
# विनोबा-जीवन-दर्शन

लेखक - शिवाजी न. भावे

(आबा)



# अनुक्रमणिका

# विनोबा - जीवन - दर्शन

अनुक्रमणिका

# विनोबा - जीवन - दर्शन

[ब्रह्मचर्य, ब्रह्मजिज्ञासा, ब्राह्मी स्थिति, ब्रह्मविहार,
ब्रह्मविद्या-मंदिर, ब्रह्मनिर्वाण]

**शिवाजी न. भावे**
**(आबा)**

**महाराष्ट्र-राज्य साहित्य-संस्कृति-मंडळ**
**मुंबई**

अनुक्रमणिका

**प्रथमावृत्ती** : ऑगस्ट, १९८४

**प्रकाशक** : सचिव,
महाराष्ट्र राज्य साहित्य-संस्कृति-मंडळ,
मंत्रालय, मुंबई—४०० ०३२.

© **प्रथमावृत्ती**
**प्रकाशकाधीन**

**मुद्रक** : व्यवस्थापक,
शासकीय मुद्रणालय आणि ग्रंथागार,
सिव्हील लाईन्स, नागपूर—४४० ००१.

[**किंमत : ९० रुपये**]

## अनुक्रमणिका

# थोडेसे प्रारंभिक

१५ नोव्हेंबर १९८२ ला पूज्य विनोबाजींचा आत्मा ब्रह्मात विलीन झाल्याची बातमी आली. प्रत्येक नश्वर देहाला पंचत्वात विलीन व्हावेच लागते. पण सर्वांच्याच विलीन होण्याची नोंद घेण्यात येत नसते. विनोबाजींचे व्यक्तित्व हे असामान्य. श्री. अरविंदांनी आपल्या कल्पनेतला महामानव रंगविताना महात्मा गांधी आणि विनोबा यांचे चित्र डोळ्यासमोर ठेवले असेल किंवा नाही कोण जाणे. पण माझ्यासारखा सामान्य माणूस जेव्हा माणसातल्या या हिमालयाकडे पाहातो तेव्हा तत्त्वज्ञांनी वर्णन केलेला महामानव तो हाच, असे त्याला वाटल्यावाचून रहात नाही. स्वभावविशेषाच्या भिन्नतेमुळे गांधी, नेहरू, विनोबा, अरविंद, रवीन्द्रनाथ, मार्क्स, रसेल, शंकराचार्य, ज्ञानेश्वर हे वेगवेगळे भासतील हे खरे. पण हे सगळेच महामानव होते यांत शंका नाही. पूज्य विनोबांचे सगळेच सामान्य माणसापेक्षा वेगळे. त्यांचे चालणे, बोलणे, वागणे वेगळे. त्यांचे मरण पण वेगळे. मी विनोबांना प्रथम १९३३–३४ सालात पाहिले आणि त्यानंतर त्यांना अनेकदा पाहिले. गांधीवादी अर्थशास्त्रावर त्यांच्याशी थोडीशी चर्चाही केली आणि त्यातून मला कळले ते एवढेच की, ज्यांना महामानव म्हणता येईल त्यांपैकी विनोबा हे एक. मी त्यांना पाहिले आणि त्यांच्याशी बोललो तेव्हा ते गांधींच्या वर्धा परिसरातील आश्रमांचे प्रमुख होते. त्या काळात विनोबाजींप्रमाणेच इतरही महान् व्यक्तींची माझी भेट झाली. वल्लभभाई (त्यांना पुढे वल्लभस्वामी म्हणू लागले), मनोहरजी दिवाण, अण्णासाहेब सहस्रबुद्धे, बाबाजी मोघे, श्री. वाळुंजकर, श्री. जे. सी. कुमारप्पा आणि श्री. भारतन् कुमारप्पा यांच्याही माझ्या भेटी याच काळातल्या. पण या सर्व मोठ्या लोकांतही विनोबाजींचा वेगळेपणा काही औरच होता. त्या काळात विनोबाजींना बाबा म्हणत असत की नाही हे मला आठवत नाही. पण विनोबाजींनी तेव्हा दाढी ठेवली नव्हती आणि चालण्या वागण्यात ते आम्हाला गांधीजींसारखेच वाटत असत. विनोबाजींची पुष्कळ व्याख्याने त्यावेळेला मी ऐकली होती. विद्यार्थी चळवळीसही विनोबाजींनी आशीर्वाद दिला होता. पण विनोबाजी जगाला त्या काळात फारसे ज्ञात नव्हते. एका रीतीने हा त्यांच्या महामानवतेच्या तयारीचा, तपश्चर्येचा काळ होता. या तपश्चर्येमुळेच त्यांची महामानवता विश्वाच्या क्षितिजावर फाकली. महात्मा गांधींनी वैयक्तिक सत्याग्रहाच्यावेळी पहिले सत्याग्रही म्हणून विनोबांची निवड केली आणि विनोबाजी प्रकाशात आले. वैयक्तिक सत्याग्रहातील दुसरे सत्याग्रही पंडित जवाहरलाल नेहरू. पंडित नेहरू हेही महामानव. पण विनोबा आणि नेहरू यांची विजीगिषा वेगळ्या प्रकारची. गांधीजींचा तात्त्विक, आध्यात्मिक वारसा हा विनोबांकडेच आला आणि तो शेवटपर्यंत तसाच राहिला. सर्व जगाला हलवून सोडणारी भूदानाची चळवळ विनोबांनी केली. पण त्यातून त्यांनी 'राजकारण' मात्र उत्पन्न केले नाही. जयहिंदच्या राजकीय, सामाजिक गर्जनेऐवजी त्यांनी 'जय जगत्' चा नारा दिला. 'जय जगत्' चा खरा अर्थ जय मानव असा आहे. 'जय जगत्' हे मानवतेच्या तत्त्वज्ञानाचे आणि चळवळीचे घोषवाक्य, पण या चळवळीचा उपयोग करून राजकीय झोतात यावे असे त्यांना कधीही वाटले नाही. गांधीजींच्या तत्त्वज्ञानामागील तात्त्विक अधिष्ठात्याची जागा ही विनोबाजींचीच. विनोबाजी ऋषी होते. तत्त्व जाणणारे होते. ब्रह्म जाणणारे म्हणून ब्राह्मण होते. ब्राह्मणाचे कार्य हे मार्गदर्शकाचे, गुरुचे, न्यायाधीशाचे. त्यातूनच विनोबाजींच्या आचार्य कुलाची कल्पना पण निघाली.

पण जन्मतांना महामानव आणि सामान्य बालक यांत अंतर नसते. बुद्धीचा आणि आनुवंशिक मानवी संपदेचा काही स्वतंत्र वाटा त्याच्याकडे असणारच. परंतु, अशा बालकाचे महामानवामध्ये परिवर्तन होत असताना होणारी प्रक्रिया ही फार महत्त्वाची असते. हीच खरी शिक्षणाची प्रक्रिया. मानववंशाचा हाच खरा सांस्कृतिक वारसा. ही प्रक्रिया टिपणे, हा वारसा टिकविणे हे मानवी इतिहासाचे मुख्य कार्य आहे. पूज्य विनोबांच्या बाबतीत त्यांचे साक्षात् बंधू श्री. शिवाजीराव भावे यांनी ही विनोबांच्या विकासांची प्रक्रिया टिपली आहे. श्री. शिवाजीराव भावे हे केवळ त्यांचे बंधूच नाहीत. विनोबांप्रमाणे तेही आश्रमवासी आहेत. त्यांची ही

अनुक्रमणिका

फार मोठी तपश्चर्या आहे. अशा माणसालाच विनोबासारख्यांच्या आयुष्यात उत्पन्न झालेल्या संवेदना व्यवस्थित टिपता येणार.

विनोबाजी ज्या दिवशी गेले त्या दिवशीच मी माझ्या मनाशी संकल्प केला होता की, साहित्य-संस्कृति-मंडळातर्फे पूज्य विनोबाजींचे चरित्र प्रसिद्ध करावे. कु. निर्मला देशपांडे, श्री. रमाकांत पाटील, श्री. म्हसकर, श्री. गौतम बजाज आणि विनोबाजींचे खाजगी चिटणीस श्री. बाळ विजय इत्यादींच्या सहकार्यामुळे विनोबाजींचे चरित्र आज प्रसिद्ध करण्याचा योग येत आहे. शासकीय मुद्रणालय नागपूरचे व्यवस्थापक श्री. बेसिल ब्रेकन सहाय्यक व्यवस्थापक श्री. रामचंद्र प्रभुदेसाई आणि इतर सर्व सेवकवर्ग यांनी अत्यंत आपुलकीने या ग्रंथाचे सुंदर मुद्रण करून दिले. ब्रह्मविद्यामंदिर, पवनार येथील आश्रमवासीयांच्या मदतीशिवाय तर हे चरित्र प्रकाशात येणे शक्यच नव्हते. या सर्वांचा आणि ग्रंथलेखक श्री. शिवाजीराव भावे उर्फ आबा यांचा, तसेच साहित्य-संस्कृति-मंडळाचे सदस्य व सेवकवर्ग या सर्वांचा मी ऋणी आहे.

भारताच्या पंतप्रधान श्रीमती इंदिरा गांधी यांच्या हस्ते या चरित्राचे प्रकाशन व्हावे असे मला वाटत होते. त्यांनी हे चरित्र प्रकाशित करावयाचे कबूल केले. त्यांच्याप्रती मी माझी कृतज्ञता व्यक्त करितो.

पूज्य बाबांचे चरित्र मजकडून प्रसिद्ध होणे हा माझ्या आयुष्यातील एक महत्त्वाचा क्षण आहे असे मी मानतो.

४२, 'यशोधन' :
मुंबई—४०० ००१.
दिनांक ९ जुलै १९८४.

**सुरेन्द्र बारलिंगे,**
अध्यक्ष,
महाराष्ट्र-राज्य साहित्य-संस्कृति-मंडळ,
मुंबई.

अनुक्रमणिका

# किंचित् निवेदन

## विनोबा-जीवन-दर्शन

(१) आमची आई ‘अनंतकोटि ब्रह्मांडनायका’ पूजेच्या वेळीं रोज म्हणत असे. अनंतकोटि ब्रह्मांडनायकाला कोण जाणूं शकेल? तसें च पू. विनोबाजी म्हणत माझें आंतरिक जीवन कोणी च जाणूं शकणार नाहीं. तें मी च माझें जाणतों. ‘जाणसी तें तुझें तूं चि प्रत्यक्ष पुरुषोत्तमा’ हें च खरें.

(२) परंतु, गांधीजींप्रमाणें च स्थितप्रज्ञतुल्य असणाऱ्या पू. विनोबाजींनीं स्थितप्रज्ञदर्शन, गीताप्रवचनें आणि गीताई हें जें साम्ययोग जीवन-दर्शन करविलें त्यांत त्यांचें किंचित् आंतरिक जीवन अवभासित होतें असें वाटतें.

(३) ज्याप्रमाणें ‘दुग्धं गीतामृतं महत्’ म्हणतात तें दूध ज्यानें जन्मांत पाहिलें नाहीं त्याला दुरून उताला गेलेलें दूध अवभासित होतें तसें पू. विनोबाजींचें जीवन म्हणजे आंतरिक जीवन किंचित् अवभासित् होतें न होतें असें म्हणतां येईल.

(४) अथवा ज्यानें कधीं हि कमलसरोवर पाहिलें नाहीं त्याला स्फुटकमलसुगंधी मंद वाऱ्याबरोबर कमलसुगंध थोडा मिळाला म्हणजे पू. विनोबाजींच्या आंतरिक जीवनाचा किंचित् सुगंध प्राप्त होतो न होतो असे म्हटल्यावाचून राहवत नाहीं.

(५) खरोखर विनोबाजींचें जीवन-दर्शन हें कमलाप्रमाणें अलिप्त, पवित्र आणि सर्वांगशुद्ध आहे यांत शंका नाहीं. तें जीवन-दर्शन सहस्रदल उत्फुल्ल अम्लान कमलाप्रमाणें नित्यनूतन दरवळणारें आहे ही हि गोष्ट स्पष्ट आहे.

(६) माझ्याकडून सर्वात्मक ईश्वरकृपेनें लिहिलें गेलेलें पू. विनोबांचें जीवनदर्शन हें एक प्रकारें उत्तरोत्तर विजय च विजय मिळवीत गेलेलें महापुरुष-दर्शन आहे. त्याला महाकवि भवभूतीचे च शब्द उत्तम रीतीनें लागू पडतात :

**प्रियप्राया वृत्तिर्विनयमधुरो वाचिनियमः**
**प्रकृत्या कल्याणी मतिरनवगीतः परिचयः ।**
**पुरो वा पश्चात् वा तदिदमविपर्यासितरसं**
**रहस्यं साधूनामनुपधि विशुद्धं विजयते ॥**

**शिवाजी न. भावे**
(आबा)

अनुक्रमणिका

# अनुक्रमणिका


थोडेसे प्रारंभिक........ 6

किंचित् निवेदन........ 8

प्रकरण १ ले घर ........ 15

प्रकरण २ रे उपासना ........ 20

प्रकरण ३ रे आई ........ 24

प्रकरण ४ थे योगी........ 36

प्रकरण ५ वे विश्वमित्राचें श्रीफल........ 46

प्रकरण ६ वे गुरुत्वमध्य ........ 50

प्रकरण ७ वे मातृदर्शन ........ 56

प्रकरण ८ वे ब्रह्मचर्य ........ 61

प्रकरण ९ वें बडोदे ........ 68

प्रकरण १० वें प्राथमिक शाळेतील अभ्यास ........ 74

प्रकरण ११ वें वडिलांचे शिक्षण........ 79

प्रकरण १२ वे हायस्कूल ........ 83

प्रकरण १३ वे वैराग्य........ 87

प्रकरण १४ वें देशसेवेची तयारी ........ 94

प्रकरण १५ वें विद्यार्थी - मंडळ ........ 99

प्रकरण १६ वें पूर्व - तयारी ........ 104

प्रकरण १७ वें अथातो ब्रह्मजिज्ञासा........ 109

प्रकरण १८ वें काशी........ 113

प्रकरण १९ वें कर्मयोगाची कसोटी ........ 117

प्रकरण २० वें भक्तांची धाव ........ 122

प्रकरण २१ वें पुनरागमन........ 132

प्रकरण २२ वें संधि-काल ........ 137

प्रकरण २३ वें वांई........ 144

प्रकरण २४ वें विद्यार्थी मंडळाची समाप्ति........ 151

प्रकरण २५ वें मृत्यूचें दर्शन........ 154

प्रकरण २६ वें सत्याग्रहाश्रम—साबरमती ........ 160

प्रकरण २७ वें बापूजी........ 171

प्रकरण २८ वें कर्मयोगी आणि संन्यासी........ 191

प्रकरण २९ वें वर्ध्याचा भगीरथ ........ 197
प्रकरण ३० वें वर्धा आश्रमाची सुरुवात........ 203
प्रकरण ३१ वें घास बंगला........ 211
प्रकरण ३२ वें महाराष्ट्र - धर्म ........ 223
प्रकरण ३३ वें झेंडा—सत्याग्रह ........ 229
प्रकरण ३४ वें महाराष्ट्र - धर्म साप्ताहिक ........ 237
प्रकरण ३५ वें नवीन आश्रम ........ 244
प्रकरण ३६ वें राष्ट्रीय-शाळा ........ 263
प्रकरण ३७ वें कन्या-शाळा........ 270
प्रकरण ३८ वें मूळ विचारपोथी ........ 276
प्रकरण ३९ वें स्वयंभू महादेवाची प्रदक्षिणा ........291
प्रकरण ४० वें आचार्यांचे अद्भुत त्रिविध दर्शन ........ 305
प्रकरण ४१ वें वृक्षच्छेद ........313
प्रकरण ४२ वें कर्मयोगी भक्तांची विश्रांति व समाधिबोध ........321
प्रकरण ४३ वें गीताई........ 324
प्रकरण ४४ वें मंदिरें आणि पाणवठे........ 346
प्रकरण ४५ वें धुळें-जेल........ 354
प्रकरण ४६ वें कॉटन मार्केट (कापूस बाजार)........361
प्रकरण ४७ वें कन्याश्रम........ 367
प्रकरण ४८ वें प्रीतिसंगम........371
प्रकरण ४९ वें ज्ञानगंगेचे कांहीं संवाद-बिंदु........381
प्रकरण ५० वें प्रवासांतील कार्यक्रम ........411
प्रकरण ५१ वें दोन आश्रम........421
प्रकरण ५२ वें ग्रामसेवा मंडळ ........ 443
प्रकरण ५३ वें गीताईचा प्रचार........ 449
प्रकरण ५४ वें परंधाम—पवनार—आश्रम........ 455
प्रकरण ५५ वें फैजपूर कॉंग्रेस ........ 468
प्रकरण ५६ वें अद्वितीय सत्याग्रही........ 474
प्रकरण ५७ वें अद्वैत दर्शन........481
प्रकरण ५८ वें महारोगी सेवा मंडल ........ 490
प्रकरण ५९ वें द्वितीय सत्याग्रह : साद्यंत वृत्त........ 494

प्रकरण ६० वें खटल्याचा दिवस ........ 533
प्रकरण ६१ वें निकालाचा दिवस ........ 536
प्रकरण ६२ वें सत्याग्रहाची परिसमाप्ती ........ 537
प्रकरण ६३ वें मद्रासकडील दौरा ........ 541
प्रकरण ६४ वें वर्धा-यात्रेचे वीस दिवस ........ 547
परिशिष्ट ........ 643
पूज्य विनोबाजींचे कवितेत पत्र ........ 643
गोपाळराव काळे यांस पत्र ........ 643
पू. बापूंना वांईहून पाठविलेले पत्र (१०-२-१९१८) ........ 647
श्रुतिमाउली—वेद (१९१८) ........ 650
आईच्या मांडीवर (१८-४-१९५८) ........ 651
मोघेजींचा आश्रमप्रवेश (२४-१०-१९२१) ........ 653
गोपाळराव काळे यांचा आश्रमप्रवेश (१९२२) ........ 654
वायकोम सत्याग्रह (१९२४) ........ 655
ऐक्यपरिषदेंत दिल्लीला (१९२४) ........ 655
विनोबाजी बापूंना भेटण्याला पुण्याला (२४-१-१९२४) ........ 656
मनोहर बळवंत दिवाण यांचा आश्रमप्रवेश (१९२६) ........ 656
शांति (२२-१०-१९३१) ........ 657
नवजीवन साहित्यमंदिराचे उद्घाटन (९-१-१९३४) ........ 657
विनोबा गागोदें गांवीं (१९३५) ........ 658
विनोबांचें ४० वर्षें झालीं म्हणून अल्प निरीक्षणपर पत्र (७-९-१९३५) ........ 659
विनोबाजींची प्रकृति सुधारली (१९३८) ........ 659
पू. विनोबाजींना खणतांना भरतराम मूर्ति सापडली (१९३८) ........ 660
पू. जमनालालजींचा स्वर्गवास (१२-२-१९४२) ........ 660
पू. विनोबांचा वेलोर जेलमधें उपवास (३-३-१९४३) ........ 661
पहिली गोसेवा परिषद् (१-२-१९४७) ........ 661
विनोबांचें सुरगांवला रोज भंगीकाम (२-४-१९४७) ........ 661
वडिलांचा (न. शं. भावे) स्वर्गवास (२९-१०-१९४७) ........ 662
गांधीजींचें बलिदान १३ दिवस ........ 663
सेवाग्राम रचनात्मक कार्यकर्ता संमेलन ........ 666
विनोबाजींच्या पोटांत अल्सर ........ 672

राजघाट दिल्ली येथें झालेलें विनोबाजींचें प्रार्थनोत्तर भाषण ........................................ 672
जयपूरला गोसेवा संघाचें उद्‌घाटन.............................................................. 672
कॉँग्रेसभवन, पुणें : प्रार्थनोत्तर प्रवचन............................................................ 672
पू. विनोबाजींच्या उरुळी कांचन येथें एक सप्ताह विश्राम........................................ 673
कांचनमुक्तीचा प्रयोग.................................................................................. 674
गीताई-शब्दार्थ-कोश .................................................................................. 674
भूदान गंगा.............................................................................................. 675
ब्रह्मविद्या-मंदिर ........................................................................................ 679
हिंदुधर्माची व्याख्या .....................................................................................681
पू. किशोरलाल मश्रूवाला यांचा स्वर्गवास........................................................ 682
चांडीलाचा आजार..................................................................................... 682
पू. विनोबाजींना रॉयल मेगॅसिस पारितोषिक..................................................... 683
आजोबांच्याकडे पुन्हां विनोबाजी................................................................... 684
जीवन महामंत्र........................................................................................... 684
अमृतसरमध्यें साहित्यिकांची परिषद................................................................ 685
चंबलघाटी क्षेत्रांत डाकूंचें आत्मसमर्पण ........................................................... 685
अशोभनीय पोस्टर सत्याग्रह ........................................................................... 686
सुरगांवला नानाजी महाराज यांचा स्वर्गवास...................................................... 686
पू. विनोबाजींनीं स्थापन केलेले ६ आश्रम .......................................................... 687
मेथे मास्तरांचा स्वर्गवास.............................................................................. 688
पू. विनोबाजी टॉयफाइडनें आजारी................................................................. 688
डॉ. रा. ना. दातार यांचा अकोला येथें स्वर्गवास ................................................. 689
लालबहादुर शास्त्री पू. विनोबांच्या भेटीला ....................................................... 689
भाषा प्रश्नावर पू. विनोबाजींचें उपोषण्............................................................. 690
महिला लोकयात्रा ....................................................................................... 690
जे. पी.—जयप्रकाश नारायण.........................................................................691
स्वामी आनंद............................................................................................. 692
विश्वमहिला संमेलन .................................................................................... 693
गीताई मंदिराचें उद्‌घाटन .............................................................................. 693
मृत्यूचें दर्शन (पूज्य बाळकोबाचें स्वर्गगमन) ....................................................... 694
पू. काकासाहेब कालेलकर ............................................................................. 696

कै. पू. बाळूभाई मेहता ऊर्फ काकाजी ........ 697
गोहत्त्या-बंदीसाठीं सत्याग्रह ........ 697
पवनार आश्रमांत ........ 698
महापरिनिर्वाण ........ 700
पत्रांजली ........ 707
समापन ........ 709
पूज्य विनोबाजींचे चरित्रकार ........ 710
विनोबा - साहित्य - सूची ........ 713
विनोबांचा जीवन पट ........ 715

# विनोबा-जीवन-दर्शन

ब्रह्मचर्य, ब्रह्मजिज्ञासा, ब्राह्मीस्थिति,
ब्रह्मविहार, ब्रह्मविद्यामंदिर, ब्रह्मनिर्वाण

★

वेद-वेदांत-गीतानां
विनुना सार उद्धृतः
ब्रह्म सत्यं जगत् स्फूर्तिः
जीवनं सत्य-शोधनम्॥

★

वेदांतो विज्ञानम्
विश्वासश् चेति शक्तयस् तिस्रः
यासां स्थैर्ये नित्यम्
शांति-समृद्धी भविष्यतो जगति॥

अनुक्रमणिका

# पूज्य विनोबा भावे जीवन-दर्शन

## प्रकरण १ ले

### घर

**डो**ळे उघडल्यापासून बालकाला जें जें कांहीं दृष्टीस पडूं लागतें तें सर्व दृश्य त्याला अत्यंत महत्त्वाचें वाटतें. तो अत्यंत एकाग्र चित्तानें प्रत्येक वस्तु आपल्या अंतःकरणांत सांठवून ठेवतो. किती का क्षुद्र वस्तु असेना, बालकाला तिच्यांत महान अर्थ सांठवलेला दिसतो. महत्त्वाचें, गैरमहत्त्वाचें असें त्याला कांहीं च नाहीं. सर्व कांहीं सत्यं शिवं सुंदरम्! साधारण बालमनाची ही स्थिति, मग ज्ञानेश्वरांनीं म्हटल्याप्रमाणें :—

**अथवा ज्ञानाग्निहोत्री । जे परब्रह्मसुक्षेत्रीं**
**महासुखक्षेत्रीं । आदिवंत ॥**
**जे सिद्धांताचिया सिंहासनीं । राज्य करिती त्रिभूवनीं**
**जे कूजती कोकिल वनीं । संतोषाच्या ॥**
**जे विवेकद्रुमाच्या मुळीं । बैसले आहाति नित्यफळीं**
**तया योगियांच्या कुळीं । जन्म पावे ॥**

असे जे योगभ्रष्ट असतील त्यांच्या चित्तांत आयुष्याच्या प्रभातकालीं आसपासच्या दृश्यानें केवढी खळबळ उडाली असेल! ज्या जमिनींतून, ज्या हवापाण्यांतून त्याच्या ज्ञानाला कोंब फुटले त्याचें कोण वर्णन करणार! त्याचें किंचित् स्थूल वर्णन मात्र शक्य आहे.

तें पहा कोंकणांतलें एक लहानसें खेडें. घरांवर कौलें देखील नाहींत. पेंढ्यानें शाकारलेल्या छोट्या छोट्या झोंपड्यांचा समूह म्हणजे च कोंकणांतलें खेडेगांव. तेथें विटा तरी कोठून मिळणार? कारवीच्या भिंती. जिकडे तिकडे भातशेती. लंगोटी लावलेले कुणबी लोक. आजूबाजूला किर्र्र् झाडी. डोंगराचा वेढा पडलेला. मधून मधून मोठमोठे काळे दगड अस्ताव्यस्त पसरलेले. कळकाची बेटें. ठिकठिकाणीं करवंदांच्या काळ्याभोर जाळ्या. असा सगळा देखावा. छोटीं छोटीं गुरें डोंगरावर चरत असावयाचीं. कंबरेला कोयता लटकावलेलीं कुणब्यांचीं पोरें त्यांच्यामागून फिरत असावयाचीं. मौजेनें मधून मधून एकादें गाणें गुणगुणावें, मधेंच गोफणीनें दगड मारण्याचा खेळ खेळावा, एखादा पाडाला लागलेला आंबा पाडावा, करवंदें खावीं, असा त्यांचा क्रम,

अशा त्या खेड्यांत एखादा प्रवासी आला तर त्याला उतरण्याला शंभुराव भाव्यांचें एकच एक घर. कुणब्याच्या पोरांना विचारीत विचारीत प्रवासी आला कीं प्रथम च त्या झोंपड्यांच्या गांवांत विटांनीं बांधलेलें तें घर गांवाच्या मध्यभागीं त्याला आढळावयाचें. दांडीवर लुगडीं, धोत्रें वाळताहेत. दुपारचीं जेवणें झालीं आहेत. बाहेर कावळे खरकट्या भांड्यांजवळ काव् काव् करीत आहेत. बाया मंडळी अंमळ विश्रांति घेत आहेत. जिकडे तिकडें शुक्क होऊन गेलें आहे. अशा वेळीं जरी कोणी पाहुणा आला तरी त्याची व्यवस्था व्हायची च. इतकें च काय, पण रात्रीं बेरात्रीं कित्येक पाहुणे यावयाचे. पाऊस पडत असावयाचा. लांकडें ओलीं चिंब् झालेलीं असावयाचीं तरी सुद्धां वाटसरूंसाठीं स्वयंपाक-पाण्याची व्यवस्था झाली नाहीं असें

व्हावयाचें नाहीं. अतिथि-सेवा तप्तरतेनें व्हावयाची च. कारण आर्य संस्कृतींत अतिथि देवाप्रमाणें मानला जातो.

प्रवासी फाटकांतून आंत शिरला कीं प्रथम मोठमोठीं भातासाठीं केलेलीं लांकडाचीं कोठारें त्याला दिसावयाचीं. ओटीच्या खालच्या बाजूला कातकरी किंवा कुणबी मजुरीबद्दल भात मागण्यासाठीं आलेले उकिडवे बसलेले दिसावयाचे. ओटीच्या वरच्या बाजूला बैठकीवर बहुधा मध्यम वयाचे गृहस्थ लोडाशीं टेकून बसलेले आढळावयाचे. गोपाळराव भावे ते हे च! स्वभाव मोकळा, दिलदार, बुद्धि तीव्र. मुलांना शिकवण्यांत हातखंडा. विषय ठसविण्याकडे विशेष लक्ष. मुलांना गोखल्यांचें गणित, वृत्तदर्पण, बाळमित्र, इसापनीति, हरि आणि त्रिंबक शिकवितांना मोठी मौज वाटावयाची. ते शिकवितांना :

**य यमाचा न नयन त ताराप र राधिका ।**
**म मानावा स समरा ज जनास भ भास्कर ॥**

या कवितेची तर मुलांना फार च गंमत वाटे.

**होडीवाला नावाडी वल्हव वल्हव वल्हवितो ।**
**चटणीवाला चटणी घाट घाट घाटीतो ॥**

असे गंमतीचे पाठहि तार स्वरांत चालत. दिवसभर मग मुलांच्या तोंडी त्यांची सारखी आवृत्तिहि व्हावयाची च.

ओटीच्या दुसऱ्या बाजूला एका मोठ्या लांकडी चौरंगावर एक साठीच्या सुमाराचा आंधळा गृहस्थ सदोदित बसलेला असावयाचा. कधीं पत्रावळी लावा यात, कधीं चोया कराव्या, गड्यामाणसांना कामें सांगावीं. दोर वळावेत. परवचा पाढे मुलांना शिकवावेत. असा त्या गृहस्थाचा एकसारखा उद्योग चालूंच असे. आंधळा म्हणून रिकामा कधीं च नसावयाचा. भल्या पहांटेस उठून घरचें सगळें पाणीहि यानें च भरावें. घरच्या सर्व माणसांवर वडिलपणाचा दरारा आणि प्रेमळ दृष्टि असें हें आंधळ्या माणसाचें दिव्य दर्शन नित्य ओटीवर व्हायचेंच. या गृहस्थाचें नांव 'आंधळे काका' असें पडलें होतें. हें भले गृहस्थ वयाच्या नवव्या वर्षापासून आंधळे झाले. यांचा या घरच्या मंडळीशीं नात्याचा दूरचा हि संबंध नाहीं. परंतु आपलें सर्व आयुष्य त्यांनीं या घरांत घालविलें. आपल्या सच्छील, उद्योगी आणि नेमस्त वर्तनानें ते सर्वांना पितृतुल्य वाटत. सार्थ जीवन त्यांच्या ठिकाणीं मूर्तरूपानें अवतरलें होतें!

त्यानंतर ओटीवर वावरणारे ते गरीब गडी दिसावयाचे. खाण्याला कांदा भाकर. आंथरण्याला घोंगडी. इतकें असलें म्हणजे बस. घरांत सकाळपासून संध्याकाळपर्यंत राबावें हा त्यांचा देहस्वभाव च. "ए अनु, ए दामा, ए कुशा" घरांतल्या माणसांच्या हांकावरून त्यांचीं नांवें तेव्हां च लक्षांत यावयाचीं. घटकेंत मुलांना खेळवावें तर घटकेंत धान्य मोजावें. लगे च सारवण्याचें काम तर मधें च भांडी घासण्याचें काम निघावयाचें. अथवा एकदम गाडी जुंपून परगांवीं जाण्याची तयारी त्यांना करावी लागावयाची. त्यांचीं काळीकभिन्न गोटीदार शरीरें सतत कामाला तयार च असावयाचीं. त्यांचा कित्येक मुलांना इतका लळा असावा कीं आई रागे भरली तर उलट, "दामाला सांगेन" अशी दटावणी त्यांनीं आईला द्यावी.

ओटीच्या पुढच्या बाजूला काळ्या रंगाचा 'वाघ्या' कुत्रा नेहमीं पहारा करीत असावयाचा. कधीं घरांत शिरावयाचा नाहीं. कधीं लडिवाळपणा नाहीं. आपलें काम बरें कीं आपण बरें. भाकरी सुद्धां सर्वांचीं जेवणें झाल्यावर त्याला मिळावयाची. पण तेवढ्या तुकड्यावर तो आपला कर्मयोग बजावावयास राजी च.

तसा च तो पांढरा सफेत 'पांड्या' कोंबडा हि ओटीवर दाणे टिपीत मधून मधून 'कु-कू-कू' ओरडतांना आढळावयाचा. सकाळीं पहांटे उठणें त्याचें कधीं च चुकावयाचें नाहीं.

ओटीपासून जरा दूर गुरांचा स्वतंत्र गोठा दिसावयाचा. तेथें सकाळ संध्याकाळ कासंडींत काढल्या जाणाऱ्या दुधाच्या धारांचा संमिश्र मंजुळ ध्वनि कानीं यावयाचा. गोमातेचें मुलांना केवढें कौतुक! ज्यानें त्यानें म्हणावें ही माझी गाय, ही माझी गाय! लगे च कोणी म्हणावें—

**गाय गाईत्री । म्हैस सावित्री**
**बैल नंदी । रेडा पापी ॥**

ते मंगळ्या आणि मोत्या बैल तर मुलांचे आणि गड्यांचे जीव कीं प्राण. मात्र गाडींत बसलें असतांना त्यांना धावडवतांना पराण्या टोंचताना कोणास कांहीं च वाटावयाचें नाहीं. इनामदारांचे बैल सर्व गाड्यांच्या पुढें गेले च पाहिजेत! असा हा सगळा घराच्या पुढच्या बाजूचा देखावा झाला.

मागच्या दारीं अंगणामधलें ते कलमी आंब्याचें झाड आपली छाया आणि उन्हाळ्यांत मधुर फळें देण्यासाठीं उभें च असावयाचें. जवळ च त्याच्या अगदीं उलट,—

**प्रतिपाळ तरी पाटाचा । तुळशियेच्या झाडाचा**
**परी फळां फुलां छायेचा । आश्रय नाहीं ॥**

असें वृंदावनांतलें तुळशीचें झाड. नित्यपूजेमुळें गंध-कुंकू-हळद यांचा एक छोटा साठा च झालेला दिसे. येथेंच बाया मंडळी सकाळच्या प्रहरीं वालांच्या डाळिंब्या सोलीत बसत. मुंज झालेल्या मुलांना भटजी येथें च शेंडी ओढून 'धि-यो-यो-नः प्रचोद्यात्' चा पाठ द्यावयाचे. बिचाऱ्या मुलांना 'शेंडी तुटो कीं पारंबी तुटो' या म्हणीची आठवण यावयाची. म्हणजे असें कीं एक तर माझी शेंडी तुटो किंवा या आंब्याची पारंबी तरी तुटून भटजीच्या डोक्यावर पडो. कांहींतरी होऊन ही यातायात एकदां सुटो. या तुळशीजवळ च एक पेरूचें झाड असे. कावळे सतत पेरूवर टोंचा मारावयाचे. तसेच जवळ नारळाचें उंच च उंच झाड दिसावयाचें. त्याला या मृत्युलोकाची पर्वा च नाहीं. जेव्हां पहावें तेव्हां आकाशाशीं गुजगोष्टींत मग्न. अंगण उतरून विहिरीकडे जावयाचे म्हणजे ऊंबराला टाळतां यावयाचें नाहीं. दत्तात्रेयाचें मूर्तिमंत स्मरण च तें! पण त्याचीं फळें मात्र विनाकारण पायाखालीं चिरडावयाचीं. तेथेंच प्राजक्ताचा सडा पडलेला. शेवग्याच्या शेंगा लोंबताहेत, अगस्त्याचीं फुलें डुलताहेत, असा देखावा दिसावयाचा. सीताफळ आणि रामफळाचीं झाडें हि बाहेरच्या बाजूस जवळ च पण घराच्या पाठीमागच्या बाजूला आपल्या फळांनीं मुलांचा लोभ वाढवीत असावयाचीं. बऱ्याच वळणावळणाच्या पायऱ्या उतरून गेल्यानंतर कुठें ती विहीर लागावयाची. विहीर जरी खोलांत असे तरी तिचें पाणी प्याल्याबरोबर,—

**'अत्यंत सरस हृदयो यतः परेषां गुण गृहीतोसि'**

अनुक्रमणिका

हा उद्‌गार अंतःकरणांत सहज च उदित व्हावा. विहिरीच्या बाजूला एक हांडा सदोदित तापत असावयाचा. विहिरीच्या जवळच्या कुंपणाबाहेर कुणब्यांची विहीर असे. तेथें पोहऱ्याचा एकसारखा ‘डुबक् डुबक्’ आवाज चाले. शेजारीं च एक केळीचा बाग व समोर च लहानसें तळें असे. पावसाळ्यांत या तळ्यांत मंडुक स्तुति सुरूं व्हावयाची ती ‘न भूतो न भविष्यति.’ ‘डरांव् डरांव्’ चा आवाज संपायचा च नाहीं. तळ्यासमोर डोंगराच्या पायथ्याशीं एक पडकें बल्लाळेश्वराचें देऊळ दिसे. कधीं कधीं त्या देवाची पूजा होत असे. बाकी तो ‘उपाशी-विठोबा’ या नांवाला च ज्यास्त पात्र असे. पण घरासमोरच्या महादेवाच्या देवळाचें तसें नसे. त्यांत नेहमीं गांवचे लोक पूजा करावयास यावयाचे. प्रत्येकाची येण्याची वेळ आणि पूजेचा प्रकार भिन्न भिन्न असावयाचा. कोणी नुसता बेल च वाही तर कोणी त्याबरोबर चार फुलें हि वाही. कोणी फार घाईंत असे तर कोणाची पूजा अगदीं स्वस्थपणें व्हावयाची. कोणी ‘बंऽऽभोलानाथ’ ची गर्जना करून आगमन ललकारी तर कोणाचें नुसत्या घंटेवर भागे. या देवळाभोंवतीं नेहमीं मुलें हि खेळत असावयाचीं. शिवाशिवीचा खेळ, लपंडावाचा खेळ हे च प्रमुख खेळ. त्यांत मारामाऱ्या, आरडाओरड, रडारड, पुष्कळ व्हावयाची. झोंबाझोंबीला सुरुवात होऊन भावी आयुष्यांतल्या कुंस्तीबाज मल्लगिरीची दीक्षा हि सहज च मिळें. पण ज्यांना हा ‘धकाधकीचा मामला’ सहन होत नसे; अर्थात् च जे वाङमयप्रेमी असत, ते नाना तऱ्हेचे प्रलाप काढीत. त्यांतूनच चिडवण सुरुं होऊन,—

**मुला रे मुला तुझा तांबडा च कुल्ला ।**
**तुला पाटलाच्या ओटीवरून ढकलून दिला ॥**

अशीं कवनेंहि निर्माण व्हावयाचीं. असा प्रकार बहुतेक दिवसभर चाले. तेथें खेळ खेळण्याचें दुसरें एक कारण असे. तेथें कधीं कधीं मुलांना प्रसाद मिळें. शिवाय नंदींवर चढून घंटा वाजवण्याची तलफ येथें यथेच्छ भागवून घेतां येई. अशा प्रकारें तेथला महादेव ‘पशुपति’ या नांवाऐवजीं ‘शिशुपति’ या नांवानेंच ज्यास्त शोभण्यासारखा दिसे.

शहरापासून अगदीं दूर असलेल्या त्या कोंकणातल्या खेड्यांत बालमनाला रिझविण्याचें भरपूर सामर्थ्य होतें. तिन्ही काळ आणि साही ऋतूंनीं निरनिराळ्या भावांची सामग्री सतत पुरविल्यामुळें विविधतेला कांहीं च वाण नसे. निर्दोष स्वातंत्र्याची ती एक लीला होती. निर्भयतेनें खुशाल डोंगरावर हिंडावे, खेळ खेळावेत, फळ खावी, असा सहज कार्यक्रम चाले. सृष्टीमध्यें भय ही वस्तु च नाहीं. सर्प, विंचू, वाघ, चोरं, भुतें थोर बालकाच्या सृष्टींत नाहींत च. त्यानें रात्रीं बेरात्रीं हि किर्र्र झाडींत फिरावयास जावें. त्या गाढ एकांतांत त्याच्या मनांत काय येत असेल? त्याची मनोदशा कशी ओळखणार?

**“तैसी येर येरांचिये मिळणीं । पडत आनंदकल्लोळांची वेणी ॥**
**तेथ बोधबोधांची लेणीं । बोधें चि मिरवी ॥”**

बोधाच्या लहरीवर लहरी तेथें उसळत असतील! दैवी संपत्तीचा पहिला गुण ‘निर्भयता. या निर्भयतेच्या सुरावर,—

**“वृक्षवल्ली आम्हां सोयरीं वनचरें । पक्षीहि सुस्वरें आळविती ॥”**

अनुक्रमणिका

अशा प्रकारच्या दिव्य रागांचे आरोह—अवरोह तेथें स्वेच्छेनें विहार करीत असतील? “निजगृहात्तूर्णं विनिर्गम्यताम्” या सिद्धांताचीं अनंत आंदोलनें तेथें उमटून हा एक च दिव्य रसाविष्कार निर्माण होत असेल,—

**“हे विश्व चि माझे घर”**

●●●

अनुक्रमणिका

# प्रकरण २ रे

## उपासना

**सकाळपासून** संध्याकाळपर्यंत, जन्मल्यापासून मरेपर्यंत, प्रत्येक क्रिया उपासनामय व्हावी, प्रत्येक कर्म धर्ममय व्हावें ह्यासाठीं वैदिक संस्कृतीमध्यें नाना प्रकारच्या क्रियाकलापांची रचना झाली, अनेक व्रतनियमांची परंपरा आंखली गेली, कर्मकांडाची प्रचंड इमारत उभारली गेली.

**यत्करोषि यदश्नासि यज्जुहोषि ददासि यत् ।**
**यत्तपस्यसि कौन्तेय तत्कुरुष्व मदर्पणम् ॥**
**जे खासी होमिसी देसी जे जे आचरिसी तप ।**
**जे कांही करिती कर्म ते करी मज अर्पण ॥**

हें ध्येय व्यक्तीला साध्य करतां यावें म्हणून ऋषींनीं परमकारुणिक दृष्टीनें ही सगळी खटपट केली. ह्या उपासनेच्या नाना क्रियांनीं व्यक्तीबरोबर समाजावर, कुटुंबावर, कनिष्ठांवर, लहान मुलांवर एक प्रकारची अव्यक्त संस्कारमालिका ठसत जाते. उत्तरोत्तर मनोभूमिका सात्त्विक आणि सोज्वळ होत जाते, ज्या ज्या कुटुंबात असामान्य योग्यतेचे थोर पुरुष जन्मले, बहुधा त्या प्रत्येक भारतीय कुटुंबांत अशी उपासनेची प्रचंड प्रवाहधारा वहात आलेली आहे. ह्या उपासनेच्या जीवनावर महापुरुषांच्या बीजभूत वृत्तींचें पोषण होऊन जगताला तद्वारां ज्ञानवैराग्याचीं मधुर फळें चाखावयास मिळालीं आहेत. दगडाविटांनीं स्थूल घर बनत असेल, आंतील माणसांनी त्याची कल्पना केली जात असेल; “गृहं तु गृहिणीहीनं” इत्यादि तत्संबंधीं नाना प्रकारचीं वचनें हि असतील, परंतु वैदिक संस्कृतीमध्यें घराची मध्यवर्ती कल्पना उपासना ही च आहे. मागील प्रकरणांत मुख्य घर पाहिलें. आतां उपासनेचें दर्शन करावयाचें.

सडपातळ शरीर, तोंडावर तांबुस तेज, वृद्धत्वामुळें पाठ किंचित् वांकली आहे. निवळ लंगोटी लावून झपाझप पावलें टाकीत यज्ञकुंडाला प्रदक्षिणा करीत आहेत—घरांतील उपासनेचा दीप सतत प्रज्वलित ठेवणारी ती च ही साधुमूर्ति! शंभुराव ऊर्फ रावसाहेब भावे यांचें नांव. अग्निहोत्र घेतल्यामुळें अग्नीच्या उपासनेंत दंग.

**“अग्निं परिसमोहनम् । अग्नि परियुक्षणम् ॥**

—अशा प्रकारें त्या यज्ञशाळेंत अग्नीची उपासना चालूं च असावयाची. स्वच्छ सारवलेली जमीन, तीन यज्ञकुंडें, जवळ च समिधा, स्त्रुक्, स्त्रुवें, मृगचर्म इत्यादि साहित्य पडलेलें पाहून, त्या देखाव्यामुळें त्या हजारों वर्षांच्या पुरातन ऋषीकालाचे मूर्तिमंत चित्र ह्या पुरुषाच्या द्वारें उभें आहे काय, असा क्षणभर भास होई. तीन्ही वेळ स्नान, तीन्ही वेळ संध्या, तीन्ही वेळ भस्मलेपन, तीन्ही वेळ हवन—ह्यांत खंड म्हणून कधीं पडावयाचा नाहीं. पंधरा पंधरा दिवसांनी ‘इष्टि’ यावयाची.

**“अग्नेय स्वाहा अग्नेय इदं न मम ।**
**इंद्राय स्वाहा इंद्राय इदं न मम ॥”**

अनुक्रमणिका

—असा सारखा स्वाहाकार चाले. वेदमंत्रांचा घोष व्हावयाचा. “अग्निमीळे पुरोहितम्!” हा वेदाचा पहिला मंत्र. तो अगदीं लहान मुलांना सुद्धां चिरपरिचित होऊन गेलेला. मधला प्रहर उलटून जावयाचा तरी जेवणाचा पत्ता नाहीं. मग तो पुरोडाश तयार व्हावयाचा. त्यानंतर अन्नसंतर्पण. अगदीं उत्तमांतलें उत्तम साजूक तूप बाहेरच्या मंडळींना वाढावयाचें. त्यानंतर दक्षिणा. इतरांचीं जेवणें वगैरे व्हावयाचीं. परंतु हा पुरुष उपाशी च! —बहुधा नेहमीं च दुपारीं दोन तीन वाजतां आहार घेत. चोवीस तासांत एकदांच आहार. भुईमूग, गूळ, दूध व ताक. ह्याशिवाय २५/३० वर्षांत अन्नाला शिवले हि नाहींत. हा आहारक्रम मरेपर्यंत चालूं होता.

अग्नीची उपासना नसे त्यावेळीं यज्ञशाळेबाहेर मृगचर्मांवर बसून मंत्रजप, वेदाचीं संथा देणें, गुरुचरित्राचा पाठ, भारत, भागवत, गीता यांचें श्रवण इत्यादि कामें चालूं च असावयाचीं. दिवस कलला, दुपारच्या सांवल्या सरकल्या म्हणजे औषधोपचारासाठीं रोगी यावयाचे. कोणाकडून पै हि घ्यावयाची नाहीं. बहुधा सगळीकडून जाऊन निरूपाय म्हणून आलेले रोगी च फार असत. त्यांना स्पष्ट सांगत, “माझ्या औषधाचा गुण ईश्वराच्या भक्तीशिवाय येणार नाहीं. पहा जमत असेल तर!” मग कोणाला मारुतीला प्रदक्षिणा, तर कोणाला पहांटे गंगास्नान, तर कोणाला तेथून दहा मैलांवर असलेल्या देवाचें दर्शन. अशी उपासना सांगून औषध देत. औषध सगळ्यांना एक च. पांढरी भुकटी. तिला हिऱ्याचें भस्म म्हणत. त्या औषधानें अनेक असाध्य रोग्यांना गुण येत असे. त्याशिवाय घरांतल्या अडचणी, कोर्टांतले बखेडे, आपसांतली भाऊबंदकी, पारमार्थिक साधना इत्यादि अनेक प्रकरणें घेऊन अनेक लोक येत. त्यांना हि सल्ला देत. पण सर्वांच्या जोडीला कांहीं ना कांहीं उपासना लावून देत. लोकांशीं बोलत असतां पुराणांतल्या गोष्टी निघावयाच्या, स्वतःच्या पूर्वायुष्यांतला अनुभव सांगावयाचे. ऐकतां ऐकतां लोक तटस्थ होऊन जातां आदरपूर्वक प्रणाम करून आपआपलें काम झालें म्हणजे मंडळी उठून जात.

कोणी आला गेला तरी त्यांत ते कधीं च गुंतत नसत. आपल्या उपास्यदेवतेखेरीज दुसरीकडे कुठें हि लक्ष नाहीं. फार काय घरच्या संसाराच्या गोष्टी हि ऐकत नसत. एकदां प्लेगनें आजारी पडले. सबंध गांव ओस पडलेला. परंतु भीतीचा लेश नाहीं. ईश्वराची इच्छा असेल तसें होईल हा विश्वास. आपल्या मुलांना कुटुंबांतील मंडळींनासुद्धां पत्र नाहीं. कारण लेखणी ईश्वरचरणीं वाहिलेली. दहा दिवस स्वस्थ पडले. अकराव्या दिवशीं हुशारी वाटली. तेव्हां उठले. घरांत प्लेगनें ऊंदीर मरत च होते. अंगणांत लांकडें पेटवून वेदमंत्रानें त्यांचें दहन करावें व निर्विकार मनानें आपल्या नित्यक्रमाला लागावें; हा त्यांचा त्या वेळचा क्रम असे. घरांत कोणी आजारी पडलें तर एवढे कुशल वैद्य असून पहावयाचे सुद्धां नाहींत. कांहींतरी पापामुळें दुखणें येतें ही त्यांची निश्चित समजूत होती. स्वतःसुद्धां औषध घेत नसत. एकदां थंडी वाजून ताप भरला तेव्हां लगे च उठून थंड पाण्यानें स्नान करूं लागले. आणि स्नानानंतर ताप गेला असें म्हणून पूर्ववत् आपली उपासना-कर्में करूं लागले. अशा त्यांच्या अनेक चमत्कारिक गोष्टी गांवभर आजूबाजूला सर्वांच्या तोंडीं असत.

शास्त्रांत सांगितलेलीं नाना तऱ्हेचीं व्रतें हि चालूं असत. चांद्रायण व्रतांत चंद्राच्या तिथीप्रमाणे—प्रतिपदा एक, द्वितीया दोन, तृतीया तीन—असे घांस घ्यावयाचे, त्या च प्रमाणें चंद्रोदय होईल तेव्हां च जेवावयाचे. जेवण्यापूर्वीहि अनेक विधि मंत्रतंत्र असावयाचे. देवाची आरती व्हावयाची. त्या वेळीं मध्यरात्र जरी असली तरी अगदीं लहान मुलांसकट सगळ्यांना उठवून देवाला नमस्कार करायला लावावयाचा. अशी एक ना दोन, शेंकडो व्रतें चालावयाचीं.

अनुक्रमणिका

अग्नीची उपासना, वेदमंत्रांची संथा, गुरुचरित्राचा पाठ, पुराणश्रवणे, मंत्रजप,—ह्या शिवाय शिवोपासना हा उपासनेचा फार मोठा महत्त्वाचा भाग असे. त्यांनीं तेवढ्यासाठीं कोटीश्वराचें मंदिर बांधलें. सकाळीं चार वाजतां उठून सगळ्यांच्या आधीं महादेवाची पूजा करीत. त्या प्रभातकाळच्या प्रशांत वेळीं शंकराच्या त्या देवळांत नंदादीप तेवत आहे, फुलांचा, उदबत्त्यांचा वास भरून राहिला आहे, शिवलिंगाची मोठी थोरली सांवली भिंतीवर पडली आहे. पिंडीवर थेंब-थेंब-थेंब अभिषेक गळत आहे.

**नमः शम्भवाय च मयोभवाय च नमः शंकरायच मयस्कराय च ।**
**नमः शिवाय च शिवतराय च ॥ य. १६ ॥ ४० ॥**

हा त्यांचा पाठ गाभाऱ्यांत घुमत आहे—असा पावन आणि गंभीर देखावा नित्य प्रभातकाळीं दिसे. शंकराच्या पूजेंतला आणखी एक महत्त्वाचा भाग असे. चंदनाचें गंध घांसून त्या गंधाचा शंकराचा मुखवटा तयार करावा लागे. त्यासाठीं पुष्कळ गंध लागे. घरांतल्या लहान मुलांना हि गंध घांसण्यासाठीं तास तास बसवीत.

**मना चंदनाचे परी त्वा झिजावें ।**
**परी अंतरी सज्ञनां निववावे ॥**

ह्या समर्थ वचनाचा तो पदार्थपाठ च असे. बेलाची लाखोली, पांढऱ्या फुलांची लाखोली पूजेचे असे कितीतरी प्रकार चालत. नगारखान्यावर सकाळ-संध्याकाळ देवासाठीं वाद्ये वाजत. रात्रीं आरती होई; मधून मधून उत्सव, कथा, कीर्तनें होत—गवई देवापुढें गाणीं गात. देवाच्या ह्या सर्व उपचारांसाठीं कर्ज करण्यासहि मागेपुढें पहात नसत.

सकाळीं चार वाजल्यापासून रात्रीं साडे दहा-अकरा वाजेपर्यंतचा सर्व वेळ असा उपासनेंत जाई. देवाची च उपासना, देवाचे च विचार, देवाचा च जप, देवाचें च बोलणें, त्यामुळे त्यांना स्वप्नें हि देवाचीं च पडत. नाना प्रकारचे दृष्टांत होत. “मी नित्य रामाचा जप करतों आणि माझ्या मंदिरांत तूं रामाची मूर्ति माझ्यासमोर ठेवली नाहींस त्यामुळें तुझी भक्ति असून हि मी तुझ्यावर प्रसन्न नाहीं”, असा एकदां स्वप्नांत त्यांना शंकरानें दृष्टांत दिला. झालें, ताबडतोब संगमरवरी रामाची मूर्ति करवून शंकरासमोर स्थापन केली. हे दृष्टांत म्हणजे साधकाच्या मनाच्या च हालचालीचे परिणाम म्हटले तरी, त्यांत साधकाची मनोभूमिका त्या त्या विषयाशीं किती तन्मय आहे ह्याचें प्रत्यंतर येतें. ‘तुझ्या घरांत एक महापुरुष जन्मणार आहे’, असा हि दृष्टांत त्यांना झाला होता. त्यासाठीं जन्मोत्सवाची तयारी हि त्यांनी’ करून ठेवली होती. नाना प्रकारें तत्संबंधीं गोष्टी अगोदरच त्यांनीं लोकांना सांगून ठेवल्या होत्या. बुद्ध, कृष्ण, ख्रिस्त, महावीर इत्यादि अनेक अवतारांसंबंधीं, थोर पुरुषांसंबंधीं अशा आख्यायिका ऐकूं येतात. त्यांचें रहस्य काय हा एक मोठा प्रश्न आहे. निदान जेथें अशी तन्मयतेनें उपासना चालते; जेथें जेथ सुसंस्कारांचा अभ्यास केला जातो, जेथें जेथें तपस्या चालते, तेथें त्या उपासनेचें फल मूर्तिमंत दिसेल,—हातापायांची, चालती बोलती चैतन्यमय आपल्या सारखी गुरूमूर्ति आपल्याला लाभेल अशी अपेक्षा असणें अगदीं स्वाभाविक आहे ह्यांत शंका नाहीं. त्या सुप्त अपेक्षेचा च हा भविष्योग्दार समजावयाचा कीं साक्षात् दृष्टांतांच्या द्वारें असें पुढील भविष्य समजूं शकतें, ह्याचा निवाडा करणें कठिण आहे. येथें मात्र झालेला दृष्टांत परिपूर्ण खरा झाला आहे असें म्हणणें प्राप्त आहे. ह्यामुळें च ह्या नूतन बालकाकडे पाहण्याची त्यांची दृष्टि अगदीं भिन्न होती. “मी स्वतः अ आ इ ई चा, श्रीगणेशाचा, धडा त्याला दिला आहे” असें ते अभिमानानें म्हणत. त्याला प्रथम धडा दिल्याबद्दल ते

अनुक्रमणिका

स्वतःला धन्य मानीत. नातवासंबंधींच्या प्रेमानें ते असें म्हणत असें समजण्याचें कारण नाहीं. सर्वसंगपरित्याग करून संन्यासाश्रम मी केव्हां स्वीकारीन अशी त्यांस तळमळ लागली होती.

अग्नीची उपासना, शंकराची उपासना, मंत्रजप, कठोर व्रतें, सद्ग्रंथ श्रवण, वैद्यकी व इतर सल्लामसलतीच्या द्वारें लोकसेवा असें त्यांचें जीवन होतें.

**उपासनेला दृढ चालवावें । भूदेव संतांस सदा नमावे ॥**
**सत्कर्मयोगें वय घालवावे। सर्वां मुखी मंगल बोलवावें ॥**

ही समर्थोक्ति त्यांच्या ठिकाणीं परिणत झालेली दिसत असे. सर्वांना त्यांच्या विषयीं आदर वाटे. साधुपुरुष म्हणून लोक दर्शनास हि येत. सर्वांना सर्वांत वडील आणि करारी स्वभाव असल्यामुळें त्यांचा धाक हि वाटे. असे हे उपासनामय दीर्घ जीवन घरांत मूर्तिमंत सतत दिसत असल्यामुळें सर्वांवर त्याचा परिणाम झाल्याखेरीज कसा राहील? विशेषतः ज्याच्या संबंधीं त्यांनीं अगोदर च दृष्टांत झाला म्हणून भविष्य वर्तविलें होतें त्याच्या बालजीवनावर त्या दृश्यानें केवढें कार्य केलें असेल? —वेदकाळापासून आतांपर्यंत चालत आलेल्या सर्व उपासनेचें सार त्याच्या चित्तांत ठसून त्यानें मग ही च एक उपासनेची विशुद्ध कल्पना जगापुढें मांडावी ह्यांत तरी नवल काय?—

**कल्याणकारी, शक्तिशाली, सर्वलभ्य, उपासना ।**
**चित्तीं मुरो, विश्वांत पसरो, हीच माझी वासना ॥**

# प्रकरण ३ रे

## आई

**न मंत्रं नो तंत्रं तदपि च न जाने स्तुतिमहो ।**
**न चाह्वानं ध्यानं तदपि च न जाने स्तुतिकथा ॥**
**न जाने मुद्रास्ते तदपि च न जाने विलपनं ।**
**परं जाने मातस्त्वदनुसरणं क्लेशहरणम् ॥**

**हे आई!** मंत्र-तंत्र, ध्यान-धारणा, जप-तप, पूजा-पाठ, कथा-कीर्तन, हें मला कांहीं एक समजत नाहीं. मी एक तुलाच ओळखतो. तुझ्या पाठोपाठ यावें ह्याशिवाय मला कांहींच माहीत नाहीं. मी फक्त एकच जाणतों—“आई! आई!! आई!!!”— १३०० वर्षांपूर्वीच्या मलबारमधल्या कालदी गांवांतल्या त्या महान् आचार्यांचे हे मातेसंबंधींचे अद्‌भुत उद्‌गार ऐकून, मनाला काय बरें वाटतें? कोणचे विचार मनांत येतात? बुद्धिमत्तेचे ऊंचांत ऊंच शिखर गांठून, हिमालयाच्या अत्युच्च गौरीशंकर शिखरावर चढून, पुन्हां ते शेवटीं “आई, तुझ्या पादपद्‌माशिवाय मी कांहींच जाणत नाही.” असे कां बरें म्हणतात? उत्तरेकडे परिव्राजक बनून धर्मप्रचार करीत एकसारखें पर्यटन करीत असतां, नित्य नाना प्रकारच्या वादांची झुम्मड चालूं असतां, अगदीं थेट दक्षिणेकडच्या त्या भिकार खेड्यांतल्या, गरीब माऊलीचे ते पाय त्यांना वारंवार कां बरें स्मरत असत? काय उत्तर देणार? उत्तर देण्याचें यत्किंचित् तरी सामर्थ्य आपल्यांत आहे का? ज्यानें आईला पूर्ण ओळखलें असेल तोच खरोखर उत्तर देऊं शकेल. आई सर्वांना च असते. पण तिची ओळख कितीकांना असेल? ज्याला आचार्यांसारखी ओळख असेल तो च खरा ‘मातृमान्,’ त्याला ‘मातृदेवो भव’ हा उपदेश करण्याचें कारण च नाहीं. तोच ह्याचें उत्तर देऊं शकेल. पायावर इमारत उभी असते, पण पाया कोणाला च दिसत नाहीं. इमारतींचे च कौतुक जो तो करीत असतो. फळाफुलाछायेनें बहरलेल्या वृक्षाची आपण स्तुति करतों, पण त्याच्या जमिनींतल्या मुळाची कोणाला आठवण होते का? उतूं गेलेलें दूध तेवढें च पहावयाचें का? अरे, भांड्यांत च खऱ्या दूधाचा सांठा आहे. हा ऊत केवळ त्याच्यावरची एक ऊर्मि आहे. ही च गोष्ट आई आणि मुलाची आहे. आईला जग न ओळखो! पण थोर पुरुष तिला ओळखल्याशिवाय कसा राहील?— आई आणि मूल ह्याच्या इतका पवित्र, स्वाभाविक, प्रेममय, अगदीं अनन्य संबंध दुसरा कोणता दाखवता येईल बरें! आई आणि मुलगा अगदी अद्वैत! अद्वैत! अद्वैत! ह्याशिवाय काय वर्णन करतां येईल? आचार्यांना अद्वैतसिद्धांत आईने च शिकवला. आणि त्याचा च जन्मभर प्रचार करण्यासाठीं ते परिव्राजक झाले. मग ते आईला कां बरें स्मरणार नाहींत?

अगदीं हूबेहूब अशी च स्थिति येथें हि आपणांस दिसून येते. हा हि आचार्यतुल्य अद्‌भुत बुद्धिमत्तेचा पुरुष असे च उद्‌गार काढतो.

**“आई! तूं जें मला दिलेंस तें कोणी च दिलें नाहीं ।**
**आणि तूं मेल्यानंतर जें देत आहेस तें जिवंतपणी दिलें नाहीस ॥**
**आत्म्याच्या अमरत्वाचा एवढा च पुरावा मला बस आहे ॥”**

अगदीं आचार्यांप्रमाणें च ब्रह्मज्ञानाच्या मस्तींत उत्तरेकडे पर्यटन करीत असतां मातेचें वारंवार स्मरण येऊन.

अनुक्रमणिका

**मातेचें मन संतत चिंतुनि दीना मुलास कळकळतें ।**
**चिंता वृथा कशाला माय जगाची तिला सकळ कळतें ॥**

असे काव्यबद्ध पत्र लिहून मातेची समजूत करण्याचा प्रयत्न करतांना दिसतो. त्या मातेच्या उपकाराचे यत्किंचित् तरी पांग फिटतील काय? तिच्या गुणांचें थोडें तरी वर्णन होऊं शकेल काय? तिचें आयुष्य निव्वळ घरांतल्या घरांत गेलेलें. जगाला यत्किंचित् माहिती नाहीं मग कीर्तीची गोष्ट च कशाला!

**माझें असतेपण लोपो । नामरूप हारपो!**
**मज झणे वासिपो । भूतजात ॥**

ही च तिची कीर्ति! —आणि ही च तिची जगाला ओळख! परंतु असें असलें तरी, तिच्या कृतीमुळें, त्या थोर बालकाला भगवग्दीतेचा तो महान् उद्‌गार तिच्या ठिकाणीं मूर्तिमंत झालेला दिसल्याशिवाय कसा राहील?

**वाणी श्री कीर्ति नारीणां स्मृतिर्मेधा धृतिक्षमा!**
**वाणी श्री कीर्ति नारींत क्षमा मेघा धृतिस्मृति!**

कारण त्यानें अगदीं बाळपणापासून तिच्या थोर उपदेशामुळें परमार्थाची गोडी चाखली होती.

**स्तन पाजितां निजवितां हालवितां बालकासी खेळवितां ।**
**दे बोध जो सुदुर्लभ थोरांसि सहस्त्रकल्प मेळवितां ॥**

मदालसेनें आपल्या पुत्रांना दिलेला तो वैराग्योपदेश पुराणांत त्याला मागाहून आढळला. आधीं स्वतःच्या जीवनांत त्यानें त्याचा अनुभव घेतला होता. हा अनुभव कोणता? ज्ञानेश्वरांनीं त्याचें विस्तृत वर्णन केलेलें आहे. तें काव्यमय आहे म्हणून आतिशयोक्त मानावें, कीं, अपुरें मानावें हें तरी कोण सांगणार?

**जय जय वो शुद्धे । उदारे प्रसिद्धे**
**अनवरत आनंदे । वर्षतिये ॥**
**विषयव्याळें मिठी । दिधलिया नुठी ताठी**
**ते तुझिये कृपादृष्टि । निर्विष होय ॥**
**तरी कवणातें ताप पोळी । कैसेनि वो शोक जाळी**
**जरी प्रसादरस कल्लोळीं । पुरें येसी तूं ॥**
**योगसुखाचे सोहळे । सेवकां तुझेनि स्नेहाळे**
**सोहं सिद्धीचे लळे । पाळिसी तूं ॥**
**आधारशक्तीचिये अंकीं । वाढविसी कौतुकीं**
**हृदयाकाशपालकीं । परिये देसी निजें ॥**
**प्रत्यक्‌जोतीची वोंवाळणी । मनपवनाची खेळणीं**
**आत्मसुखाचीं बाळलेणीं । लेवविसी तूं ॥**
**सतरावियेचे स्तन्य देसी । अनाहताचा हल्लरु गासी**
**समाधिबोधें निजविसी । बुझावुनी ॥**

अनुक्रमणिका

हें वर्णन अतिशयोक्त किंवा अपुरें न मानतां यथार्थ मानण्याला गमक सांपडणार नाहीं असें नाहीं. मुलाला एकसारखें टक लावून, कोंकणांतल्या त्या दाट झाडाझुडपांकडे अंगणांत पहात ठेवणें बरें नाहीं असें ती मानी, कारण मुलाची मनस्थिति अगदीं योग्यासारखी असते. त्यामुळें झाडांशीं तो इतका तद्रूप होतो कीं, ती हिरवीं पानें, त्यांचा तो रंग, त्याच्या अगदीं रोमरोमांत भरून जातो. फार काय त्यामुळें त्याला शौचाला हि हिरवें होऊं लागतें. तेव्हां मुलाचें हें इतकें योगयुक्त मन निव्वळ झाडाकडे लावून ठेवणें बरे नाहीं. शिवाय त्याच्या शरीराला त्यानें त्रास होण्याचा संभव, अशा च तऱ्हेच्या विचारसरणींने सर्व बाबतींत मुलाचें लालन-पालन करणारी आई ही खरोखर योगशास्त्र जाणणारी गुरूमाऊली च समजली पाहिजे हें काय सांगावयास पाहिजे? “विन्या ज्यास्त मागूं नकोस. लक्षांत ठेव.—थोड्यांत गोडी आणि फारांत लबाडी”, हें तिचें आपल्या मुलांना उद्देशून सांगणें योगशास्त्रांतला जीवनामधील परिमिततेचा सिद्धांत अगदीं साध्या शब्दांत सांगत नाहीं काय? “मनुष्यानें उत्तम गृहस्थाश्रम केला तर, आईबापांचा उद्धार होतो. पण उत्तम ब्रह्मचर्य पाळलें तर, बेचाळीस पिढ्यां उद्धरतात.” ह्या तिच्या वचनांत “ब्रह्मचारिव्रते स्थितः” ह्याचाच प्रतिध्वनि नाहीं असें कसें समजावें? पोटभर अन्न आणि अंगभर वस्त्र ह्यांपेक्षा अधिकाची गरज नाही. हे तिचे नेहमींचे शब्द असत. ह्यांत हि अपरिग्रहाचें योगशास्त्रीय तत्त्व बीजभूत नाहीं असें कोण म्हणेल?

तरी त्या माऊलीचा जन्म उत्तम कुळांत झालेला होता. कर्नाटकांतल्या “हावनूर” गांवीं तिचें बालपण गेलें. त्या बालवयांत तिला शिक्षण काय मिळालें होतें? तिला शाळेचें शिक्षण किंवा दुसऱ्या कोणत्या हि कृत्रिम शिक्षण पद्धतीचा संस्कार मिळाला नव्हता. शिक्षण मिळण्यावर नाहीं, तें घेण्यावर आहे. ज्याची घेण्याची शक्ति आहे त्याला अनंत हस्तानें देव देण्यास तयार आहे. शिक्षण शाळेत का मिळतें? का मास्तर शिकवितात? जीवनांतलें शिक्षण, आध्यात्मिक शिक्षण असें मिळूं शकत नाहीं. तें बीजभूत असतें. प्रत्येक क्षणीं आणि प्रत्येक क्रियेंतून तें मिळत च असतें. हा च तिच्या जीवनांतला सिद्धांत पुढें तिच्या त्या महान् बालकानें स्पष्टपणें मांडून दाखविला. “ही सर्व सचराचर सृष्टि हा ईश्वरानें उघडून ठेवलेला एक अद्भुत शिक्षणग्रंथ आहे. त्याच्यापुढें वेद व्यर्थ आहे, कुराण रद्द आहे. बायबलचें बल चालत नाही”. तिला न मिळालेलें परंतु तिनें मिळवलेलें शिक्षण किती होते हें सांगता च येणार नाही. शिक्षण कसें मिळवावें ही कला तिला तिच्या वडिलांकडून च मिळाली होती. “बाळकृणबोवा” त्या वेळच्या गवई लोकांत चांगले च परिचित असत. हे च तिचे वडील. तिची आई लहानपणींच वारली. बाळकृष्ण बोवांनीं गायन विद्येसाठीं पुष्कळ परिश्रम करून ती कला हस्तगत करून घेतली. त्या वेळीं इंदूरचे पानसे गवई फार प्रख्यात होतें. अजून हि गायक वर्गांत त्यांची ख्याती आहे. बाळकृष्ण बोवा त्यांच्याकडे तरुण वयांत गायन शिकण्यासाठीं राहिले. गुरूंनीं दिवसभर पाणी भरणें, झाडणें, सारवणें, अशीं कामें सांगावीं, परंतु एकहि दिवस गायन म्हणून शिकवूं नये. असा क्रम सारखा ७/८ महिने चालला. परंतु शिष्यानें गुरूजवळ ह्याबद्दल अवाक्षर हि काढलें नाहीं; आणि गुरुशुश्रूषेंत यत्किंचितहि उणें पडूं दिलें नाही.

**कां चैतन्याचिया पोंवळी । माजीं आंनंदाचिया राऊळीं**
**श्रीगुरुलिंगा ढाळी । ध्यानामृत ॥**
**उदयिता बोधार्का । बुद्धीची डाळ सात्विका**
**भरोनियां त्र्यंबका । लाखोली वाहे ॥**
**काळशुद्धि त्रिकाळीं । जीवदशा धूप जाळी**
**ज्ञानदीपें वोवाळीं । निरंतर ॥**
**सामरस्याची रससोय । अखंड अर्पित जाय**
**आपण भराडा होय । गुरु तो लिंग ॥**

अनुक्रमणिका

ज्ञानेश्वरांच्या ह्या वचनाचें किंचित् दर्शन आपणाला अशा उदाहरणांच्या द्वारें मिळतें. गुरूपरिचर्येंत दिवस चालले होते. गुरूंच्या घरीं नित्य गायनाच्या मैफली झडत, अनेक विद्यार्थी शिकून जात, परंतु हे मात्र तसेच शिक्षणाशिवाय कोरडे राहिले होते. एके दिवशीं एक उत्तम गवई गुरूंकडे आले. तास दोन तास गाणें झालें. त्यांनी तंबोरा खाली ठेवला. जवळच हे उभे होते. त्यांना त्या आलेल्या गवयांनी विचारले; "काय रे मुला! तूं कोण? तूं ह्यांच्याकडे आहेस तर तुला ह्यांनी गाणें शिकविलेच. असेल. आम्हांला एकादी चीज म्हणून दाखवतोस का? हा प्रश्न ऐकून त्यांना काय वाटलें असेल? इकडे आड आणि तिकडे विहीर. परंतु, त्यांनी गुरूला संभाळून घेतलें गुरूनें इतके दिवस राहून ही शिकवलें नाहीं, हें प्रकट केलें नाही. ते म्हणाले, "मला तसे फार दिवस झालें नाहींत. त्यामुळें मला गाणें येत नाही. पण तबल्याचे बोल मी म्हणून दाखवतों. ऐकून ऐकून तबल्याचे बोल त्यांना अवगत झालें होते. ते त्यांचे तबल्याचे बोल ऐकल्यावर त्या गवयानें पानसे ह्यांस म्हटलें, "हा मुलगा मोठा चलाख दिसतो. ह्याला हातांत घ्या. चांगला तयार होईल." तेव्हांपासून त्यांच्या शिक्षणाला सुरुवात झाली व त्यांनी ती कला हस्तगत करून घेतली. मागील प्रकरणांतील शंभूराव भाव्यांच्या कोटीश्वराच्या मंदिरात देवापुढें ते गाणीं म्हणत. शंभूराव भाव्यांविषयीं त्यांना फार आदर वाटे. गंधाच्या शंकराच्या मुखवट्यासाठीं कर्नाटकांतून म्हैसूरकडून उत्तम चंदनी लांकडे ते त्यांना आणून देत. गायनकलेची त्यांनी मरेपर्यंत उपासना केली. त्यांचे आपल्या मुलीवर फार प्रेम होतें. त्यांच्यां प्रेमामुळे त्यांची शिक्षण पद्धति तिच्या जीवनांत उतरणें अगदीं स्वाभाविक होतें. कानडी प्रांतांत असल्यामुळे आईला अगदीं बालपणापासून उत्तम कानडी येत असे. त्या लहान वयांत कानडीमधली सुंदर सुंदर गाणीं तिला मुखोद्‌गत झालीं होतीं. भारतवर्षातील दोन सगीत पद्धतींपैकी द्राविड संगीताची कर्नाटकी गाण्यावर छाप असणें स्वाभाविक आहे. 'किन्नर' देश तो च 'कन्नड' देश अशी कित्येक व्युत्पत्ति काढतात. आईला द्राविड संगीताचे शास्त्रशुद्ध ज्ञान होतें असें नाहीं. परंतु तिच्या तोंडून अत्यंत कोमल, प्रेमळ, करुण आणि तरल भावांची आंदोलने त्या कर्नाटकी गीतांतून ऐकतांना ह्रदय गद्‌गद् होऊन जाई. डोळे पाण्यानें भरून येत. पृथ्वीवरून आपण कोठल्या तरी दूर उच्च प्रदेशांत चाललों आहों असा भास होई. तिच्या त्या गाण्यांत तिचें चारित्र्य, तिची भक्ति, तिचें उदात्त जीवन एकदम समरसून जाई! आणि तिला मराठी गाणीं आणि कविता तरी किती येत होत्या! तिच्यां स्मरणशक्तीला सीमा च नव्हती. बगिच्यांतली उत्तम उत्तम फुलें वेंचून देवासाठी परडींत टाकावी त्याप्रमाणे उत्तम उत्तम चालींची, उत्तम उत्तम अर्थाचीं शेंकडों कवनें तिच्या स्मृतींत तिनें सांठवून ठेवली होतीं. तिच्या त्या स्मृतीला परडीची तरी उपमा कशी द्यावी? तो भक्तीनें दरवळलेला बगीचा च फुलला होता! रोज नवीन गाणें म्हणावयांचें, जुने म्हटलेले फिरुन म्हणावयाचें नाहीं, ह्या अटींनें ती आपल्या मुलांस रोज गाणीं म्हणून दाखवी. परंतु कधीं तिला हार खावी लागली नाहीं. अशी वर्षानुवर्षे जावीं, आई एवढीं गाणीं आणते तरी कोठून? तिच्यांत कांही चमत्कार शक्ती तर नाहीं? का देव तिला गुप्तरूपाने गाणीं सांगतो? कांहीच कल्पना व्हावयाची नाहीं.

**आकाशांत फुलें, धरेवर फुलें, वाऱ्यावरी ही फुलें ।**
**माझ्या गेहिं फुलें, मनांत हि फुलें, भूगर्भि सारीं फुलें ॥**
**माझें चित्त भुले, सुगंधित भले, हे विश्व हो जाहलें ।**
**कोणाला कळलें किती पसरलें उद्यान हें शोभलें ॥**

—अगदीं अशी च स्थिति होऊन जावयाची! भक्तीमय सुगंधानें दरवळलेल्या त्या काव्यकुसुमांच्या बगिच्याचा अंदाज च व्हावयाचा नाहीं. कधीं

**वेडा तामसा जोगी देखिला गे माय ॥**

अनुक्रमणिका

**भिकेचे तुकडे मागून भोपळ्यांत खाय ।**
**......वेड्यानें कोठून चोरून आणिली ॥ की काय**

हें पद ऐकावयास मिळावें. मग त्या भिक्षेकरी शंकरमूर्तीवरच मन खिळून जावें तर कधीं

**मदनतात मनमोहन मुरली वाजवि कुंजवनीं ।**
**सारीगमपधनिशी गायन करितो सप्तसुरावरनी ॥**

असें कृष्णाचें वेणूगीत ऐकावयास मिळावें. मग त्या मुरलीमध्यें च चित्त लीन होऊन जाई. मुरलीपुढें मग सर्व वाद्यें फिकीं वाटावीं. "लहानपणापासून मला मुरली जितकी गोड लागते तितकें दुसरे वाद्य गोड लागत नाहीं. मुरली आमचें राष्ट्रीय वाद्य आहे. गरीबापासून श्रीमंतांपर्यंत सर्वांना लभ्य आहे. रात्रीच्या शांत वेळी दुरून मुरलीचा ध्वनी कानावर पडला कीं भगवंतांच्या दिव्य चरित्राचे स्मरण होतें" —असें मुरलींचें अद्वितीय स्थान चित्तांत ठसून जाण्याला तें आईचें वेणूगीत कारण नसेल असें कोण म्हणेल? आईचे हि नांव तिच्या वडिलांनीं 'वेणु' असें च ठेवलें होतें.

**काळी घोंगडी । काळी काठी**
**काळा दोरा कंठी । बोली महाराची थेट मराठी ॥**
**पायीं वहाणा । मोठा शहाणा । पतित पावन नाम जयाचें ।**
**वारी संकट हरी दामाजिचें । कौतुक दैवाचें ॥**
**वारी संकट हरी ॥**

अशी दामाजिपंतांची रसद ती कधीं ऐकावी. बालमनावर त्यांतल्या प्रत्येक वर्णाचा, प्रत्येक उच्चाराचा, प्रत्येक आलापाचा विलक्षण परिणाम होई. त्यांतून मराठींचें प्रेम गरिबांचा कळवळा, महारांशीं समरसता, जुलमी लोकांबद्दल क्षोभ, दामाजीची साधुता, देवाची भक्तवत्सलता काय काय चित्तापुढें उभें राही! फार काय, काळी घोंगडी हा शब्द हि कांहीं विशेष मंत्रानें भारलेला वाटें. "काळी घोंगडी मला फार प्रिय आहे. काळ्या घोंगडीचा सहवासी म्हणजे कृष्णाचा सहवासी". ह्या किंवा अशाच अनेक विचारांना बीजभूत अशी भूमिका ह्या गाण्यांनी तयार होई. शिवाय बालवयांत आईच्या काळ्या चंद्रकळेच्या चौघडीवर निजण्याची परिणती, श्रीकृष्णाच्या काळ्या घोंगडीच्या प्रेमात कां होऊं नये? अगदीं बालवयांत कर्नाटकांतून, थेट दक्षिणेंतून उत्तरेकडे, परक्या घरांत आपल्या नेहमींच्या प्रिय, परिचित अशा सर्व माणसांना सोडून येतांना, पुढच्या जीवनाची कल्पना नसतांना, कष्टमय व जबाबदारीच्या जीवनांत प्रवेश करतांना तिच्याजवळ कोणता आधार होता? ही तिच्या हृदयांत असलेली भक्तिमयता आणि स्मृतीमध्यें असलेल्या अपार संतसंगाचा च तिला शेवटपर्यंत आधार होता.

**मारगमें तारन मिले संत राम दोई ।**
**संत सदा शीस उपर राम हृदय होई ॥**
**मेरे तो गिरिधर गोपाल दूसरा न कोई ॥**

—हाच तिचा आधार होता. 'शिक्षण म्हणजे सत्संगति', ह्या शिक्षणाच्या महान् सिद्धांताप्रमाणें तिला परिपूर्ण शिक्षण मिळालें होते. ही सत्संगति तिच्या ठिकाणीं अंतर्बाह्य भरून उरली होती.

अनुक्रमणिका

आणि तिच्या सेवामयतेचा तर अंत च नव्हता. सकाळपासून संध्याकाळपर्यंत एकापाठीमागून एक कामें लागलेलींच असत. भगवान् सूर्यनारायण ज्याप्रमाणे कोणता हि ऋतु असो, कोणती हि परिस्थिति असो, आपल्या अव्याहत तेजाने तळपत च असावयाचा, त्यात खंड म्हणून कधीं पडावयाचा नाहीं, कर्मयोगाचा उपदेश भगवंतांनीं त्याला सर्वांच्या आधीं केला, तेव्हांपासून तो आतापर्यंत त्यानें अव्याहत आपल्या ठिकाणीं कर्मयोग दाखविला, त्याप्रमाणे च ती कर्नाटकातून आली तेव्हांपासून हा कर्मयोग मरेपर्यंत तिनें आचरून दाखविला. अगदीं प्रभातकाळीं जवळ जवळ ब्राह्म मुहूर्तावर ती उठे—

**जागृत होतां माता आधीं निद्रित बालां पाहे ।**
**हर्षें मंद्स्मित वात्सल्य-ज्योत्स्ना वर्षत राहे ॥**

घरांतली मुलें निजलीं आहेत, बाहेर तारे चमकत आहेत; वाऱ्याची हालचाल सुरू झाली आहे, अशा वेळीं एरंडेल तेलाच्या मिण मिण करणाऱ्या दिव्याच्या स्निग्ध प्रकाशांत

**उठा प्रातःकाळ झाला । आत्माराम पाहूं चला ।**
**हा समय जरी टळला । तरी अंतरला श्रीराम ॥**

अशा भूपाळ्या, आरत्या, अभंग तन्मयतेनें ती म्हणत आहे. हें नित्याचें पहिलें दृश्य असावयाचें. त्यानंतर जात्याच्या घुरघुर गोड आवाजावर म्हटलेलीं गाणीं ऐकूं यावयाचीं. कोणत्या हि वाद्यावर अशीं गोड गाणीं म्हणतां येतील काय? छेः! छेः! ती गोष्ट अशक्य आहे. चूल-चक्की-चात ह्या तीन गृहदेवता आहेत. त्या गृहदेवतांची का वाद्यें बरोबरी करतील? ही कल्पना च किती हीन आहे. त्यानंतर सडासंमार्जनादि अनेक स्वच्छताकर्में व्हावयाचीं! आकाशांतले चंद्रसूर्य, बागेंतल्या फुलवेली, देवादिकांची शंखचक्रयुधें, देवळांतलें कांसव अशा मनोहर आकृतींची मांगल्य मंत्राने भारलेली शुभ्र रांगोळी भराभर यांत्रिक तऱ्हेने घातली जाई. अगदीं रेखीव, अगदीं आंखीव तऱ्हेनें, ‘मुखी नाम हातीं काम’ असा दिवसभर कार्यक्रम चाले. देविदासाचें व्यंकटेशस्तोत्र, रामदासांचे मनाचे श्लोक, काय काय म्हटलें जाई तें काय सांगणार? प्रत्येकाची प्रकृति, प्रत्येकाचा स्वभाव, प्रत्येकाचे कपडे, प्रत्येकाचें खाणें, प्रत्येकाची जागा, प्रत्येकाच्या खोडी, किती गोष्टी पहाव्या लागत! दळणें, सारवणें, झाडणें, भांडी घांसणें, निवडणें, कपडे धुणें, कपडे शिवणें, स्वयंपाक करणें, दहा माणसांच्या घरांतलें काम! कोणी आजारी असलें तरी शुश्रूषा हि तिने च करावी. कामाचा यच्चयावत सर्व बोजा तिच्या वर च! पण तिला त्याचें भान होते का? जनाबाईनें सकाळीं उठावें, पीठ दळावें. दळतां दळतां परमेश्वराशीं इतकें तन्मय व्हावें कीं पिठाचा ढीग पडला तरी भान नाहीं, मग भानावर आल्यावर तो पिठाचा ढीग पाहून देवानें च हें दळलें असें वाटून रडूं लागावें! ही गोष्ट का खोटी च म्हणावयाची? इतिहास पाहून ह्या गोष्टीची परीक्षा होणार आहे? का उत्खननानें ही गोष्ट सिद्ध होईल? हे चवचाल मना! डोळे उघडून स्वच्छ पाहशील तर तुला तुझ्या अगदी जवळ, तुझ्या घरांत ही गोष्ट दिसून येईल.

**कबिराचे ते शेले विणितो । सांवत्या माळ्याची भाजी खुडितो ।**
**जनीसंगें दळत कांडत । गाणें गाइले । अजि म्यां ब्रह्म पाहिलें ।**
**कटिकरनटसमचरण विटेवरी उभें राहिले.......**

अनुक्रमणिका

—हें गाणें म्हणतांना तुझी आई कां रडत असे—तिच्या डोळ्यांतून अनावर अश्रुधारा कां वहात असत; ह्याचा मग तुला उलगडा होईल.

**नैष्कर्म्यसिद्धिं परमां संन्यासेनाधिगच्छति ।**

ह्याचें भाष्य पाहण्याची तुला आवश्यता राहणार नाहीं.. आणि भाष्य पाहून तरी काय होणार?

**नैष्कर्म्यमप्यच्युतभाववर्जितं ।**
**न शोभते ज्ञानमलं निरंजनम् ॥**

ह्याचा तुला कोठें अनुभव येणार? —अरेरे! हे शिक्षण, ही विद्वत्ता, ह्या बाह्य जगाचा पसारा, हे सर्व अवडंबर आमचा किती नाश करून राहिलें आहे! आमच्या जवळची, अगदीं आमची च, नित्य आमच्या सेवेंत तत्पर, आमच्या कल्याणासाठीं रात्रंदिवस तळमळणारी आमची आई, तिच्या जीवनाचें रहस्य आम्हांला यत्किंचित् तरी कळलें का? तिचा अल्पसा तरी गुण आम्ही घेतों का? तिला थोडा तरी हातभार आम्ही लावला का? प्रश्नमाला किती हि लांबवली तरी उपयोग काय? उत्तर शून्य च आहे. घरांतल्या मंडळीं खेरीज बाहेरचे विद्यार्थी हि मधून मधून घरीं असावयाचे. त्यांना मुळीं च परकें वाटूं नये म्हणून त्यांच्याशीं अगदीं प्रेमानें वागावयाचें, बहुधा कोणतें हि काम त्यांना सांगावयाचें नाहीं. घरांतील शिळें अन्न स्वतः खावें, आपल्या मुलांना द्यावे, परंतु त्यांना ताजे तयार केलेलें उत्तमोत्तम अन्न वाढावयाचें. किती तिची दक्षता! आणि गरीबांविषयीं, शेजाऱ्यांविषयीं केवढी कळकळ! शेजाऱ्यांच्या कोणत्या हि कामाला—मग ते पापड, फेण्या घालण्याचें असो कीं, स्वयंपाकाचें असो, नेहमी तयार असावयाचें. आपल्याकडून होईल ती मदत सर्वांना करावयाची. कोणी भिकारी आला तरी अत्यंत भक्तिभावानें देव समजून च भिक्षा द्यावयाची. मग तिच्या महाबुद्धिमान् मुलानें जरी शंका काढली तरी तिच्या भावनेंत कांहींच फरक व्हावयाचा नाहीं. तिच्या निश्चल ईश्वरभावनेंत शेंवटीं तो हि बुडून जातो व उद्‌गार काढतो— “आमच्या घरांत भिकारी आला. आईनें त्याला मूठभर तांदूळ घातले. मी म्हटलें, हें दान योग्य झालें नाही. तो तर चांगला धट्टाकट्टा होता. दान देतांना योग्यायोग्य पाहिलें पाहिजे. नाहींतर व्यसनें व आळस ह्यांना उत्तेजन दिल्यासारखें होईल. असें म्हणून ‘देशे काले च पात्रे च’ हा श्लोक हि मी आईला म्हणून दाखवला. मला आईनें एकच उत्तर दिलें. तिच्या त्या उत्तराला अजून मला उत्तर देतां येत नाहीं. ती म्हणाली, जो कोणी भिकारी आला होता तो परमेश्वर च होता! आतां पात्रापात्राचा कर विचार. भगवान् का अपात्र आहे? पात्रापात्राचा विचार करण्याचा तुला काय अधिकार आहे? अधिक विचार करण्याची मला जरूर च नाहीं. मला तो ईश्वररूप आहे. ह्या उत्तरावर मला उत्तर अजून सुचलें नाही.” जो आपल्या दारीं आला आहे तो अभद्र भिकारी का समजावयाचा? त्याला जग कांहीं हि समजो, तिची तर सर्वत्र एकच निश्चल ईश्वरमय भावना होती—

**पुण्यमें पापमें साहमे चोरमें ।**
**काकमें कीरमें हंसमें मोरमें ॥**
**सुखते दुःखते द्वंद्वते है परे ।**
**सुंदरे सुंदरे सुंदरे सुंदरे ॥**

बुद्धीला एकदम न पटणाऱ्या आईच्या भावनेंत हि थोर बुद्धि असावयाची. ह्याचे कितीतरी दाखले प्रत्यहीं मिळावयाचे. हा पहा एक प्रसंग— “आई म्हणाली, ‘विन्या पणती सांभाळून वापरावी, पडली बिडली तर तें

एक अशुभ चिन्ह आहे.' मी म्हटले, 'अशुभ म्हणजे काय?' ती म्हणाली, 'अशुभ म्हणजे त्याच्या योगानें कुटुंबांतला कोणी माणूस दगावतो'. हे ऐकल्याबरोबर मी ती पणती तशीच्या तशी च आपटून फोडून टाकली. आणि मग एक दिवस झाला, दोन दिवस झाले, एक आठवडा गेला, पण आश्चर्य हें कीं कोणी च मरेना. तेव्हां मी आईला विचारलें, हें कसें काय? सात दिवस झाले, पण अजून कोणाला कांहींच झालें नाहीं. पण आई चतुर होती. आई म्हणाली, मुद्दाम पणती फोडून त्याचा अशुभ परिणाम होत नाहीं. गबाळेपणानें जर हातून दिवा पडला तर त्याचा अशुभ परिणाम होतो." ह्यांत कांही च बुद्धि नाही का? दिव्याचा केवढा सन्मान! दिव्याची ज्योत गबाळेपणानें मालवली. दिवा पडला म्हणजे ती जीवनज्योत च गेली समजावयाची. ह्यांत केवढि बुद्धि आहे!

**कर्में समस्त करणें अति नम्रभावे ।**
**धर्में चि पूजन घडे हरिचें स्वभावें ॥**
**ठावें न अन्य विषयांत कसें रमावें ।**
**मावे न भाव हृदयीं सकलां नमावें ॥**

तिची दिनचर्या अशी कर्ममय, धर्ममय आणि भक्तिमय होती.

**तूं सर्वधर्ममय शर्मद कर्ममूर्ती ।**
**आनंदधाम करुणामय आर्तपूर्ति ॥**

असें तिचें अगदीं सूत्रमय जीवन वाटे!

तिची पूजा कधीं हि टळावयाची नाहीं. बाळकृष्ण, शालिग्राम, नर्मद्या गणपति, देवी असे तिचे इन मीन साडे तीन देव असत. पण तिन्ही लोकांना व्यापून उरेल असा त्यांच्या ठिकाणीं तिचा भक्तिभाव होता. त्या देवांसाठीं फुलें आणलीं नाहींत म्हणजे तिला किती वाईट वाटे! अरे, आंपण जेवावें, खावें, झोपावें, मौज करावी आणि देवासाठीं चार फुलें हि आणण्याची आठवण ठेऊं नये ना! असे ती अगदीं कळवळून म्हणे! तुळशीला तरी ती किती प्रदक्षिणा घाली! एकादशी, सोमवार, उपासतापास नेहमीच चालत! 'सूर्याला निदान बारा तरी नमस्कार घालीत जा रे' असे तिचे नेहमीं सांगणें असावयाचें. 'हरी चिंतनीं अन्न जेवीत जावें' ह्या तत्त्वाप्रमाणें जेवतांना हि ती गोविंद गोविंद म्हणे. उत्तम उत्तम कथा-कीर्तनें, प्रवचनें ऐकण्याचा तर तिला हव्यास च होता. घरांतलीं सगळीं कामें सांभाळून ती कीर्तन-प्रवचनादिस हि जाई. तेथें अगदीं तटस्थ चित्ता नें सर्व गोष्टी तिनें ग्रहण कराव्यात. घरीं आल्यावर आपल्या मुलांशीं बाबांशीं त्यासंबंधीं चर्चा करावी. ऐकलेली संस्कृत प्राकृत वचनें भराभर म्हणून दांखवावीत. तीं मनांत घोळून अगदी आपलीशीं करावींत. प्रवचनकाराचा मुद्दा कोठें डळमळीत असेल तर, त्यासंबंधीं हि चर्चा करावी. अशा ज्ञानसत्रांत तिची बुद्धि अखंड जागृत असावयाची. किती हि काम केलेलें असो, किती हि थकवा आलेला असो, जरासुद्धां अनवधान, डोळ्यांवर झांपड नसावयाची. तिचा तो महान् बालक—त्याचें प्रथम प्रवचन पहिल्यानें च ती ऐकत आहे. मंदिरांत गर्दी जमली आहे, शेंकडो डोळे त्या एकाच मूर्तिकडे वेधून राहिले आहेत. खादीचा पंचा आणि उपरणें पांघरलेली, ब्रह्मचर्यानें झळकणारी, जवळ च दंड आडवा ठेवलेला, तत्त्वज्ञानाची अनेक गूढें लीलेनें उकलून दाखविणारी मूर्ति व्यासपीठावर विराजमान झालेंली आहे—नाना वचनें, नाना उपमा, नाना कोट्या, नाना युक्तिवाद ह्यांचा सारखा वर्षाव होऊन राहिला आहे—श्रोते त्या तेजानें, त्या ज्ञानानें दिपून गेले आहेत! अजून हि तें दृश्य डोळ्यांपुढें तसें च दिसत आहे. तिला त्या

प्रवचनानें काय वाटलें तें काय सांगणार! सबंध प्रवचनांत ती समाधिस्थासारखी टक लावून बसली होती. निश्चल! अगदी निस्पंद! केवळ मूर्तिवत् बसून ती ऐकत होती. अशा तऱ्हेनें ज्ञानसंग्रह करण्याची तिची अखंड वृत्ति पाहून आश्चर्य वाटें. तिच्याजवळ भारत, रामायण, भागवत ह्यांतल्या कथा, साधुसंतांच्या गोष्टी ह्यांचा प्रचंड संग्रह झाला होता. अगदीं सहज काम करतां करतां एकाद्या प्रसंगावरून ती आपल्या मुलांना दृष्टांतादाखल गोष्टी सांगे आणि बोध देई. त्या वेळीं तिला भान नसे. तिचे म्हणणें अगदीं तंतोतंत खरें वाटें! किती भक्तिभावाने ती गोष्टि सांगे! एखादी वीज चमकून लख्ख प्रकाश पडावा त्याप्रमाणें अशा प्रसंगीं आईबद्दल एकदम विलक्षण आदरभाव उत्पन्न होई. ते अवधूतोपाख्यान सांगतांना तर आई किती तन्मय होत असे!

**न मे मानावमानौ स्तौ न चिंता गेहपुत्रिणाम ।**
**आत्मक्रीड आत्मरतिर्विचरामीह बालवत् ॥**

अवधूत म्हणतात— "मान-अपमानाचा बालकाला स्पर्श नाहीं. घर-परिवाराची चिंता नाही. केवळ आपल्याशीं च खेळणें, आपणांमध्येंच रमून राहणें बालकापासून मी हे गुण घेतले. तशीच त्या कुमारीची मधुर कथा ऐकतांना किती उत्सुकता वाटे! अवधूत पर्यटन करीत करीत एका झोंपड्यापाशीं येतात—

**क्वचित्कुमारी त्वात्मानं वृणानान्गृहमागतान् ।**
**स्वयं तानर्हयामास क्वापि यातेषु बंधुषु ॥**

ती कुमारी एकटी च घरीं आहे. घरांतली मंडळी कोठें बाहेर निघून गेलीं आहेत. तिचें लग्न ठरलेलें असतें. तिच्या भावी पतीकडची मंडळी त्या घरांत येतात. एकटी असल्यामुळें त्यांच्या अतिथ्याचें काम तिला च करावें लागतें.

**तेषांमभ्यवहारार्थं शालीन्वहसि पार्थिव ।**
**अवघ्नन्त्याः प्रकोष्ठस्थाश्चक्रुः शंखाः स्वनं महत् ॥**

अरेरे! ती किती गरीब होती! पाहुण्यासाठीं तिच्याकडें धान्य हि तयार नव्हतें. तेव्हां जेवण्यासाठीं म्हणून त्यांच्यासाठीं भात करावा म्हणून ती तांदूळ सडण्याला बसली. हातांतल्या कंकणांचा आवाज होऊं लागला. आपलें दारिद्र्य पाहून जेवण्या-खाण्याचा मंडळींना संकोच होऊं नये ह्या भावनेनें ती फार च लाजली. मग हातांत दोन दोन कंकणें मात्र ठेवून बाकीचीं, तिनें काढून टाकली. परंतु त्या दोन दोन कंकणांचासुद्धां आवाज होऊं लागला. तेव्हां शेवटीं तिनें एक एक च कंकण ठेवलें. मग आवाज थांबला. ही गोष्ट सांगून अवधूत म्हणतात, "मला त्या कुमारीपासून केवढा बोध मिळाला! अनेक लोकांत—जनसंभर्दांत राहण्यानें कलह होतो. इतके च काय पण दोघे एके ठिकाणीं राहिले तरी गप्पागोष्टींत वेळ जातो. तेव्हां कुमारी च्या हातांतील एकेक कंकणाप्रमाणे केवळ एकटे रहावें, हा मी बोध घेतला." अवधूताच्या गोष्टी तिच्या अगदीं आवडीच्या होत्या. श्रीकृष्ण सुदाम्याची गोष्ट. ती परमात्म्याची स्नेहकातरमूर्ती!—

**मित्रांग-स्पर्शानें झाला सुखी दयेचा सिंधु ।**
**लोचन पद्मापासुनि गळती प्रेमाश्रूंचे बिंदु ॥**

अनुक्रमणिका

त्याच्या उलट द्रुपद आणि द्रोणाचार्यांची गोष्ट. द्रौपदीचा धांवा, धृवाची तपश्चर्या, धर्मराज आणि कुत्रा, वाल्या कोळ्याची गोष्ट, मारूतीची निष्ठा,—सीतेचें करुण जीवन—अहाहा! त्या कथांची गोडी किती अवर्णनीय आहे! ती महाराष्ट्रांतली चार अद्‌भुत भावंडें, मुक्ताबाईचा चांगदेवाला उपदेश, विसोबा खेचराकडे नामदेव जात आहे, वाटेंत कुत्र्याच्या रूपानें भगवान् भाकरी पळवताहेत, विसोबा खेचर शिवलिंगावर पाय ठेवून निजले आहेत, पुंडलिक आईबापांना घेऊन जात आहे, गर्वाच्या किंचित् तावडींत छत्रपति येतात न येतात तों च समर्थ्यांच्या तोंडून उद्‌गार निघतात—

**आम्ही काय कुणाचें खातों रे । तो राम आम्हांला देतो ।**
**बांधिले घुमट किल्ल्याचे तट । तयाला फुटती पिंपळवट ॥**
**तेथें कोण लावितो मोट । बुडाला पाणी कोण घालीतो—श्रीराम ।**
**खडक फोडितां सजिव रोडकी । पाहिली सर्वांनी बेडकी ॥**
**सिंधु नसता तियेचें मुखीं । चारा कोण घालितो—श्रीराम आम्हांला देतो ॥**

—असा हा बोधमय भूतकाळ आई तसाच्या तसा मांडी! मग एकाएकीं कामाचें भान येऊन, दीर्घ निःश्वास टाकून "हं! काम आहे ना," असें म्हणून कामाला निघून जाई. त्यावेळीं मनाला किती शून्य वाटे! त्या अफाट भूतकाळांतली ती नाना प्रकारानें वाहणांरी जीवनें पाहिलीं म्हणजे एकदम विश्वरूपदर्शन झाल्यासारखें वाटे! त्याच, केवळ त्याच वेळीं, तिच्या मूढ मुलांना आईची थोरवी थोडीशी कळे.

तिनें कोठें फारसा प्रवास केला नव्हता. तीर्थयात्रा हि जवळ जवळ झाल्या नव्हत्या च. परंतु 'तीर्थीकुर्वंति तीर्थाणी' अशी तिची स्थिति होती—जशी कांहीं सर्व भरतखंड फिरलेली च आहे, अशी ती माहिती सांगे. चारी धामांची यात्रा ती बोलतां बोलतां करवी. तुंगभद्रा तर तिनें पाहिलेली च होती. तेथील "व्यण्णी हळ" ती वर्णन करी. कृष्णा, वेण्या, कोयना सर्व नद्यांचीं तीर्थें तिला माहीत असत. गोकाकचा धबधबा, शिवकांची, विष्णुकांची, बारा ज्योर्तिर्लिंगें, रामेश्वर आणि कन्याकुमारी, मथुरा, गोकुळ-वृंदावन सर्व ठिकाणीं ती नेई.

**कळों आली माव रे । भक्तिपाशीं देव रे ।**
**न पाहे चि यातिकूळ । कर्ममूळ भाव रे ॥**
**कोण पुण्यश्लोक रे । गोकुळींचे लोक रे ।**
**तयामाजीं नांदताहे । जगन्नायक रे ॥**
**भाविकांचा बंध रे । तोडी जगद्‌वंद्य रे ।**
**यशोदेनें उखळीं तो । बांधिला गोविंद रे ॥**

—मग गोकुळांतल्या कथा किती तरी निघत. 'यथाव्रज-गोपिकानाम्' नारद भक्तिसूत्रांत भक्तींचे उदाहरण नारद गोपींचे च देतात. काय त्यांची भक्ति!

**माळाकार परस्परें कर गळां घालोनि गोपांगना ।**
**गाती नाचति पाहती अवधिया एका जगज्ञीवना ॥**
**कालिंदी तट वाळुवंट गगनीं संपूर्ण तारापति ।**
**कल्हारीं कुमुदोत्पली आलि शरत्काळीं जळीं गुंजती ॥**

अनुक्रमणिका

**गोपिनायक इंद्रनील मिरवे मुक्ताफळांच्या गळा ।**
**गोऱ्या गौळणि रासमंडळि तया मध्ये हरी सांवळा ॥**
**कस्तूरी निटीली कलिंदतनया श्रीरास माळा गळां ।**
**सौभाग्य वज्रभूमिचें पदरजें त्याच्या चि आंलें फळां ॥**

काशीचें हि ती दर्शन करवी. तो तेथला शास्त्रविद्येचा पाठ, हजारों शिष्य, नाना प्रकारचे वाद, गंगातटाकीं तपस्या करणारें हजारो ऋषिमुनि एकदम डोळ्यांपुढें येत. गंगेच्या कांठावर बसून.

**भगवति तव तीरे नीर मात्राशनोहं ।**
**विगतविषयतृष्णः कृष्णमाराधयामि ॥**
**सकलकलुषभंगे स्वर्गसोपानसंगे ।**
**तरलतरतरंगे देवि गंगे प्रसीद्!॥**

अशीं म्हटलीं जाणारीं स्तोत्रें एकदम डोळ्यांपुढें उभीं राहत. कोठें हि न जातां तिला एवढी माहिती होती त्यांत आश्चर्य तरी कसलें? शंकराचार्यांनीं त्याचा निवाडा केला आहे—

**मनो निवृत्तिः परमोपशांतिः । सा तीर्थवर्या मणिकर्णिका च ।**
**ज्ञानप्रवाहा विमलाहिगंगा । सा काशिकाऽहं निजवोधरूपा ।**
**काशीक्षेत्रं शरीरं त्रिभुवनजननी व्यापिनी ज्ञानगंगा ।**
**भक्ति श्रद्धा गणेशं निजगुरुचरणध्यान योग-प्रयागः ॥**
**विश्वेशोऽयं तुरीयः सकलजनमनः साक्षिभतोऽन्तरात्मा ।**
**देहे सर्वं मदीये यदि वसति पुनस्तीर्थंमन्यत्किमस्ति? ॥**

कोंकणातून बडोद्यास जातांना वाटेंत नर्मदा, तापी दोन्हीं नद्या लागावयाच्या. "नर्मदा नदी आली कीं आम्हांला उठव बरं" असें मुलें म्हणत. ती मग जागत बसें. नर्मदेचें ध्यान करी. नदी आली कीं तिच्या डोळ्यांत आनंदाश्रु चमकत. अगदीं भक्तिभावानें हात जोडून नारळ पैसे तिच्यांत टाकी. मुलांच्या हातांत पैसे देऊन त्यांच्याकडून ती पैसे टाकवी—तो प्रसंग अजून डोळ्यांपुढेंच आहे. जसा आतां च घडत आहे!

भारतवर्षाच्या सर्व भूतकाळाप्रमाणें वर्तमानकाळाची हि तिला बिनचूक माहिती असे स्वतः वर्तमानपत्र कधीं वाचीत नसे. परंतु आपल्या मुलांकडून केसरी वाचवून घेई. अगदीं लहानपणापासून तिचें देशाकडे लक्ष होते. माधवराव रानडे, केरुनाना छत्रे, कुंटे, भांडारकर, ह्यांच्या ती गोष्टी सांगे. कॉंग्रेसची तिला चांगली माहिती असे. दादाभाई नौरोजी, सुरेंद्रनाथ बानर्जी, अरविंद घोष, 'लाल-बाल-पाल' ही जहाल त्रिमूर्ति, 'गोखले-वाच्छा-मेथा' ही मवाळ त्रिमूर्ति—त्या सर्वांविषयीं तिला अतिशय आदर वाटें. आपल्या मायभूमीला मुक्त करण्यासाठीं धडपडणाऱ्या त्या पुढाऱ्यांप्रमाणेंच सावरकर, खुदिराम बोस यांच्या धाडशी कृत्याकडे हि ती अभिमानानें पाही. त्यासंबंधीं गोष्टी निघत. विवेकानंदांचा वेदान्तदिग्विजय, रामतीर्थांचें हिमालय पर्यटन ह्यासंबंधी तिला किती कौतुक वाटे! आपल्या मुलांकडून ती त्या देशभक्तांचीं चरित्रें वेळांत वेळ काढून वाचवून घेई. शिवाजीचें केळुसकरांचें चरित्र, बापटांचें, बाजिरावाचें चरित्र, विवेकानंद, टिळक, रामतीर्थ, झांशीची राणी, अहिल्याबाई, रामकृष्ण परमहंस—अनेकांचीं चरित्रें तिनें वाचून घेतलीं होतीं. "देशाची सेवा केली म्हणजे देवाची सेवा झालीच", अशी तिची समजूत होती. 'पण

थोडेसें भजन हि पाहिजे' असें ती म्हणे. तिचें सकाळ संध्याकाळचें भजन कधींहि चुकलें नाहीं. टिळक कैदेंत गेलें तेव्हां तिनें साखर सोडली. परदेशी वस्तु घरांत येऊं नये असा तिचा कटाक्ष होता.

तिच्या अल्प—अतिशय अल्प—आयुष्यामधें घरांतल्या घरांत राहून तिनें केवढा अनुभव मिळविला! किती पुण्यसंस्कार तिनें जमा केले! प्राप्त कर्तव्य बजावीत असतां किती परोपकार केला! एका च अल्प जन्मामध्यें अनंत जन्मांचें सार्थक करून ती गेली!!! आपल्या मुलांच्या चिंतेनें खचित च तिचें अर्धें आयुष्य आधीं च नष्ट झालें. गृहत्याग करून गेलेल्या त्या महान् बालकाच्या चिंतेनें तिचें हृदय विदीर्ण झालें. बसतां, उठतां, जागतां, निजतां त्याची चिंता तिला ग्रासून टाकी. त्याला ती ज्ञानी समजे, अवतारी मानी. **'यद्यदेव वदति तत्तदेव भवति'** असा वाचासिद्ध समजे. त्याच्या जवळ तिचे नानाप्रकारचें संवाद होत. ती नाना प्रश्न विचारी, अशी ही अगदीं अकल्पित तऱ्हेनें 'कपिल-देवहूती' —च्या प्रसंगाची पुन्हां एकदां पुनरावृत्ति होई.

ती आई जिवंत नाहीं असें वाटत च नाहीं. जेव्हां जेव्हां स्वप्नें पडावीं तेव्हां तेव्हां ती जिवंत आहे, बोलत आहे, तिचा दासबोध आदि नित्यपाठ करीत आहे, 'अर्जुना! इतर मज कांहीं! इतर मज कांहीं! भक्तीविण आवडत नाहीं' — अशीं गाणीं म्हणत आहे, कामांत दंग आहे, असें च दिसतें. आणि तिची मृण्मय मूर्ति गेली तरी तिच्या त्या ज्ञानी बालकानें तिची चिन्मय मूर्ति हृदयसिंहासनावर मांडून ठेवली आहे. तो म्हणतो—"मला गीतेचा अर्थ थोडाफार समजूं लागल्यानंतर थोड्या दिवसांनीं माझी आई मेली. म्हणजे मला गीतेच्या ओटींत घालून ती गेली. आई गीते! तुझ्या च दुधावर आतांपर्यंत मी पोसलों आणि ह्यापुढें हिं तुझा च आधार आहे."

**गीताई माऊली माझी तिचा मी बाळ नेणता ।**
**पडतां रडतां घेई उचलूनि कडेवरी ॥**

—अशा त्या माऊलीला एका पारड्यांत घाला आणि दुसऱ्या पारड्यांत सारें जग. तिचे पारडें जड ठरेल!

**रुक्मिणीनें एका तुळशीदळानें गिरिधर प्रभु तुळिला ।**

—त्या तुलसीदलासारखी तिची स्थिति होती. तिचें दुसरें नांव हि रुक्मिणी होतें. पण ह्या सर्व नामरूपाचें आतां काय! हे माते! तुझ्या मुलांना 'आई' हें एक च मंत्रमय नांव पुरे आहे. त्यांना मार्गदर्शन करून आश्वासन देणारें तें तुझें एक च पावन स्मरण हि बस आहे—

**वयं त्वद्हृदयरुधिरपोषिताः!**

●●●

अनुक्रमणिका

## प्रकरण ४ थे

## योगी

**त्वं हि नः पिताऽसि । पिता तो बोधि ।**

**पित्यासंबंधी** वैदिक संस्कृतींत केवढा आदर! साक्षात् परमेश्वराला च पिता म्हटलें आहे. मनुष्याचें वैशिष्ट्य केवळ पैतृक संस्कारांत आहे. मातृवात्सल्य तर पशु-पक्ष्यांतहि दिसून येतें. तें सार्वत्रिक आहे. विश्वव्यापी आहे. परंतु पितृवात्सल्य फक्त मनुष्यांत च विकसित झालें. मुलानें आपल्या नांवापुढें बापाचें नांव एवढ्यासाठीं च लावावयाचें. नारीहृदयांतून प्रेमाची, वात्सल्याची, अहिंसेची, भक्तीची गंगा उगम पावली ती च पैतृक संस्काराच्या योगानें धैर्य, गांभीर्य, कर्मयोग अशा दिशेने वाहूं लागली! त्या पवित्र जीवनाच्या तीरावर च मानवी संस्कृति वसली आहे! भाव आणि शास्त्र, हृदय आणि बुद्धि, ज्ञान आणि कर्म ह्यांचा संपूर्ण उपयोग करून मानवी संस्कृति उत्तरोत्तर दैवी संस्कृतीकडे जावी हा पैतृक संस्काराचा आदर्श आहे. हा आदर्श ज्यांच्या ठिकाणीं मुरला असेल, त्यांच्या च ठिकाणीं खऱ्या अर्थानें पितृत्व आहे असें म्हणावयाचें. ‘स पिता पितरस्तासां केवलं जन्महेतवः’। केवळ जन्महेतु पिता हा पिता नव्हे. त्याशिवाय ईश्वराकडून आलेल्या परमशुद्ध, निर्विकार, निर्मळ, अनासक्त, तटस्थ आणि अतिशय तैलबुद्धीच्या बालकाला गुरुतुल्य होणें ही पितृत्वाची फार च मोठी कठिण कसोटी आहे. मानवाचा विकास, दैवी संपत्तीचा आदर्श आणि बालकाचें गुरुत्व, ह्या तीन गोष्टींवर—ह्या तिपाईवर पितृत्वाची थोर पदवी अधिष्ठित झालेली आहे.

ह्या पदवीला संपूर्ण लायक असें जीवन कठिण तर खरें च. पण तें जीवन प्रत्यक्ष आपल्या डोळ्यांपुढे दिसत आहे; अगदीं आपल्यासमोर च आहे. आपल्या दिव्य चारित्र्यानें देदीप्यमान झालेल्या त्या जीवनाकडे पाहतांना किती विस्मय वाटतो! आयुष्याची संध्याकाळ झाली असून हि, तेथें आपणांला प्रभातकाळचा उत्साह दिसतो. विद्यार्थीदशा गेली, मध्यदशा उलटली, सगळा संसार समाप्त झाला तरी तेथें खऱ्या विद्यार्थ्याची ज्ञानजिज्ञासा प्रतिपच्चंद्राप्रमाणे वाढत च आहे. विश्रांतीचा काळ असून तेथें अविश्रांत कर्मयोग चालला आहे. कोणी हि मदतीला नाहीं तरी सर्व साहाय्ये तेथे स्वतः सिध्द जय्यत तयार च आहे! उणें कांहीं च नाहीं, असें दिसतें ही का जादू म्हणावी? का हा दैवी चमत्कार समजावा? होय. ही जादू आहे. हा दैवी चमत्कार च आहे. ह्या चमत्काराला ‘योग’ म्हणतात. ह्या योगशक्तीमुळें च ही अशी विस्मयजनक अवस्था आपल्याला प्रत्यक्ष दिसत आहे! गीतेंत भगवंतांनीं ह्या अवस्थेचें वर्णन केलें आहे—

**अग्निर्ज्योतिरहः शुक्लः षण्मासा उत्तरायणम् ।**
**तत्र प्रयाता गच्छंति ब्रह्म ब्रह्मविदो जनाः ॥**

हा योग साधासुधा नाहीं. तो अचूक ध्येयप्राप्ती करविणारा देवयानपंथ आहे. येथे उत्तरोत्तर ज्ञान, उत्तरोत्तर शुद्धि, उत्तरोत्तर सावधानता, उत्तरोत्तर आनंदाची वाढती चित्कला च दिसावयाची! येथें प्रत्येक आपत्तींतून संपत्ति च निघावयाची.

**“संपतौ च विपत्तौ च महतामेकरूपता” ।**

अनुक्रमणिका

हे म्हणण्याची येथें आवश्यकता च नाहीं.

**“विपदो नैव विपदो संपदो नैव संपदः”**

विपत्ति ही विपत्ति नाहीं. संपत्ति ही संपत्ति नाहीं—सर्व ईश्वरमय, ज्ञानमय आहे! नवीन कागद करण्याचा प्रयोग करतां करतां उजव्या हाताला जखम झाली. त्यामुळें तो हात १५/२० दिवस निरुपयोगी झाला, परंतु म्हणून आपलें नित्य कर्म थांबविलें का? का तेथें दुःखाची उदास छटा उमटली? मुळींच नाहीं. उलट ह्या अवस्थेंत एकाच हातानें सर्व कामें करून शेवटीं हात बरा झाल्यावर आपल्या मुलाला लिहितात, “आतां हात बरा झाला आहे. एकादा अवयव अधु झाला म्हणजे त्या अवयवाची किती आवश्यकता असते ह्याचें ज्ञान ह्या प्रसंगामुळें होतें.” ज्ञानाची ही किती एकनिष्ठ उपासना!

बालवयापासून त्यांच्या जीवनांत ज्ञानोपासना सहज च ठसून गेली होती. प्रत्येक गोष्ट मोजून, मापून, तपासून पहावयाची, प्रत्येक विषयाचे काळजीपूर्वक पृथक्करण करावयाचें, त्याच्या मुळाशीं जावयाचें ही अगदीं सहजवृत्ति! मुलगा प्रश्न विचारतो, ‘बाबा व्हिटामिन व्हिटामिन तें काय?’ त्याला उत्तर देतात, “व्हिटामिन हें वस्तूंतून अलग काढून दाखवितां येत नाहीं. पण तें आहे ह्यांत शंका नाहीं.” त्यावर दुसरा प्रश्न विचारला, “मग आहे कसें म्हणावें? आहे तर तें अलग कां काढतां येऊं नये?” त्यावर म्हणतात, “व्हिटामिन हे ‘त्व’ आहे, ‘त्व’ हे कधीं अलग करतां येईल का? ‘मनुष्यत्व’ म्हणून कांहीं अलग काढून दाखवितां येईल का? तसेंच व्हिटामिन आहे.” शास्त्रीय विषयांत रमणाऱ्या बुद्धीची मूलग्राही धांव अशा प्रकारच्या सहज संभाषणांत हि ध्यानांत यावयाची. ज्ञानोपासनेमुळें वृत्तींत सदैव गंभीरता असावयाची, त्यामुळें स्वतःच्या ज्ञानोपासनेच्या कोणत्या हि गोष्टीसंबंधानें कोणाला हि कांहीं कळावयाचें नाहीं. ते एकदां सहज बोलतां बोलतां म्हणाले, “मी पुण्याला शिकत होतों. माझ्या वर्गांत अनेक हुषार मुलें होतीं. प्रत्येकाचा एकेक आवडीचा विषय ठरलेला असे. कोणी म्हणे मला भाषाविषय आवडतो, पण गणितांत कांहीं आपली गति नाहीं. कोणी म्हणें इतिहास मला उत्तम येतो, पण भूगोल किती केलें तरी येत च नाहीं. मला हें सर्व ऐकून नवल च वाटे! जर एका विषयांत बुद्धि चालते तर ती दुसऱ्या विषयांत कां चालूं नये? हा विषय आवडतो आणि दुसरा आवडत नाहीं हें काय? ह्या विषयांतली गोडी जर चाखली तर दुसऱ्या विषयांतील गोडी हि घेतां आली च पाहिजे. मला जो जो विषय जरूर वाटतो त्या प्रत्येकांत माझी गति चालते. आणि प्रत्येक विषयांतली गोडी घेतां येते.” ह्या वरून त्यांच्या अभ्यासाची काय पद्धति होती तें लक्ष्यांत येतें. “समत्वं योग उच्यते” ही योगाची व्याख्या त्यांच्या अभ्यासाला तंतोतंत लागूं पडत असे. नेमस्तपणें सर्व क्रिया करावयाच्या. शांतपणे कार्यक्रम चालवावयाचा. कोणत्या हि गोष्टीचा अतिरेक करावयाचा नाहीं. अशी त्यांची पद्धति असे. त्यामुळें प्रत्येक विषय संथपणे आत्मसात् करून त्याची गोडी त्यांना घेतां आली. गणितासारख्या रुक्ष समजल्या जाणाऱ्या विषयांत हि त्यांची आश्चर्यकारक गति असे. इंग्रजी, पदार्थविज्ञान, रसायन, तर्क, प्रत्येक विषयांत त्यांनीं प्राविण्य संपादन केलें होतें. असें, पुण्याला कॉलेजमध्यें सुमारें इंटरमिजिएट पर्यंत शिक्षण झालें.

परंतु वडिलांनीं जास्त शिक्षण घेण्याची परवानगी दिली नाहीं. तरी कोणत्या हि प्रकारें नाखूश न होतां, त्यांची आज्ञा वंद्य समजून हें शाळेंतलें शिक्षण त्यांनीं संपविलें. “माय बापें केवळ काशी। तेणें नव जावें तीर्थासी”, तुकाराम महाराजांच्या ह्या तत्त्वाप्रमाणें त्यांचें वर्तन असे. जुन्या पद्धतीप्रमाणें संध्यादींच्या योगानें वडिलांना संतोष होतो म्हणून ते संध्यादि क्रिया करीत. त्यांच्या आज्ञेचा भंग कधीं हि करीत नसत. दृष्टि कमी झाली म्हणून त्यांना वाचण्यास सुलभ अशा त्यांच्या नित्यपाठ्याच्या पोथ्या अगदीं मोठ्या आणि सुंदर

अनुक्रमणिका

अक्षरांत तयार करून देत. त्याचा आईवडिलांना केवढा संतोष होई! वडील देवासाठीं वाटेल तेवढें कर्ज करीत, व्यवहाराकडे यत्किंचित् हि पहात नसत. परंतु त्यांच्या ह्या गोष्टींत कोणत्या हि तऱ्हेनें स्वप्नांत सुद्धां निरर्थक भाव त्यांनीं पाहिला नाहीं. वडिलांना जें कांहीं करावयाचें तें त्यांनीं करावें; आपण त्यांची होईल तेवढी सेवा करणें, एवढेंच आपलें काम असें ते मानीत. त्यांच्या उपासनामय जीवनाबद्दल त्यांना स्वाभाविकपणें च अतिशय आदर वाटे. उत्तर हिंदुस्थानांत काशीला जाऊन आले, तेव्हां मातापितरांसाठीं त्यांनीं गंगेची घागर मुद्दाम आणली. गंगेचें स्नान घडल्यामुळें त्यांना केवढा आनंद झाला! देवांमध्यें ते गंगातीर्थ अजून हि पूजिलें जातें! व्यवसायानिमित्तानें दूर राहिल्यामुळें त्यांना पुढील वयांत आई, वडिलांची सेवा करण्याचा प्रसंग क्वचित् च येत असे. परंतु त्यांचें चित्त मात्र दूर राहून हि आईबापांच्या सेवाभावानें परिपूर्ण भरून गेलेलें असे.

पुण्यास शिक्षण झाल्यानंतर कांहीं दिवस त्यांनीं शिक्षकाचें काम केलें. शिक्षक या दृष्टीनें त्यांची असामान्य योग्यता त्यांच्याजवळ अल्प हि शिकलेल्या मनुष्याला कबूल करावी लागते. शिक्षकाचें काम त्यांनी अल्पावधींतच सोडलें. तरी “स्वाध्याय प्रवचनाभ्यां न प्रमदितव्यम्” ही श्रुतीची आज्ञा त्यांच्या ठिकाणीं स्वभावतःच मुरून गेलेली असे. केव्हां हि कोणी हि विद्यार्थी आला की, लगेच त्याला अगदीं स्पष्ट, गोड रीतीनें, आवडीनें तो तो विषय ते समजवून द्यावयाचे. हायस्कूलमधले कित्येक विद्यार्थी रात्रीं त्यांच्याकडे येत. दुपारचा ऑफीसचा वेळ सोडून बाकीच्या वेळांत कोणी हि यावें! कोणाला इंग्रजी, कोणाला गणित, कोणाला कांहीं, कोणाला कांहीं असें चालूं च असे. स्वतः कोणापासून हि कांहीं शिकण्यासारखे असेल तर शिकण्यास तयार असत.

आपल्या ऑफीसचें काम हि त्यांनीं अतिशय चोखपणें बजावलें. कष्टाळू स्वभाव असल्यामुळें त्यांच्या कार्याविषयीं सर्वांस समाधान असे. दिवाण मनुभाई मेहता खाजगी खात्याचे अधिकारी असतांना त्यांनीं “अतिशय नेमस्त, मितभाषी, कष्टाळू, अत्यंत प्रामाणिक” अशा तऱ्हेचा त्यांच्याविषयीं अभिप्राय व्यक्त केला होता. आपल्याला स्वाभाविकपणें जें मिळेल त्याव्यतिरिक्त अधिक पैसे मिळण्यासाठीं वरिष्ठांकडे नाना तऱ्हेची खटपट करणें, वगैरे प्रकार त्यांनीं कधीं हि केले नाहींत. अधिक द्रव्याचा त्यांनीं लोभ ठेवला च नाहीं. मिसेस स्ट्रॉंग ह्या अमेरिकन बाईंच्या हाताखालीं काम करीत असतां त्यांची योग्यता पाहून त्यांना अतिशय विस्मय वाटला. त्यावेळी त्यांना ५०—६० रुपये मिळत असत. इतक्या योग्यतेच्या माणसाला इतका कमी पैसा दिला जावा हा अन्याय आहे असें वाटून त्या बाईंनीं सयाजिराव गायकवाडांकडे त्यांच्यासंबंधीं लिहिलें. त्यासंबंधीं त्यांस विचारलें असतां “मला मिळतो हा पैसा बस आहे. अधिका ची अपेक्षा नाही”, असें त्यांचें उत्तर ऐकून त्या बाईस किती आश्चर्य वाटलें असेल! सयाजीरावांकडे लिहून हि त्यांना अधिक पगार देत नाहींत. असें पाहून कांहीं दिवसांनीं “हा अन्याय दूर करण्यासाठीं मला माझ्या पगारांतून त्यांना पैसे द्यावें लागतील” असे जेंव्हां त्या बाईंनीं लिहिलें तेव्हां मग अधिक पैसे मिळूं लागले. केवळ कांहीं वरिष्ठ अधिकाऱ्यांची च गोष्ट नाहीं, ऑफीसमधील प्रत्येक मनुष्याला त्यांच्याविषयीं आदर असे. हाताखालच्या माणसांना हि प्रेम आणि जिव्हाळा वाटे. ज्यावेळीं दरबार असे तेव्हां विशिष्ट तऱ्हेचा शुभ्र पोशाख करावा लागे. ऑफीसमधल्या पुष्कळांचा तो पोषाख अस्वच्छ असावयाचा. कित्येक वेळां त्यांवर साध्या धुण्यानें न निघणारे डाग हि असावयाचे. ते काढण्यासाठीं दरबारच्या दिवसाच्या अगदीं आधल्या दिवशीं कित्येकांनीं यावें व म्हणावें, भावे, पहा बुवा हा एवढा डाग कांहीं निघत नाहीं आणि उद्यां तर दरबार! मग त्यांनीं ते कपडे रात्रीच्या रात्रीं धुवून, नाना रसायनांच्या साधनांनीं ते डाग काढून इस्तरी करून अगदीं झक्क पोशाख तयार करून द्यावा. कोणाला कांहीं टाइप करावयाचें असलें तरी पुडकींच्या पुडकीं घेऊन

कित्येक जण येत. मग ऑफीसचें काम करून उरलेल्या वेळांत लोकांचीं कामें करून द्यावयाचीं. अशीं कामें केल्यावर कोण संतुष्ट होणार नाहीं?

ऑफीस सोडून घरीं सुद्धां उद्योगाखेरीज ते क्षणभर हि स्वस्थ बसत नसत. रविवारीं किंवा इतर सणाच्या दिवशीं हि स्वस्थ बसले आहेत, किंवा दुपारीं झोंप घेताहेत असें दिसावयाचें नाहीं. घराच्या एका खोलींत उद्योगाची नाना उपकरणें ठेवलेलीं असत. तेथें ते कांहींतरी प्रयोगांत दंग असावयाचे, रसायनशास्त्रावरचीं, रंगासंबंधीचीं दुर्मिळ पुस्तकें, अनेक प्रकारचीं ॲसिडें, नाना प्रकारच्या मिश्रणांच्या बाटल्या, मातीचे कुंडे, कांचेच्या नळ्या, निरनिराळ्या प्रकारच्या वनस्पति—एक छोटीशी प्रयोगशाळाच असे. तेथें त्या अडगळींत त्यांचा कांहींतरी उद्योग सुरू असावयाचा. स्टोव्हवर कांहींतरी मिश्रण तापत आहे, त्यांत निरनिराळीं फडकीं बुचकळताहेत, काचेच्या नळींत ओतून पुन्हां त्याची परीक्षा करताहेत असे सतरा प्रयोग आढळत. त्याची इतरांना कांहीं च माहिती नसावयाची. त्या खोलींत बहुधा कोणी जात हि नसे. अशा प्रयोगांत सुट्टीच्या दिवशीं १२—१ हि वाजून जाई, इतरांना भुका लागून जात. तरी त्यांच्या तंद्रीचा भंग होत नसे. रंगाचा अत्यंत काळजीपूर्वक दीर्घ अभ्यास केल्यामुळें तत्संबंधीच्या संशोधनांत च ते निमग्न असत. त्या खोलींत कापडावर छापण्याच्या निरनिराळ्या नकाशांचे ठसे ठेवलेले असत. स्वतः हि नवीन नवीन पत्र्याचे, लांकडाचे ठसे तयार करीत. त्याची ठोक ठोक चालूं असे. रंगाच्या मिश्रणासंबंधी स्वतः केलेलीं टिपणें तरी किती असत! त्यांच्या अशा उद्योगाकडे पाहून सहज एखादा शेजारचा मनुष्य म्हणे हि “भावे, ह्या सगळ्या प्रयोगाचा फायदा काय?” त्याला काय उत्तर देणार? हा विद्यानंद होता. त्याचा फायदा कसा मापावयाचा? बहुधा त्याला कांहीं उत्तर मिळत नसे. तो प्रश्न ते हसून च घालवीत असत. पक्क्या रंगाचीं मुळाक्षरें छापून त्यांनीं त्याचे हातरुमाल तयार केले होते. मुलांना दप्तर बांधण्यास रुमाल उपयोगी पडून त्यांच्यासमोर मुळाक्षरें हि सतत राहतील अशी दृष्टि होती. शाळाखात्यांत असे रुमाल उपयोगी पडतील अशी त्यांची कल्पना होती. अतिशय सुबक अक्षरें, स्वच्छ पांढऱ्या कपड्यावर पक्क्या रंगांत छापून इस्तरी करून, घडी घालून त्याचें सुंदर सुंदर नमुन्याचे रुमाल पुष्कळ ठिकाणीं त्यांनीं पाठविलें होते. अर्थातच ते लोकांना फार आवडले होते. हे रुमाल मिळण्याचा पत्ता ‘एन्. एस्. भावे ॲन्ड सन्स’ —असा असे. ‘सन्स’चा ह्या उद्योगांत कांहीं फारसा भाग नसें हे निराळें! तशी च नमुन्यादाखल पुष्कळ तऱ्हेचीं चिटें हि तयार करीत. त्याशिवाय घरचे मुलांचे, स्वतःचे सर्व कपडे बहुधा स्वतः शिवत. स्वावलंबन, शिंपी कामाचे ज्ञान अशी त्यांत विविध दृष्टि असे! घरचा शिंपी हें एकच मराठी पुस्तक त्यांच्यापुढें असे. बाकी त्या विषयांची इंग्रजी मधली सुंदर सुंदर पुस्तकें ते सेंट्रल लायब्रींतून आणून वाचीत. अगदीं संध्याकाळ झाली, ऑफीसमधून थकून आले, मध्यें बिलकुल विश्रांती नाहीं, तरी संध्याकाळच्या अंधुक प्रकाशांत ते खिडकीशीं कपडे शिवत बसलेले अनेक वेळां दिसत. टोप्या शिवून, कुराणाच्या प्रति लिहून आपला खासगी खर्च चालविणाऱ्या मुसलमान बादशाहांच्या गोष्टींचा ऐतिहासिक पुरावा मिळो किंवा न मिळो, येथें अशा उद्योगशीलतेविषयीं संशय नाहीं. असे प्रत्यक्ष उदाहरण आहे! आमचे राष्ट्र गुलाम कां? आमची हीन स्थिती कां? उद्योगाची आमच्यांत वृत्ति नाहीं म्हणून. अशी त्यांची ठाम समजूत आणि अतिशय योग्य समजूत असे. त्याप्रमाणें ते स्वतः रात्रंदिवस उद्योगांत मग्न असत. घरचे कपडे हि धोब्याला देत नसत. स्वतः सर्वांचे कपडे धूत. सोड्याची भट्टी लावीत. कपडे धुण्याचे हि निरनिराळे प्रयोग करीत. लॉंडरीवरची सेंट्रल लायब्रीमधील पुस्तकें त्यांच्या बैठकीवर दिसत. इतरांना त्यांतलीं सुंदर सुंदर चित्रें पाहण्यापलीकडे कांहीं गम्य नसे. मोठी पितळी इस्तरी हि आणून ठेवली होती. तिचा हि उपयोग करीत. कपडे धुणें, कपडे शिवणें, रंगांचे प्रयोग करणें, लोकांचीं निरनिराळीं कामें करून देणें, शिकवणें, घरचा बाजार वगैरे करणें—ह्याशिवाय उद्योगाच्या निरनिराळ्या शाखांकडे त्यांची चौफेर नजर असे. लहान सहान उद्योगधंदे हि त्यांच्या नजरेंतून सुटत नसत. गुजराथमध्यें नवारीचा धंदा बरा च चालतो. नवार विणणाऱ्या गरीब लोकांच्या झोंपड्यांत जाऊन ते तास तास त्या लोकांशीं

अनुक्रमणिका

बोलत. त्या लोकांना मोठें नवल वाटे! कुंभाराचे काम—पॉटरी—हि पाहत. ‘होजिरी वर्क’ ची माहिती त्यांनीं मिळवली होती. आपल्या मुलाला तें काम शिकवण्यासाठीं त्यांनीं पाठवलें होतें. त्यांच्या फोटोग्राफर मित्रांनीं ‘विविध कलामंदिर’ काढलेलें होतें. तेथें मधून मधून फेरी असावयाची. बडोद्यांतल्या प्रसिद्ध ‘कलाभुवनमधील’ ललित आणि साध्या कलांकडे त्यांचें लक्ष असे. तेथें त्यांनीं कित्येक विद्यार्थ्यांना—त्याचप्रमाणे आपल्या मुलाला हि—शिकण्यासाठीं पाठविलें होतें. चित्रकला, शिल्पकला, सुतारी, एंजिनियरिंग, सर्व विषयांत त्यांची बुद्धि चाले. त्यांत ते निरीक्षण करून विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करून देत. ह्या बाबतींत इंग्रजी पुस्तकें हा त्यांचा फार मोठा आधार असे. इंग्रजी शिकावयाचें तें एवढ्या च साठीं अशी त्यांची योग्य समजूत होती. इंग्रजींतल्या वाङमयाकडे तो बघत नसत. इंग्रजींतल्या उद्योगधंद्याच्या शास्त्रीय पुस्तकांचें मात्र आता फार महत्त्व वाटे. कोणता हि महत्त्वाचा उपयुक्त धंदा त्यांच्या नजरेंतून सुटला नाहीं. चिकित्सक, गणिती आणि चौकस नजरेनें प्रत्येक उद्योगाकडे ते लक्ष पुरवीत.

रात्रीं बारा बारा वाजेपर्यंत कित्येक वेळां ते अशीं शास्त्रीय पुस्तकें वाचीत पडलेले आहेत असें दिसे. जेवणाच्या वेळीं हि त्यांचें संशोधनविषयक विचार चालत. पाटावर बसून डोळे मिटून ते विचारांत मग्न आहेत असा देखावा अनेक वेळां पहावयास सांपडे. समोर ताट वाढलेलें असलें तरी त्यांना समजत नसे. मग ‘ताट वाढलें’ म्हणून कोणी आठवण करून दिली कीं, एकदम समाधिभंग झाल्याप्रमाणें भानावर येऊन जेवण्यास सुरुवात करीत.

रंगाचें काम मोठ्या प्रमाणावर आपल्या हातून व्हावें, त्यामधील अनेक व्यावहारिक खुब्या समजाव्या, एवढ्यासाठीं वर्ष दोन वर्ष रजा काढून ते मुद्दाम कानपूरमधील रंगाच्या गिरणीत गेले. आपलीं मुलें माणसें सोडून ज्ञानासाठीं मुद्दाम अडचणींत राहिले. तेथें मॅनेजरच्या हाताखालीं त्यांनीं काम केलें. सकाळीं सहाला जाऊन संध्याकाळीं सहापर्यंत बारा तास गिरणींत काढावयाचे. उभें राहून पायांत गोळे येत. परंतु ज्ञान साधनेंत खंड नाहीं. तेथें अधिकाराच्या जागेवर असून अगदीं बारीक सारीक कामें हि हातानें करीत. तेथल्या मजुरांत मिसळत. वरचे अधिकारी आहेत असें त्यांना वाटत हि नसे. त्यांच्या कामांत हौसेनें भाग घेत. सर्वांशीं हंसून खेळून वागत. त्यांना होईल ती पैशांची मदत हि करीत. त्यांच्याबरोबर बसून मधले जेवण घेत. मजुरांपैकी कोणी आजारी पडलें’ कोणाला कांहीं झालें तरी चौकशी करून त्याच्याकडे जात. त्याला आश्वासन देत सर्वांना त्या गिरणींत ते अगदीं प्रिय होऊन बसले होते.

**प्रियप्राया वृत्तिर्विनयमधुरो वाचि नियमः ।**
**प्रकृत्या कल्याणी मतिरनवगीतः परिचयः ॥**
**पुरो वा पश्चाद्वा तदिदमविपर्यासितरसं ।**
**रहस्यं साधूनां अनुपधि विशुद्धं विजयते ॥**

कोठेंहि जा, साधुत्वाचा जय च आहे! भवभूतीची ही उक्ति त्या ठिकाणीं हि प्रत्ययाला आली. जेव्हां त्यांचे गिरणींतील काम संपलें आणि त्यांनीं मॅनेजरजवळ परत जाण्याची गोष्ट काढली तेव्हां त्या युरोपियन मनुष्यास अतिशय वाईट वाटलें. त्यानें त्यांना न जाण्याचा किती आग्रह केला! “तुम्ही कां जातां? तुम्हांला येथें कांहीं कमी आहे का? तुमचा पगार दुप्पट करूं.” नाना तऱ्हेनें त्यानें त्यांना राहवून घेण्याचा प्रयत्न केला. ‘निदान तुम्हांला दुसरीकडे कोठें काम करण्याची इच्छा होईल तर प्रथम आम्हांला विचारा,’ असा एक आशेचा धागा त्यानें शेवटीं जोडून घेतला च! मजुरांना किती वाईट वाटलें त्याची तर कल्पना च देणें शक्य नाहीं. वर्ष-सवावर्षांत त्यांचे अगदीं इतके प्रेमाचे दृढ संबंध होऊन गेले होते कीं, जन्मजन्मांतराचे जसे

संबंध असावेत! त्यांना असा अधिकारी जन्मांत पाहावयास मिळाला नव्हता. पुराणांत आपण रामचंद्राच्या वनगमन प्रसंगाचें चित्र वाचतों. श्रीकृष्ण गोकुळ सोडून जातांना गोपगोपींची करुण अवस्था वाचतों. ह्या निव्वळ का यांतल्या किंवा पुराणांतल्या गोष्टी नाहींत. त्या कानपूरच्या मजुरांचा निरोप घेतेवेळीं असा देखावा प्रत्यक्ष दिसला. तेथें तीं च पुराणकालचीं चित्रें पुन्हां रंगलीं. काळ पालटला असला म्हणून कांहीं साधुत्व पालटलें नाहीं. आणि साधुत्वाला वश होणारें मानवी मन हि तेंच आहे. तें मन आणि साधुत्व ह्यांची ती पुराणलीला देशकाल परिस्थितीचा फक्त वेष पालटून त्या ठिकाणीं पुन्हां अनुवृत झाली. तो युरोपियन अधिकारी कोण? त्याचा देश, त्याचा वेष, त्याची भाषा, त्याचा धर्म, त्याचें जीवन किती भिन्न! ह्यांचा त्याचा कांहीं संबंध? आणि ते निरनिराळ्या जातींचे, निरनिराळ्या वयांचे, निरनिराळ्या धर्मांचे मजूर, ह्यांचे आणि त्यांचें तरी काय नातें होतें? त्यांचें प्रेम संपादन करण्याची, सेवा करण्याची त्यांना कांहीं जरूर होती? नाहीं. गरजेनें ह्या गोष्टी घडत नसतात. येथें निर्हेतुकता च लागते. झरा कां वाहतो? वाहणें हेंच त्याचें जीवन. सूर्य कां प्रकाश देतो? प्रकाश देणें हें च त्याचें अस्तित्व. मूक सेवामय जीवन हा त्यांचा सहजस्वभाव च! त्यांत हेतु नाहीं. ‘मातृप्रेमा हेतु नसे’ —येथें हि अशी च गोष्ट आहे.

प्रवाहपतित संस्थांनीं सेवेंत ठराविक काल देऊन आपली कौटुंबिक जबाबदारी पार पाडीत, संशोधनामध्यें अग्रेसर होत होत, अनेकांची सेवा करून सोज्वल आणि गंभीर झालेला जीवनप्रवाह शांतपणें पुढें पुढें चालला होता.

**कां फेडित पापताप । पोखित तीरींचे पादप**
**समुद्रा जाय आप । गंगेचें जैसे ॥**
**कां जगाचें आंध्य फेडित । श्रियेचीं राऊळें उघडित ।**
**निघे जैसा भास्वत । प्रदक्षिणे ।**

अशाच तऱ्हेचें हें जीवन! पण एकाएकीं त्यांत केवढा फरक पडला! बाहेरचा सगळा देखावा एकदम पालटला! ज्या कौटुंबिक जबाबदारीसाठीं कांहीं बाह्य उद्योग अथवा सेवा करावयाची तें कुटुंब एकाएकीं नष्ट झालें! सर्वजण मिळून उद्योगाच्या ज्ञानसाधनाच्या सत्रांत एकत्र भाग घेतील त्या मनोरथाचा पूर्ण विध्वंस झाला. “एकमेकां करूं सहाय्य । अवघे धरूं सुपंथ” एवढी च त्यांची कल्पना असे. आपल्या उद्योगमयतेंत आपल्या कुटुंबियांनीं, आपल्या मुलांनीं, भाग घ्यावा ही च त्यांची अत्यंत योग्य इच्छा होती. मुलांच्यापासून पैशाची किंवा वंशवृद्धीच्या सांसारिक कल्पनांची त्यांना अपेक्षा नव्हती. परंतु एका मागून एक सर्व च मुलांचा मार्ग वेगळा ठरत चालला. त्यांत कांहीं दोष नव्हता. परंतु तो त्यांना अपेक्षित मार्ग नव्हता एवढें मात्र खरें. अशा स्थितींत मृत्यूनें हि आपली नजर कुटुंबावर वळवली. १९१७/१८ सालच्या इन्फ्लूएंझाचा कहर! घरांतील सर्वांना आजारानें घेरलें. घरांतील मुख्य माणसाचा बळी घेऊन शेवटीं हा आजार थांबला!

**“पक्षि अंगणा आले । चारा घेऊनियां गेले”**

एकदम असा देखावा दिसला. मृत्यूनें कांहीं माणसें नेलीं. कांहीं भिन्न मार्गांत निराळ्या च दिशेनें हळूंहळूं फांकून गेलीं. आणि हे शेवटीं एकटेच्या एकटे च राहिले! दुसरा मनुष्य असता तर शोकानें खचून जाता, त्याला सगळें ब्रह्मांड आठवलें असतें. उदासीनतेच्या भीषण छटेनें त्याला ग्रासलें असतें. पण हा सगळा कालचक्राचा फेरा गंभीरपणें जिरवून त्यांनीं पुन्हां आपल्या पूर्व वृत्तीला बिनधोकपणें सुरुवात केली. “उत्पतति आर्यः पतन्नपि” —ही आर्य पुरुषाची वृत्ति तेथें दिसून आली.

अनुक्रमणिका

उलट आतां नवीन जोमानें नव्या अभ्यासाला सुरवात झाली. पन्नाशीच्या सुमाराला जगांत कोणी संगीताच्या अभ्यासाला सुरुवात केली नसेल. पण इतक्या विषम परिस्थितींत आणि उतार वयांत चिकाटीनें १०/१० तास संगीताचा अभ्यास सुरूं झाला. जेथें शोकाचे करूण विलाप ऐकूं यावे तेथें संगीताच्या रागरागिण्यांचे आलाप झडूं लागले! अशा योगयुक्त पुरुषाला काळ काय करूं शकेल?

**"यस्मिन्स्थितो न दुःखेन गुरुणापि विचाल्यते"**

असें भगवंतांनीं त्याचें वर्णन च देऊन ठेवलें आहे. आतां घरांतील झाडण्या-सारवण्यापासून स्वयंपाकापर्यंत सर्व कामें त्यांनीं स्वतः करावीं. तेथें हि ज्ञान, तेथें हि प्रयोग, तेथें हि संशोधन सुरूं! सेंट्रल लायब्ररींतून निरनिराळ्या भट्ट्यांचे वर्णनाचे १६ व्हॉल्यूम्स आणले. शेवटीं ऑस्ट्रियन भट्टी अगदीं साधीं म्हणून स्वतः च, कोणी हि गवंडी न बोलावतां तयार केली. त्यांत पाव, बिस्किटें तयार करावीं, स्वयंपाकाचें निरनिराळें प्रयोग करावे. असे अन्नाचे निरनिराळें प्रयोग करतां करतां, आहारशास्त्रावरील पुस्तकें वाचतां वाचतां शेवटी सर्व अन्न सोडून १७/१८ वर्षे निव्वळ दूध, सोयाबीन व क्वचित् फळ ह्यावर ते राहिले. जीभ ताब्यांत असलेला असा मनुष्य क्वचितच पाहण्यास सांपडेल.

केवळ स्वादविषयाची च गोष्ट नाहीं. इतर विषयांत हि वृत्ति अशीच. एकदां बडोद्यास रोषनाई होती. घरीं स्वतःच्या मुलीच्या लग्नानिमित्त आलेली मंडळी ती पाहण्यास उत्सुक होती. त्यासंबंधीं गोष्ट निघाली. तेव्हां ते म्हणाले, "ज्यांना जायचें त्यांनीं जावें. परंतु मला त्यांत एवढें आनंदानें पाहण्याजोगें काय आहे तें च समजत नाहीं. त्यांत नवीन काय आहे? आपल्या घरीं आपण नाहीं का दिवे लावीत? २/४ दिवे लावतों असे च २०-२५-४०-१००-१,०००-दिवे लावले त्याची कल्पना नाहीं का येत? त्यांत विशेष काय आहे?" असा च दुसरा प्रसंग. कोणता तरी सणाचा दिवस होता. तेव्हां आज अमुक केलें पाहिजे, तमुक केलें पाहिजे अशी कांहीं बोलणीं त्यांच्या कानावर आलीं. तेव्हां ते म्हणाले, "कांही तरी निमित्त करून आपल्या जिभेला आवडतील असे पदार्थ करावयाचे दुसरें काय? सणाचें एक निमित्त च. सणाच्यादिवशी पक्वानांची काय जरूर?' जगांत चाललेल्या वेडगळपणाच्या प्रकारांत त्यांना कधींच आनंद वाटत नसे. दिवाळीच्या दिवशीं एकदां त्यांचे स्नेही त्यांना म्हणाले, "भावे, तुम्हीं मुलांना फटाके हि आणून देत नाहीं. मुलांना मग सणाची गंमत तरी कशी वाटावी?" तेव्हां त्यांनीं उत्तर दिलें, "गंमतीची काय कल्पना आहे? आपल्या घरांतलीं कांचेचीं भांडीं, ग्लोब वगैरे घेऊन तिसऱ्या मजल्या वरून खालीं टाकून दिलीं, तर काय गंमत झाली! केवढा आवाज झाला! कसें तुकडें चोहोंकडे पसरले! असे का म्हणावयाचें? फटाक्यांची हि ती च गोष्ट. त्यांत गंमत कसली? शिवाय मी आणून दिले तरी मुलें कोठें फटाक्याला हात लावावयास तयार आहेत?"

अशी एकाकी, निःस्पृह, तत्त्वज्ञानी वृत्ति असून त्याचा इतरांशीं वागतांना मागमूस हि लागत नसे. मित्र मंडळींना तर ह्या वृत्तीचें आश्चर्य वाटे, बालवयापासून चे हि कित्येक मित्र होते. त्यांचे व्यवसाय, स्वभाव, राहणी अगदीं भिन्न असे. परंतु दोन-तीन दिवसाआड त्या मंडळींत तास दीड तास बसून यावयाचे हा अखंड क्रम असे. तेथें चहा, विड्या, चिरूट, पत्ते, बुद्धिबळें, वर्तमानपत्रें, ह्यांचा अड्डा पडलेला असे. परंतु जेथें जन्मांत सुपारी खाल्ली नाहीं तेथें ह्या गोष्टींचा स्पर्श च कसा असेल? तेथें निरनिराळ्या गप्पा चालत, हास्यविनोदाचे फवारे उडत; कोणी लोडाला टेंकून, कोणी झोंपाळ्यावर झोकें घेत, तर कोणी आराम खुर्चीवर रेलून हातपाय ताणून बसे. तेथें घटकाभर सर्वजण अगदी मुक्त वातावरणांत असत. पण त्यांमध्यें हि अगदी नेमस्त तऱ्हेने रहात. कित्येकांच्या तोंडून संभाषणादींत अभद्र शब्द हि विनोदानें येत. पण त्यांच्या तोंडात जन्मांत अमंगळ शब्द आला नाहीं. बेसावधपणा हा त्यांस माहीत च नाहीं. बडोद्यांतील व्हेटरनरी डॉ.

अनुक्रमणिका

जोगळेकरांकडें ही बैठक असे. परंतु इन्फ्लुएंझाच्या आजारांत ते हि एकाएकी वारले. तेव्हांपासून ही बैठक पूर्ववत् राहिली नाही. वयाच्या १६ वर्षांपासून डॉ. जोगळेकरांचा स्नेह होता.

डॉ. जोगळेकर वारल्यानंतर त्यांच्या मुलामाणसांची जवळ जवळ अनाथ स्थिति झाली. मित्रांबद्दल निवळ गप्पा मारणाऱ्या शाळू सोबत्याची ह्यांची भूमिका नव्हती. अगदी आपल्या स्वतःच्या कुटुंबासारखी त्यांच्या मुलामाणसांची अव्याहत २०/२५ वर्षें काळजी घेतली. त्यांच्या मुलांना शिक्षण देऊन कामधंद्याला लावून दिलें. दोन ओळींत ही हकीकत मांडतां येते. पण सतत २०/२५ वर्षें परक्या मुलांची-कुटुंबाची त्यांना अनाथ वाटणार नाहीं अशा तऱ्हेनें अलग घर थाटून देऊन काळजी घेणें हें सामान्य काम नाहीं. निष्काम सेवेशिवाय ह्या गोष्टी घडावयाच्या नाहींत. महाराष्ट्र-चरखासंघाला चांदा येथें रंगकामाची माहिति करून देण्यासाठीं सहा महिनें निरपेक्षतेनें सेवा करतांना हि ही च वृत्ति दिसून आली. तेथें, २५/३० वर्षें रंगाचा अभ्यास, रंगकामांत असामान्य योग्यता, परंतु तेथें निव्वळ एक विद्यार्थी शिकविण्यासाठीं ठेवला होता. परंतु कोणती हि तक्रार नाही. केवळ कर्तव्य बुद्धीने एवढ्या मोठ्या योग्यतेचा पुरुष त्या एका मुलासाठीं खपतो आहे, रात्रंदिवस प्रयोग करतो आहे, रंगांसाठीं विहिरीचे पाणी काढतो आहे—त्या गोष्टी काय, निष्कामसेवा वृत्ति शिवाय होतील?

निरपेक्ष सेवा करावयाची, परंतु सेवा कोणाची हि घ्यावयाची नाहीं. एकटे असोत, आजारी असोत, कोणत्या हि अडचणींत असोत, तरी नोकर ठेवावयाचें नाहींत किंवा आपल्या आजारासंबंधीं मुलांना हि कळवावयाचे नाहींत. सेवा मुलांकडून हि घ्यावयाचा संकोच तेथें इतरांची काय कथा? कोठें परगांवी गेले तर सर्व सामान आपल्याबरोबर. दुसऱ्याची कोणती हि वस्तु घ्यावयाची नाहीं. आपलें सगळें सामान (डबल) दुहेरी ठेवावयाचें. तो स्टोव्ह; तीं दुधाचीं भांडीं, स्नानाची बादली, रॉकेलची बाटली—काय काय त्यांच्याबरोबर ठेवीत त्याची यादी कुठवर देणार? आपल्या धोरणामुळें कोणाला त्रास होऊं नये म्हणून अगदी दूर निजावयाचें. हरिपुरा कॉंग्रेसमध्यें ते आलें होते. तेथें त्यांच्या ह्या स्वावलंबी वृत्तीचें दिव्य दर्शन झालें. त्या वृत्तींतून सत्यप्रेमादि अनंत गुण कसे फांकतात तें दिसलें. तेथील राहण्याच्या झोंपड्यांत कोणी हि अग्नि पेटवूं नये अशी मनाई होती. परंतु त्या थंडीच्या दिवसांत बहुधा प्रत्येक झोंपडींत अग्नि पेटवला जाई, त्यावर दूध, चहा इ. प्रकार करीत, शेकत. परंतु हें झोंपडीपासून दूर—अगदीं दूर अर्धा मैलावर तापीच्या वाळवंटांत जात आणि तेथे स्टोव्हवर दूध तापवीत. त्यांना सहज विचारलें, 'इतर लोक तर झोंपडींत अग्नि पेटवतात?' त्यावर म्हणाले— "तें मी पाहतोंच आहें. म्हणून आपण का त्या लोकांप्रमाणें करावयाचें? मग नीति ती काय राहिलीं?"

**जैसी कमळकळिका जालेनिपणें। हृदयींच्या मकरन्दातें राखों तेणे ।**
**दे राया रंका पारणें । आमोदाचें ॥**

कमळ फुलल्यावर 'यारे' 'यारे' म्हणून भुंग्यांना आमंत्रण द्यावें लागत नाहीं. सत्य हें स्वयंप्रचारी आहे. असा मनुष्य आपल्या कार्यांत असावा असें कोणास वाटणार नाहीं? खुद्द महात्माजींनीं ह्या च हेतूनें त्यांना वर्ध्यांस बोलावलें. त्यांनीं तेथें मगनवाडींत राहावें, ग्रामोद्योगासंबंधीं मार्गदर्शन करावे, प्रयोग करावे म्हणून पुष्कळ आग्रह केला. "माझें हे कनिष्ठ बंधु च आहेत. माझ्या ह्यांच्या वयांत ५/६ वर्षांचें च अंतर आहे", असें ते म्हणाले. त्यांनीं कस्तुरबासह त्यांच्या दुग्धाहार विषयक प्रयोगाचे कौतुकानें निरीक्षण केलें. आपल्या सुनेला सतार वाजवून दाखविण्यास पाठवलें. प्रार्थनेमध्यें गौरवाने त्यांच्याविषयीं माहिती करून दिली.

अनुक्रमणिका

परंतु त्यांचें कार्यक्षेत्र नक्की झालेलें असल्यामुळें संशोधनार्थ ते बडोद्यास निघून गेले. ‘हरिजन’ मध्यें महात्माजींनी त्यानंतर ह्यांच्यासंबंधीं गौरवपर असा स्वतंत्र लेख हि लिहिला होता.

किती हें गुणमय चरित्र! त्यांचें सत्यप्रेम, त्यांचा नियमितपणा, त्यांचें उद्योगशीलत्त्व, त्यांची ज्ञानमयता, त्यांची सेवापरायणता, त्यांची व्यवहारकुशलता, त्यांची स्वावलंबी वृत्ति, त्यांची निर्व्यसनता, त्यांची शांति, त्यांचें मितभाषित्व, त्यांची शास्त्रीयता, त्यांची बुद्धिमत्ता—इतक्या गुणांचा एकत्र समुच्चय कोठें पहावयास मिळेल? इतके असामान्य गुण अंगीं असून पुन्हां ‘मी एक सामान्य मनुष्य आहें’ असें त्यांस नेहमी वाटत असतें. उघड च आहे. ज्ञान आणि अहंकार एके ठिकाणीं कशी राहतील?—

**“अहंभाव ज्या मानसींचा विरेना**
**तया ज्ञान हे अन्न पोटीं जिरेना”**

त्यांचीं मुलें घराच्या बाहेर पडलीं आणि वीस वर्षांच्या दीर्घ अनुभवांतीं त्यांनीं काय पाहिलें? त्यांना आपल्या बापासारखा बाप आढळला काय? पित्याविषयीं त्यांना पहिल्यापासून च पूर्ण आदर होता. परंतु त्यांना त्यांच्या ठिकाणच्या ह्या इतक्या लौकिक गुणांची तीव्र जाणीव होती का? परंतु आतां मात्र स्वच्छ सूर्यप्रकाशाप्रमाणें ती जाणीव सतत डोळ्यांपुढें उभी राहिली आहे,

“आई वारल्यानंतरच्या ह्या सतरा वर्षांतली तुमची चाललेली अखंड, बिनगाजावाजाची आणि निःसीम तपस्या फार च मोठी वाटते. तिच्यापुढें आमची तपस्या कांहीं च नाहीं. आईचें स्मरण, तुमचा आशीर्वाद आणि लाभलेली सत्संगति काय करवील तें खरें.” विनोबाचे साष्टांग प्रणाम!

७-९-३५ च्या ह्या पत्रांत ह्या नैष्ठिक गुणांपुढें विनम्र होऊन आशीर्वाद मागितला आहे. अजून हि तीच तपस्या, तो च उद्योग, ते च गुण अगदीं तसें च चाललें आहे. १६-२-३९ च्या पत्रांत ते आपल्या स्नेह्यांना लिहितात—

“सप्रेम नमस्कार वि. आपलें. ता. १२ चें पत्र पावले त्या पूर्वीचें हि पत्र मिळालेले आहे. खेडेगांवात भरणारी काँग्रेस पहावयाची होती. ती गेल्यावेळीं हरिपुरा येथें पाहिली. तेव्हां त्रिपुरी येथें भरणाऱ्या काँग्रेसच्या प्रदर्शनाला जाण्याचा माझा विचार नाहीं. येत्या फाल्गुनांत ६५ वें वर्ष लागेल व केव्हां मरण येईल ह्याचा नेम नाहीं. तेव्हां अशा कामाकरतां वेळ घालविण्यास सवड नाहीं. हातीं घेतलेली कामें केव्हां पुरी होतील त्या काळजींत आहे. प्रकृती बरी आहे. दूध ६ रत्तल व ८/९ तोळे सोयाबीन हा आहार आहे. सकाळीं ९॥ स एका मुसलमान वस्तादाकडें ध्रुपदें लिहून घेण्याकरतां सतार घेऊन जात असतो. शिवाय लिहून घेतलेली ध्रुपदें व बोल स्वच्छ लिहिणे, तयार करणें वगैरे कामांमुळे वेळ मिळत नाही. कळावे. लोभ अ. हे. वि.

**—न. शं. भावे.**

अशा पुरुषांचा जन्म हा लोकांना आदर्श दिसावा म्हणून असतो! “भवो हि लोकाभ्युदयाय तादृशाम्” ही उक्ति हि त्यांच्यापुढें फिकी पडते!

अनुक्रमणिका

**अन्या जगद्धितमयी मनसः प्रवृत्तिः ।**
**अन्यैव कापि रचना वचनावलीनाम् ॥**

त्यांचें जीवन प्रसिद्ध असो वा नसो, त्यांत नाना प्रकारच्या चमत्कृतिपूर्ण घटना असोत कीं नसोत, ते जीवन कांहीं निराळें च आहे ह्यांत संशय नाहीं! तेथें अखंड शोध आहे म्हणून अखंड शुद्धि आहे; अखंड साधना आहे म्हणून अखंड सिद्धि आहे; तेथें अखंड चिंतन आहे म्हणून अखंड बुद्धि आहे. उद्योग—प्रयोग—उपयोग = योग. —उद्योग—प्रयोग—उपयोग—योग अशा प्रवाह धारेनें तें जीवन, men may come and men may go but I go on for ever—असें सतत चाललें आहे. त्यांच्यापुढें त्यांचे मित्र, संबंधी, त्यांचीं मुलें च काय पण कोणी हि नम्रपणें मस्तक नमवील. नको म्हटलें तरी सेवा करण्यांत धन्यता मानील. आणि कोणत्याहि अंतःकरणांतून हा च उद्गार निघेल.

**त्वं हि नः पितासि । पिता तो बोधि ॥**

अनुक्रमणिका

## प्रकरण ५ वे

## विश्वमित्राचें श्रीफल

**हिंदुस्तानांतील** बहुधा प्रत्येक मनुष्य पुरातन वैदिक ऋषींशी आपला संबंध जोडतो. वसिष्ठ—विश्वमित्र—वामदेव असें च कांहींतरी तो आपलें गोत्र सांगेल. त्याचें तो नित्यस्मरण करील, प्रत्येक धार्मिक प्रसंगीं त्याचा उच्चार करील. आपला पूर्वज मोठा संपत्तिमान्, शक्तिमान, ऐश्वर्यवान असल्यासंबंधी त्याला अभिमान वाटणार नाही; तो ज्ञानीं होता, तो तपस्वी होता, तो वनवासी होता, भक्तिमान् होता,—साक्षात्कारी होता, द्रष्टा होता, ऋषी होता, ह्या गोष्टींची त्याला धन्यता वाटेल. मागील चार प्रकरणांत घरासकट, उपासनामूर्ति, मातृमूर्ति आणि योगमूर्ति चें आपण किंचित् दर्शन घेतलें. ह्या घरांत उपासनेचा, भक्तिप्रेमाचा आणि योगाचा प्रवाह थेट विश्वामित्रापासून उगम पावला.

**"दृष्टिस्तृणीकृत जगत्रय सत्वसारा ।**
**धीरोद्धता नमयतीव गतिर्धरित्रीम्" ॥**

असे दर्पोग्रतेनें रसरसलेलें, खडबडीत, अत्यंत दक्ष आणि

**"जें वाहे सलिलमिषें सुधा चि सारीं ।**
**आलोकें करूनि च जन्ममृत्यु वारी ॥**

असें सर्व विश्वाशीं सहानुभूतीनें समरसलेलें, अत्यंत स्नेहमय, जगावर प्रेमाची पांखर घालणारें; अशी विश्वामित्राचीं दोन जीवनें आहेत. ही दोन जीवनें म्हणजे एक वरचें आणि एक आंतलें; असा प्रकार आहे. त्यामुळें च विकासशील चारित्र्याची परमावधि विश्वमित्रांनीं गांठली.

**"सानोः सानुमारुहत्" ।**


वेदांत म्हटल्याप्रमाणें एका शिखरावरून दुसऱ्या, दुसऱ्यावरून तिसऱ्या अशा उत्तरोत्तर उन्नतीच्या शिखरावरून ते झराझर चढत गेलें. तेथून त्यांनी ब्रह्मदर्शनाच्या अपार आनंदाचा ठेवा हस्तगत केला. हजारों वर्षें अनेक वेदमंत्रांच्या द्वारें, त्या ठेव्यांतील दिव्य रत्नांनीं मानवी जीवनाचें पथप्रदर्शन केलें.

अशा ह्या महान् ऋषीचें—विश्वामित्राचें—"कौशिक गोत्रोत्पन्नोऽहम्" असें नित्यस्मरण ह्या घरांतील मंडळी करतात. आणि आश्चर्य हें कीं ह्या घराण्यावर हि विश्वामित्राच्या जीवनाची छाया बेमालुम पडलेली दिसून येते. गेल्या आठ पिढ्यांच्या अगदीं सामान्य माहितीवरून हि ही गोष्ट उघड होते. प्रथम शिवाजी नारायण भावे ह्यांनी हल्लीच्या रत्नागिरी जिल्ह्यांतील 'अडूर' हा गांव कांहीं तरी लढाईचें किंवा राजकारणाचें रुक्ष, कठोर काम यशस्वी करून मराठी राज्यकर्त्यांकडून इनाम म्हणून मिळवला. त्यानंतर त्यांच्या मुलांनीं वांई येथें, क्षेत्राच्या ठिकाणीं राहून बहुधा उपासना करतां यावी म्हणून घर, थोडी शेती आणि बगीचा मिळवला. राजकारणादि कठोर वृत्ति आणि उपासनादि स्निग्ध प्रकार हे विश्वामित्राच्या जीवनाचें च अल्पसें प्रतिबिंब ह्या पितापुत्रांच्या जीवनावर पडलेलें नाहीं असे कोण म्हणेल? त्यानंतर पुन्हां नरसिंग कृष्णराव

भावे ह्या मूळ शिवाजी नारायणांच्या नातवानें सरदार आंग्रे ह्यांना पेशव्याकडील सरदार रास्ते ह्यांच्यासह मदत करून प्रथम प्रकरणांतील घर ज्या ठिकाणी आहे तो 'गागोदें' गांव इनाम म्हणून आंग्र्याकडून संपादन केला. हे नरसिंगराव भावे गागोद्यास शिपाईप्यादे ठेवीत व इतमामानें क्षत्रिय वृत्तिप्रमाणें रहात असावेत असें दिसतें. २७ मे १८१७ सालीं दिलेल्या पुण्याच्या रेसिडेंटाच्या पासपोर्टावरून ही गोष्ट उघड होते. नरसिंगरावांकडचे वीस घोडेस्वार आणि २५ पायदळ शिपाई नेवाशास कांही कामा निमित्त जात असतां हा पासपोर्ट दिला गेला आहे. नरसिंगरावांचे पुत्र शिवाजीराव ह्यांना बाबासाहेब म्हणत. ह्यांचे च पुत्र शंभुराव भावे. त्यांच्या उपासनामयतेचें किंचित् दर्शन दुसऱ्या च प्रकरणांत झालें आहे. राजकारणांतील रुक्ष, कठोर जीवन, पुन्हां भक्ति-प्रेम—उपासनेचा स्निग्ध गंभीर प्रवाह. पुन्हां राजकारण, पुन्हां ती च उपासनेची रसमय गंगा! असा हा विश्वामित्राच्या च बाह्यांतर जीवनाचा खेळ पिता-पुत्र—पितापुत्र—पिता-पुत्र अशा परंपरेनें पुनःपुन्हां खेळला जात होता. आणि ह्या घराण्यांतील प्रत्येक व्यक्तीच्या जीवनांत हे दोन्ही प्रकार नव्हते असें हि नाहीं. रुपये मोजतांना रुपयाची कोणची तरी एक बाजू दिसावयाची व दुसरी लपावयाचीं. काळाच्या मोजणींत कोणाची उपासनामय बाजू प्रकट झाली तर कोणाची राजकारणात्मक बाजू पुढें आली, इतकें च. उदाहरणार्थ शंभुराव भाव्यांचे चिरंजीव गोविंदराव भावे हें अत्यंत उग्र वृत्तीचे असत. न्यायनिष्ठूरतेची प्रतिमा म्हटल्यास हरकत नाहीं. परंतु ही बहिर्वृत्ति सोडून त्यांना आंतून अग्निऱ्होत्र घ्यावें, तद्वारां ईश्वराची उपासना करावी अशी हृदयांतल्या हृदयाची कोमल प्रेरणा पुनः पुन्हां होत असे. गोपाळराव भावे गोविंदरावांचे च सख्खे भाऊ. रागाच्या भरांत गोविंदरावांनीं त्यांना मारलें. गोपाळराव घर सोडून—अगदीं बालवयांत वाईचे घर सोडून—जे निघाले ते पायीं बोरघाटांतल्या बोगद्यापर्यंत! इतकी दर्पोग्र वृत्ति असून हि औदार्य, वात्सल्य, देशसेवा, दानधर्मादींचा प्रवाह त्यांच्या जीवनांत सरस्वतीप्रमाणें गुप्तपणें वहात होता. त्याचें दिग्दर्शन पुढील प्रकरणांत येईल.

सारांश त्या आठ पिढ्यांतील मंडळींत बाह्यतः क्षात्रवृत्ती, रुक्ष-कठोर भाव, दर्पोग्रता इ. टणक, खडबडीत भाग दिसत असला तरी आंतून भक्ति, ज्ञान, उपासना, स्नेह-सेवा ह्या गुणांची वृत्ति रुळत आलेली आहे. पण ही आंतरवृत्ति पाहण्याला खोल जांवे लागतें. वरवर पाहणाऱ्याला ती कशी आढळून येणार? नारळाचें असें च नाहीं का? वरून कठिण, काथ्याच्या आवरणानें वेष्टिलेला, अगदीं रुक्ष आणि खडबडीत, त्याच्या आंतला भाग, करवंटीच्या आंतला भाग अगदीं मृदु, शुभ्र, सोज्वळ, स्नेहयुक्त मधुर जीवनानें भरला आहे असें कोणास स्वप्नांत तरी खरें वाटेल का? नाहीं. पण वस्तुस्थितीच्या अनुभवानें नारळाच्या अंतर्भागाचें ग्रहण लोक करतात. तसेंच ह्या कुलांतील परंपरा कळण्याला अंतर्ग्राहि दृष्टि पाहिजे.

बहिर्दृष्टीनें पाहिलें तर येथें कांहीं थांग लागावयाचा नाहीं. घरांतील आईनें, बहिणीनें नुसतें खुशालीचें पत्र पाठविण्यासंबंधी म्हटलें तरी "पत्र नाहीं आलें म्हणजे खुशाल च आहें असें समजावें. आलें म्हणजे बरीक 'कांहीतरी आहे' असें मानावें!" असें उत्तर ऐकून सामान्य मनुष्याला किती निर्दयता वाटेल? आणि एका तऱ्हेने ही रुक्षता आहे हि. परस्परसंबंधाच्या ह्या दृष्टींत येथेंच ही रुक्षता आढळते असें नव्हे. नुसत्या आठ पिढ्यांच्या वंशावळीचा जरी तपास घेतला तरी हें च आढळून येईल.




मूळ शिवाजी नारायण भावे ह्यांचे चार पुत्र. त्यांतून द्वितीय नारायण ह्यांचे चि. विश्वासराव ह्यांचा निर्वंश झाला. परंतु तृतीय पुत्र जे रामचंद्र त्यांचा विस्तार सर्वांत जास्त होऊन हि प्रथम पुत्र माधवराव व चतुर्थपुत्र बळवंतराव ह्यांच्या ह्या तृतीय पुत्र रामचंद्ररावांच्या वंशांतील मंडळीचा परिचय तर राहोच पण साधें दर्शन हि एकमेकांस राहिलें नाही. फक्त प्रथम आणि चतुर्थ पुत्राच्या संततींत जवळ जवळ घरें असल्यामुळें जुजबी संबंध राहिला. ह्या चतुर्थ पुत्राच्या शाखेला 'धाकटें घर' आणि प्रथम पुत्राच्या शाखेस 'मोठें घर' म्हणत. शंभुराव भावे हे ह्या 'धाकट्या घराहून' 'मोठ्या घरीं' दत्तक आले हें वंशवृक्षावरून समजण्याजोगें आहे.

मागें स्पष्ट केल्याप्रमाणें हा वंशवृक्ष—ही परंपरा म्हणजे विश्वामित्राची परंपरा. बाहेरून कठिण पण आंत मृदु केवळ नारळाप्रमाणे. विश्वामित्राच्या प्रतिसृष्टींत नारळ ही मनुष्य श्रेणी मानतात. त्यामुळे उपमेबरोबर नारळाच्या दृष्टांताने परंपरा हि नीट सूचित होते अतिशय उंच जावयांचे, आकाशांत विहार करावयाचा, सूक्ष्म विचाराच्या वातावरणांत वावरावयाचें, ब्रह्मविहार करावयाचा, वरून टणक आंतून मृदु, वरून रुक्ष आंतून स्निग्ध, वरून खडबडीत आंतून गुळगुळींत घाव घातल्याशिवाय आंतल्या आशयाचा मागमूस लागावयाचा नाहीं. 'बहुशाखात्यनंताश्च' अशा अनंत शाखा नसावयाच्या. सरळ एक मार्गांत—एकाच भूमिकेंत असावयाचें. नित्य विकासशील असावयाचें ही येथली परंपरासरणी. येथें विश्वामित्राच्या पूर्वायुष्यांतील राजसी वृत्ति तीव्र प्रमाणात कोठें दिसली तरी तिच्या आंत सात्विक ध्येयाचा हव्यास सतत

अनुक्रमणिका

लागल्यामुळें मारलेल्या रजोगुणांत, जिवंत, जागृत ज्वालामुखीसारख्या कार्यकारी सत्वगुणांत तिचें रूपांतर व्हावयाचें. त्यामुळें "धिग्बलं क्षत्रियबलं ब्रह्मतेजो बलं बलम् ।" ह्या प्रतीतीचा अनुभव जगापुढे मांडावयाचा हें च मानवी जीवनाचें अत्युच्च ध्येय ह्या कुलांतील परंपरेला अभिप्रेत आहे.

हें ध्येय गांठणारे महाफळ त्या वंशवृक्षाला लागले. आतां ह्या वंशवृक्षाच्या परंपरेचें साफल्य झाले. ह्या वृक्षाची इतर फळें हे नारळ म्हटलें तर ह्या मोहाचा—निर्मोह करणाऱ्या मोहाचा—नारळ म्हणावें लागेल. हा वरून रुक्ष दिसेल. येथें एकदम गाभ्याला हात घालतां येणार नाहीं. तरी थोडा धीर धरून प्रयत्न करावा म्हणजे, Knock the door and the door will be opened ही प्रतीती आल्याशिवाय राहणार नाहीं! म्हणून च नारळाला हिंदुधर्मात एवढें मोठें स्थान आहे. तें अत्यंत मांगलिक फळ आहे— तें श्रीफळ आहे. एका परीनें त्याची अत्यंत कठीण बाह्यावस्था ही त्याचें आणि जगाचें एक रक्षण च आहे. हें रक्षण, त्याची उच्च भूमिकेमुळे दिसणारी भीषणता, आंतली पुण्यमयता पुढील श्लोकांत किती यथार्थतेने मांडली आहे बरें!

**भयानां भयं भीषणं भीषणानां ।**<br>**गतिः प्राणिनां पावनं पावनानां ॥**<br>**महोच्चैः पदानां नियंतृत्वमेकं ।**<br>**परेषां परं रक्षणं रक्षणानाम्!॥**

म्हणून च त्याच्या पुढें—ह्या वंशवृक्षाच्या महाफलापुढें, ह्या विश्वामित्राच्या श्रीफलापुढें हात जोडून म्हणावयाचें—

**वयं त्वां स्मरामो वयं त्वां भजामो ।**<br>**वयं त्वां जगत्साक्षिरूपं नमामः ॥**<br>**सदेकं निधानं निरालंबमीशम् ।**<br>**भवांभोधिपोतं शरण्यं व्रजामः ॥**

●●●

अनुक्रमणिका

# प्रकरण ६ वे

## गुरुत्वमध्य

**सबंध** दिवसभर पक्षी ह्या झाडावरून त्या झाडावर, इकडून तिकडे चारी दिशांना उडत असतात. परंतु सायंकाळ झाली, सूर्यनारायणानें आपले किरण आखडते घेतले, सृष्टीवर अंधाराचा पडदा पडूं लागला, म्हणजे ते आपल्या घरट्याकडे धाव घेतात. गुरें हि आपल्या घराकडे परत येतात. पशूपक्षी च काय, माणसाचें हि असें च नाहीं का? नाना ठिकाणीं तो जाईल, नाना उद्योगधंदे करील, नानाप्रकारचे धक्के चपेटे सहन करील, परंतु पुन्हां आपल्या मूळस्थानाला आल्याशिवाय त्यास समाधान वाटावयाचें नाहीं. तें स्थान मग लहानसें झोपडें का असेना, तें त्याला परम रमणीय वाटेल! त्याच्यापुढें पौर्णिमेच्या चंद्रप्रकाशांत झळकणारा ताजमहाल तुच्छ वाटेल. उलट अमावस्येच्या गाढ अंधकाराशीं मिळून गेलेल्या, मिणमिण करणाऱ्या लहानशा दिवलीनें च ओळखूं येणाऱ्या त्या खोपट्यांत त्याला सकल सौंदर्याचें सार मूर्तिमंत झालेलें आढळून येईल. (Artless art is the greatest art!) अकृत्रिम सौंदर्याची बरोबरी कोण करणार? म्हणून

**"नको पुनवेची मिरवणूक देवा ।**
**गोड अंवसेचें विरघळूनि जाणें" ॥**

ही च तो प्रार्थना करील. सर्व सुखसोयींनीं गजबजलेल्या आणि ऐश्वर्यानें नटलेल्या राजप्रासादाचा हि त्याला वीट येईल. एकदां त्या आपल्या खेडेगांवांत आपण जाऊं या, तेथल्या डोंगरावर मोकळ्या हवेंत फिरूं या. त्या खेड्यांत राहणाऱ्या अगदीं प्रेमळ आणि साध्याभोळ्या माणसांशीं चार शब्द बोलूं या. तेथली जमीन, तेथलें पाणी, तेथलीं झाडें, तेथलीं फळें, तेथली फुलें, तेथलीं मुलें, त्या वत्सल गाई, तेथलें साधे अकृत्रिम जीवन ह्या सर्वांशीं आपण एकदां मिळून जाऊं या. नको हा पसारा, हा व्याप, ही गडबड आतां अगदीं नको असें त्यास वाटेल.

**"हे राज्यवर सांडिजे । मग निबांता येथेंचि ऐसिजे" ॥**

अशा तऱ्हेची प्रेरणा मनुष्यमात्राच्या हृदयांत स्वतःसिद्ध भरून राहिलेली आहे. ह्या व्यक्त जगाच्या कोलाहलांतून आपल्या अव्यक्ताच्या मूळ शांतिस्थानाकडे जाण्याची प्रेरणा अगदीं स्वाभाविक नव्हे काय?

ह्या अव्यक्तस्थानाचा प्रतिनिधि म्हणूनच ऋषि एकांत-स्थळाला महत्त्व देत. अगदीं साध्या खेड्यांतल्या जीवनाचें तरी ह्या च अव्यक्ताशीं साधर्म्य असल्यामुळें महति गागोदें गांव हें असें च एकांत स्थळ आहे.

ह्या गांवांतील झोंपडीवजा अशी एकंदर ६० घरें. म्हणजे सुमारें ३०० माणसांचें गांव. गांवाची हद्द पूर्व-पश्चिम एकमैल उतर-दक्षिण दोन मैल मिळून सगळा घेर सुमारें पांच साडे पांच मैलांचा आहे. १८० बिघे शेतीची जमीन, २०० बिघे गुरचरण, २५ बिघे गांव. नदीनाले ५० बिघे. जंगल डोंगर ४५० बिघे. एकूण ८५० बिघे जमिनींत ३०० माणसांची वस्ती म्हणजे एकांत स्थानच झालें! नकाशा वरून हि ही गोष्ट लक्षांत येते. हें

गांव च काय, कुलाबा जिल्ह्यांतील पेण तालुक्यांत सर्वत्र अशी च स्थिति आहे. वरसई, पेण, वावशी हीं दहा मैलांतलीं साधारण गांवें सोडून दिलीं तर गागोद्याच्या सरहद्दीला लागून असलेलीं सहा गांवें अगदीं च किरकोळ २५/३० घरांच्या वस्तीचीं आहेंत. त्यांत पूर्वी हें गांव नदीकांठीं व त्यानंतर डोंगराच्या पायथ्याशीं असे. त्यामुळें तर तेथील एकांताला विशेष च गाढ स्वरूप येई. ज्यांचा जन्म, ज्यांचे सर्व आयुष्य अशा ठिकाणीं गेलें त्यांच्या जीवनांत स्वभावतःच वैराग्यवृत्ति कां उसळूं नये? त्यांतून पुन्हां एका अतिशय निष्ठावंत थोर उपासकाचे — आपल्या पित्याचे — शंभुराव भावे ह्यांचें, उदाहरण डोळ्यांपुढें, त्यामुळें गोपाळराव भावे त्यांच्यां जीवनांत बालपणापासून वैराग्याचे विचार येत. संसार सोडून द्यावा, घरचें काम न करतां जनतेचें काम करावें, तद्द्वारा आपल्या आयुष्याचें सार्थक करावें, "संसारामधि ऐस आपुला उगा च भटकत फिरूं नको" ह्या धोपटमार्गानें सगळेच चालले आहेत, त्यांत काय पुरुषार्थ आहे, अशी भावना त्यांच्या बालमनांतच उद्भवली होती. नुसती भावना च नव्हे पण त्याप्रमाणें निश्चयाला हि सुरवात झाली होती. सेवेला वाहून घ्यावयाचें म्हणजे स्वाभाविकच कुटुंब-परिग्रह नको. म्हणून लग्न करावयाचे नाही. ब्रह्मचर्यानें रहावयाचें— असा त्यांनीं संकल्प केला होता. 'काम-कांचन-किर्ती'—पुत्रेषणा, वित्तेषणा—लोकेषणा—ह्या तिन्ही एषणांचा त्याग करण्याचें त्यांच्या मनांत घोळत होतें. परंतु त्यांच्यासाठीं परमेश्वरानें निराळें च कार्य नेमून ठेवलेलें होतें असें दिसतें. कुटुंबांतील सर्व मंडळींची सेवा करावी, त्यांना आधार मिळावा, मूळ ठिकाणांवर गुरुत्वमध्याप्रमाणें स्थिर रहावें असा च कांहीं त्याचा संकेत होता असें दिसतें. इतरांच्यासाठीं वातावरण निर्माण करावें, रोपांना खतपाणी द्यावें, आपण मागे च असावें अशी त्यांची भूमिका ईश्वराने करून ठेवलीं. त्या वयांत इतक्या गंभीर विचाराला परिपक्वता न येणें हें कांहीं अस्वाभाविक म्हणतां येणार नाहीं. शिवाय त्यांचें शिक्षण हि विशेष झालें नव्हतें. खेळांत मात्र हातखंडा. नाना प्रकारें दिवसभर खेळ खेळावेत, ताडामाडावर चढावें, आवळें, बोरें, चिंचा पाडाव्या, नदीमध्यें यथेच्छ डुंबावें असा कार्यक्रम चाले. वांईस कृष्णेच्या महापुरात बेधडक उडी टाकीत! एकदां तर महापुरात संध्याकाळच्या सुमाराला आजूबाजूस कोणी नसतांना थेट पुलावरून उडी टाकून दिली! थोड्याच वेळांत एका मोठ्या भोवऱ्यांत सांपडले. गरगर फिरूं लागले. भोंवरा फोडण्याचा प्रयत्न केला पण जमेना. श्वास कोंडला. नाकातोंडांत पाणी शिरलें. नुसती शेंडी वर गरगर फिरूं लागली. वडील बंधू गोविंदराव त्याच वेळीं पुलावरून चालले होते. नुसती शेंडी फिरतांना त्यांनी पाहिली. ती दुसऱ्या कोणाची असणार? इतका धाडसी आपल्या भावाशिवाय कोण असणार? एका क्षणांत उडी टाकून त्यांनीं दुरून त्यांस भोंवऱ्यातून बाहेर काढलें. साहस करणें हा त्यांचा स्वभाव च होऊन बसला होता. मोठ्या वयांत हि नाना तऱ्हेच्या जमिनीच्या-पैशाच्या उलाढाली करण्यांत, कर्ज काढण्यांत त्यांस दिक्कत वाटत नसे. विशाल कल्पनांची व्यापक कल्पनांची आवड! "यो वै भूमा तत्सुखं, नाल्पे सुखमस्ति!" अशी त्यांची स्थिति असे. शंभुराव भाव्यांशीं इतर मंडळी भीत भीत संभाळून बोलत. पण ह्यांचे तसें नाही. हें तास तास निःशंक बोलू शकत. स्वभावांत भित्रेपणा नाही च. "मला लग्न करावयाचें नाही. देशसेवा करावयाची आहे" अशा अर्थाचें लांबलचक पत्र त्यांनी वडिलांच्या हातांत दिलें. त्यांनीं ते वांचून तसें च ठेवून दिलें व त्याचा कांहींएक विचार न करतां लग्न करून, टाकलें! लग्न झालें तें झालें पण त्यानंतर एक पत्नी हयात असतां दुसरें लग्न केलें! काटा झुकला तिकडे झुकला! पुन्हां दिलदारपणा मोकळेपणा इतका कीं अगदी ५/६ वर्षांच्या मुलाने 'हि तुम्ही दोन लग्नें कां केलीं, तुम्ही तर मुळींच लग्न करणार नव्हतां?' असें बिनदिक्कत विचारावें. त्यांनीं लगे च लहान मुलांची समजूत हि करून द्यावी. मग प्रत्येक लहान मुलाला विचारावें—का रे राजा, तूं लग्न करणार का नाहीं?—'नाहीं'! मग बाळकृष्णा? 'नाही' आणि तूं रे शिवाजी? 'नाही'. बहुधा कोणी हि लग्न करीन असें म्हणावयाचा नाहीं.

हा मोकळेपणा त्यांच्या स्वभावाचें एक महत्त्वाचें अंग होऊन बसला होता. बापाशीं हि संकोच बाळगावा परंतु ह्यांच्याशीं बोलतांना तसें वाटूं नये, अशी सर्वांची स्थिति होती. त्यामुळें सर्व कुटुंबीयांचे

अनुक्रमणिका

गुरुत्वमध्यस्थान त्यांना आपोआपच प्राप्त झालें. मुलें मुली, भाचे, पुतणे, लहान मोठे सर्वांना त्यांच्याशीं मोकळेपणाचा अनुभव येत असे. ह्या कुटुंबियांच्या महत्त्वाच्या घटना सर्व येथेंच व्हावयाच्या. जन्म, लग्न, उपनयन—अशा कार्यासाठीं मंडळी जमावयाची. तत्संबंधीं सर्व योजना त्यांनीं च ठरवावयाची. त्यामुळें नेहेमीं त्यांच्याकडे माणसांची ये-जा सुरू असावयाची. येणाऱ्यांची गांठोडीं सुटून मुलांना खाऊ मिळत राहावयाचा व जाणाऱ्यांची गांठोडी बांधली जाऊन बरोबर पाथेय दिलें जावयाचें. पडशीवाले प्रवासी तर नेहमीं ठेवलेलेच असत. स्नेही म्हणून वरसईहून मुकुंदभटजी, वाकरूळहून विष्णुभटजी ४/६ दिवसांनी एकदां तरी यावयाचेच. त्याशिवाय कामानिमित्त बाहेरून गडी माणसें येत ती निराळीं च. दोन्ही बहिणींचे यजमान तऱ्हेवाईक. एक जवळच सापोली येथे राहत. परंतु त्यांचे डोके ठिकाणावर नसावयाचें. देवाचें भजन करीत स्वस्थ बसत. कोणाशीं हि बोलावयाचें नाहीत. मुलांच्या शिक्षणाकडे किंवा व्यवहाराकडे लक्ष कोठून राहणार? कारण वेडाच्या लहरीचा कांही च नेम नसे. त्यामुळें त्यांची मुलें येथें च मधून मधून रहावयाचीं. दुसरे पेण येथे राहत. परंतु त्यांचा स्वभाव हि अतिशय विक्षिप्त, त्यामुळे ते त्यांचीं सर्व मुलें माणसें बराच काळ येथें असत. केंस वाढलेले, नखें लांब लांब, शेजारच्या बहाळेश्वराच्या देवळांत निजावयाचें.नुसते हरबरे खाऊन रहावें, कधीं दुसरी च कांही कल्पना काढावी. कधीं तपश्चर्या, कधीं पर्यटनाची कल्पना. कधीं अन्य विषयक कल्पना, कधीं यांत्रिक उद्योगाच्या लांब बाता! सगळा वेळ त्यांत जावयाचा. अशी ही मूर्ति असे! परंतु येथे त्यांना स्थान असे. घरची सर्व मिळकत अशा तऱ्हेच्या विक्षिप्त कल्पनांत घालवून टाकलेली. त्यामुळें समाजांत मान बिलकुल नसे. त्यांची मुलें येथें च असत. त्यांचा आणि बापाचा संबंध जवळ जवळ नसे च. आई आणि मामांचें घर गागोदें ही च त्यांची जिव्हाळ्याचीं स्थाने. पुढें तर त्यांपैकीं नारायण उर्फ नाना साठे हें येथेंच १०/१२ वर्षें राहिले. एकनिष्ठेनें—गोपाळराव भावे—यांची त्यांनीं सेवा केली, चिकित्सक, उद्योगी आणि चौकस स्वभाव असल्यामुळें व्यवहाराचें पुष्कळसें प्राथमिक काम त्यांच्याकडून सहज होऊं शकत असे. कांहीं विशेष प्रसंग असेल तर गोपाळरावांच्याकडे तें प्रकरण यावयाचें. मग ओटीवर त्याची घासाघीस सुरू व्हावयाची. गोपाळरावांचा आवाज दांडगा होता. लबाड माणसावर एकदम ओरडावयाचे. लबाडी त्यांस खपावयाची नाहीं. काथोडी, गडीमाणसें, फसविणारी कुळें ह्यांना गोपाळरावांची विलक्षण भीति वाटे. व्यवहाराखेरीज इतर वादविवादांत हि आवाज पुष्कळ चढावयाचा. अनेक वेळां ओटीवर वादाला रंग चढत असे. बाया मंडळी तिष्ठत बसत. १२/१ वाजून गेला आहे. तरी स्नान नाहीं—वादविवाद चालूं च. मुलांच्या पोटांत कावळे कोकलूं लागत. जेवतांना हि अनेक विषयांवर चर्चा चालूं च असे. विषय व्यावहारिक, सामाजिक, राजकीय, धार्मिक, औद्योगिक, कोणता असेल त्याचा नेम नाहीं. साधक बाधक चर्चा चालावयाची. फार काय जेवणावरहि बोलणें निघावयाचें. जास्त खाऊन कोण दाखवतो यावर वळले कीं लगेच दुसऱ्या दिवशी मोदक लाडवाचें जेवण बायकामंडळींना करण्यास सांगत. मुकुंदभटजीसारख्या मंडळींनीं मग त्या शर्यतीत भाग घ्यावा. एकदां तर जेवतां जेवतां धांवण्यावर गोष्ट गेली. कोणीतरी विषय काढला. गोपाळराव सर्वांत वडील. नाना, महादेव वगैरे भाचे तरुण, परंतु जेवल्याबरोबर ताबडतोब सर्वांत पुढें धांवण्याची महत्वाकांक्षा त्यांनीं सोडली नाही. जेवण झाल्याबरोबर—एक-दोन-तीन—सर्वजण धांवूं लागले. इनामदार, त्यांचे दोघे भाचे आणखी एक स्नेही अगदी दांत ओठ खाऊन त्या दुपारच्या भर उन्हांत जोरानें धांवताहेत! हें दृश्य पाहून गांवकऱ्यांना चमत्कारिक वाटलें. त्यांना कांहीं च उमज पडेना. झालें तरी काय? हे चोरामागें धांवताहेत? का कोठें आग लागली? कोणास कांहीं कळेना. नंतर घरांत चौकशी करतां सर्व गोष्टी ध्यानांत आल्या. एकादी गोष्ट ठरवली की बेभान होऊन तन्मयतेनें ती करावयाची असा त्यांचा दंडक असे. एकदा बडोद्याहून गांधींच्या आश्रमांत असलेल्या आपल्या पुतण्यास भेटण्यास चालले होते. गाडीत प्रख्यात जादूगार 'महंमद सेल' जवळ येऊन बसला. त्याने जादू करण्यास सुरुवात केली. तो म्हणे 'मला पांच रुपये द्या. मी अमुक चमत्कार करतो.' लगेच ह्यांनी नोट काढली. त्यांनें कांहीतरी चमत्कार करून दाखविला. पुन्हां रुप्याची

अनुक्रमणिका

घड्याळाची सांखळी दिली—दुसरा चमत्कार अशा एकेक वस्तु देत होते. परंतु त्याच्यापाशी काय कसब आहे हें पहाण्यांत बेभान, तन्मय झालें होते. शेवटीं त्या जादुगाराचे उतरण्याचे स्टेशन येऊन हा खेळ संपला!

सेवेची उर्मि, साहसीपणा, मोकळेपणा, दिलदारपणा, नाना विषयांत विचार करण्याची, बसल्या बसल्या ब्रह्मांडाची मुसाफरी करण्याची आवड, ह्या गुणांबरोबरच अनेक तऱ्हेचे प्रयोग करावयाची व तद्वारां जीवन विकसीत करण्याची आकांक्षा हि त्यांच्या ठिकाणीं बलवत्तर होती. स्वदेशीच्या कल्पनेवरून त्यांनीं वर्षभर स्वतःच्या गागोंदें गांवाबाहेरील कोणती ही वस्तु खावयाची नाहीं, असा प्रयोग करून पाहिला आणि तो यशस्वी हि झाला. स्वतः मरेपर्यंत खादी वापरली. एकुलता एक च मुलगा असतांना त्यानें संसार सोडून द्यावा. आपली बालपणाची कल्पना उचलून ती त्याने तडीस न्यावी, ह्यासाठीं सर्व मोहाचा पडदा सारून, त्याला अतिशय दूर, सत्याग्रहाश्रम—साबरमतीसारख्या ठिकाणीं ठेवण्याचा हि त्यांनीं प्रयोग केला. आपल्या कुटुंबाकडून फलाहाराच्या उपोषणाऐवजी आठ दिवस कडकडीत उपवास करविणें, सूत कांतवून घेणे असे हि प्रयोग त्यांनीं केले. आपल्या मुलींनें आजन्म अविवाहित राहावें अशा तऱ्हेनें प्रयोग करण्यासाठीं तिच्या चुलत भावाच्या देखरेखीखालीं ते तयार झाले होते. दुसऱ्या चुलत भावाला म्हणजे आपल्या पुतण्याला तर त्यांनीं एक मुलगी सोपवूनच दिली होती. त्याचा प्रयोग फक्त तिला लवकर लग्न न करतां पुष्कळ वाढवून कर्व्यांच्या पाठशाळेंत सुशिक्षित करण्याकरता च होता. दारूचा पिठा अजिबात बंद करवण्यासाठीं पिठा कायमचा बंद होईपर्यंत उपास करण्याचा दृढनिश्चय करून पिठ्यासमोर केवळ तीन दिवस अहोरात्र उपवास करून ते घोंगडीवर बसून राहिले होते. सत्याग्रह संग्रामाच्या वेळीं त्यांना 'तुमचें इनाम जप्त कां करू नये' अशी सरकारकडून नोटीस देण्यांत आली होती. स्वतःच्या ह्या अशा प्रयोगाखेरीज इतरांना हि ते किती उत्तेजन देत! होईल ती मदत प्रत्येक कामीं त्यांनीं करावी. एका पुतण्याला लेखनादीचा लहानपणापासून नाद असे. त्याला त्या कामांत मदत व उत्तेजन देत. दुसऱ्यानें अध्यात्मचिंतनासाठीं एकांतांत झोंपडी बांधून राहण्याची कल्पना काढली, त्याला हि त्यांनीं सर्वप्रकारें मदत केली. बाहेरच्या मंडळीस हि मदत करीत. 'नाही' म्हणावयाचे नाहींत. पुण्याच्या अनाथ विद्यार्थी गृहाला मदत, वाईच्या चिपळूणकर मंडळीला मदत, कोठें उत्सवाला मदत, कोठें संस्थेला मदत, असे चालूंच असे. तालुक्यांत लोकलबोर्डाच्या कामांत हि भाग घेत. बोर्डाच्या सभांना निरनिराळ्या ठिकाणीं जावें लागे. गांवांतल्या लोकांना तर त्यांचा फार मोठा आधार असे. कांहीं अडल्यास ह्यांच्याकडे यावें. कांहीं तरी मिळवायाचें च, अशी प्रत्येकाची खात्री असे. वर्ध्याच्या आश्रमांत हि एकदां ते येऊन गेले. आपल्या पुतण्याचा तो आश्रम पाहून त्यांना समाधान वाटलें. त्यांना प्रथमपासून च त्याच्या कर्तृत्वाविषयीं, बुद्धिमत्तेविषयीं, वैराग्याविषयीं आदर असे. आपला आदर्श आपल्या पुतण्याकडून आचरीला जात आहे ह्याबद्दल त्यांना परमसंतोष वाटे. त्यांनीं त्याला लहानपणीं इतर मुलांबरोबर शिकविलें होतें. त्या शिक्षणाचा हा केवढा मोठा विकास! तो परममंगल आश्रम, तेथली शांति, तेथला कार्यक्रम, तेथली प्रार्थना ही केवढी मोठी परिणति! निवृत्त जीवनाची च ती प्रवृत्ति. तेथें स्वच्छता, नियमितता, कर्मनिमग्नता हे भाव तर होते च, परंतु अव्यक्ताच्या दिव्य साम्राज्यांतल्या अनेक गूढ भावांनीं ते वातावरण भरून गेलें होतें. ह्या सर्व गोष्टींची संवेदना त्यांना आपल्या पूर्वविचारांच्या स्पंदनांशीं साथ करतांना आढळून आली.

त्यामुळें या क्षणभंगुर आयुष्याचे दिवस भरभर चालले आहेत ह्याची त्यांना जाणीव तीव्रतेनें होत होती. वाढदिवस हा खरोखर मरण जवळ आल्याची खूण आहे!

अनुक्रमणिका

**“आयुषः खंडमादाय रविरस्तं गमिष्यति ।**
**उत्थायोत्थाय बोद्धव्यं किमद्य सुकृतं कृतम्” ॥**

तिकडे सूर्य अस्ताला जात आहे. आपल्या आयुष्याचा एक तुकडा घेऊन चालला तो. एक वेळ तुझ्या जीवनाचा हि असा च अस्त होईल असें तो सुचवितो—अशा विचाराची छाप त्यांच्यावर पडली होती. ‘कांहीं केलें नाहींतरी मनुष्य केवळ जपानें हि सिद्ध होतो’ असें एक वचन आहे. त्याप्रमाणे वरून व्यवहार करीत असून, तो मी कधीं सोडीन असा त्यांचा आंतून जप चाललेला होता. मुलींचीं लग्ने करावीं, मागें कर्ज कांही एक राहूं नये अशा खटपटींत ते होते. त्यासाठीं ते श्रम हि पुष्कळ करूं लागले. परंतु विधिघटना वेगळीच होती! व्यवहारनिवृत्तीसाठीं जोरानें व्यवहार करीत होते. तरीं नेहमीप्रमाणें सदग्रंथ वाचन आणि ग्रंथसंग्रह करण्याचा नादहि तसा च चालू होता. वेद, उपनिषदे, भारत, रामायण, भागवत, गीतारहस्य, अनेक ग्रंथ ते वाचीत. मग त्या त्या विचारांच्या तंद्रीत अंगणांत, ओटीवर दोन दोन तास फिरत राहात. “विचाराच्या ऊर्मि डोक्यांत शिरल्या म्हणजे स्वस्थ बसवत च नाही, फिरल्याशिवाय गत्यंतर नाही” असे ते म्हणत. “ध्यानाला आसन आणि विचाराला चालन” ह्या सूत्राचे उदाहरण त्यांच्यापाशीं प्रत्यक्ष दिसे.

अशा प्रसंगीं विचारमग्नतेमुळे त्यांचा चेहरा उग्र भासे. रागावले म्हणजे हि कोणाची पुढें जाण्याची प्राज्ञा नाहीं. मुलें आणि बायामंडळी तर थरथर कांपत असत. परंतु राग शांत झाल्यावर मग हाच का तो रागावलेला मनुष्य, असें वाटावें इतका फरक पडावयाचा. सज्जनाचा राग आणि पाण्याचा डाग फार वेळ रहावयाचा नाही. “क्रोधोऽपि निर्मलधियां रमणीय एव” अशी च त्यांच्या तीव्र-कठोर वृत्तींची स्थिति असे. खडीसाखरेचा खडा वरून किती कठोर—रुक्ष! पण पाण्यांत टाकल्याबरोबर त्याचे काय स्वरूप होते. एकच उदाहरण—मुंजीच्या स्वयंपाकासाठी चर खणले होते. तेथे धांवतांना पुतण्याचा तोल जाऊन तो फुफाट्यात पडला. ५/६ वर्षांचें वय. त्यामुळें आंगाची नुसती आग झाली. लगेच ह्यांनी त्याला उचलून घेतले. सर्व रात्रभर त्याला वाऱ्यावर हिंडवले. त्याच्या सर्व वेदना त्यांच्या हृदयांत मापून घ्याव्या इतके त्या पुतण्याच्या दुःखानें ते विरघळले! झर् झर् झर् डोळ्यांतून अश्रुधारा वहात होत्या! दुःखितासाठीं अंतःकरण असे अगदी द्रवून जात असे. आपली मुलें, आपल्या भावांची मुलें, आपल्या बहिणींची मुलें कोणांत हि यत्किंचित फरक त्यांना वाटत नसे. सर्वांवर सारखी च माया, सारखे च प्रेम, सर्वांशी सारखी च वागणूक, सर्वांची सारखी च काळजी! हा हि माझा! तो हि माझा च! आणि तो तिसराहि माझाच! त्या चवथ्याला हि आपले प्रेम देतील!!! “God is love”, हा त्यांच्यातला परमेश्वरी प्रेमाविर्भाव मुलांना एकसारखा च लाभला. त्यामुळें हा माझा सख्खा भाऊ, हा चुलत भाऊ, हा आतेभाऊ, ही सख्खी बहिण, ही चुलतबहिण, ही आतेबहिण, असा विचार हि कोणाच्या मनांत स्फुरत नाहीं. सगळ एका च ठिकाणचे, एकाच गांवचे, एकाच गुरुत्वमध्याभोंवती वाढलेले —अगदी एक च अशी सहज भावना त्यामुळें पोसली गेली. भांडणतंटे मुलांत मोठ्यांत असावयाचे च. उद्योग, वृत्ति, मार्ग हि निरनिराळें असतील. परंतु हृदयांतल्या हृदयांत—मनांतल्या मनांत भेदभावाचा मागमूस हि दिसावयाचा नाहीं. महासागरावर पर्वतप्राय लाटा दिसतील. दर्शनी देखावा च तो! ती केवळ नजरबंदी! आंत महासागर शांत—निस्तब्ध—केवळ एकरस!!!

सर्वांना गुरुत्वमध्याप्रमाणें असणारें ते गोपाळराव भावे आतां दिसणार नाहीत—कालाच्या ओघांत ते लीन झाले. तरी त्यांचे उपकार, त्यांचे गुण, त्यांचे प्रेम अमर आहे. त्यांचे बालपणापासूनचे ध्येय तर त्यांच्या पुतण्याने सर्वांच्या पुढें मूर्तिमंत करून दाखविले आहे. त्या ध्येयाच्या पूर्णतेच्या उद्धाराचे संगीत हि आपल्या कानांत घुमत आहे. ते ऐकून त्यांच्या आत्म्याला हि शांतीचा अनुभव येत असेल हे काय सांगावयास पाहिजे?

अनुक्रमणिका

तटिनींसम धांवत येई । ती शांति माझ्या ठायीं । सर्वदा
गंगेसम वाहत येई । ती शांति माझ्या ठायीं । सर्वदा ॥
अब्धीसम लोळत येई । ती शांति माझ्या ठायी । सर्वदा
देहांतुनि रोमांतूनि । शांतता येई वाहुनि । सर्वदा ॥
वैवाहिक शेला आण । सोनेरी ज्यावरि किरण । शोभती
फिटलासे अंतरपाट । अज्ञानपटल घनदाट । नासलें ॥
मालांनो दिधली छाती । लोळा हो लोळा वरति । स्वरैशा
आनंदनयनबिंदूची । कुसुमें ही तुमची साची । शोभती ॥
तेजाची वलये भंवती । मस्तका फार भूषविती । नवल हें
जीवींचे मधुरामृत हे । वारुणी मोदमय वाहे । मदभरे ॥

●●●

अनुक्रमणिका

# प्रकरण ७ वे

## मातृदर्शन

**सर्व** स्थावर-जंगम पदार्थांत सत्तारूपानें वास करणाऱ्या विश्वरूपिणी मातेशिवाय ह्या जगांत काय आहे? ती च गुप्त रूपाने मागे राहून आपल्या वत्सांची काळजी घेते. विद्या, लक्ष्मी आणि शक्ति ही तिची च स्वरूपें. पण ह्यांच्या हि पलीकडें "सेवा" हे तिचे केवढें विशाल-दर्शन! ह्या दर्शनांत विद्या-लक्ष्मी—शक्ति सर्व सामावून जातात. ब्राह्मणांनी विद्यारूपांत, क्षत्रियांनी शक्तिरूपांत आणि वैश्यांनी लक्ष्मीच्या रूपांत तिचा आश्रय करावा; परंतु तिच्या अजाण शक्तिहीन तान्ह्या बालकांनी काय करावें? त्यांना जाति, वर्ण ह्यांचा स्पर्श हि नाही, जगाची हि त्यांना ओळख नाहीं. त्यांना कोणचा आधार आहे? त्यांना "सेवा—देवी" हिचा च आधार. ही विश्वरूपिणी आई त्यांची सर्व प्रकारें काळजी करण्यास समर्थ आहे. सर्वांना च ह्या सेवेनें वाढविलें. तिला च विसरून विद्या, लक्ष्मी, शक्तीच्या पाठीमागें लोक लागतात. पण आधार तुटल्यावर वरचा डोलारा किती वेळ राहील? ज्या फांदीवर आपण उभें आहों ती फांदी च तोडून कसें चालेल? अनाथ, अज्ञान, अशक्त अशा स्वरूपांत आपल्याला कोणी वाढवले? आपल्याला ह्या सेवेनेच समर्थ केले नाही काय? म्हणून सेवा हा सर्व आधारांचा आधार आहे. १८/२० वर्षांची अननुभवी बालिका! परंतु बालकाला प्रसविल्याबरोबर एकाएकी शुश्रूषा करण्याचें ज्ञान तिच्यांत कोठून येते? ती का हॉस्पिटलमध्यें शिशुपालन विद्या शिकते? आणि ती च बालिका सर्व कुटुंबाची व्यवस्था तरी कशी राखते? एकाएकी तिच्यांत केवढी क्रांति होते? ती एकदम प्रौढ होते. एकदम गंभीर होते. तिच्या रोमरोमांत वात्सल्य भरून जाते. सर्वांची जबाबदारी घेण्यास ती तयार होते! हे स्थित्यंतर कशामुळें घडते? हा मातृत्वाचा म्हणजे च सेवेचा परिणाम आहे, विश्वांत सर्वत्र मातृत्व आहे म्हणून च विश्व टिकून आहे. सेवेच्या आधारावर च ते चालूं आहे.

त्या कुलांत—ह्या महान बालकाच्या कुलांत हें दिव्य मातृदर्शन सर्व स्त्रियांच्या ठिकाणीं दिसावें ह्यांत आश्चर्य कसलें? ह्या कुलांतील स्त्रियांनी सर्वांची सेवा केली. त्यांनीच संस्कारांची लेणी घडविली, त्यांनी अनेक कष्ट सहन केले, त्यांनी कुलवल्लीची वात्सल्याच्या पाण्यानें जोपासना केली परंतु त्यांच्या नांवाचा येथे मागमूस हि लागावयाचा नाही. वंशांवळीत त्यांची नांवें आढळणार नाहींत. पण त्यांची नांवे नाहीत म्हणून का त्यांना त्यांत कमीपणा आहे? कृति रहावी पण कर्त्याचे नांव राहूं नये, ही निरहंकार सेवेची परमावधि नव्हे काय? येथे मूर्तिकार मूर्तीत विरून गेला. कर्ता कृतींत मिसळला. तो आतां वेगळा राहिला च नाहीं. ती वेरुळ ची लेणी कोणी केली? ते कैलासचें लेणे कोणी घडविले? कोण सांगणार? त्या अजिंठ्याच्या लेण्यांत चिताऱ्याने कोठे हि आपले नांव कोरून ठेवलेले दिसते का? आपल्या त्या भव्य कृतींत तो मिसळून गेला. आपल्या नामरूपाचे त्याला भानच राहिलें नाहीं. तो कलाकार म्हणजे ती कला आणि ती कला म्हणजें तो कलाकार!

**आतां आमोद सुनास आले । श्रुतीस श्रवण रिघाले**
**आरसे उठिले । लोचनासी ॥**
**फुलें चि झालीं भ्रमर । तरुणीची झाली नर**
**झालें आपुले शेजार । निद्राळुचि ॥**

अशी त्यांची स्थिति झाली. नादब्रह्माच्या तुफान समुद्रांत गायकाच्या नामरूपाची नाव पार नष्ट झाली.

अनुक्रमणिका

**ही पहा उलटली नाव । उलटली नाव ।**
**ह्यापुढें कोठला ठाव । ह्या जळीं? ॥**

ह्या कुळांत ह्या महान बालकाच्या आजीच्या पलीकडच्या कोणा हि स्त्री ची कल्पना देतां येणार नाही. परंतु गंगेचे मूळ आपल्याला माहित नसले तरी, ते उंच आहे, हिमालयाच्या गिरिगव्हरांत कोठे तरी आहे. त्याने च ही पापतापनाशिनी झुळझुळ वहात कलरव करणारी निर्मळ गंगा तयार केली हें जसे आपण सहज समजूं शकतो तसेच येथेहि त्या कुलाचें संस्कारमय निर्मळ जीवन बनवण्यास त्या मागच्या काळांतल्या वात्सल्यमय स्त्रिया च प्रामुख्याने कारणीभूत आहेत, हें आपल्या लक्षात येतें. अगस्त्य ऋषींच्या लोपामुद्रेप्रमाणें त्यांची स्थिति झाली. पतीबरोबर त्या एकरूप होऊन गेल्या. त्यांची स्वतंत्र मुद्रा लुप्त झाली.

ह्या अनेक 'लोपामुद्रां' नंतर सप्तर्षींमध्यें वसिष्ठा जवळ अरुंधति अगदीं बारीक नजरेने च फक्त दिसते. तशी ती आजी, अगदी अस्पष्ट स्वरूपांत भासमान होते. शंभुराव भाव्यांच्या उपासनेत तिला त्यांची किती तंत्रे संभाळावी लागत ह्याची कल्पनाच केलेली बरी! कित्येक वेळां तर तिच्या योजना शक्तीचा अगदी अंत येऊन जात असे. उत्तरवयांत शंभुराव भावे केवळ भुइमूग आणि गूळ खाऊन राहात असत हे मागें आलें च आहे. रोज तेवढ्यासाठीं भुइमुगाचा लाडू तयार करावा लागे. 'लाडू गोड लागत नाही. गूळ फार कमी टाकला जातो' अशी शंभुरावांची त्यासंबंधी दररोज तक्रार असावयाची. आजीने रोज गुळाचें प्रमाण वाढवावें. परंतु 'गूळ कमी' ही तक्रार कांही थांबावयाची नाही. असे होता होतां—गुळाचें प्रमाण वाढवितां वाढवितां एक दिवस भुइमूग न घालता केवळ गुळाचाच लाडू तिने करून ठेवला. आणि विचारले 'आज तरी मनाप्रमाणें गोड आहे ना?' त्यावर शंभुरावांकडून उत्तर आले, 'हां, आहे. आज कांही गोडी लागते खरी लाडवांत'—अशा चमत्कारिक गोष्टी अनेक देतां येतील. यज्ञशाळेत नेहमी एक साप राहावयाचा. अग्नीला नैवद्य म्हणून दूध ठेवलें जाई : ते पिण्याची त्याला संवय लागलेली. शंभुरावास कोणी किती सांगितले तरी ते तिकडे लक्ष देत नसत. सापाला मारणें किंवा यज्ञशाळेंतून घालवून देणें त्यापैकीं कोणत्या हि गोष्टीला त्यांची परवानगी नसे. आजीच्या अंतःकरणाला त्या सापाचा केवढा घोर लागला होता! प्लेगमध्यें सुद्धां मृत्यूचे भय सोडून तिने शंभुरावांच्या बरोबरीने दिवस काढले. तिला प्लेग हि झाला. असे सर्व तऱ्हेचे कष्ट तिने सहन केले. गंगेप्रमाणे तिच्या ठिकाणीं उज्वल पावित्र्य होते. तिचे नांव हि गंगाच होते. आणि गंगेच्या काठीं काशी क्षेत्रांत च तिचे प्राणोत्क्रमण झालें. शेवटपर्यंत तिने कोणाची हि सेवा घेतली नाही. आपले प्रत्येक काम ती स्वतः करीत असे.

तिच्या मुलींमध्ये म्हणजे ह्या महान बालकाच्या आत्याबाईंमध्यें हि आजीच्या तपस्येचा गुण उतरला होता. सीता,जान्हवी आणि दुर्गा. ह्या तिघींची सापोली, पेण आणि बिरवाडी येथे घरें असत. जवळ ठिकाणें असल्यामुळें आणि यजमान तऱ्हेवाईक म्हणून पहिल्या दोघींचा त्या घराण्याशीं अधिक संबंध येई! यजमानांच्या तऱ्हेवाईकपणामुळें लाचारीची स्थिति त्यांना स्पर्श करूं शकली नाहीं. विषम परिस्थितीशीं त्यांनी अत्यंत धैर्यानें तोंड दिलें. त्यावेळीं हिंदुस्तानांत पुष्कळ ठिकाणी प्लेगचा कहर असे, प्लेगच्या रोग्यांची शुश्रूषा करण्यास कोणी हि धजावत नसे. परंतु त्यांनी बेधडक अशा रोग्यांची शुश्रूषा करावी कठिण परिस्थितीमुळें मुलाने यांत्रिक मागावर लुगडी विणावी. आणि ह्या साध्वीने रेशीम उकलून द्यावें असा देखावा त्या गागोद्याच्या खेडेगांवी पुष्कळ दिवस पहावयास मिळें. हिंदुस्थानच्या समाजजीवनाचा मध्यबिंदु ह्या वस्त्रविद्येवर च उभारला जावयाचा आहे, हें त्यांना त्या वेळीं कोठून माहीत असणार? राष्ट्राच्या निशाणावर रहाटाचे प्रतीक खडे होईल त्याचे स्वप्नहि पडणे त्या वेळीं शक्य नव्हते.

अनुक्रमणिका

**वासांसि जीर्णानि यथा विहाय**
**नवानि गृह्णाति नरोऽपराणि ।**
**तथा शरीराणि विहाय जीर्णा–**
**न्यन्यानि संयाति नवानि देही ॥**

या न्यायाप्रमाणें प्लेग आणि अनेक विषयाच्या निमित्ताने हीं जीवनें हीं काळाच्या उदरांत लीन झाली.

ह्यानंतर ह्या घरांतील मुलांना सर्वांना च आपल्या आईप्रमाणें वाटणाऱ्या त्या तिन्ही काकूंची सेवापरायण वृत्ती दृष्टीस येते. वरसईची अन्नपूर्णाकाकू काय किंवा पेणची गोपिकाकाकू काय अथवा सर्वांत वडील वैधव्यदशेने आपल्या दोन्ही मुलांसकट जीवन कंठणारी काकू काय ह्या घराण्यांतील पुरुषांची प्रकृती अतिशय तीव्रतर असल्यामुळें— सर्वांची च महाभारतांत वर्णन केलेल्या जरुत्कारुसारखी स्थिति असे. आधी तो जरत्कारु विवाह च करण्याला तयार नव्हता. मग माझ्या च नांवाची कोणी मुलगी असेल तर विवाह करीन, हा पण केला. कर्मधर्मसंयोगाने सर्व गोष्टी जुळून विवाह झाला. तरी जरुत्कारु स्त्रीला बजावतो—

**“स्त्रीस मुनि म्हणें अप्रिय करितांचि त्यजिन तत्क्षणी तुजला”**

नंतरचे त्या जरुत्कारुच्या स्त्रीचे जें वर्णन आहे ते येथे हि पूर्णपणें लागूं पडते.

**त्या शब्दें कंपिततनु झाली संझानिले जशी कदली ।**
**पदलीना ती साध्वी मान्य करूनि ‘बहू बरे’ असे वदली ॥**
**भयचकितता मृगाची शुनकाची जागरुकता शिकली ।**
**ती इंगितज्ञता ही काकाची म्हणुनि सेवनीं टिकली ॥**

ह्या आदर्श सेवागुणांखेरीज प्रत्येकीचे वैशिष्ठ्य स्वतंत्रपणें दिसून येई ते निराळे. विधवा काकूमध्यें व्यवस्थितपणा अधिक दिसे. तिच्या मुलींत नर्मदाताईमध्ये हि तो गुण दिसतो. त्या घारुताईमध्ये तर हा गुण किती उत्कटत्वाने दिसतो! अडीचशें वर्षांपूर्वीचे मोठमोठ्या तुळ्या असलेलें ते वांईचे घर. त्याला कारंजाचा मोठा चौक, आजूबाजूला ऐसपैस जागा, परंतु तेथें ती एकटी निर्भयतेनें राहाते. ती नसतांना घरांत जावें, मोठा चमत्कार दिसतो! अनेक नोकर-चाकरांनी सगळीकडें व्यवस्था लावून झाडून सारवून घरांतल्या श्रीमान मालकांसाठीं जितकी स्वच्छ आणि व्यवस्थित जागा करणें शक्य असेल त्याच्या किती तरी पट येथें व्यवस्था दिसते. चिमूटभर तरी कोठें केर सांपडेल तर अशक्य! हा सगळा तिच्या आईच्या उदाहरणाचा परिणाम आहे. पेणच्या काकूमध्यें सहन करण्याचा, कांही हि झाले तरी मुकाट्याने राहावे—मौनी असावे, हा तितिक्षेचा विशेष गुण दिसून येई! उलट वरसईच्या काकूमध्यें अतिशय गोड बोलण्यानें, प्रेमानें, आगतस्वागतानें पूर्ण वश करण्याचा मोठा च गुण होता. गोडशांच्या घराण्यातलीच ती. गोडसे—“गोड बोलणारे ते गोडसे”—अशी कोटी अजून हि केली जाते. सुप्रसिद्ध विद्वान नरहरशास्त्री गोडसे—‘माझा प्रवास’ हा रसाळ ग्रंथ लिहिणारे गोडसे, ह्यांच्या कुळांतील विद्वत्तेचा अन्वयीपणा, भारदस्त रसाळपणा, हे दोन्ही गुण तिच्यामध्यें पूर्णपणें उतरलें होते.

भीमा, चंद्रा, गीता, गोदा ह्या तिच्या चारी मुलींत हि तिचे हें गुण पुष्कळ प्रमाणांत दृष्टीस पडतात. विषम परिस्थितीच्या कचाट्यांत सांपडल्यामुळें अल्पवयांत गुण विकासाला, शरीर विकासाला आणि बुद्धि

अनुक्रमणिका

विकासाला फार थोडा अवसर मिळतो. बिचाऱ्या मुलींना लग्नापूर्वी हे आयुष्य एक सुंदर स्वप्नाप्रमाणें च दिसते. परंतु प्रत्यक्ष त्यांना अनुभव काय येतो?

> I slept and dreamt that life is beauty.
> But I woke and saw that life is duty.

जीवनांतल्या कर्तव्याचे दर्शन हे कांहीं वाईट नाही. परंतु किती कडू आणि विषमय दर्शन! त्या बहिणींप्रमाणे च मृत बहिणीं ची हि स्थिति. एकीचे जीवन कष्ट करतां करतां विहिरींत पडून नष्ट झालें! आणि दुसरी 'शांति' नांवाप्रमाणेच अतिशय शांत वृत्तीची, कोणत्या हि गोष्टीचा हव्यास नाहीं. अगदीं थोडें, पाउलभर पाणी असलेली एकादी लहानशी नदी जशी सपाट प्रदेशावरून वहात जावी—तेथें खळखळ नाही, आवाज नाही, कोणाचे लक्ष वेधले जावयाचें नाही, तशी तिची वृत्ति. परंतु परक्या घरांत सेवा करतां करतां क्षयरोग्याची शुश्रूषा करता करता अविकसित अवस्थेतच अपरिहार्यपणें मृत्यूने तिला सोडवलें! त्याला जबाबदार कोण?

**एको रसः करुण एव निमित्त भेदात् ।**
**भिन्नः पृथक्पृथगिवाश्रयते विवर्तान् ॥**
**आवर्त बुद्बुदरंगमयान्विकारान् ।**
**अंभो यथा सलिलमेव तु तत्समग्रम् ॥**

—अशी आपल्या मुलींची करुण अवस्था करणारें पालक. ही सर्व जबाबदारी निःसंशय त्यांची च परंतु त्या मुली मात्र अशा हि परिस्थितीत.

**अवघाचि संसार सुखाचा करीन ।**
**आनंदे भरीन त्रिभुवन ॥**

ह्याच स्फूर्तीनें जीवनांत अग्रेसर होत असतात. किती ही खडकाळ जमीन असो, पाण्याचा यत्किंचित् ओलावा मिळाल्याबरोबर सृष्टि माता त्या खडकाळ जमिनीला झांकते. तेथे हिरवेगार गालीचे निर्माण करते. तऱ्हेतऱ्हेच्या फुलांची नकशी ती त्यावर उठवून देते!

हे च मातृदर्शन आहे. सेवेवर आधारलेली लोपामुद्रा—अरुंधती—जरुत्कारु ही परंपरा येथे अव्याहत आढळून येते. तपस्या, योजनाशक्ती, व्यवस्थितपणा, विषम परिस्थितीशी झगडणारी धीर गंभीरता, तितिक्षा येथें मुरलेली आहे.

**"साच आणि मवाळ । मितळे आणि रसाळ ।**
**शब्द जैसे कल्लोळ । अमृताचे" ॥**

अशा प्रकारची दिव्यवाणी येथें आढळून येईल. येथे दारिद्र्य असेल तरी हीनता नाही; विषम परिस्थिती असेल तरी लाचारी नाही; अशक्तता असेल तरी मनोदौर्बल्य नाही. मातृदर्शनाची ही गुणमय बाजू झाली. दुसरी मर्यादेची बाजू. आपल्याबरोबरीची स्त्री असेल तर बहीण, लहान असेल तर मुलगी, मोठी असेल तर

अनुक्रमणिका

आई—हा सकळ स्त्रीजातीसंबधीचा भाव ह्या मातृदर्शनाने ठसून गेला आहे. किंबहुना लहानमोठी हा भेद न करतां सर्वत्र मातेचीच दृष्टि आहे. ही लहान मुलगी हि माता च, ती तरुणी हि माताच, आणि ती वृद्धा हि पण माता च. 'सर्वं मातृमयं जगत् ।' —ह्यांत सर्व नीती आली. मातेसमोर जे बोलतां येईल ते बोलावें, मातेसमोर जे निःशंक वाचता येईल तें च वाचावें, जी क्रिया मातेसमोर करण्यास हरकत नाही ती करावी, हा अगदी सरळ नीति-निर्णय ह्या कुलांतील मातृपरंपरेला अभिप्रेत आहे. सर्वत्र असे मातृदर्शन व्यापून राहिले आहे. ह्या कुलांतील स्त्रियांनी हे आपल्या जीवनाने शिकवले. त्यांतला अतंर्गत मर्यादाभेद हि शिकवला. परकी स्त्री—कोणी हि असो.—ती माता तर खरीच, पण ती दूरची आहे. तेथे संकोच, मर्यादा, अपरिचय—कामापुरता परिचय ठेवावयाचा. प्रकाश सगळ्यांना सारखा च. परंतु जवळच्याला जास्त दूरच्याला कमी हा मर्यादाभेद दिव्यापाशी राहतोच. माझ्या आईच्या मांडीवर डोके ठेवून मी निजेन, म्हणून सर्वच स्त्रिया माता असल्या तरी इतरांच्या बाबतींत ती गोष्ट शक्य नाही. इतकेच काय पण यत्किंचित् स्पर्श करणे हि अशक्य. ही मर्यादा ह्या घराण्यांतील स्त्रियांनीं शिकवली. त्याप्रमाणे चालणें, सर्वत्र मातृभावनेंत निमग्न असणें ही च मातृसेवा. साक्षात् आपल्या आईच्याद्वारें मातृदर्शन, नंतर आपल्या कुळांतील सर्व स्त्रियांच्या द्वारें मातृदर्शन आणि त्यानंतर सर्व विश्वांत विश्वरूपिणी मातेचे दर्शन, ही मातृदर्शनाची त्रिपदी झाली. त्या त्रिपदा गायत्रीपेक्षा पवित्र दर्शन कोणचे दाखवितां येईल? येथें सर्व दर्शनें फिकी पडतील मग षड्दर्शनांची ती काय चाड! आणि ज्याच्या डोळ्यांत हें दर्शन ठसले त्याच्यापुढे सर्व शास्त्रें हात जोडून उभी राहतील यांत तरी आश्चर्य कसलें?

**तये सिद्धप्रज्ञेचेनि लाभे । मन चि सारस्वत दुभे ।**
**सकल शास्त्रें स्वयंभे । निघती मुखे ॥ (ज्ञा.)**

●●●

# प्रकरण ८ वे

## ब्रह्मचर्य

**ब्रह्मतेज** प्राप्तीसाठीं दुर्दम्य प्रयत्न करणारी विश्वामित्राची परंपरा, अतिशय तन्मयतेनें चाललेली आजोबांची एकनिष्ठ उपासना, आईची ती दिव्य शिकवण, पित्याचा अलौकिक गुणमय योग, चुलत्याची सद्‌भावना, सर्व स्त्रियांच्या द्वारें मिळणारें भव्य मातृदर्शन—असें हे कुळ, आणि त्या कुळाचें ते एकांतांतले रमणीय निवासस्थान ह्या सर्वांचें दर्शन घेतल्यावर—

**पवित्र तें कुळ पावन तो देश**

अशी जेथली स्थिति न सांगता हि लक्षांत येते.

**चंद्र तेथें चंद्रिका । शंभु तेथे अंबिका ।**
**संत तेथे विवेका । असणें कीं जी ॥**
**दया तेथे धर्म । धर्म तेथे सुखागम ।**
**सुखीं पुरुषोत्तम । असे जैसा ॥**
**वसंत तेथें वनें । वन तेथ सुमनें ।**
**सुमनी पालिंगनें । सारंगांची ॥**
**गुरू तेथ ज्ञान । ज्ञानीं आत्मदर्शन ।**
**दर्शनीं समाधान । आथी जैसें ॥**

ह्या ज्ञानेश्वरांच्या ओव्या येथें किती उत्तम लागू पडतात!

**परी वैराग्यवसंताचेनि भरे ।**
**सोहंभाव महुरे । मोडोनि आला ॥**

अशा एका दिव्य कल्पवृक्षाच्या प्राप्तीसाठीं ह्या कुलपरंपरेचे सर्व जीवन खर्ची पडले.

**म्हणौनि प्रातिफळीं फळतां ।**
**ययासि वेळ न लगेल आतां ॥**


आतां अशी वेळ येऊन ठेपली. आणि सप्टेंबर ११ सन १८९५ सालीं एका महापुरुषाचा जन्म झाला!

शके १८१७ कृष्णपक्षांतल्या गाढ अंधकाराच्या रात्रीचा तो समय. तशांत दक्षिणायन. भाद्रपदांतली सप्तमी. पावसाच्या योगाने आकाश आणि पृथ्वी एक झालेली. कोंकणांतले ते गागोदें गांव आणि तेथली चराचर सृष्टी निस्तब्ध शांतीचा आस्वाद घेत गुंगत पडली होती. गाढ निद्रेचे साम्राज्य चोहोंकडे पसरलें होते. दिवसाचा कोणता हि भेद तेथे प्रतीत होत नव्हता. रात्रिदेवतेनें जणूं काय ती अद्वैताची पाठशाळा च


त्या ठिकाणीं उघडली होती! स्थावर-जंगम, चराचर, लहानथोर, कोणता हि भेद उरला नव्हता. तेथें एक च सनातन, चिरंतन अव्यंग समाधि! ते पर्वत हि ध्यानस्थ, ती झाडें हि निस्तब्ध, ढोलींतून पक्षी बसलेले ते हि केवळ निस्पंद! दृश्य सृष्टीच्या अगदी पलीकडच्या—अनंताच्या—अव्यक्ताच्या चिंतनांत तो काळ जसा अगदी कांही तन्मय होऊन गेला होता! चिंतनाला रात्र आणि कर्मयोगाला दिवस हा विभाग उघड आहे. जगांत आल्याबरोबर चिंतनाच्या, समाधीच्या, त्या पहिल्या दृश्याचा तर ठसा ह्या बालकावर एकदम पडला नसेल ना? कोण सांगणार? ह्या महापुरुषाच्या चिंतनाकडे, ध्यानाकडें, समाधीकडें, निवृत्तीकडें कल अधिक असण्याचें हें मोठें बाह्य कारण झालें नसेल ना?

"रात्रीं मी मौन राखतो, त्यामुळें की काय कोण जाणे? अंधार माझ्याशी बोलतो." तो म्हणतो "माझ्यामधून तुझा जन्म आहे. माझ्यांत च तूं लीन होणार आहेस. आज हि तुझ्यावर माझी च सत्ता आहे"—ह्या उद्‌गाराचे बीज त्या प्रथम दर्शनांत असेल काय? अथवा 'या निशा सर्वभूतानां तस्यां जागर्ति संयमी ।' ह्या वचनाची ही पहिली च सलामी येथें झडली? प्रकाशाच्या नजरबंदीने आणि दृश्य सृष्टीच्या मायेने आलेल्या आंधळेपणांत जग खुशाल सुख मानो.

श्रीगणेशायनमः । सजयति सिंदुरवदनो देवो यत्पाद. । स्वस्तिश्रीनृपशालिवाहन शके १८१७, मन्मथनाम संवत्सरे दक्षिणायने भाद्रपदे मासे कृष्ण पक्षे तिथी ७ घटी २७ प. ४५ परं. ८ सौम्यवासरे (बुधवार) रोहिणी नक्षत्र घ. ४४ प. ९ वज्रयोग घ. ४७ प. बव करणे घ. २८ परं बालवकरणें एवं पंचागशुध्दौ तद्दिने सूर्यस्तात् रात्रौ गत घटी २ प. ४५ मीन लग्ने तत्समये राजश्री नरहर शंभुराव भाव्ये अस्थ भार्या वज्रचुडेमंडित रुक्मिणी नाम्नी पुत्ररत्नं प्रासूत जन्म नक्षत्र रोहिणी चरण ४ नक्षत्रनाम वु. मनुष्यगण : शूद्र जातिः सर्प योनिः वैश्य वर्णः स्वामी शुक्रः मित्र गुरुः (११ सप्टेंबर १८९५).



जन्म कुंडली



राशी कुंडली

वंशो विस्तारतां याति देवद्विजगुरुप्रसादात् दीर्घायुर्भूयात् कुलदेवता प्रसन्नोस्तु ।

**सामर्थ्यानामिव समुदयः संचयो वा गुणानाम् ।**
**आविर्भूय स्थित इव जगत्पुण्यनिर्माण राशिः ॥**

अशी ही दिव्य प्रतिभा जगाला त्या अंधारांतूनच प्राप्त झाली. ह्यांत शंका नाही.

जणूं काय त्या अंधाराच्या योगाने शरीरावर हि सावळी छटा उमटली. राम आणि कृष्ण सावळे च नव्हते का? भारतीय जीवनाशी हा सावळा रंग निगडीत झालेला आहे. श्रमाचा तो प्रतिनिधी आहे. शेतकऱ्याचा तो वर्ण आहे. ऐश्वर्याची त्यावर चमक आहे "कांत्या श्यामो यशसा गौर :" कवींनी अशी विरोधाभासाने किती तरी सुंदर वर्णनें त्यावर केली आहेत.

अनुक्रमणिका

**मोटकी देह्याकृती उमटे । आणि निजज्ञानाची पहाट फुटे ।**
**सूर्यापुढे प्रगटे । प्रकाश जैसा ॥**

—एकंदर शरीराचा आकार ज्ञानेश्वरांचे हें वर्णन पाहून च तयार झाला असा भास होई. स्थूल शरिरांत बहुधा सूक्ष्म विचार राहात नाहींत म्हणून का अगदी लहानशी आकृती असावी?

**करचरणतळे । जैसी कां रातोप्तळे ॥**

ह्या योग्याच्या वर्णनाप्रमाणें, खरोखर तांबडेभडक, दुरून केवळ लाल कमळाप्रमाणें दिसणारें हात ह्या बालकाच्या ठिकाणचें चटकन् लक्ष वेधणारें एक वैशिष्ट्य आहे. आणि त्या कोंवळ्या अवस्थेतच नव्हे, अद्यापि ही ती च कोमलता तेथें दिसते. कमळ हें अलिप्ततेचें प्रतीक आहे. कमळाप्रमाणें सर्व कर्मापासून अलिप्त अशा संन्यस्त वृत्तीची हे हात साक्ष पटवतात! कुमारत्व, सनत्कुमारत्व त्या हातांवर कायमचे च उमटलें आहे! तसा च मुद्रेचा भाव. ओठ वारंवार घट्ट मिटून घेण्याच्या लकबीमुळें चेहऱ्यावर एकदम गंभीर भाव खेळावा आणि निश्चयाच्या तीव्रतेची जाणीव तेथें चमकून जावी. अजून हि अशी च स्थिति आहे. विशाल कपाळावरून आणि लांबट चेहऱ्यावरून चिंतनशीलतेची पकड कायमची च ठसून गेलेली दिसे.

क्रमाक्रमानें नूतन बाल्यावस्थेंतली सहज ब्रह्मचिंतनमय अवस्था लवकर च परिणति पावूं लागली. त्या सिद्धप्रज्ञेला वाचेची मनोहर पालवी फुटली. सामान्य बालकाच्या किती तरी अगोदर हा बालक बोलूं लागला. आईचे बोलणें, आईची गाणीं, आईच्या म्हणीं, आईच्या कहाण्या, आईच्या गोष्टी, आईचा पाठ, आईचा बोध—भराभर वाचेनें तसेच्या तसें अनुकरण केलें जाई! ध्वनीला प्रतिध्वनी, शब्दाला प्रतिशब्द, सुराला सूर, बिंबाला प्रतिबिंब, मुळी च वेळ नाहीं—असे होऊं लागलें. अगदी अर्भकावस्थेंत च वाचाशक्ति अशी वेगाने परिणत झाली. पुढील असामान्य वक्तृत्वाची छटा आतां च दिसूं लागली. तशीच चालण्याची गोष्ट—

**विहाय कामान् यः सर्वान्पुमांश्चरति निस्पृहः ।**

केवळ अहेतुकपणें एकसारखें फिरत राहण्याची त्या बालवयापासून च आवड! एके दिवशीं कांही कारणाने आई व इतर मंडळी गाडींत बसून पेणेस गेली. बरोबर यांस नेले नव्हते. गागोद्याहून पेण सात मैल आहे. गाडी तर निघून गेली. मागून ह्या सहा वर्षांच्या बालकाने कोणास न विचारतां निर्भयतेने उघड्या पायानें, जंगलांतून जाणारा सात मैल रस्ता आक्रमण केला. मग पेणेला प्रत्येक घरांत आपली आई आहे का? म्हणून डोकावण्यास सुरवात केली. असे करतां करतां इष्ट ठिकाण एकदांचे मिळालें. आणि रस्त्यावरून च "आई, मी आलों!" म्हणून आईपुढें ही अवधूतमूर्ति उभी! त्या उघड्याबंब बालकाला, रस्त्यांतून आपल्या शोधार्थ डोकावतांना पाहून त्या मातेला काय वाटलें असेल? भागवतकारांनी त्या अवस्थेचे वर्णन केलें आहे—

**वैदर्भी यास पाहे द्रव हृदयि धरी तत्क्षणीं स्तन्य वाहे ।**
**की ते आनंद लाहे निजतमुज असे ज्ञात होणेचि आहे ॥**
**बाष्पाने कंठ दाटे सकळ तनुवरि क्षिप्र रोमांच थाटे ।**
**शोकाचा सिंधु आटे त्वरित परम तद्दर्शनी खेद वाटे ॥**

अनुक्रमणिका

—घरांत, बाहेर, दिवसभर एकसारखे भिरभिर फिरण्याचा छंद असे. या फिरण्याला पायबंद घालण्यासाठीं काकांनी एक युक्ति करावी. भात साठविण्यासाठीं केलेल्या उंच कोठारावर बसवून ठेवावें. ती कोठारे ८/१० फूट तरी उंच असत. पण पुढें पुढें ही युक्ति हि फुकट जाई. तेंथून उडी मारणें ही गोष्ट सरावांतली होऊन गेली. घड्याळाचे कांटे कां फिरतात? आतां दोन वाजलें म्हणजे काय झालें? दोन वाजलें आणि तीन वाजले यांत फरक काय झाला? सकाळ, संध्याकाळ, दुपार हा फरक तर समजतो. पण एक-दोन-तीन हें काय प्रकरण आहे? पुन्हां पांच मिनीटें, पंधरा मिनीटें हें काय? —अशा विचारांनी ते बालमन सदोदित भरून गेलेलें असे. रात्रीच्या प्रशांत वेळीं, अंगणांत चंद्राच्या आल्हादकारक किंरणांकडे, चमचम चमकणाऱ्या हजारों ताऱ्यांकडे चित्त अगदी वेधून जाई! आणि कोंकणात काजव्यांची तर दिवाळी च पहावयास मिळें! “पौर्णिमेला कृष्णाचा मुखचंद्र पहावा, अमावास्थेला कृष्णाची अंगकांति पहावी” ह्या रमणीय विचाराला येथूनच सुरवात झाली. रात्रीं बेरात्रीं डोंगरावर जावें, सापाची, चोराची, भुताची मुळीं च भीति नाहीं! भीति वाटे ती बेडकांची. विनाकारण पायाखालीं चिरडावयाचें. खातां खातां एक तुकडा तोडावा ‘हा पहा कोंबडा झाला; आतां पहा गाईचे तोंड झाले, आतां पहा बकरी झाली’ असे त्या तुकड्याच्या आकारावरून चालावयाचें. आईने ‘हां असे म्हणूं नये’ असे म्हणतांच ‘कां?’ हा प्रश्न ठरलेला. ‘कोंबडे बकरी का आपण खातो?’ असे उत्तर मिळाले म्हणजे मग आईचे म्हणणें लक्षांत यावयाचे. खाण्यांत कधी हि आधाशीपणा नाही. किंवा ‘हें दे तें दे’ अशी स्वादवृत्ति नाहीं. ‘यदृच्छालाभसंतुष्टः’ हें ठरलेलें. अजन हि ती च सरणी आहे. अनेक पदार्थ खपत नाहींत. या बाबतींत अक्राणी महालांतील भिल्लाच्या घरचें चित्र लागूं होते. “ज्वारीची सफेत स्वच्छ, चांगली भाजलेली, पूर्ण चंद्रासारखी वाटोळीं सुंदर सबंद भाकरी आणि तिच्या मध्यभागीं कशाची तरी घट्ट डाळ किंवा भाजी आणून पाहुण्यांच्या हातांत द्यावयाची. हातांत आलेली भाकर डाव्या हातावर घेऊन, उजव्या हाताने तिचा लहान तुकडा मोडून त्याला तिच्यावर असलेल्या डाळीचा किंवा भाजीचा हिस्सेरसीप्रमाणें येईल तेवढा भाग लावून तो खायचा. हें काम इतक्या सफाईने व बरोबर होतें की, शेवटच्या घांसाला त्याच्या च बेताची भाजी राहिली असते तिच्यासुद्धां तो घास तोंडांत टाकला कीं, दोन हात झटकून पाहुणे उठलें.”

रानांवनांत वृक्ष-वनस्पतींचे, पशुपक्ष्यांचे अवलोकन करावें, नाना वस्तूंचे कार्यकारणभाव चिंतावे, दिवसभर सृष्टीची अनेक गूढ कोडीं सोडवीत जावी, आईपासून निरनिराळ्या तऱ्हेनें बोध ग्रहण करीत जावा. शैशवावस्था अशी परिणत होत गेली. नंतर आजोबांकडून ‘श्रीगणेशाचा’ पाठ मिळाला. आजोबा चंदन घासावयास लावीत, देवाला नमस्कार करावयास लावीत. रात्रीबेरात्रीं आरतीसाठीं उठवीत. काकांनी वृत्तदर्पण शिकवलें. त्या कवितांत मन रंगून गेलें. निरनिराळ्या छंदांतल्या कविता म्हणण्यांत कल्पनातीत आनंद होई. तशी च इसापनीति वाचून घेतली. ती नानाविध पशुसृष्टि, त्यांचे ते संवाद मनावर ठसून गेले. अजून इसापाचे दृष्टांत नेहमी सांगितले जातात. व्याख्यान, प्रवचन, संवाद सर्व वेळीं इसाप हात जोडून सामग्री पुरविण्यास तयार असतो! इसापाला ईश्वरदर्शन झालें होते एथपर्यंत मनाची भावना आहे! बाळमित्र हि वाचले. त्याच्या कोमलतेने हृदयावर परिणाम केला. हरि आणि त्रिंबकांतील तत्त्वें अतिशय आवडूं लागली. गणितांत हि प्रवेश झाला. कोणत्या हि विषयांत पहिल्यापासून च अप्रतिहत गति चाले. संध्यादि संस्कृत प्रकार हि मुंजीपूर्वी च मुखोद्‌गत होऊन गेले.

शरीराकडें मात्र लक्ष नसेः मुळापासून च वृत्ति चिंतनपर असल्यामुळे आणि शरीरपर नसल्यामुळे.

**‘देहीं चि असती रोड’** ।

अनुक्रमणिका

हें वचन शरीरावर कायमचें मुद्रित झालेलें असे. वारंवार ताप हि यावा. आणि आधीं च अशक्त असलेल्या प्रकृतींत भर पडावी. असा प्रकार एकसारखा चाले. मग या बालकाला बालग्रह च आहेत, अमुक च आहे, तमुक च आहे अशी कल्पना हि स्त्रियांनी काढावी.

ह्या बालकाची असामान्यता अगदीं जन्मापूर्वी च त्याच्या आजोबांनी वर्तवून ठेवली होती. आईला त्याचा प्रत्यय येत असे. आणि इतर मंडळींना हि त्याच्या बुद्धिमत्तेची असामान्य भरारी पाहून आश्चर्य वाटत असे. वयाच्या ९ व्या वर्षापासून केसरीचें वाचन सुरू झालें. जगांतल्या हालचाली कळूं लागल्या. आपण कोण? आपला देश कोठें आहे? त्याच्या उद्धारार्थ कोण कोण झटत आहेत? मागचा इतिहास काय आहे? त्या सर्व प्रश्नांची मालिका भराभर डोळ्यांपुढें येत चालली. काका वगैरें मंडळी हि असली चर्चा करीत. ती लक्ष्यपूर्वक ऐकली जाई. आपल्या सोबत्यांबरोबर हि ह्या गोष्टींची चर्चा चालें.

त्यावेळीं आतेभाऊ नाना साठे व त्यांचे धाकटे बंधु महादुबाबा हे दोघें वयानें वडील परंतु बरोबरीच्या सोबत्याप्रमाणे च असत. दोघे हि अत्यंत बुद्धिमान्, तर्कशक्तींत प्रखर, हिकमती योजना इत्यादि मध्यें पटाईत असत. अतिशय उच्च विचारांचे सूक्ष्म पापुद्रे काढून चर्चा करण्याची त्यांना हौस असे. आपण कांही तरी महत्कार्य केलें पाहिजे अशी ध्येयवादी दृष्टि त्यांच्या ठिकाणीं होती. ते हि बालवयांत च होते. परंतु आयुष्याच्या, देशाच्या, धर्माच्या, मानवी जीवनाच्या मोठमोठ्या गूढ आणि सूक्ष्म प्रश्नांत त्यांची बुद्धि सदोदित गुंतलेली असे. सख्या भावांपेक्षांहि जास्त आपलेपणाने ते रहात. कोणते हि काम करण्याला सदैव तत्पर असत. आज हि ती च विलक्षण बुद्धि, ती च कार्यकुशलता त्यांच्यापुढें हात जोडून उभी आहे असे दिसेल. दांडगा आत्मविश्वास त्यांच्या ठिकाणीं आहे. भीतीचे नांव हि नाही. कोणती हि पदवी न घेतां, शाळेंत न जातां, आपल्या केवळ कल्पकतेच्या जोरावर त्यांनी यंत्रशास्त्रात प्राविण्य संपादन केलें. साधें उदाहरण—सायकल शिकण्याला साधारण माणसाला कोण धडपड करावी लागते. पण येथें तसें नाही. नानाने अक्षरशः पांच मिनिटांत सायकल शिकून घेतली. आधीं निरीक्षण, परीक्षण, त्यांतले तत्त्व समजून घेणें, मग एकदम तद्नुसार क्रिया आणि ताबडतोब सिद्धि. अशी त्यांची त्या बाबतींत हातोटी असे. अशा दोघां सोबत्यांबरोबर उच्च चर्चेत, खेळांत, नाना हिकमतींत काळ जात असे. त्या बालवयांत भावी आयुष्याचें चित्र रेखाटण्यांत ह्या त्रिमूर्तीचे मन मग्न झालेलें असे. उच्च विचारांच्या मनोरथांचे मनोरे बांधण्यांत ते गुंग असत, विशाल कल्पनांनी त्यांचे मन भरून गेलेलें असे. पारतंत्र्यांतून देशाला सोडविणें. त्यासाठीं मोठी संघटना करणें, तपश्चर्या करणें, आपल्या अंगीं नाना तऱ्हेचे गुण बाणवून घेणें इ. विचार चालत. केसरीच्या वाचनाने त्या विचारांना चालना मिळे. चौफेर अवलोकनांत भर पडे. इतर मिळतील त्या पुस्तकांचे वाचन हि चालत असे. ह्या सर्व विचारांचा निष्कर्ष 'ब्रह्मचर्य' ह्या एका शब्दांत प्रगट करतां येईल. ह्या तिघांनी ह्या च वेळीं आजन्म नैष्ठिक ब्रह्मचारी राहण्याचा निश्चय केला. त्या वयांत त्या निश्चयाची रम्यता, उच्चता आणि आकर्षकता तेवढी प्रतीत होत असे. त्यांतले अंतराय आणि त्यातली कठिणता त्यावेळी प्रतीत होणे शक्य नव्हते. आणि ते स्वाभाविक हि होते. खरें पाहिलें तर सबंध जीवन ही ब्रह्मचर्याची च साधना आहे. बालवयांत सहजतेने ब्रह्मचर्य, यौवनावस्थेत स्वाध्यायाभ्यासाच्या जोरावर ब्रह्मचर्य, गृहस्थाश्रमांत पुत्रनिष्ठेच्या जोरावर ब्रह्मचर्य, वानप्रस्थाश्रमांत लोकसेवेच्या जोरावर ब्रह्मचर्य, आणि संन्यासांत ईश्वरनिष्ठेच्या बलावर ब्रह्मचर्य अशी ही जीवनव्यापिनी विशाल साधना आहे. कोणत्या तरी अत्युच्च विशाल कल्पनेसाठीं जी चर्या ते ब्रह्मचर्य. नैष्ठिक ब्रह्मचाऱ्याला तर सर्व उच्च ध्येयें एकवटावी लागतात—(१) सहजता (२) स्फूर्ति (३) लोकसेवा (४) सत्संग (५) ईश्वरनिष्ठा, अशा अनेक प्रवाहाने नौष्ठिक ब्रह्मचारी ब्रह्मचर्याच्या विशाल सागराला एकसारखा मिळत असतो. नदी समुद्राला मिळालेली च असते; तरी पुन्हां एकसारखी वाहून मिळत च असते. ब्रह्मचर्य स्वाभाविक च आहे. ती स्वाभाविकता वाहती ठेवावयाची इतके

अनुक्रमणिका

च त्याचें काम. नदी समुद्राला मिळाली असून मिळत असते त्याप्रमाणें साधना आणि सिद्धि ह्यात अखंडता राखावी लागते. स्त्री आणि पुरुष हा भाव मावळावा लागतो. दोन्ही भावांचे सामर्थ्य अंगांत परिपूर्ण मुरवावे लागतें. सर्वत्र ब्रह्ममयता दिसावी लागते. तेव्हांचे ते नैष्ठिक ब्रह्मचर्य!

**ईश्वरें मोठें सूत्र केलें । मनुष्यमात्र गुंतोनि राहिले ॥**

प्रत्येकाला मिथ्या मोहाने पछाडलेलें आहे. त्यांतून, पलीकडे जावयाचें! ह्याला सहजता आणि दुर्दम्य प्रयत्न पाहिजे. 'विश्वामित्रासारखे फसले तेथें आपला काय पाड?' ही विचारसरणीं तेथे लागू होत नाहीं 'विश्वामित्रासारखे फसले म्हणून च मी जास्त सावध राहीन' ही वीर-वृत्ति येथें लागते. ह्या बालकाला जरी एवढा विचार त्या वेळीं आटोक्यांत आला नसला तरी, ह्या विचारसरणीला बीजभूत जी सहजस्फूर्ति ती त्या ठिकाणी परिपूर्ण अंशाने, स्फुरत्प्रभनें एकसारखी झळकत होती. ह्या बालकाबरोबरचे ते दोघे सोबती आतां गृहस्थाश्रमांत प्रविष्ट झालेले आहेत. तरी त्यांची योग्यता मुळी च कमी होत नाहीं. कारण खरा गृहस्थाश्रम हा ब्रह्मचर्याचा च पर्याय आहे. शिवाय त्या दोघां सोबत्यांनी ह्या बालकाच्या मूळ प्रेरणेबरोबर त्यावेळीं सहकार्य केलें ही तरी काय लहान सहान गोष्ट आहे? ज्या विचारांत मन गढून गेलें तो आपल्या जीवनांत बद्धमूल करावयाचा. त्याचा सतत ध्यास घ्यावयाचा; जळीं, स्थळीं, काष्ठीं, पाषाणीं त्याचे च दर्शन करावयाचें. ह्या शिरस्त्याप्रमाणें सहज प्रेरणेप्रमाणे ह्या बालकाचे मन ब्रह्मचर्याच्या विचाराने भरून गेलें. त्याला आपल्याला एक परम आनंदाचा ठेवा सांपडल्याची खात्री वाटली. सर्व सामर्थ्य पुढें हात जोडून उभें राहिल्याची प्रतीति आली!

होतां होतां महाराष्ट्रीय कोंकणस्थ घराण्यांतल्या पद्धतीप्रमाणें उपनयनाचा काळ जवळ आला. त्या वेळीं आप्तेष्ट मित्रमंडळी जमवून उपनयन प्रसंग मोठ्या प्रमाणावर करण्यांत येत असे. त्याप्रमाणें सर्व मंडळी जमली होती. उपनयनांतील मंत्रांच्या कवाइती झाल्या. जेवणावळी झाल्या. वाजंत्रीची टामटूम हि झाली. शेवटी उपनयनाच्या मूळ कल्पनेप्रमाणे नूतन बटु विद्याग्रहणासाठी काशीयात्रेला जावयाचा असा प्रसंग उपनयनांत येतो. त्या च वेळीं अतिशय तिरस्करणीय अशा तऱ्हेचा प्रसंग, तेथें रूढि म्हणून दाखल केला जातो. मुलगा असा काशीला चालल्याचा देखावा करतात; आणि लगे च मामा किंवा असाच कोणीतरी म्हणतो, 'हां, हां, आपण काशीला जाऊं नका. मी आपणांस मुलगी देतो'—नंतर मुलाने परतावयाचे व सोडमुंज व्हावयाची. हा विलक्षण भाग रूढीप्रमाणें पुढें आला. सर्व मंडळी जमलेली च होती. सदरहू बाष्कळ वाक्ये हि ह्या बालकासमोर म्हटली गेली. परंतु त्या च वेळीं ह्या लहान मूर्तिमध्यें काय पाणी आहे याचा प्रत्यय आला. एकदम वीज चमकावी किंवा आकाशवाणीं व्हावी त्याप्रमाणे ह्या बटूने सगळ्यांना बजावले—"तुमच्या रूढिप्रमाणे तुम्ही कांही हि म्हणा व कांही हि करा; परंतु मी आजन्म ब्रह्मचारी राहण्याची प्रतिज्ञा केली असून, तिच्यांत प्रत्यक्ष ईश्वर जरी येऊन उभा राहिला तरी यत्किंचित बदल होणें शक्य नाही." ह्या वाक्यानें सर्व मंडळींस मोठा च विस्मय वाटला. हा खरोखर एक अद्भुत प्रकार झाला. प्रत्येकजण गंभीर होऊन गेला. आपण एका बालकासमोर उभे नसून कोण्या दैवी पुरुषापुढें उभें आहों अशी सगळ्यांची खात्री झाली. त्यावेळचे त्याचे तें शब्द, ती मुखमुद्रा, तो आविर्भाव, तो धीरगंभीर आवाज व तो एकंदर देखावा पाहून सर्वजण दिपून गेले. ह्या बालकाच्या असामान्य दैवी शक्तीचा सामुदायिक अनुभव प्रथम च त्या ठिकाणीं आला. आणि जो तो त्या बालकाकडें निराळ्या च दृष्टीने पाहूं लागला. जगज्जेत्या विजयी वीराकडे जितक्या कुतुहलतेने पाहिले गेले नसेल तितक्या कौतुकाने जो तो त्याच्याकडे पाहूं लागला. जिकडे तिकडे ज्याच्या त्याच्या तोंडी हाच विषय रमून गेला. उपनयनांतलें सर्व मंत्र ह्या दिव्य वाक्यापुढें फिके पडले आणि ह्या बालकानें अशा दिव्य वाक्यानें आपलें उपनयन आपण च करून घेतलें!

**तेजस्वी जे वृत्ति ऐशी जयांची ।**
**तेथे कांही चाड नाहीं वयाचीं ॥**

ही कवींची वाक्यें खरोखर अशा च ठिकाणीं प्रतीतीला येतात. आणि मन गोंधळून जातें. महासागरासमोर उभें राहिल्याबरोबर मनुष्य जसा दिङ्मूढ बनतो तशी त्याची अशा प्रसंगीं विमनस्क स्थिती होते; आणि संजयाची गीतेतंली अवस्था त्यांच्या डोळ्यांपुढे सहजगत्या च उभी राहते—

**राजन् संस्मृत्य संस्मृत्य संवादमिममद्भूतम् ।**
**केशवार्जुनयोः पुण्यं हृष्यामि च मुहुर्मुहुः ॥**
**तच्च संस्मृत्य संस्मृत्य रूपमत्यद्भुतं हरेः ।**
**विस्मयो मे महान् राजन् हृष्यामि च पुनःपुनः ॥**

अनुक्रमणिका

# प्रकरण ९ वें

## बडोदे

**उपनयनानंतरचा** सुमारें १०/११ वर्षाचा काळ बडोद्यांत गेला. तेथे वडील संस्थानी नोकरींत असल्यामुळें बडोद्यास राहणें स्वाभाविक होतें. कोठें कोकणांतले ते खेडेंगांव आणि कोठें बडोदें! दोहोंमध्यें मुळी च साम्य नाहीं. वैषम्य मात्र भरपूर! कोंकणांत घरचें घर, वाटेल तेवढी जागा, येथे संकुचितता. तेथे जिकडे तिकडे झाडीं, येथें शहरांत झाडांचें नांव नाहीं. तेथें मोकळी हवा, येथें हवा खाण्यास बाहेर जावयाचें. तेथलें कुणबी लंगोटी लावलेले, येथें तऱ्हेतऱ्हेचा पोषाख. तेथले गांव म्हणजे जसे एक कुटुंब, सर्वांची सर्वांना ओळख, येथें कोण कोणाला विचारतो? तेथें ब्रह्ममय एकजिनसीपणा तर येथें बहुजिनसी प्रकृतीचा पसारा! हें सर्व प्रकृतीचे वैविध्य दिसावें म्हणून तर यदृच्छेनें ह्या बालकाला येथें आणलें नसेल? अथवा वैराग्याच्या दृढीकरणासाठीं, ज्ञानाच्या विविध साधनांसाठी, दुनियेच्या दर्शनासाठीं, त्या सहविचारी मित्रमंडळींसाठी, ज्या गुर्जर महात्म्याशी पुढें संबंध यावयाचा त्याच्या गुर्जर जीवनाशी परिचय व्हावा म्हणून, येथें राहण्याचा योग आला? यदृच्छेचा गूढ हेतु कोण सांगूं शकेल? बडोद्याला अनेक थोर पुरुषांना अनेक निमित्ताने यावें लागले आहे एवढें मात्र खरें!

खुद्द बडोद्याचे सयाजिराव गायकवाड हि नाशिक जिल्ह्यांतील कवळाण्याच्या भिकार खेड्यांतून च येथें आलेले. येथें येऊन त्यांनी किती तरी सुधारणा केल्या. हल्लीचे बडोदे शहर हे एका दृष्टीनें त्यांचे च स्मारक आहे असें म्हणण्यास हरकत नाही. गुजराथमध्ये दुसऱ्या आणि मुंबई इलाख्यामध्यें तिसऱ्या प्रतीचें हें शहर आहे. पहिल्या प्रथम प्रवासी आगगाडींतून स्टेशनवर उतरल्या बरोबर समोर च दत्ताचें मंदिर लागते. तशी च पुष्कळशीं वडाची झाडें दिसतात. त्यांच्या दर्शनानें वटोदरपुरी म्हणजे च बडोदे अशी खात्री होण्यास वेळ लागत नाहीं. नंतर पुढें गेल्यावर हायस्कूलची इमारत लागते, आगगाडींतून अगदीं दुरून ती दिसते. येथें ह्या बालकाचें इंग्रजी शिक्षण झालें. येथें त्याला कित्येक दिवस एकसारखें यावें लागे. त्याच्या वास्तव्यांनें आणि एकंदर विद्येच्या वातावरणानें ही इमारत पवित्र वातावरणानें भरलेली आहे असें कोणास वाटणार नाही? इमारत ह्या दृष्टीने हि हिचे वैशिष्ट्य डोळ्यांत भरण्याजोगें आहे. मोठमोठ्या घुमटांनीं इमारतीला एकदम गंभीर स्वरूप आलें आहे. विद्या म्हणजे पोरखेळ नव्हे. विद्येकडें गंभीरतेनें पहावें, असें च जणूं काय ही इमारत सुचवते. इमारती भोंवती फुलझाडांचे ताटवे, हिरवेंगार खेळण्याचें मैदान असा देखावा आहे. ह्या मैदानावर क्रिकेटच्या मॅचीस पाहण्यासाठीं गर्दी लोटावयाची. जवळ च शंकराचें देवालय आणि विद्यार्थ्यांचे वसतिगृह आहे. हायस्कूल टाकून पुढें गेलें कीं सरळ रस्त्यानें 'कमेटी बाग' नांवाचा बाग लागतो. त्याच्यासमोर च सयाजीरावांचा घोड्यावर बसलेला पुतळा आहे व शेजारी कँपकडे जाण्याचा रस्ता आहे. लहानापासून थोरांना, सर्वांना ज्ञान, आनंद, करमणूक ह्यांची ह्या बागेनें मोठी च सोय करून दिली आहे. 'मृगाणां च मृगेंद्रोऽहम्' गीतेतली ती विभूती येथें पहावयास सांपडते. रोज तिच्या गंभीर गर्जना गांवभर ऐकूं यावयाच्या. तसेच वाघ, लांडगे, कोल्हे, आस्वलें, तरस इत्यादि वन्य हिंस्र पशु ह्या उपवनांत ठेवलेलें आहेत. हरणांचा भाग लागला म्हणजे हरणेंच हरणें! कांही मोठीं, कांहीं लहान, कांहीं शिंगांची, कांही बिनशिंगांची, कांही ठिपक्यांची, कांही बिनठिपक्यांची. हरणांना पाहून रामायणांतला सीताहरणाचा प्रसंग अचूक डोळ्यापुढें उभा राही. रानमांजरे, चित्ते, गेंडे, आफ्रिकेतले कांगारू, पट्यापट्या चा झिब्रा पाहून मोठा विस्मय वाटावा! शहामृगें हि एका भागांत असावयाची. त्यांची मोठमोठीं अंडी पाहून नवल वाटे. पक्ष्यांचा विभाग लागला की मग त्यांची च सृष्टि सुरूं व्हावयाची. पोपट, मैना, काकाकौवे, कोंबडे, हंस,

मोर, चंडोल—कुठलें कुठलें पक्षी आणून ठेवले आहेत. ह्या बागेंत हा बालक किती तरी वेळां येई. बालपणांतल्या त्या इसापनीतींतले ते सगळें पशुपक्षी येथें जमा केलेलें पाहून त्याला किती आनंद वाटला असेल! माशांच्या विभागांत लाल, पिवळें, पांढरे, हिरवे—'नानावर्णाकृतीनि च' असें मासे पाहण्यांत मुलें गर्क होऊन जात. सृष्टीचें हें कौतुक बालकांना किती आकर्षक वाटते! येथें च मेंदी चा चक्रव्यूह तयार केलेला आहे. त्याला भुलभुलावणी म्हणत. त्यांत किती तरी वेळ भिरभिर फिरावें; पण बाहेर पडतां यावयाचें नाहीं. कित्येकांनी ही आपत्ति अगोदर च ओळखून, खिशांत चुरमुरें आणावे, खात जावें आणि थोडे थोडें खाली टाकत जावे —'एक पंथ दो काज'— म्हणजे मुरमुऱ्यांच्या खुणेवरून आलेला रस्ता बिनचूक मिळावयाचा. निरनिराळ्या तऱ्हेच्या चित्रविचित्र वनस्पति, झाडें, फळें, फुलें यांनी गजबजलेल्या त्या बागेंत हिरवीगार पटांगणें, खेळण्याच्या जागा, ठिकठिकाणीं विश्रांतिस्थानें असत. मोकळेपणाची लयलूट असे. उन्हाळ्यांत बसण्यासाठी थंडगार समरहौस केलेलें असें. ठिकठिकाणीं बसण्यासाठीं बाक असत. लहान मुलें, विद्यार्थी, स्त्रिया, मोठी माणसे फिरावयास यावी. कोणी हंसतो आहे; कोणी धांवत आहे; कोणी खाद्य पदार्थांचा समाचार घेत आहे. कोणी बाकावर पडून विश्रांति घेत आहेत. कोणाच्या परस्परांत गुजगोष्टी चालूं आहेत. असा तो बाग दिसावयाचा. किती तरी लांब रूंद आहे तो. त्यांत च म्युझियमची इमारत आहे. आंत निरनिराळीं दालनें लागतात. चित्रांचे, पुतळ्यांचे, वाद्यांचे, पोथ्यांचे, भांड्यांचे, पशूंचे, पक्ष्यांचे वनस्पतिंचे, दगडाचे — कसलें कसलें वर्णन द्यावे. पाहून पाहून डोळें भरून यावयाचे. कुतुहलता नष्ट होऊन चित्त अगदी शून्यमनस्क होऊन जावें. एकेक विभाग नीट समजावून घ्यावयाचा तर महिना महिना लागावा असे ते म्युझियम आहे. त्यांत हि ह्या बालकाने पुष्कळ वेळां संचार केलेल आहे. ह्या च बागेंत आठवड्यांतून एकदां सर्व वाद्यें ऐकविण्याची सोय केलेली असे. सतार, ताऊस, वीणा, सारंगी, फिडल, सरोद, जलतरंग—ती वाद्यें एकदम एकदां वाजवावयाची आणि नंतर एकामागून एक पाळीपाळींने वाजवावयाची. बाकावर बसून रसिक लोक ऐकत बसत. बँड हि वाजविला जाई. ही बाग टाकून जरा पुढें गेलें कीं विश्वामित्री नदीचा पूल लागतो. बडोदे शहर ह्या नदीच्या जवळ वसलें आहे. पावसाळ्यांत नदीला पूर येतो तेव्हां लोक नदी पाहण्यासाठी यावयाचे. ह्यापुढें दोन रस्ते फुटतात. एक जेलकडे जातो व दुसरा शहराकडें. रस्त्यांत पुन्हा एक दत्ताचें मंदीर, वडाची झाडें असे दृश्य दिसते. दुसऱ्या बाजूला हॉस्पिटल. यापुढें वस्तीला सुरवात होते. एका बाजूला केदारेश्वराचे मंदिर लागते. समोर कुंभारवाड्याचा रस्ता. लगे च निरनिराळ्या गल्ल्यांना सुरवात होते. येथें जवळच कासारफळिया नांवाची गल्ली आहे. प्रथम वर्षभर राहण्याचा येथें योग आला होता. ह्या कासारफळिया मध्यें च मुख्य रस्त्यावर सहाव्या नंबरची मराठी शाळा असे. तेथें थोडी वर्षे मराठी शिक्षणासाठीं ह्या बालकाला जावें लागले. कासारफळिया जवळच राममंदीर ची पोळ आहे. तेथे कांही दिवस व त्या पोळेसमोरील विविध-कलामंदिराच्या पाठीमागे पवाराच्या चाळींत कांही दिवस घर बदलावे लागले. भाड्याच्या घरामुळें इकडून तिकडे अशी बडोद्यांत चार ठिकाणें बदलावी लागली. पवाराच्या चाळींतून शेवटी कापडीपोळेंत मनोहर नांवाच्या घरंदाज गृहस्थांच्या घरांत जावें लागलें. तेथें शेवटपर्यंत वास्तव्य झालें. ह्या कापडीपोळेच्या पाठीमागे शंकरपोळ अनुस्तुफळिया, शास्त्रीबुवांची पोळ अशा गल्ल्या आलेल्या आहेत. शास्त्रीबोवांच्या पोळेंत व्हेटरनरी डॉ. जोगळेकर रहात. तसें च त्या पोळेंत नसरवानजी आणि अदरजी ह्या दोन पारशी डॉक्टरांचा दवाखाना होता. येथें औषधासाठीं ह्या बालकाला किती तरी वेळां यावे लागे. जरा कांही झालें की ताबडतोब पारशी डॉक्टरांकडे जावयाचे. व तो नको म्हणेपर्यंत औषध चालूं ठेवावयाचे. असा वडिलांचा आपल्या घरांतील मंडळीसंबंधी शिरस्ता होता. सतरा डॉक्टरांना विचारावयाचे नाही.

**'औषधं जाह्नवीतोयं वैद्यो नारायणो हरिः'**

अनुक्रमणिका

ह्या श्रद्धेनें त्या ठरीव डॉक्टराकडे जावयाचे. शंकरपोळ, अनुस्तुफळिया इत्यादि गल्ल्यांत शाळेंतींल ओळखीचे विद्यार्थी असत. त्यांच्याकडे वारंवार जाणे येणें असे. शास्त्र्यांच्या पोळेत डॉ. जोगळेकरांच्या समोर पुढें टिळकांचा अखाडा असे. विद्यार्थी संध्याकाळीं जमावयाचे. लाठी-काठी, फरीगदगा इत्यादींचे संध्याकाळीं दर्शन व्हावयाचे. कापडीपोळेंत शिरतांना रस्त्यावर एक शंकराचे देऊळ लागते. भाविक लोक येतां जातां पादत्राणें काढून क्षणभर हात जोडावयाचे व लगबगीने पुढें जावयाचे. या मंदिराजवळून मुख्य रस्त्यांतले ते मोठें टॉवर दिसावयाचे. त्यावर घड्याळ. सा-रे-ग-म ह्या सुरांत वाजणारे त्याचे ठोके कालाचे नित्यसंगीत एकसारखे ऐकविण्यास तत्पर असत. रात्रीं नऊ वाजतां तोफेचा आवाज होई. त्यावरून आपापलीं घड्याळें जो तो लावून घेई. ह्या टॉवरच्या रस्त्यांतून दुतर्फा तऱ्हतऱ्हेची दुकानें असावयाची. त्या दुकानांतून “शुं जोइये? शुं आपुं! आटलुं बधुं! वधारे पैसा लेतो नथी” इ. त्रुटित गुजराथी वाक्यें एकसारखीं ऐकूं येत. टॉवर जवळ च चित्तेखान मारूति, पावरोटीवाल्यांच्या भडकलेल्या भटट्या व गायनशाळा असे. संध्याकाळीं त्या विनामूल्य शिकविण्यांत येणाऱ्या गायन शाळेंत शिकण्यासाठीं विद्यार्थ्यांचा मेळा जमत असे. ह्या रस्त्यावर गाड्या, घोडे, ट्राम, इत्यादि वाहनें हि सारखी फिरत असावयाची. परंतु कोठीच्या रस्त्याने मात्र फारशी माणसांची वर्दळ नसे. या बाजूला सर्व सरकारी कचेऱ्या आलेल्या आहेत. स्टेट लायब्ररी हि याच भागांत आहे. येथें वाचनासाठीं या बालकाचे बहुतेक रोज येणें व्हावयाचे. हा च रस्ता पुढें सरळ गेला कीं, लक्ष्मीविलास राजवाड्याकडें जातो. त्यापुढें आनंदबाग नांवाच्या छोट्याशा मंदिराकडे आणि त्यापुढें थेट ५-६ मैलांवर असलेल्या मकरपुरा राजवाड्याकडे हा रस्ता वळतो. ह्या रस्त्यावर किती तरी वेळां फिरण्यासाठीं येणे व्हावयाचे. शहरांतल्या अगदी एका टोकाला सेंट्रल लायब्ररी आहे. तेथें अक्षरशः लाख्खों पुस्तकांचा संग्रह केलेला आहे. लहान मुलांना खेळवून नाना प्रकारे ज्ञान मिळवून देण्यासाठीं या लायब्ररीच्या वर एक विभाग राखून ठेवलेला असे. तेथें एक विद्वान बाई असत, मुलांना ठोकळे जमविण्याचे, मेकॅनोची रचना करण्याचे, मोटारी, आगगाड्या चालविण्याचे असे अनेक खेळ त्या शिकवित. दुर्बिणींतून वस्तु दाखवीत. या पुस्तकालयांत हि मधून मधून या बालकानें यावें. या भागाकडे येतांना रस्त्यांत लहरीपुरा दरवाजा, मांडवी आणि त्यावर उंच भगवा झेंडा लागावयाचा. त्याला पाहिल्याबरोबर मराठ्यांच्या इतिहासाचे स्मरण ठरलेलें! ह्या च बाजूला वाडी नांवाचा विभाग आहे. वाडीमध्ये पुरोहित नांवाचे स्नेही असत. त्यांच्याकडे पुष्कळ वेळां जाणें असावयाचे. शहराच्या निरनिराळ्या भागांतून फिरण्याऐवजी शहराबाहेर दूर फिरण्याला जाण्याची आवड अधिक असे. स्टेशन पलीकडें घोडें दौडविण्यासाठीं ४-५ मैलांवर मैल दीड मैलाचे एक वर्तुळ केलेले आहे. त्याला घोडदौडी म्हणतात. फिरण्याचे हे हि एक ठिकाण असे. सरकारी अधिकाऱ्यांचे बंगले ह्या भागांत लागत. काशिविश्वेश्वराचे मंदिर हि इकडेच आहे. येथें गंगनाथ भारती विद्यालय ही शिक्षण संस्था असे. काकासाहेब कालेलकर तींत शिक्षणादींच्या कामांत भाग घेत. या मंदिराच्या बाजूला राहण्याच्या जागा असत. प्लेगमध्यें येथें राहण्याचा योग येई.

अभ्यासासाठीं हायस्कूल, मित्रांना भेटण्यासाठीं निरनिराळ्या गल्ल्या, वाचनसाठीं स्टेट लायब्ररी आणि सेंट्रल लायब्ररी, व्याख्यान प्रवचनांसाठी माणिकरावांचा आखाडा, मुजुमदारांचा आखाडा, दादामहाराजांचा मठ, स्टेट लायब्ररीचा हॉल, फिरण्यासाठी घोड-दौड, सिद्धनाथ, आनंदबाग, मकरपुरा, गोवा गेट, स्मशानाची बाजू, विश्वामित्री स्टेशन—एवढा च ह्या बालकाचा बडोद्याशीं संबंध असे.

मोठमोठीं पुस्तकालयें, प्राणिसंग्रहालयें, अखाडे, सुरसागर सारखे पोहण्याला मोठें तलाव, कलाशिक्षणासाठीं कलाभुवन, निरनिराळ्या शाळा, विद्यार्थ्यांची वसतिगृहें, व्याख्यानादिसाठीं न्यायमंदिरासारख्या विस्तृत जागा, संगीतासाठीं गायनशाळा, आंधळ्या मुक्यांची शाळा, अशा तऱ्हेची

जीवनांतल्या ज्ञानाची साधनें बडोद्याला एकत्र पहावयास मिळतात. त्याबरोबर च वैभवाचें प्रदर्शन हि येथें दिसतें. लक्ष्मीविलास राजवाडा, मकरपुरा राजवाडा, नजर बागेंतील करोडो रुपयांचा जवाहिरखाना—हा सगळा वैभवाचा भाग आहे. गणपति उत्सवाच्या निमित्ताने व दसऱ्याच्या सीमोल्लंघनासाठीं सरकारस्वारी लवाजम्यासकट निघे.

**हा मंद मंद गजराजसमूह चाले**

असे झुलणारें, रंगवलेलें अनेक हत्ती, त्यावर अंबारीत, हौद्यांत बसलेली राजकुटुंबांतील माणसें, घोड्याची पथकें, भालाईत, पायदळ, सांडणीस्वार, देशी इंग्रजी वाद्यें, सोन्याचांदीच्या तोफा, सोन्याचांदीचे रथ, गाड्या, पालख्या, मेणें, समारंभनिमित्ताने होणारी दारूची आतषबाजी, साठमारी नांवाने प्रसिद्ध असलेली हत्तीहत्तीची झुंज, इत्यादि प्रकारांनी वर्षांतून अनेक वेळां वैभवाचें प्रदर्शन व्हावयाचे. हे सगळें प्रकार एकेक वेळा ह्या बालकाने पाहिले आहेत. परंतु त्यांत त्याचे चित रमणें शक्य नव्हतें. ज्ञान आणि ऐश्वर्य, ईश्वराचा प्रभाव दुहेरी आहे. ज्ञानानें तो जीवाला मुक्तीचा रस्ता दाखवतो आणि ऐश्वर्यानें मायेच्या बाजारांत 'पुनरपि जननं पुनरपि मरणं' असे गोते खावयास लावतो. म्हणून ऐश्वर्य ही वस्तु अनुकरणीय नाही. ती ईश्वराला च शोभते. ज्ञानाची उपासना मात्र प्रत्येकाला अतिशय कल्याणप्रद आहे. परंतु लोकांचा ऐश्वर्याकडे च सर्व कल. अगदी भिकाऱ्यापासून तो राजामहाराजापर्यंत जो तो आपल्या वैभवाचे प्रदर्शन करील. आपल्या शरीराला रंगवील, केंसाला तेल चोपडील, चित्रविचित्र रंगाचा पट्टेपट्टेदार पोशाख चढवील. त्यावर मिळतील ते, मिळतील त्या धातूचे दागिनें चढवील. तीन तीन वेळां आपला मुखडा आरशांत पाहील. पण त्याला हें समजणार नाहीं कीं

**मुखडा क्या देखे दरपनमें ।**
**नही दया धरम मनमें ॥**

वेरुळची लेणी, अजिंठ्याची लेणीं, दक्षिण हिंदुस्तानांतील उंच उंच गोपुरांचीं मंदिरें हीं सर्व देवाचें वैभव दाखविणारीं आहेत. मनुष्याचें वैभव दाखविण्याची हिंदू धर्मांत पद्धति नाहीं. अशोक, शिवाजी, रामदास—कोणाचे हि स्मारक नाही. कोणी हि आपल्या बायकोसाठीं ताजमहाल बांधला नाही. कोणी हि आपल्या पूर्वजांचें स्मारक बांधलें नाही. ह्याचें कारण हि हें च आहे.

**वैभव देवाचे च वाढवावे, देहाचे वैभव नको ।**

हा सनातन धर्माचा सनातन सिद्धांत आहे. आणि हें सर्व वैभव तरी देवाचे स्मरण म्हणून च करावयाचें. खरें म्हटलें तर मनुष्यापाशीं वैभव दाखविण्याची काय सत्ता आहे? मग तो एकादा सम्राट असो कीं साधारण मनुष्य असो.

**नवपल्लवी रोमांचितु । महानिले कांपवितु ।**
**आमोदजळें बोलवितु । फुलांचे डोळे ॥**
**कोकिळा कलरवाचेनि मिषे । मृगवृंद बोलवित जैसे ।**
**वसंत कां प्रवेशे । भक्त आरागी ॥**

असा तो वसंत निर्माण करील? का

**पसरले सरले गिरि साजिरे । सरवटे धुकटें भरिते भरें ।**
**बहुत वात झडाड झडाडितां । वर तरू वरमाचि कडाडितो ॥**
**झिरपति झरती झरती झरे । न धरितां धरितां निर वावरे ।**
**बहुत पाथळ बोध महीतळीं । नभकटे धुकटें कट पाथळी ॥**

असा वर्षाऋतु त्याला उत्पन्न करतां येईल? त्याने सोन्याची फुलें, चांदीचे दागिने केले, मोत्यांचे सर केले पण कमळ आणि गुलाब, बकुळ आणि शेवंती, मोगरा आणि मालती ही काय मनुष्यकृति आहे? सिंहाचे राजैश्वर्य, मोराचे नटणें, आणि कोकिळेचे गायन त्याला कसें निर्माण करतां येईल? देवाने दिलेलें वैभव सोडून मनुष्य ह्या कृत्रिम पसाऱ्याच्या पाठीमागें लागून स्वतःला भिकारी मात्र बनवितो. म्हणून

**हुजुरसलामी मुजरा घे तूं नजराणा मान ।**
**मी इकडे हा हरिच्या पायीं पडलों बेभान ॥**

ह्या बालकाची अशी सहजवृत्ति असे.

लोकांच्या विविध दर्शनाविषयीं कांही किरकोळ गोष्टी च मांडल्या तरी पुरे होईल. गुजराथमध्यें आल्याबरोबर प्रथम सकाळीं लोक 'दातण' करतात ही गोष्ट कधीं न पाहिलेली नजरेस पडली. ही गोष्ट साधारण नाही. उत्तर हिंदुस्थान आणि दक्षिण हिंदुस्थान असा हा फरक आहे. मद्रास, कर्नाटक, मल्याळ, महाराष्ट्र, तैलंगण—चोहोंकडे दक्षिणेंत दाताला राखुंडी किंवा कसली तरी भुकटी लावतात. पण उत्तरेकडे कोणच्या हि देशांत असें नाही. सर्वत्र दातणाची च पद्धति आहे. आरोग्यदृष्ट्या 'दातण' हें दक्षिणेकडें हि सर्वत्र वापरलें जाण्याची आवश्यकता आहे. दातणाच्या निमित्तानें कित्येक लोक तास तास दातण चघळीत ओट्यावर बसावयाचे. ठिकठिकाणीं थुंकावयाचें, दातणें कोठे तरी फेकून द्यावयाचे असा गलिच्छपणा नित्य पाहण्यांत येई. तसा च गुजराथी बायकांचा रडण्याचा समारंभ.

**मोले घातले रडाया । नाहीं आसु आणि माया ॥**

हा अभंग पूर्वी खरा वाटत नसे. रडण्यासाठी का कोणी मजुरी देत घेत असतील? असें वाटावयाचें. परंतु ती गोष्ट अक्षरशः खरी आहे. मजुरी देऊन रडायला बायका जमवावयाच्या व 'हाय हाय' म्हणून ऊर बडवीत बसावयाचें. ह्या देखाव्याचें अतिशय हंसू येई! गुजराथी लोकांची सारवण्याची एक विशिष्ट पद्धति आहे. जमीन सहा सहा महिने उखळत नाही. त्यांत नकशी करतात. सारवण्यांत मोठी कला दिसे. तशीं च जाती. महाराष्ट्रांतली जातीं साधी असावयाची. परंतु गुजराथमधल्या जात्यांत इच्छेप्रमाणें जड हलकें करण्याची सोय असते. विड्या पिण्याचे व्यसन गुजराथेंत फार. कित्येक जातींत तर खुद्द बाप निःशंकपणें मुलाला विडी पेटवून देतो! त्यामुळें विड्या वळण्याचा धंदा गुजराथी विधवा बायांत पुष्कळ दिसे. गुजराथ्यांचे उच्चार अशुद्ध. सकाळीं नळावर स्नान करतांना कित्येक जण संस्कृत स्तोत्रें म्हणावयाचे. त्यांत त्या सुंदर स्तोत्रांना अगदीच हेंगाडे स्वरूप आणीत असत. व्यापारांत आणि उद्योगधंद्यांत गुजराती लोक किती तरी हुषार आहेत. परंतु त्यांचा 'अव्यापारेषु व्यापार' ही पुष्कळ वेळां दिसे. कापडी पोळेंमध्यें रोज असा एक उद्योगी मनुष्य यावयाचा आणि गटारांतील माती, रेती वगैरे चाळीत बसावयाचा. उद्देश हा कीं कांहीं पै पैसा त्यांत

मिळेल, बटने, किरकोळ दागिन्याचे तुकडे वगैरे मिळतील. वर्षानुवर्षे असे माती चाळणारें लोक आढळंत. भिकाऱ्यांची हि कमतरता नसे. रोज रात्री एक आंधळी बाई 'आंधरीनें कंइं आपो' असे विशिष्ट सुरांत म्हणत यावयाची. धो धो पाऊस पडत असला तरी तिचा नित्यनियम चुकत नसे. पैसा हेच दैवत असलेल्या समाजांत फसवाफसवी हि असावयाची च. कापडीपोळेंत शेजारी च एक गरीब बिचारी विधवा बाई मोलमजुरी करून एकटी च राहात असे. मजूरी करून करून तिने दोन अडीचशें रुपये जमवले व एका गृहस्थाकडें ठेवावयास दिले. त्या गृहस्थाने ते पैसे तिला परत दिलें नाहींत. ती काय करणार? कांही कागद केला नव्हता, साक्षी, पुरावा कांही नाहीं. भलमनसाई ही च साक्ष. पण ती चालणार कशी? मग ती दररोज सकाळी उठतांना आणि संध्याकाळीं निजतांना ईश्वरस्मरणाबरोबर 'त्याचे निःसंतान होवो, त्याची अन्नानदशा होवो' असे गुजराथींत मोठमोठ्याने म्हणावयाची. शेजाऱ्यापाजाऱ्यांस ते सर्व ऐकूं जावयाचे. ईश्वरस्मरण आणि शिव्याशाप हा अगदी परस्पर विरुद्ध प्रकार एकत्र पाहून विस्मय वाटे. पण जनतेचें दर्शन म्हणजे असें च नाहीं का? त्यांत वैविध्य आणि परस्परविरुद्धतेनें च सगळा रंग भरला जातो.

**या ते रूद्र शिवातनुः ।**

हें च जनतेचे खरें दर्शन आहे.

ज्ञानाची विविध साधनें, ऐश्वर्याचे व्यर्थ प्रदर्शन आणि जनतेचें उभयविध दर्शन—बडोदें हि जगाप्रमाणें च त्रिविध स्वरुपांत नटलेलें असे. परंतु हा ब्रह्मनिष्ठ पुरुष तेथें कसा रहात असेल? क्रमाक्रमानें ते सर्व आपल्याला कळणार च आहे. तरी गीतेने ह्याचें अगोदर च उत्तर देऊन ठेवलें आहे.

**सर्वकर्माणि मनसा संन्यस्यास्ते सुखं वशी ।**
**नवद्वारे पुरे देही नैव कुर्वन्न कारयन् ॥**

●●●

अनुक्रमणिका

## प्रकरण १० वें

## प्राथमिक शाळेतील अभ्यास

'**तत्र** स्थितो यत्नोभ्यासः' — वृत्तीची आत्म्याच्या ठिकाणीं तल्लीनता करण्याचा अभ्यास हा च खरा अभ्यास! त्याला अनुकूल अशा तऱ्हेचें अक्षरशिक्षण, त्याला साधक अशा तऱ्हेची कर्मकुशलता, त्याला पोषक अशा तऱ्हेचे वातावरण हीच शाळा. हेंच शिक्षण होय. जनसंभर्दापासनू दूर, एकांतात, सृष्टिमातेच्या मोकळ्या वातावरणांत, प्रशस्त, स्वच्छ आणि सुंदर जागीं च असा अभ्यास होऊं शकतो. ज्ञानेश्वरांनी म्हटल्याप्रमाणें तेथें अभ्यास च अभ्यासाला करतो. आणि नुसत्या जागेचा च प्रश्न नाहीं. तेथलें मार्गदर्शक, शिक्षक, गुरू, सोबती, सवंगडी आणि मित्र हे तर प्रेमाचे पुतळे, जिव्हाळ्याचे जिव्हाळे असावे लागतात. तेथें ज्ञान आणि कर्म एका च वेळीं एकत्र नांदावे लागते. वाघ आणि गाय एका च ठिकाणीं राहताहेत असा देखावा तेथें दिसावा लागतो. आईबाप, भाऊबहिण, इत्यादि नातीं ही तर देहसंबंधानें अपरिहार्य च असतात. परंतु गुरू मित्र, शिष्य ही नातीं तशीं नाहीत. तेथें रक्तसंबंधाची अपरिहार्यता किंवा गुलामी नाहीं. तेथें हृदयसंबंधाचें आत्मस्वातंत्र्य आहे. त्यामुळें

**रूपलावण्य अभ्यांसितां नये । सहज गुणास न चले उपाये ।**
**म्हणूनि धरावी सोये । आगंतुक गुणाची ॥**

अशी तेथें सोय आहे. तेथें नाईलाजाची भाषा नाहीं तेथें स्वातंत्र्याचे नियंत्रण आहे. म्हणून गुरू, मित्र, शिष्य हे एका दृष्टीने बाप, भाऊ, पुत्र इत्यादींपेक्षां निःसंशय श्रेष्ठ ठरतात. भारत वर्षांत ऋषिकालीं असे गुरूशिष्य, त्यांचे आश्रम आणि त्यांचें तेथलें अध्ययन, हा एक जीवनाचा अतिशय पवित्र आणि रमणीय भाग असे. उषःकाळांतला उल्हास, नवीन उमलणाऱ्या कमळांचे सौंदर्य आणि प्रतिचंद्राची वाढती चित्कला ह्यांना उपमा देतां येईल काय? त्यावेळचे कोमल बालमन, त्या मनाची तीव्र ग्रहण शक्ति, त्या ग्रहणांतला आल्हाद, त्यांत सन्मित्र आणि प्रिय सहाध्यायांचा मेळा, तशांत उत्तम शिकवण आणि सद्गुरुची सेवा, उत्तरोत्तर सगळाच्या सगळा वर्धमान पक्ष असावयाचा!

**ऋतु बरवा शारदु । शारदी पुढती चांदु ।**
**चंद्री जैसा संबंधु । पूर्णिमेचा ॥**
**कां वसंतीं बरवा आराम । आरामीं प्रियसंगम ।**
**संगमी आगम । उपचाराचा ॥**
**वाचे बरवे कवित्व । कवित्वीं बरवें रसिकत्व ।**
**रसिकत्वीं परतत्त्व । स्पर्शु जैसा ॥**

—येथे ज्ञानेश्वरांशिवाय कोण दृष्टांत देईल? कोणत्या भाषेंत त्या रमणीय स्थितीचें वर्णन करावें? महाभारतासारख्या इतिहास ग्रंथाच्या अग्रभागीं व्यासांनी ह्या गुरुशिष्यसंबंधाचा प्रसंग पहिल्या प्रथम मांडला आहे. ग्रंथाच्या शाब्दिक मंगलापेक्षां जीवनाच्या इतिहासाच्या पानावरचें हें प्रत्यक्ष मंगल व्यासांना सर्वश्रेष्ठ वाटलें. ह्यांत शंका नाहीं.

अनुक्रमणिका

## वृद्धिरादैच् ।

पाणिनीनें व्याकरणाच्या पहिल्या पानावर हे सूत्र रचून घातलें. जीवनाच्या व्याकरणग्रंथांतला हा काल म्हणजे वर्धमानकाल, म्हणजे 'वृद्धी' च नव्हे काय? आणि लगे च 'अदेङ गुणः' असे दुसरे सूत्र पाणिनी देतो. 'वृद्धि आणि गुण' एकामागून एक आलेलीं हीं दोन सूत्रें, शिक्षणाची हि प्रथमसूत्रें आहेत. विकास आणि गुण, किंवा गुणांचा विकास, अथवा विकासाचा गुण कसेंहि म्हणा ह्या दोघांची जोडी शिक्षणांत अभेद्य आहे. ती फुटणें शक्य नाहीं. व्यासांची इतिहासाची पाठशाळा असों की, पाणिनीच्या व्याकरणाचें अध्ययन असो, कपिलांचे सांख्य तत्त्वांचें विद्यापीठ असो कीं गौतमांचें न्यायविद्यालय असो, वाग्भट वैद्यक शिकवो की भास्कराचार्य गणित शिकवो, अथवा बादरायणांचा वेदान्त चालों की शंकराचार्यांचे अद्वैतभाष्य चालों—गुण हें सगळीकडें सारखे च. उपाधिभेदाने मोकळी फुलें, फुलांचा गुच्छ, फुलांचा हार किंवा फुलांचा गजरा, असे निरनिराळें प्रकार केले तरी फुलांत फरक होत नाहीं. तें च सौंदर्य, तीच कोमलता! त्याप्रमाणें गणित, व्याकरण, इतिहास, न्याय, वेदांत, शेती, स्वयंपाक, गोरक्षण, पाणी भरणें, लाकडें फोडणे ह्यांत अक्षरशः कांही फरक नाही. सर्व जीवनाचीं अंगें आहेत. सर्वांत एका च प्रकारच्या गुणांचा अभ्यास करावयाचा. गीतेने ह्याला तप म्हटलें आहे. बारा वर्षे गुरुगृहीं राहून ज्या गुणांची दृढता झाली पाहिजे ते गुण गीता उघड करून सांगते.

**देवद्विजगुरुप्राज्ञपूजनं शौचमार्जवम् ।**
**ब्रह्मचर्यमहिंसा च शारीरं तप उच्यते ॥**
**अनुद्वेगकरं वाक्यं सत्यं प्रियहितं च यत् ।**
**स्वाध्यायाभ्यसनं चैव वाङ्मयं तप उच्यते ॥**
**मनःप्रसादः सौम्यत्वं मौनमात्मविनिग्रहः ।**
**भावसंशुद्धिरित्येतत्तपो मानसमुच्यते ॥**

ह्या गुणांचें पोषण करणारा देखावा त्या सहाव्या नंबरच्या शाळेंत ह्या बालकाला दिसला असेल काय? नाहीं. अवघीं २॥/३ वर्षे च मराठीं शाळेंत जावें लागलें. आधींचा अभ्यास वडिलांनीं करून घेतला होता. ह्या तीन वर्षांत ४/५/६ इयत्ता झाल्या. त्या वेळचे शिक्षक कोण, त्यावेळचें सहाध्यायीं कोण, ह्याची कांही च कल्पना देतां येत नाहीं.

अत्यंत अमंगळ भाषा हा प्राथमिक शाळांतील सर्वांत मोठा दुर्गुण ह्या हि शाळेंत भरपूर असे. ("Well begun is half done") अशी इंग्रजीत एक म्हण आहे. सुरवात चांगली झाली की अर्धे काम फत्तें झालें म्हणून समजावें. प्राथमिक शाळेंत मुलगा हें अमंगळ भाषाशास्त्र शिकला म्हणजे पुढील मध्यम आणि उच्च शाळांतील शिक्षणांत असणाऱ्या शांकुतलादि नाटकांच्या सभ्य तमाशाची पूर्वतयारी झाली! विद्यापीठ आणि विद्यालयांत खरोखर असे विद्येचे पीठ आणि विद्येचा लय होत असतो. ह्या प्राथमिक शाळांचे वर्णन ह्या बालकानें एकदा सहज विनोदानें केलें होते. ते अक्षरशः खरें आहे. तो म्हणतो—"आमच्यावेळीं शाळेच्या पाठ्य पुस्तकांत एक अभंग असे

**शाळेसि जातांना मुलांनी वाटेत ।**
**तमाशा पाहत राहू नये ॥**

अनुक्रमणिका

त्याचा अर्थ असा कीं जर शाळेंत च रोज पांच पांच घंटे तमाशा पाहायला मिळतो आहे तर वाटेत कशाला पहा!" ज्या आद्य मराठी कवीनें

**ये मराठीचिये नगरी । ब्रह्मविद्येचा सुकाळ करी ॥**

अशी मराठी भाषेंची उच्च सुरवात करून दिली. त्याच मराठीं भाषेंत अत्यंत अमंगळ प्रकारची भाषा सर्वत्र पसरली आहे. भाषेचा मनावर फार परिणाम होतो. विचार हा भाषामय आहे. जो जसें बोलतो तसा तो बनतो. म्हणून भाषा सुधारली पाहिजे. अमंगळ भाषा तर उपयोगाची नाही च. शिविगाळ तर नको च; पण अशुद्ध, अस्पष्ट भाषाहि उपयोगाची नाहीं. म्लेच्छ्-अस्पष्टे शब्दे असा पाणिनीने अर्थ दिला आहे. अस्पष्ट शब्द आला की म्लेच्छत्व आलें च. वेदाची संहिता म्हणणारा काश्मीरचा ब्राह्मण असो की कन्याकुमारीचा ब्राह्मण असो, उच्चारांत, स्वरांत काडीचाहि फरक पडावयाचा नाहीं. भाषाशुद्धीचा हा कटाक्ष ह्या बालकाच्या जीवनांत पहिल्यापासून च होता. भाषा शुद्ध पाहिजे त्याप्रमाणें त्या भाषेंत परस्परविग्रह ही उपयोगाचा नाहीं,. लोकसंग्राहक, सुखसंवाद करणारी, उच्च विचार दर्शविणारी, शुद्ध, स्पष्ट भाषा बालकाला शिकण्याला मिळाली पाहिजे. परंतु 'प्रथमग्रासेमक्षिकापातः' त्याप्रमाणें ह्या प्राथमिक शाळेतली भाषा अगदी हीन स्थितीला गेलेली असते. सर्व व्यवहाराला आधार अशी वाणी च आहे. म्हणून

**सत्यपूतां वदेद्वाचं ।**

भाषेत सत्याचे तेज प्रगट झालें पाहिजे. पण हें सर्व विचार त्या प्राथमिक शाळेला काय होत! मुलांना भरडून काढण्याचा तो एक कारखाना च असतो! केवळ भाषेचाच प्रश्न नाही. तेथली प्रत्येक गोष्ट ही निरुपयोगी आणि विपरीतपरिणामीं असते. आतां प्रश्न असा येतो कीं, अशा त्या अत्यंत हीन वातावरणांत या बालकाच्या मनावर काय संस्कार झाले? त्याचे तेथें कितपत जमलें?

असामान्य व्यक्ति आणि सामान्य माणसांत जो फरक असतो तो च येथें प्रकट झाला. सामान्य माणसें परिस्थितीप्रमाणें बनतात, परिस्थितीला वश होतात, परिस्थितीप्रमाणें वांकतात, 'पानी तेरा रंग कैसा जिसमें मिलावे वैसा'—असे त्यांचे स्वरूप असतें. परंतु, असामान्य व्यक्तींची स्थिति अशी नसते. ते परिस्थितीला वळवतात; किंवा परिस्थितीमधून आपले इष्ट साध्य नेमकें तेवढें काढून घेतात. ते त्या परिस्थितीशीं कधीहि मिळून जात नाहीत.

**अवघी भाग्ये येती घरां । देव सोयरा झालिया ॥**

अशी त्यांची स्थिती झालेली असते. प्रतिकूल परिस्थितींत महापुरुष आपलें प्रतिकारसामर्थ्य वाढविण्याची संधि आली म्हणून आनंद मानतो, अनुकूल परिस्थिति असेल तर आपले ग्रहणसामर्थ्य वाढविण्याचा हा प्रयोग आला असें त्यास वाटते.

**बरा देवा कुणबी केलों । नाही तर दंभे असतो मेलों ॥**

आपण अशिक्षित कुणबी झालों ह्याबद्दल तुकाराम महाराज खिन्न होत नाहींत. ते म्हणतात ही इष्टापत्ती च आहे. वाटेल त्या परिस्थितींतून आपले इष्ट शोधून काढण्याची तीव्र दृष्टि जवळ असल्यामुळें, कशा हि तऱ्हेची

आपत्ति येवो ती त्याला हटकून इष्टापत्ती च होते. राजवाडे म्हणत असत, 'हिंदुस्तानांत अज्ञान आणि अशास्त्रीयता पसरली आहे. हे एक भयंकर संकट आहे. पण संकट यावें तर असें च यावे त्यांत च आपली कर्तबगारी दिसून येईल'. ह्या उद्‌गारांत हि ही च महापुरुषाची वृत्ति दिसून येते. रामकृष्ण परमहंस एकदां दारूच्या पिठ्यावरून चालले होते. तेथे पुष्कळ दारूडे झिंगत होते. अद्वातद्वा बोलत होते. तो देखावा पाहून त्यांनी नेमके आपले इष्ट त्यांतून काढून घेतलें. ते हि भक्तिरसानें गाऊं लागले.

**हरिरस ही मधुरा मदिरा ।**
**प्राशुनी धुंद हो चतुरा ॥**

कोठें दारूचा पिठा आणि कोठें अष्टसात्विक भक्तीची भूमिका! परंतु महापुरुषाची वृत्ति कोठून कोठें उडी मारते याचा नेम नाहीं. परिसाच्या स्पर्शानें लोखंडाचें सोनें होते. ह्याचा अर्थ हा च. जिकडे तिकडे महापुरुषाला आपल्या इष्ट वस्तूचीं साधनें भरली आहेत असे स्पष्ट दिसते. Fool quarrels with tool! त्या बडोद्याच्या मराठी शाळेतल्या त्या हीन परिस्थितीशीं हा बालक समरसून गेला नाही. तुळशीदासांनी म्हटल्याप्रमाणें तो अगदी अलग असे.

**विधिबस सुजन कुसंगति परहीं । फनि मनीसम निजगुण अनुसरही ॥**
**दैवे कुसंगति पडे जरि संत भारी । वर्ते भुजंगमणिसा स्वगुणानुसारी ॥**

त्या शाळेंत अगदी पहिल्या प्रथम विषम परिस्थितींत आपलें तत्त्व हि टिकवून ठेवण्याचा झगडण्याचा पाठ ह्या बालकाला मिळाला.

**तस्मात्सर्वेषु कालेषु मामनुस्मर युद्ध च ।**
**रात्रदिन आम्हां युद्धाचा प्रसंग ।**
**अंतर्बाह्य जग आणि मन ॥**

बेफिकीरपणानें आपला मार्ग आक्रमण करावा आणि झगडत रहावे, हा पाठ अनायासें परिस्थितीद्वारां तेथे मिळाला. शाळेतील अक्षरशिक्षणाचा प्रश्न च नव्हता. शाळेतल्या पाठ्य पुस्तकांच्या अभ्यासासाठीं शाळेंतल्या कोणत्याहि शिक्षकाची जरुरी नव्हती. राजवाडे म्हणत की, "मराठी शाळेपासून बी.ए. पर्यंत चे शिक्षण मी ३/४ वर्षांत घेऊं शकलों असतो पण तेवढ्यासाठीं माझी पुष्कळ वर्षें विनाकारण खर्ची पडली," तशीच या बालकाची हि स्थिती होती, असे म्हणण्यास हरकत नाहीं. विषम परिस्थितींत महापुरुष समरसून जात नाहीं च पण त्यांच्या आंगचे तेज अधिक च उज्वल होते. जगांत तेजस्वितेने कसे रहावें, जगाची पुष्कळशीं परिस्थिति प्रतिकार करण्याजोगी कशी आहे, शिक्षणाचा खेळखंडोबा कसा चालला आहे, एका आईला ज्यास्तींत जास्त जितकीं मुलें असतील त्या पेक्षां एका शिक्षकाला जास्त मुलांना शिकवणें कसें अशक्य आहे, शिक्षकाचा विद्यार्थ्याच्या जीवनाशीं पूर्ण संबंध कसा पाहिजे, तासातासाने निरनिराळें विषय बदलून शिक्षण देण्याची पद्धती कशी निरुपयोगी आहे, इत्यादि विचारांना त्या शाळेंत सुरवात झाली असेल, अशी कल्पना करण्यास हरकत नाही. त्यामुळें बीजतः निवृत्त शिक्षणाची योजना तयार होण्याला येथून चालना मिळाली असेल, आणि अशी खात्री पटण्याला ही शाळा पहिलें निमित्त कारण झाले असेल. यांत शंका नाही की शिक्षण म्हणजे संतसंग आणि अध्ययन म्हणजे

**या स्तेषां स्वैरकथा स्ता एव भवंति शास्त्राणि ।**

अशा सहजतेने मिळणारे आत्मज्ञान!

●●●

अनुक्रमणिका

# प्रकरण ११ वें

## वडिलांचे शिक्षण

**प्राथमिक** शाळा समाप्त झाल्यानंतर पुढें वडिलांनीं घरीं च शिकविण्याला सुरवात केली. सकाळीं शिकवावें दुपारीं अभ्यास करावयास देऊन स्वतः ऑफिसमध्यें जावें व संध्याकाळीं घरी आल्यावर केलेला अभ्यास तपासावा, पुन्हां दुसऱ्या दिवशीं सकाळी नवीन शिक्षण द्यावें—साधारणपणें असा क्रम असे. अभ्यास शांतपणें करतां यावा म्हणून अभ्यासाची खोली हि नेहमी स्वतंत्र असावयाची. तेथें कोणतीहि अडगळ नसे. फक्त पुस्तकें व खालीं बसण्यासाठी कांहीं तरी आंथरलेले असे. रात्री हरिकेन कंदील तेथें यावयाचा. त्या कंदिलाचा उजेड डोळ्यावर येऊं नये म्हणून त्यावर कागद लावला पाहिजे असें वडिलांचें नेहमीं सांगणें असे. शिक्षणांत गणित, इंग्रजी, अक्षर आणि चित्रकला हे विषय असत. वडिलांना गणित विषयाचें अतिशय महत्त्व वाटे. बिनचूकपणा, चोखपणा, अचूक तर्कपद्धति ही गणितानें च प्राप्त होते असें त्यांचें म्हणणें असे. त्यांची स्वतःची त्या विषयांत चांगलीच गति होती. गणित पाटीवर मुळींच मांडावयाचे नाहीं, प्रथम नीट उदाहरण समजून घ्यावें, दहा वेळां त्यांतले सर्व मुद्दे डोळ्यापुढें आणावे. उगीच इकडून तिकडे आंकडेमोड करावयाची नाहीं. विचारानें गणित सोडवावयाचें. असें आंकडे मांडून पाहू, तसे आंकडे मांडून पाहूं असा कांही प्रयोग करावयाचा नाहीं. गणित हा प्रयोगविषय नाहीं, निश्चित अनुमान पद्धतीवर तो उभारलेला आहे असें ते सांगत. आणि तें खरें च होतें. तो विषय च तसा आहे. एका उदाहरणाचें उत्तर वीस आहे. कोणी १७ कोणी १८ तर कोणी १९॥ उत्तर दिलें तर तें तेथें चालावयाचें नाहीं. उत्तर बिनचूक च पाहिजे. १९॥ उत्तरवाला म्हणेल कीं, मी खऱ्या उत्तराच्या अगदीं जवळ आहे; तर तें त्याचें म्हणणें टिकणार नाहीं. १७, १८, १९, १९॥ ही सर्व उत्तरें सारखीं च चूक आहेत. त्यांत तारतम्याला मुळींच अवसर नाहीं. गणित असें बिनचूक शास्त्र आहे. एक तर पूर्ण ज्ञान किंवा पूर्ण अज्ञान ह्या दोन च अवस्था तेथें संभवतात. अर्धवटपणा तेथें खपावयाचा नाहीं. कांही तरी सालापाला लावून तेथें चालावयाचे नाहीं. शेंकडा ३३ मार्कांनीं पास, ५० मार्कांनीं पास ही अर्धवट दृष्टि तेथें खपत नाहीं. १०० पैकीं १०० मार्क मिळतील तर च विद्यार्थी बरोबर समजावयाचा. शेंकडा ३३ तांदूळ शिजले व बाकीचे कच्चे राहिलें तर तो भात चालेल काय? शेंकडा ३३ वस्त्र धड आणि बाकीचें फाटलेले, ते नेसतां येईल काय? शेंकडा ३३ निरोगी, बाकी रोगी असा मनुष्य काय कामाचा?

मासा जसा पाण्यांत लीलेनें हालचाल करतो. जरासुद्धां श्रम नाही. तशी ह्या बालकाच्या चिंतनशील मनाची गणिताविषयीं स्थिती होऊन गेली. He came He saw and He conquerred ही सीझरविषयीं ची उक्ति येथें अक्षरशः खरी ठरली. मोठमोठे कूटप्रश्न तेथें लीलेनें सोडवले जाऊं लागलें गणितांत चित्त अगदीं तल्लीन होऊन जाऊं लागले. त्या अभ्यासाचा आराम झाला. त्यांतल्या श्रमाचा शम वाटूं लागला. वडिलांनी दिवसभराची गणितें देऊन ठेवावीं, तीं तास दीड तासांत सगळीं सोडवून टाकावीं आणि उरलेला वेळ स्टेट लायब्ररींत जाऊन वाचनांत घालवावा, असें होऊं लागले. गणित म्हणजे हातचा मळ झाला. ही गणिताची आवड पुढें हि कायम राहिली. गृहत्याग करून काशीला जाईपर्यंत गणिताचीं पुस्तकें जवळ होतीं. तेथें मग तीं गंगा नदींत टाकून दिलीं.

वडिलांचा इंग्रजी विषय हि उत्कृष्ट होता. इंग्रजी म्हणजे आधुनिक युगाचें आणि आधुनिक जगाचें प्रवेशद्वार च, अशी त्यांची मसजूत असे. इंग्रजी चा प्रत्येक अर्थ कोशांत पहावयाचा, प्रत्येक उच्चार पाहून

अनुक्रमणिका

ठेवावयाचा. वाचन अस्खलित झालें पाहिजे. कोठें अडखळतां कामा नये. अर्थ समजण्यांत कच्चेपणा उपयोगी नाहीं. अनुमानधक्क्यावर विसंबून रहावयाचें नाहीं. अशी त्यांची शिस्त असे. त्याप्रमाणें इंग्रजी हि उत्तम येऊं लागलें.

अक्षराच्या कॉप्या गिरवण्याचा मात्र कंटाळा वाटे! त्यांत चिंतन, मनन, बुद्धि इ. चा भाग फार कमी असें वाटत असावें काय? परंतु असें म्हणावें तर पुढें अक्षरहि चांगलें झालें; आणि अक्षरांचे महत्त्व हि फार पटलें.

**ब्राह्मणे बाळबोध अक्षर । घडसूनि करावे सुंदर**
**जें देखतां चि चतुर । समाधान पावती ॥**
**वाटोळें सरळें मोकळें । वोतलें मसीचें काळे ।**
**कुळकुळीत वोळी चालल्या ढाळे । मुक्तामाळा जैशा ।**

इत्यादि समर्थांची वचनें वाचून मग अक्षर चांगलें करण्याचें सुचलें असों की सहज अक्षर चांगलें झालें असों, त्या वेळीं त्या इंग्रजी अक्षराच्या कॉप्या गिरविण्यांत कंटाळा वाटे ही गोष्ट खरी.

चित्रकलेसाठीं मराठे मास्तरांच्या खाजगी चित्रशाळेच्या वर्गांत जावें लागे. तेथें वर्ष सहा महिन्यांत फर्स्ट ग्रेड हि पुरी केली. हे मराठे मास्तर चित्रकलेच्या कांहीं शाखांत अतिशय प्रवीण असत. डोळें मिटून नुसत्या पेन्सिलीनें नाना तऱ्हेची डिझाइन्स ते सफाईदार तऱ्हेने काढून देत. गणपतीच्या दिवसांत ते गणपति हि करीत. विद्यार्थ्यांकडून हि गणपति करवून घेत. नागावर बसलेले, ऊंदरावर बसलेले, उजव्या सोंडेचे, लहान, मोठे, मुकुटांचे, पगड्यांचे, टोप्यांचे अनेक प्रकारचे गणपति तयार होत. त्यांचे स्वतःचें नांव हि गणपतराव होते. ‘पहा गणपती च गणपति तयार करतो’ असे ते विनोदानें म्हणत. मार्मिक बोलण्यांत आणि शिस्तीने काम करून घेण्यांत ते पटाईत होते. तसेच स्वतःच्या चित्रकलेबद्दल ते पार अभिमान दाखवीत. कोणता ही चित्रकार त्यांच्या पुढें कःपदार्थ ठरे. एकदां कोणी घोडा, वाघ, सिंह अशी चित्रें काढून त्या त्या प्राण्यांची नांवें हि त्या खाली लिहिली व तीं चित्रें त्यांना दाखविण्यासाठीं नेलीं. चित्रें पाहतां च ते एकदम म्हणाले “अरे, असें पहा, ज्या अर्थी तुला प्रत्येक चित्राखालीं घोडा, गाय, सिंह असे अक्षरांनी लिहून दाखवावें लागतें त्याअर्थी ही चित्रें त्या प्राण्यांची नाहींत असें च सिद्ध होत नाहीं का?” असे मार्मिक संवाद तेथे अनेक प्रकारचे चालत. परंतु डोळें बिघडल्यामुळें ह्या ‘चित्रकला शिक्षण मंदिरांतील’ शिक्षण पुढें बंद केलें.

रोज स्टेट लायब्ररींतून पुस्तकें आणून एकसारखे वाचन केल्यामुळें डोळे बिघडले. वाचतां वाचतां सूर्यप्रकाश कमी झाला, सूर्यास्त होऊन संधिप्रकाश आला तरी तसें च वाचत रहावें. यामुळें डोळे बिघडतील ह्याची शंका हि येऊं नये. चंद्रप्रकाशांत हि कित्येक वेळां वाचावे. अशा कारणांनी डोळ्यांची शक्ति कमी झाली. नाटकें, कादंबऱ्या, भिकार तमाशेवजा साळूताईच्या गोष्टी वाचून हि पुष्कळांचे डोळे बिघडतात. पण तेथें असल्या गोष्टींचा स्पर्श च नव्हता. भारत, भागवत, रामायण, निबंधमाला, पांगारकरांचे लेख, मुमुक्षु ग्रंथमाला, सरस्वतीमंदीर—असें च सर्व वाचन चाले.

वडील रोज सकाळीं शिकवीत, रात्री अभ्यास तपाशीत, सुट्टीच्या दिवशीं दुपारीं हि अभ्यास घेत. तरी वडिलांशीं तसा मोकळेपणा कधीं च वाटला नाही. त्यांचा स्वभाव गंभीर व मितभाषी असे. शिक्षणांत हि

अनुक्रमणिका

कडकपणा असे आणि त्यावेळीं तापटपणा हि बराच असे. त्यामुळें मोकळेपणा वाटावयाचा नाहीं. उलट भीति वाटे. पुष्कळ वेळां गैरसमज होऊन वडील अतिशय मारीत. एकदां धाकट्या भावाशीं जरा जोराने बोलणें चाललें होते. वडील ऑफीसमधून थकून च आले होते. आल्याबरोबर त्यांना हा विवाद ऐकूं आला. लगे च 'काय गडबड आहे रे' असें म्हणून कोपऱ्यांत मुसळ पडले होतें. तें च त्यांनी कंबरेत हाणलें. थोडें लागलें. थोडक्यांत बचावलें. आईने एकदम चपळाई करून मुलाला पलीकडच्या खोलींत घालवून दिलें. शिवाय या बालकाचा स्वभाव हि पुष्कळ विक्षिप्त आणि एककल्ली असे. त्यामुळें हि या मारांत भर पडे. एकदां वडिलांनी विचारलें 'काय रे उजेड नीट पडत नाहीं कंदिलांत तेल आहे कीं नाही?' त्याला उत्तर मिळालें 'तेल आहे', इतक्यांत दोन मिनीटांनी तेल नसल्यामुळें कंदिल विझून गेला. 'कंदिल विझला. तेल आहे असें कसें म्हणालास?' असें मग वडिलांनी स्वाभाविक च विचारलें. त्यावर उत्तर आलें. "ज्या वेळीं 'आहे' म्हणून सांगितले त्यावेळीं तेल होते च. त्यावेळीं दिवा विझला नाही. आतां विझला. व आतां तेल नाही" —हें उत्तर फाजील तार्किक च म्हणावें लागेल. वडिलांनी त्यावर जबाब दिला "गाडीला ५ मिनीटें आहेत. आणि एकादा मनुष्य दोन मैलांवरून पायीं जावयास निघाला. तो तुला भेटला आणि त्यानें तुला विचारलें कीं, गाडीला वेळ आहे? तर काय जबाब देशील? 'आहे' असें म्हणशील काय? पांच मिनीटे अजून वेळ आहे हें खरें. पण तो ज्या उद्देशाने विचारतो तो उद्देश पाहतां 'नाही' असें च म्हणावे लागेल?" —असे चमत्कारिक प्रसंग अनेक घडत आणि क्षुल्लक कारणावरून हि पुष्कळ मार खावा लागे. अभ्यासाची कधीं च तक्रार नसे. पण अशी निमित्तें अनेक घडत. एकदां कंदिलाची कांच विलायती आहे अशा समजुतीने बेभान होऊन वडिलांदेखत शेजारच्या काठीनें तिचे तुकडे तकुडें करून टाकले. अर्थात् ही गोष्ट वडिलांना सहन होणें शक्य नव्हते. अशा प्रसंगांतून आई मात्र निभावून नेण्याचा प्रयत्न करीत असे.

ह्या अल्पकालावधींत पुष्कळसें गणित, इंग्रजी व फर्स्ट ग्रेड इतकी चित्रकला झाली. तसे च मराठीचें वाचन हि पुष्कळ वाढले. वडिलांशीं प्रत्यक्ष संबंध असा ह्या च वेळीं आला. यापुढें केव्हां ही असा संबंध येऊं शकला नाहीं. पुढें हायस्कूलमध्यें जाऊं लागल्यापासून तर ६/६ महिन्यांत एक शब्द हि बोलणें व्हावयाचे नाहीं. हायस्कूलमध्यें प्रत्येक वर्षी वर नंबर येऊन बक्षिसें व स्कॉलरशिप मिळत असे. त्यामुळें त्या बाबतींत हि विचारपूस करण्याचा प्रश्न नसे. वडील जरी गंभीर असत, कडकपणाने वागवीत तरी त्यांच्याविषयीं अनादर यत्किंचित् हि वाटत नसे. उलट त्यांच्या ठिकाणच्या अनेक थोर सद्‌गुणांची, त्यांच्या ज्ञानमयतेची जाणीव उत्तरोत्तर अधिकाधिक वाढत च होती. वरच्या गंभीरपणामुळें आंतली गुणमयता तत्त्वदर्शी पुरुषाच्या नजरेआड झाली तर तो तत्त्वदर्शी तरी कशाचा! त्या काळचा तो वडिलांच्या जवळचा अभ्यास, त्याची पद्धति जन्मभर उपयोगी पडली. इतरांना शिकवितांना तिचा अनेक वेळां उपयोग केला जातो. ते च गणित आतां व्यवहाराच्या प्रत्येक क्रियेंत पाहिलें जातें. जेलमधल्या लहानशा खोलींत फिरत असतां पावलांच्या अंदाजाने फूट काढावयाचे. एका फेरीतलें ते फूट मोजून शेंवटी एकंदर फेऱ्या मोजावयाच्या व बरोबर ६ मैल फिरावयाचें. जेवण हि मोजून घ्यावयाचें, प्रत्येक क्रिया तोलून करावयाची. सूत कांततांना किती वेळ तुटलें. दर मिनीटाला किती तार निघतातं. असें सर्वत्र गणित वापरावयाचे. You cannot cheat Algebra. गणिताला कोणी च फसवूं शकत नाहीं. तो एक योग च आहे. गणितानें हें सर्व जीवन असें बद्ध झालें आहे. मनुष्याला गणित नाहीं आलें तरी चालेल पण गणितदृष्टि आली च पाहिजे. ज्याचा हिशेब बरोबर नाहीं तो स्वार्थ, परमार्थ, देशसेवा कांहींच करूं शकणार नाहीं. नेपोलियन बोनापार्ट गणिती पद्धतीने हालचाली करून शत्रूचा मोड करीत असे. न्यूटननें गणितशास्त्रामुळें केवढे शोध लावले! पण त्या मोठमोठ्या गोष्टी सोडल्या तरी निजणें, बोलणें, खाणें प्रत्येक क्रिया मोजून करावी, जीवनांत परिमितता आणांवी, हें तर सर्वांना शक्य आहे. निदान पुढील समर्थांनीं दाखविलेली दृष्टि आली तरी केवढें कार्य होईल!

अनुक्रमणिका

'माझे अन्याय अगणित । कोण करील गणित' ॥

●●●

## अनुक्रमणिका

# प्रकरण १२ वे

## हायस्कूल

**घरचें** शिक्षण बंद करून ह्यापुढें वडिलांनीं हायस्कूलमध्यें ह्या विद्यार्थ्याला पाठविण्याचें ठरवलें; आणि त्याप्रमाणें एकदम इंग्रजी चौथ्या इयत्तेंत बसविलें. मुलाला रे रे करीत पहिलीपासून शाळेंत घालण्यापेक्षां वडिलांची ही पद्धति फार उत्तम होती. एक तर, पहिल्यापासून आपल्या देखरेखीखाली नीट शिकविलें म्हणजे, पुढें कोणती हि अडचण पडत नाही. शिवाय विनाकारण वेळ हि जात नाहीं. पहिला पाया मजबूत करून घेतला नाहीं तर, पुढें सर्व कच्चेपणा राहतो. प्रथम रोप लावल्यानंतर त्याला कुंपण घालावें लागतें, त्याला रोज पाणी द्यावें लागतें, त्याची सर्व प्रकारें काळजी घ्यावी लागते. पुढें तें रोप वाढून मोठें झाल्यानंतर त्याला कोणत्या हि प्रकारची भीति रहात नाही. ह्या दृष्टीनें ही शिक्षण योजना चांगली च यशस्वी ठरली. हायस्कूलमधलें सर्व विषय अगदीं आटोक्यांतले च होते. परंतु, चौथीपासून दुसरी भाषा कोणती तरी घ्यावी लागते. ती दुसरी भाषा वडिलांनी कोणती च शिकवली नव्हती. फ्रेंच, पर्शियन आणि संस्कृत अशा तीन भाषा तेथें चालत. फ्रेंच ही सर्व यूरोपची 'हिंदी' भाषा आहे. म्हणून, ती च शिकावी. यूरोपमध्यें जावयाचें झालें तर तिचा फार उपयोग होईल; अशा तऱ्हेचे वडिलांचे विचार होते; व त्याप्रमाणें फ्रेंच भाषा घेतली. परंतु, वर्गांतील इतर विद्यार्थ्यांचे धडे पुष्कळ पुढें निघून गेलेले; आणि इकडे तर नुसती फ्रेंच भाषेची तोंडओळख देखील नाहीं. हा मोठा पेंच पडला. परीक्षा हि जवळ आलेली; तेव्हां हें व्हावें कसें? अखेर फ्रेंच शिक्षकाकडे जाऊन फ्रेंच भाषेची थोडीशी प्राथमिक ओळख करून घेतली. हे शिक्षक देसाई नांवाचे गुजराथी गृहस्थ होते. मोठे ममताळू असत. ह्या शिक्षकांकडून फ्रेंचची माहिती थोडीशी घेतल्यानंतर एकदम एकसारखे ५० तास बसून फ्रेंचचा मुळीं च न झालेला अभ्यास इतर मुलांच्याबरोबर आणला. इतकें च काय पण परीक्षेंत हि फ्रेंचमध्यें दुसरा नंबर आला व एकंदर शाळेंत पहिला नंबर मिळाला. त्यामुळें हायस्कूलमध्यें जिकडे तिकडे ह्या विद्यार्थ्याची एकदम प्रसिद्धि झाली. एकाएकी एकदम आलेला एक अनोळखी विद्यार्थी; दिसावयाला अगदीं च किरकोळ आणि रोडका, दृष्टि सुद्धां बरीचशीं मंद, डोळे किलकिले करून पाहणारा, फ्रेंचचा अभ्यास तर मुळीं च नाही, अशा स्थितींत त्याचा सर्व शाळेंत पहिला नंबर येणें ही एक आश्चर्यकारक घटना समजली गेल्यास आश्चर्य काय? ह्या घटनेपासून विद्यार्थीवर्ग आणि शिक्षक ह्या सर्वांचें लक्ष ह्या विद्यार्थ्याकडे वेधून गेलें. गणितांत तर तो सगळ्यांना अद्वितीय वाटे. परंतु, त्या शिवाय कपडे अगदीं साधे, छानछोकीचे नांव नाहीं, बुद्धिमत्तेबद्दल अहंकार नाहीं, ह्या सर्व गोष्टी अधिक च विस्मयकारक वाटत.

परीक्षेत पहिल्या नंबरला स्कॉलरशिपबरोबर ज्याच्या त्याच्या आवडीची पुस्तकें हि घेऊन देत. इतर मुलें डिक्शनऱ्या घेत किंवा पुढील अभ्यासाचीं पुस्तकें घेऊन ठेवीत. परंतु, ह्या विद्यार्थ्याने बक्षिसांत "दासबोध" मागितला; बक्षिसांत काव्येतिहाससंग्रहाची पुस्तकें घेतली. नाहीं म्हणायला इंग्रजी सँडफर्ड आणि मर्टन हें च एक इंग्रजीचे पुस्तक घेतलें. हा सर्व प्रकार पाहून सर्वांना चमत्कार वाटला. तेथले शाळेचें आपटे हेडमास्तर तर स्पष्ट च म्हणाले, "दासबोध काय घेतोस? तुला गोसावी व्हावयाचें आहे काय? आहे काय त्यांत?" त्यावर ह्या विद्यार्थ्यानें सर्वांदेखत अगदीं खरमरीत उत्तर दिलें. "आपण तो ग्रंथ वाचला नसतां त्याविषयीं मत सांगणें अगदीं अयोग्य आहे." अशा तऱ्हेचा जबाब, सर्वांदेखत, आणि हेडमास्तरना! त्या मास्तराला ह्याचा बराच राग आला. पण करतो काय? झक्कत तो 'दासबोध' त्याला घेऊन द्यावा लागला. त्या प्रसंगापासून ह्या विद्यार्थ्याच्याकडं ह्या मास्तरची फार करडी नजर असे. मॅट्रिकच्या परिक्षेच्यावेळीं फॉर्म देण्यासाठीं जी आधीची परीक्षा घेतात, तींत ह्या मास्तरानें स्वतः गणिताचा पेपर काढला

होता. ह्या विद्यार्थ्यानें त्याच्या पेपरला न बसतां तो पेपर च सोडून दिला. आणि त्याच्या हातून आपली परीक्षा घेण्याचें साफ टाळलें. त्याचा तर त्याला फारच राग आला. त्याने ह्याला फॉर्म देतां येत नाहीं असें ठरविलें. ती गोष्ट तेव्हां च सर्व शाळाभर झाली. सर्वांना आश्चर्य वाटलें. सर्व मास्तरांनीं त्या हेडमास्तराला सांगितले कीं, "ह्या विद्यार्थ्याला फॉर्म दिला च पाहिजे. तो आतांपर्यंत स्कॉलरशिप मिळवीत आला आहे; गणितांत तर तो अद्वितीय आहे. त्यानें पेपर दिला नाहीं म्हणून त्याला फॉर्म न देण्यांत शाळेचें हि नुकसान आहे." शेवटीं फॉर्म देणें भाग पडलें.

प्रत्येक वर्षी बक्षिसें आणि स्कॉलरशिप मिळे त्यामुळें वडिलांना शिक्षणाचा खर्च असा पडला च नाहीं, असें म्हणण्यास हरकत नाहीं. परंतु, असें असलें तरी बक्षिसासाठीं, पारितोषिक मिळवण्यासाठीं मुद्दाम प्रयत्न असा कधीं च केला नाहीं. किंबहुना हा विद्यार्थी शाळेचा अभ्यास फार च थोडा वेळ करी. एकदां ह्या विद्यार्थ्यानें च सांगितले कीं, 'इतर थोर सद्ग्रंथांचा अभ्यास करून कंटाळा आला म्हणजे; थोडा पालट म्हणून मी हा शाळेचा अभ्यास करतों'—ह्या विद्यार्थ्याचा मुख्य अभ्यास निराळाच होता.

**'निम्नाकडे चि धांवे नाटोपे जेवि अद्रिचा ओढा'** ।

नदी कोठून हि निघो आणि कोणच्या हि दिशेला जावो, निम्नगति ही च खरी तिची गति असावयाची. सूर्यफूल सूर्याकडे च वळावयाचे.

**"व्यतिषजति पदार्थानान्तरः कोऽपि हेतुः ।**
**न खलु बहिरूपाधीन्प्रीतयः संश्रयंते"** ॥

एकाद्या गोष्टीविषयीं आवड आणि एकाद्या गोष्टीविषयीं स्वाभाविक च औदासिन्य, हें सर्व आंतरवृत्तीवर अवलंबून आहे. शाळेंत घातलें म्हणून आध्यात्मिक पुरुषाचा आत्मिक अभ्यास थोडा च थांबणार आहे! तो थांबणें तर शक्य नाहीं च पण ह्या उदाहरणावरून उलट असें स्पष्ट दिसतें कीं तो च अभ्यास कोठें हि जा, प्रधानत्वानें वाढत जावयाचा.

ह्या हायस्कूलमध्यें गुजराथी साइड आणि मराठी साइड असे दोन विभाग असत. गुजराथी मराठी मुलांचा त्यामुळें स्वाभाविक च संबंध येत नसे. ही फार च वाईट गोष्ट म्हटली पाहिजे.

**'पानीमें मीन पियासी । मोहे देखत आवे हांसी'** ॥

कबीराच्या ह्या म्हणण्याप्रमाणें गुजराथमध्यें राहून गुजराथी मित्र नाहींत, गुजराथी भाषा येत नाहीं. अशी स्थिति इतर मुलांप्रमाणें ह्या हि विद्यार्थ्याची होती. एकदां हे सर्व विद्यार्थी दूर फिरावयास गेले असतां, रस्त्यांत एक बाग लागला. तेथून ही सर्व मंडळी पुढें गेली. बागेंत झाडांवर फळें होतीं. त्यांतलीं कांहीं फळें कमी झालीं असें वाटून त्या माळ्यानें ह्या विद्यार्थ्यांकडे मोर्चा वळवला. आणि तो विद्यार्थ्यांवर आळ घेऊं लागला हा विद्यार्थी हि त्यांत होता च; त्या गुजराथी माळ्याला समजून सांगण्याचा ह्यानें पुष्कळ प्रयत्न केला. पण त्या माळ्याला मराठी येत नसल्यानें आणि ह्याला गुजराथी येत नसल्यानें तो प्रयत्न जवळ जवळ व्यर्थ च ठरला—अशी स्थिती होती तरी शाळेंत दोन्ही बाजूंकडे गुजराथी मराठी दोन्ही शिक्षक असत हें एक बरें होतें.

त्यांत भगुभाई पंड्या म्हणून एक गुजराथी शिक्षक असे. मराठी विद्यार्थी त्या बिचाऱ्याला भगुभाई च्या ऐवजी 'भागुबाई पंड्या' च म्हणत. पण असल्या टवाळींत हा विद्यार्थी कधीं च भाग घेत नसे. प्रथमपासून च टवाळी करणें त्याला माहीत नव्हतें. कित्येक विद्यार्थी निरनिराळीं पुस्तकें पाहून गणितादींचें मुद्दाम कठिण कठिण प्रश्न काढून ते वर्गांत शिक्षकांस विचारीत. व त्यांना सांगतां आलें नाहीं किंवा सांगण्याला वेळ लागला, थोडी तारांबळ उडाली कीं टवाळी करावयाचे. मग सर्व विद्यार्थ्यांनी टाळ्या पिटाव्या, बाकें वाजवावीं, कोणी मास्तरला ऐकूं जाईल अशा तऱ्हेनें 'मूर्ख आहे' 'कांही येत नाहीं' असें म्हणावें—पण हें प्रकार ह्या विद्यार्थ्यानें कधीं हि केले नाहींत. एकदां सहस्रबुद्धे नामक शिक्षकानें अभ्यासाची वही मागितली. ती जरा दुरून च ह्यानें त्यांच्याकडें टाकली. त्याबरोबर त्यांनी गंभीरपणें विद्यार्थ्यांनीं नम्रतेनें कसें वागले पाहिजे, दुरून वही टाकणें ही सामान्य गोष्ट कशी नाहीं वगैरे पुष्कळ सांगितलें. प्रत्येक वर्षी बक्षिसें आणि स्कॉलरशिप मिळविणारा दुसरा विद्यार्थी असता तर त्याला ह्या बोलण्यानें अपमान वाटता. पण त्या विद्यार्थ्याने त्याचे तें म्हणणें ऐकून घेतलें. त्यांतला योग्य बोध ग्रहण केला.

परंतु, असें असलें तरी शाळेच्या निरुपयोगी प्रकारांत यानें कधी च भाग घेतला नाहीं. शिक्षकांची 'जी हां' करणें, शिक्षकांच्या घरीं जाणें, पुढें पुढें करणें, सोशल गेंदरिंगमध्यें भाग घेणें, ह्या सर्व गोष्टींचा अगदीं च तिटकारा असे. योग्य प्रसंगीं शिक्षकांना विरोध करण्याला हि कमी केलें नाही. सोशल गॅदरिंगच्या वेळीं नाटकें, प्रहसनें, गाणें, बजावणें, निरनिराळें खेळ, खाना इत्यादि प्रकार व्हावयाचे. या असल्या गोष्टींसाठीं वर्गणी देणें हि युक्त नव्हे असे विचार असत. कित्येक विद्यार्थी तर ह्या पोषाखीपणाला, नटण्यामुरडण्याला, सोशल गॅदरिंगच्या ऐवजी उघड उघड 'सोशल गधडिंग' म्हणून निंदा करीत.

ह्या शाळेंतल्या कांही शिक्षकांखेरीज बहुतेकांना ह्या विद्यार्थ्याबद्दल आदर वाटत असे. कित्येक तर भर वर्गांत "तुम्ही च आतां आम्हांला शिकवा" असें हि कधीं कधीं म्हणत. मग विद्यार्थ्यांना त्याच्याविषयी आदर वाटेल ह्यांत नवल काय? ह्याच्याभोंवती नेहमी विद्यार्थ्यांचा घोळका असावयाचा. शाळेच्या सुट्टीत फिरतां फिरतां किंवा हिरव्या गार गवतावर ही मंडळी एकीकडें बसत तेथें अनेक विषयांवर चर्चा चालावयाची. खुशालचेंडू विद्यार्थीमात्र ह्यांच्यांत येत नसत. त्यांतले कोणी खाद्य पदार्थांत गुंतत, तर कोणी पत्ते खेळण्यांत आनंद मानीत. कोणी एकलकोंडें राहून अभ्यासाची धोकंपट्टी च करीत. परंतु ह्या विद्यार्थ्यांच्या मेळ्यांत तसें कांही नसावयाचें. यांचे विषय उच्च, यांची चर्चा बोधप्रद, तेथे विनोद असला तरी टवाळी क्वचीत च असे. सर्वजण थोडें भिऊन च ह्याच्याशीं वागत. असा भितीयुक्त आदर विद्यार्थ्यांच्या मनांत असे. सहाध्यायी खरे. बरोबरीचे च ते. धिंगामस्ती ही ते करीत. पण त्यांना आपल्यामध्यें आणि ह्या विद्यार्थ्यांमध्यें पुष्कळ अंतर दिसून येई. त्याच्या भाषणांत त्यांना अलौकीक विचार मिळत. तो चंद्र आणि ते चकोर, तो मेघ आणि ते मोर असा च देखावा दिसावयाचा. शाळा सुटल्यानंतरही ते घरीं येत. नेहमी घरीं विद्यार्थ्यांची गर्दी असावयाची. कोणी गणितें सोडविण्याला, कोणी भाषाविषयक प्रश्न विचारण्याला, कोणी कांही, कोणी कांही निमित्त करून तेथे हजर राही. संध्याकाळी फिरावयासमुद्धां विद्यार्थी असावयाचे च. एक रात्र सोडून बाकीचा बहुतेक वेळ ते यावयाचे च. लोहचुंबकाचें आकर्षण लागूं पडलें कीं, 'अनिच्छिन्नपि' लोखंड खेंचलें जातें. येथे तर लोखंडाचा जडपणा हि विद्यार्थ्यांत नाहीं. मग तें खेचलें जातें यांत नवल कसलें?

खरें म्हटलें तर, ह्या शाळेंत ह्या स्नेही जगाचा परिचय हा च ह्या विद्यार्थ्याला मुख्य लाभ झाला. तेथें कांही च शिक्षण मिळालें नाहीं असें नाहीं. पारशी वाडिया मास्तर सारखे अतिशय उत्कृष्ट शिक्षक तेथें होते. त्यामुळें टेनिसन वर्डस्वथची काव्यें आवडूं लागलीं. थोरो आणि कार्लाईल, रस्किन आणि इमर्सन अशा

प्रतिभावान ग्रंथकारांची ओळख झाली. गोल्डन-ट्रेझरीसारखी पुस्तकें आवडूं लागलीं. परंतु तेथला मुख्य लाभ सांगावयाचा तर स्नेहलाभ हा च मुख्यतः सांगावा लागेल. ह्या स्नेहीमंडळांतले कित्येक स्नेही पुढें ह्या विद्यार्थ्याबरोबर सहकारी झाले, त्यांनी सर्वांनी एकाच दिशेनें आयुष्याचा मार्ग आंखला. शिवाजी, नेपोलियन इत्यादी पराक्रमी पुरुषांना बालपणचें स्नेही शेवटपर्यंत उपयोगी पडलें. येथें हि तसे च झालें. नदी समुद्राकडें चालली म्हणजे एकटी जात नाही. अनेक लहान नद्या, नाले, ओहोळ, झरे, प्रवाह ह्यांना आपल्याबरोबर घेऊन जाते. किंवा राजवैभवांत रूळलेला पुरुष एकटा च जेवीत नाहीं. त्याच्या बरोबर अनेक मंडळी असावयाची च. ह्या विद्यार्थ्यांच्या जीवनांत हेंच आढळून आलें. हा लोकसंग्रहाचा थोर अधिकार ह्या हायस्कूलांत च प्रकट झाला.

**लोकसंग्रहमेवापि संपश्यन्कर्तुमर्हसि ।**

हें सांगण्याची येथें जरूर च नव्हती. स्वभावतः च प्रत्येक कृती लोकसंग्राहक ठरे. आणि कांही न केलें तरी लोकसंग्रहांत खंड पडावयाचा नाहीं. ह्याचें उदाहरण तेव्हांही कधीं कधी दिसे. कित्येक वेळां हे विद्यार्थी जमले तरी यानें अगदी स्तब्ध असावे तोंडातून शब्दही काढूं नये. तरी दुसऱ्या दिवशीं कोणी आलें नाहीं असें घडावयाचें नाहीं. ह्याचें कारण दक्षिणामूर्ती स्त्रोत्रांत उघड करून सांगितलें आहे.

**“चित्रं वटतरोर्मुले वृद्धाः शिष्या गुरुर्युवा ।<br>गुरोस्तु मौनं व्याख्यानं शिष्यास्तु छिन्नसंशयः” ॥**

—अशी लोकसंग्रहाची सुरुवात या हायस्कूलपासून च झाली. ह्या विद्यार्थ्याच्या ठिकाणीं अनेक बहुमोल गुण आहेत हें येथें इतर विद्यार्थ्यांना दिसून आलें, त्यामुळें ह्याच्या भोंवती एक छोटीशी प्रभावळ, एक वर्तुळ, असा एक छोटासा संघच अनपेक्षित तऱ्हेनें येथें जमला. त्यांत ह्या विद्यार्थ्यांचे विचार प्रमाण ठरूं लागले. ह्याची वागणूक ती च श्रेष्ठ अशी छाप पडली आणि येथें असे स्पष्ट दिसूं लागले की भगवद्‌गीतेतींल भगवंतांचें वचन अगदी अक्षरशः खरें आहे. त्यांत बिलकूल उणेपणा नाही.

**यद्यदाचरति श्रेष्ठस्तत्तदेवेतरो जनः ।<br>स यत्प्रमाणं कुरुते लोकस्तदनुवर्तते ॥**

●●●

अनुक्रमणिका

# प्रकरण १३ वे

## वैराग्य

**तें हें विषयवैराग्य । जें आत्मलाभाचें भाग्य ॥**

**सर्व** भाग्याचें भाग्य कोणतें असेल, वैभवा ची परिसीमा जरा कोठें पहावयास मिळेल, जर सनातन सुखानंदाची ठेव कोठें ठेवलेली असेल तर ती येथें च आहे. वैराग्य हें च भाग्यांचें भाग्य, ही च वैभवा ची स्वर्गनगरी आणि हा च सनातन सौख्यठेवा होय. उत्तम आरोग्य, शक्तिसंपन्नता, अनुपम सौंदर्य, राजराजेश्वराचें ऐश्वर्य, बृहस्पतितुल्य विद्वता ह्या सगळ्या गोष्टी मनुष्याला हव्याशा वाटतात. ह्या सर्व गोष्टी मनुष्याच्या महत्त्वाकांक्षेचा विषय झालेल्या आहेत. सर्वजण नित्य त्यांची च इच्छा करतात. त्यांच्या अल्प अंशाने जो तो आपल्या च अहंकाराच्या तोऱ्यांत डुलत असतो! परंतु एकादा च विरळ पुरुष ह्यांच्या पलीकडें जातो; त्यांना अगदीं तुच्छ समजतो. आणि त्यांत पुन्हां अगदींच बाल्यकालांत, आयुष्याच्या ऐन उमेदींत ज्याला ह्या सर्वांविषयीं वैराग्य प्राप्त होतें असें उदाहरण तर अगदींच विरळा!

**“इमा रामाः सरथाः सत्‍र्या । नहीदृशा लंभतीया मनुष्यैः” ॥**

अरे नचिकेतसा! ह्या अलभ्य अशा अप्सरा पहा. आणि त्या बरोबर च

**“ये ये कामा दुर्लभा मर्त्यलोके । सर्वाकामान् छंदतः प्रार्थयस्व”**

मनुष्य लोकांत न मिळणारें सर्व भाग्यभोग तूं माग. इतकें च काय पण

**“स्वयं च जीव शरदो यावदिच्छसि ।”**

वाटेल तितकें आयुष्य मागून घे. इतके सगळें प्रलोभन दूर सारून ज्ञानेश्वरांनीं म्हटल्याप्रमाणें “कुहिलें पिशितश्वानाचें” —कुत्र्याचें सडलेलें मांस समजून—ह्या सगळ्याचा त्याग करणारी नचिकेतसारखी व्यक्ति खरोखर एकादी च. अशा व्यक्तीची वर्तनपद्धति जगाच्या अगदीं विरूद्ध दिशेनें चाललेली दिसून येते. येथें हि आपल्याला ती च नचिकेतसाची मूर्ति ह्या विद्यार्थ्यांच्या रूपानें उभी आहे असें म्हणतां येईल. मुळीं च अतिशयोक्ति न करतां शंकराचार्य, ज्ञानेश्वर, रामदास ही प्रवर्तकपरंपरा वैराग्यरूपानें येथें समाविष्ट झाली आहे, असें दिसून येईल. रामदासांनी लग्नांतून पलायन केलें आणि येथें तर मुंजीत च संन्यासाची घोषणा केली गेली अशी चढती पायरी हि येथें आढळून येईल.

मुंजीतल्या त्या घोषणेनंतर बडोद्यास शाळेंत शिकत असतां, बाहेरून सहाध्यायीं विद्यार्थ्यांशीं नाना विषयांवर विचारविनिमय चालूं असतां, एक-एक-एक-असें दिवस एकामागून एक लोटत असतां वैराग्याची चित्कला प्रतिपच्चंद्राप्रमाणें एकसारखीं वाढत च गेली. पावसाळ्यांत महानदीचा पूर अनावर असावा किंवा वसंतऋतूंत फुलांचा बहर जसा कांही अकल्पनीय होऊन जावा त्याप्रमाणें तारुण्यांत पदप्रवेश करीत असतां वैराग्याचा भर अनेक तऱ्हेनें उचंबळूं लागला. खाणें, पिणें, बसणें, उठणें, बोलणें, चालणें—भराभर एकेक

गोष्ट बदलूं लागली. आतां मनाची घडण पूर्णपणें वैराग्या च्या मुशींत ओतली गेली. पूर्वी अगदीं लहानपणीं गादी वापरली तेवढीं च, आतां ती सोडून दिली. एक काळी घोंगडी आंथरावयाची व एक धोतर पांघरावयाचे हा क्रम सुरूं झाला. ती च घोंगडी दिवसा बसण्यासाठीं वापरलीं जाई. उशीला सुद्धा कांही नाही. रात्र असो, दिवस असो, थंडी असो, ऊन असो आपल्या समोरचें दार अगदीं सताड उघडे ठेवावयाचें. चोर येईल म्हणून आपण दार बंद करून इतरांप्रमाणें चोरून निजावयाचें नाहीं. एकदां त्या घोंगडीवर अंग टाकलें म्हणजे वरून धोतर अगदीं तोंडावरून सुद्धां गुरफटून घ्यावयाचें व सकाळपर्यंत केवळ प्रेतवत् उताणें निजावयाचें, सकाळीं उठल्याबरोबर ऊन पाण्यानें स्नान करण्याची कोंकणातील पद्धत असे. ब्रह्मचाऱ्याला ऊन पाणीं चांगलें नाहीं असें कोठें वाचनांत आलें. तत्क्षणीं ऊन पाणीं सोडून दिलें. अगदीं पहाटे भर थंडीतसुद्धां थंडपाण्यानें बिनदिक्कत स्नान करावें. तास तास नळाखालीं बसावें. पूर्वी पायांत जोडा असे. आतां तो हि सोडून दिला. प्रखर उन्हानें जमीन नुसती भाजून निघे. त्यांत पुन्हां बडोद्यांत प्लेग असला म्हणजे गांवाबाहेर ३-४ मैलांवर काशिविश्वेश्वराच्या मंदिराजवळ राहणें असलें म्हणजे तेथून रोज अकरा वाजतां मध्यें लागणाऱ्या जैतनपूरच्या फुफाट्यांतून जावे लागे. पाय नुसते होरपळून निघत. त्यामुळें डोळ्यांचें किती नुकसान होत आहे, इकडे हि लक्ष नाहीं.

**'मिथिलायां प्रदीप्तायां न मे दह्यति किंचन' ॥**

असा हा अभ्यास होता. पाय भाजतात तर भाजोत! हे पाय म्हणजे मी नव्हे. आत्मा अगदीं निराळा आहे. तो तर "नैनं दहति पावक" ह्या कोटींतला, तेथें माझ्या पायाची पर्वा मी कां करावी? उलट रविवारीं सुट्टीच्या दिवशीं फिरावयाला निघावयाचें तें मुद्दाम भरा बारा वाजतांच—मग १०/१२ मैल फिरून घरीं संध्याकाळच्या सुमारास यावयाचें. पाय पोळूं देत, वरून डोकें तापूं दे, अंगाचा घाम होऊं दे—कसें हि होवो परंतु 'सुखा आंग देऊं नये' ह्या समर्थोक्तिप्रमाणें झालें पाहिजे. कणखरपणा बाणला पाहिजे. ह्या सुखाला लाचावलेल्या शरीराला नमवलें पाहिजे, परिव्राजकत्वाची, पर्यटनाची संवय झाली पाहिजे. —असा हव्यास असे. ह्या हव्यासामुळें डोळें अगदीच बिघडलें. आंधळ्यासारखी स्थिति झाली. रात्रीं आकाशांतले तारे दिसावयाचे नाहींत, दिवसा शाळेंत फळ्यावरचीं अक्षरें दिसावयाची नाहींत परंतु चष्मा घालावयाचा नाहीं, हा निर्धार. बहिर्दृष्टि गेली तर जावो अंतर्दृष्टि कोणी हिरावून घेऊं शकेल काय? हे बाहेरचें डोळे गेले तर आंतले उघडतील, 'चक्षुर्वे सत्यं' चा अनुभव गेला तरी 'यदृष्टं तन्नष्टं' चा अनुभव येईल. ध्यानाची सृष्टि फुलेल. मिल्टन आंधळा च नव्हता का? होमरचे काव्य त्यांच्या बर्हिदृष्टीचा पडदा बंद झाल्यावरच बाहेर पडेल ना? कांही हि होवों; चष्मा नको असें वाटत असें. त्याचे कारण त्या चष्म्यापाठीमागची उपाधी! तो परदेशांतला असावयाचा; इतर मुलें डोळें चांगले असून झीरो नंबरचा चष्मा केवळ ऐटीखातर लावीत—इतके दुर्गुण असलेला तो नको च चष्मा. केवळ ह्या चष्म्यांचे च काय? इतर विद्यार्थ्यांची ओढ अनेक वस्तूंकडे एकसारखी लागलेली असे. कोणी भांग पाडी, कोणी हातरुमालानें वारंवार तोंड पुशी, कोणांचे आपल्या निऱ्याकडे लक्ष, कोणास वाटे चापचोप करून सुंदर दिसावें, पण तें सर्व मायेचे पटल येथें कोठलें? वर्षांतून वडील एकदां कापडाच्या दुकानांत नेत. मग त्यांनी दुकानदाराकडून निरनिराळीं कापडें पहावीं व त्यांतलें एकादे पुढें करून म्हणावें 'हां हें बरें आहे नाहीं?' त्यांनी असें म्हटल्यावर त्यांनी केवळ विमनस्कपणें मान डोलवावी. बरें वाईट कापड निवडण्याची मनस्थिति च मावळली होती. धोतर, सदरा, टोपी—वडील जें घेऊन देत तें घ्यावयाचें. बैलांना जसें जिकडें न्यावें तिकडे ते बिचारे जातात. तसे कोणत्या हि दुकानांत न्या आणि कसलें हि कापड द्या. येथें त्याची आवडनिवड कांहीं च नसावयाची. त्या क्षणभंगुर शरीरावर पांढरें कापड आलें काय आणि काळें आले काय? कोटाला पांच गुंड्या लावल्या काय आणि सात गुंड्या लावल्या

काय, धोतर ह्या काठांचे घेतलें काय आणि त्या काठाचें घेतलें काय, अथवा काठ च नसला म्हणून तरी काय बिघडतें? सावलीचा का कोणी कधीं विचार करतो? अशी मनोवृत्ति असे.

**काष्ठाआड अग्न । आणि वस्त्राआड नग्न ॥**

तेथें काय पहावयाचें? तेल चोपडण्याचा तर तिरस्कार च असे. दिवाळींत आईनें क्वचित् बळें च तेल लावलें असेल तर सांगतां येत नाहीं. बाकी ते हि बहुतेक नाहीं च. अशा मनस्थितींत नाटक-सिनेमा पाहणें तर शक्य च नव्हतें. फक्त 'पानपतचा मोबदला' हे एक च नाटक लहानपणीं पाहिलें. तसाच सिनेमा तर सिनेमाच्या थिएटरांत थोडा वेळ पाहून पुढें स्वच्छ झोंप च घेतली. त्या सिनेमाच्या झगझगीत चित्रांनी डोळ्यांना फार च त्रास वाटूं लागला. लहाणपणींसुद्धां ते रबरी चेंडू, त्या लखोट्या, ते पतंग, ती मातीची खेळणीं, ते वाजविण्यांचे बाजे, कशाची हि इच्छा धरलीं नाही, मग दिवाळींत दारू उडवणें, होळींत बोंबा मारणें, रंगपंचमींत रंग उडवणें ह्यांचा तर प्रश्न च संभवत नाहीं.

खाण्यापिण्यांत हि वैराग्य वृत्तीचा च पगडा दिसून येई. "जितं सर्व जिते रसं" —हा जिंकण्याला अतिशय कठीण विषय सुद्धा येथें सहज जिंकला गेला होता. सकाळीं नियमानें दूध प्यावें, शरीरांत शक्ति आली पाहिजे म्हणून आई नेहमी काळजी घ्यावयाची; पण विद्यार्थी आलेले असले, गणिताचे प्रश्न सोडवणें चालूं आहे, भूमितीच्या आकृति काढताहेत, कोणत्या तरी विषयावर चर्चा चालली आहे, अशा वेळीं तें दूध पिणें हि तसेच राहून जावयाचे. दुपारीं हि अगदीं शाळेच्या ऐनवेळेवर सर्व विद्यार्थी भराभर घरोघर निघून जावयाचें. मग कसे तरी दोन घास खाऊन शाळेंत निघून जावें. संध्याकाळीं हि तें च, जेवतांना हि विचाराचें तुफान मस्तकांत उठलेलें असावयाचें. एकदम आपोष्णी घेऊन टाकावयाची. मग सर्व पदार्थ तसे च ताटांत पडून रहात. असें किती तरी वेळां घडावें. बाहेर जातेवेळीं 'अमुक पदार्थ अमुक ठिकाणीं ठेवला आहे तो घेऊन खाण्यासाठीं' आई बजावून जावयाची, परंतु त्याचा कांही च उपयोग होत नसे. आईनें स्वतः दिल्याशिवाय कोणाता हि पदार्थ कधीं च खाल्ला नाहीं. आई बडोद्याहून कोकणांत जात असतां उन्हाळ्यांत आंबे घ्यावे म्हणून कांहीं रुपये देऊन गेली. परंतु आंबे बाजारांत जाऊन घ्यावे ही मनाला प्रेरणा च कोठें होती? ते रुपये तसे च पडून राहिले. कोणता हि पदार्थ आवडीने खाणे हें मुळीं येथे नाहीं च. जेवतांना कित्येक वेळां मीठ पडलेलें नसलें तरी त्याचे भान नसे. पदार्थ आळणी च खाल्ला जाई. मग आई स्वतः जेव्हां जेवी किंवा दुसरे कोणी जेव्हां पदार्थांतला कमीजास्तीपणा दाखवी तेव्हां तो प्रगट व्हावयाचा. साखर परदेशी म्हणून साखर च वर्ज्य केली. दुसऱ्याकडे मुळीं च जेवावयास जावयांचें नाही. लग्न, मुंज, समारंभ, ह्यांत मुळींच भाग घ्यावयाचा नाहीं. सख्या बहिणीचें लग्न घरीं होतें. तरी हि लग्नांत मुळींच भाग घेतला नाहीं. इतकें च काय पण घरचा मुक्काम च हलवला. स्नेह्याकडे सर्व वेळ बसून रहावयाचें. इकडे मिष्टान्नाच्या पंक्ति उठताहेत आणि ह्या विद्यार्थ्याच्या जेवणाचा हि पत्ता नाहीं. तेवढ्या त्या लग्नाच्या गर्दीत हि आईचें लक्ष असावयाचें. मग मध्येच आईनें चौकशी करावी. कोणाकडून तरी ह्यास बोलावून आणावें. मग त्या लग्नघरीं न जेवतां आपल्या उपरण्यांत ह्याने कांही खाण्याचें पदार्थ बांधून घेऊन जावे. व स्नेह्याच्या खोलींत जाऊन खावें. कोणी असे दृष्य ऐकलें हि नसेल. मग पाहण्याची काय कथा! ह्या लग्नापासून हा विद्यार्थी इतका अलिप्त होता कीं बहिणीच्या नवऱ्यांचें नांव सुद्धां माहीत नव्हतें. घरांत प्रत्यक्ष बहिणीचें लग्न परंतु शाळेंत गाजलेला तिचा हुषार वडील भाऊ तेथें मुळीं च हजर नाहीं. ह्याचा सर्वांना मोठा अचंबा तर वाटला च. त्या बिचाऱ्यांना काय माहीत कीं, तिकडें लग्नाचें बाजे वाजवलें जात आहेत आणि इकडे तत्त्वज्ञानावर ह्या विद्यार्थ्याचा आपल्या सहाध्यायाशीं कडाक्याचा वादविवाद चालला आहे! तिकडे मिष्टान्नाची पंगत तर येथें "ज्ञानामृतं भोजन"; तिकडे 'शुभमंगल' चाललें आहे तर इकडें इतिहासाच्या

अनुक्रमणिका

रोमहर्षण प्रसंगाची फोड चालली आहे. ह्या समारंभाचा आणि ह्या विद्यार्थ्याच्या मनःस्थितीचा अगदी तमःप्रकाशवत् विरूद्ध प्रकार होता. ह्या तुच्छ संसारांत हजारों लग्नें चाललीं च आहेत. हजारो मिष्टान्नें लोक खात च आहेत. टामटूम हि नेहमीच पहाण्यांत येते, पण असें उदाहरण काय सहजासहजीं वाटेवर पडलेलें दिसेल? खरोखर ज्यांनी हे उदाहरण प्रत्यक्ष पाहिले ते धन्य! ज्यांनी ऐकले ते हि धन्य!! आणि ज्यांना त्यांतले मर्म कळले, ज्यांना त्यांतल्या तत्त्वाचा अवलंब करण्याची यत्किंचित इच्छा झाली ते हि धन्य!!!

ज्यांचें चित्त एकसारखें बाहेर च भटकत फिरतें, हा पदार्थ दिसला गुंतलें मन त्यांत, हें हॉटेल आले सुटलें जिभेला पाणी, ही रस्त्यावरून मिरवणूक चालली चालला बघायला, हा बँड वाजतो टवकारलेच कान ह्याने—असें ज्यांचे मन, त्यांना ह्या स्थितीची कल्पना कशी येणार? त्या वेळचें बोलणें एकदां सहज निघालें तेव्हांची आठवण म्हणून एक प्रसंग सहज सांगण्यांत आला— “त्यावेळीं हलवायाची दुकानें, त्यांत मांडलेलें ते बरफी, पेढे इत्यादी नाना तऱ्हेचे पदार्थ रस्त्यांत फिरत असतां पाहण्यांत येत. निरनिराळें लोक व विद्यार्थी ते पदार्थ घेतांना दिसावयाचे. पण मला कधीं तशी इच्छा झालीं नाहीं. मला ते पेढें, बरफी वगैरे पदार्थ म्हणजे दगडाच्या गारगोट्या भासत. मी रोज रस्त्यांतून त्या मांडलेल्या गारगोट्यां पाही पण दगडाच्या गारगोट्या खेरीज मला त्यांत कांही रस आहे असें दर्शन कधींच झालें नाहीं. तसें च उन्हाळ्याच्या दिवसांत विद्यार्थी जमत, निरनिराळीं सरबतें पीत, आईसक्रीम करून खात. पण त्या प्रकारांतही मला कधीं भाग घेण्याची इच्छा झाली नाहीं. एकदां असे च कांही विद्यार्थी जमले होते. आईसक्रीम खात होते. तिकडून फंदीबोवा चालले होते (प्रसिद्ध कवी फंदीबोवांचे वंशज—हेही कवित्व करीत). त्यांना विद्यार्थ्यांनी बोलावलें व आईसक्रीम घेण्याची विनंती केली. ती ऐकून ते जरा रागानें च म्हणाले, मी हे असले तुमचें सटरफटर खाणें खात नसतों. मग एक विद्यार्थी म्हणाला, फंदीबोवा निदान तुम्ही ‘आईस’ तरी खा. त्याला तर कांहीं हरकत नाही? लगेंच हें कवी म्हणाले, बाबांनों, मी आईस खात नाहीं आणि बापास ही खात नाहीं. ते धंदे तुम्हीच करा.”

अशी ही वैराग्यवृत्ति त्या वेळीं इतकी प्रबळ असे कीं वैराग्यपोषक जो जो शब्द कानीं पडे तो तो अगदीं खोल हृदयांत ठसून जाई. सहज एकदां सकाळच्या सुमारास बहीण तुकारामाचा एक अभंग म्हणत होती.

**जंव चाले उत्तम धंदा । तंव बहीण म्हणे दादा ॥**

तिच्या म्हणण्यांत कोणता ही भाव नव्हता. अर्थाकडें लक्ष नव्हते. परंतु बहिणीच्या तोंडून ते बहिणीसंबंधीचे च उद्‌गार ऐकून त्या अभंगावर चित्तवृत्ति अगदी खिळून गेली. तसें पाहिलें तर प्रसंग अगदी साधारण होता. एकदां आईकडे एक बाई बसावयास आली होती. शेजारच्या खोलींत हा विद्यार्थी होता. त्या बाईचा आवाज थोडा मोठा च होता. त्यामुळें तिचें बोलणें सर्व कानावर येत होतें. ती बाई जाईपर्यंत तिचा विषय एक च चालला होता. तो म्हणजे “दागिने”. त्या अमक्या बाईच्या कानांत आजकाल अमुक दागिने दिसतात, तमकीने तमुक दागिने केले, ठकूताईला तो दागिना शोभून दिसतो आणि बकूबाईला हा शोभून दिसतो. शेवटीं ती बाई गेल्याबरोबर हा विद्यार्थी आईकडें येऊन आईला म्हणला— “आई, दागिन्याशिवाय ह्या जगांत दुसऱ्या महत्त्वाच्या गोष्टी च नाहीत? त्या बाईची ती कटकट ऐकूण मी अगदी कंटाळून गेलों. तुला त्या बाईला सांगतां येत नव्हते काय की हा विषय आतां पुरे म्हणून, तुला तरी तें ऐकण्यांत आनंद वाटत होता काय?” त्यावर मग आईने सांगितले “आतां प्रसंग पुन्हां असा आला तर मी विषय बदलण्याचा प्रयत्न

अनुक्रमणिका

करीन. मी तरी काय करणार? त्या बाईला तो च विषय आवडत होता. आपआपल्या आवडीप्रमाणें ज्यांचें त्याचें बोलणें असतें."

हायस्कूलमध्यें 'दासबोध' बक्षिसांत मिळवला होता. त्याचें मनन ह्या वेळीं एकसारखे चालूं असे. समर्थांपासून ह्या विद्यार्थ्याला विलक्षण स्फूर्ति प्राप्त झाली. वैराग्याच्या प्रेरणेंत रामदासांचे ग्रंथ फार मोठा आधार होऊन बसला. दासबोधाची अनेक आवर्तनें झालीं. त्यांतला उपदेश तंतोतंत पटला. दासबोधांतील तिसऱ्या दशकापासून वर्णन केलेलें संसाराचें भयंकर चित्र त्या वेळीं मार्गदर्शक होऊन बसलें.

**जन्म हा चि विषमकाळ । जन्म हे चि वोखटी वेळ**
**जन्म हा अति कुश्चीळ । नरकपतन ॥**

ही खात्री झाली. दासबोधामुळें ही खात्री पटली असें नव्हे. पण दासबोधामुळें मूळवृत्तींचें अधिक दृढीकरण झालें. सर्व ग्रंथांत दासबोध ग्रंथ श्रेष्ठ वाटूं लागला. त्याचें हि कारण हें च. अंतर्यामी जी जी कल्पना केली ती ती दासबोधांत आढळली. त्यामुळें घरी आईखेरीज इतर कोणाशीं मुळीं च बोलणें नसावयाचें. मग इकडच्या तिकडच्या गोष्टी किंवा थट्टामस्करी कोठून असणार?

**कर्मयोगें सकळ मिळालीं । येकें स्थळीं जन्मासि आली ।**
**ती तुवां आपुली मानिलीं । कैची रे पढतमूर्खा ॥**

ही ओवी हृदयांत पक्की ठसून गेली.

**ये च क्षणीं मरून जासी । तरी रघुनाथीं अंतरलासी ।**
**माझें माझें म्हणतोसी । म्हणौनिया ॥**

म्हणून आपला वेळ मुळींच वाया घालवावयाचा नाहीं. वस्तुतः ह्या घराचा कोणत्या हि तऱ्हेचा पाश ह्यांना लागत होता, अगर घरांची कांही उपाधी होती असें मुळीं च नाहीं तरीं—

**जयासि वाटे सुख चि असावें ।**
**तेणें रघुनाथ भजनीं लागावे ॥**
**स्वजन सकळ ही त्यागावे ।**
**दुखमूळ जे ॥**

अशा सारख्या ओव्या वारंवार चितांत घोळत असत. गृहत्याग केला पाहिजे असें वाटें. घरांतील कोणते हि काम कोणी हि सांगत नसे. बाजारांतली भाजी हि एकादे वेळीं आणण्यास कधीं च कोणी सांगितलें नाहीं. कोणत्या हि तऱ्हेची घरची उपाधि नव्हती. ह्या विद्यार्थ्याविषयींच्या आदरामुळें, उग्रतेमुळें कोणी हि विनाकारण कटकट करीत बसला आहे त्यामुळें ह्यास त्रास होत असें बहुतेक घडत नसे. सकाळपासून संध्याकाळपर्यंत घरांत केवळ 'मूक' अशी च ह्या विद्यार्थ्याची स्थिति होती. तरी

**जिवलग जिव घेती प्रेत सांडुनि देती ।**

अनुक्रमणिका

ह्या समर्थवचनाप्रमाणें आपलें जे रक्तसंबंधी त्यांच्याशीं संबंध नकों अशी त्यावेळची निष्ठा होती. अतिशय गरीब स्वभाव, वडील भावाविषयीं पराकाष्ठेचा आदर अशा पाठच्या भावानें साधें एकादें गणित विचारलें तरी त्याला मुळीं च सांगावयाचें नाहीं. 'बाबांना विचार' हें उत्तर ठरलेलें. बाहेर चें विद्यार्थी मात्र रोज येऊन, गणित, इंग्रजी, इतिहास—काय वाटेल तें शिकूं शकत. पण भावाला अडलेला एकादा शब्द हि सांगणे व्हावयाचें नाहीं. ज्यास्त च लगट करून, आग्रह धरला तर निर्दयपणे मारण्यास हि मागेपुढें पहावयाचें नाहीं. पण थारा म्हणून मुळींच मिळावयाचा नाही. फिरावयास वेळेस एकटें जावयाचें परंतु भावास येऊं द्यावयाचें नाहीं. भाविक भाऊ आदरपूर्वक मागून मागून जरी न कळत गेला आणि ती गोष्ट लक्ष्यांत आली तर मारीत मारीत हाकून द्यावयाचें. अशी स्वजनांसंबंधी रुक्ष दृष्टी होती. ह्याचें कारण हें च.

**कैची माता कैचा पिता । कैचा भ्राता ।**<br>
**कैची सुहृदें कैची वनिता । पुत्रकलत्रादिक ॥**<br>
**हें तूं जाण मायेची । अवधी सोइरी सुखाची ।**<br>
**हे तुझ्या सुखदुःखाची । सांगाती नव्हेती ॥**

ह्या ओव्या—अशा ह्या दासबोधाच्या ओव्या जीव कीं प्राण वाटत. त्यांच्यापुढें सर्व जगत् तुच्छ होऊन जाई! निजतांना तो दासबोध डोक्याजवळ च असावयाचा. त्या दासबोधादि पुस्तकांना कोणी हात लावला कीं वाघिणीच्या पिलांना हात लावल्यावर जशी वाघीण चवताळावी तीच, अगदीं तशी च प्रतीति यावयाची. आपली सर्व पुस्तकें कपाटांत व्यवस्थित रीतीनें बांधून शिवून पुठ्ठे चढवून कुलुपांत ठेवावयाचीं. रोज त्या पुस्तकांचे वाचन चालें. त्यावर पेन्सिलीनें तऱ्हेतऱ्हेच्या खुणा होत. महत्त्वाच्या ओव्यां चाळल्या जात. महत्त्वाच्या शब्दांचा, कठिण शब्दांचा कोश तयार करणें चालें. सर्व बुद्धि एकवटून त्यावर परिश्रम व्हावयाचा. त्यांतले सर्व संदर्भ डोळ्यापुढें आणावयाचे. विचारांचे सर्व धागेदोरे, एकमेकांत गुरफटलेल्या त्यांच्या गुंती उकलावयाच्या. आवडीचीं वचनें स्मरणानें भराभर ४/४ तास म्हणत जावयाचीं. ४/५ हजार कविता म्हणणें एक लीला होऊन गेली होती. मनाच्या श्लोकांची एक प्रत रात्रंदिवस जवळ ठेवावयाची. शंकर श्रीकृष्ण देवांविषयीं सुद्धां ह्या रामदासी वाङ्मयामुळें अतिशय आदर असे. त्यांच्या दासबोधाच्या प्रस्तावनेची हि पारायणावर पारायणें होत. वैराग्याच्या उसळीमध्यें, विचारांच्या तंद्रीमध्यें, चार-चार तास आपल्या खोलींत फेऱ्या घालाव्या, ते मनाचे श्लोक, अगदीं गर्जना करून म्हणावयाचे. सबंद गल्लीच्या गल्ली दणाणून जात असे. त्या आवाजानें वातावरण भरून जाई. त्या गंभीर घोषानें नसानसांत स्फूर्तीचा संचार होई, रक्तांत चैतन्य खेळे आणि चित्तांत त्याचा पडसाद घुमत राही. पहाडी खणखणीत सिंहगर्जनेचा च आवाज तो! तेथें संगीताची विलासिता नसे. पौरुषाचा प्रकर्ष, गांभीर्याची सीमा, रणांगणांतलीं रणभेरी तेथे झडते आहे, निर्भयतेचा हा स्वेच्छ संचार आहे, अशी प्रतीति येई.

बाहेर गांवच्या लोकांना ह्या वैराग्याच्या भूमिकेची माहिती कोठून असणार? त्यांना लौकिक हुषारी, उत्तम विद्याभ्यास, कुलशीलाची श्रेष्ठता यापलीकडे कल्पना च नसे. त्यामुळें आपल्या मुलीला हें स्थळ बरें आहे अशा समजुतीनें वडिलांच्याकडें कित्येक लोकांची पत्रें यावयाचीं. अशीं कांही पत्रें वडिलांच्या अगोदर च ह्यांच्या पाहण्यांत आल्याबरोबर वडिलांना न देतां च ती ताबडतोब जाळून टाकलीं. वडिलांनी 'तुला लग्न करावयाचें नसेल तर नको करूं. परंतु माझीं पत्रें जाळणें योग्य नाहीं' असें हि यावर सांगितलें. ह्याच कालावधींत एक गृहस्थ पाहुणे म्हणून आले, दोन-चार दिवस राहिले. परत जातांना त्यांनी सांगितलें की मी आलों होतों निराळ्या च उद्देशाने. माझ्या मुलीला हें स्थळ पहावें व येथली एकंदर परिस्थिति स्वतः अवलोकावी म्हणून मी इतके दिवस राहिलों, परंतु हा विद्यार्थी तरुण आहे, बुद्धीमान् आहे, कुलीन आहे,

पण इतक्या अल्प वयांत ह्याच्या ठिकाणीं धगधगीत वैराग्य जसें पाहण्यांत आलें तसें कोठें च पाहिलें नाहीं. हा कधीं हि लग्न करणें शक्य नाहीं. ही गोष्ट अवलोकनावरून माझ्या लक्ष्यांत आली. हा दिसावयाला विद्यार्थी आहे पण केवळ ऋषीतुल्य आहे. जरी माझा हेतू येथे सफल झाला नाहीं तरी ह्याचें दर्शन झालें हें हि मी एक माझें भाग्य च समजतों!

शाळेत असून शाळेंत नाही, विद्यार्थांत असून विद्यार्थ्यांत नाहीं आणि घरीं असून घरांत हि नाहीं. सर्व लौकिक विषयांपासून अगदीं अलिप्त. खाणें, पिणें, बसणें, उठणें सर्वत्र वैराग्याची छटा पडली. ‘पद्मपत्रमिवांभसा’ ह्या सूत्रांत जीवन गोवलें गेलें. तारुण्याच्या केवळ सुरुवातीला च ‘अनेकजन्मसंसिद्ध’ अशी ही अलभ्य भूमिका करतलामलकवत झाली.

**कोऽहं कस्त्वं कुतः आयातः का मे जननी को मे तातः ।**
**इति परिभावय सर्वमसारं विश्वं त्यक्त्वा स्वप्नविचारम् ॥**

ही मूलसंशोधकवृत्ति येथें तीव्रतेनें वाढत चालली. आणि जगाकडे पाहून

**सांडूनि राम आनंदघन । ज्यांचे मनीं विषयचिंतन ॥**
**त्यासि कैसें समाधान । लोलंगतासी ॥**

ह्या ओवीचा अनुभव बाणून गेला. प्रभातकालापूर्वी अरुणाची प्रभा फांकतें, क्रमाक्रमानें मग सर्व दिशा उजळतात त्याप्रमाणें वैराग्याची प्रभा प्रत्यंगावर फुलन गेली. तिचा प्रकाश प्रत्येक क्रियेवर पडत चालला. चित्त चिंतनाच्या खोल भावराज्यांत गर्क होऊन गेलें. मस्तकांत तत्त्वज्ञानाचे तुफान चालूं झाले. ह्या अवस्थेच्या प्रचंड वेगामुळें इतरांस ती गंभीरता, ती उग्रता, अगदी अगम्य वाटे. पण तेथें आपल्या अप्रतिबद्ध गतीपलीकडे जगाची कल्पना च नव्हती. ती गति दुसरी गोष्ट जाणत च नव्हती.

**यत्र नान्यत्पश्यति नान्यच्छ्रुणोति नान्यद्विजानाति ।**
**स भूमा ॥**

●●●

अनुक्रमणिका

## प्रकरण १४ वें

# देशसेवेची तयारी

**बालपणापासून** केसरीचें वाचन, देशकाळपरिस्थितीची पूर्ण जाणीव, नाना देशांच्या आणि नाना तऱ्हेच्या इतिहासांचें आणि थोर पुरुषांच्या चरित्रांचें अध्ययन—त्यामुळें देशसेवा हें जीवनाचें एक अपरिहार्य अंग ठरून गेलें. देशाची माहिती मिळवण्यासाठीं बहुतेक महत्त्वाचीं वर्तमानपत्रें वाचल्याशिवाय दिवस जात नसे. ज्या वयांत केवळ स्वार्थाच्या, कीर्तीच्या, सुखोपभोगाच्या मनोराज्यांत सर्वसामान्य मन गर्क असावयाचें त्या वयांत श्रीसमर्थांप्रमाणें—

**'आई, चिंता करतों विश्वाची'**

असें देशसेवेच्या चिंतेने मन व्यग्र झालेलें असें. माझ्या असामान्य बुद्धिमत्तेनें मी पुढें हजारों रुपये मिळवीन, मोठमोठें वाडे बांधीन, बागबगीचे फुलवीन, असले विचार तर मनांत येत नव्हते च, पण अगोदर चरितार्थाचा कांहीं अल्पसा तरी धंदा करून मग बाकी देशसेवा करीन, असले हि विचार मनांत नसत. सर्व वेळ, सर्व शक्ति सेवेसाठीं च.

**जो परोपकार करत चि गेला ।**
**पाहिजे तो ज्याला त्याला ॥**
**मग काय उणें तयाला ।**
**भूमंडळीं ॥**

त्याला कां दोन भाकरी मिळणार नाहींत? असा भव्य संन्यासी विचार मनांत होता. संन्यासी विचार म्हणजे खरोखर बादशाही विचार च तो! नेपोलियन बादशहा सेंट हेलेना येथे कैदेंत असतां त्याचा इंग्रज अधिकाऱ्यांनी अतिशय छळ केला. कधीं कधीं त्याला नीट अन्नसामुग्री हि मिळूं नये. तेव्हां त्यानें एकदां अधिकाऱ्यांस निरोप पाठविला कीं, "मला तुमच्या सामुग्रीची मुळीं च पर्वा नाहीं. कांहीं केले तरी तुम्ही मला उपाशी मारूं शकणार नाहीं. पहाऱ्यावर ठेवलेल्या शूर शिपायांकडे मी जाईन. मी हि म्हातारा शूर शिपाई आहे. ते मला आपल्याबरोबर भाकर खाण्यास नाहीं म्हणणार नाहींत." नेपोलियनची बादशाही खरोखर ह्या उद्‌गारांत होती. आपली शिपाईगिरी आपल्याला सन्मानपूर्वक भाकर देईल च अशी त्याची खात्री होती. येथें हि ही च बादशाही बाणून गेलेली होती. या बादशाहीचा अर्थ काय? लोक परमार्थ देशसेवा दैवावर सोपवतात. स्वार्थ आणि संसारांत मात्र प्रयत्न करीत असतात. येथें परमार्थ आणि देशसेवा प्रयत्नानें करावयाची आणि देहाचा विचार दैवावर सोपवून द्यावयाचा अशी स्थिति होती. हाच या बादशाहीचा अर्थ!

सर्व वेळ सर्व शक्ति सेवेसाठीं, देशासाठीं द्यावयाची ही गोष्ट खरी, पण व्यक्तीची शक्ति किती? आणि हा देश केवढा? हा हिंदुस्थान देश म्हणजे कांही लहानसहान देश का आहे? एक मोठें खंड च आहे हें! भरतखंड नांव एवढ्यासाठीं च पडलें. त्या देशाची सेवा करावयाची कशी? परकीय सत्तेखालीं हतबल झालेला, शतशः विभागला गेलेला, परकीयांनी पिळून काढलेला, दारिद्र्याने पीडलेला, अज्ञानानें ग्रासलेला, भांडणांनी बुजबुजलेला, हा देश पुढें कसा जाईल? ह्याचे एकीकरण कसें होईल? ह्याला

अनुक्रमणिका

स्वातंत्र्य कसें दिसेल? ह्या प्रश्नांना काय उत्तर देणार? यक्षप्रश्नांचीं उत्तरें धर्मराजानें दिलीं. पण तेथें निव्वळ प्रश्नांचीं उत्तरें देऊन भागत होतें. येथें जरी उत्तरें मिळालीं असें क्षणभर गृहीत धरलें तरी तेवढ्यानें काय होणार? त्या उत्तरानुरूप कृति कशी घडवून आणावयाची? ह्या निष्प्राण देशांत दोन माणसें हि एके ठिकाणीं येऊं शकत नाहींत, भावाभावांत हि भांडणें, कोणी कोणाचें ऐकत नाही.

**करंटे मिळाले सर्वे । जो तो बुद्धीच सांगतो ॥**

अशा स्थितींत देशकार्याची प्रचंड कर्मचक्रें चालावीं कशी? खरोखर बुद्धि कुंठित होऊन जाईल, मनुष्य हतबुद्ध होऊन त्याची चेतना देहांतल्या देहांत जिरून जाईल, अशी ह्या देशाची हीन स्थिती आहे.

पण संतांच्या ग्रंथांचा ह्या हि बाबतींत येथें मोठा च आधार मिळाला.

**सामर्थ्य आहे चळवळीचे । जो जो करील तयाचें ।**
**परंतु तेथें भगवंताचें । अधिष्ठान पाहिजे ॥**

भगवंताच्या अधिष्ठानाच्या जोरावर देशाला जरून मुक्त करतां येईल, कसें होईल हा प्रश्न च नाहीं. अशी मनःस्थिति बनली. लंकेमध्ये राक्षसांच्या त्या प्रचंड जमावांत एकटा मारूती गेला. त्याला तेथें कोणतें बळ होतें? जो जो पुढें येईल त्याला

**'तया झोडितों दास मी राघवाचा' ॥**

अशी त्याची वृत्ति होती. संकटांना, अडथळ्यांना दूर सारून पुढें जाऊं. 'अशक्य' हा शब्द नेपोलियनच्या कोशांत नव्हता. तसा आपल्या हि कोशांत नसावा. आणि अमुक झालें पाहिजे, तमुक झालें पाहिजे ह्या फलासक्तीच्या विचारांपेक्षां मी माझी कामगिरी बजावली पाहिजे. मला दुसरें विचार करण्याची जरूर च नाहीं. ही कर्तव्यपर निष्काम वृत्ति हि येथें बनून गेली होती.

इतिहासाच्या अध्ययनानें हा सर्व पाया मजबूत झाला होता. "तोफ झाली; महाराज गडावर गेले. मी माझें काम केलें. आतां मला आनंदाने मृत्यू येत आहे." पावनखिंडीतलें बाजी प्रभूचें हे पावन उद्‌गार—मृतांना हि सजीव करणारें उद्‌गार—मनांत शेकडों वेळां रमून गेलेलें होते. देशसेवेसाठीं आज्ञाधारक शिपायांच्या मोठमोठ्या फौजा पाहिजेत; त्यापेक्षां हुकमी गुणांच्या प्रचंड समुदायाची आवश्यकता जास्त आहे, हें सर्व अजमावणें चाललें होतें. एका शिवाजीच्या पाठीमागें शेंकडो शिवाजी लपलेले आहेत. ते गेले, मेले, इतिहासाला त्याची दाद नाहीं. परंतु ह्या विद्यार्थ्याच्या ज्ञानचक्षूला ते स्पष्ट दिसत होते. त्यांची कामगिरी आपल्या दिव्य दृष्टीनें अवलोकिली जात होती. त्या अज्ञात महात्म्यांचें डावपेंच शिकणें येथें चालू होते. पायांत जाऊन बसावें कळस होऊन मग कोणी हि झळकेल. पहिले घाव आपण घालावे, शेवटचा दगड फुटणारा घाव कोणी हि घालील. ही निष्ठा आपल्याला आपल्या आसपास उभी केली पाहिजे. ह्याचा अंदाज घेणें चाललें होते. एकाला तयार केला तर त्यानें दुसऱ्याला तयार केला पाहिजे. एक-एक-एक करीत, पुढें पुढें जात एक मजबूत अखंड परंपरा चोहींकडे फैलावली पाहिजे.

अनुक्रमणिका

**महंते महंत करावे । युक्तिबुद्धीनें भरावें ।**
**जाणते करूनि विखरावे । नाना देशीं ॥**

अशा योजनेचा विचार चालूं होता. आपण धाडलेला मनुष्य जगाच्या रंगानें रंगणार नाहीं; उलट आपल्या रंगानें जगाला रंगवील असा पाहिजे. आधीं कोंडाण्याचें लग्न मग रायबाचें करूं हा तानाजीचा खरा क्रम आपल्या मंडळींना कळला पाहिजे; "दोर कापून टाकला आहे, आतां परत कोठें जाणार?" हें दोर कापण्याचें सूर्याजीचे तत्त्वज्ञान आधीं शिकवलें पाहिजे. हळदीघाटच्या युद्धांत १६ हजार रजपूत कापले गेले पण कोणी मागें परतला नाहीं; असे निश्चयाचें महामेरुत्व आपल्यापाशीं पाहिजे. सबंध राज्य जाऊन रानोमाळ भटकत असतां हि लॉर्ड लेकला जसवंतसिंग होळकरानें 'जीन घर, जीन तख्त' असा खडखडीत जबाब दिला. "मी शरण येणें शक्य नाहीं. माझें राज्य गेलेलें नाहीं. हा घोडा हेंच माझें राज्य आणि हेंच माझे तख्त!" अशी वृत्ति बनली पाहिजे. 'बकरी बनून दोनशें वर्षें जगण्यापेक्षां वाघ होऊन दोन दिवस जगणें बरें', ही टिपू सुलतानाची स्वाभिमानी वृत्ति आली पाहिजे. पन्नादाईने राजपुत्रासाठीं आपल्या मुलाचा बळी दिला. आपणांला असा आत्मयज्ञ करतां आला पाहिजे. 'बुद्धं सरणं गच्छामि, संघं सरणं गच्छामि, धम्मं सरणं गच्छामि' —ही बुद्धांची संघटना कळली पाहिजे. व्यक्ति, संघ, आणि तत्त्व असा उत्तरोत्तर मजबूत संघटनेचा पाया घातला पाहिजे. अल्लाहो अकबरचा ध्वनि निघाला आणि जपान ते जिब्राल्टरपर्यंत इस्लामची तलवार चमकली, अशी धर्माची शक्ति आपल्यापाशीं पाहिजे. रणांगणांत प्रत्यक्ष शत्रूशीं लढत असतां नमाज पढण्याच्या वेळीं एकदम शस्त्र बाजूला ठेवून ईश्वरध्यानांत मग्न होण्याची वृत्ति पाहिजे. शत्रूच्या हातून सुटून झांशीच्या किल्ल्यांतून निसटून राणी लक्ष्मीबाई हजारों इंग्रजांची फळीं फोडून रातोरात सारखी पळत राहिली. हें असामान्य धाडस, हा कंटकपणा पाहिजे. नेपोलियन एकसारखा पंधरा दिवस घोड्यावर बसून मास्कोहून पॅरिसला परत आला. राघोबा भरारी लांब लांब मजला मारून शत्रूला चकित करी. आपल्यापाशीं असल्या गुणांचीं माणसें पाहिजेत. ही शक्ति आपण संग्रहित केली पाहिजे. अशा तऱ्हेची मानसिक तयारी येथें चालली होती. इतिहासाची ही स्फूर्ति येथें सांठत होती. इतिहास म्हणजे स्फूर्तीची मूर्ति असून भूतकाळाचें भूत नव्हें हे स्पष्ट प्रतीतीला येत होतें. अशा ऐतिहासिक व हल्लींच्या थोर पुरुषांचीं चित्रें हि त्या विद्यार्थ्यांने आदरपूर्वक आपल्या जवळ ठेवली होती.

हिंदुस्थानांतील असंतोषाचे जनक लो. टिळक. त्यांचा बहुधा प्रत्येक लेख, त्यांचें प्रत्येक भाषण नीट वाचावयाचें. त्यांतील विचारांची दिशा समजून घेऊन ते विचार आपलेसे करावयाचे. राजवाड्यांच्या लेखांचे हि असेंच अवलोकन होई. त्यांची स्वभाषेविषयीं तळमळ, त्यांची संन्यस्त वृत्ति, त्यांची गाढ विद्वत्ता, त्यांचा कष्टाळूपणा ह्या गुणांमुळें त्यांच्याविषयीं अतोनात आदर वाटे. त्यांचें सर्व च लिहिणें अतिशय स्फूर्तिकारक वाटे. लाला लजपतराय, बिपिनचंद्र पाल, अरविंद घोष ह्या सर्वांच्या हालचाली, त्यांचे विचार लक्षपूर्वक वाचलें जावयाचे. राष्ट्रीय शिक्षणासाठीं प्रयत्न करणारे विजापूरकर, त्यांचे समर्थ विद्यालय, काच कारखाना, इ. शिक्षणविषयक गोष्टी हि देशांत कसकशा चाललेल्या आहेत, त्याचें अवलोकन असावयाचें. शिवराम महादेव परांजप्यांचें लेख, राष्ट्रमत, काळ, भाला, केसरी इत्यादि वर्तमानपत्रांतील महत्त्वाचा सगळा भाग अवलोकनांत असावयाचा. बंगालमधील चळवळीकडें, कॉंग्रेसच्या चळवळीकडे सारखी नजर असे. विचाराच्या तीव्रपणामुळें, आत्यंतिक त्यागाच्या दृश्यामुळें बॉंब फेकणाऱ्या, युरोपियनांचा खून करणाऱ्या बंगाली तरुणांविषयी फार आदर असे.

**नैनं छिन्दन्ति शस्त्राणि नैनं दहति पावकः ।**

अनुक्रमणिका

असें म्हणत म्हणत आनंदाने फांसावर लटकणाऱ्या खुदिराम बोस सारख्या तरुणांचें क्रांतिकारक तत्त्वज्ञान, सावरकरासारख्यांचें जळजळीत लेख, त्यांचे मॅझिनीचें चरित्र, कित्येक जप्त झालेलीं पुस्तकें, ह्यांचा हि संग्रह करून ठेवला होता. ह्या धाडशी तरुणांप्रमाणें आपण हि खुशाल मृत्यूच्या दाढेंत शिरावें, आपल्या मातृभूमीला पारतंत्र्यांत जखडणाऱ्या परकी लोकांपैकीं एकाचा तरी निःपात करावा इतक्या थराला विचार गेले होते. बॉंब तयार करण्याच्या अर्धवट उद्योगांत हि कांहीसा भाग घेतला होता. त्याप्रमाणें बडोद्यांत एके दिवशीं एक स्फोट हि झाला होता. पण त्याला विशेष महत्त्व नव्हतें. असे जरी हिंसामय क्रांतिकारक विचार तयार होत होते तरी संतांच्या ग्रंथांच्या अध्यायनामुळें व एकंदर विचारांच्या वाढत्या श्रेणीमुळें ह्या क्रांतिकारक किंवा चुकीच्या कल्पनांत पुढें पुढें फरक पडत होता. उत्तरोत्तर चळवळींच्या, देशसेवेच्या, साधनांच्या शुद्धतेकडे मुख्य लक्ष दिलें पाहिजे, ही भूमिका बनूं लागली होती. पूर्वेतिहासांतले अनेक उत्तमोत्तम गुण, टिळकासारख्यांच्या राजकारणांतले सूक्ष्मातिसूक्ष्म विचार, क्रांतिकारकांची बलिदानाची तयारी—अशी देशसेवेला लागणारी महत्त्वाची साधना क्रमाक्रमानें आटोक्यांत येत होती. आणि त्याला संतांनी दाखविलेली साधनशुद्धीची, सात्विकतेची, दिव्यत्वाची जोड हि मिळत चालली होती. ही च देशसेवेची तयारी. ह्या सेवेसाठीं सर्व वेळ, सर्व शक्ति अर्पण करावयाची असे विचार बाणले.

"परवशताचि निरय हें जाणुनि तूं संग सोडूनी सरक" पंतांच्या ह्या आर्येप्रमाणें परवशतेच्या ह्या घोर नरकांतून आपली पुरातन ऋषिमुनींची ही पुण्यभूमी, हा सर्व समाज वर आला पाहिजे अशी तळमळ वाढत चालली. मी एकटाच मुक्त होईन ही पारमार्थिक कां होईना पण स्वार्थी वृत्ति येथें मुळींच शिवली नाहीं. धर्मराजाप्रमाणें 'कुत्रा येंऊ शकत नसेल तर त्या स्वर्गांत मी हि येणार नाहीं.'—अशी ही भावना होती.

**"शुनि चैव श्वपाके च पंडिताः समदर्शिनः"**

गीतेंत सांगितलेले समतेचें दर्शन तें हेंच. प्रल्हादाचें म्हणणें हि भागवतांत आलें आहे.

**प्रायेण देव मुनयः स्वविमुक्तिकामाः ।**
**मौनं चरंति विजने न परार्थनिष्ठाः ।**
**नैतान् विहाय कृपणान् विमुमुक्षुः एको ।**
**नान्यं त्वदन्यशरणं भ्रमतोऽनुपश्ये ॥**

लोकांत आहों तोंपर्यंत लोकसेवा अपरिहार्य आहे. आपण स्वतः, हे सर्व लोक, ही सर्व चराचर सृष्टि आणि ह्या व्यक्त जगापलीकडचें अव्यक्ताचें अनंत साम्राज्य—हें सर्व एक—केवळ एकरूपच आहे; ही भूमिका, हा च मोक्ष आणि ह्या मोक्षाला अनुकूल समाजरचना हें च स्वराज्य. स्वराज्य आणि मोक्ष, ह्यांच्यासाठीं तळमळणें, अंतःकरणपूर्वक झटणें, कायेनें, वाचेनें, मनानें ह्यासाठीं प्रयत्न करणें, या सर्व प्रयत्नांत उत्तरोत्तर शुद्धतेचा दीप प्रज्वलित ठेवणें, ही च खऱ्या देशसेवेची तयारी होय. ही तयारी च अशी आहे की ह्या तयारीनें च पुष्कळसें कार्य आपोआप होऊन जातें. ही आपली तयारी उत्तम आहे, आपल्याजवळ प्रतिपक्षाच्या शेंकडो पट जास्त साधना आहे, सद्‌गुणांचें प्रचंड लष्कर आपल्या हुकमतींत वागत आहे; हें प्रतिपक्षाच्या नीट लक्ष्यांत आलें कीं लढाई थांबली च. मग प्रतिपक्षी बिनशर्त शरण येण्याला वेळ लागत नाही. मोक्ष आणि सर्वभूतहित तेथें हात जोडून उभें राहतें. त्यासाठीं अन्य कोणती हि क्रिया करावी लागत नाहीं. आपोआप च दोन्ही गोष्टी घडून येतात.

अनुक्रमणिका

अशी ही तयारी येथें अतिशय उत्कटतेनें बाणली जात होती. आणि त्या तयारीचें भगवंतांनी सांगितलेलें दिव्य फलित हि जवळ जवळ येत होते.

**लभन्ते ब्रह्मनिर्वाणमृषय : क्षीणकल्मषाः ।**
**छिन्नद्वैधा यतात्मानः सर्वभूतहिते रताः ॥**

अनुक्रमणिका

## प्रकरण १५ वें

## विद्यार्थी - मंडळ

**हायस्कूलांत** प्रवेश केल्यापासून एकप्रकारें लोकसंग्रहाला सुरुवात झाली. देशसेवेची तयारी हि हळूं हळूं होत गेली. वैराग्याचें तर बाळकडूच जणूं मिळालें होतें. अशा स्थितींत ह्या विद्यार्थ्यांभोंवतीं अपरिहार्यपणें अनेक विद्यार्थ्यांचें एक वलय, एक मंडळ—विद्यार्थ्यांचा एक संघ आपोआपच बनत गेला. सूर्य जसा प्रभेनें सदोदित वेढलेला असतो किंवा उत्तम फुलाभोंवतीं सुवास जसा दरवळून गेलेला असतो त्याप्रमाणें ही गोष्ट अगदीं स्वाभाविक तऱ्हेनें घडून आली.

हे विद्यार्थी जमावयाचे अभ्यासाच्या निमित्तानें. परंतु निघावयाच्या सगळ्या विश्वांतल्या गोष्टी. तेथें आत्मज्ञानापासून विज्ञानापर्यंतचे सर्व विषय निघत.

**निंदा-स्तुती जनांच्या । वार्ता वधूधनाच्या ॥**

ह्या गोष्टी मात्र तेथें मुळीं च चालत नसत. ह्या विद्यार्थ्यांसमोर असल्या गोष्टी निघणें शक्य च नव्हतें. तथापि नुसत्या वेदान्त, देशसेवा इत्यादींच्या केवळ गप्पा करण्याची आळशी संवय ही कित्येकांना लागलेली असते, किंवा कित्येकांना नुसता रामराम म्हणण्याचा चाळा लागलेला असतो. असा हा चाळा नव्हता. जो विचार केला तो कृतींत उतरलाच पाहिजे अशी येथें आचार-विचारांची जोडी अभेद्यपणें नांदत असे. आचार, विचार, आणि उच्चार ह्यांचा पूर्ण मेळ येथें दिसून येई. विचार मात्र मोठे मोठे आणि आचाराच्या नांवानें शून्य, असली बेभळट प्रकृति येथें कधींच नव्हती. ती आतां या वाढत्या अवस्थेत कोठून असणार? विचार-आचार-उच्चार, विचार-आचार-उच्चार अशी परंपरा येथें अबाधित चालत असे. त्या मानानें भोंवतालचे विद्यार्थी कच्चे होते ह्यांत शंका नाहीं. परंतु ते कच्चे असले तरी ढोंगी नव्हते. त्यांना आचाराची तळमळ नसे असें नाहीं. शिवाय आचार हा नेहमी विचाराच्या मागें च असावयाचा. विचाराबरोबर आचार भिडवणारा ह्या विद्यार्थ्यासारखा महापुरुष एकादा च. डोळ्यांना क्षितिज दिसलें तरी तेथे पाय एकदम कसें जातील? आणि पाय तेथें ज्या वेळीं चालून जातील त्यावेळीं विचारांचें क्षितिज हि पुन्हां पुढें पुढें च धावेल. म्हणून ह्या विद्यार्थ्याचे विचार ऐकावे, ते संग्रहित करावे, चर्चा करावी अशा ज्ञानप्राप्तीच्या हेतूनें मंडळी जमत असत. त्यांत कांहीं वावगें नव्हतें. पण मंडळी असा विचार करून जमत असें हि म्हणतां येणार नाहीं. ज्ञानाचें ते आकर्षण च त्यांना तेथें ओढून नेई.

ह्या मंडळींच्या बैठकी निरनिराळ्या ठिकाणीं होत. विशेषतः निवांत जागा, घरांतील कोणाहि मंडळींना ह्यांचा त्रास नको, ह्यांना त्यांचा त्रास नको, अशा ठिकाणीं ही मंडळी जमत. गोपाळराव काळे, शंकरराव तगारे, धोत्रे वगैरे मंडळीकडे कांहीशी अशी जागा असे. अशा एकाद्या जागी किंवा फिरतां फिरतां अथवा गावांबाहेरील एकाद्या ठिकाणीं मैदानावर चर्चेला, वादविवादाला रंग चढत असे. त्यांत गोपाळराव काळे हे मोठे तार्किक आणि वादकुशल असत. त्यामुळें निरनिराळे महत्त्वाचे मुद्दे मंडळीपुढें येत. हातघाईच्या लढाईमध्यें ज्याप्रमाणें एक इंच इंच जमिनीसाठीं भयंकर रणकंदन व्हावें, त्याप्रमाणें आपल्या लहानसहान मुद्यांसाठी सुद्धां प्रमाणांचा भडिमार व्हावयाचा. शंकरराव तगारे हे मितभाषी असत. परंतु मध्येंच एकादी मार्मिक कोटी करून वादाला कलाटणी मिळेल अशीं सूचक वाक्ये ते बोलत. मोघे वगैरे मंडळी बहुधा ऐकत

अनुक्रमणिका

रहावयाची. एकादी माऱ्याची जागा जशी अगदीं पक्की धरून ठेवावी त्याप्रमाणें गोपाळराव काळे हे आपला मुद्दा एकसारखा धरून ठेवीत. किती ही विरुद्ध पुरावे आले तरी शांतपणें, सावधपणें, त्यांतले बिंग शोधून त्यावर हल्ला चढवीत. वादांत नेहमी बचावाचे धोरण ठेवीत. चढाईचें धोरण असलें म्हणजे पुष्कळ वेळां मनुष्य घसरण्याचा संभव असतो. त्यामुळें सारखा बचाव करीत रहावयाचें, मुळींच पीछेहाट करून घ्यावयाची नाहीं अशी त्यांची पद्धति असे. विषय त्यामुळें पिंजून पिंजून मोकळा होई. बुद्धिबळांत ज्याप्रमाणें खेळाडू दोघे च असतात, परंतु कांही ह्या बाजूनें, कांही त्या बाजूनें डाव सूचवीत असतात, त्याप्रमाणें येथें ही वादविवादांत मधून मधून इतर मंडळी भाग घेत—अशा वादविवादांत प्रतिपक्षाकडून किती हि चिकाटी राखली गेली तरी शेवटीं हा विद्यार्थी त्या सर्वांवर मात केल्याखेरीज रहात नसे. वादविवादांत असे तासच्या तास निघून जात. रस्त्यांत, गल्लीच्या नाक्यावर ही मंडळी वादविवाद करीत उभी रहात. तेथें ही एक दोन तास निघून गेले तरी त्यांचें कांही कोणास भान नसावयाचें. कित्येक वेळां रात्रीचे अकरा अकरा वाजत. घरीं आई ह्या विद्यार्थ्यांची वाट पहात बसे. जेवण झालेलें नसावयाचें. मग रात्रीं जेवण व्हावयाचें.

'वादे वादे जायते तत्त्वबोधः' —अशा तऱ्हेचे ते वाद म्हणजे एक मोठा च लाभ असे. कधीं वादविवाद, कधी साधे संभाषण, कधीं गणितादि प्रकार तर कधीं उत्तम उत्तम ग्रंथांचें नुसतें वाचन हि चाले. मग इतर मंडळी ऐकत. वाचतां वाचतां मध्यें च एकाद्या वाक्यावर टीका करून लगेच पुढें सुरूं. असें ज्ञानाचें वातावरण आजूबाजूला सर्वत्र प्रस्तृत झालेलें असे. कोणाला हि घरची कोणती च जबाबदारी नव्हती. केवळ मुक्त अवस्थेंत रहावयाचें. घरीं केवळ जेवण्याखाण्यापुरतें च रहावयाचें. बाकीचा वेळ ही मंडळी आपली जमलेली च असावयाची. असें होतां होतां एक दिवस आपापले विचार स्पष्टपणें एकदम मांडावे व मग इतरांनी त्यावर आक्षेप असतील तर सांगावे अशा तऱ्हेची एक कल्पना निघून; बहुधा बडोद्याजवळच्या कोठल्या तरी मैदानांत अथवा कोणाच्या घरीं ह्या मंडळींचा हा नवा उपक्रम सहजतेनें सुरूं झाला. बहुधा 'केकावली' वर हा विद्यार्थी त्या दिवशीं बोलला. हें च पहिलें भाषण समजण्याला हरकत नाहीं. त्यानंतर मग ही मैदानीं भाषणें अनेक होऊ लागलीं. पूर्व पक्ष उत्तर पक्ष व्हावयाचे. एकामागून एक वक्ते बोलावयाचे. ज्याला जे सुचेल तें त्यानें सांगावयाचें. कोणी कोणी लिहून आणून वाचीत. कित्येक केवळ मुद्दे लिहून आणीत. मैदानांतलीं हीं व्याख्यानें, प्रवचनें पुढे पुढें गोपाळराव काळे, धोत्रे, वगैरेंच्या माडीवर हि व्हावयाची. बैठक घातलेली असे. रात्र झाली असल्यास तेथें एखादा कंदील हि असे. कधीं कधीं अंधारांत ही भाषणें चालत. ह्या भाषणाच्या कलेंत हि त्या विद्यार्थ्याची सहज च विलक्षण प्रगति झाली. डेमॉस्थिनीस किंवा बर्क अगर विवेकानंद, सुरेंद्रनाथ बॅनर्जी ह्या वक्त्यांप्रमाणें वक्तृत्व हें अगदीं सरावांतलें होऊन गेलें. मात्र फरक इतका च कीं, वक्तृत्वाचे नाटकी बाह्योपचार मात्र येथें मुळींच नसत. विचारांच्या प्रचंड लोंढ्याबरोबर 'वाचमर्थोनुधावति' अशी भाषा सहज च अनुरूप निघे. विचार जवळ नाहीं आणि नुसत्या फुसक्या भाषेला आणि हावभावाला काय महत्त्व येईल? शाळेच्या अभ्यासांतून जीवनाच्या अभ्यासाची साधी चर्चा, ह्या चर्चेतून प्रमाणबद्ध वादविवाद, वादविवादांतून अस्खलित, विचारपरिप्लुत वक्तृत्वपूर्ण व्याख्यानें, अशी ही चढती पाह्यरी होती. ह्याशिवाय मंडळींतील कांही जण आपले विचार लिहून काढण्याच्या उद्योगांत ही मग्न असत. ह्या विद्यार्थ्याचा हि लिहिण्याचा अभ्यास वाढत चालला. कविता, निबंध, टीका—नाना तऱ्हेंचें अतिशय विस्तृत आणि उद्‌बोधक लिखाण तयार झालें. हें लिखाण पुढें सर्वच्या सर्व जाळून टाकण्यात आलें. श्री. धोत्रे हें हि लिहिण्यांत बरा च उत्साह दाखवीत. कित्येकांची या बाबतीतली चिकाटी मोठी विलक्षण असे. फडके हे निरनिराळ्या गोष्टी, निबंध, कविता, कादंबऱ्या लिहिण्यात गढलेलें असावयाचे. आपल्या लिहिण्यांत सुधारणा होवो किंवा न होवो, कोणी चांगले म्हणों कीं न म्हणों यांचा लेखनोद्योग आपला चालूं च असावयाचा. तावा वर ताव, पानावर पानें सारखी लिहून काढावयाची—असा ह्यांचा हा लेखनाचा 'निष्काम-कर्मयोग' असे! ह्या च सुमाराला एक हस्तलिखित मासिक काढण्यांत आलें. त्यांत ही

अनुक्रमणिका

मंडळी निरनिराळे लेख लिहीत. संभाषण, लेखन, वाचन, चर्चा, वादविवाद, व्याख्यान, प्रवचन इतके कार्यक्रम आतां होऊं लागले. आतां ह्या विद्यार्थ्यांच्या संमतीने “विद्यार्थी-मंडळ” ही संस्था काढण्यांत आली. संस्थेत दर आठवड्यात रविवारीं नियमानें व्याख्यानें होऊं लागलीं. पूर्वीचें अनियत स्वरूप जाऊन आतां नियत स्वरूप येऊं लागलें. त्यामुळें हीं व्याख्यानें ऐकण्याला विद्यार्थी हि बरे च जमूं लागले. होतां होतां गणपति उत्सव, शिवजयंत्युत्सव इत्यादि उत्सव होऊं लागले. अभ्यासासाठीं, विद्यार्थ्यांच्या सोयीसाठीं आतां आणखी एक नवीन उपक्रम सुरू केला. गणितादी विषय महिना चार आणे वर्गणी—म्हणजे केवळ दिव्याच्या खर्चापुरती वर्गणी—घेऊन रोज सायंकाळी दोन तास शिक्षणाचा वर्ग जाहीर रीतीनें उघडला ह्या वर्गाचा फायदा अनेक विद्यार्थी घेऊं लागलें. ह्या एकंदर व्यापामुळें संस्थेला स्वतंत्र जागा घेण्याची हि जरूरी भासूं लागली. त्याप्रमाणें एक स्वतंत्र जागा हि घेतली. आता पर्यंत ही मंडळी जी दिवसा जमत तीं रात्रीं ही कधीं कधीं संस्थेच्या जागेंतच निजूं लागली. तो एक लहानसा मठ असावा, असें त्या संस्थेस स्वरूप प्राप्त झालें. प्रत्येकाला तें आपलें माहेरघर च वाटे! केव्हां ही तेथें जा कोणी ना कोणी तेथें असावयाचें च. कधीं तेथें वादविवाद ऐकूं येई. कधीं संभाषण चाललेलें दिसें. कधीं हास्यविनोदाचे फवारे उडत कोणी एकमेकांशीं हलक्या आवाजांत गप्पा गोष्टी करीत. कोणी कांही अभ्यास करी कोणी एकाद्या पुस्तकाचें वाचन करी. कोणी वर्तमानपत्रें चाळीं. ‘युद्धस्य कथा रम्या’! त्या वेळीं चालूं असलेल्या युद्धाच्या च कोणी गोष्टी करीत. जर्मनीने अमुक शहर घेतलें. सेनापती मॅकेन्सनचा अमुक डाव दिसतो. जनरल जॉफ्रे आतां अशी हालचाल करील—अशा त्या सगळ्या गोष्टी असत. संध्याकाळीं वर्ग चालत. रविवारीं व्याख्यानें व्हावयाचीं. अशा त्या वर्दळीमुळें बरा च कचरा झाला म्हणजे एक दोन दिवसांनी एकाद्या सेवापरायण विद्यार्थ्यानें सगळी झाडझूड करावी. रस्त्यावरच्या नळावरून माठ भरून ठेवावा. बैठक घालून ठेवावी. कंदील पुसावा. तेथील शिकवण्याचें फळें ही खडूनें घाण झालेले असत ते काळेभोर करून ठेवावे. इतक्या गडबडींत कोणी तेथें कधीं कधीं आसनप्राणायामादि हि करीत. ह्या मंडळींच्यापैकी, बहुतेकांनी आपआपल्या घरचीं वाचनीय पुस्तकें येथें आणून ठेवलीं. तीं संस्थेला कायमचीं च देऊन टाकलीं. वर्तमानपत्रें, मासिकें, चिकटबुकें हि येथें ठेवलीं गेलीं.

**मराठा तितुका मेळवावा ।**
**आपुला हा महाराष्ट्र-धर्म वाढवावा ।**
**ये विषयीं न धरितां तकवा ।**
**पूर्वज हांसति ॥**
**निश्चयाचें बळ । तुका म्हणे ते चि फळ ॥**

इत्यादी साधुसंतांच्या सुंदर सुंदर म्हणी चिकटवल्या गेल्या. घरोघर फिरून पुढें संस्थेसाठी अनेक ग्रंथ जमविण्यांत आले. सुमारे दोन हजार उत्तम पुस्तकांचा संग्रह असा फुकट करण्यांत आला. पुस्तकांसाठीं कपाटें ठेवलीं. लायब्रेरीयनचें काम ही एकाने आपल्याकडें घेतलें. हीं पुस्तकें जमवितांना तोंड वेंगाडणें, जी हां करणें, येन केन प्रकारेण पुस्तकें लोकांकडून काढणें, असला प्रकार तर मुळींच नव्हता. उलट हा विद्यार्थी स्पष्ट सांगत असे, “हीं पुस्तकें पुन्हां परत मिळावयाची नाहींत. आम्ही वाटेल तें करूं. जाळून सुद्धां टांकू. अशा परिस्थितींत देत असाल तर द्या.” इतक्या निस्पृहपणें हीं पुस्तकें मिळवलीं होतीं. त्यांत बहुतेक मराठीचा च भरणा होता. कांही इंग्रजी, गुजराती व हिंदी पुस्तकें हि होतीं. हीं सर्व पुस्तकें पुढें साबरमती च्या सत्याग्रहाश्रमास देऊन टाकण्यांत आलीं. तेथून महात्माजींनीं ती अहमदाबादच्या म्युनिसिपल लायब्ररीला देऊन टाकली. त्या लायब्ररींतींल महत्त्वाच्या पुस्तकांमध्यें ह्या विद्यार्थ्यानें किती तरी खुणा केल्या होत्या. रामदास, तुकाराम, वामन, मोरोपंत, एकनाथ, नामदेव, ज्ञानेश्वर—तमाम महाराष्ट्र

अनुक्रमणिका

विचारकांचे विचार तपासून पाहिलें होते. लायब्ररींतून पुस्तकें नेण्यासाठीं आतां आणखी विद्यार्थी येऊं लागले. रात्रीच्या वर्गांत जे विद्यार्थी येत त्यांना ही येथली साप्ताहिक व्याख्यानें ऐकण्याची इच्छा होणें स्वाभाविक होतें. विद्यार्थ्यांची ये जा अशी वाढूं लागली. आणि 'विद्यार्थी-मंडळ' हे तत्त्व येथे पूर्ण अर्थानें सार्थ होऊं लागलें. जरी हें नांव ह्या संस्थेला रीतसर दिलेलें होतें व त्याप्रमाणें पाटी ही लावली होती, तरी नेहमींच्या बोलण्यांत जो तो 'संस्था' असा च उल्लेख करी. 'विद्यार्थी-मंडळ' हें नांव बोलण्यांत वापरलें जात नसें. 'कोठें चालला?' 'जरा संस्थेवर जाऊन येतो', अशी च संभाषण पद्धति असे.

ही संस्था आतां स्वाभाविकपणे च पुष्कळांच्या परिचयाची झाली. तेव्हां पोलिसांच्या नजरेतून ती कशी सुटणार? तरुण मंडळी आणि संस्था स्थापतात! त्यांत पुन्हां नाटक, गाणें-बजावणें, वगैरे कांहीं नाहीं. सगळा विचारांचा च व्याप, त्या अर्थी कांहीं तरी राजद्रोहाचा प्रकार असला च पाहिजे. असला संशय सहज च बळावला. या तरुणांचीं नांवें पोलिसांच्या 'काळ्या लिष्टांत' जाऊन पडली. मधून मधून शेजाऱ्या पाजाऱ्यांना पोलीस येऊन विचारीत. येथें कोण कोण येतात; काय काय करतात? कित्येक वेळां भाषणें चालूं असतां रस्त्यांतून च आनंदराव नामक पोलिस फौजदार तीं ऐकत उभे रहात. पोलिसांच्या ह्या चौकशीनें येथे कोण घाबरून जाणार? उलट तो एक गंमतीचा च विषय झाला.

इतकें गंभीर विचार ज्या अर्थी ही मंडळी करीत, ज्या अर्थी संस्था स्थापून संघटना करण्याचा त्यांनी प्रारंभ केलेला आहे, त्या अर्थी सहज च ही मंडळी येथे केवळ पोक्त माणसासारखीं वावरत असतील, असे कोणी अनुमान केल्यास तें साफ चुकीचे ठरेल. कित्येक वेळां ही सर्व मंडळी बालकवत् धांवणें, उड्या मारणें, मस्ती करणें असे प्रकार करीत. अभ्यासाच्या निमित्ताने यावयाचे आणि चार चार तास मस्ती च चालली आहे, हा त्याला ढकलतो, तो त्याला ढकलतो, कोणी पाय च ओढतो, कोणी दंडावर बुक्के च मारतो असें दृश्य पुष्कळ वेळां दिसे. बाळू गोळे वगैरे धिपाड आणि अडदांड विद्यार्थ्याचा मस्तीकडे कल विशेष च असावयाचा. केवळ संस्थेवर च नव्हे, घरी सुद्धां ही मंडळी जमली म्हणजे माडीवर मस्ती सुरू होई. धक्काधक्की, रेटारेटी, चालली म्हणजे कोणाला भान राहतें? खालीं हि गडबड ऐकूं आली म्हणजे आई ओरडावयाची. मग थोडासा फरक पडे. घरीं पागेदार नांवाचे विद्यार्थी कांही दिवस राहिले होते. त्यांची आणि ह्या विद्यार्थ्याची जी झोंबी चाले ती 'न भूतो न भविष्यति'. हे पागेदार स्वभावाने अतिशय गरीब स्वभावाचे होते. त्यामुळे आईचें कोमल मन अधिक च दुखावें. तिला असे वाटे कीं हा दुसऱ्याचा मुलगा स्वभावाने अतिशय गरीब. तो आपल्या येथे राहिला तर त्याला आपल्या मुलाने असें मस्ती करून त्रास देणें किती वाईट आहे. त्या मुलाला तर केवळ फुलासारखे ठेवले पाहिजे. ह्याबद्दल कधीं कधीं आई बोले हि. परंतु, त्या पागेदारांना ह्याचे कधी कांही वाटणें शक्य च नव्हते. एकदां हा विद्यार्थी आणि धोत्रे नामक सोबती फिरावयास चालले होते. रस्त्यांत च रेटारेटी सुरू होऊन कुस्ती झाली. धोत्र्यांना खालीं दाबून हा विद्यार्थी वर बसला. तो रस्ता जरा एकीकडचा असल्याने तिकडे जाणारी येणारीं माणसें कमी असत. तरी कांहीं माणसें जमलीं च. येथे भांडण दिसते, मारामारी तर प्रत्यक्ष पाहतो परंतु कोणी कांही बोलत नाही. विरोधाचा दुसरा कोणता च प्रकार नाहीं हें पाहून ती मंडळी निघून गेली.

हा विद्यार्थी प्रत्येक बाबतींत ह्या विद्यार्थी मंडळांत श्रेष्ठ होता. त्याची बुद्धि, त्याचें लेखन, त्याचें वक्तृत्व, त्याचें वैराग्य, त्याच्या योजना, कोणत्या हि बाबतींत दुसरे विद्यार्थी ह्याची बरोबरी करूं शकत नव्हते. तरी ह्या दुसऱ्या विद्यार्थ्यांचा हि साधना ह्या दृष्टीनें फार उपयोग झालेला आहे. ह्यांत गोपाळराव काळ्यांसारखे तर्ककुशल, श्री. बेडेकरांसारखे अतिशय निष्ठावान्, मोघ्यांसारखे संसारविचारी, धोत्र्यांसारखे भावनावश, बाळू गोळ्यांसारखे दणगट, फडक्यांसारखे चिकाटीचे, देशपांड्यांसारखे भाविक,

तगाऱ्यांसारखे मार्मिक विद्यार्थी असत. पांचा मुखीं परमेश्वर ह्या म्हणीप्रमाणें हा विद्यार्थी-समुदाय ईश्वरी अधिष्ठानावर सहज च उभारला गेला. एका दृष्टीने अशी मंडळी एकत्र जमणें ही कांहीं साधारण गोष्ट समजतां येणार नाहीं. त्यांत पुन्हां एकत्र जमून, संस्था स्थापून सर्वांनी आपल्याला कार्याच्या, ज्ञानाच्या, धाग्याने बद्ध करून घेतले. ही गोष्ट तर सहसा कोठें च आढळावयाची नाहीं.

**ब्राह्मण मंडळ्या मेळवाव्या । भक्तमंडळ्या मानाव्या ।**
**संत मंडळ्या शोधाव्या । भूमंडळीं (दासबोध १९ ६/१४)**

ह्या विद्यार्थी-मंडळ संस्थेत हें समर्थवचन केंद्रीभूत झालेलें दिसून आलें. गृहसंस्थेंतून निघून ह्या व्यापक संस्थेत ही मंडळीं आली. ह्या विद्यार्थ्याबरोबर हीं बांधली गेली. गृहसंस्थ्या ही व्यक्तिपोषक संस्था म्हटल्यास ही संस्था प्राधान्यानें विचारपोषक होती. ह्यापुढील कार्यक्षेत्रांत प्रवेश करण्याची ही पूर्वतयारी होती. ह्यापुढें ह्या विद्यार्थ्याबरोबर जी मंडळी राहिली त्यांनीं कित्येकांनी जरी विवाह केले तरी त्यांचें घर सुटलें तें सुटलें च. सूर्य प्रखर तेजानें तळपत असतो, तो असा अखंड जळत असतो म्हणून इतरांना उष्णता मिळते. ह्या विद्यार्थ्याची धांव थेट मोक्ष-साधनेपर्यंत भिडली तेव्हां आसपास घर सुटून सेवाकर्माची कांहीं ऊब मिळाली. आणि ज्यांनी ज्यांनी कांहीं विचार येथें ऐकले, त्यांनी जरी प्रत्यक्ष घर सोडलें नाहीं, अगर प्रत्यक्ष सेवाकर्मात ते पडलें नाहींत, तरी ह्या विद्यार्थी-मंडळातलें ते विचार त्यांना उपयोगी पडल्याशिवाय राहिले नसतील यांत शंका नाहीं. कारण विचारासारखी कल्याणप्रद वस्तु दुसरी कोणती दाखविणार? खरोखर हें विद्यार्थीमंडळ म्हणजे विचारमंडळ च होतें. इतरांना कांहीं हि वाटो; परंतु शुद्ध तर्कावर, शुद्ध विचारावर ह्या विद्यार्थ्यांची फार मोठी श्रद्धा असे. आचार्यांचें हि असें च नव्हतें का?

**श्रुतिमतस्तर्कोनुसंधीयताम् ।**

आचार्यांनी ही आज्ञा स्पष्टपणें दिली च आहे. विचाराचा ह्या विद्यार्थ्याला विलक्षण आधार वाटतो. विचार करीत, मनन करीत रहावें हें च सुख, ह्या सुखलाभानें अनेक दुःखें—मोठमोठीं दुःखें पार विरघळून जातात. हा येथें प्रत्यक्ष अनुभव असे. विद्यार्थी-मंडळांत हा अनुभव त्यावेळीं प्रामुख्यानें येत असे. आणि भगवंतांनी हि तो सांगितला आहे. ते विद्यार्थी-मंडळ आतां अस्तिवांत नसलें तरी तो अनुभव भगवंतांनी सांगितल्याप्रमाणें वाढत्या प्रमाणांत स्पष्टपणे पुढें उभा आहे. तेव्हां तें विद्यार्थी-मंडळ आतां गेलें असें तरी कसें म्हणावें? अनुभवरूपानें तें पुढें आहेच

**सुखमात्यंतिकं यत्तद्बुद्धिग्राह्यमतीद्रियम् ।**
**वेत्ति यत्र न चैवायं स्थितश्चलति तत्त्वतः ॥**
**यं लब्धा चापरं लाभं मन्यते नाधिकं ततः ।**
**यस्मिन्स्थितो न दुःखेन गुरुणापि विचाल्यते ॥**

●●●

अनुक्रमणिका

## प्रकरण १६ वें

# पूर्व - तयारी

**"ऐ मुसाफिर** कूचका सामान कर" — नज़ीर कवी चें हें वचन आतां रात्रंदिवस ह्या विद्यार्थ्याच्या रूपानें प्रकट होऊं लागलें. पुढची तयारी, गृहत्यागाची तयारी, अतिशय वेगानें सुरू झाली. आजचा दिवस हा उद्याच्या तयारीसाठीं आहे. रात्रीची विश्रांतीसुद्धां उद्यांच्या उद्योगासाठीं आहे. हा आठवडा म्हणजे पुढील आढवड्याची तयारी; हा पंधरवडा म्हणजे पुढील पंधरवाड्याची तयारी करण्यासाठीं; हा महिना पुढील महिन्यांसाठीं; हा ऋतु पुढील ऋतुसाठीं; हें वर्ष पुढील वर्षासाठीं; हें जीवन पुढील जीवनासाठीं—अशी ही कार्यकारणाची अखंड सांखळी च आहे. एका कोंबांतून दुसरा, दुसऱ्यांतून तिसरा असा हा सनातन न्याय आहे. आणि हा न्याय का उगीच च निर्माण झाला आहे? नाहीं. ह्या अनंत, सनातन आत्मतत्त्वाचा आपल्या ठिकाणीं आविष्कार अनुभवण्यासाठीं हा सिद्धांत उप्पन्न झाला. अत्यल्पसें बीज, परंतु कोशावरणाचा भेद करून तें त्या विशाल आकाशाचा अनुभव घेण्यासाठीं वर येतें. एक पान फुटलें, दुसरे आणखी फुटलें, त्यांतून कोंब निघावा असें करतां करतां तें विकासाच्या अत्युच्च पायरीला जातें. तेथें फलपुष्पपल्लवांनीं तें डोलूं लागतें. अनेक द्विजगणांचीं संगीत संमेलनें मग त्याच्या शाखांवर होऊं लागतात. त्याच्या सुगंधानें वेडावून भक्तभृंग तेथें रुंजी घालूं लागतात. त्या एका बीजाची अनेक बीजें होतात. माझा अंत च नाहीं, मी अनंत आहे. मी अल्प नाहीं, मी विशाल आहे. मी मर्त्य नाहीं, मी अमर आहे. मी क्षुद्र नाहीं, मी भव्य आहे. मी सुंदर नित्यशुद्ध बुद्ध मुक्तस्वरूप आहे. हा अनुभव तेथें प्रतिबिंबित होतो. ऋषि एवढ्यासाठीं च तर विशाल वृक्षाच्या गूढ छायेंत तद्रूपतेनें ध्यान करीत नसतील? एका अल्प बीजाची ही कथा मग प्रतिभावान् पुरुषाची धांव केवढी मोठी असेल बरें? तो बाल्यकालांत असतो, त्याच्याबरोबर अनेक बालकें असतात. तो मोठा होतो, इतरहि मोठे होतात. परंतु इतरांच्या आणि त्याच्या मानसिक विकासांत केवढें अंतर पडतें? जेथें इतर जागेवरच्या जागेवर तेथें हा पार कोठल्या कोठें निघून जातो. त्याची मनोदशा इतरांना कल्पनेंने हि आकलन करवत नाहीं.

### वृद्धा : शिष्या गुरुर्युवा

अशी त्याची स्थिती होण्याचें हि हें च कारण. तो दिसण्यांत बाल असून वृद्धाहून वृद्ध ठरतो. आणि हें दिसावयाला वृद्ध परंतु त्याच्यापुढें केवळ बालवत् ठरतात. असा तो महान् आत्मा—विद्युद्‌गतीनें विकसित होणारा तो थोर पुरुष घराच्या लहानशा वातावरणांत कसा मावेल बरें? त्याचा आत्मा तेथें थोड्या च वेळांत गुदमरूं लागतो. ह्या देहांत सुद्धां त्याला कोंडल्यासारखें होतें. तो देहगेहाचा स्नेह राखूं च शकत नाहीं. घरांत केवळ गरीबींत काळ कंठणारी वृद्ध आई; तिला कोणाचा हि आधार नाहीं. अशा स्थितींत सुद्धां, आठव्या च वर्षीं आचार्यांना त्या घरीं राहवेना. ते आईला गंभीरपणें वारंवार म्हणत, "आई, मला जाऊं दे, मला संन्यास घेऊं दे." "पण बाळा, मला तूं एकटा च आहेस, तूं गेल्यावर मी कोणांकडें पाहून दिवस कंठूं?" असें तिचे करुणोद्‌गार ऐकून आचार्य कुंठीत होत. असे वारंवार होई. शेवटीं एक दिवस त्यांनी आईला सांगितले, "हें माते, मी घराबाहेर गेलों तर च जगेन, हा गृहग्राह मला मारीत आहे. येथें मी गुदमरत आहे." आईनें तत्क्षणीं परवानगी दिली. एक क्षण हि आगेमागें गेला नाही. येथें आचार्य निष्ठुर होते असे का म्हणावयाचें? त्यांच्या गृहत्यागानें मातेचा आणि मुलाचा एकदम विकास झाला.

अनुक्रमणिका

ह्या विद्यार्थ्याचें घर योग्याचें च. त्यांत तिळमात्र शंका नाहीं. सर्व परंपरा मंगल. सर्व माणसें पवित्र. आई तर केवळ बोधाची मूर्ति! घरचा कोणता हि पाश नाहीं. पूर्ण मुक्तदशा. पण तेथें हि हा आत्मा मावूं शकला नाहीं. आतां हें घराचें कोशकवच फोडून बाहेर येण्याची प्रेरणा वारंवार होऊं लागली. पूर्ण निश्चय च झाला. त्यासाठीं तयारी जोरानें होऊं लागली. विद्यार्थीमंडळांत मित्रांशीं चर्चा होऊं लागली. शंकरराव तगारे आणि बेडेकर हे ह्या गृहत्यागाच्या तयारीं त सामील झाले. त्यांनी हि गृहत्यागाचा निश्चय केला.

**"आतां कोण पाहे मागे परतोनी । गेले हारपोनी देहभाव"**

—ह्या तयारींत देहभान हारपून गेलें. आतां मागें पाहणें च सरलें. सारखें पुढें च पहावयाचें. बुद्ध भगवान् गृहत्याग करण्याच्या तयारींत असतांना, त्यांचें चित्त मागेपुढें एकसारखें हेलकावें खात होते. लंबक एकदां ह्या दिशेला एकदां त्या दिशेला असें चाललें होते. चित्त एकसारखे दोलायमान होत होते. पण येथें तसें मुळीं च नव्हतें. येथें अगदी निश्चित बुध्दि होती. आचार्यांना हि एकट्या आईला टाकून जाणें जड पडलें. तसें येथें कांही च नव्हतें. घरून परवानगी मागावयाची, मग कदाचित्, अडथळा व्हावयाचा, असल्या भानगडी मुळीं करावयाच्या च नाहीत. सरळ कोणाला न विचारतां, कोणता हि मागमूस न लागेल अशा रीतीनें निघून जावयाचें अशी निश्चित योजना ठरली.

आतां ती संन्यासाची परमरमणीय अवस्था डोळ्यांमध्ये प्रतिबिंबित झाली. त्या अवस्थेंत चित्त दंग झाले. ठिकठिकाणीं तो संन्यासी फिरतो आहे. यद्दच्छालाभसंतुष्ट वृत्तीनें 'करतल भिक्षा तरूतल वास :' अशा अपरिग्रहवृतीनें त्याचें दिवस केवळ आनंदांत एकामागून एक जात आहेत.

**कौपीनवंतः खलु भाग्यवंतः**

ही भाग्यदशा बाणून गेलेली आहे. घरदार, आपलें गांव, आप्त-इष्ट यांची आठवण आता मुळीं च उरलेली नाही. श्रेयोमार्गात अग्रेसर होत होत एकसारखे विचरण, एकसारखे परिभ्रमण चाललें आहे, जनता जनार्दनाला—ह्या महादेवाला प्रदक्षिणा घालणें चाललें आहे. सर्वत्र नारायणाचें च दर्शन तो घेत आहे. तो नारायण त्याला कधीं बालरूपानें दिसतो आहे. कधीं तो स्त्री होऊन डोक्यावर विहिरीचें पाणी आणतो आहे. क्वचित तो रस्त्यांत भाजी विकावयास बसला आहे तर कोठें त्यानें मोठमोठीं दुकानें खोललीं आहेत. कोठें तो राजैश्वर्यांत निमग्न झाला आहे तर कोठें तो दरिद्री महारोग्याचें जीवन कंठीत आहे. कोठें हि जा त्याचें च दर्शन होत आहे. पशुपक्षी, वृक्ष-वनस्पती सर्व कांहीं तो च आहे. आकाश हि तो च आणि पृथ्वी हि तो च, तारे हि तो च आणि वारे हि तो च, सुंदर हि तो च आणि कुरुप हि तो च, बालहि तो च आणि वृद्ध हि तो च. सर्व स्थावर-जंगम पदार्थात हा संन्यासी त्याचेंच दर्शन घेत आहे.

**सब मे रम रहा प्रभु एकाकी ।**
**पेख पेख नानक बिहसाई ॥**

सर्वत्र त्या मंगलमूर्ति नारायणाला पाहून हा संन्यासी हर्षानें भरून गेला आहे. त्याला आतां दुसरें कांही च नाहीं. सर्वत्र आनंद! आनंद!! आनंद!!!

**संपूर्ण जगदेव नंदनवनं सर्वेऽपि कल्पद्रुमा**

अनुक्रमणिका

**गांगं वारि समस्त वारिनिवहः पुण्याः समस्ताः क्रियाः ।**
**वाचः प्राकृत संस्कृत श्रुति शिरो वाराणसी मेदिनी**
**सर्वावस्थितिरस्य वस्तुविषया दृष्टे परब्रह्मणि ॥**

ह्या संन्यासी अवस्थेनें, परिव्राजकवृत्तीनें, विश्वकुटुंबक भूमिकेनें अंतःकरण भरून गेलें त्याबरोबर अध्यात्म ग्रंथांचा अभ्यास हि तीव्र वेगानें पुढें पुढें चालला. शाळेंत फ्रेंच भाषा घेतल्यामुळें संस्कृतचें ज्ञान नव्हतें. गोपाळराव काळ्यांनीं संस्कृत घेतलें होते. त्यामुळें त्यांना संस्कृतची माहिती होती. त्यांच्याकडून संस्कृत भाषेची सामान्य सरणी समजावून घेतली. ज्या भाषेंत हजारों वर्षांचा बिनमोल आध्यात्मिक अनुभव सांठविलेला ती भाषा जरूर शिकली पाहिजे. त्या भाषेंतील साहित्याची मोठीशी पर्वा नाहीं परंतु वेदउपनिषद् सूत्रग्रंथादि ऋषींच्या बहुमोल अनुभवाच्या लाभासाठीं ती भाषा थोड्या च वेळांत हस्तगत करून घेतली. भगवद्गीतेच्या अध्ययनाला सुरुवात केली. उच्च स्वरानें घोषपूर्वक आतां गीता म्हटली जाऊं लागली. ती जवळ जवळ पाठ च झाली. ब्रह्मसूत्रांत हि प्रवेश झाला. त्या वेदान्तात चित्त लीन झालें.

भारतवर्षाच्या भूगोलाचा हि कसोशीनें अभ्यास चालूं झाला. परिव्राजकाला सगळीकडची माहिती पाहिजे म्हणून नकाशे चाळले जाऊं लागले. अमुक स्थळ अमुक स्थानापासून किती मैल येईल? रेल्वे कोणकोणत्या ठिकाणीं जाते? रस्ते कसकसे आहेत? नद्यांना उतार कोठें कोठें आहेत? अरण्यस्थानें कोणती? हें सर्व अभ्यासलें गेलें स्नेह्यांशीं आतां कित्येक तास ह्या च प्रश्नोत्तरांची चर्चा चालूं लागली. एकमेकांना माहिती विचारून ती पक्की करावयाचीं. राहिलेला कच्चेपणा काढून टाकावयाचा. असा यांत उद्देश्य असे. काश्मिरपासून कन्याकुमारीपर्यंत चा सगळा प्रदेश आतां लक्ष्यांत आला. सर्व तीर्थें, सर्व ऐतिहासिक ठिकाणें, सर्व थोर पुरुषांची वसतिस्थानें मनश्चक्षूंसमोर नाचूं लागलीं.

**समुद्र इव गांभीर्ये धैर्येण हिमवानिव ।**

ह्या दोन उपमांत कवीनें जसा सर्व भारतवर्ष समावून घेतला, खालीं हिंदी महासागर आणि वर हिमालय— ह्या दोहोंत सर्व भारतवर्ष समाविष्ट झाला, त्याप्रमाणें आतां ह्या एका च मस्तकांत

**नीलसिंधुजलधौतचरणतल**
**अनिल विकंपित श्यामल अंचल**
**अंबर चुंबित भाल हिमाचल ।**

समाविष्ट होऊन गेला. अशा ह्या तयारीच्या पुढें कॉलेजचें वातावरण केवळ विषवत् होऊन गेले. तेथें नांवापुरतें जावयाचें. एका हि पुस्तकाला हात लावावयाचा नाहीं. आतां ह्या निरुपयोगी शिक्षणाचा सगळा संसर्ग आपोआप सुटत चालला. फळ परिपक्व झालें की फांदीपासून सुटावयाचें च. शाळा, कॉलेज, घर ह्या वस्तु येथें नांवाला च राहिल्या होत्या. येथें केवळ देह होता.

**जो संसारव्ययें फिटला । नैराश्यें विनटला ।**
**व्याधाहातोनि सुटला । विहंगमु जैसा ॥**

अनुक्रमणिका

ज्ञानेश्वरांच्या ह्या उपमेप्रमाणें मन आतां पक्ष्याप्रमाणें दूरदूर विहार करूं लागलें होतें. हिमालयाच्या अत्युच्च शिखरांवर ते सहज विराजमान होई.

**यद्‌गत्वा न निवर्तंते तद्धाम परमं मम ॥**

अशा मंगलधामाकडे ते ओढ घेत होतें.

ही स्थिति वडील आणि त्यांची स्नेही मंडळी ह्यांच्या कांहीं शी लक्ष्यांत येऊं लागली होती. पण त्यांत पुष्कळ विपरीत समज होता. बंगालच्या क्रांतिकारकांप्रमाणें ह्याचे ज्वलज्जहाल विचार कोणत्या थराला जातील त्याचा नेम नाहीं, असें त्यांस वाटे. शरीरहि अतिशय कृश झालेलें होतें. त्यामुळें हि चिंतेची छटा उमटून जाई. वडिलांचे स्नेही घरीं जमले म्हणजे क्वचित् दुरून दुरून कांही प्रश्न विचारीत. परंतु त्यांना थांगपत्ता मुळीं च लागत नसे. वडील मात्र कांही च विचारीत नसत. वडील कानपूरला गेलें असतां मागें त्यांचें स्नेही डॉ. जोगळेकर ह्यांच्याकडे राहणें असे. त्यांना बुद्धिबळाचा अतिशय नाद होता. त्यांच्याबरोबर कधीं कधीं बुद्धिबळें खेळण्याचा योग येई. तेहि क्वचित् प्रश्न विचारीत. शंकरराव तगारे त्यांच्या च कडें रहात. परंतु शंकररावांच्या कडून हि कांहीं एक कळत नसे. ह्या मुलांची लोकविलक्षण वृत्ति पाहून सर्वांना विस्मय वाटे. भर पावसांत छत्र्या बंद करून ही मंडळी खुशाल रस्त्यांतून पांच पांच मैल फिरत. इतर वेळीं हि आंगावर नुसता सदरा उपरण्यासारखा पांघरून फिरावयाचें. घरीं केवळ मौनी रहावयाचें. घरचा संबंध शक्य तितका टाळावयाचा. मित्रमंडळींत एकसारखी खलबतें व्हावयाची. इत्यादि गोष्टींवरून वडिलांच्या स्नेही मंडळींत हे तरुण बंगाली क्रांतिकारकांच्या रस्त्याला लागणार असा समज झाला होता. ह्यांची वैराग्यशील वृत्ति हा क्रांतिकारकांच्या कंटकपणाचा अभ्यास असावा असे त्यांस वाटे. शिवाय अतिशय एकाग्रतेमुळें कित्येक वेळां नित्यक्रम हि राहून जात. आठ आठ दिवसांत कित्येक वेळां स्नान हि केलेलें नसावयाचें. मग कपड्यांची ओज ठेवण्याची गोष्ट च काय? तसें पहावें तर कित्येक वेळां दोन दोन तास स्नान च चाले. मित्रांबरोबर बुद्धिबळें खेळण्यांत गढून गेल्यावर ५/५ तास हि सहज निघून जात. बाळू गोळ्यांसारखी मंडळी पोहावयास सुरसागर तलावांत जात तर तेथेंच पांच पांच तास डुंबत रहात. हठयोगाच्या, प्राणायामाच्या, धौतीबस्तीच्या अभ्यासांत कॉलेज मध्यें हि जावयाचें नाहीं. कधीं कधीं व्यायामाची लहर लागली म्हणजे हातांत कुऱ्हाड, करवत घेऊन गल्लींत दारोदार फिरून लांकडें फोडण्याची मागणी करीत. लोकांना साहजिक च आश्चर्य वाटे. कॉलेज मधलें हे तरुण आणि लांकडफोड्याचा व्यायाम घेतों म्हणतात हें काय—ह्या सर्व मंडळींच्या अशा गोष्टींचा वडील मंडळींस मुळी च उलगडा होत नसे.

वैराग्याच्या तीव्रतम अवस्थेंत, विचारांच्या तुफान वादळांत, साधनेच्या उन्मादावस्थेंत समत्वाची अपेक्षा च करतां येत नाहीं. नदी वेगानें वाहूं लागली म्हणजे ती सरळ कशी वाहील? झंझावाताच्या झपाट्यांत झाडें उन्मळून पडावयाची च. ज्वालामुखीच्या जळजळींत रसापासून मलयागरुच्या शीतलतेची अपेक्षा करतां येईल काय? गर्भ बाहेर येतांना मरणप्राय वेदनांनीं आसपासचें वातावरण व्यस्त करून टाकतो. आयुष्याची दिशा, मनाची भूमिका, हृदयाचा भाव, एकदम संक्रामणावस्थेंत असतांना आसपास त्या उलटापालटीची छटा उमटल्याशिवाय कशी राहील? आणि तिने आसपासचें जग गोंधळून जाईल यांत तरी आश्चर्य काय? खुद्द ‘विद्यार्थी-मंडळांतल्या’ अनेक मित्रांना सुद्धां या गृहत्यागाची नीटशीं कल्पना येऊं शकली नाहीं, तेथें इतरांची काय कथा? आणि हें अगदीं स्वाभाविकच आहे. अशा गोष्टींची कल्पना येण्याला

अनुक्रमणिका

निराळ्या च वंशांत जन्म घ्यावा लागतो. बुद्ध आणि शंकराचार्य, ज्ञानेश्वर आणि समर्थ अशा महापुरुषांना च ह्याचे रहस्य समजून उलगडा व्हावयाचा. ह्या बाबतींत तुकोबांचें वचन येथें किती उत्तम लागू पडते!

**तुका म्हणें तेथें पाहिजे जातीचे । येरा गबाळाचे काम नाहीं ॥**

[अनुक्रमणिका]

## प्रकरण १७ वें

## अथातो ब्रह्मजिज्ञासा

**सर्व** तयारी झाली. निश्चित केलेला गृहत्यागाचा दिवस जवळ जवळ येऊं लागला. ज्या दिवसाच्या कल्पनेंत अनेक दिवस घालवले, ज्या दिवसाच्या कल्पनेंत सगळी कल्पनाशक्ति खर्च केली तो दिवस आतां अगदी जवळ च आला. रोज सूर्य अस्ताला जाई आणि सकाळीं पुन्हां सूर्याचा उदय होई. तो त्या दिव्य दिवसाच्या जवळचा प्रत्येक दिवस, प्रत्येक सूर्योदय, प्रत्येक सूर्यास्त, कल्पनातील आनंदानें रंगलेला असे, Kingdom of God is at hand —ह्या उक्तीची साक्ष आतां अंतःकरणाला पटूं लागली. घरांतून निघून जाणें हीं तर एक सामान्य क्रिया आहे. अनेक कारणांनीं अनेक जण आजपर्यंत घरांतून निघून गेलेलें आहेत. परंतु गृहत्यागाच्या पाठीमागची जी भव्य भूमिका आहे त्या भूमिकेमुळें ह्या गृहत्यागाला महत्त्व आहे. क्रियेचें महत्त्व नाहीं. क्रियेपाठीमागच्या भूमिकेचें महत्त्व आहे. त्या भूमिकेचें कोणत्या शब्दांत वर्णन करावें? येथें खरोखर भाषा लटकी पडते. ह्या गृहत्यागांत कोणकोणत्या गोष्टी समावल्या होत्या हें कसें सांगणार? हा मायेचा पूर्ण त्याग होता. खरोखर येथें माया अशी नव्हती च. मायेच्या छायेचा गृहरूपानें नुसता भास होता. तो आंता ह्या दिवसाच्या रूपानें निघून जाणार होता. नाणें तयार झालें. मुशींतून तावून सुलाखून लखलखीत होऊन बाहेर पडलें. आतां त्याच्यावर राज्याचा फक्त छाप पडणार असा हा दिवस होता. शक्तिशाली सम्राटाची सत्ता च त्याच्या सर्वत्र अधिकाराची द्वाही फिरवीत असते, ही गोष्ट खरी; पण राज्याभिषेकाचा विधि हा करावा लागतो च, तो च हा दिवस होता. तलवार आजपर्यंत म्यानांत होती. ती तलवार च; ह्यांत तिळमात्र शंका नाहीं. तिच्यांत कांहीं च कमीपणा नव्हता. परंतु आंता ह्या दिवसाच्या रूपानें ती उपसली जावयाची होती.

**अङ्गशस्त्रेण दृढेन छित्त्वा—**
**ततः पदं तत्परिमार्गितव्यम्**
**यस्मिन्गता न निवर्तन्तिति भूयः ।**

हें आतां ह्या दिवसाच्या रूपानें फक्त उघड व्हावयाचें होतें. म्हणून ह्या दिवसाला एवढें महत्त्व. तो दिवस कसला? ती ध्यानमूर्ति—तो आनंदाचा ठेवा च होता! म्हणून च त्याची—

That darling dear
Coming near and near
Smiling glancing
Singing and dancing

अशी मार्गप्रतिक्षा!

गृहत्यागाच्या ह्या दिवसाच्या अगोदर च शंकरराव तगारे ह्यांनी घर सोडलें होतें. त्यांची परीक्षा होऊन गेलेली होती. व तींत ते नापास झाले होते. डॉ. जोगळेकरांच्याकडे ते रहात असत. ते आतां सरळ पूर्वी ठरल्याप्रमाण काशीला निघून गेले. परंतु डॉ. जोगळेकरांना वाटलें कीं हा विद्यार्थी नेहमीप्रमाणें परीक्षा

अनुक्रमणिका

झाल्यावर सोलापूरला आपल्या काकांकडे गेला असावा. पण काकांचें पत्र आलें कीं 'तो तेथें आलेला नाहीं.' बडोद्याहून तर रवाना झाला पण सोलापूरला गेला नाहीं म्हणून डॉ. जोगळेकर व शंकररावांचें काका ह्यांना फार काळजी लागली. झालें. जिकडे तिकडे विचारपूस, चौकशी सुरू झाली. जेथें काहीं माहिती द्यावयाची नाहीं असें मित्रमंडळींत ठरलेलें होतें तेथें प्रश्न च काय? कोणी हि आपणांस कांहीं माहिती असल्याचें सांगेना. जातांना शंकररावांना पोंचविण्यासाठीं विद्यार्थी गेलें होते ते डॉ. जोगळेकरांनी पाहिलें होतें. त्यांनी विद्यार्थ्यांना विचारलें. "आम्हांला काय माहीत? आम्ही नुसते गप्पा करीत स्टेशनपर्यंत फिरण्यासाठीं गेलों होतो." असें त्यावर उत्तर आलें. ग्रहणाचें वेध आधींपासून सुरू होतात. किंवा प्रत्यक्ष सूर्योदयाच्या अगोदर अरुणाचा उदय होतो; त्याप्रमाणें च हें शंकररावांचे झालें. ते ह्या विद्यार्थ्याच्या अगोदरच रवाना झाले.

आतां हा विद्यार्थी आणि बेडेकर राहिले. यूनिव्हर्सिटीच्या इंटरमीजिएटच्या परीक्षेसाठीं म्हणून मुंबईस जावयाचें होते. तो दिवस येऊन ठेपला. ह्या परीक्षेला गोपाळराव काळे हि जावयाचे होते. सामानाची बांधाबांध झाली. संध्याकाळीं बेडेकर एकदां घरीं येऊन गेले. त्यानंतर धाकट्या भावानें सहज विचारलें "मुंबईहून न परत येण्याला किती दिवस लागतील?" त्याला कांहीं च उत्तर मिळालें नाहीं. नंतर जेवण झालें. बरोबर वडील आणि धाकटे दोघे भाऊ हि स्टेशनपर्यंत गेले. गोपाळराव काळ्यांनीं तिकिटें काढलीं. तो रात्रीचा समय. ती गृहत्यागाची गंभीर घडी होती. पण त्याची कल्पना फक्त गोपाळराव, बेडेकर वगैरेंशिवाय कोणाला च नव्हती. गोपाळराव काळ्यांनीं तिकिटें काढलीं खरी. पण ती सर्व मुंबई ची नव्हतीं. स्वतःचे फक्त मुंबईचे. बाकीचीं सुरतेची होती. पण सुरतेचें तिकिट आपण घेऊन मुंबईचें ह्या विद्यार्थ्याच्या हातांत दिलें. वडिलांच्या सूक्ष्म नजरेंत सुरतेचे तिकिट दिसूं नयें म्हणून ही खबरदारी गोपाळरावांनी घेतली होती. रात्रीच्या ९ वा. च्या गाडींत गोपाळरावांसह हा विद्यार्थी बसला. गाडी क्षणार्धांत चालूं झाली. पार दिसेनाशीं झाली. तें घर, कॉलेज, बडोद्याची ती मित्रमंडळी, आतां भराभर मागें टाकून गाडी भर वेगांत निघून जात होती. आकाश नुसतें फुललें होते. आपल्या हजारों नेत्रांनीं तें ह्या प्रसंगाकडे टक लावून पहात असेल काय? झालें. बडोदे निघून गेलें. आणि एकदम पडदा पडला. हा एक नवाच जन्म झाला. मरणानंतर जुनें सर्व कांहीं पुसल्यासारखें होतें. तसें च येथें झालें. आतां सर्व व्यावहारिक विषयांना तिलांजली दिली गेली. तेथून नवा प्रांत सुरू झाला. सुरतेला उतरून निराळ्या गाडींत बसून काशीच्या त्या पुरातन क्षेत्रांत आतां हे दोघे ब्रह्ममार्गाचे प्रवासी दाखल झालें. त्यांचे सोबती शंकरराव तगारे तेथें आधीं च गेलें होते. बालपणांत ब्रह्मचर्याच्या प्रतिज्ञेंत हि असे च दोघे सोबती (दोघे आतेभाऊ) बरोबर होते आणि आतां ह्या गृहत्यागाच्या प्रसंगांत हि ह्या दोघांनी साथ दिली. हा योगायोग च नव्हे काय?

इकडे मुंबईस परीक्षा झाली. मुंबईहून वडिलांना एक पत्र आलें. ते गोपाळरावांना तेथून टाकण्यास दिलें होतें. त्यांनीं परीक्षा झाल्यावर तें टाकलें, "मी प्रवासास जात आहे. माझी काळजी करूं नये; प्रवासाशिवाय शिक्षणाची पूर्तता होत नाहीं असें पाश्चात्य शिक्षणशास्त्रज्ञांचें हि मत आहे. माझा हा प्रयत्न इतरांना जरी कोणाला पसंत पडला नाहीं तरी निदान 'दासबोधाला' तरी तो खचित पसंत पडेल ह्यात शंका नाही!"—अशा आशयाचें तें बरे च मोठें पत्र होतें! वडिलांना त्या पत्राचा प्रथम कांहीं दिवस नीट उलगडा झाला नाहीं. त्यांना असें वाटलें कीं हे सर्व विद्यार्थी मिळून परीक्षा झाल्यानंतर कोठें प्रवासाला गेलेलें दिसतात. ५/१५ दिवसांत परत येतील. परंतु ५/१५ दिवस कशाचे? परीक्षेस गेलेलें इतर सगळें विद्यार्थी बडोद्यास परत आलें. त्यांचे नित्याचे व्यवहार सर्व सुरू झाले. पण ह्या विद्यार्थ्याचा पत्ता नाही. बेडेकर हि नाहींत आणि शंकरराव तगारे तर अगोदर च गुप्त होऊन गेलें होते. तेव्हां वडील त्या आलेल्या पत्राचें पुनःपुन्हां वाचन करून त्याच्या अर्थाचा तलास करूं लागले. व मग हा गृहत्याग च असावा अशी च त्यांच्या

अनुक्रमणिका

मनाची खात्रीं होऊं लागली. परंतु गंभीर स्वभाव असल्यामुळें तें त्यासंबंधीं विशेष चिंता प्रकट करीत नसत. आईच्या हृदयाची मात्र कालवाकालव होऊन गेली. तिचे हृदय अगदी विदीर्ण होऊन गेले! वडिलांनी इतर विद्यार्थ्यांच्याकडें चौकशीला सुरवात केली. गोपाळराव काळ्यांना विचारलें. पण त्यांनीं मुळीं च दाद लागू दिली नाहीं. एक महिना गेला, दुसरा महिना गेला. जिकडे तिकडे हळूं हळूं ही बातमी पसरली. निरनिराळ्या मंडळींचें निरनिराळें तर्क सुरूं झाले. कोणी म्हणूं लागले, हा हुशार विद्यार्थी परीक्षेंत नापास झाल्यामुळें वाईट वाटून पळून गेला असेल; कोणी तर त्यानें कोठें जीव दिला असेल अशी हि कल्पना केली. बेडेकरांच्या घरीं त्यांची आई आणि लहान भाऊ तेवढा होता. त्या आईला आपला मुलगा गुप्त झाल्याचें किती दुःख झालें असेल? पण करणार काय? तिने हि आपल्याकडून होईल तेवढी चौकशी करवली. पुढें एक दिवस काशीच्या गुप्त पोलीसाकडून त्या त्रिमूर्तीविषयीं माहिती कळवण्याबद्दल बडोद्याच्या पोलिस खात्याला लिहून आलें. तेव्हां बडोद्याचें आनंदराव फौजदार वडिलांच्याकडें तपास करीत करीत आले. आणि अशा रीतीनें हें तिघें काशीला आहेत हें कळलें. पुढें थोड्या च दिवसांत ह्या विद्यार्थ्यांचें आणखी एक कार्ड काशीहून आलें. त्यांत काशीला जाऊन आपण संसार सोडला आहें असें स्पष्ट कळवलें होतें. इतर लोक काशीला जाऊन एकादें नावडते भोपळ्या सारखें क्षुद्र फळ सोडतात. येथें सर्व मायावृक्षाचें बीजभूत संसारफळ पूर्ण सोडून दिल्याचें कळविण्यांत आलें. त्या च पत्रांत "ब्रह्मजिज्ञासा" हें आतां आपले एकमात्र लक्ष्य असल्याचें हि कळविलें होते. 'ब्रह्मजिज्ञासा' 'ब्रह्मजिज्ञासा' हे शब्द त्या पत्रानें सर्वांच्या कानावर ठसून गेलें. पाण्याचा लोट निघून गेला तरी जमिनीवर ओल तशी च राहते. किंवा गाणें संपलें तरी त्याचें सूर परिणामरूपानें कानांत घुमत रहातात. त्याप्रमाणें तें पत्र वाचलें, ठेवून दिलें. त्यावर पुष्कळ दिवस निघून गेलें तरी 'ब्रह्मजिज्ञासा' 'ब्रह्मजिज्ञासा' हें शब्द तसे च डोळ्यांपुढें लखलखीत उभे राहिलें. त्या शब्दांचा जोर मुळीं च कमी झाला नाहीं. फळाबद्दल मूळ ओळखावयाचें, परिणामावरून साधनाची परीक्षा करावयाची, कार्यावरून कारण तपासावयाचें पण येथें 'ब्रह्मजिज्ञासा' ह्या शब्दावरून काय बोध होणार? ब्रह्मजिज्ञासे ची कल्पना कोणाला असणार? ह्या संसारचक्रांत दैनंदिन गतीनें तशाच त्याच त्याच क्रिया पुनः पुन्हां करीत भ्रमण करण्याची एक च जडता ज्यांच्या ठिकाणीं भरून राहिली आहे त्या सामान्य जीवांना 'ब्रह्मजिज्ञासा' शब्दानें काय उलगडा होणार? प्रत्येकाला ह्या शब्दानें एक आश्चर्ययुक्त, जबरदस्त धक्का बसला. भकास आकाशाच्या पोकळींत केवळ "शून्य! शून्य!! शून्य!!!" —दुसरा कसला च भास होत नाहीं. त्याप्रमाणें ह्या ब्रह्मजिज्ञासेनें सर्वांची शून्यावस्था होऊन गेली. कोणते हि दृश्य फल हा शब्द दाखवित नव्हता. "न तत्र चक्षुर्गच्छति न वाग्गच्छति" अशी च सर्व इंद्रियांची येथें अवस्था झाली. आणि हें ध्येय खरोखर असें च होते. येथें सचराचर सर्व सृष्टि लटकी च पडली पाहिजे. कशाची हि मात्रा येथें चालावयाची नाहीं "नैषा तर्केण मतिरापनेया" येथें कोणता हि तर्क लंगडा ठरावयाचा. अशा त्या लोकविलक्षण ध्येयाला हा पुरुष आपलें लक्ष्य समजून तीराप्रमाणें त्याचा वेध घेण्याला निघून गेला. आपल्या अपूर्व बुद्धिमत्तेची सर्व ऐहिक फळें तुच्छ समजून त्यानें एकदम ब्रह्मजिज्ञासेची गांठ घेतली.

**आणीक दुसरें मन नाहीं आतां ।**
**नेमिलिया चित्ता पासूनियां ॥**
**पांडुरंग ध्यानीं पांडुरंग मनीं ।**
**जागृति स्वपनीं पांडुरंग ॥**
**पडिले वळण इंद्रियां सकळां ।**
**भाव तो निराळा नाहीं दुजा ॥**

अनुक्रमणिका

—ही अध्यात्मदशा येथें बाणून गेली. आतां वेदान्ताला शिरोधार्य म्हणून सर्वाच्या अग्रभागीं चमकणारें ते एक च दिव्य सूत्र रोमरोमांत स्फुरण पावूं लागलें.

**अथातो ब्रह्मजिज्ञासा ।**

अनुक्रमणिका

# प्रकरण १८ वें

## काशी

**बडोद्याहून** एकदम काशीकडें प्रयाण करण्यात त्या पुरातन पुण्यक्षेत्राची महनीयता व तेथें दडलेली ब्रह्मविद्येच्या परंपरेची अनेक पवित्र स्मरणें हीं हि कारणें असतील च, परंतु जगात ज्याच्या पार्थिव उंचीलासुद्धा तुलना नाहीं, मग आध्यात्मिक उंचीची गोष्ट च कशाला? त्या कैलास पर्वतावर, त्या परम पवित्र हिमालयावर आतां आपलें कायमचे विचरणस्थल करावें ह्या दृष्टीनें मधला टप्पा म्हणूनच बहुधा काशीला प्रयाण केलें. उत्तरोत्तर उच्च भूमिका गांठावयाची ही च एक अभिलाषा आतां मनांत होती. त्याप्रमाणे बडोदे—काशी—हिमालय अशी ही त्रिविक्रम दृष्टि सहजच बनून गेली. आतां दक्षिण दिशा नाहींच. उत्तरोत्तर वरवर जावयाचें हें च एक ध्येय राहिलें. पार्थिवतेचा पडदा गळून पडला. यमाची दक्षिण दिशा आतां नाहीं. आतां हे शरीर काशीविश्वेश्वराच्या—शिवाच्या—जवळ जात चाललें. शरीर हें शव आहे. ते शिवाशिवाय शून्य आहे. म्हणून तें त्याच्या परममंगल कैलासाकडे चाललें. मरणाला मारून टाकण्यासाठीं हीं तळमळ होती. कैलासापूर्वी काशीचा टप्पा ह्याच कारणासाठीं गांठला गेला.

**येक बळाचे निवडले । ते पोहत चि उगमाकडे गेले ॥**

प्रवाहांत वाहात जाण्यांत अर्थ नाहीं. प्रवाहाच्या विरुद्ध दिशेनें उगम गांठण्यांत पुरुषार्थ आहे. त्या परमपुरुषार्थासाठीं गंगेची हि प्रथम च गांठ घेतली. आपल्या उगमस्थानाच्या किती तरी गूढ कथा ती कलरव करीत करीत आजपर्यंत सांगत आलेली, एक तरी बालक आपल्या ह्या गोष्टी ऐकेल का? ह्या भावानें तिचा अखंड निनाद, अखंड प्रवाह, चालत च आलेला, शंकराच्या मस्तकांत ती राहिलेली, तेथल्या त्या उच्च विचारांचे अनंत संदेश देण्यासाठीं ती किती उत्सुक! पण प्रत्येक वेळीं 'नचकश्चित श्रृणोति माम्' हा च बहुधा तिला अनुभव यावा. तरी सुद्धां ती केवळ करुणेची मूर्ति आपल्या बालकांना जागृत करण्यासाठीं एकसारखी वहातच राहिली. शतकेंच्या शतकें अज्ञानाच्या गाढ अंधकारांत निजून राहिलेल्या ह्या बालकांपैकीं कोणी जागेल का? ही च तिची आशा. पण आतापर्यंत

**किं निःशंकें शेषे शेषे वयसि त्वमागतौ मृत्यौ ।**
**अथवा सुखं शषीथा निकटे जागर्ति जान्हवी जननी ॥**

असल्या हालचाली पलीकडे तिला जागृतीची चिन्हें फारशी दिसलेलीं नाहींत. भारत वर्षांत जो जो बालक जन्माला येई त्या प्रत्येकाकडें ती पहात आलेली. हा आपलें ज्ञान ग्रहण करील का? —नाहीं. मग हा दुसरा? —तो हि नाही. मग आतां हा तिसरा तरी? किती कालपर्यंत तिनें अशी वाट पाहिलेली अशा अत्यंत आतुर अवस्थेंत! हा धगधगीत वैराग्याचा पुतळा, जागृतीची जागृति बाणलेला हा ब्रह्मनिष्ठ बालक पाहून तिच्या भावनेचा पूर किती वाहिला असेल ह्याची कल्पना तरी करतां येईल का? आणि तिच्या त्या करुणेनें भरलेल्या गूं-गूं-गूं आवाज करणाऱ्या बोधानें ह्या बालकाची तरी काय अवस्था झाली असेल?

ज्यावेळीं कोणी चिटपांखरूं सुद्धां नसावयाचे अशा वेळीं, रात्रीं तीन वाजतां च ह्याने गंगेवर येऊन बसावें, तिच्या थंडगार पाण्यांत किती तरी वेळ स्नान करावें आणि बिंदुमाधव घाटावर ध्यान करावें. तेथें

कोणीं नाही—दुसरे कोणीं नाहीं—एक हा बालक आणि ती माता! अथवा हे दोघे तरी कशाचे? तेथें केवळ निरामय एकताच असे.

**“प्रेमगली अति सांकडी। उसमें दो न समाय”**

त्या गंगाकाठीं काव्यें रचावीं. आणि कागदावर लिहून ती नदीच्या प्रवाहांत सोडून द्यावी असा नित्यक्रम असे. लहानपणीं होड्या करून बालकें पावसाच्या ओहोळांत सोडून देतात. मातेने त्या होड्यांचे कोडकौतुक करावे तसा च हा प्रकार होता. ती काव्यें पाहून गंगामातेला केवढा हर्ष झाला असेल? ह्या च गंगेच्या पाण्यांत बरोबर आणलेली गणिताचीं पुस्तकें टाकून दिलीं. तें गणित आतां माझ्या जीवनांत राहूं दे. त्या पुस्तकांचा भार आतां नको. नको त्या पुस्तकांची आसक्ति. अशा रीतीने गणपति-विसर्जनाप्रमाणें येथें गणिताचें विसर्जन करण्यांत आले.

**दर्शन, स्पर्शन, मज्जन, पाना**

तुळशीदासांच्या कल्पनेप्रमाणें गंगाजीवनाच्या चतुर्विध लाभामुळे हृदयांत दडलेलें सूक्ष्म खळमळां चे हि येथें क्षालन केलें गेले.

काशीला शंकरराव तगारे, बेडेकर ह्यांसह राहण्यास एक जागा पाहिली. प्रसिद्ध तात्या टोपेंची बहीण खुर्देकर घराण्यांत दिलेली होती. तिच्या मोठ्या वाड्यांत माडीवर जागा मिळाली. ती तात्या टोपेची बहीण अगदीं जख्ख म्हातारी झालेली होती. त्या भयाण वाड्यांत जुन्या युगाची केवळ एक अस्पष्ट छाया च ती. तेथें ती केवळ एकटी च रहात असे. तिनें वर राहण्यासाठीं जागा दिली. कोठे तरी दुपारचे जेवण जेवावें, संध्याकाळीं पैशाचीं रताळीं व दही घेऊन खावें, आणि दिवसभर अध्यात्मचिंतनांत, ब्रह्मसूत्रादि ग्रंथ वाचनांत, गंगाकाठी ध्यान करण्यांत, अथवा काव्यें रचण्यांत मग्न असावे असा कार्यक्रम असे. वर्तमानपत्रें वाचावीं; आपापसांत चर्चा करावी. असेंहि घडें. काशींतल्या कित्येक पंडितांची हि गांठ पडे. परंतु न्यायव्याकरणावर बारा बारा वर्षे फुकट घालविण्याला हा ब्रह्मनिष्ट पुरुष कधीं च तयार नव्हता. तेव्हां त्यांचे यांचे जमावें कसें? शब्दजालाच्या महारण्यांत आंधळ्या हत्तीप्रमाणें भ्रमण करणाऱ्या त्या पंडितांच्या अर्थशून्य घटपटाच्या वादविवादांत चित्त तल्लीन होण्याची मुळीं च शक्यता नव्हती. तरी पण क्वचित् त्यांच्या सभेंत हि जाण्याचा योग येई. एकें ठिकाणी एकदां अशी च एक पंडितांची सभा होतीं. विषय द्वैत आणि अद्वैत हा नियुक्त केलेला होता. द्वैतवाद्यांनी अद्वैत वाद्यांवर आणि अद्वैतवाद्यांनीं द्वैतवाद्यांवर यथेच्छ झोड उठवली. प्रत्येकानें पांडित्यप्रकर्ष प्रकट करण्याची हौस भागवून घेतली. वाद कांही केल्या मिटेना. तेव्हां ह्या ब्रह्मनिष्ठ पुरुषाने शेवटीं मोजकी एक दोन वाक्यें च सांगितली. “निदान अद्वैताचें तरी कोणाशींच भांडण नको. कारण अद्वैत म्हणजे च मेळ” अशा आशयाची ती वाक्यें होती. पण ह्या लहानशा व्याख्यानानें दोन्ही बाजूच्या पंडितांना आनंद झाला. अद्वैतवादी पंडित म्हणालें तुम्ही आज आमची बाजू चांगली सांभाळली. द्वैतवादी म्हणाले, तुम्ही अद्वैतवाद्यांचे बोलणें च मोडून काढलें—असे गमतीचे प्रसंग मधून मधून घडत.

काशी हे क्षेत्रांचे ठिकाण असल्यामुळें तेथें इतर क्षेत्रांप्रमाणे गलिच्छपणा आणि ओंगळपणानें कायमची च वस्ती केलेली असे. रस्ते अगदीं अरुंद, पायखानें घाणेरडे, गंगेंत गटारें, भिकाऱ्यांचे तांडे, महारोग्यांचा सुळसुळाट—त्यामुळें प्रकृतीची नीट काळजी घेतली नाहीं तर परक्या माणसाला तर फार च भीति असे. हे तिघे तरुण तर अशा तऱ्हेने घराच्या बाहेर कधीं च राहिलेलें नाहींत. त्यांची शरीरें कंटक

अनुक्रमणिका

खरी. पण खाण्यापिण्याचें हाल असें कधीं च झाले नव्हते. त्यामुळें आणि शरीराकडें दुर्लक्ष्य केल्यामुळे, तिघांची हि प्रकृति एकसारखीं खालावत जात होतीं. अंगांत ताप असला तरीं त्याची पर्वा अशीं कोणीं च करूं नये. नित्यक्रमांत कांहीं च फरक करावयाचा नाहीं. विश्रांती, औषधपाणीं, विशेष आहार-विहार, असें कांहीं च नाहीं. असें कितीं दिवस चालावयाचे? साधक झाला म्हणून त्याचे प्रकृतिधर्म बदलतील काय? त्यांतून स्वतःच्या शरीराच्या कंटकपणावर ज्यांचा विश्वास त्या बेडेकरांचीं तर ह्या मनोवृत्तिमुळें अतिशय दैना झालीं. बेडेकरांचे शरीर पिळदार, नदींत पोहण्यांत पटाईत, लांब मजला मारणें, धांवणें, लांकडें फोडणें, पाणीं भरणें, हे सर्व त्यांच्या सरावांतलें. त्यामुळें आपल्याला कोणतेहि अन्न सहज पचवितां येईल; अशी त्यांचीं वृत्ति असे. अपचन झालें तरीं सावधगिरीं रहात नसे. असें करतां करतां त्यांची प्रकृति ढांसळूं ‘लागली. क्षीणता वाढत चालली. डायरिया झाला. अन्न मुळींच पचेना. औषधोपचार सुरू झाले. परंतु, प्रकृति मुळीं च ताळ्यावर येईना. शक्य तितके सर्व उपचार केले. परंतु व्यर्थ. कशाचा हि उपयोग होईना. चाळींस चाळींस वेळां शौचास होऊं लागलें. इतकें असून हि घरीं परत जाण्याचीं इच्छा त्यांना स्पर्श करूं शकली नाहीं. इतके च काय पण आपल्या आजाराचीं हकीकत घरीं कळवावीं असें हि कधीं त्यांनीं म्हटलें नाहीं.

**अर्थ वा साधयेत् । देहं वा पातयेत् ।**

हीं च धीरोदात्त वृत्ति शेवटपर्यंत त्यांची होती.

**मरणं प्रकृतिः शरीरिणाम् ।**
**विकृतिर्जीवितमुच्यते बुधैः ।**

मरण हें प्रतिक्षणीं पाठीस लागलेलें च आहे. परंतु वीर पुरुष आपल्या धीरवृत्तीने मरणाला मारून टाकतो. त्याचें प्रत्यक्ष उदाहरण येथें मिळालें. आपल्या परमपूज्य मित्रावरची निष्ठा त्यांची लवमात्र ढळली नाहीं. त्यांना मित्रमंडळी नेहमी ‘भोळे’ ह्या नावानें हांक मारीत. “भोळे, तुला कसे काय वाटतें? तुझ्या आईला बोलवावें काय? तुला कोणाला भेटण्याची इच्छा होते? तुझा भाऊ तुझ्या सेवेला हवा ना?” असें किती प्रश्न त्याला विचारले गेले असतील. पण तेथें एक च निष्ठा बाणली होती. आपल्या त्या थोर मित्राविषयी गुरुतुल्य भावना बनून गेली होती. हालअपेष्टा, भयंकर आजार किंवा दुसरी कोणती हि आपत्ति त्या निष्ठेला यत्किंचित् हि चलित करूं शकत नव्हती. तेथें अतिशय कष्ट असून अतिशय समाधान होतें. तेथें आतां आई, बाप, भाऊ ही माया उरली च नव्हती.

**त्वमेव माता च पिता त्वमेव ।**
**त्वमेव बंधुश्च सखा त्वमेव ।**
**त्वमेव विद्या द्रविणं त्वमेव ।**
**त्वमेव सर्वं मम देवदेव ॥**

ह्या च एका दिव्य भावानें ते आपल्या श्रेष्ठ मित्रांकडे पहात असत. शेवटचा क्षण आला दिवा मंद मंद होत चालला. आईला तार करून मृत्यूची हकीकत तेवढी कळविण्यास त्यांनी सांगितली आणि अत्यंत शांत चित्तानें प्राण सोडला!!!

अनुक्रमणिका

बेडेकर गेले ही बातमी बडोद्याला त्यांच्या आईला कळविण्यांत आली. त्या विधवा बाईला त्यामुळें किती दुःख झालें असेल ह्याची कल्पनाच केलेली बरी. काशीला आतां त्रिमूर्तिपैकीं दोघेच राहिले. बेडेकरांप्रमाणें च शंकरराव तगाऱ्यांस हि क्षीणता येत होती. थोड्या च दिवसांत पुन्हां ते एकटे च पडले. त्यांचा कर्णधार प्रवासासाठीं निघून गेला. त्या च सुमाराला गायकवाड सरकारसाठीं हत्ती खरेदी करण्यासाठीं म्हणून डॉ. जोगळेकर या बाजूला आले होते. त्यांनी शंकरराव तगाऱ्यांचा काशींत पुष्कळ शोध केला आणि त्यांची भेट घेतली. तापामुळें अशक्त झालेलें. बरें च दिवसांत स्नान नसल्यामुळें मलिन दिसणारे, हजामत वाढलेली, आवाज खोल गेलेला, असे ते शंकरराव पाहिल्याबरोबर डॉक्टरांना अतिशय वाईट वाटलें. त्यांनी परत बडोद्याला चलण्याविषयीं पुष्कळ आग्रह केला. त्यांनीं तें ऐकलें नाहीं. तथापि शंकररावांची भूमिका डळमळीत होती, हें निःसंशय. डॉक्टर बडोद्यास परत गेले. त्यानंतर कांही दिवसांनी शंकरराव हि बडोद्यास निघून आले. नंतर पूर्ववत् कॉलेजमध्यें शिकून ते संसारांत हि प्रविष्ट झालें.

दक्षिण आफ्रिकेंतून येऊन नुकता च कोचरबला महात्माजींनी आश्रम स्थापन केला होता. त्यावेळीं महात्माजी ऐवजी देशभक्त गांधी म्हणण्याचा प्रघात होता. त्यांच्या आश्रमाची नियमपत्रिका काशीला हातांत पडली. त्या पत्रिकेमुळें ह्या ब्रह्मजिज्ञासूच्या मनावर बराच परिणाम झाला. लगे च महात्माजींना अध्यात्मविषयक शंकांचें एक पत्र लिहिलें गेलें. "पत्रोंपत्रीं असल्या शंकांना उत्तर देणें कठीण आहे. तुम्ही आश्रमांत येऊन कांहीं दिवस रहा म्हणजे आपल्याला बोलतां येईल", अशा आशयाचें महात्माजींकडून उत्तर आलें. आणि एकदम काशीहून मथुरा, वृंदावन, वगैरे करीत कोचरब येथील सत्याग्रहाश्रमांत प्रयाण केलें गेलें. येथें हिमालयाचा खरा अर्थ लक्षांत आला "स्थावराणां हिमालय." ह्या भगवद्वाक्याचा अर्थ येथें उलगडला गेला. 'स्थिर वस्तूंत मी हिमालय आहे'—असें भगवान सांगतात. चित्ताची स्थिरवृत्ति हाच खरा हिमालय. ह्या हिमालयाच्या — स्थिरवृत्तीच्या उत्तुंग शिखरावर चढून जनतेचें, सर्व हिंदुस्थानचे विविध दर्शन येथें मिळालें. येथून च गांधींच्या नवयुगाची स्मृति अभ्यासली गेली. श्रुतीमध्यें रमणाऱ्या बुद्धीनें या स्मृतीचे आदरपूर्वक परिशीलन केलें. आणि हें स्पष्ट दाखवून दिलें कीं हिमालय हिमालय म्हणतात तो मी च आहे. तो पार्थिव हिमालय माझ्यापुढें किती क्षुद्र आहे. त्याची ती भासिक उत्तुंगता ही मी च त्याला दिली आहे.

**"अंगामुळें चि माझ्या गंगा पवित्र झाली ।**
**उंची हिमालयाला माझ्यामुळें मिळाली ॥"**

●●●

अनुक्रमणिका

## प्रकरण १९ वें

# कर्मयोगाची कसोटी

“**सर्व** कर्माखिलं पार्थं ज्ञाने परिसमाप्यते” —सर्व कर्मांची पूर्णता ज्ञानामध्यें च होतें. तो च त्याचा हेतु असतो. परंतु ज्ञान झालें म्हणजे कर्म थांबतें असें नाहीं. ज्ञान हें पुन्हां कर्मांत च प्रवृत्त होतें. फरक इतका च कीं तें सिद्धकर्म होते. तेथे अपेक्षा कशाची च नसते. सहजतेनें सर्व व्यापार आपोआप बिनबोभाट चाललेला असतो. कर्म कोणते हि असो; ज्ञान्याचें कर्म कांहीं निराळ्या च शैलीनें हो असते. तेथें कर्मांत आवडनिवड कांही च नसते. अगदीं साध्या झाडण्याच्या कामापासून तों थेट आचार्याच्या अध्यापनकार्यापर्यंत यच्चयावत् कर्मे तो करतो. परंतु तेथें एक च अनासक्ति, तन्मयता बाणून गेलेली असते. कर्म चांगलें व्हावें, अतिशय वेगानें व्हावें, पण अहंकाराची लेशमात्र छटा उमटूं नये. यत्किंचित हि बोज मनावर ऊरुं च नये. अशा कांही लोकविलक्षण तऱ्हेनें त्याचें कर्म होत असतें. त्या कर्माला कोणती उपमा देणार? तें कर्म च नव्हे. ती मूर्तिमंत उपासना! ज्ञानाचा आविष्कार!! ती कलेची कला आणि सौंदर्याचें सौंदर्य!!!

**अग्निमाजीं गेले । अग्नि होऊनियां ठेलें ॥**

कर्म होऊन हि तें कर्म नव्हे. त्या कर्माकडे पाहून कोण संतुष्ट होणार नाहीं? शंभर नंबरी सोन्याची कसोटी पाहिल्याबरोबर सोनार आनंदित झाला नाहीं असें घडेल काय? —येथें हि असेंच झालें.

काशीहून आल्याबरोबर कोचरबच्या आश्रमामध्यें कर्माच्या कसोटीवर ह्या ब्रह्ममार्गी पुरुषाचें ज्ञान परिक्षिलें गेलें. येथें त्याची कसोटी लागली. घरीं अभ्यासादि परिश्रम तर अखंड चाले पण कधीं च कोणते हि काम करण्याची संवय नाहीं. येथें यच्चयावत् आश्रमाची कामें अंगावर पडलीं. स्वयंपाक करणें, दळणें, पाणी ओढणें, झाडणें, भांडी घांसणें, निवडणें, खणणें, पायखानें साफ करणें, विणणें —अशीं कामें कोणकोणती सांगणार? पांच पंचवीस माणसांच्या आश्रमांतली तीं अनेक तऱ्हेचीं कामें असत. तशांत डोळें बिघडलेले. चष्मा हि नाहीं. काशीच्या वाईट हवेमुळें, कष्टामुळें, आधीं च क्षीण असलेलें शरीर अधिक च क्षीण होत चालले. परंतु आश्रमांत दाखल झाल्यापासून अव्याहत अव्यंग कर्मयोगाला सुरुवात करून दिली. विश्रांति, प्रमाद, आळस यांचा मागमूस हि नाही. त्या पहिल्या सहा महिन्यांत हातांत पुस्तक धरलें नाहीं. अथवा वर्तमानपत्र हि वाचलें नाहीं. सदोदित एक च गोष्ट. कर्म—कर्म आणि कर्म! अथवा वर्तमानपत्र हि वाचलें नाहीं. सदोदित एक च गोष्ट. कर्म—कर्म आणि कर्म!

**श्री एकनाथ सदनीं माधवजी सर्व काम तें करितो ।**
**स्वकरें चंदन घाशीं गंगेचे पाणि कावडी भरितो ॥**

असाच हां देखावा नव्हे काय? महात्मा गांधींना हि एकनाथांची उपमा किती यथार्थतेनें लागू होते! त्या कोचरबच्या सत्याग्रहाश्रमांत असा सुंदर कर्मयोग चाललेला होता.

सकाळपासून संध्याकाळपर्यंत एकामागून एक कार्यक्रम लागलेला असे. त्यांत कधीं च खंड पडावयचा नाहीं. कस्तुरबा गांधींच्या स्वयंपाकघरांत पुष्कळसें काम करावें लागे. त्यांचा स्वभाव प्रेमळ परंतु

अतिशय तीव्र असे. दक्षिण अफ्रिकेपासून गांधीजींच्या नाना प्रकारच्या प्रयोगांमुळें त्या कांहींशा त्रासिक दिसत. त्यांच्या हाताखालीं काम करणें म्हणजे एक मोठी च कठिण गोष्ट असें कित्येक मानीत. परंतु येथें सर्व कामें बिनचूक केली गेली आणि कस्तुरबांविषयींचा आदर उत्तरोत्तर वृद्धींगत होत गेला. त्यांचा स्वभाव तीव्र तर खरा च. परंतु जगन्मातेची मंगलता आणि पवित्रता त्यांच्या ठिकाणीं मूर्तिमंत अवतरलेली दिसे. गांधीजीसारख्या महापुरुषाच्या सान्निध्यांत राहिल्यानें त्यांचे केवढें परिवर्तन झालेलें होते! त्यांच्या ठिकाणीं सेवा, भक्ति आणि निरलसता तर असामान्य कोटीची दिसे!

आपलें काम करीत असतांना इतर मंडळी आपापसांत गप्पागोष्टी हि करावयाची. परंतु येथें सदोदित मौन च असे. बोलणें विचारलें तेवढ्यापुरतें च. आपलें कर्म नीट झालें पाहिजे, वेगानें झालें पाहिजे, त्याचें सर्व तंत्र, त्याची सांगोपांग घटना आपल्या हातीं आली पाहिजे, अशा रीतीनें कर्मांत निमग्न असावयाचें. कर्म जड होतां कामा नये. घाण्याचा बैल बारा बारा तास एकसारखा फिरतो म्हणून त्याला कर्मयोगी म्हणतां येणार नाहीं. कर्म सतत वेगानें, सहजतेने, सुंदरतेनें झालें पाहिजे. त्या कर्मावर सर्व बाजूंनीं आंतबाहेर ज्ञानाचा प्रकाश पडला पाहिजे. ह्या एका दिव्य बुद्धीने तीं स्वयंपाकादि सर्व कामें चालावयाचीं. अगदीं लखलखीत धुवून पुसून आरपार प्रकाश बिनहरकत मोकळेपणानें जाईल अशी कंदिलाची कांच रोज तयार करण्यांत येई. मग त्या दिव्याचा प्रकाश पडावयाचा. तो प्रकाश त्या कंदिलाचा म्हणावयाचा का? त्या प्रकाशामागें हा ज्ञानी कर्मयोगी दडलेला असे.

**"प्रज्वालितो ज्ञानमयः प्रदीपः"**

अशी उपमा मग तिथे कां सुचणार नाहींत? असेच प्रत्येक कामाचें असे.

नागोजी भट्ट काशीला अध्ययन संपवून महापंडित होऊन परत येत होते. त्यांना रस्त्यांत एक गांव लागलें. त्या गांवात एका घरंदाज माणसाचें घर त्यांनी पाहिलें. ते पाहिल्याबरोबर त्यांना काय वाटलें कोणास माहीत? पण त्यांनी एक निश्चय ठरविला. आणि त्या गृहस्थाच्या घरांत जाऊन मला नोकरी पाहिजे आहे अशी मागणी केली. गृहस्थानें विचारलें; कोणाची नोकरी पाहिजे आहे? काय काम करूं शकाल? त्यावर पाणी भरण्याचें काम मी करीन, तसें च झाडण्या लोटण्याचें सर्व साधारण कोणतेहि काम मी करीन, असें नागोजीने सांगितले. पगार कांहीच नको. दोन वेळां जेवण, एक स्वतंत्र खोली आणि रोज एक तांबली भर तेल इतकें मिळालें म्हणजे अधिक कांही नको असें हि नागोजींनीं सांगितलें. ती गोष्ट त्या गृहस्थांनीं कबूल करून नागोजीस नोकरीस ठेवलें. मग दिवसभर रोज त्यांनी पाणी भरावें, घरांतलीं सगळीं कामें करावीं आणि रात्र झाल्यानंतर हळूंच उठून आपल्या खोलींतला दिवा लावून दोन तीन तास अनेक शास्त्रांवर टीकाग्रंथ लिहावें, असा नित्यक्रम असे. मरेपर्यंत असें चाललें होते. ते मेल्यानंतर त्यांच्याविषयीं मग लोकांना खरी हकीकत कळली. लोक हळहळलें. ते जिवंत असतां त्या गावांत, त्या घरांत एका हि मनुष्याला कल्पना येऊं शकली नाहीं. हा जो पाणक्या दिसतो आहे तो महापंडीत असेल अशी शंकासुद्धा कोणाला आली नाहीं. येणार तरी कशी? नागोजी स्वतः कधीं च ओळख देत नसत. पडेंल तें काम करावें आणि न बोलतां रहावें अशी त्यांची दिनचर्या असे. हिरा कोळशांत लपलेला रहावा किंवा जमिनींत द्रव्य पुरलेलें असावें अथवा समुद्राच्या पोटांत रत्नाचा सांठा दडलेला असावा त्याप्रमाणें महापुरुष पुष्कळ वेळां अप्रत्यक्षपणें च जगांत वावरत असतो.

अनुक्रमणिका

**चातुर्य लपवी । महत्त्व हारवी ।**
**पिसेपण मिरवी । आवडोनी ॥**

ही ज्ञानेश्वरांची उक्ति येथें नागोजीभट्टांप्रमाणें परंतु स्वाभाविकपणें च लागू झाली. शरीर अति कृश डोळ्यांनी दिसावयाचें नाहीं, एका कानानें नीट ऐंकू येत नसे. सदोदीत कामांत असावयाचें. कोणाशीं कांही हि बोलणें नाहीं; त्या कोचरबमधील आश्रमांत पुष्कळांची समजूत हा एक अर्धवट वेडा मनुष्य असावा, अशा सारखी झालेली होती. निदान येथें

**शाब्दे परे च निष्णातः**

अशी भूमिका स्वयंसिद्धपणें विराजमान झालेली आहे याची तर कोणास च कल्पना नसे. कोचरबच्या सत्याग्रहाश्रमांत त्यावेळी गांधीजी बहुधा नेहमीच असावयाचें. हिंदुस्थानात त्यांच्या कामाचा व्याप दक्षिण आफ्रिकेप्रमाणे वाढलेला नव्हता. त्यामुळे त्यांचा सहवास भरपूर मिळे. ते हि सतत कर्मयोगांत निमग्न असत. दळण्याच्या कामापासून पायखान्याच्या कामापर्यंत सर्व कामांत त्यांचा भाग असे. वाढण्याचें काम तर नेहमी स्वतःच करीत, अशा त्यांच्या सहवासात.

**“ज्ञानामृत भोजनं”**

ह्या उक्तीचा साक्षात्कार व्हावा ह्यांत आश्चर्य काय? परंतु त्यांच्या नित्याच्या हालचालीखेरीज सर्व कामें संपल्यानंतर, सूर्यास्त झाल्यावर प्रार्थनेपर्यंत आणि प्रार्थनेनंतर हि वेळ उरत असे. त्यांत ते अनेकांच्या अनेक प्रश्नांना उत्तरें देत. तो वेळ बहुधा अशा संभाषणांत जाई तेव्हां तर ज्ञानाची मेजवानी च असे. त्या वेळीं जवळ च मागच्या बाजूस लीनतेनें बसावें, सर्व शरीराचें कान करून—अथवा शरीराचें कसले—जीवाचें कान करून त्यांचे अकृत्रिम परंतु ज्ञानगर्भ बोल ग्रहण करावे. स्वतः मात्र कांही च प्रश्न विचारूं नये. असा क्रम असे. जीवनासंबंधी चे तें नाना तऱ्हेचें महत्त्वाचे प्रश्न आणि त्यावरील निर्णय हृदयाच्या हृदयांत गंभीरपणें सांठवले जात. ते एकदां तेथें गेले म्हणजे कधींच तेथून निसटावयाचे नाहींत. प्राणापलीकडें त्यांचें जतन केलें जाई. खरोखर असा वक्ता आणि असा श्रोता दुर्लभच!

**आश्चर्यवच्चैनमन्यच्छृणोति । श्रुत्वाप्येनं वेद न चैव कश्चित् ॥**

असाच प्रकार इतरत्र व्हावयाचा! परंतु येथें सांगणारा आणि ऐकणारा एकरूपच होऊन जात. बापाचें धन स्वाभाविकपणें च मुलाला मिळावें, किंवा गुरूंचे ज्ञान शिष्याला लाभावे अथवा सर्व झाडाचा परिपाक फळांत उतरावा त्याप्रमाणें च येथें वक्ता आणि श्रोता ह्यांची परस्पर-जोडी जमली होती. “अर्जुनाला निमित करून भगवान्, आपणांस च गीता सांगत आहेत. अर्जुनं निमित्तीकृत्य आह भगवान् वासुदेव :” —असें शंकराचार्यांनीं गीताभाष्य केलें पण त्याचा प्रत्यक्ष आचार हनुमंतानें केला. हें भगवंतांचे बोल माझ्यासाठींच आहेत. अर्जुनाला निमित्त करून भगवान् मला च सांगत आहेत. अशी खूणगांठ बांधून रथाच्या वरच्या भागावर हनुमंत अगदीं तटस्थेनें गीता ऐकत होता. आणि ऐकणें झाल्यानंतर—गीता संपल्यानंतर हा थोर उपदेश आपल्याजवळ कायमचा राहिला पाहिजे ह्या हेतूनें त्यांनें तो तसाच्या तसा च पाठ म्हणण्यास सुरुवात केली. परंतु भगवंतांनीं युद्धाच्या गर्दींत गीता म्हणण्याला मनाई केली. व शेवटी सांगितलें की तूं ह्या स्वरूपांत गीता कोणाला सांगूं नको तेव्हां मग हनुमंताने युद्ध झाल्यानंतर पिशाच्याचें रूप धारण करून

अनुक्रमणिका

गीतेवर “पैशाचभाष्य” लिहिलें अशी एक रसिककथा हि सांगण्यांत येते. हनुमंताप्रमाणें च महात्माजींचें तें बोल इतरांच्या निमित्तानें आपल्याला च सांगितले आहेत अशा भूमिकेनें दिवसभर काम करीत असतां मनासमोर आणले जात. त्या विचारांचें सात्मीकरण करण्याची च ती क्रिया असे. कर्माशिवाय ज्ञान पचत च नाहीं. ते कर्माबरोबर च पचावयाचे. निष्काम शरीरपरिश्रमाने, सेवेनें, ज्ञानाचें पचन होतें. ह्या महात्माजींच्या विचाराखेरीज साधुसंतांची वचनें, गीता, उपनिषदें, ब्रह्मसूत्रें ह्यांचे हि चिंतन कामाबरोबर चालूं असे.

**चिंतनासि न लगे वेळ । सर्वकाळ करावे ॥**

हें च खरें! ज्ञानासाठीं म्हणून वेगळा वेळ देण्याची कांही च आवश्यकता नाहीं. कर्म हा चिंतनाचा सूर च आहे. तंबोऱ्याच्या सूराशिवाय गवयाचें गाणें होत नाहीं. तसें च कर्माच्या सुरावर चिंतनाच्या रागरागिण्या आलापिल्या जात. त्यामुळें कर्मांत माधुर्य निर्माण होई. कर्मांत श्रम वाटत नसे. कर्माचें स्वरूप च पालटून जाई. चिंतनाच्या परिसानें कर्माचें अंतरंग सुवर्णाप्रमाणें आहे ही प्रत्यक्ष प्रतीति येई. डोंगर बाहेरून खडबडीत वेडावांकडा दिसतो, परंतु लेण्यांत प्रवेश केल्याबरोबर ज्याप्रमाणें त्याचा बाहेरचा भाग मनापुढें क्षणभर हि टिकत नाहीं, त्याप्रमाणें अंतरंगदर्शनानें हृदय भरून येतें. त्या भव्य मूर्ति, ते खांब, त्या कमानी, त्या नकशा, ते विविध तऱ्हेचे कलेचे मोहक नमुने दिसल्यावर मग हा डोंगर नव्हे, हा कैलास आहे, हें शंकराचें परम मंगल धाम आहे, सकल कला विद्या आणि ज्ञानाचें हें भांडागार आहे, अशी खात्री पटते. त्याप्रमाणें ज्ञानी कर्माच्या अंतरंगांत शिरतो. त्यामुळें च तो तेथें लीन होतो, तो त्या त्या कर्मांत रंगून जातो. लोकांना मात्र त्याचें आश्चर्य वाटतें.

महात्माजींच्या त्या आश्रमामध्यें त्या वेळचें नियम हि अतिशय कडक असत. जेवणामध्यें मीठ हि नसावयाचें. इतर चवीच्या मसाल्यांचा तर प्रश्न च नाहीं. दूध तूप हि वर्ज्यच असे. तेल हि नाहीच. स्निग्ध पदार्थ मुळींच नसे. आपल्या व्रतांच्या दृढीकरणासाठीं, सात्विकवृत्तीच्या परिपोषणासाठीं ते नाना प्रकारचें प्रयोग करीत असत. आपलें शरीर ही एक केवळ ‘टेस्ट ट्यूब’ आहे इतक्या निर्विकार मनानें महात्माजी स्वतःच्या शरीरावर प्रयोग करीत. पुष्कळांना त्यांच्या ह्या प्रयोगाचें मर्म कळावयाचें नाही. पण येथें हे सर्व प्रयोग नीट समजून घेतलें गेलें. प्रयोग म्हटला कीं, त्यांत तपस्या आलीच. आणि तपश्चर्येनें शरीराला कृशता येईल ह्यांत हि आश्चर्य कसले? “कृशता तपस्विनाम्” हें तत्व च आहें. पण वरून शरीर कर्मांत आणि तपश्चर्येंत कृश होत जात होते. तसतसा आत्म्याचा आनंद वाढत होता. शरीराच्या संकोचाबरोबर आत्म्याचा विकास होत होता.

असे दिवसामागून दिवस जात होते. सकाळ आणि संध्याकाळ केव्हां होई ह्यांचें हि भान उरूं नये. अशी ही स्थिति होती. सकाळच्या आणि संध्याकाळच्या प्रार्थना, त्यांतलीं महात्माजींची प्रवचनें, त्यांचें चालणें, बोलणें, संवाद सर्व क्रिया ज्या तत्त्वानें चालत तें एकच सन्तत्व संगृहित केले जात होते. केवळ आपल्या आध्यात्मिक प्रश्नांचीं उत्तरें मिळावीं, म्हणून रहात असलेला, येथें कायमचे रहावें अशी मुळीच कल्पना नसतां एक अवाक्षर हि न बोलतां, इतके दिवस झालें अजून माझ्याशीं महात्माजी मुळीं च बोलत नाहींत असा विचार हि मनांत न आणतां हा महापुरुष येथें स्थिर वृत्तीनें कर्मांत निमग्न होऊन गेला होता. त्याच्या प्रत्येक हालचालीकडें, त्याच्या लोकविलक्षण स्थिरवृत्तींकडें त्याच्या कर्मयोगाच्या पूर्णावस्थेकडें आणि ज्ञानाच्या जबरदस्त अंतःप्रवाहाकडें महात्माजींचे पहिल्यापासून पूर्ण लक्ष होतें. जसजसें दिवस ज्यास्त होत गेले तसतशी त्यांची दृष्टी येथें खिळून गेली. ह्या पुरुषाच्या ठिकाणीं बाणलेल्या त्या परमरमणीय अवस्थेकडें पाहून ते मनांतल्या मनांत अतिशय हर्षित होऊं लागले. परंतु वरून त्यांनी तसें

कांहीं च दर्शविलें नाहीं. शेवटीं एक दिवस उजाडला. आणि स्वतः बापूजींनी त्या दिवशीं संध्याकाळीं ह्यांस बोलावून बरोबर फिरावयास नेलें. व अत्यंत समाधानपूर्वक बोलण्यास सुरुवात केली. "माझे तुमच्याकडे प्रथमपासून पूर्ण लक्ष असून, तुमच्या विस्मयकारक भूमिकेमुळें मला फार आनंद झाला आहे." अशा तऱ्हेनें त्या बोलण्याची सुरुवात झाली. कर्मयोगाची कसोटी येथें लागली. आध्यात्मिक प्रश्नोत्तराला येथून तोंड फुटलें. जन्मजन्मांतराची ओळख च जणूं येथें सिद्ध झाली. पण यापूर्वी सहा महिनेंपर्यंत हे दोघें हि महापुरुष एकमेकांशीं कांहींच बोलले नाहींत. किती विस्मयकारक घटना ही! अशा प्रसंगी भवभूतीसारखा क्रांतदर्शी कवी हि जेथें हात टेकतो तेथें सामान्य मनुष्याची बुद्धी काय सांगणार?

**वज्रादपि कठोराणि मृदूनि कुसुमादपि ।**
**लोकोत्तराणां चेतांसि को हि विज्ञातुमर्हति ॥**

●●●

अनुक्रमणिका

## प्रकरण २० वें

## भक्तांची धाव

**देव** जितका निर्गुण तितका च भक्त त्याला सगुण करण्याचा प्रयत्न करतो. तो बोलत नाहीं तर हा त्यांच्याशी बोलण्याचा उत्तरोत्तर अधिकाधिक प्रयत्न करील. त्याची स्तोत्रें, भजनें, आरत्या, धांवे नाना प्रकार करुन तो त्याच्याशीं संवाद करील. तो मुळीं च खात नाहीं तर हा त्याला खाण्यासाठीं अनेक प्रकारचे नैवेद्य अर्पण करील. तो ऐकत नाहीं तर हा त्याला विविध तऱ्हेच्या रागरागिण्या ऐकवील. त्याला वस्त्रें नकोत पण हा त्याला भरजरी वस्त्रें नेसवील, अलंकारांनी नटवील. तो अशरीरी, हा त्याच्या प्रतिमांनीं विश्व भरून टाकण्याचा हव्यास धरील. दगडाला हि शेंदूर फाशील आणि तिथें हि तो त्याला पाहील. जलदेवता, स्थलदेवता, गृहदेवता, वनदेवता—सर्वत्र देवता त्याला दिसतील. देव जितका जितका दूर जाईल तितका तितका भक्त त्याच्या जवळ जाण्याचा प्रयत्न करील तो जितका कठोर तितका च हा मृदु होईल, वारंवार त्याला आळवील आणि शेवटीं—

**मजवरि घालीं घण । परि मी न सोडीं चरण ।**

ही त्याची अद्‌भुत निष्ठा देवाला साक्षात् पुढें यावयाला लावील च, इतकें च काय पण—

**नाहं वसामि वैकुंठे । योगिनां ह्रद्ये खौ**
**मद्‌भक्ता यत्र गायंति । तत्र तिष्ठामि नारद**

असा सदोदित त्याला आपल्या च जवळ तो उभा ठेवील. आणि केवळ उभा च नव्हे,

**नामदेव कीर्तन करी तिथें रे बा, नाचे पांडुरंग**
**नाचे पांडुरंग! नाचे पांडुरंग!! नाचे पांडुरंग ।!!!**

त्याला आपल्या भक्तिभावानें तल्लीन करून नाचायला लावील! ही भक्ताची परमोच्च भूमिका खरोखर पराकोटीला गेलेला भक्त च जाणूं शकतो. आणि तशा भक्ताला च तिचें वर्णन करतां येईल.

**अतर्क्य महिमा तुझा गुण हि फार बा, हे विधी ।**
**श्रुतिज्ञ हि म्हणें सदा स्तवील आमुची केवीं धी ॥**
**तरी जन यथामति स्तवुनी जाहले सन्मति ।**
**स्तवार्थ तुझिया तुझ्यासम कवी कधी जन्मति? ॥**

देवाचें वर्णन करण्याला देव च पाहिजें. त्याप्रमाणें भक्ता चें वर्णन भक्ताशिवाय व्हावयाचें नाहीं. 'शिवो भूत्वा शिवं यजेत्!'

अनुक्रमणिका

पण येथें काल्पनिक वर्णनाचा प्रश्न च नाहीं. ही प्रत्यक्ष गोष्ट आहे. चित्रकारानें बारा बारा वर्षे अभ्यास करावा आणि मग आपल्या कल्पनेनें एखादें आदर्श चित्र तयार करावें, तसा प्रकार येथें नाहीं च. डोळ्यांच्या बाहुलीला कांहीं चित्रकला शिकावी लागत नाहीं. कोणत्या हि देखाव्यांचें अचूक प्रतिबिंब तेथें आयतें च चित्रित होतें. तसें येथें आहे. हा प्रत्यक्ष देखावा डोळ्यांपुढे च आहे, अगदीं समोर उभा आहे. जो डोळे उघडील त्याला दिसेल. येथें जणूं काय चित्र रेखाटून च ठेवलें आहे, आपलें काम फक्त पाहण्याचें च आहे. सृष्टिदेवतेची ही सहज योजना आहे. येथें कृत्रिम वर्णनाचा प्रश्न नाहीं. सकाळच्या प्रहरीं ज्याप्रमाणें बगिच्यांत झाडांवर फुलें फुललेलीं दिसतात; तीं खुडावयाचीं आणि दुसऱ्या एखाद्या प्रतिमेवर वहावयाची आवश्यकता च नाहीं, वृक्षरूपी परमेश्वराच्या डोक्यावर ती निसर्गानें वाहून च ठेवलीं आहेत, ती पूजा तयार च आहे, आपण फक्त भक्तिभावाने दर्शन घेऊन हात जोडावयाचे एवढेंच आपलें काम आहे. तें च काम आतां करूं.

**स्वजनजन धनाचा कोण संतोष आहे!**

ह्या तत्त्वाप्रमाणें येथें उपास्यानें उपासकाशीं आश्रमांत जाईपर्यंत अगदीं च तुटक वागणूक ठेवली होती. बालपणापासून जवळ जवळ हें असें होतें. परंतु भक्ताची भूमिका मात्र उपास्याकडे च —आपल्या वडील बंधूकडे च — एकसारखी ओढ घेत असे. ह्यांत परस्परांचा हि गुण मानावा लागेल. उपास्याच्या ठिकाणीं तिरस्कारानें हि नमस्कार करविण्याचा चमत्कार होता, हें उघड आहे. पण उपासकाच्या ठिकाणीं तशी—

**नम्र झाला भूतां । तेणें कोंडिलें अनंता**

इतकी अनंताला कोंडण्याची नम्र वृत्ति होती.

हें लीनवृत्तीचें वळण अगदीं जन्मल्यापासून च दिसून आलें. जन्मल्यानंतर नामकरणाचा विधी करावा लागतो. तो प्रसंग आला. त्याप्रमाणें नांव ठेवलें गेलें. थोड्या च वेळांत ह्या बालकाने मोठा आकांत सुरू केला; सर्वांना मोठा अचंबा वाटला. वैद्याला दाखविलें. औषधें दिलीं. परंतु कांहीं च उपयोग झाला नाहीं. अहोरात्र रडणें चालू होते. तशा स्थितीत आईचा किंचित डोळा लागला असतां तिला स्वप्न पडलें. स्वप्नांत तिचे वडिल एकदम तिच्याजवळ येऊन तिला म्हणाले, “मुली, मी तुझ्या पोटीं जन्म घेतला आहे. माझें “चिंतामणी” हें ठेवलेलें नांव बदलून माझें मूळ नांव च मला ठेव.” त्या स्वप्नाप्रमाणें लगेच नांव बदललें. नांव बदलल्याबरोबर बालक शांत. तेथें अशांतीचा मागमूस हि राहिला नाहीं. “चिंतामणी” हें वैभवदर्शक नांव नको, “बाळकृष्ण” हें साधें, देवाचें, नम्र नांवच आपल्या वृत्तीला शोभेल असाच ह्याचा भावार्थ घ्यावयाचा काय? पण हा कर्नाटकांत घडलेला गूढ प्रसंग सोडून दिला तरीं पुढें हि ही वृत्ति सतत एकसारखी दिसून आली. लीनता, एकनिष्ठा, भक्ति हें येथलें सहज जीवन होतें. “दामा” नांवाच्या गड्याकडे लहान मुलें खेळविण्याचें काम होतें. त्या गड्यावर इतकी श्रद्धा बसली कीं रात्रीं हि घरांतलें आईजवळचें अंथरुण सोडून त्या गड्याच्या घोंगडीवर निजण्यासाठीं ओटीवर धांव घ्यावी.

**शाल दुशाला न हि कामाच्या । साधूची घोंगडी बरी ।**

ही निष्ठा त्यांत नकळत दिसून येते. ज्याच्यावर श्रद्धा ठेवावी तो गडी काळा आहे, दरिद्री आहे, घामट आहे, कुरुप आहे—कोणता हि विचार तेथें यावयाचा नाहीं. घरांत कोणी रागवून बोलल्यास “त्या गड्याला

अनुक्रमणिका

सांगेन” असे म्हटलें जाई, इतका त्याच्यावर विश्वास होता. कोणाला हि कधीं त्रास देऊं नये, अतिशय शांतपणें, गोडपणें रहावें. ही नित्य वृत्ति होती. त्यामुळे शांतीच्या बरोबर येणारी पुष्टि हि शरीरावर चांगली शोभून दिसे. पाहणाऱ्याला अपरंपार संतोष होई.

**“शांतिःपुष्टिस्तुष्टिश्चास्तु ।”**

ही सदिच्छा च या बालकाच्या रूपानें नटलेली येथें दिसे. यापुढें वयाच्या वाढीबरोबर प्राथमिक शिक्षणाला सुरुवात झाली. तेथें शिक्षकांना सहाध्यायांना संतोषविण्यासाठीं सारखा परिश्रम केला जाई. घरीं हि शक्य तें सर्व काम करून सेवावृत्तीनें राहण्याचा कल असे. याच सुमारास डॉ. जोगळेकरांकडे कांहीं महिने राहण्याचा प्रसंग आला होता. तेथें हि त्यांच्या घरच्या सर्व मंडळींना आपल्या गोड स्वभावानें आणि सेवेनें तल्लीन करून सोडलें केवळ पुत्रवत् प्रेम ती मंडळी करूं लागली. तेथें घराच्या समोर एक मोठें आंगण होते या आंगणांत फुलझाडें लावून बगीचा तयार केला. रोज नियमानें त्या बगीच्याला पाणी देण्याचें काम केलें. मे महिन्याच्या सुट्टींत थंड हवा म्हणून वांईला जाण्याचा प्रसंग येई. तेथें आजोबा आणि आजी यांना परम संतोष होईल अशी च वागणूक असे. त्यांचे सोवळ्यांचें सर्व नियम एकनिष्ठेनें पालन करावयाचे, आजोबांना गंध उगाळून द्यावयाचें. तेथें देवळांत जवळच राहणाऱ्या ‘बुवांना’ हि पूर्ण संतुष्ट केलें होते. त्यांचे सामान आणून द्यावें, बाजार करून द्यावा, त्यांच्याबरोबर भजनें म्हणूं लागावें—अशा रीतीनें सर्वांचें मन राखण्याची कला आंगवळणी च पडली होती.

**राजी राखावें सर्वांना । कठिण आहे**

ही कला सामान्य नव्हे.

**“सेवाधर्मः परमगहनो योगिनामप्यगम्यः”**

या बाबतींत योग्याला हि दुर्लभ अशी हातोटी सहज साधून गेली होती. लायब्ररींत जावें, वर्तमानपत्रें, पुस्तकें वाचावीं, जगांतल्या अनेक प्रश्नांत मन घालावें, हीं वृत्ति मुळींच नसे. एका सेवेच्या मार्गानें जावें, आसपासच्या जगाची निरलस होऊन सेवा करावी, हा च कल असे. मित्रांच्याबरोबर अभ्यास करून त्यांना मदत करण्याकडें लक्ष असे, त्याप्रमाणें त्यांच्याबरोबर खेळण्यांत हि पाऊल नेहमीं पुढें च असावयाचें. क्रिकेट, आट्यापाट्या, खो खो इत्यादि खेळांचा अतोनात नाद. होळीच्या दिवसांत बारा बारा वाजेपर्यंत खेळ चालावा.

केवळ अज्ञपणें जीवनाचा क्रम असा सेवामय, भक्तिमय आणि लीलामय अगदीं सर्वसाधारण जरी चालला होता तरी त्यांत जबरदस्त श्रद्धेची अंतर्भूमिका स्वतःसिद्धपणें तयार झाली होती. आपल्या वडील बंधूकडे अतिशय आदरपूर्वक लक्ष ठेवलें जाई. उपास्याची च ती भावना असे. वैराग्य, ब्रह्मचर्य, ह्या गोष्टी आपण हि आपल्या जीवनांत तशा च उतरवणार, सामान्य संसारी मार्गानें जावयाचें नाहीं, ही दृष्टि भावनेच्या बाजूने पक्की च ठरली होती. एकलव्यानें गुरूचा पुतळा तयार करून त्याच्यासमोर स्वतःच धनुर्वेदाचें शिक्षण घेतलें. रात्रंदिवस गुरू स्वतः ज्याला परिश्रमपूर्वक शिकवीत त्या प्रियशिष्य अर्जुनापेक्षां हि त्या विद्येंत एकलव्यानें प्राविण्य मिळवलें. तसें च येथें होत होतें. शमदमादि वैराग्य साधनेमध्यें आपल्या बंधूकडे पाहून प्रगति केली जात होती. केवळ अनुकरणानें स्वतःच्या कल्पनेनें एकेक क्रिया बदलत होती. जी जी

बाह्यक्रिया तेथें दिसे ती ती येथें तशीच श्रद्धापूर्वक गिरवली जाई. तेथें दासबोधाचा नित्य अभ्यास तर येथें हि 'दासबोधांतील उपदेशपाठ' वाचला जाई. तेथें साखर वर्ज्य. येथें हि वर्ज्य. तेथें केवळ घोंगडीवर निद्रा, येथें हि तसें च. तेथें छत्री जोडा वगैरेंचा त्याग. येथें हि ह्या वस्तूंचा त्याग केला गेला. प्रत्यक्ष दिसणारी अशी एक हि गोष्ट नव्हती कीं जी तेथें आहे आणि येथें नाहीं. गवई स्वतः गात असावा आणि ऐकून ऐकून कोणी त्याचें गाणें तसें च हुबेहुब म्हणावें, चित्रकार चित्र तयार करीत असावा आणि त्याबरहुकूम कोणी चित्र काढावें, किंवा मूर्तीकाराची चाललेली मूर्ति पाहून कोणी तशी च हुबेहुब घडवावी, त्याप्रमाणें येथें केवळ अनुकरणानें अध्यात्म-विद्येचें धडे गिरविण्यात येत होते.

**'पुढें गेले त्यांचा शोधीत मारग'**

ह्याप्रमाणें पुढच्याला पाहून मागच्यानें अगदी पावलावर पाऊल टाकीत जावें, रस्ता मुळींच सोडूं नये, अशी स्थिती येथें झाली. सुखकारक गोष्टींचें अनुकरण कोणी हि करील. परंतु शमदमांचें अनुकरण आणि तें हि अगदीं तसेंच हुबेहुब, तशांत अगदींच अननुभवी बालवय, हा सामान्य चमत्कार नव्हे!

**बहुतां सुकृतांची जोडी । म्हणुनी विठ्ठली आवडी**

अशी अनेक जन्मांची ही पुण्याई येथें फळाला आली होती!

केवळ दुरून अवलोकन करून हें ध्येय ठरविण्यांत आलें होतें. वडील बंधूंची ह्याबाबतींतली तीव्र-कठोर वृत्ति यत्किंचित् हि शिथिल होत नसे. हें थोर ध्येय वाचेनें समजावण्याचा प्रश्न च नसे. एखाद्या सामान्य अभ्यासाच्या प्रश्नाला हि कित्येक वेळां उत्तर मिळावयाचें नाहीं. प्रत्यक्ष उदाहरण असतां सांगण्याची आवश्यकता नाहीं. आणि सांगून अशा गोष्टी घडत नसतात. हें हि खरें च होतें. पण भक्ति ही मोठी चमत्कारिक वस्तु आहे. ती लगट केल्याशिवाय रहात नाहीं. कांहीं ना कांहीं निमित्तानें बोलण्याचा प्रयत्न केला जाई. आणि त्यामुळें पुष्कळ वेळां मार खावा लागे. पण हा आपला क्रम कधीं च सोडला नाहीं. खडक लागला तरी खणत जावयाचें. येथें आंत खोल पाणी आहे. तें खणून खणून केंव्हा तरी आपल्याला मिळेल च अशा श्रद्धेनें हें सर्व चालावयाचें. "धृत्युत्साहसमन्वितः" हें सात्विक कर्त्यांचें लक्षण येथें असें मुरलेलें होतें. गुरूच्या क्रोधानें जो दूर जाईल त्याला ज्ञानाची कधीं च आशा नाहीं. रत्नें मिळवावयाचीं आहेत आणि यत्न करावयाचा नाहीं, हें अवलक्षण येथें कधीं च नव्हतें. मोती काढणारा समुद्राच्या तळाशीं जीव धोक्यांत टाकून जातो, कमळें खुडावयाचीं तर वेली पायाला जखडणार च, सोन्याच्या खाणीच्या शोधांत जंगलेंच्या जंगलें भटकावीं लागतात. तेथें कच खाणारा काय कामाचा? 'यतंतश्च दृढव्रताः' — भक्ताचा प्रयत्नवाद कधीं च मागें पडत नाहीं. खरा भक्त प्रयत्नवादाचा पुतळा असतो. तसें च येथें असे. साध्या क्रियांमध्यें सुद्धां हा प्रयत्नवाद दिसे. मारुती जन्माच्या दिवशीं ज्यास्तीत जास्त देवळें हिंडावयाचीं. चालण्याची पराकाष्ठा करावयाची. तसें च एकादशीचें. एकादशीला हि दूरदूरची महादेवाचीं मंदिरें गांठावयाचीं. काशीविश्वेश्वर, जाळेश्वर, केदारेश्वर, विगलेश्वर—एकसारखें चालावयाचें. सकाळीं धावण्यांसाठीं जावयाचें. भर थंडींत पायांत कांही नसे. धांवता धांवतां पाय केवळ काल्यासारखे थंड आणि जड होऊन जात. पण आपला नित्यक्रम उत्साहानें पार पाडावयाचाच. सहाध्यायांची सेवा, शिक्षकांची सेवा, उत्तम अभ्यास, घरची सेवा, आपल्या ध्येयमूर्तीशीं एकरूप होण्याचा सतत प्रयत्न, असें हें बाल्यकालांचें जीवन सरळ ओघानें चाललें होतें. प्राथमिक शिक्षण हि ह्या ओघांत समाप्त झालें.

अनुक्रमणिका

ज्याचा जो स्वभाव, ज्याची जशी भूमिका, ज्याचा जो प्रवाह त्याप्रमाणें च त्याची सर्व परिस्थिति निर्माण होत असते. भक्तीला, सेवेला, एकनिष्ठेला अतिशय अनुकूल अशा सर्वश्रेष्ठ ललितकलेची उपासना येथे आतां न कळत सुरूं झाली. शेजारचा दत्तू मनोहर नांवाचा मित्र गायनशाळेत जात असे, त्याच्या संगतीनें गायनशाळेत जाण्याला सुरुवात केली. जी गोष्ट ग्रहण केली ती एकनिष्ठेनें च नेहमीं व्हावयाची. रोज नियमानें त्या गायन शाळेंत जावयाचे व भक्तीला परिपोषक अशा त्या संगीतविद्येचा अभ्यास करावयाचा. असा क्रम सुरू झाला. हिऱ्याला कोंदणांत बसवावें, सोन्याला अलंकाराच्या मुशींत ओतावें, तसें च हें झालें. माधुर्याला मधुरता आणि सौंदर्याला सुंदरता ज्याप्रमाणे अधिकाधिक मिळत च जावी, चंद्राची एकेक कला खुलत जाऊन सृष्टीवर रुपेरी प्रकाश पसरत जावा, एकेक कळी खुलत जाऊन परिमल जिकडे तिकडे दरवळून जावा, त्याप्रमाणें मूळच्या सेवामय भक्तीच्या वृत्तीचा ह्या संगीत विद्येनें अधिक च परिपोष झाला. अगदीं योग्य वेळीं ही संगीताची साथ मिळून मूळच्या मधुर वृत्तीला बहार येण्याला हें एक मोठें च साधन मिळालें. सप्तस्वरांच्या उलट सुलट कसरती केल्या जाऊं लागल्या. कल्लोळ कसा हि लोळत राहिला तरी समुद्रावरची त्याची अखंड लीला आनंदाचा च आविष्कार करावयाची! त्याप्रमाणें हीं सुरांचीं मिश्रणें, त्यांच्या त्या निरनिराळ्या मुरडी, तीं वळणें, त्यांचीं पुनरावर्तनें यांचा मनावर एक च कोमल, सुखमय, तल्लीनतेचा संस्कार उमटावयाचा. त्यामुळें, हें वरवरचें नाना द्वंद्वांनीं भरलेलें विश्व कोठच्या कोठें गेलें! अगदीं पार मेलें!! त्याचा मागमूस हि राहिला नाहीं!!! ही दुनिया सोडून आपण एका नव्या च दुनियेंत प्रवेश केला, येथें न्यूनता कोणती च नाहीं. विश्वकर्म्याची ही राजधानी. येथें जिकडे तिकडे आनंदाची लयलूट, सप्तस्वरांच्या साम्राज्यांत—नादब्रह्माच्या स्वर-राज्यांत खुशाल स्वेच्छया संचार करावा.

**पाण्यामधूनि लाटा । लाटांमधूनि पाणी ।**
**गाण्यामधूनि सूर । होती स्वरें चि गाणीं ॥**
**ऐसी परंपरा ही । चाले अनंत काळ ।**
**कोठें हि खंड नाहीं । सर्वत्र हा चि खेळ ॥**
**दारिद्र्य दैन्य बंध । स्वप्नीं हि येत नाहीं ।**
**येथें उणे न कांहीं । सर्वत्र बादशाही ॥**

असा अनुभव यावयाचा. या संगीताप्रमाणें च आतां मराठी शिक्षण झाल्याबरोबर चित्रकलेची हि जोड मिळाली. वडिलांनीं चित्रकलेचें शिक्षण घेण्यासाठीं बडोद्याच्या कलाभवनमध्यें घातलें. संगीतानें भगवंतांचें नाम गावें, चित्रकलेनें भगवंतांचें रूप रेखाटावें, अशा या दोन महान् कलांचा अभ्यास जोडीजोडीनें सुरूं झाला. चित्रकलेचा अभ्यास तीन वर्षांत समाप्त होऊन, त्याच्यापुढें शिल्पकलेला सुरुवात झाली. निरनिराळ्या प्रकारचे ग्रीक, रोमन पुतळे शाडूच्या मातीनें तसे च हूबेहूब तयार करावयाचे, शिवाय प्रत्यक्ष मनुष्याला बसवून ही त्यावरून पुतळा करावयाचा, असें हें दुहेरी काम चाले. घरच्या मोलकरणीच्या नवऱ्याला बसवून त्याचा पुतळा तयार केला, आणि ८/१० दिवसांत तो एकाएकी छातीच्या दुखण्यानें मरण पावला. त्यामुळें तो पुतळा तयार केल्यावरून च तो मेला असें त्याच्या घरच्या मंडळींना वाटलें. तसा धाकट्या भावाचा हि पुतळा तयार केला होता. हें काम उभें राहून करावें लागे. ७/७ तास उभें रहावयाचें. रविवारीं सुट्टी असे. त्या दिवशीं सुद्धां शिक्षकांकडून शाळेची किल्ली मागवून घेऊन काम करीत रहावयाचें, असा क्रम असे. ज्ञानाला सुट्टी कसली? सुट्टी अज्ञानाला द्यावयास पाहिजे. इतर विद्यार्थी नाईलाज म्हणून, आईबाप सांगतात म्हणून पुढें चारितार्थाचें साधन म्हणून अभ्यास करावयाचे, त्यामुळें मन भारावून जाऊन एक दिवस सुट्टी मिळावी असें वाटणें साहजिक च आहे. सणाचे दिवस, पवित्र दिवस, मंगल दिवस, ज्ञान, उपासना, भक्तीची पराकाष्ठा करण्यासाठी. परंतु लोक नेमके त्या च दिवशीं आळस, अत्याहार आणि

अनुक्रमणिका

अज्ञानांत तल्लीन रहातात. अशी जगाची चमत्कारिक रीत आहे. या रीतीच्या विरुद्ध येथें सुट्टीच्या दिवशीं नेहमीपेक्षां जास्त काम व्हावयाचें. कारण त्या दिवशीं शाळेंत कोणी च नसल्यामुळें गाढ एकांत असावयाचा. तेथें कोणती च गडबड नसल्यानें, केवळ एकट्यानें जग विसरून त्या कलाकृतींचा अभ्यास केला जाई. अशा आपल्या विद्यार्थ्याच्या तन्मयतेमुळें तेथले सुप्रसिद्ध शिल्पकार कोल्हटकर नेहमीं सुप्रसन्न असत. शक्य ती मदत ते करीत. कलेचीं रहस्यें समजावून सांगत. प्रथम कसें तरी थापाथापींचें काम करून मग शेवटीं आपण उत्तम मूर्ति तयार करूं ही मनोवृत्ति उपयोगाची नाहीं. प्रथमपासून च काळजी घेतली पाहिजे. पहिल्या पहिल्या क्रियांवर पुढच्या पुढच्या क्रिया अवलंबून असतात. तेव्हां प्रथमपासून कृतींत पूर्णता पाहिजे. सूर्योदयापूर्वी अर्धवट प्रकाशांत झाड अस्पष्ट दिसतें. पण अपूर्ण दिसत नाहीं. अर्धे झाड सूर्योदयापूर्वी दिसलें तें सूर्योदयानंतर पूर्ण झालें असें कधीं होत नाहीं. अपूर्णातून पूर्ण निघूं च शकत नाहीं. मुळांत नाहीं तें फळांत कोठून येईल. लहानाचे मोठें, अस्पष्टांचें स्पष्ट, सूक्ष्माचें स्थूल होईल पण अपूर्णाचें पूर्ण होणे शक्य नाहीं. अशी त्या कलेची किती तरी रहस्यें असावयाचीं. माती कशी असावी, प्लॅस्टरचा उपयोग कसा करावा, सांचे कसे करावयाचे, मनुष्याचें चारित्र्य, त्याच्या आयुष्याची छाप त्याच्या पुतळ्यावर दिसली पाहिजे, प्लॅस्टिसिनचा उपयोग काय इत्यादी अनेक गोष्टी त्या कलेच्या उपासकाच्या नेहमींच्या परिचयाच्या होऊन जात. त्याचीं निरनिराळीं लांकडी हत्यारें निरनिराळ्या कामासाठीं जवळ सज्ज ठेवावीं लागत. पण ही कलेची उपासना अभक्त करील तर तो लहरी, आढ्यताखोर, व्यसनी बनावयाचा, कारण त्याची दृष्टि निर्मळ नसावयाची. हें प्रत्येक ललित कलेंत आतांपर्यंत आढळून आलेलें आहे. गवयाचा गायनशास्त्रांतील ताल जरी बिनचूक असला तरी नीतिशास्त्रांत तो बेताल च असावा, अशी जणूं कांहीं परंपराच ठरलेली. मूर्तिकार इतरांचे चारित्र्य त्या जड मूर्तीवर उमटविण्याचा प्रयत्न करील, पण स्वतःच्या हृदयावर त्याचा परिणाम होऊं देणार नाहीं. समुद्रांत भिजला पण आंतून कोरडा तो कोरडा च. अशा अभक्तांची कला ही बहिरंगी कला समजली पाहिजे. पण भक्त जर कलाकार होईल तर कलेचा अंतर्बाह्य परिणाम स्पष्ट सर्वत्र उमटूं लागतो. जीवन च पालटतें. तेथें मंगलता आणि सौंदर्य एकत्रित नांदू लागतें. श्रेय आणि प्रेम एक च होऊन जातें. काम आणि प्रेमाची तेथें मिसळ व्हावयाची नाहीं. कलेच्या नांवानें अमंगलंता तेथें यावयाची नाहीं. नागवीं चित्रें निर्माण करून ही त्यांत अपवित्रतेचा भाव उमटावयाचा नाहीं. उत्तरोत्तर शुद्ध, सुंदर, स्वच्छ तें च ग्रहण केलें जावयाचें. येथला कलेचा अभ्यास हा अशा च तऱ्हेचा अभ्यास होता. हा अभ्यास केवळ शाळेंत च होई असें नव्हें. रस्त्यानें जातां जातां जो जो समोर येई त्या त्या व्यक्तीची ती चाल, ती चालण्याची ढब, ते ते निरनिराळे चेहऱ्याचे आविर्भाव, ते अवस्थांचें भिन्न भिन्न विकासक्रम, त्या भावांच्या विविध छटा हें सगळें मनःपटलावर अचूक चित्रित होत जाई. कोणाचें नाक रेखीव, तर दुसऱ्याच्या पोटऱ्या घाटदार, तिसऱ्याचे डोळे पाणीदार, तर चवथ्याचें असें च कांहीं लक्ष वेधणारें लक्षण, असें एकेक पहात जाऊन तें मनांत कलारूपानें संग्रहीत होत राहवयाचें. रोडक्या भिकाऱ्याचा भाव निराळा, वैभवांत रुळलेल्या राजबिंड्या पुरुषाची मूर्ति निराळी. मातेचें वात्सल्य निराळें आणि बालकाची निर्दोष सहजता निराळी. बाहेरच्या देखाव्यांतून सगळें अंतर्ज्ञान च उभें रहावयाचें! सगळें मन च अवयवांच्या रूपानें फुटून दिसावयाचें! एकादा भिकारी गात असला तरी त्याच्या त्या एकतारीवरचा आवाज मोठमोठ्या मैफली जिंकणाऱ्या तानसेनापेक्षां ही कधीं कधीं श्रेष्ठ ठरतो. त्यामुळें जिथें तिथें कलोपासनेला अवकाश राहून ती च कला मागें पुढें सर्वत्र व्यापून उभी आहे असें दिसावयाचें.

**तत्प्राप्य तदेवावलोकयति तदेव श्रृणोति तदेव चिंतयपति ।**

अशी या कलाकाराची स्थिति होऊन जाई. तिकडे कोणी नळ सोडलेला असावा, खाली बादली भरत असावी, नळांतून पडणाऱ्या पाण्याच्या बादलीवर होणाऱ्या आघातानें नाद निर्माण होई. मग दुरून असें

अनुक्रमणिका

वाटावें, कोठें दूर सतार वाजत आहे; सारंग रागाची गत चालली आहे; काय सुंदर वाजविणारा आहे! हात काय सरसर चालला आहे! नखी मारण्याची सफाई तरी किती सुरेख! मेणकाम किती बहारीचें!!! सगळा कल्पनेचा खेळ. एकादा साधा डाग जरी भिंतीवर पडला असला तरी, त्या डागांत लगे च नाक डोळें तयार होत. तेथें सुंदर सुंदर चित्रें दिसावयाचीं. जिकडे तिकडे सौंदर्यमय आकाररूप. जीवनाचें प्रकार असे हेरले जावयाचे. झाडें, घरें, पशु, पक्षी, माणसें, स्त्रिया, पुरुष, मुलें, भिकारी, श्रीमान्—सगळें आकारांचे प्रकार मांडले आहेत. अशी दुनिया ही एक चित्रशाळा आणि नादानुसंधानानें बनलेली गायनशाळा—एक मोठें कलाभवन आहे. अशी दृष्टि बनून गेलेली होती. कोणत्या हि शिक्षणापेक्षां दृष्टीला जास्त महत्त्व आहे. त्या त्या शिक्षणाचें उपासनेचें, विशिष्ट क्रियेचें मर्म सर्व जीवनभर मांपावयाचें व त्याची योजना ठरवावयाची. प्रार्थनेंत मनुष्य बसला आहे, पण प्रार्थनेंतून उठल्यावर त्या प्रार्थनेचा परिणाम किती वेळ टिकतो आहे त्यावर प्रार्थनेची योग्यता अवलंबून आहे. विश्रांति पुष्कळ घेतली पण विश्रांतीनंतर काम करतांना लवकर च थकून गेला तर त्या विश्रांतीची, त्या झोंपेची काय किंमत राहील? तासभर ध्यान केलें, पण ध्यानविसर्जनानंतर जर लवकरच मन चंचल होईल तर तें ध्यान तात्पुरतें च म्हणावयाचें. ध्यानाचा, ज्ञानाचा, उपासनेचा, कोणत्या हि थोर कृतीचा परिणाम दीर्घ काळ टिकण्यावर त्या कृतीची किंमत अवलंबून आहे. प्राणायाम तासभर केला, अगदीं श्वासोच्छ्वासांची गति समांतर झाली, पण दिवसभर जर श्वासोच्छ्वास विषमतेनें अव्यवस्थित चालूं राहील तर प्राणायाम साधला नाहीं असें च म्हणावें लागेल. बगीच्याला मोटेचें पाणी दिलें, पण तें पुन्हां देईपर्यंत ओल राहील इतकें नसलें तर त्याचा उपयोग नाहीं. ती क्रिया फुकट गेली. येथे शिल्पकला आणि संगीत नियमितपणें परिश्रमपूर्वक सुट्टी न घेतां शिकली जात होतें. त्याप्रमाणे रात्रंदिवस सर्वत्र त्यांचें दर्शन घेतलें जाई. अजपा जप ज्याप्रमाणें सतत होतो त्याप्रमाणें हा ह्या कलांचा अजपा जप झाला होता. ह्या बरोबरच आतां आणखी एका नवीन गोष्टीला सुरुवात झाली. गायनशाळेंत गायन सुरूं होतें. तेथले च बापट मास्तर त्यांचा विश्वास संपादन केल्यामुळें सतार विशेष मन लावून शिकवीत. त्यांच्याच योगानें एका वाद्यसंमेलन मंडळांत (concert) प्रवेश झाला. निरनिराळे वाद्य वाजविणारें एकत्र जमून त्यांनीं ही संस्था स्थापली होती. तींत बापट मास्तर होते. त्यांनीं आपल्या ह्या नवीन शिष्याला हि तिच्यांत सामील केलें. सर्व ललित कर्णमधुर वाद्यें एकत्रित वाजवावयाची व नंतर एकेकटें वाद्य वाजवावयाचे असा त्यांत वादनक्रम ठरलेला असे. बापटमास्तरांमुळें सतारीमध्यें हात अगदीं सुंदर चालूं लागला. त्याबरोबर च फिड्ल हि सुरू केलें. स्वरमंडळाचा हि कांहींसा अभ्यास केला. त्या संमेलनसंस्थेंत दाखल झाल्यामुळें अभ्यासांत अशी भर पडत चालली. ह्या सर्व मंडळींसह निरनिराळ्या राजेरजवाड्यांकडे वाद्यें वाजवण्यासाठीं जाण्याचें प्रसंग येऊं लागले. ही मंडळी त्याबद्दल मोबदला घेत असत. पण येथें पैशासाठीं हें सर्व केलें जात नसल्यामुळें एक पै हि घेण्यांत येत नसे.

बाल्यकाळांतली मूळ निष्ठा सेवेच्या स्वरूपांत परिणत झाली. तिला पुढें कलेची जोड मिळाली. त्याबरोबर च ध्येयवादाची, वैराग्याची, ब्रह्मचर्याची, देशसेवेची दिशा मिळण्याला वडील बंधूंचें जवळचें च उदाहरण कारणीभूत झालें. मुख्य जीवनांतील गोष्ट अशी अगोदर च निश्चित झाली. मध्यबिंदु तयार झाला. आतां वर्तुळाची मर्यादा केवढी हि विस्तृत करा. पाया निश्चित झाला. वरच्या इमारतींत कसे हि फेरफार करा. बैठक पक्की झाली. जीवनाची अशी सहजसुंदर, कलामय, भक्तिमय, सेवामय घडण झाली. परंतु या सर्वांवर उपास्याची अजून सही झाली नव्हती. त्याच्या ज्ञानाची, त्याच्या प्रत्यक्ष मार्गदर्शकत्वाची अजून येथें उणीव च होती. घरांत जोपर्यंत हें उपास्य—वडील बंधु—होते, तोंपर्यंत निदान त्याच्या दर्शनानें, त्याच्या हालचालीनें कांहीं तरी बोध मिळे आणि तद्द्वारा मार्गदर्शन होई. परंतु गृहत्याग केल्यापासून या भक्ताच्या हृदयाची स्थिति दोरा तुटलेल्या पतंगासारखी झाली. नावेला कर्णधार नाहीं, प्रवाशाला मार्गदर्शक नाहीं अशी च ही अवस्था होती. 'विद्यार्थी-मंडळांत' जाऊन तेथून कांहीं थोडेंबहुत पाथेय मिळविण्याचा प्रयत्न

केला जाई. परंतु परावर्तित अशा चंद्रप्रकाशांत ज्याप्रमाणें दिवसाचीं कामें होऊं शकत नाहींत त्याप्रमाणें हें काम विद्यार्थी-मंडळांतील मित्रांकडून होणें शक्य नव्हतें. इकडे वडिलांच्याकडे नित्य इंग्रजी, गणित इत्यादींचा अभ्यास चाले. ते कलेसंबंधींचीं हि इंग्रजी पुस्तकें वाचवून घेत. परंतु त्यांची नेहमीं च भीती वाटे. त्यांना यत्किंचित चूक सहन व्हावयाची नाहीं. त्यांच्या संतोषासाठीं कसोशीनें अभ्यास केला जाई. परंतु त्यांच्या ठिकाणीं आदर्श जीवन असून हि गुरूची उणीव भासत असे. ती गुरूमूर्ति तर केव्हां च घरांतून निघून गेलेली. त्यामुळें चित्त नेहमीं विचारांत मग्न असे. वडील बंधूंच्या गृहत्यागानें तेथें विलक्षण खळबळ उडून गेली. वास्तव्य घरीं असून चित्त मात्र वडील बंधूंकडे लागलेलें, शरीर येथें पण अंतःकरण दुसरी च कडे, वस्तु जळाली पण येथें केवळ आकार राहिला आहे, पक्षी उडाला फक्त पिंजरा येथें आहे अशी ही स्थिती होती.

**बीत गये दिन भजन बिना रे ।**
**बाल्यअवस्था खेल गंवायो जब जुवानी तब मान किया रे ।**
**कहत कबीरा सुन भाई साधू पार उतर गये संत जना रे ॥**

ह्या कबीराच्या वचनाचा भाव मनापुढें उभा राहिला. अरेरे! आपलें आयुष्य आपण सगळें व्यर्थ च घालवित आहो ना? जीवनाच्या सगळ्या गुंतागुंती सोडवून आपला वडील भाऊ—हा महापुरुष—कसा मुक्त अवस्था भोगीत आहे! आपण हें उघड्या डोळ्यांनीं पहात असून स्वस्थ बसणार काय? आपल्या अगदीं डोळ्यासमोरच्या ह्या उदाहरणाचा आपल्याला कांही च का उपयोग होणार नाहीं? त्या गांधींच्या आश्रमांत आपणांस स्थान मिळेल काय? तेथें अध्यात्माच्या वातावरणांत, त्या दोन महापुरुषांच्या सान्निध्यांत आपण आपल्या कलेचा अभ्यास करूं शकणार नाहीं काय? ही विचारमालिका ह्या भक्ताच्या मस्तकांत थैमान घालूं लागली. विचाराचा वेग—ती कोंडलेली वाफ च! तो ज्वालामुखींतला जळजळीत रस! किती दिवस स्वस्थ बसणार? लवकर च तयारी केली आणि एका क्षणांत आपली अतिशय थोर मातापितरें, भाऊ-बहीण ह्यांना सोडून कोणाला न कळत गांधीजींच्या कोचरब-आश्रमांत धांव घेतली.

**माय बाप हि टाकिले । परी बंधु-रत्न न सोडिलें**
**स्नेह बंधन सज्ञनें । भुवनमयीं हि न तोडिले**

अशी पुन्हां एकदां वाल्मिकीच्या महाकाव्यांतल्या त्या थोर प्रसंगाची पुनरावृत्ती झाली. रामाच्या पाठोपाठ भरतानें राज्य सोडून वनाकडें धांव घेतली. तो च प्रसंग हा. येथें भरताच्या भक्तिभावाचें उदाहरण अतिशयोक्तिनें दिलें गेलेलें नाही. हूबेहूब ती च भूमिका आहे, त्याच मनोवृत्तींत हें प्रयाण केलें गेले. आणि आपल्या बंधूला भेटल्यावर तशी च गद्‌गद अवस्था येथें दिसून आली. तेथे दोन महान् आत्म्यांचें मीलन झालें. जीवा-शिवा ची च ती भेट. जन्मापासून आतांपर्यंत जो संवाद घडला नव्हता तो येथें घडला. संपूर्ण आत्मनिवेदन केलें. आपला विचार अगदीं काकुळतीने कळवला. "कांहीं हि करा, कोणती हि अवघड गोष्ट सांगा, परंतु मला येथून जावयास सांगूं नका; ज्या पवित्र सहवासाचा मी भुकेलेला आहे तो आश्रमवास मला घडूं द्या", अशा सारखी ही करूणा-वाणी होती. ती ऐकून कोणाचें हृदय द्रवणार नाहीं? तेथें मग ज्ञानाचा पाऊस पडला. लीनतेनें म्लानवदन होऊन तो उपदेश—आत्मज्ञानाचा तो उपदेश ऐकला गेला. "आपण कोण आहों? आपण हा जन्म घेतला आणि यांत च गुरफटून राहिलों आहों. हे आपण प्रतिक्षणीं विसरतो. आपल्याला ज्ञान तर नाहीं च पण ज्ञान नाहीं याचें भान हि कोठें आहे? हा देह म्हणजे आपण नव्हे. आपण चैतन्य, आत्मा, विशाल-व्यापक-अद्वितिय-ब्रह्मस्वरूप आहों. आत्मा सर्वत्र व्यापलेला आहे. त्याला जन्म-

मृत्यु-जरा कोणता हि विकार स्पर्श करूं शकत नाहीं. हा देह—असें अनंत देह गेलें तरी तो मरत नाहीं. ह्या देहाच्या साधनानें आपण त्या आत्मतत्त्वाची ओळख करून घ्यावयाची त्याच्या ऐवजी उलट आपण त्याची ओळख विसरतों नाना प्रकारच्या चुका करतो, खाणें, पिणें, खेळणें, निजणें, या सर्वांत आपल्याला मौज वाटते—असें वाटत नाहीं कीं, काय त्या च त्या च क्रिया करीत रहावयाच्या. आपले देशबांधव मानवसमाज आपल्या आसपासची दुनिया—सर्व आत्मस्वरूप आहे. म्हणून नेहमी सावध राहिलें पाहिजे, ह्या देहाचें सार्थक केलें पाहिजे. देह हा केव्हां जाईल त्याचा नियम नाहीं. मृत्यूच्या घरचें आमंत्रण जन्मापासून च त्यानें घेऊन ठेवलें आहे. म्हणून प्रत्येक क्षणाला आपलें कर्तव्य करण्याकडे, आत्महिताकडे लक्ष ठेवावें" — किती तरी बोध तेथें मिळाला. कल्पनेनें तो ज्यास्त मांडणें हि शक्य नाहीं. आत्म्यासंबंधीं आतांपर्यंत माहिती च नव्हती. ती ओळख आतां झाली. ती ओळख झाल्याबरोबर हृदयांत लख्ख प्रकाश पडला. मग येथें कलेच्या अभ्यासाला वाव नाहीं. आपल्या आईबापांची सेवा करणें आपलें कर्तव्य आहे—ते अत्यंत पवित्र आहेत, त्यांच्या गुणांना तर सीमा च नाहीं. त्यांना आपण संतोष दिला पाहिजे. कलेचा अभ्यास हि त्यांच्याजवळ बडोद्याला उत्तम तऱ्हेनें होऊं शकेल. म्हणून परत घरीं जाण्याचा उपदेश केला. भरताला हि रामचंद्रांनीं असें च परत पाठविलें होतें. महात्माजींनी हि परत जाण्याचा च सल्ला दिला. वडील बंधूंची आश्रमासंबंधीं दृष्टि ह्या वेळीं एका प्रसंगाच्या द्वारें एकदम लक्षांत आली. एकदां नेहमीप्रमाणें महात्माजी सर्वांना जेवण वाढीत होते. सर्वांना सर्व पदार्थांबरोबर लिंबू वाढलें. परंतु त्याप्रमाणें एकदोघांना वाढण्याचें राहून गेलें. महात्माजींनीं आपल्या संवयीप्रमाणें कोणास कांहीं वाढण्याचें राहून गेलें नाहीं ना, असें विचारलें. लगें च "लिंबू. . . ." असा उच्चार तोंडांतल्या तोंडात होतो न होतो तों च हलक्या आवाजांत— "बाळ्या लिंबू खाण्याला तूं येथें आलास काय?" असा वडील बंधूंकडून इशारा मिळतांच मेल्याहून मेलें होऊन जावें, तशी दशा झाली! तो एकदम वज्रप्रहार च झाला असें वाटलें. अरेरे! केवढी चूक आपण केली असें वाटलें. आश्रमासारख्या ठिकाणीं रहावयाचें तर नम्रपणें, महापुरुषाच्या पायापाशीं बसून बोध घेण्यासाठीं रहावयाचें. तेथें औषधाप्रमाणें आहार सेवन करावयाचा. कोणाला हि आपल्यासाठीं यत्किंचित् हि श्रम पडूं द्यावयाचा नाहीं. त्या इशाऱ्यांत काय काय दडलें होतें हें उकलून दाखवितां येणार नाहीं. आश्रमांत रहावयाचें, साधना करावयाची तर यत्किंचित् आसक्ति उपयोगाची नाहीं. वडील बंधूंना आसक्तीचा नुसता संशय हि खपत नसे. बडोद्याला बुद्धिबळें खेळण्याचा मित्रांच्या आग्रहानें सराव झाला होता. एकदां स्वप्नात बुद्धिबळाचा खेळ आला. तत्क्षणीं तीं बुद्धिबळें फेकून दिलीं. तेव्हांपासून खेळणें बंद. मनावर बुद्धिबळाचा ताबा काय कामाचा? अशी तीव्र अनासक्त भावना असल्यामुळें आपल्या भावाला हि "लिंबाची" सूचना दिली. आणि भक्तानें मग त्यासंबंधीं किती विचार केला सांगणें शक्य नाहीं. एकादे महापातक करावें आणि पश्चात्तापानें मनुष्य अगदीं म्लान होऊन जावा तशी स्थिति झाली. आपल्या हातून केवढा प्रमाद झाला! असें वाटलें. त्या आश्रमांत कांही फार दिवस वास्तव्य नव्हतें. पण तेथली प्रत्येक गोष्ट हृदयांत सांठवली जात होती. बापूजींच्या बरोबर सकाळीं दळण्याचा प्रसंग येई तेव्हां त्यांचा सहवास मिळे. तेथले त्या आश्रमांतलें खाणें, पिणें, वागणें, तेथलीं व्रतें, तेथला पोषाख, तेथली प्रत्येक क्रिया ५/७ दिवसांत अंतःकरणांत ठसवून आत्मसात करून घेतली. बापूजींनीं वडिलांना पत्र पाठविलें. त्यांत तुमच्या मुलाचें चारित्र्य अत्यंत श्रेष्ठ दर्जाचें आहे, अशी प्रशंसा केलेली होती.

आतां परत जाण्याचा प्रसंग आला. घरीं जाण्याचें जिवावर आलें होतें. परंतु परत जाण्याची आज्ञा च झाल्यावर काय करणार? जड अंतःकरणानें कोचरब-आश्रम सोडला. आश्रमाला जणूं काय पूर्णपणें हृदयांत भरून घेऊन पुन्हां घरीं प्रवेश केला. प्रवेश केला परंतु आतां पूर्ण अंतर्बाह्य परिवर्तन झालेलें होतें. त्यामुळें सर्वत्र त्या परिवर्तनाची च सृष्टि दृष्टींत भरून गेली. द्वारकेस श्रीकृष्णाकडे सुदामा गेला होता. भगवंताची भेट घेऊन आपल्या गांवाकडे परत आला. पण त्याला तें गांव ओळखूं येईना. आपण चुकून परत

द्वारकेला तर आलों नाहीं असें त्यास वाटलें. तो रस्ता चालत होता, दुरून त्याला गांव दिसत होतें, त्यांतले स्त्रीपुरुष नजरेंत येत होते; पण तेथें सर्व द्वारकामय होऊन गेलें! तेव्हा आपल्या गांवची ओळख पटणार कुठून?

**हळुहळु पथ लंघीलंघितां गांव खेडें**
**निरखुनि जंव पाहे होतसे चित्त वेडें**
**पुरुष जवळ देखे आली योषा सुकेशी**
**पुनरपि अजि आलों काय मि द्वारकेशी**?

सुदाम्याप्रमाणें च येथें पूर्ण परिवर्तन झाल्यामुळ दृष्टि पार बदलली होती. शरीर बारा वर्षांनीं पूर्णपणें बदलतें म्हणतात. हा आत्मा एका क्षणांत पार बदलून गेला. शरीर जसेच्या तसें च असून त्याच्या जीवनांत विस्मयकारक परिवर्तन झालें. भरत रामचंद्रांच्या आज्ञेप्रमाणें परत अयोध्येमध्यें आला. पण तो वनांत जातांना जो भरत होता तो गेलेला भरत मेला च! हा अगदीं नवा भरत होता. त्यानें राज्यांत राहून हि वनवास स्वीकारला. रामचंद्रांपेक्षां जास्त तपस्या केली. येथें आतां घरीं राहून हि ती च भरताची भूमिका आचरण्यास सुरुवात झाली. येथें तपश्चर्येची परमावधि गांठण्यांत आली. गुरु-शिष्य, पति-पत्नी, पिता-पुत्र, इत्यादि अनेक संबंधानें भारतवर्षांत आदर्श परंपरा चालत आलेल्या आहेत. परंतु त्या सर्वांत भ्रातृपरंपरेनें जी उज्ज्वल निष्ठा दाखविली, ती कांहीं निराळी च म्हणावी लागेल! भ्रातृसंबंधानें आपण सर्व जोडले गेलों आहोंत. भरतामुळें च 'भारतवर्ष' हें नांव पडलें. म्हणून च बडोद्याहून आश्रमांत गेलेल्या मंडळींत हा भक्त जसा पहिला होता त्याप्रमाणें आश्रमीय जीवनाची आणि महापुरुषांची भक्ति करण्यांत हि शेवटपर्यंत तो पहिला च राहिला. त्याची बरोबरी कोणी करूं शकला नाहीं. कारण येथें उपासक आणि उपास्य; महापुरुष आणि भक्त, ह्यांच्यांत अंतर मुळीं च राहिलें नव्हतें. बाह्यतः एकमेकांपासून पुष्कळ दूर असून हि ते इतके जवळ—नेहमी च इतके जवळ—होते कीं त्याला उपमाच देतां येणार नाहीं. कवीनें हि हें च उद्‌गार काढले आहेत :

**छाया तनूची तनुला न सोडी ।**
**त्या बंधुंची एक तशी च जोडी ।**
**परस्परीं त्यांस अपूर्व गोडी ।**
**त्या मित्रभावा उपमा चि थोडी ॥**

●●●

# प्रकरण २१ वें

## पुनरागमन

**महात्माजींच्या** आश्रमांतल्या कर्मयोगाच्या पलीकडे जाऊन आतां त्यांच्याशीं अखंड ज्ञानचर्चा सुरूं झाली. त्या चर्चेंत उभयतांचें दिवसच्या दिवस निघून जात. नवीन नवीन विचारांची सूक्ष्म छाननी होऊं लागली. जीवनाच्या अंगप्रत्यंगावर विचारांचा अंतर्बाह्य प्रकाश फांकून गेला. अध्यात्माची अनेक कोडीं सहजासहजीं उलगडल्यासारखीं झालीं.

**सततं कीर्तयन्तो मां यतंतश्च दृढव्रताः ।**
**नमस्यंतश्च मां भक्त्या नित्ययुक्ता उपासते ॥**

केवळ ह्या एका श्लोकांत आतां ते आश्रम जीवन सामावून गेलें.

**प्रत्येक क्षणीं ऐकतों हरिकथा, प्रत्यक्षरीं ते निघे**
**शाखा कीं तरुला तशी नवकथा, तें रोमरोमीं रिघे ।**
**त्यांतें तोष न होय घोष जरि तो ऐके कथेचा सदा**
**जैसा सागर तो अनावरसरिन्नीरें भरेना कदा ॥**

अशी प्रज्वलित ज्ञानावस्था तेथें प्रगट झाली. आश्रमांत चित्त रमून गेलें. महात्माजींच्या सत्यअहिंसादि तत्त्वांच्या महान् प्रयोगशाळेंतला कुशल “आचार्य” अशी भूमिका अगदीं अल्पावधींत गांठली गेली.

आतां एक गोष्ट करावयाची आवश्यकता होती. घरीं न कळत काशीला निघून जाण्यांत सत्यतत्त्वाला बाध येत होता. फार मोठ्या उदात्त हेतूनें अल्प जरी वक्र वृत्ति घडली तरी ताबडतोब तिची निष्कृति केली पाहिजे. म्हणून घरीं परत जाऊन, आपलें विचार स्वच्छपणें मांडून मग परत आश्रमांत येणें आवश्यक झालें. महात्माजींनी हि तसा च सल्ला दिला. त्याप्रमाणें बडोद्याला यावें लागलें. . . . . . .पण ह्या घटनेंत एक मोठा अर्थ भरलेला होता. बडोद्याला येण्यांत सत्यमार्गाचें अवलंबन, मातेचा संतोष, हें दोन हेतु तर स्पष्ट च होते. परंतु विद्यार्थी-मंडळांत, सहाध्यायांशीं, आपल्या सोबत्यांपाशीं जो अनेक प्रकारचा विचारविनिमय झाला होता त्याच्या दृढीकरणासाठीं, त्या विचारांना नवीन दृष्टीची झिलई देण्यासाठीं, त्या त्या विद्यार्थ्यांना, सहाध्यायांना जें विचार दिले होते त्यांची वाढ करण्यासाठी हें आगमन फार च आवश्यक होतें. महान् पुरुष आधीं वाटेल त्याला विचार देत नाहीं. ज्याला विचार दिला तेथें तो कितपत रुजला याकडे त्याचें लक्ष अव्याहत लागलेलें असतें. कारण तो विचार फेंकीत नाहीं, तो विचार पेरतो. त्यामुळें त्या पेरलेल्या विचारांचें पीक निघालें कीं नाहीं याकडे त्याची शेतकऱ्याप्रमाणें सारखी नजर असणें स्वाभाविक आहे. महान् जीवनामुळें लहान जीवन हि महान् बनतें. ही ‘विद्यार्थी-मंडळांतलीं’ लहान लहान जीवनें ह्या थोर जीवनाखेरीज जगताच्या मायामय बाजारांत कोठच्या कोठें धुळीस मिळालीं असतीं. एवढ्यासाठीं च नदी महासागराकडे जात असतां सरळ रेषेंत जात नाहीं. ती निरनिराळीं वळणें घेत दुमडत दुमडत, मुरडत मुरडत अनेक दिशांनीं वहात जाते. त्यामुळें ती निरनिराळ्या प्रदेशांत असलेल्या अनेक लहान लहान जलप्रवाहांना आपल्या बरोबर नेते. जर नदी सरळ एका च रेषेंत समुद्राला मिळेल तर हा लाभ होणार नाहीं.

अनुक्रमणिका

फार च थोडीं जीवनें तिला मिळूं शकतील. अनेक जीवनें जागच्या जागीं च सुकून जातील. या पुनरागमनांत ही च नदीची पवित्र करुणा स्वाभाविक तऱ्हेनें प्रकट झाली.

गृहत्याग केला होता ती च ही रात्रीची ९॥ ची वेळ होती. ह्या च वेळीं पुन्हां घरीं प्रवेश केला गेला. वडील कोठें तरी बाहेर मित्रांकडे गेले होते. सर्वांचीं जेवणें झालीं होतीं, आंथरूणें पसरलीं होतीं, नेहमीं आपल्या मुलाच्या चिंतेंत निमग्न असलेली आई त्या कापडीपोळेंतल्या घरांतील माजघरांत सर्व कामें उरकल्यामुळें निवांतपणें स्वस्थ बसली होती. दिवेल तेलाचा दिवा मिणामिण जळत होता. अशा त्या शांतवेळीं अंगणांतून एक कृश मूर्ति अंधारांतून एकदम येत आहे असें दिसलें. कोण आहे, असें विचारावयाचें इतक्यांत ती मूर्ति एकदम माजघरांत प्रविष्ट झाली आणि तिनें मातेपुढें केवळ दंडवत् साष्टांग नमस्कार घातला. ही गोष्ट इतकी आकस्मिकपणें घडली कीं आईला आश्चर्याचा धक्का च बसला. आणि ही नमस्कार घालणारी मूर्ति दुसरी तिसरी कोणी नसून आपला च गृहत्याग केलेला पुत्र आहे हें तत्क्षणीं लक्षांत आल्याबरोबर आनंदानें ती केवळ निस्पंद बनून गेली. तिच्याच्यानें जागचें हालणेंसुद्धां होईना. ती केवळ जड मूर्तिसारखी निश्चल होऊन गेली. सर्वांचीं जेवणें झाल्यामुळें घरांत खाण्यासारखा जिन्नस कांहीं च उरला नव्हता. तेव्हां स्वयंपाक करण्याची जरूरी होती. पण “आतां माझ्याच्यानें हालवतसुद्धां नाहीं. अशी माझ्या मनाची स्थिती झाली आहे. तेव्हां शांते, तूंच स्वयंपाक कर आणि विनायकाला वाढ” असें ती आपल्या मुलीला म्हणाली. तो प्रसंग केवळ अवर्णनीय च होता! क्रमाक्रमानें सर्व स्वयंपाक तयार होऊन जेवण हि आटोपलें. वडील बाहेरून आले. आणि लगे च तेथें जेवणाच्या पाटावर बसून च बोलण्याला सुरुवात झाली. उष्टें ताट समोर च पडलेले होतें. त्या बोलण्यांत अनेक प्रश्न निघून स्वतःची जीवनाची दृष्टि अनेक तऱ्हेनें समजावून देण्यांत येत होती. वडील मधून मधून शंका विचारीत होते. जवळ जवळ बारा वाजले आणि नंतर सर्वजण झोंपी गेले.

दुसरा दिवस उजाडला. गोपाळराव काळे यांची भेट झाली. पुन्हां पूर्वींप्रमाणें मंडळी जमूं लागली. वादविवाद, फिरणें, संभाषण इत्यादि गोष्टी पूर्ववत् सुरू झाल्या. कधीं न येणारे विद्यार्थी हि आतां कुतूहलानें येऊं लागले. अनेक तऱ्हेचें प्रश्न विचारू लागले. सगळा दिवस बोलण्यांत, प्रश्नोत्तरांत आणि वादविवादांत निघून जाऊं लागला. नवीन विद्यार्थ्यांना, अपरिचितांना सर्वच गोष्टींचें गूढ वाटे. तशांत आतां पूर्वीचा पोषाखहि राहिला नव्हता. गुडघ्यापर्यंत पंचा, अंगावर उपरणें, हातांत दंड हे पोषाखाचें बाह्य परिवर्तन अगदीच किरकोळ परिवर्तन झालें होतें. त्या मानानें आंत कितीतरी मोठें परिवर्तन झालें होते, त्याची बिचाऱ्या सामान्य लोकांना काय कल्पना? परंतु बाह्य पोषाखानें च कित्येक बुजत. एकजण श्री. मोघे ह्यांना एकदां विचारतो— “काय रे! तो विनायक भावे अलीकडे बोडक्यानें रस्त्यांतून हिंडतांना पाहिला—अगदीं अशक्त असा—तो काय ‘मॅड’ झाला का रे?” त्यावर मोघे उत्तर करतात— “ते नुसतें स्वतःच वेडें झालें नाहींत, दुसऱ्यांना हि आणखी असें च वेड लावणार आहेत ते!” ह्या उत्तरानें तो गृहस्थ काय समजला असेल तें असो. परंतु यावरून जवळच्या मंडळींत या परिवर्तनाविषयीं केवढा आदर उत्पन्न झाला होता, हें सहज लक्ष्यांत येतें. पुष्कळ दिवस पाण्यासाठीं भटकत फिरणाऱ्या तृष्णार्त मनुष्याला एकदम अमृताचें सरोवर लागावें, किंवा अथांग समुद्रांत गटंकळ्या खात असतांना एखादी हंसवाहिनी नाव जवळच धावून यावी, अथवा भयाण अरण्यांत एकाएकीं ऋषींचा रमणीय आश्रम दिसावा त्याप्रमाणें ह्या दृढपरिचित मित्रांची स्थिति झाली होती. ते आतां जवळ जवळ दिवसभर भोंवताली च असत. काशीचें अनुभव, आश्रमांतलें प्रसंग, गांधींचें विचार—अशी बोलण्याला विविध विषयांची सामुग्री होती. ह्या मेजवानीचा लाभ कोण सोडणार? सदा सर्वदा ही मेजवानी चालूं च असावयाची. येथें अजीर्णाची भीति नाहीं. वीट येण्याचें हि नांव नको.

अनुक्रमणिका

**'अवीट हें क्षीर हरिकथा माऊली!'**

जगांतल्या इतर सर्व गोष्टी शिळ्या होतात, त्यांचा वीट येतो, त्या टाकाऊ ठरतात. या गोष्टींना वीट नाहीं, येथें श्रम नाहीं, शिळेपणाचें नांव नाहीं. परमार्थ हा असा अवीट आहे. राम आणि सीतेच्या संवादाचें वर्णन करतांना भवभूतीनें

**अविदितगतयामा रात्रिरेव व्यरंसीत् ।**

असें वर्णन केलें आहे. संवादसुखांत न कळत सर्व रात्रच निघून गेली. एका रात्रीची च कथा काय येथें असे कित्येक दिवस सहज निघून गेले. त्याचें कोणास च भान नसे. कालस्थलाची मर्यादा ह्या संभाषणांत अगदीं च लुप्त होऊन जाई.

हा संवादांतून प्रकट होणारा ज्ञानामृताचा लाभ आपण एकट्यानें च घ्यावा, हें मंडळींना रुचेना. एक च पदार्थ परंतु आरसे महालांत ठेवल्यानें तो जिकडें तिकडें दिसूं लागतो. मग त्याची मौज वाढते. ज्ञानांत जितके भागीदार तितका आनंद अधिक—तितकी प्रतीती अधिक वाढूं लागते. म्हणून मंडळींनीं जाहीर प्रवचनें करण्याचें ठरविलें. बडोद्यांतलीं ही पहिली च जाहीर प्रवचनें होतीं. तशी 'विद्यार्थी-मंडळांत' अनेक व्याख्यान-प्रवचनें झाली होतीं. परंतु त्यांचा लाभ फार च थोड्यांना मिळाला होता. जाहीर प्रवचनांच्या जाहीराती काढून जिकडे तिकडे वाटल्यामुळें लोकांचें कुतूहल अधिक च वाढलें. वयस्क मंडळी, विद्यार्थी मंडळी, शाळेंतील शिक्षक वर्ग असे अनेक गटाचे लोक प्रवचनाला येऊं लागले. आई आणि वडील दोघांनीं हि प्रवचनें ऐकलीं. बिनतोड विचारसरणी, गाढ विद्वत्ता, त्या त्या विषयांतली तन्मयता, विलक्षण भाषाप्रभुत्व, हृदयस्पर्शी वक्तृत्व, वचनें म्हणण्याची आवेशयुक्त धाटणी, विचाराच्या खोलपणामुळें उमटणारा गंभीर आविर्भाव, ह्यामुळें सर्व च लोक चित्रासारखे तटस्थ होऊन जात. 'हा कालचा पोर', असें ज्यांनीं म्हणावें ती व्यवहारचतुर माणसें हि दिङ्मूढ बनलीं.

**"माझे श्वासोच्छ्वास हि नवे । नित्य प्रबंध होआवे" ।**

ह्या ज्ञानेश्वरांच्या उक्तीप्रमाणें येथें एकसारखा ज्ञानाचा पाऊस पडत राही; तरी तें ज्ञान खुंटून जाईल अशी भीति च नसे. भक्ताचा योगक्षेम मी चालवितों ही भगवंताची प्रतिज्ञा विफल कशी होईल? भक्ताला भगवान् ज्ञान कधीं च कमी पडूं देत नाहीं. एकवेळ भक्ताला खायला मिळणार नाहीं. पण ज्ञान हें भगवान् त्याच्यापुढें वाढून च ठेवतो. जगन्नाथासमोर अन्नाच्या राशीच्या राशि पडलेल्या असतात. कोणी हि प्रसाद घेऊन जावा. तेथें जातपात, उच्चनीच, लहान-मोठा, स्त्री-पुरुष असा मुळीं भेद च नाहीं. त्याप्रमाणे ज्ञानाचा अपार साठा भगवान् भक्ताच्या पुढें ठेवून देतो. तें ज्ञान त्यानें लोकांत वाटावे, लोकांना त्याने निर्मळता यांवीं, अज्ञानाचा अंधकार साफ धुवून निघावा, ही च त्याची इच्छा.

**तैसा वाग्विलास विस्तारु । गीतार्थेसी विश्व भरूं**
**आनंदाचा आवारुं । मांडूं जगा**
**फिटो विवेकाची वाणी । हो काना मना जिणी**
**देखों आवडे खाणी । ब्रह्मविद्येची**
**दिसों परतत्त्व डोळां । पाहों सूखाचा सोहळा**

अनुक्रमणिका

**रिघों महाबोध-सुकाळा । माजीं विश्व**

हीच त्याची भावना. ह्या भगवंताच्या दिव्य स्फूर्तीची मूर्ति च ह्या प्रवचनरूपानें आपण पहात आहों असा भास होई. आपल्या पुढें बोलत असलेली हीं बालमूर्ति साक्षात् शंकराचार्य तर नाहीं? ज्ञानेश्वर तर येथें प्रवचन करीत नाहींत? का हें प्रत्यक्ष समर्थच बोलत आहेत? अशी श्रोत्यांच्या मनाची स्थिति होऊन जाई. प्रवचनकाराच्या शब्दाशब्दांत, अक्षराअक्षरांत भगवंताचा दिव्य संदेश भरून राहिलेला होता. बोलणारा स्वतः बोलतो आहे अशी भूमिका च तेथें नव्हती.

**विषयीं विसर पडिला निःशेष । अंगी ब्रह्मरस ठसावला ॥**
**माझीं मज झाली अनावर वाचा । छंद ह्या नामाचा लागलासे ॥**

ह्या तुकाराममहाराजांच्या अभंगाचा तो साक्षात्कारच होता. त्या प्रवचनांनी लोकांची हृदयें काबीज केलीं. "डोके फिरलेला मुलगा, शाळा सोडून पळून गेलेला मूर्ख पोर"— अशी ज्यांची भावना त्यांनीं उघडपणें "पळून गेल्याचें सार्थक केलें" असे उद्गार काढले. जिकडे तिकडे "धन्य धन्य" हा च ध्वनि दुमदुमून गेला. आपल्या बुद्धीच्या कक्षेच्या बाहेर असलेल्या अनंताच्या अपार साम्राज्याचा हा सम्राट आहे, आपली व्यावहारिक बुद्धि येथें चालावयाची नाहीं, अशी ह्या प्रवचनांनीं सर्वांची खात्री पटली.

परंतु अशी खात्री पटली तरी आपली मुलें हि ह्या च अनुरोधानें चालूं लागलीं तर मात्र ह्या व्यावहारिक लोकांना तें पटलें नसतें. पुढें हें आढळून आलें च. "संसारामधिं ऐस आपुला" हें च व्यावहारिकांचे मुख्य सूत्र. संसाराबाहेर जाणाऱ्यांची ते प्रशंसा करतील. त्यांना क्षणभर त्यांचें मोठें कौतुक वाटेल. पण आपण, आपलीं मुलें, आपलें संबंधीं, हे मात्र अगदी सदासर्वदा संसाराच्या कोंडीतच राहिले पाहिजेत अशी ते दक्षता घेतील. संसाराबाहेरचा मनुष्य किती हि थोर असो, तो आपला नव्हे अशी त्यांची वज्रलेप भावनाच झालेली असते. संसारांतून बाहेर पडण्याचा प्रयत्न म्हणजे एक भयंकर गोष्ट असें ते समजतात. संसार सोडून परमार्थात पडणें, लोकसेवा करणे ही गोष्ट खरोखर सोपी नव्हे. परंतु असा प्रयत्न करणें, असा प्रयोग करणें सुद्धां व्यावहारिक लोक भयंकर समजतात. एका हठयोग्याला कोणीं सांगितलें, "अहो तुमची ती सतरा आसनें, त्या अनेक भयंकर क्रिया, त्या निरनिराळ्या मुद्रा यांनी एखाद वेळां हातपाय सुद्धां मोडावयाचे. असला विलक्षण प्रयोग करण्यापेक्षा मुळीं च प्रयोग न करणें चांगलें." त्यावर तो योगी म्हणाला, "तुमचा संसाराचा प्रयोग तरी काय कमी भयंकर आहे? आयुष्यभर मरमर काम करून शेवटीं सरळ स्मशानाचा रस्ता धरण्याचा च तो प्रयोग आहे. पण हजारों लोक तो च प्रयोग करीत असल्यामुळें भयंकर वाटत नाहीं." अमृताच्या समुद्रांत बुडण्याच्या भीतीने जसा अज्ञानी मनुष्य परावृत्त व्हावा किंवा ज्ञानेश्वरांनी म्हटल्याप्रमाणें

**दैवें चिंतामणी लेइजे । कीं हें ओझें म्हणोनि सांडिजे ।**
**कामधेनू दवडिजे । न पोसवे म्हणोनि ॥**

अशी ह्या संसारांत रुळलेल्या माणसांची स्थिति झालेली असते.

परंतु 'विद्यार्थी-मंडळांतलीं' मंडळी तरुण होती. व्यवहारांत रुळलेली नव्हती. त्यामुळें त्यांची स्थिति मात्र अशी नव्हती. आतां ही मंडळी पूर्ववत् विद्याभ्यास करीत होती. तरी पूर्वींचा स्वाभाविकपणा

त्यांत उरलेला नव्हता. आयुष्याची दिशा आतां ही च; असे कोणास हि वाटेना. नावाड्यानें नाव तयार केली. तो आतां पर तीराला नेण्याला आपल्याला हांक मारीत आहे—अशा प्रवासी मनस्थितींत बहुतेक सर्व राहूं लागले. बी. ए. ची परीक्षा तेवढी राहिलीं आहे ती देऊन टाकूं आणि मग आपला निश्चय कांही तरी ठरवूं, अशा मनस्थितींत कोणी होते. कोणी एल्. एल्. बी. चा अभ्यास करूं, कांहीं वकीली करून पैसे हि मिळवूं व मग देशसेवेला लागूं, अशा "आधीं पोटोबा" अथवा "वार्धके मुनिवृत्तिनाम्" ह्या रघुवंशांतल्या विचारांत पडले होते. कोणी हा एवढा मोठा पल्ला आपल्याला झेपेल ना? अशा साशंक स्थितींत होते. कोणी लग्न केल्यामुळें च आपण फसलों आहों असें मानीत होते. तर कोणी निदान सध्यां लग्न तरी करू नयें अशा मनस्थितींत होते. निरनिराळ्या तऱ्हेचे विचार त्या त्या विद्यार्थ्यांच्या मनांत घोळत असत. ह्या पुनरागमनानें सर्वांची च स्थिति अशी डळमळीत झाली होती. आपणांस कांहीं तरी मार्ग ठरविला पाहिजे, अशी जाणीव तेथें उत्पन्न झाली. घरांत दोघां हि भावांची मनस्थिति तर याहून हि अतिशय तीव्रतम होऊन गेली. गृहत्यागाचा मार्ग, अध्यात्माचा मार्ग या पुनरागमनाने डोळ्यापुढें लखलखीत दिसूं लागला. घराची ममता अगदीं च नष्ट होऊन गेली. या ठिकाणीं सर्व साधनें भरपूर, हें घर अत्यंत पवित्र, येथें आपलीं परमपूज्य मातापितरें राहतात. तरी हा सोनेरी पाश हें च, प्रेमाचें बंधन—पण बंधन च तें— तें कांहीं केल्या रूचेना. आतां एक च गोष्ट डोळ्यांपुढें उभी राही.

**तरी झडझडोनि वहिला निघ । इयें भक्तीचिये वाटे लाग ।**
**जिया पावसी अव्यंग । निजधाम माझें ॥**

●●●

अनुक्रमणिका

## प्रकरण २२ वें

## संधि-काल

**थोड्याच** दिवसांच्या बडोद्याच्या वास्तव्यानंतर आतां परत आश्रमांत जाण्याची वेळ आली. मध्यंतरीचा बडोद्यांतील वास्तव्याचा काळ समाप्त झाला. आसपासची मित्र मंडळी यावेळीं आनंदांत अगदीं गर्क होऊन गेलीं होती. हा ज्ञानाचा ठेवा पूर्वीप्रमाणें आपल्यांत सदोदित रहावयाचा नाहीं ही प्रत्येकाची खात्री होती. असें असून हि

आजनो ल्हावो लीजिये रे । काल कोणे दीठी छे

या तत्त्वाप्रमाणें पुढच्या विचारानें आजच्या ज्ञानानंदांत न्यूनता कोण आणणार? पण हा काळ आतां संपला. आनंदाचा काळ तेव्हां च संपतो—केव्हां संपला हें लक्षांत सुद्धां येत नाहीं एकदम जागे झाल्यानंतर ज्याप्रमाणें पडलेलें स्वप्न केवळ शून्यवत् भासते, त्याप्रमाणे अशा प्रसंगीं मनाची स्थिति शून्यवत् होऊन जाते. यात्रेच्या ठिकाणीं चार दिवस भक्तांचा मेळा जमतो; गातो; नाचतो; आणि निघून जातो. मग ते यात्रेचें ठिकाण जसें ओसाड भासावें तसें च येथें झालें. तसे पाहिलें तर मानव-जीवन हें चढउतारांनीं भरलेलें आहे. त्याला कधीं भरती, कधीं ओहोटी यावयाची च.

**चंद्रासि लागति कळा उपराग येतो ।**
**गंगेसि भंग बहु पाणउतार होतो ॥**

सृष्टीचा हा नियमच आहे. ईश्वरानें विश्वाच्या कल्याणासाठीं च हा नियम घालून दिलेला आहे. रस्त्याला चढउतार असतो त्यामुळें मनुष्याला आणि वाहनादिकांना रस्ता चालणें सुकर होतें. सारखा चढ किंवा सारखा उतार असेल तर चालणें किती क्लेशकारक होईल? रात्रीमागून दिवस आणि दिवसामागून रात्र. हीं एकमेकांना पूरक आहेत. दोहोंचा मिळून जीवना चें पोषण करण्याचा क्रम अखंड चालूं असतो. कडक उन्हाळ्याशेजारी च ईश्वरानें पावसाळा निर्माण केला आहे. जन्ममृत्यू सुद्धां आपल्या कल्याणासाठीं च आहेत. जन्म नसेल तर जीवनांत नवीनता दाखल होणार नाहीं. आणि मृत्यू नसेल तर सर्वत्र जीर्णतेची भेसुर छटा पसरेल. जीवन हें असें दुहेरी निर्माण केलें आहे. कारण आत्मा वाहता आहे. जीवाला त्या प्रवाहातून जातां आलें पाहिजे. होडी एकदां या बाजूला झुकते एकदां त्या बाजूला झुकते. नावाडी मग नाव वल्ही मारीत मारीत परतीराला नेतो. आज दिवसभर सूर्याच्या प्रखर उन्हानें कोमल फुलें कोमेजून गेली. त्यांच्या पाकळ्या पाकळ्या होऊन तीं गळून पडलीं. पण उद्यां सकाळीं नवीन नवीन फुलें यावयाचीं आहेत. त्यांना जागा करून देण्यासाठीं तीं गळालीं. सृष्टिचक्राची ही केवढी आश्चर्यजनक रचना! —ह्या सृष्टिरचनेचें रहस्य अशा च प्रसंगानें उलगडावयाचें. तो प्रसंग—तो कोचरबला जाण्याचा प्रसंग आतां जवळ आला. गाडी अहमदाबादकडे निघून गेली आणि स्टेशनपर्यंत गेलेली मंडळी पुन्हां परत आपापल्या घरीं निघून आली.

मंडळी निघून आली खरी. पण त्यांचें चित्त मात्र ह्या सत्पुरुषावर खिळून गेलें ते गेलें च! हा अगदीं अल्पावधींत, आपल्या बरोबरीचा असून कोठल्या कोठें निघून गेला! आपण तर अजून जीवनाला सुरवात च

अनुक्रमणिका

केली नाहीं. आपलें जीवन म्हणजे नांवाचें जीवन आणि यानें तर जीवनाच्या अंगप्रत्यंगाची छाननी करून त्यांतल्या अगदीं अस्सल गाभ्याला च हात घातला. महावीर हनुमान् जन्मल्याबरोबर त्यानें भक्ष्य समजून सूर्यनारायणावार झडप घातली. त्याप्रमाणें यानें आता च—इतक्या अल्पावधींत सूर्यनारायणाचा हि सूर्य नारायण जो सत्यनारायण त्याचे च

**निगमकल्पतरोर्गलितं फलम् ।**
**शुकमुखादमृतद्रव संयुतं ॥**

असे अत्यंत परिपक्व फळ पदरांत पाडून घेतलें! परततांना अशासारखे विचार मनांत येणें अपरिहार्य होतें. हें असले विचार म्हणजे आत्मजागृतीचा प्रभातकाळ होय. ज्या सत्पुरुषाच्या योगानें आपल्या जीवनांत ही जागृति आली त्याच्याबद्दल

**काय वानूं मी या संतांचे उपकार ।**
**आम्हा निरंतर जागवीति ॥**

ही एक च कृतज्ञताबुद्धि मग मनांत उदय पावून त्याच्या च विचारांत चित्त मग्न होऊन राहणें हीं गोष्ट अगदीं स्वाभाविक मानावी लागेल.

ही गोष्ट स्वाभाविक खरी च. पण तीमुळें एकदां एक मोठा गमतीचा प्रसंग घडून आला. कादंबरींत मुद्दाम कल्पित प्रसंग घालावा तशा च सारखा हा प्रसंग होता. बडोद्याहून प्रयाण झाल्यानंतर थोड्या च दिवसांत गोपाळराव काळे यांना एक इंग्रजींत लिहिलेलें कार्ड आलें. ती सकाळची नेहमीची ८/९ ची वेळ होती. "मी आईला दागिने घेऊन बोलावलें परंतु ती अजून आलीं नाहीं. याचें कारण समजत नाहीं. तरी ताबडतोब तिला येण्यासंबंधी कळवावें."—अशा आशयाचा तो मजकूर होता. खालीं सही हि होती. गोपाळराव काळे ताबडतोब तें पत्र घेऊन इकडें घरीं वडिलांच्याकडे आले. त्यांनीं हि तें वाचलें. त्यांना कांहीं उलगडा झाला नाहीं. आश्रमांतून वडिलांकडें अथवा आईकडे कसलें च पत्र आलें नव्हतें. आणि आईला तिकडे बोलावण्याचें कारण तरी काय? शिवाय दागिन्यांचा उल्लेख किती चमत्कारिक समलोष्टाश्मकांचन पुरुषाला दागिन्याची काय आवश्यकता? सगळा च घोटाळा होता. तर्क कांहीं चालेना. "राष्ट्रकार्यात अर्पण करण्यासाठी पैसे पाहिजेत म्हणून दागिन्यांची जरूर असेल" असा तर्क वडिलांनीं काढला. आई तर त्या पत्रानें हतबुद्ध झाली. मुलाच्या बाबतींत कोणत्या हि आईला जी नेहमीं च काळजी वाटते त्यापलीकडे तिला दुसरें कांहीं च दिसत नव्हतें. एखादें प्राण संकट तर आपल्या मुलावर ओढावलें नसेल? का त्याला एखाद्या भयंकर आजारानें घेरलें आहे? —असें कांहीं तरी तरंग तिच्या मनावर उठत होते. 'अतिस्नेहः पापशंकी' ही म्हण खरोखर आईला च बरोबर लागूं पडते. पण केवळ चिंतामग्न होऊन किंवा तर्कवितर्क करून काय उपयोग? या पत्रासंबंधीं कांहीं तरी निर्णय करावयास पाहिजे होता. तेव्हां संध्याकाळच्या गाडीनें गोपाळराव काळ्यांनीं आईला घेऊन आश्रमांत जावें असे निश्चित ठरविलें. गोपाळराव काळे दुपारचें जेवण करण्यासाठीं स्वतःच्या घरीं गेले. पत्राचा विचार त्यांच्या डोक्यांत घोळत होता च. होतां होतां अहमदाबादचें त्यांचे एक आप्त होते. त्यांचें तें पत्र आहे. आश्रममधून आलेलें नव्हे. असा त्यांना बोध झाला. त्याप्रमाणें त्या पत्रांत लिहिलेल्या हकीकतीची संगति हि जुळली. लगे च ते पत्र घेऊन आले. आणि पत्रासंबंधीं खरा प्रकार त्यांनीं निवेदन केला. तत्क्षणीं चिंतेचें, गूढतेचें, आश्चर्याचें वातावरण एकदम नष्ट झालें. एखादें वादळ यावें आणि क्षणार्धात वितळून जावें तसें च हें झालें. "कल्पित कादंबरीसारखी घटना

अनुक्रमणिका

झाली ही!” असे च सर्वांच्या तोंडून उद्गार निघाले. ही घटना घडण्याला त्या पत्रांचें अमदाबादहून येणें, अक्षर हुबेहुब असणें ही जरी कारणें घडलीं असली तरी गोपाळरावासारख्यांच्या चित्तांत आपल्या त्या थोर मित्रासंबंधीं सारखे विचार घोळत असल्याचें तें निदर्शक होतें. एकटें गोपाळराव च नव्हे; इतरांना हि याच कारणानें त्या पत्रानें चकवलें. महापुरुषाचा जिव्हाळा हा अशा विलक्षण स्वरूपाचा असतो. तेथें ज्ञानाची अपूर्वता असते. स्वार्थाचा किंवा व्यावहारिकतेचा त्यांत लवलेश हि नसतो. अशा ममताशून्य प्रेमाची बरोबरी कशानें हि होणार नाहीं!

या प्रेमामुळें, ज्ञानाच्या आकर्षणामुळें, विद्यार्थी मंडळांतल्या मंडळींपैकीं कोणी कोणी या नाहीं त्या निमित्तानें मधून मधून आश्रमांत जा ये करूं लागले. गोपाळराव काळे तर थोड्या दिवसांसाठीं शिक्षक म्हणून तेथें राहिले होते. बाळू गोळे, धोत्रे वगैरे मंडळी हि तेथें जाऊन आली. ही मंडळी तेथें जात त्याप्रमाणें गणपति-उत्सवादि निमित्ताने बडोद्यास येण्याचे प्रसंग हि घडवून आणीत. त्या निमित्तानें चार दिवस ज्ञानसत्राचा लाभ मिळे. अशा प्रसंगीं बडोद्यांत इतर ठिकाणीं हि लोक व्याख्यानाला बोलावून नेत. एकदां कॉलेजच्या बोर्डिंगमधील विद्यार्थ्यांनीं हि बोलावलें होते. अशी बडोद्याला मधून मधून ज्ञानसत्राची मेजवानी च होई. कारण आश्रमाप्रमाणें बडोद्यांतील ह्या लहानशा संघाकडे नेहमी कृपादृष्टि होती. श्रीसमर्थ रामदासांच्या ग्रंथांचा अगदीं बालपणापासून अभ्यास झाल्याकारणानें पहिल्यापासून सामुदायिक साधनेकडे नीट नजर असे. समर्थ ग्रंथांचा अभ्यास सुमारें नऊ वर्षे केला होता. त्यांतील मुख्य दोन गोष्टींची छाप मनावर पडली होती. एक वैराग्य आणि दोन सामुदायिक साधना. वैराग्यासाठीं जबरदस्त साधना केली होती. किंबहुना वैराग्य हें तर येथलें स्वतःसिद्ध जीवन होतें. त्याप्रमाणें सामुदायिक साधनेच्या दृष्टीनें ‘विद्यार्थी-मंडळ’ निर्माण झालें होतें. आपल्याला एकादी वस्तु मिळाली तर ती, एकट्यानें खात न बसतां दुसऱ्याला हि द्यावी हें जसें तसें च ज्ञानाचें हि आहे. आपल्याच जवळ ज्ञान ठेवून तें जिरावयाचें नाहीं. त्याचा कस लागावयाचा नाहीं. आपल्याबरोबर इतरांना जो घेऊन जातो त्यांत त्याच्या ज्ञानवैराग्याचा कस लागतो. व सर्वांची उंची थोडी तरी वाढते. हिमालय २५ हजार फूट उंच आहे पण इतर ठिकाणीं खड्डे आहेत त्यांचें काय? हिमालयाची माती सर्वत्र पसरली तर हिमालयाएवढी सर्वत्र उंची होणार नाहीं. पण कांहीं तरी पातळी वाढेल च. जो जवळच्याची, समुदायाची उंची वाढवूं शकत नाहीं; त्याच्या उंचीचा उपयोग काय? पाणी वाहतांना रस्त्यांतील खड्डे भरून च पुढें जातें. शिवाय पर्वतादिकांची उंची डोळ्याला दिसते तरी पण येथें आध्यात्मिक उंची अमुक आहे याचें प्रमाण काय? तिचें कांहीं अल्प तरी मापन व्हावयाला, कसोटी लागण्याला, समुदायाशिवाय दुसरी गती च कोणती आहे? स्वतःच्या ज्ञानवैराग्याची भूमिका पक्की केल्याशिवायच्या सामुदायिक साधनेंत कांहीं च अर्थ नाहीं. म्हणून मुख्य गोष्ट आत्मकल्याण. मुख्य गोष्ट स्वतःची भूमिका ज्ञानवैराग्यानें भक्कम करणें. त्यानंतर समुदाय-सेवेची गोष्ट येते. असा हा सरळ मार्ग आहे.

**झालिया दर्शन करीन मी सेवा ।**
**आणिक तें देवा नलगे दुजें ॥**

तुकाराममहाराजांनीं हि ही च दृष्टि ठेवली होती. जवळ साधनेचें बळ नाहीं, आणि समुदाय करण्याचा वृथा हव्यास मात्र पुष्कळ, असें कांहीं लोक आढळतात. “कांहीं” कशाला? ज्याला त्याला आपण गुरु बनावें अशी च इच्छा असते. आधीं कोणाचा तरी मुलगा बनल्याशिवाय बाप बनतां येत नाही. तसें कोणाचें तरी शिष्यत्व पत्करून ज्ञान मिळविल्याशिवाय गुरु होता येत नाहीं. ही साधी गोष्ट कांहीं आमच्या लक्ष्यांत येत नाहीं. थोडक्यांत आम्हांला समुदाय-सेवा नको असते पण समुदायाचें आधिपत्य मात्र पाहिजे असतें—ही एक मनोवृत्ति झाली. दुसरी मनोवृत्ति अशी असते कीं आपल्याला काय करावयाचें आहे दुसऱ्याशीं?

आपल्याला ज्ञान मिळालें झालें. आतां कांहीं भानगड उरली च नाहीं. पण ज्ञान मिळालें हें कशावरून? सूर्याचा प्रकाश तर दिसत नाहीं. गाढ अंधकार आजूबाजूला पसरला आहे. मग सूर्योदय झाला हें कशावरून समजावयाचें? ज्ञानाची कसोटी काय? आणि उपयोग काय? ज्ञान काय एका डोक्याच्या कवटींत पडून राहील? वैराग्य काय असें कोंपऱ्यांत बसणारें आहे? “प्रजातंतु मां व्यवच्छेत्सीः” ही उपनिषदांची हांक काय सांगते? शारीरिक प्रजोत्पादनांत जर संतती निर्माण करण्याचा प्रचंड वेग आहे, तर काय ज्ञानांत संतति निर्माण करण्याचें, परंपरा निर्माण करण्याचें सामर्थ्य नाहीं? समुदाय-सेवा ज्ञानपरंपरेच्या दृष्टींने च करावयाची. या बडोद्याच्या लहानशा संघाकडे या च दृष्टींनें पाहिलें जाई. हा कांही हजारों लोकांचा समुदाय नव्हता. माणसें थोडीं आणि निवडक च होतीं. परंतु त्यांच्याकडे मन धांव घेई याचें कारण साधनेची खरी दृष्टि येथें बाणली होती हें च होय; या च कारणांमुळें गृहत्याग केला तरी निरनिराळ्या निमित्तानें बडोद्याला मधून मधून येणें व्हावयाचें. एकदां विद्यार्थी-मंडळांत भांडण लागलें. अशा ठिकाणीं भांडण कसलें होणार? तें भांडण कार्यासंबंधीं च होतें. एक म्हणे, तुम्हीं कांहीं च कार्याचा जोम राखीत नाहीं, आतांपर्यंत केलें तेवढें च; यापुढचा विचार कोणी करीत नाहीं. नवीन अभ्यास नाहीं, नवीन प्रेरणा नाहीं, व्याख्यानें देतां तीं हि आपली रडकीं च. त्यांत कोठें अभ्यासाचा मागमूस हि दिसत नाहीं, हे काय? दुसरी मंडळी म्हणत आपल्या परीनें आम्ही कार्याचा प्रयत्न करीत आहोंत. वर्ग चालवितों, उत्सव करतों, पुस्तकें जमवितों—हळूं हळूं काम करतों च आहों, परंतु एवढ्यानें समाधान नाहीं, म्हणून पहिल्यांनें नवीन विद्यार्थ्यांचा भरणा करून आतां नवीन चैतन्य आणण्याची दिशा स्वीकारण्याची कल्पना काढली. तो म्हणे “तें कांहीं नाहीं, मी च आतां एंजिन आहें, तुम्ही केवळ डबे आहांत. तुम्हांला ओढून पुढें नेल्याशिवाय तुम्ही कांहीं हलणार नाहीं”, अशासारखें हें भांडण होतें. ह्या भांडणाची हकीकत कळवली गेली. त्याप्रमाणें लगे च बडोद्यास आगमन झालें. हें भांडण मग सहज च मिटलें. हें काय सांगावयास पाहिजे?

वरवर पाहतां हें भांडण मिटलें. पण खरोखर तें मिटलें नाहीं. कारण तें कांही व्यक्तीव्यक्तींतलें भांडण नव्हतें. हें भांडण—हा झगडा निराळा च होता. आपण, प्रत्येकांनें वेगाने पुढें गेलें पाहिजे. सांचलेल्या कोंडलेल्या किंवा विरुद्ध स्थितींत राहतां कामा नये, हें जें एका बाजूचें म्हणणें होतें तें खरें होतें. कारण सांचलेलें सद्‌गुण सुद्धां दुर्गुणाच्या च पायरीला पोंचतात. म्हणून वेग, चैतन्य, खेळतेपणा, प्रवाहित्व अखंड राहिलें पाहिजे, हें म्हणणें खरें च होतें. तो वेग, तें चैतन्य कसें मिळवावें या संबंधीं हा झगडा होता, “मीच एंजिन आहें आणि मी च तो वेग आणीन” हा अहंकाराचा भाग होता, तो मात्र गेला. भांडण मिटलें याचा एवढा च अर्थ होता. ‘विद्यार्थी मंडळानें’ आतां पुढें जावयास पाहिजें. प्रगतीचीं पावलें झपाट्यानें पडावयास पाहिजेत, तारुण्याचा हा महत्त्वाचा भाग गमावता कामा नये. यासंबंधींचा असंतोष हें च खरें भांडण होतें. पण हा असंतोष जावयाचा कसा? व्यक्तीची प्रगति तीव्र वेगानें झाली पाहिजे आणि संघाशीं हि संबंध राहिला पाहिजे, हे साधावयाचें कसें हा मोठा प्रश्न होता. मधून मधून या ठिकाणीं हा सत्पुरुष आल्याने किंवा इथली मंडळी चार दिवस आश्रमांत गेल्यानें हीं तळमळ शांत होऊं शकत नव्हती. पेला ओठाजवळ नेला तरीसुद्धां तहान शांत होत नाहीं. प्राप्तीशिवाय तळमळ शांत कशी होणार? उलट अशानें ती तळमळ ज्यास्त च वाढत जाते. सरूपता, समीपता, सलोकता या तीन मुक्ति मिळाल्या तरी सायुज्यतेखेरीज शांति नाहीं.

अशा स्थितींत च या सत्पुरुषाकडून महाराष्ट्रांत संचार केला गेला. वांई येथें वास्तव्य झालें. तेथें हि चार मंडळी हाताला लागली. त्यांना ‘विद्यार्थी-मंडळा’ ची माहिती करून दिली. त्यांतल्या दोन विद्यार्थ्यांनीं बडोद्यास हि प्रयाण केलें. या तरुणांना धर्मकार्यार्थ तयार करण्यासाठीं बडोद्यास कांहीं दिवस वास्तव्य झालें. ‘विद्यार्थि मंडळ’ ही संस्था मुख्यतः विचारसंस्था होती. संस्थेजवळ जुजबी कामापुरता वर्गणीचा पैसा असे. संस्थेवर मंडळी येत जात; रात्रीं निजत. परंतु तेथें संपूर्ण जेवणखाण्याची व्यवस्था नव्हती. हे दोघे

तरुण अगदीं च नवीन, निराळ्या वातावरणांतले, त्यांची व्यवस्था उत्तम व्हावी अशी आवश्यकता होती. गोपाळराव काळ्यांनीं आपल्या घरीं त्यांची व्यवस्था केली. आपल्या थोर मित्रांचे हे विद्यार्थी आहेत ह्या भावनेनें ते त्यांच्याकडे पाहत असत. त्यांनीं हे कोण आहेत, कशासाठीं आले. कांहीं हि विचारावयाचें नाहीं असें घरच्या मंडळींना गोपाळरावांनीं स्पष्ट बजावलें होतें. गोपाळरावांच्याकडची सर्व मंडळी गोपाळरावांप्रमाणें च सात्विक वृत्तीची असल्यामुळें कोणी हि या विद्यार्थ्यासंबंधीं चौकशी केली नाहीं. आणि व्यवस्था हि उत्तमोत्तम ठेवली. हे दोन विद्यार्थी म्हणजे वांईच्या प्राज्ञपाठशाळेंतींल लक्ष्मणशास्त्री जोशी आणि कोनकर शास्त्री हे होत. ते संस्कृत मध्यें उत्तम बोलत. पंडिती वातावरणांत वाढलेले होते. न्याय आणि व्याकरणाचे अभ्यासी होते. एकाद्या वैय्याकरणाला कोणी प्रश्न विचारला स्टेशन कोणीकडे आहे? तर त्या जुनाट हेकट वैय्याकरणानें उत्तर द्यावें "भूगोल हा माझा विषय नाहीं." ही गोष्ट सांगितली जाते किंवा जुन्या पंडितांच्या व्यवहारशून्यतेची "धृताधारे पात्रं वा पात्राधारे धृतं" अशी हि गोष्ट सांगितली जाते! जवळ जवळ अशा च आकुंचित् क्षेत्रांत ते वाढलेले होते. त्यामुळें त्यांना इतर सामान्य गोष्टींचें हि ज्ञान नसे. वैराग्यपूर्वक सेवा करावयाची तर जगाचें चौफेर ज्ञान पाहिजे म्हणून त्यांना येथें शिकविण्याची सुरुवात केली. एवढें नैय्यायिक होते परंतु त्यांना गुणाकार भागाकार शिकविण्यापासून सुरुवात होती. इंग्रजीची हि ती च स्थिति. प्रथम पासून सुरुवात होती. पण १/२ महिन्यांत च हे विषय पुष्कळ तयार करून घेतले. टॉल्स्टॉयचे (Teaching of Christ) हें पुस्तक वाचवून घेतलें. या च सुमाराला बडोद्यांत प्लेगचा उपद्रव सुरू झाला. तेव्हां या विद्यार्थ्यांना गांवाबाहेर काशीविश्वेश्वराच्या मंदिराजवळ घर हलवलें होतें तेथें ठेवलें. या विद्यार्थ्यांच्या शोधांत कानडेशास्त्री हि बडोद्यास आले होते. कारण हें विद्यार्थी वांईहून विचारून आले नव्हते. बडोद्याहून हि ते न विचारता च पुढें निघून गेले.

घरीं वरील विद्यार्थ्यांचा असा अभ्यास चालला होता त्याप्रमाणें पाठच्या भावाची विस्मयकारक तपस्या चालूं होती. संगीत, चित्रकला, वडिलांजवळ इंग्रजी शिक्षण हें तर पूर्ववत परिश्रमपूर्वक चाले च. परंतु आतां महात्माजींच्या आश्रमांतल्या कित्येक गोष्टी येथें सुरू करण्यांत आल्या. दळण्याचें काम सुरू केलें, पोषाख आश्रमीयांप्रमाणे च शुभ्र साधा ठरविला. त्या वेळीं पांढरी टोपी उत्तर हिंदुस्तानी भैय्याखेरीज कोणी घालीत नसे. त्यामुळें शाळेंत रस्त्यांत, तो एक कुतुहलाचा विषय होऊन बसला. आहारांत केवळ गहूं आणि दूध ठेवलें. 'आरोग्यताविषे सामान्य ज्ञान' या बापूजींच्या ग्रंथाचें अगदी काळजीपूर्वक परिशीलन करून त्याप्रमाणें चालण्याचा आटोकाट प्रयत्न सुरू केला. आहार कमी कमी करून शेंवटी रोज एक भाकरी व दूध इतक्या वर च आणून ठेवला. शरीर उत्तरोत्तर कृश होत चाललें. कमी आहारामुळें शौच्याला होईना. उष्णता वाढे. कामाचा हि सारखा हव्यास होता. झोंप हि कमी घेतली जाई. ११ ते ४ इतकी च झोंप होती. रात्रीं वडिलांजवळ वाचावयास बसावें. ते थकून आलेले असत. त्यांचा सहज डोळा लागे. मग तेवढा वेळ तसें च बसावयाचें. त्यांना जाग आली कीं, "हं, पुढें काय?" असें म्हणून वाचण्याला सुरुवात होई. असे ११/११॥ पर्यंत चाले. नंतरची झोंप हि गाढ येत नसे. शरीर तर सापळ्यासारखें होत चाललें. आईवडिलांना एकसारखी चिंता लागली. आई जास्त आहार घेण्यासाठीं किती कळकळीनें सांगे—पण नाहीं. ठरलेल्या आहारांत फरक व्हावयाचा नाहीं. लोकांना जास्त खाऊं नका, चमचमीत जेवूं नका, आरोग्य बिघडेल म्हणून सांगावें लागतें. येथें जास्त आहार घेण्याबद्दल सांगावें लागे. अगदीं च उलट स्थिति!

**या निशा सर्व भूतानां तस्यां जागर्ति संयमि ।**
**यस्यां जाग्रति भूतानि सा निशा पश्यतो मुनेः ॥**

अनुक्रमणिका

विद्यार्थी-मंडळांतील प्रगतीसंबंधीचा असंतोष्, घरीं चाललेली तीव्र तपस्या, बाहेरील विद्यार्थ्यांचें शिक्षण या सर्वांचा एक च अर्थ होता. खऱ्या जीवनाला सुरुवात करण्यासाठीं ही धडपड होतीं. अग्नी पेटण्यापूर्वीची धुमसण्याची ही स्थिति होती. "ज्वलन्निव ब्रह्ममयेन तेजसा" असे पेटणारें महात्मे तर फार च थोडे. परंतु ही धुमसण्याची स्थिति सुद्धां तशी च दुर्लभ मानावी लागेल.

**मनुष्याणां सहस्त्रेषु कश्चिद्यतति सिद्धये ।**
**यततामपि सिद्धानां कश्चिन्मां वेत्ति तत्त्वतः ॥**

या श्लोकांवर भाष्य करतांना श्रीशंकराचार्य म्हणतात—"तेषां यततामपि सिद्धानां—सिद्धा एव हि ते ये मोक्षाय यतन्ते"—जे मोक्षासाठीं झटतात त्यांना सिद्ध च समजलें पाहिजे कारण असे मोक्षार्थ झटणारे काय वाटेवर पडले आहेत? म्हणून त्यांना गीतेनें सिद्ध म्हटलें आहे. ते बद्ध अवस्थेंतून पुढें गेले म्हणून सिद्ध च समजले पाहिजेत. आतां येथें असा प्रश्न येतो की, येथें खरें जीवन नव्हतें म्हणून ही धुमसण्याची क्रिया चालली होती, त्याचा अर्थ काय? येथें काय कोणी छानछोकींत दिवस घालवित होते? का कोणी भयंकर व्यसनांत गुरफटला होता? असें काहीं च नव्हतें. परंतु ज्या ज्या महत्त्वाच्या गोष्टी आत्म्याला आवश्यक आहेत त्यामुळें देशाला आणि जगाला हि त्यांची जरुरी आहे त्यांचा या बडोद्याच्या रोजच्या जीवनांत समावेश होत नव्हता. मधून मधून येथें व्याख्यानें होत. चर्चा होई. आश्रमांतून या मंडळींच्या आमंत्रणामुळें येथें थोर सत्पुरुषाचें आगमन हि होई. परंतु नरसी मेहत्यानें म्हटल्याप्रमाणें

**नित सेवा नित ओछव कीर्तन । निरखवा नंदकुमार रे**

अशी ज्ञानाची, भक्तीची, सेवेची नित्यस्थिति येथें नसे. तेव्हां नैमित्तिक अवस्थेंतून नित्यस्थितीवर येण्यासाठीं ही धडपड चालू होतीं; असें म्हणतां येईल. जीवनांत महत्त्वाचें जें जें वाटत असेल तें नित्य नियमित राहिलें पाहिजे. उदाहरणार्थ प्रार्थना जर आध्यात्मिक जीवनाचें महत्त्वाचें अंग आहे असे वाटत असेल तर रोज प्रार्थना केली पाहिजे. आठ दिवसांनीं एकदां भजन म्हणावयाचें याला आध्यात्मिक दृष्टीनें विशेष अर्थ नाहीं. त्यानें जीवनाचें पोषण होणार नाहीं. कारण सात दिवसांच्या इतर व्यवहारानें तो भजनाचा ठसा तेव्हां च पुसला जाईल. म्हणून जीवन पुष्ट करणारी वस्तु नित्य असावी लागते. रोज जेवावें, रोज स्नान करावें, रोज निजावें, हें जसें शरीरपोषणाचें नित्य-कार्य चाललें आहे, तसें आत्म्याला नित्य पोषण मिळेल असा जीवनक्रम पाहिजे. पहिले पहिले थोर खलिफा युद्धाच्या ऐन गर्दीत हि नमाजाचा वेळ चुकू देत नसत. त्या वेळीं शस्त्रें बाजूला ठेवून भर रणांगणांत ईश्वरमय होत. कारण ती वस्तु ते निरपवाद नित्य महत्त्वाची समजत, आध्यात्मिक मानीत. असें नित्य आध्यात्मिक जीवन आश्रमाखेरीज यथें लाभणें सोपें नव्हते.

मग आश्रमांत येण्याला या मंडळींना त्यांच्या त्या थोर आश्रमीय मित्रांकडून सुचविलें गेलें नाहीं याचे कारण काय? कारण सत्पुरुषांची ही नेहमीची च पद्धति आहे. सत्पुरुष बहुधा स्थूल गोष्टी सांगत नाहींत. ते अखंड वाहते असतात. त्यांच्यापासून ज्यांना जें घ्यावयाचें तें त्यांनी घ्यावें; अशी त्यांची वर्तनपद्धति असते. गंगा नदी परमपवित्र आहे. परंतु ती जर नेहमीचा मार्ग सोडून लोकांच्या घरांत शिरेल तर किती अनर्थ होईल? सूर्याचें हि असें च आहे. तो नेहमी सेवेला हजर असतो. दार जरा किलकिलें केलें की आंत शिरला च. आपला प्रकाश तो ताबडतोब आंत पाठवितो. परंतु दार बंद असेल तर दार ठोठावण्यांचे काम तो करीत नाहीं. तो दाराबाहेर नम्रतेनें उभा असतो. सेवकाची सेवेची तत्परता, नम्रता आणि मर्यादा ही सत्पुरुषांच्या

अनुक्रमणिका

ठिकाणीं अशी परिपूर्ण उतरलेली असते. गोपाळराव काळ्यांच्या मनांत लग्न करावयाचे नव्हतें, परंतु त्यांच्या वडिलांनीं कुठें तरी लग्न जुळवून एकाएकी तार केली व “तूं नाहीं म्हणूं नको माझी अब्रू जाईल” अशी गळ घातली. गोपाळरावांनी स्वाभाविकपणें च “काय करूं?” असा प्रश्न विचारला होता. पण त्याप्रसंगी हि ‘तेथें पाहिजे जातीचें’ या एका चरणाखेरीज कांही उत्तर दिले नव्हतें. सत्पुरुष ज्याच्या त्याच्या अंतर्विकासाला वाव देत असतात. कोणाच्या व्यवहारांत अनाहूत मन घालींत नाहींत. इतकें च काय पण स्थूल गोष्टी हि बहुधा सांगत नाहींत. कारण उघड आहे. वर केव्हां यावें हे अंकुराला बरोबर समजते. त्याला जर लहान मुलाप्रमाणें वर येत नाहीं म्हणून उपटूं लागलो तर काय रोप वर येईल?

शिवाय वांईचें वास्तव्य, महाराष्ट्र-परिभ्रमण इत्यादि गोष्टींचा स्वतःचा अनुभव हि अजून चालूं होता. कोचरब आश्रमाचे साबरमती आश्रमांत परिवर्तन होत होते. बडोद्याची मंडळी हि परिवर्तनावस्थेंत च होती. त्यामुळें या काळाचे वर्णन करावयाचे तर हा काळ संधि-काळ होता असें म्हणावें लागेल. म्हटलें तर उजेड, म्हटलें तर अंधार अशी ही अवस्था होती. सूर्य तर दिसत नाहीं. पण तत्पूर्वीचा प्रकाश आहे. बरें प्रकाश आहे म्हणावें तर अंधार हि पूर्ण गेला नाहीं अशी ही स्थिति होती. खरें म्हणावयाचें म्हणजे ही च एक अशी स्थिति होती असें नव्हें. विशेषत्वानें हा काळ असा होता इतकेच. बाकी परिवर्तनावस्था ही नेहमीची च आहे. म्हणून नेहमीच संधि-काळ आहे असें समजावयाचें आणि उपनिषदांतींल ती थोर प्रार्थना सतत करीत रहावयाची.

**ॐ असतो मा सद्गमय ।**
**तमसो मा ज्योतिर्गमय ।**
**मृत्यो माऽमृतं गमय ।**

●●●

अनुक्रमणिका

# प्रकरण २३ वें

## वांई

**गृहत्याग** करून हिमालयांत जाण्याच्या रस्त्यांतला पहिला 'टप्पा' काशी ठरविला गेला. तेथून आश्रमांत येऊन आध्यात्मिक हिमालयाच्या अत्युच्च शिखरावर चढल्यानंतर 'महाराष्ट्रातील काशी' म्हणविल्या जाणाऱ्या प्रसिद्ध 'वांई' क्षेत्रीं आगमन झालें. या वेळीं शरीर कमालीचें क्षीण झालेलें होतें. शरीर ज्यास्त चांगलें व्हावें म्हणून च बापूजींनीं हि वांईला जाण्याच्या कल्पनेंस प्रोत्साहन दिलें असावें. योगीं पुरुषाचें शरीर रोगी नसावयाचें च. परंतु, पुष्ट होणें हा त्याचा स्वभावधर्म नव्हे. त्यानें ठरविलें तर त्याला पुष्ट होतां च येणार नाहीं असें नाहीं. उलट तो रोगी पुरुषापेक्षां अति लवकर पुष्ट होऊन दाखवील. परंतु, त्याचा कल पुष्टीकडें नसतो. त्याचा कल शुद्धीकडें असतो आणि त्यामुळे त्या शुद्धींतून त्याची बुद्धि एकसारखी परिपुष्ट बनत जाते. शुद्धबुद्धि हें आत्मदर्शनाचें महाद्वार आहे. या द्वारांतून ती थोर सिद्धि त्याला प्राप्त होते. म्हणून च महावीर हनुमंतांचें वर्णन करतांना

**मनोजवं मारुततुल्यवेगं जितेंद्रियं बुद्धिमतां वरिष्ठम् ।**

असें म्हटलें आहे. हनुमंताची 'वरिष्ठ-बुद्धि' हें त्याच्या शुद्ध शरीराचें आणि शुद्ध वृत्तींचें फळ आहे. परिपुष्ट स्नायु एका दिवसाच्या तीव्र तापांत साफ उतरून जातात, असा अनुभव आहे. पण बुद्धीचें तसें नाहीं. ती टिकाऊ असते. योगी तें च अन्न घेतो आणि भोगी हि तें च अन्न घेतो अशी स्थिती असली तरी योग्याच्या अन्नाचा परिपाक सात्विकतेत होऊन बुद्धीला तो पोषक ठरेल; उलट भोगी मनुष्याच्या अन्नाचा परिपाक राजसी वृत्तींत होऊन त्याची भोगवासना बळावेल. वृत्तिभेदामुळें हें होत असतें. What is body and soul? Soul! Soul is a thinner body and body is a ruffers soul. शरीर आणि आत्मा म्हणजे काय? शरीर म्हणजे स्थूल आत्मा आणि आत्मा म्हणजे सूक्ष्म शरीर अशी व्याख्या केली जाते. ती परिपूर्ण नसली तरी वृत्ति आणि देहाला ती लागू पडते. ज्याची जशी वृत्ति तसें त्याचें शरीर आणि ज्याचें जसे शरीर तशी त्याची वृत्ति. असे म्हणण्यास हरकत नाहीं. म्हणून योगी पुरुषाची अशक्तता आणि भोगी पुरुषाची अशक्तता यांत महदंतर आहे, हे लक्षांत ठेवलें पाहिजे. योगी पुरुष अशक्त दिसला तरी त्याची वृत्ति अशक्त होत नाहीं. त्याचा स्वभाव 'मनोजवं मारुततुल्यवेगं' असा धडाडीचा—'धृत्युत्साहसमन्वित'. जो मूळपासून असतो तो बदलत नाहीं. ज्याप्रमाणें आपले जड-जवाहीर, सोनें, मोती, मोहरा पुतळ्या, आपण अगदीं आंत—पेटींत—तळघरांत घालून ठेवतो त्याप्रमाणे योगी आपली सर्व शक्ति बुद्धीच्या पेटींत भरून ठेवतो. आणि संयमाचें त्याला कुलूप लावून टाकतो. त्यामुळें तो दिसतो अशक्त पण असतो शक्तिमान. उलट आपली संपत्ति भर रस्त्यांत, उघड्यावर एकाद्याने टाकावी आणि मग ती सहज च नष्ट होऊन जावी; तशा सारखी इतरांची गोष्ट असते. ते दिसतात जाडजूड, पण पोकळ आणि फुसके! यत्किंचित् संयम तेथें टिकवून धरतां येत नाहीं. एंजिनांत वाफ कोंडून ठेवतात. मग ती कोंडलेली वाफ केवढें प्रचंड कार्य करूं शकते! योग्याचें तसे च असते. तो शक्तीचा सर्व साठा बुद्धीमध्यें आणून ठेवतो. म्हणून त्याची शक्ति बाहेर स्नायुरूपाने दिसत नाहीं. याला च कुंडलिनी जागृत करून मस्तकांत नेली म्हणावयाची. वृत्तीचा प्रवाह एकसारखा विचारमय आणि ज्ञानमय असणें हें च शक्तीचें उर्ध्वगमन आहे. ज्ञानमय वृत्ति योगी पुरुषाच्या ठिकाणीं एकसारखी वाढत जाते. मग तो शरीराच्या निमित्तानें प्रवासास जावों अगर दुसरे कांहीं करो, या वृत्तींत खंड पडावयाचा नाहीं.

वांईच्या वास्तव्यांत हें च दिसून आलें. आणि याशिवाय दुसरें दृष्य दिसेल तरी कसें? काय अमुक काळीं अमुक कारणानें सिंह बकरी झाला आहे, असे कधी आढळून आलें आहे? सिंह जेव्हां पहावा तेव्हां सिंह च!

तारीख १४ जानेवारी १९१७ रोजी आश्रमांतून वांईस जाण्यासाठीं गाडी गांठली. गाडींत बसल्यापासून आरंभी च एक शास्त्री भेटला. त्याच्याबरोबर गीतेसंबंधी चर्चा करण्यांत बडोद्यापर्यंतचा काळ गेला. सुरतेस मीमांसाशास्त्रप्रवीण असे एक गृहस्थ भेटले. त्यांच्याशीं संभाषण करण्यांत मुंबईपर्यंतचा काळ व्यतीत झाला. पुढें पुण्यास आगमन झालें. लगेच गायकवाड वाड्यांत जाऊन 'टिळक केव्हां येणार'? म्हणून नरसोपंताकडे चौकशी केली. लोकशिक्षणकर्ते ओकांची गांठ घेण्यासाठीं पुष्कळ तपास केला. दोन दिवसानंतर टिळकांची भेट घेतली. त्यांत पुढील प्रश्न विचारण्यांत आले :—

प्रश्न—'आपणांस सत्समागम घडला आहे काय?'
उत्तर—"नाहीं."
प्रश्न—'आपली जन्म-मरणाची भीती गेली आहे काय?'
उत्तर—'तसें कांहीं सांगतां येणार नाहीं.'
प्रश्न—'आपण अमृतानुभव पाहिला आहे काय?'
उत्तर—"नाही."
प्रश्न—'बीजकग्रंथ आपल्या वाचण्यांत आहे काय?'
उत्तर—"नाहीं, मी प्राकृत ग्रंथ फारसे पाहिलेले नाहींत. ज्ञानेश्वरी मात्र थोडीशी पाहिली आहे. संस्कृतग्रंथ वाचण्याचा मला लहानपणापासून नाद होता. ते बहुतेक सगळे वाचले आहेत. गीतेच्या त्या सातशें श्लोकांसंबंधी तुम्हांस कांही विचारावयाचे असल्यास विचारा".

यापुढें अनेक प्रश्नोंत्तरे झाली. पण तीं उपलब्ध नाहींत. तरी इतक्या प्रश्नोत्तरावरून "तद्विद्धि प्रणिपातेन परिप्रश्नेन सेवया" ही वृत्ति आणि टिळकांचीही मोकळेपणानें उत्तर देण्याची पद्धति स्पष्ट दिसून येते.

यानंतर वांईस आगमन झाले. वांईत आल्यावर ४/२ माणसांची ओळख झाल्यावर 'ज्ञानेश्वरी' वर घरी च प्रवचन सुरू केले. त्यामुळें मंडळी जमूं लागली. लवकरच तेथील चवंडेबोवांच्या गोरक्षण कार्याचे हि निरीक्षण केलें. त्याचप्रमाणे तेथील मोफत वाचनालयाची पाहणी केली. सर्वच संस्थांत वरून बडेजाव परंतु आंतून पोकळपणा आहे, असे आढळून आले. पुढें कालांतराने नेहमींप्रमाणे वांईस कृष्णेच्या घाटांवर उत्सव सुरू झाले. कृष्णेच्या उत्सवांत भोजनांचा आणि कीर्तन-प्रवचनादींचा कार्यक्रम असे. निरनिराळ्या घाटांवर हे उत्सव होत. प्रथम गणपतिआळीच्या घाटावरील, ब्राह्मणशाहीच्या घाटावरील उत्सवांत दोन जाहीर प्रवचनें केलीं. गीता, तुकाराम, रामदास असे प्रवचनाचे विषय असत. गीतेवरील प्रवचनांचा लोकांवर विलक्षण परिणाम झाला. हे अशक्त, किडकिडीत, पाप्याचे पितर काय बोलणार आहे! अशा भावनेनें प्रथम जे लोक टवाळीच्या तयारीनें उभे होते तेच भर रस्त्यांत पाया पडूं लागले. अरे रे! आपण या सत्पुरुषाविषयीं किती विपरीत कल्पना केली! असें म्हणून पश्चाताप पावूं लागले. One morning I rose and found myself famous. ह्या बायरन कवीच्या उक्तीप्रमाणें वांईच्या भागांत जिकडे तिकडे या व्याख्यानांनीं खळबळ उडून गेली. या सत्पुरुषाची स्तुति-स्तोत्रें चारी बाजूंला पसरून गेली. नंतर आजूबाजूचीं व्याख्यानप्रवचनांचीं आमंत्रणावर आमंत्रणें येऊं लागलीं. ठिकठिकाणीं कार्यक्रम होऊ लागले. गीता, उपनिषदें, ज्ञानेश्वरी,

अनुक्रमणिका

तुकाराम, रामदास, नारदभक्तिसूत्रें—अशा अनेक महत्त्वाच्या विषयांवर प्रवचनें झालीं. लिंबगो यास प्रवचन चालूं असतां कांही शास्त्री-पंडितांनीं भर प्रवचनांत अडविण्याच्या भावनेनें शांकरभाष्याविषयीं जोर जोरानें प्रश्न विचारले. त्याला अतिशय बिनतोड उत्तरें देण्यांत आल्यामुळें ब्रह्मवृंद मंत्रमुग्ध होऊन गेला. ठिकठिकाणीं वादविवाद झाले. लोक ज्ञानाच्या प्रखर तेजानें दिपून गेलें. वांईस त्यामुळे रोज ५/१० माणसें नेहमीं मुक्कामावर असावयाचीं, नाना विषयांवर प्रश्नोत्तरें चालावयाचीं. रोज त्यांचे शंकासमाधान करण्याचें एक कामच होऊन बसलें.

ही जशी आजूबाजूला खळबळ उडून गेली, त्याप्रमाणें घरीं हि असाच प्रकार झाला. वांईस मोठे घर आणि कोटेश्वराचें देवालय होतें. आजोबांनीं आपल्या वयाचा उत्तरभाग येथेंच देवळांत तन्मय होऊन उपासनेंत घालविला होता. ते तर आतां नव्हते. आजी होत्या, त्या घरांत रहात. जेवणापुरतें घरांत जावें आणि बाकी देवळांत च निरनिराळे वर्ग, शंकासमाधान इ. करीत असावे, असा प्रथमचा क्रम असे, परंतु, आजीचे सोवळ्या ओवळ्याचें जुनाट विचार अगदीं पक्के दृढ झालेले असल्यामुळे आपल्या नातवाचे नवीन विचार तिला पटावयाचे नाहींत. तिला सगळे च चमत्कारिक वाटे. तिनें एकदां “तुमच्या आश्रमांत काय काय करतात?” असें विचारलें. तेथें “दळणें, पायखाने साफ करणें, हजामती करणें—अशीं कामें चालतात”, असें उत्तर मिळालें, तें ऐकून तिला फारच वाईट वाटलें. ही हकीकत काकांनीं वडिलास कळविली. वडील हि कांहीं दिवसांनीं आजीकडे गेले. “म्हाताऱ्या माणसांना त्रास देण्याची इच्छा नसली तरी आपल्यापासून त्यांना त्रास होतो तेव्हां दूर राहाणें चांगलें”, असें सुचविलें. त्यानंतर मुक्काम दुसरीकडे हलवला. घरच्या सर्व मंडळीचे ह्या म्हाताऱ्या आजीसारखे विचार होते, असें नाही. उदाहरणार्थ या वेळीं विष्णु कानडे हा तरुण आतेभाऊ येथें राहाण्यासाठी आला होता. त्याला हे नवीन विचार अतिशय उद्बोधक वाटत होते. त्याचा लहानपणापासून कधींच संबंध आलेला नव्हता. परंतु, तरुण असल्यामुळें त्याला हे विचार पटत होते. इतकेच काय पण या विचारांचें विलक्षण आकर्षण वाटत होते. म्हातारा आणि तरुणांतला फरक तो हाच. नंतर गांवांत ५/७ जातीं चालविली. त्यायोगें तरुणांची संघटना झाली. या दळण्यांतून ५०/६० रुपये मिळाले, ते पुस्तकें घेऊन तरुणासाठीं लायब्ररी करण्यांत खर्च केले.

केवळ वय मोठें झाले म्हणजे म्हातारा झाला असें नव्हे. ज्याची नवीन विचार ग्रहण करण्याची शक्ति गेली, जो जीर्णापलीकडे पाहूं च शकत नाहीं, तो म्हातारा समजला पाहिजे. नवीनाचें, चैतन्याचे ग्रहण होईनासें झाले कीं, जीर्णता आली, मग वयानें तो मनुष्य लहान असला, तरी त्याला तरुण म्हणतां यावयाचें नाहीं. नवीन शिकण्याची शक्ति गेली कीं, म्हातारा झाला च. हिंदुस्तानांत खरे तरुण हल्ली फारच थोडे आढळतात.

अशी नित्य तरुण वृत्तींत असणारे—सनत्कुमारत्वाची आवड असणारे—वांईत प्रसिद्ध नारायणशास्त्री मराठे ही एक महत्त्वाची व्यक्ति होती. ते वेदांतशास्त्रांत प्रवीण असून इतर सर्व शास्त्रांचे पाठ देत असत. त्यांचे गुरु प्रज्ञानंदसरस्वति मोठे अधिकारी संन्यासी होते. नारायणशास्त्र्यांनी गुरूची अध्यापन-परंपरा सतत चालविली होती. एकसारखे १२/१२ तास ते शिकवीत. वांईत ठरलेल्या घरीं माधुकरी मागावयाची आणि सकाळीं पाचपासून संध्याकाळपर्यंत शिकवीत असावयाचे, असा त्यांचा क्रम असे. सबंध आयुष्यांत त्यांनीं द्रव्याची यत्किंचत् हि अपेक्षा ठेविली नाही. अर्थात् विवाहादि परिग्रह केला नाहीं च. जुना शास्त्री म्हटला म्हणजे हेकट असावयाचा, आपल्या विशिष्ट जगापलीकडे त्याची नजर जावयाची नाहीं. तो नेहमीं कर्मठपणाच्या गुंत्यांत गुंडाळलेला असावयाचा. अनुदारपणानें, अहंपणानें तो भरलेला असावयाचा. अशी एक परंपराच पडत आलेली आहे. नारायणशास्त्री या परंपरेला अपवाद होते, असें म्हणतां येईल.

अनुक्रमणिका

नारायणशास्त्र्यांची प्रथम जेव्हां भेट घेतली तेव्हां "वेदशास्त्रादि अभ्यास अस्पृश्यांस शिकविण्याची आपली तयारी आहे काय, असा प्रश्न विचारला होता. त्याला 'होय' असे उत्तर मिळाल्यावर मग रोज संध्याकाळनंतर त्यांच्याकडे जाऊन अनेक प्रश्नोत्तरें करण्याचा क्रम सुरू झाला. इंग्रजी शिक्षण मुळींच झालें नसून हि त्यांना पदार्थविज्ञानादि शास्त्रांत हि गोडी वाटत असे. अत्यंत स्वतंत्ररीत्या, पूर्वग्रहरहित असा विचार ते करूं शकत. ब्रह्मसूत्रभाष्यादि ग्रंथातील विचारासंबंधी त्यांच्याशीं वांईस असतांना पुष्कळ च विचारविनिमय झाला. मुख्यतः श्रवणाचें व मधून मधून प्रश्न करण्याचें धोरण ठेविलें गेलें. रामदासांनीं म्हटल्याप्रमाणें

**जनीं हीत पंडित सांडित गेले ।**

असल्या वृत्तीचे हे पंडित नव्हते.

**गलिताहंकृति जाणे बंधामोक्षासि अनुभवी चढला ।**
**तो पंडित इतर नव्हे जरि पुष्कळ सर्व शास्त्रही पढला ॥**

या भागवतांतील व्याख्येप्रमाणें नारायणशास्त्री मराठे हे एक थोर साधक होते. या साधकाने विद्यादानासाठीं काढलेल्या प्राज्ञपाठशाळेचे हि निरीक्षण केले गेले. या पाठशाळेंतील कांहीं विद्यार्थी आकर्षित होऊन व्याख्यानप्रवचनादींस येत असत. लक्ष्मणशास्त्री जोशी व कोनकर शास्त्री हे बडोद्यास आलेले विद्यार्थी येथें च शिकत होते.

प्रथमच दर्शित केल्याप्रमाणें या वेळीं शरीर अतिशय क्षीण झालें होतें, तरी कार्यक्रमांत कोणताच व्यत्यय येत नसे. सकाळपासून संध्याकाळपर्यंत अध्ययन, अध्यापन, निरीक्षण, परीक्षण, वाद, संवाद, शंकासमाधान—असा प्रकार चाललेला च असे. शिवाय रोज दहा दहा मैल फिरण्याचा क्रम असे तो पुन्हा निराळा च. फिरणें हें तर येथलें जीवनच असे, **'चराति चरतो भगः ।'** फिरल्याशिवाय मुळींच चैन पडत नसे. पण आश्चर्याची गोष्ट ही की, इतक्या क्षीण शरीराच्या द्वारें घेतलें जाणारें हें काम हि कमीच वाटून येथें अत्यंत उग्र तपश्चर्या सुरूं केली. वांई क्षेत्र मूळचेंच थंड, तशांत कृष्णाकांठ आणि त्यांत पुन्हा थंडीत तर अगदी कडाकाच उडे. परंतु तशा कडाक्याच्या थंडींत, कृष्णेच्या घाटावर खालीं अंथरावयास कांही नाहीं, वर पांघरावयास कांहीं नाहीं, अशा तऱ्हेनें निजण्याची सुरवात केली.

**उष्ण वेढावें । शीत पांघुरावें**
**वृष्टीचिया रहावें । घरां आंत ॥**

असाच हा अभ्यास होता. या अशा तीव्र तपस्येमुळें आधींच क्षीण झालेल्या शरिरांत विकृति उत्पन्न झाल्यास नवल काय? रोज अंगांत ताप राहूं लागला. तरी स्नान थंड पाण्याचेंच असावयाचें. खाण्यापिण्याची कांहीं विशेष योजना नव्हतीच. पूर्वी भाजी-भाकरी वगैरे चें जेवण कोणी तरी विद्यार्थी तयार करून आणी. आतां तें सर्व सोडून केवळ केळ्यावरच राहाण्याचा क्रम सुरू केला. एका वैद्यानें तर स्पष्टच सांगितलें होतें कीं 'तुमची शरीर प्रकृति इतकी खालावली आहे कीं, तुम्ही तीन महिनेसुद्धा अशा स्थितींत टिकाव धरूं शकणार नाहीं.' नारायणशास्त्री मराठे यांनीं हि उघड्यांत अंथरुणाशिवाय न निजण्याबद्दल सांगितलें होतें. तरी ही तपस्या चालू च होती. श्री. खरे हे या वेळीं विद्यार्थीदशेंत होते. ते खोली झाडणें, सारवणें, इ. कामें करीत.

त्यामुळें कांहींशी मदत होत असे. पुढें हे खरे भारत इतिहास संशोधक मंडळांत काम करूं लागले. अशी उग्र तपस्या चालली असतां, शरीर मूळचेंच अत्यंत क्षीण असून हि हळूहळू प्रकृति सुधारून घेतली. शेवटीं त्या वैद्याचें अनुमान खोटें ठरलें.

आतां पायीं प्रवासाची हि सुरवात करून दिली. डोंगर, पर्वत, किल्ले, नद्या, नाले, खोरी, घाट, बाऱ्या, खिंडी, मठ, मंदिरें, अरण्यें, सगळें असें निरीक्षण चाललें होतें. एकदां तर वांईहून थेट पुण्यास पायीं न थांबता मजल मारली. एका चालींत हे ५० मैल अंतर कापण्यांत आलें! देश-निरीक्षणाबरोबर प्रवचनादींचा कार्यक्रम हि चालत असे. अनोळखी ठिकाणीं स्वतःच्या प्रवचनाच्या जाहिराती स्वतःच वाटण्याचें काम करावयाचें व रात्रीं प्रवचनाला बसावयाचें. हा देखावा पाहून ग्रामवासी लोक आश्चर्यचकित होऊन जात. व्याख्यान ऐकल्यावर तर त्या आश्चर्याला सीमाच राहात नसे. कित्येक वेळां तर भर बाजारांत दिवसा एखाद्या उंच कट्ट्यावर उभें राहून बांधवहो, म्हणून भाषणाला सुरवात करावयाची. दोन दोन तास श्रोते आकस्मिकपणें च रंगून जावयाचें. आपापले व्यवहार विसरून तत्त्वज्ञानाचा तो प्रचंड ओघ पहात राहावयाचे. मग व्याख्यान झाल्यावर लोकांनीं 'कोठें उतरलां आहां?' वगैरे चौकशी करावी. उतरणार कोठें? ओळखी ओळखीनें थोडाच हा ब्रम्हविद्येचा प्रचार चालला होता. संन्यासी-प्रचार अवधूत-वृत्तीनेंच व्हावयाचा. मग कोणीतरी आपल्या घरीं नेई. तेथें स्नान, जेवणादिकाची व्यवस्था करी. मग गांवची मंडळी प्रश्नोत्तरासाठीं, शंकासमाधानासाठीं जमत. आणखी मुक्काम व्हावा म्हणून आग्रह करीत. अशा अवधूत-अवस्थेंत कित्येक वेळां दोन दोन दिवस पोटांत कांहींच नाहीं अशी ही वेळ येई. जनताजनार्दनाची ही खरी निरपेक्ष सेवां होती. एकदां सांगलीला यांच्या अध्यक्षतेखालीं न. चिं. केळकरांचें स्वराज्यावर व्याख्यान झालें. केळकरांनी नेहमीच्या संवयीप्रमाणें घरगुती खाण्यापिण्याचे, चैनीचे आणि सांसारिक दृष्टांत देऊन पूर्वीच्या स्वराज्यांतलें भोग वैभव कसें होतें, हें रसभरित वर्णन करून सांगितलें. अध्यक्षीय भाषणांत केळकरांचे सर्व विचार खोडून काढण्यांत आले "स्वराज्य पाहिजे तें चैनीसाठीं, भोगासाठीं नको. खरें वैभव त्यागांत आहे. जेव्हां भोगाची वासना बळावते, तेव्हांच स्वराज्य जातें. गिबननें रोमन साम्राज्याच्या अपकर्षाचें कारण काय सांगितलें आहे? चैन वाढली, मजुरीची आवड कमी झाली, कणखरपणा नष्ट झाला, त्यामुळें शेवटीं रोमन साम्राज्याची इमारत ढासळून पडली. आपलें राज्य किंवा कोणतें हि राज्य जाण्याचें कारण हेंच आहे. स्वराज्य मिळवावयाचें व टिकवावयाचें तर भोग-विलासानें ती गोष्ट व्हावयाची नाहीं. भोगविलासासाठीं स्वराज्य नको आहे. स्वराज्यांत कर्तृत्वाला, साहसाला, त्यागाला अधिक वाव मिळेल म्हणूनच तें पाहिजे आहे."—अशा तऱ्हेचे विचार प्रदर्शित केले गेले आणि सभा संपली. दुसऱ्या दिवशीं लोक केळकरांच्या कडे गेले. "अध्यक्षांचें भाषण आपल्या अगदीं विरूद्ध विचाराचें झालें आपण कांहीच बोललां नाहीं, हें कसें?" असा लोकांनी प्रश्न विचारला. केळकर म्हणाले, "संन्यासी मनुष्य आहे. आपण त्यावर काय बोलावें!" असा जरी प्रकार होता तरी केळकरांच्या गुणांविषयीं येथें परिपूर्ण आदर होता. विचार जरी भिन्न असले तरी कोणाच्या हि विषयीं अनादराची भावना येथें पहिल्यापासून कधीं च उद्‌भवलीं नाहीं.

यावेळीं वांई आणि आसपासच्या भागांत प्लेगचा नुसता कहर उसळला होता. भराभर माणसें मरत. परंतु प्लेगची भीति येथें कोठून असणार? व्याख्यानादि प्रकारांमुळे, निर्भय विचारसरणीमुळें पोलिसांचा ससेमिरा हि एक सारखा मागें असे च. पण मृत्यूची भीति गेली तेथें पोलीस अथवा जेल काय करणार? ज्यानें मृत्यूची भीति सोडली, त्याला जगांत कोण भिववूं शकेल? क्षीण शरीर प्रकृतीची, विद्वान कर्मठ शास्त्र्यांच्या विरोधाची, घरच्या म्हाताऱ्या माणसांच्या असंतोषाची, पुढारी म्हणविणाऱ्यांच्या विरुद्ध मताची, प्रवासांतल्या अडचणींची, सरकारची, मृत्यूची कसली हि भीति येथें स्पर्श करूं शकत नसे. प्रवासांत एके ठिकाणीं एक पिशाचविद्याप्रवीण मनुष्य भेटला. त्याला सांगितलें कीं, मी कोठें हि भयाण जागेंत येतो, कांहीं

अनुक्रमणिका

हि क्रिया कर. पिश्याच्च मला दाखव. तो म्हणाला— "आपल्या सारख्यांच्या पुढें पिशाच्च क्षणभर हि उभें राहण्याची प्राज्ञा नाहीं." मेस्मेरिझमवाल्या माणसाची गांठ पडली. तेव्हा तो हि असेंच म्हणाला— 'आपल्यावर आमचा प्रयोग होणें शक्य नाहीं. या निर्भय वृत्तीचें मूळ कारण हि आपल्या मित्रांना बडोद्यास पाठविलेल्या एका पत्रांत येऊन गेलें होतें.

**सदासर्वदा देव संन्नीध आहे ।**
**कृपाळूपणें अल्प धारिष्ट पाहे ॥**

हेंच तें कारण. पण घरीं आईला मात्र आपल्या या मुलाची एक सारखी काळजी वाटत राही. तो कोठें जेवला असेल? त्याला प्लेगच्या वातावरणांत कांहीं होणार तर नाहीं? त्याची राहण्याची नीट व्यवस्था असेल कां? तिच्या मनांत नेहमी च सतरा तरंग उभे राहात. तिला खुशालीचें महिन्यांतून एखादें तरी कार्ड पाठवावें असें तिचें सांगणें असे. त्या प्रमाणें कधीं कधीं नुसतें एखादें वाक्य असलेलें कार्ड येई. पण तेवढ्यानें च तिला केवढें समाधान होई! मोठ मोठे ग्रंथ वाचल्यानें जें समाधान व्हावयाचें नाहीं तें तिला केवळ एका वाक्यानें होई! पुत्राच्या ठिकाणीं मातेला स्वतःचें रूप दिसतें. भिन्नभाव मुळींच नसतो. त्यामुळें तिला तेथें आत्मदर्शन होत असतें. हें मुलाकडून आलेलें एखादें वाक्य— तें एक वाक्य नसे तर संपूर्ण आत्मदर्शनाचा तो ग्रंथच— आनंदाची परिसीमा त्यांत भरलेली असे. लहानपणीं नाग नरसोबाची पूजा करण्यासाठीं ती कधीं हि बाजारांतून नागाचें चित्र आणलेलें पसंत करीत नसे. आपल्या मुलाच्या हातचा गंधाचा पाटावर काढलेला नाग तिला जास्त आवडे. मुलाच्या हातचें चित्र पवित्र असतें असें ती म्हणे. हीं घरीं क्वचित् येणारीं पत्रें आईच्या नांवची असत असें नाहीं. पुन्हा ती गद्यांत असते असेंही नाहीं. कधीं कधीं तीं पद्यांत असावयाचीं. एकदां एक कार्ड संस्कृत मध्येंच पाठविलें होतें. बडोद्याच्या विद्यार्थि मंडळांतील मित्रांनाहि पत्रें येत. तीं पत्रें नेहमीं येत असें हि नाहीं. परंतु त्यांत मजकूर अधिक असावयाचा. पत्रांत कळकळ ओतप्रोत भरलेली असे. उदाहरणा दाखल येथें फक्त एकच लहानसा भाग देतां येईल— "मोघेजी, धोत्रेजी व आपण (श्री. गोपाळराव काळे) आपल्या आयुष्याचें धोरण अजून ठरविलें आहे किंवा नाहीं— निदान ठरविण्याचा 'प्रयत्न' तरी चाललां आहे किंवा नाहीं? हा प्रश्न पुन्हा एकदां विचारून ठेवतो! आयुष्य संपावयाच्या आंत निकाल झाल्यास ठीक! तुम्हांला दोष लावण्याची माझी मुळींच योग्यता नाहीं. तरी आपल्या कार्याकडे सारखी दृष्टि लावा." "इतकी विनंति केल्याशिवाय राहवत नाहीं. तुमच्या आमच्या सारखे तरुण तपश्चर्या करूं लागल्यास भारत भूमीचा उद्धार लांबणीवर आहे काय? भारत मातेच्या हाकेला बहिरे होऊं नका ही च विनंति ॥ ॐ ॥ वंदे मातरम् ॥

या मित्रांना पत्रें पाठविलीं जात त्या प्रमाणें मधून मधून आश्रमांत बापूजींना हि पत्रें जावयाचीं. ते हि थोडक्यांत उत्तरें देत असत. एका पत्रांत त्यांनीं लिहिलें होतें

**"तमारूं चारित्र्य जोई हूं मोहसमुद्रमा डुबी जाऊं छुं."**

परंतु हें पत्र पाहून येथें मात्र—

**परगुण परमाणून्यर्वतीकृत्य नित्यं । निजह्यदि विकसंतः संति संतः कियंतः**

अनुक्रमणिका

या एकच भावनेशिवाय अन्य भावना मनाला शिवली नाहीं. सत्पुरुष नेहमींच प्रशंसेला भीत असतो. रामकृष्ण परमहंसांचीं कांहीं वचनें एकदां केशव चंद्रसेन यांनीं वर्तमान पत्रांत प्रसिद्ध केलीं. रामकृष्णांना हें समजतांच ते रागावले. त्यांना ती गोष्ट मुळीं च आवडली नाहीं. वांईच्या वास्तव्यांत तेथील व्याख्यान-प्रवचनादींत, आसपासच्या परिभ्रमणांत ही गोष्ट उघड झालीं कीं, या ठिकाणीं इतकी ज्ञान-शक्ति भरली आहे कीं, कीर्तीचे दिगंत झेंडे मिरविले जातील. असामान्य धुरीणत्व सहज प्राप्त होईल. जराशी हालचाल केली कीं, लोकांच्या झुंडीच्या झुंडी जमूं लागतील. अशी उद्बोधन-शक्ति, जनमनाला वेध लावणारी शक्ति स्वयंसिद्धपणेंच येथें वास करीत आहे. परंतु योगी असल्या शक्तीच्या, असल्या सिद्धीच्या पाठीमागें लागलेला नसतो. त्याला शुद्धीचा हव्यास असतो. लोकांचे जमाव जमविण्यापेक्षां आत्मशुद्धीची तळमळ निर्माण करणें, हें त्याचें खरें लक्ष असतें. त्याला स्वतःची कीर्ति मुळींच नको असते.

**देहे त्यागितां कीर्ति मागें उरावी**
**मना सज्जना हे चि क्रीया धरावी**

या वचनाच्या खऱ्या अर्थाकडे त्याचें लक्ष वेधलेलें असतें. क्रियेचा देह गेला तरी कृतीची कीर्ति राहिली पाहिजे. कृतीचा इष्ट परिणाम मागें उरला पाहिजे. लोकांच्या तोंडी आपली प्रशंसा असणें ही कांहीं कीर्ति नव्हे. प्राणवान, टिकाऊ कृति-सामर्थ्य म्हणजेच कीर्ति होय. हा प्राण कोठें कोठें आहे, पुढारी कस कसे आहेत, देशांतले सर्वसामान्य लोकांची काय स्थिति आहे, संस्था काय काय करीत आहेत, हें सर्व निरीक्षण या वांईच्या आसपास फिरून सहज च शरीरनिमित्तानें करून घेतलें. राष्ट्राची नाडी ओळखली. आणि समर्थांचें वाक्य परिपूर्ण अर्थानें सार्थ केलें.

**भिक्षामिसें लहानथोरें । परीक्षूनि सोडावीं**

●●●

अनुक्रमणिका

## प्रकरण २४ वें

## विद्यार्थी मंडळाची समाप्ति

**आईच्या** आयुष्याची समाप्ति झाली. पार्थिवतेचा पडदा गळून पडला. आतां ती नित्य शुद्ध, बुद्ध अवस्थेला पोहोंचली. ती आता वेगळी राहिलीच नाहीं. केवळ आत्मरूप होऊन गेली! मग तिचें आयुष्य संपलें कसें म्हणावें? तिचें मर्त्य आयुष्य संपून तिच्या अमर आयुष्याला सुरवात झाली. ती जिवंत असतांना जो बोध देई त्यापेक्षां तिच्या महान् बालकाला आतां तिच्या अव्यक्त मूर्तीकडून किती तरी जास्त व्यक्त बोध मिळूं लागला! ती जिवंत असतां जवळ होती त्यापेक्षां किती तरी पट आतां अधिक जवळ भासूं लागली!

आईचें मर्त्य जीवन संपून ती जशी अगदीं जवळ भासूं लागली, त्या प्रमाणें आतां विद्यार्थि-मंडळाचें बडोद्यांतलें जीवन हा महापुरुष—हा प्राण—निघून गेल्यामुळें संपुष्टांत आलें होतें. येथलें विद्यार्थि-मंडळाचें कार्य समाप्त झालें होतें; त्यामुळें हळूं हळू विद्यार्थि-मंडळ हि या महापुरुषाच्या जवळ येत गेलें. प्रथम विद्यार्थि-मंडळाची बडोद्यांतली स्वतंत्र जागा रद्द करून टाकिली. विद्यार्थि-मंडळातले च एक सदस्य श्री. भागवत यांच्याकडे लायब्ररी तेवढी ठेविली. पण ती हि पुढें लवकरच सत्याग्रहाश्रमाच्या लायब्ररींत सामील करून टाकिली. आई वारल्यानंतर घरच्या दोन्ही भावांचें चित्त तर बडोदें सोडून केव्हांच आश्रमांत निघून गेलें होतें. त्यांपैकी वडील भावानें प्रकृतीच्या निमित्तानें बापूजींच्या सल्ल्यानें आश्रमांत प्रयाण केलें तें कायमचें च! गोपाळराव काळे आश्रमाशी परिचित झाले च होते. श्री. धोत्रे स्वतः कोणताहि निर्णय करूं शकतील असें होते. त्यांच्या घरीं आई शिवाय दुसरें कोणी नसल्यामुळें वडील मंडळींशी झगडण्याचा विशेष प्रश्न नव्हतां. ते प्रथम पुढील आयुष्यासंबंधी अनेक तऱ्हेचे विचार करीत होते. पण त्यांनी हि आश्रमांत दाखल होण्याचें ठरविले. त्यांना समर्थ विद्यालय, सरस्वति पाठशाळा इत्यादि संस्था पाहाण्यासाठीं पाठविण्यांत आले. ते इंदूरकडे महेश्वरला जाऊन विणण्याची हि कांहीं माहिती घेऊन आले. आश्रमांत विणकाम करावयाचें होतें. त्याची ही जणूं प्रस्तावनाच होती. विद्यार्थि-मंडळातलें एक सदस्य श्री. परांजपे हे आपल्या मामांच्या धाकांत असत. स्वभावांत भित्रेपणा फार. पण ते हि धोत्र्यांच्या प्रेरणेनें आश्रमांत दाखल झाले. त्यांना त्यांच्या मामांकडून बराच विरोध झाला. मामा आश्रमांत गेले. कडकडून मिठी मारली, रडूं लागले. आरडा ओरड केली. शिव्याशाप दिले. गमती गमती त्यांनीं केल्या! परांजप्यांकडे असणारे व विद्यार्थि-मंडळांत वारंवार येणारे श्री. अनंतराव भावे आश्रम पाहून गेले. वाईला आपल्या घरची व्यवस्था लावून मग आश्रमांत दाखल व्हावयाचें असें त्यांनीं ठरवलें होतें. गोपाळराव काळ्यांनी हि आश्रमांत दाखल होऊन देशसेवेसाठीं आयुष्य खर्च करण्याचा आपला निर्णय आपल्या वडील मंडळींना कळविला. त्यांच्या निर्णयामुळें त्यांच्या घरच्या मंडळींवर एकदम आघात झाला. गोपाळरावांच्या घरची सर्व च मंडळी शांत आणि सात्त्विक स्वभावाची होती. परंतु त्यांनीं गोपाळरावांच्या विषयीं आशेचे मोठे मोठे मनोरे बांधून ठेविले होते. गोपाळराव एल्. एल्. बी. झाले होते. त्यांच्या शिक्षणासाठीं पुष्कळ खर्च झालेला होता. त्यामुळें त्यांच्या वडिलांना अतोनात दुःख झालें. श्री. मोघे मुंबईस नोकरी करीत होते. परंतु ते ह्या विद्यार्थि-मंडळांतील मंडळींच्या मार्गाचें दुरून निरीक्षण करीत च होते. ते यावेळीं आश्रमांत दाखल झाले नाहींत. ते बरे च उशिरां आश्रमांत आले. त्यांच्या वडिलांनीं तर विरोधाची कमाल केली. मरेपर्यंत ते एक सारखा विरोध करीत राहिले. आश्रमाला ते 'धेडाश्रम' म्हणत—बाडग्या लोकांचा तांडा समजत. नाहीं नाहीं त्या शिव्या ते आपल्या मुलाला देत.

अनुक्रमणिका

या एका मागून एक घर सोडण्याच्या प्रकारामागें एक च व्यक्ति सूत्रधारासारखी लपलेली आहे, तिनें न सांगतां हि तिच्या मागें हे विद्यार्थि खेंचले जात आहेत; हें या विद्यार्थ्यांच्या वडील मंडळींना, आप्तेष्टांना माहीत होतें. म्हणून मनांतून ते या महापुरुषाला शिव्याशाप देत. श्री. मोघे यांच्या वडिलांनीं तर उघड खुनाची धमकी दिली होती. आपल्या मुलांना बिघडविणारा तो हाच, अशी या लोकांची कल्पना होती. आपल्या उपयोगाला नाहीं आला कीं, तो मुलगा बिघडला अशीच बहुतेक वडील माणसांची समजूत असते. त्यांचें प्रत्यंतर येथें चांगल्या तऱ्हेनें आलें. तरुणांना बिघडविण्याचें कुलव्रत सॉक्रेटीसपासून अव्याहत चालत आलेलें च असल्यामुळे, असल्या शिव्या-शापांचा परिणाम येथें काय होणार होता?

**जेणे घेडे नारायणीं अंतराय**
**हो कां बापमाय त्यजावी ते**

अशी शिकवण जेथें सतत घोकून ठेवलेली होती, तेथे असल्या विरोधानें काय होणार? येथें या सर्व विरोधाला तोंड देण्याची तयारी भरभक्कम झालेली होती. त्यामुळें दोन हजार वर्षांपूर्वी ख्राइस्टनें जे सांगितलें तें येथें या प्रसंगीं प्रत्यक्ष अनुभवास आलें. A man's foes shall be they of his own household आईवरून स्त्रीवर, स्त्रीवरून पुत्रावर अशी प्रेमाची अधोगति जगांत दिसून येते. येथें आईवरून संतावर, संतावरून ईश्वरावर, अशा ऊर्ध्वगतीची गृहत्यागरूप पहिली हालचाल ह्या विद्यार्थि-मंडळांत दिसूं लागली. ही हालचाल दिसतांच त्या विरुद्ध आक्रोश सुरूं झाला. धर्ममार्गांत जग अडथळा आणल्याशिवाय राहात नाहीं. अगदीं आपल्या घरून च बहुधा अडथळ्याला सुरवात होते. म्हणून धर्ममार्गात, "He that loveth father or mother more than me is not worthy of me. And He that loveth son or daughter more than me is not worthy of me." :— हा ख्रिस्तानें सांगितलेला सिद्धांत च खरा ठरतो. कोणी तपस्या करूं लागला कीं, इंद्रानें आपली अप्सरादीकांची मोहसेना त्याच्यावर पाठविली च! ही जर स्वर्गांतल्या देवांच्या राजाची कथा, तर मायेंत जखडलेल्या मर्त्य मानवांची आपल्या परमार्थ-प्रवेश करूं इच्छिणाऱ्या मुलांबद्दल मोहविवश स्थिति व्हावी याबद्दल त्यांना तर दोष देण्यांत काय अर्थ आहे?

पण याला अपवाद नव्हता, असें नाहीं. या महापुरुषाचे काका या च सुमारास काहीं कामानिमित्त बडोद्यास आले होते. स्वाभाविकपणें च ते आश्रमांत हि जाऊन आले. त्यांच्या मनावर आश्रमाच्या वातावरणाचा बरा च परिणाम झाला. कोंकणांत खेडे गांवीं गेल्यानंतर आपल्या एकुलत्या एक मुलानें हि अशी च ज्ञानोपासना करावी, सांसारिक कामें तर सर्वच करीत आहेत, या भावनेनें त्यांनीं आपल्या मुलाला आश्रमांत पाठविला सगळ्यांत लहान भाऊ हि या च सुमारास गृहत्याग करून आबूच्या पहाडांवरून आश्रमांत येऊन दाखल झाला.

विद्यार्थि-मंडळाची अशा तऱ्हेनें समाप्ति झाली. समाप्ति म्हणण्यापेक्षां हा विकास च झाला असें म्हटलें पाहिजे. विनाश म्हटला तरी विनाश हें हि विकासाचें एक अपरिहार्य अंग च आहे! गीतेनें "बुद्धिनाशात्प्रणश्यति" असें म्हणून बुद्धिनाश हा च विनाश ठरविला आहे. बाह्य देह गेला, त्यांत परिवर्तन झालें म्हणजे विनाश झाला नाहीं. अशा बाह्य देहाचा विनाश झाल्याशिवाय विकास हि व्हावयाचा नाहीं. बाल्य जातें तेव्हांच तारुण्य येतें. फूल गळतें तेव्हां त्याचें फळ तयार होतें. शेतांत धान्य टाकून द्यावें, तें मातीत मिसळूं द्यावें, त्याचा त्याग करावा, तेव्हांच त्याच्यापासून नवीन धान्याची आशा असते. विद्यार्थि-मंडळ आतां समाप्त झालें. आश्रमाच्या भूमींत तें पेरलें गेलें.

अनुक्रमणिका

बीं ज्याप्रमाणें भूमींत पेरलें गेलें तरी तें मातींत मिळून जात नाहीं, तें अलग राहतें, तेथ तें आपला विकास करून वर येते—त्याप्रमाणें ही मंडळी आश्रमांत गेली तरी आश्रमाशीं तीं मिसळून गेलीं नाहींत. म्हणजे इतर आश्रमीयांसारखी ती मध्यबिंदु शून्य राहिलीं नाहींत. खरें म्हणावयाचें म्हणजे केवळ आश्रम हें त्यांचें लक्ष्य नव्हतें. आश्रमांतील हा थोर सत्पुरुष हेंच त्यांचें लक्ष्यस्थान होतें. तो जर आश्रमांत न येता तर यापैकीं कोणी च आश्रमांत गेले नसते. आश्रमांतील कार्यक्रम पार पाडण्याचा ही मंडळी आपल्याकडून शक्य तो प्रयत्न करीत. तेथल्या व्रतनियमांच्या परिपालनाचा हि अभ्यास करीत. पण बालक ज्या प्रमाणें रस्त्यावरून गेलें तरी कोठें जावयाचें, हा रस्ता कोठला, हें कांहीं एक जाणत नाहीं. तें फक्त आईचें बोट धरणें तेवढें जाणतें. केवळ अशीच जरी नाही तरी पुष्कळ अंशानें ह्यां मंडळीची अशीच स्थिति होती. आश्रमांतील व्रतनियमांना ही मंडळी अपुरी पडत. परंतु त्यांची आपल्या लक्ष्य-स्थानावरची निष्ठा कधी मागें पडलीं नाहीं. त्यामुळें च या मंडळींचा या आश्रमांत हि एक निराळाच संघ जमल्यासारखा झाला. सर्व कार्यक्रम संपल्यानंतर संध्याकाळच्या वेळेला हा संघ जमावयाचा आणि अनेक विषयांवर ज्ञान-चर्चा सुरूं व्हावयाची. या संघांत आश्रमांतील विद्यार्थ्यांपैकीं हि कांहीं विद्यार्थी दाखल झाल्या सारखे झाले होते. ते विद्यार्थि या महापुरुषाची सेवा करण्याचा हि प्रयत्न करीत.

वस्तुतः सत्पुरुषाला आपली सेवा करवून घेण्याची मुळींच आवश्यकता नसते. त्याच प्रमाणें आपल्या भोंवती ती च ती च मंडळी वारवांर जमावी यांत हि कांही त्याच्या स्वतःच्या स्वार्थाचा भाग नसतो. परंतु सेवेच्या योगानें विद्यार्थ्याला शिकविण्याला अवसर मिळतो, त्याचें अंतःकरण तपासतां येते. त्याचें बोलणें, चालणें, वागणूक, दक्षता, त्याची सावधानता त्याची मर्यादा या सर्वांत असामान्य फरक करवितां येतो. तें दार कर कर वाजतें आहे आणि विद्यार्थि तसा च पाठाला बसला आहे तर काय विद्यार्थ्याच्या अंगीं पाठ ठसेल? त्याला झट्कन सेवाभावानें उठणें शिकविलें पाहिजे. त्या दाराची तक्रार त्यानें दूर केली पाहिजे. मग तो पाठाला बसेल. तो दिवा पुसलेला नाहीं, काळा झालेला आहे. विद्यार्थि तो लगेच साफ करील. त्यामुळें काजळी नष्ट कशी करावी, अज्ञानाचें पटल कसें घालवावें, हें त्याला कळेल. सेवेमुळें गुरूला विद्यार्थ्याची अंतर्बाह्य पारख होते. मग मातीच्या घड्या प्रमाणें गुरूला त्याला आकार देतां येईल. तसेंच निष्ठावंत मंडळी वारंवार येत गेली म्हणजे त्यांची नीट ओळख होते. त्यांच्या जीवनाचा विकास कसा करावयाचा, त्यांच्या करवीं ईश्वरी कार्याचा कोणता भाग करवून घ्यावयाचा हें नीट समजतें. नाहीं तर कोणाला हि कोणतें हि काम नेमून द्यावयाचें, ठराव पास करावयाचे, अध्यक्ष, उपाध्यक्ष, सेक्रेटरी, चिटणीस, खजिनदार—अशा योजना व्हावयाच्या, कमिट्या नेमावयाच्या. कार्य तर कांही करावयाचें नाहीं, पण कार्य करतों आहों असें जाहीर मात्र करावयाचें, असें होऊन बसतें. सत्पुरुषाची कार्य-पद्धति अशी नसते. तो कुशल माळ्याप्रमाणें कोणतें रोपटें कुठें लावावयाचें, त्याला कोणतें खत केव्हां द्यावयाचें हें सर्व जाणत असतो. बडोद्यास या सत्पुरुषाच्या सहवासानें विद्यार्थि-मंडळांत विचाराचा धागा दृढ झाला. आतां आश्रमांत आचाराचें सूत्र निश्चित होऊं लागलें. जुनें जीवन सोडून नवीन जीवनांत विद्यार्थि-मंडळाचा प्रवेश झाला आणि ख्रिस्ताचें बायबलमधलें ते प्रसिद्ध वाक्य खरें ठरलें.

> "He that findeth his life shall loose it, and
> He that looseth his life for my sake shall find it"

●●●

अनुक्रमणिका

# प्रकरण २५ वें

## मृत्यूचें दर्शन

**१९१८** साल. ऑगस्ट महिना. १९१४ सालचें महायुद्ध संपत आलें होते. मृत्यूच्या तडाक्यांतून आतां युरोपखंडाची आणि त्याबरोबर हिंदुस्थान, आफ्रिका वगैरे गुलाम देशांतून लढाईवर गेलेल्या लोकांची सुटका होत आहे, अशीं चिन्हें दिसूं लागलीं. पण मृत्यूनें हें परस्पर द्वेषाचें हत्यार खालीं ठेवलें न ठेवलें तोंच दुसरें हत्यार धारण केलें. युद्धांत जाऊन अनेक दुःखें सहन करून हजारों लोक मेले होते. त्यामुळें युद्धावर गेलेल्यांना मृत्यूचें भरपूर दर्शन झालें होतें.

चिरंजीव हे सर्व ही मानिताती, ही नित्याची डोळ्यावरची झांपड त्यांची थोडीफार तरी दूर झाली होती. परंतु युद्धावर न गेले त्यांच्या डोळ्यावरचा पडदा दूर कसा करावयाचा? म्हणून मृत्यूनें त्यांच्यासाठीं हें दुसरें शस्त्र धारण केलें काय? परमेश्वराच्या हातांत अनंत आयुधें आहेत. अर्जुनाचा अखंड भाता कधीं सरावयाचा नाहीं. त्याप्रमाणें ईश्वरीहेतू सफळ करण्यासाठीं मृत्यूजवळ अनंत आयुधें आहेत. महायुद्ध संपतें न संपतें तोंच जगावर इन्फ्ल्यूएंझाच्या साथीची छाया पडली. विचार करण्याला अवसर नाहीं. उपाय-योजनेला वाव नाहीं. अशी चमत्कारिक स्थिती झाली. रात्रींच्या वेळीं वीज जोरानें कडकडून कोठल्या कोठें नाहींशी होते. 'हें काय झालें?' या आश्चर्यभावनेव्यतिरिक्त तेथें दुसरें कांहीं च उरत नाहीं. बाकी सगळा अंधारच राहतो. तसाच या साथी संबंधींचा प्रकार झाला. ही आली कोठून? हिचें कारण काय? आणि ही गेली कशी? हें कांहीं कोणाला सांगतां आलें नाहीं. पुष्कळ कमिट्यावर कमिट्या बसल्या, डाक्टरांचीं मंडळेंच्या मंडळें विचार विनिमय करूं लागलीं. तर्कावर तर्क रचले गेले पण

**अतर्कासि तर्की असा कोण आहे ।**

हाच अनुभव शेवटीं सत्य ठरला. कोणाला कांहीं समजेना. तर्क करणारा तर्क करतों न करतों तों च तो हि या भयंकर साथीमध्यें ओढला जाई. जिकडे तिकडे मृत्यूची भीषण छटा पसरून गेली. भित्र्या माणसाला ज्याप्रमाणें अंधारांत जिकडे तिकडें भुतें च नाचतांना दिसतात, जरा खुट्ट झालें कीं छातींत धस्स होऊन मनांत नेमकी भुताची वेडीवांकडी आकृति उभी राहते.

**शब्द पडसाद उठला । म्हणे मागें कोण आला ।**

असा तो संशयी मुद्रेनें पाहूं लागतो, त्याप्रमाणें जो तो आपल्याकडे संशयी मुद्रेनें पाहूं लागला. आज काय जरा अंग दुखलें, मग मला हा इंन्फ्ल्यूएंझा तर झाला नाहीं? जरा पडसें आलें, झालें 'बहुतेक हा इन्फ्ल्यूएंझा च असावा' अशा कल्पना व्हावयाच्या. मृत्यूपेक्षां मृत्यूच्या भीतीनें च लोक जास्त मरतात. राजा येण्यापूर्वी जसे त्याचे भालदार, चोपदार ललकारतात त्याप्रमाणें मृत्यूपूर्वीं मृत्यूची भीति आधीं येत असतें. हा अनुभव बाहेरच तेवढा आला असें नव्हे. घरांतही याचा प्रथम अनुभव आला च. नंतर मागून मृत्यूनें हि प्रवेश केला.

अनुक्रमणिका

ही साथ येण्यापूर्वी कर्नाटकाचा एक भोळाभाबडा विद्यार्थी बडोद्याची कीर्ति ऐकून महाराज आपल्याला शिक्षणाची सोय करून देतील, या कल्पनेनें बडोद्यास आला व सरळ राजमहालामध्यें जाऊं लागला. तेथें त्याला कोण जाऊं देणार? त्याला शिपायांनीं अडवलें. ती वेळ संध्याकाळची होती. वडील ऑफीसमधून घरीं परत येत होते. त्यांना रस्त्यांत हा विद्यार्थी भेटला. त्याची हकीकत ऐकून त्याला वडिलांनीं घरीं आणला. आणि घरापासून फार दूर नसलेल्या फाऊंडरीच्या कारखान्यांत त्याच्या इच्छेप्रमाणें कामाला लावला. तेथें त्यानें उत्कृष्ट काम करून दाखविलें. तो ज्या फाऊंडरीच्या कारखान्यांत काम करीत असे त्याच बाजूनें बडोद्यांतील स्मशानाचा रस्ता असल्यामुळें तिकडून साथींमध्यें मरणारांचीं प्रेतें एकसारखीं एकामागून एक जाऊं लागलीं. तीं स्वाभाविकच त्याच्या नजरेस पडत त्यामुळें त्याचे आधींच कोमल असलेलें बालमन विव्हल होऊन जाई. तो नेहमीं घरीं आल्यावर उदास दिसे. इंन्फ्ल्यूएंझानें मेलेल्या प्रेतांचें च चित्र त्याच्या डोळ्यापुढें उभें राही. आजूबाजूला जिकडे तिकडे आज हा आजारी पडला, उद्यां त्याला ताप आला, परवां त्यानें अंथरूण धरलें, अशा बातम्या येत. आईला तो विव्हल होऊन ह्या बातम्या आणि प्रेतादिकांचे दृश्य सांगावयाचा. घरांत इतरांना त्या बातम्यांचें काहींच वाटत नसे. पण आई आणि बहिणीवर त्यांचा परिणाम होई. अशा रींतीनें मृत्यूची भीति त्या मुलाच्या द्वारें घरांत थोडासा प्रवेश करूं शकली. त्यांत त्या मुलाला तर भितीनें पूर्णपणें पछाडलें होतें. तो शरिरानें मजबूत होता, परंतु आतां तो अशक्त भासूं लागला. त्याचें चित्त येथें राहिलें च नव्हतें. धारवाडकडल्या आपल्या गांवाकडे जाण्याचे विचार साहजिकपणेंच त्याच्या मनांत उभे राहिले. आईनें हि त्याला तसाच सल्ला दिला. आणि त्या मुलाला प्रेमपूर्वक पैसे वगैरेची सर्व सोय करून देऊन धारवाडकडे परत पाठविला.

तो गेला आणि दोन तीन दिवसांनीं वडिलांना कोणी ओळखीचे वारलें म्हणून स्मशानांत जावें लागलें. एक सारखीं माणसें मरत असल्यामुळें स्मशानांत दहनविधि लवकर होऊं शकला नाहीं. त्यामुळें तेथें बराच वेळ लागला. त्याच्या योगानें वडिलांना श्रमाचा ताप आला. आईनें त्या तापांत फार काळजी घेतली. वरच्या माडीवर वडील तापानें आजारी असतांना ती एकसारखी चढउतार करून करून थकून गेली. वडिलांचा ताप थोडा बरा झाला. इतक्यांत मुलीला आणि लहान मुलाला ताप आला. त्यामुळे हि तिला पुष्कळ श्रम पडले. नंतर तिला हि ताप आला. घरांत आतां फक्त तिचीं दोन अननुभवीं मुलें च तेवढीं राहिलीं, बाकी तिच्या स्वतःसकट सर्वांना आजारानें घेरलें. आजूबाजूला सुद्धां हा आजार जिकडे तिकडे पसरला होता. तेव्हां मदतीला कोणींच येऊं शकत नसे. इन्फ्ल्युएंझाच्या आजारांत शक्तीचा पूर्ण क्षय होऊन गेल्यामुळें आजारी माणूस एकाच दिवसांत अंथरुणाला खिळून जाई. तो पुन्हा उठणें मुष्किल होऊन बसे. त्यामुळें रात्रंदिवस आजारी माणसांना शुश्रूषेची जरूर भासे. कोणाला पाणी पाहिजे, कोणाला दूध द्यावयाचे, कोणाचे कपडे घामानें भिजल्यामुळें बदलावयाचें, कोणाला गरम पाणी द्यावयाचें, डॉक्टराकडून औषधें आणावयाचीं, दरेकाला ठरलेल्या वेळीं तीं द्यावयाचीं—एकसारख्या ह्याच क्रिया चालत. शुश्रूषकाला स्वतःला जेवावयालासुद्धां फुरसद उरूं नये. रात्रीं हि जागावयाचें. प्रत्येक घराप्रमाणें हें हि घर या स्थितींत एक 'हॉस्पिटल' च बनलें! हॉस्पिटलमध्यें शुश्रूषेचीं सुंदर उपकरणें आणि व्यवस्था तरी असते. तशी प्रत्येक घरीं कोठून असणार? त्यामुळें तर आजाऱ्यांची अतिशय शोचनीय स्थिति होऊन जाई. हॉस्पिटलमध्ये जाणते डॉक्टर, हुशार सेविका असतात, पण घरीं तशी स्थिति कोठून असणार? एकाची पुडी दुसऱ्याला दिली, दुसऱ्याची ह्याला दिली, असा औषधांचा गोंधळ कित्येक ठिकाणीं व्हावयाचा. गरिबांची दैना तर काय सांगणार? त्यांच्या घरांत खावयाला हि नसावयाचें. डॉक्टर नें सांगावें, केवळ दूध घ्या, दुसरें कांहीं खाऊं नका, पण दूध कोठलें? कित्येकांच्या जवळ तर मेलेल्या माणसाच्या दहनक्रियेला सुद्धां पैसा नसे. तशांत पुन्हा अज्ञानाची भर पडून कित्येक मृत्यु ओढवत. डॉक्टर, लोकांना स्वच्छ सांगत असत— 'पहा, जगावयाचें असेल तर मी सांगेपर्यंत कांहीं हि खाऊं नका. फक्त साबूदाणा, दूध, फळें, घ्या.' पण अज्ञानी

लोकांची समजूत अशी कीं, खाल्ल्याशिवाय जीव रहावयाचा कसा? डॉक्टर काय सांगतात. चार घास खाल्ले तर काय तेवढ्यानें जीव जाणार आहे? डॉक्टरला या खाण्यापिण्याच्या बाबतींत काय एवढें समजतें? त्याचें औषध तर आपण घेतों च आहोंत. केवढें हें घोर अज्ञान! वस्तुतः ह्या बाबतींत खरें तत्त्व निराळे च आहे.

**पथ्ये सति गदार्तस्य किमौषधनिषेवणम्?**
**पथ्ये असति गदार्तस्य किमौषधनिषेवणम्?**

पथ्य असल्यावर औषधाची गरज काय? आणि पथ्य जर नसेल तर औषधाचा उपयोग काय? मुख्य वस्तु, पथ्य, शुश्रूषा, मनाची शांति, सुव्यवस्था, ईश्वरस्मरण ही आहे. आजारांत औषध हें अगदी गौण साधन आहे. स्वच्छ हवा, पाणी, विश्रांति, मनाचा धीर, शांति प्रेमळ शुश्रूषा, मृत्यूच्या खोट्या भीतीचा अभाव, ईश्वरावर दृढ श्रद्धा, आजारांतून हि पापाचा क्षय करावयाचा आहे, आजार हि ज्ञान मिळविण्यासाठी आहे—ही मनोवृत्ती असेल तर औषधाची जरूर काय?

**शिरीं आहे राम राज । औषधाचें काय काज?**
**जो जो प्रयत्न रामावीण । तो तो दुःखासी कारण ॥**

समर्थांचें वचन हि हेंच सांगतें. पण ही स्थिति या देशांत कोठें आहे? आजाऱ्याच्या जवळ बसून सुंदर गाणीं म्हणावींत. त्याला सुंदर अभंग ऐकवावेत. त्यामुळे त्याला केवढें समाधान वाटेल! गीतादि ग्रंथाचा थोडा पाठ ठेवावा. पण जेथें गीता म्हणजे काय हें माहीत नाहीं, त्या अशिक्षित दरिद्री लोकांत हें सर्व कसे व्हावयाचें? श्रीमंत, सुशिक्षितांत तर याची अडचण असूं नये. तरी तेथें हि अशिक्षित दरिद्री लोकांसारखी च स्थिति आढळून येते. श्रीमंती आणि विद्वत्ता वाटेल तेवढी असली तरी शुश्रूषेची आजाऱ्यासाठीं सोईस्कर अशी अगदीं जरुरीचीं शौच-लघ्वीची साधीं उपकरणें हि आणण्याची बुद्धि होत नाहीं, तेथें गीता रामायणाचें काय? अशा स्थितीमुळे सर्व च आजारी माणसांची अगदी दैना होऊन जाई. स्वच्छतेच्या अभावामुळें हि त्या वेळीं ही साथ एकसारखी पसरत चालली. बडोद्यास ह्या साथीच्या प्रतिकारासाठी स्वयंसेवकदल उभारण्यांत आलें. गरीबांना दूध, औषधें वाटण्याचा हि प्रयत्न झाला.

या वेळीं आश्रमांत हि कित्येक जण आजारी होतें. गोपाळराव काळे हि त्यांत सापडले होते. श्री. धोत्र्यांनीं आश्रमांत बडोद्याची घरची परिस्थिति कळविली. लगेच बापूजींनीं आपल्या आईबापांची सेवा करण्यासाठीं बडोद्यास जाण्यास सांगितलें. “येथें हि आश्रमीयांची सेवा करावयाची आहे. तेव्हां एथली सेवा टाकून बडोद्याला जाण्याची आवश्यकता नाही”, असें त्यावर उत्तर सुचविलें. परंतु बापूजींनी आग्रहपूर्वक सांगितल्यामुळें बडोद्यास आगमन झालें. आतां घरांत दोन शुश्रूषकां ऐवजीं तीन शुश्रूषक झाले. आतांपर्यंत धाकट्या दोघा भावांनीं शुश्रूषा-कार्य आपल्या शक्तीप्रमाणें संभाळलें होतें. परंतु त्यांत आंता गणित दांखल केलें गेलें. प्रत्येकाचा सेवेचा वेळ आणि प्रत्येकाचीं कामें लिहून त्या प्रमाणें निश्चित ठरवून दिलीं. स्वतः बहुधा रात्रीं जागण्याचें काम घेतलें. या हि अवस्थेंत विद्यार्थि-मंडळाच्या जागेत दिवसाचा बहुतेक वेळ विद्यार्थ्यांना शिकविण्यांत, प्रश्नोत्तरांत जात असे. कोणत्या हि परिस्थितींत समत्व ढळूं न दिलें पाहिजे, या तत्त्वाचा हा प्रत्यक्ष पदार्थ पाठच होता! दिवसामागून दिवस जाऊं लागले. परंतु कोणाची हि प्रकृति सुधरेना. दरेकाला ताप चालूंच राहिला. हें असें किती दिवस चालावयाचें याचा कांही अंदाज होईना. अशा स्थितींत सगळ्यांत लहान बंधु दत्तात्रेय त्याचा ताप निघाल्यासारखा झाला. त्याचें वय लहान. तापानंतर भूक फार

लागते. याप्रमाणें तो खावयास मागूं लागला. डॉक्टरची सक्त ताकीद होती कीं, दूध वगैरे पातळ पदार्थांखेरीज कांही हि खावयास द्यावयाचें नाहीं. त्यांप्रमाणे त्याला कोणी कांही दिलें नाहीं. शेवटी आईनें लाह्याचें पीठ थोडेंसें दुधांत कालवून त्याला दिलें. त्यानंतर परिणाम मात्र विपरीत दिसून आला. प्रकृति पार बिघडून न्युमोनियापर्यंत पाळी गेली. आईचें हृदय विदीर्ण झालें! त्या पिठामुळेंच असें झालें, असें कोण सांगणार? परंतु तें संशयाला एक कारण झालें, यांत शंका नाहीं. आतां उपचारांची कमाल केली, औषधांवर औषधें चाललीं. छाती शेकणें, टर्पेंटाईन लावणें, शक्य ते डॉक्टरचे इलाज सर्व केले. पण त्यांचा कांहीं एक उपयोग झाला नाहीं. मृत्यूनें या निर्दोष बालकाचा पहिला बळी घेतला.

आजारामुळें घरावर जी भीषण छटा पडली होती, त्यांत ह्या पहिल्या मृत्यूनें अधिक च भर पडली. आईच्या अवस्थेचें तर मुळीं च वर्णन करतां येत नाहीं. रडणें तर दूरच राहिलें. तिच्या डोळ्यांतून एक हि अश्रु बिंदु गेला नाहीं. सगळें दुःख तिच्या हृदयांत भरून राहिलें. ती अतिशय गंभीर झाली. तिच्या ह्या अवस्थेचा वडिलांना हि उलगडा झाला नाहीं. भावना तीव्रतम झाली म्हणजे तेथें ती प्रगट होणें च शक्य नसते. तिचा प्रगटपणा अप्रगटतेनें च कळावयाचा. यंत्र अतिशय वेगानें फिरूं लागलें म्हणजे तें फिरतें हें मुळीं च लक्षांत येत नाहीं. तें स्थिर भासूं लागतें. विजेचा प्रकाश तीव्रतर—तीव्रतम असा होत जातो तसतशी प्रकाशाची प्रगट अवस्था मावळूं लागते. डोळ्यांना कांहीच दिसेनासे होतें. डोळे दिपण्याच्या पलीकडची ही अवस्था आहे. आईचा आतां मृत्यूचा निश्चय च झाला. ह्या लोकांतली सर्व आशा तिनें सोडून दिली. तिचा आजार एकसारखा वाढत चालला. ती आपल्या बिछान्यावर अहोरात्र समाधिस्थासारखी बसून राहूं लागली. तिला श्वास लागला. आवाज हि फार च घोगरा होऊन गेला. अंगात ताप तर मुळींच नव्हता. उलट शैत्य वाढत चाललें. डॉक्टर-वैद्यांची औषधें हि ती घेईना. 'मला आतां देवानें लवकर सोडवावें', हीच एक प्रार्थना ती करूं लागली. 'आई, हें काय बोलतेस?' असें तिच्या मुलांनीं म्हणावें पण ती तिकडे मुळीं च लक्ष देईना. तिच्या मूढ मुलांना हि तिच्या अवस्थेची मुळीं च कल्पना येईना. आतां तिला कोणती हि इच्छा राहिली नव्हती. कोणाला भेटावयाचें, अमुक करावयाचें असें कांहीं च नव्हतें. ती मरणाची सारखी प्रतीक्षा करीत होती. शेजारच्या बायका तिच्याकडें येत. पण ती नुसती त्यांच्याकडे पाही. बोलवत नव्हतें. मृत्यूच्या अगदीं जवळ ती जात आहे हें तिच्या मुलांच्या लक्षांत आलें नाहीं. तो बुधवारचा दिवस होता. रात्रीं औषध घेण्यासंबंधीं वडिलांनीं पुष्कळ आग्रह केला. तिच्या महान् बालकानें हि समजावून सांगण्याचा प्रयत्न केला. पण तिनें औषध घेतलें नाहीं. तें तसेंच जवळच्या भांड्यांत ओतून दिलें. या च रात्रीं आपली आई आपल्याला सोडून जाणार, अशी कल्पना सुद्धां मनाला शिवली नाहीं. घड्याळांत अकरा वाजले. जिकडे तिकडे निजानीज झाली. रात्रीं दोन वाजतां आई उठून बसली. कारण बसलें असतां श्वासापासून त्रास कमी होत असे. 'झोंप येत नाहीं काय करावें', असें ती वडिलांना म्हणाली. 'आतां पहाटेची वेळ झाली आहे, झोंप येईल', असें वडिलांनी उत्तर दिलें. नंतर ती निजली. श्वास जरा कमी झाला. तेव्हां शंका येऊन ते जवळ गेले. नाडी पाहिली. नाडी सुटलेली होती. मात्रा घालण्याच्या उद्द्शानें आल्याचा रस काढावयास सांगितला. परंतु लगे च दांतखिळी बसून सर्व आटोपलें. २४-१०-१८ चा गुरुवारचा हा सुमारें २॥—३ चा ब्राह्ममुहूर्ताचा वेळ होता. प्रभांत कालाचे वारे वाहूं लागले होते. अंगणांतील झाडें टवटवीत दिसत होतीं. आईचा देह घोंगडींवर ठेविला गेला. आतां तिच्या पायापाशीं बसून तिचा तो महान् बालक भगवद्‌गीता खड्यास्वरांत म्हणूं लागला. आजूबाजूच्या लोकांना कांहींच कळलें नाहीं. येथें रडारड नाहीं! आकांत नाहीं! मृत्युचे चिन्ह कोणतें हि दिसलें नाहीं! भगवद्‌गीतेचा पाठ चाललेला आहे, या पलीकडे शेजाऱ्यापाजाऱ्यांना कांहीं च समजलें नाहीं!

गीतापाठ समाप्त झाल्यानंतर पुढच्या तयारीचा विचार सुरू झाला. 'दहनविधि करावयाचा तो जुन्या पद्धतीनें करण्यांत कांहीं अर्थ नाहीं. आपला त्या स्मशानांतल्या ब्राह्मणादिकांवर विश्वास नाहीं. आईच्या मृत्यूप्रीत्यर्थ श्रद्धापूर्वक लोकोपयोगी संस्थादिकांना पैसे देतां येतील', वगैरे विचार वडिलांच्यापुढें मांडण्यांत आले. वडिलांचे हि असेच विचार होते. परंतु ते व्यावहारिक पद्धतीनें चालणारे होते. ते थोडा वेळ स्वस्थ बसले. आणि लगेच त्यांनीं सांगितलें कीं, "हा प्रश्न आपला नाहीं. मृताची श्रद्धा कशी होती, हें पाहिलें पाहिजे. मृताला जर विचारलें असतें तर त्यानें आपला दहनविधि ज्या प्रकारें व्हावा असें सांगितलें असतें अशी आपण कल्पना करूं, त्याप्रमाणें च तो करावयास पाहिजे. कारण त्याच्यासाठीं तो आपण करतों आहों. आपले विचार आपण आपले बाबतींत लागूं करूं शकतों." या वडिलांच्या उत्तरानें जुन्या पद्धतीप्रमाणें च दहनविधि करण्याची गोष्ट निश्चित झाली. पण 'मी या विधींत भाग घेऊं शकत नाहीं', असें स्वच्छपणें सांगण्यांत आलें. आतां कोणी क्रिया करावयाची? कारण वडील मुलगा तयार नाहीं. त्या नंतर दोघा मुलांची पाळी होती. पण दोघे हि या गोष्टीला तयार झाले नसते. 'मी तुला सांगतों तुला क्रिया करण्यास हरकत नाहीं', अशी आज्ञा झाल्यानंतर मधल्या मुलानें क्रिया करावी, असें ठरविण्यांत आलें. पण ह्या आज्ञेपेक्षां हि आणखी एक विलक्षण आज्ञा करण्यांत आली. तो प्रसंग वर्णनानें कळण्यासारखा नाहीं. आतां सुमारें सात वाजले असतील. सकाळच्या कोवळ्या उन्हाची तिरीप घरांत येऊं लागली होतीं. इतक्यांत गंभीरपणें आपल्या दोन्ही भावांना आज्ञा केली गेली, 'आज कांहीं विशेष घडलें आहे असें न समजतां नेहमीं प्रमाणें च सर्व कामें करावयाचीं. आतां सकाळचें खाणें सुद्धां नेहमीं प्रमाणें झालें पाहिजे', ही आज्ञा मोठी कठीण आज्ञा होती. समोर आईचें प्रेत पडलेलें आहे अशा स्थितींत कोणत्या मुलाला खाण्याची कल्पना योग्य वाटेल? पण आपल्या वडील भावावर गुरुतुल्य निष्ठा असल्यामुळें ती आज्ञा पार पाडणें अगदीं जिवावर आलें होतें तरी तसें करणें भाग होतें! परंतु स्वतः मात्र त्या दिवशीं सबंध दिवस कांहींच खाल्लें नाहीं.

आतां सर्व मंडळी जमली. प्रेताला नेण्याची सर्व तयारी झाली. स्नानादि सर्व मंगलविधि अंगणांत केले. शेजारच्या स्त्रिया आल्या होत्या. त्यांच्या डोळ्यांतून अनावर अश्रुधारा वहात होत्या. त्यानंतर प्रेत-यात्रा निघाली. प्रेत स्मशानांत दाखल झालें. तेथें प्रेतें च प्रेतें दिसत होतीं.

**मना पाहतां सत्य हे मृत्युभूमी ।**

हें वचन डोळ्यापुढें प्रकट होत होतें. भडाग्नि दिला गेला आणि हा देह अग्नीबरोबर अदृश्य होऊं लागला.

**ज्ञानाग्नि : सर्व कर्माणि भस्मसात्कुरुतेऽर्जुन ।**

ज्ञानरूपीं अग्नि सर्व कर्मे नाहींशी करितो. या भडाग्नीनें जन्मभर कर्मांत राबलेला सगळा देह च भस्म करून टाकला! एका दिवसांत केवढें हें परिवर्तन झालें! काल जो देह होता तो आज कोठें गेला? त्याचा या लोकाचा सर्व संबंध एकाएकी कसा तुटला? मृत्यूची केवढी हि अगम्य लीला! त्याचें साम्राज्य सर्व जगावर चालतें. त्याच्या तडाक्यांतून कोण सुटला आहे! संध्याकाळीं विद्यार्थि-मंडळाच्या संस्थेंत सर्व मंडळी जमली असतां एक च उद्‌गार निघाला "आज आमची आई गेली, आम्ही हि असें च जाणार!" —एकच उद्‌गार पण त्यांत केवढा अर्थ होता!

पण लोकांना ह्याची मुळीं च कल्पना नव्हती. उलट मोठा मुलगा हजर असून, त्यानें आईची क्रिया हि केली नाहीं, तो स्मशानांत सुद्धां गेला नाहीं, असें म्हणून लोक नाना प्रकारें निंदा करूं लागले.

अनुक्रमणिका

शंकराचार्य एवढें मोठें संन्यासी असून हि त्यांनी आईचें और्ध्वदेहिक कार्य केलें आणि हे काय शंकराचार्यापेक्षां मोठे लागून गेले? असें हि कित्येकांनीं म्हटलें. लोकांची दृष्टि अशीच बहिर्वर्ति असते. ते आंत पाहूं च शकत नाहींत. नेहमीच्या ठराविक पद्धतीविरुद्ध जो कोणी गेला, तो त्यांच्या दृष्टीनें संभावित मनुष्य नव्हे. संभावित-पणाचें लक्षण हेंच कीं, जो सर्व बाबतींत केवळ वरवरच्या देखाव्याकडे पाहून वागेल. परंतु सत्पुरुषाला नेहमींच असल्या दिखाऊ गोष्टींची चीड असते. तो सत्याकडे बघणारा असतो. प्रदर्शन करण्यासाठीं केलेले लोकाचार त्याला मुळीं च रुचत नाहींत. याचा आणखी हि एक मासला याच वेळीं पहावयास मिळाला. मृत्यूनंतर ज्याला शोक झाला असेल, त्याचें सांत्वन करणें योग्य आहे, परंतु कृत्रिम तऱ्हेनें, एक चाल म्हणून, विनाकारण सांत्वनासाठीं, सहानुभूति दाखविण्यासाठीं जावयाचें, चार घटका बसून ठराविक साचाच्या त्या च त्या च गोष्टी बोलावयाच्या यांत कांहीं विशेष तथ्य आहे असें म्हणतां येणार नाहीं. आईच्या मृत्यूनंतर हा प्रकार रोज घडे. कोणी आलें कीं, आतां हे अमुक बोलणार हें आधीं च समजून येई. एकदां अशी च एक बाई आली आणि वडिलांना सांगू लागली “काकूंचा स्वभाव असा होता आणि त्यांचे गुण तसे होते त्या गेल्या मोठें वाईट झालें इ. इ. इ.”, हें तिचें बोलणें ऐकून—‘बाई, त्यांच्या गुणावगुणांची तुमच्यापेक्षां आमच्या वडिलांना चांगली कल्पना आहे, तुम्ही तें आतां रडगाणें नका सांगूं. आल्या तशा आता जा कशा’, असें स्पष्टच सांगितलें. अशा स्पष्टतेनें लोकांत किती गैरसमज पसरत असेल, याची कल्पना च करावी.

पण गैरसमज पसरो कीं, कांहीं होवो सत्पुरुष सत्याकडे च सतत पाहात असतो. आणि हा प्रसंग हि काय अशा कृत्रिम गोष्टींत घोटाळण्याचा होता? मृत्यूसारखी गंभीर गोष्ट यांत आईचा मृत्यु!— ‘गृहीत इव केशेषु मृत्युना धर्म माचरेत्’—अशा वचनांचा विचार करावयाचा कां लोकाचाराच्या कृत्रिम पसाऱ्यांत मग्न व्हावयाचें? ‘लोक काय म्हणतील’ अशी भीति ठेवण्याचा का हा प्रसंग होता? स्वतःचें घर जळत आहे आणि आरडा ओरड करीत नाहीं, कां? तर ‘लोक काय म्हणतील,’ या भीतीनें. ही काय विचाराची योग्य दिशा आहे? असली विचाराची तत्त्वशून्य दिशा येथें स्वप्नांत हि रुचणें शक्य नव्हते. येथें सतत एकच दृष्टि बाणून गेलेली होती. आणि आईच्या मृत्यूच्या प्रसंगानें तर ती अधिक च दृढ होऊन गेली ह्यांत शंका नाहीं.

**कोइ निंदो कोइ वंदो कोइ कैसे कहो रे ।**
**रघुनाथ सांथे प्रीत बांधी होय तैसे होय रे ॥**

●●●

# प्रकरण २६ वें

## सत्याग्रहाश्रम—साबरमती

**कोचरब** हें लहानसें खेडें आणि तेथली आश्रमाची जागा हि भाड्याची. तेथें आश्रमाला अनुकूल अशा सर्व सोई कोठून असणार? आणि महात्माजींच्या आश्रमाचा व्याप तर एक सारखा वाढूं लागला. आज हा साधक आला, उद्यां तो आला, परवां आणखी कोणी तरी आलें—असें एक सारखें चालूं झालें. कोणी अध्यात्मासाठीं, तर कोणी देशसेवेसाठीं, कोणी शंकासमाधानासाठीं तर कोणी माहितीसाठीं, कोणी चार दिवस अनुभव म्हणून तर कोणी जीवन कायमचें च येथें घालवावें म्हणून—अशी आश्रमाची एकसारखी वाढ होऊं लागली. स्त्री-पुरुष, लहान-मोठें, तरुण-वृद्ध, विद्वान्-अविद्वान्, गरीब-श्रीमंत्, हिंदु-मुसलमान, महाराष्ट्रीय-गुजराथी, सर्व तऱ्हेची माणसें येत. तेथें कोणत्या हि तऱ्हेचा भेद नसे. सगळीकडचे साधक जमा होत. युगयुगाची ज्ञान-तृष्णा शमन करणारे तें स्थान पाहून साधकांचे थवेच्या थवे तेथें लोटावें, यांत आश्चर्य कसलें. परंतु तेथलें ज्ञान आणि तेथलीं व्रतें पूर्णपणें जिरविणारे मात्र फार थोडे. समुद्रावर कोणी लोटा घेऊन गेला, कोणी घागर, कोणी हंडा, कोणी पिपें आणिलीं, तरी सगळा समुद्रच पिऊन टाकणाऱ्या आगस्त्य ऋषीसारख्या ह्या महापुरुषाची बरोबरी कोण करणार? इतकी नाना तऱ्हेची मंडळी येऊं लागल्यामुळे आश्रमाचा विस्तार करणें भाग पडलें. एकदम हाताला लागतींल ती मंडळी घेऊन, नाना क्षेत्रांत फेंकून मरुभूमींत हि नंदनवन निर्माण करण्याचा दांडगा आत्मविश्वास, महात्माजींच्या ठिकाणीं नसता तर ही गोष्ट होऊं शकली नसती.

**या रे यारे लहान थोर । भलते याती नारी नर**

अशी जणूं ते सर्व हिंदुस्थानाला आश्रमरूपानें हाक च मारीत आहेत असें वाटे. त्यामुळें कोचरबची जागा बदलली. आश्रमासाठीं साबरमतीच्या कांठावर विस्तृत जागा घेण्यांत आली. इतकी विस्तृत, सुंदर, मोकळी आणि एकांतांतली जागा अन्यत्र मिळणें शक्य नव्हतें. तेथें बहुतेक चारी बाजूला थेट क्षितिजापर्यंत नजर भिडे आणि सूर्य-चंद्राचे अस्तोदय, ताऱ्यांची दिव्य दर्शनें डोळ्यांत प्रतिबिंबित होत. साबरमतीच्या पर तीरावर आश्रमाच्या अगदीं विरुद्ध देखावा दिसावयाचा. अमदाबाद मधली मिलची ऊंच ऊंच धुराडीं एकसारखा धूर वर सोडीत असावयाची. एखादी प्रचंड विडीच जणूं उभी पेटवावी, त्याप्रमाणें हें अमंगल दृश्य दिसे. या तीराला साधकांचें एकांत स्थान तर पर तीराला बद्ध लोकांचें भोगस्थान. अशी ही रचना दिसे. जगताच्या कोलाहलांतून आपला मार्ग काढावयाचा आहे, पैल तीरावरच्या भोगमय जगाला ऐल तीरावरची शांति द्यावयाची आहे, असा तो मूर्तिमंत बोध च उघडपणें तेथें मांडलेला आहे असे वाटे. ह्या दोन्ही तीरांमधून बेफिकीरपणें कलरव करीत साबरमती नदी वाहात असावयाची. तिच्या पवित्र आणि स्वच्छ जीवनावर सूर्याच्या आणि चंद्राच्या प्रकाशानें रुपेरी आणि सोनेरी छटा पसरे. रात्रीं हजारो तारका हि तिच्यांत स्नान करण्यास चुकावयाच्या नाहींत. नाना रंगांनी रंगलेले परंतु कोणत्या हि रंगाचे नसलेले तिचे तरंग एकसारखे खळखळ खळखळ आवाज करीत सर सर वाहात असावयाचे. 'हर हर' 'हर हर' या पवित्र मंत्राचा च तो ध्वनि वाटे. त्या खळखळ आवाजानें अंतःकरणांत केवढी खळबळ उडे!

**वाहे पवित्र करुणा सरितामिषें कुणाची?**
**कल्लोल लोल गाती गाणीं जिच्या गुणाची**

अनुक्रमणिका

असे अनेक प्रश्न करीत हंसत हंसत ते तरंग एकसारखे पुढें निघून जात. याच साबरमतीच्या तीरावर समोर प्रेतें जाळलीं जावयाचीं. सगळेजण ज्या एका च अव्यक्त मार्गानें जावयाचे, जेथें भेदाचा यत्किंचित् भास हि उरावयाचा नाहीं, जेथें ह्या जीवनाचा मागमूस हि उरावयाचा नाहीं, त्या मृत्यूचें तें पवित्र दर्शन रोज एकसारखें होई. विशेषतः अंधाराच्या वेळीं पेटलेल्या लाल चिता रात्रीच्या गंभीरतेंत अधिक च भर टाकीत. जवळ च दुधेश्वर महादेवाचें पांढरें मंदिर दिसे.

**चिदानंद रूपः शिवोऽहं शिवोऽहं ।**

ह्या जपाचें तें स्मारक भासे. दुपारच्या वेळीं अमदाबाद शहरांतून धोबी लोक कपडे धुण्यास आपापले गट्ठे घेऊन यावयाचे. मग दिवसभर ते कपडे रेतीतं वाळत पडत. सगळ्यांचे देह सारखेच, तेच दोन पाय, तेच दोन हात, तसेंच तें पोट, छाती हि ती च, मान हि सारखी च– पण त्या पोषाखांत केवढें वैविध्य! हें वैविध्य कपड्यांत कोठून आलें? हा फरक सगळा मनाचा. मनाचे च हे निरनिराळे ढंग! ते कपडे नसत, धोब्यांना दिलेली ती कपड्यांच्या रूपानें असंख्य मनें च तेथें जणूं काय वाळत पडलेलीं दिसत!

त्या तीरावर ते धोबी दिसत, तसे ह्या तीरावरचे हे साधक हि धोबी च म्हणावयाचे. हे हि ह्या तीरावर राहून चित्ताच्या निर्मळतेसाठीं प्रयत्न करीत. ते कपडे उघड्यावर वाळत टाकत, तशीं आपलीं मनें उघड्या वर टाका, त्यांतले दोष उघडे होऊं द्या. ते वारंवार कपडे धूत. आपण हि हें मन वारंवार पवित्र करूं या. मग त्या पवित्र मनाची घडी घालूं. ती परीट घडी किती डौलदार दिसेल! त्या परीट घडीचा स्वच्छ पोषाख मग आपण आपल्या हृदयस्थ परमात्म्याला चढवूं. तो मालक, आपण त्याचे सेवक-धोबी, आपलीं मनें हा च त्याचा विविध तऱ्हेचा पोषाख. तो पोषाख निर्मळ करण्याचें काम आपण केलें नाहीं तर संतोषाचा मुशारा तो आपणास देणार नाहीं. ह्या तीरावर सर्व क्रियांतून ही अध्यात्म-दृष्टि ठेवलेली असे. जीवनांतील सर्व क्रियांना असें आध्यात्मिक महत्त्व असे. हिंदुस्थानांत सर्वत्र दिसणाऱ्या पायखान्यांची गलिच्छ स्थिति येथें दिसावयाची नाही. पायखान्यांत देवघरांतला निर्मळपणा राखण्याचा येथें आटोकाट प्रयत्न असावयाचा. अल्पाचे महान् कसें करावें ही कला येथील सर्व क्रियांतून शिकावयाची. येथला भंगी हा भंगी नव्हे तो महान् उपासक आहे. रामकृष्ण परमहंस अहंकार निःशेष नष्ट व्हावा म्हणून कोणास न कळत रात्री हळूं च उठत आणि आपल्या लांब सडक केसांनीं लोकांचे पायखाने झाडीत. ही च निरहंकारित्वाची दृष्टि भंगी कामांतून लाभली पाहिजे. भंगी काम करतां करतां चित्तशुद्धि होत गेली पाहिजे, अशी येथल्या भंगी कामांतून अपेक्षा असे. लॉर्ड हंटर आश्रम पाहाण्यास आले तेव्हां बापूजींनी त्यांना प्रथम पायखाने च दाखविले. अत्यंत अमंगळ भासणारें काम हि परम मंगलता देते, हेंच तत्त्व त्यांना दाखवावयाचें, आपली महत्त्वाची गोष्ट दाखवावयाची अशी त्यांत सूक्ष्म तत्त्वदृष्टि प्रगट झाली. येथें न्हाव्याचें काम हि आश्रमीय लोक च करीत. “सदा शुचिः कारु हस्तः” कारागिराचा हात हा नेहमीच पवित्र आहे. लोकांच्या डोक्यावरचे केस काढावयाचे, त्यांतला मळ काढून टाकावयाचा, हें काम कारागिराचें च! तें काम हलकें नाहीं. सेना न्हावी ह्याच आध्यात्मिक दृष्टीनें आपलें न्हाव्याचें काम करी. येथें विणकामाला हि असेंच आध्यात्मिक महत्त्व असे. विणकामाची इमारत हें च उद्योगाचें मुख्य केंद्र असे. सर्वांनीं तेथें यावे.

**सूत गुंतले तें उकलावें । तैसें मन हें उगवावे**<br>**मानत मानत घालावें । मुळाकडे**

अनुक्रमणिका

ही समर्थोक्ति मग आचरणांत आणण्याचा प्रयत्न करावा. आश्रमाचे व्यवस्थापक मगनलालभाई तर ह्या कामांत रात्रंदिवस लक्ष घालीत, नाना तऱ्हेचे प्रयोग करीत. कापूस पेरण्यापासून कापड निघेपर्यंतचे सर्व प्रयोग त्यांच्या डोक्यांत एकसारखे घोळत असत.

**साधु चरित शुभ सरिस कपासू ।**
**निरस बिसद् फल गुणमय जासु ॥**

ही तुलशीदासांची उक्ति त्यांना कापसाच्या दर्शनाबरोबर च दर्शन देत असे! सूर्यनारायणाचे किरण सृष्टीवर पसरले कीं, विणकरानें आपली ताणी पसरावी आणि झपाझप वस्त्र विणण्यास सुरुवात करावी. सकाळच्या प्रहरीं पक्षी आकाशांतून भर वेगानें सूर्यप्रभेकडे धांव घेतांना त्यांच्या पंखांचा जसा हलके 'कूं' 'कूं' असा आवाज यावा, त्याप्रमाणें धोट्याचा आवाजयावयाचा व त्यांत दंग होऊन भराभर काम पुढें चालावयाचें. अशा प्रकारची ती विणकामाची जागा नेहमीं च कबिरांच्या शेल्यांनी भरून जावी. तेथल्या साधकांनीं सुंदर सुंदर वस्त्रें विणावी. आपल्या देशाच्या दारिद्र्याबरोबर आपल्या मनाचें दारिद्र्य नष्ट करावयाचें. कल्पना दारिद्र्य हें च खरें दारिद्र्य. स्थूल दारिद्र्य हा कल्पना दारिद्र्याचा च परिणाम आहे, अशी एकंदर त्यांची भावना असे. तेथें शेतीचें आणि माळ्याचें काम हि आश्रमवासी च करीत. सावत्या माळ्याप्रमाणें भुवरजीभाई गाजर, रताळी, काकड्यांची नेहमी उपासना करीत असावयाचे!

**माळिये जेउतें नेलें । तेउतें निवांत चि गेले**
**तया पाणिया ऐसे केलें । होआवें गा**

माळ्याच्या कामांतून किती हा सुंदर बोध ज्ञानेश्वरांनीं दिला आहे! जीवनाच्या अंगप्रत्यंगाशीं संबंध राखल्याशिवाय जीवनांतला बोध तरी कसा मिळेल? पाण्यांत पडल्याशिवाय पोहतां येईल काय? आश्रमांत गोपालनाचें काम हि कसोशीनें होत असे. गोमातेचे नुसतें कौतुक करून काय उपयोग? तिची सेवा केली पाहिजे. तिची धार काढावी, गोठा साफ करावा. नवीन नवीन प्रयोग करून गाईची योग्यता वाढवावी. गोब्राह्मण प्रतिपालन हें तर हिंदुधर्माचें ब्रीदवाक्य. गाईपासून अगदीं थेट विद्वान् ब्राह्मणापर्यंत सर्वांचें पालन हा त्याचा अर्थ खरा च, पण त्यांत गाईला पहिलें स्थान दिलें. त्यांत हिंदुधर्माची अहिंसेची, अद्वैताची, विशाल दृष्टि भरून राहिली आहे. गाय केवळ उपयोगी म्हणून तिची उपासना नाहीं करावयाची, तर आपला संबंध पशुसृष्टीशीं हि येऊं देण्यासाठीं आपल्या संघांत मनुष्येतर प्राणि हि दाखल करावे म्हणून गाईची उपासना करावयाची. गाईशिवाय श्रीकृष्ण भगवान शोभत नाहीत. पॅलेस्टाइनमध्यें ख्रिस्ताचें हि असेंच नाहीं कां? त्याच्या चित्रांत तीं कोंकरें आपलीं असावयाचीं च. हा कृष्ण इकडे गाई चारी तो तिकडे कोंकरें चारी. दोन्हींकडे एक च दृष्टि, एक च अहिंसा, एक च वात्सल्य! आश्रमांत गोरक्षणाचें काम अहिंसेचें अपरिहार्य अंग, हिंदुधर्माचें अपरिहार्य अंग म्हणून अतिशय परिश्रमपूर्वक चालत असे. असा माणसांप्रमाणें एकेक कामाचा व्याप हि वाढत गेला. त्यामुळें कोचरबप्रमाणें एकत्र स्वयंपाक मात्र केला जात नसे. जो तो अलग स्वयंपाक करी. तरी प्रत्येकाच्या स्वयंपाकांत, भोजनांत हि फार मोठी दृष्टि असे. जेवण म्हणजे च कांहीं जीवन नव्हे, हें खरें; तरी त्यांत मनुष्याची वृत्ति बनण्याचा प्रश्न असतो. "आहार शुद्धौ सत्त्वशुद्धिः" किंवा "युक्ताहार विहारस्य", इत्यादि वचनें हि हाच प्राचीन अनुभव सांगतात. स्वच्छता, निर्मांसता आणि संयम ही भारतीय भोजनांतली सामान्य दृष्टि आहे. आहाराच्या प्रयोगांत अध्यात्म, आरोग्य, स्वदेशी धर्म आणि अर्थशास्त्र अशी चतुरंग दृष्टि एकवटून येथें प्रयोग केले जात.

अनुक्रमणिका

आश्रम हा सर्व दृष्टींनीं प्रयोगशाळा च असे. नवीन नवीन प्रयोग करावयाचे. त्यांतलें सार घ्यावयाचें. उत्तरोत्तर साधकभावाने संशोधन करावयाचें आणि सेवा करावयाची, हेंच येथलें कार्य. त्याच्या योगाने एकंदर सत्त्वगुणाची वाढ व्हावी. अशी येथली योजना. देहाचें आरोग्य वाढत जावें, मनांत दया-क्षमा-शांतीचा ठसा उमटून बुद्धींत खऱ्या ज्ञानाची जिज्ञासा तीव्रतम होत जावी हें सत्वगुणाचें त्रिविध कार्य उत्तमोत्तम व्हावें, म्हणून च नाना तऱ्हेचे प्रयोग. म्हणून अक्षर शिक्षणापेक्षा येथे सत्याकडे मुख्य लक्ष दिलें जाई. कारण सत्य हा सर्व गुणांचा गुण्या आहे. सत्यामागे सर्वच गुण आपोआप धावत येतात. एक सत्य जर सधिल तर त्यांत इतर गोष्टी येतात च. पण सत्य सोडून अनेक गोष्टींमागें धावल्यास एक हि गोष्ट हातीं येत नाहीं. म्हणून साहित्य विसरून सत्य स्मरावें, ही येथली पद्धति. मुख्य लक्ष सत्याकडे, आत्महिताकडे द्यावयाचे. त्याने क्रमाने सहज च सर्वांचे हित व्हावें, अशी येथली विचारसरणी. परस्परांच्या सुखांत विरोध असूं शकेल परंतु हितांत विरोध असणें शक्य नाही. स्वहितांत परहित सहज च येते.

**स्वान्तः सुखाय तुलसी रघुनाथ गाथा ।**
**भाषानिबंधमतिमंजुलमातनोति ।**

तुलसीदास स्वान्तःसुखासाठी रामायण रचतात. गोष्ट खरी. पण त्यामुळे करोडों लोकांच्या जीवनाला शांति मिळते. स्वान्तः सुखासाठीं जे जे केलें तें विश्वाच्या आत्म्याशीं जाऊन भिडलें च पाहिजे. सरोवरांत धोंडा टाकला कीं, त्याची वर्तुळें पाण्यात तयार होऊन तीं सर्व सरोवर व्यापतात च. साखर दुधांत टाकल्याबरोबर ती विरघळते. केवळ दुग्धस्वरूप होऊन राहते. लोक म्हणतात, आम्ही दूध प्यालों. साखरेचें नांव हि कोणी काढीत नाहींत. गोड गोड दूध पितात, पण साखरे चें नांव नाहीं. निरहंकार होऊन साखरेप्रमाणे विश्वात्म्याशीं मिळून, शून्यवत् होऊन सेवा करावी, हें च या आश्रमाचें ध्येय. तेवढ्यासाठीं मोठमोठ्या इमारती बांधल्या. विद्यार्थ्यांसाठी प्रचंड छात्रालय, शिक्षकांसाठीं—कुटुंबीजनासाठीं घरें, विणकामाची इमारत, महात्माजींसाठीं जागा, गोशाळेसाठीं इमारत, कोठाराची जागा, पुस्तकालयाची जागा, जणूं काय तें एक गांव च वसले. पण ह्या महापुरुषासाठीं तेथे कोणची जागा होती? संन्याशाच्या कुटीप्रमाणें साबरमतीच्या तीरावर एक छोटी दोन खोल्यांची इमारत मिळाली होती. इतर इमारतींपासून तें ठिकाण अगदीं निराळे च दिसे. त्याच्या जवळच महात्माजींचें निवासस्थान होतें. तेथून जवळ च प्रार्थनेची उघड्यांत बसण्याची रेतीची जागा असे. सर्व स्त्री-पुरुष तेथे प्रार्थनेसाठीं जमत. समाजांत नेहमीं स्त्री-पुरुष, लहान-मोठा, मालक-मजूर, सुरूप-कुरूप, बुद्धिमान-अबुद्धिमान—नाना प्रकारांनीं भेद पडत असतो. तो भेद प्रार्थनेच्या ठिकाणीं, देवासमोर लुप्त होऊन जावा असे तें स्थळ असे. तेथे मी मोठा, मी पुढच्या जागीं बसेन, तूं लहान म्हणून मागे बस असा भेदभाव नाहीं. सूर्यनारायणापुढे मोठा दिवा, दिवटी, काजवा सर्व सारखेच. बादशहा येवो कीं, भिकारी येवो देवापुढे ते सारखेच. अद्वैत भावनेने तेथें बसावयाचें, स्थित-प्रज्ञाचे श्लोक म्हणावे, रामनामाचा घोष करावा, संतांच्या सुंदर सुंदर भजनांशी एकरूप व्हावें. घटकाभर ह्या जगाच्या पसाऱ्यातून अगदीं अलिप्त होऊन भक्तिरसांत लीन व्हांवें, असें हें स्थळ असे. वस्तुतः सर्व दिवसभर भक्तिमय च असावें पण ह्या प्रार्थनेच्या वेळीं भक्तिभावाचा विशेष अभ्यास करावा. शरिरांत अनंत छिद्रें आहेत. त्यांनीं आंतबाहेर हवा जात येत असतेच. पण हवा घेण्याचें मुख्य काम नाकानें करावयाचें. तसेंच प्रार्थनेचें. सर्व सेवा-कर्मांत उपासना च करावयाची पण येथें ही खास उपासना करावयाची. सर्व प्रहर सारखेच. पण सकाळच्या वेळेला रामप्रहर म्हणावयाचें. म्हणजे इतर प्रहर कांही हराम प्रहर नाहींत. या प्रार्थनेच्या द्वारें परमेश्वराची करुणा भाकून नम्र व्हावयाचें, भक्तीच्या झऱ्यातं स्नान करून शुद्ध व्हावयाचें, स्फूर्तीच्या चैतन्यानें उत्साहित व्हावयाचें, अशी ही आश्रमांतील सर्वांत महत्त्वाची जागा असे. उघड्यामध्यें असलेली, आकाशाच्या विशालतेनें ब्रह्ममय झालेली, उषःकाल आणि संध्याकाळ च्या अलिप्ततेनें

सजलेली, चंद्र-तारकांच्या स्वर्गीय प्रकाशानें भारलेली, नदीच्या काठामुळें करुणेनें थबथबलेली, वाळूमुळें आपली भूमिका स्पष्ट करणारी—एक वेळ हे वाळूचे कण मोजले जातील, पण ईश्वराच्या गुणांचा थाग लागणार नाहीं—या भूमिकेनें गद्गद बनलेली, अशी ती अद्भुत जागा असे. तेथें प्रार्थनेच्या वेळीं दिवा सुद्धां ठेवावयाचा नाहीं. आवाज हि अगदीं कोमल, संवादी आणि हलका ठेवावयाचा. अव्यक्ताच्या सहज स्थितीचा कोणत्याहि कृत्रिमतेनें भंग होईल, असें तेथें कांहीं हि करावयाचें नाहीं. तेथें आरती नाहीं. झांजमृदुंगाची झुम्मड नाहीं. धूपदीपाची 'सुगंधी विडी' नाहीं. कांहीं नांहीं. केवळ एखादें कोमल तंतु वाद्य असे अगर नसे, त्या ठिकाणीं प्रार्थना आपली सुरू च व्हावयाची! तेथल्या गायनांत पंडित खरे प्रमुख असत. संगीत-शास्त्रांत त्यांनी तपेंच्या तपें घालविलेली होतीं. प्रार्थनेतल्या भजनांनीं त्यांच्या विद्येचें खरें सार्थक होत असे. आपल्या कलेचें प्रदर्शन करावें, गायकमंडळीकडून 'हो! —वाहवा! क्या खूब!' अशी प्रशंसा करून घ्यावी, द्रव्याच्या पोतड्या भराव्या, बहुतेक गायकांची

**जैसी रांधवणी रससोय निकी । करूनियां मोलें विकी**
**तैसा भोगासाठी अविवेकी । धाडिती धर्मु**

अशीच हीन स्थिती असे. परंतु पंडित खरे हे असल्या खोट्या मार्गाला लागलेले नव्हते. प्रार्थनेंत संगीत म्हणणारा, प्रार्थना चालविणारा, नारदाप्रमाणें भक्तीभावानें भरलेला, निस्पृह आणि कलामय असावा. पं. खरे हे नारद सांप्रदायांतले होते असें म्हणतां येईल. आश्चर्याची गोष्ट अशी कीं, इतकें संगीतशास्त्राचे आचार्य असून ते ह्या महापुरुषाच्या आवाजावर खूष असत. वेदोपनिषदांचे मंत्र, गीतेचे श्लोक म्हणतांना जे दिव्य संगीत येथें प्रगट होत असे त्यावर महात्माजी प्रमाणें पं. खरे ही मुग्ध होऊन जात. संगीतावरचीं संस्कृत पुस्तकें समजून घेण्याच्या निमित्तानें दोन दोन तास ते येऊन बसावयाचे. मग पुष्कळ चर्चा व्हावयाची. पं. खऱ्यांकडे संगीताचें स्वतः शिक्षण घेण्यासाठी ३—४ महिने थोडा वेळ हि दिला गेला होता. प्रार्थनेंत 'काशीबेन' कडून हि कधी कधीं महात्माजी पदें म्हणवून घेत. महात्माजींचे पुतणे छगनलाल गांधी यांच्या या पत्नी. अतिशय सात्विक वृत्तीच्या म्हणून सर्वांना पूज्य असत. त्यांची वृत्ति त्यांच्या गुजराथी पद्यें म्हणण्यात हि उमटून पडत असे. महात्माजींचे दक्षिण अफ्रिकेपासून चे मुसलमान सहकारी इमामसाहेब प्रसंगोपात कुराण म्हणत. ख्रिस्ती पद्यें, सर्व धर्मांतलीं गायनें प्रार्थनेंत म्हटली जात. प्रार्थनेनंतर प्रसंगानुसार महात्माजी निरनिराळ्या तऱ्हेचा उपदेश करीत. सर्व आश्रमवासियांना तें एक सुंदर मार्गदर्शन असे. हें काम आतां महात्माजींनीं ह्या महापुरुषावर सोंपविलें, त्यामुळे येथल्या अनंत ज्ञानाची आश्रमीयांस कल्पना येऊं लागली. जो वेडापिसा वाटत असे, तो च आतां महाज्ञानीं भासूं लागला. प्रार्थनेंत गुजराथी भाषेत सांगावे लागे. त्यामुळें गुजराथी भाषेचा कसून अभ्यास केला. आश्रमांतील राष्ट्रीय शाळेंतील मुलांना शिकविण्याचें हि काम महात्माजींनीं दिलें. त्यावेळीं तेथल्या राष्ट्रीय शाळेंतल्या मुलांना शिकविण्यांत काकासाहेब कालेलकरांसारखे अष्टपैलू विद्वान, किशोरलालभाई मिश्रूवाला यांसारखे तर्कप्रधान साधक, अप्पासाहेब पटवर्धनांसारखे निष्ठावान् चिकाटीचे शिक्षक होते, नरहरिभाई परेख हि होते. बापूजींच्या सान्निध्यांत असलेले महादेवभाई देसाई हि प्रसंगोपात्त विद्यार्थ्यांना कांही सांगत. संगीतासाठी पंडितजी तर तयार च असत. परंतु मुलांना येथें जें ज्ञान मिळे तें कोठेंच मिळूं शकत नसे. येथें गुरु आणि आई जणूं एकत्रित झालेली आहेत असा विद्यार्थ्यांना भास होई. आश्रमांत मात्र विद्यार्थ्यांखेरीज इतरांना केवळ गुरुत्वाची भूमिका च तेवढी दिसे. महात्माजींना आश्रमांत सगळे बापूजी म्हणत—कस्तुरबा सुद्धा 'बापूजी' म्हणत. बापूजी म्हणजे 'बाबा'. पत्नी पतीला बाप ह्या भावनेने पहाते आणि पती पत्नीला 'माता' ह्या भावनेने पाहतो, केवढा त्या दोन आत्म्यांचा विकास! रामकृष्ण परमहंसांच्या पत्नीनीं एकदां त्यांना सहज विचारलें 'माझ्याकडे तुम्ही कोणत्या भावनेनें पाहता?' 'रामकृष्णांनीं चटकन् उत्तर दिलें "साक्षात् जगदंबेच्या

अनुक्रमणिका

भावाखेरीज मला तुझ्या ठिकाणीं दुसरे कांहीं च दिसत नाही”. आश्रमाला अशीं दिव्य माता-पितरे मिळाली होतीं, पण गुरु नव्हता. आता हा गुरु लाभला. मुलांना मात्र गुरु आणि आई दोन्हीं एकत्र च या ठिकाणी दिसत. मुलांच्या मेळ्यांत बसलेला हा पुरुष आणि इतर मोठ्या मंडळीत असतांना हा पुरुष—ह्या अगदीं भिन्न व्यक्ति भासत. ब्रह्मचाऱ्याच्या ठिकाणीं हें वात्सल्य पाहून आश्चर्य वाटेल. पण ब्रह्मचाऱ्याच्यां वात्सल्याची बरोबरी कोण करणार? भीष्माचार्यांना मुलगा नाहीं आणि मुलाशिवाय तर मनुष्याला सद्गति नाही? असा एकानें प्रश्न विचारला. त्याला व्यासांनीं उत्तर दिलें. अरे, भीष्माचार्यांचे तर सगळे च पुत्र आहेत. येथें हि ही च स्थिति असे. मात्र विद्यार्थी वाटेल तसा असेल तर येथें त्याचें जमावयाचें नाहीं. श्रद्धावान् विद्यार्थी येथे वारंवार यावयाचे आणि नाना तऱ्हेनें हास्य-विनोद-संवादात वेळ केव्हां च निघून जावयाचा. केवळ स्वर्गीय आनंदानें तें वातावरण भरून जाई. विद्यार्थ्यांमध्यें हा पुरुष जितका खुले तितका कोठे च खुललेला दिसावयाचा नाहीं. बाल-गोपाळांच्या मेळ्यांत केवळ मुक्तीचा आनंद च झुलतो आहे असे दिसे! लहान विद्यार्थी म्हणजे बाळकृष्णाची मूर्ति ह्या भावनेनें सतत पाहिलें जाई. मी विद्यार्थ्यांना शिकवितो त्यापेक्षां किती तरी पट विद्यार्थ्यांपासून शिकतों असें नेहमीचें उद्गार असत. गुळाभोंवतीं मुंग्या आणि फुलाभोंवतीं भुंगे जसे नेहमीं गुंगत असावयाचे तशीं मुलें येथे नेहमी च घोटाळत असावयाची. मुलांपाशीं अंतःकरण उघडें होई. त्यांना अनेक तऱ्हेनें बोध दिला जाई. असे सर्वच प्रसंग अतिशय उद्बोधक आणि स्फूर्तिदायक असत. त्यांत पुन्हा कृत्रिमता मुळींच नसावयाची. ते ते प्रसंग आणि तदनुसार बोध आपोआप प्रकट होई. आई संबंधीं हि सांगितलें जाई. हा पहा अशासारखा च पुढील एक व्याख्यानांतील उतारा.

“मी आईचा मुलगा आहे, कोणी आईचीं मुले असतात तर कोणी बापाचीं, तर कोणी आजोबांची. मी आईचा आहें. तुम्ही म्हणाल हें काय सांगतां? तुम्हाला ही गंमत वाटेल. परंतु ही गंमत नाहीं. जी मी ओळख आतां सांगितली ती माझी पूर्ण ओळख आहे. मी आईचा मुलगा आहें. म्हणजे माझ्या जीवनावर आईचा परिणाम जेवढा झाला तेवढा क्वचित च इतर कोणाचा झाला असेल! स्त्रियांकडे पाहाण्याची माझी ही च दृष्टि आहे. आईच्या च दृष्टीनें मी स्त्रियांकडे पाहातों. माझ्यावर आईची जेवढी सत्ता आहे तेवढी दुसऱ्या कोणत्या हि नातलगाची नाहीं. तिनें लावलें तें वळण, तिनें लावली ती दिशा. आईनें जें शिकविलें, त्याच्याशीं जें जुळेल तें मी घेतलें.” कधी मौन आणि सतत कर्मावर बोलणे निघावयाचें. आश्रमांतली च उदाहरणे विद्यार्थ्यांना कळकळीन सांगितलीं जावयाची. “ते छोटेलालजी पहा. कसे एकमार्गी आहेत, सतत राब राब राबतात सदोदित मौनी.” “प्रभुदास, तूं च म्हणालास ना कीं, आमचे आजोबा म्हणत ‘मगनलाल छगनलाल सोनाना ने तेमना दीरा गाराना’, याचा अर्थ समजलास का? खरोखर मगनलालभाई आणि छगनलालभाई सोन्यासाखे च आहेत. तुम्ही त्यांचें उदाहरण डोळ्यापुढे ठेवा. अगदीं जवळचे आहेत म्हणून दुर्लक्ष होतें. पण त्यांत आपली फार हानि आहे. मनुष्य बहुधा आपल्या आसपासची प्रत्यक्ष घडणारी सज्जनतेचीं, पवित्रतेचीं उदाहरणें लक्षांत च घेत नाहीं. त्याग, पवित्रता इत्यादि स गुण बहुधा हजार पांचशें वर्षें मागे असावयाचे. जर आजच्या जिवंत संतांविषयीं मी आंधळा असेन तर हजार पांचशें वर्षांपूर्वीच्या संतांचा आपणाला कांहींच उपयोग होणार नाहीं. मला तर माझ्या आसपास इतकीं पवित्र उदाहरणें रोजच्या रोज पहावयास सांपडतात कीं, अशा संगतीत राहण्याचें भाग्य जर निश्चित मिळणार असेल तर जन्मोजन्मीं मोक्ष न मागतां तें भाग्य पत्करण्याची मला इच्छा होईल.” असा बोध दिला जाई. त्यापेक्षां प्रत्यक्ष उदाहरणाचा परिणाम अधिक तीव्रतर असे. विद्यार्थ्यांपुढे त्या उदाहरणाची मूर्ति ढळढळीत नेहमी उभी राही. पहाटें सर्वांच्या आधीं तीन वाजतां उठून साबरमतीच्या थंडगार पाण्यांत स्नान करावयाचें. मग छात्रालयांतील विद्यार्थ्यांस घंटेबरोबर चार वाजतां उठवावयाचें. प्रत्येकाने घंटेबरोबर ताबडतोब आंथरुण सोडलें पाहिजे. ताबडतोब प्रातर्विधि आटोपून नदीवर स्नानाला गेलें पाहिजे. प्रार्थनेंत शिस्तवार बसून नंतर नमस्कारादि व्यायाम रीतसर घेतला पाहिजे. आपले कपडे, आपलीं पुस्तकें, आपलें सर्व सामान व्यवस्थित, स्वच्छ आणि सुंदर

तऱ्हेन ठेविलें पाहिजे—अशी प्रत्येक बाबतींत कडक शिस्त असे. विद्यार्थ्यांत कणखरपणा पाहिजे, आळस यत्किंचित हि नको, छानछोकीपणा मुळींच कामाचा नाहीं. आश्रमांतलें छात्रालय असें सुंदर तऱ्हेनें स्वतःच्या देखरेखीखालीं चालविलें होतें. शिस्त अतिशय कडक असून मुलें आनंदांत निमग्न असत. उदासीनतेची रोगट छटा मुळीं च दिसावयाची नाहीं. कारण त्या कार्यक्रमाच्या तीव्र यंत्राला प्रेमाचें, आत्मिक-बोधाचें तेल सतत मिळत राही, त्यामुळें घर्षणाची भीति च नसे. अभ्यास सुद्धा भरपूर होई. भिकारडेपणा मुळींच नसे. निरनिराळ्या ठिकाणाहून आलेलीं ती मुलें, त्यांचे जुने संस्कार बदलून त्यांना नवीन संस्कार देण्यासाठीं अभ्यासाची चांगली च चालना दिली होती. उच्च विषयाची गोडी लावल्याशिवाय सामान्य विषय सुटत नाहीं, हें जाणून बुद्धिपूर्वक, मानसशास्त्राचा पूर्ण विचार करून त्या निरनिराळ्या ठिकाणच्या मुलांचे संस्कार एकदम हां हां म्हणता बदलून टाकले. एकच दिवा पेटवला आणि अंधाराचे समूळ उच्चाटन केलें. स्फुलिंग! एकच ठिणगी ती!! सबंद अरण्याच्या अरण्य पेटवून देते!!! त्याप्रमाणे च झालें. मुलें दिवसभर जेवण्याखाण्याची च चर्चा करावयाचीं. आज भाजींत मीठ च जास्त होतें. ती पोळी खुसखुशीत झाली. पण भात पचपचीत होता. त्या मुलाचा टॉवेल रंगीत आहे आणि माझा सफेत पांढरा स्वच्छ आहे— कांहीं तरी बाह्य विषयावर मुलें बडबडत असावयाचीं. त्याला ताळ नां तंत्र. हें त्यां मुलांचें अवलक्षण १५/२० दिवसांत एकदम पालटून टाकलें. मुलांना गणिताची आणि संस्कृतची गोडी इतक्या कुशलतेने लाविली की, त्यांना तद् यतिरिक्त दुसरें कांहीं च दिसेना.

**आपुल्या सारिखे करीती तात्काळ ।**

या उक्तीचा तेथें प्रत्यक्ष अनुभव आला. खाण्यापिण्याच्या च गोष्टींत मुलें पूर्वी मग्न असत, हीं पूर्वजन्मीचीं आचाऱ्याचीं मुलें तर नसतील? कांही बकाल करंट्याच्या घरांत वाढलेलीं सदोदित भूक भूक करणारीं बुभुक्षित मुलें आहेत?—असें वाटावें, तेथें आता निराळेंच दृश्य दिसूं लागलें. तीं च मुलें आतां निरनिराळ्या छंदांतलीं, निरनिराळ्या वृत्तांतलीं संस्कृत वचनें तल्लीनतेनें म्हणून वातावरणाला हि त्याच नादांत गुंगवूं लागलीं.

**मत्तेभेंद्र विभिन्न कुंभ कवल ग्रासैके बद्धस्पृहः**
**किं जीर्ण तृणमति मानमहतामग्रेसरः केसरी ॥**

अशी तीं गर्जना करूं लागलीं. आतांपर्यंत बकरीसारखीं दिसणारीं मेषपात्र मुलें सिंहाचे छावे वाटूं लागले. त्यांना आतां दुसऱ्या कोणत्या हि शिक्षकाचे विषय आवडेनासे झाले. त्यांच्या वर्गांत हि तीं जाईनाशी झालीं. बापूजींकडे त्याची तक्रार गेली. त्यांना फार कडक शिस्त लावली आहे, तीं त्यामुळें अशक्त झालेलीं आहेत, अशी हि एक तक्रार होती. पण ही दुसरी तक्रार तर अगदीं च पोकळ ठरली. कारण ह्या कडक शिस्तींत तीं कणखर बनलीं होतीं. त्यांचीं वजनें एक सारखी वाढत होतीं. त्यांची नोंद ठेवलेली असे. पहिल्या तक्रारीबद्दल मुलांना जमवून बापूजींनीं विचारलें तेव्हां "आम्हांला हे एक च शिक्षक आणि संस्कृत आणि गणित हे विषय या खेरीज कशाची हि जरूरी नाहीं"—असें निरपवाद सर्वांनीं उत्तर दिलें. त्यावेळीं डोक्यावर केंस वाढविले होते. त्यांच्या लांब जटा झाल्या होत्या. आंतली ऋषिता त्यामुळें जणूं बाहेर हि खुलून दिसे. तीं तेथलीं राष्ट्रीय शाळेंतलीं—रात्रंदिन मधुर स्वर इतस्ततः प्रीतियुक्त तीं गाती—अशीं लवकुशां प्रमाणें संगीतमग्न मुलें आणि त्यांचा हा ऋषितुल्य गुरू पाहून प्राचीन आश्रमाचा च हा देखावा या नव्या आश्रमांत अवतरला आहे, असें भासे. आपण येथें शिक्षण घेत आहों असें त्यांस मुळीं च भासत नसे. ही

केवळ एक लीला—निव्वळ आनंद अशी त्यांची स्थिति होत असे. पोहतांना प्रथम कोण कष्ट होतात पण नंतर तो एक विश्रांतीचा—करमणुकीचा प्रकार होतो. येथें तीच गोष्ट दिसे.

आणि पोहण्याच्या कलेंत हि हे विद्यार्थी तरबेज झाले. कित्येक शिक्षकांना हि पोहतां येत नसे. पण मुलांना सर्वांना पोहोण्याचा नाद लागला. मुलांचे च काय आश्रमांतील मुली हि पोहण्यांत पटाईत झाल्या. एकदां तर मगनलाल गांधीच्या मुलीनें एका शिक्षकाला मोठ्या धैर्यानें बुडतां बुडतां वाचविलें. साबरमती नदीमध्यें स्वतःला हि बुडण्याचा प्रसंग आला होता. पुरामुळें नदी वाढलेली होती. तिचा वेग हि दांडगा होता. त्यामुळें प्रवाहांत हात मारून मारून थकवा आला, सर्वांग शिथिल झालें. सर्व शक्ति खुंटून गेली. शेवटीं सर्व प्रयत्न व्यर्थ झाले. तीरावर एक कोणी पोहतां न येणारा परका मनुष्य होता. त्याला ओरडून सांगितलें, “मी बुडालों आत्मा अमर आहे याचें स्मरण असूं द्या. असें आश्रमीय मंडळीस सांग.” परंतु ईश्वरी कृपेनें थोड्याच वेळांत खाली उंच भाग पायाला लागून आधार मिळाला आणि थोडी विश्रांति मिळून परत आश्रमांत येतां आलें. मुलांना घेऊन अबूच्या पहाडावर प्रवासांत असतांना हि असाच एक प्रसंग आला होता. काकासाहेब कालेलकरांबरोबर बोलत बोलत दाट जंगलांत कोठें आलों ह्याचें फिरतांना भान राहिलें नाहीं. इतक्यांत कोणत्या संकटांत आपण आहोंत हें काकासाहेबांच्या लक्षांत आलें. पांच सात हातावर समोर एक प्रचंड वाघ आणि तितक्या अंतरावर मागें तशीच एक वाघीण उभी होतीं. दोघें हि ह्या दोघांकडे पहात होते. लगे च काय करावें ह्याचा विचार झाला. उन्हांमध्यें वाघ सहसा येत नाहीं. जवळ च बाजूला उन्ह दिसत होतें. तेथें हळूं हळूं सरकून डोंगराच्या दरड्या उतरून गेल्यामुळें हें संकट टळलें. महापुरुषांवर संकटें येतात आणि अकल्पित तऱ्हेनें नाहींशीं हि होतात. लढाईच्या गर्दीत नेपोलियन बोनापार्टवर असंख्य गोळ्या येऊन पडत. शिपाई, नेपोलियनला मागें परतण्याची विनंति करीत. पण त्याचें उत्तर ठरलेलें असें. “मला मारील अशी गोळी अद्याप कोणत्या हि कारखान्यांत तयार झालेली नाहीं.” अमदाबादच्या दंग्यांत शिपायांनीं जमावावर गोळ्या झाडल्या होत्या. मोठा दंगा झाला होता. त्या वेळीं आश्रमांतून काकासाहेब व इतर मंडळीबरोबर शांतता राखण्यासाठीं भर दंग्यांत गर्दीत जाण्याचा प्रसंग आला होता. गोळ्या दोन चार हातांवर येऊन पडत. कित्येक माणसें जखमी झालीं. परंतु निर्भयतेनें समजाऊन सांगणाऱ्या ह्या लोकांवर गोळ्या मुळींच आल्या नाहींत. ज्ञानाची कसोटी संकटांत च होते. घरीं रणांगणातल्या रम्य कथांचीं रसभरित वर्णनें वाचणें आणि रणांगणांत धुमश्चक्रीमध्यें प्रत्यक्ष भाग घेणें यांत केवढा फरक आहे!

या अनेक संकटांच्या कसोटीनें तावून सुलाखून निघालेलें ज्ञान आतां सर्व आश्रमीयांच्या आकर्षणाचा विषय झालें. त्यामुळें विद्यार्थ्यांप्रमाणें मोठ्या मंडळींना हि शिकण्याची लालसा उत्पन्न झाली. विद्यार्थ्यांबरोबर ज्ञानाचें तेज सर्व आश्रमांत फैलावून गेलें. प्रार्थनेंतील प्रवचनांनीं हृदयें तल्लीन करून सोडलीं. मोठ्या मंडळींनीं आपला एक पाठ घ्यावा म्हणून विनंती केली. ही सर्व मंडळी थोर योग्यतेची, वयानें हि लहान नव्हेत तरी—

**तस्माद्गुरूं प्रपद्येत जिज्ञासु : श्रेय उत्तमम् ।**
**शाब्दे परे च निष्णांतं ब्रह्मण्युपशमाश्रयम् ॥**

या नम्र वृत्तीनें पाठाला येत. पहाटे कडक थंडी पडलेली असावयाची. अंगावर कांटा उभा राही. साबरमतीच्या बर्फासारख्या गार पाण्यांत स्नान केल्यावर तर हुडहुडी भरे, तरी सर्वजणांनीं स्नान करून च यावें, अशी शिस्त होती. शुकदेवाप्रमाणें फक्त नेसण्याचें वस्त्र तेवढें बाकी ‘दिशोऽपि वसनम्’ अशा स्थितींत तो वर्ग घेण्यांत येई. आप्पासाहेब पटवर्धन, मगनलालभाई गांधी, महादेवभाई देसाई अशी ती मंडळी

प्रभातकाळीं साबरमतीच्या तीरावर पाठाला बसत असत. मग वेदोपनिषदापासून संतपरंपरेपर्यंतचें सर्व तत्त्वज्ञान तेथें दर्शन देई. तिन्ही काळांचें एकत्र दर्शन होऊन पाठ संपताना—

**दिक्कालाद्यनवच्छिन्नानंतचिन्मात्रमूर्तये ।**
**स्वानुभूत्येकमानाय नम : शांताय तेजसे ॥**

अशी सर्वांची अवस्था व्हावयाची! सर्व जण त्या शांत तेजोमय मूर्तीला मनांतल्या मनांत नमस्कार करून निघून जावयाचे.

पण विद्यार्थ्यांच्या मेळ्यांतली मजा येथें नसे. त्यांत पुन्हा निष्ठावान् विद्यार्थि असतांना जो भाव असे तो इतरत्र प्रगट व्हावयाचा नाहीं. तेजस्वी, निष्ठावान् विद्यार्थि हाच कार्यकारी होऊं शकतो. शंभर आंधळ्यांपेक्षां एक डोळस चांगला ही येथें दृष्टि असे.

**एकेनापि हि शूरेण सिंहि स्वपिति रक्षितम् ।**
**सदैव दशभि : पुत्रैर्भारं वहति रासभि ॥**

ही कार्यकारिणी दृष्टि येथें सदैव जागृत असे. भाराभर भरताडाची जरूर नाहीं. एक च सिंहाचा बच्चा बस आहे असा विचार येथें पक्का झालेला होता. जगांत आजूबाजूला पसरलेल्या जडतेचा वारंवार परिणाम होऊन, व्यवहारांतल्या नफातोट्यानें चित्त भारावून जाऊन आसक्तीच्या दडपणाखालीं निश्चेष्ट होऊन सर्वत्र जडवादाची छटा पसरते, तेज मावळतें; बाल्य काळांत चैतन्यमय असलेलें मनुष्याचें मन पुढें केवळ यंत्रवत् बनतें. हृदयस्थ परमात्म्याची ओळख बुजून जाते. मी मर्त्य देह आहे आणि रे रे करीत तो टिकवावयाचा आहे, ही च एक मनीषा तेथें ठाणें देऊन बसते. मी खडतर कष्ट करीन, ज्ञानाचे प्रांतच्या प्रांत काबीज करीन, प्रत्यक्ष चैतन्याची गांठ घेईन, माझ्या देहाचें हें पोतडें तुच्छ समजून, ईश्वरी कार्यासाठीं त्याचें बलिदान देण्यास तयार होईन ही इच्छा च तेथें उद्भवूं शकत नाहीं. असले जड ठोकळे काय कामाचे? अशी दृष्टि अगदी प्रथमपासून च असे. जेथें बल नाहीं तेथें बलिदान कशाचें? निष्ठावान् माणसांची जरूरी एवढ्यासाठीं च. जडाशीं लढून चैतन्याचा प्रकाश सर्वत्र पसरून द्यावा ही च मनीषा येथें असे. अशी मनीषा असलेला मनुष्य बाह्य अवडंबर, संख्येचें बल, आणि वरवरच्या पसाऱ्याच्या अगदीं विरुद्ध असतो. कारण त्याला एक च सत्यवान् निष्ठावान् माणसाचें सामर्थ्य काय करतें याची पूर्ण कल्पना असते. ज्यावेळीं जडतेची धूळ लोकसमाजावर वारंवार पसरते, तिच्या गडद अंधःकारानें दशदिशा व्याप्त होतात, विश्व सर्व तमोगुणाच्या गर्तेत लोटलें जाऊं लागतें, स्वार्थाशिवाय कोणाला कांहीं दिसत नाहीं, त्या वेळीं एकदम प्रकाशाची एक मोठी लाट येते, सगळीकडचा तमोगुण नष्ट होतो, रजोगुण मारला जातो, आणि दैवी संपत्तीची पुन्हा प्रस्थापना होते. हें कार्य दुर्दम्य निष्ठेंतून तयार होतें. शेंकडों संस्था, शेंकडों योजना, शेंकडों सभा, करोडों साधनें जें कार्य करूं शकत नाहींत तें कार्य असा जाज्वल्य निष्ठेचा मनुष्य करूं शकतो. म्हणून येथें आचार्यांची, गुरूची भूमिका जरी बाणली होती, तरी वाटेल तो मनुष्य जवळ येऊं शकत नसे. झंझावात सुटावा आणि वारधूळ पसरून जिकडे तिकडे वनांतल्या कच्च्या आणि कुजट फळांची पडापड सुरूं व्हावी त्याप्रमाणें येथें आल्या बरोबर, हा पळाला, तो गळला, त्याची गाळण उडाली, हा फें फें करूं लागला अशी सगळ्यांची स्थिति व्हावयाची, कोणी च टिकावयाचा नाहीं. येथलें तेज सहन व्हावयाचें नाहीं. ज्याच्या ठिकाणीं निष्ठा आहे, भक्ति आहे, तेज आहे, तणाव आहे तो च टिके. येथें सर्व गाळीव काम असे. वाटेल तो मनुष्य यावयाचा नाहीं. वाटेल तें बोलणें येथें सहन केलें जावयाचें नाहीं. येथें सर्व तावून सुलाखून परीक्षून

अनुक्रमणिका

घेतलें जाई. महात्माजींच्या कार्याचा समुद्र उचंबळून येथें हजारो तऱ्हेचीं माणसें येत, पण ह्या माणसांपैकीं कोणतीं माणसें हातीं धरावीं हें इतरांना मुळीं च माहीत नसे. Come and follow me I shall make you fishers of men, अशी ज्यांना आज्ञा झाली असा च पुरुष हें काम करूं शकतो. ज्ञानेश्वरांनीं केवळ १८ वर्षात महाराष्ट्राच्या सर्व संस्कृतीची रचना केली. 'सदा सेवि आरण्य तारुण्यकाळीं' ची गर्जना झाली आणि महाराष्ट्रांत स्वराज्याचे वारे वाहूं लागले. एक च बलिदान झालें. जॉर्डन, युफ्रेटिस आणि नाइल नदीच्या कांठची पुराण संस्कृति एकदम परिवर्तन पावली. ख्रिस्ताच्या शिकवणीनें क्रमाक्रमानें यूरोप खंडाचा कब्जा घेतला. अरबस्तानांतल्या ऊंटावरचा महंमद हजारो लोकांच्या अंतःकरणांत विराजमान झाला. धैर्य-शौर्याची त्यानें ज्योत पेटवून दिली. बोधिवृक्षाखालून बुद्ध उठले आणि एकदम आशिया खंड पेटून गेलें. युद्धांत अर्जुन प्रश्न विचारतो काय आणि त्याला उत्तर देतां देतां सहजासहजी मानवजातीच्या विचाराचें सर्व सार एकदम बाहेर येतें काय! हा केवळ असीम खोलीचा, जाज्वल्य निष्ठेचा परिणाम. तेथें दुसरें दिसत नाहीं. आत्म्याच्या अनंत शक्तीव्यतिरिक्त दुसरी भाषा नाहीं.

**'आत्मा नं वै विजानथ अन्या वाचा विमुंचथ' ।**

आई आई, बाबा बाबा ही अगदीं लहानपणापासून शिकविलेली सर्व माइक भाषा तो विसरतो. अशा निष्ठावान् पुरुषाची स्मरणापेक्षां विस्मरणावर च जास्त भिस्त असते. म्हणून त्याच्या स्मरणशक्तीची बरोबरी कोण हि करूं शकत नाहीं.

**पै व्याकरणीं चोखडा । तर्की अतिगाढा । आत्मज्ञानीं फुडा । जात्यंध तो**

असलें आंधळेपण त्याला रुचत नाहीं. तो "आत्मा, आत्मा" हाच विचार करितो, हे च शब्द बोलतो, आचार-विचारांत हि त्याला दुसरें सुचत नाहीं. "संघ शक्तिः कलौ युगे" म्हणन तो भीक मागत फिरत नाहीं, तर आत्मशक्ति ही च खरी शक्ति समजून बेडर वृत्तीनें कालस्थलाच्या तुफान दरियांत आपल्या देहाच्या क्षुद्र होडक्यांतून निःशंक प्रवास करून दरिया पार करतो. याच वेळीं बापूजींनीं थोरोच्या सिव्हिल डिसोबिडियन्सचें संस्कृत भाषांतर करण्यास सांगितलें; तें संस्कृत पद्यांत करून दिलें गेलें. बापूजी आणि काका साहेबांना तें पाहून मोठा हर्ष वाटला. तें भाषांतर काळाच्या तडाक्यांत कोठल्या कोठें गेलें. परंतु त्यांतलें एक च वाक्य नेहमीं म्हटलें जातें. तें म्हणजे

**'एकाकी पौरुषं कुर्यात्'**

बरोबर कोणी येईल तर ठीक च नाहीं तर एकट्यानें च ईश्वरी कार्य साधूं, ही आत्मप्रतीति ज्याच्या जवळ आहे, असे विद्यार्थी तयार व्हावे ही च येथें तळमळ होती. निष्ठावान् विद्यार्थ्यांवर प्रेम एवढ्याच साठीं. मोठमोठे श्रीमान्, विद्वान्, कीर्तीचे कळस, त्रिखंडांत गाजलेले लोक आश्रमांत येऊन जात. पण त्यांच्याकडे लक्ष नसे. लक्ष एक च

**माझीये जातीचें मज भेटो कोणी**
**आवडीची धणी फेडावया**

अनुक्रमणिका

संबंध आश्रमांत इतक्या थोर योग्यतेचा मनुष्य नव्हता. इतर पुष्कळांना आश्रमामुळें मोठेपणा आलेला होता. येथें अगदीं उलट प्रकार होता. सी. एफ्. अँड्रयूजशीं ओळख करून देतांना महात्माजींनीं हुबेहुब अशी च ओळख करून दिली होती. हा एकटा म्हणजे सर्व आश्रम आणि हा नाहीं म्हणजे आश्रम नाहीं, अशी वस्तुस्थिति होती. तत्त्वज्ञाच्या च ती लक्षांत येई, इतरांना कांही च भासत नसे. कारण महात्माजी आतां आश्रमाचे राहिले नव्हते. ते सर्व हिंदुस्थानाचे झाले होते. आश्रम ही माझी सर्वोत्कृष्ट कृति, असें ते म्हणत. आश्रम उत्तम चालला कीं, हिंदुस्थानचें अधिराज्य काय सर्व जगाची व्यवस्था लागली अशी त्यांची पक्की खात्री असे. परंतु त्यांना आश्रमांत राहण्याला वेळ कोठें असे? हिंदुस्थानमधली अनेक कामें सतत थैमान घालीत असावयाची. त्यामुळें त्यांना पुष्कळसा वेळ फिरण्यांत द्यावा लागे. आश्रम हें भाताचे शेत, तेथून मग चोहींकडे रोपें लावावयाचीं. युक्तिबुद्धींनें भारलेले लोक सर्वत्र पसरावयाचे. पण हें सर्व येथें होणें शक्य नव्हतें. येथलें संचालनाचें कार्य च त्यामुळें हातीं घ्यावें लागलें असतें. या ठिकाणीं तयारी करणाऱ्याला अवसर मिळाला. पुढील आश्रमाच्या संचालन कार्याची येथें प्रस्तावना झाली, असें म्हणण्यास हरकत नाही. येथें बडोद्याच्या पूर्वपरिचितांपैकीं मंडळी हळू हळू जमूं लागली. येथले कांहीं विद्यार्थि हि ह्या संघांत सामील होते. हा संघ म्हणजे आश्रमांतला आश्रम म्हणजेच गुरूचें स्थान, किल्ल्यांतला किल्ला म्हणजेच बाले किल्ला, फुलांतले फूल म्हणजेच सुगंधाचा सांठा, फळांतलें फळ म्हणजे च रसाची भूमिका—असें ह्याचें स्वरूप होतें. तोफेचा गोळा तयार झाला. बत्ती हि ह्या पुरुषाच्या रूपानें हजर होतीं. गोळ्याचा स्फोट होण्याला अजून अवकाश होता.

राष्ट्रीय शाळेंतल्या मुलांना आतां शरीरपरिश्रमाचें तत्त्व शिकविण्याचें ठरलें. बहुतेक वेळ कातण्या-पिंजण्यांत जाऊं लागला. कच्ची मुलें निघून जाऊं लागलीं. शिक्षक हि ह्या शरिरपरिश्रमांत मागें पडूं लागले, पण येथें मागें पडण्याचा प्रश्न च नव्हता. विणकामाच्या उद्योगालयांत ८/८ तास मौन राखून चरख्यावर सूत कातण्याचें सूरूं केलें. शंकराच्या पिंडीवर अभिषेकाची संतत धार पडावी त्याप्रमाणे चरख्याच्या चातीवर पांढऱ्या शुभ्र सुताची धार एक सारखी पडते आहे असें वाटे. ज्ञान-कर्म-भक्तीचा तो संगम च होता

चित्तांत ज्ञान! हातांत कर्म!! हृदयांत भक्ति!!! त्रिवेणी संगमाची पावनता या ठिकाणीं सहज च आली होती. येथें कोणी हि यावें, चार दिवस घालवावें, पश्चातापदग्ध होऊन मागील सर्व संचिताचा च काय परंतु सर्व संसाराचा च पूर्ण त्याग करावा, असें हें हजारों वर्षानंतर अवतरलेल्या महात्म्यांचे पवित्र स्थान होतें. त्रिवेणी संगमावर जाऊन करावयाचें कार्य तें हें च नव्हे काय?

**म्हणोनि भलतेनें एथ सद्भावें नाहावें ।**
**प्रयागमाधव विश्वरूप पहावें ।**
**येतुलेनि संसारासि द्यावें ।**
**तिलोदक**

●●●

अनुक्रमणिका

# प्रकरण २७ वें

# बापूजी

**हजारो** सत्यवादी पुरुषांचा अर्क काढला आणि त्यापासून एक मूर्ति तयार केली तरी बापूजींची बरोबरी होईल किंवा नाहीं याची शंका च आहे! श्रवणाचें एक चित्र—केवळ चित्र च तें पण त्या चित्रांनें या बालकाला 'मातृ देवो भव । पितृ देवो भव' हा उपनिषदांतील उपदेश दिला जावा आणि जन्मभर तो चिती रमून रहावा ही सामान्य घटना म्हणतां येणार नाहीं. पण खरी आश्चर्यमय घटना, यापेक्षां हि विस्मयकारक गोष्ट निराळी च आहे. हरिश्चंद्राचें नाटक हा बालक पाहातो आणि त्या केवळ नाटकानें च सत्याचें संपूर्ण महत्त्व त्याच्या चित्तांत ठसून जातें. खरोखर ही "मनुष्याणां सहस्रेषु" अशा तऱ्हेची घटना मानावी लागेल. सत्य म्हणजे काय एखादें खेळणें आहे तर त्याचें वेड मुलाला लागून रहाव? प्रत्यक्ष समोरचीं उदाहरणें पाहून मोठ मोठ्या लोकांना जिथें ही गोष्ट ग्रहण करितां येत नाहीं तेथें केवळ नाटकांतल्या सत्याचा एका बालकावर खोल ठसा उमटावा ही गोष्ट किती विस्मयकारक आहे! सत्यादि तत्त्वें स्वयंस्फूर्तिशिवाय ठसावयाचीं नाहींत हें च खरें! तें नाटक केवळ निमित्त. कांहीं निमित्तानें आंतली स्फूर्ति प्रकट होते हा च ह्याचा भावार्थ. झरा आंत दडलेला च होता, जरासा धक्का लागला आणि वरचा दगड दूर झाला. लगेच झुळझुळ पाणी वाहूं लागलें. तत्क्षणीं परमेश्वराची अद्भूत किमया उघड झाली!

आणि सत्याबरोबर त्यांच्या ठिकाणीं अहिंसेची सुद्धां केवढी तरी स्फूर्ति दडलेली होती! ज्ञानेश्वरांनीं केलेले वर्णन अतिशयोक्त ठरणार नाही.

**तो कनक चंपकाचा कळा । की अमृताचा पुतळा ।**
**ना ना सांसिन्नला मळा । कोवळिकेचा ॥**

त्यांचा देह हाडामांसाचा बनला होता ही पार्थिव दृष्टि झाली. सत्य त्यांचा आत्मा म्हटला तर अहिंसा, प्रेम हा त्यांचा प्राण म्हणावा लागेल. त्यांच्या आकृतींत सौंदर्याचा आकार आढळून येणार नाही. पण सकल सौंदर्याचें सार तेथें केंद्रीभूत झालेलें दिसून येईल. लहानपणापासून या कोमलतेमुळें स्वभावांत लाजरेपणा फार. प्रेम असून हि कोणाशीं मैत्री करण्याला त्यांचें मन धजावत नसे, इतका हळुवारपणा मनांत भरलेला. क्षणभर हि कोणाच्या डोळ्याशीं डोळा भिडविण्याची शक्यता नाहीं. एखादी लाजाळू मुलगी सुद्धां यांच्यापेक्षां धीट असेल! शरीर हि ठेंगणें, बोताबाताचें. या पोरबंदरच्या पोरांत थोरांत अति थोर होण्याचीं हीं दोन महान् बीजें जन्मतः च दडून राहिलेलीं होतीं. या दोन गोष्टींच्या जोडीला त्यांच्या आईकडून ईश्वरनिष्ठेची जोड मिळाली. चोर, पाप, भुतें,—सर्वांची भीति नष्ट होण्याला रामनामाचा उपाय त्यांना घरच्या "रंभा" नावाच्या दासीकडून कळला. राम नामाविषयीं तेव्हांपासून जो जिव्हाळा लागून राहिला तो जीवनाला शेवटपर्यंत कर्णधाराप्रमाणें नेहमीं मार्गदर्शक ठरला. आईनें ईश्वराप्रीत्यर्थ उपवासादि तपस्या करावी, चांद्रायणादि कठोर व्रतें करावीं, नेहमी ईश्वर-भक्तीमध्यें तल्लीन असावें या गोष्टींचा मनावर खोल ठसा उमटला. निर्दोष, सात्विक उपवासानें जीवनांत असामान्य शांति प्राप्त होते हा हि एक सिद्धांत च होऊन बसला.

**तमेनं वेदानुवचनेंन ब्राह्मणा विविदिषन्ति**
**यज्ञेन दानेन तपसा अनाशकेन ।**

अनुक्रमणिका

उपवास हें ईश्वरप्राप्तींचे हि साधन होऊं शकतें. साधक मात्र अतिशय उच्च दर्जाचा असला पाहिजे. याची पुढील जीवनांत प्रतीति आली, त्याला या आईच्या उपवासांचें दृश्य च कारणीभूत झालें. सत्य आणि अहिंसा, भक्ति आणि तपस्या—या चार गोष्टींनी त्यांच्या जीवनाची घडण घडवली. लहानपणीं च त्यांना तुलशीरामायणाची गोडी लागली. वडील गीतेचा पाठ करीत. त्या गीतेचें प्रेम इतकें वाढलें कीं, त्या ग्रंथाला उत्तर आयुष्यांत नित्यपाठांत स्थान मिळालें. तो ग्रंथ म्हणजे आपला मार्गदर्शक, तो आपला वाटाड्या. इतकी त्याच्याशीं तन्मयता होऊन गेली. परंतु बालवयांत गीतेची फारशी ओळख होऊं शकली नाहीं. गीतेची ओळख होऊं शकली नाहीं, तरी भक्ति आणि तपस्या, अहिंसा आणि सत्य या गीतेंतल्या सारभूत गोष्टी चित्तावर ठसून गेल्या.

या गोष्टी नुसत्या हृदयांत उदित होण्याला च हजारों सद्‌गुणांचे कण एकत्रित व्हावे लागतात. या गोष्टींचा, या तत्त्वांचा विकास तर दूरच नुसतें ओझरतें दर्शन होण्याला हजारों जन्म खर्ची घालावे लागतात. यापैकीं कोणत्या तत्त्वासाठी कोणकोणते सद्‌गुण लागतात, याचें कांहीं गणित मांडता यावयाचें नाहीं. सत्पुरुषांच्या एकंदर हालचालीवरून च हें लक्षांत यावयाचें. संकोची वृत्ति असल्यामुळें लहानपणापासून अवाच्या सवा बोलण्याची त्यांना मुळीं च संवय नव्हती. इतकें च काय पण बोलणें अगदीं च कमीं असावयाचें. सत्यासाठीं मितभाषित्व हा गुण फार आवश्यक आहे. तो त्यांच्या ठिकाणीं लहानपणापासून च मुरलेला होता. 'सत्याय मितभाषिणाम्' हें रघुराजाचें वर्णन त्यांना तंतोतंत लागूं होत असे. सत्य-अहिंसादि तत्त्वांच्या रक्षणार्थ असे कोणकोणते गुण त्यांच्या ठिकाणीं आहेत किंवा होते हें सांगणें अतिशय कठीण आहे. त्यांचे मितभाषित्व, त्यांची दुःखितांविषयीं करुणा, त्यांचा तो अखंड चाललेला कर्मयोग—सतत परिश्रम, त्यांची अनासक्ति, त्यांचें आत्मपरिक्षण, एवढी त्रिखंड कीर्ति गाजत असून, जयजयकारानें वातावरण एकसारखें दुमदुमत असून अखंड टिकणारी निरभिमानता, परगुण-ग्रहणाकडे लागून राहिलेली नजर, सगळ्यांना समभावानें पाहणारें त्यांचे हृदय, अखंड सावध असून मुलांच्या घोळक्यांत बागडणारी त्यांची बालवृत्ति, त्याचा त्याग, त्यांचा आहारनिद्रेवर असलेला विलक्षण काबू, त्यांची क्षमावृत्ति, त्यांची व्रतकर्कशता, २१/२१ दिवस उपवास करून हि प्रफुल्ल कमळाप्रमाणें हास्ययुक्त असणारी त्यांची प्रसन्न मुद्रा—कोणकोणते गुण सांगावें? परमेश्वराचें वर्णन करतांना भक्ताची कशी अगदीं दिङ्‌मूढ अवस्था होऊन जाते! तो दयाधन म्हणावा का तो दीननाथ म्हणावा? का तो ज्ञानमूर्ति म्हणावा? त्याला नित्य, शुद्ध, बुद्ध म्हणावें का त्याला काय म्हणावें? त्याच्या गुणाला कांहीं पार आहे काय?

**हे प्रभु पूरणनाथ हमारे । कौन कौन गुण कहे तुम्हारे**?

असें म्हटल्याशिवाय शेंवटीं त्याला गत्यंतरच राहात नाहीं, तशी च स्थिति या ठिकाणीं होऊन जाते. जगांत कोणती हि गोष्ट एकाकी नाहीं. तिच्या आजूबाजूला, मागें, पुढें, खालीं, वर सर्वत्र त्या त्या गोष्टीचे सोबती, त्या त्या गोष्टीला अनुकूल अशा वस्तु पसरलेल्या असतात. प्रत्येक वस्तूंचें स्वतःचें असें एक निराळें च जग किंवा निदान कुटुंब तरी असतें च असते. त्या वस्तूला केंद्र करून इतर वस्तु त्या गोष्टीभोंवतीं फिरत राहतात. ही जर प्रत्येक सामान्य गोष्टीची स्थिति तर सत्य अहिंसेसारख्या परमोच्च तत्त्वांभोंवतीं कोणकोणत्या गोष्टींचा समूह फिरत असेल? या सत्यनारायणाभोंवतीं किती ग्रहमाला परिभ्रमण करीत असतील? हें कसें सांगणार? ऋषि तर म्हणतात.

**सत्ये सर्व प्रतिष्ठितम् ।**

अनुक्रमणिका

सर्व विश्व च सत्यावर अवलंबून आहे. त्याच्याभोंवतीं सर्व जीवन परिभ्रमण करीत आहे. ऋषींच्या या वचनाचा प्रत्यक्ष अनुभव येथें दिसून आला. क्रमाक्रमानें या ठिकाणचें सत्य सर्व जगाचें लक्ष वेधून घेऊं लागलें. आणि जगाच्या सर्व आशा अद्याप येथें च खिळून राहिल्या आहेत. हजारों वर्षांत असा पुरुष झाला नाहीं म्हणतात त्याचें कारण हें च.

पण अशी स्थिति असली तरी पुष्कळशा महापुरुषांना ज्या अग्निदिव्यांतून जावें लागतें, त्या मोहमय मनोवृत्तीच्या तडाख्यांत या हि महापुरुषाला अनेक वेळां सांपडावें लागलें होतें. सत्याचा मार्ग तसें पाहिलें तर अगदीं सरळ आहे. त्याच्यामध्यें वळणें-वांकणें, आडरस्ते मुळीं च नाहींत. चुकण्याची भीति च नको. परंतु हा मार्ग सरळ असून हि कठीण आहें.

**दुर्ग पथस्तत्कवयो वदन्ति**

हा मार्ग जेवढा सरळ तेवढा च दुर्गम मार्ग आहे.

**क्षुरस्य धारा निशिता दुरत्यया**

वस्तऱ्याच्या तीक्ष्ण धारेवरून चालण्याचा हा रस्ता आहे. बुद्धाला या रस्यानें जाता जातां मारसेनेनें अडवलें होतें. ख्रिस्ताचा मार्ग हि असा च सैतानानें रोखून ठेविला होता. पण या दोन्ही महापुरुषांपुढें मारसेना आणि सैतान यांचें कांहीं चालूं शकलें नाहीं. शंकरानें ज्याप्रमाणें त्रिनेत्र उघडून मदनाचें क्षणार्धांत भस्म करून टाकलें त्याप्रमाणें जरी नाहीं तरी हळूंहळूं मोहाच्या तडाक्यांतून या महापुरुषानें हि आपली सुटका करून घेतली.

इंग्रजी शिक्षणामुळें 'मांस खाल्ल्यानें शरीर सुदृढ होईल' हा विचार त्या वेळीं अनेकांच्या मनांत बद्धमूल झाला होता. तो विचार—विचार कसला अविचार—येथें हि प्रवेश करूं शकला. आपलें हिंदुस्थान गुलाम कां? तर मांशासन वर्ज्य म्हणून. ही विचार-सरणी अजून हि कित्येकांच्या मनांत घर करून राहिली आहे. मांस खावयाचें—पुन्हां तें लहान मुलानें खावयाचें—वैष्णव कुटुंबातल्या मुलानें खावयाचें—धर्मासाठीं रात्रंदिवस उपासतापास करणाऱ्या आईच्या मुलानें खावयाचें ही गोष्ट काय उघड तऱ्हेनें होणें शक्य होतें? नाही.' गुप्त तऱ्हेनें—चोरून जरी त्या पदार्थाची किळस येई तरी बळें बळ च ती गोष्ट करावी लागली. अहिंसा-सत्याचा जगावर प्रकाश पाडणाऱ्या या असामान्य महापुरुषाच्या जीवनांत अगदीं बालपणीं असत्य आणि हिंसा यांना वश होण्याचा प्रसंग आला, हा विलक्षण योगायोग म्हटला पाहिजे! स्वर्गामध्यें धर्मराज गेल्यावर त्याला महाभारतकारांनीं क्षणभर नर्काचें दर्शन करविलें तशी च हीं गोष्ट घडली. हजारों वर्षांची तपस्या या निरामिष आहाराच्या पाठीमागें आहे. भारतीय संस्कृतीचा हा आहार-प्रयोग म्हणजे कांहीं सामान्य गोष्ट नाहीं. चार अक्षरें शिकलीं कीं झालें सर्व ज्ञान. युरोपियन लोक खातात मांस मग आपल्याला हि काय हरकत आहे, हा विचार बरोबर नाहीं. हें कांहीं त्यावेळीं लक्ष्यांत आलें नाहीं. पण आई-बापांना फसवून मांस खाणें रुचेना म्हणून तें बंद केलें.

इंग्रजी शिक्षणपद्धतीनें असे अनेक कुसंस्कार चित्तावर उमटत असत. 'मी जर हें शिक्षण मुळीं च घेतलें नसतें तर आज कोठच्या कोठें निघून गेलों असतों', अशासारखे उद्‌गार पुढें काढण्यांत आले त्याचे तरी कारण हें असें च असलें पाहिजे. पण त्या वेळीं ही कल्पना कोठें होती? इंग्रजी शिक्षण तर घेतलें च पण

येथें च न थांबतां विलायतेला जाण्याची हि तयारी केली. पण ती गोष्ट आईला रुचेना. कशी रुचणार? आपल्या स्वतःपासून दूर, हा आपला मुलगा असा आपल्यापासून दूर जाऊन आपल्याला अगदीं पारखा होईल. तो मोठा बॅरिस्टर होईल. तो पैशांचे ढीग पाडील पण उपयोग काय? तो अशाच्या असा च परत येईल तेव्हां ना. तेथें विलायतेंत तो दारू तर पिणार नाहीं? तो परस्त्रीच्या पाशांत तर पडणार नाहीं? आणि मांसाशन तर तेथें सर्रास चालतें. त्या माउलीच्या मनाची अशी एकदम चलबिचल होऊन गेली. आपला मुलगा गरिबींत राहिलेला, अशिक्षित राहिलेला, मान-मान्यताहीन राहिलेला तिला चालत होता, पण नीतिहीन मुलाची कल्पना तिला असह्य होती. केवढी त्या मातेची थोरवी! तिनें विलायतला जाण्याला साफ नकार दिला. वस्तुतः हा विलायतेला जाण्याला नकार नव्हता; तर हा स्वैर वातावरणांत जाण्याला नकार होता. अमेरिकेंत जा कीं विलायतेंत जा, दूर असा कीं, जवळ असा, पण सदोदित नीतीमध्यें च तुमचें वास्तव्य असूं द्या. राजाच्या महालांत मनुष्य गेला काय किंवा झोंपडींत गेला काय, ती बाह्य उपाधिं झाली. मनुष्य कुठें हि जावो तो राहतो आपल्या देहांत च. त्याप्रमाणें, कुठें गेलों तरी नीतीमध्यें च आपला वास असावा या तिच्या म्हणण्याचा शेंवटीं जय होऊन या महापुरुषाकडून तशी प्रतिज्ञा घेववली. मग विलायतेस प्रयाण केलें गेलें. ती प्रतिज्ञा म्हणजे मातेनें बालकाला दिलेलें अभेद्य कवच च होतें. जा, माझ्या मुला तूं कोठें हि जा. या प्रतिज्ञेचें हें कवच तुला दिलें आहे. तूं आतां जग जिंकशील. तुला आतां कोठें हि भीति नाहीं. आईच्या निमित्तानें भारतमातेनें च जणूं या बालकाला हा जातांना संदेश दिला असावा काय अशी कल्पना जर कोणी केली तर ती अयथार्थ मानण्याचें कांहीं कारण नाहीं. हे वज्रकवच आईनें जर दिलें नसतें तर केवढा अनर्थ झाला असता, मांसाशनाची येथें सुरवात झालेली च होतीं. एकदां तर मित्राच्या संगतीनें वेश्येकडे जाण्याचा प्रसंग आला. वृत्ति अगदीं संकोची असल्यामुळें तेथें कांहीं अतिप्रसंग घडला नाहीं. तथापि त्या वेळीं तरी आपण नामर्द आहोंत अशा प्रकारची लाज वाटू लागली होती. यावरून जर आईनें हें कवच दिलें नसतें तर—हा प्रश्न सहज च डोळ्यापुढें उभा राहतो. ईश्वरी कृपा अपार आहे. तो महापुरुषांना निमित्तमात्र करण्यासाठीं, लोकांना आधार देण्यासाठीं अनेक घटना घडवीत असतो. त्यानें च ही प्रतिज्ञेची घटना घडविली आणि अशा महापुरुषाला वेश्यादींचें दर्शन हि अगदीं बालवयांत त्यांनें च करविलें, असें हि म्हणण्यास काय हरकत आहे? जगताला मार्ग दाखविणाऱ्या या महापुरुषाला जगताचें शुभाशुभ स्वरूप पूर्णपणें माहीत असावें या च हेंतूनें या घटना त्यानें घडविल्या, असें अनुमान करण्यास जागा आहे. हें सर्व जग विषयाच्या विषमय वातावरणानें दूषित झालेलें आहे त्याच्या उद्धारासाठीं कारुण्यपूर्ण दृष्टीची जरूर आहे, पण विषयाचा स्पर्श च नसेल तर कदाचित ही करुणा अंतःकरणांत उदित होणार नाहीं म्हणून च कीं काय बालपणीं च विवाहादि विषयांत ईश्वरानें या महापुरुषाला बद्ध करून ठेवलें असावें! हे केवल मनाचे तरंग आहेत. ईश्वरी हेतु कोण सांगणार?

विलायतेंत इतक्या लहानपणीं लग्न करीत नाहींत. त्यामुळें तेथें गेल्यावर आपण अविवाहित आहोंत असें हि कांहीं दिवस भासविलें, पण हि गोष्ट बरोबर नाहीं हें तेव्हां च लक्षांत येऊन मग त्याप्रमाणें धैर्यपूर्वक सरळ सर्वांना सांगण्याचा क्रम ठरविला. विलायतेच्या त्या कृत्रिम वातावरणांत या संकोची मुलाचा किती कोंडमारा झाला असेल याची कल्पना च केलेली बरी. तेथला पोषाख, तेथलें खाणें, तेथली राहणी, तेथली बकाल वस्ती — हें सर्व कांहीं मानवलें नाहीं. शहरी संस्कृतीच्या विरुद्ध मनोवृत्ति तयार होण्याला हें विलायतचें वास्तव्य हि कारणीभूत झालें असलें पाहिजे. तरी पण मोहमय मनोवृत्तीचा पगडा हि मधून मधून हृदयावर बसे. नाच-गाण्याचे धडे या च मनोवृत्तीत गिरवलें. या च मनोवृत्तीत अंड्यांचा आहार निरामिष आहार आहे अशी एक प्रकारची वंचना करून घेतली गेली. पण अशा मोहांत हि, एकटे असून कोणी डोक्यावर नसतां स्वतःच्या केवळ विवेकबळावर विद्यार्थीदशा अत्यंत साधेपणानें पार पडली. स्वतः

स्वयंपाक करावा, कमींत कमी खर्चांत रहावें, मीठ-मसाले वगैरे चवीच्या पदार्थांचा उपयोग कमी करण्याचा प्रयत्न करावा, अभ्यास शक्य तितक्या कसोशीनें करण्याचा प्रयत्न असावा, अशा साधनेचा हा काळ होता.

**सदा सेवि आरण्य तारुण्यकाळीं ।**
**मिळेना कंदा कल्पनेचे न मेळी ॥**

ही वृत्ति त्या लंडनसारख्या शहरांत खरोखर दुर्मिळ होती! त्या घटोत्कची मायेच्या बाजारांत हा सत्त्वगुणी विद्यार्थी नकळतपणें पुढील असामान्य जीवनाची तयारी करीत होता. गीतेंतील स्थितप्रज्ञाच्या प्रकरणावर या च वेळीं चित्त वेधून गेलें. हें प्रकरण पुढें जीवनाचा आदर्श ठरलें. धर्मासंबंधी विचाराला हि सुरवात झाली. अशा या विद्यार्थ्याच्या साध्या राहणीवर त्याच्या एकांगीं—अगदीं एकमार्गी जीवनावर अनेक प्रकारचे प्रहार केले गेले, पण स्वतःचें सत्त्व सोडलें नाहीं. नम्रपणें आपला मार्ग आचरण्याचें बिनधोकपणें चालूं ठेविलें.

हा विभाग संपला. बॅरिस्टरची परीक्षा हि पास झाली. हिंदुस्थानांत आगमन झालें. ताबडतोब 'ततःकिं' चा प्रश्न दत्त म्हणून पुढें उभा राहिला. बॅरिस्टरची परीक्षा पास झाली खरी परंतु कायदे पंडितांची वाचाळ पंचविशी कांहीं अंगांत मुरली नाहीं. विलायतची वारी केली खरी, जगांतल्या मोठ्यातल्या मोठ्या शहरांत वास्तव्य झालें पण कोरडेच्या कोरडे च!

गांवढळ शेतकऱ्यांचा हा प्रतिनिधि कोर्टात कायद्याचा कीस काढून केसेस लढवूं शकला नाहीं. त्याची भर कोर्टात फजिती झाली. हा बॅरिस्टर झाला पण अंगांत शेतकरीपणा च मुरलेला होता. तुमचा धंदा कोणता म्हणून ज्या ज्या वेळेला जज्जाकडून विचारण्यांत आलें, सार्वजनिक सेवेचें फळ म्हणून राजद्रोहाचा छाप जेव्हां जेव्हां पडला, त्या वेळीं—'शेती आणि विणकाम' हें जे उत्तर दिलें गेलें ते अगदीं खरें होतें. वरून बॅरिस्टर पण आंतून खेडवळ अशी ही स्थिति होती. तुकाराममहाराजांनीं म्हटल्याप्रमाणे ।

**मूळ स्वभाव जाईना । त्याचें भजन राहिना ।**

ही गोष्ट उघड झाली. मुंबईला भर कोर्टात अशी फजिती झाल्यावर मुंबईला वकीलीचा धंदा करणे शक्य च नव्हत.

नंतर कांहीं दिवस राजकोटला अर्ज लिहिण्याच्या कामांत काढले. परंतु जगांतल्या फसवा फसवीच्या व्यवहारांचा अनुभव येण्यापलीकडे विशेष कांहीं लभ्यांश झाला नाहीं. विलायतेहून आल्यापासून आतांपर्यंत कार्योत्साहाचा लाभ मिळाला च नाहीं. वडील विलायतेला जाण्यापूर्वीच वारले होते. आई विलायतेला असतांना च वारली. हिंदुस्थानांत पाय ठेवल्याबरोबर आईच्या मृत्यूची हकीकत कळली.

अशी प्रथम सुरवात उदासीनतेपासून झाली. नाहीं म्हणण्याला राजचंद्रांचा मुंबईला सहवास झाला; त्याच्या योगानें जीवनाला भरपूर पाथेय मिळालें. स्व. राजचंद्र एक उच्च कोटीचे साधक असून मुंबईच्या जवाहिऱ्याच्या व्यापारांत काम करीत. परंतु त्यांच्या जीवनाचें ध्येय निराळे च होतें.

**हसतां रमतां प्रकट हरि देखुं रे ।**
**मम जीवन सफल तव लेखुं रे ।**

अनुक्रमणिका

**मुक्तानंद नो नाथ विहारी रे ।**
**ओधा जीवनदोरी अमारी रे ॥**

हें त्यांच्या जीवनाचें सर्वत्र भगवद्दर्शन करण्याचें सूत्रवाक्य होतें. पुढें गोखले, रस्किन, टॉलस्टॉय इत्यादि थोर पुरुषांचा जीवनावर पुष्कळ परिणाम झाला. पण धार्मिकदृष्ट्या राजचंद्रांचा परिणाम अधिक प्रभावी ठरला.

इतक्यांत एकाएकीं आफ्रिकेंत एका मुसलमान व्यापाऱ्याच्या खटल्यासाठीं जाण्याची संधि मिळाली. ही गोष्ट एक सामान्य च गोष्ट होती. पण असामान्य कर्तृत्वाचा प्रारंभ करून देण्याला महाद्वाराप्रमाणें ती महत्त्वाची ठरली. मारवाडच्या रुक्ष प्रदेशांतून प्रवास करतां करतां एकदम माळव्याच्या मनोहर प्रदेशाचें दर्शन घडावें, त्याप्रमाणें आफ्रिकेंत गेल्याबरोबर एका नवीन जगाचें—एका प्रचंड कार्यक्षेत्राचें दर्शन झालें. आणि त्या क्षेत्रांत एकाद्या कुशल माळ्याप्रमाणें अनेक प्रयोगांचे, अनेक कार्यांचे बागबगीचे फुलविण्यांत आले. अद्वितीय यशाचे गुच्छ त्याठिकाणीं डुलू लागलें. हा पुरुष तेथें गेला आणि एकदम आफ्रिका खंडांत हिंदी लोकांत चैतन्याचें वारें खेळूं लागले. लढवय्यांना सेनापति मिळाला. साधकांना गुरु भेटला, विद्यार्थ्यांना शिक्षक, बालकांना बाप आणि आर्त स्त्रियांना कृष्णासारखा बंधु प्राप्त झाला. श्रीकृष्णाभोंवतीं गोपाळांचा मेळा, रामचंद्राभोंवतीं वानरांचें सैन्य, तसे ते तेथले सर्व लोक या पुरुषाभोंवतीं गोळा झाले. आफ्रिकेंतल्या अनुभवाला सीमा राहिलीं नाहीं. बालसूर्याचें किरण सूर्याचा प्रकाश उत्कृष्ट तऱ्हेनें पाडतात च, पण तो वर जसजसा चढतो, तसतसा त्याचा प्रकाश जसा उत्तरोत्तर वरचढ होत जातो, त्याप्रमाणें आतांपर्यंतच्या जीवनांत पुष्कळ च बोधप्रकाश भरलेला होता. हें खरें च, पण आतां आफ्रिकेंतल्या प्रवेशाबरोबर सूर्य उत्तरोत्तर वरचढ तेजानें तळपूं लागला. मागच्या पेक्षां पुढची कृति जास्त जास्त स्पष्ट, जास्त जास्त प्रभावी, जास्त जास्त शुद्ध आणि बोधमय ठरूं लागली. एकट्या पडलेल्या सेनापतीला सैन्य-दर्शनानें जो आत्मविश्वास वाटतो किंवा शेतकऱ्याला उत्कृष्ट भूमि पाहून जो आनंद होतो, तीच स्थिति येथल्या कार्यक्षेत्रांत प्रवेश केल्याबरोबर अनुभवास आली. हिंदुस्थानांत चरितार्थ चालविण्याच्या चिंतेंत असणारा हा मनुष्य येथें एकदम इतका प्रभावी कसा ठरला? ह्याचें उत्तर काय देणार? प्रत्यक्ष ६०० लढाया लढून युद्धशास्त्राचा आचार्य ठरलेला नेपोलियन सुद्धां चरितार्थाच्या चिंतेनें आत्महत्त्येपर्यंत पोंचला नव्हता काय? गजांत लक्ष्मी ज्याच्या दाराशीं झुलत असे, त्या राजाधिराज बादशहाची अशी स्थिति कां होती? विवेकानंदांना हि चरितार्थाच्या चिंतेनें भटकवलें नव्हतें काय? जगद्धर्मपरिषदेंतला हा गाजलेला वक्ता पोटासाठीं कलकत्त्याला दारोंदार सकाळपासून संध्याकाळ पावेतों भटकत असे. महापुरुषांची विद्या ही पोट भरण्यासाठीं नसते च!

**पोट भरावयाची विद्या । हीस म्हणो नये विद्या**

हें समर्थ वचन त्यांच्या विद्येला पूर्णपणें लागू पडतें. ज्याप्रमाणें पराग, पाच, वैडूर्य, नीळ इत्यादि रत्नें देऊन बाजारांतली साधी भाजी घेऊं म्हटलें तर तो व्यवहार होणार नाहीं, किंवा जवळ हजाराची नोट असून सुद्धां खेड्यापाड्यांत पैशाचे फुटाणे फाकण्यासाठीं सुद्धां तिचा उपयोग होत नाहीं. त्याप्रमाणें महापुरुषांची व्यवहारासंबंधींची गोष्ट असते. ज्या अभंगवाणीनें महाराष्ट्राला वेड लावलें, त्या तिच्या कर्त्याला कोरडी भाकर सुद्धां वेळेवर मिळत नसें. महापुरुषांचें सामान्य व्यवहारांतलें अपशय हि त्यांच्या पुढील असामान्य यशाची प्रस्तावना च असते. येथे हि ही च स्थिति होती. म्हणून हिंदुस्थांनांत चरितार्याच्या चिंतेंत असणारा हा पुरुष आफ्रिकेंत आल्यावर राष्ट्राच्या चरितार्थाचे प्रश्न सोडवूं लागला. ही कांहीं यक्षिणीची कांडी नव्हे.

ही गोष्ट पुष्कळ असामान्य पुरुषांच्या आयुष्यांत घडणारी अशी नित्याची च घटना आहे. याचा अर्थ असा नव्हे कीं, आफ्रिकेंतील मार्ग अगदीं सुरळीत होता; किंवा गुलाबी पायघड्या या रस्यावर पसरलेल्या होत्या. उलट येथल्या अडचणींना तर पार नव्हता. जाणून बुजून हा परदेश होता. त्यांत अनोळखी स्थिति. येथें सर्व च संशयी मुद्रेनें पाहात. येथें प्रतिक्षणीं काळ्या गोऱ्याचा भेद. न्याय अन्यायाचा मुळींच विचार नाहीं. आगगाडींत, कोर्टांत, रस्त्यांत या भेदाचा अडथळा उभा राही. नाना प्रकारचे अपमान सहन करावे लागत. येथें एकामागून एक असे अडचणींचे डोंगर उभे राहिले. परंतु प्रत्येक अडचणीला उल्लंघून जाण्याचें धैर्य हि ईश्वराकडून मिळत गेलें. आणि पाणी ज्याप्रमाणें समोरचा खड्डा भरल्याशिवाय पुढें जात नाहीं, त्याप्रमाणें आलेली अडचण मग ती स्वतःची असो कीं, परक्याची असो दूर केल्याशिवाय रहावयाचें च नाहीं. या धोरणामुळें आफ्रिकेंतलें वास्तव्य एक सारखें वाढत च गेलें. एकसारखें अडचणींशीं लढत च रहावें लागलें. आणि या रात्रंदिवस चाललेल्यां लढ्यांत विजयावर विजय मिळत गेले.

परंतु विजयापूर्वी हि पराजयाचा हि अनुभव येथें आला नाहीं असें नाहीं. आफ्रिकेच्या प्रवासांत च हा पराजयाचा प्रसंग आला. बोटीवर कप्तानाची चांगली ओळख झाली. बंदर लागल्याबरोबर कप्तानानें स्वतःबरोबर एका हबशी वेश्येकडे नेलें. मित्रसेवेची त्याची अशी विचित्र कल्पना होती. तेथें अनाचार घडणे शक्य च नव्हतें. परंतु मी ह्या ठिकाणी प्रवेश करू शकत नाहीं, असा खडखडीत जबाब द्यावयास पाहिजे होता. पण तेजाच्या अभावी हें घडूं शकलें नाहीं. मागून ही टोचणी मनाला लागून राहिली—खरोखर हा पराजय च होता.

यानंतर डरबनमध्यें प्रवेश केला. तेथें ज्यांचे वकीलीचें काम मिळालें होतें ते मुसलमान शेट भेटले. त्यांच्याशीं मुसलमानी धर्माची पुष्कळ चर्चा होई—

**भाजन भेद कहावत नाना ।**
**एक—मृतिका रुप री ॥**

हा अनुभव आतां येऊं लागला. धर्म निराळा असो, पण सर्वत्र आपल्या धर्माप्रमाणें च उच्च पारमार्थिक विचार भरलेले आहेत याची प्रतीति येऊं लागली. हिंदु, मुसलमान, पारशी, ख्रिस्ती, जैन, बौद्ध सर्वांच्या ऐक्यमय संस्कृतीचा अगदीं सहजानुभव येथें मुरून गेला. त्यांतल्या त्यांत हिंदुस्थानांतील हिंदु व मुसलमान या प्रमुख धर्माच्या ऐक्याची कल्पना या संवादांमधून सहज च परिणत झाली.

पण दक्षिण आफ्रिकेंतला मुख्य प्रश्न हिंदु-मुसलमानांचा नसून काळ्या-गोऱ्यांचा होता. याचा हि अनुभव लवकर च आला. डरबानच्या कोर्टात गेल्याबरोबर मॅजिस्ट्रेटनें पगडी उतरण्यास सांगितली. कारण हा बॅरिस्टर असेल पण काळा, हलका, चामडी निराळी, अशी समजूत. हा अपमान सहन केला नाहीं. तत्क्षणी कोर्ट सोडून बाहेरचा रस्ता धरला. वर्तमानपत्रांत पगडी संबंधीच्या हकीकतीचा लेख लिहिला. चोहोंकडे एकदम खळबळ उडाली:

**सर्वेषु गात्रेषु शिरः प्रधानम् ।**

अनुक्रमणिका

अशा त्या डोक्यावरचें शिरोभूषण विनाकारण उतरण्यास सांगणे म्हणजे मनुष्यत्वाचा च अपमान. केवळ काळ्या हिंदी लोकांचा अपमान नव्हे. अशी ही वृत्ति होती. या अपमानांची येथें एक सारखी परंपराच अनुभवावयाची होती. त्या परंपरेंतून अनेक गोष्टी शिकवावयाच्या होत्या.

**आपणांस जें जें ठावें । तें तें दुसऱ्यास शिकवावें ।**
**शहाणे करुनी सोडावे । सकळ जन ॥**

ही वृत्ति येथें स्वभावतः च वसत होती. पण या वृत्तीला हि मूळभूत आणि दुर्मिळ अशी गोष्ट म्हणजे लोकांना शिकविण्याच्या आधीं आपण लोकांकडून एकसारखा बोध घेत जावयाचा. हें विश्व केवळ बोधाच्या शोधासाठींच आहे, केवळ शिष्य भावाने शिकण्यासाठी आहे, ही वृत्ति येथें प्रकट होऊं लागली. जो स्वतः शिकूं शकत नाहीं तो दुसऱ्याला काय शिकविणार? आपल्या रणधुरंधरतेची आठवण पूर्णपणें विसरून नेपोलियन बोनापार्ट स्वयंपाक शिकण्यासाठी निःशंकपणें भटाऱ्याच्या दुकानांत जाई. नेपोलियन बोनापार्टप्रमाणें च परंतु आध्यात्मिक तत्त्वांवर असंख्य उलाढाली करणारा हा पुरुष हि साध्या साध्या गोष्टी येथें शिकूं लागला. बॅरिस्टर होऊन हि जमाखर्च माहीत नाहीं. पी. नोट म्हणजे काय?—प्रामिसरी नोट. ही साधी गोष्ट हि मोठेपणाचा मान सोडून कारकुनाकडून समजून घेतली. ज्याला ज्ञान पाहिजे त्यानें लहान झालें पाहिजे. मान सोडला पाहिजे. मोठेपणाला ज्ञान कोठलें?

**लहानपण दे गा देवा । मुंगी साखरे चा रवा**
**ऐरावती रत्न थोर । त्यासि अंकुशाचा मार**

ही तुकोबांची उक्ति काय खोटी ठरेल?

या ज्ञानसंशोधक वृत्तीमुळें इतर वकीलांचा स्वार्थीपणा येथें मुळांत च नव्हता. नसते कज्जे लावून आपल्या पोळीवर तूप ओढण्याची गोष्ट तर दूर च, पण असलेले दीर्घकालीन तंटे मिटवून, दिलजमाईनें पैसा, वेळ आणि बुद्धि शक्ति वांचविण्याची खरी सद्बुद्धि येथें प्रथम पासून च प्रकट झाली.

**जरी मैत्रें चि वैरी मरे । तरी वायां कां बांधावे कटारे**
**रोग जाय दुध साखरे । तरी निंब कां पियावा?**

मैत्रीनें स्वाभाविकपणें च तंटे मिटतात मग त्या मैत्रीचा आश्रय कां करूं नये? या विचारसरणींनें—"आपापसांत तंटा मिटविण्याचा मी शक्य तों प्रयत्न करीन" असें आपल्या मुसलमान अशिलाला सांगतां च तो चपापला.

बिचाऱ्याला जगाच्या खोट्या रहाटीला सोडून सत्याच्या खऱ्या रहाटीनें वागणाऱ्या वृत्तीची ओळख कोठून असणार? हजारों आंधळ्यांत एखादा डोळस मूर्ख ठरतो. तसेंच त्याचें हि झाल्यास नवल काय? पण सत्य कधीं हि लपत नाहीं, तें पुढें या मुसलमान अशीलाला च काय पण सर्व जगाला स्वच्छपणें दिसून आलें. कारण या ठिकाणीं नुसतें सत्य नसून सत्याचा आग्रह होता. नुसतें सत्य तर अव्यक्तरूपाने सर्वत्र भरलेलें च आहे. ते असत्यांत हि आहे. असत्याला हि सत्याचें च अधिष्ठान लागतें. त्याशिवाय तें टिकूं च शकत नाहीं. सत्य म्हणजे नुसतें खरे बोलणें नव्हें. सत्य हें ईश्वराप्रमाणें अनंतस्वरूपीं आहे. किंबहुना सत्य

म्हणजे च ईश्वर. ईश्वर सत्य आहे हें येथलें प्रथम दर्शन. सत्य हा च ईश्वर आहे हा अंतिम साक्षात्कार होय. नैतिक-भौतिक-तात्विक-सत्याच्या स्वरूपाला पार नाहीं. त्याची सुरवात नैतिकतेपासून होते. त्याचा अंत कोठे होतो? त्याची सीमा कोणची? त्याला सीमा च नाहीं. त्याचा अंत च नाहीं. कारण सत्य म्हणजे अनंत आकाशासारखी उच्चस्थिति आहे. मनुष्य पडून पडून पडला तर कोठें पडेल? पृथ्वीवर, खोल खड्ड्यांत, समुद्रांत, आणखी तो कोठे जाणार? पतनाला अंत आहे, पण उन्नतीला अंत नाहीं. आकाशांत मनुष्य वर वर चढत गेला तर, बाबिलोन मधल्या लोकांप्रमाणे तो जर वर वर मजले बांधित गेला तर, बायबलमध्यें लिहिलें आहे स्वर्गांतल्या देवांना भीति वाटली कीं, हे बाबिलोनमधले लोक येतील आपल्या येथें स्वर्ग बिघडून टाकण्याला. तशी वस्तुस्थिति नाहीं. आकाशांत किती हि उंच चढत गेलें तरी त्याला अंत च नाहीं.

**सत्यं ज्ञानमनंतं ब्रह्म ।**

—असें सत्याचें विशाल स्वरूप आहे. त्या सत्याचा आग्रह म्हणजे स्वतः सत्य ग्रहण करावयाचें आणि आत्मवत् सर्व मानून सर्वांकडून त्याचें ग्रहण करवावयाचें. हें करीत असतां कोणाला हि यत्किंचित् हि त्रास होऊं द्यावयाचा नाहीं. स्वतः सर्व क्लेश सहन करावयाचे.

असा तो सत्याग्रहाचा प्रसंग आला. अशीलाच्या कामासाठीं डरबनहून प्रिटोरियाला जावयाचें होतें. पहिल्या वर्गाचें टिकीट घेतलें. टिकीट पहिल्या वर्गाचें असलें तरी पहिल्या वर्गांत काळा मनुष्य बसलेला गोरा माणूस सहन कसा करणार? गार्ड हि गोरा च. तक्रार झाली. पण जबरदस्तीनें सामानासकट मध्यें च फेंकलें जाण्याखेरीज दाद लागली नाहीं. ऑफ्रिकेंत हें असें नेहमीं होईल तर निभाव कसा लागेल हा विचार क्षणभर मनांत आला हिंदुस्थानांत परत जावें असें वाटलें. पण लगे च निश्चय केला, नाहीं, हें वर्णविद्वेषाचें बीज काढून टाकल्याशिवाय मागें पाऊल घ्यावयाचें नाहीं. या च प्रवासांत पुन्हां एकदां तो च प्रसंग आला. या प्रसंगीं गोरा गार्ड गाडींतून उतरवूं लागला तरी गोऱ्या प्रवाशानें यांचा बचाव केला. याच्या आधीं या च प्रवासांतला शिग्रामांत बसण्याचा प्रसंग मात्र अतिशय करुणास्पद होता. एका गोऱ्या गृहस्थाला यांच्या जागेवर बसण्याची व विडी पिण्याची लहर लागली. उर्मटपणें तो या काळ्या कुलीला हुकूम करूं लागला. सत्य म्हणजे दैवी संपत्तीचा पहिला गुण 'अभय'. त्या अभय वृत्तीनें त्याच्या उर्मटपणाला तोंड दिलें. ताबडतोब त्या गोऱ्या माणसानें या बिचाऱ्या निरपराध, अजाण परदेशस्थ माणसाच्या अंगावर अमानुष हल्ला केला. पण मेलों तरी बेहेत्तर पण आपली जागा सोडावयाची नाहीं, या निर्धारामुळें त्याचें कांहीं चाललें नाही. दुसरे उतारू मध्यें पडले. हें प्रकरण मग थोडक्यांत संपले. सत्याग्रहांतल्या आत्मक्लेशाच्या विभागाची ही पहिली सलामी च येथें झडली असें म्हणण्यास हरकत नाहीं.

प्रिटोरियाला गेल्यानंतर पुष्कळ लोकांच्या ओळखी झाल्या. विशेषतः धर्मप्रवृत्तीच्या लोकांच्या ओळखी होऊन त्यांच्याकडून मिळालेल्या निरनिराळ्या धार्मिक पुस्तकांचे वाचन आणि चर्चा होऊं लागली. मनुष्य ज्या मार्गांतला असेल त्या मार्गांतल्या संगतींत तो स्वाभाविकपणें च पडतो. सत्संग किंवा दुस्संग हा स्वतःवर अवलंबून आहे. किंबहुना तो स्वतःचें च प्रतिबिंब आहे. स्वतःचे तोंड वेडेंवांकडें आहे म्हणून आरशावर रागावण्यांत काय अर्थ? आरसा असेल तें च दाखविणार. त्याप्रमाणें मला वाईट संगतींत राहावें लागतें या तक्रारींत काय अर्थ आहे? मी वाईट म्हणून माझ्या भोंवतीं वाईट लोक जमा होतात. गवयाभोंवतीं गवई, चित्रकाराभोवतीं चित्रकार, कवीभोंवतीं कवी, असा च समूह जमावयाचा. जो जसा असेल तशी त्याच्या भोंवती दुनिया पैदा होते. येथें मूलतः च धर्म प्रवृत्तीचा अंतःप्रवाह वाहत होता. त्यामुळें धार्मिक प्रवृत्तीच्या लोकांशी संबंध जडत गेला यांत आश्चर्य कसलें?

अनुक्रमणिका

परंतु ही सर्व मंडळी जरी धार्मिक प्रवृत्तीची होती तरी ती ख्रिस्ती धर्मांतली मंडळी होती. आणि धर्मासंबंधीच्या त्यांच्या समजुती पुष्कळशा पुस्तकी, ऐकीव आणि अनुदार वृत्तीच्या होत्या. धार्मिक जरी झाला तरी शुद्ध ज्ञान त्याच्या ठिकाणी मिळेल च असें नाहीं. ज्ञानाच्या सिद्धीसाठीं आत्माच्या शुद्धीची आवश्यकता आहे. ही शुद्धि अनेक जन्मांनीं लाभावयाची, तेथें पुस्तकांच्या पठनपाठनाचें काय चालणार? त्यामुळें या ख्रिस्ती धर्मी स्नेह्यांनीं पुष्कळ पुस्तकें वाचावयास दिली. आणि नाना तऱ्हेनें चर्चा केली तरी त्यांचे म्हणणें पटूं शकलें नाहीं. कारण धर्मांचें मूलतत्त्व जें येथें अनेक जन्मांच्या अनुभवानें अंतःकरणांत उत्स्फूर्त झालें होतें तें त्यांच्या आकलनांत हि येऊं शकत नव्हतें. खरा धर्म जर कोणता असेल तर तो ख्रिस्ती धर्म. इतर धर्म खोटे. पापांतून सुटका व्हायची असेल तर ख्रिस्ती धर्म स्वीकारल्याशिवाय गत्यंतर नाहीं. या त्यांच्या आकुंचित कल्पना येथें कशा पटाव्या? माझा धर्म चांगला. कां? तर तो माझा आहे म्हणून. ही काय सत्यदृष्टि झाली? ही तर अहंकाराची दृष्टि झाली.

**दैवी ह्येषा गुणमयी मम माया दुरत्यया ।**

खरोखर 'ममत्व' ही च माया आहे. अहंकारापासून च ज्यांनें सुरुवात केली तो तरणार कसा? त्यानें प्रथम च तळ गांठला. म्हणून ईश्वराची कास धरली पाहिजे. ममत्व जाऊन समत्व लाभलें पाहिजे. ती सर्व धर्मसमत्वाची भूमिका या मित्रांची नव्हती. त्यामुळें त्यांचे म्हणणें कांहीं केल्या पटूं शकलें नाहीं. गळ्यांत तुळशीची माळ होती. ती पाहून त्या गोऱ्या स्नेह्यांना येथल्या अज्ञानाची मोठी कींव येई. त्यांना वाटे हें खूळ आहे. पण तें खूळ नव्हतें. ती मातोश्रींनीं गळ्यांत घातलेली माळ होती. तें आपल्या पुत्राला माळेच्या मिषानें दिलेलें अभेद्य धर्म कवच होतें. नाहीं तर त्या माळेंत काय आहे? केवळ तुळशीचीं लांकडें आणि सूत एवढें कां येथें समजत नव्हते? पण नाही. ती माळा, साधारण माळा नव्हती. तें प्रतीक होतें. त्याच्या पाठीमागें अनंत कल्पना भरलेल्या होत्या. मोठ्या आकड्यांना संक्षेप रूप द्यावें त्याप्रमाणें देवाला संक्षेप रूप देऊन सुट-सुटीत मूर्तिरूपानें पुढें मांडण्याची हिंदु-धर्मांतली ती मूर्ति-पूजेची कल्पना होती. आपल्याला देवानें मूर्ति करून ठेवलें आहे तर त्याला हि आपण मूर्ति करूं. त्याला अगदीं आपल्यासारखा बनवून त्याच्याशीं सलगी करूं, अशी मूर्ति-पूजेची अतिशय रमणीय कल्पना त्या माळेंत केंद्रित झालेली होती. त्यामुळें ती माळ आपोआप तुटेल तर तुटो पण ती आपणहून तोडावयाची नाहीं. मूर्ती-पूजा नसेल करावयाची तर केली च पाहिजे असें नाहीं. परंतु मूर्तीभंग करतां कामा नये, या थोर तत्त्वाचा येथें या बाबतींत अवलंब केला. काय आश्चर्य पहा. ज्यांच्या अज्ञानाची कींव करण्याची जरूरी ते च उलट येथल्या माळेबद्दल कींव करूं लागलें. पण निर्दोष बालकासारखी वृत्ति असलेल्या या पुरुषाला त्याचें कांहीं च वाटलें नाहीं. शिवाय ते असें हि सांगत कीं, पापाच्या परिणामांतून मुक्त होण्याला येशू खेरीज काय उपाय आहे? तें त्यांचें म्हणणें हि पटत नसें. आणि अत्यंत नम्र पण स्पष्टतेनें उत्तर दिले जाई, "मला पापाच्या परिणामांतून मोकळीक नको आहे. मला मुक्ति पाहिजे. ती पापवृत्तीपासून, पापी कर्मापासून." याच्या उलट बहुतेकांची कल्पना असते. कोणी बोलून दाखवो न दाखवो पण.

**पुण्यस्य फलमिच्छंति पुण्यं नेच्छंती मानवाः ।**
**पापस्य फलनेच्छंति पापं कुर्वंती यत्नतः ॥**

हीच चोंहीकडे स्थिति आढळून येते. धर्म-विचाराच्या अभ्यासांत च समाधान न मानतां येथल्या दलित लोकांची म्हणजे हिंदी लोकांची सेवा करण्यासाठीं हि या वेळीं आटोकाट प्रयत्न केला गेला. सर्व हिंदी लोकांची सभा भरवून सभेंत सत्याच्या आणि स्वच्छतेच्या महत्त्वाचें आविष्करण केलें. सत्य हें व्यवहारांत

अनुक्रमणिका

चालावयाचें नाहीं या मताचें खंडन केलें. हें पहिलें च सार्वजनिक भाषण होतें. येथल्या हिंदी लोकांना व्यवहारज्ञानार्थ फुकट इंग्रजी शिकविण्याचा आणि आपण होऊन अशा लोकांकडे खेटे घालण्याचा ही प्रयत्न केला. लोकसेवेची कळकळ काय करणार नाहीं? सर्व भूतांच्या ठायीं भगवंत दिसूं लागल्याशिवाय संत सेवेसाठी कां तळमळतात, याची कल्पना कशी येणार? या तळमळींत संबंध सार्वजनिक सेवेचें बीज भरलेलें होतें. या वृत्तीमुळें च भर रस्त्यांत अगदीं हलक्या शिपायाकडून लाथ मारून फूटपाथखालीं उतरण्याचा प्रसंग आला तरी विरोधभाव निर्माण होऊं शकला नाहीं. उलट अशा प्रसंगांमुळें हिंदी लोकांविषयीं कळकळ तीव्र होत चालली.

तरी घेतलेला दावा पुरा करावयाचा होता. त्याची काया-वाचा-मनानें पूर्ण तयारी केलीं. ती करीत असतां शेंकडों गुजराथी पत्रांचें इंग्रजी भाषांतर करावें लागे. दावा साधारण नव्हता. ६ लाखांचा दावा होता. त्यामुळें इंग्रजीचा अभ्यास हि पुष्कळ च वाढला. दाव्याचा इतक्या तन्मयतेनें अभ्यास केला कीं, त्यांतल्या एकूण एक सर्व हकीकतीची खडान् खडा माहिती झाली. मनश्चक्षूसमोर सर्व गोष्टी प्रत्यक्ष नजरेनें पहाव्या तशा लखलखींत स्पष्ट दिसूं लागल्या. वकीलींत हि सत्याचें च दर्शन घेतलें. प्रत्यक्ष हकीकतीवर ताबा म्हणजेच सत्य घटनेवर ताबा. तो असला म्हणजे सत्याच्या पाठीमागें कायदा आपोआप येतो. हा अनुभव या दाव्यांत मिळाला. दाव्याच्या हकीकतीवर इतका काबू असून इतर वकीलांप्रमाणें भांडणें लावून आपली तुंबडी भरण्याची इच्छा येथें उत्पन्न कशी होणार? हा दावा आपसांत मिटविण्याचा आटोकाट प्रयत्न केला आणि त्यांत यश मिळविलें. दोन्ही पक्ष इरेस पडले असतां, पदरीं गजान्त लक्ष्मी झुलत असतां, वकील बॅरिस्टर भांडण वाढविण्यास चिथावीत अस तां असला प्रयत्न करणें हें च आधीं दुर्मिळ. त्यांत यश येणें किती दुर्मिळ असेल! आपापसांत समजुतीनें भांडण मिटविणें म्हणजें च वकीली. असा या दाव्यावरून येथें बोध घेतला गेला. प्रत्येक धंद्यातून धर्म-मार्ग च काढावयाचा अशी ही ईश्वरी प्रेरणा होती. वकीली करीत असतां सत्याचा काटा पुढें यत्किंचित् ही ढळला नाहीं. यापुढें २० वर्षे वकीली केली, पण या च तऱ्हेनें. खोटी केस आहे असें कळतां क्षणींच ती सोडून दिली जाई.

**परस्परें जडो, मैत्र जीवांचें ।**

ही च एक प्रेमदृष्टि वकीलीमध्यें ठेविली होती. व्यवहारांत हि अशी निष्कलंक वृत्ती ठेवणारा पुरुष धन्य होय. आजूबाजूला अगदीं विरुद्ध परिस्थिति असता, चोहोंकडे चिखलानें भरलेलें जग दिसत असतां आपण कमळाप्रमाणें अलिप्त रहावयाचें. काय तो प्रसंग! केवढे तें सामर्थ्य!! त्याचें वर्णन कोण करूं शकेल? इतकें असून ही धर्मलाभासाठीं सामान्य ख्रिस्ती, मुसलमान सुचवतील तीं पुस्तकें वाचणें चालूं च होतें. कुराणाचें वाचन केलें. आतां केस संपली. हिंदुस्थानांत परत जाण्याची वेळ आली.

पण योगायोग निराळा च होता. परत हिंदुस्थानांत जाण्यासाठी निघालेल्या या बॅरिस्टरला मंडळींनीं मेजवानी दिली होती. त्या ठिकाणीं बैठकीवर एक वर्तमानपत्र पडलें होते. त्यांत तेथल्या विधिमंडळांत सभासद निवडून येण्याचा हिंदु लोकांचा मताधिकार काढून घेण्याची तेथल्या कायदेमंडळांत चर्चा चालूं होती. ती संबंधी मजकूर होता. तो वाचण्यांत आला. मंडळींना मग स्वाभाविकपणें च सावध राहण्याची सूचना दिली. पण मंडळींनीं आपण आमचें पुढारीपण स्वीकारावें व येथें च रहावें अशी गळ घातली. त्याप्रमाणें मग कार्याला आरंभ झाला. हजारों अर्ज वसाहत मंत्र्यांकडे पाठविण्यांत आले. हिंदुस्थानांत सर्वत्र ही वार्ता पसरली. चरितार्थ लोकाश्रयावर न ठेवतां त्यासाठी वकीलीची सनद घेतली. सनद घेतांना सतरा अडचणी आल्या. सनद घेतल्यानंतर तेथल्या कोर्टाच्या नियमाप्रमाणें च पोषाख

पाहिजे. त्यामुळें पगडी हि उतरण्याचा प्रसंग आला. आफ्रिकेंत सार्वजनिक कामासाठीं यापुढें एक व्यापक संस्था च असावी. हीं कल्पना लोकांपुढें मांडून हिंदुस्थानांतल्या कॉंग्रेसच्या धर्तीवर नाताळ इंडियन कॉंग्रेस ही संस्था काढली. दर महिन्याला या कॉंग्रेसच्या बैठकी व्हावयाच्या. तेथें सार्वजनिक रितीनें बोलावें कसें, वर्गण्या कशा कराव्या, पै न पै चा हिशेब कसा राखावा, सार्वजनिक बाबतींत कर्ज मुळीं च करतां कामा नये. पैशांच्या बाबतींत वायद्यावर कधीं ही विश्वास ठेवूं नये — इत्यादी गोष्टींचा अनुभव सर्वांना करून दिला. कॉंग्रेसशिवाय हिंदी लोकांच्या शिक्षणाची एक संस्था काढली. या संस्थेंत हि चर्चा होई. या संस्थेला जोडून एक पुस्तकालय स्थापन करण्यांत आलें.

अशी ही लोकसेवा एकसारखी वाढत चालली, परंतु ही लोकसेवा प्रामुख्यानें वरिष्ठ वर्गाच्या संबंधाने होत होती. आफ्रिकेंत हिंदी लोकांत मुदतबंदी मजुरांची संख्या सर्वांत जास्त होती. मुदतबंदी मजुरांवर गोऱ्या लोकांकडून अनेक तऱ्हेचे अत्याचार होत. बालासुंदरम् नांवाच्या मुदतबंदी मजुराला त्याच्या गोऱ्या मालकाने बेदम मारलें. त्याचे दांत पडले. तो रक्तबंबाळ स्थितींत या सहायकर्त्याकडे रडत आला. त्याच्यासाठीं सर्व तऱ्हेचे परिश्रम करून त्याच्या अन्यायाचे निवारण केलें. त्यामुळें सर्व मुदतबंदी मजुरांचा लोंढा या पुढाऱ्याकडे वळला. जो तो आपलीं दुःखें मांडूं लागला. या वेळेपासून आफ्रिकेंत या मजुरांचा प्रचंड लढा लढण्याची तयारी सुरू झाली. मुदतबंदी करार पुरा झाल्यानंतर मजुरांनीं आफ्रिकेंत राहूं नये म्हणून गोऱ्या लोकांनी त्यांच्यावर वार्षिक पावणे चारशे रुपयांचा कर टाकला, पण हिंदुस्थानांत त्याचा गवगवा झाला. या पुढाऱ्याच्या नेतृत्वाखालीं नाताळ इंडियन कॉंग्रेसनें मोठी चळवळ केली. त्यामुळें हिंदुस्थानच्या त्या वेळच्या वाइसरायनें वार्षिक ४५ रुपयांचा कर करविला. ही दया नव्हती. ही एक मोठी चूक होती. दगडापेक्षां वीट मऊ हा न्याय येथें लागूं होत नाहीं. खाण्याला भाकर मागितली तर काय दगडापेक्षां वीट मऊ म्हणून वीट चालूं शकेल? दर माणसावर ४५ रु. वार्षिक कर आणि विनाकारण याचा अर्थ काय? या कराने लढ्याचें बीं पेरलें.

जनसेवा हें ईश्वर-दर्शनाचें साधन या दृष्टींनें च नेहमी पाहिलें जाई. त्यामुळें पुढारीपणाचा अहंभाव कधीं च स्पर्श करूं शकला नाहीं. उलट एकसारखें आत्मनिरीक्षण वाढत गेलें. धार्मिक वाचन, धार्मिक मित्रांशीं सहवास, चर्चा या गोष्टींमध्ये कधीं च खंड पडला नाहीं. या चर्चेसाठीं नियमितपणें स्नेहींमंडळीकडे जाणें व्हावयाचें. मुलें म्हणजे देवाघरची फुलें! निर्दोषतेचीं क्रीडास्थानें! मोठ्यांमध्यें नाना विकार भरलेले असावयाचे. मुलांचे तसें नाहीं. तेव्हां त्यांच्या सहवासानें आपल्याला निर्विकारता प्राप्त होईल, त्यांच्या ठिकाणची सहजता आपण ग्रहण करूं, अशाच भावनेनें मुलांमध्यें मिसळण्याचा अभ्यास केला. "व्हावें लहानाहूनि लहान" हें तत्त्व मुलांत मिसळून साधलें जात असे. मुलांना आपल्या साधनेंत हि सामील केलें जाई. युरोपियन मुलाला मांसांपेक्षां फळ चांगलें असें पटविल्यामुळें त्याच्या आईला वाईट वाटलें, असा हि एक प्रसंग तेथें घडला. त्या आईला हि मग नम्रपणें संतोषविले.

आफ्रिकेंत येऊन तीन वर्षे झाल्यावर हिंदुस्थानांत ६ महिन्यासाठीं येणें झालें. बोटीवर हि उर्दूचा आणि तामीळचा अभ्यास केला. आपल्या मुसलमान आणि द्रविड बंधूंचें हृद्गत कळावें म्हणून च हा अभ्यास सुरू केला. हिंदुस्थानांत आल्यावर प्लेगमध्यें लोक-सेवा केली. दक्षिण आफ्रिकेच्या कामासाठीं रानडें, तय्यबजी, फेरोजशहा वगैरे पुढाऱ्यांच्या भेटी घेतल्या. मुंबईस सभा केली. पुण्यास लोकमान्य व गोखल्यांच्या भेटी झाल्या. गोखल्यांचें हे प्रथम दर्शन! पण—

अनुक्रमणिका

**तच्चेतसा स्मरति नूनमबोधपूर्वं**
**भावांतराणि जननांतर सौहृदानि**

अशी पहिल्या च भेटींत स्थिति होऊन गेली. गोखल्यांच्या गुरुत्वाचें स्थान हृदयांत अढळ झालें. पुण्याला हि एक सभा झाली. तेथून मद्रासला प्रयाण केलें. मद्रासच्या उत्साहास पार नव्हता. बालासुंदरमच्या गोष्टींनें मद्रासी मन विव्हल झालें. तेथल्या प्रमुख वर्तमानपत्रांनीं हि आपल्या वर्तमानपत्रांत आफ्रिकेसंबंधीं मजकूर छापण्यांत पुष्कळ मदत केली. तेथून कलकत्त्याला प्रयाण केलें गेलें. कलकत्त्याला पुष्कळ अडचणी आल्या. अमृतबझारपत्रिकेच्या संपादकानें तर जवळ जवळ हाकून दिल्यासारखें केलें. परंतु नम्रतेनें चिकाटीनें काम केल्यामुळें येथें हि सभा होऊं शकेल अशी आशा वाटूं लागली. परंतु आफ्रिकेंतल्या स्नेह्यांकडून एकदम बोलावणें आल्यामुळें आफ्रिकेंत जाण्याची तयारी केली.

आतांपर्यंत आफ्रिकेंत कुटुंब नेलें नव्हतें. यावेळीं मुलें कुटुंब असा सर्व परिवार बरोबर घेतला. अद्यापि हि बाह्य अवडंबराचा पगडा मनावरचा पूर्ण गेला नसल्यामुळें मुलें व कुटुंबाला पारशी फॅशनेबल पोषाखाची दीक्षा दिली. कांटे चमच्यानें जेवण्यास भाग पाडलें. ज्या बोटीवरून प्रवास केला ती बोट ऑफ्रिकेंतल्या पहिल्या अशिलाच्या मालकीची होती, अशी च या अशिलाची दुसरी हि बोट हिंदुस्थानांतले उतारू घेऊन आफ्रिकेस जावयास निघाली होती. हा अठरा दिवसांचा प्रवास होता. यावेळीं प्रवासांत प्रचंड वादळ झालें. सर्व लोक घाबरले. कप्तान धीर देत होता. पण बोट केव्हां बुडेल ह्याचा नेम नव्हता. या प्रसंगीं एका ईश्वराखेरीज कोण वांचविणार? त्याचा च सर्वांनीं धांवा केला. २४ तास ही स्थिति टिकली. नमाज, भजन, प्रार्थना, याशिवाय आतां बोटीवरचे सर्व व्यवहार बंद होते. या वेळीं हि लोकांची सेवा केली. वादळ शांत झालें. आणि ईश्वरस्मरण कोठल्या कोठें पार वितळून गेलें. मनुष्याची केवढी ही मायामय स्थिति!

बोट किनाऱ्याला लागली खरी पण ती प्लेगच्या वातावरणांतील म्हणून २३ दिवस कोणा हि उतारूला किनाऱ्यावर उतरूं दिलें नाहीं. हिंदी लोकांना आफ्रिकेंत उतरूं द्यावयाचें नाहीं, हा त्यांत गोऱ्या लोकांचा हेतु होता. त्यांनीं मोठ्या सभा भरवल्या. या दोन्ही बोटी हिंदुस्थानांत परत गेल्या पाहिजेत, अशी मालकाला धमकी दिली गेली. उतारूंना हि परत गेलां नाहीं तर समुद्रांत बुडवूं म्हणून सांगण्यांत आलें. पण सर्व जणांनीं याचा प्रतिकार करण्याचा निश्चय केला. गांधी हिंदुस्थानांत गेले. तेथें त्यांनीं आफ्रिकेंतल्या गोऱ्या लोकांविरूद्ध वाटेल तें सांगितलें, आणि वर येथें हिंदी लोकांच्या दोन बोटी घेऊन आफ्रिका हिंदी लोकांनीं च भरून काढण्यासाठीं ते परत आले — असा गोऱ्या लोकांचा गैरसमज झाला होता. त्यामुळें सर्व उतारूंपेक्षां हि यांच्यावर त्यांचा राग विशेष होता. समुद्रांत बोटीवर किती दिवस राहणार. धैर्यानें सर्व उतारू उतरले. पण हे उतरल्या बरोबर गोऱ्या पोरांनीं यांना ओळखून एक च गिल्ला केला. त्यांत मोठे हि सामील झाले आणि या निरपराध मनुष्यावर दगड-विटांचा, अंड्यांचा वर्षाव सुरूं झाला. पोलीस अधिकाऱ्याच्या बायकोनें कांहीं बचाव केला. मग पोलीस अधिकारी येऊन कसें बसें घर गांठलें. पण लोकांनीं घराला वेढा दिला. मारून टाकण्याची लोकांची पूर्ण तयारी झाली होती. पण पोलीस अधिकाऱ्यानें शिताफीनें वेष पालटावयास लावून पोलीस ठाण्यांत सुरक्षित नेलें. पुढें सत्यस्थिती कळल्यावर हळूं हळूं लोकांचा राग आपोआप कमी झाला. आतां पूर्ववत् नाताळ कॉंग्रेसचें काम हातीं घेतलें. कॉंग्रेसचा फंड वाढवून पाऊण लाखापर्यंत रक्कम जमवली. तरी या सेवेनें समाधान वाटेना.

**कामये दुःख तप्तानां प्राणिनां आर्तिनाशनम् ।**

अनुक्रमणिका

ही इच्छा प्रबळ होत चालली आहे. प्राप्तांची सेवा, सज्जनांची सेवा आणि दुःखितांची सेवा, हे सेवेचे तीन प्रकार. त्यांतल्या तिसऱ्या प्रकारची सेवा व्हावी म्हणून मन तळमळत असे. इतक्यांत एके दिवशीं एक रक्तपितीनें पीडलेला अपंग मनुष्य दाराशीं आला. त्याला घरीं ठेवून त्याची कांहीं दिवस शुश्रूषा केली. आणि नंतर त्याची हॉस्पिटलमध्यें चांगली सोय लावून दिली. रोज असें सेवेचें काम करतां यावें म्हणून मग एका इस्पितळांत रोज दोन तास जाण्याचा क्रम सुरू केला. आणि दुःखितांच्या सेवेची अमूल्य साधना अंगी बाणवून घेतली. कोणी हि आजारी असो, त्याची जीवाभावानें सेवा करावयाची. त्याचा मोह मुळीं च राखावयाचा नाहीं. पण सेवा तर अशी करावयाची की, जणूं काय हा रोगी यांचा जन्मजन्मांतरीचा संबंधी असावा.

**सक्ताः कर्मण्यविद्वांसो यथा कुर्वन्ति भारत ।**
**कुर्याद्विद्वांस्तथासक्तश्चिकीर्षुर्लोकसंग्रहम् ॥**

या श्लोकावरचें भाष्य अशा आचरणांत दिसून येतें. आजाऱ्यांच्या शुश्रुषेमुळें तत्संबंधीं ज्ञान हि पुष्कळ झालें. एके प्रसंगी सुईणीचें काम हि स्वतः करावें लागलें. पण तत्संबंधीं ज्ञान असल्यामुळें तें हि पार पाडलें. आजाऱ्याच्या सेवेप्रमाणें अर्भकांची सेवा हि पत्करली. ती तर घरांत च लाभली. स्त्रिया च करूं जाणोत असें तें नाजूक काम पण त्यांत हि प्राविण्य मिळविलें.

ही कळत न कळत ब्रह्मचर्याची च भूमिका तयार होत होती. पुरुष+स्त्री अथवा स्त्री+पुरुष = ब्रह्मचारी. हें ब्रह्मचाऱ्याचें समीकरण च आहे. पुरुष हि नाहीं आणि स्त्री हि नाहीं तो नपुंसक. पुरुषानें ब्रह्मचर्य साधावयाचें तर स्त्रीत्व अंगी बाणवलें पाहिजे. त्यांचा विनय, त्यांची नम्रता, त्यांची सेवा, त्यांची काळजी, हें सर्व तितक्याच तऱ्हेनें आपल्या अंगीं बाणवलें पाहिजे. तेव्हां ब्रह्मचर्याची साधना साधली जावयाची. त्या शिवाय सर्व इंद्रियांवर पाहारा ठेवावयास पाहिजे. जीभ जर ताब्यांत नसेल तर ब्रह्मचर्य साधणें शक्य नाहीं. हा धर्म-विचार येथें नक्की केला गेला. आणि यांत आश्चर्य तरी काय? जेथें सत्य आणि सेवा मुरून गेली तेथें संयम हा अपरिहार्यपणें आलाच पाहिजे. सत्य, सेवा आणि संयम ही जीवनाची त्रयी च आहे. त्यामुळें अंतःकरण ब्रह्मचर्य-साधनेनें भरून गेलें. सेवा आणि संतति यांचें जुळावयाचें च नाहीं ही पक्की खात्री झाली. पुढें तर ब्रह्मचर्यांचें व्रत च घेऊन टाकलें. जी गोष्ट सिद्धांताची म्हणून निश्चित झाली, तिचें व्रत च घ्यावयास पाहिजे. तेथें चालढकल उपयोगी नाहीं. व्रतांत सुरक्षितता आहे, मुक्तता आहे. वर्तनाला बंधन असावें, म्हणजे वृत्ति मोकळी राहते हा नियम च आहे.

संयमाच्या राहणीचा हि कसोशीनें अभ्यास सुरू झाला. काळ्या माणसाची हजामत गोरे हजाम करतात, तेव्हां त्या हि बाबतींत स्वावलंबनाचा प्रयोग केला. त्यांत पुष्कळ वेळां लोकांकडून उपहास हि व्हावा. धोब्याचें काम हि स्वतःच करावें. त्यांत हि पुढें प्राविण्य मिळविलें गेलें. गोखले दक्षिण आफ्रिकेंत आले असतां रानड्यांचा प्रसाद म्हणून ठेवलेलें एक उपरणें धुवावयाचें होतें, तें धुवून त्याला सुंदर इस्तरी करून गोखल्यांना या धोबीकामानें हि संतुष्ट केलें. आणि त्यांच्या संतोषानें आपल्या कामाची सार्थकता मानली. केवढा हा सेवेचा हव्यास!

या च हव्यासामुळें बोअर लढाईच्या वेळीं लढाईतल्या घायाळ लोकांच्या शुश्रूषेसाठीं पथक तयार केलें. हे पथक ११०० लोकांचें होतें. त्यांत बहुतेक मुदतबंदी मजूर होते. ह्या सेवकांसह उत्कृष्ट सेवा केली. भर लढाईंत जोखीम सहन करून जखमी लोकांना उचलून २०/२०, २५/२५ मैलांच्या मजला माराव्या

लागत. रस्त्यांत पिण्याला पाणी हि नसावयाचें. वाटेंत एके ठिकाणीं एक झरा लागला. जखमी शिपायांनीं आधीं पाणी प्यावें कीं, सेवकांनीं आधीं प्यावें असा प्रश्न उभा राहिला. सेवक आधीं पाणी घेईनात. जखमी गोरे शिपाई हि आधीं पाणी पिण्याला तयार नव्हतें. असे हृदयस्पर्शी प्रसंग कित्येक घडून आले. या सेवकांच्या सेवेमुळें हिंदी लोकांची योग्यता वाढली. ६ आठवडे हें काम चाललें होतें. जिकडें तिकडें या सेवेची प्रशंसा झाली. यानंतर हिंदी लोकांच्या स्वच्छतेच्या बाबतींत प्रयत्न केले. बाह्य स्वच्छता नाहीं तेथें आंतरिक स्वच्छता कोठून असणार? म्हणून हा सर्व खटाटोप होता.

बोअर युद्धानंतर आफ्रिकेंतून कायमचें हिंदुस्थानांत जाण्याचें स्नेही मंडळींना कळविलें. त्यांनीं मग देणग्यांचा नुसता वर्षाव केला. सोन्या-मोत्याचे दागिने, हिऱ्याच्या आंगठ्या, घड्याळें—शेंकडों रुपयांच्या भेटी मिळाल्या. या मित्रांच्या भेटी न घेणें हि शक्य नव्हतें. रात्र पडली. आतां झोंप घ्यावयाची, पण झोंप येईना. हें धन मी घेतां कामा नये. सार्वजनिक सेवेबद्दल इनाम घेणें बरोबर होणार नाहीं, हा विचार झोंप येऊं देईना. एक वेळ सुईच्या नेढ्यांतून उंट, हत्ती जाऊं शकतील, परंतु धनवान माणसांचा ईश्वरी साम्राज्यांत प्रवेश होणें शक्य नाहीं, ख्रिस्ताचें असें वचन च आहे. रात्रभर झोंप आली नाहीं. खोलींत येरझारा घालून रात्र घालविली. दुसऱ्या दिवशीं त्या देणग्यांचा ट्रस्ट करून सार्वजनिक कार्यार्थ त्याची योजना केली. घरच्या मंडळींना ती गोष्ट पसंत पडली नाहीं. कशी पसंत पडणार?

**मान दंभ चेष्टा । हे तो शूकराची विष्ठा**
**तुका म्हणे धन । आम्हां गोमांसा समान**

ही वृत्ति काय एकाएकी येईल?

आफ्रिकेंतून येतांना मॉरिशस बेटावर थोडा वेळ राहून तेथली सर्व माहिती मिळविली. हिंदुस्थानांत आल्यावर कॉंग्रेसच्या अधिवेशनांत सेवा करण्यासाठीं कलकत्त्याला प्रयाण केलें गेलें. तेथली घाण, गोंधळ आणि पोषाखीपणा पाहून दुःख झालें. कॉंग्रेसमध्यें सेवेचें काम श्री. घोशालबाबूंकडे मिळालें. त्यांनीं कारकुनाचें काम दिलें. त्यांची वैयक्तिक सेवा कोटाचीं बटनें लावण्यापर्यंत हि केली. कॉंग्रेसमधल्या अवडंबराचा आणि इंग्रजी भाषेच्या अवास्तव महत्त्वाचा विषाद वाटला. दक्षिण आफ्रिकेच्या संबंधीचा ठराव गोखल्यांच्यामुळें पास तर झाला. पण त्याच्याकडे कोणी फारसें लक्ष दिलें नाहीं. यानंतर गोखल्यांच्या सहवासांत कलकत्त्याला महिनाभर राहण्याचा लाभ मिळाला. गोखल्यांनीं निरनिराळ्या ओळखी करून दिल्या. त्यामुळें कलकत्ता आणि बंगालमधील थोर पुरुषांच्या भेटी होऊं शकल्या. यानंतर राजकोटपर्यंत तिसऱ्या वर्गानें प्रवास केला. तिसऱ्या वर्गांतील उतारूंचे हाल आणि हलगर्जीपणा असह्य वाटला. काशीक्षेत्रांत जातां च धक्का बसला. तेथला गलिच्छपणा आणि दंभ पाहून फार वाईट वाटलें. यानंतर मुंबईंत वकीलीला सुरवात केली. परंतु मुंबईंत स्थिर राहूं शकले नाहीं. दक्षिण आफ्रिकेंतून बोलावणें आलें.

हें बोलावणें कांहीं उगी च आलें नव्हतें. दक्षिण आफ्रिकेंत हिंदी लोकांविरुद्ध त्यांना त्या देशांतून घालवून देण्याच्या उद्देश्यानें गोऱ्या लोकांकडून विलक्षण घटना होत होत्या. प्रत्येकानें आपल्या आंगठ्याचे ठसे, आपल्या अंगावरच्या खुणा सरकारला द्याव्या म्हणजे कोणी नवीन माणूस बिगर परवाना ट्रान्सवालमध्यें आला कीं सरकारला तपासतां येईल अशा तऱ्हेचें धोरण—कायदा नव्हे—तेथल्या सरकारनें आंखलें. पुष्कळ वाटाघाटीनंतर सर्वांनीं त्याप्रमाणें मान्यता दर्शविली. पण हिंदी लोकांच्या ह्या भलमनसाईबद्दल ऋणी राहण्याऐवजीं उलट यापेक्षां हि एक कडक कायदा तयार केला. त्यांत याप्रमाणें न

वागणाऱ्याला दंड व शिक्षा भरपूर ठेविलेली होती. वाटेल त्यावेळीं रस्त्यांत, कोर्टांत हा परवाना सरकारी अंमलदाराला दाखविण्याची जबरदस्ती त्यांत दाखल केली. यासाठीं केव्हां हि सरकारी अंमलदार कोणाच्या हि घरांत घुसूं शकेल अशी व्यवस्था केली. एक ना दोन शेंकडों तऱ्हेनें या कायद्यांत हिंदी लोकांना गांजून हांकून लावण्याची तरतूद केली.

या कायद्याविरुद्ध प्रचंड सभा झाल्या. हा कायदा स्त्रियांवर हि लादण्याची कारवाई चालूं होती. त्या विरुद्ध चळवळ करण्यांत आली. डेप्युटेशन नेलें. सरकारनें स्त्रियांच्या बाबतींतली कारवाई रद्द केली. विलायतेंत डेप्युटेशनमध्यें स्वतः जाऊन नाना प्रयत्न केले. विलायतेंत इंग्रज मित्रांनीं—कित्येकांनीं—तर कमाल मदत केली. पण कांहीं उपयोग झाला नाहीं. कायद्याचा अंमल १९०७ ला सुरूं झाला. सरकारनें परवाना काढण्याच्या कचेऱ्या खोलल्या. इकडे परवाना कोणी हि काढूं नये म्हणून पिकेटिंगची चळवळ करण्यांत आली. पिकेटिंगचा विलक्षण परिणाम होऊन फार च थोड्यांनीं परवाने काढले. बहुतेक सर्व हिंदी लोक या चळवळींत दाखल झाले. शेंवटीं सरकारनें लोकांना भीति दाखविण्याच्या इराद्यानें एका माणसाला पकडलें. एक महिना सजा दिली. त्याचा परिणाम उलटा च झाला. चळवळ अधिक च वाढत चालली. म्हणून चळवळींचे पुढारी पकडले गेले. हा च पहिला जेलचा अनुभव. सजा साधी होती. ह्या मुख्य पुढाऱ्याला पकडल्यानंतर सत्याग्रही कैद्यांचा जेलमध्यें एकसारखा भरणा होऊं लागला. पकडलेल्या लोकांत चिनी लोक हि होते. कारण ते आशियामधले होते. त्यांना हि हा परवान्याचा कायदा लागूं होता. १५ दिवस झाले. इतक्यांत मध्यस्थी करणारा एक इंग्रज संपादक आला. गांधीशिवाय चळवळ थांबणें शक्य नाहीं असा सगळ्यांनीं खडखडीत जबाब दिला. त्यामुळें तो मुलाखत घेण्यासाठीं आला. राजीखुषीनें प्रत्येक हिंदी मनुष्यानें आपला परवाना काढावा म्हणजे सरकार हा कायदा रद्द करील असें सरकारकडून आश्वासन मिळाल्यावर चळवळ थांबली. सर्वांना सोडलें. पण कित्येकांवर विशेषतः एका पठाणावर याचा विपरीत परिणाम झाला. आतां लोकांनीं आपणहून परवाना काढावा, आपल्या हातांच्या बोटांचा ठसा द्यावा असा उलटा उपदेश हा पुढारी कसा करितो हें च त्याच्या लक्षांत येईना. स्वतःचा परवाना काढण्यासाठीं जात असतां हा पठाण रस्त्यांत भेटला. त्यानें डोक्यावर आपल्या सोट्याचा जोरानें प्रहार केला. तो मर्मघात सहन झाला नाहीं. तत्क्षणीं बेशुद्धि आली. पठाणाला पकडण्यांत आलें. शुद्धींवर आल्याबरोबर प्रथम त्या पठाणाला सोडविण्याबद्दलचे उद्‌गार काढण्यांत आले. केवढी ही करुणा!

**अक्रोधेन जयेत् क्रोधं । असाधु साधुना जयेत ।**

ही भगवान बुद्धाची वाणी च तेथें प्रकट झाली. लगेच त्या जखमी स्थितींत परवाना काढण्यांत आला. स्वतःच्या बोटांचे ठसे उमटवून दिले. या वेळीं रे. डोक या ख्रिस्ती मित्रानें जी सेवा-चाकरी केली ती अपूर्व होती. ह्या च रे. डोककडून या महान् नेत्याचें पहिलें चरित्र लिहिण्यांत आलें. रे. डोक इतर ख्रिस्ती उपदेशकाप्रमाणें आकुंचित दृष्टीचे नव्हते. त्यांना दुसऱ्याच्या धर्माविषयीं सहानुभूति असे. असे ख्रिस्ती गोरे सहायक आफ्रिकेंत एकसारखे मिळत च गेले.

**चित्त शुद्ध तरी शत्रु मित्र होती ।**
**व्याघ्र ही न खाती सर्प तया ॥**

ही गोष्ट जर खरी तर गोऱ्या ख्रिस्ती लोकांची कथा काय?

अनुक्रमणिका

**अहिंसा प्रतिष्ठायां तत्संन्निधौ वैरत्यागः ।**

हा सिद्धांत येथें प्रत्यक्ष अनुभवास आला. पण विरोध अजून शमला नव्हता. रे. डोककडून बरें झाल्यानंतर लगे च नाताळमध्यें गेल्यावर एका सभेंत पठाणांनीं मारण्याचा प्रयत्न केला च. तेथल्या मित्रांनीं व पोलिसांनीं बचाव केला. तेथून फिनिक्समध्यें प्रयाण केलें गेलें. फिनिक्स वसाहतींत शहरापासून दूर शेतांत स्वाभाविक तऱ्हेनें मजुरी करून स्वावलंबन, सहकार्य, सद्‌भाव या तत्त्वांवर येथें मंडळी रहात. येथें राहणाऱ्या मंडळींत युरोपियन, ख्रिस्ती, हिंदु, हे सर्व समानत्वानें रहात. येथें इंडियन ओपिनियन हें पत्र चालविण्याचा छापखाना होता. इंडियन ओपिनियन पत्रानें आफ्रिकेतले सर्व लोक भारले गेले. वीस वीस हजार प्रति त्याच्या खपत. या वसाहतींत मगनलाल गांधी हे स्वतःचे पुतणे आपला सर्व व्यापार सोडून साधी राहणी पत्करून रहावयास आले होते. यांच्यावर या तत्त्वांचा फार परिणाम झाला. यांनीं च सत्याग्रह शब्द शोधण्याला मदत केली. 'पॅसिव्ह रेझिस्टन्स' या इंग्रजी शब्दांत सत्याग्रहाची कल्पना येऊं शकत नसे. तें दुबळ्यांचें हत्यार अशी भलती च समजूत कित्येकांची झाली होती. मगनलाल गांधींनीं 'पॅसिव्ह रेझिस्टन्स' या शब्दाऐवजीं 'सत्याग्रह' शब्द सुचवला. शेंवटी त्यावरून 'सत्याग्रह' हा युगप्रवर्तक शब्द बनविण्यांत आला.

सत्याग्रही लोकांनीं आपल्या वचनाप्रमाणें स्वेच्छेनें परवाने काढले. परंतु परवान्याचा कायदा रद्द करण्याचें सरकारनें दिलेलें वचन सरकारकडून पाळण्यांत आलें नाहीं. पुष्कळ अर्जावर अर्ज केले, परंतु कांहीं इलाज चालेना. शेंवटी अमुक मुदतींत जर सरकारनें कायदा रद्द केला नाहीं तर काढलेले परवाने जाळून टाकण्यांत येतील, असें विनयपूर्वक परंतु दृढपणें कळविण्यांत आलें. सरकारला त्याचा विलक्षण राग आला. हें 'अल्टिमेटम' दिलें असें सरकारनें मानलें आणि उलट आणखी एक जुलमी कायदा पास केला. इकडे सत्याग्रही लोकांनीं काढलेले परवाने जाळण्यासाठीं मोठी सभा केली. एकदम दोन हजारावर परवान्यांची होळी करण्यांत आली. सरकारनें केलेल्या जुलमी कायद्याविरुद्ध हि सत्याग्रह पुकारण्यांत आला. त्यावर गांधी नवीन नवीन कुरापती काढून कसें हि करून सरकारला त्रास देऊं इच्छितो, असा सरकारकडून आरोप करण्यांत आला. हा नवा कायदा ट्रान्सवालमध्यें नवीन येणाऱ्या हिंदी लोकांना अटकावण्यासंबंधींचा होता. या कायद्याविरुद्ध आतां एका पारशी गृहस्थाकडून सत्याग्रह करविण्यांत आला. पण त्या नंतर नाताळमधून जथ्थेच्या जथ्थे येऊं लागले. त्यांना पकडण्यांत आलें. ट्रान्सवालमधल्या लोकांचा हि परवाना न दाखविण्याचा सत्याग्रह चालू च होता. इमामसाहेब हि पकडले गेले. इमामसाहेबांनीं गांधीजींना हिंदुस्थानांत हि साथ दिली. अनेक बडे बडे बॅरिस्टर, व्यापारी पकडले गेले. खुद्द स्वतःचा हि हा दुसरा काराग्रहवास होता. जेलमध्यें अतिशय कष्ट भोगावे लागले. अपमान सहन करावे लागले. खाण्यापिण्याच्या गैरसोईला सीमा नव्हती. त्यामुळें एकाचा जेलमध्यें मृत्यु झाला. तरी सत्याग्रह्यांची संख्या वाढत च चालली. शेवटीं सरकारनें हद्दपारीचा उपाय अजमावून पाहिला. पण हद्दपार केलेले लोक पुन्हां परत येत म्हणून हद्दपार लोकांची एक मोठी आगबोट तयार करून हिंदुस्थानांत त्यांना उतरवून देण्याचें बेकायदेशीर आणि क्रूर कर्म हि सरकारनें करून पाहिलें. त्या बिचाऱ्या अडाणी गरीब आणि हिंदुस्थानांत कांहीं हि मिळकत किंवा खाण्यापिण्याची व्यवस्था नसलेल्या लोकांच्या हालांची कल्पना हि करवणार नाहीं. पण या प्रकारामुळें हिंदुस्थानांत चोहोंकडे खळबळ उडून गेली. त्यामुळें आफ्रिकन सरकारचा हा क्रूर मार्ग बंद पडला. यानंतर जेलमध्यें अधिक त्रास देण्याची आणि अपमान करण्याची सुरवात झाली. सत्याग्रह्यांनीं सात सात दिवस उपवास करून आपल्या मानाचें रक्षण सरकारला करावयाला लावलें. या वेळीं पुन्हां विलायतेला डेप्युटेशनमध्यें जावें लागलें. पण डेप्युटेशनचा कांहीं खास उपयोग झाला नाहीं. सत्याग्रहाची चळवळ चालू च होती. जेलमध्यें गेलेल्यांच्या कुटुंबांची मागें व्यवस्था काय करावी हा एक मोठा च प्रश्न

येऊन पडला. आतांपर्यंत अशा कुटुंबांना जरूरीप्रमाणें पैसे दिले जात असत. पण पैसे किती दिवस पुरणार? तेव्हां या सत्याग्रही कुटुंबांची सोय करण्यासाठीं ट्रान्सवालमध्ये कॅलनबॅक या जर्मन सहकाऱ्याकडून ११०० एकर जमीन खरीद करवली. या जमीनींत पुष्कळ फळझाडें होतीं. तीं हि सत्याग्रही कुटुंबांना उपयोगी पडत. तेथें एक पाण्याचा झरा होता. प्रत्येक काम नोकराखेरीज स्वावलंबनानें केलें जाई. पायखान्याचें काम हि स्वतः करावयाचें. पुरुष आणि स्त्रियांसाठीं वेगवेगळ्या जागा केल्या होत्या. या वसाहतीला टॉल्स्टॉय फॉर्म हें नांव ठेवलें होतें. येथें हिंदु, मुसलमान, पार्शी, ख्रिस्ती सर्व एकत्र च रहात. मांसाहार वर्ज्य होता. साध्या पत्र्याच्या खोल्या येथें बांधण्यांत आल्या. येथून — शहर म्हणजे जोहान्सबर्ग — २०-२१ मैल दूर होतें. तेथें जावयाचें झालें तर पायीं जाण्याचा शिरस्ता पाडला होता. सर्व जण मजुरी करीत. सुतारीचा आणि चपला बनविण्याचा धंदा हि तेथें दाखल करण्यांत आला. त्यांतून कांहीं कमाई होत असे. तेथल्या मुलांसाठी शाळा हि काढण्यांत आली. मजूरी करून थकल्यानंतर शाळेंत शिकणें आणि शिकवणे कठीण होई. गुरुशिष्यांना डुलक्या याव्या. तेथल्या मुलांची भाषा एक नव्हती. धर्म हि निरनिराळे. तरी या सर्व मुलांत कधीं उच्चनीच भाव उत्पन्न झाला नाहीं. सर्व खेळीमेळीनें राहूं शकलें. पण सर्वांत कठीण प्रयोग तरुण स्त्रीपुरुषांचें, मुलांमुलींचें एकत्र बसणें उठणें हा च होता. कारण अशा समाजात अमर्याद वर्तन होण्याची भीति होती. पण ईश्वरकृपेनें तसें कांहीं झालें नाहीं. येथला पोषाख हि अगदीं साधा होता. स्त्रियाच हा पोषाख शिवून देत. जेवण्यांत डाळ, भात, भाजी, पोळी असा अगदीं साधेपणा होता. चमचे लाकडाचे बनवले होते. जेलच्याप्रमाणें थाळ्या होत्या. ताटें नव्हतीं. कोणी आजारी पडलें तर त्यासाठीं कोणती च खास व्यवस्था नव्हती. फक्त निसर्गोपचाराचे प्रयोग चालवले जात. टॉल्स्टॉय फार्ममध्यें असतांना स्वतः पांच वर्षें दूध सोडून देऊन फलाहारावर राहण्याचा प्रयोग केला आणि तो चांगला च सफल झाला.

टॉल्स्टॉय फार्ममध्यें असे दिवस जात होते. सत्याग्रहाचा लढा हि चालूं होता. दक्षिण आफ्रिकेंतल्या हिंदी लोकांच्या स्थितीचा अभ्यास करण्यासाठीं या वेळीं गोखल्यांना बोलावण्यांत आलें. त्यांनीं हिंदुस्थानांत राहून मिळवतां येईल ती माहिती मिळविली होती च. यावेळीं ते विलायतेला होते. या बाबतींत ब्रिटिश मंत्र्यांशीं त्यांचा विचारविनिमय चालला च होता. त्यांनीं आफ्रिकेंत येण्याचें कबूल केलें. बादशहाला जो मान मिळाला नसता तो मान देण्याचें कार्य घडवून आणलें. ते सरकारी पाहुणे म्हणून हि प्रिटोरियामध्यें राहिले. त्यांची प्रकृति अस्वस्थ होती. त्यांचे सर्व काम हातीं घेतलें. त्यांची खूप सेवा केली. गोखल्यांच्या मधुर आणि अपूर्व विचारांच्या भाषणांनीं गोऱ्या लोकांची मनें मुग्ध करून सोडलीं. या प्रवासांत गोखल्यांकडून मराठी भाषणें हि करविण्यांत आलीं. गोखल्यांना या दौऱ्यांत सरकारकडून मुदतबंदी मजुरांवरचा ३ पौंड कर रद्द केला जाईल असें आश्वासन मिळालें. पण सरकारनें वचन-भंग केला. मग सत्याग्रहांत मुदतबंदी मजूर हि सामील झाले. आतां ट्रान्सवाल मधला टॉल्स्टॉय फार्म बंद केला. नाताळमधली फिनिक्स वसाहत च मुख्य केंद्र केलें. अद्याप मजूर चळवळींत दाखल झाले नव्हते. तों च चळवळीला जोर चढण्याला कारणीभूत असा एक नवीन च जुलूम सरकारनें सुरूं केला. ज्या लग्नांची कोर्टांत नोंद नाहीं म्हणजे जीं ख्रिस्ती पद्धतीनें झालीं नाहींत तीं लग्नें म्हणजे हिंदु-मुसलमानांचीं लग्नें — हीं लग्नें च नव्हत. असा एक निर्णय करण्यांत आला. लग्नांच्या स्त्रिया म्हणजे ठेवलेल्या बाया असा याचा अर्थ झाला. त्यामुळें स्त्रियांनीं हि सत्याग्रहांत भाग घेण्याचें ठरविलें. फिनिक्समधल्या स्त्रिया तयार झाल्या. नाताळमधून ट्रान्सवालच्या हद्दींत परवान्याशिवाय गेल्यानें सत्याग्रह होत होता. त्याप्रमाणें सत्याग्रह केला गेला. स्त्रियांच्या पहिल्या टोळीला पकडलें. राजकीय कारणांसाठी हिंदीं स्त्रिया जेलमध्यें गेल्याचें हें पहिलें च उदाहरण होतें. जिकडे तिकडे या वार्तेनें खळबळ उडाली. या स्त्रियांना जेलमध्यें अतिशय वाईट अन्न देण्यांत आलें, त्यामुळें एक मद्रासी बाई जेलमधून सुटल्याबरोबर थोड्या च दिवसांत मरण पावली. तिचें नांव बालियामा असून तिच्यासाठीं मोठें स्मारक करविण्याचें ठरलें. स्त्रियांच्या या बलिदानानें मुदतबंदी मजुरांना जोर चढला. त्यांनीं कामावर

जाण्याचें नाकारलें. हरताळ सुरू झाला. हे सर्व मजूर खाणींत काम करणारे होते. ते मालकांच्या जागेंत च रहात. त्यांना हाकून देण्यांत आलें. हजारो मजूर असे निराधार झाले. त्यांना खाणेंपिणें कोठून पुरवणार? डाळ तांदुळाच्या गोणीच्या गोणी व्यापाऱ्यांकडून आणविल्या. पण असें किती दिवस चालणार? मजुरांची संख्या पांच हजार झाली. शेंवटीं ट्रान्सवाल मध्यें जाऊन स्त्रियांप्रमाणें च मजुरांनीं सत्याग्रह करण्याचें ठरविलें. ही मजुरांची ५/६ हजार फौज घेऊन हा महान् पुढारी सत्याग्रहाला निघाला. मजुरांची रस्त्यांत खाण्यापिण्याची शक्य तितकी काळजी घेतली तरी कित्येक वेळा सर्वांना अर्धपोटीं राहण्याचा प्रसंग येई. असे अनेक कष्ट पडत तरी स्वतः या पुढाऱ्यानें सर्वांच्या बरोबर राहून सर्वांना संतोष द्यावा. देवांना हि हेवा वाटण्याजोगा हा रोमहर्षण प्रसंग होता. कित्येक स्त्रियांचीं मुलें या प्रवासांत मरण पावलीं. पण कोणी हि हिंमत सोडली नाहीं. सरकारनें शेंवटीं या फौजेच्या सेनापतीला आणि बरोबरीच्या इतर पुढाऱ्यांना पकडलें. पण मजूर हरले नाहींत. ही शांतिसेना तशी च पुढें शांतपणें चालूं लागली. शेवटीं या सर्व मजुरांना पकडून कैद केले. तरी सत्याग्रही मजुरांचा प्रवाह एकसारखा वहात च होता. आफ्रिकन सरकारनें या हजारों पकडलेल्या मजुरांना जेलमधून त्यांच्या मालकांच्या स्वाधीन केलें. खाणीजवळ च जेल केला. मजुरांना फटके मारले, त्यांच्या अंगावरून घोडेस्वार नेले. बंदुकांचे दस्ते मारले. नाहीं नाहीं ते अत्याचार केले, पण कोणी हि कामावर गेला नाहीं. आणि आपलें अन त्या चाराचें तत्त्व सोडलें नाहीं. या बाबतींत गोखल्यांनीं हिंदुस्थानांत जोराची चळवळ सुरू केली. सी. एफ्. अँड्रयूज, पियरसन यांना आफ्रिकेंत पाठविलें. हिंदुस्थानचे व्हाइसराय लॉर्ड हार्डिंग्ज ह्यांनी हि द. आफ्रिकन सरकारवर जाहीर रीतीनें कडक टीका केली. आणि सत्याग्रही लोकांना पाठिंबा दिला. यानंतर अनेक प्रकारच्या भेटीगांठी व पत्रव्यवहार होऊन हिंदी लोकांच्या परिस्थितीविषयीं कमिशन नेमण्यांत आलें. पण त्यावर हिंदी लोकांनीं बहिष्कार टाकला. शेंवटीं परवान्याची जबरदस्ती, तीन पौंडांचा कर, हिंदी लग्नांना अमान्यता या अन्याय त्रयीचा अंत झाला. त्यासाठीं आठ वर्षें झुंजावें लागलें.

आतां आफ्रिकेंतलें काम संपलें. हिंदुस्थानांत परत जावयाचें. परंतु गोखले विलायतेंत होते. त्यांच्या इच्छेप्रमाणें त्यांना भेटण्यासाठीं विलायतेंत प्रयाण केलें गेलें. इतक्यांत युरोपमध्यें महायुद्ध सुरूं झालें. बोअर युद्ध आणि झुलू बंडाच्या वेळीं ज्या प्रमाणें युद्धांत ब्रिटिश सरकारला शुश्रूषा-पथकाची मदत दिली होती त्याप्रमाणें यावेळीं हि मदत देऊं केली. आणि त्याप्रमाणें इंग्लंडमध्यें शुश्रूषा-पथकाला प्राथमिक उपचाराचें शिक्षण देण्याला हि सुरवात झाली. हें शिक्षण देत असतां अंमलदारांनीं अरेरावी सुरूं केली. त्या प्रमाणें तक्रारी हि केल्या गेल्या पण त्यांचा विशेष उपयोग झाला नाहीं. शिवाय स्वतःला प्लूरसीचा आजार झाल्यामुळें या शुश्रूषादलांत भाग घेतां आला नाहीं. गोखल्यांनीं डॉक्टर सांगतील तो आहार घेण्याला सांगितलें. पण दूध सोडलें होतें. तें घेणें शक्य नव्हतें. शेवटीं हिंदुस्थानांत परत येण्याचे ठरलें. परंतु फिनिक्समधल्या लोकांना कोठे ठेवावें हा प्रश्न पडला. सी. एफ्. ॲन्ड्रयूजकडे त्यांची व्यवस्था सोपण्यांत आली. अँन्ड्रयूज यांची रवींद्रनाथ टागोर, प्रो. रुद्र आणि श्रद्धानंद यांच्यावर श्रद्धा होती. या तिघांकडे फिनिक्स आश्रमची मंडळी ठेवण्याची त्यांनी व्यवस्था केली. हिंदुस्थानांत आल्यावर मुंबईस मोठा स्वागतसमारंभ झाला. स्वागताप्रीत्यर्थ मुंबईला इंग्रजी भाषणें झालीं. त्याला गुजरातींत उत्तर दिलें. आणि इंग्रजी भाषेच्या अवास्तव प्राधान्याचा निषेध केला. पुण्याला गोखल्यांनीं हि स्वागत केलें. गुजराथमध्यें आश्रम काढण्याची कल्पना त्यांना सांगता च ती त्यांनीं मान्य केली. आणि तो मी माझा च आश्रम समजतों. जरूर आश्रम काढा. त्याला लागतील ते सर्व पैसे माझ्याकडून च घ्यावयाचे असें आश्वासन दिलें. स्वागताप्रीत्यर्थ मेजवानी देण्यांत आली. तेथपर्यंत गोखले कसेंबसें आले पण त्यांना तेथें घेरी आली. यानंतर राजकोटला प्रवास केला. तिसऱ्या वर्गांतील उतारूंचे हाल पाहिले आणि फिनिक्सची मंडळी शांतिनिकेतनला होती म्हणून शांतिनिकेतन गांठलें. शांतिनिकेतन म्हणजे कवीश्वर रवींद्रनाथ टागोर यांचें

अनुक्रमणिका

ठिकाण. येथें सर्व काव्यमय जीवन असावयाचें. परंतु येथें हि स्वयंपाकादि बाबतींत स्वावलंबनाचे प्रयोग सुरू झाले. इतक्यांत गोखले वारल्याची तार आली. हिंदुस्थान शोकसमुद्रांत बुडून गेला. शांतिनिकेतन सोडून घाईघाईनें पुण्याला प्रयाण केलें. गोखल्यांची उत्तरक्रिया वगैरे सर्व होऊन गेली. त्यांच्या भारत सेवक समाजांत दाखल होण्याच्या बाबतींत दोन तट पडले. त्यामुळें ती कल्पना सोडून दिली. तेथून कलकत्त्याला भूपेंद्र बसूंना आणि नंतर रंगूनला डॉ. मेहतांना भेटून श्रद्धानंदांना भेटण्यासाठीं हरिद्वार गांठलें. १९१५ साल. मोठा कुंभ मेळा भरला होता. या कुंभ मेळ्यांत हि सेवेचें काम केलें. पण त्या यात्रेंतला गवाळपणा, पाखंड आणि अस्वच्छता सहन झाली नाहीं. श्रद्धानंदजींचें म्हणणें आश्रम हरिद्वारला स्थापावा. कोणी कलकत्ता, कोणी राजकोट अशा सूचना येत होत्या. पण शेंवटी अमदाबादजवळ २९ मे १९१५ रोजीं कोचरब या गांवीं आश्रम स्थापन करण्यांत आला. फिनिक्स, टॉल्स्टॉय फार्म अशीं नांवें न देतां 'सत्याग्रहाश्रम' हें च नांव देण्यांत आलें. आश्रमांत दाखल होण्यापूर्वीचें बापूजींचें चरित्र येथें समाप्त झालें.

हें चरित्र कशाचें, हा एक वेडावाकडा आराखडा हि म्हणतां येणार नाहीं. या दिव्य चरित्रांतला एकेक प्रसंग, त्या प्रसंगाचे उपप्रसंग आणि त्यांतले पुन्हा निरनिराळे पैलू, त्यांत आणखी सत्य-अहिंसादि सूक्ष्म तत्त्वदृष्टि, या सर्वांचे आविष्करण कोण करणार? एका मनुष्याच्या आयुष्यांत इतके प्रसंग कादंबरींतल्या काल्पनिकतेला हि मागें सारतील असे प्रसंग येथें घडलेले आहेत. खरोखर येथल्या अनुभवाला सीमा च नाहीं. त्याचें वर्णन कोण करूं शकेल? श्रीमंतांचा अनुभव, गरीबांचा अनुभव, व्यापाऱ्यांचा अनुभव, शेतकऱ्यांचा अनुभव, मजुरांचा अनुभव, बेकारांचा अनुभव, लढाईंतला अनुभव, हुल्लडीचा अनुभव, आश्रमाचा अनुभव, जेलमधला अनुभव, सत्याग्रहाचा अनुभव, तडजोडीचा अनुभव, माराचा अनुभव, स्वागताचा अनुभव, उद्योगाचा अनुभव, वकीलीचा अनुभव, आजाऱ्यांचा अनुभव, शुश्रूषेचा अनुभव, मुलांचा अनुभव—कोणकोणते अनुभव सांगावे? खरोखर कोणकोणता अनुभव आला हें सांगण्यापेक्षा कोणता अनुभव आला नाहीं हा च येथें प्रश्न आहे. गीतेंत ११ व्या अध्यायांत विश्वरूपदर्शन आलेलें आहे. तसें च येथें अनुभवाचें विश्वरूपदर्शन भरलेलें आहे.

'यदि हास्ति तदन्यत्र यन्नेहास्ति न तत्क्वचित्' ही महाभारताविषयींची उक्ति येथें पूर्णांशानें लागू पडते. आणि महाभारताचा गाभा जी गीता तिचें हि येथें दर्शन होतें. उद्योगाला सीमा नाहीं. वेळ मुळीं च मिळत नाहीं. म्हणून दक्षिण आफ्रिकेंत दंतधावनाच्या वेळीं एकेक श्लोक भिंतीवर लिहून तो तेवढ्या वेळांत वाचून लक्षांत ठेवावयाचा. असे गीतेचे १३ अध्याय पाठ केले. केवढी ही निष्ठा! आणि एवढें च नव्हे तर गीतेचे हि सारभूत असे स्थितप्रज्ञाचे १८ श्लोक रोजच्या प्रार्थनेसाठीं मुक्रर करण्यांत केवढी कुशाग्रता दाखविली गेली. कोणत्या हि थोर पुरुषाला ही कल्पना सुचली नाहीं. हिंद–स्वराज्यासारख्या लिखाणानें हिंदुस्थानचें च काय पण जगाचें स्वराज्य मिळविण्याची किल्ली दाखवून दिली. अशा प्रकारें जीवनाच्या अंगप्रत्यंगांत नवीन दृष्टि देणारा हा सत्पुरुष एक महान् द्रष्टा—एक महान् स्मृतिकार—ठरावा यांत आश्चर्य कसलें?

अशा या महात्म्याच्या सर्व खुब्या आकलन करणारा, त्याच्या अनुभवाचे सात्मीकरण करणारा थोर ग्राहक कोचरब येथें च मिळाला. पण असें असून हि महात्मा त्याचा गुरू होता असें म्हणतां येणार नाहीं. याचें कारण काय बरें? — तें अत्यंत गूढ रहस्य, ती अतिशय पवित्र भूमिका अवलोकन करण्यासाठीं हें प्रकरण अधारभूत म्हणून लक्षांत ठेवून पुढें जावें लागेल.

●●●

# प्रकरण २८ वें

## कर्मयोगी आणि संन्यासी

**मनुष्य** या जगांत नाना तऱ्हेचीं कर्में करतो. कांहीं शारीरिक, कांहीं मानसिक, कांहीं नित्य, कांहीं नैमित्तिक, कांहीं स्वतःसाठीं, कांहीं दुसऱ्यासाठीं, कोणताही मनुष्य कर्माशिवाय कल्पिता च येत नाहीं. जीवाचें जीवत्व कर्माशीं अगदीं निगडित बांधलें गेलें आहे.

**न हि कश्चित्क्षणमपि जातु तिष्ठत्यकर्मकृत् ।**
**कार्यते ह्यवशः कर्म सर्वः प्रकृतिजैर्गुणैः ॥**

हा सार्वभौम सिद्धांत आहे. परंतु करोडो मनुष्यांत कर्मयोगी हा एखादाच. कर्म करणारे सगळे खरे. पण त्यांत कर्मांतला योग साधणारा विरळा. आणि त्यांत संन्यासी तर त्याहून विरळा!

कर्म कोणतें हि असो, चांगले असो कीं वाईट असो, परार्थ असो कीं स्वार्थी असो, तें शिल्लक रहात नाहीं, जगतीतलावर आजपर्यंत हजारों घडामोडी झाल्या पण त्या शिल्लक राहिल्या नाहींत. जी जी कृति करावी ती ती विनाशाकडे च धांव घेते. कर्म टळत हि नाहीं आणि टिकत हि नाहीं. असें कर्माचें विलक्षण स्वरूप आहे.

कर्म टिकत नाहीं. त्यापासून प्राप्त झालेलें फळ हि टिकाऊ नाहीं. म्हणून प्रत्येक कर्मांत कर्मयोगी अनासक्तीचा अभ्यास करतो. कर्म टळत नाहीं म्हणून प्रत्येक कर्म एकाग्रतेनें, व्यवस्थेनें आणि विचारपूर्वक तो करतो. त्याच्या पाठीमागें तो आपल्या अंतःकरणाचें सर्व सामर्थ्य लावून त्याला रसमय करून टाकतो. इष्टस्थलीं जावयाचें आहे तर प्रवास टळणें शक्य नाहीं. मग प्रवास हें जरी इष्ट-साध्य नसलें तरी त्याला – त्या साधनाला–साध्यवत् मानून, रसमय करून आपलें इष्टस्थल कां गांठूं नये? असा तो विचार करतो. साधननिमग्नता हा कर्मयोगाचा विशेष आहे. साधननिमग्नतेनें कर्म जरी नष्ट झालें तरी साधन दृढावत जातें. सर्व जगताला, सर्व कर्मांना साधनस्वरूप देण्याचा कर्मयोग्याचा हव्यास असतो. जो जो प्रसंग येईल, जी जी वस्तु भेटेल, जी जी व्यक्ति अवलोकनांत येईल, ती ती तो संग्राह्य ठरवून त्या त्या प्रसंगाला, वस्तूला आणि व्यक्तीला साधनाचा रंग चढविण्याचा तो प्रयत्न करतो. म्हणून तो लोकसंग्राहक ठरतो.

याच्या उलट संन्यासी प्रत्येक कर्मांतून, प्रत्येक कृतींतून, प्रत्येक प्रसंगांतून सिद्धांतच ग्रहण करीत जातो. त्या त्या कर्माला, व्यक्तीला, प्रसंगाला किंबहुना सर्व व्यक्ताला तो गौणत्व देतो. त्याला त्यांमधला सर्व कार्यकारणभाव एकदम उलगडून तो त्याच्या मूळसिद्धांतांत तल्लीन होतो. गणिताचीं उदाहरणें सोडविण्यांत संन्याशाला मौज वाटत नाहीं. तो गणिताचा सिद्धांत एकदम आकलन करतो. त्यामुळें त्या सिद्धांताला अनुसरून दिलेलीं उदाहरणें करीत रहाण्याची त्याला आवश्यकता उरत नाहीं. उलट कर्मयोगी अशी अनेक उदाहरणें सोडविण्यांत दंग होईल. म्हणून संन्यासी पुरुष लोकसंग्रह टाळीत नाहीं. आणि लोकसंग्रह करीत हि नाहीं. तो स्वाभाविकपणें च प्रवर्तक ठरतो. तो सार्वभौम सिद्धांत मांडतो. कर्मयोगी सार्वभौम साधना मांडीत जातो. गीतेला बापूजीसारखा कर्मयोगी 'अनासक्तियोग' म्हणेल. कारण तें साधनदर्शक नांव आहे. संन्यासी गीतेला 'समत्वयोग' म्हंणेल. कारण ते सिद्धांतदर्शक नांव आहे. समत्व हें

साध्य आणि अनासक्ति हें साधन आहे. संन्यासी सूर्याप्रमाणें सर्वत्र प्रचंड उष्णता फेकीत राहील पण कोणाच्या घरांत शिरून त्याचें अन्न शिजवणार नाहीं. तो शेत पिकवील पण भात शिजवणें हें अग्नीचें च काम. तें कर्मयोगी करील.

सर्वसामान्य लोक जीवधारणार्थ कर्म करणारे असतात. त्यांना कर्मयोगी म्हणतां च येत नाहीं. त्यातले कांहीं विशिष्ट कर्मांना जडतेनें चिकटलेले असतात. त्यांना कर्मठ म्हणतां येईल. पण कर्मयोगी हा पूर्ण अर्थानें शेंकडों वर्षांनीं तरी पहायला सांपडतो कीं नाहीं याची शंका च आहे. ती च गोष्ट संन्याशाची.

परंतु ही गोष्ट जरी खरी असली, हजारों माणसांत शेकडों वर्षांनीं संन्यासी आणि कर्मयोगी यांचें क्वचित् च दर्शन होत असलें तरी संन्यासी–कर्मयोगी–संन्यासी–कर्मयोगी अशी जोडी मात्र अव्याहत चालत आलेली आहे. येथें हि हें च दर्शन होतें. बापूजी दक्षिण आफ्रिकेंतून कर्मयोगसिद्धि मिळवून आले न आले तों च या संन्यासी मूर्तीचा उदय झाला. सांखळींतले दुवे जसे परस्परांत अडकलेले असावे तसे संन्यास आणि कर्मयोग–सिद्धांत आणि साधना या एकमेकांत अडकलेल्या असल्यामुळें संन्यासी आणि कर्मयोगी हे हि जणूं काय सांखळीच्या दुव्याप्रमाणें एकमेकांत अडकले जातात. अशी स्थिति आजपर्यंत अनेक वेळां दिसून आली आहे. संन्यासी याज्ञवल्क्य झाले कीं जनक कर्मयोगी आणि कर्मयोगी जनक झाले कीं शुकाचार्य संन्यासी अशी परंपरा प्राचीन काळपांसून चाललेली दिसून येते. बुद्धासारखे महान् कर्मयोगी निघाले कीं लगे च शंकराचार्यासारखे संन्यासी प्रगट होतात. ज्ञानेश्वरांसारखे संन्यासी झाले कीं लगेच नामदेवासारखे कर्मयोगी व्हावे. अशीं एक परस्परसंबंधाची सांखळी आढळून येते. दिवस कर्मयोगी रात्र संन्यासी हा क्रम जसा अव्याहत चाललेला आहे तशी ही गोष्ट अगदीं अपरिहार्य आहे. रुपया हा संन्यासी म्हटला तर त्याच्या चलनासाठीं कर्मयोगी खुर्दा कल्पिलाच पाहिजे. रुपयांचा खुर्दा काय आणि बंदा रुपया काय किंमत एक च. पण एकाचा रोजच्या व्यवहारांत उपयोग जास्त आहे. आणि दुसरा अर्थसंरणार्थ जरूरीचा आहे. म्हणून हा सिद्धांत समजला पाहिजे कीं महान् कर्मयोगी निघाला कीं त्याच्या जोडीला महान् संन्यासी हि निघाला च पाहिजे. किंवा महान् संन्यासी निघाला कीं महान् कर्मयोगी आपोआप निसर्गतः पुढें यावयाचा च. रामकृष्ण परमहंस महान् संन्यासी म्हटले तर विवेकानंद कर्मयोगी ठरल्याशिवाय राहणार नाहींत. प्रवृत्ति-निवृत्तीची हीं दोन पूर्ण स्वरूपें आहेत. पूर्ण प्रवृत्ति म्हणजे कर्मयोग आणि पूर्ण निवृत्ति म्हणजे संन्यास. झाडाचें पूर्ण स्वरूप जसें बीजांत केंद्रित होतें तसें संन्यासांत शक्तिरूपानें कर्मयोगाचें पूर्ण स्वरूप केंद्रित होतें. बीजाचें स्वरूप जसें झाडांत विस्तृत होतें तसें संन्यासाचें स्वरूप साधनरूपानें कर्मयोगांत विस्तृत होतें. त्यामुळें संन्यासी आणि कर्मयोगी हे पूर्ण स्वरूपांत दिसायला भिन्न दिसले तरी असायला त्यांच्यांत भेद नसतो. समुद्रावर प्रचंड वादळ होऊन पर्वतप्राय लाटा उसळल्या तरी समुद्र थेंबसुद्धां वाढला असें म्हणतां येत नाहीं. स्वरूप निराळें इतकें च किंवा त्यानें अगदीं शांत स्वरूप धारण केलें म्हणून तो आतां आटला असे म्हणतां यावयाचें नाहीं. स्वरूप च फक्त बदललें. वस्तु एक च. तसें च संन्यासी कर्मयोगी यांचें आहे.

**एकं सांख्यं च योगं च यः पश्यति स पश्यति ।**

परंतु असें असलें तरी संन्यासी आणि कर्मयोगी यांच्यांत गुरुशिष्यसंबंध मात्र असूं शकत नाहीं. पूज्यपूजक संबंध असेल, सेव्यसेवक संबंध असेल, पण गुरुशिष्यसंबंध असणें शक्य नाहीं. कर्मयोग्यानें वाटेल तो प्रयत्न केला तरी संन्याशाचें वळण बदलणार नाहीं. कारण बदलण्याची आवश्यकता च नाहीं. तसेंच संन्याशानें वाटेल तेवढा प्रयत्न केला तरी कर्मयोग्याचे वळण बदलणार नाहीं कारण त्याची जरूरी

अनुक्रमणिका

नाहीं. खरा गवई तबलजीनें किती ही चुकवा-चुकवी केली तरी कधीं हि चुकत नाहीं किंवा खरा तबलजी गायकाच्या जाळ्यांत सांपडून बेताल होणार नाहीं. गुरूशिष्यसंबंधांत गुरू शिष्याला मातीच्या गोळ्यासारखा आकार देतो आहे, अशी स्पष्ट स्थिति असते. एकाद्या मुशींत ज्याप्रमाणें रस ओतावा त्याप्रमाणें शिष्याचा रस ओंतून गुरू प्रतिमा घडवीत असतो. म्हणून कर्मयोग्याचा शिष्य कर्मयोगी च आणि संन्याशाचा शिष्य संन्यासी च होईल. अथवा संन्यासी आणि कर्मयोगी स्वयंभू च असतील. कर्मयोग्याचा शिष्य संन्यासी आणि संन्याशाचा शिष्य कर्मयोगी असें जेथें पुराणादि ग्रंथांत दिलेलें आढळून येईल तेथें फक्त गुरूभाव आणि शिष्यभाव घ्यावयास पाहिजे. माझा एकाद्याच्या ठिकाणीं पितृभाव असला म्हणजे तो खरोखर माझा पिता आहे असे म्हणतां येणार नाहीं. तसें च शुकाचार्यांनीं जनकांना गुरू मानलें म्हणून जनक त्यांचे गुरू झाले असें होत नाहीं. कारण दोघांच्या वळणांत मुळांतच फरक आहे. गुरूशिष्य अंतर्बाह्य एकच असावे लागतात. एक वेळ बापासारखा किंवा आईसारखा मुलगा होणार नाहीं पण गुरूसारखा शिष्य झाला च पाहिजे. गुरूंत शंभरपट गोडी असेल तर शिष्यांत पन्नास पट उतरेल. पण कटुता मुळीं च नसेल. शिष्य गुरूपेक्षां वरचढ किंवा कम दर्जाचा असेल. पण तेथें भिन्नता मुळीं च नसेल. संन्यास आणि कर्मयोग यांच्यांत पूर्णावस्थेंत आतून मुळीं च भेद नसतो. परंतु बाह्यतः महदंतर असतें. गुरूशिष्यभावांत अंतर्बाह्य अभेद असावा लागतो. आणि खरी गोष्ट अशी कीं पूर्णावस्थेचा कर्मयोग आणि पूर्णावस्थेचा संन्यास हा आंतरविकास स्वरूप असतो. कळी आपण होऊन उमलते, का तिला कोणी हात लावून उमलवतें? तशी च ही स्थिति आहे.

म्हणून च यथें बापूंची आज्ञा पाळली जाते. त्यांचें च धोरण सर्वमान्य केलें जातें. त्यांच्यासमोर लीनतेनें च बसावें. होतां होईल तों बोलणें च नाहीं. नुसतें ऐकत असावें. पण बोलण्याचा प्रसंग च आला तर अगदीं हलका आवाज असावा. ते म्हणतील त्याप्रमाणें अक्षरशः करण्याचा प्रयत्न असावा. परंतु इतकें असून वळण मात्र निराळें च उमटून पडतें. कारण येंथें आंतून ऐक्य असून बाह्यतः फरक आहे. येथें गुरूशिष्यसंबंध नाहीं. बापूजींनी आश्रम चालविला, येथें हि आश्रम चालविण्याचा प्रसंग आला. बापूंचा आज्ञेवरून च आला. पण दोघांच्या चालवण्यांत महदंतर दिसून आलें. तत्त्व एक च, परंतु वळण भिन्न. बापूंच्या आजूबाजूला संग्रह दिसेल, येथें निग्रह दिसेल. तेथें लांबीरूंदी दिसेल, येथें खोली दिसावयाची. तेथें कर्माची प्रचंड चक्रें चाललेली दिसतील, तेथें उलाढालीचें केंद्रस्थान होईल, येथें सिध्दांताचें आसन बळकट केलें जाईल, अव्यापारेषु व्यापाराला मुरड घातली जाईल. तेथें चरख्याचें सुटसुटीत सोपें साधें यंत्र शोधण्याची प्रवृत्ति बळावेल, पण येथें तकलीवरच लक्ष केंद्रित होईल. तेथें प्रार्थनेंत वाद्यांचा गोड आवाज रूचेल, येथें वाद्यें नकोत असा कल दिसेल. तेथें दिगंत कीर्ति पसरेल. येथले रहस्य फार च थोड्यांना माहीत असावयाचें. तेथें सर्वांशीं परिचयाचा प्रयत्न, येथें १०—१० महिनें जवळ राहून नांवगांवाची हि विचारपूस नाहीं. तेथें स्त्रियां-मुलें, अपंग-रोगी यांचा घोळका. येथें गाढ एकांत, स्त्रिया-मुलें यांचा स्पर्श नाहीं. तेथें अवकाश नाहीं जेवायाला. उदंड कामें. येथें कालस्थलाचें भान नाहीं. तेथें तुफान वायूचें तांडव-नृत्य, येथें आकाशाची अखंड समाधि. तेथें लालन-पालन करण्याची वृत्ति, बापाची भूमिका. येथें लालनपालनाचें कोडकौतुक नाहीं, गुरूची भूमिका. तेथें कुटुंबीजनांना मिळवून घेण्याची वृत्ति. येथें 'निजगृहात्तूर्ण विनिर्गम्यताम्' हा सिध्दांत. तेंथें—

**यदि ह्यहं न वर्तेयं जातु कर्मण्यतंद्रितः ।**

ही चिंता, येथें—

**न मे पार्थास्ति कर्तव्यं त्रिषु लोकेषु किंचन ।**

अनुक्रमणिका

ही मुद्रा. एक राजर्षि, राजकारणादि कर्मनिष्ठेंत निमग्न असून भक्त. दुसरा ब्रह्मर्षि, ब्रह्मज्ञानादि निष्ठेंत निमग्न असून भक्त. बापूजींच्या आयुष्याकडे ओझरती नजर टाकली तरी तेथें कर्मप्राधान्य दिसून येईल. वैराग्याची परिणति होण्याला तेथें कर्माच्या अनुभवाच्या प्रचंड मालिकेंतून जावें लागलेले दिसेल. येथें आयुष्यांत घडामोडी नाहींत च. कर्माचें तर मुळीं नांव नाहीं. केवळ ज्ञाननिष्ठा. वैराग्याचें बाळकडूच मिळालेंलें. मोहाचें आवरण आलें आहे आणि मग तें दूर केलें आहे, असें येथें नाहीं च.

'प्रक्षालनाध्दि पंकस्य दूरादस्पर्शनम् वरम्' ही च मूळ अवस्था. व्यवहाराचें दर्शन हि नाहीं. बापूजींच्या चरित्रांत सुधारणा आहे, येथें विकास आहे, बापूजींच्या चरित्रांत क्रांति आहे, येथें वाद आहे. बापूंजींच्या चरित्रावर गार्हस्थ्याची छटा आहे, येथें तिचा मागमूस हि नाहीं.

परंतु अशी मूळची स्वयंस्फूर्त संन्यासी भूमिका असली तरी बापूंचे अपरंपार उपकार झालेले आहेत. प्रथम आईच्याकडून परमार्थाची ओळख झाली. पुढें संतवचनांत चित्त रंगून गेलें. आतां बापूंच्या रूपानें प्रत्यक्ष संत च डोळ्यापुढें उभा राहिला. आतां चिंता च राहिली नाहीं. जगांत कसे वागावें, कोणकोणती हालचाल करावी, कसला हि विचार करण्याचे कारण नाहीं. केवळ ब्रह्मविचारांत निमग्न असावें. कर्मयोगांतील चिंता वाहण्यास बापू समर्थ आहेत अशी स्थिति होऊन गेली. "योगक्षेमं वहाम्यहम्" हें भगवंतांचें आश्वासन बापूंच्या रूपानें सर्व जगाला मिळालें. पण विशेष अर्थानें त्याची येथें प्राप्ति झाली. जगताच्या संबंधानें येणारा अनुभव आयता मिळाला आणि जगताच्या सेवेचें कर्तव्य आणि त्याची पध्दति अचूक हातीं पडली.

परंतु असें असले तरी बापूंच्या विविध उलाढालींत प्रत्यक्ष भाग घेण्याचा प्रसंग आला नाहीं. आणि अलग-अलिप्त राहून ब्रह्मविचारांची अखंडता साधत गेली. त्यामुळें बापूंच्या तत्त्वज्ञानाची, त्यांच्या अनुभवांतून निघालेल्या दिव्य स्मृतीची येथें बिनचूक मापणी होऊं शकली. थर्मामिटर ताप बिनचूक दाखवितो. कारण तो तापापासून अलिप्त असतो. तसें संन्यासी मनुष्य च तत्त्वज्ञानाची मापणी बिनचूक करूं शकतो. कारण तो कर्मापासून सर्वथैव अलिप्त असतो.

बापूंनीं हि ही भूमिका ओळखली असली च पाहिजे. नाहीं तर त्यांनीं येथल्या अवस्थेकडे पाहून 'जड भरत' ही उपमा कशी दिली असती? केवळ अंतरंगांतलें च काम कसें सोंपवलें असते? प्रथम साबरमतीला आश्रमचें छात्रालय, शिक्षण आणि प्रार्थनेंतलीं प्रवचनें, असें सर्व ज्ञानमय कर्म सोपवलें गेलें. त्यानंतर गुजराथ विद्यापीठाची स्थापना झाल्यावर 'धर्मवक्ता' म्हणून तेथें प्रवचनें देण्याची जबाबदारी सोंपवलीं. हें वस्तुतः काम नव्हतें च. अंतरंगांतलें ज्ञान प्रगट करण्याचा च हा प्रकार होता. गुजराथ विद्यापीठांत प्रथम कांहीं दिवस प्रवचनें केल्यावर तेथें जाणें बंद केलें. 'उद्योगाची धांव बैसली आसनीं' कोणता हि उद्योग येथें आसनावर बसून च व्हावयाचा. धांवाधांव करण्याची आवश्यकता च नाहीं. गुजराथ विद्यापीठांतील विद्यार्थ्यांचीं मनें भारून गेलेली च होती. ते बिचारे सकाळीं पांच पांच मैल धांवत साबरमतीच्या तीरावर प्रार्थनेंत होणारीं प्रवचनें ऐकण्यास येत असत. आणि प्रवचनें ऐकून आपणांस धन्य मानीत. संन्यासी कार्य करीत असतो तें असें.

**तेणें न पाहतां विश्व देखिलें । न करतां सर्व केलें । न भोगितां भोगिलें । भोग्यजात ॥**
**एके ठायीं बैसला । परी सर्वत्र तो चि गेला । हें असो विश्व जाहला । आंगें चि तो ॥**

अनुक्रमणिका

हें च त्याचें स्वरूप असतें. या स्वरूपामुळें तो बाह्य धांवाधांव करतांना मुळीं च दिसावयाचा नाहीं. पण त्याच्या योगानें सत्कर्माची अनंत प्रेरणा एकसारखी मिळत च जाईल.

संन्यासी कर्म करीत नाहीं म्हणजे काय आणि कर्मयोगी कर्म करतो म्हणजे काय याचा नीट उमज च कोठें दिसून येत नाहीं. कर्मयोगी म्हणजे जणूं एकसारखीं कर्मे च करणारा, रजोगुणी आणि संन्यासी म्हणजे कांहीं च न करणारा म्हणजे कर्मशून्य, आळशी, तमोगुणी, अशी एक चमत्कारिक लौकिक समजूत आहे. पण कर्मयोग्याचें कर्मपर वळण असलें तरी कोणतें हि कर्म आपलें करीत रहावें असा त्याला हव्यास नसतो. आणि संन्याशाला कर्माची जरूर नाहीं म्हणून कर्म न करण्याचा त्याचा आग्रह असतो. किंवा तो आळशी असतो असें हि नव्हे. उलट तो अनंत कर्मांचा प्रेरक असतो. भगवंतांनीं एवढ्यासाठीं सूर्याचा दाखला दिला आहे. सूर्य पाहिल्यास मुळीं च कर्म करीत नाहीं म्हणून तो संन्यासी. पाहिल्यास सतत कर्म करतो म्हणून तो कर्मयोगी. संन्यास आणि कर्मयोगांत आंतून पूर्ण ऐक्यच असतें. म्हणून च हे दोन अद्‌भुत पुरुष एके ठिकाणीं आढळून येतात. इतकें च काय एक दुसऱ्याच्या आज्ञेंत राहूं शकतो. एकमेकांचें वळण भिन्न असून त्यांत तत्त्वभेद निर्माण होत नाहीं.

तो नागपूर कॉंग्रेसचा सुमार होता. सत्याग्रहाश्रमाची शाखा काढण्याला आजपर्यंत महात्माजींनीं कोठें च संमति दिली नव्हती. परंतु मध्यप्रांतांत वर्ध्याला आश्रमाची शाखा काढण्याला त्यांनीं संमति दिली. आश्रमाचे मुख्य संचालक म्हणून रमणिकलाल मोदी यांची योजना झाली. हे गुजराथी जैन सद्‌गृहस्थ त्याप्रमाणें तयार झाले. त्यांच्या पत्नी हि तयार झाल्या. त्यांच्याबरोबर विणकाम करणारे एक गृहस्थ आणखी त्यांच्या हाताखालीं दुसरे एक गुजराथी गृहस्थ अशी ही मंडळी वर्ध्यास येण्यासाठीं तयार झाली. साबरमतीचे मुख्य व्यवस्थापक मगनलालभाई त्यांना घेऊन वर्ध्यास आले. बरोबर या संन्यासी पुरुषाला हि नेण्यात आलें. नंतर वर्ध्यास आश्रमाची १९२१ च्या संक्रांतीला सुरवात झाली. मगनलालभाईंबरोबर पुन्हां साबरमतीला मूळ ठिकाणीं येऊन पूर्ववत् कार्यक्रम सुरूं झाला. २/३ महिने झाले. वर्ध्याचे पाणी मानवलें नाहीं. म्हणून रमणिकलालभाई एकसारखे आजारी राहूं लागले. त्यांना परत बोलावून घेण्याचें ठरलें. आणि बापूजींनीं त्यांच्या जागीं या महापुरुषाची योजना केली. एका क्षणाचा हि विचार न करतां त्यांच्या आज्ञेप्रमाणें वर्ध्याला येण्याचें निश्चित केलें.

**प्रेमसूत्र दोरी । नेतो तिकडे जातो हरी**

यापेक्षां ज्यास्त कांहीं करण्याची जरूर च नव्हती. शके १८४३ चैत्र शु. प्रतिपदेच्या दिवशीं १९२१ मार्च आश्रमाची संस्थापना झाली.

सर्व सिद्धता अगोदरच झालेली होती. देवाची मूर्ति मूर्तिकार एकीकडे घडवतो. मंदिर हि दुसरीकडे चाललेलें असतें. हजारों रुपयांचा खर्च तेथें होतो. प्राणप्रतिष्ठा हि देवाला करावी लागत नाहीं. षोडषोपचार हि बिनतक्रार चालूं होतात. आरतीचा गजर, उत्सवाची झुम्मड, गाण्याचे आलाप, प्रसादाची लूट, भक्तांची गर्दी, भजनपूजनाचा सोहळा— सगळें आपोआप च होतें. देव येत नाहीं जात नाहीं. देव कांहीं करीत नाहीं. तशी ही दशा. संस्था काढावयाच्या म्हणजे कोण आटापीट करावी लागते. फंड जमवा, हिशेब द्या, शेट— सावकारांचे ऊंबरे झिजवा, याची त्याला आणि त्याची याला भीड घाला, व्याख्यानें द्या, कार्यक्रम करा, लेख लिहा, विनंत्या काढा—महामेहनतीनें त्या संस्था चालतात. पण येथें तसें नाहीं. येथें याच्या अगदीं उलट स्थिति—हे हजारों रुपये घ्या, आणखी ह्या टोलेजंग इमारती स्वीकारा. ही जमीन आपणालाच अर्पण केली

अनुक्रमणिका

आहे. अशी लोकांकडून आयती सामुग्री चालत यावयाची. संन्यासाची ही परम रमणीय अवस्था आहे. वस्तुतः त्याला कांहीं च नको असतें. पण त्याला कांहीं तरी निमित्तानें गुंतवून त्याचा सत्संग कसा मिळवावा ही च चिंता भक्तांना लागलेली असते. तो वैभवाला तर भुलणें शक्य नाहीं. मग त्याला संस्था काढण्याला सांगतील, त्याच्यापुढें लोकसेवेच्या निरनिराळ्या योजना मांडल्या जातील. असे हे त्याच्या सिद्धीचे सगळे खेळ आहेत. पण तो मात्र संतांची आज्ञा म्हणून तेथें राहतो. त्याला लोकसेवा दोन्ही अर्थांनीं नाहीं. तो लोकांची सेवा घेत हि नाहीं आणि लोकांची सेवा करीत हि नाहीं.

बापूजींना हें सगळें माहीत होतें. त्यांच्या कर्मयोगाच्या भात्यांत हा रामबाण संन्यासी पडलेला होता. आणि हा रामबाण सोडायचा कोठें हें त्यांनीं आतां नीट हेरलें होतें. सत्याग्रहाश्रमाच्या नवीन आवृत्तीसाठीं त्यांनीं त्याची योजना केली. कारण हें कार्य च असें होतें कीं एक तर बापूजींसारखा पूर्ण कर्मयोगी तें करूं शकेल किंवा येथल्याप्रमाणें पूर्ण संन्यासी तें पार पाडील. इतरांच्या हांतून तें व्हावयाचें नाहीं. कारण आश्रम आणि इतर संस्था यांत उत्तर-दक्षिण ध्रुवाइतकें अंतर. तेथें विद्वत्तेनें, पैशानें, मनुष्य बळानें काम व्हावयाचें. पण येथें परमेश्वरानें सांगितलेल्या दुहेरी निष्ठेच्या पूर्णतेशिवाय मुळीं च चालावयाचें नाहीं. त्या दुहेरी निष्ठेपैकीं संन्यास तर मुळांतच मुरलेला होता आणि कर्मयोगाची कसोटी बापूंच्यापाशीं लागलेली होती. त्यामुळें बापूजींनीं अत्यंत खात्रीपूर्वक ही योजना केली होती. ते निर्धास्त होते कीं आतां या नव्या आश्रमांत जीं जीं माणसें येतील त्यांना त्यांना योग्य वळण मिळूं शकेल. साबरमतीला च छात्रालयांत त्यांना हा अनुभव येऊन चुकला होता. आणि खरोखर येथें हें सामर्थ्य स्वतःसिद्धपणें च भरलेंलें होतें कीं

**तो जयाकडे वास पाहें । तेउती सुखाची सृष्टि होये**
**तो म्हणे तेथ राहे । महाबोध**

अनुक्रमणिका

## प्रकरण २९ वें

## वर्ध्याचा भगीरथ

**वर्धा** हें नदीचें नांव. पण तेंच गांवाला हि लावण्यांत आलें. बरें, गांव वर्धा नदीच्या कांठीं असावें तर तें हि नाहीं. वर्धा नदीपासून वर्धा गांव वीस मैल दूर. मुख्य गांवाला वर्धा नांव मिळाल्यामुळें जिल्ह्याला तर तें स्वाभाविकच लावण्यांत आलें. आणि यांत कांहीं आश्चर्य हि नाहीं. आपल्या सबंध देशाचें नांव च एका नदीवरून पडलें आहे. सिंधु नदीवरूनच हिंदुस्थान नांव पडलें. पंच नद्यावरून पंजाब नांव पडलें. कृष्णा नदीवरून तैलंगणातला कृष्णा जिल्हा झाला. तसा च गोदावरी वरून गोदावरी. आणि वर्धा नदीवरून वर्धातट नांव पडून त्याचा अपभ्रंश वऱ्हाड व्हावा ही गोष्ट हि चालत आलेली आहे.

आपला सबंध देश म्हणजे मातृस्वरूप आहे. नदीहून आईचें दर्शन दुसरें कोठें घडेल? नदी म्हणजे मातृदर्शनाचा आदर्श. भारतवर्षाची मर्यादा च मुळीं सरस्वती आणि दृषद्वती या दोन नद्यांचीं कल्पिलेली आहे. भारतीय संस्कृति ही आईची संस्कृति आहे, हें त्यावरून समजून येतें. आई म्हणजे काय? पवित्र करूणा. नदी ही करूणेची मूर्ति आहे. हें मर्त्यजीवन म्हणजे करूण जीवन आहे. येथले सर्व रस करूणरसाच्या सत्तेखालीं राबत असतात. अशा स्थितींत या जीवनाला आधारभूत अशी कारूण्यमय संस्कृति जर नसेल तर किती शोचनिय अवस्था होईल? भारतीय संस्कृतीची एक मर्यादा दृषद्वतीची म्हणजे दगडा सारख्या जडांना हि आपल्या करूणेची पाखर घालणारी आहे आणि दुसरी मर्यादा सरस्वतीची. मोठमोठ्या गतिमंतांना हि गति देणारी अशी ही मर्यादा आहे. याच भारतीय संस्कृतीनें भरलेलें नदीचें नांव या गांवाला मिळालें. या नदीच्या नावांचें च काय प्रत्यक्ष भारतीय संस्कृतीची गंगा च येथें आणावयाची असा कृतनिश्चय येथल्या भगीरथ प्रयत्नाच्या एका पुरुषानें केला. आणि भारतीय संस्कृतीचे प्रतिनिधी महापुरुष हि या गांवांशेजारी त्यानें आणले.

अशा या गावाच्या आजूबाजूचा भाग अगदीं सामान्य. बहुतेक सपाट असाच आढळतो. कारण सबंध वऱ्हाड नागपूरचा मुलूख च मुळीं सपाट आहे. त्यामुळें महाराष्ट्रांतलें डोंगरांतलें निसर्गसौंदर्य येथें नाहीं पण

**माशिया जैसे मोहळ । जळचरां जैसे जळ**
**पक्षियां अंतराळ । मोकळें हें**

असा मोकळेपणा मैदानी मुलखामुळें आणि विस्तीर्ण आकाशामुळें येथें अनुभवावयास सांपडतो. येथील महापुरषांच्या चरित्रांत आणि चारित्र्यांत सौंदर्यापेक्षां मोकळेपणाचे म्हणजे सत्य-अहिंसेचें अधिक दर्शन असल्यामुळें ही समानशीलतेची जोडी मात्र सौंदर्यवर्धक ठरावी यांत आश्चर्य कसलें? तरी वर्ध्याच्या समोर रेल्वे लाईनीच्या दक्षिणेस लहानशा टेकड्यांची रांग दृग्गोचर होते. त्याचप्रमाणें उत्तरेकडे दूर क्षितिजावर हि डोंगरांच्या रांगा दृष्टिपथांत येतात. गांवाजवळची हनुमानगडची प्रसिद्ध टेकडी हि ध्यान खेंचून घेते.

तसें पाहिलें तर हें गांव मूळचे मोठें नव्हे, पालकवाडी नांवाचें हें खडे च. परंतु तें जिल्ह्याचें ठिकाण बनलें. त्यामुळें त्याचें नांव बदललें. आणि वर्धा म्हणजे वर्धमान स्थितींतले गांव अशी स्थिति प्राप्त झाली. खेड्याचा देखावा जाऊन

अनुक्रमणिका

**घरें सुंदरें लोक नानापरीचे ।**

असें वळण येथें दिसूं लागलें.

**अभागी किती लोक भाग्यास आले ।**
**कितीयेक ते भाग्य निर्भाग्य झाले ।**
**कितीयेक ते सुकृति वाढताती ।**
**कितीयेक ते पातकी मोडताती ॥**

अशा उलाढाली प्रत्यहीं होऊं लागल्या. हिंदुस्थानच्या मध्य केंद्रावर असल्यामुळें मुंबई, कलकत्ता, मद्रास, पेशावर कोठें हि मध्यें न उतरतां जातां यावें असें हें सोईचें ठिकाण झालें. क्रमाक्रमानें मुलांच्या शाळा, वसतिस्थानें, मशीदी, मंदिरें, ख्रिश्चन चर्चे, बाजार, धर्मशाळा, छापखाने, पुस्तकालयें असा व्याप वाढत चालला आणि

**नातरी नगरांतरी वसिजे । तरी नागर चि होइजे**

हा अनुभव पांढरपेशांना येऊं लागला. खेड्याची सहजता जाऊन कृत्रिमतेचें केंद्रीकरण होऊं लागलें. खेड्यावरून गाड्यांत आपला माल घेऊन गरीब लोक येथें येऊं लागले.

**मन चंचल हें कृष्णा हट्टी छळितसे बळें ।**
**धांवे वाऱ्यावरी त्याचा दिसे निग्रह दुष्कर ॥**

ही मनस्थिति येथील जीवनांत पहावयास सांपडूं लागली. जिकडे तिकडे धावाधाव चालली आहे, चांचल्याची प्रतीर्ति येते आहे, जो तो कोलाहलातून आपला मार्ग काढीत आहे, हेंच दृश्य गांवांत दिसूं लागलें. परंतु “कांहीं गल्बला कांही निवळ” या समर्थोक्तीप्रमाणें सरकारी अंमलदार रहात त्या सिव्हिल लाईन मध्यें एकांत राखला गेला. दूर दूर बंगले, प्रशस्त रस्ते, रस्त्याच्या दुतर्फा झाडी अशी रचना केली गेली. या सिव्हिल लाईन मध्यें चर्चजवळ असलेली एक एकांत जागा, चारी बाजूला मोठमोठीं झाडें असलेली फार सुंदर दिसे. हा सिव्हिल लाईनचा भाग जवळ जवळ गांवा एव्हढाच मोठा बनला. येथें च जेल, कोर्ट-कचेऱ्या, पोलिस लाईन, कलेक्टर, जज्ञ, डी. एस. पी. वगैरेंचे बंगले असा सर्व सरकारी पसारां पडला. याच सिव्हिल लाईनला लागून मारवाडी शिक्षामंडळाची मारवाडी विद्यालयाची प्रचंड इमारत व बोर्डिंग बांधलें गेलें. या सिव्हिल लाईनच्या एकांत भागाखेरीज गांवाच्या पूर्व बाजूला शिंदी गांवाकडे हि गांव सरत असल्यामुळे बराच एकांत असे. त्या भागांत बगीचे आणि कापसाच्या जिनांचा देखावा दिसे.

परंतु, वर्ध्याला गांवाचें किंवा गांवाबाहेरचें असें कोणतें हि आकर्षण नव्हतें कीं जें महात्माजीसारख्यांना तेथें आश्रम स्थापावयास लावील. वर्धा गांवाप्रमाणें अनेक गांवें दाखवितां येतील. मग महात्माजी कोणत्या आकर्षणामुळें वर्ध्याला आश्रमाची संस्थापना करण्यास तयार झाले?

**नाहं वसामि वैकुंठे योगिनां हृदये रवौ । मद्‌भक्ता यत्र गायन्ति तत्र तिष्ठामि नारद ॥**

अनुक्रमणिका

भगवान् ज्याप्रमाणें भक्ताला भुलतो, त्याचप्रमाणें महात्माजी हि येथल्या एका श्रेष्ठ भक्ताला वश होऊन त्यांनीं आश्रमाची शाखा वर्ध्यास उघडण्याची संमति दिली. तो श्रेष्ठ भक्त म्हणजे श्री. सेठ जमनालाल बजाज. तो भक्त असून भक्तीचा पोषाख तेथें मुळीं च नव्हता जपजाप्य, स्नानसंध्या, भजनपूजन, यात्राप्रदक्षिणा असले प्रकार तेथें दिसावयाचे नाहींत. परंतु भक्तीची भूमिका मात्र तेथें आंतून तयार होत गेलेली होती. त्यांतून आणखी आश्चर्याची गोष्ट अशी कीं संपत्तीचा वेढा त्यांच्या भोंवती अखंड पडलेला असे. भक्त आणि श्रीमान ही जोडी जमावयाची च नाही. ग्यानबा-तुकारामाची काय दशा होती? पण येथें ही जोडी जमल्या सारखी दिसे. परंतु हें वरवरचें च पाहणें. हा संपत्तीचा पसारा त्या भक्ताला खरोखर वेढूनच होता पण तो त्याच्या आंत कधीं च शिरूं शकला नाहीं. नांव पाण्यांत खुशाल राहो पण पाणी कांहीं नावेंत शिरूं शकत नव्हतें. हें सत्य होतें. लक्ष्मीकडे हा मातृभावानें पाही. ती देवदेवाची दासी. आपली माता. आपण तिचे मालक नाहीं. आपण तिचे सेवक. अशी च त्याची भावना असे. लक्ष्मीनारायणाचें सुंदर मंदिर त्याच्या राजवाडेवजा घराला लागून दिसे. ते केवळ त्याच्या अंतःकरणांतल्या महान् भावनेचें परंपरागत आलेलें एक लहानसें चिन्ह होतें इतकें च म्हणतां येईल. हा भक्त लक्ष्मीचा सेवक असल्याकारणानें त्यानें तिची हरप्रकारें सेवा करून पुष्कळ धन मिळवून जणूं काय तिला परिपुष्ट केलें. मूळच्या ५/६ लाख धनाला त्यांनें पटीपटीनें वाढवलें.—आपल्या कर्तृत्वाच्या जोरावर त्यानें त्याची वाढ केली. मराठी ४ इयत्ते पलीकडे शिक्षण नाहीं. परंतु मोठमोठ्या पदवीधरांची ह्यानें तेव्हां च पारख करावी. लफंगा कोण, सज्जन कोण, दिखाऊ कोण, खरा कोण, पोषाखी कोण, मेहनती कोण, हे त्याला तेव्हां च समजावयाचें. हा भक्त असून श्रीमान होता, हा जसा विरोधाभास तसा हा भक्त असून भोळा नव्हता हा हि एक विरोधाभास च म्हणावयाचा. चातुर्य त्याच्या पुढें नेहमीं हात जोडून उभें असें.

**न्याय नीति विवेक विचार । नाना प्रसंग प्रकार । परीक्षिणें परांतर । देणे ईश्वराचें ॥**

हें ईश्वरी देणें त्याला जन्मतः च लाभलें होतें. आणि हें ईश्वरी देणें त्यानें देण्यांत च खर्च केलें. म्हणजे दानांत च खर्च केलें. लहानपणीं श्री. वच्छराज या श्रीमान मारवाडी गृहस्थाकडे हा दत्तक आला होता. दुकानाचे काम नीट कसोशीनें पहावें म्हणून त्यांनीं रोज एक रुपया देण्याचें प्रलोभन उत्पन्न केलें होतें. पण 'लाभाल्लोभः प्रवर्तते' हा नियम येथें अपवाद ठरला. असा रोजचा एकेक रुपया जमवून या बालभक्ताने एका वर्तमानपत्राला १०० रुपये चे दान केलें. आणि आपली भक्तीची भूमिका सिद्ध केली. कारण भक्ति म्हणजे सेवा. या सेवेचा हर्ष हृदयांत मावेना. पुढें लाखो रुपयांचें दान केलें पण त्या बालवयांतल्या शंभर रुपयांच्या दानावरचीं तीं दानें केवळ शून्यें च ठरलीं! त्यांची किंमत उरली च नाहीं. हें वय केवळ १३-१४ वर्षाचें होतें. बच्छराज हे गृहस्थ क्रोधी असून शिव्यागाळी करणारें होते. कांहीं कारणानें ते या मुलावर नाराज झाले. त्यावेळीं या तेजस्वी १७ वर्षाच्या मुलानें सर्व संपत्तीचा त्याग करून बच्छराजजींना मारवाडींत पत्र लिहिलें. त्या पत्रांत या भक्ताची श्रेष्ठ मनोभूमिका प्रतिबिंबित झाली आहे.

**॥ श्रीगणेशजी ॥**

सिद्ध श्री. वर्धा शुभस्थान पूज्य श्री. बच्छराजजी रामधनदास सुँ लिखी चि. जमन का पावाधोक बांचीजो । अठे उठे श्रीलक्ष्मीनारायणजी महाराज सदा सहाय छे । उपरंच समाचार एक बांचीजो । आपकी तबीयत आज दिन हमारे ऊपर निहायत नाराज होय गई सो कुछ हरकत नहीं । श्री. ठाकुरजीकी मरजी और गोद का लियोडा था आप इस तरह कहयो । सो आपको कुछ भी कसूर नहिं, जिको हमाँ ने गोद दियो जिनेको कसूर छे । बाकी आप कयो कि तुम नालिस करो सो ठीक । बाकी हमारो आपके उपर कुछ कर्जो छे

नहीं । आपको कमायडो पीसो छे । आपकी खुसी आवे सो करो । हमारो कुछ आप ऊपर अधिकार छे नहीं । हमाँ आप सो आज मिती ताई तो हमारे बारेमें अथवा जो हमारे ताई जो खर्च हुयो सो हुयो बाकी आज दिन सुँ आप कनेसूं एक छदाम कोडी हमाँ लेवांगा नहीं, अथवा माँगावाँगा नहीं । आप आपके मन माँ कोई रीत का विचार करजो मत ना । आपकी तरफ हमारो कोई रीत का हक आज दिनसो रहयो छे नहीं और श्रीलक्ष्मीनारायणजी सुँ अर्ज ये है कि आपको शरीर ठीक राखे और आपनो हाल बीस पचीस बरस तक कायम राखे । और हमाँ जठे जावाँगा, बठे सुँ थाके ताई इस माफिक ठाकुरजीसे विनती करेंगा । और म्हारे सूं जो कुछ कुसूर आज ताई हुयो सो सब माफ करजो । और आपके मनमें हो की सब पीसा का साथी है, पीसा के ताँई सेवा करे छे सो हमारे मनमाँ तो आपकी पीसा की बिल्कुल छे नहीं. और भी ठाकुरजी करेंगा तो आपके पीसे की हमारे मनमाँ आगे भी आवेगी नहीं । कारण हमारो तगदीर हमारे साथ छे । और पीसो हमारे पास होकर हमाँ काई करेंगा । म्हाने तो पीसा नजीक रहने की बिल्कुल परवा छे नहीं । आपकी दयासे श्री ठाकुरजीका भजन सुमरन जो कुछ होवेगा सो करेंगा । सो इस जनम माँही भी सुख पावेगा और अगला जनम माँही भी सुख पावेगा । और आप आपके चित्त माँ प्रसन्नता राखियो । कोई रीत को फिकर करजो मतना । सब झूठा नाता छे । कोई कोई को पोतो नहीं । और कोई कोई को दादो नहीं । सब आप आपका सुखका साथी छे । सब झूठो पसारो छे । आप हाल ताई मायाजाल माँही फँस रहया छो, हमां आज दिन आपके उपदेश सुँ मायाजाल सुँ छूट गया छां । आगे श्री भगवान संसार सुँ बचावेगा । और आपके मन माँ इस तरह बिल्कुल समझजो मतना कि हमारे ऊपर नालिस फरियाद करेगा । हमाँ हमारे राजीखुशी सों टिकट लगाकर सही कर दीनी छे कि आपके ऊपर अथवा आपकी स्टेट पीसा रवया गहना गाँठा और कोई भी सामान ऊपर आज से बिल्कुल हक रहयो नही सो जाणजो । और हमारे हाथ को कोई को करजो छे नहीं । कोई ने भी एक भी पीसो देनो छे नहीं सो जाणजो । और तो समाचार छे । और समाचार तो बहुत छे, परंतु हमारे से लिखो जावे नहीं । संवत् १९६४ मिती वैसाख वदी २ मंगलवार ।

एक आनेका टिकट

पूज्य श्री. १०५ दाद जी श्री १०५ वच्छराज जी सुँ जमन का पांवा धोक बाँचीजो । घणो घणो मान सेती आपकी तरफ हमारो कोई रीति को लेनदेन रही नहीं । श्रीठाकुरजीके मन्दिर को काम बराबर चलाजो । और आप सुँ दान धरम बने सो खूब करता जाइयो और ब्राम्हण साधू ने गाली बिल्कुल दीजो मत ना और कोई ने भी हाथ का उत्तर देइजो, मुँह का उत्तर दीजो मत ना । ज्यादा कॉई लिखाँ । इतना माँहे समझ लीजो । और हमाँ आपकी चीजाँ सागे लयाँगा नहीं । सो सर्व अठेई आपका छोड गया छाँ खाली आंग ऊपर कपडा पहरेयाँ छाँ ।

महात्माजी या भक्ताला कां भुलले हें विचारण्याचें आतां प्रयोजनच उरणार नाहीं. या पत्रांत त्याचा सर्व उलगडा आलेला आहे. बच्छराजजी हि या पत्रांनें विरघळले हें काय सांगावयास पाहिजे? पुढें क्रमानें सर्व कारभार हातीं येऊन हा भक्त मोठी धनिक सेठ बनला. सरकार दरबारी हि त्याचा मोठा सन्मान झाला. परंतु

**नहिं कोई अस जनमा जगमांही ।**
**प्रभुता पाई जाहि मद नाहीं ॥**

अनुक्रमणिका

हें वाक्य त्यानें खोटें ठरविलें. त्याच्या लीनतेची कमान उत्तरोत्तर वाढत गेली. सज्ज्नसंगतीची लालसा त्याला स्वस्थ बसूं देईना. सेवेपुढें त्याला दुसरें कांहीं सुचेना. नाना प्रकारच्या परोपकारी सेवाकार्यार्थ त्यानें सतत धन खर्चावें, अनेक योजना घडाव्या असें घडूं लागलें. परंतु

**तेथें तारुण्य वोसरेना । रोगव्याधी हि असेना**
**वृद्धाप्य आणि मरण येना । कदाकाळीं**
**तेथें एकाहूनि एक सुंदर । तेथें येकाहूनी येक चतुर**
**धीर उदार आणि शूर । मर्यादेवेगळे**
**तेथें दिव्य देह ज्योतिरूपें । विद्युल्लतेसारखी स्वरूपें**
**तेथे येश कीर्ति प्रतापें । सीमा सांडिली**

असा एक आदर्श आपल्यापाशीं असावा ही तळमळ कांही मावळेना. हा आदर्श कोठे मिळावा? टोलेजंग विश्वविद्यालयें, नाना प्रकारचीं संशोधन-मंदिरें, कॉंग्रस सारख्या राजकीय संस्थांच्या प्रचंड संघटना, वर्तमान पत्रांच्या प्रचारयोजना, मोठमोठीं पुस्तकालयें या सर्वांची कामें पाहून आणि त्यांना लाखों रुपये देऊन हि हा आदर्श मिळेना. गांधीजी ज्या तऱ्हेनें राहतात, गांधीजी ज्या तऱ्हेचे सेवक बनवूं इच्छितात ती तऱ्हा, तो आदर्श इतरत्र कोठे दिसेना. त्या आदर्शासाठीं तन-मन-धन खर्चण्याची पूर्ण तयारी होती. पण तन-मन-धनाच्या दानानें तो आदर्श मिळण्याजोगा नव्हता. हा दान देणारा भक्त खरा पण येथें त्याला स्वतःलाच हें दान मागण्याचा प्रसंग आला! देवापाशीं जावयाचें आणि मग काय कसें मागावें ही भीड ठेवावयाची? कां तेथें मी धनिक ही वणिक् वृत्ति आठवावयाची? खरा भक्त काय आपलें सर्व शरीरबळ, धनदौलत, विद्वत्ता, आणि मान-मान्यता ही विसरून देवापुढें निःशंक हात पसरणार नाहीं? येथें हि ती च वृत्ति बाणलेली होती. या भक्ताने बापूजींपुढें हात पसरला.

**देखा धवळारी चिंतामणीचा । जरी पहुडला होय दैवाचा**
**तरी वीसणतां हि बोलु तयाचा । परी सोपु न वचे**
**कामधेनुचा पाडा । वरी कल्पतरूचा आहे मांदोडा**
**म्हणोनि मनोरथ सिद्धीचिया चाडा । तो नवल नोहे**

चिंतामणीच्या महालांत निजलेला मनुष्य जें बरळेंल तें सिद्धीस जावें किंवा आधीं च कामधेनूचा वत्स आणि त्यांत कल्पतरूच्या मांडवाखालीं उभा राहिला तर त्याच्या मनोरथांना कोंब फुटतो न फुटतो तों च तेथें फळांचा बहार यावा यांत आश्चर्य कोण मानील? महात्माजींनीं या भक्ताचें कोड पुरवलें. सत्याग्रहाश्रमाची शाखा वर्ध्यास काढण्याची परवानगी देऊन आपलीं माणसें हि पाठविलीं.

परंतु या पाठीमागें अनेक प्रयत्नांची परंपरा उभी होती, हें लक्षांत ठेवलें पाहिजे. महात्माजींनीं एकाएकी च ही कल्पना मान्य केली असें मानण्याचें कारण नाहीं. आश्रमाची गंगा आणण्याला या भक्ताला भगीरथ प्रयत्न करावे लागले. केवळ आश्रमच काय परंतु सर्व हिंदुस्थानच्या सेवेचें हें केंद्र करण्याचा हव्यास या भक्तानें धरला होता. त्याप्रमाणें क्रमाक्रमानें त्याची पूर्तता होत गेली. आणि वर्ध्याला महात्माजींसारखा अलौकीक दाता, जमनालालजीसारखा भगीरथ प्रयत्न करणारा भक्त, आणि सर्व आश्रम ज्यानें आपल्या एकाच व्यक्तींत केंद्रित करून घेतला, ज्यानें सर्व तत्त्वज्ञान आपल्या ठिकाणीं मुरवलें त्या महापुरूषासारखा आश्रमसंचालक, हा त्रिवेणीसंगम जुळून आला. भगीरथाच्या प्रयत्नाची ही अपूर्व गंगा येथें वाहूं लागली.

अनुक्रमणिका

प्रत्यक्ष आपल्या प्रयत्नांचीं ही मधुर फळें डोळ्यांनीं पाहून हि या भक्ताच्या ठिकाणीं अहंकाराची छटा हि उमटत नाहीं. विरक्तीचा यत्किंचित हि भंग होत नाहीं. प्रयत्नाच्या कर्कशतेचें आघात होत असून कटुतेचा लेश हि येथें उत्पन्न होऊं शकत नाहीं. बालकवत् निरहंकारता आणि साखरेसारखी गोडी, यांची जोडी येथें अखंड क्रीडा करतांना दिसून येते. त्यामुळें वर्ध्याचा हा भगीरथ खरोखर भगीरथ आहे हें हि पाहणाराच्या लक्षांत येत नाहीं. इतकी सत्वाची स्वाभाविकता त्याच्या ठिकाणीं मुरून गेली. भगीरथ प्रयत्नांची पराकाष्ठा ती ही च. प्रयत्नांचा प्रयत्नपणा च जाऊन आतां तेथें ज्ञानेश्वरांच्या वचनांची सृष्टि निर्माण झाली.

**जैसें अवचितपणें । वायूसि विचरणें**
**कीं निरभिमान उदैजणें । सूर्याचें जैसें**
**कां श्रुति स्वभावतां बोले । गंगा काजेवीण चाले**
**तैसें अवष्टंभहीन भलें । वर्तणें जयाचें**
**ऋतुकाळीं तरी फळती । परी फ़ळलों हें नेणती**
**तया वृक्षांचिये ऐसि वृत्ति । कर्मी सदा**

●●●

अनुक्रमणिका

## प्रकरण ३० वें

## वर्धा आश्रमाची सुरुवात

**वनं तु, सात्त्विको वासो ग्रामो राजसमुच्यते ।**
**तामसं द्यूतसदनं मन्निकेतं तु निर्गुणम् ॥**

**सात्त्विक** ठिकाण हें गांवात असणें शक्य नाहीं. कारण गावांतली राजस-तामस वर्दळ ही सात्विकतेला सर्वस्वी विरुद्ध ठरते. म्हणून आश्रमासारख्या संस्था प्राचीन कालापासून अरण्यांत, नदीच्या तीरावर किंवा पर्वतासन्निध एकांतांत असावयाच्या अशी भारत वर्षांतली ऋषींची परंपरा चालत आलेली आहे. ज्ञानाच्या लक्षणांत भगवंतांनीं ती परंपरा गोवून टाकली आहे.

**आणि तीर्थें धौतें तटें । तपोवनें चोखटें ।**
**आवडती कपाटे । वसवूं जया ॥**
**शैलकक्षांची कुहरें । जळाशयपरिसरें ।**
**अधिष्ठि जो आदरें । नगरा न ये ॥**
**बहु एकांतावरी प्रीति । जया जनपदाची खंती ।**
**जाण मनुष्याकारें मूर्ति । ज्ञानाची तो ॥**

ज्ञानेश्वरमहाराजांनीं असें त्याचें स्पष्टीकरण केलें आहे. मूळ साबरमती आश्रम हि अशाच एकांतस्थळीं नदीतटाकीं बसला होता. त्या च आश्रमाची वर्ध्याची शाखा ती हि तशाच स्थळीं वसावी यांत नवल नाहीं. मुळाप्रमाणें च फळ असावयाचें.

**हें शब्देंवीण संवादिजे । इंद्रियां नेणतां भोगिजे ।**
**बोलाआदी झोंबिजे । प्रमेयासी ॥**

इतकी हळुवार साधना चालावी अशी जेथें अपेक्षा, त्या ठिकाणचें वातावरण हि तसें च असावें, तेथली आजूबाजूची स्थिति हि त्या साधनेला अनुरूप असावी हें स्वाभाविक च म्हणावें लागेल. सेठ जमनालाल बजाज स्वतः जरी गावांत राजवाडेवजा महालांत रहात असत तरी त्यांना आश्रमस्थानाची कल्पना होती. त्यांना च काय प्रत्येक भारतीयाला आश्रमस्थानाची कल्पना असते. पावित्र्य, स्वच्छता, निसर्ग, एकांत या तेथल्या अगदीं प्राथमिक गोष्टी आहेत. त्याशिवाय आश्रमाचें स्थान होऊं च शकत नाहीं. स्वराशिवाय गाणें, पाण्याशिवाय सरोवर किंवा लिपीशिवाय लेख ह्या जशा केवळ कल्पना च. तशी एकांताशिवाय आश्रम ही हि कल्पना च मानावी लागेल. त्यामुळें वर्धा आश्रमाला सुरुवातीला जमनालालजींनीं जी जागा दिली ती गांवाच्या पूर्वेकडे विस्तीर्ण आणि एकांत असलेल्या बगीच्यांत दिली.

हा बगीचा गांवाबाहेर असला तरी तसा गांवापासून दूर होता असें नाहीं. परंतु गांवाचा गल्बला येथें नसे. बगीच्यांत जिकडे तिकडे हिरवें दृश्य दिसें. मोठीं झाडें हिरवीं, लहान रोपटीं हि हिरवीं. मध्यें वाढलेलें गवत हि हिरवें. भाजीपाला लावलेला तो हि हिरवा च. मधून मधून झाडावर पक्षी बसत ते हि बहुतेक हिरवे

च. मधला रस्ता मात्र वेगळा दिसे. पक्षांच्या चोचीं आणि फुलांचे रंग वेगळे दिसत बाकी तेथें हिरव्या रंगाचें अद्वैत पसरलेलें असे. सर्वत्र हिरव्याचार झाडांची दाटी लागलेली असें. त्या झाडांना रोज पाणी दिलें जाई. त्यासाठीं मोटा चालत. मोटींच्या चाकाचा मधुर आवाज आणि मध्यें च 'धो' असा मोटेंतलें पाणी पडल्याचा ठेका कानीं पडून सौंदर्य आणि नाद यांचा लय लागल्यासारखा वाटें. त्यांत फुलांचा परिमळ हि वाऱ्याबरोबर मिश्रित व्हावा एवढी भरपूर फुलझाडें बगीच्यांत लावलेली होती. गुलाब, मोगरा, शेवंती, जाई, जुई इत्यादि फुलें आपलें सत्‌दानाचें कार्य बिनतक्रार अखंड करीत असत. त्यांत मुळीं च कसूर व्हावयाची नाहीं. त्यामुळें तेथें नादाबरोबर सुगंध हि दरवळून गेलेला असे. फक्त रसाची च उणीव कधीं कधीं भासावी. कारण रस सांठवणारीं फळें नेहमी च दिसत नसत. फळांचा बहर नेहमीं कोठून असणार? पण जेव्हां तो असे त्या वेळीं तो खरोखर अकल्पनीय होऊन जात असे. विशेषतः संत्र्यांची झाडें तर फळांनीं नुसती लदून गेलेलीं असत. शाखा मोडून पडण्याच्या तयारींत आहेत. पण माळ्यांनीं टेके दिल्यामुळें च त्या मोडत नाहींत. मात्र जमीनीपर्यंत अगदीं वांकून गेल्या आहेत. त्यामुळें—

**फळतिये तरूची शाखा । सहजे भूमीसी उतरे देखा ।**
**तैसे जीवमात्रा अशेखा । खालावती जे ॥**

असें दृष्य येता जातांना दिसावयाचें. त्या फळांपैकीं कांहीं फळें तोडून खावीं ही अभिलाषाबुद्धी च त्या फळांना पाहून मावळून जाई. चैतन्याचें अंतर्वैभव त्या फळांच्या रूपानें फुटून निघालेंलें पाहून तेथें च मन खिळून जाई. तेथें मुखांत तीं फळें कोंबावीं हा अन्याय च वाटे. तसें च फुलांचें. तीं नाना रंगांनीं नटलेंलीं कोमल फुलें आपल्या हातांनीं खुडावीं आणि नाकांत घालावीं हा केवढा अपराध! तो अपराध आश्रमीयांकडून होणें हें शक्य नव्हतें. कारण आश्रमाच्या आचार्यांना ती गोष्ट क्षणभर हि सहन होणें शक्य नव्हतें. त्यांना यत्किंचित हि खपत नसे. पर्वताएवढी आसक्ति असली तरी आसक्त पुरुषाला ती फुलासारखी वाटते. आणि विरक्ताला फुलाच्या आसक्तीचा हि पर्वताएवढा भार वाटतो. म्हणून भक्तीमध्यें ईश्वराला च फुलें वहावीं असा विनियोग केलेला आहे. या बगीच्यांतल्या फळांची आणि भाज्याचीं हि ही च गोष्ट. येथलीं फळें तोडणें किंवा येथलीं भाजी खुडून आश्रमांत आणणें हें आश्रमाच्या शिस्तीविरुद्ध गणलें गेलें होतें. हा आश्रम या बगीच्यांत होता. तरी या बगीच्यापासून तो सर्वथैव अलिप्त होता. बगीच्यांत माळ्यांचीं झोंपडीवजा घरें होतीं. तेथें च गाईबैलांचा गोठा असे. शिवाय व्हिक्टोरियाचा पुतळा हि बगीच्यांत बसविला होता. त्यासमोर हिरवळ तयार करून बसण्याला बाक ठेवले होते. सकाळ संध्याकाळ सहल करीत गांवांतले लोक तेथें येऊन गप्पा मारीत बसत. पण त्यांच्याशीं हि आश्रमीयांचा बिलकूल संबंध येत नसे.

आश्रमाची इमारत बगीच्यांतील विहिरीजवळ च चांगली मजबूत बांधलेली. वर सर्वत्र गच्ची. एक च मजला. अशी ती इमारत त्या बगीच्यांत जणू काय लपून राहिल्यासारखी दिसे. इमारतीमध्यें खडे बसवून नकशी केलेली गुळगुळीत फरसबंदी जमीन होती. ती आश्रमाला शोभेशी नव्हती यांत शंका नाही. त्या जमिनीचा एकंदर थाट विलासी जीवनाची साक्ष पटवीत असे. आश्रमजीवनांतली दृष्टि विकासाकडे खिळलेली असावयाची तेथें विलासाला यत्किंचित् हि स्थान नाहीं. चारी बाजूला चौक, इमारत मध्यें चौक अशी ही बंदिस्त जागा असल्यामुळें आंत राहणारे गच्चीवर चढतील किंवा खिडकींतून बाहेर डोकावतील तर च बगीच्याचें दर्शन व्हावें नाहीं तर आपण जगापासून वेगळें आहोंत. येथें बहिर्दृष्टीला मुळीं च वाव नाहीं.

अनुक्रमणिका

**अंतरकी अखियाँ खोलो जी ।**
**बैठो साधुसंतनकी संगत मधुरी बानी बोलो जी ।**
**चिदानंदका दरशन करके प्रेम मगन हो डोलो जी ।**
**मानपुरी कहे चार खान में आप हि आप अकेलो जी ॥**

—असें अंर्तदृष्टिमय एकाकित्वाचें भान करविणारी ती इमारत होती. त्यांत पुन्हां आश्रमांत काम करीत असतां मुळीं च न बोलण्याची शिस्त येथल्या आचार्यानें लावून दिलेली होती. तलवारीला म्यान आणि जिभेला मौन हें येथलें तत्त्व असल्यामुळें एकाकित्वाला आणखी च खुलावट दिल्यासारखें होई. आणि निःशब्दपणें वावरतांना ज्ञानेश्वरांच्या ओव्यांची आठवण तें स्थान सहज करून देई.

**बहु करूनि निःशब्द । दाट न रिघे स्वापद ।**
**शुक हन षट्पद । तेडतें नाहीं ॥**
**पाणिलगे हंसें । दोनी चारी सारसें ।**
**कवणें एके वेळे बैसे । कोकिळ ही हो कां ॥**

अशा त्या स्थानीं खरोखर च कधीं कधीं कोकिळा येऊन पंचमालावाचें उपनिषत् ऐकवीत.

तें उपनिषत् ऐकत ऐकत चरख्याची अखंड उपासना तेथें सुरूं असावयाची. एका खोलींत पिंजाऱ्याची पिंजण सारखी 'तुंही तुंही' बोलून निरहंकारित्वाचा उपदेश करीत असे. 'तूं च आहेस ईश्वरा! मी नाहीं. तूं च. तूं च. 'तुही' 'तुही' हा दादू पिंजाऱ्याचा उपदेश त्या पिंजाऱ्याला माहीत नसला तरी तें जड पिंजण मात्र एकसारखा तोच मंत्र घोकी. एका खोलींत हातमागावर विणकाम चालूं असे. तो फटक्याचा माग असल्याकारणांनें फट् फट् आवाज होत च रहावयाचा. सूत्रविद्या हें च राष्ट्रजीवनाचें सूत्र असल्यामुळें येथें रात्रंदिवस त्याची च उपासना चाले. मोठे रहाट, भाल्यासारख्या चाती, जाडजूड पेळू, तसें च जाडजूड सूत असा सूत्रविद्येंतला त्या वेळचा उगम होता. नदीचा उगम सूक्ष्म असतो पुढें ती स्थूल होत जाते. कलेचा उगम ओबडधोबड स्थूल असून पुढें ती उत्तरोत्तर सूक्ष्म होत जाते. या जाडजूड सुताचें विणलेंलें धोतर नवीन असले म्हणजे पोसोडीसारखें वाटावयाचें. आणि कमरेला तें टिकून राहण्यासाठीं बरी च सावधानता ठेवावी लागे.

इकडे राष्ट्रसेवेची उपासना चालूं असतां आश्रमाच्या आचार्याकडून येथल्या विद्यार्थ्यांचे वर्ग घेतले जावयाचे. विद्यार्थी सर्व साबरमतीहून आलेले गुजराथी च. साबरमतीच्या राष्ट्रीय शाळेंतल्या शिस्तींत लागलेले हे विद्यार्थी स्वस्यंफूर्तीनें आपल्या आचार्याबरोबर येथें आलें होतें. त्यांत महात्माजींचे तिघे नातू होते. एका गुजराथी संन्याशानें सोंपवलेले दोन विद्यार्थी होते. ते हि त्याचे नातू च होते. या शिवाय हि साबरमतीचे आणखी विद्यार्थी होते. वर्गांत गीता, उपनिषदें च शिकवलीं जावयाचीं. गुजराथी विद्यार्थ्यांना उच्चार हि कसोशीनें शिकवावे लागत. त्यामुळें त्या च त्या च भागाची एकसारखी आवृत्ति होणें अपरिहार्य होतें. शंकराचार्यांच्या गीताभाष्याची म्हणजे बहुधा प्रस्तावनेची किती तरी वेळ पुनरावृत्ति होई.

स भगवान्सृष्ट्वेदं जगतस्य च स्थितिं चिकीर्षुर्मरीच्यादीनग्रे सृष्ट्वा प्रजापतीन्प्रवृत्तिलक्षणं धर्मं ग्राह्यामास वेदोक्तम् । —या प्रस्तावनेचा घोष चाललेला असतांना प्रत्यक्ष आचार्य च या आचार्यांच्या रूपानें डोळ्यांसमोर दिसत. आणि खरोखर गीतेवरचें शंकराचार्यांचें भाष्य शिष्यासमोर सांगीतलें गेल्यासारखेंच

अनुक्रमणिका

आहे. त्याच्या अगदीं उलट ज्ञानेश्वरी. ती गुरुसमोर सांगितली आहे. त्यामुळें दोघांच्या भूमिकेंत फरक पडला आहे. भाष्याखेरीज खुद्द गीतापाठ हि घोषपूर्वक व्हावयाचा.

**ऐसे माझेनि नामघोषें । नाहीं चि करिती विश्वाची दुःखे ।**
**अवघें जग चि महासुखें । दुमदुमित भरलें ॥**

हा अनुभव त्या वेळीं येत असे. अशी ज्ञानकर्माची सुंदर जोडी तेथें जमली होती. दोन्ही वेळच्या प्रार्थना उघड्यांत गच्चीवर च होत. त्या वेळी भक्तीची गंगा तेथें अवतीर्ण होई. प्रार्थनेंत मधून-मधून बोधप्रद प्रवचनें व्हावयाचीं. तीं ऐकण्याला गावांतून जमनालालजींबरोबर कधीं कधीं मंडळी येऊन बसत.

सकाळीं पहाटे चारपासून संध्याकाळीं साडेसहा पर्यंत एकसारखा कार्यक्रम लागलेला असे. शिस्त अगदीं कडक असे. खाणें, पिणें, बसणें, उठणें, वाचणें, निजणें, प्रत्येक गोष्टींत आत्मनिग्रहावर भर असे. इंद्रियांना लळा नको, आळसाला वाव नको अशी त्यांत दृष्टि होती. आईच्या क्रोधांत हि स्नेह असावा किंवा कडू औषधाचा परिणाम जसा गोड असावा, तसा येथल्या शिस्तीचा प्रकार होता. प्रत्येकानें आपल्या कामाचा हिशेब द्यावयाचा. कमींत कमी वेळांत ज्यास्तींत जास्त काम सुंदर आणि यथायोग्य झालें पाहिजे. हें धडाडीचें, चिकाटीचें, सातत्याचें त्यांत शिक्षण होतें. खरोखर विरक्त पुरुषाच्या कठोरतेंत ज्याला प्रेम मिळतें आणि आसक्त पुरुषाच्या प्रेमांत हि ज्याला कठोरता दिसते त्याला च खरी दृष्टि आली म्हणावयाची. ही दृष्टि येथल्या विद्यार्थ्यांत होती किंवा नाहीं हें सांगणें कठिण आहे. पण या असामान्य कठोर भासणाऱ्या आचार्यांविषयीं असामान्य आदर त्यांच्या ठिकाणीं वसत होता. अमृताची प्राप्ति झाली म्हणजे सर्व रस मिळाले किंवा समुद्रांत सर्व नद्या समावून च गेल्या, तसे आपल्या या महान् आचार्यांत आपलें सर्व हित केंद्रित झालें असें सर्वांस मनःपूर्वक वाटे. त्यामुळें च येथला कार्यक्रम सुरळीत चाले. सूतकाम, ज्ञानोपासना आणि गृहकार्य असा त्रिविध कार्यक्रम असे. गृहकार्य यच्चयावत् सर्व विद्यार्थी च करीत. दळणें, पाणी भरणें, निवडणें, स्वयंपाक करणें, झाडणें, भांडीं घासणें अशीं तीं कामें असत. प्रत्येक कामांत सिद्धांती दृष्टि असे. भांडी घासली तर तीं आंतून स्वच्छ पाहिजेत. लोक बाहेरून चकाकी आणण्याचा प्रयत्न करतात. धान्य निवडतांना लोक खडे तेवढे काढतील. पण तांदुळांत चार डाळीचे दाणे आले तर त्यांना खपतील. येथें तसें नाहीं. तें धान्य हि अलग केलें पाहिजे. तें त्या त्या धान्यांत टाकून द्यावें. सत्याला असें मिश्रण खपावयाचें नाहीं. स्वयंपाक उभ्यानें च व्हावयास पाहिजे. बसून पाठ वांकते. छाती कमकुवत होते. ज्ञानतंतूंना निर्बलता येते. अशी यांत दृष्टि होती. स्वयंपाकांत मुख्यतः भाजीभाकर असावयाची. दूध हि असे. प्रसंगानुसार डाळ भात असावयाचा. भाकरी गव्हाची, कडकडींत लाल भाजलेली असे. भास्कराच्या आकाराची ती भाकरी रंग हि भास्करासारखा. भाजी बिनमसाल्याची. डाळ घट्ट. कोरडें अन्न अधिक पचतें या तत्त्वाप्रमाणें हें अन्न बनवलें जाई. स्वयंपाकादि कामांत आचार्याचा भाग असे च. स्वयंपाक हें आईचें काम.

**अहं वैश्वानरो भूत्वा प्राणिनां देहमाश्रितः ।**
**प्राणापानसमायुक्तः पचाम्यन्नं चतुर्विधम् ॥**

वैश्वानररूपी परमेश्वराला जें अन्न द्यावयाचें तें किती काळजीपूर्वक झालें पाहिजें. तेथें ज्ञान आणि प्रेम एकत्रित झालें पाहिजें. नाहीं तर तें अन्न राजस-तामस व्हावयाचें. राजस-तामस अन्न भगवंताला कसें चालेल? 'पचाम्यन्नं चतुर्विध' —चार प्रकारचें सात्त्विक अन्न च मी पचवितों असें त्यानें म्हटलें आहे. 'रस्याः स्निग्धाः स्थिरा हृद्या' हें च तें चार प्रकारचें अन्न. जर चतुर्विध सात्त्विक अन्न झालें नाहीं तर नारायणस्वरूपी

अनुक्रमणिका

माणसें आजारी पडतील. मग त्यांना उपवास करण्याचा हि प्रसंग यावयाचा. आचार्यांचा तर उपवासावर भर नसे. घरीं वर्षांतून येणाऱ्या शिवरात्री सारख्या मोठ्या उपवासाच्या दिवशीं इतरांप्रमाणें तो फराळ करी. पण एकादशी, गुरुवार इत्यादि करण्याची त्याची पद्धत नसे. त्याची एकादशी वेगळीच होती. उपवासाच्या आध्यात्मिक सामर्थ्याविषयीं बरोबर कल्पना असून हि

**नको सोडूं अन्न । नको सेवूं वन**

असा त्याचा साम्ययोगावर भर होता. त्यांतून ब्रह्मचाऱ्यानें उपवास करावा लागेल असें वागतां च कामा नये. अन्नासंबंधींची ही सूक्ष्म दृष्टि पाहून कोणी म्हणेल आहे काय त्यात? मजबूत दंड बठकी काढल्या, व्यायाम केला तर कसलें हि अन्न पचून जातें. पण हें म्हणणें बरोबर नाही. राजसतामस अन्न व्यायामानें पचतें ही कल्पना खरी नाहीं. आजारी पडला नाहीं. म्हणजे अन्न पचलें असें होत नाहीं. अन्न तेव्हां च पचलें समजावयाचें जेव्हां चित्त निर्विकार आणि बुद्धि तेजस्वी होईल. शरीरांत रोग प्रवेश च करणार नाहीं. आणि वैराग्ययुक्त निष्काम बळ प्राप्त होईल. व्यायामाचें हि येथें योग्य स्थान होतें. परंतु कृत्रिम व्यायामाला येथें फार म्हत्त्व नव्हतें. कृत्रिम व्यायाम त्याज्य नव्हे परंतु त्याचें अवास्तव स्तोम माजवणें हि योग्य नव्हे. येथील आचार्य व्यायामासाठीं सर्व विद्यार्थ्यांकडून नमस्कार घालवी. एक पंथ दो काज असा हा अल्पसा व्यायाम होता. त्या वेळीं सूर्यनारायणाचें तेज हि अंगावर पडे. त्यानें बुद्धि तेजस्वी होण्याला मदत होते अशी आचार्यांची कल्पना होती. त्याप्रमाणें उन्हांत फेऱ्या घालीत विचाराच्या गतीबरोबर फिरत रहावें असा देखावा त्यांच्या बाबतींत किती तरी वेळां दिसून येई. अध्यात्म आणि शरीर यांचा उत्कर्ष या नमस्कारानें साधला जाई. नम्रतेचा हा पाठ असे. सूर्यनारायणाचें तेज संग्रहीत करण्याची ही युक्ति होती. समर्थांनीं हि ही साधना केली होती. समर्थ सकाळपासून दुपारपर्यंत गोदावरी नदींत उभे रहात. त्यांचें पाण्यांत उभें रहाणें तेवढें लोकांना प्रतीत होतें. पण कंबरेपासून डोक्यापर्यंतचा भाग उन्हांत चांगला तापून निघे. इकडे कोणाचे लक्ष जात नाहीं. सूर्याची उष्णता तर नको; पण तेज तर पाहिजे म्हणून त्यांनी कंबरभर पाण्यांत उभें राहून ती वरची उष्णता पाण्याच्या द्वारें घालवून टाकण्याची युक्ति योजली होती. पाण्याची थंडी तर नको पण पाण्याची शुद्धता हवी. म्हणून वरच्या उन्हानें पाण्याची थंडी निघून जावी. आणि शुद्धता शरीरांत मुरून जावी अशी त्यांची योजना होती. या योजनेप्रमाणें येथें हि थंड पाण्यानें च स्नान करण्याचा शिरस्ता होता पहाटे, दुपारी, संध्याकाळीं तीन्हीं वेळां स्नान करण्यास परवानगी असे. येथला बाजार आठवड्यांत ठरलेल्या वेळीं केला जाई. बाजाराशीं कमींत कमी संबंध असेल तर च ती उत्तम गृहव्यवस्था समजावयाची. अशी सर्व कार्यावर आचार्यांची कडक आणि कृपाळू दृष्टि असे त्यामुळें सर्व कार्यांत स्वावलंबनाबरोबर

**यत्करोषि यदश्नासि यज्जुहोषि ददासि यत् । यत्तपस्यसि कौन्तेय तत्कुरुष्व मदर्पणम् ॥**

ही विशाल दृष्टि लक्ष्यांत येई. सेनापतीची सर्व नजर जशी सैन्याच्या सुस्थितीवर तशी आचार्यांची नजर आश्रमीयांच्या मनःस्थितीवर एकसारखी असावायची. बाहेर सभादिकांना आमंत्रणें यावयाची ती बहुतेक नाकारली च जावयाची. परंतु क्वचित् आमंत्रण स्वीकारलें तरी तें गौण कार्य च गणलें जाई. आश्रमाचें काम तपस्येचें, आश्रमाचें काम सेवेचें, आश्रमाचें काम ज्ञानाचें, आश्रमाचें काम भक्तीचें तें झाल्यावर मग इतर गोष्टी. मुख्य चित्राचें महत्त्व. आजूबाजूच्या नक्षीचें महत्त्व गौण. त्यामुळें बाहेर क्वचित् जाणें झालें तरी सर्व नजर आश्रमांतच खिळलेली असे. गाय चरते डोंगरावर पण तिचे चित्त वासरापाशी बांधलें गेलेलें असतें, तसा च प्रकार येथें व्हावयाचा.

अनुक्रमणिका

हृदयाच्या हालचालीवर आणि मेंदूच्या शक्तीवर सर्व शरीर अवलंबून असतें त्याप्रमाणें ज्ञान आणि प्रेम, सत्य आणि अहिंसा, भक्ति आणि तपस्यां यांच्या केंद्रीकरणावर सर्व मानवजीवन अवलंबून असतें. हें केंद्रीकरण करण्याचें कार्य म्हणजे च आश्रमाचें कार्य. त्या कार्याची अव्यक्त मूर्ति येथें घडवली जात होती. आचार्यांच्या ठिकाणी सर्व महाव्रतांची शक्ति केंद्रित होत होती. गाडीचे डबे नुसते जमवून कार्य चालणार नाहीं. त्याला एंजिनची जरुरी आहे. नुसतें सर्पण जमवून उपयोग नाहीं. अग्नीचा स्फुल्लिंग पाहिजे. पण ही अंतर्दृष्टि बहुतेक कोणाला च नसे. केवळ बहिर्दृष्टीचे लोक आश्रम पहाण्यास आले म्हणजे यांना येथें कांहीं च दिसावयाचें नाहीं. 'अः! हा च का गांधींचा आश्रम! येथे काय आहे? घरकाम, सूत, रहाट, माग, पिंजण, प्रार्थना, वर्ग बस्स एवढें च! येथले लोक पहावे तर भव्य, गुबगुबीत गालाचे, पिळदार दंडाचे, धिप्पाड शरीराचे हि दिसत नाहींत. चिमुकली मुलें, मुके जीव, चांगले खावें, प्यावे, खिदळावें, मस्त रहावें तर तसें कांही नाहीं. आहार हि मापून घेतात. तिखट खात नाहींत, मसाले नाहींत, कसें तरी खायचें आणि सुतक्यासारखें रहावयाचें. असें ते एकूण दिसतें आहे येथें!" —असें या बिचाऱ्या भोळ्या जीवांना वाटे. कित्येक तुच्छतादर्शक नजरेनें पाहून तेथून निघून जात. शिवाय त्यांना कोणी येथें 'या बसा' 'हें पहा, तें पहा' असें करीत नसे, जो तो शिस्तीचा शिपाई. हीं कामें कोण करणार? आचार्यांची तऱ्हा तर अगदीं च वेगळी. नमस्कार केला कीं त्यानें नुसते हात जोडावे, कोण? कुठले? काय? कांहीं च प्रश्न विचारूं नये. बाहेरची मंडळी स्तंभित च होत. खोट्या हास्याची लकेर चेहऱ्यावर आणायाची, झटपट उठावयाचें आसन द्यावयाचें, पाणी आणूं का म्हणावयाचें, मिठास भाषण करावयाचें हा गृहस्थाश्रमीं शिरस्ता येथें बाळपणापासून च नव्हता. ही लष्करी छावणी होती, हा संन्याशाचा मठ होता. येथें गृहाचाराचे लौकिक प्रकार कोठले? आलेत तर या. गेलेत तर जा. राहिलेत तर रहा. पण राहिलेत तर येथल्या शिस्तीनें रहा. लहान थोर भेद विसरून रहा. मौनपूर्वक मजुरी करून ज्ञानलालसेनें रहावयाचें तर रहा. अशी येथली पद्धति. येथें यावयाचें तर शिष्यभावानें, शिपाईगिरीनें या किंवा गुरू होऊन सेनापती होऊन या. येथें दुसरा प्रश्न च नाहीं. पण येथें गुरू होऊन कोण येणार? गुरूचा गुरू कोण? कल्पतरूला फूल वहाणें किंवा परिमळाला परिमळ देणें तशांतली च ही गोष्ट. त्यामुळें खुद्द वर्ध्याचा एक हि माणूस आश्रमांत दाखल झाला नाहीं. यावरून कोणी म्हणेल हा आश्रम अहिंसेची साधना करणारा नव्हता तर? तर तसें नाहीं. येथें अहिंसेचें केंद्रीकरण चाललें होतें. बाह्योपचाराचें दिखाऊ मार्दव येथें नसे. लोणी वेगळें काढणारी रवी ही काय हिंसक म्हणावयाची? येथें मनुष्य आला कीं त्याचें मंथन च व्हावयाचें. त्याचें येथें लहान पोराप्रमाणें लालन व्हावयाचें नाहीं. या मंथनांतून त्याचें जीवन लोण्याप्रमाणें मृदु होऊन जावें, शुद्ध होऊन जावें, स्नेहमय होऊन जावें अशी दृष्टि होती. ती केवळ आश्रम पाहून समजणें शक्य नसे. लोकांचा हि यांत कांहीं दोष होता असें नाहीं. त्यांच्यावर एकदम या आश्रमाची छाप पडत नसे. एकदम पाहिल्याबरोबर ज्याची छाप पडते तें बहुधा आंतून पोकळ असतें. भरीव गोष्टीची एकदम छाप पडत नाहीं. हळूंहळूं अंतरंग दर्शन होईल तसतशी तिची खुबी समजूं लागते.

तरी प्रार्थनेंतलें एखादें प्रवचन ज्यांनीं ऐकलें किंवा वर्गांतला पांच मिनिटांचा हि देखावा ज्यांनीं पाहिला की मात्र त्यांची दृष्टि एकदम पालटून जात असे. जगताला निर्मळ करणारी ही विचारांची अद्भूत गंगा पाहून त्यांची चित्तवृत्ति भारून जाई. मग दुसरे कोणते हि विचार सुचत नसत.

**हूं बुराईने डरूं ना शी फिकर छे पापनी**
**धोवा बुराईने बधे गंगा बहे छे आपनी**
**ज्यां ज्यां नजर मारी फरे यादी भरी छे आपनी**

अनुक्रमणिका

अशी भावमय अवस्था होऊन जाई. अरेरे, आपण बाहेरच्या रूक्ष देखाव्यावरून किती फसलों. आपण या महापुरुषाकडून आपल्यासारख्या क्षुद्र जीवाचें स्वागत कसें अपेक्षिलें. मग अशी त्यांना आपल्या व्यावहारिक मनोवृत्तीची लाज वाटावी.

**अजानता महिमानं तवेदं ।**
**मया प्रमादात्प्रणयेन वापि ॥**

हा भाव त्यांच्या हृदयांत मग सहज च उदित होई.

तरी हीं प्रवचनें गुजराथीमध्यें च होत. आश्रमांतले सर्व विद्यार्थी साबरमती आश्रमांतून आलेले गुजराथी च असल्याकारणानें त्या वेळीं सर्व व्यवहार गुजराथीमधून च चाले. ज्याप्रमाणें एखादें रोपटें उपटून दुसरीकडे लावावयाचें असलें म्हणजे तें रोपटें जेथलें असलें तेथली माती त्याच्या बरोबर च असावी लागते तसें हें होतें. गुजराथमधल्या आश्रमाचें हें रोपटें येथें आल्यामुळें अजून गुजराती भाषेचें वातावरण येथें पसरलें होतें. पण हें वातावरण दिवसेंदिवस ओसरत चाललें यांत शंका नाहीं. कारण महाराष्ट्राचा हा जरी मुख्य भाग नसला तरी येथली भाषा मराठी च. फक्त कांहीं वऱ्हाडी शब्द निराळे आणि हिंदीचे कांहीं शब्द अधिक यावयाचे. तरी पण हें महाराष्ट्राचें च बृहन्महाराष्ट्र म्हणविलें जाणारें क्षेत्र होतें. तेव्हां हळूं हळूं आश्रमांतले गुजराती विद्यार्थी मराठी भाषा शिकूं लागले.

महाराष्ट्राचें कसलेलें क्षेत्र पुणें-सातारा. तेथें शेकडों ऐतिहासिक हालचाली झालेल्या. संत आणि वीरांची ती भूमि. इंग्रजी राज्यानंतरच्या चळवळीचें केंद्र तिकडे च. ग्रंथांतली भाषा हि तिकडचीच प्रमुख. विद्वानांचे आखाडे पुण्याकडे च. असें असतां महाराष्ट्राच्या त्या भागांत आश्रमरचना न होतां इकडे होण्यांत हि ईश्वराचा मोठा हेतु असला पाहिजे. जी जमीन फार लागवडींत आली तिचा कस कालांतरानें कमी होतो. तेथें 'सांगे वडिलांची कीर्ति! तो एक मूर्ख' हा उपदेश रुचत नाहीं. पूर्वजांच्या पराक्रमाचा नसता अभिमान तेथें उत्पन्न होतो. तेथें कोणत्या हि कार्याला निंदास्तुतीचे निष्कारण आघात सहन करावे लागतात. गतवैभवाच्या गुंगींत जे पडले त्यांच्या ठिकाणीं वर्तमान पराक्रमाची जागृति कोठून असणार? म्हणून ईश्वरानें

**अहंकाराचा वारा न लागो राजसा ।**
**माझ्या विष्णुदासां भाविकांसी ॥**

या हेतूनें त्या भूमींत आश्रम-स्थान नेलें नाहीं, असें च म्हणणें भाग आहे. गुजराथच्या भूमींत महात्माजींसारखा संत जन्मला याचें हि हें च कारण आहे. ईश्वराला अमुक देश, अमुक जात किंवा अमुक हवापाणी प्यारें असतें असें नाहीं. परंतु जेथें नम्रता आहे, अभिमानाचा अभाव आहे तेथें ईश्वर आपल्या कार्याला सुरुवात करतो.

**ईश्वरप्याभिमान द्वेषित्वाद्दैन्यप्रियत्वाच्च ।**

नारदांनीं हि हें सांगितलें च आहे. उघड च आहे. खडकावर पेरलेंलें बीं फुकट जातें मऊ जमीनींत तें रुजतें. त्यामुळें महात्माजींसारखे पुरुष राजकारणादि विषयांत मागासलेल्या लोकांत निर्माण झाले. रणशूरपणाचा

ज्यांना अभिमान नाहीं "रण छोड" हें च जे दैवत मानून बसले अशामध्यें च त्यांनीं आपलें कार्य सुरूं केलें. त्यांना तेथें श्रद्धेचें क्षेत्र मिळालें. तसें च येथें हि हें क्षेत्र मिळून आश्रमादीचें कार्य सुरूं झालें.

आतांपर्यंत हे आचार्य त्या आश्रमांत रहात होते. पण आतां त्यांनी आपल्यामध्येंच तो आश्रम समावून येथें हा आश्रम सुरूं केला. त्या आश्रमाची ही परिणति होती. हा आश्रम केवळ आचार्यांचें प्रतिबिंब च होतें. विद्यार्थी हे केवळ छायेसारखे होते. साबरमतीची विविध-प्रवृत्ति येथें मुळीं च नव्हती. तेथें नाना प्रश्न उद्भवत. येथें कोणता हि प्रशन नसे. हें असें झालें पाहिजें असें ठरलें कीं लगे च तसें व्हावयाचें च. येथें प्रामाणिक मतभेदाला अवसर नव्हता. प्रत्येक माणसागणिक मत हें येथें नव्हतें. येथें हे आचार्य करतील ती पूर्वदिशा असा एकजिनसी कारभार होता. येथें प्रत्येक जणानें आपलें आत्मस्वातंत्र्य स्वेच्छेनें अर्पण केलें होतें. भगवंतांनीं अर्जुनाला १८ अध्याय सांगितले. परोपरीनें उपदेश केला आणि शेंवटीं 'यथेच्छासि तथा कुरू' असें म्हटलें. पण अर्जुनानें तें स्वीकारलें नाहीं.

**तूं एक मात्र सीमा माझ्या स्वतंत्रतेची ।**
**तुझ्या चि बंधनाची गोडी मनास साची ॥**

ही च त्याची वृत्ति होती. अर्जुनाप्रमाणें या बाबतींत प्रत्येकाची येथें ही च ऋजु भूमिका बनलेली होती.

**करिष्ये वचनं तव ।**

●●●

अनुक्रमणिका

## प्रकरण ३१ वें

## घास बंगला

**प्रत्येक** वस्तूंत परिवर्तन होत असतें. जगाचा जगपणा च परिवर्तनावर अवलंबून आहे. त्यांत बहुधा.

**पुनरपि जननं पुनरपि मरणं ।**
**पुनरपि जननी जठरे शयनम् ॥**

असाच प्रकार असावयाचा. तो च तो च कंटाळवाणा काथ्याकूट या परिवर्तनांत आढळून यावयाचा. असें परिवर्तन म्हणजे नुसती हालचाल च समजली पाहिजे. घड्याळाचा लंबक सारखा हालतो. पण ती बद्धतेनें होणारीं ठराविक हालचाल आहे. तेथें नवीन दर्शन नाहीं. ती यंत्र-गति आहे. जीवनांतला मंत्र हरवला कीं जीवन यंत्रवत् होतें. मग दगडाच्या देवाची पूजा करणारा मनुष्य हि जड दगड बनतो. लोहाराच्या भात्याप्रमाणें केवळ श्वास घेणारें तें यंत्र होतें. History repeats itself या शून्य-बोधाशिवाय तेथें आणखी कोणती च कल्पना उदित होत नाहीं. जेथून निघावयाचें तेथें च परत जावयाचें हें च शून्याचें स्वरूप. अशा इतिहासाचा व्यवहार म्हणजे शून्य-व्यवहार. म्हणून व्यवहारशून्य बनल्याशिवाय यांतून सुटका नाहीं. शून्याला शून्य केल्याशिवाय पूर्णता नाहीं. जीवनांतल्या पूर्णतेसाठीं, जीवनातल्या मंत्रासाठीं, जें परिवर्तन करावयाचें तें च खरें परिवर्तन. बाकींची नुसती यांत्रिक हालचाल.

या दृष्टीनें आश्रमाच्या जागेंत परिवर्तन करण्याचा प्रसंग आला. आश्रमाची सुरूवात तर जमनालालजींच्या बगीच्यांत चांगल्या तऱ्हेनें झाली. परंतु तेथें आश्रमविकासाच्या दृष्टीनें अपूर्णता भासूं लागली. या बगीच्यांत सकाळसंध्याकाळ लोकांनीं फिरावयास येण्याचा प्रघात होता. ही गोष्ट आश्रमीय वातावरणाला प्रतिकूल होती. लोक आणि आश्रम यांचें जुळण्याजोगें नव्हतें. कारण दोघांची दिशा—

**लोकांस पाह्याचा आदर । तेथें याचा अनादर ।**
**लोक सर्वकाल तत्पर । तेथे यांची अनिच्छा ॥**

अशी अगदीं च भिन्न होती. या बगीच्यांतल्या इमारतींत विणकामासाठीं नीट व्यवस्था होण्याजोगी नव्हती. येथें शेतांत शौचाला जावें लागे. आश्रमांत पायखाना असल्याशिवाय चालण्याजोगें नव्हतें. तें स्वच्छतेचें महत्त्वाचें परंतु हजारों वर्षें दुर्लक्षिलेलें काम. त्याचा आदर्श आश्रमांत पहावयास सांपडला च पाहिजे. हाताने पायखानें साफ करण्याची दीक्षा प्रत्येकाला मिळाली च पाहिजे. शिवाय हा बगीचा होता. बगीचा म्हणजे श्रीमंतांचें विलासस्थान. आश्रमाभोंवतीं बाग असण्यांस हरकत नाहीं. पण तो मौजेसाठीं बनविलेला नव्हे. तेथें फुलें असतील तर ती देवासाठीं, नाकांत कोंबण्यासाठीं नव्हेत. तेथें फळें असतील तर तीं सात्विक आहाराचा प्रकार म्हणून. चवीसाठीं तीं फळें नव्हेंत. तेथें मोठमोठे वृक्ष असतील तर वायूच्या शुद्धीकरणासाठीं, उघड्यांत झाडाखालीं बसून ध्यानचिंतन, अभ्यास करण्यांसाठीं, गप्पा छाटण्यासाठीं नाहीं. तेथें वनस्पतींचें संवर्धन होईल. तर तें लोकोपयोगी औषधींचें. दिखाऊ विलायती झाडांचें नव्हें. तेथें मनोरंजनासाठीं मुद्दाम केलेलीं थुईथुई उडणारीं कारंजीं असणार नाहींत. पण स्वच्छतेंसाठीं, झाडांना पाणी मिळावें म्हणून निर्मळ पाण्याचीं टाकीं असतींल. नैसर्गिक शोभेला तेथें वाव असेल. पण बगीच्यांतल्या

अनुक्रमणिका

कृत्रिम कापकुपीच्या नखऱ्याला तेथें अवसर असणार नाहीं. तेथें जंगलांतली अव्यवस्था नसेल. पण जंगलांतील सहजता असेल. तेथें बगीच्यांतींल व्यवस्था असेल. पण बगीच्यांतील कृत्रिमता नसेल. हा बगीचा हा कांहीं आश्रमासाठीं तयार केलेला नव्हता. त्यामुळें आश्रमयोग्य अशी सर्व व्यवस्था तेथें असण्याची अपेक्षा हि व्यर्थ होती. त्यामुळें आश्रमस्थान बदलण्यांचें निश्चित करण्यांत आलें. सिव्हिल लाइनमध्यें चर्चजवळ एक सुंदर विस्तीर्ण जागा होती. ती जमनालालजींच्या मालकीची होती. तेथें एक मोठा बंगला होता. तो बऱ्याच वर्षांचा जुना दिसत असे. बंगल्यावर गवताचें छप्पर असल्यामुळें आणि आजूबाजूला उंच च उंच झाडें असल्यामुळें त्या स्थानाला ऋषींच्या आश्रमांचें गांभीर्य प्राप्त झालेलें होतें. या बंगल्यांत जपानी लोक कांहीं दिवस रहात होते. म्हणून कोणी याला जपानी बंगला म्हणत. त्यावर गवताचें छप्पर होतें. म्हणून कोणी घास बंगला नांव देत. बरी च वर्षे तेथें कोणी च रहात नसल्यामुळें गांवांत तो भूत-बंगला नांवाने ओळखला जाई. त्यामुळें स्टेशन वरून रात्रीं तेथें टांग्यानें जावयाचें म्हटल्यास टांगेवाले तेथें येण्यास तयार व्हावयाचे नाहींत अशा तऱ्हेचें तें गूढ ठिकाण होतें.

त्या ठिकाणीं आश्रम नेण्यांत आला. वस्तुतः आचार्यांची राहण्यासंबंधींची कल्पना निराळी च असे. मी कोठें राहूं इच्छितों? पहिलें उत्तर कोठें हि, दुसरें उत्तर ‘सत्संगतींत,’ तिसरें उत्तर ‘आत्म्यांत,’ असें त्यांचें या प्रश्नाला तिहेरी उत्तर होतें. या दृष्टीनें या जागेंत राहण्याचें ठरलें काय आणि त्या जागेंत राहण्याचें ठरलें काय ती मोठी महत्त्वाची बाब नव्हती. हें वस्त्र वापरलें काय आणि तें वस्त्र वापरलें काय अशी स्थिति असणाऱ्या वैभवशाली पुरुषासारखी ही अवस्था होती.

या ठिकाणीं आश्रमपरिवर्तन झाल्यानंतर आश्रमाची पहिली बाल्यावस्था ओसरूं लागली. साधनेची एकेक कळी येथें उमलूं लागली. आश्रमाच्या मुख्य उद्योगाचा हळूं हळूं विकास होऊं लागला. त्या मुख्य उद्योगासाठीं म्हणजे विणकामादीसाठीं एक लांब च लांब टिनाची ‘शेड’ उभारण्यांत आली. ही शेड बांधण्यासाठी सुताराच्या हाताखालीं मजूर म्हणून मुद्दाम आचार्यांनीं आपल्या धाकट्या भावाची योजना केली. मोठमोठे लोक आपल्या विद्यार्थ्यांना उत्तमांतील उत्तम सोय करून देतात. त्यांना कोणत्या हि तऱ्हेची तसदी पडूं नये. आपल्या विद्यार्थ्याला सर्व सुखचैन असावी अशी त्यांची कल्पना असते. पण ती च शेंवटीं जीवनाचा नाश करते.

**सुखार्थी वा कुतो विद्या । विद्यार्थी वा कुतः सुखम् ।**

हें व्यासांचें बिनमोल सांगणें त्यांच्या मायिक दृष्टीला दिसत नाहीं. विद्या हें च सुख इतर सुख हा केवळ सुखाचा आभास हें त्यांना कळत नाहीं. अशा तऱ्हेनें सुखसोयीमध्यें वाढलेल्या विद्यार्थ्यावर विद्या मुळीं च प्रसन्न होत नाहीं. विद्यार्थी घोकंपट्टी करून वर नंबर मिळवो, त्याला लोकांमध्यें मानमान्यता मिळो, परंतु खरी विद्या मात्र तेथें क्षणभर हि टिकत नाहीं.

**आधी कष्ट मग फळ । कष्ट चि नाहीं तें निर्फळ ।**
**साक्षेपेंवीण केवळ । वृथापृष्ट ॥**

अशी त्याची स्थिति होते. दीर्घ-मनन, दीर्घचिंतन, दीर्घ कष्ट करून सिद्धांत ग्रहण करावयाचे, हें त्याच्याच्यानें होऊं शकत नाहीं, तो शरीरभोग च शोधीत जातो. तो उत्तरोत्तर दुर्बळ बनतो. त्यांत तणावा तर कांहीं रहात नाहीं. पण

**दिसेंदीस अभ्यंतरी गर्व सांचे ।**

अशी त्याची आढ्यताखोर वृत्ति बनते. म्हणून च आयुष्याच्या प्रभातकालीं मजबूत कष्ट करून विद्या मिळवली पाहिजे हें तत्त्व या सुतारापाशीं आपल्या विद्यार्थ्यानें शिकावें ही दृष्टि आचार्यांनी आश्रमांत ठेवली होती.

**करी मस्तक ठेंगणा ।**

हें वळण त्यामध्यें मिळवावयाचें होतें. तो सुतार दिवसभर काबाडकष्ट करून पोट भरणारा, परंतु त्याच्याशीं समरस होऊन त्याच्यामधले बिनमोल गुण ग्रहण करावयाचें हें काम काय कॉलेजमधल्या छिचोर वातावरणांत होऊं शकलें असतें? तो बिचारा दिवसभर चरखे करावयाचा, टिनची शेड बांधण्यासाठीं लांकडें कापावयाचा. सकाळीं यावें. दुपारी भाकर खावी. लोटाभर पाणी प्यावें. आणि मुळीं च विश्रांति न घेतां तोंडानें

**टाळ वाजे मुरदंग बाजे, बीना बाजे दनाना ।**
**आयुष्याचा नाश होतो शिरीराम म्हनाना हो म्हनाना ॥**

असें गाणें म्हणत थेट संध्याकाळपर्यंत काम करावें, या त्याच्या कार्यक्रमाला कांहीं च का किंमत नाहीं! तेथें शिकण्याजोगें मुळी च कांहीं नाहीं? सहृदय मनुष्याला तरी येथें शिक्षण नाहीं असें म्हणवणार नाहीं. या सुतारानें प्रथम प्रथम मुर्वतीखातर अहो जावो म्हणण्याची सुरवात केली. पण थोड्या च दिवसांत त्याच्या लक्षांत आलें कीं, आपला विद्यार्थी अगदी च मठ्ठ आहे. त्याला लेखणी चालवितां येते पण पटाशी चालवितां येत नाहीं. त्याला साध्या करवतीनें लांकूड सरळ कसें कापावें तें हि माहीत नाहीं. तो अगदी च अडाणी आहे. तेव्हां मग त्यानें अहोजाहोचा शिष्टाचार टाकून दिला. 'हां हे घे हत्यार. त्याला धार लाव. हा वेळू फडकवून आण' अशी मोकळ्या मनानें कामें सांगून नैसर्गिक जीवनाचें शिक्षण देण्यास सुरवात केली. त्याला आतां आपला विद्यार्थी पुत्रवत् वाटूं लागला. त्याचा संकोच पार मावळला. तें दृश्य पाहून आचार्यांना केवढें समाधान झालें! आतां खरा रंग जमला, आतां गाडी रस्त्याला लागली, अशी त्याची खात्री झाली. तरी सुद्धां या सुताराच्या मनांत अजून शंकेचा भाव उरला होता च. कां उरणार नाहीं? कोणता विद्वान् मनुष्य सुतारादिवर्गांत मिसळला आहे? कोणत्या उच्चवर्णीय मनुष्यानें त्यांच्याशीं मैत्री जोडली आहे? उच्चतेच्या बंधनाच्या बाहेर पडून या लोकांच्या जीवनांत कोण दाखल झाला आहे? एक दिवस काम करतां करतां त्यानें हळूं च गोष्ट काढली. तो म्हणातो—

"माझ्या घरीं आचार्य जेवायला येतील का? माझ्या मनांत फार दिवसांपासून आहे, पण त्यांना विचारावें कसें? त्यांना वाईट तर वाटणार नाहीं? ते येतील कीं नाहीं असें वाटतें. आणखी तूं व सोमाभाई (विणकाम करणारा एक गुजराथी विद्यार्थी) अशा तिघांना जेवावयाला बोलवावयाचें माझ्या मनांत आहे." लगे च त्यांच्या विद्यार्थ्याने विचारलें—'कां कांहीं विशेष आहे काय?' तो म्हणतो—"नाहीं. तसें कांहीं नाहीं. विशेष काय असणार? माझीं मुलें लहान च आहेत. ना कोणाचें लग्न ना कोणाचें कार्य. पण मनांत आहे कीं, एकदां त्यांचे पाय आपल्या घराला लागावे. तूं तेवढें आचार्यांना खुबीनें विचारशील का? पहा जुळेल तर. तुला तर यायला हरकत नाहीं ना आणि सोमाभाई?" त्यांचा विद्यार्थी विरघळून गेला. त्यानें उत्तर दिलें— 'मला आणि सोमाभाईला काय हरकत असणार?' पण आमचें सर्व त्यांच्याच हातांत, ते म्हणतील तसें आम्हीं करतों. त्यावर तो सुतार म्हणतो—'मग तिघांचें हि जेवण्याचें विचारून, घेशील ना? मला विचारण्याचा धीर

अनुक्रमणिका

होत नाहीं.' विद्यार्थी उत्तर करतो—'कां बरें? खुशाल विचारा. ते नाहीं म्हणणार नाहींत, तुम्ही च पहात नाहीं कां? त्यांच्या ठिकाणीं कांहीं भेदभाव का आहे? कोणी हि जावें. आपल्याला वाटेल तें खुशाल विचारावें तुम्हांला कसली च भीति नाहीं.' हें ऐकल्यावर त्या सुताराच्या चेहऱ्यावर आनंदाचें तेज पसरलें. त्यानें त्याच दिवशीं कामावरून परत जातांना आचार्यांना विनंती केली. आणि आचार्यांनीं ती ताबडतोब मान्य केली, हें काय सांगावयास पाहिजे? त्याच्या हर्षाला सीमा राहिली नाहीं. परंतु—

**काय करूं पाहुणेर । खोप मोडकी जर्जर ।**

त्याच्या मनाची अवस्था काय वर्णन करणार? एक दिवस त्याचे विद्यार्थी आणि एक दिवस त्यांचे आचार्य असे दोन दिवस त्याच्याकडे जेवले. तें जेवण कसलें? तें त्याच्या समाधानाचें परमोच्च शिखर होतें!

**दुर्योधनका मेवा त्यागो । साग बिदुरघर पाई ।**

हा महाभारताचा देखावा काय फक्त महाभारतांत राहण्यासाठीं च निर्माण झाला? येथें तो स्पष्ट प्रतीतीला आला. लहानपणापासून हा आचार्य कोठें च जेवावयास जावयाचा नाही.

**प्रपंचअस्तीं जाऊं नये । बाष्फळ अन्न खाऊं नये ।**
**पाहुण्यासारखें घेंऊ नये । आमंत्रण कदा ॥**
**श्राद्ध पक्ष सटी सामासें । शांती फळशोभत बारसें ।**
**भोग राहाण बहु वसें । नवस व्रतें उद्यापनें ॥**
**तेथें निःस्पृहें जाऊं नये । त्याचे अन्न खाऊं नये ।**
**येळिलवाणें करूं नये । आपणासी ॥**

ही निस्पृहाची शिकवण अंगांत मुरलेली होती. या च आश्रमांतला प्रसंग. गावांतले प्रतिष्ठित वकील मनोहरपंत देशपांडे कोरें पांढरें शुभ्र धोतर, अंगावर तसा च नवा कोट, पुणेरी जरतारी झिरमिळ्याची पगडी, हातांत चांदीची वाटी, अशा थाटांत संध्याकाळच्या सुमाराला आश्रमांत आले. त्या वेळीं आश्रमातील प्रार्थना चालू होती. ते हि बैठकीवर बसले. प्रार्थना समाप्त झाली. त्यांनीं चांदीच्या वाटीतल्या अक्षता आणि सुपारी आचार्यांपुढे करून सर्व आश्रमाला आपल्याकडचे आमंत्रण देण्यासाठी बोलण्याला सुरुवात केली.

आचार्य—"तुम्ही महाराष्ट्र-धर्म मासिक पाहिलें आहे काय?"
उत्तर—"होय."
आचार्य—"त्यांतला समर्थांचें स्मरण हा लेख तुमच्या वाचनांत आला आहे काय?"
उत्तर—"नाहीं."
आचार्य—"तो लेख तुम्ही वाचला असता तर येथें हें आमंत्रण देण्याला तुम्ही आला नसता."

हातांतल्या कुंकूमिश्रित लाल अक्षता तशा च चांदीच्या वाटींत टाकीत सदर वकील खजील होऊन म्हणाले—"कांहीं हरकत नाहीं. आपल्या तत्त्वाला बाध येईल तर आपण हें आमंत्रण स्वीकारावें असा माझा आग्रह नाहीं." इतकें बोलून ते चटकन् उठले. त्यांचा चेहरा उतरला. नमस्कार करून लगे च ते चालूं लागले. थोड्या च वेळांत ते आश्रमाची हद्द ओलांडून दिसेनासे झाले. जो पुरुष स्वतःच्या बहिणीच्या लग्नांत

हि हजर राहिला नाहीं, ज्याने कधीं लोकांकडे जेवण्याचें आमंत्रण स्वीकारलें नाहीं; जेवण्याचा समारंभ असावा याची च ज्याला चीड. त्यानें हें आमंत्रण नाकारतांना जी वृत्ति दाखविली त्यांत आश्चर्य कांहीं च नाहीं. परंतु एका गरीब सुताराला तो वश होऊं शकला, हा विशेष आहे. त्या सुताराची च गोष्ट काय, आश्रमामध्यें एका कुत्र्याच्या मरणाच्या निमित्तानें आश्रमाची सर्व कामें आचार्यांनी बंद केली होती. या कुत्र्याला आश्रमामध्यें कोणी हि खाण्यास देत नसे. कुत्र्यांना किंवा कोणत्या हि प्राण्यांना खाण्याला देण्याची आश्रमामध्यें सक्त मनाई होती. ज्या प्राण्यांपासून आपण काम घेत नाहीं, त्यांना विनाकारण पोसावयाचें नाहीं, या तत्त्वाप्रमाणें त्या कुत्र्याला कोणी खाऊं घालीत नसे. तरी तो रात्रभर आश्रमाच्या आवारांत राही. आणि पहारा करण्याचें काम करी. प्रार्थनेच्या दोन वेळच्या घंटा ऐकून तो आश्रमीय माणसाप्रमाणें प्रार्थनेसाठीं घातलेल्या बैठकीवर प्रार्थना होईपर्यंत बसे. आणि मंडळी उठूं लागली म्हणजे उठून जाई. घंटा वाजली म्हणजे तो बाहेरून धांवत धांवत यावयाचा च. जणूं काय त्याला प्रार्थना समजत होती, असें च त्याचें वर्तन दिसे. दुपारची १०-११ वाजण्याची वेळ होती. एकाएकी तो कुत्रा धापा टाकीत धांवत आला. आणि गडबडा लोळूं लागला. त्याला बहुधा कोणी तरी विष घातलें असावें. त्याला थोडें ताक पाजून पाहिलें. पण तो उपाय करण्याच्या स्थितींत च नव्हता. ५/७ मिनिटांत तडफडून त्यानें प्राण सोडला. आचार्यांना ही गोष्ट कळतां च त्यांनी सर्व व्यवहार बंद करवला. स्वयंपाक तयार होता तरी जेवण बंद केलें. त्या कुत्र्याची आश्रमीय विद्यार्थांनीं समाधी तयार केली. संध्याकाळीं प्रार्थनेंत त्या कुत्र्याविषयीं अत्यंत हृदयस्पर्शी प्रवचन झालें. धर्मराज आणि कुत्रा, शिवाजी महाराजांचा कुत्रा, सारमेयाची कथा किती तरी गोष्टी तेथें सांगितल्या गेल्या. आपल्या आजूबाजूची सृष्टि ही देवानें किती गुणमय करून ठेवली आहे. आपण तिकडे मुळीं च पहात नाहीं. हें त्या वेळीं चित्तांत चांगलें ठसलें. आश्रमाच्या मोठ्या विस्तीर्ण जागेंत मोठमोठीं झाडें आणि अनेक प्रकारचीं झुडपें असत. त्या झुडुपांच्या आश्रयानें एक सुंदर हरीण नेहमीं आजूबाजूला रहावयाचें. झुडपाआड दबत दबत फिरतांना तें नेहमी दिसावयाचें. आश्रमीयांकडून कधीं त्याला त्रास दिला गेला नाहीं. त्यामुळें पुढें पुढें तें फार च निर्भय झालें. मंडळी आंत जेवावयास बसली असतां स्वयंपाकघराच्या ओट्यावर हि तें येऊं लागलें. या वेळीं आचार्य वाढत असावयाचे. खरकटीं भांडीं तें चाटावयाचें. आचार्य कधीं कधीं त्याला प्रयोग म्हणून तूप लावलेली गव्हाची भाकरी टाकीत. पण तें नाकानें वास घेई आणि भाकरीला स्पर्श हि करावयाचें नाहीं. लगे च आचार्यांनीं बिनतुपाची भाकरी टाकावी कीं तत्काळ तें खाऊं लागे. मग आचार्य सर्वांना म्हणत. 'पहा, हरीण निर्मासाहारी आहे. त्याचें हें लक्षण आहे. तूप हा मांसोद्भव पदार्थ आहे. त्याला तें स्पर्श हि करीत नाहीं. कित्येक वेळां अशी टाकलेली भाकरी खाण्यासाठीं तो कुत्रा हि पुढें यावयाचा, पण हरीण त्याला धडक मारून ती भाकरी स्वतः खाई. ती त्याची निर्भयता पाहून कौतुक वाटे. कुत्र्याला हि 'अयं आश्रम हरिणः न हन्तव्यः' ही मनोभावना असावी असें वाटून मोठा आनंद होई. ऋषिकालीन आश्रमांत वाघ आणि गाई एक ठिकाणीं पाणी पीत आणि खात हें खोटें वाटण्याचें कारण नाहीं, असा विश्वास उत्पन्न होई. या आश्रमामध्यें राहणाऱ्या विद्यार्थ्यांवर या ऋषिकालीन जीवनकल्पनेचा स्वाभाविकच ठसा उमटत असे. येथें घास बंगल्यांत प्रत्येक मोठ्या हॉलमध्यें ४/४ जण रहात. प्रत्येकाला एकेक मोठें कपाट असे. त्यांत प्रत्येकाचें सामान राही. सामान तें काय असावयाचें, कांहीं पुस्तकें, ताटवाटी आणि बिछाना. आपापल्या जागेवर किंवा ओट्यावर जो तो निजे. उन्हाळ्यांत उघड्यांत हि मंडळी निजत. परंतु हें न रुचून आश्रमाच्या आवारांत च परंतु आश्रमापासून दूर उघड्या जागेंत मोठ्या पिंपळाच्या झाडाखालीं गवताची हंतरी घालून तीवर रात्रभर निजण्याचा उपक्रम एकानें सुरू केला.

**द्वा सुपर्णा सयुजा सखाया समानं वृक्षं परिशस्वजाते ।**
**तयोरन्यः पिप्पलं स्वादुअत्ति अनश्नन् अन्यो अभिचाकशीती ॥**

अनुक्रमणिका

—या उपनिषद्वाक्याचें स्मरण करविणाऱ्या त्या वृक्षाखालीं निजण्याचा मोह तरुण साधकांना होणें ही खरोखर भाग्याची गोष्ट आहे. परंतु अशा साधनेंत विवेक पाहिजे तो वृद्धांकडून म्हणजे ज्ञानवृद्धाकडून घ्यावयास पाहिजे. तरुणांत वेग आणि वृद्धांत विवेक हे दोघांचे दोन अलंकार आहेत. दोघांचा समन्वय म्हणजे वृद्धतरुणयोग. तो आचार्यांच्या ठिकाणीं पूर्ण बाणला होता. तथापि आचार्यांना या बाबतींत न विसरतां सदर विद्यार्थ्यानें हा उपक्रम सुरू केला होता. पण याच्या पुढें जाऊन अगदीं गाढ अरण्यांत च केवळ एकाकी रहावें असा संकल्प करून कोणाला न कळत हा विद्यार्थी एका रात्रीं निघून गेला. पण ती गोष्ट ताबडतोबच एकाच्या लक्ष्यांत येऊन रातोरात स्टेशनवरून त्याला पुन्हां परत आणण्यात आलें, मग आचार्यांनी सकाळीं त्यावर मोठें प्रवचन करून 'हा आपला आश्रम अरण्यस्थानापेक्षां कमदर्जाचा नाहीं. साधकाला येथें भरपूर पाथेय मिळेल' एतत्संबंधीं पुष्कळ बोधप्रद विवेचन केलें. आणि न सांगतां निघून जाण्यांतला असत्यादि दोष दाखविला. वास्तविक असें वैराग्यशील आवेगांतलें पण टिकाऊ कृत्य आचार्यांना फार आवडण्याजोगें होतें. त्याच्या ठिकाणीं तें नुसतें ओसंडत होतें! परंतु

**घरी कामधेनु पुढे ताक मागे ।**

असें वर्तन त्याला कसें आवडेल? वैराग्यवर्धनाला येथें काय प्रतिबंध होता? उलट वैराग्यवर्धनार्थ येथें अनेक गोष्टी विचारपूर्वक आंखण्यांत आल्या होत्या. आचार्यांच्या ठिकाणीं वैराग्याचें वळण मूळचें च. तें बीज स्वतःसिद्ध च. पण त्याला खतपाणी ज्या दासबोध ग्रंथानें घातलें त्या दासबोधाची पारायणें करण्याला वल्लभ नांवाच्या एका विद्यार्थ्याला आचार्यांनी सुचविलें होतें. तरुणपणीच तत्त्वज्ञानाचा अभ्यास झाला पाहिजे अशी आचार्यांची दृष्टि होती. सदर विद्यार्थी साबरमतीपासून च नम्रभावानें जवळ राहिलेला. संन्याशाचा नातू. बाल्यकालापासून च "योगी व्हावें" अशी त्यानें आकांक्षा धरलेली. नम्र विनयी अभ्यासी! त्याला ही सूचना सहज च आवडली आणि सकाळीं मग आश्रमाच्या ओटीवर एकीकडे बसून तो पारायण करी. लवकर लवकर पारायण करण्याच्या कल्पनेनें तो भराभर वाचीत जाई. भुंगा गुणगुणत असावा त्याप्रमाणें ती गुणगुण तेथें ऐकूं येई. नीतिशास्त्रप्रवेश, उपनिषदें, शांकरभाष्य अशा अध्यात्मग्रंथांचे वर्ग मधून मधून आचार्य घेत. परंतु ती गोष्ट शाळेंतल्या वर्गासारखी नसे. सहजस्फूर्तीने आचार्य बोलावतील तेवढ्या च विद्यार्थ्यांचा हा वर्ग असे. रवींद्रनाथ टागोरांची भाची सुप्रसिद्ध सरलादेवी चौधराणी यांचा मुलगा दीपकदत्त चौधरी हा हि साबरमतीहून येथें आला होता. सरलादेवींना आचार्यांच्या विद्वत्तेविषयीं फार आदर असे. त्यांना हि आपला मुलगा अशा आचार्यांकडे रहावा यांत आनंद वाटत होता. पण तो मुलगा येथें आजारी पडला. येथलें शिक्षण हें

**धकाधकीचा मामला । कैचा घडे अशक्ताला ।**
**याकारणें नाना बुद्धी शक्ताला । शिकवाव्या ॥**

अशा थाटाचे असे. त्या मुलाला त्याच्या शरीरप्रकृतीजोगें अगदीं च सौम्य काम दिलें गेलें. दिवसभर आश्रमाच्या ओट्यावर बसून आश्रमाचे डाळ तांदूळ इत्यादि धान्य निवडावें. हें त्याचें काम आणि यांतच त्याचें शिक्षण होतें. प्रार्थनेंतील प्रवचनें ऐकावींत, सहज संभाषणांतून

**क्षणशः कणशश्चैव**

अनुक्रमणिका

ज्ञान संपादन करावें. असा प्रत्येक विद्यार्थ्याचा कार्यक्रम निरनिराळ्या तऱ्हेचा परंतु एका च ब्रह्मविद्येच्या शिक्षणसूत्रांत गोंवलेला असे. त्यामुळें असमाधानाला जागा च नव्हती.

हा जुनाट घास बंगला असल्यामुळें कांहीं भाग पडित झाला होता. वरचें गवताचें छप्पर पुष्कळ ठिकाणीं कुजून गेलें होतें. आजूबाजूला जंगलासारखी परिस्थिती होती. त्यामुळें येथें पावसाळ्यांत साप विंचू भरपूर निघत. कित्येक वेळां सहज दरवाजा उघडावा तर दरवाजाच्या पाठीमागें १०/१० विंचवांची रांग लागलेली असे. भर झोंपेंत विंचू चावून विद्यार्थी जागे होत. हे गुजराथी विद्यार्थी. अद्यापि मराठी नीट येत नसे. तेव्हां काय झालें? असें कोणी विचारलें कीं—"बिछूनें चटकन बटका भरला" असें मोडकें तोडकें उत्तर यावयाचें. पुढें पुढें विंचवाला कोणत्या हि साधनाशिवाय नुसत्या हातानें धरण्याची कला विद्यार्थी शिकले. विंचवाची नांगी पकडून त्याला ते सहज लीलेनें दूर फेंकून देऊं लागले. आचार्यांला हें निर्भयतेचें शिक्षण अभिप्रेत होतें च. साप हि कित्येक जण निर्भयतेनें आणि शिताफीनें हातानें धरून फेंकून देत. या सर्पविंचवांचा थोडा फार बंदोबस्त असा होई. पण पावसाळ्यांत छपरांचे गवत कुजून जाई आणि आजूबाजूला डबकी सांचत, ऊंच ऊंच गवत वाढे, पानांचा पाचोळा कुजून जाई आणि चोंहींकडे उबस विषारी हवा तयार होई. त्यांत डासांची उत्पत्ति हि अपरंपार व्हावयाची. मग हिंवतापाची सुरुवात होऊन एकेक जण भराभर अंथरूण धरी. या मलेरियाला मात्र कोणाला फारसा प्रतिकार करतां आला नाहीं.

**एतद्वै परमं तपो यद्व्याहितस्तप्यते ।**

या मलेरियाच्या व्याधीचें तप येथल्या तपश्चर्येत एक मोठे विघ्न होऊन गेलें. कित्येक वेळ जवळ जवळ सर्व च विद्यार्थी आजारी असावयाचे. अशा हि प्रसंगीं रोग हा कां आला? आपलें कोठें चुकलें? इत्यादि आत्मनिरीक्षणाची ही संधी आहे असा आचार्यांचा उपदेश आश्रमीयांना मार्गदर्शक असे च. आचार्य हि या साथींतून सुटूं शकत नसत. आधीं च अशक्त, त्यांत आहाराचे अनेक प्रयोग करीत त्यामुळें हि शरीर कृश असे. शिवाय मानसिक चिंतनानें शरीराला थकवा येई—त्यामुळें त्यांना ताप लागल्याबरोबर ते अधिक च अशक्त व्हावे यांत नवल नाहीं. देहभोग आपला आपण सहन करावयाचा. तिकडे साबरमतीला किंवा मित्रमंडळींना कोणी हि आपला आजार कळवावा अशी त्यांची मुळीं च इच्छा नसे. कित्येक वेळां अशा आजारी अवस्थेंत प्रार्थनेनंतरच्या प्रवचनांत गंभीरपणें सांगितलें जाई.—"मी मेलों तर यत्किंचित् हि चलबिचल होतां कामा नये. कोणालाही कळविण्याचें कारण नाहीं. इकडे सर्व क्रिया झाल्यानंतर मग वाटल्यास एक साधी बातमी म्हणून कळविण्यास हरकत नाहीं.

**मरका गुरु आणि रडका चेला ।**
**दोघांचा परमार्थ वाया गेला ॥**

असें होतां कामा नये.

प्रार्थनेमध्यें वेळोवेळीं घडणाऱ्या साध्या घटनांवर हि उत्तम तऱ्हेचा बोध दिला जाई. आश्रमाच्या शेतांत कापूस पेरलेला होता. कापसामध्यें मधून मधून एक दोन ओळी तुरीच्या हि पेरण्याची मध्यप्रांतांत चाल आहे. त्यामुळें शेतांत सौंदर्य आणि उपयुक्तता हि वाटते. शिवाय वेंचणी करणाऱ्या मजूरांना मधून मधन तोंड चालविण्याला तें एक साधन मिळतें. एकदां आश्रमीय विद्यार्थी शेतांत कापूस वेंचणी करतांना मजुराप्रमाणेंच शेंगा खाताहेत असें आचार्यांना आढळलें. त्यावर प्रार्थनेंत पुष्कळ बोध दिला गेला. आपण

अनुक्रमणिका

जेवतों त्या व्यतिरिक्त मध्यें यत्किंचित हि कोणती हि वस्तु तोंडांत टाकणें हें पाप आहे. असें समजलें पाहिजे. आहारदृष्ट्या त्यांत अध्यशन आहे."—गोष्ट साधी आहे. पण ती जीवनावर कायमचा परिणाम करणारी आहे. लहान मुलांना आया खाण्याचें एक व्यसन च लावतात. पोरें आणि ढोरें जणूं काय सारखीं च, त्यांना नेहमी जणूं काय चरावयास पाहिजे च. असे बारीक सारीक अनेक प्रसंग असत. घटना मोठी कीं लहान असो तिचें महत्त्व तिच्या आकारावर नसून तिच्या आंतरिक मानस भावावर असल्यामुळें

**साध्या ही विषयांत आशय असे मोठा किती आढळे ।**
**नित्याच्या परि दर्शनें जन कसे होतात ते आंधळे ॥**

अशी सामान्य लोकांप्रमाणें आश्रमांत आणि ही जीवनसंस्था चालविणाऱ्या महान् आचार्यात आंधळी स्थिति कल्पिणें हि शक्य नाहीं. या साध्या विषयांखेरीज प्रार्थनेंत साधनेविषयीं हि पुष्कळ सांगितलें जाई. एकदां तर सकाळीं ४ वाजतां प्रार्थना सुरू झाली. आणि त्यानंतर प्रवचन सुरू झालें. तें १० वाजेपर्यंत चाललें होतें. तटस्थ चित्राप्रमाणें सर्व जण ऐकत बसले होते. टॉमस आ केंपिसाचें 'इमिटेशन ऑफ क्राइस्ट' हि सांगितलें जाई. कधीं मनाच्या श्लोकांवर विवरण होई. सकाळचा मंद मंद वारा सुटलेला आहे. आजूबाजूची झाडें डोलत आहेत. जिकडे तिकडे अस्पष्ट अंधःकार पसरला आहे. वर आकाशांत तारका चमकत आहेत. बैठकीवर दोन ओळी करून विद्यार्थीगण आणि एका बाजूला मध्यें आचार्य बसून तऱ्हेतऱ्हेचे विवेचन चाललें आहे हा प्रार्थनेंतला भाग अतिशय उद्बोधक असे.

प्रार्थना हा आश्रमजीवनावरचा कधीं हि न पुसला जाईल असा ईश्वरी शिक्का होता. या शिक्क्याच्या दोन बाजू असत. सकाळची प्रार्थना एक बाजू आणि संध्याकाळची प्रार्थना दुसरी बाजू. हें च आश्रमाचे नाणें. ईश्वरीसाम्राज्यांत चालेल म्हणून सर्व चुकलें तरी प्रार्थना तर चुकतां च कामा नये. नित्य नवा रस, नित्य नवी गोडी, रोज मधुर भजनें! रोज संतांचा उपदेश तन्मयतेनें म्हणावा थकवा किती हि येवो, आजार कसा हि असो.—

**साता दिवसाचा उपवासी । तरी सोडूं नये भजनासी ॥**

असें आचार्यांचें वागणें आणि सांगणें असे. सर्व तपस्या या भक्तीच्या गोडीनें च गोड व्हावयाची. तपस्येचा योग बनविण्याची, सर्व परिस्थितीचें भाग्य बनविण्याची कला यांत च शिकावयाची. म्हणून या प्रार्थना अति महत्त्वाच्या असत. जो तपस्वी नाहीं, ज्याच्यापाशीं कष्ट नाहीं, जो प्रयोग करीत नाहीं त्याला प्रार्थनेचें महत्त्व कसें कळणार? आपली शक्ति तुटून पडली. आतां पुढें कांहीं दिसत नाहीं अशी स्थिति आल्यांखेरीज 'तेषामहं समुद्धर्ता' हें आश्वासन कोठून मिळणार?

आश्रमीयांची शक्ति खरोखर दिवसभराच्या तपस्येनें तुटून पडे. कित्येक वेळां तर धड जेवण मिळावयाचें नाहीं. कारण प्रयोग असा चाले कीं सूत कांतण्यावर आपला जेवणखर्च चालवावयाचा. अमुक इतकें सूत सर्वांचें झालें तर च हिशोबाप्रमाणें जेवण मिळावयाचें. सकाळीं ४ ला सर्व जण उठत. प्रार्थना झाल्यावर कोणी दळण करी, कोणी पाणी भरी, कोणी न्याहरीची तयारी करीत. बाकीचे सर्व पिंजणखोलींत पिंजावयाचें. पाळ्या लागलेल्या असत. त्या-त्या ठरलेल्या वेळीं पिंजून लगेच रहाटावर सूत काढावयाला बसावयाचें—ते थेट ११-११॥ पर्यंत भिर् भिर् भिंगऱ्या फिरताहेत, फाळक्यावर गर् गर् सूत गुंडाळले जात आहे, लडीवर लडी, गुंड्यावर गुंड्या जमा होत आहेत. असा पहिल्यापहिल्यानें सगळा उत्साहाचा भर

असावयाचा. पण तिकडे ११-११॥ झाले कीं, हात थोडा थोडा ढिला पडूं लागे. अल्पवयस्क विद्यार्थी च ते. लगेच जेवण झालें कीं, भांडी घासून, धान्य निवडून क्षणभर हि न थांबतां पुन्हां आपल्या रहाटावर सुताची चढाओढ सुरू होई. कोणी वर हात खेचतो आहे, कोणी बाजूला, कोणी आंखूड धागा काढतो आहे तर कोणी लांब, कोणी भराभर चाती बदलतो. तर कोणी एक च चात फुगवून भरतो. कोणी तिरपा चरखा ठेवतो तर कोणी सरळ. असे नाना प्रकार करून कसें हि करून ज्यांचा त्याचा भाग आधीं उकरण्याच्या झटापटीत जो तो असावयाचा. दुपारचे तीन वाजले कीं, गोपाळराव काळे किंवा प्रौढ मंडळीपैकीं कोणी तरी पाटीपेन्सील घेऊन दरेकाच्या गुंड्या मोजावयाचा. मग हिशेबाप्रमाणें गुंड्या किती कमी पडतात. तें पहावयाचें. जर असें दिसलें कीं संध्याकाळीं ६ पर्यंत जेवणापुरतें सूत कांतून होणार नाहीं तर त्या दिवशीं सायंकाळचें जेवण बंद. स्वयंपाक व्हावयाचा नाहीं. त्यांत थोडेंसें सूत कमी पडेल असें दिसलें तर तेल वापरलें नाहीं, म्हणजे तेवढ्यांत भागे. जरा जास्त कमी पडले तर तूप सोडावें लागे, आणखी जास्त कमी पडलें कीं डाळ सोडावी असा प्रकार चाले. बहुधा इतर लोक लगेच कांतण्याला बसून कसें हि करून निदान भाजीभाकर मिळेल एवढें तरी सूत काढण्याची पराकाष्ठा करीत. ही खुशीची गरीबी खरोखर अमीरीची हि अमीरी होती.

**जो सुख पावे नाम भजनमें ।**
**सो सुख नाहिं अमीरीमें ॥**
**मन लागो मेरो यार फकीरीमें ।**
**भला बुरा सबका सुनि लीजे ।**
**कर गुजरान गरीबी में ॥**

हें भजन त्या वेळीं आश्रमांत मूर्तिमंत प्रगट झालेलें असे. विणकामाच्या प्रयोगांत हि अशी च तपस्या होती. या सर्व प्रयोगांत आणि तपस्येंत आचार्य अग्रेसर असावयाचे. त्या वेळी कोणालाच विणकामाची नीट माहिती नव्हती. सूत हि नवीन असे. खादीच्या विणकामाची पद्धति च निराळी होती. त्यामुळें सर्व बाबतींत चुका होत. सूताला खळ देण्याची फजीती तर इतकी व्हावयाची कीं ८-८, १०-१० दिवस कांजी दिलेल्या सूताची १० वाराची ताणी ८-८ तास सारखी सांधत उभें रहावें लागे. इतके तार तुटत. ऋषींच्या जटांप्रमाणें त्या ताणींत तुटलेल्या तारांची जुंबाडेच्या जुंबाडे लोंबत असावयाची. उभे राहून राहून पायांत रक्त उतरें. फिरण्या पेक्षां नुसते उभे रहाणें कठिण. तार सांधत उभें राहून एका पायावर उभे रहाण्याच्या तपस्येची आठवण व्हावयाची. वरून उन्हाचा मारा हि सपाटून व्हावयाचा. ताणी ८—१० दिवसांत तयार झाल्यावर मागावर चढावयाची. तेथें तिचा काय टिकाव लागणार? शतशः सांधलेले तिचे धागे तटातट तुटूं लागले कीं, विणणारा अगदीं मेटाकुटीस येऊन जावयाचा. ‘झिनी झिनी झिनी झिनी चदरिया’ प्रार्थनेंत म्हटलें जाणारें हें कबीराचें पद आठवावें तों त्याचा आपल्या विणकामाशीं कोठें च मेळ दिसावयाचा नाहीं. तो कबीर तर गाणें म्हणत म्हणत आपलें विणकाम खुशीनें करी. त्यानें विणतां विणतां आलेल्या जिज्ञासूंना उपदेश हि द्यावा. पण येथें तर एक हि धागा आडवा बसत नाहीं. जिकडे तिकडे तुटातूट सुरू. आकाशाला ढिगळें देण्याचा च तर हा प्रकार नाहीं? असें वाटे. येथें कसली आली आहे ‘झिनी चदरिया’ असा तो विणण्याचा प्रकार असे. पावसाळ्यांत विणण्याच्या खड्यांत पाणी येई. तेथें डास तयार च असत. ते पायांना सडकून चावत. अशा थाटांत विणकामाचें काम ८ तास चालावयाचें. असें एक ठाण ज्यानें विणलें त्याला त्या दिवशीं मग कोलंबसाला अमेरिका सांपडली तेवढा आनंद व्हावयाचा. परंतु पुन्हा तें च. नवी ताणी सुरू केली कीं पुन्हां तुटलेल्या तारांचा हा समुद्र कसा तरून जावा हा यक्षप्रश्न पुढें उभा राही. खादीच्या विणकामांतली त्या वेळची तपस्या ही अशी होती. आचार्य नाना तऱ्हेनें या सर्व कामांत जातीनें भाग घेऊन सूचना देत.

अनुक्रमणिका

या तपस्येची कल्पना मोठमोठ्या पुढाऱ्यांना हि येणें शक्य नसे. जमनालालजी मोठ्या प्रेमानें कोणी पुढारी वर्ध्याला आला कीं त्याला आश्रमांत आणावयाचे च पण त्याचा कांहीं उपयोग होत नसे. एकदां विठ्ठलभाई पटेल आणि सरोजिनी नायडू आश्रमांत आल्या. संध्याकाळची वेळ होती. विणकाम संपवून जेवण आटोपून मंडळी भांडी घासीत होतीं. जमनालालजींनीं एका विद्यार्थ्याला बोलावले व विणकामाची शेड उडवून देण्याला सांगितले. तो भास्कर नांवाचा विद्यार्थी पुढे झाला. त्यानें विणकामाचें झडपें नुसतें किलकिलें केलें न केलें तोंच विठ्ठलभाई आणि सरोजिनी नायडू म्हणाल्या 'हें काय विणकाम ना? हां बरे चला.' तेवढ्या एका सेकंदांत त्या किलकिल्या दारांतून अस्पष्ट प्रकाशांत त्यांना काय दिसलें त्यांचें त्यांना माहित! असे अनेक पुढारी येत आणि जात. गांवांत त्यांचीं व्याख्यानें हि होत. परंतु आश्रमांतून कोणी जात नसे. व आश्रमांत हि त्यांचा उपदेशादि प्रकार कधीं घडला नाहीं. मात्र आश्रमापासून फार दूर नसलेल्या मारवाडी विद्यालयांत पुढाऱ्यांचे व्याख्यानादि प्रकार व्हावयाचे. तेथला देखावा भिन्न होता. ती प्रचंड इमारतीची शाळा आणि तेथले विद्यार्थी यांचें वातावरण सर्वस्वी वेगळें होतें. तरी इतर शाळापेक्षां तेथें राष्ट्रीय जिव्हाळा अधिक असे. आचार्यांना हि मारवाडी विद्यालयांतल्या शिक्षकाकडून व चालकाकडून आमंत्रण येई. मुलांना कांहीं उपदेश मिळावा हा त्यांचा त्यांत हेतु असे. तेथें आठवड्यांतून एकाद वेळां जाणें व्हावयाचें. तेथल्या व्याख्यानांनीं मुलें आकर्षिली जात. त्यांतली कांहीं मुलें कधीं कधीं आश्रमांत येत. त्या विद्यालयाजवळ च राहणारे, त्या विद्यालयाला प्रेरणा देणारे, व्यवहाराच्या व शिक्षणाच्या नाना क्षेत्रांतला अनुभव घेतलेले, जमनालालजींच्या निकटवर्ती मोठ्या स्नेहीमंडळीपैकीं एक श्रीकृष्णदास जाजू हि प्रार्थनादिंच्या वेळी आणि इतर वेळीं येताजातां येथें येऊन निरीक्षण संभाषण करावयाचे. इकडे ताणी सांधणें चालूं आहे. जाजूजी आले आहेत, आचार्य ताणीचे तार सांधतां सांधतां जाजूजींशीं अर्थशास्त्रादि चर्चा करीत आहेत, असें पुष्कळ वेळां दिसून येई. गांवांतली कॉंग्रेसची आणि इतर चळवळींतलीं माणसें हि सल्ला-मसलतीसाठीं येत. त्या सर्वांवर आचार्यांच्या निःस्पृहतेचा, वैराग्याचा, विद्वत्तेचा, निर्णायक आणि खोल चिंतनाचा स्वाभाविक च परिणाम होई.

या पुरुषाचा आपण शक्य तितका उपयोग करून घेतला पाहिजे, याचे विचार लोकांना ऐकवले पाहिजेत अशी जमनालालजी, जाजूजी वगैरे मंडळींची उत्कट इच्छा असे. पण करतात काय? येथलें ज्ञान सर्व या घास बंगल्यांत च अडकून पडलें होतें. तसें पाहिलें तर हा बंगला हि नाही. घास बंगल्यांत कांहीं दिवस राहिल्यानंतर, बंगल्याच्या जवळच्या झाडाखालीं विद्यार्थ्यांनीं आचार्यांसाठी तट्ट्याची एक लहानशी पर्णकुटी तयार केली. त्या कुटींत निजण्याचा एक लाकडी पाट, जवळ कांहीं पुस्तकें, पाण्याचा लखलखीत घासलेला लोटा असें सामान असे. समोर घोंगडी आंथरलेली. तेथें त्या लहानशा झोंपडींत हें ज्ञान रहात होतें. एके दिवशीं मोठें वादळ झालें, जोराचा पाऊस आला आणि एक मोठें झाड कडाडून झोंपडीजवळ च पडलें. त्यानंतर मग विद्यार्थ्यांनीं हें झोंपडीचें स्थान बदललें. ही येथली ज्ञानाची गंगा वाहून केवळ कालसमुद्रांत लीन होत आहे. हिचे पाट काढून त्या पाटावर बगीचें फुलवावेत. त्या बगीच्यांतलीं फुलें जनतारूप महादेवाच्या डोक्यावर वहावी याची जमनालालजींना उत्कंठा लागली होती. तेव्हां जमनालालजींच्या आणि इतरांच्या वारंवार होणाऱ्या आग्रहामुळें आचार्यांकडून शेवटी 'महाराष्ट्र-धर्म' मासिक काढून तें एकहाती लिहिण्याचें कबूल केलें गेलें. मनोहरपंत देशपांड्याशीं बोलतांना उल्लेख येऊन गेला तें च हें मासिक. त्या मासिकांत लेख लिहीत असतां एकसारख्या फेऱ्या घालून चिंतन चालावयाचें, त्यामुळें आधींच्या अशक्ततेंत भर पडत चालली. मासिकाचीं प्रुफें तपासणें, छापखान्याचें काम करणें, मासिकांची रवानगी करणें, प्रचार हिशेब वगैरे कामें गोपाळराव काळ्यांसारखी मोठी मंडळी करीत. या मासिकाच्या प्रचारासाठीं मोघेजी गांवोगांव निघालें. विचारी लोकांचें चित्त या मासिकानें तेव्हां च वेधलें.

अनुक्रमणिका

मग खानदेशकडची मंडळी एकेक येऊं लागली. आश्रमाचा अनुभव घेऊं लागली. त्यांतल्या कांहीं माणसांनीं तर सेवाक्षेत्रांत उत्तम कर्तबगारी करून दाखवली. परंतु स्पृश्यास्पृश्य भेद येथें नाही या मुद्यावर कित्येक मंडळी आश्रम सोडून गेली. गेलेल्यांपैकीं कांहीं पुन्हां परत आलीं. निघून जाणाऱ्या मंडळींत कांहीं कष्टाला कंटाळून जाणारीं हि होती. एका गृहस्थाची मोठी गंमत आहे. तो दिवसभर इतरांप्रमाणें रहाट चालवावयाचा पण हा “मोनोटोनस” कार्यक्रम त्याला नापसंत होता. तो रहाट तर नीट चालवी, पण मधून मधून विद्यार्थ्यांना म्हणें, “काय लचांड लावलें आहे गांधींनीं हें! मला तर याचा राष्ट्रसेवेसाठीं कांहीं उपयोग दिसत नाहीं. दिवसभर बांधल्यासारखें बसावयाचें आणि सूत काढायचें यानें काय होणार? त्यापेक्षां शेती केलेली बरी. शेतकऱ्यांत त्यामुळें मिसळणें शक्य होईल. शेतीची सुधारणा होईल. मला वाटतें मोठ्या माणसांना एकेक “हॉबी” असते. त्यांतलीच ही गांधींची हॉबी दिसते. ती त्यांनीं सर्व राष्ट्राच्या पाठीमागें लावून दिली! त्यांना जर कदाचित् मडक्याची हॉबी असती तर त्यांनीं आम्हां सगळ्यांच्या पाठीमागें मडक्यांनीं स्वराज्य मिळेल, कुंभार व्हा, असें च लचांड लावलें असतें!” अशा याच्या बोलण्याचें विद्यार्थ्यांना हंसूं येई. पण एक दिवस त्यानें आपला शेतीसंबंधींचा विचार आचार्यांना कळविला. आचार्यांनी लगेच त्याला आश्रमसमोरचें मैदान दाखविलें. व ८ तास सूत कांतण्याऐवजीं त्यानें खुशाल ८ तास खणावें, अशी त्याला परवानगी दिली. २/३ दिवस उन्हांत काम केल्यावर त्याची ही हौस पार वितळली आणि एके दिवशी तो गुपचूप निघून गेला. चोहीकडून निरनिराळीं मंडळी आल्यामुळें असे गंमती चे प्रकार घडणें अपरिहार्य होतें. एक नाटकांतला मनुष्य होता. तो दाखल झाला तेव्हां त्यानें कांहीं निराळी च हकीकत सांगितली होती. पण त्याचा नाटकीपणा छपला नाहीं. रहाटावर दिवसभर काततांना अस्पष्ट आवाजांत तो नाटकी गाणी गुणगुणें. त्याचा येथे किती दिवस टिकाव लागणार. तो थोड्याच दिवसांत निघून गेला. पण जातांना एक रहाट मात्र गुपचूप चोरून नेण्यास तो विसरला नाहीं! आश्रम हें वाहतें पाणी असे. त्यांत कांहीं अशा तऱ्हेचे लोक येत. परंतु ते टिकूं शकत नसत आणि आश्रमावर त्यांचा कांहीं च परिणाम होत नसे.

**प्राणाघातान्निवृत्तिः परधनहरणें संयमः सत्यवाक्यं ।**
**काले शक्त्या प्रदानं युवतिजनकथा मूकभावः परेषां ॥**
**तृष्णास्त्रोतो विभंगो गुरुषु च विनयः सर्वभूतानुकंपा ।**
**सामान्यः सर्वशास्त्रेष्वनुपहतविधिः श्रेयसामेष पंथाः ॥**

हीं नीतितत्त्वें ज्या आर्यसंस्कृतीच्या प्रवाहांत भिनलेली आहेत, तेथें मानवी मनाच्या दुर्बलतेचा आश्रमासारख्या संस्थेवर काय परिणाम होणार? शिवाय ज्या ज्ञानसूर्याचा आश्रमांत सतत प्रकाश पडलेला असे, तेथें असल्या शुद्र घटना किती वेळ टिकणार? तेथें लगेच आत्मशुद्धि व्हावयाची च. असलीं माणसें भराभर गळून पडावयाचीं. तेथें शुद्ध आणि गाळीव तें च टिकावयाचें. येथल्या उद्योगाच्या प्रखर अग्नीपुढें निरुद्योगी जीवनांतला कमकुवतपणा येथें रहावयाचा नाहीं. तो जळून भस्मसात् व्हावयाचा.

येथला उद्योग जितका प्रखर असे तितका तो डोळस हि होता. त्यामुळें निरनिराळ्या ठिकाणीं चाललेल्या खादीच्या विणकामासंबंधीं येथली मंडळी जागरूकतेनें पहात असत. या दृष्टीनें मध्यप्रांतांतल्या किन्ही येथील उद्योगाची पाहणी करण्यासाठी आश्रमातर्फे दोन माणसें पाठविलीं गेलीं. अशा निरीक्षणांतून नवीन नवीन कल्पना सुचत जात. महाराष्ट्र-चर्खासंघाच्या उत्पत्तिकेंद्राला या पाहणीचा पुढें पुष्कळ उपयोग होऊन या च भागांत प्रथम महाराष्ट्र-चर्खासंघाचीं उत्पत्तिकेंद्रें सुरूं झालीं.

अनुक्रमणिका

अशा प्रकारें राष्ट्रीय उद्योगाची तपस्या, यमनियमांचा अभ्यास, भक्तिज्ञानाची उपासना या आश्रमांत जोरदार तऱ्हेंनें चालूं झाली. येथें आचार्यांच्या भोंवतीं असलेलें बडोदें आणि साबरमतीचें मंडळ तर बहुतेक जमा झालें च. पण आतां येथें आणखी नवीन नवीन मंडळींचें नवे वलय तयार होऊं लागलें. आश्रमाच्या बाहेर ही मंडळी क्वचित च जात. परंतु बाहेरच्या कार्यकर्त्यांचें लक्ष मात्र येथें हळूं हळूं वेधूं लागलें. कारण सत्य हें स्वयंप्रचारी असतें. जमनालालजींनीं आपला पुतण्या हि येथें ठेवला. असे त्यांना जे जे होतकरू दिसत त्यांना जमनालालजी आश्रमांत आणीत च असत. गुणांची पारख करून आश्रमांत परिचयापरिचयानें च प्रवेश मिळे. वाटेल त्याचा येथें प्रवेश होत नसे. कुलीन, शालीन, धडाडीचे बुद्धिमान् राष्ट्रसेवक आश्रमाला पाहिजे होते.

**परीक्षेविणें बांधिले दृढ नाणें ।**
**परी सत्य मिथ्या असे कोण जाणे ॥**

असें येथल्या आचार्यांचें नसे. पुष्कळशा राष्ट्रीय शाळांत, सर्वत्र मार खाल्लेलीं उडाणटप्पू मुलें नाइलाज म्हणून पालक नेऊन घालीत. तसें येथें नव्हतें. आत्महिताच्या लालसेनें, देशसेवेच्या भावनेनें, आणि दुर्दम्य निश्चयाच्या प्रेरणेनें वेडीं झालेलीं माणसें येथें हवीं असत. अशांसाठीं आश्रमाचा दरवाजा सतत मोकळा असे. या मोकळ्या दारांतून योग्य माणसें आंत येत. आणि "यद्गत्वा न निवर्तन्ते" अशी त्यांची स्थिति होऊन जाई. आचार्यांपलीकडे त्यांना जग दिसेनासें होई. जग हें केवळ मिथ्या च आहे, हा वेदांताचा अनुभव त्यांना अक्षरशः खरा वाटे. जग हें ज्ञानाचें पेटवण आहे. अग्नीला काय लांकडें कधीं सत्य वाटलीं आहेत? तीं त्याच्यापाशीं आलीं कीं तत्स्वरूप च होऊन जावयाचीं. म्हणून आश्रमीयांचे लक्ष बाहेर मुळीं च जावयाचे नाहीं. जगांत जें जें म्हणून चांगलें आहे, जगांत जें जें म्हणून परमार्थपोषक आहे, तें तें सर्व आपल्या साधनाच्या आकर्षणानें आपोआप न बोलावतां येथें च येईल. मोठमोठे संत सत्पुरूष आणि महात्मे आपल्या येथें आपणहून येतील. आपली साधना बळकट झाली कीं आपल्याला कसली च चिंता नाहीं. अशी आचार्यांची शिकवण असे. येथली माणसें उगीच आप्तेष्टांशीं किंवा मित्रांशी पत्रव्यवहार करताहेत, भाराभर पुस्तकांच्या फंदांत पडलीं आहेत किंवा वर्तमानपत्रांत गुंगत आहेत अथवा गप्पागोष्टींत सुख मानताहेत हें दृश्य आचार्याला मुळीं च खपावयाचें नाहीं. येथें व्यासवाल्मीकि का येईना, बा वाल्मीके, तुझें काव्य चरखा कांतण्यांत च प्रकट होऊं दे असें च मी म्हणेन, अशी आचार्यांची भाषा असे. आत्मशक्तीचें केंद्रीकरण झालें कीं, सर्व शक्ति आपोआप मिळावयाच्या. आत्म्याला जिंकलें कीं जग जिंकलें जावयाचें अशी ही अद्भुत साधना होती. आणि ती आचार्य आपल्याबरोबर इतरांकडून करवून घेत हें च येथलें महद्भाग्य होतें! आयुष्यच्या आयुष्य घालविलें तरी हें भाग्य लाभेल असा भरंवसा नाहीं. आणि या घडीचा तरी काय भरंवसा आहे? अशा क्षणभंगुर अवस्थेंत येथले निष्ठावंत साधक आपल्या मनाला वारंवार हें च समजावीत यांत नवल काय?—

**एक देव बोलवाया । बोल वाया सोड रे ।**
**मोड तूं एका मनें चि । कामनेची खोड रे ॥**
**अन्न संतपाय साचें । पायसाचें गोड रे ।**
**सौख्य हें चि साधनाचें । साधनाचें जोड रे ॥**

●●●

अनुक्रमणिका

# प्रकरण ३२ वें

## महाराष्ट्र - धर्म

**या छापखान्याच्या** काळांत अनेक लोक अनेक तऱ्हेचे लिखाण लिहीत असतात. आणि प्रकाशित करीत असतात. खरोखर असल्या बेजबाबदार लिखाणाच्या ढिगाऱ्यांत आपलें लिखाण दाखल करणें म्हणजे तें प्रकाशित करणें नसून अप्रकाशित करण्यासारखें च आहे. त्यामुळें होता होईल तो लिहूं नये. प्रकाशनाच्या भानगडींत पडूं नये. आपले विचार आपल्यांतच जिरवून घ्यावें. ते आपल्या ठिकाणीं मुरून जावे, आजूबाजूच्या चार साधकांना अधिकारानुरूप त्याचा लाभ व्हावा, विचारांचा परिपाक आचाररूपानें सिद्ध होत रहावा. आचार हेंच प्रचाराचें सर्वोत्तम साधन. विचार प्रकट केला नाहीं तरीं विचाराचें प्रचंड वातावरण तयार होत राहातें. समुद्राची वाफ जशी प्रत्यक्ष तयार होतांना दिसत नाहीं, तथापि वर्षा ऋतूंत ती सर्व जगाला जीवनाचा लाभ करून देते. त्याप्रमाणें सत्पुरुषांचे विचार हे लिहिले गेले नाहींत तरी वातावरणांत ते भरून राहतात. ते बोलले गेले नाहींत तरी अखंड मूक व्याख्यान देत च असतात. त्यांच्या तेजस्वी विचारांनीं च मानवजीवन नकळत प्रगतिपथावर पुढें पुढें जात असतें. या सिद्धांताप्रमाणें लिहिणें किंवा बोलणें या दोन्ही गोष्टींवर असामान्य काबू असून, विचारांचें आणि भाषेचें, पूर्वसिद्धांतांचें आणि नवीन शोधांचें अखंड भांडार येथें करतलामलकवत् झालेलें असून आजपर्यंत लिहिण्याकडे आणि बोलण्याकडे मित्रमंडळींचा आग्रह असून हि विशेष लक्ष पुरवलें गेलें नाहीं. आणि यांत आश्चर्य तरी कसलें? जेथें विचार हें च जीवन, सर्व जग च विचारमय झालें तेथें कागदावर ते विचार लिहावे आणि ते लोकांनीं वाचावे, असल्या कल्पनांना थारा कोठून मिळणार? जिकडे तिकडे सृष्टि जलमय दिसूं लागल्यावर एखादा लोटाभर पाणी दुसऱ्याला भरून देण्याचा उपक्रम कसा करवेल? तुकाराममहाराजांच्या अभंगांच्या वह्या नदींत बुडाल्या होत्या. त्या पांडुरंगानें वर काढल्याची कथा आहे. पण येथें अभंगाची च नदी वाहत होती! येथें अशा वह्या लिहिणें हि शक्य नाहीं आणि बुडणें हि शक्य नाहीं. मग त्या वर काढण्याची कथा काय?

अशा सर्वस्वी ब्रह्ममय भूमिकेंत असलेल्या पुरुषाला विचाराच्या लेखमय साकार भूमिकेवर आणण्याला मित्रमंडळींना किती कष्ट पडले असतील याची कल्पना च केलेली बरी. ज्यांच्या विचारांची लोकांना जरूर नाहीं, ते लोक आपण च आपले विचार मांडून, त्यांचा उदो उदो करून घ्या हो, घ्या हो, असे तोंड वेंगाडत फिरतात आणि ज्यांच्या विचारांची जग युगयुगापासून उत्सुकतेनें वाट पाहाते असे सत्पुरूष विचाराला लेखरूपांत उतरूं देण्याला सर्वस्वी प्रतिकूल दिसतात. अशा स्थितींत आमचें व्हावयाचें कसें? आम्हांला जें लिखाण नको तें टळत नाहीं आणि हवें तें मिळत नाहीं. अशी आजूबाजूच्या मंडळींची अवस्था पाहून महाराष्ट्र धर्माचा अवतार झाला. १९२३ जानेवारीला महाराष्ट्र-धर्माचा पहिला अंक निघाला.

पण मूळ समाधि अवस्थेंत रमणाऱ्या बुद्धीला ज्याप्रमाणें मोठ्या कष्टानें खालच्या जगांतल्या भूमिकेंत उतरावें लागतें किंवा आपल्या भव्य राजप्रासादांत राहणारा राजपुरुष ज्याप्रमाणें जरी झोपडींत क्षणभर उतरला तरी तो तेवढ्या पुरता च, तो कांहीं तेथें टिकून रहावयाचा नाहीं. त्याप्रमाणें महाराष्ट्र-धर्म मासिकाच्या पहिल्या अंकाच्या पहिल्या च लेखांत लिहिण्याच्या स्थायित्वापेक्षां न लिहिण्याच्या अव्यक्त दशेकडेच झोंक ठेवला गेला. "संकल्पाचें उदक सोडून चुकलों. पण असें करण्यांत खरोखर च "चुकलों" कीं काय ही शंका शेकडों वेळां मनांत येऊन गेली आहे." असें पहिल्या च लेखाच्या शेंवटच्या परिच्छेदांत म्हटलें आहे. पहिला लेख आत्मनिवेदनाचा आहे. 'भक्तिसंप्रदायांत आत्मनिवेदन शेंवटीं येत असलें तरी

पत्रकाराच्या संप्रदायांत तें पहिल्या प्रथम येतें. कारण भक्ताचें काम आंतल्या देवाला जागण्याचें आणि पत्रकाराचें बाहेरच्या देवाला जागविण्याचें असतें', असें त्याचें कारण दाखवून पुन्हा 'आंतला देव जागल्याशिवाय बाहेरचा देव जागविणें शक्य नाहीं', हा मूल सिद्धांत हि प्रकट केला आहे. पहिल्या च पानावर हा मजकूर आढळतो.

या उपक्रम-उपसंहारावरून लिहिण्याचें हें काम किती संयमपूर्वक किती निवृत्तिमय तऱ्हेनें केलें जात आहे याची कल्पना येते. सर्व प्रवृत्तीवर निवृत्तीची एवढी जबरदस्त पकड असल्यावर—संयमाचा संयम म्हणजे विचार जिरविणे, विकार जिरविण्यांत खरा संयम नाहीं, असा कल्पनातीत संयम स्वतःसिद्ध असल्यावर जे विचार प्रकट होतील, जी भाषा उमटून पडेल, जी कांहीं शब्दरचना होईल त्या रचनेला सहज च पृथ्वीचें मोल येईल यांत शंका कशाला? किंबहुना तिच्या मोलाचा तोल पृथ्वीच्या उपमेनें हि होऊं शकणार नाहीं.

'जरि म्हणति कवि क्षितिला अचला सर्वंसहा क्षमा उर्वी', पृथ्वीला जरी कवींनीं अचला म्हटलें आहे तरी येथल्या सिद्धांतांचें अचलत्व पृथ्वीच्या अचलत्वाला मागें टाकतें. ती जरी सर्व सहन करणारी असली तरी येथें सर्व विचार आपल्या विचारांत समावून टाकल्यामुळें सहन करण्याच्या भाषेपलीकडची अतुलनीय सहिष्णुता येथें दिसतें! सम्राटाच्या संपत्तीला लाजविणाऱ्या विचारवैभवानें भरलेलें हें लिखाण याच्या मोलाचा तोल कसा होणार? ब्रह्मसूत्रभाष्यांत आचार्यांची जशी एकमेवाद्वितीय बादशाही भूमिका दिसते किंवा रस्किनच्या लेखांत प्रतिभेची भरारी जशी प्रतीतीला येते, ज्ञानेश्वर ज्याप्रमाणें आपल्या शांतरसाच्या अमृतांत जीवाला समाधिमग्न करून सोडतात आणि मग दुसरें कांहीं सुचेनासें होतें तशी च या लिखाणाची स्थिति!

परंतु विचारांची अशी विश्वव्यापक विशाल भरारी असून हि मासिकाचें नांव मात्र सकृद्दर्शनी आटोपशीर असें "महाराष्ट्र-धर्म" ठेवलें गेलें. खाजगी चर्चेंत दोन नांवें सुचविलीं गेलीं होतीं. एक विनयपत्रिका आणि दुसरें महाराष्ट्र-धर्म. परंतु विनयपत्रिका हें जरी अतिशय गोड नांव असलें तरी तें तुळसीदासजींच्या एका ग्रंथाला आधींच लाभलेलें होतें. आणि महाराष्ट्र-धर्म ही संज्ञा मित्रमंडळींच्या हृदयांत विद्यार्थि-मंडळापासून एकसारखी घुमत राहिलेली. तेव्हां या दोन नांवांत विनयपत्रिका हें नांव पसंत पडण्याजोगें नव्हतें च. तरी कांहीं तार्किक मंडळींनीं या नांवांतल्या आकुंचितपणावर आक्षेप घेतला होता. त्या आक्षेपाचें निरसन पहिल्याच लेखांत प्रथमारंभीं सुंदर तऱ्हेनें केलें गेलें. महाराष्ट्र-धर्म ही संज्ञा मूळची समर्थ-ग्रंथांतली. मूळ योजकांच्या मनांत हि यासंबंधी आकुंचित कल्पना नव्हत्या. या संबंधीं विवेचन करून — "महाराष्ट्र-धर्म हा प्रथमदर्शनीं जरी वामनासारखा दिसला तरी वस्तुतः तो दोन्ही पावलांत विराट विश्व व्यापून टाकणाऱ्या त्रिविक्रमासारखा आहे असें दिसून येईल. या त्रिविक्रमाचें एक पाऊल महाराष्ट्रीय, दुसरें राष्ट्रीय आणि तिसरें अतिराष्ट्रीय आहे. यशोदेचा बालकृष्ण एका अर्थानें विश्वरूपाच्या मुखांत असला तरी दुसऱ्या अर्थानें त्याच्या हि मुखांत विश्वरूप येते हा अनुभव जसा यशोदेच्या यशस्वी दृष्टीला आला त्याचप्रमाणें 'महाराष्ट्र-धर्म' हा आकुंचित अर्थानें सबंध भारतीय धर्माला पोटांत घालून 'दहा अंगुळें वर उरण्यासारखा आहे, असें च ऐतिहासिक प्रज्ञेच्या विचारी दृष्टीस दिसून येईल." असें समाधान केलें गेलें आहे. त्याचप्रमाणें महाराष्ट्र शब्दाची व्याप्ति स्पष्ट केल्यावर धर्म हा राजकारणादि व्यवहारविषयाहून सर्वथैव निराळा समजणारे जे कित्येक लोक आहेत त्यांची ही समजूत किती भ्रामक आहे हें दाखवून धर्म आणि व्यवहाराची सांगड असली पाहिजे, असें म्हणणाऱ्यांचा या सांगडीचा अर्थ कोणता आहे आणि खरा अर्थ काय आहे हें स्पष्ट केलें आहे. राजकारणाशीं धर्माची सांगड म्हणजे धर्माच्या नांवावर गुप्त

कट केले म्हणजे ते सुरक्षित राहतात, व्यवहाराशीं धर्माची सांगड म्हणजे ‘संसार सुखें करावा’ अशी बायको करण्याची परवानगी—असल्या बालिश अर्थानें धर्माची सांगड नसून धर्मानें सर्व व्यवहार पावन करण्यासाठीं सर्व व्यवहाराशीं धर्माची सांगड घालावयाची. हा अर्थ स्पष्ट केला आहे. धर्माशिवाय कोणत्या हि गोष्टींत तेज च उत्पन्न होऊं शकत नाहीं, हा हि महत्त्वाचा मुद्दा उघड करून महाराष्ट्र शब्दाप्रमाणें धर्माची व्याप्ति आणि मासिकाचें धोरण मांडलें आहे.—

(१) ईश्वरनिष्ठा
(२) राजकारण
(३) सर्वसावधवृत्ति

या त्रिविध धोरणाप्रमाणें ‘उपनिषदांचा अभ्यास’ ही महत्त्वाची लेखमाला मासिकांत सुरू करण्यांत आली. चार अध्यायाची ही लेखमाला अपूर्णच राहिली. मासिकाच्या १९२ पृष्ठांपैकीं ६० पृष्ठांत ही माला व्यापलेली आहे. उपनिषदांच्या अभ्यासाच्या या लेखमालेला मराठी वाङ्मयांत तोड नाहीं, असें म्हणावें लागेल. असामान्य वस्तूंची वर्णनें करण्यानें त्यांची कल्पना तर करतां येत नाहीं च. पण उलट त्या वस्तूंना कमीपणा आणण्यासारखें होतें. तशी च स्थिति या लेखमालेसंबंधीं होणार आहे. समुद्राच्या कांठीं गेल्यावर काय स्थिति होते? आपला च आपल्याशीं रममाण झालेला त्याचा तो विलक्षण देखावा! ती प्रचंड गर्जना!! एकावर एक उसळणाऱ्या लाटांची ती अखंड लीला!!! खरोखर मनांचें मनपण च तेथें नष्ट होतें. ती च बरोबर तशी च स्थिति या लेखमालेमुळें होऊन मनाची अवस्था, मनाची बैठक सर्वथैव बदलून जाते. ज्ञानामुळें उन्मनी अवस्था होते म्हणतात. ती हीच अवस्था काय? असें आपलें च आपल्याला वाटूं लागतें. मिठाची बाहुली समुद्राचा तळ पाहून परत येणें शक्य नाहीं. तशी येथें मनाची केवळ विलीन स्थिति होऊन जाते. तें मन अलग राहूं च शकत नाहीं. ब्रह्मदर्शनाचा अनुभव सांगतां येत नाहीं. तसें या मालेचें वर्णन करणें शक्य नाहीं.

या मालेखेरीज (१) निवृत्त-शिक्षण (२) चार पुरुषार्थ (३) माझा यज्ञ (४) समर्थांचें स्मरण (५) सेवाधर्माचा मेवा (६) अभावाचे कौतुक हे सहा लेख या चार अंकांत आलेले आहेत. निवृत्त शिक्षण हा लेख म्हणजे विद्यार्थि-मंडळांत १९२० सालापूर्वी झालेंलें एक व्याख्यान होय. त्या वेळीं श्री. तगारे—जे काशीला बरोबर होते—ते मुख्य वक्ते होते. पण ते १५-२० मिनिटेंच बोलले व त्यानंतर गंभीरपणें अध्यक्ष म्हणून हे निवृत्त-शिक्षणाचे विचार प्रकट करण्यांत आले. हा लेख त्या व्याख्यानाचा संक्षेप आहे. व्याख्यान सुमारें १॥ तास झालें होतें. विद्यार्थि-मंडळांतील १५-२० मंडळी च व्याख्यान ऐकण्याला हजर होती. कापडीपोळेंतल्या (बडोदें) तिसऱ्या मजल्यावरच्या विद्यार्थि-मंडळाच्या जागेंत हें व्याख्यान झालें. श्री. देशपांडे, गोपाळराव काळे, तगारे वगैरेंनीं हें व्याख्यान नंतर प्रत्येकानें स्वतंत्रपणें उतरून आणलें होतें. कोणी ‘न शिक्षा’ म्हणून त्याला मथळा दिला होता तर कोणी दुसरा च कांहीं मथळा दिला होता. या लेखाची ही हकीकत आहे तशी इतर लेखांची नाहीं. म्हणून तत्संबंधीं विवेचन करण्याचा प्रश्न च नाहीं. अंधारांतला एखादा पदार्थ शोधावयाचा तर दिव्याची आवश्यकता आहे. पण सूर्याला दाखविण्यासाठीं दिवा लागेल काय? महाराष्ट्र-धर्म मासिकांतील हे सहा लेख म्हणजे मानवीजीवनाला मार्ग दाखविणारे स्वयंप्रकाशी तेजोगोल च होत.

आणखी या मासिकांतला महत्त्वाचा भाग म्हणजे ‘सत्याग्रहाश्रम वर्धा येथील नियमावली’. महात्माजींच्या सत्याग्रहाश्रम, साबरमतीच्या नियमावलीचा हा अनुवाद च आहे. परंतु त्यांत तीन गोष्टी फार महत्त्वाच्या आहेत. “हा आश्रम साबरमतीच्या सत्याग्रहाश्रमाची स्वतंत्र शाखा असून ‘दो डोळां एक दिठी’

अनुक्रमणिका

त्याप्रमाणें दोन्हींकडे माणसें हि तीं च काम करीत आहेत." असें या नियमावलींत दुसरें च वाक्य लिहिलें गेलें आहे. सत्याग्रहाश्रमासारखी जीवनसंस्था चालवावयाची आणि ती स्वतंत्र तऱ्हेनें ही कांहीं साधारण गोष्ट नव्हें. येथें असामान्य आत्मविश्वास तर आहे च पण त्यांत विलक्षण सूत्रधारित्व हि परिपूर्ण भरलेंलें आहे. आणि खरोखर साबरमतीची ही शाखा या महापुरुषाच्या नेतृत्वाखालीं बिनबोभाट स्वतंत्रपणें च सतत चालत आली. कोणती च अडचण आली नाहीं. कोणता हि घोटाळा येथें उपस्थित झाला नाहीं. येथलें कार्य राजमार्गानें जावें तसें अगदीं सहज तऱ्हेनें चाललें. साबरमतीच्या लोकांना किंवा महात्माजींना अथवा दुसऱ्या कोणाला हि यांत लक्ष घालण्याचें, येथल्या अडचणी निवारण करण्याचें कारण पडलें नाहीं. दुसरी या नियमावलींतील महत्त्वाची गोष्ट म्हणजे ही मूळची महात्माजींचीच नियमावलि खरी, पण तिला या नव्या नियमावलीनें पूर्वींच्या वचनांच्या द्वारें ऋषींच्या अनुभवाचा आधार दाखविला गेला. तिसरी महत्त्वाची गोष्ट खादीशास्त्राच्या अभ्यासक्रमाची. हा अभ्यासक्रम म्हणजे त्या शास्त्राचा अनुभव घेऊन ठरविलेला प्रयोग होता. आश्रमाच्या चिमनलाल व भास्कर या दोन विद्यार्थ्यांनीं दहा रत्तल रुई घेऊन, सर्व क्रिया करून, पिंजून, कांतून त्याचा एका महिन्यांत केवळ एकेकट्यानें २५/२५ चौरस वार कपडा विणून काढला होता. त्या अनुभवाप्रमाणें विणकाम विभागाची परीक्षा ठेवण्यांत आली होती. प्रयोगाच्या अनुभवाच्या—नित्य वर्धमान अनुभवाच्या—पायावर उभारलेलें विणकामादि उद्योगशास्त्राचें शिक्षण हिंदुस्थानांत कोठें च मिळूं शकत नव्हतें. येथें विधायक कार्यक्रमाच्या या अंगाचे सतत प्रयत्न चालत. महाराष्ट्र-धर्माच्या मासिकाचें काम तेथें एका खोलींत चाले. बाकी आश्रमांत सर्वत्र उद्योगमय वातावरण होतें.

मासिकाच्या त्रिविध धोरणाप्रमाणें इतर लेखांत राजकारणावर प्रसंगानुसार दृष्टांतादाखल विवेचन होई च. पण त्याशिवाय प्रासंगिक म्हणून स्वतंत्र सदराखालीं (१) खादीची प्रगति (२) ब्रिटिश संबंध (३) निवडणुकीचीं भांडणें (४) परराष्ट्रीय सहानुभूति (५) कौन्सिल प्रवेश (६) ब्रिटिश मालावर बहिष्कार (७) स्वराज्याचे शिपाई (८) जनीं जनार्दन (९) खुनाचा न्याय आणि न्यायाचा खून (१०) आंकडेशास्त्राचा वांकडेपणा (११) डोक्यांत गिरणी (१२) कर्नाटकांतील सूत (१३) त्रयाणांभिक्षुकाणाम् (१४) धर्मक्षेत्रें नागपुरे (१५) संस्कृतीचे तुकडे—हे पंधरा लेख आलेले आहेत. ३४ पानें या लेखांनीं भरलेलीं आहेत. बहुतेक राजकारणावर हे लेख असले तरी त्यांत—

(१) प्रगति गुणाकाराच्या नियमानें होत असते. बेरजेचा नियम तेथें लागू होत नाहीं.
(२) ज्याचा स्वतःच्या आत्म्यावर विश्वास असेल त्याचा दुसऱ्याच्याही आत्म्यावर विश्वास असतो.
(३) वाणीनें जितकी हिंसा होते. त्याच्या शतांश हि मारामारीनें होणें शक्य नाहीं.
(४) तामसपणाचा अतिनिषेध करीत बसण्यांत हि तामसपणा होता.

(५) असहकारिता ही शत्रूच्या दुर्बलतेवर पोसली जाणारी अमंगल वस्तु नाहीं. आपलें पुण्य वाढविणें हा एक च रस्ता तिला माहीत आहे.

(६) सर्वांच्या सामुदायिक इच्छाशक्तीचें किंवा संकल्पाचें स्वराज्य हें दृश्य फळ आहे.

(७) अंत्यजांविषयीं अस्पृश्यभावना दूर करणें म्हणजे अंत्यजांची उन्नति करणें नसून आमची स्वतःची उन्नति करून घेणें होय.

(८) जेथें कामगिरीवांचून बक्षिस मिळतें तेथें अपराधावांचून फांशी ठेवलेली च.

अनुक्रमणिका

(९) देशाभिमान आणि यंत्राभिमान यांची जोडी अभेद्य आहे, असा भ्रम इंग्रजी शिक्षणानें उत्पन्न केला.

(१०) हल्लीं 'धर्म' शब्द बाटला असून 'रोटी' आणि 'बेटी' याहून उच्च व्यवहाराची ह्या धर्माला कल्पना नाहीं.

अशीं अनेक मार्गदर्शक आणि उद्‌बोधक सिद्धांतरत्नें आढळून येतात. तलावांतलें पाणी लहानशा नळांत आलें तरी पाणी तें च. राजकारणाच्या संकोची क्षेत्रांत हि मूळचें ब्रह्मविद्येचें पाणी खेळतें आहे असें येथें आढळून येईल. अग्नीची लहानशी ठिणगी असली तरी तिच्यांत अग्नीचे सर्व गुण असावयाचेच.

**अमृताची सर्व शक्ति चव थेंबा**

हा सिद्धांत च आहे.

अभ्यासी असें हें महाराष्ट्र-धर्म मासिक ब्रह्मविद्येच्या रसानें परिपूर्ण भरलेंलें मनुष्याला जणूं काय एक आश्वासन च मिळालेंलें आहे! चंदनाचें झाड जरी सर्व च सुवासानें भरलेंलें असलें तरी त्याच्या गाभ्यांत अधिक सुवास असतो. त्याप्रमाणें महाराष्ट्र-धर्माच्या चार अंकांत सर्वत्र एक च दिव्य तत्त्वज्ञान भरलेंलें असलें, तरी उपनिषदांचा अभ्यास या मासिकाचा गाभा म्हणावा लागेल. महात्माजींनीं येरवडा जेलमध्यें हें मासिक वाचलें. आणि ते अतिशय हर्षित झाले. निदान उपनिषदांच्या अभ्यासाची लेखमाला तरी पुरी करावी अशी त्यांनीं इच्छा प्रदर्शित केली. उपनिषदांचा अभ्यास हा या मासिकाचा गाभा, आत्मनिवेदन हें याचें मूळ. याला एका मागून एक अशा विविध सहा लेखांच्या शाखा फुटल्या असून प्रासंगिक लेख हीं याचीं पानें होत. सत्याग्रहाश्रम-वर्धा-नियमावलि हा याचा दिव्य सुवास असून आत्मबलिदानाची संपूर्ण तयारी हीं याचीं फळें होत! आत्मनिवेदन हा लेख लिहिल्यानंतर चार च महिन्यांनीं आत्मबलिदानाचा या मासिकावर प्रसंग आला. 'धर्मक्षेत्रे नागपुरे' हें प्रासंगिक लिहिल्यानंतर महाराष्ट्र-धर्माच्या क्षेत्रांतून लेखकाला — या मासिकाच्या आचार्यांना—नागपूरच्या कारागृह-क्षेत्रांत जावें लागलें.

खरें पाहिलें तर आचार्यांचें हे मासिक हें च पहिलें जाहीर लिखाण. तसें फार पूर्वी बडोद्यास असतांना मुमुक्षूमध्यें व कदाचित् इतरत्र कांहीं लिहिलें असेल. पण तें किरकोळ च. असें हें एक हातीं लिहिलेंलें पहिलें जाहीर लिखाण म्हणजे विचारांचा प्रचंड स्फोट च होता. ही कोंडलेली वाफ होती. हा ज्वालामुखीं होता यांत शंका नाहीं. परंतु येथें उन्मत्ततेचा लवलेश नव्हता. उलट मासिकाच्या रूपानें हा संतांना भक्तिपूर्वक नमस्कार घातला होता.

**तरी न्यून तें पुरतें । अधिक तें सरतें ।**
**करुनि घ्यावें हें तुमतें । विनवित असे ॥**

अशी येथें प्रथमारंभींच विनवणी करण्यांत आली होती. एक औपचारिक प्रघात म्हणून ही विनंति नव्हती. खरोखर अंतःकरणापासूनचा हा उद्‌गार होता. सत्याच्या अंशामधून संतांची उत्पत्ति असल्यामुळें संतांचें बोलणें—त्यांतून स्वतःसंबंधींचें बोलणें कधीं हि औपचारिक नसतें. तें पूर्ण सत्यच असतें. ज्ञानेश्वरांनीं हि ठिकठिकाणीं गुरुमाउली आणि संत यांची विनवणी केली आहे. त्यांत केवढी विशाल दृष्टि आहे! समोर सर्व

अनुक्रमणिका

साधुसंत बसले आहेत, या पवित्र दृष्टींने लिहिलेला हा ग्रंथ म्हणजे राजा घरीं आला असतां सम्राटानें त्याच्यासाठीं केलेली स्वागताची प्रचंड तयारी होय! संतांना हि मेजवानी देण्याइतकी ऐपत ज्ञानेश्वरांसारख्या राजराजेश्वरांत असणार नाहीं तर काय बकाल करंट्यांत असेल? येथें हि ती च स्थिति होती. संतांपुढें आपण हें लिखाण ठेवीत आहों ही नम्र वृत्ति तर तेथें होती च, पण संतांपुढें आपलें लिखाण ठेवण्याइतकी परमोच्च भूमिका हि येथें होती. केवढा हा विरोधाभास! नम्रता आणि उंची एके च ठिकाणीं? होय. नम्रता आणि उंची एके च ठिकाणीं असावयाची. संतवचनांत घोळलेल्या संताच्या सेवेंत झिजलेल्या महापुरुषाचें तर हें जीवनसूत्र च बनलें आहे. आणि तें या मासिकांत हि पूर्णपणें प्रकट झालें आहे यांत शंका नाहीं.

सूत्र. — नम्रतेच्या उंचीला माप नाहीं. (विचारपोथी विचार ३२१).

●●●

अनुक्रमणिका

# प्रकरण ३३ वें

## झेंडा—सत्याग्रह

**तो प्रभातकाळचा** वेळ होता. मंद मंद वायु वहात होता. सृष्टीमध्यें हळूं हळूं चैतन्य, प्रकाश आणि स्पष्टता येत होती. अंधाराचा पगडा कमी कमी होत चालला होता. पक्षी हि आपल्या घरट्यांत सूर्यनारायण आतां दिसेल, आपण मग पूर्वेकडे भराभर उडून जाऊं, अशी कल्पना करीत होते. दूर रस्त्यावर खेड्यांतून शहराकडे येणाऱ्या गाड्यांना जोडलेल्या बैलांच्या घंटा वाजत होत्या. सत्याग्रहाश्रमाची नेहमींची प्रभातकाळची प्रार्थना संपली च होती. मंडळी बैठकीवर उघड्या मैदानांत बसलेली होती. आतां क्षणभरानें तीं उठणार व आपापल्या उद्योगाला लागणार, इतक्यांत भर वेगांत एक मनुष्य आला. बहुधा सायकलवर च बसून आला असावा—त्याला श्वास लागला होता. तो प्रार्थनेच्या बैठकीजवळ आला व आचार्यांजवळ च जाऊन बसला.

लगेच आचार्यांनीं विचारलें—"कोण?"
उत्तर—'मी अमुक अमुक'
आचार्य—'काय काम आहे?'

उत्तर—'जी, जमनालालजींची नागपूरहून तार आली आहे. आजच्या सत्याग्रहाला स्वयंसैनिक नाहींत. वर्ध्याहून आणि आश्रमांतून ताबडतोब स्वयंसेवक पाठविण्याची व्यवस्था व्हावी.'

आचार्य—'ठीक आहे. गांवांतून कोणी मंडळी तयार केली का?'
उत्तर—'जी, आळकोबाजी पटले, केशवराव जंगमबार...........अशी कांहीं मंडळी तयार आहेत.'
आचार्य—'मग आणखी किती जण पाहिजेत?'
उत्तर—'तीन जण'

आचार्य—(प्रार्थनेला बसलेल्या आश्रमीय विद्यार्थ्यांकडे वळून)— 'शिवाजी, सत्याग्रहाला जायची तयारी आहे ना?'

शिवाजी—'होय.'
आचार्य—'रामदास, भास्कर?'
रामदास व भास्कर—'होय.'

आचार्य—(धोत्रेजींना)—'रघुनाथराव, या तिघांना रवाना करा. गांवांतली मंडळी आहेत च. यांना गाडी कोणती आहे? ही मंडळी केव्हां पोंचतील?'

धोत्रेजी—'आतां ८ ला गाडी आहे. नागपूरला दुपारच्या जेवणाच्या वेळापर्यंत पोंचतील.'

झालें. लगेच आलेला मनुष्य निघून गेला. आणि आश्रमीय विद्यार्थी आपली सर्व तयारी करून नागपूरला रवाना झाले.

## न जाने जानकीनाथ प्रभाते किं भविष्यति

ह्या सत्याग्रहाच्या मंगल प्रसंगाचा लाभ असा अनपेक्षित रीतीनें आश्रमीय मंडळींस मिळेल याची एक क्षणापूर्वी कोणाला हि कल्पना नव्हती. आणि या च वेळीं याची हि कोणाला कल्पना होती कीं यापुढें बहुतेक आश्रमीय मंडळींना या सत्याग्रहांत जावें लागून मागे आश्रमांत एखाद दुसरा च मनुष्य राहील!

अखिल भारतीय स्वरूपाचा हा पहिला च सत्याग्रह. आणि तो हि झेंड्याच्या निमित्तानें सुरू झालेला. राष्ट्रानें पहिलें निशाण या सत्याग्रहरूपानें रोवलें. ता. १८ मार्च १९२३ हा दिवस महात्माजींच्या कारागृहवासाचा स्मृति-दिन होता. सर्वत्र हिंदुस्थानांत हरताळ पडला होता. जबलपूरला संध्याकाळीं राष्ट्रीय निशाणाची मिरवणूक निघाली. पण तिला छावणींतून जायला सरकारनें मनाई केली. त्या वेळीं सत्याग्रह झाला. पण सरकारनें अटक करून नंतर स्वयंसेवकांना सोडून दिलें. जालियनवाला बागेच्या स्मरणानिमित्त अशी च मिरवणूक नागपूरला निघाली. राष्ट्रीय निशाणाच्या या मिरवणुकीला सिव्हिल लाईनमधून म्हणजे "सभ्य वस्तीमधून" जाण्याला सरकारनें बंदी केली व झेंडा घेऊन जाणाऱ्यांना पोलिसांनीं बेशुद्ध पडेपर्यंत बेदम मार दिला. आणि स्वयंसेवकांना फरपटत नेऊन गटारांत टाकून दिलें. या च पकडलेल्या लोकांना पुढें दोन महिन्याची साधी सजा देण्यांत आली. लगे च मराठी मध्यप्रांत कमिटीची आश्रमांत बैठक झाली. स्वयंसेवक आणि निधि जमविण्याचें ठरलें. ३० एप्रिल पर्यंतची ही मुदत होती. मे १९२३ ला सत्याग्रह सुरू झाला. जमनालालजी, बाबासाहेब विरूळकर, नागपूरच्या असहयोग आश्रमचे महात्मा भगवानदीनजी या मंडळींनी स्वाभाविक च चळवळीचा पुढाकार घेतला. त्यांत दुसऱ्या च तुकडीसाठीं जमनालालजींनीं तार करून वर्ध्याहून स्वयंसेवक मागविले आणि सत्याग्रहाच्या आघाडीवर जाण्याचा लाभ आश्रमीयांना मिळाला.

एकामागून एक स्वयंसेवक जमूं लागले. मध्यप्रांतांतल्या तालुक्या-तालुक्यांतून स्वयंसेवकांची रीघ लागली. सर्व हिंदुस्थानभर या झेंडा सत्याग्रहाच्या प्रकरणानें हलकल्लोळ उडाला. गुजराथ, बंगाल, बिहार, महाराष्ट्र, कर्नाटक, मद्रास सगळीकडचे स्वयंसेवक जमूं लागले. नागपूरला पोंचण्याच्या आंत च कोणाला वर्ध्याला, तर कोणाला जबलपूरला तर कोणाला आणखी दुसरीकडे असें अटकविण्यांत आलें. नागपूरला स्वयंसेवक-शिबिराची व्यवस्था ठेवणें मुष्किल होऊन बसलें, स्वयंसेवक आले कीं त्यांचें स्वागत करावयाचें, त्यांच्या खाण्या पिण्याची व्यवस्था करावयाची. ते जेलमध्ये गेले कीं मागें त्यांचें सामान संभाळावयाचें. अनेक तऱ्हेचीं कामें असत. तीं उरकणार कशी? वर्ध्याच्या सत्याग्रहाश्रमाची सर्व मंडळी, मागें गोपाळराव काळे व एक दोन विद्यार्थि खेरीज, या व्यवस्थेच्या कामासाठीं नागपूरला रवाना झालीं. स्वयंसेवकांसाठीं स्वयंपाक करण्याची हि व्यवस्था ठेवणें मोठें कठिण काम झालें. आचारी तर होते च. पण ते बिचारे हा रात्रंदिवस चाललेला धबडगा किती सहन करणार? आश्रमीय मंडळी त्यांच्या बरोबर कामाला लागत. सकाळीं पुऱ्या लाटण्याला सुरुवात व्हावी ती मध्यें थोडा वेळ जेवणाचा सोडून थेट रात्रीं दहा दहा वाजेपर्यंत लाटणें चालावयाचें च. हात दुखून जात. स्वयंसेवक नाना तऱ्हेचे येत. मानापमानाचे प्रसंग यायचे. कोणाला कोणत्या गोष्टींनें अपमान वाटेल तें कांहीं सांगतां यावयाचें नाहीं. भांडणें व तक्रारी मिटवणें कठिण झालें. चळवळीचे जे जे पुढारी होते त्यांना हि सरकारनें पकडण्याचा सपाटा चालविला. पुढारी गेले कीं चळवळ ढिली पडेल, गोंधळ उडेल असें सरकारला वाटलें. पण

अनुक्रमणिका

**कीं तोडिला तरु फुटे आणखी भरानें ।**

झाडाची शाखा तोडली कीं आडव्या अंगानें फुटूं लागतें. तसें झालें. पुढारी गेले. त्यांची जागा दुसऱ्या लोकांनीं घेतली. पुढारी काय होता येत नाहीं? खरें म्हटलें तर अशा चळवळीचा वेग च पुढारी असतो. ऐन वेळेला जो पुढें होतो तो पुढारी. पुढाऱ्याची एक अलग जात थोडी च आहे?

**पुढें गेले त्यांचा शोधीत मारग**
**चला जाऊ माग घेत आम्ही**
**वंदूं चरणरज सेवूं उष्टावळी**
**पूर्वकर्मा होळी करुनि सांडू**
**अमूप हे गांठीं बांधूं भांडवल**

पुढारी व्हावयाचें म्हणजे पुढें गेलेल्या लोकांप्रमाणें वागावयाचें. त्यांचीं पावलें कोणत्या मार्गानें गेलीं तें निरखून तसें च जावयाचें. या अनुनायित्वाच्या सरळ सिद्धांताप्रमाणें पुढारी हि व्यवस्था करण्याला मिळत गेले. स्वयंसेवकांच्या अंतर्व्यवस्थेचें काम वर्धा आश्रमच्या मंडळींनीं चालविलें च होतें.

या नागपूरच्या सर्व हकीकती वेळोंवेळीं आश्रमांत आचार्यांना कळविल्या जात होत्या. तेव्हां एकदां निरीक्षण करण्यासाठीं धोत्रे वगैरेसह आचार्य नागपूरला गेले. कर्नाटकच्या डॉ. हर्डीकरांचे स्वयंसेवक, गुजराथचे डॉ. चंदूलाल, मोहनलाल पंड्या इत्यादींच्या बरोबर आलेले गुजराथी स्वयंसेवक, बंगालचा जथ्था—अशीं शें-दीडशें स्वयंसेवक मंडळी नागपूरच्या झेंडा-सत्याग्रहाच्या छावणींत होती. नागपूरला त्या वेळीं स्वाभाविकपणें च मोठमोठ्या सभा हि भरत. आचार्यांचें च त्या दिवशीं मुख्य भाषण झालें. लोकांवर विलक्षण प्रभाव पडला. "नागपूर हें आतां साधें शहर राहिलें नाहीं. धर्मक्षेत्र झालें आहे. कुरुक्षेत्रांतला लढा आतां येथें लढला जात आहे. 'यतो धर्मस्ततो जयः' हा सिद्धान्त आहे. ब्रिटिश सरकार केवढें हि बलिष्ठ असो, सत्याग्रहापुढें तें नमलें च पाहिजे." अशी सिद्धांताची सिंहगर्जना तेथें झाली. अशा तऱ्हेचें जळजळीत आणि युक्तिवादानें परिपूर्ण असें तें भाषण ऐकून हा च आमचा खरा पुढारी आहे अशी स्वयंसेवकांची खात्री पटली. रात्रीं हें भाषण झालें. नंतर जेवणें होऊन जिकडे तिकडे निजानीज झाली. प्रत्येकजण थकलेला होता. चळवळीच्या वेगाचे प्रचंड धक्के प्रत्येकाच्या मेंदूवर बसलेले होते. मलूल होऊन जो तो आपल्या अंथरुणावर निजला होता. रात्रीचा मधला प्रहर उलटला. ब्राह्म मुहूर्ताचा समय झाला. १८ जून १९२३ ची ही गोष्ट. कोणाला कांहींच कल्पना नव्हती. एकदम सर्व छावणीला सोल्जरांचा आणि हिंदी शिपायांचा वेढा पडला. आणि एकेकाला पकडून लॉरींत कोंबून जेलमध्ये नेण्याचा तडाका सुरू झाला. आचार्यांची हि जोरांत चौकशी सुरू झाली. आचार्य जागे झाले. काय आहे असें विचारतात न विचारतात तोंच "पकडो, ये ही है भडकानेवाला, यही सबको यहाँ लाया", म्हणून शिपायांनीं क्षणार्धात या अतिशय अशक्त मूर्तीला जोरानें ढकललें. लोक जागे होऊन तेथें जमाव जमण्याच्या आंत सगळ्यांना नागपूरच्या अजनी जेलमध्यें टाकून देण्यांत आलें.

जेलचें हें प्रथम दर्शन होतें. तो अंधाराचा उत्तररात्रींचा समय. या वेळीं जेलचें फाटक उघडण्याचें कांहीं कारण नसावयाचें. परंतु एकामागून एक शे-दीडशें मंडळी या फाटकांतून आंत कोंबली गेली. बहुतेक जण अंथरुणांतून उठवून च आणले होते. त्यामुळें बहुतेक नुसते उघडेबोडके धोतर तेवढे कमरेला असे तेथें आले होते. नव्हते कोणाजवळ कपडे तर नव्हते पुस्तकादि सामान. बिछाना हि छावणींत च पडलेला.

त्यामुळें त्या अजनी जेलच्या राक्षसी फाटकां आंत शिरल्याबरोबर दरेकाला घोंगड्या वगैरे देण्यासाठीं वॉर्डर लोकांची मोठी धांदल उडाली. या वेळीं जेलमध्यें जिकडे तिकडे कैद्यांच्या चेहऱ्यावर नवा तजेला आला होता. चर्चेचा एक च विषय होता. एवढे मोठे विद्वान, कर्तृत्ववान् श्रेष्ठ पुढारी पुरुष ज्या अर्थी येथें आले त्या अर्थी आतां कांहीं तरी अघटित घटना होणार. आपला हा कंटाळवाणा जेल समाप्त होईल. आपण सुखरूप आपल्या मुलामाणसांत जाऊन पोचूं. आपलें तें शेत आपल्याला नांगरावयास मिळेल. मग आपण आपल्या मोटेच्या दोरावर बसून मोट हांकूं. दुपारची भाकरी त्या चिंचेच्या झाडाखालीं च खाऊं. लोटाभर पाणी पिऊं आणि तेथेंच अंग आडवें टाकून सुखाची झोप घेऊं. अशीं सुखस्वप्नें त्या बिचाऱ्या २०/२० वर्षें कैद झालेल्या कैद्यांच्या मनांत डोकाऊं लागलीं. कंटाळवाण्या, प्रेमशून्य, निर्दय वातावरणांत राहून त्यांचीं मनें हलकीं झालीं होतीं. नुसतें घरचें स्वप्न पडून कैदी जागा झाला कीं तास तास ढळढळा रडत बसे. त्याला वाटे अरेरे! हें स्वप्न च ना? केव्हां आपण आपल्या मुलामाणसांत जाऊं? केव्हां आपल्याला आपले स्नेही सोबती भेटतील? ते आपल्याला पूर्वीसारखे च वागवतील काय, पूर्वीचा तो काळ तसाच अनुभवावयास सांपडेल काय? कल्पनेच्या कल्लोळांनी त्यांचें मन भाराऊन जाई. आणि असलीं स्वप्नें पडून जागें होण्यापेक्षां त्यांतच आपल्याला देव सदैव गुंगवील तर किती बरें! असें त्यांस होऊन जाई.

त्या स्वप्नांत, सदैव जीवन मुरो चित्ता नुरो जागृति, इतकी हळवीं मनें बनलेले ते कैदी! त्या कैद्यांना आज आशेचे किरण दिसूं लागले. जेथें चोर, डाकू, खुनी असावयाचे तेथें सज्जन, परोपकारी महात्मे येऊं लागल्यावर कारागृहांतून आपली सुटका होण्याची आशा त्यांना कां न वाटावी?

सकाळ झाली. जेलच्या दुनियेंतले सर्व कारभार नित्याप्रमाणें चालू झाले. रात्रीचे पहारे बदलले. लखलखीत संगिनी घेतलेले नवे शिपाई आंत आले. जेलरसाहेब हि आंत आले. कैद्यांकडून त्यांस खडी तालीम देण्यांत आली. जेलच्या मध्यभागीं असलेल्या गोल जागेंमध्यें जेलरसाहेब येऊन उभे राहिले. इतक्यांत एक वार्डर एका अतिशय अशक्त झालेल्या, उपरणें पांघरलेल्या व्यक्तीला घेऊन जेलरसाहेबांकडे आला. ठरलेला यांत्रिक पद्धतीचा सलाम करून त्यानें त्या व्यक्तीला जेलरसाहेबांसमोर उभें केलें. ही व्यक्ति म्हणजे आचार्य च होते. तेथें जेलरशीं उभ्या उभ्या दोन तास सारखें भाषण चाललें होतें. —असा देखावा जेलमधल्या कैद्यांनीं वॉर्डरांनीं केव्हांच पाहिलेला नव्हता. एक पकडून आणलेला माणूस आणि जेलरशीं जेलरला दोन दोन तास उभा करून बोललेला त्यांच्या कधीं हि पाहण्यांत आला नाहीं. जो तो टकमक टकमक त्या मूर्तीकडे दुरून पाही आणि आपापल्या कामाला निघून जाई. जेलमधल्या वरिष्ठ अधिकाऱ्यांशीं समोरासमोर नाना तऱ्हेचीं अगदीं निःसंकोचपणें चर्चा करणारा हा पुरुष देवदूत तर नाहीं ना? असे विचार मनांत येऊन त्याप्रमाणें वॉर्डरांनीं बोलून हि दाखविलें. ही सगळी जेलरशीं चर्चा झाली ती जेलच्या तंत्राविषयीं, तेथल्या नियमांविषयीं होती. या नव्या जगांतले कायदे काय आहेत, तेथलें धोरण कोणतें आहे, यासंबंधीं पूर्ण माहिती करून घेणारी ही एकच व्यक्ति होती. आंधळेपणानें वागणें प्रकृतींत च नव्हते. प्रत्येक क्रिया ज्ञानपूर्वक व्हावी, या एका च कल्पनेवरून ही चर्चा करण्यांत आली होती.

पुढें रीतीप्रमाणें कोर्टांत न्यायदानाचा फार्स होऊन वर्षभराची सक्तमजुरीची शिक्षा देण्यांत आली. कोर्ट जेलमध्यें च आलें होतें. हा लोकमताचा विजय च होता. कोर्टाला हि स्वस्थान सोडून अन्यायी वर्तन करण्यासाठीं चारी भिंतीच्या आंत गुपचूपपणें लोकांना नकळत शिक्षा देण्यावांचून गत्यंतर नव्हतें. अन्यायकृत्य उघडपणें कसें होणार?

अनुक्रमणिका

शिक्षा झाल्याबरोबर पोषाख बदलला. गुडघ्याच्या वर असलेली बिनबंदाची चड्डी, बिनबाह्यांची बंडी, कमरेला पट्टेवजा टॉवेल आणि वर टोपी हा जेलचा पोषाख. यांत मुळींच फरक नसावयाचा. फक्त डोक्यावरच्या टोप्यांमध्यें मात्र फरक, कोणाची टोपी काळी, कोणाची पांढरी, कोणाची पिवळी, कोणाची काळी-पिवळी, कोणाची लाल. हे इतके फरक कांहीं वैचित्र्यासाठीं नसत. किंवा आवड म्हणून कांहीं ही प्रत्येकानें वापरलेली भिन्न भिन्न रंगाची टोपी नसे. ही शारीरिक स्थितीची वर्गवारी होती. सशक्त पांढरी टोपी, मध्यम काळी टोपी, अशक्त पिवळी टोपी, आजारी काळी-पिवळी टोपी असा हा प्रकार असे. लाल टोपी म्हणजे, धोक्याचें चिन्ह (डेंजर सिग्नल). पळून जाण्याचा ज्यानें प्रयत्न केला तो कैदी लाल टोपीचा. या पोषाखाखेरीज केतकीच्या तंतूची एक जाड चटई, पांघरण्यास घोंगडी, जेवण्यासाठीं थाली-तसला म्हणजे, लोखंडाचें लहानसें ताट व एक मोठा लोखंडी कटोरा. जेलच्या चित्रगुप्ताला लिहिण्यासाठीं एक लंबी वही जिला हिस्टरी टिकेट म्हणतात. असा सामानाचा थाट असे. छातीवर लाकडी फळीचा बिल्ला लटकवलेला असावयाचा. त्यावर कैदीनंबर, सुटण्याची तारीख, शिक्षेचें कलम लिहिलेलें असे. हें सगळें वेषांतर झाल्यानंतर नांव लिहिण्यासाठीं जेलच्या ऑफिसमध्यें सर्व मंडळींबरोबर नेण्यांत आलें. दरेकानें आपलें नांव सांगितलें व तें तेथें दफ्तरामध्यें टिपण्यांत आलें. आचार्यांची असामान्यता येथें हि दिसून आली. जेलमध्यें जाणूनबुजून अपमान करण्याचा च सर्वत्र शिरस्ता. तेथें आपला मान आपण च राखला पाहिजे. तेथें खोटा विनय उपयोगी नाहीं. लगेच नांव विचारल्याबरोबर “विनोबाजी” असें चांगलें ऐकूं जाईल—लिहिण्यांत चूक होणार नाहीं—अशा स्वरांत आचार्यांनी नांव सांगितलें. नुसतें विनोबा नाहीं सांगितलें. तर ‘विनोबाजी’ असे बहुमानसूचक ‘जी’ हें अक्षर लावून नांव सांगितलें. सगळ्यांना आश्चर्य वाटलें. तेव्हां मग मंडळींना नंतर सांगितलें कीं, ‘अरे, येथें ‘विनोबाजी’ नांव लिहिलें म्हणजे पुढें बोलण्याचा प्रसंग आला असतां अधिकारी आपल्याला याच संमानयुक्त नांवानें हांक मारतील. नाहीं तर आपण होऊन हे अधिकारी थोडे च कैद्याला मान द्यायला बसले आहेत! तेव्हां या ठिकाणीं असें च सांगावयास पाहिजे’. आचार्य अतिशय अशक्त असल्याकारणानें त्यांना पिवळी टोपी देण्यांत आली होती. हा पोषाखाचा आणि नामलेखनादींचा पहिला प्रकार झाल्यानंतर लगेच जेलजीवनाला सुरवात झाली. कोणाला चक्की, कोणाला कागद कुटणें, कोणाला केतकी कुटणें, कोणाला खडी फोडणें—अशीं कामें मिळालीं आणि क्षणार्धांत तो पुरातन देखावा तेथें पुन्हां अवतीर्ण झाला.

**समीर लोटितो खडे वरुण घालितो सडे**
**मयंक साउली धरी मळीण पावकु हरी**
**विधी विधीस धाकतो सुरेंद्र बाग राखतो**
**करावयास निग्रहो! भूमंडळासि विग्रहो**
**अखंड चाकरी करी । सदा वरुची भाकरी ।**
**सटी अरुंधती दळी । गणेश गाढवे वळी ॥**

—रावणाच्या कारागृहांत गणपतीसारख्यां देवांना गाढवें हाकण्याचें काम मिळालें. तसें च तेथें होतें. सब घोडे बारा टक्के असें हें जेलजीवन, तेथें कोणता हि भेद नव्हता. येथलें हें अभेदाचें तत्त्व म्हणजे जणूं अद्वैततत्त्व शिकण्याची शाळा च असें हि साधक म्हणूं शकेल. पण खरोखर हें अद्वैत आणि अद्वैतांत जमीन-अस्मानाइतका फरक! खरें अद्वैत हें चैतन्यमय आणि येथलें अद्वैत हें जड. जडाच्या ठिकाणीं अद्वैत आलें म्हणजे जेल बनतो. जगांत जडाच्या ठिकाणीं द्वैत ठेवण्यांत आणि अद्वैत न ठेवण्यांत परमेश्वराची खरोखर दया च प्रतीतीला येते. अंडर ट्रायल म्हणजे जेलजीवनाच्या त्रिशंकु अवस्थेंत असतांना एक मित्र आचार्यांना

अनुक्रमणिका

भेटण्यासाठीं आले. तेव्हां आचार्यांकडून जेलचें थोडक्यांत आणि सूत्रमय वर्णन करण्यांत आलें. मित्रानें सहज विचारलें—"कसें काय आहे येथें जेलमध्यें?"

आचार्य उत्तर करतात—"बरोबर सर्कशीच्या उलट."
मित्र—"म्हणजे? याचा अर्थ नाहीं समजला!"
आचार्य—"सर्कशींत माणसाच्या ताब्यांत पशु असतात. येथें पशूंच्या ताब्यांत माणसें आहेत."

या मुलाखतींत जेलनियमाप्रमाणें जेलर हि हजर होता च. त्यानें लगे च ही मुलाखत समाप्त केली, हें काय सांगावयास पाहिजे? आणि मुलाखत समाप्त केली हें हि एका परीनें योग्य च झालें नाहीं काय? कारण जेलचें संपूर्ण वर्णन या एका मार्मिक सूत्रांत आल्यानंतर अधिक मुलाखतीचें काम च काय राहिलें?

आचार्यांना जेलमध्यें केतकी कुटण्याचें काम दिलें. आणि हा पकडलेल्या लोकांचा म्होरक्या म्हणून आणि सुपरिंटेंडेंटला प्रश्न विचारून "मुजोरी" करतो म्हणून इतरांपासून अलग करून गुन्हाखान्यांत म्हणजे एकांतवासाच्या कोठडीत कोंडून ठेवलें. या एकांतवासाच्या कोठड्या एकामागून एक लागलेल्या असत. येथें च रामदास व भास्कर हे आचार्यांचे तेजस्वी विद्यार्थी कोंडलेले असत. आचार्य आल्याबरोबर त्यांची सेवा स्वाभाविकपणें च हे विद्यार्थी करूं लागले.

**जेथे जातो तेथे तू माझा सांगाती ।**

ईश्वर ज्याच्या सांगाती झाला त्याला एकांतांत ठेवला म्हणून काय तो अलग पडूं शकतो? जिकडे तिकडे त्याचे सांगाती तयार च असावयाचे.

**अवघे जन मज झाले लोकपाळ ।**
**सोईरे सकळ प्राणसखे ॥**
**तुका म्हणे आतां खेळतो कौतुकें ।**
**झाले तुझे सुख अंतर्बाही ॥**

या ब्रह्मविहाराच्या भूमिकेंत सर्व जग लीलामय होऊन जावें यांत नवल काय? आणि या कोठड्यांत तर त्या महापुरुषाचे प्रत्यक्ष विद्यार्थी च होते. तेथें त्याला काय उणीव असणार? आणि हे विद्यार्थी कसे? ज्यांनीं अन्याय्य वाटणाऱ्या जेलच्या कायद्याचें वारंवार उल्लंघन करून जेलच्या सर्व शिक्षा हंसतमुखानें भोगल्या, आडाबेडी, दंडाबेडी, हातकडी, चक्की, एकांतवास, केतकी कुटणें, कोणतें हि कठिण काम आणि कठिण शिक्षा अगदीं तुच्छ करून टाकल्या. आपल्या स्वमानापुढें राक्षसी जेल, क्रूर अधिकारी आणि भयंकर शिक्षा या त्यांनीं कस्पटाप्रमाणें करून दाखविल्या. ही प्रतीति येथल्या जेलरला आलेली च होती. तेव्हां तो एकदां आचार्यांना म्हणाला हि "तुमच्या शिष्यांनीं जर आमचें कांहीं चालूं दिलें नाहीं तर आतां तुम्ही तर त्यांचे गुरू च! तुमच्यापुढें आमचें काय चालावयाचें आहे?"

ही गोष्ट जेलरच्या आधींच लक्षांत आली. ती सुपरिंटेंडेंटच्या मागून लक्षांत आली च. आचार्यांना केवळ एकांतवासांत कोंडून हि भागेल असें त्याला वाटेनां. तेव्हां आचार्य आणि आचार्यांबरोबरची पुष्कळशी मंडळी त्यानें अकोला जेलमध्यें पाठवून ही येथली 'पीडा' टाळली! अकोला जेल हा सेंट्रल जेल नव्हे.

अनुक्रमणिका

लहानसा जेल. तेथें या लोकांना ठेवल्यानें सेंट्रल जेलमधल्या हजारों कैद्यांवरचा त्यांचा परिणाम टळावा ही त्यांतली दृष्टि होती अकोला जेलमध्यें हि जेलचा अमानुषपणा सेंट्रल जेलच्या मानानें कमी नव्हता. उलट लहान जेलमध्यें कोणता हि अत्याचार झाला तरी त्याची दाद हि लागत नाहीं. प्रथम प्रथम अकोला जेलमध्यें पुष्कळ कडकपणा होता. अमानुषपणाचा एक च दाखला पुरेसा आहे. कोणत्या हि तऱ्हेचा आडोसा न ठेवतां एका लाइनींत पायाला पाय लागून पन्नास पन्नास जणांना शौचाला बसवीत. कित्येकांना तर तो प्रसंग म्हणजे मरण वाटे. तेथें बसणें च त्यांना शक्य नसे. परंतु हा अपमानास्पद प्रकार बदलून घेण्यासाठीं, शौचासाठीं योग्य व्यवस्था करण्यासाठीं सरकारशीं झगडणें ही गोष्ट निराळी होती. आणि या बाबतींत अगदीं हतबुद्ध होऊन जाणें ही गोष्ट वेगळी. हतबुद्ध होऊन जाणें हें वीराचें काम नव्हे. वीर तो च कीं ज्याचा सर्व प्रसंगीं धीर टिकून राहातो. या हि प्रसंगीं तो धीर येथें दाखविला गेला. आणि मनावरचें सर्व संकोचाचें दडपण पार झुगारून दिलें. कुंभार जसा मातीच्या गोळ्याला वाटेल तो आकार देतो त्याप्रमाणें मनाला वाटेल तो आकार क्षणार्धांत देऊन टाकणारें केवढें हें सामर्थ्य! येथें मुळींच संकोच न ठेवतां सरळ शौचविधी उरकला. पुढें या बाबतींत हळू हळू सुधारणा घडवून आणली. येथें काम मिळालें होतें तें गिट्टी फोडण्याचें. या कामांत हि दिलेला ‘टास्क’ पुरा करण्यासाठीं अटोकाट प्रयत्न करून ती गोष्ट सरावांत आणली गेली. आठ फूट गिट्टी फोडण्याचें हें काम हि आनंदांत आणि कुशलतेनें केलें गेलें. या च वेळीं कस्तुरबा जेलमध्यें आचार्यांना भेटण्यासाठीं आल्या होत्या. महादेवभाई देसाई व राजगोपालाचारींनीं हि यंग इंडियांत आचार्यांविषयीं अतिशय आदर पूर्वक लेख लिहिले होते. हाताला गिट्टी फोडून फोड आले. आधीं च कमलाप्रमाणें कोमल असलेले हात रक्तबंबाळ झाले तरी कमलाप्रमाणें अलिप्तता कांहीं त्यांची गेली नाहीं. दुःखाचें नांव हि चेहऱ्यावर दिसावयाचें नाहीं. पुढें पुढें हाताला घट्टे हि पडूं लागले. आणि हें जेलचें काम हा खेळ करून टाकूं अशी स्थिति झाली. तसेंच जेलच्या अन्नाचें. आचार्यांना तो केवळ ब्रह्ममायेचा खेळ वाटे! ब्रह्म एक तशी ती ज्वारीची भाकरी एक आणि माया पंचभूतांची तशी ती पंचरसी डाळ, असे दृष्टांत आचार्यांना यावरून सुचत.

कोणी किती हि न्याय-निष्ठुरतेचा आव आणो सत्पुरुषापुढें वांकावें च लागतें. श्रीकृष्ण परमात्म्यापुढें कारागृहाचीं दारें काय बंद राहतील? ती खळाखळ उघडून जायची च. हा जेल आतां जेल हि राहिला नाहीं. एका महिन्यांत आचार्यांभोवतीं आकोला जेलमधले सर्व कैदी राजापेक्षां हि आदरपूर्वक नमूं लागले. अधिकारी हि नरम पडले. मग वेदांची पुस्तकें तेथें मागवलीं. जेल लायब्ररींतलीं पुस्तकें हि तेथें जमा झालीं. आकोल्यामधलीं पुस्तकेंसुद्धां तेथें चालत आलीं. असें सर्व ज्ञानसाहित्य जमा झालें. जेलमधल्या मंडळींत नाना तऱ्हेचा विचारविनिमय होई. सतरा ठिकाणची कार्यकर्ती मंडळीं एके ठिकाणीं अशी जमा होणें शक्य नव्हतें. या जेलच्या योगानें त्यांना परस्पराजवळ येऊन भरपूर विचारविनिमय करण्याला वेळ मिळाला. आणि आचार्यांसारखा मार्गदर्शक मिळून त्या विचारविनिमयांत आणखी बिनचूकपणाची भर पडली. आपापली भूमिका, आपले विचार आपापलें कार्यक्षेत्र, आपापली कार्यपद्धति यांची तेथें जणूं काय तपासणी च झाली. काळाच्या ओघांत वाहवत जात असतां तेथें मागें वळून सिंहावलोकन करण्याला हा चांगला अवसर मिळाला. आत्मपरीक्षणाची अंतर्मुख वृत्ति येथें सर्वांना प्राप्त झाली. मोठमोठे लोक येथें अगदीं लहान ठरले. आणि लहान होते ते मोठे ठरले. संयमाची, इंद्रियनिग्रहाची, शरीरपरिश्रमाची कसोटी येथें लागली. मोठा लक्षाधीश हि येथें सत्याग्रह करून आला तरी प्रसंगीं साध्या विडीच्या व्यसनासाठीं चोरी करतो अशी स्थिति उघड झाली.

**काकः काकः पिकः पिकः ।**
**काचः काचो मणिः मणिः ॥**

अनुक्रमणिका

ही कसोटी येथें चांगली प्रत्ययास आली. वसंत ऋतु आला म्हणजे कावळा कोण आणि कोकिळा कोण, याचा निर्णय होतो. घणाखालीं सांपडल्यावर च काच कोणता आणि हिरा कोणता तें कळतें. देशभक्त कोण, देवभक्त कोण आणि देहभक्त कोण हें जेलबाहेर नीट समजत नाहीं. तें बाहेरच्या पोषाखावरून, संभाषणावरून किंवा माणसाच्या लेखभाषणांवरून कळावयाचें नाहीं. जेलसारखीं ठिकाणें च या गोष्टी उघड करतात. येथें मनुष्याचें अंतःस्वरूप अगदीं स्पष्ट होऊन जातें. विश्वरूपाच्या अफाट पसाऱ्यांत जें फाकून गेलेलें असतें तें स्वरूप येथें उघडकीस येतें. आणि आत्मशुद्धि केल्याशियाय सर्व गोष्टी वायफळ आहेत असा अनुभव येतो. आत्मशुद्धीच्या साधनेला मार्गदर्शक आचार्य जेलमध्यें प्रत्यक्ष समोर रात्रंदिवस अगदीं जवळ च होता तेव्हां तो जेल हा सर्वदृष्ट्या जेल च. परंतु त्याचें एकदम रूपांतर कां होऊं नये? तो साधकांचा आश्रम, तें आत्मशुद्धीचें स्थान, तें भावी कार्याचें बीजारोपण कां ठरूं नये? इतर सामान्यांची ही गोष्ट मग आचार्यांची काय स्थिति असेल? ज्ञानेश्वरांनीं स्पष्टच सांगितलें आहे.

**म्हणोनि आत्मयाचें केवळ । जो रूप चि जाहला निखळ**
**तया नाहीं बंदिशाळ । कर्माची हे**

आत्मज्ञानी पुरुषाला बंधन कोठलें? हा जेल केवळ शिवरूप शिवालय होऊन गेला! जेल हा भास च. तो खरा नव्हे अशी स्थिति झाली.

आणि खरोखर च हा भास हि थोड्या च दिवसांत पार वितळून गेला. चळवळीचा वाढता जोम पाहून, चळवळीचें नैतिक तेज पाहून सरकारला नमतें घेणें भाग पडलें. आणि ३ सप्टेंबर १९२३ रोजीं आकोल्यांतली सर्व मंडळी सुटून गेली. मग आश्रमामध्यें आचार्यांसह सर्वांनीं प्रवेश केला. ज्या आश्रमांत केवळ गोपाळराव व एक दोन विद्यार्थी राहिले होते, तो आश्रम एकाएकीं माणसांनीं गजबजून गेला. आचार्यांचा आश्रम पाहाण्यासाठीं आतां नागपूर जेलमधून सुटलेली मंडळी हि एकामागून एक धांव घेऊं लागली. आनंदाच्या नंदनवनांत जणूं काय मूर्तिमंत हर्षानें प्रवेश करावा तशी ती मंडळी भासत. प्रत्येकाच्या चेहऱ्यावर विजयोत्साहाचें तेज, प्रत्येकाच्या तोंडीं जेलमधल्या कौतुकास्पद गोष्टी, प्रत्येकाच्या हृदयांत आचार्यांविषयीं आदर. अशीं ती मंडळी एकेक आचार्यांपुढें प्रणिपात करीत आणि क्षणभर तेथें पुढील देखावा निर्माण होई.

**रोमांच जंव फरके । तंव तंव आंग सुरके**
**स्तंभ स्वेदाते जिंके । एकला कंप ॥**
**अद्वयानंदस्पर्शे । दिठी रसमय जाली असे**
**ते अश्रु नव्हती जैसे । द्रव चि ये ॥**
**नेणों काय नमाय पोटीं । काय नेणों गुंफे कंठी**
**वागर्था पडत मिठी । उससाचिया ॥**

अनुक्रमणिका

# प्रकरण ३४ वें

## महाराष्ट्र - धर्म साप्ताहिक

**एखाद्या** गोष्टींत यश मिळालें कीं कोणाला हि आनंद व्हावा, ही गोष्ट अगदीं स्वाभाविक म्हणावी लागेल. त्यांत पुन्हां तें यश जितके तीव्र कष्ट सोसून मिळविलें असेल तितकीच त्या आनंदाची तीव्रता वाढावी यांत आश्चर्य कसलें? अथांग डोहांत बुडतां बुडतां काठावर येऊन पोंचल्यावर जो आनंद होतो तो बुडण्याच्या पूर्वी कांठावर असतांना मुळीं च प्रत्ययाला येत नाहीं. दीर्घकालीन आजारानंतर लाभलेल्या आरोग्याचा अनुभव आणि त्याचा आनंद कांहीं वेगळा च आहे. आजारी नसलेल्या माणसाला त्याचा प्रत्यय यावयाचा नाहीं. प्रखर उन्हांतून आलेल्या माणसाला कोणी आपल्या घरांत नेऊन स्वच्छ ताज्या आणि थंडगार पाण्याचा घासलेला लखलखीत पेला द्यावा—त्याला त्या वेळीं त्या थंड पाण्याची जी मधुरता प्रतीतीला येईल ती इतर वेळीं येणार नाहीं. तें पाणी नव्हे तर निव्वळ अमृत! अशी त्याची तें पितांना अवस्था होऊन जाते! झेंडा सत्याग्रहांतून सुटलेल्या लोकांच्या आनंदाची ही च अवस्था होती. आधींचे तीव्र कष्ट, त्यांत ते कष्ट देशासाठीं झालेले, तशांत पुन्हां ते कष्ट सामुदायिक रीत्या अनुभवलेले आणि त्यानंतर मग त्यांत यशस्विता मिळालेली. त्यामुळें या आनंदाला विशेष असें तीव्र स्वरूप प्राप्त झालें होतें. पार्श्वभूमि जितकी काळी तितकें चित्र एकदम उठावदार दिसतें. म्हणून च कवि म्हणतो—

**देअर इज नो काम लाईफ दैट व्हेन स्टार्म इज डन**
**देअर इज नो प्लेझंट कीन ॲज पेन्स रिलीज**
**देअर इज नो जॉय दैट लाईट ॲज सो डीप**
**ॲज पीस नो पीस सो डीप ॲज दैट स्ट्रगल वन**

परंतु असामान्य पुरुषाची स्थिति मात्र फार वेगळी असते. अपार कष्ट करून मिळविलेलें यश हि त्याला हर्षानें वेडें करूं शकत नाहीं. कारण सामान्य मनुष्याप्रमाणें त्याला यश भोगावयाचें नसतें. तर त्या यशाची पायरी करून तो आणखी पुढच्या यशस्वी भूमिकेवर जात असतो. तो यश हा मुक्काम समजत नाहीं. तर ती पायरी समजतो. त्यामुळें तेथें च तो थबकून रहात नाहीं. कोणतें हि यश हें त्याचें ध्येय नसून तत्वसिद्धीच्या अनंत ध्येयासाठीं यशःसिद्धीची सोपान-परंपरा तो एकसारखा चढत असतो. तो यश भोगीत नाहीं, पण त्याचा उपयोग करून पुढें जातो. झेंडासत्याग्रहानंतर इतरांप्रमाणें सत्याग्रहाच्या यशांत गुंग न होता अनेक प्रकारांनीं अनेक आकारानें आश्रम-जीवनाचें पाऊल पुढें पडलें पाहिजे अशी च आचार्यांची योजना होती. जेलमध्यें अनेक ओळखी झाल्या होत्या. त्यांतले कित्येक आचार्यांच्या कल्पनेप्रमाणें सार्वजनिक कार्य करण्यासाठीं आश्रमांत आले होते. आश्रमाची प्रवृत्ति वाढती होती. आश्रमाच्या व्यापाला हा घास-बंगला पुरा पडत नाहीं म्हणून ५०/६० माणसांची सोय होईल अशी स्वतंत्र इमारत बांधण्याचें काम चालूं होतें. त्या कामावर द्वारकानाथजी हरकारे व गोपाळराव काळे हे देखरेख ठेवीत होते. सार्वजनिक विचारप्रेरणेच्या दृष्टीनें जमनालालजींच्या व मित्रमंडळींच्या आग्रहानें चालूं झालेंलें व झेंडासत्याग्रहामुळें बंद पडलेंलें महाराष्ट्र-धर्म मासिक पुन्हां सुरू करावें असा विचार हि आतां चालू झाला. पण आचार्यांना आश्रमाच्या मुख्य उद्योगाच्या, प्रयोगाच्या आणि माणसें तयार करण्यांच्या कामात तितकीशी सवड मिळणे कठिण म्हणून, महिन्याच्या महिन्याला अठ्ठेचाळीस पानांचें मोठ्या आकाराचें बारीक टाइपाचें मासिक एकहातीं चालविण्यांत ताण हि पडतो अशी वस्तुस्थिति आढळून आल्यामुळें मंडळींकडून मासिकांचें

अनियमितकालिकांत रूपांतर करण्याचें ठरविण्यांत आलें व तसें वर्गणीदारांस कळविलें. त्यांत हि विचारांची साखळी तुटते. वाचकाला ही साखळी जमवून घेण्यासाठीं अधिक त्रास पडतो म्हणून ग्रंथरूपानें हा मजकूर देणें बरें एथपर्यंत मजल आली. आणि शेवटीं महाराष्ट्र-धर्म मासिकाचें साप्ताहिक वृत्तपत्राच्या स्वरूपांत १८-६-१९२४ रोजीं नवीन अवतरण झालें. बरोबर एक वर्षापूर्वीं या च दिवशीं नागपूरच्या सत्याग्रही छावणीवर छापा घालून आचार्यांसह अनेक मंडळींना सरकारनें पकडून जेलमध्यें टाकलें होतें.

एका वर्षापूर्वींच्या म. ध. मासिकांत आणि या साप्ताहिकांत पुष्कळच अंतर होतें. त्या मासिकाचे आणि या साप्ताहिकाचे विचार एक च. धोरण तें च. परंतु ते संतांच्या पुढें मांडलेले परमोच्च भूमिकेवरचे विचार, हे साध्याभोळ्या खेडवळापुढचे तितक्या च उच्च भूमिकेवरून परंतु

**अर्भकाचे साठी । पंते हाती धरिली पाटी ।**
**बाळकाचे चाली । माता नेणुनि पाउल घाली ॥**
**तुका म्हणे नाव । जनासाठी उदकीं ठाव ॥**

अशा रीतीनें समरसून निघालेले उद्‌गार. तो ब्रह्मविद्येचा परिपाक हा भक्ति आणि सेवेचा साधा सर्वलभ्य मेवा. आचारशुद्धि आणि बहुश्रुतता, सत्समागम आणि विचारसूक्ष्मता, अशा अनेक साधनांनीं ते विचार ग्रहण व्हावयाचे. येथे

**'या रे या रे लहान थोर । भलते याती नारी नर'**

अशी सर्वजनांना हांक. पाणपोईवर कोणी हि पाणी प्यावें. राजारंक हा भेद तेथें मुळीं च नाहीं. ही ज्ञानप्रभा होती. तर पूर्वींचे म. ध. मासिक ही ज्ञानवापी मानावी लागेल. ज्ञानवापींतून पाणी काढण्याचें श्रम घ्यावे तेव्हां च त्याचा लाभ. परंतु ज्ञानप्रपेचें तसें नाहीं. येथें आयत्या काढलेल्या पाण्याचा लाभ. कडबा पचवून गाईनें दूध द्यावें तसा हा प्रकार आहे. काबुली द्राक्षें सर्वसामान्य फळ नव्हे. भारतवर्षांतलें सर्वसामान्य फळ आंबा. हे साप्ताहिक आंब्यासारखें होतें. ज्ञानेश्वरांची ज्ञानेश्वरी हें "देशीकार लेणें" खरें पण तेथें नित्य राहाण्याची सोय नाहीं. लेण्याचें दर्शन घ्यावें. कृतार्थ व्हावें.

**चित्रा पाहुनि तूज तूजसम मी झालो चि चित्राकृति ।**
**पाहें काय उभा कुठें क्षणभरी ही राहिली न स्मृति ॥**

त्यांतल्या एकेक कलाकृतीकडे पाहून देहभान विसरावें ही गोष्ट खरी पण तेथून शेवटीं आपल्या साध्या झोपडीकडे च परतणें भाग आहे. म्हणून ज्ञानेश्वरांच्या "देशीकार लेण्याचें" दर्शन घेऊन हि महाराष्ट्र तुकोबांच्या अभंगवाणींतच रंगून जातो. महाराष्ट्र-धर्म मासिक देशीकार-लेणें म्हटलें तर महाराष्ट्र-धर्म साप्ताहिक ही अभंगवाणी म्हणावी लागेल.

एका च व्यक्तीनें हें देशीकार लेणें करून पुन्हां सर्वोपयोगी अभंगवाणी हि निर्माण करावी. यांत आश्चर्य वाटण्याजोगें काही नाहीं. ज्ञानेश्वरमहाराजांच्या उदाहरणातहि आपल्याला हे च आढळून येते. त्यांनीं ज्ञानेश्वरीसारखी अद्‌भुत रचना करून हि पुन्हा अगदीं प्राकृत जनांसाठीं त्यांच्या भाषेंत

अनुक्रमणिका

**इवलेंसें रोप लावियेलें द्वारीं ।**
**तयाचा वेलु गेला गगनावेरी ॥**
**मोगरा फुलला मोगरा फुलला ।**
**फुलें वेंचितां भार कळियांसि आला ॥**
**मनाचिये गुंती गुंफियेला शेला ।**
**बापरखुमादेवीवरी विठ्ठलीं अर्पिला ॥**

असे साधे साध अभंग हि लिहिले. तुकारामहाराजांनीं त्याचा फार विस्तार केला इतकें च. शंकराचार्यांनीं हि मोठमोठीं भाष्यें लिहून पुन्हां सामान्य जनासाठीं

**भज गोविंदं भज गोविंदं भज गोविंदं मूढमते ।**

अशीं मधुर स्त्रोतें लिहिलीं आहेत. सिद्धांत मांडावा आणि त्याचे साधे साधे बाळबोध धडे हि द्यावे, ही गोष्ट आर्यसंस्कृतींत परंपरेनें एकसारखी अव्याहत चालत आलेली आहे. प्रथम वैदिक ऋषींनीं अतिशय गूढ अशा सूक्तावलीच्या द्वारें जीवनसिद्धांत सांगितलें. त्यानंतर उपनिषदांची सरळ, उघड, अकृत्रिम अशी गद्यपद्य मांडणी झाली. त्याच्या हि पुढें जाऊन पुराणकारांनीं अनेक गोष्टींचा पाल्हाळानें पुरस्कार केला. मग त्याच्या उलट शास्त्रकारांची सूत्रपद्धति सुरू झाली. त्या सूत्रपद्धतीनंतर विस्तार करून अर्थ उकलणारी भाष्यपद्धति निर्माण झाली. या सर्व परंपरेंत सिद्धांत मांडावा आणि त्याचे धडे द्यावे ही गोष्ट प्रतिबिंबित झालेली दिसून येईल.

वैदिक पद्धतींतली खोली, औषनिषदिक पद्धतींतली अकृत्रिमता, सौत्रिक पद्धतींतली सूक्ष्मता आणि भाष्यपद्धतींतली तार्किकता या सर्व लेखन पद्धतींतलें सार म ध. मासिकांत काय आणि या साप्ताहिकांत काय सहज रीतीनें समावून गेलेलें दिसून येतें. फक्त पौराणिक पद्धतींतला पाल्हाळ मात्र येथें यत्किंचित हि दिसावयाचा नाहीं. पौराणिक पद्धतींतल्या मार्मिक गोष्टी आणि दाखले यांचा भरपूर उपयोग केलेला येथें आढळून येईल. संतांच्या पद्धतींतली भक्तिमयता येथें सांठवलेली आहे. विचारांची अनेक स्मारकें दाखवून विचाराला चालना देणारी नैरुक्तिक पद्धति निरनिराळ्या कोट्यांच्या स्वरूपांत येथें दृग्गोचर होते. येथें बहुधा प्रत्येक लेखांत संशोधकाची नाविन्यप्रतिभा चमकत असून व्याकरणाची काटेकोर शुद्धता असून कवीची रसमयता भरलेली आहे. वर्तमानकाळाची कार्यनिश्चिति, भूतकालांतील कारणांचा उकल, भविष्यकालाचें मार्गदर्शन असें तिहेरी कार्य आचार्यांच्या म. ध. साप्ताहिकांतील लेखांच्या द्वारें सिद्ध झालें.

महाराष्ट्र-धर्म मासिक केवळ एकट्या आचार्यांच्या च हातचें होते. पण साप्ताहिकांत गोपाळराव काळ्यांचा हि मोठा भाग होता. १८–६–१९२४ ते ११–४–१९२७ पर्यंत चार वर्षें हें साप्ताहिक चाललें.—

| | | |
|---|---|---|
| १८–६–१९२४ ते ३१–१२–१९२४ | .. | २८ अंक |
| ७–१–१९२५ ते २८–१२–१९२५ | .. | ४९ अंक |
| ४–१–१९२६ ते २७–१२–१९२६ | .. | ५० अंक |
| ३–१–१९२७ ते ११–४–१९२७ | .. | १३ अंक |

अनुक्रमणिका

असे एकूण चार वर्षें मिळून या साप्ताहिकाचे १४० अंक निघाले.

१८—६—१९२४ ते ८—१०—१९२४ पर्यंत धरमदास पालीवाल हे मुद्रक होते. १५—१०—२४ ते ११—४—१९२७ पर्यंत देवीदास गोपाळ पथकी हे मुद्रक राहिले. पहिल्यापासून शेवटपर्यंत राजस्थान केसरी प्रेस, वर्धा, हें जमनालालजींच्या पेढीजवळचें मुद्रणस्थान कायम होतें. या पत्राचा आकार यंग इंडिया, नवजीवनचा असून पृष्ठे प्रथम सहा होतीं, पुढें आठ करण्यांत आलीं. या पत्राची वर्गणी टपालहंशीलासह ३ रु. १३ आणे होती. स्थानिक ३ रु. ८ आणे वर्गणी ठेवण्यांत आली होती. क्वचित् या साप्ताहिकाला देणगी हि मिळे. २३—७—२४ च्या अंकात ९०, ४० व २३ रु. देणगी व ती हि नांवें जाहीर न करतां मिळालेली नमूद आहे. त्याचप्रमाणे 'महाराष्ट्र-धर्माचा प्रचार' या २—११—२५ च्या टिप्पणींत ५० रु. ची देणगी एकानें दिल्याचें आलेंलें आहे. गोपाळराव काळे हे १८—६—२४ ते १९—७—२६ पर्यंत संपादक होते. १९—७—२६ ते ११—४—२७ पर्यंत आचार्यांचें संपादक म्हणून नांव घालण्यांत आलें. परंतु संपादकाचें काम बहुतेक चारीं वर्षें गोपाळराव काळ्यांनी च केलें. मध्यंतरी गोपाळराव काळे ॲपेंडिसाईट्च्या रोगानें ऑपरेशनसाठीं नागपूरला गेले होते तेवढ्या अवधींत हें काम गोपाळराव वाळुंजकरांनीं केलें, शिवाय महात्माजींच्या दिल्लीच्या २१ दिवसांच्या उपवासाच्या वेळीं आचार्य दिल्लीस असतां वाळुंजकरांनीं साप्ताहिकांत लेख लिहून सर्व संपादकीय काम केलें होतें. लहानमोठें बारीकसारीक किरकोळ लिखाण धरून एकूण चार वर्षांतल्या १४० अंकांत १२१६ लेख लिहिले गेले. यांत यंग इंडिया नवजीवनमधल्या महात्माजींच्या लेखांच्या भाषांतराचा पुष्कळ भाग येऊन गेला. त्या वेळचे यंग इंडिया—नवजीवनमधले महात्माजींचे मुख्य महत्त्वाचे लेख यांत समाविष्ट झाले. या सर्व लेखांची भाषांतरें बहुतेक गोपाळराव काळ्यांनी च केलीं आहेत. साप्ताहिकांत खुद्द महात्माजींचे ४८३ भाषांतरित लेख या साप्ताहिकांत आलेले आहेत. स्वतः गोपाळराव काळ्यांनी २९६ लेख लिहिले. वाळुंजकरांचे ३२, धोत्र्यांचे २१, नाना कुळकर्णी ७, आचार्यांचे वडील ४ असे व इतर भाषांतरित लेख या पत्रकांत आलेले होते. गोपाळराव काळे, धोत्रे यांच्या लेखांत चिरपरिचयामुळें आचार्यांच्या विचारांची छाया पडणें स्वाभाविक मानावें लागेल. वाळुंजकरांनी तर आचार्यांचे ऐकलेले विचार च कित्येक ठिकाणीं आपल्या भाषेंत लिहिले आहेत. गोपाळराव काळ्यांच्या लेखांत राजकारणाचा भाग विशेष असून तर्कप्रवणता दिसून येते. धोत्र्यांच्या लेखांत कांही भावना, कांहीं आचार्यांच्या कोट्यांचें अनुकरण असा प्रकार आहे. आचार्यांच्या वडिलांच्या लेखांत रंगविषयक वाङ्मयपरीक्षण आहे. आचार्यांचे एकनिष्ठ विद्यार्थी वल्लभ भगवान पटेल यांचा हि एक लेख आहे. या साप्ताहिकांत बातम्या आणि जाहिराती मुळींच नसत. फक्त ज्या घटनांवर विचार मांडावयाचा तेवढ्यांचा च प्रासंगिक या सदरांत लिहितांना उल्लेख येई. आचार्यांचे लेख सोडून बाकीच्या भागाकडे पाहिले तरी हि हें अत्यंत पवित्र वातावरणांनें भरलेंलें दिसून येई.

या साप्ताहिकांत आचार्यांचे लेख एकूण २२२. त्यांत व्याख्यान प्रवचने ६, मुलाखत १, संतांचा प्रसाद ३५, लेख ७७ व प्रासंगिक स्वरूपाने लिहिलेले लेख १०३ अशी एक वर्गवारी पडते. पण वर्गवारी पाडूं लागल्यास निरनिराळ्या तऱ्हेनें ती पाडता येईल. विषयदृष्ट्या, धर्म, उद्योग, शिक्षण, राजकारण, अस्पृश्यता-निवारण, स्मारक, हिन्दु-मुसलमान-एकी, मृत्यूलेख, समाजविषयक लेख, आरोग्य, साहित्य, इतकी कमींत कमी वर्गवारी पाडता येईल. परंतु ही किती हि वर्गवारी केली तरी ती अपूर्णच ठरेल, यांत शंका नाही. कारण आचार्यांसारख्या समर्थ लेखकाच्या लेखांत अनेक विषय ओळखू येणार नाहींत असें मिसळलेले असावयाचे. इंद्रधनुष्याच्या रंगात अमुक रंग कोठें संपला आणि अमुक कोठें सुरू झाला असे स्पष्ट दाखवितां येत नाहीं. या ठिकाणीं हि अमुक विषय हा येथें आहे आणि अमुक नाहीं असे विषयांचे तुकडे पाडणे ही गोष्ट अशक्य च समजली पाहिजे. जसजसे त्या लेखांकडे पहावे तसतसा त्यांत नवीन नवीन अर्थ सांपडतो. जिवंत कृतींचें हेंच लक्षण आहे. एखाद्या मनुष्याचा पुतळा किती हि मोहक आणि हुबेहूब असो त्या

अनुक्रमणिका

विषयीं क्षणभर कौतुक वाटलें तरी इसापनीतींतल्या कोल्ह्यालाहि जेथे अशा मुखवट्यांकडे पाहून समाधान वाटेना तेथे जिवंत माणसांचे तो काय समाधान करणार? जिवंत कृति ही नुसती हुबेहूब किंवा सुंदर नसते. परंतु ती प्रत्येक वेळी नवीन आणि यथायोग्य दर्शन करवून देत असते. कारण तिच्यांत सत्य असतें. सत् असेल तेंच चेतन असेल आणि तेथें च आनंद उत्पन्न होईल.

म्हणून प्रथमच वाचकांना उद्देशून लिहितांना आचार्यांनी हा उलघडा केला आहे. मी वाचकांशीं "मराठें बोलणे" बोलणार असे म्हणून मराठें बोलणे म्हणजे काय याची आचार्यांनी व्याख्या दिली आहे— "मराठें बोलणें म्हणजे साधें, सरळ, उघड उघड बोलणें. मनांत जसे असेल तसे अगदीं खुल्ले एक घाव कीं दोन तुकडे असें बोलणें. ह्याचें नांव मराठें बोलणें. थोडक्यांत मराठें बोलणें म्हणजे "खरें" बोलणे".

**म्हणोनि आइके देवा । हा भावार्थ आतां न बोलवा ।**
**मज विवेक सांगावा । मऱ्हाटा जी ॥**

ज्ञानेश्वरांनी 'मऱ्हाटा विवेक' म्हणून अर्जुनाच्या तोंडी जे शब्द घातले त्याचा स्पष्टीकरणासह अनुवाद करून आचार्यांनी वाचकांपुढे पहिल्या प्रथम सत्याचें अधिष्ठान मांडले आहे. याच अंकांत 'म्हातारा तर्क' या लेखांत 'नवीन गोष्ट शिकण्याची ज्याची उमेद गेली तो म्हातारा' अशी जीर्णतेची—चैतन्यशून्यतेजवळ गेलेल्याची व्याख्या देऊन चैतन्यमयतेचा सत्याबरोबर च उपदेश केला आहे. पहिल्या लेखांत सत् दुसऱ्यांत चित् अशा दोन वस्तु मांडल्या गेल्या. त्यांत च आनंदाचा आविष्कार होऊन गेला आहे. सत्याचा अवलंब करून, जीर्णता सोडून नवीन वस्तु शिकाव्या, अखंड बोधाचा शोध करून दीन-दुबळ्यांची सेवा करीत जावी हें सूचित झालें आहे. परमेश्वरानें हि हें च उदाहरण घालून दिले आहे. म्हणून आचार्यांनी देवाचा दाखला दिला आहे.—"देव अनाथांचा नाथ आहे. दीनांचा दयाळ आहे. पतितांचा सांभाळ करणारा आहे, गरीबांचा वाली आहे, संकटांत सांपडलेल्यांचा कैवारी, टाकोटाकी धाऊन येणारा, पाठीराखा आहे", आनंदाचे लक्षण हें च कीं तो दुःखांचा नाश करील. परमेश्वर आनंदमय आहे म्हणून च तो दीनदयाळ आहे. आनंद ज्याला लाभला तो दीनांची सेवा करील च. ज्याला प्रकाश मिळाला तो अंधाराचा नाश केल्यावांचून कसा राहील? सुगंध हा दुर्गंधी घालवील, सुरुचि ही अरुचीचा नाश करील, उष्णता शीतनिवारक होईल, ही सहज गोष्ट आहे. इतके च काय पण ज्याला आनंद लाभला नाही त्याला हि लाभावयाचा असेल तर दुःखाचा नाश करून च लाभेल. आचार्यांनी लिहिलेल्या पहिल्या अंकांतील दोन्ही लेखांत सच्चिदानंदाचा प्रकाश दाखविला गेला आहे. कारण

**देहाच्या साधनें । सच्चिदानंद पदवी घेणें ।**

हें च मानवजीवनाचें ध्येय आहे. या ध्येयानुसार सेवेसाठी, गरीब लोकांच्या उद्योगासाठीं, नवीन समजूत पटवून देण्यासाठीं, सत्याच्या यथार्थ दर्शनासाठी साप्ताहिकांत जें जें आचार्यांनी लिहिलें तें तें बहुतेक स्थायी स्वरुपाचें लिखाण झालें. या लिखाणांत मोठमोठे तत्त्ववेत्ते, ऋषिमुनि, साधुसंत आणि शास्त्रज्ञांच्या वचनांचा, तत्त्वांचा आणि समजावून सांगण्याच्या पद्धतीचा

**साधुबोध झाला तो नुरोनियां ठेला ।**
**ठायीं च मुराला अनूभव ॥**

अनुक्रमणिका

असा परिपाक अनुभवरूपानें स्वतःसिद्धपणें च जरी उतरलेला असला तरी हि आचार्यांनी स्वतंत्रपणे संताच्या प्रसादाच्या ३५ लेखांत केवळ संतांची च वचनें, त्यांचे च विचार, त्यांच्या च निरनिराळ्या उदाहरणांनीं दाखवून, वेदोपनिषदांचें अनुभव नमूद करून हा थोडक्यांत सत्संगाचा एक अभ्यास च करविला आहे.

असे हें साप्ताहिक पत्र—ज्यांत बापूजींचे महत्त्वाचे लेख येत, ज्यांत वर्तमानपत्रांत कोठें हि आढळून येणार नाहीं असें पवित्र वातावरण असे, जेथे ऋषींची खोली, उपनिषदांची सहजता, सूत्रकाची सूक्ष्मता, भाष्यकारांची तर्ककुशलता, नैरुक्तांची विचारस्मारकता, संतांची भक्तिमयता, कवींची रसमयता, पुराणकारांची वार्ताकथनवृत्ति, वैय्याकरणांची परमदक्षता, भूतकालाचा उकल, वर्तमानकालाची कार्यनिश्चिती, भविष्याचें मार्गदर्शन; सर्व सुलभ भाषेंत समरसून प्रकट होई असें आचार्यांचे लेख येत. जेथें आदिमध्यावसानीं सर्वत्र सच्चिदानंदाचा प्रकाश फांकून गेलेला असे, ज्यांत काळाच्या अनित्यतेशीं झगडून नित्योपयोगी असे सिद्धांतलेख लिहिले जात, ज्यामध्ये कोणाला हि पृथक्करणाची शक्ति न चालतां केवळ अद्वैताची नित्यनूतन स्फूर्ति भरलेली असे, जेथे पूर्व कालांतला संतानुभव स्वानुभवासकट ओसंडून बाहेर येई—तें हें आचार्यांचें लिखाण प्रकट करणारें साप्ताहिक शेवटीं बंद करण्याची वेळ आली. मुख्यतः पुण्याच्या शंकरराव देव प्रभूति लोकांच्या कल्पनेवरून महाराष्ट्रांतील खादी कार्यकर्त्यांचा, बापूजींचा सल्ला घेऊन, पुण्याचे शिवराम महादेव परांजपे यांच्या देवांनीं घातलेल्या स्वराज्य पत्रांत पुण्याची गांधीशिक्षण माला आणि हें महाराष्ट-धर्म साप्ताहिक समाविष्ट करण्याचें ठरविण्यांत आले. असें हें साप्ताहिक बंद झाल्यानें जनतेशीं संबंध तुटला गेला आणि उत्तम विचारांचा प्रचार थांबला असें वरवर पाहाणाऱ्याला वाटण्याचा संभव होता. पण आचार्यांनीं शेवटीं 'वाचकांस विज्ञापना' करतांना या संबंधी उलगडा करून खऱ्या जनतेच्या संबंधाचें आणि विचारविनिमयांचे साधन पुढीलप्रमाणें दाखवून दिलें—"संतांच्या बरोबर सात पावलें चालण्यानें हि मैत्री जडते असें वृद्धांचे वचन आहे. मग महाराष्ट्र-धर्माच्या निमित्तानें ज्या सज्जनांशीं आज इतकीं वर्षें परिचय घडला त्यांच्या मैत्रीची अपेक्षा करण्यास कोणती हरकत? जर हरकत नाहीं तर त्यांच्यापाशीं इतकेंच मागावयाचें कीं त्यांनी ह्यापुढें व्यक्तिगत स्नेहसंबंध राखून योग्य ती सेवा घ्यावी.

**नमावे पाय हे माझें उचित ।**
**आशीर्वादें हित तुमचिया ॥**

या आचार्यांच्या विज्ञापनेमुळें नव्हे परंतु आचार्यांच्या स्वतःसिद्ध आध्यात्मिक योग्यतेमुळें अनेक लहानापासून थोर लोकांनी आचार्यांशीं पत्रव्यवहारद्वारें, आश्रमांत येऊन सहवासद्वारें आपल्या जीवनाचे निरनिराळे प्रश्न उलगडून घेतले. मोठमोठे पुढारी आणि कार्यकर्त्ये सार्वजनिक रीत्या भाषणें देतात, ग्रंथ लिहितात, वर्तमानपत्रें चालवतात, परंतु एकाच्या हि व्यक्तिगत जीवनांत क्वचित च कोणी फेरफार करूं शकतो. असे पुढारी आणि कार्यकर्ते म्हणजे राजवाड्यांच्या भाषेंत निव्वळ "उच्चार" होत. रामकृष्ण परमहंस सांगत "पंचांगांत लिहिलें कीं पाऊस अमुक अमुक तारखेला पडेल. पण पंचांग पिळलें तर थेंबभर तरी पाणी मिळेल का?" ज्या उच्चारानें, ज्या कृतींनें जीवनाचा लाभ होत नाहीं ते उच्चार, त्या कृति, ते विचार म्हणजे केवळ 'अव्यापारेषु व्यापार' आहे. त्यामुळें च मोठमोठ्या विचारकांचे विचार आणि उच्चार, लेख आणि भाषणें केवळ फुकट जन्माला येतात. कारण त्यांच्या पाठीमागें खरी शक्ति नसते. पण येथें आचार्यांचा फारसा संबंध न येतां हि केवळ दुरून

अनुक्रमणिका

**जाणत्याचे जाणावे प्रसंग । जाणत्याचे घ्यावे रंग ॥**
**जाणत्याचे स्फूर्तीचे तरंग । अभ्यासावे ॥**
**जाणत्याचा साक्षेप घ्यावा । जाणत्याचा तर्क जाणावा ॥**
**जाणत्याचा उल्लेख समजावा । न बोलतां चि ॥**

अशी योग्यता बाणली असल्यामुळें “व्यक्तिगत संबंध राखून सेवा घ्यावी” हें वाक्य साप्ताहिकाच्या समाप्तीच्या वेळीं लिहिलें गेलें. हें वाक्य वरून अति विनीत आणि साधें आहे पण त्यांत असामान्य अधिकार दडलेला आहे. हें वाक्य तर कोणी हि लिहूं शकेल असें वाटण्याचा संभव आहे. पण हा निव्वळ भ्रम आहे. लिहिण्यांत कांहीं विशेष नाहीं. नुसतें लिहून टाकलें. पण त्या वाक्याप्रमाणें व्यक्तिगत संबंध राखून लोकांचे जीवन पालटण्याची शक्ति पाहिजे ना? ही शक्ति

**जाणत्याचा काळ सार्थक । जाणत्याचा अध्यात्मविवेक ।**
**जाणत्याचे गुण अनेक । अवघे चि घ्यावे ॥**
**जाणत्याचा भक्तिमार्ग । जाणत्याचा वैराग्ययोग ।**
**जाणत्याचा अवघा प्रसंग । समजोन घ्यावा ॥**
**जाणत्याचे पहावें ज्ञान । जाणत्याचे शिकावें ध्यान ।**
**जाणत्याचे सूक्ष्म चिन्ह । समजोन घ्यावें ॥**
**जाणत्याचे अलिप्तपण । जाणत्याचे विदेहलक्षण ।**
**जाणत्याचे ब्रह्मविवरण । समजोन घ्यावे ॥**

अशी योग्यता असल्याशिवाय कोठून येणार?

आचार्यांनी प्रथम महाराष्ट्र-धर्म मासिक संतांपुढे मांडले, नंतर महाराष्ट्र-धर्म साप्ताहिकाच्या द्वारें जनतेशीं विचारसंबंध जोडला आणि शेवटी प्रत्यक्ष अनेकांच्या जीवनांत प्रवेश करून, अनेकांच्या जीवनाचे लहानमोठे प्रश्न सोडविण्याची पुढची पायरी गांठली. म्हणून च महाराष्ट्र-धर्म मासिक आणि साप्ताहिक बंद पडलें तरी “मरोनि उरणें जगीं आम्हां” या तुकोबांच्या उक्तीप्रमाणें हें सर्व लिखाण पूर्ण अर्थानें सदैव अमर ठरलें. आणि पुनः पुन्हां त्याचा अनेक ठिकाणी अनेक प्रकारे अनुवाद हि होत राहिला.

●●●

अनुक्रमणिका

## प्रकरण ३५ वें

## नवीन आश्रम

**झें**डा सत्याग्रहाच्या वेळेपासून च आश्रमीय व्यापाला जागा पुरत नाहीं. म्हणून घास-बंगला सोडून आश्रमासाठीं स्वतंत्र जागा घेतली होती. जमनालाल बजाज यांच्या बगीच्यांत आश्रम-संस्थापना होऊन, त्यांच्या चर्चजवळील घास-बंगल्यांत तो कांहीं दिवस राहिला. आतां त्याच्या विस्तारामुळें मारवाडी विद्यालयाच्या बोर्डिंगच्या पलीकडे अगदीं मोकळ्या शेतांत चारी बाजूला विस्तीर्ण क्षितिज दिसेल अशी ही जागा घेण्यांत आली होती. झेंडा-सत्याग्रहांतून मंडळी सुटून आली तेव्हां इमारती बांधण्याचें काम पुरें होत आलें होतें. त्यानंतर थोड्या च दिवसांनीं नवीन ठिकाणीं आश्रम गेला. राहण्यासाठीं मोठी इमारत, विणकामासाठीं बराकीवजा लांब च लांब जागा, स्वयंपाकादीसाठीं इमारत, अशा मुख्य तीन इमारती बांधल्या गेल्या. शिवाय पायखाने, विहीर व स्नानाच्या खोल्या, बाकी तारांचे कुंपण असलेलें मोठे विस्तृत शेत. आश्रमाचा हा च देखावा होता. पन्नास माणसांचा समावेश होईल अशी ही विस्तृत जागा होती. ही बांधण्यासाठीं पाऊण लाख रुपये खर्च आला. मुख्य राहण्याची इमारत सर्वांत मोठी असून त्या इमारतीच्या दर्शनी भागाला मेहेरपी कमानी आणि बाकी दोन्ही बाजूला गॉथिक कमानी आणि मोठमोठे गोल खांब असल्यामुळे या इमारतीला राजवैभवाचें स्वरूप प्राप्त झालें होते. या इमारतीवर सर्वत्र गच्ची असून मध्ये च एक खोली ठेवलेली होती. दुसरा कोणता हि रंग न लावतां केवळ पांढरा सफेत चुना दिलेली ती इमारत तालुक्यांतून १०-१० मैलांवरून दुरून दिसे. जवळ च दोन फर्लांगावर नागपूरकडे जाणाऱ्या गाडीचे रूळ होते. त्यामुळे गाडींतून प्रवास करणाऱ्यांना हि या इमारतीचें दर्शन होई.

**कृताभ्यंगस्नाना कनकमणिभूषाविरहिता ।**
**विराजे सिंदूरें धवलवसनें भूपवनिता ॥**

असें या इमारतीचें गंभीर स्वरूप होतें. राजवैभव आणि वैराग्य यांचें हें संमेलन दिसे. साधेपणा आणि भव्यता या दोहोंचा या इमारतींत लय लागलेला होता. रात्रींच्या वेळीं जिकडे तिकडे गाढ अंधकार पडला, आश्रमांतील प्रार्थना संपली, जिकडे तिकडे निजानीज झाली म्हणजे तर या इमारतीचें विशालपण पण अस्पष्ट स्वरूप केवळ ध्यान करणाऱ्या एखाद्या ऋषिसमुदायासारखे भासे. चंद्रप्रकाशांत ही इमारत पांढऱ्या रंगामुळें रात्रभर झळकत राही. तिच्या देदीप्यमान रुप्यांसारख्या चकाकीने

**हो कां जे शारदीचियेनि वोलें । चंद्रबिंब पाल्हेलें ।**
**कां मूर्त तेज चि बैसलें । आसनावरी ॥**

या ज्ञानेश्वरांच्या उक्तीची आठवण व्हावी. दगडविटांच्या इमारतींत हि नाना प्रकारचे चैतन्यभाव निर्माण होत असतात. साध्या मातीवर शिल्पकार आपल्या बोटांनीं रागद्वेषादि नाना भावांच्या रेखा उमटवीत असतो. मनावर जड वस्तूंच्या भिन्न आकाराचे भिन्न भिन्न चेतन परिणाम होतात. प्रत्येक स्थूल वस्तूचा बाह्य आकार हि सूक्ष्म आंतर-मानस भाव दाखवितो. नदीकांठ, एकांत, स्वच्छ पवित्र जागा, प्रभातकालचा समय अशा प्रकारच्या गोष्टी बाह्य तर खऱ्या च, पण त्यांची मनावर अतिशय सात्त्विक छाप पडते. भरतीच्या वेळेला लाटा किनाऱ्यावर लोटतात आणि ओहोटीच्या वेळीं समुद्रांत खेचतात, त्याप्रमाणें बाह्य वस्तूंच्या

अनुक्रमणिका

निरनिराळ्या भावांनीं मनाच्या लाटांच्या दिशा भिन्न भिन्न बनत जातात. म्हणून च साधक असल्या बाह्य गोष्टींत हि पवित्रतेचे भाव पहात असतो. तो प्रत्येक गोष्टीला असा जपत असतो. मनावरची अशुद्ध संस्कारमालिका क्षीण होऊन शुद्ध संस्काराची भरती उत्तरोत्तर वृद्धिंगत व्हावी हा त्याचा प्रयत्न असतो. म्हणून तो आपल्या मनाला बाह्य सुद्धां अनेक बंधनें घालीत असतो. त्या बंधनांतून च त्याला मुक्तीचा रस्ता दिसतो.—

**देशबंधश्चित्तस्य धारणा ।**
**चित्ताची धारणा देशबंधाखेरीज**
**व्हावयाची नाही. म्हणून**
**अनृतदर्शी । सभासमाजांश्वांगता । स्त्रीषु यावदर्थसंभाषी**

अशा त्याला अनेक मर्यादा घालाव्या लागतात. अशा मर्यादा जेथें सहज पाळल्या जातील त्या दृष्टीनें हें स्थान आणि या इमारती आश्रमाच्या जीवनाला योग्य दिशा दाखविणाऱ्या होत्या, असें म्हणावें लागेल. तथापि आचार्यांनी स्वतः यांत कांहीं लक्ष घातलें होतें असें नाहीं. आचार्यांची भूमिका ही स्थूल व्यावहारिक कामें करण्याची मूळपासून कधीं हि नव्हती. त्यामुळें इमारती अशा च असाव्या अशी निश्चित कल्पना देणें ही गोष्ट त्यांच्याकडून अपेक्षित नव्हती. एकदां सहज इमारत बांधण्यापूर्वी गोष्टी चालल्या असतानां स्वस्तिक आकाराची इमारत असावी अशीं कल्पना त्यानें सुचविली होती. स्वस्तिकाकृतींत सर्वत्र साम्याची कल्पना आहे. पण जें सहज होईल तें घ्यायचें. बाह्यवस्तूंत आग्रह ठेवावयाचा नाहीं आग्रहशक्ती महत्त्वाची आहे. ती विशिष्ट प्रसंगासाठीं राखून ठेवावयाची. ती अशी बाह्य वस्तूंत खर्चली तर ती विशिष्ट प्रसंगीं हुकमी मदत देऊं शकणार नाहीं. या तत्त्वाप्रमाणें या इमारती बनल्या गेल्या. त्यांत कोणाची एकाची कल्पना निश्चित होती असें नव्हे. पण जें सहज होतें तें च सुंदर होतें, तें च योग्य होतें. मुद्दाम केलेली कृति कृत्रिम ठरते. कलाकार जेव्हां सहजावस्थेला पोंचतो तेव्हां च त्याच्या हातून उत्तम कलाकृति निर्माण होते. तोपर्यंत त्याच्या कृतींत अभ्यास असतो. त्या अभ्यासाचा अभ्यासपणा मोडून जेव्हां सहजता मुरेल तेव्हां जें जें गावें, जें जें चित्र काढावे, जें जें बोलावें, जें जें लिहावें, जें कर्म करावें, तें साधें हि कर्म, नुसते साधें चालणें सुद्धां अतिशय प्रमाणशुद्ध, अतिशय सुंदर, अतिशय उपयुक्त, यथायोग्य ठरतें. वेडेंवांकडें तेथें कांहीं व्हावयाचें च नाहीं. वेडेवाकडें करूं म्हटलें तरी तें आपलें सुंदर च व्हावयाचें.

**सर्वेंद्रियांच्या आंगणी । विवेक करी राबणी ।**
**साच चि करचरणीं । होती डोळे ॥**

अशी स्थिति बाणल्यावर मग—

**नायकावें तें कान चि टाळी । न पाहावें तें दिटी चि गाळी ।**
**अवाच्य तें टाळी । जीभ चि गा ॥**

हें सांगावयास पाहिजे काय?

असो, अशी ही सहजसुंदर राजवैभव इमारत होती तरी आंत मात्र राजवैभव नांदत नसून तपस्या च रात्रंदिवस वावरत असे. येथें कोणी आला तर त्याला साधें पिण्याचें पाणी हि एकदम मिळावयाचे नाहीं.

कारण येथें आश्रमांत पाणी भरले जात नसें. तहान लागली कीं विहिरींतलें पाणी काढायचें असा येथला शिरस्ता होता. बापूजी येथें आलें असता महादेवभाईंनीं याविषयीं एकदां विनोदानें लिहिलें हि होतें. बरें विहिरीतले पाणी जवळ असावें, तर तें हि नाहीं. विहिरीला खणतांना एकदा जो काळा दगड लागला तो शेवटपर्यंत फुटला नव्हता. ऐंशी फूट खोल विहीर झाली, पण पाण्याचें नांव नाहीं. आंतला झरा मुळींच लागला नाहीं. विहिरीच्या दगडाचा मात्र मोठा ढीग बाहेर पडला. त्याच्या दृष्टांताचा आचार्यांनी महाराष्ट्र-धर्मांत उपयोग करून घेतला. विहिरींत झऱ्याचें पाणी आलें नाहीं तरी पावसाचें पाणी झिरपून त्याचा संग्रह होई. व तें पाणी वर्षभर पुरें. असें तें पाणी ५०/६० हातावरचें ओढून मग प्यावयाचें किंवा कोणाला हवें असल्यास द्यावयाचे अशी स्थिति होती. त्यामुळें एवढ्या राजेशाही इमारती पण आजुबाजूला वृक्ष-वनस्पतीचें नांव नव्हतें. कारण झाडांना पाणी देण्याला विहिरींत पुरेसें पाणी कुठें असे? कोणी आश्रमांत जेवावयास आला तर त्याला कित्येक दिवस सर्व स्वयंपाकाची भांडीं मडक्याची दिसावयाची. त्या वेळीं मडक्यांचा प्रयोग चालला होता. कित्येक आश्रमीय विद्यार्थी कित्येक दिवस केवळ लंगोटी नेसून राहात. त्यामुळें ही एक बाबा लोकांची धर्मशाळा तर नाहीं? असें कोणास वाटणें शक्य होतें. शक्य होतें कशाला? एकाला असे वाटलें च. तो मनुष्य कोठला मुशाफिर असेल. सुमारें संध्याकाळीं ६/७ च्या सुमाराला तो आश्रमांत आला. मुख्य इमारतींतल्या सर्व हॉलमध्यें तो शिरला. आणि एका हॉलमध्यें दोघे आश्रमवासी बोलत बसले होते. तेथें येऊन त्यानें विचारलें, “ये धरमशाला है क्या?” या बोलणाऱ्या मंडळींनीं विनोदानें उत्तर दिलें — ‘हा, धरमशाला ही समझो एक तरहसे’, त्या बिचाऱ्याला तो विनोद समजला नाहीं. समजावा कसा? कारण त्याला त्या इमारतींत कोठें च कोणतें हि सामान दिसलें नाहीं. सर्व हॉल अगदीं मोकळे होते. सर्वांचें सामान कपाटांत बंद असावें. खोल्या केवळ मोकळ्या असाव्या अशी आचार्यांची त्या वेळची शिस्त असे. त्याला अडगळ यत्किंचित खपत नसे. त्याप्रमाणें सर्व हॉल मोकळे दिसल्यामुळें त्याला ही धर्मशाळा च आहे असें वाटलें. रात्रीं तो केव्हां आला कोणास माहीत. परंतु आचार्य एकटे च मुख्य इमारतीच्या गच्चीवरच्या खोलींत निजले होते. तेथें तो जाऊन कोपऱ्यांत खालीं कांहीं न आंथरतां निजला. आचार्यांना एकटें निजणें लहानपणापासून प्रशस्त वाटे. त्यामुळे त्याला दुसऱ्याची हालचाल तेव्हां च समजे. त्या गृहस्थाचा झोपेंतला मोठा श्वास चालू झाला. खोलींत अंधार होता. आचार्य दोनच्या सुमारास जागे झाले. आणि श्वासोच्छवासाचा आवाज ऐकून त्यांनीं कोण आहे? असें विचारलें. विचारतां च तो गृहस्थ जागा झाला व त्यानें न उठतां च “आदमी है” असें उत्तर दिलें. तें ऐकून आचार्यांना अचंबा वाटला. आचार्यांनी कंदिल लावला. आणि न विचारतां असें निजणें योग्य नव्हे असें त्याला सांगितलें. त्यानें ‘एवढी रात्र निजूं द्या ही धर्मशाळा आहे अशी माझी समजूत झाली’ अशी विनंति केली. पण आचार्यांनी ती गोष्ट कबूल केली नाहीं. ‘बरें’, तर मी जातों. मला कांहीं प्रसाद तरी द्या, असें त्यानें म्हटल्यावरून आचार्यांनी त्याला गीता दिली. आणि तो सकाळच्या चारच्या प्रार्थनेच्या अगोदर च तेथून रवाना झाला.

हा प्रसंग घडण्याचें दुसरें कारण म्हणजे आश्रमचे दरवाजे सदासर्वदा सताड उघडे असत हें होय. चोराच्या भयानें आश्रमाचीं दारें लावलीं जात नसत. तरी या आश्रमांत चोरी अशी झाली च नाहीं. साबरमतीच्या आश्रमांत चोऱ्या होत. बापूजी म्हणत चोरी होते याचा अर्थ आपणाकडे परिग्रह आहे. अपरीग्रही माणसाकडे चोरी होणार नाहीं. आश्रमचा परिग्रह हा परिग्रह नसून केवळ व्यवस्थेसाठीं, लोकसेवेसाठीं, ठेवलेला साधनसमूह आहे असें चोरांना हि वाटलें पाहिजे. जेथें ममत्वबुद्धि असते तेथें च परिग्रह असतो, आणि तेथें च चोऱ्या व्हावयाच्या. कारण ममत्वानें समत्वाचा कांटा ढळतो. समत्व गेलें कीं चोऱ्यांसारखीं विषम कृत्यें घडावयाचीं. परंतु या आश्रमांत सदा सर्वदा सताड दारें उघडीं असून हि चोरी झाली नाहीं. आश्रमांत दूध घालण्यासाठीं म्हणून रोज एक तुकाराम तेली नांवाचा गृहस्थ येत होता. कधीं कधीं त्याची बायको हि येई. एक दिवस तो सकाळीं दूध घेऊन आला. त्यानें दूध घातलें आणि एक

साबणाची लहानशी वडी खिशांतून काढून पुढें ठेवली. दूध घेणाऱ्या आश्रमीयानें हें काय म्हणून विचारलें. तो म्हणाला, 'ही तुमच्या आश्रमाची साबणाची वडी आहे. माझ्या बायकोनें ती चोरली. पण ती कबूल होईना. मी ओळखली कीं ती आश्रमाची च विहिरीवर पडलेली साबणाची वडी आहे. पण बायको कबूल होत नाहीं. म्हणून आज उपवास घातला आहे.' तो पुढें म्हणाला, 'मीं तिला पुष्कळ समजावलें कीं चोरी निदान आश्रमाची करूं नये.' पण ती कबूल च होत नाहीं. काय करावें? त्याला त्या आश्रमीयानें समजावलें कीं असें करूं नको. ती वडी आश्रमाची नसणें हि शक्य आहे. उगीच बायकोला उपवास घालूं नको. खरा प्रकार काय होता कोणास ठाऊक. पण त्या तेल्याची आश्रमाविषयीं अशी पवित्र भावना होती! एकदां समोरच्या आलोडी गांवांतला एक गरीब मनुष्य आला. आणि त्यानें आश्रमाच्या हद्दींतला एक मोठा गोटा उचलला. तो असे मोठे मोठे दगड शोधून त्याचे पाटेवरवंटे करून विकी. त्यावर च त्याची उपजीविका चाले. त्याच्या घरीं तो एकटा च असे. त्याच्या दारिद्र्यामुळें, एकाकित्वामुळें, त्याचा चेहरा अगदीं करुणास्पद दिसत होता. त्यानें तो गोटा घेतला तेव्हां आश्रमीयांनीं पाहिलें आणि तो गोटा टाकावयास सांगितलें. तो याची दाद घेण्यासाठीं आचार्यांकडे आला. तो सुमारे १०॥-११ चा सुमार होता. आचार्य विहिरीवर उभे होते. विद्यार्थ्यानें त्यांच्या स्नानासाठीं पाणी काढून ठेवलें होतें. त्या गरीब मनुष्यानें करुण शब्दांत आपली कहाणी सांगितली. वाटत होतें कीं, त्याला तो गोटा घेऊन जाण्याला परवानगी मिळेल. पण तशी परवानगी आचार्यांकडून मिळाली नाहीं. त्याच्याकडे आचार्य पाहात होते, हंसत होते. मनांत त्याच्याविषयीं पूर्ण सहानुभूति होती. त्याच्या ठिकाणीं प्रत्यक्ष ईश्वरदर्शन करण्याची आचार्यांची भूमिका होती. पण सत्याला बाध येता कामा नये म्हणून बिनविचारता घेतलेला गोटा त्यांनी टाकावयास लावला. मोठें करूण दृश्य होतें तें! पण आचार्यांच्या निर्णायक बुद्धीनें त्याला सत्याचा पाठ शिकवला.

यांत कठोरता दिसेल, पण ती दुसऱ्याच्या बाबतींत भासे याच्या किती तरी पट स्वतःच्या बाबतींत असे. आचार्यांचा स्वभाव कठोर समजला जाई पण तें वैराग्याचें तीव्र स्वरूप होतें. आपल्या संगतींतला, आपल्या आश्रमांतला कोणी हि असो, त्याच्या हातून घडलेला प्रमाद हा आपला च प्रमाद समजून त्याच्याबद्दल स्वतः प्रायश्चित घेण्याच्या बापूंच्या मनोवृत्तीसारखी च आचार्यांची वृत्ति होती. अशा परिस्थितींत त्याला खाणें पिणें सुचावयाचें नाहीं. एकसारख्या फेऱ्या घालीत विचार करीत रहावें असें सारखें चालावयाचें. आपली उग्रता आपणांत च जिरवावयाचा हा प्रकार असे. योगाग्नीनें शरीर दग्ध होऊं शकतें या गोष्टीचा प्रत्यय येथें येई. पूर्वींचे संत उच्च भूमिकेवर विहार करणारे, सदाचाराचा उपदेश करणारे भक्तिज्ञान-वैराग्यांत रमून जाणारे होते. पण त्यांच्या संगतींतला कोणी माणूस अनाचारी निघाला तर ते ती गोष्ट त्याच्या नशिबावर सोपवून देत. त्यांना त्या त्या माणसाच्या अनाचारामुळें दुःख होई. पण यांत आपलें स्वतःचें च कांहीं वैगुण्य आहे असें त्यांना वाटत नसे.

**यत्ने कृते यदि न सिध्यति कोऽत्र दोषः ।**

अशी त्यांची मनोवृत्ति असे. पण बापूजी आणि आचार्यांची पायरी यापुढची असे. दिव्याचा प्रकाश काय आपल्या पुरता च राहील? फुलाचा वास काय फुलांत च दडून राहील? असें होणें शक्य नाहीं. या च विचारसरणीनें येथें दुसऱ्याच्या दोषाबद्दल स्वतःला योगाग्नींत दग्ध करण्याची क्रिया चाले. पूर्वसंतांना वैराग्य, ज्ञान, सत्य इत्यादि गुण स्वतःची भूमिका टिकवण्यापुरते लागत. पण येथें स्वतः म्हणजे स्वतःसकट स्वतःच्या संबंधांतले लोक अशी व्यापक कल्पना असल्यानें संतांपेक्षा किती तरी पट सत्यादिगुणांची अपेक्षा असे. सत्य स्वतःपाशीं पाहिजे च, पण त्याचा जेथें जाऊं तेथें प्रकाश पडला पाहिजे. आपल्या आसपास असत्य फिरकतां कामा नये. ही च गोष्ट अहिंसेची. अहिंसेची कसोटी काय? तुमच्या जवळ अहिंसा आहे

कशावरून? तर तुमच्याजवळ तुमच्या आसपास हिंसा होऊं शकत नाहीं त्यावरून. नारदांवर चाल करून आलेला कठोर वाल्या कोळी एकदम हिंसा सोडून

**मा निषाद प्रतिष्ठां त्वमगमः शाश्वतीः समाः ।**

इतक्या कोमल मनोवृत्तीचा बनला. माणसांची शिकार करणाऱ्या वाल्या कोळ्याला क्रौच पक्षाला मारलेला बाण सहन झाला नाहीं. ही अहिंसेची कसोटी आहे. ब्रह्मचर्याची कसोटी काय? ब्रह्मचाऱ्याच्या संगतींत निर्विकारता निर्माण होईल. ब्रह्मचर्याची कसोटी आचार्यांना पूर्ण लागू होती. लहानपणापासून जो जो त्याच्या संगतींत आला. त्या बहुधा प्रत्येकाला ब्रह्मचारी राहण्याची प्रेरणा मिळाली. त्याच्या मित्रमंडळींत विवाहित माणसें असून हि त्यांनीं ब्रह्मचर्याचा प्रयोग आरंभला. आचार्यांची अशी स्वतःची सत्य-अहिंसा वाढविण्यासाठीं योगाग्नि पेटवून उग्र तपस्या चालली होती. त्यामुळें त्याला बाहेरचीं माणसें भीत यात मुळीं च शंका नाहीं. आश्रमांत सहज उतरण्यास कोणी येईल असें घडत नसे. एकदां बापूजी आले असतांना त्यांच्या बरोबरची कांहीं मंडळी जमनालालजींकडे च राहिली. मग बापूजींनीं जेव्हां त्यांची हजेरी घेतली तेव्हां तीं आश्रमांत येऊन जेऊं खाऊं लागलीं.

जमनालालजी मात्र नेहमीं च यावयाचे. मधून मधून त्यांनीं स्वतः येथें जेवावयास हि रहावें असें घडे. घास बंगल्यांत किंवा बगीच्यांत ते कधीं जेवावयास आले नाहींत. ते आले म्हणजे त्यांच्याबरोबर त्यांच्या घराच्या मंडळींचा आणि मुलामुलींचा मेळा असेच. त्यांच्या भाषणांत नेहमीं कामाचें बोलणें आणि हास्यविनोद यांची जोडी असावयाची च. आचार्य स्वतः जेवण वाढीत. बहुधा एकदम च सर्व जेवण वाढून घेण्याची त्या वेळीं पद्धत होती. त्यामुळें या जमनालालजींच्या बरोबरच्या पाहुण्यांना आचार्य सांगत—'नमक मिल सकता है, बाकी तो सब आपको परोस दिया है'. जमनालालजी यावर विनोदानें म्हणत—'नमक मिल सकता है ये मेहरबानी है'. जमनालालजी आश्रमांत जेवण्यास येत त्यांत त्यांची अत्यंत पवित्र भावना असे. आचार्यांकडे वारंवार येतां यावें, आश्रमादि संस्थांची विचारपूस करता यावी म्हणून जमनालालजींनी जुन्या आश्रमांत म्हणजे घास बंगल्यांत स्वतःचें राहण्याचें ठिकाण बनविलें. आणि गांवांत न रहातां ते बहुतेक काल येथें च घालवूं लागले. आश्रमाचें जीवन, आश्रमाचें जेवण, म्हणजे शुद्ध माणसांच्या हातचा प्रसाद अशी त्यांची भावना होती. एकदां पंडित मालवीय आले असतां त्यांना जमनालालजी म्हणाले,— 'पंडितजी, यहां का ये पवित्र भोजन है आश्रम का. आप थोडा प्रसाद लीजीए. पंडितजी अर्थात् च कोठें च कांहीं च न खाणारे सनातनी. त्यांनीं ती सूचना स्वीकारली नाहीं. जमनालालजी स्वतः आश्रमाच्या उच्च आदर्शाला पोंचण्याची तयारी करीत होते. त्यांनी स्वतःचीं मुलें निःशंकपणें या कडक शिस्तीच्या आश्रमांत ठेवण्यास मागेंपुढें पाहिलें नाहीं.

**अंतरस्त्यागी बहिःसंगी लोके विचर राघव ।**

या वसिष्ठांनीं रामचंद्राला उपदेशिलेल्या तत्त्वाप्रमाणें ते खरोखर त्यागस्वरूप झाले होते यांत शंका नाहीं. त्यांची आचार्यांच्या सत्संगाची लालसा केवळ अपूर्व असे. आचार्यांचे बंधु संगीतांत प्रवीण असल्यामुळें ते तेथें असतांना प्रार्थना चालवीत असत. त्यांना एकदां जमनालालजी म्हणाले, तुमचा संगीतशास्त्राचा अभ्यास पुष्कळ आहे. आम्हांला तर त्यांत कांहीं समजत नाहीं. पण आचार्य प्रार्थनेनंतर प्रवचन देतां देतां मध्यें च एखादा अभंग म्हणतात किंवा एखादें वचन म्हणतात तसें गोड संगीत आम्हांला कोणाचें च वाटत नाहीं. बापूजी आले असतां त्यांचा मुक्काम गच्चीवरच्या एकांत अशा त्या हवेशीर खोलींत असावयाचा. तो रात्रींचा

प्रसंग होता. जमनालालजी एकटे च बापूंच्या जवळ बसले होते. एकाएकीं ते बापूंना म्हणाले, 'मला नेहमीं ही भीति वाटते कीं आचार्य या आश्रमांत राहणार नाहींत. विरक्त पुरुष आहेत. त्यांना नदीकांठ, अरण्य अशा स्थानीं जाण्याची केव्हां इच्छा होईल सांगतां येत नाहीं.' त्यावर बापूंनीं उत्तर दिले—

**"मने पुछवां वगर एवुं कंई थवानु नथी ।"**

जमनालालजींची आचार्यांविषयीं अशी निष्ठाबुद्धि होती! जमनालालजी आपल्या वाढदिवशीं आचार्यांकडे येऊन आत्मपरीक्षणात्मक निवेदन हि करीत. एकदां संध्याकाळच्या प्रार्थनेंत जमनालालजी आले. आचार्यांनी त्या दिवशीं प्रवचनांत संसाराच्या मिथ्या स्वरूपाविषयीं आणि त्याच्या मोहासंबंधी विवेचन केले. प्रार्थना संपली. जमनालालजी परत जावयाचे. पण ते परत न जातां म्हणाले, 'अब हम यहीं रहेंगे'. त्यांना आश्रमांतली एक एकांत खोली देण्यांत आली. दुसऱ्या दिवशीं त्यांचे कागदपत्र घेऊन, कपडे घेऊन, गांवांतल्या दुकानावरून नोकर आला. जमनालालजी खोलींत नव्हते. कपडे ठेवतां ठेवतां तो एका आश्रमीयाला म्हणाला, अब शेठजी साधु बन गये. अब दुकान छोड दिया, मालूम होता है.' नोकर परत गेला. जमनालालजी १/२ दिवसांत च मुंबईस कांहीं कामासाठीं निघून गेले. जमनालालजींप्रमाणें बाबासाहेब देशमुख विरूळकर हि आचार्यांकडे येत असत. पुढें तर ते २/३ महिने प्रत्यक्ष आश्रमांत राहिले हि. ब्राह्मणेतरांचे पुढारी, कॉंग्रेसनिष्ठ, अतिशय सात्त्विक वृत्तीचे असे हे नागपूर भागांतले सुप्रसिद्ध गृहस्थ होते. वर्ध्याजवळ ७/८ मैलावर असलेल्या 'सुरंवांव' नांवाच्या खेड्यांत राहणारे नानाजीमहाराज नांवाचे साधु गृहस्थ आणि त्यांची चाहती मंडळी मधून मधून आश्रमांत आचार्यांकडे येत. आचार्य आपल्या विद्यार्थ्याला ब्रह्मसूत्रभाष्य शिकवी तें ऐकण्यास बसत. ब्रह्मसूत्र एकदां सुरू झालें की आचार्य देहभान विसरून जाई. त्यांच्या मुखांतून अनावर वेगानें ज्ञानगंगेचा प्रवाह बाहेर पडे. तें दृश्य अलौकिक असे. आवाज हि पहाडी असावयाचा. या ब्रह्मसूत्रभाष्यामुळें नानाजीमहाराजांचा ओढा आचार्यांकडे वळला तो कायमचा च. नानाजीमहाराज नागपूरकडचे. घरचीं माणसें मरण पावलीं. चित्त उदास झालें. पूर्वपुण्याईमुळें चित्तांत वैराग्य बाणलें. पुष्कळ प्रवास केला. शेंवटीं सहज फिरत सुरगांवला आले. तेथें च आतां रहावे असें ठरवलें. त्याप्रमाणें गांवांत जवळ जवळ दीड तप राहिले. वैद्यकीच्या द्वारें शेंकडों लोकांची सेवा केली. गोपालकृष्णाचें मंदिर व मठ गांवकऱ्यांनीं बांधून दिला. गांवांत महारांपासून ब्राह्मणांपर्यंत सर्वांना भक्तींची दीक्षा दिली. गांवांत स्त्रियांना हि साक्षरतेचें शिक्षण दिलें. अतिशय शांतिपूर्वक ही साधना त्यांनी केली. त्यांची आचार्यांवर श्रद्धा बसून गेली. ब्रह्मसूत्रभाष्याच्या या अपूर्व प्रसंगानिमित्त दुसरे हि पुष्कळ लोक येऊन गेले. एकदां आश्रमांतील शंकरराव चौधरी नांवाच्या विद्यार्थ्याचे वडील व त्यांचा कबीरपंथी गुरू आश्रमांत आला. तो तरुण वयाचा होता. कबीरपंथ च श्रेष्ठ. असें प्रतिपादन करण्याच्या हेतूनें तो रात्रीं आचार्यांकडे गेला. आचार्य प्रार्थनेनंतर कांहीं च बोलत नसे. तो मग स्वतः नाना तऱ्हेनें बोलूं लागला. 'मी ॐ जाणत नाही सोम जाणत नाहीं नि बोम जाणत नाहीं' असे एक वाक्य तो बोलला. तो प्रसंग पुढें आचार्यांच्या विचारपोथींत प्रविष्ट झाला. असे चमत्कारिक लोक हि क्वचित् येत. एकदां श्याम कवि नांवाचे विलक्षण गृहस्थ आले. संध्याकाळचा सुमार होता. ते गच्चीवर आचार्यांशीं बोलत बसले. बोलतां बोलतां तेथें च गच्चीवर पचकन् थुंकले. आचार्यांनी लगेच 'हें काय?' असे खडकावून विचारतां च 'चुकलों चुकलों' म्हणून पुन्हां आपलें त्यांनीं बोलणें तसें च सुरू केले. आचार्यांनीं ताबडतोब पाण्याची बादली आणवून तेथें सफाई करवली. 'प्रचारक या भूमिकेंत फिरणारा मनुष्य त्याला एवढी साधी गोष्ट कळूं नये' याबद्दल आचार्यांनी प्रार्थनेंत खेदोद्गार काढले. वाटेल त्यानें उठावें, वाटेल तो प्रचार करावा, वाटेल तीं भाषणें करावीं, सभासभ्यता कांहीं च पाहू नये, वाटेल त्याची निंदास्तुति करावी, हा व्यासपीठाचा अपमान, सार्वजनिक जीवनांतली ही अवनति आचार्यांना खपत नसे. असा कांही प्रकार झाला कीं आचार्य तत्क्षणीं

अनुक्रमणिका

**नसे राम ते धाम सोडूनि द्यावें । सुखालागि आरण्य सेवीत जावें ॥**

या तत्त्वाप्रमाणें तेथून निघून जाई. तसें च खासगी सभा ज्या ज्या वेळीं भरत त्या त्या वेळीं जो तो आपले म्हणणें मांडण्याच्या भरांत दुसऱ्याचें बोलणें हि ऐकून घ्यावयाचें विसरत असतों. मग सगळ्यांच्या बोलण्याचा एक च गिल्ला तेथें चालतो. ही हि गोष्ट आचार्यांना पूर्ण नापसंत असे. ही आचार्यांची मनोभूमिका गांवांत, प्रांतात सर्वत्र माहीत झाली होती. सभेचा वेळ ठरवला नऊ वाजता आणि सभा सुरू करावयाची ९॥ ला असा अनियमितपणा हि आचार्यांना सहन होत नसे. लोकांचा असा व्यर्थ वेळ घेणें बरोबर नाहीं. सबंध सार्वजनिक जीवन त्यानें अव्यवस्थित होतें. ही विचारसरणि आणि तदनुसार वर्तनपद्धति माहीत असल्यामुळें आचार्यांना भीत भीत च सार्वजनिक सभादिकांत आमंत्रण दिलें जाई. परंतु चित्तांत अशांति झाली, पुढें काय करावें हें सुचेनासे झालें म्हणजे आचार्यांकडे च आपल्याला कांहीं समाधान मिळेल, आध्यात्मिक आश्वासनाची ही च एक जागा आहे. याची जाणीव हि आसपास असे. कोणती हि अडचण उपस्थित झाली नाहीं. व्यवहाराच्या नित्यभ्रमाला कोणता च धक्का बसला नाहीं तोपर्यंत दुरून या देवाला नमस्कार करावयाचा. भीत भीत यावयाचे असा प्रकार असे. पण चित्ताला शांति नाहीं, तळमळ तळमळ चालली आहे, झोप येत नाहीं, खाणेंपिणें गोड लागत नाहीं अशा स्थितींत आचार्यांजवळ अंतःकरण उघडें केलें जाई. तो रात्रीचा समय होता. चंद्राचा रुपेरी प्रकाश चोंहींकडे पसरला होता. दिवसाचा सर्व कर्मभाग आणि हालचाली लोपून गेल्या होत्या. आचार्य गच्चीवर होता. निजण्याची तयारी च होती. इतक्यांत गांवांतलें एक लक्षाधीश शेठ येऊन त्यांनीं आचार्यांना नमस्कार केला. आणि ते लीनतेनें बाजूला बसून राहिले. काय आहे म्हणून विचारतां—दिवाळें निघालें. सर्वस्व गेलें. सट्टा केल्यामुळें अशी स्थिति झाली. अशी त्यांनीं स्वस्थिति सांगण्यास सुरुवात केली. बोलतां बोलतां त्यांचा आवाज फुटेनासा झाला. डोळ्यांतून अश्रुधारा चालल्या. आचार्यांनी मग चार गोष्टी सांगितल्या. त्यानंतर त्यांना थोडी शांति वाटली. ते प्रणाम करून निघून गेले. असा शांतिलाभ अनेकांना होई. मारवाडी विद्यालयाचें बोर्डिंग आणि हा नवीन बांधलेला आश्रम यामध्यें मारवाडी विद्यालयाच्या शिक्षकांसाठीं स्वतंत्र घरे बांधलीं होतीं. त्या घरांपैकीं एका घरामध्यें वर्ध्याच्या वकील वर्गांतील प्रख्यात जाजूसाहेब वकील राहात होते. त्यांनी १९२० सालीं वकिली सोडून दिली होती. आणि जमनालाल जींच्या सहकार्यानें अनेक सार्वजनिक कामांत ते सूत्रधाराप्रमाणें मागें राहून भाग घेत. मारवाडी समाजाच्या सामाजिक सुधारणेबाबत त्यांचा पुढाकार असे. मारवाडी विद्यालयाला तर त्यांचा मोठा आधार होता. स्वभावानें मितभाषी आणि संकोची, व्यवहारांत अतिशय कडक आणि आध्यात्मिक वृत्तीचे, गाजावाजा न करतां सेवा करणारे, सल्लामसलतीनें अनेक कामें करणारे अशी त्यांची भूमिका असे. महाराष्ट्र चर्खा संघाचे ते कर्णधार झाले आणि त्यांनी त्या संघाला व्यापारी दृष्ट्या अतिशय सुव्यवस्थित शिस्त लावून दिली. जमनालालजींपेक्षां वयानें मोठे असल्यामुळें आणि जमनालालजींशीं त्यांचा गाढ संबंध असल्यामुळें जमनालालजी त्यांच्याकडे अतिशय आदरबुद्धीने पहात. नेहमीं प्रत्येक बाबतींत त्यांचा सल्ला घेत. असे हे जाजूची आश्रमामध्यें आचार्यांकडे आश्रमस्थापनेपासून मधून मधून येत. पण आंता आश्रम अगदीं शेजारीच आल्यामुळें ते स्वभावतः संकोची तरी प्रार्थनेंत बहुतेक नियमित येत असत. त्याचप्रमाणें मधून मधून आचार्यांकडे येऊन नाना तऱ्हेचें बोलणें करीत. जमनालालजींचा स्वभाव अगदीं मोकळा बालवत्. तर यांचा अगदीं उलट. हे लहानपणापासून च वृद्ध आणि संकोची होते. त्यांनीं आपलीं मुलें आश्रमामध्यें ठेवलीं होतीं. त्यांचा मोठा मुलगा जन्मतः कुबडा होता. तो जरी अपंग होता तरी त्याला हि त्यांनी आश्रमांत ठेवला होता. तो अपंग असल्यामुळें त्रासिक परंतु अतिशय नियमित असे. आश्रमांत घंटा वाजविण्याचे काम त्याच्याकडे असे. त्याच्या ठिकाणच्या नेमस्तपणाच्या गुणाची आचार्य फार प्रशंसा करी. जमनालालजींच्या मुलांप्रमाणें च जाजूजींचीं मुलें हि आश्रमांत मिसळून गेलीं. जाजूजींनीं कांहीं दिवस आचार्यांकडे ज्ञानेश्वरी वाचली. याखेरीज मारवाडी विद्यालयाचे कांहीं शिक्षक आणि विद्यार्थी

हि आचार्यांकडे यावयाचे. मारवाडी विद्यालयाचे एक शिक्षक या आश्रमाविरुद्ध असत. ते तेथल्या बोर्डिंगचे व्यवस्थापक होते. त्यांना वाटे हा अहिंसातत्त्वाचा आश्रम म्हणजे भागुबाई बनविण्याला कारण होणार. याने काय राष्ट्राचा उद्धार व्हावयाया आहे! अहिंसा परमोधर्मः हे बुद्धाचें तत्त्व. हिंदूंचें तत्त्व अहिंसा परमो अधर्म :— असा अनेक प्रकारें त्याचा विरोध होता. वास्तविक अनेक माणसांचीं मतें हीं खरीं मतें च नसतात. जशी वृत्ति असते तसें मनुष्य बोलतो. मतें ज्यांना आहेत असें मानता यईल असे प्रज्ञावंत विचारी पुरुष थोडे. विद्यार्थी आचार्यांकडे जातात म्हणून हे शिक्षक रागवत असत. तेथें जाऊं नये असें सरळ तर म्हणतां येत नसे त्यामुळें अशा विद्यार्थ्यांना बोर्डिंगमध्यें कडक तऱ्हेनें वागविण्यांत येई. आपल्या मताचा प्रसार असा जबरदस्तीनें येनकेनप्रकारेण करण्याकडे च अज्ञ लोकांचा कल असतो. त्यांचीं तीं मतें हि नसतात. त्यांना कोणतीं च मतें नसतात. विकारवशता ज्यांची गेलीं नाहीं त्यांना मतें कोठली? आणि त्यांचा प्रचार हा हि प्रचार नसतो. तो विकारवशतेचा प्रचार होतो. त्याप्रमाणें बिचारा तो शिक्षक आपल्या ताब्यांतल्या मुलांना जबरदस्तीनें आपली मतें ग्रहण करविण्याच्या खटपटींत असे. परंतु

**कीं तोडिला तरु फुटे आणखी भरानें ।**

या न्यायानें मुलें सर्व त्रास सहन करून हि आचार्यांकडे अधिक जिज्ञासेनें येत असत. आईबापांशीं झगडून, बंड करून कित्येक जण आश्रमांत दाखल झाले होते. ‘मायबापे केवळ काशी’ हा सिद्धान्त मानून हि

**जेणें घडे नारायणीं अंतराय । हो का बापमाय त्यजावी ते ॥**

असल्या वळणाचे बाळकडू च जेथें मिळालें होतें. त्याच्यापाशीं येणाऱ्या मुलांत त्याचा अंश उतरून तीं सर्व त्रास सहन करून हि आचार्यांकडें तत्परतेनें येत यांत नवल काय? रामकृष्ण परमहंसांच्याकडे येणाऱ्या मुलांना कित्येक आईबाप असाच धाकटपटशा दाखवीत. तुकाराममहाराजांच्याकडे सुद्धां मुलांचा मेळावा जमे. त्या मुलांना हि आईबाप असें च दटावीत. कारण त्यांना आपली चिंता पडे. जो तो स्वतःचे च पाहतो. मतप्रचार तरी कां करावयाचा तें मत ‘माझे’ म्हणून. ते सत्य म्हणून नव्हे. पोरें महाराजांच्या नादीं लागली तर आईबापांना काय चिंता पडे तें तुकाराममहाराजांनी स्वतःच सांगितले आहे.

**मायबाप करिती चिंता । पोर नाईके सांगतां ।**
**नको जाऊं देऊळासी । नेतो बागुल लोकांसी ॥**
**ऐशांच्या संगती । हातीं पडलीं नेणों किती ।**
**कर्णद्वारे पुराणिक । भुलवी शब्दें लावी भीक ॥**
**आम्हां कैचा मग । करिसि उघडियांचा संग ।**
**तुका म्हणे जाणे नरका । त्यांचा उपदेश आईका ॥**

या अभंगांवर महाराष्ट्र धर्मांत आचार्यांनी विवेचन केले आहे. (संतांचा प्रसाद १३) संभव आहे अशा प्रसंगावरूनच कदाचित् आचार्यांच्या त्या लेखाची उत्पत्ति असेल! पण प्रसंगाचें महत्त्व नाहीं. तत्त्वाचें महत्त्व आहे.

सामान्य लोकांची—स्वार्थी आईबापांची आश्रमासंबंधीं आणि आचार्यांच्या संगतीसंबंधीं असलीं मतें असत यांत विशेष कांहीं नाहीं. पण आश्रमांतल्या शेजारी राहणारे, आश्रमांत नेहमीं आचार्यांकडे येणारे,

अनुक्रमणिका

आपलीं मुले हि आश्रमांत ठेवणाऱ्या जाजूसाहेबांच्यासारख्या विचारी लोकांना हि आश्रमांत राहणारी मुलें एक तर कबीर-चैतन्याप्रमाणें उच्च दर्जाचे संत बनतील, नाहीं तर अगदीं च कमकुवत, टाकाऊ, व्यवहारज्ञान नाहीं, धड संसार हि चालवता येत नाहीं अशीं निपजतील असें वाटें. कित्येकांना वाटे लहान मुलांना परमार्थज्ञान काय उपयोगी? त्यांना गीता, शांकरभाष्य हें काय पचणार? पण आचार्यांचें मत त्याच्या अगदी उलट असें. या बाबतींत लहान तो च मोठा आणि मोठा तो च लहान अशी यांची अनुभवसिद्ध खात्री होती. त्या संबंधी महाराष्ट्र धर्ममध्यें आचार्याचें एक प्रवचन हि आलें आहे. जाजूसाहेबांच्या कल्पनेंत कांहीं च तथ्य नसें असें नाहीं. कारण आश्रम ही प्रयोगशाळा असे. येथें एक तर अपूर्व शोध लागावयाचा किंवा कांहींच निष्पत्ति व्हावयाची नाहीं. पण धड संसार हि चालविता यायचा नाहीं, नेभळट, कमकुवत, टाकाऊ, अशी मुलांची स्थिति कदाचित् व्हावयाची या कल्पना बरोबर नव्हत्या. कारण आश्रमातल्या शिक्षणपद्धतीचा पाया च शरीर-परिश्रम हा होता. ज्याच्याजवळ श्रमशक्ति आली तो नेभळट कसा बनेल? त्याला आजिविकेची चिंता कशी राहील? कारण ज्याला ही मजुरीची शक्ती आली तो कोठें ही चार कामें करून आपले जीवन चालवील. त्याला फिकीर कशाची? उलट ज्याच्याजवळ शरीरपरिश्रम-शक्ती नाहीं आणि भाराभर सर्टिफिकीटें मात्र आहेत, तो वाटेल तेथें जाऊन आपलें जीवन चालवूं शकणार नाही. खेड्यांत गेला तर तो काय करील? तेथें शेतांत तो खणोल कां बागेला पाणी देईल? तो तेथें हतबुद्ध झाल्याखेरीज राहणार नाहीं. त्याचा दिमाख फक्त खुर्चीवर बसून टेबलावरचे कागद खरड्यापुरता. त्याला वाटेल तेथें जीवन चालविणें ही गोष्ट अशक्य. म्हणून च आपल्या मुलांना सर्व दुनिया ही आपली वाटावी, परकी वाटूं नये, प्रत्येक ठिकाणीं त्याला अन्न मिळावें म्हणून शरीरपरिश्रमाला ऋषींच्या आश्रमांत हि पहिलें स्थान असे

**स गुरुमेवाभिगच्छेत्समित्पाणिः श्रोत्रियं ब्रह्मनिष्ठम् ।**

गुरुकडे प्रथम जायचें तें समिधा घेऊन च जायचे. समिधा म्हणजे लाकडांचा प्रतिनिधि. दुरून जगलांतून लांकडे आणण्याची, मजूरी करण्याची, शरीरपरिश्रम करण्याची, सेवा करण्याची तयारी समिधांनीं दर्शित होते. ऋषींच्या आश्रमांत प्रथम पाणी भरणें, दळणें, लांकडें फोडणें असा साधा श्रम झाल्यानंतर विणकाम, सुतारी, लोहारी, असा कलात्मक शरीरपरिश्रम शिकावयाचा, त्यानंतर न्याय, व्याकरणादि बौद्धिक परिश्रम. त्याच्या हि पुढें चिंतन, मनन, ध्यान, योग, भक्ति, ज्ञान, इत्यादींमध्यें विद्यार्थी पुढें जावयाचा. आश्रमांतील या शिक्षणपद्धतीसंबंधीं आचार्यानें स्वतःच एका पत्रांत खुलासा केला आहे.

वर्धा :

दिनांक २५ ऑगस्ट १९३६.

श्री. ..............................परंतु शिक्षणामध्यें आजच्या घटकेला सार्थकतेपेक्षां साक्षरतेंकडे जें लक्ष दिलें आहे तें आत्मनाशक आहे. तुम्ही आपल्या भावाला एखादा समय (तास) शिकवितां तें योग्य आहे. आणि तेवढें बस आहे. किंबहुना स्वावलंबी उद्योगशक्ति पूर्ण विकसित होईपर्यंत अक्षर कोणाचें हि असो एखादा तासा पलीकडे जाऊं नये, असा माझा अभिप्राय आहे. माझ्या बहुतेक मुलांना आणि जीं मला महाबुद्धिवान् भासली त्यांना हि एखादा उद्योग पूर्ण हातांत असल्याशिवाय एखाद तासापेक्षां अधिक मीं कधींच शिकविलें नाहीं. ज्यांनीं स्वावलंबनोपयोगी एखादा उद्योग—कला हस्तगत केली आहे, ज्यांना नीतीचें वळण लागलें आहे, ज्यांच्या हातून २/४ वर्षें सेवा घडली आहे, अशांना च विशेष शिक्षणासाठीं मीं हातांत घेतलें आहे. केवळ निर्बुद्धाला धंदेशिक्षण द्यावें अशी माझी दृष्टि नाहीं. अल्प अथवा विशाल बुद्धीच्या सर्व च विद्यार्थ्यांना (१) संपूर्ण स्वावलंबनशक्ति, (२) नैतिक वळण, (३) सेवावृत्ति निर्माण होईपर्यंत एखाद

अनुक्रमणिका

तासा पलीकडे अक्षरशिक्षण देऊं च नये. त्यानंतर हवे असेल त्याला केवळ अक्षरशिक्षण नव्हे पण अक्षर द्वारा बौद्धिक शिक्षण भरपूर द्यावें अशी माझी पद्धति आहे. या पद्धतीमुळें भाराभर विद्यार्थ्यांवर केला जाणारा निरूपयोगी परिश्रम टळतो. कांहीं विद्यार्थ्यांचा आजीवन संबंध जडतो, राष्ट्राला स्वावलंबी सेवक लाभतो. आणि जिव्हाळ्याचा—ज्याला उपमा देतां येत नाहीं असा गुरु-शिष्य संबंध निर्माण होतो. कांहीं मुलें अथवा त्यांचे आईबाप ह्या प्रारंभिक चारदोन वर्षांच्या तपस्येला कंटाळतात आणि संगति सोडतात. पण ती मी इष्टापत्ति समजतों. ह्या माझ्या पद्धतीमुळें चार दोन मुलें निराश हि झालीं आहेत. पण एकंदरींत माझ्या श्रमाचा अपव्यय न होतां समर्थ साहायक आणि सेवक मला आणि राष्ट्राला पांचपंचवीस मिळाले आहेत. ह्या प्रत्यक्ष फलितांमुळें माझे हे शिक्षण विषयक विचार जे मुळांत च दीर्घचिंतनावर उभे राहिले आहेत ते प्रत्यक्षानें हि दृढ होतात.

—विनोबा.

शिक्षणाच्या या धोरणाप्रमाणें आचार्यांनी विणकामादि उद्योग आणि त्याचें संशोधन एकसारखें चालविलें होतें. सुतारी हि सुरूं करण्यांत आली. गोसेवेचा प्रयोग हि चालू झाला. हें सर्व शिक्षणाचें अपूर्व तंत्र पाहून एकदां शेजारच्या मारवाडी विद्यालयाच्या एका शिक्षकांनीं आचार्यांना विचारलें कीं, 'आश्रमांत कशा तऱ्हेचे विद्यार्थी तयार व्हावें अशी आपली अपेक्षा आहे?' आचार्यांनी गंभीरपणें उत्तर केलें—'ज्ञानेश्वर, रामदास, तुकाराम, कबीर, चैतन्य यापेक्षां खालच्या दर्जाचे विद्यार्थी तयार झाले तर मी माझा प्रयोग अयशस्वी समजेन.' आचार्यांची आश्रमाच्या प्रयोगाविषयीं इतकी उच्च दृष्टि होती. म्हणून च हजारों विद्यार्थ्यांना शिकवूं शकणारा, त्यांना आपल्या असामान्य विद्वत्तेनें वश करणारा हा पुरुष येथें केवळ १०/२० विद्यार्थ्यांवर प्रयोग करीत होता. त्या प्रयोगामध्यें संपूर्ण शास्त्रीय मूलग्राही दृष्टि होती. उदा. विणकामाचा प्रयोग कापसाच्या शेताशिवाय पूर्ण होत नाहीं म्हणून आचार्यांनी विद्यार्थ्यांसह शेतीचे प्रयोग आरंभले. मुळापासूनचें ज्ञान नसेल तर पुढचीं कार्यें बिघडतील. पाया मजबूत नाहीं मग इमारत वर कशी चढेल? मुळांत शुद्धि नसेल तर पुढें शुद्धि राहणार नाहीं. नदीं मुळांत शुद्ध असते म्हणून पुढें तिला मिळणारे अशुद्ध नाले वगैरे हि शुद्ध होऊन जातात. म्हणून कापसाच्या शेतीचे प्रयोग सुरू झाले. त्यांत शरीरपरिश्रमाचा हि प्रयोग होता च. स्वतः आचार्य या कामांत अग्रेसर असे. सकाळीं सूर्योदयापासून १२ वाजे पर्यंत काम चालें. लगे च जेवण झाल्यावर धान्य निवडण्याचें काम व्हावयाचें व पुन्हां शेतांत निंदण्याखुरपण्याचें काम आचार्य आपल्या विद्यार्थ्यांसह करी. तेथें गप्पागोष्टी मुळीं च चालावयाच्या नाहींत. तन्मयतेनें हें काम भराभर होत राहावयाचें तें थेट संध्याकाळीं सूर्य मावळेपर्यंत. कापूस-पेरणी, निंदणे, कापूस-वेचणी असलीं सर्व कामें आचार्यांनी आवडीनें केलीं. शिवाय तिळाची शेती, गव्हाची शेती हि आश्रमतर्फे करण्यांत आली. तेथें आळीपाळीनें आश्रमचे विद्यार्थी जात आणि पांखरें उडवून शेतराखणीचें काम करीत. माळ्यावर बसून पांखरें उडवतांना

**भक्तासाठीं तो जगजेठी बसुनी माळ्यावर ।**
**पांखरें उडवी सारंगधर ॥**

या तुकारामबोवांच्या अनुभवाचें स्मरण होई. तुकारामबोवा केवळ भजन गात आणि पांखरें मुळीच उडवीत नसत. भगवान् त्यांच्यासाठीं तीं पांखरें उडवी असा याचा अर्थ लोक करतात. तो बरोबर नाहीं. तुकारामबोवा इतक्या तन्मयतनें तें काम करीत कीं तो जणूं भगवान च करतो असें वाटावें. तुकारामबोवा तें शेतीचें काम भजन समजून च करीत

अनुक्रमणिका

**स्वकर्मणा तमभ्यर्च सिद्धिं विंदति मानवः ।**

या गीतेच्या कल्पनेप्रमाणें त्यांचें वागणें असे. त्यामुळें त्या शेतांत अतिशय पीक आलें. इतरांच्या पेक्षां जास्त पीक येण्याचें कारण तुकारामबोवांची दक्षता. भक्त अजागळ नसतो तो प्रत्येक काम इतरांच्यापेक्षां हि चोख आणि अतिशय व्यवस्थित तऱ्हेनें करतो. त्याला पाव आण्याची चूक हि खपत नाहीं. तेवढ्यासाठीं तो रात्र रात्र हि जागेल. जिवाचें रानपाणी करील. पण चूक होऊं देणार नाहीं.

**अनपेक्षः शुचिर्दक्षः उदासीनो गतव्यथः ।**

असें भक्ताचें वर्णन आहे. काम करण्यांत त्याला फलापेक्षां नसते. तो अत्यंत स्वच्छतनें दक्षतनें उच्च भूमिकेवर राहून कोणत्या हि तऱ्हेच्या कष्टाची पर्वा न करतां काम करील आणि तें इतकें सुंदर करील कीं त्याचें त्याला हि तें काम आपण केलें असें वाटणार नाहीं. मग तो भगवंताचे पाड मानील. त्याचा अहंकार यत्किंचित उरणार नाहीं. अशा केवळ समाधि स्थितींतलें तें त्याचें कर्म इतरांना हि भगवंताचें वाटावें यांत नवल नाहीं. नुसत्या कबीराच्या, तुकारामाच्या गोष्टी सांगून आणि त्यांचे अभंग म्हणवून काय तुकारामबोवांच्या शेतीचा आणि कबीराच्या शेल्याचा अनुभव येऊं शकेल? त्याचें आचार्यांकडून आश्रमीय विद्यार्थ्यांना प्रात्यक्षिक मिळत असे.

त्या प्रात्यक्षिकाच्या फळाचा एका आकस्मिक प्रसंगानें आश्रमवासीयांना विलक्षण तऱ्हेनें प्रत्यय आला एकदां आश्रमीय विद्यार्थ्यांनीं कोठला तरी प्रवास करावा अशी एक कल्पना निघाली. त्याप्रमाणें मध्यप्रांतांतील सिरोंच्याच्या प्रवासाला मंडळी निघाली. आचार्य त्यांत नव्हता च. या मंडळींत खामगांवहून आलेले आश्रमांतले मधुकर नांवाचे विद्यार्थि होते. सर्व मिळून ८/९ मंडळी असतील. वर्ध्याहून ही मंडळी बलारशाला गेली. तेथे वर्धा नदींत स्नान करण्यास मंडळी उतरली. ११-११॥ चा दुपारचा समय. मधुकर पोहणारे होते. ते आणि दुसरे एक आश्रमीय पोहण्यास पडले. थोडे पोहले. मधुकर पलीकडच्या काठापासून ५-१० हात च दूर होते. एकाएकीं बुडूं लागले. बुडण्याचें कांहीं कारण नव्हतें. ५/६ हातांत च ते कांठावर जाऊं शकत होते. जवळ च पोहणारे साथीदार आश्रमवासी हांक मारतां च मदतीला आले. त्यांनीं हात दिला. तरी कांहीं जमेना. मधुकर सारखे खालीं जाऊं लागले. मोठा कठिण प्रसंग होता! ज्यांनीं हात दिला ते आश्रमीय हि त्यांच्याबरोबर खालीं खालीं जाऊं लागले. शेंवटीं नाइलाज झालेला पाहून त्यांनीं मधुकरांस सांगितलें ‘मी तुम्हांस वांचवूं शकत नाहीं.’ हें शब्द ऐकतां च एका क्षणांत त्यांनीं त्या आश्रमीयाचा हात सोडून दिला आणि सरळ खालीं नदींत ते ओढले गेले. अनुमान आहे कीं त्यांना मगरानें ओढून नेलें असावें. पुष्कळ शोध केला. नदींत कोळी तपास करून आले. पण प्रेत मिळालें नाहीं. २/३ दिवसांनीं मैल दीड मैलावर बहुतेक भाग हाडाचा सांगाडा आणि बाकी नेसलेलें खादीचें धोतर असें प्रेत दिसलें. मगराने खाऊन टाकलें असावें. या घटनेनें आचार्यांना दुःख हि झालें आणि आनंद हि झाला. दुःख अशासाठीं कीं असा थोर सेवाभावी विद्यार्थी विनाकारण मृत्यूमुखीं पडला. आनंदाचें कारण उघड आहे. आचार्यांनी प्रार्थनेंत प्रवचन केलें त्या वेळीं सांगितलें कीं ‘मी वांचवूं शकत नाहीं’ असें म्हटल्याबरोबर बुडत्या माणसाने लगे च हात सोडून देणें हें केवढे विवेकाचें काम आहे! माझा हा विद्यार्थि अशा तऱ्हेनें विवेक न सोडतां निर्मोह होऊन मेला याबद्दल मीं आनंदानें नाचावें अशी ही गोष्ट आहे. शिवाय आश्रमांत आला असतां महाराष्ट्रधर्माचे हिशोब लिहिणें, पत्ते लिहिणें वगैरे काम त्यानें निष्ठेनें केलें. तसें च गाईंच्या सेवे चें काम हि त्यानें केलें. ज्ञानाची— अधिक विद्येची सुद्धां वांछा धरली नाहीं. सेवेत च सर्व समाधान मानलें. मरतांना परमावधिचा विवेक दाखविला आणि मेल्यावर हि त्याचा देह जलचराच्या सेवेंत त्याचें भक्ष्य म्हणून नष्ट झाला. केवळ खादीच्या

पंचानें च तो देह ओळखला गेला. ती खादी शेंवटपर्यंत चिटकून राहिली. “केवढें हें थोर उदाहरण!” आश्रमांत आल्याला हि फार काळ झाला नव्हता. तों च इतक्या उच्च कोटीला हा तरुण विद्यार्थि पोंचू शकला. ‘मुहूर्तं जलितं श्रेयः न च धूमायितं चिरं’—धुमसत राहण्यापेक्षां क्षणांत चमकून जाणें जास्त श्रेयस्कर होय. अशीं अल्पायुषी चरित्रें जगाला ज्ञात नसोत पण त्यांचें कौडकौतुक करणारे आचार्य तीं विसरणें शक्य नाहीं. या मृत्यूचा आचार्यांच्या चित्तावर खोल ठसा उमटला. कोणतें हि काम नसतांना केवळ प्रवास करण्यांत हि आश्रमवासीं या नात्यानें स्वच्छंद आहे आणि म्हणून ईश्वरानें या मृत्यूच्या द्वारें हा पाठ दिला असें आचार्यांनी मानलें. तेव्हांपासून काम नसतांना केवळ प्रवासाला जाण्याची कल्पना च आश्रमांत उद्‌भवूं शकली नाहीं. असा विद्यार्थि आचार्यांच्या शिक्षणाच्या अपेक्षिताप्रमाणे संत कोटीला पोंचला असता असें म्हणण्यांत कांहीं प्रमाद किंवा अतिशयोक्ति होईल असें कोणी हि म्हणणार नाहीं. अशा थोड्याश्या विद्यार्थ्यांवर आचार्यांची आध्यात्मिक शक्ति खर्च होत असे.

आचार्यांची शक्ति अशा विद्यार्थ्यांवर येथें खर्च होई त्याप्रमाणें स्वतः आचार्य हि नेहमीं चिंतन मननांत आणि अभ्यासांत मग्न असे. आचार्यांच्या ठिकाणीं मूळपासून विद्यार्थिवृत्ति आणि अभ्यासीवृत्ति जन्मजात मुरलेली असल्यामुळें न करतां हि आपणहून अभ्यास च व्हावा अशी आचार्यांची स्थिति असे. रामदासादिकांचा अभ्यास बडोद्यास झाला होता. उपनिषदें, ब्रह्मसूत्रें, वेद इत्यादींचा अभ्यास त्यानंतर झाला. या नवीन आश्रमांत तुकाराम, ज्ञानेश्वर आणि तुळशीदासादि संतांच्या अभ्यासांत आचार्य अगदीं लीन होऊन गेले. आपल्या गंधर्वाला हि लाजविणाऱ्या मधुरगंभीर आवाजानें आचार्य तुकोबांचे अभंग म्हणत एकसारखे आपल्या खोलींत फिरत राहात

**तुज ऐसा कोणी न दिसे उदार ।**
**अभयदानशूर पांडुरंगा ॥**
**विषयीं विसर पडिला निःशेष ।**
**आंगीं ब्रह्मरस साठवला ॥**
**उद्योगाची धांव बैसली आसनीं ।**
**पडलें नारायणीं मोटळें हें ॥**

असे अभंगाचे चरण ते च ते च म्हटलें जात. त्या खोलींत त्यांचा ध्वनि निनादत राही. त्या पवित्र आवाजानें सर्व वातावरण भरून राही. इतक्यांत डोळ्यांत अनावर अश्रुधारा वहात आहेत, सबंद चेहरा आरक्त झाला आहे, अभंग म्हणतां म्हणतां आवाज गद्‌गद होऊन गेला आहे, असें हि होऊन जावयाचें. अभंग म्हणावा, फेऱ्या घालाव्या, चित्त तन्मय व्हावें, आवाज गद्‌गद व्हावा, हृदय विरघळून जावें, चित्ताची निस्पंद अवस्था व्हावी, असा तो चमत्कारिक अभ्यास चाले. तुकारामबोवांच्या सर्व अवस्था जणूं काय जेथें प्रत्यक्ष मनःपटावर प्रतिबिंबित होऊन जात. रोमरोमांत तो अभ्यास स्फुरत राही. जगाचें भान नाहीं. हा पुरुष एकटाच्या एकटा त्या दिव्य अवस्थांच्या भिन्नभिन्न दालनांत विहार करतो आहे. भावसमुद्राच्या तरंगांमधून माशाप्रमाणें तरंगत जातो आहे असा देखावा नित्य दिसावयाचा. राजदरबारांत जसा एकेक जण येतो आणि राजाला मुजरा करून जातो त्याप्रमाणें ते अभंग एकेक आचार्यांकडे यावयाचे आणि संतांच्या अंतरंगाच्या अनेक खुणा निवेदन करून जावयाचे. ते अभंग अनेक अज्ञात प्रसंग, अनेक अज्ञात सिद्धांतांचा नजराणा पुढे ठेवावयाचे! संतांच्या हृदयसमुद्रांतलीं तीं सर्व रत्नें आपण होऊन आचार्यांपुढें प्रकट होऊन स्वतःला कृतार्थ मानीत. त्या संतवचनांतले सगळे भाव, सगळीं रहस्यें, सगळ्या खुब्या येथें आत्मसात होऊन जात आणि त्या

अनुक्रमणिका

त्या सर्व उच्च अवस्था येथे स्वतः सिद्धपणें अनुभवल्या जात. क्षेपक भाग कोणता, खोटे अभंग कोणते तें सर्व आचार्यांपुढें तेव्हांच उघड होई.

**भक्त ऐसे जाणा जे देहीं उदास ।**
**गेले आशापाश निवारुनी ॥**

हा अभंग छळकांना उद्देशून आहे, हा अमका अभंग अमक्या स्थितीचा आहे, तमक्याचा तमुक अर्थ आहे. अशीं कोणाला न कळलेलीं रहस्यें आचार्यांना सहज लीलेने कळत. आचार्यांच्या अभंगाच्या चाली हि निरनिराळ्या सहजस्फूर्तीच्या आणि अगदीं अपूर्व असत. शिवाय लहानपणीं ऐकलेल्या आईच्या अद्‌भुत चाली आचार्य आळवून आळवून ठसवून घेत. आईच्या त्या चालींत आईची मूर्ति अगदीं परिपूर्ण उतरलेली भासे. नादांत स्वरूप कोंदून गेलेंलें असतें. सर्व सृष्टि शब्दप्रभव च आहे.

**जेणें हा जीव दिला दान**
**तयाचें करित चिंतन**
**जगज्ञीवन नारायण**
**गाईन गुण तयाचे**
**जो हा भीवरेच्या तीरीं**
**कट धरुनियां करीं**
**जो हा गोपाळांच्या मेळीं**
**खेळु खेळे वनमाळी**
**जो हा लावण्यपुतळा**
**जयाचें नाम पाप नाशी**
**लक्षुमी ऐशी ज्याची दासी**
**सर्व-भावें त्यासी तुका शरण**

या अभंगाला आईची च चाल आचार्य लावीत.

**रंगा येई वो विठाई सांवळीये डोळसे ।**

या अभंगाला आईच्या कानडी पद्धतीची चाल लावल्याने केवढें भावांतर होऊन जाई!

**पैल आले हरी । शंखचक्र शोभे करी**
**गरुड येतो फडत्कारें । ना भी ना भी म्हणे त्वरे**
**मुकुट कुंडलाच्या दीप्ति । तेजें लोपला गभस्ति**
**मेघश्याम वर्ण हरी । मूर्ति डोळस साजिरी**
**चतुर्भुज वैजयंती । गळा माळ हे रुळती**
**पीतांबर झळके कैसा । उजळल्या दाही दिशा**
**तुका झालासे संतुष्ट । घरा आलें वैकुंठ पीठ**

अनुक्रमणिका

तुकारामबुवांच्या ह्या शेंवटच्या प्रसंगाच्या अभंगाला आईची चाल लावल्यानें एकदम तो प्रसंग प्रत्यक्ष डोळ्यासमोर येई आणि आचार्य त्यांत रंगून जाई

**म्हणसी होऊनि निश्चिंता । हरूनियां अवघी चिंता**
**मग जाऊं एकांता । भजन करूं**

या हि अभंगाची ती आईची चाल आणि तो अभंग म्हणत आचार्य कोठल्या तरी दूरच्या जगांत पार निघून जात. केवढा हा आईच्या चालींचा प्रभाव! आईच्या चालीं, संतांचीं वचनें आणि या महापुरुषाचीं तन्मयतेनें म्हणण्याची भावमय अवस्था म्हणजे ऐकणाऱ्याला केवळ आयती आनंदाची लूट च असे.

**मनुवा रामनाम-रस पीजे ।**
**ताज कुसंग सतसंग बैठ नित हरिचरचा सुनि लीजे ॥**
**काम-क्रोध-मद-मोह-लोभको चितसे बहाय कीजे ।**
**मीरा के प्रभु गिरिधर नागर ताहि के रंग में भीजे ॥**

या मीराबाईच्या पदाचा खरा अनुभव आयता यावयाचा. भक्तीच्या रंगांत रंगून कसें जावें हें सांगण्याची जरूर च उरावयाची नाहीं. आश्रमवासीयांप्रमाणें च महाराष्ट्र-धर्मातील 'संतांच्या प्रसादा'च्या आचार्यांच्या लेखमालेनें या आचार्यांच्या अभ्यासाची थोडीशी गोडी बाहेरच्या लोकांना हि मिळूं शकली. आचार्यांची ज्ञानेश्वरीच्या अभ्यासांत हि अशी च तल्लीन स्थिति होऊन गेली. ज्ञानेश्वरीसारखा ग्रंथ वाचावयास मिळणें आचार्य महाराष्ट्राचें भाग्य समजत. स्वतःला ज्ञानेश्वरी किती आवडते तर चुका दाखवावयाच्या त्या हि ज्ञानेश्वरींतल्या च दाखवतो असे त्याचे उद्‍गार आहेत. ज्ञानेश्वर गुरु, एकनाथ बापासारखे, नामदेव प्रेमळ दोस्त आणि तुकाराममहाराज हे आईसारखे अशी महाराष्ट्र-संतांविषयींची यथार्थ भावना आचार्यांनी लिहून ठेवली आहे. महाराष्ट्र-संतांप्रमाणें तुळसीदासजींच्या रामायणाचा आचार्यांचा उत्कृष्ट अभ्यास झाला. तुळसीरामायणावर आचार्यांनी महाराष्ट्रधर्मांत एक अप्रतिम लेख लिहिला. तुळसीरामायणाचे आचार्यांनें उत्तम तऱ्हेनें योग्य भाग हि पाडलेले होते. अनेकांनीं त्याप्रमाणें आपल्या तुळसीरामायणाच्या पुस्तकांत ते भाग उतरून घेतले. ज्ञानेश्वरीच्या हि अनेक मोठ्या दुरूस्त्या केलेली आचार्यांची ज्ञानेश्वरी पाहून पुष्कळांनीं आपल्या ज्ञानेश्वरींत त्याप्रमाणें फरक करून घेतला. आचार्यांच्या अशा प्रत्येक संताच्या पुस्तकावरच्या खुणा हि पुष्कळांना अभ्यास कसा करावा हें शिकवीत. या खुणा म्हणजे ज्या अभ्यासमार्गानें आचार्य गेलेत त्या मार्गावरचीं हीं चिन्हे च होत.

**गुरुपदरजमृदुमंजुल अंजन ।**
**नयनअमियदृगदोष विभंजन ॥**
**तेहि करि विमलविवेक विलोचन ।**
**बरनउं रामचरित भवमोचन ॥**

ज्या अभ्यासाच्या मार्गानें श्रेष्ठ पुरुषाचीं पाउलें पडलीं त्या मार्गांतले रजःकण हि अभ्यासाला मार्गदर्शक खुणा कां न व्हाव्यात? त्या खुणांच्या दर्शनानें दृष्टिवरचें अज्ञानपटल दूर होऊन जावें यांत आश्चर्य कसलें? 'स्वाध्याय प्रवचनाभ्यां न प्रमदितव्यं' ही श्रुतीचा आज्ञां आचार्यांच्या ठिकाणीं मूर्तिमंत अवतरलेली दिसे. आश्रमांत सकाळच्या प्रहरीं प्रार्थनेनंतर बहुधा कसला तरी वर्ग असावयाचा. कधीं नुसता उपनिषदाचा पाठ

घेतला जाई, कधीं गीता शिकविली जाई, कधीं भाष्य चालू आहे तर कधीं रामायण चाललें आहे, असा देखावा दिसे. आचार्यांच्या खोलींत गर्दी जमलेली च असावयाची. थंडीचा भयंकर कडाका असो कीं बाहेर पावसाची झड लागलेली असो, आचार्यांच्या वर्गावर त्याचा परिणाम होत नसे. वर्ग असे आश्रमीय विद्यार्थ्यांचा. पण यांत यावयाचे सर्व च. जो तो तेथें जाण्याला तत्पर असे, जमनालालजी, त्यांचे कुटुंब, जाजूजी, राष्ट्रीयशाळेचे शिक्षक सर्वजण तेथें येत. साध्या कंदिलाचा उजेड पडलेला आहे. आचार्य घोंगडीवर बसलेले आहेत, नाना प्रकारचें विवेचन चाललें आहे. मंडळी अवाक् होऊन तें ऐकत आहेत असें दिसावयाचें. प्रार्थनेंत हि वेळोवेळीं मार्गदर्शक प्रवचनें होत. त्यांतील कांहीं प्रवचनें महाराष्ट्र-धर्मांत आश्रमांतील प्रवचनें या सदराखालीं आलीं आहेत. आचार्यांचीं प्रवचनें नीटपणें कोणी उतरून घेतलीं नाहींत. कित्येकांनीं तीं प्रवचनें उतरून घेतलीं पण त्या वह्या हरवल्या आहेत.

उद्योग आणि सेवा, स्वाध्याय आणि प्रवचन, भक्ति आणि तपस्या या कक्षेंत आचार्यांचे जीवन सहजगतीनें चाललें होतें. त्याच्या भोवतीं आश्रमीय जीवन उपग्रहाप्रमाणें फिरत होतें. केवळ ईश्वरलाभाखेरीज कोणती हि अन्य वस्तु आचार्यांच्या डोळ्यासमोर नव्हती. 'अथातो ब्रह्मजिज्ञासा' म्हणून घर सोडलें त्या गोष्टीला आतां १२ वर्षें झालीं. १९२८ साल. त्या वेळीं आचार्यांची कांहीं मित्रमंडळी जमली होती. त्या वेळीं संध्याकाळच्या प्रार्थनेंत आचार्यांनी सांगितलें कीं, "या प्रसंगी

**प्रासादशिखरस्थोऽपि काको न गरुडायते ।**

या वचनाची मला आठवण होते. मी जरी येथें आश्रम चालवीत असलों तरी तो महिमा माझा नाहीं." आधीं तत्त्वज्ञानाची, वैराग्याची तीव्रता आचार्यांच्या ठिकाणीं प्रामुख्यानें दिसे. तें उग्रदर्शन होतें. हळू हळू साधनेंत पुढें जातां जातां चित्र विरघळून गेलें. आचार्य या नवीन आश्रमांत संतांच्या भक्तिप्रेमाच्या रसांत पूर्ण रंगून गेले. त्यामुळें

**पिकलिया सेंद कडूपणा गेलें ।**

अशी त्याची मधुर अवस्था प्रतीत होऊं लागली. त्यामुळें च स्वतःची व्याप्ति हि वाढत जाऊन, स्वतःची योग्यता किती हि असली तरी जगाशीं समरसून तो उद्गार काढतो.

**प्रासादशिखरस्थोऽपि काको न गरुडायते ।**

समोरच्या पेंगणाऱ्या श्रोत्यांकडे पाहून ते आत्मरूप समजून नरसी मेहता म्हणतो

**बापजी पाप में कवण कीधां हशे**
**नाम लेतां ताऊं निद्रा आवे**

तो च हा प्रकार. जितकी भूमिका उच्च होत जाते तितकी नजर व्यापक होते. त्यामुळें स्वतःच्या उंचीचें भान च शिल्लक उरत नाहीं. मनुष्यानें आयुष्यांत कर्में किती केलीं यावर त्याच्या श्रेष्ठतेचें माप अवलंबून नाहीं. त्याची अवस्था किती बदलली, त्याची भूमिका काय झाली, तो किती उच्चदशेला गेला यावर त्याची श्रेष्ठता अवलंबून आहे. भूमिका उच्च झाली कीं जगाची सेवा केली च. अशी खरी सेवा निर्देश करून दाखवितां येत

अनुक्रमणिका

नाहीं कारण ती कर्मात्मक नसून ती भावात्मक असते. या शिल्पकारानें अमुक इतके इतके पुतळे तयार केले, त्या चितार्‍यानें इतकीं चित्रें काढलीं असा हिशेब देऊन त्या श्रेष्ठ पुरुषाची सेवा दाखवितां येत नाहीं. अशी सांतसेवा त्याची नसते. त्याची सेवा कशी होते, केव्हां होते, किती होते हें सांगता च येत नाहीं. ती बहुधा जगाला कळत हि नाहीं. बापूंच्या हिंदु-मुसलमानांच्या तेढीबद्दलच्या सुप्रसिद्ध दिल्लीच्या २१ दिवसांच्या उपवासाच्या वेळीं आचार्य तेथें बोलावल्यावरून गेले होते. त्या वेळीं प्रार्थनेंत बापूजी उपनिषदें म्हणण्यास सांगत. तेथें दुसरें कोणतें हि कर्म केलें नव्हतें. पण उपनिषदें म्हणतांना होणारी तन्मयता, अत्युच्च भूमिकेमुळें त्या शब्दांच्या द्वारें प्रकट होणारा भाव यांनीं तेथल्या मोठमोठ्या पुढार्‍यांचें हि लक्ष वेधलें. पंडित मालवियांनीं स्वतः आचार्यांचा परिचय करून घेतला. आचार्यंचें शरीर कृश होतें. त्यामुळें अमुक इतकें दूध, लोणी असा आहार त्यांनीं सुचविला. पंडितजींना आचार्यांची उपनिषदें ऐकून अपार आनंद झाला. ही जी थोर सेवा ती जगाला कशी कळणार? संतांना संतोषविण्यापलीकडे सेवा ती काय राहिली? वास्तविक उपनिषदें म्हणणें ही कांहीं सेवा नव्हें. उपनिषदें कोणी हि म्हणतो. पण त्यांत आणि या म्हणण्यांत केवढें अंतर! आणि तें अंतर शब्दांनी सांगणार तरी कसें? एकच वाक्य अमुक मनुष्यानें उच्चारलें कीं कांहीं च वाटूं नये. आणि अमुक मनुष्यानें उच्चारलें कीं तें थेट हृदयांशीं भिडावें याचें कारण त्या शब्दाच्या उच्चारकाची भूमिका. या भूमिकेच्या असामान्यत्वामुळें च आचार्य स्वतः जो अभ्यास करीत, विद्यार्थ्यांना शिकवीत किंवा जमनालालजीसारख्यांशीं संभाषण करीत जो जो उद्योग करीत अथवा विनोदात्मक सहज बोलणें बोलीत अथवा सहज येतां जातां जे अभंग म्हणत त्या सर्वांत जगाची नकळत असामान्य सेवा होत होती. कारण आचार्यांची भूमिका एकसारखी वर वर चालली होती.

ती वर वर जातां जातां इतकी परमोच्च झाली होती, त्याची बुद्धि इतकी सूक्ष्मदर्शी होऊन गेली होती आणि त्याचें हृदय इतकें भावमय आणि परिशुद्ध होतें कीं त्याच्या दृष्टिपथांत आला नाहीं असा खर्‍या सेवेचा विचार च राहिला नाहीं. राष्ट्रसेवेसाठीं, राष्ट्रीय उपासनेसाठीं त्यानें तकलीचे प्रयोग केले. त्यांत असामान्य यश मिळालें. त्याप्रमाणें प्रथम ती उपासना आश्रमांत बद्धमूल होण्यासाठीं १२ वाजतां दुपारीं सर्वांनीं मौनपूर्वक आश्रमांत तकली उपासनेला बसावें असा उपक्रम सुरू करण्यांत आला. अशी आश्रमीयांची रोज ही मौनपूर्वक अर्धा तास कर्ममय उपासना चाले. आचार्यांची या उपासनेंत तुकारामाची विठोबा वर जेवढी श्रद्धा असे त्यापेक्षां रतीभर हि कमी श्रद्धा नव्हती. या श्रद्धेचा, या भक्तीचा, आंत केवढा परिपोष होत आहे याचें एकदां सर्वांना प्रत्यंतर आलें. रामनवमीचा प्रसंग होता. आश्रमीयानीं आजूबाजूच्या मंडळींनीं रामनवमीनिमित्त मौनपूर्वक तकली उपासना करावी व आचार्यांच्या तोंडचे चार शब्द ऐकावे असा कार्यक्रम आश्रमीयांनीं योजला होता. आचार्यांकडून अशा विशिष्ट दिवसांसाठीं कार्यक्रम कधीं च सुचविला जात नसे. पण कोणी तसा कार्यक्रम रचल्यास आचार्य त्याला प्रतिकूल नसत—त्या वेळीं विणकामाच्या त्या बराकीसारख्या लांब च लांब इमारतींत सर्व जण जमले. मौन राखून एका मागून एक तकल्या चालविल्या जाऊं लागल्या. तो उपासनेचा मोठा भव्य देखावा पाहून, त्या उपासनेच्या द्वारें आचार्यांना साक्षात् ईश्वराचें दर्शन झाल्यासारखें झालें. चेहरा लालबुंद होऊन गेला. भावाचा उद्रेक आवरेनासा झाला. डोळ्यांतून अश्रुधारा वाहूं लागल्या. भावसमाधीची च अवस्था ती! पण ती अनावर स्थिति आवरून आचार्यांनी त्या दिवशीं रामनाम हा शिक्का आहे आणि कृष्णोपदेश हा रोखा आहे अशा तर्‍हेनें थोडक्यांत विवेचन केलें होतें. राष्ट्रीय उपासनेप्रमाणें च राष्ट्रीय शिक्षणाकडे हि आचार्यांचें लक्ष असे. आश्रमाजवळच्या मारवाडी विद्यालयांत आश्रमीय मंडळींपैकीं एकाला त्यानें शिक्षक म्हणून पाठवून दिलें. तेंथें ते पुढें मुख्यशिक्षक झाले. त्यानंतर ते सबंध विद्यालय आचार्यांच्या धोरणाप्रमाणें चालविण्याचें ठरून आश्रमीयांपैकीं मोठी मंडळी तेथें शिक्षक झाली. शिवाय जेथें जेथें राष्ट्रीय शाळा होत्या—तुमसर, नागपूर, खामगांव, अकोला—प्रत्येक ठिकाणीं आचार्यांचें लक्ष असे. तुमसरला त्यानें मानेकर नांवाचे शिक्षक पाठविले होते. खामगांवच्या राष्ट्रीय

विद्यालयांत भांडणतंटे झाले तेव्हां जमनालालजींसह आचार्य तेथें गेले होते. खामगांवचे एक शिक्षक तर येथें येऊन कायमचे आश्रमवासी झाले होते. राष्ट्रीय शिक्षण परिषदेसाठीं आचार्य नागपूरला गेले होते. तेथें त्याचा अद्वितीय प्रभाव पडला. राष्ट्रीय शिक्षणाप्रमाणें, राष्ट्राची जी खेड्यांतली खरी जनता आहे तिच्या सेवेचा प्रयोग हि हा आश्रम सुरू झाल्यापासून च आचार्यांनी सुरू केला. अकोला जेलमध्यें असतांना च श्री. नर्मदाप्रसाद अवस्थी नांवाच्या बालाघाटकडच्या हिंदी गृहस्थांची ओळख झाली होती. त्यांनीं आचार्यांच्या धोरणाप्रमाणें वर्धा तालुक्यांतील खेडे गांवांत सेवा करण्याचें ठरविलें होतें. त्याप्रमाणें तें गृहस्थ आणि द्वारकानाथजी हरकरे या दोघांना अनुक्रमें रोहिणी आणि नागझरी या खेड्यांत काम करण्यासाठीं आचार्यांनी पाठविलें. तत्पूर्वी आचार्यांनी कार्यक्षेत्राचें अवलोकन करण्यासाठीं राधाकिसन आणि शिवाजी या दोघांस खेड्यांत फिरण्यासाठीं पाठविलें होतें. आचार्य मधून मधून रोहिणी आणि नागझरीला जाऊन अवलोकन करीत आणि तें अवलोकन व तदनुसार सूचना महाराष्ट्र-धर्मांत मांडीत. पुढें तर आचार्यांनी बहुतेक आश्रमवासियांना वर्धा तालुक्यांतल्या एकूण एक गांवांत फिरण्याचें काम दिलें. अशा प्रकारें सर्व च खेड्यांत आश्रमाच्या सेवेचें लोण पोंचलें. यानंतर आश्रमातर्फे खेड्यांत मोठमोठ्या चळवळी सुरू झाल्या. सत्याग्रहाची १९३० सालची लाट तर सर्वत्र च होती. परंतु तत्पूर्वी हरिजनांसाठीं मंदिरें व विहिरी उघडण्याची चळवळ, शिंदीच्या झाडांतून दारू काढून लोक पितात म्हणून खेड्यांतली शिंदीचीं झाडें तोडण्याची चळवळ, सत्याग्रहाची चळवळ, जिकडे तिकडे खेड्यांत आश्रमकेंद्रे काढण्याची चळवळ, अशा चळवळीला पूर आला. कॉलऱ्याची साथ आली कांहीं उपाय करा, अशा उपाय योजना आचार्यांच्या सल्ल्यानें एकामागून एक अनेक प्रकारें होऊं लागल्या. खेड्यांत पूर्ण प्रवेश झाला. राजकारणांत हि आचार्यांनी भाग घ्यावा अशी जमनालालजींची इच्छा असे. परंतु आपला मुख्य प्रयोग सोडून आचार्य केवळ बोलक्या राजकारणांत कधीं च पडले नाहींत. परंतु नागपूर, हिंगणघाट, काटोल अशा ठिकाणी प्रसंगानुसार व्याख्यानाला हरिजनपरिषदेसारख्या कामाला ते जात. एकदां जमनालालजी दासबाबूंच्या भेटीसाठीं उमरावतीला घेऊन गेले होते. निवडणुकीच्या भांडणासाठीं बॅ. सेनगुप्त आले तेथें हि आचार्य गेले होते. मगनलालभाई गांधी एकदां आचार्यांना शेतकीप्रदर्शनार्थ पुण्यास घेऊन गेले होते. 'साहेबाची कोंबडी' हा तत्संबंधी आचार्यांचा महाराष्ट्र धर्मांत लेख आलेला आहे. आचार्यांनी आपला धाकटा भाऊ राजगोपालाचारींच्या सेवेंत १॥ वर्ष ठेवला होता. पंडित मालवीय वायकम सत्याग्रहाचें निरीक्षण करण्यास जाणार होते पण ते जाऊं शकले नाहींत म्हणून बापूजींनीं आचार्यांना तिकडे पाठविलें होतें. तेथें आचार्यांनी प्रथम च इंग्रजी भाषण केलें. त्याचा गोषवारा ॲनी बेझंटबाईच्या न्यू इंडिया वगैरे पत्रांतून आलेला होता. खरोखर जो विषयनिवृत्त होऊन ब्रह्मचारी राहिला त्यानें स्त्रीजातीची सर्वोत्तम सेवा केली. मातृभावपरिपोषाखेरीज स्त्रीजातीची उत्तम सेवा दाखवितांच येणार नाहीं. तथापि आचार्यांच्या उच्च भूमिकेप्रमाणें त्याला अनुरूप अशां सेवाक्षेत्रें, त्याला अनुरूप अशीं साधनें आणि माणसें आचार्यांकडे येत गेलीं. त्याप्रमाणें आधीं कन्याशाळा येथें निघून पुढें त्यांत साबरमतीच्या मुली दाखल झाल्या आणि कन्याश्रमाचें विशाल स्वरूप त्या मूळच्या लहानशा शाळेला आलें. व आचार्यांच्या सेवाकार्यांत या हि स्त्रीसेवेच्या अंगाचा अंतर्भाव झाला.

या नवीन आश्रमांत १९२४ ते जवळ जवळ १९३४ पर्यंत १० वर्षांचा काल गेला. या दहा वर्षांत जगांत—जगाचें कशाला—हिंदुस्थानांत केवढालीं स्थित्यंतरें झालीं! आणि जगाच्या स्थित्यंतराच्या मानानें आचार्य किती तरी पुढें गेले! त्यानें त्या अवधींत काय काय केलें, आश्रमामध्यें कोणकोणत्या घटना झाल्या, त्याच्या मनोविकासाची कसकशी परिणति होत गेली, त्यानें नवीन कोणकोणतीं माणसें जोडलीं, त्याच्या सेवाकार्याचा व्याप कसकसा वाढत गेला,

अनुक्रमणिका

हें दृश्य कसें रंगत गेलें हें सांगण्याची शक्ति आणि पात्रता कोठून आणावी? त्याचें संगतवार विवेचन कोण करील? वस्तुतः आचार्यांच्या स्थायी आश्रम चालविण्याचा हा च सर्वांत मोठा काल होता. साबरमतीच्या आश्रमाचें मूळ बीज. जमनालालजींच्या बगीच्यांत त्याला नवीन एक पान फुटलें त्याचें दुसरें पान म्हणजे घासबंगल्यांतलें वास्तव्य. या नवीन आश्रमांतलें वास्तव्य हें या आश्रमरूप सेवावृक्षाचें मोठें मजबूत खोड बनले. येथून पुढें नाना कार्यांच्या भिन्न भिन्न शाखा फुटत राहून हा सेवावृक्ष एकसारखा फोंफावत गेला. आचार्यांचें जीवन हा त्याचा प्राण होता. या नवीन आश्रमांतल्या सामान्य गोष्टी याच कारणामुळें महत्त्वाच्या आणि चिंतनीय ठराव्या यांत आश्चर्य नाहीं. येथें नवीन इमारतींचा अनुभव आला, येथें घासबंगल्याप्रमाणें आजार विशेष नसे, तरी आचार्यांच्या बंधूंच्या दीर्घकालीन आजारामुळें सेवाशुश्रूषेचा लाभ मिळाला. आचार्यांनी येथें अन्नशास्त्राचा अभ्यास केला. तोलून खाण्याला सुरुवात केली. घास बंगल्यांत कित्येक वेळां रात्रीं १२-१२-वाजेपर्यंत आचार्य बोलत राहात. येथें आचार्यांनी रात्रीच्या मौनाचा अपार लाभ आपल्या ठिकाणीं मुरवून टाकला. रात्री मौनाचा त्यानें नियमच घेतला. येथें तकली उपासना सुरू झाली. येथें शेतीचे प्रयोग केले. येथें गोरक्षणाचें सूतोवाच झालें. येथें जमनालालजी प्रभृति संतसज्ञनांचा परिचय वाढला. येथपासून च खेड्याचें काम सुरू झालें, राष्ट्रीय शाळेचा अनुभव येथें मिळाला. कन्या शाळा आणि कन्या श्रम येथेंच निघाला. खेड्याशीं परिचय वाढून खेड्यांत प्रवेश झाला. महात्माजी मधून मधून येऊं लागून त्यांचे शेंवटीं वर्धा हें च निवासस्थान झालें. येथें चर्खासंघांतली मंडळी शिक्षणार्थ येत, येथें असतांना च आचार्यांच्या वडिलांनीं चर्खासंघाला रंगकाम चांद्याला सहा महिने राहून शिकविलें, या आश्रमांत असतांनाच जमनालालजींचें पहिलें मंदिर हरिजनांसाठीं उघडें झालें. हरिजनांची चळवळ, शिंदीचीं झाडें तोडण्याची चळवळ, मंडळींचा उत्तरोत्तर अधिकाधिक जमाव या च आश्रमांत झाला. या च आश्रमांत निरनिराळ्या प्रसंगांमुळें उपवासादिकांचा अनुभव आला. महात्माजींचे सात दिवसांचे उपवास येथें च झाले. या च आश्रमांत असतां आश्रमीयांपैकीं कांहींच्या गार्हस्थ्य-जीवनाला सुरुवात झाली. या आश्रमांत आचार्य संतांशीं केवळ एकरूप झालेत. त्यांची कठोर वैराग्यवृत्ति फळीभूत होऊन तिचें भक्तीच्या परममधुर रसांत येथें च रूपांतर झालें. महाराष्ट्र-धर्म साप्ताहिकाचा पुष्कळसा भाग येथेंच लिहिला गेला. आचार्यांनी रात्रीं निजण्यापूर्वीं किंचित विचार येथें च टाचण्याला सुरुवात केली, त्या विचारांची विचारपोथी या च आश्रमांत तयार झाली. शेंवटीं गीताई लिहून आचार्यांनी सर्व जगाची मोठ्यांतली मोठी सेवा केली ती या च आश्रमांत बसून. गीताई ही आचार्यांची सर्वोत्कृष्ट कृति. भगवंतांची भगवद्‌गीता आबालसुबोध खरी. परंतु ती आतां संस्कृतमुळें दुर्बोध झाली. ती आचार्यांनी मराठींत लिहून केवढा उपकार केला! त्याची कल्पना फारच थोड्यांना येईल. परंतु आचार्यांना जर कशांत स्फूर्ति असेल तर या च धर्मप्रचार-कार्यांत. त्याचें उत्कृष्ट साधन या गीताईच्या रूपानें येथें त्यानें सहज एका निमित्तानें तयार केलें. या नवीन आश्रमांत दुसरें नवीन कांहीं न घडतें तरी केवळ या एका च कृतीनें या आश्रमाला दर्शनीयत्व येतें. मग जेथें महात्माजींसारख्यांना यावेसें वाटलें, जेथें या महापुरुषाची मूर्ति रात्रंदिवस वावरली, जेथें त्याचे विद्यार्थि त्याच्या भोवती एकनिष्ठपणें राहिले, जेथें नित्य नवीन पवित्र प्रयोगाचा उद्योग चालत गेला, जेथें अनेक थोर पुरुषांचे पाय लागले त्या स्थानाच्या दर्शनीयत्वाचें किती म्हणून वर्णन करावें? जरी आतां कालौघामध्यें तें स्थान, तो महापुरुष, त्याचें कार्यक्षेत्र यांचा फारस संबंध राहिला नाहीं तरी त्या स्थानाला आलेलें महत्त्व मात्र कायमचें च उरलें आहे. परिसाच्या संगतींत आलेलें सुवर्णत्व नष्ट होईल काय? महापुरुष एकेका स्थानाला स्पर्श करतो, त्याचें परिवर्तन करतो, लगे च पुन्हां दुसऱ्या स्थानाला पावन करण्यासाठीं पुढें जातो. येथें असें च झालें. प्रथम जमनालालजींच्या खासगी बगीच्यांत आश्रम होता. पुढें तें ठिकाण खासगी राहिलें नाहीं. जमनालालजींनीं ती सार्वजनिक संस्था केली. त्यानंतर घास बंगल्यांत आश्रम गेला. जेथें जमनालालजींनीं

आपलें निवासस्थान केलें. पण त्याचें हि शेंवटीं अतिथिशाळेंत रूपांतर झालें. यानंतर या नवीन आश्रमांत हा महापुरुष १० वर्षें राहिला. यानंतर हा आश्रम हि महिला मंडळाच्या सार्वजनिक संस्थेच्या हातांत दिला गेला. धन्य तो काळ आणि धन्य तें स्थळ! कालस्थलातीत अशा महापुरुषांच्या लीलाप्रसंगाचीं हीं स्मारकें जड खरीच पण त्यांच्या नुसत्या स्मरणानें हि भाविकांना तीं हें च सांगतात त्याला काय करणार? जर कोठें स्वर्ग असेल तर येथें च आहे! येथें च आहे!! येथें च आहे!!! भक्तांच्या संगतींनें त्यांना हि भक्त-सामर्थ्य यावें यांत नवल काय?

**तीर्थीकुर्वंति तीर्थाणि**
**सुकर्मीकुर्वंति कर्माणि**
**सत्शास्त्री कुर्वंति शास्त्राणि**

●●●

अनुक्रमणिका

# प्रकरण ३६ वें

# राष्ट्रीय-शाळा

**'जन्मना** जायते शूद्रः संस्कारात् द्विज उच्यते'—मनुष्य जन्मतः शूद्र आहे. संस्कारानें तो द्विज होतो. संस्कार म्हणजे विशिष्ट विधि नव्हत. तर संस्कार म्हणजे कायावाचामनावर होणारे दैवी संपत्तीचे परिणाम. मनुष्य वास्तविक जन्मतः च दैवी संपत्तीचे गुण घेऊन आलेला असतो. परंतु त्यावर जडतेचें आवरण असतें. तें काढून टाकणें हें संस्काराचें काम आहे. दगडामध्यें मूर्ति लपलेलीच असते. मूर्तिकार आपल्या कलेच्या संस्कारानें ती फक्त प्रकट करीत असतो. म्हणून शूद्र म्हणजे क्षुद्र नव्हे. शूद्र म्हणजे मूळ वस्तु. तिचा विशिष्ट विकास म्हणजे द्विजत्व होय. जन्म झाल्याबरोबर मनुष्य शूद्र असला तरी त्याच्या द्विजत्त्वाच्या संस्करणाला—त्याच्या दुसऱ्या जन्माच्या तयारीला—ताबडतोब सुरवात होते. गृहशिक्षणांत आई, बाप, भाऊ इत्यादींच्या कुटुंबशिक्षणांत द्विजत्वाची पूर्व तयारी करून दिली जाते. गुरुगृहीं मुलगा गेला कीं तेथें त्याचा जणूं नवीन जन्म झाला. तेथें कौटुंबिक वातावरण असतें परंतु कुटुंबांतलें सांसारिक म्हणजे च स्वार्थी वातावरण नाहींसें होतें. तेथें एकदम नवीन सृष्टीला आणि नवीन दृष्टीला सुरवात होते. ही नवीन सृष्टि ज्ञानात्मक असते आणि ही नवीन दृष्टि सेवेची असते. ज्या सेवेंसाठीं हें सर्व करावयाचें ती सेवा तरी कोणाची करावयाची? सेवा आजूबाजूच्या जगाची. या आजूबाजूच्या जगाची मर्यादा ही ज्याच्या त्याच्या कर्तृत्वाच्या विकासावर अवलंबून आहे. परंतु कांही तरी विशिष्ट मर्यादा हवी म्हणून राष्ट्रापर्यंत ही मर्यादा भिडवली जाते. राष्ट्र म्हणजे सेवेची मर्यादा. जशी प्रत्येकाला देहाची मर्यादा असते, देहाच्या मर्यादेंत राहून तो देशाची सेवा करतो त्याप्रमाणें देशाची विशिष्ट मर्यादा म्हणजे राष्ट्र. या मर्यादेंत राहून तो जगाची सेवा करील. राष्ट्राची सेवा हि तो अशा च गांवाच्या सेवेच्या मर्यादेंत करुं शकतो. गांवाची सेवा सुद्धा सेवेच्या कांहीं विशिष्ट प्रकाराच्या मर्यादेंत राहून तो करूं शकतो. मर्यादा कशी हि असो. ती व्यापक होवो कीं कमी व्यापक होवो, सेवेमध्यें मर्यादा असली तरी भेदभाव हा मुळीं च नाहीं. दोन माणसें बुडताहेत. मला फक्त एकाला च वांचविणें शक्य आहे. अशा स्थितींत मी माझ्याजवळ प्रथम जो असेल त्याला वाचवीन ही मर्यादा झाली. पण मी जर दोहोंपैकीं एक हिंदुस्थांनला आहे म्हणून त्याला वाचवूं पाहीन तर तो भेद झाला. म्हणजे मर्यादाभंग झाला. म्हणून गुरुकडे गेलेला प्रत्येक मुलगा हा जगाचा उत्तम सेवक होण्यासाठीं जातो. तो द्विज होतो, तो सेवा उत्तम करण्यासाठीं द्विज होतो. वास्तविक तो जगाची सेवा करण्यासाठीं च द्विज होतो. परंतु जगाच्या अफाट कल्पनेला मर्यादा घालण्यासाठीं म्हणजे राष्ट्रसेवेसाठीं तो द्विज होतो असें म्हणावयाचें. या दृष्टीनें गुरुचें शिक्षण हें राष्ट्रीय शिक्षण आणि गुरुचें शिक्षणस्थान ही राष्ट्रीय शाळा आपोआप च ठरते.

राष्ट्रीय शाळा आणि आश्रम यांत फरक इतका च कीं राष्ट्रीय शाळेंत सेवेची लायकी निर्माण करण्याकडे मुख्य लक्ष दिलें जावयाचें, मग तींतून निघणारा विद्यार्थि कोणी सेवेला सर्वस्वी वाहून घेवो कीं अल्पस्वल्प सेवा करो तो त्याचा प्रश्न राहील. पण सेवेला लागणारी दृष्टि आणि योग्यता त्याला राष्ट्रीय शाळेंत मिळालेली असेल. परंतु आश्रमांत सर्वस्वी सेवेला वाहिलेलीं च माणसें असावयाचीं. आश्रमांत जी कांहीं योग्यता आहे ती सेवेंत अर्पण करण्याकडे मुख्य कल. राष्ट्रीय शाळेंत योग्यता उत्पन्न करण्याकडे मुख्य कल. आश्रमांत शिक्षण मिळेल तें सहज पद्धतीनें मिळेल. राष्ट्रीय शाळेंत मुद्दाम शिक्षण-योजना ठरविलेली असेल. आश्रम ही व्यापक संस्था. राष्ट्रीय शाळा ही मर्यादित संस्था. आश्रमामध्यें मुख्यतः स्वप्रेरणेनें आलेलीं माणसें असावयाचीं. राष्ट्रीय संस्थेंत पालकप्रेरणेमुळें आलेलीं मुलें असावयाची.

आश्रमांत अनेक प्रयोग व्हावयाचे. राष्ट्रीय शाळेंत अनेक प्रयोगांना तितकासा वाव नाहीं. आश्रमांत श्रमाला मुख्य महत्त्व. राष्ट्रीय शाळेंत शिक्षणाला मुख्य महत्त्व. असा राष्ट्रीय शाळा आणि आश्रम यांत फरक असावयाचा.

परंतु फरक म्हणजे भेद नव्हे. किंवा विरुद्धपणा हि नव्हे. पाणी, बर्फ आणि वाफ यांत फरक असला तरी भिन्नता नाहीं. राष्ट्रीय शाळा या बर्फासारख्या. आश्रमासारख्या संस्था ह्या नद्यांप्रमाणें आणि काँग्रेससारख्या संस्था ह्या वाफेप्रमाणें समजल्या पाहिजेत. देशांत वर्षाकालीन समृद्धीचें वायुमंडल तयार करणें, हें काँग्रेससारख्या संस्थांचें काम. थंडपणानें जीवनांतील सेवेचें घनीभूत केंद्रीकरण करणें, हें राष्ट्रीय शाळांचे काम आणि नदीप्रमाणें सतत सेवामय जीवन वाहतें राखणें हें आश्रमाचें काम. एका बाजूल थंड बर्फ आणि दुसऱ्या बाजूला गरम वाफ यांच्यामध्यें पाणी जसें रहावयाचें त्याप्रमाणें काँग्रेससारख्या संस्थांच्या व्यापक चळवळींशीं जसा आश्रमाचा संबंध येई—झेंडा सत्याग्रहासारख्या विशिष्ट प्रसंगीं जसा आश्रम सेवेला धाऊन जाई त्याप्रमाणें दुसऱ्या बाजूला राष्ट्रीय शाळांशीं हि आश्रमाचा संबंध येणें ही अपरिहार्य गोष्ट होती. म्हणून च बापूजींनी हि साबरमतीला आश्रमाशेजारी राष्ट्रीय शाळा हि काढली होती.

त्याचप्रमाणें येथे हि वर्ध्याला स्वाभाविकरीत्या च आश्रमाबरोबर राष्ट्रीय शाळा निघणें अपरिहार्य होतें. वस्तूबरोबर छाया जशी रहावयाची च तशी आश्रमाबरोबर राष्ट्रीय शाळा ही स्वाभाविकपणे उत्पन्न व्हावयाची च आणि छाया जशी वस्तूच्या आकाराची असावयाची त्याप्रमाणें राष्ट्रीय शाळेचा पुष्कळसा आकार आश्रमजीवनाला मिळता असा च असावयाचा. आणि जसा माध्यान्हीं सूर्य आला म्हणजे वस्तूची छाया त्या वस्तूमध्ये च एकप्रकारें समावून जावयाची त्याप्रमाणें सत्याग्रहाश्रमाचें मुख्य तत्त्व, मुख्य प्रकाश जो सत्याग्रह त्याचा प्रकाश ज्या वेळीं तीव्र होऊन गेला—सत्याग्रहाची चळवळ प्रचंड प्रकाश टाकूं लागली त्या वेळीं राष्ट्रीय शाळा हि एक प्रकारें आश्रमांत समावून गेली.

सर्व च राष्ट्रीय शाळांना आश्रमाच्या सान्निध्यांत राहण्याचें भाग्य मिळणें कठिण. तथापि ज्याप्रमाणें चांगल्या ठिकाणाच्या सन्निधींत राष्ट्रीय शाळा असावी किंवा ज्याप्रमाणें चांगल्या गुरूच्या सान्निध्यांत राष्ट्रीय शाळेंतील मुलें असावींत त्याप्रमाणें आश्रमासारख्या आदर्श संस्थेच्या सांन्निध्यांत राष्ट्रीय शाळा असावी, असा नित्य-सिद्धांत करण्यास हरकत नाहीं. मोठ्या झाडाखालीं लहान झाड वाढत नाहीं, हा सिद्धान्त येथें लागू होत नाहीं. हा स्वार्थशास्त्रांतला सिद्धान्त आहे. परमार्थशास्त्रांतला सिद्धांत याच्या उलट आहे. थोरांच्या छत्रछायेंत च लहानाची वाढ व्हावयाची. मोठ्या झाडाखालीं लहान झाड वाढत नाहीं हा सिद्धांत जर लागू करावयाचा तर मोठ्या गुरूच्या हाताखालीं लहान विद्यार्थ्यांचें शिक्षण च व्हावयाचें नाहीं. असा अनवस्थाप्रसंग येईल. आई मोठी मूल लहान, गुरू मोठा विद्यार्थि लहान, पुढारी मोठा अनुयायी लहान, सिद्ध मोठा साधक लहान, देव मोठा भक्त लहान, अशी जोडी च मग बसावयाची नाहीं. म्हणून—

**करी मस्तक ठेंगणा । लागे संतांच्या चरणा**

ह्यांत तिळमात्र शंका नाहीं. 'नम्रत्वेनोन्नमंतः' नम्रत्वानें च येथें वाढ होईल.

या सर्व गोष्टींची कल्पना आचार्यांच्या सहवासामुळें, गांधीजींच्या सहवासामुळें जमनालालजींना होती. त्यांना शिक्षण-कार्याची आवड होती. स्वतः विशेष शिक्षण घेतलें नसलें तरी जगताच्या अनुभवाचें सहज-शिक्षण मिळालेंलें असल्यामुळें जमनालालजींनी जाजूजींच्या सहकार्यानें शिक्षणाचें कार्य १९१०

अनुक्रमणिका

पासूनच चालविलें होतें. त्या वेळीं त्यांचा आचार्यांशीं किंवा महात्माजींशीं संबंध आलेला नव्हता. त्यामुळें त्या शिक्षणाच्या आवडीला योग्य अशी दृष्टि प्राप्त झाली होती, असें म्हणतां येणार नाहीं. त्यांनीं त्या वेळीं मारवाडी समाजांतील शिक्षणविषयक औदासिन्य दूर करण्यासाठीं मारवाडी विद्यार्थिगृह काढलें व स्वतः त्याला २१ हजार रुपये दिले. पुढें त्यांनीं १९१२ मध्यें मारवाडी विद्यालय काढलें. १९२० ला मारवाडी विद्यालयाची प्रचंड इमारत, बोर्डिंग व शिक्षकांसाठीं घरें तयार झाली. त्यानंतर जमनालालजींचा महात्माजींशीं संबंध आला. वर्ध्याला आश्रमाची संस्थापना होऊन आचार्यांशीं जमनालालजींचा परिचय झाला. यापुढें मारवाडी विद्यालयांत शक्य तितकें राष्ट्रीय वातावरण ठेवण्यांत आलें. मुख्य अध्यापक दत्तोपंत मोहनी हे आश्रमांत आचार्यांकडें मधून मधून येऊं लागले. पुष्कळ वेळा दळण्याची दीक्षा घेण्यास हि ते येत. आचार्यांना हि आठवड्यांतून एक दिवस मारवाडी विद्यालयांतील विद्यार्थ्यांना बोध देण्यासाठीं ते घेऊन जात. असा परस्परपरिचय वाढत च होता. मारवाडी विद्यालयांतील विद्यार्थ्यांचा आश्रमीयांशीं परिचय करून देण्यासाठीं एकदां त्यांनीं सर्व आश्रमीयांस मारवाडी विद्यालयांत बोलावून नेलें होतें. होतां होतां आश्रमांतले एक गृहस्थ भास्करराव परांजपे मारवाडी विद्यालयांतले मुख्य शिक्षक झाले. अशा रीतीनें ते १ जुलै १९२४ ते ३० जून १९२५ पर्यंत सुमारें एक वर्ष शिक्षक होते. ते तिथले शिक्षक होते तरी आश्रमीय होते. आश्रमांत च राहात होते. त्यामुळें आचार्यांना विद्यालयाची कल्पना पूर्णपणें बसल्या जागीं च येत असे. परंतु जमनालालजींचें एवढ्यावर च समाधान नव्हतें. त्यांना या संस्थेंत आतां आमूलाग्र फरक करण्याची इच्छा होती. जसजशी राष्ट्राची वाढ होत होती, राष्ट्रांत अस्पृश्यता दूर करण्याची चळवळ बद्धमूल झाली तर येथें हि अस्पृश्यतेचा गंध नको, राष्ट्राला बापूजींनीं खादीचें आद्य महत्त्व सांगितलें तर येथें हि त्या उद्योगाला प्राधान्य यावें, राष्ट्रांत हिंदुमुसलमानांची एकी पाहिजे तर येथें हि त्याचें बाळकडू मिळावें, अशा प्रकारच्या त्यांच्या अनेक योग्य कल्पना मारवाडी विद्यालयांत दाखल होऊन त्या परिणत झालेल्या पहाव्या अशी त्यांची मनीषा होती. शिवाय येथें कॉलेजचें उच्च शिक्षण मिळण्याची सोय व्हावी अशी ते कल्पना करीत होते. तेवढ्यासाठीं प्रो. पुणतांबेकरांना त्यांनीं बोलावलें. आप्पासाहेब पटवर्धन व साबरमतीच्या आश्रमांतील राष्ट्रीय शाळेंत अध्यापनाचें काम करणारें कृष्णराव उर्फ नाना कुळकर्णी यांस हि जमनालालजींनीं आमंत्रण दिलें. एकदोन दिवस आचार्यांसमोर चर्चा झाली. कॉलेजचें जमत नाहीं, असें दिसून आलें. अप्पासाहेब पटवर्धन व पुणतांबेकर परत गेलें. परंतु नाना कुळकर्णी यांना जमनालालजींनी शाळेसाठीं ठेऊन घेतलें. व ते १ जुलै १९२५ ते ३० नोव्हेंबर १९२५ पर्यंत मुख्याध्यापक राहिले. जमनालालजींनी आतां हळूं हळूं शाळेंत परिवर्तन करण्याचें नक्की ठरवलें होतें. ते आचार्यांचा या बाबतींत सल्ला घेत आणि त्याचें च मुख्य बळ समजत. ११ मे १९२५ च्या महाराष्ट्र धर्माच्या अंकांत "मारवाडी विद्यालय, वर्धा—मध्यप्रांत" या मथळ्याखालीं परांजप्यांनीं लिहिलेला लेख हा राष्ट्रीय शाळेच्या पूर्वतयारीचा सूचक च होता. त्यानंतर खुद्द आचार्यांनी 'राष्ट्रीय छात्रालय' (२० जुलै १९२५) व (२७ जुलै १९२५) येथील मारवाडी विद्यालय असे दोन लेख महाराष्ट्र-धर्मांत लिहिले. ते राष्ट्रीय शाळेच्या उदयापूर्वींच्या उषःकालासारखें च होतें. शेंवटीं ३ नोव्हेंबर १९२५ ला मारवाडी-शिक्षा मंडळांचें एक अधिवेशन होऊन त्यांत मारवाडी विद्यालय आणि विद्यार्थीगृह यांच्या इमारती व विद्यालयाच्या संचालनाचा अधिकार ६ वर्षांसाठीं पूर्णपणें जमनालालजींच्या हातीं देण्यांत आला. जमनालालजींनीं आतां आश्रमांतील आचार्यांच्या सहकाऱ्यांची शिक्षक म्हणून मागणी केली. राष्ट्रीय-विद्या-मंदिर असें या नवीन शाळेचें नांव ठेवण्यांत आलें. या शाळेचे मुख्यअध्यापक नाना कुळकर्णी हे च झाले. त्यांनीं महाराष्ट्र-धर्मांत त्याप्रमाणें २२ जून १९२६ ला राष्ट्रीय-विद्या-मंदिर-वर्धा हा लेख लिहून या नवीन शिक्षणाची रूपरेखा जाहीर केली. श्री. धोत्रे, मोघे, द्वारकानाथजी हरकारे, परांजपे, वाळुंजकर हि आश्रमीय मंडळी या शाळेंत शिक्षक झालीं. त्याशिवाय पूर्वींच्या मारवाडी विद्यालयांतील विद्यार्थिगृहाचे व्यवस्थापक श्री. जोशी, खानदेशातून नवीन च आलेले श्री. थत्ते व एक हिंदी गृहस्थ अशी मंडळी या नवीन शाळेंत काम करूं लागली. त्याबरोबर शिक्षणविषयक विचारप्रदर्शनाचें हि काम महाराष्ट्र-

धर्मांत लेख लिहून करण्याला सुरुवात केली गेली. नाना कुळकर्णी यांनीं पांच, धोत्रे यांनीं तीन आणि द्वारकानाथजी हरकारे यांनीं एक लेख त्या वेळीं लिहिला होता. आचार्यांचे लेख तर येत च होते.

जमनालालजींच्या या नवीन राष्ट्रीय-विद्या-मंदिरासंबंधीं मारवाडी समाजांत मुळीं च प्रेम नव्हतें. उलट जमनालालजी स्पृश्यास्पृश्यभेद मानीत नाहींत म्हणून त्यांच्यावर बहिष्कार असे. त्यामुळें मारवाडी विद्यालयाचें वरिष्ठ चालकमंडळ जें मारवाडी-विद्या-मंडळ त्यानें गांवांत अलग शाळा चालविण्याची व्यवस्था केली. पुढें एवढें मोठें विद्यालय आणि त्याचे विद्यार्थि-वसति-गृह यांची राष्ट्रीय-विद्या-मंदिराला आवश्यकता नाहीं असें आढळून आल्यावर मारवाडी शिक्षण मंडळाला हीं स्थानें परत देण्यांत आलीं. आणि जवळ जवळ शिक्षकांच्या घरीं च हें राष्ट्रीय-विद्या-मंदिर चालू लागलें.

आणि ही गोष्ट आचार्यांच्या राष्ट्रीय-शाळेसंबंधींच्या सिद्धांताला सर्वस्वी अनुरूप अशी च स्वाभाविकपणें घडून आली. आचार्यांचा सिद्धांत त्यानें "कौटुंबिक शाळा" या त्या वेळच्या महाराष्ट्र-धर्मांतील लेखांत मांडलेला आहे. "विचाराची प्रत्यक्ष जीवनापासून फारकत झाल्यानें विचार निर्जीव बनतो. आणि जीवन विचारशून्य बनतें. मनुष्य घरांत जगतो आणि शाळेंत विचार शिकतो त्यामुळें जीवन आणि विचार ह्यांचा मेळ बसत नाहीं. ह्याला उपाय म्हणजे एका बाजूनें घरांत शाळा शिरली पाहिजे आणि दुसऱ्या बाजूनें शाळेंत घर घुसलें पाहिजे. समाजशास्त्रानें शालीन कुटुंबें निर्माण केली पाहिजेत आणि शिक्षणशास्त्रानें कौटुंबिक शाळा स्थापन केल्या पाहिजत. छात्रालय किंवा शिक्षकाचें घर हा शिक्षणाचा पाया समजून त्यावर शिक्षणाची इमारत रचणारी शाळा म्हणजे कौटुंबिक शाळा."—या आचार्यांच्या सिद्धांताप्रमाणें राष्ट्रीय शाळेंतल्या सर्व शिक्षकांचीं घरें शालीन कुटुंबें होतीं अशांतला भाग नाहीं. शालीन कुटुंबें कोठून असणार? पारतंत्र्यांतली कुटुंबें एकदम शालीन कुटुंबें कशीं व्हावीं?

वास्तविक हा शिक्षक आणि विद्यार्थ्यांचा मिळून एकत्र प्रयोग होता. येथें शिक्षकांना हि शिक्षण घ्यावयाचें होतें आणि विद्यार्थ्यांना हि शिक्षण घ्यावयाचें होतें. विद्यार्थी हा एका अर्थानें शिक्षक आणि शिक्षक हा एका अर्थानें विद्यार्थी अशी येथें स्थिति असे. विद्यार्थी, लहान विद्यार्थी, शिक्षक मोठा विद्यार्थी, शिक्षक मोठा शिक्षक, विद्यार्थी लहान शिक्षक, असें फार तर वयोमानावरून येथें म्हणतां आलें असतें. पण दुसऱ्या दृष्टीनें शिक्षक हा लहान शिक्षक आणि विद्यार्थी हा च मोठा शिक्षक ठरावयाचा. कारण विद्यार्थ्याची चपळता, विद्यार्थ्याची निर्दोषता, विद्यार्थ्याची वर्धमानस्थिति शिक्षकापाशीं नसावयाची. "एकमेकां करूं साह्य अवघे धरूं सुपंथ"—अशी ही राष्ट्रीय शाळेची कल्पना होती.

या राष्ट्रीय शाळेंतले मुख्याध्यापक नाना कुळकर्णी हे अतिशय निरलस आणि सतत उद्योग करण्यांत विद्यार्थ्यांना जवळ जवळ आदर्श होते. इतर शिक्षकांत हि निरनिराळे थोडे फार गुण होते च. परंतु या सर्वांपेक्षां खरा आदर्श गुरू, खरा आदर्श विद्यार्थी-आचार्यसमोर च आश्रमांत प्रत्यक्ष वावरतांना या विद्यार्थ्यांना दिसे. हें आचार्यांचें उदाहरण म्हणजे या राष्ट्रीय शाळेंतल्या विद्यार्थ्यांचे एक महद्भाग्य होतें. जसा इमारतींत पाया मुळीं च दिसत नाहीं, खांब च इमारतीला तोलून धरतांना दिसतात, तसा या राष्ट्रीयशाळेंत आचार्य दिसत नसत. पण त्याच्यावर च सर्व शाळा उभारलेली असे. शिक्षक मात्र खांबासारखे शाळेंत दिसावयाचे. या शाळेंतल्या कांहीं विद्यार्थ्यांना आचार्य अल्पसा वेळ देत. या शाळेंत विणकामादि उद्योगांचें शिक्षण स्वतंत्रपणें देण्याऐवजीं विद्यार्थी उद्योगशिक्षणासाठीं आश्रमांत च येत. शिक्षकहि त्यांच्या बरोबर असत. आश्रमाच्या दोन वेळच्या सकाळ-संध्याकाळच्या प्रार्थनांमध्यें बहुतेक विद्यार्थी आणि शिक्षक हजर राहाण्याचा प्रयत्न करीत. बाकी मग निरनिराळे विषय विद्यार्थ्यांना निरनिराळे शिक्षक शिकवीत.

अनुक्रमणिका

आश्रमाचा आदर्श विद्यार्थ्यांसमोर सतत पुढे च असावयाचा, तसा शिक्षकांसमोर हि तो होता च. आश्रमांतली मुख्य वस्तु म्हणजे एकादश-व्रतें. या व्रतांचा आदर्श ठेवून शिक्षक चालेल तर च तो शिक्षण देऊं शकेल अशी येथल्या या शाळेची स्थिति होती. केवळ विद्वत्तेवर विद्यार्थ्यांना भारून टाकणे हें येथें शक्य नव्हतें. कारण येथें रात्रंदिवस विद्यार्थी, गुरूसमवेत च असावयाचे. केवळ विद्वत्ता ही वस्तु कांहीं रात्रंदिवस प्रकाश पाडूं शकत नाहीं. रात्रंदिवस सतत जवळ राहून ज्या वस्तूची छाप पडते ती वस्तु म्हणजे चारित्र्य, व्रतनिष्ठा, सत्त्वशीलवृत्ति आणि खरी भक्ति. विद्यार्थ्यांविषयीं शिक्षकाला आणि शिक्षकाविषयीं विद्यार्थ्याला एकसारखा अधिकाधिक आदर वाटत जाईल तर च तेथे उभयतांचा विकास होईल. या दृष्टीने सर्व शिक्षक प्रयत्नशील होतें असे फार तर म्हणतां येईल. परंतु ते आचार्यांच्या कसोटीला टिकणारे नव्हते, यांत मुळीच शंका नाहीं. ज्याने खऱ्या शिक्षकाचें काम पत्करलें तो आश्रमाचा संन्यासाचा आदर्श जरी स्वीकारूं शकला नाहीं, तरी तो गृहस्थाश्रमांतून पुढें गेला च पाहिजे, त्याने ब्रह्मचर्यव्रत स्वीकारून वानप्रस्थाश्रमाची पहिली दीक्षा घेतली च पाहिजे, त्या शिवाय तो खरा शिक्षक होऊं च शकत नाहीं. वानप्रस्थाश्रमाची पहिली दीक्षा म्हणजे ब्रह्मचर्य-व्रत. गुरुगृहांतली विद्यार्थ्याची दशा ही ब्रह्मचर्याश्रमाची स्थिति आहे. या स्थितींत त्या आश्रमाचा चालक शिक्षक च ब्रह्मचारी न राहिला तर तो ब्रह्मचर्याश्रम होईल च कसा? राष्ट्रीय-शाळा म्हणजे ब्रह्मचर्याश्रम आणि सत्याग्रहाश्रम म्हणजे संन्यासाश्रम. हे दोन आश्रम आदर्श तऱ्हेंने एकमेकांवर चालले आहेत. अशी स्थिति आचार्यांना अपेक्षित होती. वानप्रस्थाश्रमी च शिक्षक होऊं शकतो असा आचार्यांचा सिद्धांत होता. कारण खरी संततिनिष्ठा वानप्रस्थाला च मानतां येईल. संतति वेगळी आणि संततिनिष्ठा वेगळी. संतति पशूला हि असते. पण संततिनिष्ठा हें च मनुष्यत्त्वाचें वैशिष्ठ्य आहे. केवळ आपल्या मुलांना वाढवणे व शिक्षण देणें, त्याप्रमाणे त्यांच्यावर प्रेम करणे यांत संततिनिष्ठा पूर्ण होत नाहीं. आपल्या मुलांबरोबर इतर विद्यार्थ्यांना हि आपल्या मुलांप्रमाणें वागविण्यांत संततिनिष्ठा व्यापक बनते. आणि ती पक्की तेव्हां च होते कीं जेव्हां अधिक संतति निर्माण करणे हें मनुष्य पूर्णतया सोडून देतो. कारण असलेल्या संततीला आणि विद्यार्थ्याला पूर्ण करण्याकडे त्याची शक्ति खर्च होते. या सर्व गोष्टी वानप्रस्थाश्रमांत साधतात आणि त्या हि समोर संन्यासाचा आदर्श ठेवून केलेल्या असतील तर च. या कल्पनेने च ही राष्ट्रीयशाळा आश्रमासंन्निध आचार्यासंन्निध असावी असा योगायोग जुळून आला. खरोखर विद्यार्थ्यांप्रमाणे शिक्षकांचें हि हें महद्भाग्य होतें—त्यांच्या समोर आचार्य आणि त्यांचा आश्रम रात्रंदिवस उभा असे, हें एक पूर्वपुण्याईचें अपूर्व फळ च मानावें लागेल.

सत्याग्रहाश्रम हा संन्यासाचा आदर्श व्हावा, राष्ट्रीय-शाळेचे शिक्षक वानप्रस्थाश्रमाचे आदर्श व्हावेत, विद्यार्थी ब्रह्मचर्याश्रमाचें आदर्श व्हावेत आणि मधून मधून येणारे विद्यार्थ्यांचे पालक हे आश्रमसंगतीने गृहस्थाश्रमाचा आदर्श बनून हिंदुधर्माचें हें चतुर्थाश्रमाचें वैशिष्ट्य जे नष्टप्राय होऊन गेलें आहे तें बीजरूपाने येथें पुन्हां प्रादुर्भूत व्हावें अशी या राष्ट्रीय शाळेच्या उभारणीने एक सहज-योजना घडून आली. त्याप्रमाणे त्यावरहुकूम सर्वची सर्व आदर्शस्थिति प्राप्त झाली कीं नाहीं हा महत्त्वाचा मुद्दा नाहीं. पण आदर्श स्थिति आणण्याची बिनचूक योजना येथे सिद्ध झाली ही महत्त्वाची गोष्ट आहे. आचार्यांच्या ठिकाणी संन्यासाचा आदर्श पूर्णांशाने परिणत झालेला होता यांत तर तिळमात्र शंका नाहीं. आणि या च जोरावर राष्ट्रीय-शाळेची सहज योजना घडून आली.

आचार्यांसारखा आदर्श पुरुष असेल तर आश्रम आणि राष्ट्रीय-शाळा यांच्या सहजयोजनेतून चतुराश्रमाच्या आदर्श व्यवस्थेचें बीज निर्माण होऊं शकतें. म्हणून च या शाळेत फारशीं मुलें नव्हतीं. २०/२५ मुलांखेरीज मुलांची संख्या वाढली नाहीं तरी ह्या शाळेला जमनालालजी ज्यास्त महत्त्व देत. गुण हे संख्येवर अवलंबून नाहींत. उलट पुष्कळ वेळां संख्या वाढली कीं गुण कमी होतात असा अनुभव आहे. ह्या

अनुभवानुरूप या राष्ट्रीय शाळेला मुख्य महत्त्व देऊन जमनालालजींनीं आपलीं व आपल्या बहिणींचीं मुलें येथे शिक्षणासाठीं ठेवलीं. जमनालालजीं, जाजूजी, भुसावळचे अण्णासाहेब दास्ताने, गुजराथमधले रविशंकर व्यास, धुळ्याचे रामेश्वरजी अशा थोर कुळांतल्या मुलांवर येथे शिक्षणाचा प्रयोग करतां आला. रत्नागिरीचे अप्पा पटवर्धन, खामगांवचे मनोहर दिवाण, गंगाबिसन बजाज, चरखासंघाचे द्वारकानाथ लेले यांचे बंधू हि येथें शिकण्यासाठीं होते. ओळखी ओळखीने आलेली कार्यकर्त्यांची व थोर कुळांतली अशीं च बहुतेक मुलें होतीं. हीं मुलें पायखाने साफ करण्यापासून यच्चयावत स्वच्छतेचीं सर्व कामे करीत. पाणी भरण्यापासून स्वयंपाकापर्यंतची सर्व गृहकर्में त्यांच्या अंगवळणीं पडलीं. गरीब, श्रीमंत, ब्राम्हण, ब्राम्हणेत्तर, स्पृश्य, अस्पृश्य असा कोणता च भेद येथे नव्हता. सर्वांना एक च एक शिक्षण मिळत असे. तथापि शाळेत मारवाडी मुलें अधिक होतीं. त्याच्या खालोखाल महाराष्ट्रीय मुलें होतीं.

आळस, उद्धटपणा, चोरी, खोटे बोलणे, अभ्यासाची टंगळमंगळ, आपापसांत कलह, द्वेष, मत्सर, अनीति अशा अनेक दुर्गुणांच्या लहरींमधून विद्यार्थ्याला शिताफीने वांचवून सुशिक्षणाच्या पैलतीराला नेण्याचें शिक्षणाचें काम नेहमीं च मोठे बिकट असतें. तेथें एकाएकीं कोणता प्रश्न उद्‌भवेल याचा नेम नसतो. या बिकट कामाचा अनुभव येथे हि आला. परंतु यांत मुख्य दोष शिक्षकांची भूमिका यथायोग्य आणि स्थिर नव्हती हा होता. त्यामुळें शिक्षक बदलत गेले. कांहींना अयोग्यतेमुळे स्थलांतर करणे भाग पडलें. कांही दुसऱ्या कामांत लागले. नवीन शिक्षकांत प्रभाकर दिवाण, शिवाजी भावे, अशी अननुभवी मंडळी होती. जसजसा आश्रमाच्या कामाचा विकास होऊं लागला तसतशी माणसांची चाळवाचाळव होऊं लागणें स्वाभाविक होतें. मूळ आश्रमाच्या मागे ही शाळा छायेप्रमाणे मागे मागे येणे ही गोष्ट अपरिहार्य होती. येथें गणित, इंग्रजी, मराठी, संस्कृत असे सर्व विषय शिकविले जात पण यांना फारच कमी महत्त्व होतें. परीक्षेवर मुळीं च भर नसे. विद्यार्थि उद्योगी, सेवक, ज्ञानपिपासु आणि चारित्र्यवान बनावा अशीं येथें अपेक्षा असे. त्याप्रमाणे येथले विद्यार्थि कांहीं ना कांहीं राष्ट्रकार्याला हातभार लावणारे निघाले यांत शंका नाहीं. कित्येकांनीं चर्खा संघांत कामें केलीं, कित्येकांनीं आश्रमांत दाखल होऊन ग्रामसेवेचीं कामें केलीं, कित्येक सत्याग्रहांत जेलमध्ये गेले. असा थोडा फार राष्ट्रसेवेंत या विद्यार्थ्यांचा उपयोग झाला. कारण सेवेची दीक्षा त्यांना आचार्यांच्या सहवासाने आश्रमाच्या उदाहरणाने आणि शिक्षकांच्या सांगण्याने मिळालेली होती च. शिवाय शिंदीचीं झाड तोडण्याची चळवळ, हरिजनांना मंदिरें व विहिरी उघडीं करून देण्याची चळवळ अशा आश्रमाच्या चळवळींत हि या शाळेच्या विद्यार्थ्यांनीं भाग घेतलेला होता.

अशी ही शाळा ५/६ वर्षे चालली. परंतु एक तर नवीन मुलांचा ओघ बंद झाला, दुसरे खेडेगांवांच्या सेवेकडे आश्रमाचे मुख्य लक्ष केंद्रित झालें त्यामुळें आश्रमांतून राष्ट्रीय शाळेत जाणारे शिक्षक काढून घेण्यांत आले. शिवाय राष्ट्रीय शाळेतलीं मुलें कांहीं आश्रमांत दाखल झालीं. आणि सर्वांत मुख्य गोष्ट म्हणजे वानप्रस्थाश्रमाचा आदर्श शिक्षकांना झेपेलसा दिसेना. त्यामुळें या शाळेची जबाबदारी नको अशी विचारसरणी आचार्यांनी मांडली. ती जमनालालजींना मान्य च होती. पुढें मुख्याध्यापक नाना कुळकर्णी हें कांहीं दिवस सेलू येथें कांहीं मुलांसह शिक्षणाचे कार्य करीत होते. परंतु ते सत्याग्रहाच्या युद्धांत पडले गेले आणि त्यानंतर ते कोल्हापूरला कायमचे च निघून गेले आणि ही शाळा पूर्णपणें बंद पडली.

राष्ट्रीय शाळेचा हा प्रयोग म्हणजे आचार्यांच्या मध्यबिंदूभोवतालचें आश्रमवलयाबाहेरचें हें एक वर्तुळ होतें. या निमित्तानें कांहीं बाहेरचे शिक्षक व विद्यार्थि आश्रमजवळ आले आणि आश्रमाचे कांहीं आचार्यांबरोबरचे लोक आश्रमजवळून दूर थोड्या बाहेरच्या क्षेत्रांत गेले. ही एक प्रकारची खळबळ होती. पाण्यावर लाटा खळबळत राहतात. जवळच्या दूर जातात आणि दूरच्या जवळ येतात. त्यानें सर्व पाणी

अनुक्रमणिका

चैतन्यमय होतें. नवा ओघ आला, जुना बदलला असें झालें च पाहिजे. कारण साचलेले सद्‌गुण हि दुर्गुणाच्या कोटीला जातात. सांचलेली स्थिति नसावी. म्हणून राष्ट्रीय शाळेच्या निमित्तानें आचार्यांच्या आश्रमांतल्या आध्यात्मिक प्रयोगजीवनाला एक चैतन्यमय खळबळीचें स्वरूप आलें. त्या शाळेचे ते लहान विद्यार्थि, त्याहून जरा प्रौढ असलेले विद्यार्थि आणि त्यांच्यापेक्षां मोठे असलेले शिक्षक हे ह्या आध्यात्मिक पुरुषाच्या प्रेरणेभोवतीं कांहीं वर्षे तरी वावरले यांत हि केवढा लाभ झाला.

**कोण समयो येईल कैसा कोण जाणे**

अशी च संस्काराची स्थिति आहे. जे संस्कार आचार्य-संगतींत या राष्ट्रीय शाळेला थोडे फार मिळाले त्यांची कोणामध्यें केव्हां कशी परिणति होईल हें कोण सांगू शकेल? वास्तविक आचार्य या शाळेपासून काय सर्व च जगतापासून पद्‌मपत्राप्रमाणें अलिप्त च राहात. कोठें हि गुंतावयाचें हें आचार्यांच्या प्रकृतींत च नसे. त्यामुळें ही शाळा आली काय आणि गेली काय त्याच्या दृष्टीनें फरक कांहीं पडत नव्हतां. परंतु अशा पुरुषाभोवतीं अशा अनेक योजना घडाव्यात आणि तद्वारा हें सर्वस्वी निवृत्तीच्या गूढ गव्हरांत पडलेलें ज्ञान सहज रीतीनें बाहेर यावें असा ईश्वरी संकेत असल्यामुळें च त्याच्या भोवतीं योजना उभारल्या जात आणि त्यांचें कार्य झालें कीं योग्यवेळीं आचार्यांच्या इतर सहजप्रवृत्तीमध्यें प्रथम वर्णन केल्याप्रमाणें

**नातरी मध्याहनकाळीं । छाया न दिसे वेगळी**
**असे पायातळीं । रिगोनिया**

अशा तऱ्हेनें लीन होऊन जात.

●●●

अनुक्रमणिका

# प्रकरण ३७ वें

## कन्या-शाळा

**एक** साधें बीं म्हटलें तरी त्यामध्यें—त्या लहानशा दाण्यामध्यें पानें, फुलें, फळें आणि शाखा केंद्रीभूत झालेल्या असतात. तें बीज म्हणू शकते कीं माझ्यांत च पानें, फुलें, फळें आणि शाखांचा विस्तार सांठविलेला आहे. महापुरुषाच्या ठिकाणीं एखाद्या यःकश्चित् झाडाचें च काय पण संपूर्ण जगताचें ब्रह्मबीज सांठविलेलें असतें. त्यामुळें तो म्हणूं शकतो

**चलती है रेलें फरफर मुझमें! मुझमें!! मुझमें!!!**
**बहती हैं नदियाँ झरझर मुझमें! मुझमें!! मुझमें!!!**
**फिरते हैं योगी दरदर मुझमें! मुझमें!! मुझमें!!!**

हा मी हिमालयांत बसलों आहे. वास्तविक मी हिमालयांत बसलों कशाचा? मी च स्थिर-बुद्धीचा हिमालय आहे. त्यामुळें माझ्या या स्थिरतेवर अनेक चल अशा क्रिया चालून राहिल्या आहेत. स्थिर आकाशांत वाऱ्याच्या अनेक क्रिया चालतात. स्थिर पाण्यावर लाटांची लीला चालू च असते. स्थिर सोन्यावर अलंकारांच्या घडामोडी होत च राहतात. त्याप्रमाणें ही जी येथें समोर डोंगरांतून वळणें घेत घेत फरफर करीत रेल चाललेली आहे, ती माझ्यामध्येच चालली आहे! तसेंच वळणें घेत घेत या ज्या येथल्या नद्या वाहात आहेत त्या हि माझ्यामध्यें च वहात आहेत!! हे जे योगी गुहेगुहेंतून फिरत आहेत ते हि पण माझ्यामध्येंच फिरत आहेंत!!! हा आत्मानुभव, ही व्यापक भूमिका, ही स्थिर वृत्ति ज्याला प्राप्त झाली, त्याच्या भोवतालची सर्व सृष्टी केवळ त्याची च व्हावी यांत आश्चर्य कसलें? तो भिकारी का असेना कुबेराची संपत्ति ही केवळ त्याची च संपत्ति ठरते. तो कांही हि करीना कां. त्याच्या भोवतालच्या सर्व क्रिया त्याला केंद्र केल्याशिवाय रहात नाहींत. राजा कांहीं च करीत नाहीं. पण त्याचें स्थिर अस्तित्व सर्व कांहीं करवितें. त्याप्रमाणें आचार्य केवळ निवृत्तिस्वरूप असून हि एकेक नवीन नवीन सेवेच्या योजनांची सृष्टी त्यांच्या भोवती उत्पन्न होत गेली. कारण आचार्यांची निवृत्ति ही खरी निवृत्ति होती. ती सत्प्रवृत्तीने बिघडणारी निवृत्ति नव्हती तर

**भूजलतेजसमीरख रविशशीं काष्ठांतरी असे भरला ।**
**स्थिरचर व्यापुनि अवघा तो जगदात्मा दशांगुळें उरला ॥**

अशी प्रवृत्तीला व्यापून पुन्हा वर शिल्लक राहील अशी निवृत्ति होती. तरी कमींत कमी कर्म करून जास्तींत जास्त परिणाम काढणारा तिचा मूळचा स्वभाव होता. अनेक कर्मांचे खटाटोप करून, अनेक अव्यापारेषु व्यापार करून, शेंवटीं परिणाम शून्य यावयाचा हा रजोगुणी प्रकार येथें नव्हता. व्यवहारी अपूर्णांकांत मोठमोठ्या रकमा दिसतात पण तो केवळ डोलारा च असतो. त्या रकमांना संक्षेप रूप देऊं लागल्यावर त्यांचा पोकळपणा उघड होऊन कित्येक वेळां शेंवटीं पोकळ गरगरीत शून्यस्वरूप त्यांना येतें. येथील निवृत्ति हा व्यवहारी अपूर्णांक नसून आध्यात्मिक पूर्णांक होता. येथल्या अंकाला छेद नसल्यामुळें परिणाम शून्य येण्याचा संभव नसे. येथली प्रत्येक क्रिया ही आत्मशुद्धीच्या आंतर मापानें मोजली जाई. म्हणून केवळ व्यावहारिक योजना सोडून जी जी सेवेची म्हणजे च आध्यात्मिक योजना मनांत येई ती जमनालालजी

आचार्यांच्या सल्ल्याखेरीज आणि त्याच्या आधाराखेरीज उभारीत नसत. कारण केवळ पैसा इत्यादि व्यवहारिक शक्तीनें अशी योजना यशस्वी होणें अशक्य आहे, याची त्यांना नीट कल्पना असे. अशा आध्यात्मिक योजना किती हि असल्या तरी आचार्यांना त्यांचा भार कधींच वाटत नसे. आणि नाणीं किती का निघेनात सर्वांवर राजाचा शिक्का पडावयाचा च. आणि शिक्का नसेल तर नाणीं किती कां निघेनात त्यांना नाणेपणा हा कांहीं केल्या यावयाचा नाहीं. इतकें च काय पण शिक्का असेल तर त्या नाण्यांची हि खास जरुरी आहे असे नाहीं.

**नृप-मुद्रांकित पत्र प्रजेसि होतें जसें शिरोधार्य ।**

मोरोपंतांनी म्हटल्याप्रमाणे राजमुद्रांकित कागदाला हि मोठी किंमत येते. तसे च येथें होतें. आध्यात्मिकतेची खुबी ह्यांत च आहे. बाह्य आकारावर किंवा संख्येवर किंवा प्रमाणावर तीं अवलंबून न राहतां तिच्या अंतःतत्त्वावर ती अवलंबून राहते. दूध थेंबभर चाखल्याने दुधाची पुष्टि लाभणार नाहीं. त्याला प्रमाण वाढवावे लागेल. परंतु अमृताचा एक बिंदु काय आणि सिंधु काय दोहोंत फरक नाहीं. अमृताचा बिंदु लाभल्याने जो लाभ त्यापेक्षा अमृताचा समुद्र लाभल्याने अधिक लाभ होईल असें नाहीं. सेवेच्या योजना किती झाल्या अथवा बाह्य सेवा किती झाली यावर आध्यात्मिक परिणाम अवलंबून नाहीं. तर सेवेंत आध्यात्मिकता म्हणजे निरहंकारता किती आली यावर ती अवलंबून आहे. सेवा/अहंकार=भक्ति असे आचार्यांचें एक सूत्र च आहे.

या आध्यात्मिक सूत्राप्रमाणेच आचार्यांची स्थिति असल्याकारणाने समुद्राकडे जशा सगळ्या नद्या तो निरपेक्ष असूनहि आपोआप च याव्या तशा एकेक योजना आपोआप च येऊं लागल्या. जमनालालजींच्या डोळ्यांपुढे नेहमी सेवेच्या अनेक योजना असत. त्यांना सेवेचा हव्यासच होता. त्याप्रमाणे त्यांनीं आतां एक नवीन परंतु नैसर्गिक प्रवाहांत सहज सुचणारी कल्पना आचार्यांपुढे मांडली. ती म्हणजे कन्याशाळेची. राष्ट्रीय-शाळा सुरू होऊन २॥—३ वर्षे झाली होतीं. अशा स्थितींत ही कल्पना सुचणे अगदीं स्वाभाविक होतें. कार्यविकासाच्या सहजक्रमांत येणारी ही गोष्ट होती. कार्यकर्त्यांच्या मुलांची आपल्या पद्धतीप्रमाणे शिक्षण देण्याची सोय आपण केली पण कार्यकर्त्यांच्या मुलींची वाट काय? हा प्रश्न मनासमोर उभा रहाणे क्रमप्राप्त च होतें. सार्वजनिक बाबींच्या बहुतेक योजना पुरुषांच्या बाबतींत च होतात. स्त्रियांच्या व मुलींच्या योजना फार च कमी होतात. तरी सुद्धां स्त्रियांसाठी संस्कारता पुरुषांच्यापेक्षा किती तरी श्रेष्ठ दर्जाची दिसते.

'स्त्रीषु दुष्टासु वार्ष्णेय जायते वर्णसंकरः' भगवंतांनीं सुद्धां असे म्हटलें आहे. पुरुष दुष्ट झाल्याने वर्णसंकर म्हणजे सर्वत्र अव्यवस्था माजत नाहीं असे नाहीं. परंतु स्त्री हा समाजाचा बालेकिल्ला आहे. तो जोपर्यंत शाबूत आहे तोपर्यंत विजयाची आशा आहे. पण तो हि गेला म्हणजे सर्वत्र अंधारच पडला. मग कसली च आशा नाहीं. म्हणून भगवंतांनीं पहिल्या च अध्यायांत सहज ओघांत स्त्रियांची अत्युच्च योग्यता वर्णन केली आहे. अशा स्त्रियांच्या ज्ञानासाठी कांहीं योजना तर होत नाहींच पण उलट समाजांत त्यांची नाना तऱ्हेची कुचंबणा आणि गांजणूक चालू असते. आपल्या शक्तीप्रमाणे आपण लहान मुलींची च काय मोठ्या स्त्रियांची हि कांही सेवा करावी अशा हि कल्पना जमनालालजींच्या डोक्यांत घोळत असत. स्त्रियांची सेवा करावयाची म्हणजे त्यांच्यासाठी केवळ अनाथालये काढून भागावयाचें नाहीं. तर त्यांना सेवेची खरी दृष्टि लाभून त्यांच्या ठिकाणचा दुबळेपणा जाऊन श्रेष्ठ पुरुषार्थाची प्रवृत्ति त्यांच्यांत होईल. त्या हि सेवेची परंपरा पुढे चालवतील अशा च आचार्य आणि जमनालालजींच्या कल्पना होत्या. सेवेंतून सेवा निघाली तर च ती मूळची खरी सेवा. नाहीं तर मूळची सेवा हि सेवा नव्हे. तो केवळ सेवेचा निर्जीव पोषाख झाला.

अनुक्रमणिका

अग्नीपासून अग्नि उत्पन्न होईल तरच तो अग्नि. अशा स्त्रियां जर सेविका झाल्या तर सर्व बालशिक्षण त्यांना हातांत घेतां येईल. तेणे करून स्त्रियांच्या ठिकांणी असणारी ममता विकास पावेल—तिचें भक्तींमध्ये रूपांतर होईल. स्त्रियांना सार्वजनिक वातावरण मिळाल्याने त्यांचीं मने प्रफुल्लित होतील. त्यांना स्वतःला आरोग्यलाभ होऊन त्या आरोग्यशास्त्राच्या आधारस्तंभ बनतील. त्यांना जीवनांतील विशाल दृष्टि प्राप्त होऊन राष्ट्राच्या रथाचें एक चाक अशी त्यांची समर्थ स्थिति होईल. मध्ययुगीन पडतीच्या काळांत स्त्रिया 'भीरू' बनल्या. भीरुता हें त्यांचें भूषण च मानलें गेलें पण भगवान

**स्मृतिर्मेधा धृतिः क्षमा ।**

धैर्य हा स्त्रियांचा विशेष गुण दाखवितात. स्त्रियांना योग्य अवसर मिळाला तर त्यांच्या दिव्य गुणांचा विकास होऊन त्या प्रत्येक घरांत उच्च संस्कृति निर्माण करतील. आणि मानण्याची खूण जी अहिंसा तिचा त्यांच्यामधला अत्युच्च विकास हा जगाचे सर्व प्रश्न सोडवील. अशा अगदीं योग्य कल्पनांच्या आधारावर—आध्यात्मिक आधारावर कन्याशाळेची योजना आचार्य आणि जमनालालजींच्या विचारांत अंतर्भूत झालेली होती. स्त्रियांचे मुख्य काम घरांत असलें तरी त्यांचा सार्वजनिक कामांत वाटा असला पाहिजे आणि पुरुषांचे मुख्य काम जरी बाहेर असलें तरी त्यांचा गृहकार्यांत वाटा पाहिजे. या कल्पनेने राष्ट्रीय-शाळेतील गृहकार्यादि काम मुलांनी करण्याची पद्धत तर प्रथमपासून च पडलेली होती. आतां कार्यकर्त्यांच्या मुलींसाठीं सोय व्हावी म्हणून कन्याशाळा काढण्याचा विचार पुढे आला होता. तेथें स्त्रियांनी सार्वजनिक कामांत भाग घ्यावा या तत्त्वाप्रमाणे येथलें काम कोणा तरी स्त्रीने सांभाळण्याची आवश्यकता निर्माण झाली. तसेच येथें मुलींना योग्य प्रकारें शिक्षण देणाऱ्या शिक्षकाची हि व्यवस्था होती.

परंतु अनेक कामांचे डोंगर पडले असून कामासाठीं योग्य माणसें मात्र मिळत नाहींत अशी स्थिति असल्यामुळें हा एक मोठा प्रश्न च होता. कित्येकांना वाटतें पैसा, विद्वत्ता आणि इतर बाह्य साधनांच्या अभावीं राष्ट्राचे काम अडलें आहे. परंतु ही गोष्ट सर्वथैव चुकीची आहे. साधनांशिवाय कार्य अडलेलें नाहीं. तळमळीच्या योग्य माणसांशिवाय कामें अडलेलीं आहेत. साधनें नसतील आणि मनुष्य असेल तर तो साधनें हि निर्माण करू शकेल. पण साधनें आहेत आणि मनुष्य नाहीं, अशा स्थितींत तीं जड साधनें तळमळीचा मनुष्य निर्माण करूं शकणार नाहींत. उलट कित्येक वेळा अशा साधनांच्या लोभानें स्वार्थी माणसें कार्यकर्त्याचें सोंग घेऊन त्या साधनांचा हि विनाश करण्यासाठीं पुढें येतात. म्हणून साधनें गौण असून मनुष्य हा च मुख्य होय. पण सार्वजनिक कार्यासाठीं माणसें कां मिळूं नयेत? काय हिंदुस्थानांत माणसांचा तुटवडा पडला आहे. ३५ कोटी माणसांची ४० कोटी माणसें झालीं. माणसांची, लोकसंख्येची एकसारखी वाढ च होत आहे. मग कार्यासाठीं माणसें कां पुढें येऊं शकत नाहींत? याचें कारण सद्बुद्धीचा अभाव, धर्माचा अभाव म्हणजे च संसाराची बेसुमार वाढ. संसार अमुक मर्यादेबाहेर वाढला कीं, तो सर्वनाशाला कारण होतो. हिंदुस्थानांत आज सरासरी आयुर्मान २५ वर्षें हि नाहीं. तथापि 'शतायुर्वै पुरुषः' या वाक्याप्रमाणें आयुष्याची १०० वर्षें धरलीं तर पहिलीं २० हा बाल्यकाल. हा प्रामुख्यानें शिक्षणाचा काल. पुढचीं २० वर्षे म्हणजे ४० वयापर्यंत तारुण्यकाल. हा मुख्यतः कौटुंबिक जबाबदारीचा किंवा संसाराचा काल. पुढचीं २० वर्षे म्हणजे ४० ते ६० हा मध्यकाल म्हणजे मुख्यतः वानप्रस्थाश्रमाचा काल. त्यापुढचीं वीस वर्षे म्हणजे ६० ते ८० हा वार्धक्याचा काल म्हणजे संन्यासप्रवणतेचा काल. आणि ८० ते १०० हा जीर्णकाल म्हणजे पूर्णपणें संन्यासकाल, केवळ आत्मचिंतनाव्यतिरिक्त फारसें कांहीं न करण्याचा काल. असे आचार्यांच्या कल्पनेप्रमाणें आयुष्याचें वीस वीस वर्षांचे पांच भाग पडतात. या पांच भागांत २० वर्षे संसाराचा भाग आहे. त्याऐवजीं सर्व च आयुष्यभर संसार वाढल्यानें समाजकार्याला, अध्यात्मकार्याला माणसें मिळत नाहींत.

इतकेंच काय पण संसारकार्य हि अत्यंत दीनवाणें होऊन जातें. भाराभर संतती वाढल्यामुळें तिचें पोषण आणि शिक्षण होऊं शकत नाहीं. त्यामुळें संतती नेभळट बनते. आणि संख्या वाढली कीं कस कमी होतो या तत्त्वाप्रमाणें जन्मतः च प्रजेंत शारीरिक बौद्धिक कस कमी निपजतो. आणि या अजागळ परंपरेला कांहीं सुमारच रहात नाहीं. सर्व जीवन उत्तरोत्तर पुरुषार्थशून्य बनत जातें आणि

**नसे आंथराया नसे पांघराया ।**

अशी दिनवाणी स्थिति येते. यावर आधुनिकांनीं एक संततीनियमनाचा तोडगा काढला आहे. या तोडग्यानें उद्देश मुळींच सिद्ध होत नाहीं. संतति कमी होऊन तिचें पोषण करण्याचें सामर्थ्य यांत येईल. पण अतिविषयानें संतति निर्माण करण्याची यंत्रें च पार बिघडून मुळांत संतति संख्या न वाढून ही कस राहणार नाहीं तो नाहीं च. गुण नाहीं तर संख्या तरी असावी. तर येथें गुण हि नाहीं व संख्या हि नाहीं अशी अवस्था प्राप्त होणार. फक्त कमी संख्या असल्यानें अन्नवस्त्रादींचा जो काय अधिक लाभ होईल तो होईल. पण त्यानें प्रजेंत जोम मुळींच उत्पन्न होणार नाहीं. बीजतः कमकुवत असलेल्या प्रजेला वाटेल तें अन्न दिलें तरी बीजांतली उणीव दुरुस्त होणें अशक्य आहे. ही पद्धति म्हणजे सबंध मानवजीवनावर 'मुले कुठारः' अशी निस्तेज बनविणारी पद्धति आहे. या पद्धतींत सर्व काळाचा विचार नाहीं. मूलतः च ही नितीशून्य पद्धति आपल्या उद्दिष्टाला हटकून नष्ट करणारी आहे. गांठ बाहेरून सोडवून सुटत नाही. उलट ती पक्की बसते. तिला आंतून सोडवावी लागते. तात्पुरत्या अन्नवस्त्राचा गर्भप्रसवादि कष्टांचा यांत कदाचित् बचाव होत असेल. पण संतति निकस होणें, नीतिहीनतेला साधन निर्माण करणें, संततिनिर्माण यंत्र उत्तरोत्तर अपात्र बनणें असें यांत सर्व मूलभूत दोष असल्यामुळें दीर्घदृष्टीच्या ऋषींनीं संसार हा मर्यादित करून टाकला. त्यामुळे च तो जोरदार होईल अशी त्यांची योग्य दृष्टि होती. सबंध आयुष्यभर संसार केला तर संसार च राहणार नाहीं. तो दुबळा होऊन नष्ट होईल. त्यामुळे वैराग्य हें परमार्थोपयोगी आहे च पण तें संसारोपयोगी हि आहे. संसार योग्य तऱ्हेनें टिकण्याला हि अमुक प्रमाणांत वैराग्य पाहिजे. उलट विषयासक्ति ही कदाचित् संसारांतली वस्तू म्हटली तरी ती परमार्थोपयोगी तर यत्किंचित हि म्हणतां येणार नाहीं. तात्पर्य, परमार्थ आणि स्वार्थ मानव समाजाचे आणि व्यक्तीचें जीवन या सर्वांना उपयोगी तत्त्व म्हणून पशूप्रमाणे नाईलाज होईपर्यंत संसार करीत राहण्याची कल्पना ऋषींनीं अधर्म्य ठरवून तारुण्यकालापर्यंत संसाराची परवानगी दिली. त्यामुळें समाजाला उत्तम कार्यकर्ते मिळण्याची सोय झाली. संततीच्या बेसुमार वाढीला मर्यादा घातली गेली. संतति सकस होण्याला साधन निर्माण झालें. आणि व्यक्तीची जीवनयात्रा अत्यंत समाधानकारक रीतीनें चालू लागली. ही ऋषीकालीन आयुष्यक्रमणाची पद्धति बंद पडल्यामुळे सत्कार्याला, सेवाकार्याला, समाजकार्याला माणसें मिळत नाहींत.

परंतु सुदैवानें अशा तऱ्हेचा मनुष्य येथे उपलब्ध झाला. राष्ट्रीय-शाळा चालू असता सदर गृहस्थ एकदां आचार्यांकडे आले होते. व त्यांनीं स्त्रीशिक्षणाविषयींची आपली योजना आचार्यांना दाखविली होती. शिवाय पुण्याच्या स्वराज्य पत्रांत त्यांनीं स्त्रीशिक्षणाच्या या योजनेसंबंधीं लेख हि लिहिले होते. इतकें च काय पण मुंबईजवळ शीव येथें एक शाळा हि चालविली होती. ही गोष्ट भूसावळच्या आण्णासाहेब दास्तान्यांना माहीत होती. कारण हे गृहस्थ त्यांचे जुने स्नेही च होते. त्यांना हें हि माहीत होतें कीं, कन्याशाळेच्या योजनेसाठीं जमनालालजी अशा मनुष्याच्या शोधांत आहेत. म्हणून ह्या आपल्या स्नेह्यांचें नांव त्यांनीं कन्याशाळेसाठीं जमनालालजींना सुचविलें. व त्यांना वर्ध्यास येण्यासाठीं तार केली. हे गृहस्थ त्या वेळीं आण्णासाहेब दास्तान्यांच्या पूर्वखानदेशांतील पिंप्राळे आश्रमांतील नळे बसविण्याच्या वगैरे कामासाठीं आले होते. ते इलेक्ट्रीक इंजिनियरिंगची कला शिकलेले असल्यामुळे अशीं कामें करूं शकत. घड्याळदुरुस्ती हि

अनुक्रमणिका

अनेक लोक त्यांच्याकडून करवून घेत. ते तार केल्याप्रमाणें वर्ध्याला आले. १९२८ चा फेब्रुवारी महिना होता. लगेच सभा होऊन कन्याशाळेचें मंडळ नेमलें गेलें. आचार्य, गोपाळराव काळे, नाना कुळकर्णी व सदर गृहस्थ हे त्या मंडळांत होते. या गृहस्थांचें नांव शंकरअण्णा भाजेकर असून ५० च्या सुमारांचें त्यांचें वय होतें. त्यांना संसाराचा कोणता हि पाश नव्हता. ते खरोखर वानप्रस्थाश्रमी च होते. शाळेंसाठीं आतां स्त्रीकार्यकर्त्याची आवश्यक्ता होती. तेवढ्यासाठीं ते पुण्यास गेले. तेथें त्यांनीं स्त्रीकार्यकर्त्यासाठीं कांहींशीं चौकशी केली. इतक्यांत अण्णासाहेब दास्तान्यांचें कुटुंब श्री. वारुबाई ह्या या कामासाठीं तयार असल्याचें कळलें. त्याप्रमाणे त्या येऊन १६ जून १९२८ ला कन्याशाळा सुरू झाली. हा कन्याशाळेचा प्रयोग प्रथम तीन वर्षापुरतां च ठरला होता. राष्ट्रीय शाळा ज्या शेजारच्या लहान लहान शिक्षकगृहांत चालत असे, त्यांतील एक भाग या कन्याशाळेला देण्यांत आला. शाळेंत जमनालालजी, जाजूजी, गंगाबिसनजी, दादा धर्माधिकारी, जाजोदिया, सोलापूरचे राठी, अण्णासाहेब दास्ताने, वर्धा तालुक्यांतील सोनोरा गांवचे दादा पाटील अशांच्या मुली दाखल झाल्या होत्या. या कन्याशाळेसमोर च जाजूजी रहात असत. त्यामुळें या शाळेवर त्यांची आपोआप नजर राही. शाळेंत मुली निवडक आणि थोड्याच होत्या. त्यांचें शिक्षण राष्ट्रीय शाळेंतील मुलांप्रमाणेंच असे. आश्रमांत संध्याकाळच्या प्रार्थनेंत मुली हजर असत. आचार्या राष्ट्रीय शाळेपासून तसेच या शाळेपासून हि अलिप्त होते. पण अलिप्त म्हणजे दुर्लक्ष करणारे नव्हे. त्यामुळें मुली आचार्यांकडे मधून मधून कांहीं ना कांहीं शिकत च असत. विशेषतः आचार्यांनी कांहीं मुलींकडून गीताई म्हणवून घेतली. आश्रमांत तकलीउपासनेला मुली हजर राहात. मुलांच्या मानानें मुलींची जबाबदारी विशेष होती. तथापि शंकरअण्णा भाजेकरांचें शिक्षण म्हणण्यापेक्षां वळण मुलींना यथायोग्य होतें यांत शंका नाहीं. स्त्रियांच्या अंतःकरणांत भक्तीचा भाग अधिक असतो. त्याचा विकास करून पुरुषांमधली कर्मयोगाची त्यांना दीक्षा मिळाली पाहिजे. त्याप्रमाणें शंकरअण्णा कर्मयोगी नसले तरी त्यांचा योगशास्त्राकडे ओढा असे. अरविंदबाबूंच्या लिखाणाची त्यांच्यावर छाप होती. त्यांचा आसन-प्राणायाम कधीं चुकावयाचा नाहीं.

**युक्ताहारविहारस्य युक्तचेष्टस्य कर्मसु ।**
**युक्तस्वप्नावबोधस्य योगो भवति दुःखहा ॥**

हा गीतेचा उपदेश त्यांच्या ठिकाणीं मुरलेला होता. ते अतिशय मितभाषी आणि नियमीत असत. अण्णासाहेब दास्तान्यांच्या सहवासामुळें वारुबाईंना हि देशकार्याचा कांही अनुभव होता. जुन्या वळणाच्या स्त्रियांप्रमाणें साधेपणानें सतत गृहकार्य करीत राहण्यांत त्या मुरलेल्या होत्या. त्यांच्याकडून हि मुलींना कांही वळण मिळे. जमनालालजी हि वारंवार येऊन चौकशी करीत. समोर एका बाजूला राष्ट्रीय शाळेचें वातावरण, दुसऱ्या बाजूला आश्रमाचें वातावरण, आचार्य आणि जमनालालजींची कृपादृष्टी, जाजूजींचा शेजार, मोजक्या मुली, एकहातीं गाजावाजा न करतां मिळणारें शिक्षण, सर्व तऱ्हेच्या साधनांची समृद्धि, अशी ही शाळा मुलींना सहजासहजी दुसरीकडे कोठें लाभणें ही गोष्ट अशक्य च होती. मुलींना संगीत शिकविण्याचें काम आचार्यांचे संगीतज्ञ बंधू करीत असत. त्यांच्याकडे राष्ट्रीय शाळेचे विद्यार्थी हि संगीत शिकत. त्यांच्या ठिकाणीं असणाऱ्या भक्तिभावाचा, शिस्तीचा आणि वैराग्यनिष्ठेचा मुलींना बराच लाभ घेणें शक्य होतें. कारण आश्रम जप्त झाल्यानंतर त्यांनीं कन्याश्रमांत च आपलें वास्तव्य केलें होतें.

या शाळेचें वैशिष्ट्य ब्रह्मचर्याच्या आदर्शांत होतें. मुलांच्या पुढें हा आदर्श सतत ठेवला गेला आहे. पण मुली आजन्म ब्रह्मचारी राहूं शकल्या तर त्यांना तसें उत्तेजन मिळावें, त्यांच्यापुढें तो च आदर्श ठेवावा असें कोठें ही कोणत्या हि शाळेंत अजून घडलेलें नाहीं. कोणी हि हा आदर्श मुलींच्या पुढें ठेवीत नाहीं. स्त्रियांवर अत्याचार होण्याची भीती असते, त्यांना स्वतंत्र राहणें ही गोष्ट कठीण आहे, अशीं यांची अनेक

अनुक्रमणिका

कारणें आहेत. परंतु तीं सर्व बाह्य कारणें आहेत. तीं सर्व दूर करण्याचें सामर्थ्य ब्रह्मचर्यांत आहे. ब्रह्मचर्य म्हणजे च समर्थता. असमर्थता ही कल्पना ब्रह्मचर्यापुढें टिकूं शकत नाहीं. म्हणून वैधव्यांतली स्त्रियांची दीन स्थिति ही ब्रह्मचर्याची स्थिति नव्हे. या शाळेचें हें च वैशिष्ट्य होतें. येथें समोरच्या राष्ट्रीय शाळेंत, शेजारच्या आश्रमांत, सर्वत्र ब्रह्मचर्याचा आदर्श मांडलेला दिसत होता. या आदर्शाप्रमाणें कांही मुलींची चित्तवृत्ति इतर सामान्य मुलींपेक्षा पुष्कळ बदललेली होती. येथें हा ब्रह्मचर्याचा आदर्श ठेवला होता याचा अर्थ असा नाहीं कीं, विवाह अधर्म्य आहे, असे कोणी समजावीत होतें. परंतु वातावरण च अशा तऱ्हेचें होतें कीं जेणें करून ब्रह्मचर्य च आदर्श आहे ही गोष्ट लक्षांत येईल. ही गोष्ट स्त्रिया आणि मुली यांच्यासमोर मुळीं च कोठें हि नसतें. ज्याच्या ठिकाणीं हा आदर्श परिपूर्ण बाणला होता त्या आचार्यांच्या भोवतीं हें वातावरण कसें उभें राही याचें एक च साधें उदाहरण दिलें तरी पुरेसें आहे. या शाळेंतील एका मुलींचें पुढें कालांतरानें लग्न झालें. ती हकीकत दुसऱ्या एका मुलीला पत्रांत कळवीत असतां आचार्यांनी ज्ञानेश्वरांची पुढील ओवी लिहिली.

**आतां अविवेक कुमारत्वा मुकले । जया विरक्तीचें पाणिग्रहण जाले**

ज्ञानेश्वरांनीं

**कीं हे गुणकुसुमांची माळा । घेवोनि मुक्तिबाळा**
**वैराग्यनिरपेक्षाचा गळा । गिंवसित असें**

असें ब्रह्मचर्याचें ब्रह्ममय, वैराग्यमय वातावरण ठिकठिकाणीं उभें केलें आहे. हें महद्‌भाग्य आहे. हें च महद्‌भाग्य या शाळेंत होतें. हें जसें महद्‌भाग्य होतें त्याप्रमाणें देशांतील मोठमोठ्या घडामोडी हि त्यांना पाहावयास मिळत. आश्रमानें केलेल्या अस्पृश्यतानिवारण, शिंदीचीं झाडें तोडणें, इत्यादी चळवळींत मधून मधून शंकरअण्णा व मुली प्रेक्षकाप्रमाणें येत असत. आश्रमाची सत्याग्रहाची चळवळ, ग्रामसेवेची चळवळ यांच्या हि वार्ता त्यांना प्रत्यक्षही कळत. प्रत्यक्ष आश्रम जप्त होऊन आश्रमावर पहारा बसल्याचें हि त्यांनीं पाहिलें. एकामागून एक आश्रमाची मंडळी पकडली जात तो देखावा त्यांच्या डोळ्यापुढें च असे. महात्माजींच्या आगमनामुळें अनेक देशभक्तांचें दर्शन त्यांना घडे. अशाप्रकारें देशासंबंधीची चळवळ त्यांना पुष्कळशी प्रत्यक्ष जीवनामधून च कळे. ही हि लहान गोष्ट नव्हती.

अशी ही शाळा आरंभीं ठरल्याप्रमाणें तीन वर्षें चाललीं. त्यानंतर शंकरअण्णा भाजेकर यांनी १९३१ जूनला राजीनामा दिला. त्यांना राहण्याविषयी आग्रह केल्यामुळें ते १९३१ सप्टेंबरपर्यंत राहिले. त्यानंतर ते गेले. शाळा तशी चालू च होती. मुलींना नाना कुळकर्णी वगैरे राष्ट्रीय-शाळेंतील शिक्षक शिकवीत होते. पुढें महात्माजींनीं साबरमती आश्रमाचा त्याग केल्यानंतर तेथील सर्व मुली येथें आल्या. आणि कन्याशाळेचें रुपांतर ‘कन्याश्रमांत’ झालें. वारुबाई दास्ताने हि परत भूसावळला गेल्या आणि या शाळेचें कार्य समाप्त झालें.

●●●

अनुक्रमणिका

## प्रकरण ३८ वें

## मूळ विचारपोथी

**चार** इंच रुंदी. नऊ इंच लांबी. ताडपत्री पोथीप्रमाणें उभट आकार. ताडपत्री पोथीचीं सर्व पानें स्वतंत्र आणि सुट्टी असावयाची. पण ही पोथी शिवून घेतलेली, वरच्या पानाला पांढरी खादी पुठ्यादाखल लावलेली. त्यामुळें हा कापडी पुठ्ठा वाटेल तसा वळावा आणि आंतील पानांचें संरक्षण हि व्हावें अशी योजना. पोथी आडवी लिहितात. ही उभी च लिहिलेली. काळ्याभोर शाईचें ठसठशीत धांवतें अक्षर. प्रत्येक विचारावर आंकडा—आणि लिहिणें संपलें कीं, त्या दिवसाची बाजूला तारीख.—अशा या विचारपोथीच्या सहा वह्या दिसावयाला किती साध्या! किती सुटसुटीत!! किती मोहक!!! पूज्य बापूजींनीं अनासक्तीयोग लिहीला. तो लिहीत असतां हुबेहूब अशा च वह्या वापरल्या होत्या. विचारपोथीच्या ह्या वह्या करविल्या त्या बापूजींच्या अनासक्तियोगाच्या वह्यांचा आकार पाहून च. बापूजींच्या वह्यासारख्या म्हणून का ह्या वह्या मोहक म्हणावयाच्या? का जुन्या ताडपत्री ऋषीमुनींच्या पोथ्यासारख्या म्हणून ह्या वह्या मोहक समजावयाच्या? हीं दोन कारणें केवळ भावनेच्या बाजूचीं झालीं. खरें कारण वेगळें च. तें कारण अगदीं भिन्न आहे. ह्या वह्यांत लिपिबद्ध झालेले दिव्य विचार हें च त्या वह्यांच्या मोहकतेचें खरें कारण. बाकी आकार ही केवळ बाह्य वस्तु. या पोथीचें वाटेल तें पान उघडावें आणि कोठें हि नजर फिरवावी. पाहिल्याबरोबर कोणाच्या हि मनांत—

**साजिरें अमृत पाझरे तुझ्या हृदि साच तुझ्या हृदि साच**
**आनंद करितसे नाच एकला ।**
**भावना सकल पावना सुखावह वाहे सुखावह वाहे**
**त्वद्हृदीं मधुरता मोहे रंगली ।**
**अव्यक्त करुनि सुव्यक्त मूक तव भाषा मूक तव भाषा**
**जीवींच्या मधुरा आशा हंसवी ।**
**आपुलें सकल हि भलें उधळिसी सार उधळिसी सार**
**संसार सकल निःसार मानुनी ।**
**पाहुनी तुजकडे क्षणीं बंधनें गळती बंधनें गळती**
**कीं दिव्यस्वप्नें फळती सकल हि ।**

हा च उद्गार उदित व्हावा यांत शंका नाहीं.

अशा या मूळ विचारपोथींत एकंदर ८०५ विचार लिहिले गेले. तारीख ७ डिसेंबर १९२८ ला लेखनाला प्रथम सुरवात झाली. समाप्तीची तारीख नाहीं. तथापि जवळ जवळ समाप्तीची अलीकडची तारीख मात्र आहे. १७ मार्च १९३१ ला ७८३ विचार समाप्त झाले. या नंतर पुढे फक्त २२ विचार लिहिले गेले, असें म्हणण्यास हरकत नाहीं. वास्तविक शेवटच्या विचारावर च तारीख नाहीं असें नाहीं. मध्यंतरीच्या कित्येक विचारांवर तारखा नाहींत. विचारपोथींत जरी बहुतेक दररोज विचार लिहिलेले आढळतात तरी कित्येक दिवस मधून मधून खंड हि पडलेला दिसतो. तरी रोज सरासरी दोन तरी विचार लिहिले गेले असें म्हणतां येतें. सुरुवातीला कित्येक दिवस रोज पांच पांच सात सात विचार हि लिहिलेले दिसतात. परंतु मध्यंतरी मात्र रोज नियमानें एक च विचार लिहिलेला आढळतो. तो च तो च विचार क्वचित् दोनदां हि

आढळेल. नवीन बांधलेल्या आश्रमाच्या इमारतीच्या शेवटच्या हॉलमध्ये किंवा गच्चीवरील खोलींत संध्याकाळची प्रार्थना समाप्त झाल्यानंतर आचार्यानें ५/१० मिनिटांत हे विचार लिहावे आणि एका क्षणांत आंथरुणावर पडल्याबरोबर झोपीं जावें असा देखावा त्या वेळीं रोज दिसून येई.

इतकें भव्य आणि इतके अपूर्व विचार लिहिल्यानंतर त्या विचारांचे कांहीं थोडे तरी तरंग चित्तांत तरंगत राहतील आणि झोपेंत बिघाड होईल असें मुळीं च व्हावयाचें नाहीं. आचार्यांचे हे विचार आचार्यांच्या आधीन होते. ते त्याचे मालक नसून हा मात्र त्यांचा चालक होता. त्यामुळें त्यांचा त्याच्या चित्तावर बोजा पडणें अशक्य होतें. विचार किती हि चांगले असोत, ज्या विचारांमुळें चित्त क्षुब्ध होतें, चित्तांत खळबळ माजते, ते विचार आध्यात्मिक भूमिका वाढवूं शकत नाहींत. अशा विचारांमुळें फार तर बौद्धिक कसरत होऊं शकेल. ज्या विचारांनीं चित्त परम शुद्ध आणि म्हणून परम शांत होतें ते विचार च आध्यात्मिक पुष्टी देऊं शकतात. अशा आध्यात्मिक विचारांचा च अखंड विकास होत राहतो. बाकीचे विचार केवळ खळबळ उत्पन्न करून अव्यक्तांत विलीन होतात. बीं पेरल्यावर तें जसें कांहीं काळ जमिनींत स्वस्थ, शांत आणि समाधिस्थ होऊन जातें. मग योग्य वेळीं कोंब फुटून तें वर येतें. वर आल्याबरोबर त्याचा विकास एकसारखा होऊं लागतो, त्याप्रमाणें रात्रींच्या वेळीं मनोभूमिकेंत हे ४/२ विचार टाकून दिलें कीं रात्रभर अव्यक्तपणें ते पडून रहावे आणि सकाळीं पुन्हां नवीन विचारांचे कोंब त्या विचाराला फुटू लागावे, अशी ही आध्यात्मिक विचारांची शेती आचार्यांच्या जीवनांत अखंड चालत आलेली होती. त्या च शेतीच्या समृद्धीचा परमोत्कर्ष विचारपोथीं लिहिण्याच्या वेळीं झालेला होता. विचारपोथी लिहिल्यानंतर १४ वर्षांनीं १९४२ सालीं जेव्हां ही विचारपोथी छापावी अशी कल्पना निघाली, तेव्हां आचार्यानें प्रस्तावनेदाखल जे दोन शब्द लिहिले त्यांत ही गोष्ट नमूद आहे. “वयाच्या तेतीसाव्या वर्षी मला एक नवखा अनुभव आला. त्याचें स्वरूप मी शद्बांत कधीं च मांडूं शकलों नाहीं. पण त्यानंतर मन कांहींसें उन्मनल्यासारखें झालें. एकाग्रता सहज व्हावी, विविधाग्रतेला प्रयत्न लागावा, ह्या अवस्थेच्या पहिल्या वेगांत विचार लिहून ठेवण्याची वृत्ति उगवली. सारे च विचार लिहीत नव्हतों. थोडें लिहीत होतों. त्यांची ही विचारपोथी बनली आहे. सुदैवानें ही प्रेरणा फार दिवस टिकली नाहीं. तीन चार वर्षांत मावळली.” —उन्मनी अवस्थेंतल्या सहज एकाग्रतेंतून स्फुरलेल्या विचारांच्या वेगाला केवळ थोडी विश्रांति मिळावी म्हणून ते कागदावर उतरवले गेले. ते हि सर्व च विचार उतरवले गेले नाहींत. अशी या विचारांपाठीमागची मूळ भूमिका आहे. आध्यात्मिक विकासाला जेव्हां साकारता प्राप्त होते तेव्हां आध्यात्मिक विकासाच्या वेगाचा तो केवळ उपशम असतो. आध्यात्मिक विकासाचा वेग हा शद्बांत मांडता येत नाहीं. किंवा कोणत्या च साकार सांत क्रियेनें व्यक्त करतां येत नाही. आध्यात्मिक विकासाचा वेग मूर्तीकार मूर्तींत केंद्रित करूं शकणार नाहीं. चित्रकाराला तो चित्रार्पित करतां येणार नाहीं. गाणाऱ्याला तो गाण्यांत व्यक्त करवणार नाहीं. कवीला तो काव्यबद्ध करणे शक्य नाहीं. या वेगाचा त्या त्या क्रियांनी उपशम होऊन आत्म्याचें “उपशांतो ऽ यमात्मा” हें च सत्यस्वरूप त्यामुळे प्रकट होईल आणि त्या शांतीची अभिनवता तेथें चमकत राहील. आत्म्याचें भव्य, प्रशांत आणि अभिनव स्वरूप प्रकट करणारे हे विचार कागदावर लिहिले गेल्यावर चित्ताची अत्यंत प्रशांत अवस्था व्हावी आणि गाढ झोपेचा अनुभव यावा यामधें मुळीं च नवल नाहीं. पण ही उन्मन झालेल्या मनाची झोप फार वेगळ्या च स्वरूपाची. येथे झोपेच्या गाढतेबरोबर ब्रह्मानुभावाच्या स्वरूपाविष्करणाची अंतर्भूत तयारी चाललेली असते. उन्मन झालेलें चित्त झोपीं गेलें तरी तेथें ती केवळ शून्यावस्था नसते. किंचित् उमललेल्या मोत्याच्या शिंपल्यामधून जसे रमणीय मोती दिसावें त्याप्रमाणें प्रभातकालीं जागृतीनंतर अशा पुरुषाच्या डोळ्यांतून रात्रीच्या गाढ झोपेंत विकास पावलेल्या ब्रह्मविचाराच्या रत्नांचें दर्शन होतें. त्याच्या शब्दांत जादू उत्पन्न होतें. तेथें सर्व शंका सहज फिटल्या जातात.

अनुक्रमणिका

ज्या विचारांच्या लेखनापाठीमागें उन्मन अवस्थेच्या सहज एकाग्रतेच्या वेगांतलें प्रस्फुरण दडलेंलें आहे, ज्या विचारांच्या लेखनानंतरच्या उपशांतींत ब्रह्मानुभावाची रत्नप्रभा झळकत आहे. त्या विचारांचें स्वरूपाविष्करण करणें हें अत्यंत दुर्घट काम आहे. तथापि स्वरूपाविष्करण जरी नाहीं तरी या विचारांचें मूळ कळण्याला मात्र मुळीं च आधार मिळणार नाहीं असें नाहीं. असामान्य संस्थापक आणि प्रवर्तक पुरुषांची ही नेहमीं च पद्धति आहे. त्यांचे विचार, त्यांचे सिद्धांत, त्यांचे चिंतन, त्यांचे प्रयोग, त्यांचे कार्य हें जरी सर्वस्वी अपूर्व, सर्वस्वी नाविन्यपूर्ण, सर्वस्वी असामान्य असलें तरी ते आपल्या नवीन विचारांना, नवीन प्रयोगांना, नवीन सिद्धांतांना, पूर्वविचारांचा आधार घेत असतात. जुन्या झाडावर नव्या झाडाचें कलम करून त्याचीं मधुर फळें ते समाजाला चाखवीत असतात. त्यामुळें नव्याला जुन्याचा जोर मिळतो, आणि जुन्याला नव्याचा तजेला प्राप्त होतो. तोफ जुनी गोळा नवा, धनुष्य जुनें बाण नवा अशा कुशल रीतीनें ते कार्य करीत असतात. पूर्वविचारांचा आदरपूर्वक विचार करून त्यांतून च नवविचारांची दृष्टि ते जगाला देत असतात. I came to fulfil, not to destroy या ख्रिस्तवचनाप्रमाणें त्यांची विचारपद्धति असते. पूर्वश्रुतींचा विध्वंस करण्यासाठीं असे प्रवर्तक प्रवृत्त होत नाहींत. तर पूर्वश्रुतींचा आदरपूर्वक अभ्यास करून शक्य तों त्यांचें आलंबन ते जरूर प्राप्त करून घेतात. म्हणून च “या विचारांना” पूर्वश्रुतींचें आलंबन तर आहे च असें आचार्यांनी म्हटलें आहे. ‘तथापि ते (विचार) आपल्यापरी निरालंब हि म्हणतां येतील’ असें हि आचार्यांनी म्हटलें आहे. आणि तें बरोबर आहे. यांत जी नवीन दृष्टि आहे ती आपल्यापरी निरालंब आहे आणि जें या विचारांना निमित्तकारण आहे त्याला पूर्वश्रुतीचा आधार आहे. असा याचा उलगडा आहे. या पूर्वश्रुतीच्या आधारावरून याविचारांचें किंचित् अवलोकन करणें शक्य होईल.

ज्याप्रमाणें या विचारांना एका बाजूनें पूर्वश्रुतीचें आलंबन आहे त्याप्रमाणें खुद्द आचार्यांच्या पूर्वलेखाचें आलंबन हि यांतील कित्येक विचारांना प्राप्त झालेंलें आहे. आचार्यानें विचारपोथी लिहिली तिच्या पहिल्या च पानावर विचारपोथीसंबंधी जे चार शब्द लिहिले आहेत त्यांत ही गोष्ट येऊन गेलेली आहे. “यापूर्वीचा माझ्या लिखाणांतील निष्कर्ष हि यांत येऊन जातो” अशा शब्दांत आचार्यांनी ही गोष्ट मांडली आहे. आणि त्याप्रमाणें महाराष्ट्र-धर्मांतील कित्येक लेखांचा निष्कर्ष आणि कित्येक लेखांतील हूबेहूब तीं च वचनें विचारपोथींत आलेलीं आहेत.

ज्या प्रमाणांत या विचारांना आचार्यांच्या पूर्वलेखांचा आधार मिळाला त्याच्या मानानें किती तरी अधिक प्रमाणांत या विचारांना पूर्वश्रुतींचें आलंबन प्राप्त झालें आहे. ज्ञानेश्वरांनी “नाहीं श्रुतिपरौति माउली जगा” असें म्हटलें आहे तें यथार्थ नाहीं असें कोण म्हणेल?

परंतु खरोखर बहुधा प्रत्येक व्यक्तीची आई ही च त्याची पहिली श्रुति असते. तिच्या मागून मग इतर श्रुतींची ओळख व्यक्तिमात्राला होत असते. या दृष्टीनें या विचारांत प्रत्यक्ष आईचीं वचनें तर आहेत च. परंतु अस्पष्टपणें अनेक विचार आईच्या अनेक उद्गारांवरून स्फुरलेले आहेत असें म्हणण्याला पुष्कळ ठिकाणीं आधार सांपडतो. फक्त दोन च दाखले घेऊं.

**रामावतारीं देवानें उदंड सेवा घेतली ।**
**कृष्णावतारीं उदंड सेवा केली ॥**

या विचाराचें मूळ आईच्या गोष्टी सांगण्यांत च आहे, यांत संशय नाहीं. आयुष्यभर रामाची रात्रंदिवस सेवा केल्यामुळें लक्ष्मणानें एकदां रामाला सांगितलें. आतां पुढें अवतार घेण्याची पाळी येईल तेव्हां मी ‘लहान’

अनुक्रमणिका

भाऊ होणार नाहीं. त्याप्रमाणें मग कृष्णावतारीं लक्ष्मण मोठा भाऊ झाला." ही गोष्ट आई गंमतीनें अनेक वेळां सांगत असे. त्यावरून हा विचार सुचलेला दिसतो.

पुरुष दिव्यासारखा आहे. वीर्य तेलाच्या जागीं आहे.
रोज संध्याकाळीं दिवा लावल्यावर दिव्याला नमस्कार करण्याला आई शिकवी. त्या आलंबनावर च हा विचार उभारला आहे.

**'माझी त्रयी आई, गीता आणि तकली'**

हा विचार हि मातृभक्तींतून च उद्भूत झाला आहे हें उघड आहे.

ज्या प्रमाणांत या विचारपोथींत मातृभक्तींतून अनेक विचार उद्भूत झाले. त्यापेक्षां किती तरी पट अधिक विचार गीतामाउलीच्या भक्तीमधून उत्पन्न झालेले आढळून येतील. विचारपोथीचा जवळ जवळ अष्टमांश भाग गीताविषयक विचारांनीं व्यापून टाकला आहे. आईच्या मरणानंतर केवळ गीतेच्या च दुधावर मी पोसलों आहे. ही भावना ज्याच्या रोमरोमांत भिनून गेली, त्या आचार्यांच्या विचारांत गीतेला आद्य स्थान मिळावें हें अगदीं स्वाभाविक म्हटलें पाहिजे. परंतु आचार्यांच्या ठिकाणीं गीतेविषयीं भक्ति असली किंवा प्रेम असलें तरी उगीच च ते च ते च शिळे विचार घोळून घोळून लिहावे अशी त्याची स्थिति नसे. प्रेमाला कदाचित् पाल्हाळ खपेल, पण सत्याला पाल्हाळ मुळीं च चालत नाहीं. म्हणून अत्यंत योग्य आणि मोजक्या शब्दांत नवीन विचार आणि नवीन सिद्धांत असेल तर च तो लिहिला जावा ही आचार्यांची पद्धति गीताविषयक विचारांत हि आढळून येते.

"ब्राह्मी स्थिति—जेथून खालीं पडणें नाहीं.
ब्रह्मनिर्वाण—जेथून खालीं पडणें नाहीं आणि वर चढणें हि नाहीं"
हा विचारपोथींतला गीताविषयक पहिला च विचार. या विचारांत दोन्ही अवस्थांचें परस्परतुलनेनें थोडक्यांत उत्तम दर्शन करून दिलेंलें आहे.

**"यस्मान्नोद्विजते लोको लोकान्नोऽद्विजते च यः ।"**

कारण लोकांना सेवक हवा असतो तो भक्त मिळतो. भक्ताला से य हवें असतात ते लोक मिळतात"—या विचारांत भक्त आणि लोक यांची सांगड जुळण्याचें कारण नमूद केलें आहे.

"क्रोधी पुरुषाच्या मौनानें त्याचें मौन सिद्ध होत नाहीं. क्रोध सिद्ध होतो. क्रोधी पुरुषाच्या वक्तृत्वानें त्याचें वक्तृत्व सिद्ध होत नाहीं. क्रोध सिद्ध होतो. ज्ञानी पुरुषाच्या कर्माने त्याचें कर्म सिद्ध होत नाहीं. ज्ञान सिद्ध होत. ज्ञानी पुरुषाच्या अकर्मानें त्याचें अकर्म सिद्ध होत नाहीं ज्ञान सिद्ध होतें."—या विचारांत ज्ञानोत्तर कर्म कीं, संन्यास हा जो वृथा वाद ज्ञानी पुरुषाच्या बाबतींत कल्पीत असतात त्याचें थोडक्यांत निराकरण केलें आहे—असे गीतेंतील अनेक गूढ आणि सूक्ष्म अर्थ सहज लीलेनें उलगडलेले या विचारपोथींत मधून मधून आढळून येतात. प्रजावत्सल राजानें ज्याप्रमाणें जिकडे तिकडे रस्ते, विहिरी, बागा, पाणपोई, धर्मशाळा, मठमंदिरें, विद्यालयें, रुग्णशाळा इत्यादि लोकोपयोगी कामें करून आपल्या वैभवाचा आविष्कार करावा त्याप्रमाणें गीताविषयक विचारांचें या विचारपोथींत ठिकठिकाणीं अत्यंत

अनुक्रमणिका

हितकारक असें दर्शन होऊन गीतेच्या वैभवाचें उत्कृष्ट आविष्करण झालें आहे. तरी सहज लिहिले गेले तेवढे च गीताविषयक विचार या विचारपोथींत समाविष्ट झाले. यामधून च पुढें स्वतंत्र "गीताईचिंतनिकेचा" उद्‌भव झाला.

गीतामाउलीप्रमाणें च प्रत्यक्ष वेदोपनिषदांशी हि आचार्यांचा गाढ संबंध असल्यामुळें वेदोपनिषदांवरून सुचलेले अनेक विचार विचारपोथींत आलेले आहेत. वेदासंबंधींचे दोन च विचार पाहूं—

"वेद प्रामाण्य म्हणजे पूर्वपरंपरेविषयीं कृतज्ञताबुद्धि आणि नवीन पराक्रमाला स्फूर्तियुक्त मोकळीक."

"वेद एकं सत् म्हणतो पण त्याबरोबर च 'विप्रा बहुधा वदंति' असें हि म्हणतो. 'मूढा बहुधा वदंति' म्हणण्याची त्याची तयारी नाहीं. ह्यांत वेदाची अविरोधवृत्ति दिसून येते."

वेदासंबंधींच्या ह्या दोन विचारांवरून श्रुतीची अंतर्बाह्य व्यापक आणि उदात्त दृष्टि कशी स्पष्ट केली गेली आहे हें लक्षांत येईल. यानंतर उपनिषदें.

सद्‌गुरूच्या पवित्र सान्निध्यांत जें गूढ ज्ञान प्रकट झालें, ज्याच्या वाक्यसमन्वयार्थ वेदांत सूत्रांची प्रवृत्ति झाली. त्या रमणीय उपनिषद्विचारांवरील विचारांना विचारपोथींत

**मग काश्मीरीचे स्वयंभ ।**
**का रत्नबीजा निघाले कोंभ ॥**

अशा तऱ्हेचें स्वरूप प्राप्त झालेंलें आहे. ईशावास्योपनिषदांतील अत्यंत वादग्रस्त शब्द म्हटले म्हणजे संभूति आणि असंभूति हे होत.

"असंभूति—कुवासनांची अनुत्पत्ति आणि विनाश
संभूति—सद्‌भावनांची उत्पत्ति आणि विकास"

किती हे रमणीय विचार! रत्नबीजाला निघालेले हे कोंब च नव्हेत काय? तशींच उपनिषदांतील चार महावाक्यें

"प्रज्ञानं ब्रह्म—अद्वैतज्ञान
अयमात्मा ब्रह्म—ईश्वरसाक्षात्कार
अहं ब्रह्मास्मि—आत्मानुभव
तत्त्वमसि—विश्वोद्धार

या विचारांत ब्रह्मसिद्धांताची चढती विकासश्रेणी दिग्दर्शित केली आहे. अशा चढत्या पायऱ्यांचें दर्शन विचारपोथींत अनेक वेळां आणि अनेक प्रकारानें घडतें. ब्रह्मविचारांच्या ह्या सोपानपरंपरेवरून प्रत्यक्ष ब्रह्मविचाराची आनंदमयता कल्पनाग्राह्य होण्याला मुळीं च अडचण नाहीं.

अनुक्रमणिका

आईची अनुभवसिद्ध वचनें, गीता माउलीचें अद्‌भूत वैभव, वेदांची व्यापक आणि विशाल दृष्टि, उपनिषदांतील रमणीय ब्रह्मसिद्धांत इत्यादि सर्व विचारांना ज्या व्रतांच्या द्वारें आचाराच्या कक्षेंत आणलें जावयाचें त्या स्वतःच्या प्राणप्रिय व्रतासंबंधीचे दीर्घ मननावर आणि अनुभवावर उभारलेले या विचारपोथींतले विचार ही या विचारपोथींतली एक विशेष वस्तु आहे असें मानण्यास मुळींच हरकत नाहीं. “सुताराला जसें भूमितीच्या सिद्धांतांची निष्ठा वाटतें, तसें सेवकाला किंवा साधकाला अहिंसादिव्रतांचें निष्ठा वाटावी” असा सर्व व्रतांविषयीं विचार प्रकट करून आचार्यांनी जीवनांतील अभयप्राप्तीचा रस्ता दाखविला आहे. अशा “अहिंसक पुरुषाला सिंहावलोकनाची हि जरूर नाहीं. कारण त्याच्या हातून हिंसा च झालेली नसते. त्याला सिंहाप्रमाणें भीतीनें मागें वळून पाहण्याचें कारण च काय?” असा हि विचार विचारपोथींत आला आहे. असा निर्भय पुरुष जगाला सहज वश करतो कारण अहिंसेबरोबर अस्तेयादि व्रतें हि तो आपल्या ठिकाणीं सिद्ध करतो. आचार्य म्हणतात, “अस्तेयानें मी जग जिंकतों. अपरिग्रहानें तें सोडतों.” या आचार्यांच्या विचारांत समर्थ रामदास स्वामींच्या झोळींत शिवाजी महाराजांनी संपूर्ण राज्याची सनद टाकली आणि समर्थांनी ती सनद तशी च परत केल्याचें चित्र दिसून येत नाहीं काय?—अपरिग्रही मनुष्य च असें सर्व राज्य परत करूं शकतो. कारण त्याच्या मनांतलीं सर्व मनोराज्यें लयाला गेलेलीं असतात. “मनांत सांचलेली अडगळ साफ करून मन मोकळें करणें हें अपरिग्रहाचें कार्य आहे.” असा बाबतींतला विचार आचार्यांनी लिहून ठेवला च आहे. “अस्तेय पद्धतींचें नियमन करतें अपरिग्रह प्रमाणाचें फलतः दोन्ही एक च आहेत.” या विचारांत आचार्यांनी दोन्ही व्रतांच्या परस्पर तुलनेनें, परस्परसंबंध आणि परस्परांचें अंतिम ऐक्य दाखविलें आहे. अशा अहिंसादि सर्व व्रतांचा राजा ‘सत्य’ आहे. सत्याची कल्पना आचार्य पुढीलप्रमाणें देतो—“सत्याची व्याख्या नाहीं. कारण, व्याख्येचा च आधार सत्यावर आहे.” साधकाला आचार्यांचे विचारपोथींतील विचार मोक्षमार्गांत किती मदत करतील याला खरोखर उपमा च देतां येत नाहीं. निर्जन वनांत रात्रीं चुकलेल्या आंधळ्या मनुष्याला जसा त्याचा प्रत्यक्ष डोळस नातलग च एकाएकीं भेटावा अशी या विचारदर्शनाची स्थिति आहे. अस्वादव्रताची प्रगति कशी ओळखावी? हा एक च प्रश्न घ्या. याचें उत्तर काय देणार? आचार्यांनी याचें उत्तर पुढीलप्रमाणें दिलें आहें :—

(१) प्रत्यक्ष-स्वादसंशोधन
(२) शारीरिक-स्वास्थ्य संशोधन
(३) काम-क्रोधादिविकार-संशोधन
(४) अज्ञान-संशोधन

या चतुर्विध कसोटीच्या अनुरोधानें साधकानें रोज अस्वादव्रताची प्रगति खुशाल बिनधोक करीत जावी. गणित सोडविल्यानंतर तें बरोबर आहे किंवा नाहीं, याचा ताळा मुलें पहात असतात. असे अनेक आध्यात्मिक ताळे कसे पाहावे हें विचारपोथीवरून साधकाला शिकतां येतें.

गणिताच्या बिनचूक पद्धतीने मांडलेले अनुभवसिद्ध अध्यात्म कसें असतें हें पाहाण्याचे विचारपोथीसारखें दुसरें साधन क्वचित च मिळूं शकेल.

“दोन बिंदु निश्चित झाले कीं सुरेखा निश्चित होते. जीव आणि शिव हे दोन बिंदु कायम केलें कीं परमार्थ-मार्ग तयार झाला.”

“जीवन हें विचार, अनुभव आणि श्रद्धा यांचे घनफळ आहे.”

अनुक्रमणिका

“कर्म अकर्म
पण ज्ञान + कर्म = ज्ञान + अकर्म
म्हणून ज्ञान = अनंत”

“आत्मविषयक अज्ञान हें प्राथमिक अज्ञान. आपल्या ठिकाणीं हें अज्ञान आहे याची जाणीव नसणें म्हणजे तें ‘अज्ञानाचें अज्ञान’ किंवा गणिताच्या भाषेत ‘अज्ञान-वर्ग’. आपण ह्या अज्ञानवर्गात सामील आहोंत या गोष्टीचा इनकार करणें म्हणजे ‘अज्ञान-घन.’ ह्याला च विद्वत्ता म्हणतात.”

“संस्कृतांत ‘हन्’ म्हणजे मारणें आणि ‘हन्’ म्हणजे गुणणें. हिंसेनें पापाचा गुणाकार होतो.”

विचारपोथींत प्रत्यक्ष असे गणिताच्या भाषेंत मांडलेले सिद्धान्त तर आहेत च. परंतु गणिताची भाषा वगळून, परंतु गणिताच्या बिनचूक पद्धतीचे अनेक सिद्धान्त अनेक शास्त्रांच्या भाषेत विचारपोथींतल्या प्रत्येक पानावर विराजमान झालेले आहेत, असे म्हणण्यात मुळीं च अतिशयोक्ति नाहीं. गणिताच्या भाषेप्रमाणें च व्याकरणाच्या भाषेंत विचार—

“संसाराचीं तीन लिंगे—
१ अहंकार—पुल्लिंग, २ आसक्ति—स्त्रीलिंग, ३ असत्य—नपूंसकलिंग.
गणिताच्या भाषेप्रमाणें च ज्योतिषाच्या भाषेतील विचार—

“असत्यांतून सत्यांत अंधारांतून उजेडांत मृत्यूंतून अमृतात—हे साधकाचें उत्तरायण” गणिताच्या भाषेंप्रमाणे च वास्तु शास्त्राच्या भाषेतील विचार—

“मनुष्य—घर
गुण—दरवाजा
दोष—भिंती.”
गणिताच्या भाषेप्रमाणें च न्यायशास्त्राच्या भाषेंतील विचार—
“विश्व—प्रत्यक्ष-ब्रह्म
ईश्वर—अनुमान-ब्रह्म
वेद—शब्द-ब्रह्म
आत्मा—ब्रह्म.”
गणिताच्या भाषेंप्रमाणें च बालकथाशास्त्राच्या भाषेंतील विचार—

“कोणी कर्मयोगाला पिपीलिका आणि ध्यानयोगाला विहंगम म्हणतात. मी कर्मयोगाला इसापनीतींतल्या कासवाची आणि ध्यानयोगाला सशाची उपमा देतों. ध्यान करतां करतां केव्हां झोंप लागते, हें ध्यानांत येत नाहीं.

गणिताच्या भाषेप्रमाणें च कृषि शास्त्राच्या भाषेंतील विचार—
“रोप जमिनींत लावलें म्हणजे त्याला जमिनींतून पोषण मिळते. तसे चित्त आत्म्यांत रोवलें म्हणजें त्याला आत्म्यांतून पोषण मिळतें.”

अनुक्रमणिका

गणिताच्या भाषेप्रमाणेंच यंत्रशास्त्राच्या भाषेंतील विचार—

“कर्मयोगाचें यंत्र सख्त राखावें. घर्षणाच्या भीतीनें ढील करूं नये. घर्षण टाळण्यासाठीं भक्तीचे तेल द्यावें.”

“एखादा नाटककार जसा स्वतः नाटक रचून नाटकाच्या प्रयोगांत हि स्वतः सामील होतो, तसें ईश्वराचें आहे. ईश्वर विश्वरूप नाटक रचून त्यांतला आत्म्याचा पार्ट स्वतः करीत असतो. तत् सृष्ट्वा तदेवानुप्राविशत्” ।

गणिताच्या भाषेंप्रमाणे च अर्थशास्त्राच्या भाषेंतील विचार—
“संन्यास ही नोट आहे.
कर्मयोग नाणें आहे.
किंमत एक च.”

गणिताच्या भाषेप्रमाणें च पूजाशास्त्राच्या भाषेंतील विचार—
“आत्मा एक. माया शून्य. एक आणि शून्य यांच्या संयोगानें असंख्य जग. ही च लिंगोपासना.”
गणिताप्रमाणें च निश्चित शिक्षणशास्त्रांतला सिद्धांत—
“जो गुरु असेल तो शिष्य असेल च.
जो शिष्य नसेल तो गुरु नसेल च.”

“का याचा ‘नायक’ म्हणून कोणी व्यक्त नसतो. काव्यांतील सर्व व्यक्तींची सामुदायिक अव्यक्त योग्यता हा च काव्याचा नायक.”

गणिताप्रमाणें च निश्चित सांख्यशास्त्रांतील सिद्धांत—
“बुद्धीचा सदुपयोग—सत्त्वगुण
बुद्धीचा दुरुपयोग—रजोगुण
बुद्धीचा अनुपयोग—तमोगुण.”
गणिताप्रमाणें च निश्चित अन्नशास्त्रांतील सिद्धांत—

“आहार्य अन्नाची वृत्तिभेदानें त्रिविध परिणति होते. लैंगिक, प्राणिक आणि आत्मिक.” गणिताप्रमाणें च निश्चित योगशास्त्रांतील सिद्धांत—

“निद्रा आणि जागृति ह्या दोहोंचे गुण मिळून समाधि बनते. दोहोंचे दोष मिळून स्वप्न बनतें.”

गणिताप्रमाणें च निश्चित असा धर्मशास्त्रांतील सिद्धांत—

“उपयोगिता हें धर्माचें शरीर आहे, चित्तशुद्धि आत्मा.”

अनुक्रमणिका

अशीं उदारहरणें देतां देतां मूळ विचारपोथी च येथें उतरवावी लागेल. गणिताच्या पद्धतीप्रमाणें अनेक शास्त्रांचे अध्यात्माला पोषक असे सिद्धांत मांडणे ही विचारपोथीची एक अपूर्व लेखनपद्धति आहे. विधान करणे हा वाक्याचा उद्देश असतो. वाक्यांतील विधानाला विशिष्ट साच्यांत ओतलें म्हणजे तेथें अलंकारनिर्मित होते. काव्यांतील बहुतेक अलंकार म्हणजे सादृश्याच्या विशिष्ट मुशींत ओतलेलीं वाक्यें होत. काव्याच्या हि पुढें सबंध लेखनाचा जो साचा ती च काव्यशास्त्रांतली रीति किंवा शैली होय. लेखनांत जेथे जेथें विशिष्ट भावनेचा गाढपणा उत्पन्न होईल तेथें विशिष्ट रस निर्माण झाला असे म्हणतात. विचारपोथींतील वाक्यलेखनपद्धति ही काव्यलेखनपद्धतीप्रमाणे विशिष्ट ठशाची नाहीं. येथें केवळ सादृश्यावर वाक्यें रचलीं नाहींत. येथली वाक्यरचना सिद्धांतावर उभारलेली आहे. प्रसंगविशेषी येथे सर्व शास्त्रांतल्या भाषेचा सहज उपयोग करण्यांत आलेला आहे. म्हणून अमुक एक विशिष्ट ठसा येथें पाहण्याला सांपडत नाहीं. त्याचप्रमाणें अमुक एक भावना घोळवलेली कोठें हि दिसून येत नाहीं. रस म्हणजे भावनेचा विलास. येथें विलासाला स्थान च नाहीं. येथें आनंदलब्धि आहे, विकास आहे. पण रसांतली आसक्ति येथें नाहीं. संस्कृत काव्यशास्त्रांतला शांत रस हि विषयाची उद्विग्नता गाढपणें व्यक्त करतो. पण येथें ती अवस्था नाहीं. विनाकारण ती च ती च लौकिक गोष्ट चघळत राहणें आणि त्याला रस कल्पिणें ही गोष्ट येथें नाहीं. विकासाची चढती पायरी, नवीन दर्शनाचा आनंद, ज्ञानाच्या अनंत आकाशांतली भरारी— अशा तऱ्हेचा रस येथें भरलेला आहे, रस हा गौण आहे. जेथें नवीन ज्ञानाची उपलब्धि आहे तेथें सर्व रसांचा गर्व उतरविणारा अपूर्व रस आपोआप उत्पन्न होत असतो. म्हणून कोणत्या हि रसाला येथें स्थान नाहीं. त्याचप्रमाणें कोणती हि विशिष्ट लेखनपद्धति येथें अवलंबलेली नाहीं. म्हणून स्वतः आचार्यांनी ‘हे विचार जवळ जवळ निराकार आहेत असें या विचारांसंबंधीं म्हटलें आहे. उत्तम उत्तम पुष्पांची विशिष्ट रचना करून त्याचा एखादा सुंदर हार तयार करावा, ही सुभाषितांची पद्धति आहे. सुभाषितांत आंतील विचारांपेक्षां रचनेच्या आकाराला महत्त्व अधिक असतें. सामान्य विचार हि मनोहर आकारानें चित्तावर ठसतो. वाचेनें त्याचा उच्चार करण्यांत आनंद वाटतो. म्हणून सुभाषिताची रचना विशिष्ट आकारानें केली जाते. ती हि दृष्टि येथें नाहीं. हें आचार्यांनी स्वतःच स्पष्ट केलें आहे. येथें आध्यात्मिक सिद्धांत जरी अनेक शास्त्रांच्या भाषेंत मांडले गेले असले तरी शास्त्राच्या मांडणीची कर्कशता किंवा सौत्रिक पद्धति येथें अवलंबिलेली नाहीं. एक विचार दुसऱ्या विचाराशीं विशिष्ट तर्कानें जोडून एक सबंध तर्कप्रणालिका निर्माण करणें हें सौत्रिक शास्त्ररचनेचें कार्य असतें. जीवनांतील सत्य ठसविण्यापेक्षां तें विशिष्ट रसमय पद्धतीनें मांडणें हें काव्यादि कलांचें कार्य आहे. म्हणून काव्यादि कला किंवा तर्कादि शास्त्रें हीं तंत्रनिष्ठ असतात. तीं सत्यनिष्ठ नसतात. त्यांचा सत्याशीं विरोध असतो असा अर्थ नाहीं. त्यांना सत्याचा आधार असतोच. परंतु त्या आधाराचा आश्रय घेऊन तीं आपापल्या पद्धतीचा डौल उभारीत असतात. आणि त्यामुळें त्यांच्या ठिकाणीं फसवेपणा निर्माण होतो. आध्यात्मांत मात्र तंत्रनिष्ठा नसून सत्यनिष्ठा असते किंवा मंत्रनिष्ठा असते. ही च गोष्ट विचारपोथीला प्रस्तावनेदाखल लिहिलेल्या निवेदनांत आचार्यांनी स्पष्ट केली आहे. “सूत्राला तर्कबद्धता पाहिजे असते. हे (विचार) मोकळे आहेत. मग त्यांना नांव काय द्यावयाचें? मी त्यांना अर्धवट पुटपुटणें म्हणतो. अल्प वस्तूला मोठें नांव दिलें तर हें मांत्रिक साहित्यांत मोडतील”—जीवनांतील मंत्र येथें प्राप्त होईल. येथें मंत्रनिष्ठ म्हणजे सत्यनिष्ठ विचारपद्धति ही च खरी पद्धति आहे हें लक्षांत ठेवलें पाहिजे. शास्त्र आणि कला दोन्ही तटांना स्पर्श करून ही जीवनांतील मंत्रांची नदी अलिप्तपणें वाहत आहे. त्यामुळें एखाद्या विचाराला एखाद्या शास्त्राचा पोषाख दिसेल, तर एखाद्या विचाराला एखाद्या कलेचा स्पर्श झालासा वाटेल. पण खरें म्हटलें म्हणजे दोन्ही भास च. सत्य हें सत्य च. त्याला आकार नाहीं. पाणी ज्या भांड्यांत ठेवावें त्याचा त्याला आकार प्राप्त होत असतो. म्हणून काय कोणी पाण्याला अमुक एक आकार आहे असें थोडेंच मानतो?

विचारपोथींतील विचारांना एका बाजूनें शास्त्रीय पद्धतीचा स्पर्श झाल्याचा भास निर्माण होतो ही एक बाजू मागील उदाहरणांवरून पाहिली. त्याप्रमाणें च दुसऱ्या बाजूनें विचारपोथींतील विचारांना काव्यादि कलांच्या तंत्राचा किंचित् स्पर्श झालेला दिसेल असे हि विचार या विचारपोथींत आढळून येतील. उदाहरणार्थ—

मालालंकाराप्रमाणें च भासमान होणाऱ्या व्याख्यामाला—

"ईश्वराची सत्ता म्हणजे आत्म्याची अमरता, म्हणजे धर्माची नित्यता, म्हणजे जीवनाची आनंदमयता."

"अखंड नामस्मरण म्हणजे अजपा म्हणजे स्वरूपावस्थान म्हणजे निरंतर सेवा."
"देवावर विश्वास म्हणजे जगावर विश्वास, म्हणजे आत्म्यावर विश्वास, म्हणजे सत्यावर विश्वास."

कारणमाला :—

"जगामुळें 'जगाच्या' डोळ्यामुळें 'रूपाचें' बुद्धीमुळें 'ज्ञान' आत्म्यामुळें 'होतें"
"देवाच्या प्रेमळ स्वभावामुळें देव जगत्पति.
संतांच्या पुरुषार्थामुळें देव सत्पति.
माझ्या प्रार्थनेंमुळें देव मत्पति."

अन्योन्यावलंबन :—

"जी वाणी सत्याला संभाळते त्या वाणीला सत्य संभाळतें."

विरोधाभास :—

"जबाबदारीचें काम मला मिळालें तेव्हांपासून मी जबाबदारींतून सुटलों."

"तुम्हांला भोग सुटत नाहींत, तर निदान देवाच्या नांवानें भोगा. तुम्हांला भोग सुटत नाहींत, तर निदान देवाच्या नांवानें भोगू नका."

श्रृंखला :—

"जिथें पावित्र्य तिथें सौंदर्य । जिथें सौंदर्य तिथें काव्य"

रूपक :—

"वेद जंगल आहे. उपनिषदें गाई आहेत. गीता दूध आहे. संत दूध पीत आहेत. मी उच्छिष्टाची आशा राखून आहे."

अनुक्रमणिका

“स्थूल विकार म्हणजे पक्का खडक. तो भक्तीच्या झऱ्याला तोंड च फुटूं देत नाहीं. स्थूल विकार जिंकले म्हणजे भक्तीचा उगम होतो. पण भक्तीचा उगम झाला तरी सूक्ष्म विकार उरतात च. कच्च्या खडकांतून झरा वाहत राहतो. त्यामुळें आवाज होतो. तीच ‘तळमळ’. सूक्ष्म विकार हि नाहींसे झाले म्हणजे तळमळ गेली. ही परा भक्ति.”

“कर्मयोगी—जळलेली आकृति-मात्र गोवरी
संन्यासी—जळून राख झालेली निराकार गोवरी.”
“कर्मयोगी—पांढऱ्या दुधाची काळी गाय
संन्यासी—पांढऱ्या दुधाची पांढरी गाय.”

उपमा :— “कर्मयोगी—सूर्याप्रमाणें अखंड कर्म करतो.
संन्यासी—सूर्याप्रमाणें अखंड अकर्ता असतो.”

दृष्टांत :— “वारा आपणहून माझ्या खोलींत येतो.
सूर्य आपणहून माझ्या खोलींत शिरतो.
देव हि तसाच आपणहून भेटणार आहे.
माझी खोली मोकळी असूं दे म्हणजे झालें.”

प्रश्न :— “कोणी म्हणतात, ‘ईश्वर अज्ञेय आहे’. जर अज्ञेय, तर आहे कशावरून?
जर आहे, तर अज्ञेय कसा?”

“वैदिक ऋषींना आत्म-स्तुतीचा संकोच वाटत नाहीं. आत्मरूप झालेले ऋषि आत्मस्तुति न करतील तर काय अनात्मस्तुति करतील?”

प्रश्नोत्तर :— “साधना कोठपर्यंत करावी?—आपोआप ‘होऊं’ लागेपर्यंत.”

“स्वप्न काय दाखवितें?— (१) सृष्टीचें मिथ्यात्व, (२) कल्पनेचें कर्तृत्व, (३) साधनेचें अपूर्णत्व.”

“तुम्ही रज्जुसर्पाप्रमाणें ‘विवर्त’ मानता कीं सुवर्णकंकणाप्रमाणें ‘परिणाम’ मानता?

उत्तर :— मी सुवर्णकंकणाप्रमाणें ‘विवर्त’ मानतो”.

—उदाहरणे पुष्कळ झालीं. असली उदाहरणें देणें ही च आधीं चूक आहे. कारण आभासिक उदाहरणें देण्यांत स्वारस्य काय? अमुक विचार अमुक पद्धतींत बसतो का तमुक पद्धतींत बसतो हें पाहणें ही एकप्रकारें शुद्ध अरसिकता आहे. साधकानें एकेक विचार शांतपणें पहात जावा. त्याचें मनन करावें. त्याला आचरणांत आणून तो कायावाचामनांत मुरवावा ही च खरी अभ्यासाची रीत आहे. तेवढ्यासाठीं सर्व विचारांची सूचि करतां येईल. मग केव्हां हि कोणता हि विचार हुडकून काढतां येईल. आणि त्याचें मनन करीत असतां या विचारांचें मूळ, त्यांची पद्धति, त्यांचें वैशिष्ट्य, त्यांपासून निघणारे अन्य विचार हें सर्व हळूं हळूं आकलनांत येत जाईल. अशा अभ्यासानें इतकें सहज आकलन होईल कीं, तेथें आध्यात्मिक पुष्टि

अनुक्रमणिका

भासमान हि होणार नाहीं. शाब्दिक रीतीनें क्षणभर जी समजूत होते असें वाटतें ती खरी समजूत नव्हे. मनुष्याची वाढ ज्याप्रमाणें होतें हें हि समजत नाहीं त्याप्रमाणें खरी आध्यात्मिक बुद्धि नकळत प्राप्त होत असते. एकीकरणाच्या अभावीं पशूजवळ प्रत्यक्ष प्रमाण असून हि तें निरुपयोगी होतें. १० ठोके पडलेले ऐकले तरी १० वाजले हा भास त्याला कळत नाहीं. जडाला आकलनाच्या अभावीं कोणत्या च प्रमाणाची प्रतीति येत नाहीं. परंतु साधक पुरुषाला अनुमनन करतां करतां तें प्रत्यक्षाइतकें स्पष्ट होऊं लागतें. ईश्वर प्रत्यक्षानुमानादि प्रमाणातील आहे असें म्हटलें म्हणजे मग तो कळावा तरी कसा हा एक पेंच उभा राहतो. परंतु या तीन्हीं प्रमाणांचा ईश्वरचिंतनाकडे उपयोग करतां करतां अशी अवस्था येतें कीं, या प्रमाणांची जरुर च न राहतां बुद्धीला तो एकदम प्रतीत होतो. ईश्वराप्रमाणे च ईश्वरीय विचारांसंबंधींची स्थिति आहे. प्रत्यक्षानुमानादि प्रमाणांनीं झालेंलें चिंतन आचारांत उतरलें कीं बुद्धीला तें चिंतन करावें लागत च नाहीं. एकदम आपोआप अर्थाचा उलगडा होऊ लागतो. आचार्यानें स्वतः संतवचनांचा असा च दीर्घकाल साधकभावानें अभ्यास केल्यामुळे त्यांतून आध्यात्मिक विचारांची स्फूर्ति तो आपोआप प्राप्त करूं लागला. “माझ्या नित्यनैमित्तिक चिंतनाचें हें सारें सार आहे. संतांच्या मार्गावरून पण स्वतःच्या पायांनीं चालण्याचा हा प्रयत्न आहे.”—असें त्यानें विचारपोथीसंबंधीं विचारपोथी लिहिण्याच्या अगोदर च पहिल्या पानावर लिहून ठेवलें आाहे. समर्थ रामदास, तुकाराम, ज्ञानेश्वर या सर्वांच्या वचनसंगतींत आचार्यांचे दिवसानुदिवस गेले आहेत. याची प्रतीति विचारपोथी चाळतां चाळतां सहज येण्याजोगी आहे. येथे फक्त समर्थाच्या संबंधीचा एक च दाखला घेऊं.

**“सामर्थ्य आहे सत्यनिष्ठेचें । असेल जयापाशीं तयाचें**
**ह्याचें चि नांव भगवंताचें । अधिष्ठान” ॥**

हा आचार्यांचा ओवीबद्ध विचार

**“सामर्थ्य आहे चळवळेचे । जो जो करील तयाचें ।**
**परंतु तेथें भगवंताचें । अधिष्ठान पाहिजे” ॥**

या समर्थांच्या ओवीवरून च स्पष्टीकरणार्थ निर्माण झालेला आहे.

विचारपोथींत सर्व विचार गद्य स्वरूपात च लिहिले आहेत. फक्त छंदबद्ध विचार

**शेवाळी पावुनि जन्म ओंगळीं ।**
**त्रासला चिळसला जीव अंतरीं ॥**
**राहिलों निराळा म्हणुनी तेथुनी ।**
**सवित्याचें मंगल किरण सेवुनी ॥**
**मी अलिप्ततेचें गाणें गातसें ।**
**गा गा रे सखया तूंहि गा तसें ॥ १ ॥**
**घेऊनि वामनरूप भृंग तो ।**
**येतसे लुटाया मजला धांवुनी ॥**
**परि हृदयाचें बलिदान देउनी ।**
**जिंकिला कोंडिला केला गुंग तो ॥**


अनुक्रमणिका

**मी समर्पणाचें गाणें गातसें ।**
**गा गा रे सखया तूंहि गा तसें ॥ २ ॥**

हे दोन विचार पद्यस्वरूपांत आढळून येतात. विचारपोथींतील बहुतेक सर्व विचारांना पद्यस्वरूप दिल्यास स्मरणांत राहण्याला तें एक उपयुक्त साधन होईल. पद्यरचनेचें एक प्रमुख कारण स्मरणसौलभ्य हें आहे. पद्याच्या निश्चित आणि गेयस्वरूपामुळे पद्य गद्यापेक्षां लक्षांत राहून दीर्घकाळपर्यंत तें टिकाऊ होतें. कांसवाप्रमाणें कर्मयोगांत शांत पण निश्चित पावलें टाकावीं. कांसवाप्रमाणें मजबूत पाठ करून जगाचे आघात सोसावे. कांसवाप्रमाणें विषयांपासून इंद्रियें आवरावीं. कांसवाप्रमाणें दृष्टि प्रेमानें भरलेली असावी हा विचार

**कासवाच्याप्रमाणें चि कर्मयोगामधें सदा ।**
**टाकावीं मनुजें शांत पण निश्चित पाउलें ॥ १ ॥**
**कासवाच्याप्रमाणें चि करूनि दृढ पाठ हि**
**जगाचे नित्य सोसावे आघात मनुजे तसे ॥ २ ॥**
**कासवाच्याप्रमाणें चि विषयांपासुनी सदा**
**मनुजें आवरावीं तीं आपुलीं सर्व इंद्रियें ॥ ३ ॥**
**कासवाच्याप्रमाणें चि या साऱ्या जगताकडे**
**प्रेमानें भरलेली कीं असावी दृष्टि आपुली ॥ ४ ॥**

असा पद्यांत मांडल्यास हें कूर्मोपनिषत् स्मृतींत उत्तम प्रकारें राहूं शकतें. परंतु मूळच्या भाषेची यांत हानि होण्याचा संभव आहे. आणि कांहीं विचार केवळ गद्यांत च खुलतील तसें पद्यांत चांगले दिसणार नाहींत. शिवाय जे विचार केवळ लेखी दर्शनानें चित्रासारखे सुंदर आणि उद्बोधक वाटतील तें पद्यांत दुर्बोध आणि कुरूप होऊन जातील.




हा विचार

**‘अचिंत्य—चिंत्य’ फुटतें ब्रह्माच्या मधुनी स्वयें**
**‘अव्यक्त—व्यक्त’ फुटतें चिंत्याच्या मधुनी मग**
**‘अमूर्त—मूर्त’ फुटतें व्यक्ताच्या मधुनी पुढें**
**खालीं शाखा वरी मूळ ब्रह्मवृक्ष असा असे—**

अनुक्रमणिका

अशा रीतीनें पद्यांत लिहून खुलणार नाहीं. तरी हा विचार चित्रात्मक आहे हें दर्शविण्यासाठीं शेवटचा चरण अधिक योजला आहे. शिवाय 'स्मर्यते' 'अपि च' या वेदांतसूत्राप्रमाणें किंवा 'शे' 'छे च' या पाणिनीयसूत्राप्रमाणें "नको" नको. असले विचार पद्यांत कसे मांडणार?

आणि पद्यांत असले विचार मांडले तरी त्यांचा अर्थ स्पष्ट कसा होणार?—म्हणून विचारपोथी समजण्यासाठीं प्रत्येक विचारावर एक प्रकारें भाष्य च लिहावें लागेल. हें भाष्य प्रत्येकाला दीर्घ मनन करून सहज च मनःपटावर आलेखित करतां येईल.

**"वेदांतासारखा अनुभव नाहीं.**
**गणितासारखें शास्त्र नाहीं.**
**स्वयंपाकासारखी कला नाहीं".**

या विचाराच्या अनुरोधानें सबंध विचारपोथी पाहून हें भाष्य तयार होऊं शकेल. वेदांत म्हणजे अध्यात्म. गणित म्हणजे सर्व शास्त्रांचें शास्त्र. आणि स्वयंपाकाची कला म्हणजे आई. स्वयंपाकासारखी कला नाहीं. कारण त्या कलेमागें आईची महनीयता दडलेली आहे. आईच्या महनीय कलेच्या अनुरोधानें, गणिताच्या बिनचूक पद्धतीनें आणि वेदांताच्या सर्वोच्च अनुभवानें हे विचार उत्स्फूर्त झाले. येथें गीता, वेदोपनिषदें, शास्त्रें, पुराणें, काव्यें आणि स्वजीवनांतील प्रसंग या सर्वांच्या निमित्तकारणानें विचारांना चालना मिळाली. "मला संतांचीं वचनें पूज्य आहेत, माझ्या कल्पना प्रिय आहेत, सत्य प्रमाण आहे. माझ्या कल्पनांप्रमाणें वागणें मला भाग आहे. कारण स्वधर्म अबाध्य आहे. पण संतांचा आधार हि मी सोडूं शकत नाहीं. म्हणून माझ्या कल्पनांचा संतांच्या वचनाशीं मेळ घालण्याचें कर्तव्य मला प्राप्त होतें. सत्यधर्मावर दृष्टि स्थिर असल्यामुळें असा मेळ घालणें मला जड जात नाहीं. सत्यसूर्याच्या प्रकाशांत संतांच्या मार्गावरून माझ्या कल्पनांच्या पायांनीं चालण्याचा मी प्रयत्न करतों." —आचार्यांनी विचारपोथींतील एका विचारांत अशी स्वतःची आचारपद्धति स्पष्ट केली आणि म्हणून च उन्मन अवस्थेच्या सहज एकाग्रतेंतून या पोथीची उत्पत्ति झाली.

"हिंदुधर्माचें स्वरूप—

आचार सहिष्णुता, विचारस्वातंत्र्य, नीतिधर्माविषयीं दृढता"
"स्वधर्माविषयीं प्रेम, परधर्माविषयीं आदर, अधर्माविषयीं उपेक्षा मिळून धर्म"
"नारळाप्रमाणें बाहेर विरक्ति आणि आंत भक्ति असेल तेथें च प्राप्ति"
"सर्वोच्च तत्त्वें सर्वव्यापक आणि सर्वोपयुक्त असल्यामुळें सर्वसुलभ असतात."
"देहांधतेमधें दोन दोष आहेत— (१) बहिर्मुखता (२) संकुचितता.
बहिर्मुखतेमुळें आंतला देव अंतरतो. संकुचिततेमुळें दुनिया दूर होते."

**"चित्त धुण्यास उपयोगी"**
**मृत्तिका—तपस्या**
**जल—हरिप्रेम"**

"जड-सृष्टी मायानदीचा विस्तार आहे.
जीव-सृष्टी मायानदीची खोली आहे."

अनुक्रमणिका

"स्नान करतांना सहस्रशीर्ष म्हणण्याचा संप्रदाय आहे. त्या वेळीं हजारों जलबिंदूंच्या रूपांत सहस्रशीर्ष परमात्म्याचा मला स्पर्श होत आहे अशी भावना करावी. म्हणजे जीवन धुऊन निघेल.

| | | | |
|---|---|---|---|
| "१ | बुद्धीची स्थिरता | २ | इंद्रिय-निग्रह |
| ३ | निष्काम-सेवा | ४ | भक्तीचा जिव्हाळा |
| ५ | दैवी संपत्तीचा विकास | ६ | आत्मज्ञान |
| ७ | संन्यास" | | |

या सात अंगांनीं धर्म पूर्ण होतो.

"मोकळ्या हवेंत सच्चिदानंदाची भेट होते।
आकाश सत्, वायु, चित्, तेज, आनंद"

—अशासारखीं दिव्य सिद्धांतरत्नें एकामागून एक लिहिलीं गेलीं. ज्याच्या त्याच्या आवडीप्रमाणें जो तो त्यांतून पुन्हां वाटेल तशी निवड करूं शकेल. पण बहुधा निवड करण्यासाठीं गेलों आणि निवड करणें तर सोडून द्या च पण स्वतःला हि पूर्णपणें विसरून गेलों असा च येथें अनुभव येईल. या वस्तुस्थितीमुळें आजपर्यंत यांतून निवड करण्याचा कोणी च प्रयत्न केला नाहीं. उलट सुमारें शेंदीडशें मंडळींनीं हीं विचाररत्नें पूर्णपणें उतरवून सर्वच्या सर्व संग्रही ठेवण्याचा मात्र प्रयत्न केला. खरोखर आचार्यांचें महाराष्ट्र-धर्म मासिक हा गंभीर समुद्र त्यानंतरचें महाराष्ट्र-धर्म साप्ताहिक ही नित्योपयोगी भूमि आणि पुढील ही विचारपोथी म्हणजे रात्रींचें रत्नखचित आनंदमय आकाश होय! ऋषि म्हणतात आकाशाशिवाय आनंद कोठला? विचारपोथी पाहून हि हा च अनुभव येतो.

**को ऽ ह्येवान्यात् कःप्राण्यात् यदेष आकाश आनंदो न स्यात्**

●●●

अनुक्रमणिका

# प्रकरण ३९ वें

## स्वयंभू महादेवाची प्रदक्षिणा

**दर्शनाशिवाय** सेवा नाहीं. सेवेला दृष्टि पाहिजे. आंधळेपणानें सेवा तर व्हायची नाहीं च पण अपाय मात्र हटकून व्हावयाचा. म्हणून आधीं दर्शनासाठीं सर्व तळमळ! दर्शनासाठीं सर्व आटापिट!! दर्शनासाठीं सर्व साधना!!! हे देवदेवा! तूं एकदां तरी मला दर्शन दे, तदनंतर मी तुझ्या सेवेंत च तुझें नित्य दर्शन घेत जाईन. मला तुझें पूर्ण दर्शन हि नको. मला केवळ तुझ्या पायाचें दर्शन झालें तरी पुरें. भक्ताची, सेवकाची अशी नम्र भूमिका असते. देवाचें केवळ एक पाऊल आणि त्याचें दर्शन ही हि कांहीं सामान्य गोष्ट नाहीं. देवाच्या केवळ एका पावलांत च विश्वाचें पूर्ण आणि व्यापक दर्शन येऊन जातें.

**पादोऽस्य विश्वा भूतानि**
**त्रिपादस्यामृतं दिवि**

हें देवाच्या पायाचें दर्शन अल्प म्हणा कीं महान म्हणा तें व्हावयाचें कसें हा च प्रश्न आहे.—या दर्शनासाठीं च तर जीवाची सर्व धावाधाव. त्यासाठीं च सत्याग्रहाश्रमासारख्या संस्थांत राहून तपस्या करावयाची.

१९२१ पासून १९३० पर्यंत आश्रमाची स्थिति एके ठिकाणीं राहून अशी दर्शनसाधना करण्याची होती. आचार्यांना तें दर्शन लाभलें होतें. जन्मतः च जें दर्शन लाभलें होतें—आणि बापूजींच्या सहवासानें ज्याला व्यापक स्वरूप प्राप्त झालें होतें, त्याचा अल्पसा अंश हि लाभावा म्हणजे सेवेच्या मार्गाचें पाथेय या आश्रमांतल्या प्रत्येक भक्ताला प्राप्त होईल अशी ही ९ वर्षांची साधना होती. वास्तविक येथले साधक कांहीं च जाणत नव्हते. आचार्यांनी त्यांना आकार द्यावा आणि आपण तदनुकूल रहावें या पलीकडे अधिक विचार करण्याची कोणाला च आवश्यकता नव्हती. कारण आचार्यांपाशीं संपूर्ण दर्शन हि होतें आणि सेवेची संपूर्ण योजना हि होती. आचार्यांनी सतत नऊ वर्षें येथल्या साधकांना दृष्टि प्राप्त होईल अशासाठीं हा एक च प्रयोग आरंभिला होता.

त्यामुळें अनेकांचा अनेक प्रकारें गैरसमज हि झालेला होता. एवढी असामान्य योग्यता, इतकी मंडळी हाताशीं, जमनालालजींसारखे सर्व साधनें सिद्धहस्तानें पुरविणारे भक्त, अशी स्थिति असून आचार्य लोकसेवेच्या कोणत्या च प्रकारांत कां सामील होत नाहींत? केवळ या आश्रमांत २४ तास बारा महिने स्वतःला कैद्याप्रमाणें कां कोंडून घेत आहेत? काँग्रेससारख्या संस्थांत, व्याख्यानादि प्रचारांत ते कां सामील होत नाहींत? जर ते सामील झाले तर ते अनेकांना मार्गदर्शक होतील, प्रांताला पुढें नेतील, इतकें च काय पण अखिल हिंदुस्थानला हि नवीन नवीन दर्शन करवून देतील. अशासारखे विचार बाहेरच्या मंडळींच्या मनांत येत असत. जमनालालजींना हि पुष्कळ वेळां असें वाटे. कित्येकांना असें हि वाटे कीं केवळ तत्त्वज्ञानी लोकांचा हा अड्डा आहे. यांचा देशाला काय उपयोग व्हावयाचा आहे? परंतु या सर्व मूढ कल्पना होत्या. लोकसेवेची खरी कल्पना यापैकीं कोणाला च नसे. हुकमी माणसें हाताशीं असल्याशिवाय, त्या माणसांत हुकमी सेवादृष्टि आणि निग्रह असल्याशिवाय, आणि ती सेवा निश्चित स्वरूपानें सतत चालविण्याची—जगाचे सर्व आघात सोसून—तसें च आपलें काम बिनधोकपणें चालविण्याची निष्ठा असल्याशिवाय केवळ सेवेची कल्पना काय कामाची?—आचार्यांजवळ अशी निश्चित कल्पना, तदनुसार

अनेक माणसांना युक्तिबुद्धीनें भारण्याची शक्ति आणि योजना असल्यामुळें आचार्यांवर या आक्षेपांचा कांहीं च परिणाम होत नसे. त्यांचें या आश्रमांत विरजण तयार करण्याचें काम चाललें होतें. विरजण तयार असेल तर किती हि दूध असो, सगळ्याचें दही करणे सहज शक्य आहे, उत्तम बी तयार असेल तर क्रमाक्रमानें सबंध जगाला हि महारण्याचें स्वरूप देतां येईल. म्हणून आचार्य एकसारखे ९ वर्षें आश्रमांत हें दर्शनदानाचें काम करीत होते. गर्भाची पूर्ण वाढ झाल्याखेरीज—९ महिने वाट पाहिल्याशिवाय—त्याचें जगांत अवतरण होणें ही गोष्ट निष्फळतेला कारणीभूत होते. निष्फळ कर्म आचार्यांना कधीं च मान्य नसे. निष्काम कर्म म्हणजे निष्फळ कर्म नव्हे. सर्व फळाचें महाफळ पदरांत पाडून घेणारें ते निष्काम कर्म. ९ वर्षांतलें आश्रमाचें कार्य हें ९ महिने गर्भांत होणाऱ्या समाधिवस्थेंतल्या बीजभूत वाढीसारखें कार्य होतें. त्याशिवाय लोकसेवेच्या कल्पना निष्फळ ठरल्या असत्या. कारण समर्थांची शिकवण आचार्यांच्या रोमरोमांत मुरलेली होती.

**तस्मात् लोकिकीं वर्ततां नये । त्यास महंती कामा नये**
**परत्र साधनाच्या उपाये । श्रवण करुनि असावें**
**आपणास बरें पोहतां नये । लोक बुडवावयाचें कोण कार्य**
**गोडी आवडी वाया जाये । विकल्प चि आवघा**
**अभ्यासें प्रगट व्हावें । नाहीं तरी झांकोनि असावें**
**प्रगट होऊनि नासावें । हें बरें नव्हे**

समर्थ्यांच्या कल्पनेप्रमाणें आचार्यांजवळ लोकसेवेची योजना तयार होती. त्यानें लोकसेवा आणि ती करण्यासंबंधींचा अनुभव स्वतः महाराष्ट्रांत पायीं फिरून घेतलेला होता. शिवाय १९२४ सालीं वर्धा तालुक्यांतील नागझरी आणि रोहिणी या दोन गांवांत खादीप्रचार द्वारा ग्रामसेवेचें काम करण्यासाठीं त्यानी दोघा आश्रमीयांना पाठविलें होतें. त्या प्रयोग द्वारा प्रत्यक्ष वर्धा तालुक्यांतील स्थानिक लोकसेवेच्या अंगोपांगांचा हि पूर्ण विचार केला होता.

येथें कोणी असा प्रश्न विचारील कीं, हें सर्व ठीक आहे. पण जर ९ महिन्यांत गर्भाची पूर्ण वाढ होऊ शकतें तर आश्रमीय व्यक्तींना सेवादृष्टि लाभण्याला ९ वर्षांचा दीर्घ अवधि कां लागावा? त्याचें उत्तर असें कीं, गर्भाची एक तर शारीरिक वाढ होत असते. व तेथें तें काम बाह्य अडगळींशिवाय चाललेलें असतें. तसें येथें नाहीं. येथें ज्या निरनिराळ्या व्यक्ति आलेल्या असत त्यांच्यावर अगोदर च निरनिराळे संस्कार झालेले असावयाचे. त्यांचे ते मूळ संस्कार पूर्ण निघून जाऊन, निदान पुष्कळसे जीर्ण होऊन मग नवीन संस्कार आणि नवीन दर्शनाचें बळ त्यांना प्राप्त व्हावयाचें. असा हा दुहेरी प्रकार असल्यानें इतका कालावधि येथें लागणें ही अपरिहार्य गोष्ट होती. रोग जाऊन आरोग्यावस्था प्राप्त झाल्यावर शक्ति सहज वाढूं लागते. पण मुख्य रोग जाण्याला च खरे आयास पडतात. म्हणून हा कालावधि हि अधिक म्हणतां येत नाहीं. वास्तविक पाहतां अमुक एका कालावधींत नवीन दृष्टि प्राप्त होऊं शकते अशांतला भाग नाहीं. ९ वर्षें काय ९० वर्षें प्रयोग करून हि कोणती च फलनिष्पत्ति व्हावयाची नाहीं. अथवा केवळ एका दिवसांत हि संपूर्ण दर्शन होऊं शकेल अशी या बाबतींत अनिश्चित स्थिति आहे. तथापि आचार्यांनी सर्व आश्रमीयांना अगदीं 'मुलांच्या चालीनें चालावें' या धोरणानुसार ९ वर्षें धीर धरून शांतपणें एके ठिकाणीं, एका प्रयोगांत वागविलें हें केवढें महद्भाग्य!

९ वर्षांत आचार्यांपासून आश्रमीयांना विशिष्ट दृष्टि थोडी फार प्राप्त झाली. त्या विशिष्ट दृष्टीचें सर्व सृष्टीभर दर्शन करावयाची वेळ आली. अनेक शास्त्रीय विषयांप्रमाणें आचार्यांचा भूगोल हा अतिशय आवडता

विषय. कारण भूगोलाच्या अभ्यासांत तीर्थयात्रांची पवित्रता ते अनुभवीत. गृहत्याग करण्यापूर्वी सर्व हिंदुस्थानच्या भूगोलाचा त्यांनी कसोशीनें अभ्यास केला होता. आतां तसा च अभ्यास त्यांनी सुरू केला. मध्यप्रांताचा आणि विशिष्ट वर्धा तालुक्याचा सर्व भूगोल त्यांच्या मनश्चक्षूसमोर उभा राहिला. प्रत्येक गावं नमूद असलेले मराठी मध्यप्रांतांतले सर्व इंग्रजी नकाशे मागविले होते. गॅझेटियर्सची त्यांनी बारकाईनें तपासणी केली. वर्धा तालुक्यांतील प्रत्येक गांवाची अकारानुक्रमीं यादी त्यांनी तयार केली. नकाशांतील निरनिराळ्या गांवांवर पेन्सिलीनें त्यांनी निरनिराळी चिन्हें करून ठेवलीं. त्या चिन्हांचे निरनिराळे अर्थ होते. अमुक गांव महत्त्वाचें, अमुक गांवीं मोठा बाजार भरतो, अमुक गांव केंद्रस्थानीं पडतें, येथून अनेक रस्ते फुटतात. अमुक गांव महानुभावांचें, येथें मांसाहार कमी होतो. अमुक गांवीं यात्रा भरते, अमुक गांवीं चळवळे लोक अधिक आहेत—एक ना दोन अनेक दृष्टीच्या त्या खुणा असत. आचार्यांच्या या अभ्यासाची इतर कोणाला च फारशी कल्पना नव्हती. आश्रमीयांच्या क्षेत्रसंन्यासी स्वरूपाच्या कार्यक्रमांत एकदम पालट व्हावयाचा आहे याचा कोणाला आगापीछा नव्हता. आचार्यांच्या चिंतनांत काय काय गोष्टी येतात याची कोणाला च कल्पना नसे.

**त्या गुप्त कल्पना कोणास कळाव्या । कोणे येऊनि आटोपाव्या**
**ज्याच्या त्यानें कराव्या । बळकट बुध्दि**

अशी त्यांच्या चिंतनाची गूढ स्थिति होती.

आश्रमाचा नऊ वर्षांचा प्रयोग, विशिष्ट आश्रमीय दृष्टि मंडळींना यावी आणि त्याप्रमाणें त्यांना ती ग्रहण करण्याला, आंगीं मुरविण्याला भरपूर अवसर मिळावा, कार्यकर्ते तयार करण्याची कल्पना प्रत्येकाला यावी एवढ्यासाठीं होता. यापुढें हि येथेंच रेंगाळत त्याच त्या च क्रमांत परिवर्तित होणें ही गोष्ट योग्य नव्हती. तो संसार च झाला असता. त्या च त्या च गतीनें एकासारखें जरुर नसता भ्रमण करीत राहावयाचें म्हणजे च संसार. संसाराची निःसारता बाणलेल्या पुरुषाला ही गोष्ट रुचणें शक्य नव्हतें. ब्रह्मविद्येचा प्रचार आणि जनतारूपी नारायणाची सेवा याशिवाय दुसरी भक्ति ते जाणत नव्हते.

**आपण करावें करवावें । आपण विवरावें विवरवावें**
**आपण धरावें धरवावें । भजनमार्गासी**

ही दृष्टि त्यांची अढळ होती. त्याप्रमाणें आश्रमीयांना एकामागून एक जनसेवेसाठीं पाठविण्याचा त्यांनी विचार केला. राष्ट्रीय शाळेंत शिक्षक म्हणून काम करण्यासाठीं पाठविलेल्या आश्रमीयांना त्यानी तें काम आतां सोडावयास सांगितलें.

दक्षिण आफ्रिकेंत बापूजींच्या आश्रमाची स्थापना झाली. फिनिक्स, टॉल्स्टॉय फार्म, साबरमती अशीं त्याचीं स्थित्यंतरें झालीं. बापूजींच्या अनेकविध चळवळींत आश्रमीयांनीं अनेक प्रकारें भाग घेतला. तथापि लोकसेवेची येथें जी योजना झाली तशासारखी योजना कोठें च झालेली नव्हती. तेथें आश्रमांत जी कांहीं १५/२० मंडळी होती त्या सर्वांकडून सबंध वर्धा तालुका फिरण्याची आचार्यांनी कल्पना केली होती. जर देशांत खरी सेवा व्हावयाची असेल तर केवळ वरवर दौरे काढून भागावयाचें नाहीं. फुटबॉलला एकीकडून लाथ मारली कीं फुटबॉल चालला दुसरीकडे, तिथून लाथ मिळाली कीं निघाला आणखी तिसरीकडे असल्या तऱ्हेनें देशाची सेवा होणार नाहीं. आज निघाला नागपूरच्या सभेला, तिथून चालला दिल्लीला,

अनुक्रमणिका

दिल्लीहून निघाला मद्रासासाठीं. असल्या शहरीं दौऱ्यांनीं देशाचें काम होणार नाहीं. खरी सेवा खेड्यांत आहे. आणि ती प्रत्येक खेड्यांत आहे. देशांतल्या प्रत्येक खेड्यांत सेवकांचा प्रवेश झाला पाहिजे. आणि शक्य तितक्या खेड्यांत अधिकारी सेवक स्थिर होऊन त्यांनीं तेथें जनसेवेचीं केंद्रें सुरू केलीं पाहिजेत. त्या केंद्रांत पडून राहिलेलीं परंतु कर्तृत्ववान अशीं खेड्यांतलीं अनेक माणसें सेवाबुद्धीनें एकत्र होत गेलीं पाहिजेत.

**दुरितांचें तिमिर जावो । विश्व स्वधर्मसूर्यें पाहो ।**

या एका दिव्य कल्पनेनें अनेकांना भारलें पाहिजें हें आचार्यांचें धोरण होतें. त्या दृष्टीनें ज्याप्रमाणें ९ वर्षांत आश्रमांत कांहीं माणसें तयार झालीं, त्याप्रमाणें तीं माणसें वर्धा तालुक्यांतील खेड्यांत जाऊन त्यांनीं तेथें सेवा करतां करतां अशीं च आणखी माणसें तयार करावींत आणि तीं हि पुढें पुढल्या तालुक्यांत जावीं अशी देशसेवेची भरीव, अखंड आणि सर्वव्यापी कल्पना आचार्यांपाशीं हजर होतीं.

आपल्या मंडळींच्या शक्तीबाहेरचें काम देऊन निष्फळतेचा उद्योग करावयाचा नाहीं. या तत्त्वाप्रमाणें आचार्यांनी निवडलेला केवळ वर्धा तालुका या आश्रमीय लोकांच्या सेवेला पुरेसें क्षेत्र होतें. या तालुक्यांत ३०० गांवें होतीं. पहिलें काम प्रथम या तीनशें गांवांचें अवलोकन करावयाचें होते. आचार्यांनी वर्धा शहर मध्य ठेऊन पंचक्रोशींतलीं गांवें फिरण्यासाठीं निवडलीं. त्याप्रमाणें मंडळी फिरूं लागली. आश्रमीयांचा परिभ्रमणाचा हा पहिला च अनुभव होता.

**सृष्टीमध्यें बहु लोक । परिभ्रमणे कळे कौतुक**
**नाना प्रकारीचे विवेक । आडळो लागती**

नवीन नवीन प्रसंग, नवीन नवीन देखावे, नवीन नवीन जीवन आतां आश्रमीयांच्या डोळ्यासमोर उभे राहूं लागलें.

**नित्यनूतन हिंडावें । धुंडावें लोक त्यापरी**

असा आश्रमीयांचा आतां सर्वत्र संचार सुरू झाला होता. थोड्या च दिवसांच्या अनुभवानंतर एकंदर भौगोलिकदृष्ट्या आणि प्रचारदृष्ट्या विचार करून आचार्यांनी सबंध तालुक्याचे ६ भाग पाडले. आणि एका महिन्यांत प्रत्येक सोपलेल्या मंडळींनीं ५० खेडीं फिरावीं असा दंडक घालून दिला. प्रत्येकानें आचार्यांच्या नकाशावरून आपापल्या भागाचा नकाशा तयार करून घेतला. त्या नकाशांत रस्ते, गांवें, नद्या, ओहोळ, गांवांची शीव, गांवांतील अंतर दाखविणारें मैलांचें प्रमाण असे अनेक प्रकार होते. नकाशांत गांवांचीं नांवें न लिहितां हि केवळ टिंबावरून हि गांवें ओळखण्याचा अभ्यास झाला. दरेकानें आपली पिशवी सज्ज करावी, तिच्यांत आश्रमभजनावलि, मनाचे श्लोक, गीता, तुळसीरामायण किंवा ज्ञानेश्वरी, तुकारामाची गाथा असले उपासनावाङ्मय भरावें, वही, पेन्सील, लोटा असलें किरकोळ पण उपयुक्ततेनें महत्त्वाचें सामान हि घ्यावें. लोकांना शिकविण्यासाठीं तकल्या, पेळू, लहानसें पिंजण हि बरोबर घ्यावें, एका खांद्यावर कांबळें, धोत्रें, उपरणें, टाकून दुसऱ्या खांद्यावर पिशवी लटकवून घ्यावी. पायांत वाहाणा, कमरेला पंचा—कोणी अंगांत सदरा घालावा, कोणी नुसतें च उपरणें. अशा थाटांत एक दोन एक दोन गांवें फिरावीं असा क्रम सुरू झाला. फिरणाऱ्याला जरुर तें सामान ठेऊन पुन्हां हात मोकळे राहतील अशा तऱ्हेनें आपल्या सामानाची शरीरावर रचना करावी लागते. आश्रमवासी प्रचारकांपैकीं कोणी हि जवळ खाण्यासाठीं कोणता हि पदार्थ ठेवीत नसे.

अगदीं च जरुर पडली तर असावें म्हणून उगीच चार पैसे कोणाकोणाकडे असत. बहुतेक सर्व आश्रमीय हे मध्यम स्थितीतले सुशिक्षित म्हणविणारे होते. त्यांना खेड्याचा कांही च अनुभव नव्हता. इंग्रज सरकारच्या शिक्षणामुळें खेडीं आणि शहरें यांत केवढें अंतर पडलें! खेड्यांत केवळ काम करणारीं धडे राहतात आणि शहरांत केवळ डोकीं राहतात. त्यांच्याच्यानें काम मुळीं च होत नाहीं. काम करणें हें लाजिरवाणें वाटतें. उलट खेडवळांना देशाची माहिती हि नाहीं. जो जो शिकला तो खेड्याला निरुपयोगी ठरवून शहरांत गेला च. असा १५० वर्षें एकसारखा क्रम चालल्यामुळें या सुशिक्षित आणि अशिक्षितांचा मेळ जमावा कसा हा च खेड्यांत गेल्याबरोबर पहिला सवाल पुढें येई. सुशिक्षितांची भाषा आणि खेड्यांची भाषा यांत हि केवढें अंतर! समान भाषा ही माणसाला एकजीव करीत असते. तुकाराममहाराज ज्या भाषेंत बोलले ती बहुजनसमाजाची—शेतकऱ्यांची भाषा अशुद्ध समजली जाऊन केवळ मूठभर ब्राह्मणांची भाषा शुद्ध समजली गेली. त्यामुळें खेड्यांतल्या लोकांचा आणि आश्रमीयांचा हि एकदम मेळ जमला अशांतला प्रकार नव्हता. खेड्यांतले लोक या आश्रमीयांना पाहून एकदम बुजत. खेडवळांची स्थिति कांहींशी बालकासारखी असे. कोणी नवीन दिसलें कीं हें काय प्रकरण? असे त्यांचे प्रश्न चिन्हांकित चेहरे झाले च. ते एकदम मिसळावयाचे नाहींत. आश्रमीयांचें हि थोडेफार असें च होई. त्यांना हि खेड्यांतली पद्धति मुळीं च माहीत नव्हती. परंतु क्रमाक्रमानें ओळखी होत गेल्या. एकानें खेड्यांतील भाषेचें चालचलाऊ व्याकरण हि तयार केलें. खेड्यांतील ओळख ही केवळ घराच्या ओटीवर बसून चार गप्पा मारून व्हावयाची नाहीं. निरनिराळ्या लोकांच्या घरांत प्रवेश हवा असेल तर तेथें जेवणावांचून गत्यंतर नाहीं. अलग जेवण केलें कीं खेडवळांची गृहस्थिति कळावयाची नाहीं. म्हणून खेड्यांत फिरणाऱ्या आश्रमवासीयांनीं जेवण हि त्या त्या खेड्यांत कोठें हि ग्रहण करावें असा आचार्यांनी मार्ग दाखविला होता. सेवकाला सेवा करावयाची तर सेव्याचें पूर्ण ज्ञान हवें. सेव्याचा योग्य परिचय हवा. अतिपरिचय आणि संकोच या दोहोंना टाळून त्यानें योग्य परिचय करून घेतला पाहिजे. जनता ही जशी सेव्य आहे तशी ती आपली आराध्य देवता आहे. तिच्याजवळ जातांना भय अगर संकोच उपयोगी नाहीं. समाजाची सेवा करावयाची तर समाजापासून निःशंक भिक्षा मागितली पाहिजे. दुसऱ्याकडे जेवणें हें आचार्यांना बाळपणापासून मुळीं च पसंत नसे. परंतु जनसेवेवर च ज्यानें आपलें जीवन सोंपविलें त्यानें कोठें हि निस्पृहपणें जेवण्यास हरकत नाहीं. जेवण्याऐवजीं भिक्षा मागण्याची ब्रह्मचारी, संन्यासी वगैरेंची जुनी पद्धति होती. जुन्या काळांत भिक्षा ही एक थोर संस्था होती.

**गोरक्ष्य वाणिज्य कृषी । त्याहूनि प्रतिष्ठा भिक्षेसी**
**विसंबू नये झोळीसी । कदाकाळीं**
**भिक्षे ऐसे नाहीं वैराग्य । वैराग्या परतें नाहीं भाग्य**
**वैराग्य नसतां अभाग्य । येकदेसी**

कोणत्या हि धंद्यापेक्षां भिक्षा श्रेष्ठ समजली जाई. कारण भिक्षा ही त्या काळीं अपंग लोकांची संस्था नसून तें समर्थ संन्याशांचें विश्वकुटुंबक वृत्तीचें चिन्ह होतें. परंतु ही संस्था आज पार बिघडून गेलेली आहे. समाजाच्या बदललेल्या स्थितींत ती आतां सुधारणें शक्य नाहीं. शिवाय भिक्षेनें घराच्या आंतरस्थितीचा परिचय होत नाहीं तो नाहीं च. म्हणून खेड्यांत कोठें हि जेवण्याची कल्पना आचार्यांनी आश्रमीयांना दिली होती. ही जुन्या काळच्या भिक्षेची परिणति च होती. आचार्यांनी भिक्षेविषयीं महाराष्ट्र-धर्म साप्ताहिकांत या संबंधी मार्गदर्शक लेख पूर्वी च लिहून ठेवला होता. ते म्हणतात, "भिक्षा म्हणजे ज्यास्तींत ज्यास्त परिश्रम आणि कमींत कमी मोबदला. हा हि मोबदला मुळींच घेतला नसता पण शरीराचें चालत नाहीं म्हणून तेवढ्या पुरता घ्यावयाचा. पण तो हक्कानें नाहीं. ईश्वरावलंबन आहे. समाजाच्या सद्‌भावनेवर श्रद्धा आहे—अशा भिक्षावृत्तीनें संचार करणारे आश्रमीय जरी कोणाकडे हि जेवत तरी आश्रमीयांना अनुसरून च त्यांचें जेवण

अनुक्रमणिका

असे. खरोखर या बाबतींत आश्रमांत आणि बाहेर असा कांहीं च फरक नव्हता. आश्रमांतील आश्रमीयांचें जेवण ही हि वास्तविक भिक्षा च होती. प्रथमपासून या आश्रमाचा सर्व खर्च जमनालालजी चालवीत. ते आश्रमाला मासिक ३०० रुपये देत असत. आचार्यांच्या आश्रमासारख्या थोर प्रयोगाला हे तीनशें रुपये सहज पुरत. कारण तेथें कोणाला हि पैशाची अपेक्षा च नसे. ज्यास्तींत जास्त सेवा करून केवळ देहधारणेपुरतें अन्न-वस्त्र आश्रमीय घेत. त्यामुळें हे सर्व आचार्यांच्या व्याख्येप्रमाणें भिक्षास्वरूपच होतें. तथापि आश्रमीयांचें सोडलें तरी खुद्द आचार्यांच्या योग्यतेप्रमाणें, त्यांच्या आध्यात्मिक परिश्रमाने आणि त्यांच्या असामान्य प्रयोगाप्रमाणें पाहिलें तर हे तीनशें रुपये त्यांच्यापुढें केवळ कःपदार्थ होत यांत तिळमात्र शंका नाहीं. परंतु ज्या श्रद्धेनें जमनालालजी आश्रमाची काळजी घेत, ती पाहतां ते कोणी आश्रमवेगळे होते, ते एक धनिक गृहस्थ होते आणि ते या आश्रमाला कांहीं मदत करीत असत ही कल्पना हि टिकण्याजोगी नव्हती. त्यामुळें त्यांच्या पैशाला बिनमोल मदतीचें स्वरूप आलें होतें. ते आश्रमाशीं केवळ तद्रूप झाले होते. त्यांच्या स्वतःच्या कुटुंबापेक्षां आश्रम हें च त्यांचें खरें कुटुंब होतें. आश्रमासारखा अपूर्व आणि केवळ ऋषींच्या काळांतला प्रयोग अशा च थोर श्रद्धेनें व्हावयाचा. तेथें सार्वजनिक फंड करून किंवा कृत्रिम पसारा उभारून कार्य व्हावयाचें नाहीं.

आश्रमीयांचें जेवण अशा रीतीनें खेड्यांतील कोणत्या हि जातींतल्या कोणत्या हि माणसाकडे होऊं लागल्यानें खेड्यांतील सबंध गृहजीवनाची कल्पना आश्रमीयांना आली. त्याशिवाय जेवण हें जीवनाचे एक अंग असल्यामुळें ग्रामीण जीवनांत त्यामुळें काय काय गुणदोष उत्पन्न झाले आहेत हें आचार्यांपुढें मांडून त्याप्रमाणें त्याची शहानिशा करून घेतां आली. खेडवळांच्या जेवणांत तिखटावर भार कां? भाजी खेड्यांत कां नाहीं? सर्वांना दूध कां मिळत नाहीं? फळें कित्येक खेड्यांत होत असून शहरांत विकावयाला जातात पण त्यांना चैनीपलीकडची आवश्यक वस्तु खेड्यांत कां मानीत नाहींत? शेतकऱ्याला स्निग्ध पदार्थ काय काय मिळतात? मांसाशन कितपत आहे? सणासुदीला कोणकोणते पदार्थ कां केले जातात? त्यांचे परिणाम काय होतात? असे अनेक आहारविषयक प्रश्न असत. आहारामुळें होणारे रोग कोणतें? खरूज खेड्यांत अधिक कां? साथीचे रोग खेड्यांत कोणकोणते फैलावतात व ते कां? असा त्यावरून रोगशास्त्राचा हि तपास काढावा लागे. आरोग्यशास्त्राचा अभाव झाला कीं रोगशास्त्राची तपासणी आलीच. ही सर्व चर्चा एकेक फेरी मारून आचार्यांकडे येऊन करावयाची. आणि तेथून मागदर्शन घेऊन पुन्हां दुसऱ्या फेरीला सुरवात करावयाची. असा सर्व आश्रमीयांचा शिरस्ता होता. त्यायोगें आचार्य बसल्या जागीं च सर्व खेडीं फिरत आहेत अशी अवस्था निर्माण होई.

खेडेगांवांतील लोकांच्या अनारोग्याचीं कारणें तपासणें, त्यावर इलाज शोधणें, एवढें च नव्हे तर खेडेगांवांत काय काय आवश्यक आहे आणि काय काय नाहीं याचें सर्व निरीक्षण आश्रमीय सेवकांनीं करावयाचें. असे च पण त्यापेक्षां हि आपल्यामध्यें कोणकोणती उणीव आहे आणि आपल्याला या खेडेगांवच्या लोकांपासून काय काय घेतां येईल हें प्रथम प्रत्येकानें पाहिलें पाहिजे. आत्मपरीक्षणावर च विश्वनिरीक्षण उभारलें जावें अशी आचार्यांची दृष्टि होती. हजारों वर्षांची संस्कृति खेड्यांत दडलेली आहे, खेड्यांतील जनता म्हणजे हजारों वर्षांची अनुभवी जनता आहे. अशा जनतेपुढें आपण शिकलेलों, हे अडाणी अशा भूमिकेने कोणी गेल्यास हटकून फसगत व्हावयाची असें आचार्यांचें मार्गदर्शन होतें. शिक्षण आणि अनुभव यांत फार फरक आहे. शिवाय खेड्यांतील जनता अशिक्षित आहे ही समजूत हि बरोबर नाहीं. खेड्यांतील पुष्कळसे लोक निरक्षर असतील, पण निरक्षर म्हणजे अशिक्षित हें समीकरण बरोबर नाहीं. जर लिहितां वाचतां येत नाहीं म्हणून खेड्यांतले लोक अशिक्षित तर नांगर चालवितां येत नाहीं म्हणून शहरांतले लोक अशिक्षित असें या म्हणूं नये? आपण खेड्यांतील लोकांची सेवा करतो. आपण त्यागी

आहोत, हा अहंकार हि खेड्यांत चालावयाचा नाहीं. वास्तविक खेड्यांतल्या लोकांच्या कष्टापुढें, त्यांच्या दारिद्र्यापुढें मध्यम स्थितींतल्या लोकांचा त्याग हा कांही च त्याग नव्हे. अशी खेड्यांतील लोकांची स्थिति आहे. खेड्यांत कोणती हि गोष्ट उतावीळपणें होत नांही. म्हणून “धीर तो कारण । साह्य होतो नारायण” असली धीर गंभीर वृत्ति कार्यकर्त्यांपाशीं असली पाहिजे. एवढ्या मोठ्या अनुभवी जनतेपुढें दोन दिवसांत दहा सुधारणेच्या गोष्टी सांगून ती जनता लगे च त्याप्रमाणें पालटेल अशी आशा करणें व्यर्थ आहे. खेड्यांतील जनता ही पुराणप्रिय असते. जुन्याला चिकटून बसावयाचें हा तिचा स्वभाव असतो. हा स्वभाव हा दुर्गुण नसून सद्‌गुण आहे. एकाएकीं एकसारखी जर जनता पालट करूं लागली तर समाजांत स्थैर्य च राहणार नाहीं. म्हणून कोणत्या हि गोष्टींत फरक करावयाचा झाल्यास खेड्यांतील लोक फार विचारपूर्वक हळूं हळूं फरक करतात. असा हळूं हळूं केलेला फरक च बहुधा निश्चित फरक असतो. खेडेगांवांत विद्वत्ता, वक्तृत्व, असल्या उपार्जित गुणांपेक्षां नीतीच्या मूलभूत गुणांची अधिक जरूरी आहे. येथें निष्कलंक चारित्र्य, उद्योगशीलता, भगवद्‌भक्ति, शांतिक्षमा अशा नीतीच्या मूलभूत, सद्‌गुणांचा परिणाम होईल. शिवाय खेड्यांतील मुख्य धंदा जो शेती त्या धंद्यापाठीमागें सर्व वेळ खर्च करणारे शेतकरी हे जगाचे मायबाप च नव्हेत काय? दुसरे इतर व्यवसाय हे प्रत्यक्ष उत्पत्ति कांहीं च करीत नाहींत. त्यांतून शहरांतले बुद्धिव्यवसाय म्हणजे द्रव्याचें नुसतें स्थलांतर होय. जगाच्या समृद्धींत त्यामुळे मुळीं च भर पडत नाहीं. एके ठिकाणचे पैसे दुसऱ्या ठिकाणीं जाण्यापलीकडे शहरीं बुद्धिव्यवसायांत कोणती हि नवनिर्माणशक्ति नाहीं. म्हणून शेतकऱ्याच्या जवळ च खरी लक्ष्मी नांदते. पैसा निराळा, लक्ष्मी निराळी. पैसा लूट करून हि मिळेल. परंतु लक्ष्मी शेतांतील परिश्रमानें अंगांतून घामाच्या धारा निघतील आणि विष्णुकृपेचा पाऊस पडेल तेव्हां च लाभत असते. म्हणून शेतकऱ्यांचे जीवन हें अतिपवित्र जीवन. श्रमाचा पुरुषार्थ करून हि ईश्वरी कृपेच्या पावसाची करुणा भाकल्याशिवाय शेतकऱ्यांचे भागत नाहीं. शेतकऱ्याचें जीवन म्हणजे नम्र प्रयत्नवाद. खेड्यांतला कृषक म्हणजे कृष्णाच्या रंगाचा. कृष्णानें गाई चारल्या. गोपाळाचा धंदा केला. त्याच्या वडील बंधूनें नांगर चालविला. बलरामाचें हत्यार नांगर, शेती आणि गोरक्षा हे खेड्यांतले धंदे, ते धंदे करणारे लोक किती पवित्र! अशा प्रकारची सर्व गुणमय सृष्टी आचार्यांकडून आश्रमीय प्रचारकांना एकेका फेरीनंतर प्राप्त होत असे. मनुष्यरूपी घरांत प्रवेश करावयाचा—जनतारुपी घरांत प्रवेश करावयाचा तर तो योग्य मार्गानें च प्रवेश होईल.

**मनुष्य – घर**
**गुण – दार**
**दोष –भिंती**

असें आचार्यांचें सूत्र च आहे.

जरी आश्रमवासीयांना ९ वर्षेंपर्यंत एक विशिष्ट दर्शन मिळालें असलें तरी ते या नवीन सेवेला—ग्रामप्रचाराला—अनभ्यस्त च होते. खेड्यांतली अस्वच्छता, तेथली अत्यंत अमंगल शौचव्यवस्था, तेथल्या शिव्यागाळी, भांडणतंटे, तेथलें अनियमित जीवन—या सगळ्यामुळें कित्येक आश्रमवासी ५० खेड्यांची प्रदक्षिणा करून आले म्हणजे थकलेले दिसत. क्वचित् निराशेची छटा त्यांच्या बोलण्यांत उमटून पडे. अशा वेळीं आचार्यांचे वर दिलेले खेड्यासंबंधींचे उद्‌गार—खेड्यासंबंधींचे सिद्धांत—नवीन हुरूप आणण्याला आणि तदनुसार काम करण्याला कारणीभूत होत. खेड्यांमध्यें आश्रमीयांना दूध मुळींच मिळावयाचे नाहीं. कारण गाईचें च दूध वापरण्याचा आश्रमीयांचा आग्रह असे. शिवाय वाटेल त्या वेळीं फिरणें आणि वेळीं अवेळीं जेवणें, झोपेच्या वेळेचा हि नियम नाहीं. रात्रीं चिलटें व डांस चाऊन झोपमोड व्हावयाची—अशा

अनुक्रमणिका

स्थितींत खेड्यांत फिरतांना शरीरारोग्य राखणें जड जाणें स्वाभाविक होतें. त्यामुळें हि आश्रमवासी थकलेले दिसत.

**धकाधकीचा मामला । कैचा घडे अशक्ताला**
**जयाकारणें शक्ताला । नाना बुद्धी शिकवाव्या**

समर्थांनीं एवढ्यासाठीं च प्रचारक वज्रदेही पाहिजे असें म्हटलें आहे. प्रचारक वज्रदेही हवा, प्रचारकाचें चित्त अयशानें निराश होईल असें नसावें. अयशानें उत्साह आणि यशानें नम्रता हा कर्मयोगांतला आचार्यप्रणीत विनियोग त्यांच्या चित्तांत ठसलेला पाहिजे. तो जगाच्या मोहजालांत न अडकतां अनेक लोकांना त्यानें आपल्याकडे ओढलें पाहिजे. सगळीकडचे गुण घेऊन त्यानें दोषनाशार्थ सेवेच्या अनेक योजना करीत गेल्या पाहिजेत. अत्युत्साह आणि निरुत्साह या दोन आडवाटा टाळून त्यानें धृत्युत्साहयुक्त चाललें पाहिजे अशी आचार्यांची आश्रमीयांना शिकवण असे.

जरी खेड्यांत फिरण्याला आणि सेवा करण्याला निघालेले सर्व आश्रमवासी दीर्घकालपर्यंत आश्रमांत राहिलेले होते, तरी सर्वांचीं वयें, योग्यता, प्रकृति आणि प्रवृत्ति सारखी नसे. त्यांच्यांत पुष्कळ च भेद होता. असा भेद असला तरी तो ग्रामसेवेला मारक न ठरतां तारक च ठरेल असा आचार्यांचा विश्वास होता. कारण ग्रामसेवा म्हणजे कांहीं यांत्रिक काम नाहीं. ग्रामसेवेच्या हजारों अंगांना विकसित करणारे असे अनेक तऱ्हेचे सेवक पाहिजेत. त्यामुळें आश्रमीय प्रचारकानें खेड्यांत जाऊन अमुक च विशिष्ट काम केलें पाहिजे असा कोणता च निर्बंध कोणावर हि नसे. दोन वेळच्या प्रार्थना, तकलीवर सूत काढण्याची अर्धा तास उपासना, आहाराचे नियम इ. गोष्टी सर्वांच्या सामान्य असत. तथापि दरेकाची कार्यदृष्टी वेगवेगळी होती. कोणी संगीताचे ज्ञाते होते. त्यांनीं तद्वारा लोकांना एकत्र करावें, कोणी लाठीकाठी इत्यादि व्यायाम च लोकांना दाखवून देत. कोणाला व्याख्यान साधे, कोणाला घरगुती पद्धतीनें व्यावहारिक गोष्टींत लक्ष घालून संवादद्वारा लोकांची सेवा करतां येईल तर कोणाचा सूत कांतणें, पिंजणें इ. शिकविण्यावर भर असे. कोणाचा विद्यार्थ्यांत प्रवेश होई, तर कोणी वृद्धांमध्यें अधिक बसे. कोणी वर्तमानपत्रें वाचून दाखवी तर कोणी बापूजींच्या विचारावर भर ठेवी. कोणी शेतकऱ्यांत मिसळून जाई, त्यांच्याबरोबर शेतीचें हि काम करूं लागे. कोणाचा स्त्रियांत अधिक प्रवेश व्हावयाचा. कोणी अभ्यासी वृत्तीचा असे तो परिस्थितीची, अवलोकनाची भिन्न भिन्न टिपणें च तयार करी. कोणी चळवळीच्या वृत्तीचा असे तो खेड्यांतल्या सरकारचा अन्याय धुंडून त्याविरुद्ध लोक एकत्रित करण्याचा प्रयत्न करी, कोणी सेवावृत्तीचा असे तो आजाऱ्याची शुश्रुषा हि करी अशा प्रकारें जो तो आपापल्या वृत्तीप्रमाणें, प्रकृतीप्रमाणें खेड्यांत सतत भ्रमण करी. कधीं एखाद्या भिकार झोपडींत मुक्काम असावा तर कधीं गर्भश्रीमंत मालगुजाराच्या टोलेजंग वाड्यांत रहावें, कधीं केवळ कोरडी भाकरी खावी तर कधीं श्रीमंती भोजनाचा प्रकार अवलोकावा, कधीं भर उन्हांतून फिरावें, तर कधीं आल्हाददायक अशा चांदण्यांतून प्रवास व्हावा, कधीं दाट जंगलांतून जावें तर कधीं गालिच्यासारख्या हिरव्या गार गव्हाच्या शेतांतून नागमोडी वाटेनें फिरावें. कधीं संध्याकाळीं फिरावें तर कधीं पहाटे प्रार्थना करून शुक्राच्या चांदणीकडे बघत बघत वाट चालावी. कधीं कोणाशीं बोलत बोलत चालावें, तर कधीं एकटे च विचारमग्न असावें. अशा त्या आश्रमीयांच्या भिन्न भिन्न भ्रमणप्रवृत्तीमागें आचार्यांची सर्वांगी अनुभवसिद्ध बुद्धि दडलेली होती. सुगंध वाऱ्यानें वाहून आणला तरी तो मूळ आला फुलापासून च. पाळींतून पाणी आलें तरी विहिरींतूनच ते मिळालें. झाडाच्या शेंड्याला फळें आलीं तर त्याचा रस खरोखर मुळाचाच समजावयाचा. त्याप्रमाणें हे सर्व वेगवेगळे आश्रमवासी जरी वेगवेगळ्या स्वरूपांत आणि वृत्तींत फिरत असले तरी त्या सर्वांच्या पाठीमागें केवळ आचार्य च दडलेले असत. आश्रमवासी हे आचार्यांचे हातपाय होते. या

अनुक्रमणिका

दृष्टीनें हा प्रचार खरोखर आचार्यांचा एकट्याचा च होता आणि आश्रमवासियांना या प्रचारांत जरी क्वचित् नानातऱ्हेच्या शंका, निरुत्साह आणि भ्रमप्रसंगांचा अनुभव आला तरी आचार्यांना हा प्रचार म्हणजे केवळ आनंदाचा विषय वाटे. त्यामुळें कोणी आश्रमवासियानें

**पुरे पौरान् पश्यन् नर-युवति-नामाकृति-मयान्**
**सुवेषान् स्वर्णालंकरण-कलितान् चित्र-सदृशान्**

असा अनुभव मांडला किंवा दुसऱ्या एखाद्यानें

**वने वृक्षान् पश्यन् दलभरभरान् नम्र-सुशिखान्**
**घनच्छाया-च्छन्नान् बहुल-कलकूजद्-द्विज-गणान्**

असा आरण्यक अनुभव सांगितला तरी आचार्यांच्या प्रचारानंद वृत्तींत मुळीं च फरक होत नसे. कारण त्यांनी जीवन्मुक्तानंदलहरीस्तोत्राचा या च प्रचारकार्यांत स्वतः महाराष्ट्रांत फिरत असतां अनुभव घेतलेला होता.

**कदाचितत्प्रासादे क्वचिदपि च सौधे च धवले**
**कदाकाले शैले क्वचिदपि च कूलेषु सरिताम्**
**कुटीरे दांतानां मुनिजनवराणामपि वसन्**
**मुनिर्नव्यामोहं भजति गुरुदीक्षा क्षततमाः**
**क्वचिद्बाले : सार्धं करतलज तालैश्च हसितैः**
**क्वचिद्वै तारुण्यांकित चतुर नार्या सह रमन्**
**क्वचित्वृद्धैश्चिंतां क्वचिदपि तदन्यैश्च विलपन्**
**मुनिर्नव्यामोहं भजति गुरुदीक्षाक्षततमाः ॥**
**कदाचिद्विद्वद्भिर्विविध सुपुरानंद रसिकैः**
**कदाचित्काव्यालंकृत रसरसालैः कविवरैः**
**वदन्वादांस्तर्कैरनुमिति परैस्तार्किकवरैः**
**मुनिर्नव्यामोहं भजति गुरुदीक्षाक्षततमाः ॥**

अशी आचार्यांची अनुभवसिद्ध परिपूर्ण भूमिका होती.

ही भूमिका प्रत्येक आश्रमवासियाजवळ नसली तरी प्रत्येक जण दरेक फेरींत आचार्यांकडून अधिकाधिक स्फूर्ति मिळवून आपापल्यापरी ग्रामसेवेचा आटोकाट प्रयत्न करीत होता यांत शंका नाहीं. एकदां एका गांवांत रात्रीच्या वेळीं भर बारा वाजतां वाजत गाजत बकऱ्याला बळी देण्यासाठीं म्हणू न चाललेले लोक एका आश्रमप्रचारकाला आढळले. तो झोपेंत च होता. परंतु या गोंधळानें त्याची झोप मोडली. आणि हें काय प्रकरण म्हणून तो तपास करतों तों त्याला कळलें कीं गांवांत कॉलऱ्याची साथ आहे. बकऱ्याचा बळी दिल्यानें ती शांत होईल, या अडाणी समजुतीनें हा प्रकार चालला आहे. ही हकीकत कळतां च तो आश्रमवासी ताडकन् उठला आणि ज्या ठिकाणीं बकऱ्याला बळी द्यावयाचा त्या खड्ड्याजवळ उभा राहिला आणि त्यानें रात्रींच्या वेळीं मशाली हातांत घेऊन, ढोलकी पिटीत बळी देण्याच्या तयारींत असलेल्या त्या मोठ्या जनसमूहाला बळी देण्याच्या या भ्रामक समजुतीसंबंधीं खड्या आवाजांत समजावून

सांगितलें. त्याचा लोकांवर परिणाम झाला. तो पुढें म्हणाला, "जर बकऱ्याला बळी देऊन ही साथ जाईल असे तुम्ही मानत असाल तर मला—मनुष्याला बळी द्या. मग तर ही साथ पुन्हां कधीं येणार च नाहीं तुमच्या या समजुतीप्रमाणें. कसें हि असो, मी माझ्या देखत हा बळी जाऊं देणार नाहीं." हा निर्धार पाहून जनसमाज परतला आणि तो बळी वाचला. जनसमुदायाची समजूत पटली. एकदां दुसरा एक आश्रमवासी रस्त्यानें चालला असतां दूर एका विहिरीजवळ पुष्कळ माणसांचा जमाव दिसला. म्हणून काय भानगड आहे हे पाहाण्यासाठीं तो जवळ गेला. तेथें एक लहान मूल विहिरींत पडलें असून गांवचे लोक कुणी हि त्या मुलाला काढण्याच्या तजविजींत न पडतां विनाकारण आरडाओरड आणि गोंधळ करीत होते. हें पाहतां च तत्क्षणीं त्या आश्रमवासियानें तशीच्या तशी च विहिरींत उडी टाकली. आणि त्या मुलाचा प्राण वांचविला. असा च एक आश्रमवासी एके ठिकाणीं रात्रीं झोपला असतां शेजारच्या घरीं त्याला कांहीं गडबड असल्याचें ऐकूं आलें. थोडा कानोसा घेतो तो त्याच्या सर्व प्रकार लक्षांत आला. एका विधवेला अनैतिक संबंधानें एक मूल झालें. त्या मुलाला मारून टाकण्यासंबंधीं त्या ठिकाणीं बेत चालले होते. ते ऐकल्याबरोबर सदर आश्रमवासी पुढें झाला. आणि त्यानें सर्वांना खडसावून बजावलें कीं खबरदार मुलाचा प्राण घ्याल तर. त्या मुलाचें रीतसर पालन झालें च पाहिजे. एकदां एक आश्रमवासी एका गांवीं उतरला होता. रात्रींचा ११ चा सुमार होता. निजण्याची वेळ झाली च होती. इतक्यांत त्याला घरमालकानें बोलावलें. घरांत एक तरुण मुलगी क्षयानें आजारी होती. ती घाबरली. तिला रक्ताच्या गुळण्या येऊन ती बेशुद्ध झाली कांहीं उपाय? घरमालक विचारतो. उपाय काय सांगणार? 'थोडें तूप तोंडांत टाका' आश्रमवासी म्हणाला. कसलें तूप नि कसले काय! त्या मुलीचा तत्क्षणीं प्राण गेला. झालें. एकाएकीं एकदम मोठा आकांत सुरू होणार तों च त्या आश्रमवासीयानें समजावून सांगितलें, 'या वेळीं सगळा गांव निजला आहे. या वेळीं रडूं नका. मृताजवळ रडणें चांगलें नाहीं. मृताजवळ बसून गीतापाठ करावा.' घरवाल्यांवर या वचनाचा परिणाम झाला. सर्व गुपचूप राहिले. बायकामंडळी केवळ मुसमुसत होती. डोळ्यांतून अश्रू वाहत होते. पण कोणी गळा काढून रडलें नाहीं. सकाळीं रीतसर दहनविधि झाला. त्या वेळीं मात्र मोठमोठ्यानें रडणें थांबलें नाहीं. असे अकस्मात् घडणारे किती तरी प्रसंग खेड्यांत फिरत असतां आश्रमीयांसमोर एकाएकीं उभे राहात. त्या वेळीं एकदम उपाययोजना करावी लागे. त्या वेळीं विचाराला वेळ च नसे. परंतु संथ विचारपूर्वक करण्याचीं कामें हि आश्रमवासी आटोकाट मेहनत घेऊन करीत. एका आश्रमप्रचारकानें गांववाल्यांच्या मदतीनें एक रस्ता तयार केला होता. एकानें पुष्कळशीं खादी स्वतः अंगावर लादून खेड्यापाड्यांत खादीचा प्रचार केला. एकानें एका लग्नांत खादीचे च कपडे वधूवरांना घ्यावयाला लावून कमी खर्चांत लग्न करण्याची पद्धति दाखवून दिली. वाटेल त्या भिकाऱ्याला भिक्षा न घालतां रोज प्रत्येकानें ठरलेल्या रांजणांत भिक्षा घालावी व त्या भिक्षेचा उपयोग अपंग लोकांसाठीं करावा अशी पद्धत एकानें दाखवून दिली.

आकस्मिक कार्य होईल तें करावें, चिंतनपूर्वक होऊं शकेल तें हि ग्रामकार्य करीत असावें आणि ग्रामसेवेचें सतत चिंतन करावें. एक हि विषय चिंतनांतून सुटूं नये असा आश्रमप्रचारकांचा प्रयत्न असे. हिंदुस्थानची ४० करोड वस्ती. ७ लाख गांवें. या हिशेबानें हिंदुस्थानांतलें स्वयंपूर्ण खेडें म्हणजे सरासरीं ५०० वस्तीचें धरावें. ५ माणसांचें कुटुंब धरलें तर १०० कुटुंबांचा हा गट झाला. हिंदुस्थानांत शेतीं माणशीं एक एकर पडतें. स्वयंपूर्ण गांवांत निदान ५/६ शें एकर शेती पाहिजे. + गांवाला जागा + गुरचरण + शाळा + स्मशान इतकी जमीन हवी. शेतीच्या जमिनींत कमींत कमी ५० विहिरी हव्यात. कुंकवाखेरीज सौभाग्यवती स्त्री तशी विहिरीशिवाय शेती. गांवांत निदान १० विहिरी पाहिजेत. प्रत्येक विहिरीला आजुबाजूला फरसबंदी पाहिजे. नाहीं तर कचरा, घाणपाणी विहिरींत च मुरतें. गुरांना पाणी पाजण्यासाठीं कुंडीं पाहिजेत. गांवापुरता रोज निदान प्रत्येक कुटुंबाला कमींत कमी शेरभर भाजीपाला मिळेल इतकी तरी बागायत पाहिजे. त्या त्या मोसमांतली फळे हि प्रत्येकाला नीट मिळतील अशीं फळझाडें गांवाच्या आसपास

अनुक्रमणिका

हवींत. जेवणांत रोज लिंबू मिळण्याची व्यवस्था हवी. माणशीं रोज एक पौंड धान्य लागतें या हिशेबानें वर्षाला १,८०,००० पौंड धान्य शेतींत पिकलें पाहिजे. + बीं बियाणासाठीं + वरखर्चासाठीं + पाहुणेपांथस्थांसाठीं + पुढील सालासाठीं कांहीं शिल्लक + शेतसाऱ्यासाठीं इतकें तरी धान्य गांवच्या शेतींत उत्पन्न झालें पाहिजे. त्यांत द्विदल धान्य, मुख्य खाण्याचें धान्य आणि गळिताचें धान्य याचें प्रमाण हि नीट साधलें पाहिजे. शिवाय गांवाला ५०० माणसांना पुरेल इतकें वस्त्र गांवांतच झालें पाहिजे. त्यासाठीं शेतींत तेवढा भरपूर कापूस पिकवला पाहिजे. माणशीं वर्षाला २० वार या हिशेबानें गांवाला १० हजार वार कपडा लागेल. इतका कापूस + पुढील वर्षासाठीं शिल्लक कापूस + हिंदुस्थानांत सर्वत्र कापूस होत नाहीं म्हणून विकण्यासाठीं, इतक्या कापसाची जरूरी आहे. ५०० माणसांच्या गांवांत कमींत कमीं ४०० शेर तरी दूध हवें. प्रत्येक घरीं निदान पौंड दीड पौंड दूध पाहिजे च. प्रत्येकाला निदान ताक तरी मिळालें च पाहिजे. 'तक्रं तारकं' हें आचार्यांचें सूत्र च असे. यासाठीं गांवाला १०० दुभत्या गाई हव्यात. जी गाय रोज ४ शेर दूध देत नाहीं ती गाय नव्हे. १०० दुभत्या गाई म्हटल्या कीं निदान आणखी ५० भाकड गाई धरल्या च पाहिजेत. १५० गाइसाठीं गांवांत उत्तम जातीचे ५/७ वळू पाहिजेत. इतर सर्व बैल खच्ची केले पाहिजेत. गाईची संतति मजबूत आणि दूध हि सकस व भरपूर मिळेल अशा तिहेरी दृष्टीनें गाईची जोपासना झाली पाहिजे. बैलांना आर टोचतां कामा नये. गुरें घरापासून दूर बांधण्याची व्यवस्था पाहिजे नाहीं तर चिलटे होऊन आरोग्य बिघडावयाचें. शेतींत गुरांसाठीं भरपूर चारा झाला पाहिजे. शिवाय वाहनासाठीं बैल हवेत. जलद चालण्यासाठीं गांवांत कांहीं घोडे असावेत. गांवांत शेतीराखणीसाठीं कुत्रे हि असावेत. मेंढ्या, बकऱ्या, कोंबड्या हि गांवाला लागतील. त्यांचा घोंगड्या करण्याकडे वगैरे उपयोग होईल. गुरांच्या शेणाचें नीट खत झालें पाहिजे. गुरें मेल्यावर त्यांच्या हाडांचें, मांसाचें खत उत्तम होऊं शकतें. चामडें कमावलें जावें, शिंगांच्या वस्तू बनवाव्या, खुरांचा हि उपयोग होईल. या सर्व गोष्टीसाठीं चर्मालय लागेल. गांवाजवळ शौचासाठीं चरांचे फिरते पायखाने पाहिजेत. स्त्रीयांसाठीं, पावसाळ्यांसाठी अलग व्यवस्था पाहिजे. सर्व सोनखत शेतींत उपयोगांत आणलें पाहिजे. गांवांत सार्वजनिक आरोग्यासाठीं, बाळंतिणीसाठीं ४ रोगी राहूं शकतील असा दवाखाना पाहिजे. तेथें बाहेरच्या खेड्यांतल्या लोकांना हि औषधोपचार करतां येईल. जवळ च गुरांचा दवाखाना असांवा. गांवांत मध्यभागीं बाजाराची जागा असावी. ५०० माणसांना निदान ५/७ उत्तम दुकानें लागतील च. जो माल खेड्यांत होत नाहीं तो दुकानांत ठेवला जावा. ग्रामपंचायतीनें भावनियंत्रण करावें. दुकानें सार्वजनिक असावींत, धान्य देऊन, कापूस देऊन, कापड देऊन, सूत देऊन माल मिळण्याची सोय असावी. पैशाचा व्यवहार शक्य तो नसावा. गांवांत चावडीं असावी. तेथे पंचायतीचें काम चालावें, सर्वांना योग्य न्याय मिळावा, सज्जनांना, निस्वार्थी वानप्रस्थी लोकांना पंच निवडावें, गांवचा न्याय बाहेर जाऊं देऊं नये. गांवाजवळ एकांतांत शाळा असावी. ८० मुलें तरी या शाळेंत हजर राहतील. तीन शिक्षक इतक्या मुलांना पुरेसे होतील. शिक्षणांत मातृभाषा उत्तम लिहितां वाचतां यावी. राष्ट्रभाषा बोलतां यावी. आरोग्य, गणित, शेती, गोरक्षा, भजन, संगीत, चित्रकला, वस्त्रविद्या असे उपयुक्त विषय असावेत. शिक्षक वानप्रस्थी असावा. त्याच्यावर स्वतःच्या चरितार्थाखेरीज कोणाची हि जबाबदारी नसावी. त्यानें इतर वेळीं प्रौढ स्त्रीपुरुषांना साक्षर करावें. त्यानें गांवांत शिस्तशिक्षणासाठीं अखाडा वगैरे हि स्थापावे. गांवांत उत्तम आणि उपयुक्त ५०० पुस्तकांचें वाचनालय हवें. तेथें एक छापील वर्तमानपत्र यावें. शिवाय आजूबाजूच्या १० गांवांचें व आपल्या गांवाचें ग्रामीण वृत्त देणारे एखादें सायक्लोस्टाइलचें साप्ताहिक असावें. गांवांतल्या साळी, माळी, तेली, कुंभार, लोहार, सुतार, सोनार, गवंडी, पाथरवट, बुरूड, पानाडे, गौळी, शिंपी, परीट, रंगारी, न्हावी—या सगळ्यांच्या धंद्यांची ऊर्जितावस्था झाली पाहिजे. शिवाय कागद, साबू, मधमाशा यांचे हि धंदे काढावे. गांवांत कर्ज देण्याला सार्वजनिक संस्था असावी. भलतें च व्याज घेऊं नये. गांवाजवळ एकांतांत एक च पण सर्वोत्तम देवालय असावें, तेथें गांवची सर्व कला, सर्व गांभीर्य, सर्व शांति, सर्व पावित्र्य, सर्व ज्ञान हीं एकत्र व्हावींत. तेथें साधुवृत्तीचा एखादा मनुष्य असावा. हरिजनांना येथें

प्रवेश असावा, तेथें तत्त्वसंकीर्तन आणि श्रवणमननाची सोय असावी. निरनिराळें उत्सव, राष्ट्रीय दिन तेथें व्हावेत. गांवांतील स्त्रियांना शिक्षण द्यावें, त्यांचा सार्वजनिक गोष्टींत भाग असावा, विधवांना लग्नाची परवानगी असावी, विधवा अमंगल मानल्या जाऊं नयेत, जरठांबरोबर मुलींची लग्नें होऊं नयेत, स्त्रियांना पडदा नसावा. त्यांची दागिन्यांची हांव काढून टाकावी. एका पुरुषाला अनेक बायका नसाव्यात, पुरुषापेक्षां स्त्रीमजुराला मजुरी मुळीं च कमी देऊं नये. गांवांतून अमंगळ भाषा, शिव्यागाळी काढून टाकण्याची प्रचंड मोहीम सुरू केली पाहिजे. प्रत्येक घराला ऐसपैस जागा असावी. घरें साधीं कुडाचीं असलीं तरी चालतील पण प्रकाश, आकाश आणि जागा भरपूर पाहिजे. शक्य तर प्रत्येक घराला अंगण असावें आजूबाजूला जागा सोडलेली असावी. सांडपाण्यासाठीं (सोकपीट) असावी. घरांत बंद स्नानगृह असावें, स्वच्छ स्नान न केल्यानें खेड्यांत चर्मरोग फार होतात. हरिजनवस्ती गांवाबाहेर नसावी. हरिजनांना सर्व विहिरी, सार्वजनिक जागा, शाळा, मंदिर,चावडी, दवाखाना, प्रत्येकाची ओसरी किंवा बैठक इतक्या ठिकाणीं पूर्ण हक्कानें येण्याचा अधिकार आहे. त्यांना कोठें च 'हरिजन म्हणजे अस्पृश्य' या मुद्यावर बंदी नसावी. त्यांना तुच्छ लेखूं नये. त्यांना शिक्षण द्यावें, स्वच्छता शिकवावी, त्यांचें मृतमांस खाणें सोडवावें. गांवांत मुसलमान किंवा इतर धर्माच्या लोकांना सन्मानानें वागवावें. त्यांच्या उत्सवांत हिंदूंनीं भाग घ्यावा. त्यांना आपल्या उत्सवादिकांत बोलवावें. त्यांच्या धर्मांतील गोष्टीशीं परिचय करून घ्यावा. त्यांच्या मशीद, दर्गा वगैरेसाठीं मदत करावी. गांवांत करमणुकीसाठीं कीर्तन, नकला, ललितें, मॅजिक लँटर्न असले प्रकार चालतील. पण तमाशे बीभत्स लावण्या असले प्रकार नसावेत. लहानमोठी सर्व मंडळीं मधून मधून मैदानी खेळ हुतूतू, आट्यापाट्या, खो खो वगैरे खेळ खेळतील तर गांवांत परस्पर स्नेह वाढण्याला मदत होईल, मनाचे कानेकोपरे झिजून मन विशाल होईल. बैठ्या खेळांत जुगारी प्रकार नसावा. बुद्धिबळासारख्या खेळाला हरकत नाहीं. पण पत्ते, सोंगट्या असे खेळ नकोत. गांवांत दारू, गांजा, अफूचें दुकान नको. शिंदी, ताडी, कोणतें हि मादक पेय नको. विड्या, चिलमी, चहा हीं हि व्यसनें सोडविण्याचा आटोकाट प्रयत्न व्हावा. गांवांत भुतेंखेतें, चेटकें, अंगांत येणें असल्या प्रकारांचें प्रस्थ माजूं देऊं नये. या गोष्टींत धार्मिकता नाहीं हें समजावें, गांवांत रात्रीं रस्त्यावर पंचायतीतर्फे दिवे लावण्याची सोय व्हावी, गांवांत रात्रीं पांच सहा जणांची गस्त असावी. वेळ समजण्यासाठीं तासातासानें ठोके पडावेत. पंचाइतींत मोठें घड्याळ असावें. गांवच्या लोकांपैकीं दर वर्षी कांहीं विद्यार्थी, कांहीं स्त्रिया, कांहीं मोठीं माणसें, कांहीं हरिजन, कांहीं मुसलमान, कांहीं साळीमाळी इत्यादि कारागीर वगैरेंना कॉंग्रेस, खादी-प्रदर्शनें, आश्रमासारख्या संस्था, अजिंठा वेरूळसारखीं स्थळें अशा ठिकाण क्रमाक्रमानें खर्चाचा अंदाज पाहून गांवातर्फे पाठविण्याची व्यवस्था व्हावी. त्यामुळें गांवांत जगाच्या स्फूर्तीचा संचार होईल. गांवाच्या आजूबाजूला दर वर्षी वृक्षारोपणविधि व्हावा. वड, पिंपळ, आंबा, जांभूळ, आवळे, रिठे, लिंब, युकेलिप्टस् असलीं झाडें लावावीं. आंधळे-पांगळे अपंग यांची गांवांत नीट व्यवस्था व्हावी. गांवांत कोणाला हि भीक मागूं देऊं नये. महारोग्याला अलग करावें. त्याला चालमोग्रा तेलाचें इंजेक्शन देण्याची व्यवस्था करावी, किंवा त्याला गांवातर्फे महारोगी वसाहतींत पाठवावें. सामुदायिक शेती, सामुदायिक गोशाळा, असले नवीन नवीन प्रयोग गांवांत होत रहावेत. या दृष्टीनें गांवांत शेतकी मंडळ, चर्मकार मंडळ, विणकाम मंडळ असलीं अनेक हितैषी मंडळें असावीत. गांवांत मजुरांना ८/९ तासांपेक्षां अधिक काम नसावें. त्यांना गुलाम समजूं नये. लग्नादिप्रसंगीं बेसुमार खर्च होऊं नये. त्यावर नियंत्रण असावें. गांवांत देवळासंन्निध सार्वजनिक बाग असावा. प्रत्येक घरीं जमाखर्च ठेवण्याची, रोजनिशीं लिहिण्याची पद्धति असावी. गांवांत मधून मधून थोर पुरुषांना आणण्याची व्यवस्था करावी. त्यांच्या उपदेशाचा लाभ गांवाला मिळावा. प्रत्येकानें आपल्या प्राप्तीचा कांहीं तरी, अल्पसा तरी भाग दरवर्षी सार्वजनिक सेवेला धर्म म्हणून द्यावा. खेड्यांत राहणें हें शहरापेक्षां स्वस्त, सुखमय, आरोग्यमय, शांतीचें असें ठरावें. येथें विद्वानांनीं येऊन आपले ग्रंथ लिहावेत. येथें कवींना काव्य करण्याला अनुकूलता वाटावी. येथें शास्त्रज्ञांना अभ्यासाला उत्साह वाटावा. येथें संशोधकाला संशोधन करतां यावें. येथें भक्ताला

अनुक्रमणिका

आत्मशुद्धीची साधना करतां यावी—अशा प्रकारचें हें चिंतन फिरत फिरत आश्रमवासी आपल्या मनाशीं करीत असत. वास्तविक पाहतां सृष्टि नाशवंत आहे. तथापि—

**संसार मुळीं च नासका । विवेकें करावा नेटका**
**नेटकां करितां फिका । होत जातो**

ग्रामसेवेच्या चिंतनांत हि ही च दृष्टि असावी असें आचार्यांचें सांगणें आहे.

आज खेड्यांची स्थिति काय आहे? कमींत कमी सुस्थिति कशी असावी? ही सुस्थिति निर्माण करण्याला काय करावें? या संबंधींचा विचार आश्रमवासी आश्रमांत जमले म्हणजे आचार्यांसह सहज बोलतां बोलतां होऊन जात असे. सर्व आश्रमवासी एके ठिकाणीं एका वेळीं यावेत, म्हणून प्रचारक मंडळाची हि योजना झाली. प्रचारक मंडळाच्या बैठकी मधून मधून होत त्या वेळीं आचार्य सर्वांचें म्हणणें ऐकून घेत. खेड्यांत— (१) शालोपयोगी वाङ्मय, (२) वैद्यकीचीं पुस्तकें, (३) संतग्रंथ व पौराणिक ग्रंथ, (४) नाटक, कादंबरी, (५) वर्तमान पत्र—असें पांच तऱ्हेचें वाङ्मय आढळतें असा एकानें तपास केला, तो आचार्यांपुढें मांडला. खेड्यांतील लोकांना शहरांत होतात तसलीं प्रवचनें, व्याख्यानें, विचारात्मक, तर्कात्मक मांडणी आवडत नाहीं. अशीं व्याख्यानें ऐकतां ऐकतां ते तेव्हां च पेंगू लागतात. त्यांना गोष्टी, गाणीं, साधे व्यवहारांतले दृष्टांत, चुटके, विनोद, भजन, कीर्तन या गोष्टींच्या द्वारें सांगणें सोपें जातें हा हि अनुभव आचार्यांपुढें मांडण्यांत आला. खेड्यांतील लोकांना साधुवेष पाहून विशेष आदर वाटतो. पूर्वसंतांच्या तपस्येचा हा परिणाम आहे. एखाद्या ठिकाणीं सप्ताह करावा. त्याच्या समाप्तीचें भोजन करावें असल्या गोष्टींत खेडेगांवच्या लोकांना उत्साह वाटतो. गांवोगांव धान्य जमविण्याला मग अनेक लोक तयार होतात. अमुक ठिकाणीं यज्ञ आहे, असें म्हटलें कीं लोक तेथें जावयाचे च. पै पैसा तेथें ठेवतील. प्रसादग्रहणाला आतुर असतील. हें हि अवलोकन आचार्यांपुढें ठेवलें गेलें. खरोखर ज्या प्रमाणांत भारतवर्षांत भोजनाला प्रसादस्वरूप दिलें गेलें आहे तसें इतरत्र दिसत नाहीं!

अशा तऱ्हेच्या या स्थूल अवलोकनाखेरीज अगदीं सामान्य दिसणाऱ्या गोष्टींत, सामान्य वाटणाऱ्या घटनेंत हि आचार्यांना अनेक गूढ मानसभाव आढळून येत. आश्रमीय प्रचारकांना त्या संबंधीं कल्पना नसे. परंतु, आचार्यांनी अशा सामान्य वाटणाऱ्या घटनांचा अर्थ उकलून दाखविला म्हणजे मात्र खात्री पटत असे. म्हणून आश्रमीय प्रचारकांना आचार्यांची नित्याची सूचना असे कीं वेळांत वेळ काढून अनेक अवलोकनांचे टाचण करीत जावें. अशा अनेक टांचणांतून मग पुढें पृथक्करण होऊन खेडेगांवच्या सेवेचें शास्त्र बनेल. एवढ्यासाठीं प्रत्येक प्रचारकानें १५ दिवसांनीं तरी आपल्या फिरण्याचा, अवलोकनाचा रिपोर्ट पाठवावा. असें हि निश्चित करण्यांत आलें. त्याप्रमाणें अहवाल हि पाठविण्यांत येत. परंतु त्यांत विशेष कांहीं च आढळून येत नसे. प्रचारकाशीं बोलतां बोलतां अनेक महत्त्वाच्या गोष्टी आचार्यांच्या लक्षांत येत. पण प्रचारकाच्या रिपोर्टांत कांहीं च नसावयाचें. लेखननिरूपण समर्थांनीं एवढ्यासाठीं च केलें आहे. रोजनिशीं एवढ्यासाठीं च ठेवावयाची. 'दिसामाजि कांहीं तरी तें लिहावें' हा नियम हि या च कारणासाठीं. अशा साध्या दिसणाऱ्या लिखाणांतून अनेक महत्त्वाचे सिद्धांत राष्ट्राला मिळूं शकतात. शिवाय प्रचारकाला केवळ अवलोकन, टांचण एवढें करून भागणार नाहीं. त्यानें गांवांतील लोकांच्या अडचणींचा स्वतः जातीनें अनुभव घेतला पाहिजे. म्हणून खेड्यांतील लोकांसारखी राहणी असावी पण खेड्यांतील लोकांसारखें रहावयाचें म्हणजे लोक राहतात त्या पद्धतीनें राहावयाचें. नाहीं तर लोकांनीं जसें रहावें असें आपण समजतों तसें रहावयाचें, अशी आचार्यांची शिकवण होती. शिवाय—

**उत्कट भक्ति उत्कट ज्ञान । उत्कट चातुर्य उत्कट भजन**
**उत्कट योग अनुष्ठान । ठाईं ठाईं**

अशी उत्कटता प्रचारकाच्या ठिकाणीं पाहिजे. त्यासाठीं उत्कट गुणांचा प्रचंड अभ्यास पाहिजे ही आचार्यांची आणखी एक शिकवण होती. प्रचारकापाशीं प्रबोधशक्ति हवी. जनमनाला हालवून सोडण्याचें सामर्थ्य त्याच्यापाशीं असलें पाहिजे. आणखी एक सूचना प्रचारकाला आचार्य करीत. वास्तविक प्रत्यक्षपणें अशी कोणती च सूचना आचार्यांकडून केली जात नसे. परंतु त्यांच्या बोलण्यांत अनेक सूचना येऊन जात. स्वाध्यायाच्या द्वारें, ध्यानाच्या द्वारें, एकांताच्या योगानें, पूर्ण निवृत्तीच्या योगानें प्रचारकानें या सर्व जगताच्या पसाऱ्यापासून रोज कांहीं काळ तरी स्वतःला अगदीं अलिप्त राखावे. त्यामुळें प्रचारकाची बुद्धि ताजी राहील आणि नवीन नवीन स्फूर्तीचे कोंब तिला फुटत राहतील. समर्थांनीं हि ही मांडली आहें—

**कांही गल्बला कांहीं निवळ । ऐसा कंठीत जावा काळ**
**जेणें करितां वेळ । आपणासि फावे**

या सर्व प्रचारांत आचार्यांची एक च भावना होती. आपल्या या आजूबाजूच्या खेड्यांत सर्वत्र उपासनेचा प्रचार व्हावा, सकाळसंध्याकाळच्या प्रार्थनेंत लोकांनीं आवडीआवडीनें भाग घ्यावा. दुपारीं सर्व जणांनीं तकली उपासनेंत सामील व्हावें. या उपासनेचा प्रचार करण्यांत हि आत्मशुद्धीखेरीज दुसरी कोणती च वासना कोणत्या च आश्रमीयांच्या ठिकाणीं नसावी. या खेड्यांतल्या लोकांच्या रूपानें हा माझा नारायण च सर्वत्र नांदतो आहे, ही सर्व जनता हा प्रत्यक्ष महादेव, त्या देवदेवाचें मीं दर्शन घ्यावें, तेथें तें अवलोकन पुढें ठेवून पुन्हा दुसऱ्या अंगाचें अवलोकन करण्यासाठीं निघावें, अशा महादेवाच्या प्रदक्षिणा एकसारख्या होत जाव्या, ही च आचार्यांची अपेक्षा असे. या अपेक्षेप्रमाणें आश्रमीय प्रचारकांनीं तीं वर्धा तालुक्यांतील तीनशें गांवें अनेक वेळां अनेक निमित्तानें अवलोकिलीं. २५-२५ मैलांच्या मजला मारून, रात्रीचा दिवस करून, त्यांनी अनेक प्रकारे आश्रमाचें लोण सर्वत्र पोंचविलें. जो आश्रम कांहीं दिवसांपूर्वी खेडवळांना क्वचितच माहीत होता, त्याची आतां सर्वत्र माहिती होऊन गेली. जे आश्रमीय वर्धा गांवांत हि कोणाला ओळखीत नसत त्यांच्या आतां शेकडों ओळखी झाल्या. जें खेड्याचें जीवन आश्रमीयांना माहीत नव्हतें तें त्यांच्या आतां नित्यपरिचयाचें झालें. आचार्यांची ज्या तकलीउपासनेवर साक्षात् परमेश्वराप्रमाणें श्रद्धा होती ती तकलीं खेड्यांत सर्वत्र पसरून देण्याचा योग हि या च सुमाराला येऊन ठेपला. आणि या तीनशें खेड्यांत विद्युत्वेगानें जिकडेतिकडे उपासना सुरू झाल्याचें दृश्य दिसूं लागलें. तें दृश्य इतक्या लवकर पहावयास मिळेल अशी कोणाला कल्पना हि नव्हती. परंतु आश्रमीय प्रचारकांची खेड्यांत प्रदक्षिणा सुरू झाली आणि तिकडे हिंदुस्थानभर एका अपूर्व उत्साहाची लाट आली. आश्रमीय प्रचारकांनीं ही ईश्वरी कृपा च मानली. आणि जनतारूपी महादेवाच्या प्रदक्षिणांची कमाल केली. त्यामुळें त्या वेळीं तरी जिकडे तिकडे हें च दृश्य दिसूं लागलें.

उपासना—उपासना—उपासना
प्रदक्षिणा—प्रदक्षिणा—प्रदक्षिणा

●●●

# प्रकरण ४० वें

## आचार्यांचे अद्‌भुत त्रिविध दर्शन

**सन** १९३०. हिंदुस्थानभर जिकडे तिकडे जागृतीचा महापूर आलेला होता. महात्माजींच्या "दांडी-कूचचा" सर्व राष्ट्रभर विलक्षण परिणाम झाला होता. आबाल-वृद्ध सर्वांना उत्साहानें भारून टाकलें होतें. वसंतऋतूच्या आगमनानें अरण्यांत पानें, फुलें, फळें, यांची जशी नुसती गर्दी उडून जाते त्याप्रमाणें महात्माजींच्या दांडी-कूचच्या प्रसंगानें राष्ट्रांत नवचैतन्याची नुसती गर्दी उसळून गेली. स्वराज्य मिळवून हिंदी जनतेची हीनदीन स्थिति पालटल्याखेरीज साबरमती आश्रमांत परतावयाचें नाहीं अशी भीष्मप्रतिज्ञा महात्माजींनीं घेतली होती. साबरमती-आश्रमामध्यें दांडीं-कूचच्या पूर्वी महात्माजींनीं कित्येक महिने पुढील दिव्याची तयारी चालविलेली होती. एका शिस्तीचे, संयमधर्माच्या पराकाष्ठेचे, ध्येयासाठीं मरणाला कःपदार्थ समजणारे वीर येथें हवेत. कोणत्या हि कारणानें शिस्तपालनांत तीन वेळां चूक झाली तर तो मनुष्य साबरमती-आश्रमांत राहण्याला लायक नाहीं. अशा तऱ्हेची सत्याग्रहाच्या लढाईची लष्करी तयारी आश्रमवासीयांकडून त्यांनी चालविलेली होती. गरीबांना धड नीट पोटभर भाकर सुद्धां मिळत नाही. मग आम्ही जगावें तरी कसें? या दारूण व्यथेनें महात्माजींचें हृदय शतशः विदीर्ण झालें होतें. त्यासाठीं त्यांनीं आश्रमांत दिव्य तपस्या चालविली होती. स्वतःची मुख्य तपस्या, त्याबरोबर च आश्रमवासीयांकडून करविण्यांत येणारी तपस्या, सर्व हिंदी राष्ट्राची प्रतिनिधीभूत जी कॉंग्रेससंस्था तिच्यामध्यें अनेक तऱ्हेचे विचारमंथन अशा त्रिविध स्वरूपांत दांडींकूचच्या आधींचा सहा महिन्याचा काळ गेला होता. नवजीवन व यंग इंडिया या दोन वर्तमानपत्रांतून पुढील आत्मबलिदानाची कल्पना सर्व हिंदुस्थानभर हळूं हळूं पसरत होती. बापूजींचे लेख जनता आणि सरकार दोघांना हि जागृत करीत होते. अखेर बलिदानाचा म्हणजे सत्याग्रह संग्रामाचा समय जवळ जवळ येत चालला. कॉंग्रेसनें महात्माजींना सर्वाधिकार दिला. कौन्सिलांत जाऊन सरकारविरोधी कार्य करणाऱ्या स्वराज्य पक्षाची या वेळीं खात्री झाली कीं आंता कायदेभंगाखेरीज इलाज नाहीं. म्हणून भराभर एकामागून एक बहुतेक सभासदांनीं कायदे कौन्सिलचे राजीनामे सादर केले. कॉंग्रेस वर्किंग कमिटीच्या बैठकी साबरमती-आश्रमांत वारंवार होऊं लागल्या. त्या बैठकीमधून काय बोलणीं होत हें कोणाला हि कळत नसे. सर्व बैठकी कडक पहाऱ्याखालीं खासगी स्वरूपांत होत. कोणती हि बातमी मुळीं च बाहेर जात नसें. त्यामुळें तर देशभर उलट उत्सुकता अधिक च वाढे. महात्माजी काय करणार, देशाला कोणता मार्ग दाखविणार या बद्दलचे सर्वत्र आपापल्या तऱ्हेनें तर्क सुरू झाले. भावनेचा प्रचंड वेग कार्यकर्त्यांच्या मस्तकांत थैमान घालूं लागला. ज्या त्या प्रांतांत आपापल्या तऱ्हेनें स्वराज्यासाठीं बलिदान करण्याची तयारी सुरू झाली. पंजाबमध्यें ३० हजार सत्याग्रही फौज तयार झाली. बिहारमध्यें ६० हजारांवर आंकडा गेला. महाराष्ट्रांत असें च प्रचंड सैन्य उभारलें जात आहे. बंगालमध्यें लाखों लोक एका पायावर तयार आहेत. गुजराथमधील सत्याग्रहांच्या संख्येचा असाच प्रचंड आंकडा. अशा तऱ्हेच्या वर्तमानपत्रांत बातम्या येऊं लागल्या.

परंतु महात्माजींनीं या सर्व गोष्टींना आपल्यापासून अगदीं दूर ठेवलें होतें. या अत्युत्साहांत ते मुळीं च वाहवले नाहीं. ते स्वतःच त्यांच्या बरोबरीचे प्रतिज्ञाबद्ध आश्रमीय यांखेरीज इतरांनी सत्याग्रह संग्रामांत महात्माजींच्या आज्ञेखेरीज मुळीं च भाग घ्यावयाचा नाहीं अशी त्यांची योजना होती. प्रथम सुरुवात अत्यंत शास्त्रशुद्ध झाली पाहिजे. सुरुवातीला चुकी होणें किंवा कच्चेपणा असणें म्हणजे पुढील चळवळीचा डोलारा डळमळीत ठेवणें होय. म्हणून महात्माजींनी व त्यांच्या निवडक मंडळींनी च प्रथम सत्याग्रह करावयाचा ही

अनुक्रमणिका

योजना बिनचूक होती. सबंध सत्याग्रहाश्रम—साबरमतीचा होम या स्वराज्ययज्ञांत करावयाचा अशी त्यांची दृष्टि होती. त्याप्रमाणें ज्याला या लढ्यांत भाग घ्यावयाचा नसेल त्यानें आश्रम सोडून जाणें हें या वेळीं क्रमप्राप्त ठरलें. संपूर्ण आश्रम होमून टाकण्यांत आणखी हि एक हेतू होता. कोणत्या हि वस्तूवर कोणती हि खासगी मालकी ठेवावयाची नाहीं. अशा तऱ्हेचें संपूर्ण अपरिग्रहांचें व्रत आश्रमाचें एक महत्त्वाचें तत्त्व होतें. हा या व्रताचा अगदीं स्थूल अर्थ होता. पण साबरमती आश्रममधील अपवादभूत व्यक्ति सोडून पुष्कळांना याप्रमाणें वागणें शक्य नाहीं. असें आढूळन आल्यावर या लढ्यापूर्वी साबरमतीआश्रमांचे "उद्योग-मंदिरांत" बापूजींनीं रूपांतर करून टाकलें. त्यांना परिग्रह ही वस्तू सहन होण्याजोगी नव्हती. परंतु अहिंसा तत्त्वाप्रमाणें त्यांनी उद्योग-मंदिराची योजना करून आश्रमीय मंडळींना मार्गदर्शन करून दिले. तथापि आश्रमीयांचा होम करून टाकावा व राष्ट्र-सेवेनिमित्त आपण या सर्व लोकांसाठीं घेतलेला सार्वजनिक परिग्रह सार्थ होता ही वस्तु सिद्ध व्हावी हा हि ह्या लढ्यांत आश्रमीयांना अग्रभागीं उभें करण्यांत बापूजींचा एक हेतु होता. तशी वर्धा-आश्रमची स्थिति नव्हती. येथला सार्वजनिक पसारा बापूजींचा केलेला नव्हता. येथें अपरिग्रहाच्या स्थूल अर्थाच्या पालनाला हि तयार नसणारी मंडळी नव्हती. त्यामुळें वर्धा-आश्रमचें उद्योग-मंदिरांत रूपांतर झालें नव्हतें. तथापि हा आश्रम सर्वच्या सर्व सोडून देण्याला व सत्याग्रह युद्धांत बलिदान करण्याला येथली मंडळी पूर्णपणें तयार होती. तरी बापूजींच्या प्रत्यक्ष. आज्ञेखेरीज केवळ नक्कल म्हणून येथें कांहीं च केलें गेलें नाहीं. येथें दांडीं-कूचसारखी कूच कोणती च झाली नाहीं. येथें खेड्यामध्यें आश्रमातर्फे आचार्यांनी आधींपासून योजलेलें परिभ्रमण मात्र अधिक जोरानें चाललें.

ठरल्याप्रमाणें मिठाचा अन्याय दूर करण्यासाठीं बापूजी आणि त्यांची आश्रमीय मंडळी साबरमतीहून पायीं दांडींकडे जाण्यास निघाली. हिंदुस्थानभर या प्रयाणांतल्या बातम्या पसरू लागल्या. मीठ ही अगदीं साधी बाब घेऊन स्वराज्याच्या लढ्याला सुरुवात झाली. बुद्धिमान लोक आश्चर्यात गर्क झाले. कांहीं तरी वेड आहे झालें. असें म्हणण्याच्या मनोवृत्तींत कांहीं लोक होते. परंतु या मिठासाठीं केलेल्या लढ्याचा कधीं हि झाला नव्हता एवढा परिणाम जनतेवर झाला. त्यांत तरुण-वृद्ध, स्त्रीपुरुष, वैश्यशूद्र, शहरांतले खेड्यांतले असा कोणता च भेद राहिला नाहीं. जिकडे तिकडे राष्ट्र चैतन्यानें प्रस्फुरित झालें, हें दृश्य सर्वांनीं पाहिलें. कन्याकुमारीपासून तो काश्मीरपर्यंत आणि द्वारकेपासून तो जगन्नाथपर्यंत खेड्यापाड्यांसकट सर्व देश हलून गेला. सरकार हि महात्माजींकडे— "काय होणार आहे या मिठाच्या सत्याग्रहानें, कोण ऐकतों या म्हाताऱ्याचें" अशा दृष्टींनें पाहात होतें. म्हणून बापूजींना सरकारनें पुष्कळ दिवस पकडलें नाहीं. परंतु देशभरची जागृति पाहिल्यावर शेवटीं महात्माजींना पकडलें. क्रमाक्रमानें सर्वत्र मिठाचे व अन्य सत्याग्रह सुरू झाले. ५०/५० हजार लोकांचा जमाव जमूं लागला. विराट सभा होऊं लागल्या. मुखस्तंभांना वाचा फुटली. अनेक वक्ते तयार झाले. प्रचाराच्या अनेक तऱ्हा अवलंबिल्या जाऊं लागल्या. आणि—

**प्रेमे प्राणे गाने गंधे आलोके पुलके**
**प्लावित करिया निखिल द्युलोके भूलोके**
**तोमार अमल अमृत पडि छे सरिया**
**दिके दिके आजि टुटिया सकल बंद**
**मूरति धरिया जागिया उठे आनंद**
**जीवन उठिलो निबिड सुधाय भरिया**

असा रविबाबूंनीं गीतांजलींत लिहिलेला अनुभव सर्वत्र अनुभवण्यास मिळूं लागला.

अनुक्रमणिका

लोकांच्या आजपर्यंतच्या केवळ जडवृत्तीचें चैतन्यांत रूपांतर झाल्यानें हा अनुभव प्रत्येकाला कांहीं तरी प्रेरणा देत होता. ज्याला जें जें शक्य तें तें त्याने राष्ट्रासाठीं करावें ही प्रेरणा सर्वत्र पसरली होती. त्यामुळें आचार्यांनी वर्धा आश्रमतर्फे पाठविलेल्या प्रचारकांना हि खेड्यांतील लोकांशी मिसळून त्यांना कार्यप्रवण करण्याची ही एक मोठी च पर्वणी अनायासें चालून आल्यासारखें झालें. जिकडे तिकडे तालुक्यांत आचार्यांना प्रिय असणारी तकलीउपासना सुरू करण्यांत आली. सुरू करण्यांत आली म्हणण्यापेक्षां बापूजींच्या पुण्याईनें लोक जणूं काय या गोष्टीची वाट च पाहात होते असें म्हणावें लागेल. आश्रम प्रचारक केवळ या गोष्टीचे तज्ञ म्हणून निमित्तरूप झाले एवढें च. खरोखर यांत बापूजींची हि पुण्याई कशाची, योग्य काळ आला म्हणजे ईश्वर कोणाला तरी निमित्त करून त्या त्या गोष्टी घडवीत असतो. ईश्वरी कार्याला निमित्त होण्याची पात्रता असणें ही च वास्तविक पुण्याई. बापूजींना सुद्धां मिठाच्या सत्याग्रहाचा एवढा विलक्षण परिणाम होईल अशी मुळींच कल्पना नव्हती. त्यांनीं केवळ स्वकर्तव्य म्हणून सत्याग्रह सुरू केला होता. फळ मिळो वा न मिळो अशा निष्काम भावनेनें च त्यांनी सत्याग्रह-यज्ञ सुरू केलेला होता. भगवंतांनी ११ व्या अध्यायांत अर्जुनाला सांगितले, अरे अर्जुना, तूं सर्व अहंकार सोड आणि केवळ निमित्त हो. बाकी सर्व गोष्टी मी करून च ठेवलेल्या आहेत.

**मया हतांस्त्वं जहि मा व्यथिष्ठा । युद्धस्व जेतासि रणे सपत्नान्**
**निमित्तमात्रं भव सव्यसाचिन् ।**

ईश्वराच्या राज्यांत त्याच्या आज्ञेशिवाय एक पान हि हालत नाहीं. इतकें च काय त्या ईश्वराच्या राज्यांत उदात्त आणि क्रांतिकारी घटनांच्या ज्या परंपरा निर्माण होतात त्या ज्या व्यक्तींना निमित्त करून होत असतात, त्या व्यक्ती त्या त्या घटनांच्या निमित्तत्वाला पात्रीं होतात हा हि त्या व्यक्तींचा स्वतंत्र गुण असतो असें नाहीं. ईश्वरी इच्छेनें च अशा व्यक्तींना, पात्रता प्राप्त होत असते. दगडगोटे शेंदूर फासून देव होतात त्याप्रमाणें च ही गोष्ट आहे. घटना घडून गेल्या म्हणजे मग ऐतिहासिक व भौतिकवादी त्यांची कारणपरंपरा शोधून काढीत असतात. व ती परंपरा व घटना इतिहासांत क्रमप्राप्त मानीत असतात. परंतु या सर्व अपूर्व घटनांच्या पाठिमागची महत्कारणशक्ति त्यांना कधीं हि समजूं शकत नाहीं. या अपूर्व घटनात्मक परिवर्तनाला युगपरिवर्तन म्हणतात. हा च ईश्वरी अवतार होय. जगाला ज्या ईश्वरी प्रेरणेची आणि तदनुसार आवश्यक असणाऱ्या स्थूल बदलाची जरूर असते, तो बदल आणि ती प्रेरणा त्या त्या वेळीं एखाद्या अकल्पित तऱ्हेनें एकदम येणाऱ्या वावटळीप्रमाणें उद्‌भूत होतें. आणि मग त्याची कारणपरंपरा आणि उपपत्ति लोक शोधीत राहतात त्या च प्रमाणें या वावटळींत ज्या ज्या व्यक्ती अग्रेसर दिसतात त्यांच्यासंबंधीं सुद्धां मागून अनेक तऱ्हेची तर्कपरंपरा मांडली जाते. असल्या प्रचंड वावटळीवर स्वार झालेल्या ज्या व्यक्ती असतात त्यांना हें माहीत नसतें असें नाहीं कीं आपल्या पुढचें कार्य परिणामदृष्ट्या किती विलक्षण आहे.

**साहिबका घर दूर है जैसी लंबी खजूर ।**
**जो चढेगा सो पावेगा गिरेगा तो चकनाचूर ॥**

अशी या कार्याची स्थिति असते. परंतु ईश्वरी प्रेरणेमुळें कोणत्या हि भयंकर तुफानांत असले पुरुष कच खात नाहींत. ही १९३० सालची चळवळ सुरू करण्यापूर्वी खुद्द कॉंग्रेसमधल्या च नाणावलेल्या बुद्धिमान पुरुषांना हि असें वाटें कीं, या चळवळीनें देशांत अराजक माजेल आणि भलतेंच कांहीं तरी घडून इष्ट हेतु बाजूला च राहील. अशा तऱ्हेच्या पुष्कळ शंका प्रदर्शित केल्या गेल्या होत्या. परंतु ईश्वरी कार्याला निमित्त झालेल्या

बापूजींसारख्या पुरुषावर त्याचा परिणाम होणें शक्य नव्हते. त्याप्रमाणें ही महान चळवळ सुरू झाली. या चळवळीचा निरनिराळ्या ठिकाणीं अनेक तऱ्हेचा इष्ट परिणाम घडून आला. परंतु वर्धा-तालुक्यांत ही चळवळ म्हणजे केवळ इष्ट परिणामीं च ठरली नाहीं, तर या चळवळीच्या रूपानें वर्धा-आश्रमच्या कार्यकर्त्यांना खेड्यापाड्यांत काम करण्याच्या यशस्वितेचें वरदान च प्राप्त झालें. देवदर्शनाला जाण्याच्या वाटेत च देवपूजेसाठीं विविध तऱ्हेचीं फुलें मिळावीं किंवा गुरुगृहीं जाण्यासाठीं तयारी करावी तों च स्वतः च सद्गुरुंचे अकल्पित आगमन व्हावे अशासारखी ही गोष्ट झाली. या गोष्टीमुळे कार्यकर्त्यांना कार्यसुलभता प्राप्त झाली. तसें त्यांना केवळ निमित्तत्व येऊन कर्तृत्व करून हि अभिमानाला जागा राहिली नाहीं. अहंकार जसा जसा कमी होतो तसेतसे कर्तृत्व वाढतें. कारण ईश्वर अशा निरंहकार कर्त्याला आपल्या कार्याचें निमित्तत्व देत असतो. ही च ईश्वराची भक्त वत्सलता आश्रमच्या खेड्यांतील प्रचारकांना कर्तृत्वाचा अहंकार असल्याचे कांहीं च कारण नव्हतें. एक तर त्यांना खेड्यांत फिरूं लागून फार दिवस झालें नसल्यामुळें मी यँव केलें, मी त्यँव केलें असें म्हणण्याला फारसा अवसर नव्हता. दुसरें आश्रमप्रचारक निव्वळ नांवाचे होतें. त्यांच्या पाठिमागें आचार्यांची मूर्ति दडलेली होती. ते च हा प्रकार करवीत होतें. आतां या चळवळीच्या निमित्तानें लोकांत अपूर्व जागृति निर्माण झाल्यानें ती हि आपण निर्माण केली असे वाटण्याचे कांहीं च कारण नव्हतें. त्यामुळे आश्रमप्रचारक उत्तरोत्तर अधिकाधिक निमित्तमात्रेला पात्र होत होते. म्हणून च त्यांना अपूर्व उपासना कार्याचा देखावा दिसूं लागला. व तो निर्माण होण्याला साधनभूत होतां आलें. घरींदारीं, बाजारांत, शहरांत, खेड्यांत, पंढरपुरांत ज्याप्रमाणें—

जिकडे तिकडे हरिहरनामाचा सर्वदा असे गजर

तसा तेथें तकली उपासनेचा देखावा दिसूं लागला. या वेळीं वर्धा तालुक्यांत आश्रमीय प्रचारकांनी ३०० गावांत सुमारें १६/१७ हजार तकल्या घरोंघरीं पोंचविल्या. तकलीची किंमत एक आणा किंवा सहा पैशापेक्षां अधिक नसल्यामुळें ती घेण्याला कोणाला हि जड जात नसे. इतक्या सर्व तकल्या उपयोगांत आणल्या गेल्या किंवा हा सर्व च प्रचार योग्य मर्यादेंत केला गेला असें नाहीं. एका प्रचारकाने एक जेवणावळ चालली होती. तेथें च शिरून व्याख्यान दिलें व दरेकाच्या समोरची दक्षिणा घेऊन त्या बदल्यांत त्यांच्यापुढें तकल्या ठेवल्या. एकदां एका प्रचारकाला एक जण म्हणाला, "बरें आणा तकली, हा घ्या एक आणा. मला सूत कांतावयाचें नसलें तरी तकलीचा उपयोग होईल." सदर प्रचारकानें पृच्छा केली;— "कोणता उपयोग?" घेणारा गृहस्थ म्हणाला, — "अहो, निदान आलेलीं पत्रें तरी तकलीला खोचून ठेवतां येतील." हा तकलीचा उपयोग अपूर्व खराच! —इत्यर्थ इतका च कीं ज्या मानानें तकल्या लोकांनीं घेतल्या त्या मानानें तकली-उपासना झालीं असें म्हणतां येणार नाहीं. तरी हजारों घरांत ही उपासनामूर्ति प्रविष्ट झाली. हजारों लोकांनीं वेडेवांकडे कां होईना राष्ट्र-सेवेच्या भावनेनें तकलीवर सूत कांतलें, ही काय साधी गोष्ट झाली? राष्ट्र-सेवेसाठीं उपासनेची सर्वांना दीक्षा मिळाली. व्यक्तीला जी कोणती दीक्षा मिळत असते ती एकांतांत, शांत विचारांनें, प्राप्त होत असते. समाजाला—सबंध राष्ट्राला भावनेच्या आवेगांत च कोणता हि दीक्षालाभ होत असतो. आपल्या घरीं एकांतांत ईश्वरस्तवन करतांना जो वेग मिळत नाहीं तो वारकऱ्यांच्या भजनांत सहज प्राप्त होतो. अर्थात

**तेव्हां तया महासुखाचेनि भरें । धांवोनि देहाचिये गांवाबाहेरें**
**मियां धाले तेणें उद्गारें । लागती गाजों**
**पैं गुरुशिष्यांचिया एकांतीं । जे अक्षरा एकाची वदंती**
**ते मेघाचियापरी त्रिजगतीं । गर्जती सैंघ**

अनुक्रमणिका

**जैसी कमलकळिका जालेपणें । हृदयींचिया मकरंदातें राखों नेणे**
**दे रायारंका पारणें । आमोदाचें**
**तैसेंनि मातें विश्वीं कथित । कथितेनि तोषें कथूं विसरत**
**मग तया विसरामाजी विरत । आंगें जीवें**

अशी शुद्ध सात्त्विक भूमिका क्वचित च आढळावयाची. अशा वेगांत उन्मादकता ही असते च. तो उन्माद ओसरला जातो. अशी वेगाची समाजांत आवश्यकता असते. प्रचंड यात्रांची योजना एवढ्यासाठीं च झालेली आहे. तेथला तो समुदाय दरेकाच्या तोंडांत विठ्ठल नामाचा एक च गजर, दिंड्या पताकांची गर्दी—त्या वातावरणांत मनुष्य सहज च गुंग होऊन जातो. या चळवळींमध्यें हि असें च झालें. तकल्या, पेळू पिंजणें, गांवोगांव पोचविणें, पेळू करण्यास शिकविणें, तकली कांतण्यास शिकविणें, हा च सर्व प्रचाराचा भर होता. एकाचें पाहून दुसरा, दुसऱ्याचें पाहून तिसरा अशी ही गुरुपरंपरा अपरंपार होत गेली. कित्येकांचा अति बारीक सूत कातण्याकडे कल असे. कित्येक पीळ च अधिक देत. कित्येकांची भराभर सूत कांतण्यांकडे वृत्ति वळलेलीं असे. तर कित्येकांना नियमित सूत कांतण्याचे महत्त्व वाटे. कोणी भर रस्त्यांत सूत कांती, कोणी घरी गप्पा मारतांना, तर कोठे भाजीवालींने भाजीची पाटी समोर ठेवली आहे आणि एकीकडे ती सूत कांतते आहे असा देखावा दिसे. कित्येक तकलीला 'टकळी' म्हणत, तर कित्येक फिरकी म्हणत. कित्येकांनी या मूर्तीला भिंगरी नांव ठेवलें होतें तर कोणी 'कतली' म्हणण्यापर्यंत मजल मारलेलीं असे.

आचार्यांच्या नेतृत्वाखालीं खेड्यांतील जनतेला उपासनाकार्यांत मदत करण्याचे कार्य चाललें होते. त्याप्रमाणें आश्रमांत हि या कार्याला उपयुक्त अशी तयारी करण्यांत कित्येक मंडळी गुंतली होती. तकल्यांची प्रचंड मागणी पुरी पाडण्यांसाठी कित्येक जण तकल्या तयार करण्याच्या उद्योगांत गुंतले होते. कित्येक बारडोली आश्रमातर्फे तकल्या मागविण्याच्या व प्रत्यक्ष तेथील तकली-कार्य अवलोकनाच्या उद्योगांत होते. शिवाय आश्रमांत पेळू करणें विणकाम करणें, इ. कामे हि चालूच होतीं. परंतु चळवळींच्या विविध बातम्यांनीं कित्येक उतावीळ अननुभवी आश्रमीयांना अस्वस्थता वाटे. त्यांची समजूत अशी कीं या वेळीं आचार्य आश्रमातच स्थिर कसे? चळवळीच्या आघाडीवर मोठमोठ्या पुढाऱ्यांत आचार्यांनी सामील झालें पाहिजे. केवळ या तालुक्यांत चाललेलें काम या मंडळींना असमाधानकारक वाटे. तेथल्या कामाचा खोलपणा त्यांच्या ध्यानांत येत नसे. त्यामुळें त्यांचे चित्त अस्वस्थ राहूं लागलें. आश्रमाच्या आसपासच्या वातावरणांत असणाऱ्या कित्येकांनी तर म्हणावे, अरविंद घोषांप्रमाणें च आचार्यांचे आहे. आचार्यांचे देशापेक्षां ब्रह्मचिंतन, ध्यान, समाधि इकडे च अधिक लक्ष आहे. गोपाळराव काळे एकदां विनोदानें म्हणाले हि— 'अरविंद घोष तरी साधना पूर्ण झाल्यावर बाहेर येऊ म्हणतात पण तुमची ती हि आशा नाहीं, या चळवळींत आचार्यांनी एक हि व्याख्यान दिले नाहीं किंवा ते आश्रमाच्या बाहेर हि पडले नाहींत. या चळवळींनें त्यांच्या चित्तावर कोणता हि विचलिततारूप परिणाम केला नाहीं. ही चळवळ सुरू होण्यापूर्वी आचार्यांनी वर्तमानपत्रें वाचण्याचें अजिबात सोडून दिलें होतें कारण वर्तमानपत्रांतील चावट, चऱ्हाट, आणि निंदास्तुतीच्या लिखाणाकडे आचार्यांना पहावेना. परंतु चळवळ सुरू झाल्यापासून मात्र आचार्य वर्तमानपत्र वाचूं लागले. चळवळींच्या बातम्यां च मुख्यतः ते पाहीं. या चळवळींत आपापली स्थानें सोडून कित्येक जण समुद्राकाठी गेले, कित्येकांनी अन्य प्रांतात प्रयाण केलें, कित्येकांनी निरनिराळ्या ठिकाणी शिबिरें काढलीं. पण आचार्यांनी तसें कांहीं च केलें नाहीं. आचार्यांची असामान्य भूमिका हें च याचें कारण होतें. हुकमी आणि निश्चित पध्दतींने त्यांचे तेथल्या तालुक्यांत काम चाललें असतां व कोणत्या हि प्रकारें स्वाभाविक ओघांत येत नसतां, चळवळींसाठीं अन्यत्र जाणें हे कस्तूरीमृगाप्रमाणें स्वतः जवळ कस्तूरी असतां अरण्यांत कस्तूरीसाठीं भटकण्यासारखें होतें. इतर लोक चळवळींसाठीं इतस्ततः भटकलें याचें कारण त्यांच्याजवळ

अनुक्रमणिका

स्वतंत्र योजना आणि नित्य चळवळ नव्हतीं. त्यामुळें ही चळवळ संपल्यावर इतरांच्या हि चळवळीं संपल्या. पण आचार्यांचे खेड्यांतले काम थांबलें नाहीं. वर्षाकाळी नद्यांना पूर येतो आणि शरत्काळीं त्या ओसरूं लागतात, पण समुद्राला वर्षाकाळीं वाढ नसतें. आणि शरत्काळीं तो ओसरत नाहीं, तशी आचार्यांची स्थिति होतीं.

**आकांश हें वोसरों । पृथ्वी वरी विरो**
**परी नेणों मोहरों । चित्तवृत्ति**

आचार्यांची मनःस्थिति आणि कार्यस्थिति सर्वथैव नित्य आणि अचल स्वरूपाची असे. तींत नैमित्तिक उत्साहानें विचलितता येत असे. नैमित्तिक उत्साह निरुपयोगी नव्हे. नैमित्तिक उत्साहाचा उपयोग ३०० खेड्यांत आचार्य आश्रमवासीयांकडून करवीत होते च. परंतु त्यांनी स्वस्थान सोडून चळवळींसाठीं अन्यत्र जाणें किंवा येथली मंडळीं अन्यत्र पाठविणें योग्य नव्हते. ही गोष्ट येथें च स्वाभाविकपणें उद्‌भूत झालेल्या चळवळींच्या वेगानें हि पुढें सिद्ध झालीं. या च तालुक्यांत जंगल सत्याग्रहांची चळवळ सुरू झालीं. जंगल सत्याग्रहांत पुष्कळसें आश्रमवासी पकडले गेले. जर आचार्य येथे स्थिर राहिले नसते तर या तालुक्यांतली महत्त्वाचीं कार्ये आणि चळवळ योग्य तऱ्हेनें झालीं नस ती. गुरुत्वमध्यढळला कीं कार्य ढांसळलें. स्थिरता, परमशुद्धि, सर्वगामी बुद्धि आणि हुकमी कार्ययोजना ही ज्याच्याजवळ असेल तो च कार्याचे केंद्र होऊं शकतों. अहिंसक पद्धतींत शक्तींच्या जोरावर केलेले हुकूम आणि त्या हुकूमांत वागणारें सर्व तंत्र निरुपयोंगी असतें. अहिंसक तंत्रांत शिस्तपालन सहज व स्वेच्छेनें व्हावयास हवें. अहिंसक पद्धतींत श्रेष्ठ-कनिष्ठ ठरवावें लागत नाहीं. ज्याची शुद्धि श्रेष्ठ, म्हणून ज्याची बुद्धि श्रेष्ठ, म्हणून ज्याची स्थिरता श्रेष्ठ, म्हणून ज्यांचे कार्य हि श्रेष्ठ तो च येथें श्रेष्ठ, व इतर कनिष्ठ. श्रेष्ठ सहवासानें इतर कनिष्ठांना हि क्रमाक्रमानें शुद्धि लाभून श्रेष्ठता लाभावयाची व श्रेष्ठ-कनिष्ठांच्या सहकार्यानें कार्य होत रहावयाचे. या तंत्रांत श्रेष्ठापाशीं अरेराव वृत्ति नसतें. कनिष्ठापाशीं हीनपणा किंवा लांगूलचालन नसतें. अशा स्वाभाविक बनणाऱ्या अनेक अनेक श्रेष्ठकनिष्ठ परंपरांनीं सत्याग्रह-तंत्र तयार होत असतें. सत्याग्रहतंत्रांतल्यां शिपायांपाशीं कमींत कमी स्थूल सत्य आणि अहिंसा असावयास पाहिजे च. असा येथल्या लष्करभरतीचा प्रथम नियम. या नियमाप्रमाणें हिंदुस्थानची बहुतेक जनता सत्याग्रहाच्या प्रारंभिक शिपाईगिरीला अनुकूल अशा वृत्तीची आहे. या जनतेंतून विशिष्ट योग्यतेचे लोक प्राप्त करावयाचे. त्यांची खास पथके तयार होतींल. त्या पथकांतून हि खास अमलदार कार्यकर्ते तयार होतील. त्या मधून अत्युत्तम दर्जाचे सेनापति, त्या सेनापतिंतून हि सर्वोत्तम सेनानी तयार होत राहतील. येथे वशिला, जात, वय विद्वत्ता, इ. चा कांहीं संबंध नाहीं. आज महात्माजी सेनानी आहेत, उद्यां एखादा खेड्यांतला निरक्षर शेतकरी हि परम शुद्धीच्या जोरावर विद्वता आदि बाह्य उपार्जित गुण नसतांना हि सत्याग्रहयुद्धाचा सरसेनापति होऊ शकेल. ही सत्याग्रहलष्कर पद्धति आचार्यांना पूर्णपणें माहीत होती. महात्माजींच्या चळवळीचा जसजसा आविष्कार होत गेला तसतसे त्यांचे सिद्धांत अधिक समजूं लागले अशी इतरांची स्थिति होती. आचार्यांनी महात्माजींना कधीं च आत्मसात् केलें होतें. त्यामुळें ते येथें पूर्णपणें स्थिर राहिले. आणि येथल्या खेड्यांतल्या सेवेचें व चळवळींचे कार्य योग्य तऱ्हेनें होऊं शकलें. या दृष्टीनें पाहतां ही गोष्ट निश्चित आहे कीं, महात्माजींना दक्षिण आफ्रिकेपासून आतांपर्यंत आचार्यांच्या तोडीचा सत्याग्रही मिळालाच नव्हता. ते हिंदुस्थानातींल सत्या ग्रहाच्या आघाडीवर सेनानी म्हणून पुढें आले नाहीं. परंतु ते जेथें होते तेथें त्यांच्या भोवतालच्या खोल कामाचा ते एकमेव अग्रणी होते. १९३० च्या सत्याग्रह-संग्रामांत इतर अनेक लोक ठिकठिकाणीं मोठे सेनानी म्हणून नांवाजले. परंतु त्यांतल्या कांही अपवादभूत व्यक्तींखेरींज खरोखर अग्रणी असा कोणीच नव्हता. कोणाभोवतीं हि एकनिष्ठ अनुयायांचें पहिल्या दर्जाचे पथक तयार नव्हते. गणितीपद्धतींने काम करणारा,

सिद्धांत बुद्धिचा, अल्पक्षेत्र घेऊन खोली वाढविणारा पुढारी हिंदुस्थानांत झाला च नाहीं असे म्हणण्यांत मुळीं च अतिशयोक्ति नाहीं.

कसें हि असो, या १९३० सालीं हिंदुस्थानांत जागृतींचे अपूर्व दर्शन घडलें यांत शंका नाहीं. त्याचप्रमाणें आचार्यांच्या स्थितप्रज्ञतेचें हि या वेळी आश्रमीयांना अद्‌भूत दर्शन घडलें. या स्थितप्रज्ञतेंतून च सर्व महाराष्ट्रांवर उपकार करणारी "गीताई" बाहेर पडली. ता. ७—१०—३० ते ६—२—३१ इतक्या दरम्यान गीताईचे लिखाण तयार झालें. १९३० साल हें असें अद्‌भूत दर्शनांनी भरलेलें होतें. आचार्यांनी गीताई लिहून खेड्यांतल्या जनतेला धर्माच्या परमोच्च आणि सर्वसुलभ दर्शनाचे महाद्वार दाखविलें. केवळ निर्वासन बनलेल्या आचार्यांना जी उपासना विश्वांत पसरावी ही एक च वासना म्हणजे तळमळ होती तिची दीक्षा ३०० गांवी दिली गेली. त्या उपासनेचा सर्व हिंदुस्थानभर फैलाव होण्याचा योग हि पुढें यावयाचा होता. कोणत्या हि काळीं राष्ट्रीय उपासनेखेरींज राष्ट्र खडे होऊं शकणार नाहीं अशी आचार्यांची निष्ठा होती. या राष्ट्रीय उपासनेला जी मूर्ति द्यावयाची ती कल्याणकारक, शक्तिशाली आणि सर्वलभ्य पाहिजे. अशी उपासनेची शास्त्रीय व्याख्या च आचार्यांनी बसवून टाकली. या व्याख्येची दोन चरणीं कविता च त्यांनी तयार केली.

**कल्याणकारी शक्तिशाली सर्वलभ्य उपासना**
**चित्तीं मुरो, विश्वांत पसरो ही च माझी वासना**

आज तकलीशिवाय अन्य उपासना-मूर्ति दाखविणें शक्य नाहीं अशी आचार्यांची पूर्ण खात्री झालेली होतीं. त्यामुळें तकलीची मूर्ति बाळकृष्णाच्या मूर्तीप्रमाणें घरोघर पोचविण्याची आश्रमीयांनी इतकी अहमहमिका केली. असें १९३० साल हें किती पवित्र स्मरणांनी भरलेलें आहे!

(१) हिंदुस्थानभर अपूर्व जागृतीची लाट
(२) आचार्यांची अद्‌भूत स्थिरवृत्ति
(३) घरोघर उपासना-मूर्तीची संस्थापना

(४) गीतेच्या १५ व्या अध्यायांतील संसाररूपी वृक्षच्छेदनाशीं असलेल्या शिंदीच्या व्यसनवृक्षच्छेदनांचें कार्य

(५) हजारों लोकांना काबूत ठेवून आश्रमीयांनी घडवून आणलेला जंगलसत्याग्रह.

(६) शेवटचा कळस म्हणजे आचार्यांनी लिहिलेली 'गीताई'. १९३० सालांत घडलेल्या या सहा गोष्टी आचार्यांच्या आश्रमांत राहिलेला कोणी हि मनुष्य विसरणें शक्य नाहीं. या सहा गोष्टीं आश्रमीयांना संस्मरणीय तर खऱ्याच, परंतु याहिपेक्षां या पाठीमागच्या सतत चिंतनीय अशा त्रिपुटींचे हि अपूर्व दर्शन या च सालीं विशेषत्वाने घडून आलें. आणि तें आचार्यांच्या जीवनांत कधींचे च मुरून गेलेलें होते—

(१) बाहेरची जागृति
(२) आंतली स्थिरता
(३) निरहंकारता, म्हणजे च ईश्वरकार्यार्थ निमित्तत्ता हें च आचार्यांचे १९३० सालांतलें त्रिविध दर्शन होय.

अनुक्रमणिका

●●●

अनुक्रमणिका

## प्रकरण ४१ वें

## वृक्षच्छेद

(शिंदीचीं झाडे तोडण्याची चळवळ)

**दृश्य** सृष्टि जड आणि चेतन दोन तऱ्हेची आहे. या दोन्ही तऱ्हेच्या सृष्टींत चर आणि अचर असा आणखी एक भेद आहे. जडसृष्टींत आणि चेतनसृष्टींत दोहोंत हि हा द्विविध भेद आहे. विणकरानें ताणावाणा विणलेला असावा त्याप्रमाणें ईश्वराने जड-चेतन, चर-अचर यांचा एकमेकाशीं विलक्षण योग जमवून दिलेला आहे. या योगामुळें च जीवन टिकून आहे. जीवनाचा विकास हि या योगावर अवलंबून आहे. आंतून ईश्वराशीं योग बाहेरून ईश्वराच्या सर्व सृष्टीशीं योग अशी जीवनाची विकास-दृष्टि संपूर्ण जीवनांत अभिप्रेत आहे. कोणती हि वस्तु माझ्यापासून अलग तोडलेली नाहीं. ती माझ्याशीं आणि ईश्वराशीं. मी तिच्याशीं आणि ईश्वराशीं, ईश्वर तिच्याशीं आणि माझ्याशीं नित्यसंबंधानें जोडलेला आहे. अशी ही सर्वत्र जोडलेली योगदृष्टि आहे. इतकें च काय पण या योगांत केवळ नुसती जोड नसून यांत ईश्वर माझ्यांत आणि मी ईश्वरांत, ईश्वर सृष्टींत आणि सृष्टि ईश्वरांत, ईश्वरांत मी व सृष्टि, सृष्टित मी व ईश्वर, व माझ्यांत ईश्वर व सृष्टि अशी बेमालूम मिसळ झालेली आहे. असा हा विलक्षण योग आहे. या विलक्षण अध्यात्मयोगामुळें च परस्पर व्यवहार चालू शकतो आणि जीवनाचा विकास होत जातो. या अपूर्व सहकार्यावर च जीवन उभारलेंलें आहे. हें च अद्वैत होय. याच्या उलट

**अपरस्परसंभूतं किमन्यत्कामहैतुकम् ।**

ही सृष्टि परस्पर सहकार्यावर चाललेली नसून केवळ कामहेतूनें चाललेली आहे.

**म्हणती लटिकें विश्व निराधार निरीश्वर ।**
**काममूलक हें सारें कोठलें सहकार्य तें ॥**

हें असुरांचे तत्त्वज्ञान होय. सृष्टि परस्पर-सहकार्यानें चाललेली आहे. हें वरवर पाहून हि समजण्यासारखे आहे. पिवळ्या रंगांत निळा रंग टाकला कीं हिरवा रंग कां व्हावा? पिवळ्याच्या निळ्यावर व निळ्याचा पिवळ्यावर परस्पर परिणाम कां घडतो? अद्वैतामुळें. वस्तूंचा परस्परांशीं कोठें तरी बाहेरून पाहिलें तरी मेळ हा व्हावयाचा च. केवळ जड अशी माती पचवून चेतन वनस्पति वाढते. केवळ अचर अशा वनस्पतीचा रस पचवून प्राणी वाढत असतात. पुन्हां प्राण्यांनीं कचरा म्हणून टाकलेला निरुपयोगी भाग वनस्पतींना अन्नासारखा उपयोगी पडतो. वनस्पतींनीं टाकून दिलेला वायु प्राण्यांना महत्त्वाचा ठरतो. वनस्पतींचा वाळून कचरा झाली कीं तो जमिनीशीं मिळून जातो. जमिनींत कचरा झाला कीं वनस्पतींचें तें खत ठरतें. असें परस्परसहकार्यावर सर्व जीवन चाललें आहे.

मानवजीवन तर परस्परसहकार्याशिवाय चालावयाचे च नाहीं. मनुष्यानें परस्परांत म्हणजे माणसामाणसांत सहकार्य करून जीवन चालविलें आहे. तसे प्राणी आणि वनस्पतिसृष्टीशीं सहकार्य करून हि जीवन टिकविलें आहे. केवळ आहाराकडे पाहिलें तरी मनुष्यानें गाय आणि वृक्षापासून किती विकसित

अनुक्रमणिका

आहार प्राप्त केला आहे तें लक्षांत येतें. माती पचवून वनस्पतीचा रस तयार होतो. तो रस पचवून गाईचें दूध होतें. गाईचें दूध उत्कृष्ट अन्न कां? कारण तें विकसित अन्न आहे. मातीच्या वनस्पतीच्या रसांत विकास, वनस्पतीच्या रसाचें गाईच्या रक्तांत रूपांतर, त्या रक्ताचा दुधांत विकास—अशी ही उत्तरोत्तर विकासाची परिणति आहे. दूध म्हणजे साधी वस्तु नव्हे. दुधाची सर मांसाला येणार च नाहीं. कारण मांस म्हणजे पचविलेल्या वनस्पतीचा रस नव्हे तर वनस्पतीच्या रसांचे गायरूपी पचविण्याच्या यंत्रांत केलेंलें रूपांतर आहे. कोणत्या हि प्राण्याचें मांस किंवा रस हा विकसित रस नव्हे. तर विकसित रस निर्माण करण्याचें यंत्रद्रव्य आहे. म्हणून मांस खाणें म्हणजे विकासरस खाणें नसून विकासरसयंत्र खाणें आहे. मांसांत हि रस असतो व मनुष्य तो खाऊन बाकी कचरा फेकून देतो, व त्यावर जगूं शकतो. परंतु मांसांतला रस हा यंत्र चालू राहण्यासाठीं असलेला रस आहे. तसे दुधाचें नाहीं. दुधाचा गाईचे शरीरयंत्र चालण्याला उपयोग नाहीं. गाय दूध वत्सासाठीं किंवा वत्सवत् माणसांसाठीं देते. म्हणून गाईचें दूध हा विकसित आहार आहे. तसें च वृक्षांचें आहे. वनस्पतींचें रसनिर्माण यंत्र न खातां तिचा केवळ रस ग्रहण करावयाचा तर केवळ फलाहार च करावा लागेल. खरोखर गाईचें जसें दूध तसें झाडाचें फळ. फळ खाल्ल्यानें झाडाला यत्किंचित हि इजा होत नाहीं. झाडाचा उत्तमोत्तम रस अगदीं शेवटीं फळरूपाने परिणत होतो. म्हणून फळाहाराच्या तोडीचा आहार च नाहीं. गाय वनस्पतीला पूर्णपणें खातें. म्हणजे तिच्या खाण्यांत चेतनवस्तुविनाश आहे तसें हि वृक्षाच्या बाबतींत म्हणतां येणार नाहीं. यामुळे दुधापेक्षां हि झाडावर पिकलेल्या फळांचा आहार हा सर्वोत्तम आहार होय.

**तरी सत्त्वगुणाकडे । जैं दैवें भोक्ता पडे**
**तैं मधुरीं रसीं वाढे । मेचु तया १७ १३५**
**आंगेंचि द्रव्य सुरसें । जे आंगेंचि पदार्थ गोडसे**
**आंगेंचि स्नेहें बहुवसें । सुपक्के जियें १७ १३६**
**आकारें नव्हती डगळें । स्पर्शें अति मवाळें**
**जिभेलागीं स्नेहाळें । स्वादे जियें १७ १३७**
**रसें गाढीं वरी ढिलीं । द्रवभावें आथिलीं**
**ठायेंठावो सांडिलीं । अग्नितापें १७ १३८**
**आंगें सानें परिणामें थोर । जैसें गुरुमुखींचें अक्षर**
**तैसें अल्पीं जिहीं अपार । तृप्ति राहे १७ १३९**

गीतेच्या १७ व्या अध्यायांत ज्ञानेश्वरांनीं सात्त्विक आहारांत फळाहार च सात्त्विक आहार होय असें सुचविलें आहे. गुरुमुखांतलें अक्षर म्हणजे जसें गुरुच्छिष्ट होय, त्याप्रमाणें फळ हें वृक्षोच्छिष्ट च म्हणावें लागेल. (उत्-शिष्ट—झाडावर शिल्लक राहिलेंलें) या दृष्टींनें झाडाचें महत्त्व केवढें आहे! सृष्टि परस्परसहकार्यावर—अद्वैतावर—उभी आहे म्हणून कोणाचें हि सहकार्य तोडूं नये. यांतून वृक्षाचे सहकार्य तोडणें हें केवढें पाप!

**जो खांडावया घाव घाली । कां लावणी जयानें केली**
**दोघां एक चि दे साउली । वृक्ष जैसा**

सबंध वृक्षच्या वृक्ष च तोडूं लागला तरी तो मात्र आपलें सहकार्य—कार्य कधीं च तोडणार नाहीं. तो आपल्या छायेनें तोडणाराचे हि श्रमहरण करील. मानवजीवनावर वृक्षांनीं केवढा परिणाम केलेला आहे! सबंध वंशपरंपरेला च वंशवृक्ष म्हणतात. मूळ मनुष्य जेवावयाचा हि झाडांच्या पानांवर. ज्ञानाचें भोजन हि पूर्वी

अनुक्रमणिका

ताडपत्री पोथीवर प्राप्त होत असे. बुद्धि मापावयाची तर वृक्षावरून च. ही शाखाग्राही बुद्धि आहे. ही मूलग्राही बुद्धि आहे असें म्हणावयाचें. लिंबासारखी अंगकांति, चंपकासारखा गोरा, तमालश्याम असें कांतिवर्णन हि वृक्षावरून च व्हावयाचें. कोणतें हि महत्कृत्य झालें कीं

**अद्य मे सफलं जन्म अद्य मे सफलः क्रियाः**

असा फळाचा उल्लेख करावयाचा. भाषेमध्यें किती तरी वाक्प्रचार या वृक्षसन्निधानानें आलेले आहेत. तो पिकलें पान झाला

**या मिमां पुष्पितां वाचं प्रवदंन्त्यविपश्चितः**

किंवा मूळ तसें फळ. अशा वाक्प्रचारांचा मनुष्य सतत उद्योग करीत आलेला आहे. वृक्षाचा आणि माणसाचा संबंध अगदीं अभेद्य आहे. वृक्षांच्या सान्निध्यांत आध्यात्मिकता लाभते म्हणून जपातपादि साधना वृक्षसहवासांत करण्याची पद्धति भारतवर्षात सर्वत्र पडलेली आहे. अश्वत्थ पूर्वेला, बिल्व उत्तरेला, वड पश्चिमेला, अशोक आग्नेय कोणावर व आवळा दक्षिण दिशेस लावून मध्ये वेदी तयार करून त्या पंचवटीमध्यें मग ईश्वराचें ध्यान करावयाचें अशी रीत आहे. प्रत्येक वृक्षाशीं भारतीयांचीं अनेक संस्मरणें निगडित झालेलीं आहेत. औदुंबर वृक्ष म्हटला कीं दत्तात्रेयाचें स्मरण ठेवलेलें. काषायवस्त्र धारण केलेली, सहा हात असलेलीं आणि तीन तोंडें असलेली, जवळ च श्वान आणि धेनु असलेली ती म्हणजे जवळ जवळ

**विद्या विनयसंपन्ने ब्राह्मणे गवि हस्तिनी**
**शुनि चैव श्वपाके च पंडिताः समदर्शिनः**

हा गीतेचा श्लोक च. हा श्लोक त्या औदुंबर वृक्षावरून स्मरतो. वड म्हटला कीं तें भारताचें स्मरण. भारताचा हि वटवृक्षासारखा विस्तार. सत्यवान्-सावित्रीची कथा वटवृक्षानें लगे च सूचित होते. अशोक-सीता, अश्वत्थ-गीता, कदंब-कृष्ण, बेल-शंकर अशीं स्मरणें अनेक प्रकारें वृक्षांच्या ठायीं जडून गेलीं आहेत. मानवजीवन वृक्षाशीं अगदीं निगडित झालेलें आहे. त्यामुळें कोणतीं हि उत्तम प्रकारचीं झाडें तोडणें हें

**मत्सरें भक्ति मोडावी । देवालयें बिघडावी**
**फळतीं झाडें तोडावी । तो तमोगुण दा. २ [illegible]**

असें तमोगुणाचें कृत्य समजलें जावें यांत आश्चर्य कसलें? परंतु १९३० सालीं हीं अशीं उत्तमोत्तम झाडें तोडण्याचा प्रसंग प्राप्त झाला. भगवंतांनीं गीतेच्या १५ व्या अध्यायांत अश्वत्थरूपकानें संसारवृक्षच्छेदन करण्याला सांगितलें आहे. त्याप्रमाणें हीं झाडें तोडावीं च लागलीं. हीं झाडें म्हणजे वर्धा जिल्ह्यांत सर्वत्र अपरंपार पसरलेलीं शिंदीचीं झाडें होत. महाभारतकालीं अर्जुनाला खांडववनदाह करावा लागला. त्याप्रमाणें १९३० सालीं हीं झाडें तोडावीं च लागलीं.

हीं झाडें वर्धा-नागपूरकडे नद्या, नाले व ओहोळाच्या काठानें एकसारखीं आपोआप वाढत च गेलेलीं आढळून येतात. या झाडाच्या पातीच्या चट्या, केरसुण्या वगैरे नित्योपयोगी वस्तु तयार होतात. याचीं खोडें कोरून त्यांत कोठें कोठें गुरांना पाणी पाजण्याची व्यवस्था केलेली आढळते. लहान नाल्यांत पाणी असतें

अनुक्रमणिका

तेव्हां ते नाले ओलांडून जाण्यासाठीं याच्या खोडांचा पूलवजा हि कोठें कोठें उपयोग केला जातो. या झाडाला लहान लहान पिवळीं फळें येतात. त्यांना शिंदोळ्या म्हणतात. फळें विशेष उपयोगीं नसतात. तरी पोरें तीं चाखतात च. या झाडांना "बोंदे" म्हणण्याचा हि वर्ध्याकडे प्रघात आहे. पुष्कळ झाडांच्या समूहाला 'बोंदाड' म्हणतात. ताड, माड, खजूर, शिंदी या झाडांचा एक गट कल्पिण्यास हरकत नाहीं. तरी शिंदीच्या झाडाचें खजूरीच्या झाडाशीं बरें च साम्य आहे. या झाडावरून 'शिंदी' अशीं गांवांचीं हि नांवें झालेलीं आहेत. बोंदाड किंवा शिंदवन हें दिसण्याला अतिशय रमणीय दिसतें. फार उंच नाहींत फार ठेंगणीं नाहींत. अशीं हीं हजारों झाडें पाहून आनंद झाल्या खेरीज रहात नाहीं. शिंदीच्या झाडाला ताडामाडाप्रमाणें च खापे पाडून त्यांतला रस मडक्यांत काढतात व त्याची दारू केली जाते. या दारूला शिंदी म्हणतात. या झाडांचें वर्धा-नागपूरकडे 'मालगुजारांना' पुष्कळ उत्पन्न येतें. मालगुजार कोणता हि असो तो जरी ब्राह्मण असला तरी दर झाडामागें ४/५ रुपये घेऊन तें झाड तो शिंदी काढण्याला देण्याला चुकणार नाहीं. अशी सर्वत्र स्थिति असल्यामुळें च हीं झाडें तोडून टाकण्याचा प्रसंग आश्रमीय प्रचारकांवर आलेला होता. वर्धा तालुक्यांत ग्रामसेवेसाठीं फिरणाऱ्या आश्रमीय प्रचारकांच्या लक्षांत ही बाब तेव्हां च आली. या बाबीचा पुढाकार आश्रमीय प्रचारकांपैकीं एक प्रचारक श्री. गोपाळराव वाळुंजकर यांनी घेतला. १ मार्च १९३० रोजीं वाळुंजकरजी प्रचारकार्यार्थ प्रथम च १५ दिवस खेड्यांत फिरलें. तत्पूर्वी ते कधीं हि खेड्यांत फिरलेले नव्हते. तदनंतर ते पुन्हां १५ दिवस खेड्यांत भ्रमण करून आले. त्यांच्या मनांत शिंदीचीं झाडें तोडून टाकण्याची कल्पना पूर्णपणें ठसून गेली. शिंदीचीं झाडें हीं व्यसनांत टाकणारीं असल्यामुळें तीं तोडण्यासंबंधीं 'यंग इंडियां' त लेख आलेले च होते. गोपाळराव वाळुंजकर यांनीं आपली सर्व कल्पना आचार्यांपुढें ठेवली. त्याप्रमाणें या जिल्ह्यांत कार्यक्रम कसकसा करावयाचा ही हि कल्पना आचार्यांना देण्यांत आली. त्या संबंधींची एक बैठक च झाली. आचार्यांनी हा कार्यक्रम मान्य केला. त्यामध्यें कांहीं उपयोगी सूचना दिल्या. आणि या वृक्षच्छेदाच्या कार्याची मोहीम अतिशय वेगांत सुरू झाली.

हें वृक्षच्छेदनाचें कार्य हा सत्याग्रह नव्हता. यांत कोणत्या हि तऱ्हेचा कायदेभंग नव्हता. मालगुजारांच्या संमतीनें त्यांच्या च मालकीची त्यांच्या हद्दींतलीं च झाडें तोडून त्यांना या व्यसनाच्या उत्पन्नाच्या मोहांतून सोडविण्याची ही चळवळ होती. हीं झाडें तोडून जमीन साफ झाली कीं ती शेतीच्या कामाला मोकळी होते. अशी हि एक यांत दृष्टि होती. आश्रमच्या प्रचारकांनीं वाळुंजकरांच्या साह्यानुसार निरनिराळ्या मालगुजारांच्या संमतीनें त्यांच्या मालकीचीं झाडें तोडण्याची मोहीम सुरू केली व ती एकदम फोफावून गेली. या चळवळीनें खेड्यांतील लोकांच्या जीवनाचा व त्यांच्या मनोवृत्तीचा पुष्कळ च परिचय झाला. सामुदायिक रीत्या आत्मशुद्धीचा हा लोकांना मोठा च पाठ मिळाला. आत्मशुद्धीची चळवळ ही च खरी चळवळ. बाकीच्या चळवळी केवढ्या हि मोठ्या असोत तिकडे आचार्यांची दृष्टि यत्किंचित हि वळावयाची नाहीं.

**योगिनां कर्म कुर्वंति संगं त्यक्त्वात्मशुद्धये ।**

आत्मशुद्धीची चळवळ म्हणजे प्रत्यक्ष योग-मार्ग होय. ज्या ज्या इष्ट गोष्टींचा वियोग झाला असेल त्या त्या वस्तू आत्मशुद्धीच्या योगानें प्राप्त होतात. हा सिद्धांत असल्यामुळें च आचार्य स्वतः मधून मधून ठिकठिकाणीं या चळवळींत जातीनें हजर राहिले. आचार्यांच्या दृष्टींनें आत्मशुद्धीव्यतिरिक्त कर्म हें व्यर्थ कर्म आहे. कर्माकडे आत्मशुद्धीव्यतिरिक्त अन्य दृष्टीनें पाहणें आचार्यांना रुचत च नसे. या झाडें तोडण्याच्या कर्मांत प्रत्यक्ष आत्मशुद्धि असल्यामुळें च आचार्य वेळोंवेळीं या चळवळींत भाग घेऊं शकले. झाडें तोडतांना आचार्यांची ही आत्मशुद्धि अतिशय स्फूर्तिदायक ठरली. खेड्यांतल्या मोठ्या चळवळीचा हा पहिला च प्रसंग

अनुक्रमणिका

होता. गोपाळराव वाळुंजकरांसारखे कुशल चळवळे, आचार्यांसारखा कर्णधार, आश्रमांतली—राष्ट्रीय शाळेंतली तरुण उत्साही मंडळी आणि वर्ध्याच्या आजूबाजूच्या ग्रामस्थांसारखी भावयुक्त जनता. असा हा या वेळीं उत्तम संच जमला होता. लोकांत मिसळून आत्मशुद्धीची चळवळ आजपर्यंत या भागांत कोणी केली च नव्हती. बिन लागवडीची जमीन जशी एकदम पुष्कळ पीक देते, त्याप्रमाणें येथली स्थिति होती. येथें कधीं च अशी चळवळ न झाल्यानें ह्या चळवळीला एकदम जोर मिळाला.

या चळवळीसाठीं साहित्य कांहीं च लागत नव्हतें. फक्त एक चांगली कुऱ्हाड दरेकाजवळ हवी. आश्रमच्या जवळ च राहणाऱ्या श्रीकृष्ण जाजूजींनीं ४०/५० रुपयांची मदत केली. तेवढ्या पैशांत बऱ्या च कुऱ्हाडी तयार करण्यांत आल्या. राष्ट्रीय-शाळा आणि आश्रमांतल्या ८/१० मंडळीची झाडें तोडणारी स्थायी तुकडी तयार करण्यांत आली. ही 'परशुराम तुकडी' च तयार झाली. परशुरामानें आपल्या परशूनें २१ वेळां पृथ्वी निःक्षत्रिय केली असेल. परंतु परशुरामानें मुख्यतः आपल्या परशूनें सह्याद्रिच्या जवळ कोकणांतलें दाट जंगल तोडून कोंकणची वसाहत निर्माण केली. त्या वेळच्या त्या असह्याद्रीला झाडें तोडून सह्याद्रि केला. त्याप्रमाणेंच वर्धा तालुक्यांतील हा असह्य व्यसनवृक्ष उच्छेदून येथें निर्व्यसनतेची वसाहत करण्याचा च या तुकडीनें उपक्रम सुरू केला. या बालगोपालांच्या तुकडींने या वेळीं पहिल्या दर्जाचें काम केलें. सकाळच्या प्रहरीं ४ वाजता उठावें. नेहमींप्रमाणें सामुदायिक प्रार्थना करावी. नंतर प्रातःकर्म करून थोडा अल्पाहार घ्यावा आणि झुंजूमुंजू होऊन पहांट फुटून जिकडे तिकडे लख्ख दिसूं लागलें की आपापल्या कुऱ्हाडी घेऊन, बरोबर रांगा करून गांवाजवळील मालगुजाराच्या शिंदवनांत जाऊन झाडें तोडण्यांस लागावें. झाडें तोडून हाताला फोड यावे परंतु दरेकानें आपापल्या झाडतोडीची संख्या वाढावी या दिशेनें सारखा प्रयत्न करावा. स्पर्धा स्वार्थासाठीं असेल तर ती अतिशय वाईट वस्तु आहे. परंतु परार्थामध्यें, निष्काम कर्मामध्यें, सद्‌गुणांच्या आचरणामध्यें स्पर्धा जितकी वाढेल तितकी चांगली च. त्याप्रमाणें स्पर्धेनें हें बालगोपाळांचे काम येथें चालत असे. कोणी झाडावर घाव घालतांना हुंकार करी, कोणी स्तब्ध च राही. कोणी झाड लवकर तोडण्यांसाठीं बुंध्यावर चारी बाजूंनी घाव घालून पाही. कोणी एका बाजूला अर्धे झाड तोडून मोठा दोर झाडावर टाकून तें ओढून लवकर पाडण्याची युक्ति योजी. कोणी बसलेल्या घावांत बिनचूक दुसरे घाव घालून ही फाचर वाढविण्याचा व त्यायोगें झाड कोसळून पाडण्याच्या प्रयत्नांत असे. कोणी धिमेपणानें पण शेंवटी सातत्यानें आपल्या झाडतोडीचा आंकडा वाढविण्याच्या वृत्तींत दिसे. झाड तोडलें कीं कोणी समाधानाची आरोळी मारी तर कोणी झाड तोडलें तरी तसें कोणतें च बाह्य समाधान न दाखवितां गुपचूप दूसरें झाड तोडून पाडण्याच्या मागें लागे. आपलें समाधान इतक्यांत नाहीं. शेवटीं आपला आंकडा वाढला तर समाधानाचा शब्द करूं—नाचूं—बागडूं—उडूं. या कल्पनेंत असे.

**याजसाठीं केला होता अट्टाहास ।**
**शेवटचा दीस गोड व्हावा ॥**

अहो, आधीं समाधान कसलें? शेवटची सफलता ही च खरी सफलता!
—त्या झाड तोडण्यांत किती वृत्तींनीं किती तऱ्हेनें काम होत होतें हें सगळें नमूद करणें शक्य नाहीं—तेथें असंख्य वृत्तींचीं असंख्य आंदोलनें त्या कामांत दृग्गोचर होत. शेवटीं ११—११॥ झालें कीं घामाघूम झालेले ते विद्यार्थी परत येऊन स्नानादि करून जेवावयास बसत. जेवण त्या त्या गांवच्या लोकांतर्फे च असावयाचें. जेवण करून कोणी अंमल विश्रांति घेई, तकली उपासना करी आणि लगे च भर उन्हांत निघे, कोणी जरा आगेमागें निघे. भर उन्हांत उन्हाळ्याच्या दिवसांत संध्याकाळपर्यंत ते विद्यार्थी कामास भिडलेले असत. चिकाटीनें कामाला लागणें म्हणजे कामाला भिडणें. नुसतें काम करणें वेगळें आणि कामाला भिडणें वेगळें.

अनुक्रमणिका

या कामांत थेट अंधार पडेपर्यंत मंडळी गढलेलीं असत. अंधार झाला कीं परत येऊन कोणी स्नान करी, कोणी घाम पुशी, आणि तसा च जेवावयास बसे. डाळ भाकरीचें जेवण असे. संध्याकाळची प्रार्थना उघड्यांत तारकांच्या सन्निधींत व्हावयाची. ही सायंप्रार्थना नित्याप्रमाणें च खरी पण त्या प्रार्थनेंत एक आणखी विशिष्ट गोष्ट आतां दाखल झाली होती. ही गोष्ट म्हणजे प्रार्थनेनंतर आश्रमांत नित्य यज्ञाची सूतनोंद होत असे. तिच्या जोडीला आतां झाडें तोडल्याची नोंद होऊं लागली. प्रत्येकानें आपापल्या झाडांचा आंकडा प्रार्थनेंत सांगावयाचा व तो वहींत टिपला जावयाचा अशी ही आत्मनिवेदनाची नम्र पद्धति होती. आपल्या दिवसभराच्या कामाचें हें देवापुढें—आपल्या सोबत्यांपुढें—आपल्या गुरुजनांपुढें आणि खेड्यांतील समाजापुढें निवेदन होतें. कर्मांत गति हा महत्त्वाचा मुद्दा आहे. कर्म अगतिक होतां च कामा नये. या दृष्टींनें हि या नोंदणीला मोठें च महत्त्व होतें. कित्येक विद्यार्थ्यांनीं रोजीं ७०/७० झाडें तोडावीं. सामान्यतः कमींत कमी १८/२० झाडांचा आंकडा हा निश्चितपणें प्रत्येकाचा असावयाचा च. सबंध काम झाल्यानंतरचा त्या कामाचा दर्शक केवळ तो निर्गुण आंकडा कमी अधिक ऐकून त्यावरून मग कमी अधिक प्रगति मापली जाई. हें सर्व सगुण काम रात्रींच्या वेळीं पूर्ण निर्गुण होऊन जाई आणि प्रार्थनेनंतर मंडळी भराभर उघड्यांत गाढ झोपेंत गुंग होऊन जात. असा त्या विद्यार्थ्यांचा नित्याचा कार्यक्रम होता.

एका बाजूला एका मालगुजाराची व तेथील गांवकऱ्यांची पूर्ण सम्मति, सहानुभूति आणि सहकार्य मिळवून झाडतोडीचें काम विद्यार्थ्यांनीं सुरूं केलें कीं लगे च दुसऱ्या गांवीं गोपाळराव वाळुंजकर व कांहीं निवडक मंडळी या उत्साहाच्या बातम्या चोहीकडे फैलावून तेथील गांवकरी व मालगुजारांनीं या कार्यांत पडावें म्हणून प्रचार करण्यास निघत व तेथली शिंदीचीं झाडें तोडण्याचें निश्चित करून लगेच पुन्हां तिसरीकडे जात. त्यामुळे या कामाला प्रचंड वेग मिळून हें काम झपाट्यानें तालुक्यांत पसरलें. या वेळीं गोपाळराव वाळुंजकरांनीं रात्रीचा दिवस करून, जिवाचें रानपाणी करून ही सर्व खटपट केली होती. या चळवळीचें मंगलाचरण अतिशय जोरांत झालें. पहिला च कार्यक्रम वर्ध्याच्या जवळच्या सेलू काटे या गांवीं झाला. येथें एका दिवसांत दोन हजार झाडें तोडलीं गेलीं. गांवची मंडळी हि अहमहमिकेनें येथें झाडें तोडण्यासाठीं आलीं होतीं. आचार्य हि येथें गेले होते. त्यानंतर या गांवच्या जवळच असलेल्या कुर्झडी गांवीं झाडें तोडण्याचा कार्यक्रम झाला. तेथें २०० झाडें तोडलीं गेलीं. यानंतर या झाडें तोडण्याच्या कार्यक्रमाचा एकदम जिकडे-तिकडे फैलाव करून देण्याच्या उद्देशानें गोपाळराव वाळुंजकरांनीं आचार्यांपुढें एक योजना मांडली. आचार्यांनी त्या योजनेला अनुमति दिली. स्वतः आचार्य, कन्याश्रमचे संचालक भाजेकर, गोपाळराव वाळुंजकर, धोत्रे व इतर मंडळी मोटारीनें एकदम अनेक गांवीं हा कार्यक्रम फैलावून देण्याच्या उद्देशानें निघाली. मुख्य कार्यक्रम वर्धा जिल्ह्यांतील हिंगणघाट तालुक्यांतील अलीपूर गांवीं होता. तेथें आचार्यांना नेण्यांत आलें. जवळच्या गांवीं इतर मंडळी व्याख्यानादि कार्यक्रम करून झाडें तोडण्यासाठीं अनुकूल वातावरण करावें व आजुबाजूला कार्यक्रमाला भूमिका तयार व्हावी म्हणून उतरत गेली. एखादी मजबूत पाचर ठोकून, त्या पाचरीच्या आजुबाजूला लहान लहान घाव घालून तेथें हि लाकूड चिरीत न्यावयाचें तसा च हा प्रकार होता. अलीपूरला आचार्य संध्याकाळीं आले. दुसऱ्या दिवशीं कार्यक्रम ठरला होता. प्रमुख मंडळींची आचार्यांशीं गांठ घालून देण्यांत आली. प्रथम प्रथम सगळीकडे थंडपणा दिसला. दिवस उजाडला. येथल्या एका खटपटी गृहस्थाला हातीं धरून एका मोटारीवर झेंडे लावून गांवभर ही मोटार जयघोष करीत फिरवली गेली. लगे च विद्युत्संचार व्हावा त्याप्रमाणें परिणाम झाला. ‘आम्ही येतो च तुम्ही पुढें व्हा’ म्हणून मागें पाय काढणारी मंडळी आतां हळूंहळूं जमूं लागली. माघार घेणाऱ्यांत हि उत्साह संचरला. क्षणार्धात् एक लहानशी कुऱ्हाडी सेना च तेथें तयार झाली. त्या सेनेला स्वयंस्फूर्तीनें एका मारवाडी गृहस्थानें कुऱ्हाडी परशूप्रमाणें डोक्याजवळ घाव घालण्याच्या थाटांत धरण्याला सांगितलें. सर्वांनीं लगे च त्याचप्रमाणें केलें. ही सेना चालू लागली. जयघोष, राष्ट्रगीतें अशा थाटांत गांवभर फिरून

शिंदवनांत येऊन थडकली. आणि भराभर कुऱ्हाडी चालून झाडें एकामागून एक उडूं लागली. ठिकठिकाणीं या कार्यक्रमाचे फोटो घेऊन कार्यक्रमाचे कोडकौतुक व प्रचार करण्याची कला वाळुंजकरांच्यापाशीं होती च. त्यांनीं अनेक तऱ्हेचे फोटो काढविले. रात्रीं व्याख्यानादि कार्यक्रम हि झाले. अशी सुरुवात करून आचार्य आश्रमांत परत गेले. कोठें सुरुवातीसाठीं, कोठें निरीक्षणासाठीं असा मधून मधून आचार्य या झाडें तोडणाऱ्या मंडळींत राहात. रोज १८/२० झाडें तोडण्यापर्यंत त्याची प्रगति झाली होती. आचार्यांचे हि झाड तोडण्याच्या वेळचे फोटो नकळत पुष्कळ घेतले गेले. पण ते सर्व हरवले गेले. वर्धा गांवांतून जमनालालजींच्या पेढीवरचे मुख्य गंगाबिसनजी, गांवांतली काँग्रेसची प्रमुख मंडळी हि झाडें तोडण्यास येऊन गेली. आश्रमाजवळच्या कन्याश्रमांतील मुली हि मधून मधून कार्यक्रमास कौतुकानें हजर रहात व एखाद दुसरें झाड तोडीत. असा हा कार्यक्रम एकसारखा फैलावत चालला. इंझाळें या हिंगणघाट तालुक्यांतील गांवीं तर सेलू काटे या गांवाप्रमाणें च एकदम दोन हजार झाडें तोडलीं गेलीं. इंझाळ्यानंतर धोत्रे, नंतर एकुर्ली, नंतर भुईगांव, नंतर जवळगांव हें झाडतोडीचें क्षेत्र पसरत चाललें. प्रत्येक गांवीं १००/१५० तरी झाडें तोडलीं जात च होतीं. जवळ जवळ तीन महिन्याच्या अवधींत १४/१५ हजार झाडें तोडलीं गेलीं. त्यापैकीं अर्ध्यापेक्षा जास्त आश्रमीय प्रचारक व राष्ट्रीय शाळेंतील विद्यार्थ्यांनीं तोडलीं, व बाकीचीं त्या त्या गांवच्या लोकांनी तोडलीं. या चळवळींत मोटार, फराळ, फोटो वगैरेंचा मिळून सुमारें तीनशें रुपयेपर्यंत खर्च आला.

सरकारचें या चळवळीकडे लक्ष होतें च. कोणत्या हि सरकारचें देशहिताच्या चळवळीकडे लक्ष असणें ही गोष्ट उत्तम च समजली जाईल. परंतु येथल्या इंग्रज सरकारचें असें लक्ष आजपर्यंत कधीं हि राहिल्याचें आढळण्यांत आलें नाहीं. लोकांच्या हिताची, परमहिताची चळवळ का असेना पण त्यामुळें लोक जागृत होतात, लोकांत बळ वाढतें, लोक संघटित होतात, लोकांत आत्मशुद्धि आणि स्वावलंबन वाढतें— असें दिसलें तर तें तेथल्या सरकारला कधीं हि सहन झालेलें नाहीं. लोक आणि सरकार यांचा येथें एकजीव नाहीं. जित आणि जेते असा येथें लोक आणि सरकार यांत अत्यंत अधम संबंध आहे. त्यामुळें ही चळवळ हा जरी कायदेभंग नव्हता, यांत सरकारविरोधी असा कोणता हि प्रकार नव्हता तरी देखील सरकारला ही चळवळ पाहवली नाहीं. आरंभीं अधिकाऱ्यांनीं मालगुजार लोकांना आंतून या चळवळींत न पडण्याविषयीं गुप्तपणें 'समज' म्हणजे एक प्रकारें धमकी च दिली. परंतु जेव्हां या केवळ आंतल्या दटावणीचा कांहींच उपयोग होत नाहीं असें दिसलें तेव्हां उपयुक्त झाडें तोडण्याविरुद्ध एक कायदा होता त्या कायद्याच्या आधारें सरकारनें मालगुजारांवर खटले भरले. त्या खटल्यांत मालगुजारांनीं आपला सुंदर बचाव केला. आपल्या मालकीचीं झाडें तोडण्याचा आम्हांला हक्क आहे. यांत कोणता च गुन्हा नाहीं. आम्हांला या झाडांमुळें व्यापलेली जमीन लागवडींत आणण्याला झाडें तोडण्यानें मदत होत होती. आम्हांला झाडें फुकट तोडून मिळत होतीं. आमच्या व्यवहारांत आम्ही दुसऱ्या कोणाचें हि नुकसान न करतां स्वतःचा फायदा पाहिला तर त्यांत आड येण्याचा सरकारला मुळीं च हक्क नाहीं. अशा तऱ्हेचा तो सुंदर बचाव होता. परंतु सरकारचें म्हणणें असें कीं तुम्ही सत्याग्रहाश्रमाच्या मंडळींकडून च झाडें कां तोडवलींत? असत्याग्रहाश्रमाची कोणी मंडळी आणली असती तर सरकारला हरकत नव्हती! सरकार सत्याला भितें. कारण तें स्वतः असत्यावर उभारलें आहे. प्रकाशाला अंधार कां न भिईल? सरकारनें केवळ सत्याग्रहाश्रमाच्या मंडळींच्या संगतीवर च आपेक्ष घेतला असें नाहीं. उलट कांहीं टाइप केलेलीं पत्रकें काढून हीं झाडें तोडण्याची चळवळ ही लोकांच्या दृष्टीनें अगदीं घातक आहे असें समजून सांगण्याचा प्रयत्न केला. "गरीब लोकांना दूध तूप वगैरे स्निग्ध पदार्थ मिळत नाहींत. अशा स्थितींत शिंदी पिऊन त्यांना दूधतुपाची भर, करतां येतें" हीं झाडें तोडणें म्हणजे लोकांचें दूधतूप च तोडणें होय असा सरकारनें भास निर्माण केला. परंतु मालगुजार कायदेशीर रीतीनें शक्य तितकें झगडले च. वाळुंजकरजींनीं त्यांना अनेक

तऱ्हेनें मदत केली. शेंवटीं न्याय दिला गेला—न्याय कसला हा उघड अन्याय च होता.—या चळवळींत सामील झालेल्या मालगुजारांना १००/१०० दोनदोनशें रुपये दंड करण्यांत आला. दंड सरकारनें वसूल केला हें काय सांगावयास पाहिजे? ही चळवळ अशा तऱ्हेनें स्थगित झाली. शिवाय दुसरीकडे सत्याग्रहाश्रमांतील कार्यकर्त्यांना प्रत्यक्ष जंगलसत्याग्रहाच्या कार्यावर देखरेख ठेवण्याचा च प्रसंग आल्यामुळें ही चळवळ बंद ठेवणें क्रमप्राप्त आणि अपरिहार्य ठरलें.

ही चळवळ बंद झाली पण या चळवळीनें जो लक्ष्यवेध केला त्याचा परिणाम नाहींसा होण्याची शक्यता च नव्हती. खेड्यांतील लोकांना आश्रमीयांच्या द्वारें आचार्यांचा परिचय झाला. आचार्यांची अशी चळवळ उभी करण्याची आपल्या मंडळातर्फेची शक्ति त्यांच्या प्रत्ययाला आली. अन्यायाविरुद्ध झगडणारी आपल्या बाजूला एका महान् शक्ति आहे असा आधार त्यांना प्राप्त झाला. हा आधार ज्या मानानें लोकांच्या अप्रत्यक्षपणें प्रत्ययाला आला त्या मानानें तो किती तरी मोठा होता. असावयाचें लहान आणि दिसावयाचें मोठें असा दिखाऊपणा आचार्यांच्या बाबतींत कधींच निर्माण झाला नाहीं. उलट येथें अपरंपार सामर्थ्य असून त्याचा एक अंश मात्र जनतेच्या प्रत्ययाला आला. जेथे अपार थोरवी आहे तेथें सर्वदा असें च व्हावयाचें. तेथें दूरच्या जनतेची च काय कथा, जवळच्यांच्या हि फार तर एवढेंच प्रत्ययाला यावयाचें—

**नान्तं न मध्यं न पुनस्तवादिं**
**पश्यामि विश्वेश्वर! विश्वरूप!!**

●●●

अनुक्रमणिका

# प्रकरण ४२ वें

## कर्मयोगी भक्तांची विश्रांति व समाधिबोध

**असे जे रंगले नित्य भजती प्रीतिपूर्वक**
**त्यांस मी भेटवीं मातें देउनी बुद्धियोग तो ॥**
**करूनि करुणा त्यांची हृदयीं राहुनी स्वयें**
**तेजस्वी ज्ञानदीपानें अज्ञान-तम घालवीं ॥**

**कर्मयोगी** मनुष्याला विश्रांति नाहीं. कर्म ही च त्यांची विश्रांति. कामांत काम आणि आरामांत आराम अशी कर्माच्या ठिकाणीं त्यांची विश्रांति आणि कर्म यांनीं जोडलेलीं संलग्न अवस्था निर्माण होते. फार झालें तर एक काम सोडून दुसरें काम तो करतो. आणि यांतून त्याला विश्रांति मिळून जाते. पण एक काम सोडून दुसरें काम तो करतो. आणि यांतून त्याला विश्रांति मिळून जाते. पण एक काम सोडून दुसरें काम कर्मयोगी करील, तें हि ओघानें प्राप्त म्हणून येईल तर च करील. तो आपल्या रुचीप्रमाणें केव्हां हि कोणत्या हि कर्माची निवड करणार नाहीं. रुचीप्रमाणें कर्माची निवड करण्यांत—जरीं तें कर्म उपयुक्त असलें, निर्दोष असलें—तरी—अस्वाद व्रताचा भंग आहे. कर्मयोगी कर्म हें प्राप्तकर्तव्य म्हणून च करील. अशा कर्मयोग्याला कदाचित् विश्रांति च मिळावयाची नाहीं, असें कोणास वाटण्याचा संभव आहे. पण तसें नाहीं. प्राप्त कर्तव्याच्या ओघांत च त्याला विश्रांतिदायक अन्य कर्म किंवा अन्य परिस्थिति प्राप्त होत असते. कर्मयोगी भक्तांवर ईश्वराचा सदैव अनुग्रह असावयाचा च. त्यामुळें भक्ताला कोणत्या हि रीतीनें विश्रांति मिळून च जाते. आणि ही विश्रांति केवळ विश्रांति नसते. या विश्रांतींत बुद्धियोगाची प्रभा फाकून भक्ताला समाधि अवस्थेंत साठविलेला अपूर्व बोध प्राप्त करून घेण्याची पात्रता लाभत असते.

१९३० सालीं ग्रामसेवेसाठीं सतत फिरणाऱ्या आश्रमप्रचारकांचे असें च झालें. खेडेगांवांत फिरून फिरून शिंदीचीं झाडें तोडण्याच्या चळवळींत रात्रीचा दिवस करून आश्रमप्रचारक थकलेले तर होते च. पण थकलेले म्हणून विश्रांतीसाठीं वाट पहात होते असें नव्हे. उलट अधिकाधिक कार्याची रचना व त्यांच्या मनांत घोळत होती. इतक्यांत १९३० सालच्या चळवळीच्या ओघांतलें एक काम येऊन पुढें उभें राहिलें. त्या कामासाठीं बऱ्याच आश्रमप्रचारकांची जरुरी होती. त्याप्रमाणें आचार्यांच्या आज्ञेनुसार ग्रामप्रचारक सदर कामासाठीं रवाना झाले. तेथें आकस्मिक रीत्या ते सरकारचे पाहुणे ठरले. आणि या रीतीनें ईश्वरानें त्यांना विश्रांति दिली. बाहेर आश्रमांत आचार्यांच्या समाधींतून तयार होणाऱ्या अपूर्व बोधधनाच्या लाभासाठीं योग्य भूमिका निर्माण करण्याला तेथें प्रत्येकाला अवसर मिळाला.

बापूजींनीं मिठाचा सत्याग्रह सुरू केल्यामुळे हिंदुस्थानांतल्या कान्याकोपऱ्यांत हि चळवळीचे प्रचंड वारे सुरू झाले. त्यामुळे “कांहीं तरी केलें पाहिजे” ही प्रेरणा प्रत्येकाला होऊं लागली. समुद्रकांठच्या लोकांना तर मिठाचा सत्याग्रह सतत करतां येत होता च. त्यांना दुसरा कार्यक्रम नको च होता. पण समुद्रकिनारा जवळ नाहीं अशा लोकांनीं काय कार्यक्रम करावयाचा हा एक मोठा च प्रश्न उपस्थित झाला. त्यांतून वर्धा हें स्थळ मध्यप्रांतांत. मध्यप्रांतांत समुद्र कोठला? तरी कित्येकांनीं खाऱ्या पाण्याच्या विहिरीचें पाणी काढून त्याचें हि मीठ बनविण्यास कमी केलें नाहीं. कित्येकांनीं सत्याग्रहानें बनविलेल्या मिठाच्या पुड्या च परस्परांना जाहीर रीतीनें देण्याचा उपक्रम करून पाहिला. या सर्व गोष्टींत अप्रत्यक्षरूपानें

सत्याग्रह होत होता. प्रत्यक्ष येथला च एखादा प्रश्न घेऊन तद्वारा सत्याग्रह यांत होत नव्हता. अशा तऱ्हेची लोकांना जरूर होती. जरूर भासली कीं मागणी पुरवावयाची च, या ईश्वराच्या व्रताप्रमाणें येथे हि असें च झालें. मध्यप्रांतांत ठिकठिकाणीं जीं अनेक जंगलें आहेत त्या जंगलांतून गाईंना चरण्यासाठीं मोकळीक कां असूं नये? लोकांचा गुरचरणें मिळविण्याचा हक्क नाहीं काय? अशा विचारसरणीनें गवत कापून आणून जंगल सत्याग्रह करावयाचा. जंगलांतल्या लाकडांना मुळींच हात लावावयाचा नाहीं; अशा तऱ्हेचा कार्यक्रम प्रथम माधवराव अणे यांच्या नेतृत्वाखालीं पुसद येथें (यवतमाळ तालुका) झाला. त्यांत अणे पकडले गेले. वर्ध्याला त्यांच्यासाठीं प्रचंड मिरवणूक निघाली होती. यानंतर मध्यप्रांतांत सर्वत्र जंगलसत्याग्रह सुरू झालें. आश्रमीय ग्रामप्रचारक एका हि जंगलसत्याग्रहांत पडलेले नव्हते. तकली प्रचार, शिंदीचीं झाडें तोडणें या दोन कामांत त्यांची पुष्कळशी शक्ति खर्च झाली. या अवधींत वर्धा तालुका काँग्रेस कमिटीतर्फे वर्धा तालुक्यांत दोन लहान प्रमाणांतले सत्याग्रह होऊन हि गेले होते. या दोन्ही सत्याग्रहांत १०/१२ स्वयंसेवकांखेरीज जनतेचा फारसा संबंध न आल्यामुळें हे सत्याग्रह सहज च निर्विघ्नपणे पार पडले. हे सत्याग्रह ज्या स्थळीं झाले होते तें स्थळ म्हणजे वर्धा तालुक्यांतील केळझर गांवाजवळील जंगल होय. केळझर हें ठिकाण वर्ध्यापासून १६ मैलांवर असून, हें जरी एक खेडें च असलें तरी तेथें एक गणपतीचें प्रसिद्ध मंदिर आहे. माघ शुद्ध पंचमीला येथें दरवर्षी यात्रा भरते. त्यामुळें या गांवाला महत्त्व आहे. महाभारतांतली एकचक्रा नगरी येथें च होती, असा हि या गांवाबद्दल एक प्रवाद आहे. या गांवाजवळ च जंगलाची हद्द सुरू होते. येथें दोन सत्याग्रह यशस्वी झाल्यानंतर काँग्रेस कमिटीनें फार मोठ्या प्रमाणावर तिसरा सत्याग्रह करण्याचें योजिलें. या बाबतीचा तालुक्यांतील खेड्यांतून बराच प्रचार केला गेला. तालुक्यांतील खेड्यांत आश्रमीयांच्या इतका कोणाचा च प्रवेश नव्हता. त्यामुळें आणि हजारों लोक जेथें जमणार तेथें सत्याग्रहतत्त्वाला बाध येईल असें कोणतें हि अनिष्ट वर्तन लोकांकडून होऊं नये म्हणून आश्रमप्रचारकांची मदत काँग्रेस कमिटीला हवी होती. त्याप्रमाणें आचार्यांच्या अनुमतीनें आश्रमप्रचारक केळझरकडे रवाना झाले. आश्रमप्रचारकांनीं आपापल्या विभागांतून तेथें निवडक सत्याग्रही आणले होते. लोकांचा प्रचंड जमाव जमला होता. कमींत कमी वीस हजार माणसें तरी तेथें होती च. पोलीस आणि अधिकारी थक्क होऊन गेले. आश्रमप्रचारकांनीं लोकांना सांगितलें कीं जे सत्याग्रही नसतील अशा प्रेक्षकांनीं बाजूला व्हावें. सत्याग्रहींनीं च फक्त जंगलांतील गवत कापावें. प्रथम स्त्रियांच्या एका तुकडीनें सत्याग्रह केला. नंतर पुरुषांची एक तुकडी गेली. यानंतर पोलिसांनीं रस्ता अडवला. तेव्हां थोडा वेळ सर्व थबकले. आश्रमीय प्रचारकांनीं सांगितलें कीं थांबण्याचें कांहीं कारण नाहीं. त्यामुळें प्रत्यक्ष सत्याग्रह न करतां हि अधिकाऱ्यांनीं सर्व आश्रमीय प्रचारकांना पकडलें. लोकांचा मोठा गिल्ला होऊं लागला. तेव्हां अधिकाऱ्यांनी आश्रमीयांना लोकांना शांत करा म्हणून विनंति केली. लोकांना आश्रमीयांनी सहज शांत केलें. लोकांनीं पकडलेल्या आश्रमप्रचारकांचा फोटो घेतला. या वेळीं सुमारें २०० माणसें अधिकाऱ्यांनीं पकडलीं. परंतु वर्ध्याला आणीत असतां रस्त्यांत पुष्कळशीं माणसें सोडून देण्यांत आली. वर्धा जेलमध्यें आश्रमप्रचारकांसह फक्त ९६ माणसांना आणून त्यापैकीं सुमारें ५० जणांना सरकारनें शिक्षा केली. त्यांत काँ. कमिटीचे अध्यक्ष चिरंजीलाल बडजाते हे हि होते. आश्रमप्रचारकांपैकीं कोणी च सुटला नाहीं, हें सांगण्याची आवश्यकता च नाहीं. १९३० च्या सप्टेंबर महिन्यांत हा सत्याग्रह झाला. आश्रमप्रचारकांना ६ ते ९ महिनेपर्यंत शिक्षा झाली. एका विद्यार्थ्याला च तेवढी चार महिने शिक्षा झाली. जेलमध्यें सर्व आश्रमप्रचारकांना एका तऱ्हेनें विश्रांति मिळाली. येथें आत्मपरीक्षणाला, स्वाध्यायाला, पुढील कार्याच्या चिंतनाला कांहींसा अवसर मिळाला.

पुढील कार्याची म्हणजे वर्धा तालुक्यांतील पुढील चळवळीची सूचना एक तऱ्हेनें या जंगलसत्याग्रहाच्या अगोदर च ईश्वराकडून मिळाली होती. तो प्रसंग असा—१९३० च्या चळवळींत हिंदुस्थानभर जिकडे तिकडे मिरवणुकी, हरताळ इत्यादि गोष्टींचा धूमधडाका चालू होता. परंतु या मधून

अनुक्रमणिका

मधून होणाऱ्या बाबी असत. नित्याची बाब म्हटली म्हणजे झेंडावंदन व प्रभातफेरी ही होय. खेडोपाडीं सुद्धां रोज प्रभातफेऱ्या निघत. त्याप्रमाणें वर्धा गांवांत हि प्रभातफेरी निघे. या फेरीला वास्तविक कोणतें हि विघ्न येण्याचें कारण नव्हतें. परंतु हिंदी लोकांनीं हजारों वर्षांपासून अस्पृश्यतेचें पाप करून ठेवलेंलें तें नेमकें या वेळीं आडवें आलें. सत्कर्मांत हि मागील पापें विघ्न आणतात. या वेळीं कॉंग्रेसच्या प्रभातफेऱ्यांप्रमाणें च महारांनीं हि प्रभातफेऱ्या सुरू केल्या. महारांच्या प्रभातफेऱ्यांतून पंचमजॉर्जचीं गाणीं व त्याच्या नांवाचा जयजयकार असावयाचा. या दोन प्रभातफेऱ्यांत यामुळें नसतां झगडा निर्माण व्हावयाचा. त्यामुळें दगडविटांचा हि अज्ञात ठिकाणाहून वर्षाव होऊं लागला. तेढ वाढत चालली. तेव्हां महारांना या बाबतींत समजावून सांगण्यासाठीं कॉंग्रेसचे त्या वेळचे अध्यक्ष चिरंजीलाल बडजाते यांनीं केळझर सत्याग्रहाच्या आदल्या च दिवशीं वर्धा गांवाबाहेरील महारवस्तींत (पुल फैल) सभा घेतली. रात्रीं ऐन वेळीं सभेंत आचार्यांना बोलावणें पाठविलें. आचार्यांचें रात्रीं मौन असे. त्यामुळें त्यांनी आश्रमांतील एका प्रचारकाला तेथें पाठवून दिलें. तो प्रचारक तेथें गेल्यामुळें त्याच्या भाषणामुळें सभेंत जो गिल्ला होत होता व जे असमंजस प्रकार होत होते ते थांबले. सभा निर्विघ्नपणें पार पडून महारांचें कांहींसें समाधान झालें. हा लहानसा प्रसंग म्हणजे तालुक्यांत पुढें झालेल्या मोठ्या चळवळीचें सूतोवाच च होतें.

इकडे बरेच प्रमुख आश्रमप्रचारक जेलमध्यें गेल्यामुळें खेड्यांतल्या प्रचाराची जबाबदारी आचार्यांनी उरलेल्या आश्रमीयांना वाटून दिली. व याच सुमाराला एका आश्रमप्रचारकाच्या सूचनेच्या निमित्तानें स्वतः केवळ समाधिस्थ होऊन भगवद्गीतेचा बोध मराठींत आणण्याला सुरुवात केली. आश्रमप्रचारकांसाठीं व खेड्यांतील आम जनतेसाठीं हा बोध म्हणजे एक महाप्रसाद होता. हा प्रसाद केवळ तोंड गोड करण्यापुरता नव्हता. हा सेवन करून—

**प्रसादे सर्वदुःखानां हानिरस्योपजायते ।**
**प्रसन्नचेतसो ह्याशु बुद्धिः पर्यवतिष्ठते ॥**

असा अनुभव घेणें या च जीवनांत शक्य व्हावें हा यांतला हेतु होता. आचार्यांनी याचा स्वतः अनुभव घेऊन च तदनुसार सर्वांसाठीं ही रचना केली. ज्ञानेश्वरमहाराजांनीं गीतार्थाचा भावार्थानें उलगडा करून त्याचें एक भव्य देशीकार लेणें तयार केलें. येथें ज्ञानेश्वर महाराजांप्रमाणें च त्या भव्य लेण्यांत ठेवण्याजोगी मराठी गीतामूर्ति तयार केली गेली. या गीतामूर्तिपासून—या अपूर्व समाधिबोधापासून सर्वांना ज्ञानेश्वरमहाराजांनीं मागितलेंलें हें एक च आश्वासन मिळावें याशिवाय यांत आचार्यांचा दुसरा कोणता हि हेतु नव्हता.

**किंबहुना सर्वसुखी । पूर्ण होऊनि तिहीं लोकीं ।**
**भजिजो आदिपुरुखी । अखंडित ॥**

●●●

# प्रकरण ४३ वें

## गीताई

**कालक्रमामध्ये** वसंताचें नुसतें निमित्त होतें, आणि एकाएकीं झाडाचें स्वरूप पालटून जातें. वैभवाची परमसीमा तीं झाडें प्रकट करूं लागतात. एखादा हिमालयावरचा खडक दुभंगून जातो—केवळ एक निमित्त च तें—आणि आंत असलेंलें स्वच्छ पाणी एकदम झुळझुळ वाहूं लागते. ती अमृताची गंगा मग असंख्य जीवाचें पापताप सहज लीलेनें नष्ट करते. कोणत्या तरी कारणानें चुकून बालक निवृत्तिनाथ त्र्यंबकेश्वराच्या डोंगरांत सहज एका साधूजवळ जातात आणि एकदम त्यांच्यावर त्याचा अनुग्रह होऊन ते कृतार्थ होऊन परत येतात. आणि त्या कृतार्थतेचा उद्गार ज्ञानेश्वरीरूपानें प्रकट होऊन सगळ्या महाराष्ट्राची संस्कृति तयार होते. युद्धाच्या ऐन गर्दींत अर्जुन कर्तव्यमूढ होतो आणि त्या निमित्तानें विश्वाला पावन करणारी गीतामाउली प्रकट होते!!! —येथें गीताईचा जन्म असा च केवळ एका आश्रमवासीयाच्या विनंतीच्या नुसत्या निमित्तानें झाला. "संस्कृत आम्हांला समजत नाही. आम्हांला मराठी गीता असल्यास किती बरें वाटेल!" हा विचार काय केवळ एकाच मनुष्याचा होता? नव्हे. हजारों लाखों—करोडों लोकांचा हा मूक उद्गार होता. तो आचार्यांच्या अंतःकरणांत घुमत च होता. आई व्यंकटेशस्तोत्र, शनिमाहात्म्य, भक्तिमार्गप्रदीप वाची पण मराठी गीता वाचण्याची इच्छा असून हि तिला ती मिळाली नाहीं. ही गोष्ट आचार्यांच्या अंतःकरणांत खोल रुतून बसलेली होती. आपल्या हजारों मातांना उत्तमांतला उत्तम ग्रंथ वाचावयास न मिळेल तर मातेची सेंवा ती काय केली? अशा दिव्य भावाचीं आंदोलनें आचार्यांच्या अंतःकरणांत घुमत राहिलेली होती. किंबहुना आचार्य माता आणि गीता एक च समजत असत. या गीतारूपी मातेशीं आपल्या च भाषेंत हितगुज करतां आलें पाहिजे. हा गीताईच्या अवताराचा हेतु होता. आचार्यांचे स्वतःचे च एतत्संबंधीं उद्गार पाहिले म्हणजे याचा नीट उलगडा होईल.— "गीतापरिचय मला मराठीमधून म्हणजे मराठीच्या स्वरूपांत झाला. ज्ञानेश्वरांची ज्ञानेश्वरी माझ्या अवलोकनांत आली. ज्ञानेश्वंरी म्हणजे गीता च. ती विस्तृत मराठी गीता, इतका च मूळ गीतेंत आणि तिच्यांत फरक. यानंतर मूळ संस्कृतांतून हि मीं गीता पाहिली. तेव्हांपासून मी फार ग्रंथ वाचले असें म्हणतां यावयाचें नाहीं. तरी बहुतेक धर्मग्रंथांचा अभ्यास केला असें म्हणण्यास हरकत नाहीं. त्या सर्व ग्रंथांपेक्षां मला गीतेंत कांहीं विलक्षण स्फूर्ति आणि पूर्णत्व आढळून आलें. वस्तुतः हा ग्रंथ अतिशय लहान आहे. परंतु त्याची शक्ति अपार आहे. मी पाहतो आहे कीं असे म्हणण्यांत कांहीं अत्युक्ति होईल कीं काय—पण माझ्याच्यानें म्हटल्याशिवाय राहवत नाहीं कीं, या गीता माउलीच्या दुधावर च मी पोसलों आहे. जीवनामध्यें वेळोंवेळीं जे निरनिराळे प्रश्न उपस्थित होतात, चित्तामध्यें नाना तऱ्हेचे विकारविचारांचे तरंग यावयाचे त्या वेळीं मला गीतेची जितकी मदत मिळाली तितकी दुसऱ्या कोणत्या हि वस्तूपासून मिळाली नाहीं. माझ्यावर अनेकांचे अनेक उपकार झाले. लहानपणीं मला अनेक सज्ञनांचा सहवास लाभला. मोठेंपणीं हि सत्संगावांचून काळ गेला नाहीं. तरी या सर्व सज्ञनांच्या उपकाराहून गीतेचा माझ्यावर जो उपकार झाला तो कांहीं वेगळा च. त्याची तुलना होऊं शकत नाहीं. गीता ही आईप्रमाणें मला तारक झाली असें म्हणतां येईल. आईशीं बोलतांना मला आणि माझ्याशीं बोलतांना आईला—जी आत्मीयता मिळे ती गीतेपाशीं मला लाभली. आईप्रमाणेंच गीतेशीं मी बोलतों व गीता माझ्याशीं बोलतें.—या गीतेला मी आई म्हणतो. "आई" या नांवांतला सर्व भाव मी गीतेच्या ठिकाणीं पाहतों. गीतेचें भाषांतर करतांना सर्व आयाबहिणींना हा ग्रंथ उपयोगी पडावा व त्यांच्या द्वारें सर्व समाजाचें कल्याण व्हावें ही हि एक दृष्टि आहे. जर स्त्रियांच्या हातांत गीता आली तर समाजाचें केवढें कल्याण होईल याची कल्पना उपमेनें देतां येणार नाहीं. प्रत्येक घरांत हें भाषांतर वाचलें जाईल तर महान् गृहशिक्षण मिळालें असें होईल.

आम्ही गृहशिक्षणाकडे लक्ष दिलें नाहीं. स्त्रियांना महत्त्वाच्या ग्रंथांचा परिचय करून दिला नाहीं. तरी आपापल्या परींने स्त्रिया शनीमाहात्म्य, व्यंकटेशस्तोत्र इ. इ. कांहीं ना कांहीं त्या वाचीत च असतात. पण एवढ्यानें कार्यभाग व्हावयाचा नाही.—“खेडेगांवांतल्या लोकांना संस्कृत कोठून समजणार? म्हणून त्यांच्या उपयोगांसाठी अगदी सुलभ, सहज समजेल असें भाषांतर लिहिण्याची मला तीव्र इच्छा झाली.”

गीताईच्या अवतारापाठीमागचें केवळ एक तात्कालिक निमित्त आणि गीताईच्या अवतारापाठीमागची मूळ भूमिका, आचार्यांच्या एका च व्याख्यानांतून निघालेल्या या तीन उद्गारांवरून परिपूर्ण समजून येईल. परंतु केवळ एवढ्या सदिच्छेवर च गीताईचा अवतार झाला असें मानणें ही फार मोठी चूक होणार आहे. गीताईच्या अवताराच्या या इच्छेमागें हि गीताईचें अवतरण घडवून आणण्याला लागणारी किती विलक्षण तयारी लागते हें लक्षांत न घेतलें तर गीताईचें मर्म मुळीं च उलगडणार नाहीं. आचार्यांच्या च तोंडून हें मर्म आपण समजून घेऊं. ज्या एका व्याख्यानांत वरील तीन उद्गार आपणाला प्राप्त झाले, त्या च व्याख्यानांतून आपल्याला गीताईच्या अवतरणाची तयारी समजून येईल.— “आज बाळूभाईंनीं माझा परिचय करून देतांना सांगितलें की, महात्मा गांधी हे माझ्याशीं अध्यात्मिक बाबतींत सल्लामसलत करतात. या बाबतींत ते मला गुरुवत् मानतात. पण माझी योग्यता मी जाणून आहे. महात्मा गांधींची सत्संगति मला लाभली नसती तर गीतेच्या अर्थाची आज जी प्रतीति मी अनुभवून राहिलों आहे ती मला आली नसती. गीतेवर अनेकांनीं भाष्यें केलीं आहेत—अनेक थोर महात्म्यांनीं टीका केल्या आहेत. शंकराचार्यांचें भाष्य आहे, टिळक महाराजांनीं हि लिहिलें आहे. परंतु त्या सर्वांत ज्ञानेश्वरीचा माझ्यावर फार उपकार झाला असें मला वाटतें याचें कारण हेंच आहे. ज्ञानदेवांचे माझ्यावर अपार उपकार झाले आहेत. ज्ञानेश्वरी वाचतांना असा स्पष्ट अनुभव येतो कीं, अत्यंत निरभिमानी—अनहंकार अशा संताच्या अनुभवाचे हे बोल आहेत. जीवनाच्या मूलभूत तत्त्वांचा त्यांना अनुभव आला. म्हणून त्यांचें वर्णन करण्यांत ते अगदीं तल्लीन होतात. ज्ञान, कर्म भक्ति या सर्वांचा त्यांना अनुभव आला. त्यांना ती सर्व आत्मरूप—एकरूप झाली. म्हणून त्यांचें एकरूप अभेदमय वर्णन ते करतात. इतकें सर्व असून हि म. गांधींच्या संगतीचा लाभ मला मिळाला नसता तर गीता मी आज जी समजूं शकलों आहे तशी समजूं शकलों नसतों. बापूंच्या संगतींत जें कांहीं मला मिळालें ती च माझी गीता. बाळूभाईंनीं माझें वर्णन केलेलें जें मीं आतां च सांगितलें ती म्हणजे खरोखर कविकल्पना. बापूंच्या समोर मी हिमालयापुढें रजकणासारखा आहे! बापूंच्या पायाशीं बसण्याचें भाग्य मला लाभलें, त्या भाग्याला पात्र होण्याएवढी योग्यता दहा जन्मांत जरी मला मिळाली तरी पुष्कळ असें मी समजतों! आज बापूंच्या संबंधीं मी जें बोललों तशासारखें बहुधा मी बोलत नाहीं. परंतु गीतेसंबंधीचा अनुभव निःसंकोचपणें मांडण्यासाठीं मीं हें सांगितले. हें सांगण्याचा हेतु हा च कीं गीतेचा अर्थ समजून घेण्याची चावी आपल्याला मिळावी. प्रत्यक्ष जीवनाशिवाय गीता कळावयाची नाहीं. कोष व्याकरणाच्या जोरावर गीता समजून घेऊं असें कोणी म्हणेल तर तो त्याचा प्रयत्न मिथ्या आहे. संतांशिवाय गीता समजावयाची नाहीं. असें संत—अशीं प्रत्यक्ष उदाहरणें—ज्ञानेश्वरांसारखीं उदाहरणें मागें झालीं. पण प्रत्यक्ष पाहण्यानें जी प्रतीति येते तशी मागील उदाहरणें ऐकून येत नाहीं. आज बापूंचें जीवन हें असें प्रत्यक्ष उदाहरण आहे. गीतेंत निष्काम कर्मयोग सांगितला आहे. टीकाकार असें म्हणणारे आहेत. आणि अशी शंका येण्याजोगी आहे कीं, कां हो! निष्काम आणि कर्म शक्य आहे का? का ही कल्पनेंतली गोष्ट आहे? का निष्काम कर्मयोग हा अर्थवाद आहे? ही शंका रास्त आहे. वस्तुतः कित्येकांना निष्काम कर्मयोग सोपा वाटतो—अनासक्त कर्म सोपें वाटतें—पण मला तसें वाटत नाहीं. अनासक्त कर्म ही सोपी वस्तु नाहीं. असें असून आज मला अशी शंका येत नाहीं. कारण असें प्रत्यक्ष उदाहरण आहे. बापूंची मूर्ति स्पष्ट पुढें उभी आहे. त्यांच्या ठिकाणीं अनासक्ति आणि कर्म एकत्रित दिसतात. नुसतें कर्म करणें निराळें—तसे पुष्कळ लोक आहेत. पण मी म्हणतों असें योग्याचें उदाहरण मिळणें फार कठिण आहे. तेव्हां प्रत्यक्ष जीवनापासून—

अनुक्रमणिका

सत्पुरुषाच्या जीवनापासून—गीता समजून घ्यावयाची ही गीता समजण्याची चावी आहे. आपल्या महद्भाग्यानें आपल्याला प्रत्यक्ष उदाहरण लाभलें आहे. प्रत्यक्ष उदाहरण म्हणजे साक्षात् आचरण. हें आचरण बापूंपाशीं आहे. तसें च पाहिलें तर त्यांना सबंध गीता हि पाठ येत नाहीं. त्यांनी तेरा अध्याय पाठ केले होते. "जेलमध्यें अधिक पाठ करण्याचा माझा विचार होता. पण मला कांहीं साथीदार तेथें हि मिळाले. त्यांच्या बरोबर दुसरें काम करण्यांत वेळ गेला म्हणून मी पाठ करूं शकलों नाहीं. पण ज्यांना ज्यांना शक्यता आहे त्यांनीं गीता पूर्णपणें पाठ करावी. जरी मला मी गीता पूर्ण पाठ केली नसल्यामुळें हें सांगण्याचा अधिकार नाहीं, तरी हें मी गीताप्रेमामुळें सांगतों"—असें हि ते म्हणतात. खरोखर त्यांना गीता पूर्णपाठ येत नाहीं म्हणून त्यांच्यामध्यें कांहीं उणीव आहे असें नाहीं. पण त्यांचा असा स्वभाव च आहे. लोकांना जी गोष्ट सांगावयाची ती स्वतःच्या ठिकाणीं असली च पाहिजे. सांगायचा मुद्दा असा कीं, प्रत्यक्ष आचरण ही वस्तु गीता समजून घेण्यासाठीं मुख्यतः उपयोगी आहे. महात्माजींनीं आत्मकथा लिहिली आहे. मला हि लिहितां येईल. संभव असा आहे कीं त्यांच्या त्या गांवठी भाषेपेक्षां मी अधिक सरस लिहूं शकेन. पण सरसनीरस लिहिण्यावर काय आहे? येथें प्रत्यक्ष आचरण, निष्काम आचरण, सत्यदर्शन पाहिजे. तें तुकोबांनीं नाहीं का म्हटलें, "आधारावांचूनी काय सांगसी कहाणी"—सत्याचा आधार पाहिजे. त्यांनीं आपल्या आत्मकथेला नांव दिलें 'सत्याचे प्रयोग.' त्यांच्या आत्मकथेवर सत्याचा शिक्का आहे. ज्ञानेश्वरांनीं, महात्मा गांधींनीं प्रत्यक्ष आचरणानें गीतेकडे समाजाचें लक्ष खेचलें तसें इतर कोणी खेचलें असेल असें वाटत नाहीं. तुकाराममहाराजांनीं मुलीचें लग्न केलें. एक आणला शोधून मुलगा आणि केलें मुलीचें लग्न. एक लग्नाचा खेळ च केला त्यांनीं, त्यांना सगळें खेळासारखें झालें होतें. तरी वधूवरांसाठीं कांहीं द्यावयाला पाहिजे. मग त्यांनीं काय दिलें? त्यांनीं गीता दिली. आज महात्माजी हि तें च करीत आहेत. आश्रमांत जे जे असे प्रसंग झाले त्या त्या प्रसंगी आश्रम भजनावलि, गीता आणि स्वतः कांतलेंलें सूत महात्माजींनीं दिलें. यावरून गीतेविषयीं तुकाराममहाराज महात्मा गांधी यांची केवढी निष्ठा असली पाहिजे, हें उघड होतें. शंकराचार्य एवढें ज्ञानी—ज्ञान्यांचे शिरोमणि—त्यांनीं हि गीतेविषयीं काय उद्गार काढले आहेत? "गेयं गीता नामसहस्रं" "भगवद्गीता किंचिदधीता" भगवद्गीतेचें किंचित् अध्ययन—थोडेंसें पठण असलें तरी बस आहे. त्याला मग यमाची भीति नाहीं. अहो! ज्ञानी पुरुषांतले बादशहा असे हे भाष्यकार, सर्व जग ज्यांनीं रद्दी ठरविलें, नेहमीं स्वतःविषयीं बहुवचन वापरणारें, "एवं प्राप्ते ब्रूमः" असा नेहमीं बहुवचनानें स्वतःचा उल्लेख करणारे—पण गीतेविषयीं त्यांनीं किती आदर व्यक्त केला आहे! ज्ञानी पुरुषांतलें सम्राट्, परंतु म्हणतात, "अतस्तेद्विवरणे यत्नः क्रियते मया" सबंध भाष्यांत स्वतःविषयीं एकवचनी उल्लेख कोठें हि नाहीं. फक्त येथें च 'मया' असें भाष्यकार म्हणतात. त्याशिवाय गीतीचें विवरण मी करतों असें हि त्यांनीं म्हटलें नाहीं. किती सावधगिरीची भाषा! विवरण करण्याचा माझ्याकडून प्रयत्न केला जातो"—ही शंकराचार्यांसारख्यांचीं गीतेविषयीं बोलतांना स्थिति होते. याचें कारण गीतेविषयीं त्यांना तसा अनुभव आलेला आहे. ज्ञानदेव हि गीतेविषयीं किती आदरानें उद्गार काढतात.

**साचचि बोलाचें नव्हे हें शास्त्र**

हें केवळ बोलण्याचें शास्त्र नव्हे—आचरणाचें शास्त्र आहे.

**आत्मा अवतरविते मंत्र । अक्षरें इयें**

हीं गीतेचीं अक्षरें म्हणजे मंत्र आहेत. आपल्याला आपल्या जीवनांत ह्या मंत्रापासून काय बोध प्राप्त होतो हा सतत ध्यास घेतला पाहिजे."—या आचार्यांच्या व्याख्यानांतील महत्त्वाच्या उताऱ्यावरून आपल्याला

गीताईच्या अवतरणाची तयारी कोणती ती लक्षांत येण्याला आतां अडचण पडणार नाहीं. आधीं आचार्यांनी आईपासून परमार्थाचा लाभ करून घेतला. नंतर ज्ञानानुभवानें सिद्ध अशा ज्ञानेश्वरीपासून गीता समजून घेतली. तुकाराममहाराजादि अनेक संतांची ग्रंथांद्वारें सत्संग साधला. त्यानंतर निष्काम कर्माचा मूर्तिमंत पुतळा अशा महासंत महात्मा गांधींचा प्रत्यक्ष आणि गाढ सहवास आचार्यांनी प्राप्त करून घेतला. त्याचप्रमाणें शंकराचार्य-टिळकांसारख्या अनेक महाबुद्धिमान् भाष्यकारांचीं भाष्यें मननपूर्वक अभ्यासिलीं. शेवटीं स्वतः अत्यंत कसोशीनें सतत गीतेबरहुकूम आचरण राखण्याचा प्रयत्न केला आणि तदनंतर च हें गीताईचें अवतरण झालें. गीताईचे अवतरण व्हावें एवढा केवळ सदिच्छेवरून च तें झालेलें नाहीं—

(१) मातृभक्तीची परमसीमा
(२) ज्ञानदेवांच्या अपूर्व ज्ञानानुभवाचें दर्शन
(३) शंकराचार्य, टिळकादींचा बुद्धिबोध
(४) तुकाराम तुळसीदाससमर्थादि अनेक संतवचनांचा सत्संग
(५) गीतेपूर्वींच्या धर्मवाङ्मयाचें मंथन
(६) प्रत्यक्ष अनासक्त कर्मयोगाचें-दर्शन महात्मा गांधींच्या सत्संगाचा लाभ
(७) गीतेचें आचरण करण्याचा आटोकाट प्रयत्न
(८) स्त्रिया-बाळें-ग्रामीण जन यांच्याविषयीं अनुकंपा—नारायण भावनेनें त्यांच्या सेवेविषयींचीं तीव्र तळमळ.

—या सर्वांतून गीताईचा अवतार झालेला आहे. ही च गीताईच्या अवतरणाची अपूर्व तयारी होय. ही तयारी काय एका जन्मांतली आहे? खरोखर येथें ज्ञानेश्वरमहाराजांनीं काढलेल्या उद्‌गारांविषयीं दुसरे कोणते च उद्‌गार सत्य मानण्याला मन तयार होत नाहीं.

**माझिया सत्यवादाचें तप । वाचा केलें बहुत कल्प**
**तया फळाचें हें महाद्वीप । पातली प्रभु**
**पुण्यें पोसिलीं असाधारणें । तिये तुझे गुणें**
**देऊनि मज उत्तीर्णें । जाली आजी**

ज्ञानेश्वरमहाराज सद्‌गुरुंना उद्देशून स्वतःच्या गीताविवरणाविषयीचे जे हे उद्‌गार काढतात ते पूर्णपणें येथें गीताईला लागू पडतात यांत लेशमात्र शंका नाहीं.

असो तर गीताईच्या अवताराचें निमित्त व गीताईच्या अवताराच्या अपूर्व आणि अद्‌भुत पूर्वतयारीचें किंचित् अवलोकन केल्यानंतर गीताई लिहीत असतांना आचार्यांची काय स्थिति होती तें त्यांच्या च शब्दांत त्याच व्याख्यानांत आपण अवलोकूं—

—"ज्या वेळीं मी हें भाषांतर लिहीत होतों त्या वेळीं मी स्वतःमध्ये शिल्लक राहिलों नव्हतों. पहांटे एकाग्र होऊन ठरलेल्या वेळांत मी लिहीत असें. परंतु लिहितांना गीतेशिवाय जगत् कांहीं आहे याचें लेशमात्र भान उरत नसे. सहा ऑक्टोबर (१९३०) पासून सहा फेब्रुवारी (१९३१) चार महिन्यांत दुसरा विचार हि मनाला शिवला नाहीं. गीतार्थाशिवाय अन्य चिंतन नाहीं. मला स्वतःला अलग करून मीं हें भाषांतर केलें आहे." पहाटेचा अतिशय पवित्र काळ, सत्याग्रहाश्रमासारखे पुण्यस्थळ, आधीं च एकांतात असलेल्या आश्रमाच्या

अनुक्रमणिका

इमारतींतील अगदीं शेवटचा एकांतानें पूर्ण असा हॉल, त्या जागीं अतिशय स्वच्छता आणि मोकळेपणा, समोर च उषःकाल आणि सूर्याचें संपूर्ण दर्शन उभें, काळ्या भोर घोंगडीवर गीतेचीं च पुस्तकें विराजमान झालेलीं, आणि त्या च गीतेच्या मेळांत देहभान विसरून आचार्य हें भाषांतर लिहीत आहेत हा आचार्यांच्या व्याख्यानांतील उद्‌गारांचा प्रत्यक्ष देखावा त्या वेळीं रोज आश्रमीयांना दिसून येत असे. गीतालेखनाचें हें काम विणकामाच्या लांबलचक इमारतींतील पहिल्या लहान खोलींत हि कांहीं दिवस चालत असे. लिहितां लिहितां मध्ये च आचार्य हॉलमध्यें फेऱ्या हि घालीत. या प्रदक्षिणांनीं गीताईच्या मूर्तीचें आचार्यांना अधिकाधिक स्पष्ट दर्शन होई. आणि तें दर्शन वहीमध्यें उतरलें जाई.

एकूण दोन वह्यांत गीताई समाप्त झाली. फुलस्केप कागदाच्या अष्टमांश कागदांच्या उभट वह्या करून गीताई आडवी पोथीसारखी धांवत्या अक्षरांत लिहिली आहे. ह्या दोन्ही वह्यांना मागून पुठ्ठा लावून आश्रमांतील विद्यार्थ्यांनें काळ्या भोर कागदाचें बाइंडिंग केलेंलें होते. गीताई प्रथमाध्यायापासून क्रमवार लिहिलेली नाहीं. लिहिण्याचा क्रम, अध्यायवार पुढीलप्रमाणें आहे. (अध्याय ५, ६, ३, ४, ७, ८, ९, १, २, १०, १२, १३, १४, १६, १७, १५, १८, ११). गीताई लेखनकालांत चार महिन्यांत लिहिण्यांत मुळीं च खंड पडलेला नाहीं. दररोजचें लिहिणें झालें कीं खालीं आचार्य तारीख लिहून ठेवी. ७०० श्लोक चार महिन्यांत लिहिले गेले. म्हणजे सरासरी रोजीं ६ श्लोक पडले. परंतु रोज ६ च श्लोक लिहिले जात असा त्याचा अर्थ नाहीं. ही केवळ सरासरी आहे. आचार्य दिवसभर गीताई लिहीत नसत. रोज सुमारें तास सव्वातास हें लेखन होई. या हिशोबानें १२० ते १२५ तासांत गीताईलेखन पूर्ण झालेंलें आहे.

प्रत्यक्ष गीताईलेखन हें जरी दिवसभर होत नव्हतें तरी गीता-चिंतन हें नेहमींप्रमाणें अखंड च चालत असे, असें म्हणण्यास हरकत नाहीं. गीतेची नुसती समश्लोकी करावी असा या भाषांतरांतला आचार्यांचा हेतु नव्हता. समश्लोकी अनेकांनी केली आहे. केवळ मराठी समवृत्त सुलभ भाषांतर करून गीताई लिहिलेली नाहीं. गीतेचा प्रत्येक श्लोक, प्रत्येक पद, प्रत्येक शब्द तोलून तपासून त्याचें पारमार्थिक मूळ आणि मूल्य पाहून मराठींत त्याची बरोबर प्रतिकृति उमटली पाहिजे. प्रमुख अनुभवी भाष्यकारांचें अर्थ जीवनाच्या कसोटीवर कसून त्यांचा योग्य निष्कर्ष मराठी भाषांतरांत उतरला पाहिजे. जेथें जेथें संस्कृत भाषेतील विशिष्ट वाक्यपद्धति आली तेथें तेथें मराठींत त्याचा केवळ तर्जुमा उतरतां कामा नये. येथें मराठींत तत्सदृश बिनचूक वाक्यपद्धति आली पाहिजे. छंदःसुखासाठीं मराठी व्याकरणशुद्धीकडे यत्किंचित् हि दुर्लक्ष होतां कामा नये. केवळ सुलभ भाषांतर म्हणून नित्य व्यवहारांतले शब्द गीताईंत येतां कामा नयेत, व्यवहारांत वापरून घासून गेलेलें शब्दरूपी नाणें परमार्थाच्या गंभीर अशा धर्मग्रंथांत चालत नांहीं. गीतेचें हें भाषांतर हजारों गरीब, खेडवळ वगैरे लोकांसाठीं असल्यानें तें उच्चारसुलभ झालें पाहिजें. संस्कृतप्रमाणें अनेक जोडाक्षरे मध्यंतरी येऊन ठिकठिकाणीं उच्चारांत आघात निर्माण होईल अशी स्थिति येतां कामा नये. ऐकतां ऐकतां वाक्य उलगडत गेलें पाहिजे. दूरान्वय होतां कामा नये. समासाची संस्कृत पद्धति मराठींत येतां कामा नये. शक्य तितकी सुटी रचना पाहिजे. फारसी, उर्दू इ. शब्दांचा वापर मराठींत करावा हें योग्य असलें तरी संस्कृत धर्मग्रंथाचें भाषांतर हें यावत्शक्य संस्कृतोद्‌भव शब्दाद्वारे च झालें पाहिजे. त्यासाठीं अन्य भाषांतील शब्दांची जरूरी लागू नये. प्रत्येक शास्त्रांत विशिष्ट स्थानीं विशिष्ट शब्दांत एक प्रकारच्या पकडी असतात. अशीं स्थळें बिनचूक हेरलीं पाहिजेत. व त्याप्रमाणे त्यांचें भाषांतर झालें पाहिजे. गीतेचें स्वतंत्र, शुद्ध परिभाषा सांभाळून भाषांतर केलें पाहिजे. शब्दांत अर्थ, भाव, पावित्र्य, माधुर्य, सौलभ्य अनुभव परिपूर्ण उतरला पाहिजे. अशीं अनेक सूक्ष्म तंत्रे सांभाळावयाची असल्यामुळे मंत्राचें ज्याप्रमाणें सतत मनन करावें त्याप्रमाणे आचार्यांचें गीताविषयक मनन एक प्रकारें सतत चाले. आणि त्या मननांतून परिपक्व झालेल्या श्लोकांचें भाषांतर तेवढे च कागदावर उतरलें जाई. गीताविषयक मनन भाषांतर करावयाचे

म्हणून च आचार्य करीत असें नाहीं. गीताविषयक मनन हा त्यांच्या मनाचा स्वभाव च होऊन गेला होता. त्यामुळें त्यांचें गीतेवर असामान्य मनन आधी च कित्येक वर्षांपासून झालेलें होते. केवळ तात्पुरतें मनन किती हि केलें तरी त्या मननांतून गीताईसारखें भाषांतर उतरणे ही गोष्ट अशक्य होय.

पण इतके असून हि आचार्यांची या भाषांतराबाबत किती निरहंकारवृत्ति होती! किंबहुना ही निरहंकारवृत्ति होती म्हणून च हें भाषांतर असें होऊं शकलें. गीतेला हात लावण्याचा निरहंकारी, ज्ञानी, कर्मयोगी संत व भक्ताशिवाय कोणाला अधिकार आहे? विद्वत्तेच्या जोरावर गीता आकलन होणे ही केवळ मृगजळानें तहान भागविण्याची च कल्पना! आचार्यांनी गीताईला प्रस्तावनेदाखल तरी काय लिहिलें? त्या एका इवल्याशा श्लोकांत ही केवढी नम्रता आणि किती खोल भाव! आचार्यांच्या च तोंडून हें सगळें समजून घेतलें पाहिजे. आचार्यांच्या एका च व्याख्यानांतून एकत्र हें सगळें मिळतें आहे हें हि एक भाग्य च होय. तें म्हणतात—"या ग्रंथाला प्रस्तावना हि मी लिहिली नाहीं. फक्त एक च श्लोक आरंभीं दिला.

**गीताई माउली माझी तिचा मी बाळ नेणता ।**
**पडतां रडतां घेई उचलूनि कडेवरी ॥**

असा भाव प्रकट करण्याच्या दृष्टीनें एवढा एक श्लोक मला बस वाटला. भगवंतांच्या वाणीला प्रस्तावनेची जरूर च नाहीं. एतकें च काय पण त्यावर माझें नांव लिहावें लागतें हें हि एक दूषणरूप च आहे. कारण हें भाषांतर ज्या मानानें उतरलेलें आहे त्या मानानें माझें आचरण कमी पडतें. पण ग्रंथावर माझें नांव न लिहिणें या युगांत व्हावयाचें नाहीं. म्हणून नाइलाजानें तें तसें च राहूं दिलें व मला गीतेचा काय उपयोग होतो तें दोन च शब्दांत प्रकट केलें. ते दोन शब्द कोणतें? "पडतां रडतां"—पडतां रडतां घेई उचलूनि कडेवरी. पडतां म्हणजे कामक्रोधादिकांचा हल्ला चित्तावर झाला म्हणजे. आणि रडतां म्हणजे नाना कारणांनीं चित्तावर दुःखशोकाचें आक्रमण झालें म्हणजें गीता माझा बचाव करते—घेई उचलूनि कडेवरी. मी ही गीतामाउली मला कडेवर उचलून घेते असें म्हटलें आहे. ती मला आपलें दूध पाजतें असें म्हटलें नाहीं. असें मीं कां म्हटलें नाहीं? कारण गीतेसंबंधीं माझी कल्पना अशी आहे, गीतेच्या दुधावर संत पुष्ट झाले. आमचा गीता फक्त बचाव करते. आम्हांला गीतेची पुष्टि मिळावयाची तर मी संतांच्या कृपेनें च मिळेल. हा च अर्थ मी माझ्या वहींत लिहून ठेवला आहे. "वेद हें जंगल आहे. त्यामध्यें उपनिषदें ह्या गाई आहेत. श्रीकृष्ण हे दूध काढणारे गवळी. संत हें तें दूध पिणारे वत्स आहेत. मी फक्त त्यांच्या तोंडून पडलेल्या उष्ट्या थेंबाची आशा राखून आहे.—यापेक्षां माझा ज्यास्त अधिकार नाहीं."—पूर्ण निरहंकार भूमिकेवरून अपूर्व अशा तऱ्हेचें हें भाषांतर झाल्यानंतर हि गीतेवर अधिकाधिक विवरणाची जरूर राहील च हें ज्ञानदेवांच्या द्वारें आचार्य या च व्याख्यांनांत सांगतात—"ज्ञानेश्वरांनीं गीतेचें वर्णन करतांना शिवपार्वतीसंवादाची एक सुंदर ओवी लिहिली आहे.

**येथ हर म्हणे नेणिजे । देवी जैसें कां स्वरुप तुझें**
**तैसें हें नित्यनूतन देखिजे । गीतातत्त्व ॥**

हे देवि! जसें तुझें स्वरूप ओळखणें कठिण तसें हें गीतातत्त्व ओळखणें कठिण आहे कारण तें तुझ्या स्वरूपाप्रमाणें नित्य नवीन प्रकारानें प्रकट होतें. असें हें गीतातत्त्व नित्य नवीन असल्या कारणानें सर्वांना सर्व काळीं उपयोगी पडतें. ज्ञानदेवांनीं ही ओळ लिहिण्यांत दुहेरी अर्थ साधला आहे. आजपर्यंत अनेक

टीका आणि भाष्यें असतांना नवीन भाषांतराची जरूर काय? या प्रश्नाचा उलगडा केला आणि त्याबरोबर च हें भाषांतर झालें तरी पुढें हि त्याविषयीं विवरणाची जरूर राहील च हें हि त्यांत सूचित केले."

रामायण महाकाव्य लिहून झाल्यानंतर वाल्मीकी ऋषींनीं तें स्वतःच्या आश्रमांतील लवकुशादींना शिकविलें. त्याप्रमाणें हें धर्मकाव्य लिहून झाल्यानंतर आचार्यांनी हि आश्रमांतील व राष्ट्रीय शाळेंतील बालकांना हें धर्मकाव्य शिकविण्याला सुरुवात केली. कुशलवांना रामायण शिकत असतांना कल्पना नव्हती कीं प्रत्यक्ष आपल्या बापाचा च वृत्तांत आपण गात आहोंत. त्याप्रमाणें येथील विद्यार्थ्यांना हि आपण शिकत आहों हें धर्मकाव्य प्रत्यक्ष आपल्या आईचा च उपदेश आहे याची कल्पना नव्हती. विद्यार्थ्यांना शिकवीत असतां, त्यांच्याकडून पाठ म्हणवून घेत असतां आचार्य विद्यार्थ्यांना अर्थदृष्टींनें, विचार दृष्टींनें कोठें कोठें अडतें याचा नीट शोध करून तदनुसार आपल्या मूळ गीताईंत बदल करीत. वाल्मीकींनीं हि आपल्या मूळ रामायणांत कुशलवांकडून असा पुष्कळ बदल करवून घेतला असला च पाहिजे. आपला ग्रंथ अशा प्रकारें आचार्यांनी मोठमोठ्या विद्वानांपुढें न मांडता अगदीं जवळच्या साध्याभोळ्या बालबालिकांपुढें मांडला यांत हि आचार्यांची थोर दृष्टि दिसून येते. लहान ते च खरे महान्, मोठे ते खोटे, हा सिद्धांत अनेक सत्पुरुषांनीं मान्य केला आहे. या विद्यार्थ्यांना जो भाग ग्रहण होणार नाहीं तो काढून टाकावा व योग्य असा आपल्या ग्रंथांत फरक करावा, पुन्हां आपण अशा प्रकारें ग्रंथरचनेंत भाग घेत आहोंत याची विद्यार्थ्यांना कल्पना हि नसावी आणि विद्यार्थ्यांना वरून वरून आपण शिकवीत असलों तरी त्यांत आपण स्वतः हि शिकत आहोंत ही नम्र भूमिका असावी, केवढें हें रमणीय आणि थोर दृश्य! या संबंधीचें आचार्यांचे उद्‌गार पाहण्यासारखे आहेत.—"हें भाषांतर छापण्याची माझी इच्छा नव्हती. परंतु लोकांच्या आग्रहामुळें तें छापलें गेलें. माझी प्रचार करण्याची कल्पना पुस्तक छापून त्याचा प्रचार करावा, अशी नव्हती. मी माझ्या आश्रमांत तें मुलांना शिकवीत होतों. अशाच तऱ्हेनें शिकवून, पठण करवून त्याचा जीवंत प्रचार होईल. मुलांना शिकविण्यामुळें झालें काय कीं, मुलांना अर्थ समजण्यासाठीं ठिकठिकाणीं फरक करावा लागला. मूळच्या अर्थाला आणि गंभीरतेला धक्का न लावतां असे अनेक फरक केल्यामुळें पुस्तक अतिशय सुलभ झालें. माझा प्रयत्न पूर्ण झाला आहे. यापुढें माझी शक्ति संपली." "हें भाषांतर मीं विद्वानांसाठीं केलेंलें नाहीं. मी स्वतःहि विद्वान नाहीं. हल्लीं एकाग्रतेनें अभ्यास असा फार थोडा होतो. त्या मानानें मीं कांहीं अभ्यास केला आहे हें खरें पण हें भाषांतर विद्वत्तेच्या दृष्टीनें मीं लिहिलेंलें नाहीं. व विद्वानांपुढें तें ठेवण्याचा हेतु नाहीं. तें खेड्यांतींल लोकांसाठीं मीं लिहिलें आहे. पण कोणत्या हि विद्वानाकडे मीं हें भाषांतर पाठविलें नाहीं. कोणा हि विद्वानाला तें दिलें नाहीं. सहजासहजीं कोणा विद्वानाच्या हातीं हें भाषांतर पडलें नाहीं असें नाहीं. मला असें दिसतें आहे कीं, कदाचित कांहीं विद्वानांना या भाषांतरानें आनंद वाटेल. कांहींचीं मला पत्रें हि आलीं आहेत. पण जेव्हां माझ्या कानावर असें येतें कीं, अमुक खेड्यांतल्या माणसाला यापासून आधार मिळतो तेव्हां मला जें समाधान होतें त्याला उपमा नाहीं."

मुलामुलींना शिकवितां शिकवितां, चिंतन करतां करतां ६-२-३१ ला गीताई-लेखन समाप्त झाल्यानंतर ८ महिन्यांनीं आचार्यांनी क्रमवार व्यवस्थित अशी धांवत्या अक्षरांचीं दुसरी गीताई लिहून काढली. तपकिरी खादीचें बाइंडिंग केलेली, एक्सरसाइज वह्यांच्या आकाराची ही वही अंतर्बाह्य दोन्ही दृष्टींनीं अतिशय सुव्यवस्थित होती. या वहींत १०१ पानांत ७०० श्लोक लिहिले गेले. मूळ गीताईपेक्षां या वहींत ९०० सुधारणा केलेल्या होत्या. मूळ गीताईमध्यें केलेले हे सर्व फरक कांही केवळ मुलामुलींच्या गीताई शिक्षणांतून च उद्‌भूत झाले असें नव्हें. त्यांत मोठ्या मंडळींनीं हि क्वचित् चर्चा करून कांहीं फरक सुचविले होते. हे सर्व फरक निरनिराळ्या दृष्टीनें केले होतें. या ९०० फरकांनंतर पुढें गीताईंत मुळीं च फरक झाले नाहींत असें नाहीं. गीताई छापल्यावर सात आवृत्तींत पुढीलप्रमाणें—

अनुक्रमणिका

आवृत्ती तिसरी ७ फरक
आवृत्ती चौथी २ फरक
आवृत्ती पांचवी १० फरक
आवृत्ती सातवी ५ फरक

२४ फरक झाले. आणि ते ही १२ वर्षांत! म्हणजे मुळांत निश्चित असे ९०० फरक केल्यानंतर मग फारसें फरक करण्याचें कारण राहिलें नाहीं. किंबहुना पुढे पुढे कोणता ही फरक करण्याला स्वतः आचार्य सहसा धजत नसत. याचें कारण एका विशिष्ट अवस्थेत जें लिहिलें गेलें व त्याच अवस्थेंत जे सुधारलें गेलें त्यांत फरक करणे खरोखर च साहसाचें काम होतें. खुद्द भगवंतांना अर्जुनानें पुन्हां गीता सांगण्याची विनंती केली असतां विशिष्ट योगयुक्त अवस्थेत गीता सांगितली गेल्यामुळे ती पुन्हां तशी च सांगणें मला ही अशक्य आहे असें भगवंतांनीं उत्तर दिलें होतें. या उत्तरांत ही हें च मर्म सांठविलें आहे.

गीताई आश्रमांतील मुलामुलींच्या तोंडीं बसूं लागल्यानंतर तीमध्यें ९०० फरक झाल्यानंतर गीताईच्या हस्तलिखित प्रती आपापल्या पाठासाठीं अनेक आश्रमीयांनीं करून घेतल्या. आणि गीताईच्या जन्मापासून च तिच्या प्रसाराला स्वाभाविक तऱ्हेनें सुरुवात झाली. जो ग्रंथ न छापतां आजूबाजूला पठनाद्वारें सहज पसरेल त्याच्या प्रसाराला तुलना च नाहीं. अमेरिकेंत-इंग्लंडांत कित्येक पुस्तकांच्या पन्नास पन्नास लाख प्रती खपल्या आहेत म्हणून काय तीं पुस्तकें प्रसार पावली म्हणायचीं? मुळीं च नाहीं. ग्रंथप्रसार हा आवृत्तीवर, छपाईवर नाहीं. युरोपमध्ये कैक ग्रंथ छापले जातात. —फराळाच्या करमणुकीसाठीं प्रसार पावतात—ग्रंथाची गंभीरता राहात च नाहीं. जो ग्रंथ जन्मल्याबरोबर उतरला जाऊं लागला—पठण केला गेला—जो अनेकांच्या मनाचा ताबा घेऊं शकला तो अप्रकाशित राहून ही म्हणजे छापला न जाऊन ही पूर्ण प्रकाशित व्हावयाचा यांत तिळमात्र शंका नाहीं. ग्रंथ छापणें ही वस्तू गौण स्वरुपाची आहे. ती एक सोईची बाब आहे. बाकी ज्या ग्रंथाचा प्रसार लेखकाच्या हृदयांत होऊन चुकला तो विश्वहृदय काबीज करील यांत शंका कशाला? आचार्यांचे एकनिष्ठ विद्यार्थी वल्लभस्वामी यांनीं स्वाभाविकपणेंच एक गीताईची प्रत स्वतःसाठीं उतरून घेतली होती. १९३२ सालीं धुळें जेलमध्यें आचार्य असतांना जमनालालजी वगैरे अनेक थोर मंडळी धुळें-जेलमध्यें होती. त्यांच्या अत्याग्रहामुळें गीताई छापण्याला आचार्यांनी संमती दिली. त्यावेळीं वल्लभस्वामी यांची प्रत मुळाची बिनचूक तपासलेली नक्कल म्हणून उपयोगी पडली. मुद्दाम वल्लभस्वामींनीं २१-१-३२ ला सदर प्रत मुळाबरहुकूम तपासून धुळें-जेलमध्यें पाठविलीं. आश्रमीय मंडळी बहुतेक सर्व जेलमध्यें असतांना च गीताई प्रकाशित झाली. धुळें येथील हरीजन सेवेला वाहिलेले काकासाहेब बर्वे वकील हे छापखान्यांतून प्रुफें जेलमध्यें आचार्यांकडे देत आणि आचार्य तीं तपासून परत करीं, असें जेलमध्यें हें काम झालें. पहिली ५ हजारांची आवृत्ती ५ महिन्यांत खपून गेली. त्यामुळें १९३२ ऑक्टोबरमध्यें दुसरी आवृत्ती २,५०० शेंची काकासाहेब बर्व्यांकडून धुळ्याला च छापविली. ही लहानशी आवृत्ती या महिन्यांत च खलास झाल्यामुळें १९३२ ऑक्टोबरमध्यें वर्ध्यास दहा हजारांची तिसरी आवृत्ती काढली. लगेच सहा महिन्यांनीं मे १९३३ मध्यें धुळ्याला चौथी २० हजारांची आवृत्ती काढावी लागली. यानंतर १९३५ जानेवारीपर्यंत चौथी आवृत्ती पुरली. १९३५ जानेवारीला मं. ना. कुळकर्णी यांच्या कर्नाटक प्रेसमध्यें अखंड टाईपाची अतिशय सुंदर अशी २५ हजाराची आवृत्ती काढली. १९३६ जूनमध्यें पुन्हां कर्नाटक प्रेसमध्येंच अशीच सुंदर अखंड टाईपाची ३७ हजारांची आवृत्ती निघाली. ही आवृत्ती ६ वर्षें पुरली. आचार्यांच्या आग्रहामुळें जमनालालजींसकट सर्व विरुद्ध असतां प्रत्येक प्रतीची किंमत एक आणा च ठेवली गेली. गीताई च्या प्रती फुकट वाटणें किंवा कोणी त्या फुकट घेणें ही आचार्यांना पसंत नसे. कोणाला हि समजावी इतकी सुलभ गीताई आचार्यांनी करून ठेवली तशी च ती कोणाला हि श्रमांत मिळावी अशी त्यांनी

सोय केली. एक आणा किंमत म्हणजे एक तासाची मजुरी आहे. आचार्यांचे या बाबतीत उद्‌गार पाहिले म्हणजे स्पष्ट कल्पना येईल.— "(गीताईची) किंमत अल्प आहे. तेवढा त्याग प्रत्येकानें केला च पाहिजे. आतापर्यंत फुकट पुस्तकें दिलींच नाहींत असें नाहीं. पण ती रीत मी अयोग्य समजतों. ज्यांच्याजवळ पैसा नाहीं अशा विद्यार्थ्यांनीं मजुरी करावी, सूत कांतावें अथवा कांहीं दिवस जेवणांतलें तूप खाऊं नये, व अशा रितीनें पुस्तक घेऊन त्यांचें मननचिंतनपठन करावें. हें पुस्तक तुम्ही जिरवा, पचवा, गोडीनें म्हणा. पहाटे मोठ्या आवाजांत म्हणतां म्हणतां तुमच्या हृदयांत याचा अर्थ उतरेल." आचार्यांचें जें जें लिखाण होईल तें तें सर्वच्या सर्व प्रसिद्ध करावें व त्याचे प्रकाशक स्वतः असावें अशी जमनालालजींचीं उत्कट इच्छा असल्यामुळें जमनालालजींच्या हयातीपर्यंत गीताईवर प्रकाशक म्हणून त्यांचें शूभनाम सदोदित टिकून राहिलें. गीताईच्या प्रत्येक आवृत्तीच्या छपाईसाठीं सुमारें एक हजार रुपयेपर्यंत खर्च येई व तेवढी रक्कम पुस्तकें खपेपर्यंत व पुढें पुढच्या आवृत्तीसाठीं म्हणून एकसारखी अडकली राही. जमनालालजींनीं ही सर्व रक्कम भक्तीभावानें गीताईला अर्पण केली होती हें काय सांगावयास पाहिजे? अशा रीतीनें सर्व सिद्धता आणि प्रसिद्धीकरण होऊन क्रमाक्रमानें गीताईचा महाराष्ट्रांतल्या अनेक खेड्यांत प्रवेश झाला. उघडच आहे!

**वार्ता च कौतुकवती विमला च विद्या**<br>
**लोकोत्तरं परिमलश्च कुरंगनाभेः**<br>
**तैलस्य बिंदुरिव वारिणि दुर्निवारं**<br>
**एतत्रयं प्रसरति स्वयमेव भूमौ ॥**

तथापि शहरांतून प्रत्येक गोष्ट खेड्यांत जावयाची या अलीकडच्या नियमाला गीताई अपवादभूत ठरली. ती खेड्यांतच प्रथम विराजमान झाली. परंतु हा सर्व प्रसार कसकसा झाला हें पुढेंच पहावयास हवें.

खरें म्हटलें म्हणजे गीताईचा खेड्यांत किती प्रसार झाला, गीताई किती लोक वाचतात, गीताई कोणाकोणाला पाठ आहे, गीताईच्या आवृत्ती किती निघाल्या इत्यादी गोष्टी पाहणें, हें रामकृष्ण परमहंसांनीं म्हटल्याप्रमाणें एकप्रकारें विलक्षणच समजावें लागेल. रामकृष्ण परमहंस म्हणत—"अरे तूं बागेंत आलास तर, हा माळी कोण? त्याची जात काय? या आंब्याच्या झाडांचीं पानें च किती? असल्याच चौकशा करणार कां? येथले चार आंबे खायला कसे मिळतील हें पाह्यचें सोडून तूं नुसता हिशेब च का करीत राहणार?" ही दृष्टी खरोखर अतिशय पवित्र आहे! माझ्या अंतःकरणात गीताईचा प्रसार किती झाला आणि तो उत्तरोत्तर अधिकाअधिक कसा वाढत जाईल याची मला मुख्य चिंता पाहिजे. त्याच्यासाठी माझें गीताईशीं सतत हितगुज चाललें पाहिजे. सगळी सृष्टी मी तिच्या पायाशीं आणून वाहीन, सर्व दृष्टी मी तन्मय करीन तेव्हां च माझ्या हृदयांत गीताईचा प्रवेश होईल. ही मुख्य वस्तु झाल्यानंतर आत्मशुद्धीकडे मुख्य नजर ठेवून गीताईचा सेवा दृष्टीनें लोकांत कसकसा प्रसार होईल याची योजना करणे अयोग्य होणार नाहीं. गीताईच्या प्रचाराला मुख्य स्थान स्वतःचें हृदय, गीताईच्या प्रचाराची मुख्य योजना भक्ति, गीताईच्या प्रचारांचें मुख्य लक्ष्य, आत्मशुद्धि आणि गीताईच्या प्रचाराचें मुख्य फळ आत्मतुष्टी होय! या चतुःसूत्रीचा अवलंब केल्यास गीताईचा प्रसार आपोआप च होत जाईल. मग गीताईचें मनन हि सहज होईल. भक्तिनें वाचतां वाचतां जिज्ञासा वाढत जाईल, एकेक गोष्ट उलगडूं लागेल. त्या उलगडणाऱ्या गोष्टींनीं आनंद दुणावेल. त्यांत बुद्धि तल्लीन होईल. भक्तीभावानें उमलणारी बुद्धि ही शुद्धीला प्रेरक होते. तिच्यापासून शुद्धीचा सुगंध चोहोंकडे दरवळत असतो. ती केवळ कसरत ठरत नाहीं. कसरत ही कांही काळ च टिकूं शकते. भक्तीयुक्त बुद्धि ही नित्यवस्तु आहे. त्यामुळें बौद्धिक कसरती करणाऱ्या विद्वानांपेक्षां भक्ताला ध्येयविषयाचा करोडोपट अधिक उलगडा होत जातो. गीताईचा संपूर्ण उलगडा करणें हें प्रत्येकाचें स्वतःचें

आंतरिक काम आहे. गीताईचा भक्त सतत तिचें ध्यानचिंतन करीत राहील. दासी मालकिणीकडे काम करते परंतु तिचें चित्त स्वगृहाकडे च लागलेंलें असतें. त्याप्रमाणें भक्त निरनिराळ्या कामांत वरवर दिसतो पण तो आंतून गीताध्यानांत च निमग्न असतो. व्यापारी दुकानांत बसला म्हणजे कोणी आला गेला तर त्याचें स्वागत करील, पण आंतून त्याचें लक्ष गिऱ्हाईकाकडे, नफातोट्याकडे च लागलेंलें असावयाचें त्याप्रमाणें जो सतत गीताई चिंतनांत मग्न होईल, त्याला च तिचें योग्य दर्शन होऊन एकेक उलगडा होत जाईल. वरच्या शाब्दिक मृण्मय मूर्तिपलीकडची महान् चिन्मयमूर्ति मग त्याच्या डोळ्यापुढें उभी राहील, आणि लक्षांत येईल कीं, अरे ही गीताई वरून अगदीं साधी दिसते, हिच्यांत एकदम पाहिलें असतां कांहीं विशेष प्रतीति येत नाही. पण तिच्या रोमरोमांत केवढें वैशिष्ट्य भरलेंलें आहे! आपली आई ही अगदीं साधीच दिसावयाची. पण ती गुरुची हि गुरु आहे. बालक म्हणतो मला अमक्यानें अमुक शिकविलें, तमक्यानें तमुक शिकविलें, पण आईनें किती शिकविलें त्याचें मोजमापच नाहीं. त्यामुळें ती गुरु असून तिची गुरुता भासतच नाहीं. गीताई माउलीचें असें च आहे. ती इतकी सुलभ, वरून इतकी साधी दिसतें कीं तिच्या अंतरंगाची अद्‌भूत गुरुता लक्ष्यातच येत नाहीं. ज्ञानेश्वरमहाराज स्वतःच्या ज्ञानेश्वरीसंबंधीं म्हणतात—

**तैसें अध्यात्मशास्त्रीं इयें । अंतरंग चि अधिकारिये**
**परि लोक वाक्चातुर्यें । होतील सुखिया**

ज्ञानेश्वरीचें हें अध्यात्मशास्त्र अंतरंगांत शिरणाऱ्यांना च कळणार आहे. परंतु बहिरंगांतील वाक्चातूरी पाहून हि लोक सुखी होतील! तशी हि गीताईची स्थिती नाहीं. तिचे बहिरंग कोणत्या ही तऱ्हेनें नटलेंलें नाहीं. तें सहज आहे. सुलभ आहे, साधें आहे, पण नटलेंलें नाहीं. त्यामुळें एखाद्या गावांजवळच्या डोंगरांत एखादा थोर योगी रहावा, पण कोणाला माहीत नसावा, त्याप्रमाणें गीताईच्या सौलभ्यांत केवढा अलभ्य ठेवा दडलेला आहे हें कोणाच्या च एकदम लक्षांत यावयाचें नाहीं. तें लक्षांत यावयाला भक्तच पाहिजे. येथें ‘हें अभक्ताला सांगू नका’ अशी ताकीद देण्याची जरुरच नाहीं. कारण गीताईत त्याला एकदम आकर्षण असें कांहीं दिसावयाचें नाहीं. तेथें अभक्ताचा थांग च लागावयाचा नाहीं. भक्त मात्र एकेक श्लोक वाचील आणि उत्तरोत्तर अंतरंग दर्शनाचा लाभ घेऊन, बाह्यसृष्टी पार विसरून जाईल. प्रथम च ‘गीताई माउली माझी’ या श्लोकावर त्याची दृष्टि वळेल. एक आई पडणाऱ्या आणि रडणाऱ्या मुलाला उचलून कडेवर घेते आहे हें दृश्य काय नेहमींचें च नाहीं? कां हें दृश्य पाहण्यासाठीं कलकत्ता, मुंबई, दिल्ली इत्यादी मोठ्या शहरांतल्या भव्य पदार्थसंग्रहालयांत जावें लागेल? हें दृश्य नेहमींचें च. पण त्यांत खोल अर्थ आहे. गीताई माउली माझी. यांतील ‘माझी’ पद केवढें महत्त्वाचें आहे! गीताई माउली माझी म्हणजे गीताई माउली शिवाय माझें दुसरें कांहींच नाहीं. अशी बालकासारखी अनन्यता असली पाहिजे. आत्मोद्धार व्हावयाचा असेल तर गीताईवर बालकवत् एकनिष्ठा पाहिजे. असा अर्थ भक्ताला यांतून मिळेल. मी नेणता आहे ही सतत जाणीव असल्याशिवाय—पूर्ण नम्रतेशिवाय आत्मोद्धार कसा होणार. नेणतां या पदांतून भक्ताला हा लाभ होईल. ही गीतामाउली म्हणजे साक्षात् भगवंत च आहेत. भगवंत+भक्त अशी जोडी जमल्यावर पडणें आणि रडणें, शोक आणि शोक-कारण हें कोठून उरणार? शोक आणि शोक-कारण नष्ट झाल्यावर धर्म, श्री, जय, वैभव हें सहज च हातीं पडणार असा भक्ताला यांतून अर्थलाभ होईल. व्यासशिष्य संजयाचा गीतेच्या शेवटीं

**यत्र योगेश्वरः कृष्णो यत्र पार्थो धनुर्धरः ।**
**तत्र श्रीर्विजयो भूतिर्ध्रुवा नीतिर्मतिर्मम ॥**

अनुक्रमणिका

हा जसा उद्धार झाला आहे. तसाच हुबेहूब ‘गीताई माउली’ हा श्लोक आहे. तेथें गुरुशिष्य, भगवंत-भक्त ही भाषा, येथें आई-मूल ही भाषा एवढाच फरक. व्यासशिष्य संजयोद्गारांत सर्व गीता फळरूपानें सांठवली तशी या प्रथम श्लोकांत सव गीता मूळ-रूपानें समाविष्ट झाली आहे. प्रथमदर्शनीं च आचार्यांनी गीतेचें मूळ दाखविलें. गीता म्हणण्यापूर्वीं हा श्लोक म्हटला नाहीं तर ती एक गीतेंत उणीव च राहील असें वाटावें असा हा श्लोक आहे. यांत पुढील सर्व गीता बीजरुपानें सांगितली. गीता ही माझी माउली, मी तिचा एकनिष्ठ बालक, मी नेणता-नम्र. अनंत जन्मांचें पतन आणि शोकमोह गीताई नष्ट करील. ती वर उचलून मला कडेवर घेईल. माझा ती उद्धार करील—हा या श्लोकाचा अर्थ म्हणजे सर्व गीतातात्पर्यच नव्हे काय? उपक्रमउपसंहारावरून गीतातात्पर्य ठरवावयाचें तर हें च ठरत नाहीं काय? युद्धाला सुरुवात होणार इतक्यांत अर्जुन युद्ध सोडतो व उपदेशांती पुन्हां युद्धाला सुरुवात करतो हा कथेचा उपक्रमोपसंहार. पण गीतेचा तत्त्वदृष्ट्या उपक्रमोपसंहार प्रथम मोह आणि शेवटीं मोहनाश हा च ठरत नाहीं काय? इ. इ. अनेक गोष्टींचें अंतरंग स्वरुप गीताईभक्ताच्या अंतःकरणाला प्रतीत होऊन मग त्याची एक प्रकारची टिप्पणी च मनांत तयार होत जाते.

१/१ धर्मक्षेत्रे कुरुक्षेत्रे—त्या पवित्र कुरुक्षेत्रीं

त्या शब्दांनें राजवाड्यांत बसून संजय धृतराष्ट्राला कुरुक्षेत्रवृत्त सांगतो आहे असा देखावा एकदम डोळ्यापुढें उभा केला!

१/८ प्रचलित सर्वसामान्य पाठ ‘सौमदत्तिस्तथैव च!’ याच्या ऐवजीं गीताईंत ‘सौमदत्तिजयद्रथ’ हा पाठ स्वीकारला आहे. कारण १/३ १/४ मध्यें ‘द्रोणं च भीष्मं च जयद्रथं च’ असा उल्लेख आहे. त्याला आधार मिळावा म्हणून. ‘अश्वत्थामा सौमदत्ती जयद्रथ विकर्ण हि’.

१/४२ लुप्तपिंडोदकक्रिया—पिंडोदक क्रियांबद्दल ‘श्राद्ध’ शब्द वापरून गीताईनें सार्वभौम, सार्वकालिक, पितृपूजा सुचविली व विधिविधान गौण ठरविलें.

२/२ अनार्यजुष्टम्—‘असें रुचे न थोरांस’ आर्य-अनार्य ही दृष्टि टाकून मूळचा भाव मांडला.

अस्वर्ग्यम्—‘दुर्गति’ शब्द वापरून मूळ शब्द स्पष्ट केला.
अकिर्तिकरम्—‘दुष्कीर्ति’ शब्द वापरुन मूळ शब्द स्पष्ट केला.
२/५ अर्थकाम हें गुरुंचें विशेषण न घेऊन गीताईंत गुरुभक्ति सिद्ध केली.
२/१७ येन सर्वमिदं ततम्—‘ज्यानें हें व्यापिलें’ जेथे निर्गुण तेथें ततम् बद्दल ‘व्यापिलें’ जेथें सगुण तेथें ततम्बद्दल ‘विस्तारलें’ उदाहरणार्थ ८/८.

२/२६ अथ चैनं नित्यजातं नित्यं वा मन्यसे मृतम्
अथवा पाहसी तूं हा मरे जन्मे प्रतिक्षणीं ॥

—गीताईनें नित्य शब्दाची ‘प्रति-क्षणीं’ अशी फोड करून तत्त्वज्ञानदृष्ट्या जणूं नवीन भाष्य च केलें!

२/२८ अव्यक्तादीनि भूतानि व्यक्तमध्यानि भारत

अनुक्रमणिका

अव्यक्तनिधनान्येव तत्र का परिदेवना ॥
भूतांचें मूळ अव्यक्तीं मध्य तो व्यक्त भासतो
पुन्हां शेंवट अव्यक्तीं त्यामध्यें शोक कायसा ॥

तत्त्वज्ञानदृष्ट्या 'व्यक्तमध्यानि' चे 'व्यक्त तो मध्य भासतो' असें भाषांतर केल्यानें कोणता ही आक्षेप उरत नाहीं. मूळ म्हणणें गीताईनें बिनचूक मांडलें.

२/३६ निंदंतस्तव सामर्थ्यं—'निंदितील तुझें शौर्य'

अर्जुन क्षत्रिय होता. क्षत्रियाचें सामर्थ्य शौर्य हेंच होय.

२/३८ लाभालाभौ जयाजयौ—'हानिलाभ—हारजीत' मुळांतील अस्पष्टता घालविली.
२/४९ बुद्धियोग—समत्वबुद्धि—बुद्धियोगासंबंधींचा खुलासा केला.
३/४ न कर्मणामनारंभात्—'न कर्मारंभ टाळूनि' अनारंभ शब्दाबद्दल उचित शब्द घातला.

'न च संन्यसनादेव'—'संन्यासाच्या क्रियेनें चि' संन्यास आणि संन्यसन असा गीतेने स्पष्ट फरक केला आहे. 'नैष्कर्म्यसिद्धिं परमां संन्यासेनाधिगच्छति' या वाक्यावरून हें स्पष्ट होतें. संन्यसन म्हणजे संन्यासाची केवळ बाह्य क्रिया. संन्यास म्हणजे आंतरिक संन्यासावस्था.

३/६ कर्मेंद्रियाणि संयम्य—रोधूनि संयम शब्द चांगल्या अर्थी वापरतात. तो या च ठिकाणीं फक्त निराळ्या अर्थानें आला आहे. तो गीताईनें 'रोधुनी' म्हणून सुधरून घेतला.

३/३० मयि कर्माणि संन्यस्य—मज कर्मे समर्पुनी—मुळांतील संन्यस्य शब्दांतला दडलेला भाव गीताईनें खुलवला.

३/३२ मतं न अनुतिष्ठन्ति—शासन मोडिती—भगवंताचें मत म्हणजे शासन च होय. तें न अनुष्ठिणें म्हणजे मोडणें च होय.

३/३२ निग्रहः किं करिष्यति—'बलात्कार निरर्थक'. निग्रह शब्द चांगल्या अर्थी असून मुळांत जबरदस्ती या अर्थी आला तो बदलून मूळ भाव खुलवला.

४/२ योगो नष्टः परंतप—'योग लोपला' मुळांतली भाषा बेसावध होती. ती लोपला शब्दानें सावध केली. 'योग' नष्ट होणें शक्य नाहीं. कारण तो अव्यय आहे. या च श्लोकापूर्वी भगवान् म्हणतात—

४/१ इमं विवस्वते योगं प्रोक्तवानहमव्ययम् ।
—अशा गीताईभक्ताच्या टिपणीला खरोखर अंत च नाहीं. केवळ नमुन्याची म्हणून ही इतस्ततः कशी तरी टिपणी दिली. पण तिच्यावरून हि हें उघड होतें कीं, गीताई हें केवळ भाषांतर नाहीं. कोठें गीताईनें मुळाचा भाव अधिक स्पष्ट केला आहे, कोठे मुळावर जणूं भाष्य च केलें आहे. कोठें मुळांतला शब्द सुधरून घेतला आहे. कोठें बेसावध भाषा सावध केली आहे. कोठें वाकडा अर्थ करण्याला वाव राहील तेथें निश्चित

मंगलार्थकारी शब्द वापरला आहे. कोठें स्थूल कर्मकांड टाळून मूलतत्व मांडलें आहे. कोठें संकुचित भासणारा भाव व्यापक केला आहे. कोठें भिन्नार्थानें येणारा एक च शब्द द्विविध बनविला आहे. कोठें मुळाला आधार देणारा पाठभेंद स्वीकारला आहे. कोठें आड वळणाची भाषा सुधारली आहे. कोठें दूरान्वय सरळ केला आहे. आणि हें सर्व पुन्हां समश्लोकींत साधलें आहे. खरोखर या कृतीला तुलना च नाहीं! मोरोपंतानें आपल्या काव्यग्रंथांत अनेक मंत्र साधले आहेत, अनेक यमके आणली आहेत, अनेक शब्दालंकारांनीं आपलें काव्य मंडित केलें आहे. पण तो सर्व शब्दाचा च खेळ. येथें समश्लोकीची मर्यादा संभाळून केवढी अर्थाची भव्य लेणी निर्माण केली आहेत! जणूं काय गीतेच्या आत्म्याची च गीताईनें गांठ घालून दिली आहे. ज्ञानेश्वरमहाराजांना श्रोते जें म्हणतात तेंच येथें गीताईकाराला लागूं पडतें.

तूंतें श्रीमुरारी। म्हणितलें प्रगट करीं।
जे अभिप्राय गव्हरीं। झांकिलें आम्हीं १३/८५५
जें देवाचे मनोगत। दावित आहासी तूं मूर्त १३/८५६

गीताई-निमित्तानें गीतेच्या गव्हरांत झाकलेले भाव आचार्यांनी समश्लोकीची मर्यादा सांभाळून अत्युत्कृष्ट तऱ्हेनें प्रगट केले. ज्ञानेश्वरमहाराजांना तें काम करतांना विस्ताराचा आधार होता. येथें तो हि आधार तुटलेला असून तें काम केलें गेलें हा विशेष होय.

या समश्लोकींत शंकर ज्ञानेशादि भाष्यकारांचे उत्कृष्ट अर्थहि सामावले गेले आहेत हा या भाषांतराचा आणखी एक विशेष होय. वरवर चाळून हि ही गोष्ट लक्षांत आल्याशिवाय रहात नाहीं. कांही सहज दिसणारी उदाहरणें पाहूं—

२/५१ पदं गच्छंत्यनामयम्—यावर शंकराचार्य ‘तद्विष्णोः परमं पदं’ या श्रुतीच्या आधारें—पदं—परमं विष्णोः—असें भाष्य करतात. तें भाष्य ज्ञानेश्वर

मग निरामयभरित। पावती पद अच्युत।
ते बुद्धियोगयुक्त। धनुर्धरा॥

असें ज्ञानेश्वरींत समाविष्ट करतात. ते ज्ञानेश्वरांचे शब्द

“पावती पद अच्युत” असे गीताईत घेतले आहेत ‘अच्युतपद’ म्हणजे विष्णूचें परमपद. तसेंच अच्युत पद म्हणजे अनायम पद हे दोन्ही अर्थ एकाच अच्युत विशेषणांत गीताईनें सामावलें.

१८/४६ स्वकर्मणा तमभ्यर्च्य—यावर ज्ञानेश्वरमहाराजांनीं

तया सर्वात्मका ईश्वरा। स्वकर्मकुसुमांची वीरा।
पूजा केली होय अपारा। तोषालागीं॥

अशी ओवी लिहिली आहे. पूजेची भाषा आल्यामुळे कर्में स्वाभाविकपणें च फुलें ठरलीं ही च ज्ञानेशांची भाषा गीताईंत घेतली आहे.

अनुक्रमणिका

स्वकर्मकुसुमीं त्यांस पूजितां मोक्ष लाभतो.
४/३२ एवं बहुविधा यज्ञा वितता ब्रह्मणो मुखे

—अवेदद्वारणे अवगम्यमानाः ब्रह्मणो मुखे—शंकराचार्य, त्यावरून गीताईंत—
विशेष बोलिलें वेदें असे यज्ञ अनेक हे ।
९/२ राजविद्या राजगुह्यं पवित्रमिदमुत्तमम्

—आणि धर्माचें निजधाम । तेविंचि उत्तमाचें उत्तम—ज्ञानेश्वर त्यावरून गीताईंत—राजविद्या महागुह्य उत्तमोत्तम पावन

४/३ रहस्यं ह्येतदुत्तमम्
—हें जीवींचे निजगुज ।—ज्ञानेश्वर
त्यावरून गीताईंत—जीवींचे गूज हें थोर

१०/१२ परं ब्रह्म परं धाम
—परं धाम—परं तेजः—शंकराचार्य
त्यावरून गीताईंत—परब्रह्म महातेज

१२/१९ तुल्यनिंदा स्तुतिर्मौनी
—जो निंदेतें नेघे इ. इ. ज्ञानेश्वर
त्यावरून गीताईंत—निंदास्तुति न घे मौनी.

१८/६१ ईश्वरः सर्वभूतानां हृद्देशेऽर्जुन तिष्ठति ।
भ्रामयन्सर्वभूतानि यंत्रारूढानि मायया ॥
—यंत्रारूढानि—यंत्राणि आरूढानि अधिष्ठितानि इव—इति इव शब्दः अत्र द्रष्ट यः—शंकराचार्य
त्यावरून गीताईंत—
मायेनें चाळवी त्यांस जणूं यंत्रांत घालुनी

७/९२ मायैव विहितान्
—मया परमेश्वरेण सर्वज्ञेय कर्म फल विभागतया विहितान्—निर्मितान्—शंकराचार्य, त्यावरून गीताईंत—मग मागितले भोग पावती मीं चि निर्मिले ॥

११ दिशो न जाने—
—दिङ्मूढो जातः असि—शंकराचार्य
त्यावरून गीताईंत—दिङ्मूढ झालों.

१०/७ एतां विभूतिं योगं च मम यो वेत्ति तत्त्वतः
विभूतिं—विस्तारं; तत्त्वतः यथावत्—शंकराचार्य, त्यावरून गीताईंत—' हा योगयुक्त विस्तार माझा जो नीट ओळखे.

अनुक्रमणिका

१४/५ निबध्नंति
—निबध्नंति इव—शंकराचार्य
जणूं देहांत जुंपिती—गीताई

२/३४ अकीर्तिं चापि भूतानि कथयिष्यंति तेऽव्ययाम्
—तुझी अक्षय दुष्कीर्ति गात राहतील—टिळक
अखंड लोक गातील दुष्कीर्ति जगतीं तुझी—गीताई

८/९ कविं पुराणं
—कविं—क्रांतदर्शिनं सर्वज्ञं—शंकराचार्य
सर्वज्ञ कर्ता गुरु जो पुराण—गीताई

अशी उदाहरणें देण्यांत कांहीं अर्थ नाहीं. कारण अशीं कोणकोणतीं आणि किती उदाहरणें देणार? मनुष्य समुद्राकाठीं जातो आणि तेथें वाळूंत पडलेले चित्रविचित्र रंगाचे विविधाकृतीचे शंखशिंपले गोळा करतो. ते घरीं घेऊन जावें असें त्यास वाटतें तों च त्याच्या मनांत विचार येतो; घेऊन किती जाणार? आणि या रत्नाकराच्या तळाशीं करोडों रत्नें लपलेलीं आहेत. त्यांचें काय? शेवटीं असा विचार करतां करतां एकच विचार टिकतो तो हा कीं, आपल्या घरीं येथलीं रत्ने घेऊन जाण्यापेक्षां आपण च या रत्नाकरांत या अमृतसागरांत लीन होऊं या. ज्ञानेश्वरांचें गीताभाष्य इतकें अमृतमय कसे वठलें? कारण तें गीतामृतांत लीन झाले होते. गीताईची अशीच गोष्ट आहे. तिच्या ठिकाणीं रात्रंदिवस लीन झाल्याशिवाय तिची गोडी कळावयाची नाहीं. अमृताची ही तऱ्हाच मोठी विचित्र आहे. इतर रस आपण मुखांत घालतो तेव्हां त्यांची गोडी प्रतीत होते. हा गीतामृतरस आपण मुखांत घालण्याचा प्रयत्न करू तर त्यानें विशेष लाभ होणार नाहीं. आपण च याच्या मुखात पडायला हवे. आपण च याच्या ठिकाणीं लीन व्हावयाला पाहिजे. तर च त्याची गोडी कळेल. तर च आपण खरे रसमय होऊं. तेव्हांच आपणाला खरा रस कळेल. केवळ पूर्वाचार्यांचे पचविलेंलें भाष्य च यांत मिळेल असें नाही. गाय कठिण कडबा पचविते व दूध देते तसे मूळ व्यासांचे गूढ शब्द अनेकार्थानें एक च शब्दांत प्रकटलेले विचार हि तेथें आपल्याला मिळतील इतकें च काय पण कोणा हि भाष्यकारांनें आजपर्यंत न केलेले असे त्यावरचे आचार्यांचे स्वतः चे भाष्य हि आपणांस यांत पाहावयास मिळेल.

१६/८ अपरस्परसंभूतं किमन्यत्कामहैतुकम्—यांतील ‘अपस्परसंभूतं’ यावरचे सर्व प्रमुख भाष्यकारांचें भाष्य पहा.

अपरस्परसंभूतं—काम प्रयुक्तयोः स्त्रीपुरुषयोः अन्योन्यसंयोगात् जगत् सर्वं संभूतं—शंकराचार्य

**याकारणें कामें । स्त्रीपुरुषयुग्में**
**मिळती येथ जन्मे । आघवें जग ॥**
**आणि जें जें अभिलाषें । स्वार्थालागीं हें पोषे**
**पाठीं परस्परें द्वेषें । कामचि नाशी ॥**

अनुक्रमणिका

अपरस्परसंभूतं म्हणजे एकमेकापासून हि न झालेंलें—टिळक. काममूलक हें सारें कोठलें सहकार्य तें—गीताई.

अपरस्परसंभूत हा १६/८ मधील विवादास्पद शब्द. शंकराचार्यांनीं त्याचा परस्पर संभूत असा अर्थ घेतला. ज्ञानेश्वरांनीं तदनुसार च परंतु उत्पत्तिबरोबर विनाश हि दाखविला. महात्माजींनीं हि शंकराचार्यांचा च अर्थ घेतला. टिळकांनीं निराळा च अर्थ केला. परंतु अपरस्परसंभूत म्हणजें 'सहकार्यरहित' हें गीताईकारांचें भाष्य सर्व भाष्यकारांहून वेगळें आहे. जग सहकार्यावर चाललेंलें आहे, हें न मानतां केवळ स्वतःच्या कामनेसाठीं वाटेल ते करण्याची आसुरी प्रवृत्ति असते. हें यांत इतर भाष्यांतून न मिळालेंलें नवीन दर्शन लाभलेंलें आहे. स्त्रीपुरुषांपासून च सजीव जग झालें हें समजा कोणी मानीत असेल म्हणून कां तो असुरी ठरेल? आसुरीपणा हा ईश्वर आहे हें न मानणें किंवा तत्संबंधीं संशय प्रकट करणें किंवा जगदुत्पत्तिच्या उपपत्तिपैकीं अमुक उपपत्तिवर अवलंबून नाहीं. तर मी च काय तो ईश्वर. मी च सर्वश्रेष्ठ. सहकार्याची मला जरूर नाहीं. मी करीन ती पूर्वदिशा. माझ्या कामनेसाठीं मला लागेल तें मी करीन या विलक्षण अहंवृत्तींत आसुरीपणा आहे.

१८/६३ यथेच्छसि तथा कुरु
—स्वेच्छेनें योग्य तें करीं—गीताई
'योग्य तें' हे शब्द मुळाला जोडल्यामुळें; गीतारहस्यकारांना जी लांबलचक टीप द्यावी लागली आहे ती येथें टळली आहे. भगवान् अर्जुनाला इच्छास्वातंत्र्य देतात. पण यथेच्छाचार करण्यासाठीं नव्हे. भगवंतांच्या म्हणण्याचा विचार करून त्यांत शेवटीं जें योग्य दिसेल तें कर. असा च मुळात भाव आहे.

२/५९ तदा गंतासि निर्वेदं श्रोतव्यस्य श्रुतस्य च
—'आलें येईल जें कानीं तेव्हां जिरविशील तूं'—गीताई. यांत निर्वेद म्हणजे कंटाळा असा अर्थ केला तर तो जमत नाहीं. कारण भविष्यकाळचें जें 'श्रोतव्य' त्याचा निर्वेद कसा संभवेल?—म्हणून गीताईमध्यें निर्वेद म्हणजे 'श्रवण जिरवून टाकणें' असें भाष्य केलें आहे. या नवीन भाष्यांत श्रवणाबद्दल तुच्छता नाहींशीं झाली. श्रवणाची भीति हि गेली. श्रवणांचें खरें कार्य सूचित झालें. व निर्मोह झाल्याशिवाय श्रवणाचा लाभ हि होत नाहीं. उलट बुद्धि घोटाळते हें हि यांत कळून आलें.

४/४१, ४२ संशय छेदणें. ही भाषा संशय म्हणजे अज्ञान आणि अश्रद्धा म्हणून योजली. ही च भाषा घेऊन अर्जुनानें प्रश्न विचारला, एतन्मेसंशयं कृष्ण छेत्तुमर्हस्यशेषतः ६/३९. परंतु येथें संशय शब्द शंका या अर्थी आहे. म्हणून गीताईंत 'माझा संशय हा कृष्णा तूं चि फेडी मुळांतुनी—असा फेडी शब्द वापरला.

४/२८ द्रव्ययज्ञास्तपोयज्ञा योगयज्ञास्तथापरे ।
स्वाध्यायज्ञानयज्ञाश्च यतयः संशितव्रताः ॥

'द्रव्ययज्ञ' ह्या ठिकाणीं ज्या अर्थानें वापरलेला शब्द आहे त्या अर्थांनें ४/३३ श्रेयान्द्रव्यमयाद्यज्ञाज्ज्ञानयज्ञः परंतपः—वापरलेला नाहीं. म्हणून द्रव्ययज्ञ = द्रव्यार्पणें असें भाष्य गीताईंत केलें आहे व ४/३३ मध्यें द्रव्ययज्ञ शब्द तसा च ठेवला आहे.

१८/३० प्रवृत्तिं च निवृत्तिं च कार्याकार्ये भयाभये ।

अनुक्रमणिका

बंधं मोक्षं च या वेत्ति बुद्धिः सा पार्थ सात्त्विकी ॥

—‘अकर्तव्यें बंधभय कर्तव्यें मोक्ष निर्भय

जाणे सोडूं धरूं त्यास बुद्धि सात्त्विक ओळख’—गीताई कोणत्या हि भाष्यकारानें मूळ व्यस्त पदांचा असा अर्थसमाहार केला नाहीं. व प्रवृत्तिनिवृत्तिचे इतके अगदीं सहज, साधे, सरळ, अर्थ दिले नाहींत.

१३/१० विविक्तदेशसेवित्वं अरतिर्जनसंसदि

—एकांताविषयीं प्रीति जनसंगांत नावड—गीताई

प्रीति शब्दाचीं कारणें दोन (१) अरतिर्जनसंसदि हा आधार

(२) ‘विविक्त देशसेवित्वं’ हें निश्चित स्थूल लक्षण होईल.

गीता असें स्थूल लक्षण दाखवील तर ‘जनावरें हि एकांतांत राहतात’ असा त्यावर आक्षेप येईल. म्हणून एकांतवृत्ति (प्रीति) दाखवली.

७/९ तेजश्चास्मि विभावसौ ७/१० तेजस्तेजस्विनामहम्

—असें अग्नींत उष्णता—तेजस्व्यांत हि तेज मी—गीताई. एकामागून एक आलेल्या या दोन श्लोकांतील तेज शब्दाचे असे स्पष्ट भिन्नार्थ कोणी च दिले नाहींत.

आचार्यांच्या गीताईंतील स्वतंत्र भाष्याचीं अनेक उदाहरणें ज्यानें त्यानें स्वतः च पहावयास हवींत. गीताई ही समजण्यास जशी सुलभ आहे तशी ती या दृष्टीनें समजण्यास अत्यंत कठिण हि आहे. खडक फोडल्याशिवाय पाणी मिळत नाहीं, खोल बुडी मारल्याशिवाय, समुद्रांतील रत्नें कोठून मिळणार? हजारों कोळशांचा ढीग बाजूस सारण्याचें श्रम आधीं. मग च हिरे हातीं लागावयाचे. फळझाडांची जोपासना च मुख्य. झाडासाठीं १०-१२ वर्षें खपावें तेव्हां फळ खावें. तसें च येथें आहे. भक्तिप्रेमानें खपावें, गुरुशुश्रूषा करावी, साधुसंतांना विचारावें, तेव्हांच या गीताईंचें मर्म कळावयाचें. जसजसें कळेल तसतसें पुढें च जावयाचें. येथें थांबणें नको च. येथें पुढें जावें तों तों अधिकाधिक ज्ञानसंपत्ति लाभेल.

एवढ्यासाठीं च थोर ग्रंथावर भाष्यप्रतिभाष्य, टीका प्रतिटीका, अशी परंपरा निर्माण होत असते. भाष्यटीकादि प्रवृत्ति म्हणजे आकुंचित बुद्धीचें लक्षण नव्हे. थोर ग्रंथासाठीं ती एक अत्यावश्यक गोष्ट होऊन बसते. त्यांत निष्कारण वाद आणि शुष्कता निर्माण झाली तर तो दोष म्हणतां येईल. पण ही प्रवृत्ति अतिशय पवित्र आणि आवश्यक आहे. यांत शंका च नाहीं. गीतेवर शंकरज्ञानेशादींचीं भाष्यें नसतीं तर गीता कशी कळती? हे या भाष्यकारांचे केवढे उपकार आहेत. टीकाभाष्यांची अस्खलित परंपरा चालण्याला लायक असे ग्रंथ जगांत एकाएकीं निर्माण होत नाहींत. असे दैवीग्रंथ शब्द, तर्क किंवा कोणत्या हि साहित्यानें उत्पन्न होऊं शकत नाहीं. तें साक्षात् ईश्वरी देणें असतें. त्या पाठिमागे अनंत जन्माच्या सुकृताची जोडी असते. बादरायणांची ब्रह्मसूत्रें, पाणिनीचें व्याकरण सूत्राष्टक, हे अल्पाक्षरत्वाच्या साच्यांत बसविलेले ग्रंथ. हे अनेक संदर्भ आणि तर्काचे मूर्तिमंत अर्क होत. हे टीकाभाष्यावांचून कळत नाहींत. गीता शब्दांची काटकसर करीत नाहीं असें नाहीं. गीतेमध्यें अनंततर्कपरंपरा ग्रथित झालेली नाहीं असें हि नाहीं. पण तें तिचें वैशिष्ट्य नाहीं. ती मोकळेपणानें, साधेपणानें बोलते. पण ते बोल इतके बिनमोल असतात कीं त्यांतला सिद्धांतार्थ समग्र उलगडत नाहीं. जे ‘तत्त्वार्थीचे पायाळ’ असतील, जे ‘गुरुकृपांजन लेईले’ असतील. अशा थोर संतभाष्यकारांना च तिचें हृद्गत समजतें. एक वेळ पाणिनीयसूत्रें किंवा बादरायणसूत्रें भाष्याशिवाय कळतील हि. कारण सूत्ररचना ही खरोखर कोशरचनेप्रमाणें यांत्रिक स्वरूपाची असते. उत्सर्ग आणि

अनुक्रमणिका

अपवाद एकामागून एक रचत जावयाचे ही त्यांतली मुख्य पद्धति. पण गीता संतभाष्यकाराच्या मदतीशिवाय कळावयाची नाहीं. मातेचा हात धरल्याशिवाय बालक चालू शकत नाहीं. गीतेचा हात म्हणजे संतभाष्यकाराचें भाष्य होय. त्याशिवाय मनुष्याला तिच्या बरोबर चालतां यावयाचें नाहीं. गीतेपुढे कोणता हि थोर मनुष्य असो, तो बालक च ठरेल. मग सामान्यांची कथा च काय? गीताई हें एकापरीनें गीतेचें भाष्य आहे च. तथापि त्या गीताईवर हि गीतेप्रमाणें च भाष्यप्रतिभाष्य टीका प्रति टीका यांची सतत परंपरा चालावयास पाहिजे. तर च तिची विविध दर्शनें लाभतील. महाराष्ट्र भाषेत इतक्या थोर योग्यतेचा हा ग्रंथ निर्माण झाला हें केवढे भाग्य! गीताईंतील प्रत्येक पदाचा, प्रत्येक शब्दाचा कोश पाहिजे. त्यांत सर्व अर्थ, व्युत्पत्ति, व्याकरणादि सर्व अंगें परिपूर्ण सजवलेलीं हवींत. गीताईंतील श्लोकांचा अनेक तऱ्हेनें तौलनिक अभ्यास मांडावयास हवा. गीतेप्रमाणें च गीताईचें हि उत्तम तऱ्हेनें चिंतन, मनन, पठन, भाष्यादि लेखन व्हावयास पाहिजे. कारण शेंकडों ग्रंथांच्या वाचनानें जे मिळावयाचें नाहीं ते अशा एका च ग्रंथाच्या अभ्यासानें लाभतें. हा एक च ग्रंथ महाराष्ट्रांत ब्रह्मविद्येचा सुकाळ करण्याला पूर्ण समर्थ ठरेल. या एका च ग्रंथांत सर्व प्रस्थानें समाविष्ट झालीं. उपनिषदें गीता व ब्रह्मसूत्रें तीन प्रस्थानें मिळून प्रस्थानत्रयी होते. संतांनीं एकट्या गीतेंत च सर्व प्रस्थानत्रयीचा भाव परिपूर्ण तऱ्हेनें अनुभविला. निरनिराळ्या आचार्यांनीं प्रस्थानत्रयीवर भाष्य लिहिलीं. परंतु संतांनीं एकनिष्ठपणें गीतेचा च गौरव केला. याचें कारण हें च.

संतांप्रमाणें च आचार्यांचा अनुभव असल्याकारणानें त्यांनी आपलें सर्व लक्ष गीताईवर केंद्रित केलें. सर्व वेदवेदांत, महाभारतादि, जीवनेतिहास, योग-शास्त्र आणि ब्रह्मविद्येचे सर्व सिद्धांत या लहानशा ग्रंथांत साररूपानें उतरलेले असल्यामुळें या ग्रंथाचा अंतर्बाह्य प्रत्येक बाबीची आचार्यांनी सूक्ष्म छाननी करून कोठें हि ढिलेपणा राहूं दिला नाहीं. गीतेवर लिहिणें ही केवढी जबाबदारी हें जणूं त्यावरून समजून येतें. गीताईंतील प्रत्येक कानामात्रा, अनुस्वार, वेलांटी हि बरोबर आहे अशी त्यांनी खात्री करून घेतली. गीताईमध्यें कोठें हि अनिश्चितता आणि धरसोड ठेवली नाहीं.

(१) संस्कृत ऱ्हस्वांत शब्द ऱ्हस्व च यावयाचे.
(२) हि हें अव्यय नेहमीं ऱ्हस्व
(३) ऊनि उनी उनी ऊनियां—एक अक्षर ऱ्हस्व तर दुसरें दीर्घ
(४) चि नेहमीं ऱ्हस्व

असे अनेक बाबींचें निश्चित धोरण गीताईप्रमाणें मराठीं भाषेंतल्या आतांपर्यंतच्या कोणत्या हि पद्यग्रंथांत दिसून येत नाहीं. मोरोपंत आणि ज्ञानदेव यांचा भाषाशुद्धीबद्दल कटाक्ष आहे. पण गीताईची शुद्धता त्यांच्यापेक्षा किती तरी पट अधिक आहे. गीताईची भाषाशुद्धि दाखवावयाची तर गीताईचें संपूर्ण शास्त्रशुद्ध, सूत्रबद्ध व्याकरण च द्यावें लागेल. केवळ अनुनासिक परिगणनेची

(१) अनुनासिक विभक्त्यांच्या अनेकवचनी प्रत्ययांपूर्वी
(२) प्रथमा व सप्तमी ई, आं प्रत्यय हा अपवाद
(३) नपुंसकलिंगाच्या सविकार प्रथमा अनेक वचनांतावर
(४) नपुंसकलिंग प्रथमा एकवचन ‘इ, उ, ए’ कारांत शब्दांतावर
(५) तृतीया दोन्ही वचनीं सर्व प्रत्ययांवर
(६) सप्तमी ‘त’ खेरीज सर्व प्रत्ययांवर
(७) द्वितीया-चतुर्थी दोन्ही वचनीं ‘तें’ प्रत्ययांवर

अनुक्रमणिका

(८)द्वितीया-चतुर्थी अनेक वचनीं ‘नां’ प्रत्ययांवर
(९) वर्तमान-भूत तिन्ही लिंगीं दोन्ही वचनीं प्रथम पुरुषांच्या प्रत्ययांवर
(१०) ‘ए’ ‘ई’ आज्ञार्थी प्रत्ययांवर
(११) ऊं, तां, उनीयां, ऊनियां, कृदंतावर
(१२) भावे क्रियापदरूपांतावर
(१३) ओंव, खेंच, गांठ, धांव, वेंच, कांप—या धातूच्या सुरुवातीच्या स्वरांवर
(१४) हांक, नांव, झांपड, शेंवट, लेंकरुं—या नामाच्या सुरुवातीच्या स्वरांवर
(१५) पांच ह्या संख्यावाचकाच्या सुरुवातीच्या स्वरांवर
(१६) ‘कांहीं’ या सर्वनामाच्या (अगर विशेषणाच्या) सुरुवातीच्या स्वरांवर

(१७) जेव्हां, तेव्हां, कीं, मधें, पुढें, मागें, खालीं, मुळें, मुळीं, तों, आधीं, पाशीं, येथें, इथें, जिथें, जेथें, तिथें, तेथें, कुठें, विषीं, कधीं, बरें, आतां, जणूं, पूर्वी, पुन्हां, शेवटीं, तत्त्वतां, स्वयें, स्वतां, साठीं, हळूं, सवें, स्वभावतां—या अव्ययांतावर

(१८) चहूं तद्धितांतावर
(१९) मीं, आम्हीं, तुम्हीं, कोणीं, ह्या सर्वनामांतावर कर्मणिसाठीं
(२०) नाहीं क्रियापदांतावर
(२१) तूं सर्वनामांवर

अशीं एकवीस सूत्रें तयार होतील. आणि खरोखर च अशा ग्रंथाधारें केलेला व्याकरणादि शास्त्रांचा अभ्यास हा च खरा अभ्यास ठरेल.

केवळ शास्त्र शिकावयाचें म्हणून शास्त्र शिकणें वेगळें आणि त्या शास्त्राद्वारें ब्रह्मविद्या, भक्ति, अध्यात्म आणि नीति यांचा परिपोष करणारा ग्रंथ अभ्यासावयाचा ही गोष्ट वेगळी. गुरुत्वमध्याला सोडून गेलेली वस्तु निराधार आणि अगतिक होते. तेथें स्वैरता येते. मग अलंकारशास्त्र अलंकाराच्या मिषानें विषयलोलुपतेंत शिरतें, अर्थशास्त्र कामशास्त्राला अनुसरुं लागतें, व्याकरण शास्त्राला ‘नृपः नृपौ नृपाः’ असा राजनिष्ठेचा विकार जडतो. तें रामः रामौ रामाः या रामभक्तींत रमेनासें होतें. साहित्यशास्त्र हांजी हांजी करून केवळ भोगविलासाचें साहित्य निर्माण करतें. न्यायशास्त्रांत ईश्वर नाहीं असा अन्यायीं सिद्धांत दाखल होतो. गणितशास्त्रांत दारूचीं गणितें दाखल होतात, गौळण दुधांत पाण्याची भेसळ करते, त्याचे प्रमाण काढा. असली चोरी तेथें बिनदिक्कत शिकविली जाते. असे अनेक अनर्थ निर्माण होतात. परमार्थ सुटला कीं सर्व शास्त्रार्थ व्यथ होतो. प्राण गेला कीं सर्व कुडी किड्यांनीं बुजबुजून जाते. पोपट गेला कीं पिंजरा व्यर्थ. सदाचार गेला कीं घर स्मशान. पाणी आटलें कीं नदीची शोभा राहात नाहीं. आईशिवाय मूल अनाथ ठरतें. म्यान किती ही सुंदर असो शस्त्राशिवाय तें निरुपयोगी. सर्व शास्त्रांची अशीच स्थिति आहे. तीं परमार्थाच्या मर्यादेंत राहतील तर त्यांना अमर्याद सामर्थ्य आहे. परमार्थाच्या आश्रयानें च त्यांना किंमत आहे. अंकाशिवाय शून्याला काय किंमत? शून्यें वाटेल तितकीं वाढवलीं तरी त्यांना कांहीं च किंमत नाहीं. ज्याप्रमाणें मातेच्या सहवासांत मुलगा सहजपणानें अनेक तऱ्हेचें शिक्षण घेऊन आपला विकास करतो. त्याप्रमाणें गीतेच्या सहवासांत अनेक शास्त्रांचा विकास होऊं शकतो. आणि ज्यानें त्या गीतामाउलीचे चरण दृढ धरले त्याला ती सर्व शास्त्रांतली दृष्टि हि सहज देते. सर्व शास्त्रांच्या तपशीलाचा छेद करून, सर्व शास्त्रांचें सार, सर्व शास्त्रांचा आत्मा, कार्यकारणाच्या शृंखलेपलीकडे असलेल्या त्या कारणाचें हि कारण ती दाखवून

अनुक्रमणिका

देते. आपल्या एकनिष्ठ बालकासाठीं गीताई कोणत्या हि तऱ्हेचें उणें भासूं देत नाहीं. तिच्या ममतेला सीमा च नाहीं. आपल्या बालकांचे सर्व कौडकौतुक ती पुरवते.

**असो मोठा दुराचारी भजे मज अनन्य जो**
**मानावा तो जसा साधु त्याचा सुंदर निश्चय ॥**

दुराचाऱ्यांतला दुराचारी हि असो, तो अनन्यभावानें तिच्याकडे गेल्यावर ती त्याचे अश्रू पुशील. त्याचा कलंक धुवून काढील. त्याला श्रेष्ठ साधुपदवीला नेऊन पोंचविल.

**धरुनि आसरा माझा भोळे स्त्रीवैश्यशूद्र हि ।**
**कीं पापयोनि जे जीव ते हि मोक्षास पावती ॥**

सामान्य स्त्रियांना घरांतलें काम करून वेळ असा फार थोडा राहतो. परंतु अशी अगदीं एखादी भोळी स्त्री कां असेना ती अल्प काळ जरी गीताईच्या पायाशीं जाऊन बसेल, तिचा आसरा घेईल, तर मोठमोठ्या पंडितांना जो लाभ व्हावयाचा नाहीं, तो तिला गीताई सहज करून देईल. ती च गोष्ट व्यापाऱ्यांची. ती च गोष्ट शूद्रांची. उद्योगाच्या अनेक उलाढालींत वेळ नाहीं, मजूरीच्या सतत कष्टांत वेळ नाहीं. ब्रह्मविद्येच्या संस्काराचा स्पर्श होत नाहीं, सगळी शक्ति बहिर्मुख, जगाच्या व्यवहारांत खर्च होत आहे. तरी हि अल्पसें लक्ष जरी गीताईच्या चरणीं लागलें तरी ती माउली ह्या अल्प लक्षाचें महान् रूपांतर करील. सकलवेद—वेदांताचें रहस्य ती पुढें मांडील. कालसाधन अल्प असलेले स्त्री-वैश्यशूद्र असोत कीं बुद्धिसाधन अल्प असलेले पापयोनि पशुवृक्ष जड असोत. गीताईच्या अनन्यतेमुळें त्यांची कालशक्तीची, बुद्धिशक्तीची, पूर्वाचारभ्रष्टतेची कोणती च उणीव शिल्लक राहणार नाहीं. सर्व तऱ्हेचा कमीपणा, सर्व तऱ्हेची उणीव ही गीताईकडे जोंपर्यंत गेलीं नाहीं, तोंपर्यंत च. तेथें गेल्यावर कोणती च उणीव भासावयाची नाहीं. तोंपर्यंत च नदीला आटून जावयाची भीति. जोंपर्यंत समुद्राचा स्पर्श झाला नाहीं तोंपर्यंत च चोरांपासून लुबाडलें जाण्याची भीति. जोपर्यंत नगराचा प्रांत लागला नाहीं तोंपर्यंत च अंधारांत चांचपडण्याची भीति, जोंपर्यंत सूर्योदय झाला नाहीं. गीताईच्या पादपद्माचा एकदां एकनिष्ठपणें आश्रय केल्यावर कोणती च उणीव राहावयाची नाहीं. इतकें च काय पण ती दयाळू माउली आपलें सकल ऐश्वर्य आपल्या मुलांपुढें ठेवील. खरोखर आईला स्वतःला कांहीं च नको असतें. आईचें सर्व कांहीं मुलांसाठीं. तिचें खाणें, पिणें, बसणें, उठणें सर्व कांहीं मुलांसाठीं च. तिच्या दिनक्रमांत अनेक भिन्न भिन्न व्यापार दिसोत. पण आपल्या बालकांच्या कल्याणेच्छेनें च ती तें तें व्यापार करते. नदीच्या ठिकाणीं अनेक देखावे दिसतात. कधीं तिच्या पाण्यांत लाटा उसळल्या आहेत, कधीं ती पर्वतावरून उडी घेत आहे. कधीं तिच्या पाण्यांत दुधासारखा सर्वत्र च फेंस दिसत आहे. कधीं ती अगदीं संथ वाहात आहे. आणि त्या आरशांत वृक्षवनस्पति आपलें प्रतिबिंब पहात आहेत. कधीं तिची विलक्षण खळबळ चाललेली आहे, असे अनेक प्रकार तिच्या ठिकाणीं दिसतात. पण कांहीं झालें तरी नदी ती नदी च. तिच्या ठिकाणीं एक च करुणेची धार वाहात असते. त्या रूपेरी स्वच्छ जीवनाशिवाय खरोखर तेथें दुसरें कांही च नसतें. त्याप्रमाणें गीताईच्या ठिकाणीं कोणत्या हि गोष्टी असोत, तिच्या ठिकाणीं केवढें हि मोठें तत्त्वज्ञान असो, तिचीं स्वरूपें अध्याया अध्यायाला कशीं हि भिन्न भिन्न दिसोत ती केवळ करुणामय माउली आहे. ती दुःखतप्तांची केवळ सावली आहे, ती भ्रांत व त्यांची गाउली आहे ही च गोष्ट खरी! ती दीनाला भाग्यवान्, ती वांकड्याला सरळ, ती बुद्धिहीनाला बृहस्पति, ती दुःखिताला सुखी, सुखीजनाला आनंदी, आनंदी मनाला मुक्त, मुक्ताला भक्त, भक्ताला ज्ञानी, बद्धाला मुमुक्षु, मुमुक्षूला शुद्ध, शुद्धाला सिद्ध कोणाला कसकशी कोणकोणता आकार देते हें कोण सांगूं शकेल?

अनुक्रमणिका

**जगद्गुरुमहेश्वर प्रभुशिरीं जिचें नांदणें ।**
**जिच्या जळमळें तुळे न शरदिंदुचें चांदणें ॥**

शंकराच्या मस्तकांतील गंगेचा नुसता कचरा हि शरच्चंद्राच्या चांदण्याला फिकें पाडतो. ही गीताई माउली तर त्या जगद्गुरुच्या हि गुरुच्या—साक्षात् श्रीकृष्णाच्या मुखांतून निघालेली, तिच्या केवळ एखाद्या अक्षरापुढें सर्व वेदवेदांताचें ऐश्वर्य कां फिकें पडूं नये? तिच्या बालकांना काय कमी आहे? ती माउली प्रेमाची परमसीमा! ममतेची मूर्ति!! अज्ञानी—सकाम—दुर्बळ यांच्याबद्दल अनुकंपा, ज्ञानी—निष्काम—सबळ यांच्याबद्दल संतोष, प्रेमळ—भजनशील—भक्त यांच्याबद्दल प्रेम, सतत सत्कर्मांत निमग्न कर्मयोगी यांच्याबद्दल उत्साह, सतत यत्न करणारे योगी-यती-तडी-तापसी यांच्याबद्दल सहानुभूति—अशा अनेक बालकांच्या भिन्न भिन्न भावांप्रमाणें तिची ममता भिन्न भिन्न स्वरूपें धारण करते. परंतु हा 'माझा' आणि तो 'माझा' नव्हे. असें लौकिक ममतेचें स्वरूप तिला कधीं च प्राप्त होत नाहीं. तिची ममता अलौकिक आहे. ती ममता केवळ समतास्वरूप आहे. आणि हें च तिचें खरें स्वरूप आहे. साम्यांत च सकलैश्वर्य दडलेंलें आहे. तिच्या ठिकाणीं लौकिक ममतेचा स्पर्श नाहीं. कारण ती आसक्तीचा लवमात्र स्वीकार करीत नाहीं. आसक्ति तिला यत्किंचित हि खपत नाहीं. आपल्या बालकांना ती हा च स्वतःच्या ठिकाणचा अनासक्तियोग शिकविते. कर्म, ध्यान, ज्ञान, योग, यज्ञ, दान, तप, स्वाध्याय, सेवा, भक्ति—कोणता हि भाव घ्या. आसक्ति नको! आसक्ति नको!! आसक्ति नको!!! सर्वत्र तिचा हा च एक कळकळीचा सूर दिसून येईल. अनासक्तीचा अभ्यास करा आणि माझ्या स्वरूपीं मिळा. मी समस्वरूप आहे.

**सम मी सर्व भूतांस प्रियाप्रिय नसे मज ।**
**परी प्रेमबळें राहें भक्त माझ्यांत त्यांत मी ॥**

हा च तिचा संदेश आहे. विषमता आली कीं तोल गेला च. मनुष्य पडला. कायावाचामन, जागृति स्वप्न सुषुप्ति, भूत भविष्य वर्तमान—कोठें हि विषमता नको. शत्रु-मित्र, साधु-असाधु, जवळचा-दूरचा, सर्वत्र साम्याचा च अभ्यास व्हावा. हा साम्ययोगाचा अभ्यास घडेल तर माझीं मुलें कोणी कर्मयोगी होतील, कोणी सांख्ययोगी होतील, कोणी ध्यान-योगी होतील, कोणी त्रिगुणातीत—कोणी स्थितप्रज्ञ—कोणी भक्त होतील. हाच गीताई माउलीचा रात्रंदिवस ध्यास. लौकिक सामान्य आईला आपलीं मुलें भाग्यवंत, विद्यावंत, लक्ष्मीवंत, शक्तिमंत, सत्तावंत, कीर्तिमंत व्हावीं असें वाटतें. गीता या सर्व वस्तु तुच्छ समजते. त्या गौण आहेत. आनुषंगिक आहेत. त्यांच्याकडे लक्ष नको. मुख्य लक्ष अनासक्तियोग या साधनेकडे आणि समत्वयोग या साध्याकडे पाहिजे. या साध्यसाधनांतून स्थितप्रज्ञ—त्रिगुणातीत—भक्त ही थोर स्थिति आपल्या बालकांना सहज प्राप्त होईल अशी तिची वैभवशाली आणि अत्यंत उदात्त दृष्टि आहे. गीताई माउलीचें अवतरण करवून आचार्यांनी या दृष्टिची सृष्टि मराठी भाषेंत उतरवली. विरक्ति—अनासक्ति—भक्ति आणि समत्व अशी उत्तरोत्तर परिणति साधून आचार्यांनी बालपणापासून आपल्या ठिकाणीं गीताई माउलीचें ध्येय ठसविलें. त्यामुळें तो लौकिक परंतु खरोखर अलौकिक अशा आपल्या आईला व गीताई माउलीला हि सर्वांत अधिक प्रिय झाला. गीताई माउलीचें साधन त्यानें या प्रेमबळावर च सर्वांपुढें मांडलें. या साधनेनें पुढें दिल्याप्रमाणें आपणाबरोबर सर्वांनीं तिची च एकनिष्ठ उपासना करावी या पलीकडे आचार्यांना आतां कोणतें च कार्य उरलें नाहीं.

**अखंड कीर्तनें माझ्या यत्नशील दृढव्रती ।**
**भक्तीनें मज वंदूनि भजती नित्य जोडिले ॥**

अनुक्रमणिका

आचार्य या श्लोकाविषयीं म्हणतात—९/१४ हा श्लोक मला आमच्या आश्रमाचें बिरुदवाक्य वाटतो.

(१) कर्म-योग सातत्य
(२) अखंड हरिस्मरण
(३) व्रतनिश्चय
(४) नम्रता

●●●

अनुक्रमणिका

# प्रकरण ४४ वें

## मंदिरें आणि पाणवठे

(हृदयशुद्धीचीं दोन महाद्वारें)

**मोंकळेपणा** ही ईश्वराची नैसर्गिक देणगी आहे. तिच्याविरुद्ध वागून मनुष्य कोंडीमध्यें पडला कीं त्याची जीवनशक्ति क्षीण होऊन जाते. शहरामध्यें प्रकाश आणि ताज्या हवेच्या अभावीं जीवनशक्तीचा कोंडमारा होतो. कोंदट खोलींत किंवा कारागृहांतील अंधारकोठडींत तर मनुष्याची जीवनशक्ति अधिक च क्षीण होऊन जाते. आकाशाची व्यापकता, प्रकाशाचें तेज आणि हवेचें चैतन्य हीं तीन तत्त्वें म्हणजे आचार्यांच्या विचाराप्रमाणें सत् चित् आणि आनंद होय.

**हवेंत मोकळ्या भेटे सच्चिदानंद सर्वदा ।**
**आकाश सत् वायु चित् तेज आनंद ह्यापरी ॥**

अशी आचार्यांच्या विचाराची फोड असून, तो विचार पद्य बंधनानें लक्षांत ठेवण्यास उपयुक्त होतो. घरांत किती हि मोकळेपणा ठेवलेला असला, केवढें हि सुंदर घर तयार केलेंलें असलें,

**धरो ध्रुवश्च सोमश्च अहश्चैवानिलोऽनलः ।**
**प्रत्यूषश्च प्रभासश्च वसवोष्टौ प्रकीर्तिताः (महाभारत आदि. ६६-१८)**

या महाभारतांत आलेल्या श्लोकाप्रमाणें अष्ट वसूंचा म्हणजे वसतिस्थानाच्या देवतांचा

(१) स्वच्छ पाणी (आप)
(२) मोकळी हवा (अनिल)
(३) भरपूर प्रकाश (प्रभास)
(४) उषेचें दर्शन (प्रत्यूष)
(५) दिशासूचन (ध्रुव)
(६) चंद्रभोगी अंगण (सोम)
(७) टणक जमीन (घर)
(८) अग्निहोत्राची सोय (पावक)

—असा संपूर्ण विचार करून का घर बांधलेंलें असेना, तें घर हि संपूर्ण मोकळेपणाची थोडी फार कोंडी करतें च. म्हणून किती हि उत्तम घर असो, घराबाहेर दररोज फिरावयास गेलें च पाहिजे. त्याशिवाय मोकळेपणाचा लाभ होत नाहीं. तो च तो च देखावा, त्या च त्या च भिंती मनाला संकुचित करूं लागतात. बाहेर फिरल्यानें पाय मोकळे, मन मोकळें, डोळ्यांना नवीन दर्शन! अशी स्थिति होते. देवदर्शनाला जाऊन स्त्रिया हें च साधीत असतात. श्वासोच्छवासाच्या क्रियेनें मनुष्य हें च मोकळेंपण, हा च मुक्तीचा अनुभव बद्धत्तेंत राहून हि मिळवीत असतो. उच्छवासाच्या द्वारें मनुष्य आंतली संकुचितता बाहेर घालवून देतो आणि

श्वासाच्या द्वारें बाहेरची विशालता आपल्या अंतःकरणांत भरीत जातो. त्यामुळें च तो जगतो. या विशालतेवर, या ब्रह्मावर, या मोकळेपणावर, या युक्तीवर च मनुष्याचें जीवन नकळतपणें चाललेंलें आहे. आपली संकुचितता टाकून आपण विशाल व्हावें हा प्राणायामाचा हेतु आहे. छाती विशाल होणें हें मन विशाल होण्यासाठीं च. श्वासोच्छवास व्यवस्थित केला म्हणजे मनाची अशांति तत्क्षणीं दूर होते असा अनेकांचा अनुभव आहे. या च मोकळेपणासाठीं मनुष्य मित्रमंडळी जोडीत असतो. घरांत किती का प्रेमळ माणसें असेनांत, मनुष्याला मित्र केल्याशिवाय राहवत नाहीं. तीं च तीं च माणसें, त्यांचे ते च ते च व्यवहार, त्या च त्या च संवयी पाहून अप्रसन्नता वाटूं लागते, ती मित्राकडे गेल्यानें एकदम नष्ट होते. घटकाभर प्रेमसुखाच्या सहज संवादांत, हास्यविनोदांत मनावर आलेल्या औदासिन्याचे, संकुचिततेचें पटल तेव्हां च नष्ट होतें. पिठासारखें स्वच्छ चांदणें पडलें आहे, आणि मित्राबरोबर मनुष्य फिरावयास गेला आहे, अकृत्रिमपणें सहज जो विषय निघेल त्यावर बोलणें चाललें आहे, तर असा वेळ फुकट गेला असें म्हणतां येणार नाहीं. या वेळांत काय मिळविलें? या वेळांत मुक्तीचा आनंद मिळविला. लहानमुलें सुद्धां घरांत त्या च त्या च वातावरणांत राहूं इच्छित नाहींत. आईचें प्रेमामृत त्यांना अखंड मिळत असून हि तीं मुलें मला 'भूर' घेऊन जा असा हट्ट घेतल्याशिवाय राहावयाचीं नाहींत. रस्त्यांत जातां जातां हें काय? तें काय? ओहो ती गाडी चालली पहा. त्या झाडावर कशीं लाल फुलें आलीं आहेत, अशीं नवीन दर्शनानें त्यांची सच्चिदानंदमय दृष्टि होऊन जाते ती घरीं कोठून होणार! स्त्रियांच्या ठिकाणीं पुरुषापेक्षां स्वाभाविकपणें च किती तरी महनीय गुण प्रकट होत असतात. परंतु पुष्कळ वेळां त्यांच्यात आकुंचित भाव अनेक प्रकारानें दिसून येतो. याचें कारण त्यांची घरांत कोंडल्यासारखी झालेली स्थिति हें च होय. स्त्रियांना बाहेर फिरण्याची सवड असणे, मधून मधून सार्वजनिक कामांत भाग घेण्याची सवड असणें हें समाज दृष्टीनें व स्त्रियांच्या व्यक्ति दृष्टीनें एवढ्यासाठीं च उपयुक्त आहे. आपला देश सोडून प्रवासाला गेल्यानें नाना तीर्थें, वने, उपवने पाहिल्यानें, नाना पुण्यात्म्यांची, नाना प्रसंगाची गांठ पडल्यानें मनुष्य विशाल होऊन येतो. प्रवासांत मिळणाऱ्या अनेक प्रकारच्या माहितीच्या तपशीलाचें महत्त्व फारच गौण स्वरूपाचें आहे. प्रवासाचा खरा फायदा आत्मा उन्नत होतो, आत्मा विशाल होतो हा आहे. आपण एकट्यांत च कोंडून रहावें हें जीवाला आवडेनासें होतें. 'एकोऽहं बहुस्यां' ही त्याला ओढ लागते. काम शक्तीची प्रेरणा ही एक तऱ्हेनें मायेच्या विशालत्त्वासाठीं आहे. ब्रह्मचर्याचा खरा अर्थ न समजलेल्या एकट्या च एक संकुचित ब्रह्मचाऱ्यापेक्षां गृहस्थाश्रमांतल्या बहुविध मंडळींत एक प्रकारची मुक्ति—मोकळेपणा—दिसून येतो. पण तेथें हि कोंडी केली जाते आणि विषय विलासापलीकडे गृहस्थाश्रमाला अर्थ रहात नाहीं. म्हणून शक्य तो लवकर गृहस्थानें सार्वजनिक सेवेसाठीं वानप्रस्थाश्रमी होणें हें च कर्तव्य ठरतें. परंतु सार्वजनिक सेवा हा हि एक संसार होण्याचा संभव असतो. तेथें हि संकुचितता, तेथें हि रागद्वेष निर्माण होतात म्हणून वानप्रस्थाश्रमाचें संन्यास हें च सतत लक्ष असावयास पाहिजे. अशा मोकळेपणाच्या, मुक्तीच्या, विकासाच्या सर्वत्र योजना असावयास पाहिजेत. कोंकणांत घराच्या आगेंमागें भव्य स्वच्छ आंगणें आढळून येतात. देशावर तसे का नाहीं? कारण कोंकणांतल्या भयंकर पावसाळ्यांत घराबाहेर मोकळ्यांत राहणें अशक्य असतें. या चार महिन्याच्या संकोची वृत्तीचा दोष घालविण्यासाठीं इतर ऋतूंत मोकळ्या आंगणांत मांडवाखालीं वावरण्याची ही योजना आहे. संकोच, बंधन, कोंडी दूर करण्याच्या, विकास—मुक्ति—मोकळेपणा सतत मिळविण्याच्या योजना जितक्या असतील तितक्या त्या व्यक्ति आणि समाजजीवनाला हितप्रद ठरतात. त्यानें

**यत्र विश्वं भवत्येकनीडम्**

हें विश्व हें आम्हांला एक घरट्यासारखें आहे इतकी विशाल दृष्टि येते.

अनुक्रमणिका

परंतु, मोकळेपणा, विशालपणा, विकास म्हणजे स्वैरता मात्र नव्हे. तसें च संकोच, बंधन, कोंडी नको असली तरी प्रत्येक ठिकाणीं मर्यादा हि असावयास पाहिजे च. परंतु, मर्यादेच्या मूळ कल्पनेनें संकोचाची आणि विशालतेच्या मोकळेपणाच्या मूळ कल्पनेनें स्वैरतेची, अहंभावाची सर्व जगभर पकड बसलेली आहे. सामान्यतः आपल्या देशांत 'आचारः प्रथमो धर्मः' हा मर्यादायुक्त सिद्धांत प्राचीन काळापासून सर्वमान्य झाला होता. आपण स्वतः कधीं धर्माचें आचरण करूं. तें आचरण आपल्या रोमरोमांत भिनून गेलें कीं मग कोणाला न सांगतां सहज च त्याचा प्रचार होईल हा विचार अतिशय योग्य आणि मर्यादायुक्त होता, यांत शंका नाहीं. त्याचप्रमाणें आपल्या पूर्ण आचारापूर्वी हि धर्माचरणाचा कोणाला उपयोग होत असेल तर नम्रपणें त्याचा प्रचार हि करण्यास हरकत नाहीं. आपलें ज्ञान, आपली साधना आपल्याजवळ गुप्त च ठेवली पाहिजे हें बरोबर नाहीं. एकमेकां करूं साह्य अवघे धरूं सुपंथ. या न्यायानें आपली अपूर्णता प्रगट करून नम्रपणें दुसऱ्याला आपल्या साधनेचा फायदा होत असेल तर घेऊं देणें यांत कोणत्या हि तऱ्हेनें वावगें असें कांहीं च नाहीं. पहिल्या विचारांत स्वतःच्या आचारावर जोर आहे. दुसऱ्या विचारांत स्वबांधवाच्या मदतीवर जोर आहे. दोन्ही विचार परस्परविरुद्ध नसून अत्यंत योग्य आहेत. परंतु, प्रथम स्वतः आचार करूं मग इतरांना विचार सांगूं या पौर्वात्य कल्पनेचा अत्यंत विपर्यास होऊन आपलें ज्ञान, आपली साधना गुप्त ठेवण्यापर्यंत मजल गेली. आपल्या ज्ञानाला अमुक अधिकारी, तमुक अधिकारी असे अनेक प्रकारचे बंध घालण्यांत आले. त्यामुळे मूळचा विचार बाजूला राहून त्याचा विपर्यास म्हणजे गुप्तता, आंकुचितता, कोंडी आणि एक प्रकारची अस्पृश्यता ज्ञानाच्या बाबतींत निर्माण झाली. त्यामुळें धर्मसाधनादि आध्यात्मिक बाबी च काय पण सर्वसामान्य कला आणि शास्त्रें यांचा हि संकोच होत होत पूर्ण लोप होण्याची आपल्याकडे स्थिति निर्माण झाली. उत्तम गवयानें आपल्या अस्सल चिजा बारा वर्षें तनमन धनानें सेवा करणाऱ्या आपल्या शिष्याला हि सांगावयाच्या नाहींत, उत्तम मल्लाने आपले खास डावपेंच आपल्या एकनिष्ठ शिष्याला हि दाखवावयाचे नाहींत, उत्कृष्ट वैद्यानें अस्सल जड्याबुट्या मरेपर्यंत लपवून च ठेवावयाच्या अशी एक संकुचितपणाची परंपरा च निर्माण झाली. खरा धर्माचार, शास्त्रें आणि कला यांचा पौर्वात्य देशांत जो नम्र सद्विचार निर्माण झाला होता—आपली साधना पूर्ण झाली नसली तरी आपल्या बंधूला जर आपल्या साधनेचा उपयोग होत असेल तर ती साधना त्याच्यापुढें आपण होऊन हि मांडावयास हरकत नाहीं. या विचाराचा पाश्चात्य देशांत पूर्ण विपर्यास होऊन, व्यापकता, मोकळेपणा, परस्परसहकार्य निर्माण होण्याऐवजीं उलटी च स्थिति निर्माण झाली माझी साधना, माझें ज्ञान, माझें विचार नम्रपणें लोकांस द्यावयाचें हें धोरण सुटून मी सांगतो तें च खरे, तें लोकांनीं ऐकलें च पाहिजे. माझें म्हणणें मी लोकांना जबरदस्तीनें ऐकावयास लावीन च. प्रलोभन दाखवून किंवा पाशवी शक्तीच्या जोरावर आपले विचार, आपला धर्म, आपलें शास्त्र फैलावण्याचा प्रयत्न करावयाचा अशी स्थिति पाश्चात्यांत अतिशय जोरानें चालू आहे. पौर्वात्यांत विशेषतः हिंदुस्थानांत अस्पृश्यता निर्माण होण्याचें मूळ कारण नम्र आचरणाची मर्यादा जाऊन अहंकारी संकुचित वृत्ति निर्माण झाली हें आहे. पाश्चात्यांत बाटवाबाटवी, जबरदस्ती व हिंदुस्थानांत अस्पृश्यता हे दोन महादोष शिरून मर्यादा आणि मोकळेपणा यांचा जगांत मागमूस हि उरला नाहीं. हिंदुस्थानांत तर जीवनाची इतकी विलक्षण कोंडी झाली, ठिकठिकाणीं इतकी अस्पृश्यता निर्माण झाली कीं तिला कोणता च सुमार राहिला नाहीं. अस्पृश्यता निर्माण झाली ती झाली. पण तिला आणखी धर्मस्वरूप मिळालें!

**अधर्मं धर्ममिति या मन्यते तमसावृता ।**
**सर्वार्थान्विपरीतांश्च बुद्धिः सा पार्थ तामसी ॥**

अनुक्रमणिका

तामसी बुद्धीनें अस्पृश्यतारूपानें प्रत्येक ठिकाणीं आपला कबजा करून घेतला. वस्त्रामध्यें ज्याप्रमाणें सर्वत्र उभे आडवे धागे च दिसून येतात त्याप्रमाणें हिंदुस्थानांत सर्वत्र अस्पृश्यतेची सृष्टि निर्माण झाली. धर्म म्हणजे केवळ शिवाशिवी. याशिवाय धर्माची कल्पना च उरली नाहीं. पवित्रतेच्या नांवावर इतकी नीच वृत्ति निर्माण होऊं शकते यापेक्षां लाजिरवाणी गोष्ट कोणती असूं शकेल? यापेक्षां जीवनाचा कोंडमारा तो कोणता व्हावयाचा? भिंतीत चिणून मारण्याची भयंकर शिक्षा पूर्वीच्या काळांत दिली जात असे. ती मधून मधून एकट्या दुकट्या दुर्दैवी व्यक्तीच्या वांट्याला येत असे. हिंदुस्थानांत अस्पृश्यता रूपानें सबंध समाजच्या समाज भिंतींत चिणून मारण्याजोगी परिस्थिति निर्माण झाली. महात्माजींना एवढ्यासाठीं स्पर्शभावना अर्थात् अस्पृश्यता निवारण हें एक व्रत तयार करावें लागलें. बापूजी मंगळप्रभात किंवा व्रतविचारांत लिहितात— “अस्पृश्यता निवारण—आ व्रत पण अस्वादनी जेम नवुं छे अने कंईक विचित्र पण लागे. जेटलुं विचित्र छे तेना करता वधारे आवश्यक छे”

—या व्रतदृष्टीकडे आचार्यां इतके तीव्र लक्ष क्वचित् च कोणाचें असेल. आचार्यांचे याबाबत सतत विचारमंथन चालूं च असे. जमनालालजींची हि ही च स्थिति होती. त्यांच्या स्वतःच्या मालकीच्या अनेक विहिरी आणि त्यांच्या वडिलांनीं बांधलेलें भव्य लक्ष्मीनारायणाचें मंदिर होतें. स्पर्श भावनेला सुरुवात व्हावयाची ती मंदिरापासून च व्हावयास पाहिजे. मंदिर ही ईश्वरोपासनेची जागा. तेथें कोणती हि विषमता उपयोगी नाहीं. एक वेळ व्यवहारांत विषमता कल्पितां येईल—यद्यपि ती हि सर्वथैव अयोग्य च होय—पण मंदिरांत विषमता कल्पिणें म्हणजे ईश्वराच्या नांवावर केलेला ईश्वराचा भयंकर अपमान होय. अशीं अस्पृश्यांना बंदी असलेलीं मंदिरें किती हि सुंदर आणि पुरातन परंपरेची का असेनात.

**विप्रादिषड्गुणयुतादरविंदनाभ ।**
**पादारविंदविमुखात्श्वपचं वरिष्ठम् ॥**

या तत्त्वाप्रमाणें तीं मंदिरें अत्यंत कनिष्ट दर्जाची किंबहुना मंदिरें च नव्हती. उलटपक्षीं गांवाबाहेर काढून दिलेल्या अस्पृश्य वस्तींतलीं घरें हीं च सेवेचीं खरीं मंदिरें होत. मंदिर हें समाज हृदयाचें महाद्वार आहे. या द्वारांतून सर्व समाजाचें ईश्वरासमोर भक्तरूपानें दर्शन झालें पाहिजे. ती च गोष्ट पाणवठ्यांची आहे. पाणी हें प्राणिमात्राला कोणाला कोठें हि घेतां आलें पाहिजे. पाणवठ्यावर स्वच्छता पाहिजे, तेथें कोणी पाणी बिघडवितां कामा नये. परंतु तेथें अमुक जातीचा म्हणून पाणी मिळत नाहीं, विहिरीला शिवतां येत नाहीं—ही बंदी—हा महान् अपराध आहे. आकाशाला बंदी, प्रकाशाला बंदी, अग्नीला बंदी, हवेला बंदी तशी च पाण्याला बंदी ही गोष्ट हस्यास्पद आहे. खासगी विहिरीवर हि जातीच्या कारणानें बंदी असूं नये. मंदिरें आणि पाणवठे हे समाज हृदयाचे एकीकरणाचे दोन दरवाजे आहेत. मंदिरांत भक्तिमय जीवनासाठीं सर्व भेदभाव विसरून एकत्र यावयाचें, पाण्यावर—जलरूपानें मिळणाऱ्या ईश्वराच्या कृपेच्या लाभासाठीं एकत्र जमावयाचे अशी सर्वत्र मोकळी दृष्टि असावयास पाहिजे. या दृष्टीची चळवळ आचार्यांच्या प्रचारकांनीं वर्धा तालुक्यांत अतिशय वेगानें सुरू केली. गीताई माउली मराठींत अवतरल्यावर तिच्या समतेचा ममत्वपूर्ण संदेश च जणूं काय या चळवळीच्या रूपानें आजूबाजूला पसरला. एक प्रकारें या चळवळीचें सूतोवाच तीन वर्षांपूर्वी च होऊन गेलेंलें होतें. जमनालालजींनीं आचार्यांच्या प्रेरणेनें आपलें लक्ष्मीनारायणाचें प्रसिद्ध आणि प्रशस्त मंदिर १९२८ सालीं उघडून सर्व हिंदुस्थानांत अस्पृश्यांसाठीं मंदिरें मोकळीं करण्याचें प्रथम उदाहरण घालून दिलें होतें. हें मंदिर मोकळें केलें त्या दिवशीं म्हणजे २०-७-१९२८ रोजीं सायंकाळीं आचार्यांचें एतद्विषयक अत्यंत कळकळीचें आणि मर्मस्पर्शी भाषण झालें होतें. त्या अस्पृश्यांना मोकळ्या केलेल्या मंदिरांत आचार्यांना साक्षात् नारायणाचें दर्शन होऊन त्यांना भावावस्थेंतली सद्गदित स्थिति प्राप्त

झाली. क्षणभर त्यांची केवळ समाधिमग्न अवस्था होऊन गेली. कलकत्त्याच्या काली मातेच्या मंदिरांत भक्तिभावाने बेभान होऊन गेलेले रामकृष्ण परमहंस च जणूं काय आचार्यरूपानें या मंदिरांत देवासमोर उभे राहून अश्रू ढाळीत आहेत असाच तो विलक्षण देखावा होता. समोर देवाची शोभिवंत मूर्ति, एका बाजूला भजनाची झुम्मड, अस्पृश्य बंधु देवदर्शनाला आलेले, भिंतीवर चैतन्य आणि रामकृष्णांचीं भव्य भक्तिमय आणि ध्यानमग्न चित्रें लटकलेलीं, वरती हंड्या, झुंबरें, देवाच्या बाजूला मोठमोठे बिलोरी आरसे, खालची जमीन आरसपानी, देवाच्या गळ्यांतील पुष्पमाळांचा सुवास सर्वत्र दरवळलेला—अशा त्या मंदिरांत एका दरवाजांत जमनालालजी शुभ्र खादी परिधान करून टोपी सदरा घालून उभे आहेत, दुसऱ्या दरवाजासमोर केवळ उपरणें पांघरलेले, पंचा नेसलेले, छातीवर हात ठेवलेले देवाकडे निरखून पाहणारे आचार्य उभे आहेत. त्यांना आजूबाजूचें कांहीं च दिसत नाहीं. देवाच्या मूर्तीशीं ते अगदीं समरसून गेले आहेत. हा देखावा—क्षणभर च टिकलेला हा देखावा—खरोखर च अतिशय अद्‌भूत देखावा होता यांत संशय नाहीं. हें स्वप्न तर नाहीं? असा संशय उत्पन्न करील इतकें त्या दृश्याचें दैवी स्वरूप होतें. आजपर्यंत त्या मंदिरांत अनेक प्रकारें षोडषोपचारपूजा झाली असेल, तेथें अनेकांची विद्वत्तापूर्ण प्रवचनें झालीं असतील, तेथें अनेक महोत्सव होत असतील, तेथें अनेक प्रसंगी अनेक प्रकारें शोभिवंत सौंदर्यरचना केली जात असेल, परंतु, या अपूर्व दृश्याला कशाची हि सर येणें शक्य नव्हतें. कोणता हि प्रसंग या दृश्याची बरोबरी करूं शकत नव्हता. हा केवळ एक अपूर्व योगायोग होता. पुढील ३ वर्षानंतर होणाऱ्या चळवळीची ही एक प्रकारें मुहूर्तमेढ च होती.

तथापि अस्पृश्यांसकट सर्वांना खुलें झालेंलें हें मंदिर आणि आतां १९३१-३२ मध्यें सुरू झालेली ही चळवळ यांचा तसा कोणताच संबंध नव्हता. १९३१ मार्चला गांधीइर्विन पॅक्टमध्यें आश्रमप्रचारक सुटून ग्रामपर्यटनाच्या आपल्या मूळ क्षेत्रांत पुन्हां दाखल झाले होते. तालुक्यांत चळवळ उभारण्याचा अनुभव, शिंदीचीं झाडें तोडण्याच्या निमित्तानें आश्रमप्रचारकांना भरपूर मिळालेला होता. आश्रमप्रचारकांनीं तालुक्यांत फिरून पूर्वीं च भूमिका तयार करून ठेवली होती. सुरूंग तयार झाला आतां फक्त बत्ती च लावावयाची अशी ही तालुक्यांतली स्थिति होती. चळवळ उभारण्यांत अतिशय कुशल असे कार्यकर्ते गोपाळराव वाळूंजकर यांनीं च या चळवळींचें आश्रमतर्फे अग्रेसरत्व घेतलें होतें. १९३१ मार्च मध्यें जेलमधून सुटल्यानंतर ते महिनाभर खेड्यांत पूर्वीप्रमाणें फिरले होते. जूनच्या सुमाराला ते या तालुक्यांतील वर्धा नदीकाठच्या रोहिणी या गावीं गेले होते. तेथील नामदेवराव मानकर नावाच्या पाटलांशीं बोलतां बोलतां त्यांचें देऊळ हरिजनांना मोकळे करण्यास ते तयार असल्याचें त्यांनीं सांगितलें. नंतर त्याच गांवांतलें फार मोठे पाटील तुकाराम वसू हि या गोष्टीला कबूल झाले. या चळवळीची सुरुवात किंवा तत्कालिक मूळ हें च होय. यानंतर या तालुक्यांतील नागझरी गांवचे खंडेराव जाधव, त्यानंतर देवळी गांवचे गोल्लर हे हि आपल्या विहिरी व देवळें मोकळीं करण्यास तयार झाले. हीं सर्व बोलणीं मुख्य केंद्रस्थानीं आल्यावर वाळुंजकरजी आचार्यांपुढें मांडीत असत व आचार्यांकडून तत्संबंधीं मार्गदर्शन प्राप्त करून घेत असत. अशा तऱ्हेनें विचार विनिमयाचें आणि तालक्यांतील अनेकांच्या विहिरी व देवळे उघडण्याच्या संकल्पाचें एकीकरण पावसाळ्यापर्यंत अनेक प्रकारें चालूं च होतें. पावसाळा संपला. आकाश निरभ्र झालें. नदीनाल्यांचें पाणी ओसरून निर्मळ झालें. खेडेगांवातल्या प्रचारकांचे सर्व रस्ते खुले झाले. जिकडे तिकडे रमणीयता आणि निर्मळता दिसूं लागली. हवेंतला सर्दावा सरून प्रारंभीच्या थंडीचा गोड वारा वाहूं लागला. शेतें डुलूं लागलीं. शेतकरी खुलूं लागले. ताजेपण फुलूं लागला. पाऊस उत्तम झाल्यानें.

**उदंड जाहलें पाणी स्नानसंध्या करावया ।**

अनुक्रमणिका

असे उद्‌गार साधुहृदयांतून सहज च निघावें अशी परिस्थिती निर्माण झाली. पण अस्पृश्यांना उदंड पाणी कोठें होतें? त्यांना स्नानसंध्येंसाठीं, प्रार्थनेसाठीं कोणत्या मंदिरात परवानगी होती?—परंतु या अस्पृश्यांवरच्या अन्यायाचें परिमार्जन करणारी मंडळी येथे त्या च खटपटींत होती. पाऊस पडून ज्याप्रमाणें सृष्टीमधल्या सर्व मलाचें परिमार्जन होतें, त्याप्रमाणें जनसमाजाच्या दृष्टींमध्यें असलेल्या विषमतारूपमलाचें परिमार्जन कसें होईल ही च चिंता ही मंडळी करीत होती. या चिंतेचे योजनेत—योजनेचे प्रत्यक्ष प्रारंभांत आणि प्रारंभाचे मोठ्या चळवळींत एकदम रूपांतर झालें.

वर्ध्याजवळील नानासाहेब खऱ्यांची विहीर प्रथम हरिजनांसाठीं मोकळी झाली. हरिजनांनीं पाणी काढलें. जमलेल्या मंडळींचा हरिजनांसकट फोटो काढण्यांत आला. यानंतर देवळीचे राष्ट्रप्रेमी भिक्षुक यज्ञेश्वर भागवत यांच्या जुन्या पोथ्यांतून कूपोत्सर्गविधी काढण्यांत आला. आचार्यांनी त्या विधीला मान्यता दिली. यापुढें नुसतें हरिजनांनीं पाणी काढून विहीर मोकळी करण्याऐवजीं हा विधी करून; गंधफुलांनीं पूजा करून, प्रसाद वाटून "सकललोकस्नानपानार्थं कूपोत्सर्गविधिं करिष्ये" असा संकल्प सोडून, हरिजनांनीं व इतरांनीं पाणी काढून विहिरी मोकळ्या करण्याचा शिरस्ता पाडण्यांत आला. त्यामुळें विहिरी मंगलविधीनें शुद्ध केल्या जात आहेत, संकुचितपणाचें डबकें बनलेल्या विहिरींत आतां विशालतेची गंगा झऱ्याच्या रूपानें प्रवेश करीत आहे अशी भावना उद्‌भूत झाली. यानंतर देवळी या प्रमुख गांवीं एकदम १० विहिरी, नागझरी येथें १०-१२ विहिरी व एक देऊळ उघडलें. नंतर रोहिणीला दोन देवळें आणि एक विहीर उघडली. या पुढें पुलगावच्या जीनमधील जमनालालजींची विहीर उघडली. या सर्व कार्यक्रमाला फक्त तीन दिवस लागले. शिंदीचीं झाडें तोडण्याचें काम श्रमाचें होतें. या कार्यक्रमांत तसा कांहीं च प्रकार नव्हता. येथें फक्त हृदयपरिवर्तनाची आवश्यकता होती. प्रकाश आला कीं हजारों वर्षांचा कां अंधार असेना तो क्षणांत नष्ट होतो. तसें च या ठिकाणीं असे. येथें श्रमाचें मुळीं च काम नव्हतें; असें नाहीं. हृदयपरिवर्तन करण्यासाठीं, मतपरिवतनासाठीं, जुनी रूढी तोडून नवीन दिशेनें पाऊल टाकण्यासाठीं वाळूंजकरप्रभृती आश्रमप्रचारकांना अनेक प्रकारें परिश्रम करावा लागला. खुद्द जमनालालजी मुद्दाम या प्रारंभीच्या कार्यक्रमाला जातीनें हजर होते. यानंतर वर्ध्याजवळील चितोडा या लहानशा गांवीं १ देऊळ आणि १०/१५ विहिरी उघडल्या गेल्या. आचार्यांच्या हस्तें च हा कार्यक्रम झाला. त्याचे फोटो घेतले गेले. यापुढें ही चळवळ जोरांत वाढत चालली. आचार्यांचा सल्ला घेऊन हें कार्य वेगानें पुढें चाललें होतें. नागठाणें, जुबाडी, आर्वी, रोहणा, सेलसुरा, सालोड हिरापूर असा गावोंगांवीं हा कार्यक्रम वाढत च चालला. त्यांत एक मौज निर्माण होई. गांवांत एके ठिकाणीं कार्यक्रम झाल्यानंतर पूर्वी ठरलें नसतां ही कार्यक्रमांतील धार्मिक विधि, गांवच्या लोकांचा जमाव, प्रसादादि प्रकार, व्याख्यानश्रवण या सर्वांचा प्रभाव पडून अगदीं प्रतिगामी मताचे लोक ही एकाएकी आपल्या विहिरी उघडण्याला तयार होऊन जात. याच्या उलट एक दोन प्रसंगी कांहीं लोकांनीं कार्यक्रम चालू असतां मध्यें च वाद उपस्थित केला होता. सोनेगाव आबाजी या गांवीं एक निराळा च प्रसंग उद्‌भवला. तो या गांवांतल्या प्रख्यात मंदिरांतील यात्रेचा प्रसंग होता. आश्रमीय मंडळी या गांवीं अनेक वेळां गेली होती. त्यांनीं व्याख्यानद्वारा लोकांना हा विषय अनेक प्रकारें समजावून सांगितला होता. यात्रेच्या वेळीं हरिजनांना मंदिरांत दर्शनाला येऊं द्या नाहीं तर आम्ही ही हरिजनांप्रमाणें मंदिराबाहेर च राहूं अशा तऱ्हेचें मंडळींचें म्हणणें होतें. या गांवाजवळच्या नागझरी गांवचे विद्यार्थी हातांत लाठ्या, कृत्रिम भाले वगैरे घेऊन कवायती पोषाख घालून देवळाजवळ आले. नागझरीच्या विद्यार्थ्यांचें हें कसरती पथक नेहमींचें च होतें. परंतु मंदिरासमोर या पथकाला पाहिल्याबरोबर देवळांतील व्यवस्थापक मंडळींना वाटलें कीं हरिजनांना घेऊन आतां हीं मंडळी जबरदस्तीनें देवळांत शिरतील म्हणून त्यांनीं हजारो लोकांना बाहेर तिष्ठत ठेवून देवळाचीं दारें बंद केलीं. आंत बायामाणसांत रडारड सुरू झाली. भरयात्रेंत देवळाचा दरवाजा बंद केल्याचा प्रसंग हा पहिला च होता. त्यामुळें सर्व जिल्हाभर या गोष्टीनें खळबळ उडवून दिली. आणि या

चळवळीकडे सर्वांचें लक्ष वेधलें. कित्येक गांवीं विहिरी व देवळें उघडण्याची सर्व प्रकारची सिद्धता असून ही गांवचे हरिजन समारंभाचे वेळीं विहिरीवर पाणी भरण्यास किंवा देवळांत प्रवेश करण्यास तयार नसत. याचें कारण एक तर त्यांना विरोधी पक्षाकडून आंतून धमकी दिली जाई, की खबरदार तुम्ही या चळवळींत भाग घ्याल तर तुमचा भाकरीचा तुकडा व तुमचीं गांवचीं कामें ही बंद करूं. केवळ एक वेळ पाणी भरण्यानें एवढें नुकसान कोण करून घेणार? दुसरें अस्पृश्यांना च असें वाटे कीं, आपली जात खरोखर हीन आहे. आपण स्पृश्यांच्या विहिरीवर पाणी भरूं तर तो मोठा अपराध होईल. — या कारणामुळें ऐन वेळीं समारंभाचा विरस होऊं नये म्हणून आश्रमप्रचारकांना अशा समारंभाच्या वेळीं बरोबर खास हरिजन घेऊन जावे लागत. व गांवचे हरिजन नाहींत तर निदान या हरिजनांकरवीं तरी पाणी काढवून समारंभ पुरा करावा लागे. अशी ही चळवळ ता. २०-१९३२ जानेवारीपर्यंत म्हणजे सुमारें २॥ ते ३ महिनेपर्यंत चालली व एकूण ४३ देवळें व सुमारें ३०० विहिरी वर्धा तालुक्यांत उघडल्या गेल्या. बापूजींच्या १९३३ च्या हरिजनांसाठीं केलेल्या प्रसिद्ध उपवासापूर्वी या तालुक्यांत ४३ देवळें व ३०० बिहिरी उघडल्या गेल्या ही गोष्ट सबंध हिंदुस्थानांत कोठें हि न घडलेली अशी जवळ जवळ असामान्य च होती, यांत शंका नाहीं. परंतु या गोष्टींचा जिल्ह्याबाहेर कोठें गाजावाजा करण्यांत आला नाहीं. ही अद्‌भूत गोष्ट आचार्यांच्यातर्फे प्रचाराच्या ओघांत आपोआप घडली. आचार्यांच्या तपःप्रभावाच्या स्वाभाविक परिणामानें ही गोष्ट घडून आली. आचार्यांची अस्पृश्यांबाबतची संवेदनात्मक भावना पराकोटीला गेलेली होती. बापूंच्या पुण्याच्या हरिजनांप्रित्यर्थ केलेल्या उपवासानंतर तर त्यानें प्रत्यक्ष हरिजनवस्तींत च निवास केला. बापूंच्या उपवासानंतर हि पुन्हां या चळवळीला या तालुक्यांत जोर आला होता. परंतु त्या वेळीं सबंध हिंदुस्थानचें वातावरण पालटलेलें होतें. बापूंच्या अद्‌भूत बलिदानाचा तो परिणाम होता. असें कोणतें हि वातावरण नसतांना स्वतंत्र तऱ्हेनें वर्धा तालुक्यांत ही चळवळ उभारली गेली यांत आचार्य आणि त्याच्या आश्रमवासियांच्या प्रचाराचें खरें चीज झालें असें च म्हणावें लागेल. या चळवळीनें आणखी एक गोष्ट केली. ती म्हणजे पुढील सत्याग्रहाच्या चळवळीचें बीजारोपण. पुढें १९३२ सालीं सरकारनें लादलेल्या चळवळींत हि वर्धा तालुका सर्व हिंदुस्थानांत जवळ जवळ अग्रेसर राहिला याचें कारण हि आश्रमप्रचारकांतर्फे आचार्यांकडून झालेली या तालुक्यांतील ही व या मागची चळवळ आणि आश्रमप्रचारकांचा ग्रामसंचार हेंच होय. तालुक्यांतील समाजहृदयाची आश्रमप्रचारकांच्या द्वारें आचार्यांनी प्रथम ओळख करून घेतली. तदनंतर १९३० च्या चळवळींत त्यांनी समाजाला तकली उपासना शिकविली. त्यापुढें शिंदीचीं झाडें तोडण्याचा चळवळीच्या द्वारें त्यांनी व्यसननिवृत्तिचा संदेश दिला. लगे च प्रचड जंगलसत्याग्रहाच्या द्वारें समाजाला अन्यायी सरकारच्या प्रतिकाराचें शिक्षण आश्रमप्रचारकांतर्फे आचार्यांकडून देण्यांत आलें. त्यापुढें समाजाच्या हृदयशुद्धीचीं दोन द्वारें मंदिरें व पाणवठे सर्वांना मोकळे करून आचार्यानें समाजांतील संकुचिततेचा, क्षालनाचा मार्ग दाखविला. अवघ्या दोन वर्षांत आचार्यांनी वर्धा तालुक्यांतील ३०० गांवांत विलक्षण सेवा घडवून आणली. तो नसता तर निःसंशय आश्रमप्रचारकांना हें काम कधीं च सुचलें नसतें, व त्यांच्याकडून तें योजनापूर्वक घडलें हि नसतें. आश्रमप्रचारक निमित्तमात्र होतें. आचार्य त्यांच्याकडून सर्व घडवून आणीत होते. बुद्धीबळांतली प्यादी निर्जीव. पण खेळणारा त्यांना हालवून त्या लहानशा पटावर रणांगणांतले डावपेंच निर्माण करीत असतो. हा सर्व त्या खेळणाराचा प्रभाव. वर्धा तालुक्यांतील क्षेत्रपटावर आचार्यांनी केवढे स्थित्यंतर केलें! आणि तें हि केवळ दोन वर्षांत!

आचार्यांनी भरीव राष्ट्रसेवेचा नमुना किंवा सांचा निर्माण करण्याचे काम चालविलें होतें. सांचा घडविल्यानंतर ज्यानें त्यानें त्यांत माती ओतून मूर्ति घडवून घ्यावी. राष्ट्रसेवेच्या अनेक अंगांचा सांचा घडवणें हें आचार्यांचें कार्य होतें तर राष्ट्रसेवेची अनेक अंगें निर्माण करून त्यांना सर्वव्यापी प्रसिद्धि देणें हें बापूजींचें काम होतें. बापूजींनीं स्पर्शभावना हें व्रत काढलें. त्याचा हिंदुस्थानांत काँग्रेसद्वारा पुष्कळ

अनुक्रमणिका

बोलबाला झाला. आचार्यांनी स्पर्शभावनेची देशभर कशी प्रस्थापना करावी त्याचा या तालुक्यांतील मंदिरें आणि पाणवठे उघडण्याच्या चळवळीच्या द्वारें मर्यादित क्षेत्रांतला एक लहानसा नमुना तयार केला. यानंतर ही चळवळ थांबली. आचार्यांना एका निमित्तानें निराळ्या च क्षेत्रांत जावें लागलें. तें जेलचें क्षेत्र होतें. तेथें महाराष्ट्रांतले बरे च कार्यकर्ते एकत्र आले होते. महाराष्ट्रांतल्या अगदीं एकीकडच्या दोन जिल्ह्यांतले—खानदेशांतले—कार्यकर्ते तर येथें फार मोठ्या प्रमाणांत जमा झाले होते. त्या सर्व कार्यकर्त्यांना आचार्यांच्या सहवासाचा लाभ प्राप्त होऊन एक विलक्षण दर्शन प्राप्त झालें. येथें जेल हा जेल राहिलाच नाहीं. येथे च गीताई माउलीचें प्रसिद्धीकरण झालें. त्या गीताईच्या दर्शनानें

**आनंदें सांडिली सीमा गीताई दर्शनामुळें ।**
**जाहली साच हि कारा शिकृरूप शिवालय ॥**

हा अनुभव रोमरोमांत रमून गेला. त्या अतिशय पावन कथेचें दालन पुढें च पहावयास हवें. हें दालन म्हणजे दिव्य स्वप्नाची खरी झालेली सत्यसृष्टि होती. येथें आचार्यांनी ज्ञान-कर्म-भक्तीचा एक नवा च स्वर्ग निर्माण केला होता. वरून वरून कारागृहांत राहणारे ते कार्यकर्ते आंतून त्या नव्या स्वर्गामध्यें केवळ तल्लीन होऊन गेले होते. चला आपण हा भूतकाळाचा विस्मृतीरूप पडदा दूर सारूं, त्या स्वर्गाचें ओझरतें दर्शन घेऊं आणि तेथें नसलों तरी वर्तमानकाळांत हि तेथें च असल्याचा अनुभव घेऊं.

●●●

अनुक्रमणिका

# प्रकरण ४५ वें

## धुळें-जेल

**राजवाडें** १९२७ सालीं एकाएकीं वारलें. अव्याहत परिश्रम, अखंड विरक्ती, प्रचंड अभ्यास—अशा अनेक थोर साधुगुणांचा समुच्च असलेले राजवाडें आचार्यांनी कधीं हि पाहिलेले नव्हते. परंतु त्यांच्या अंतःकरणाची ओळख त्यांचे लेख वाचून १६ व्या वर्षापासून च आचार्यांना पटलेली होती. त्यांच्या लेखांनीं आचार्यांना विलक्षण स्फूर्ती प्राप्त झाली. राजवाडें वारल्यानंतर आचार्यांनी महाराष्ट्र-धर्म साप्ताहिकांत त्यांच्या संबंधीं जो मृत्युलेख लिहिला त्यांत ही गोष्ट नमूद केली आहे. त्या राजवाड्यांच्या स्मारकानिमित्त उभारलेल्या संशोधनमंदिराच्या समारंभासाठीं आचार्यांना धुळें येथे बोलावण्यांत आलें. १९३२ चा हा जानेवारी महिना होता. वास्तविक राजवाडें हे धुळ्याचे नव्हते. त्यांचा जन्म आचार्यांच्या जन्मस्थानाजवळच्या तीन मैलावरील वरसई गांवचा. ते संशोधनानिमित्त अनेक ठिकाणीं फिरत राहिले. धुळें येथें तात्यासाहेब भट वकील व नानासाहेब देव हे त्यांच्या ज्ञानाची कदर करून, त्यांना एकांत जागा देऊन, त्यांना दरवर्षी आदरपूर्वक ठेऊन घेत असल्यामुळे त्यांचें धुळें हें एक वास्तव्याचें ठिकाण झालें होतें. आणि ते वारले ही धुळ्यास च. धुळ्याच्या प्रतिवर्षीच्या वास्तव्यामुळें धुळ्याला त्यांचें स्मारक उभारलें गेलें.

अतिशय आग्रहामुळें आचार्यांना या स्मारकसमारंभासाठीं यावें लागलें. हा आग्रह ज्यांनीं राजवाड्यांचें स्मारक उभारलें त्या नानासाहेब देव वगैरें मंडळींचा नव्हता. आचार्यांच्या धुळ्यांतील भक्तगणांचा च हा मुख्य आग्रह होता. या भक्तगणांपैकीं कांहींनीं स्मारकासाठीं मदत केली होती ती आचार्यांच्या हस्तें हा समारंभ व्हावा या आग्रहावर च केली होती. ज्यावेळीं हा आग्रह झाला त्यावेळीं स्मारक करणाऱ्या भट, देव वगैरे मंडळींनीं ती गोष्ट कबूल केलेली होती. परंतु १९३२ सालीं देशांतली परिस्थिती पुर्णपणे बदललेली होती. कॉंग्रेसच्या प्रमुख मंडळींना पकडून कॉंग्रेस दडपून टाकण्याचा विडा लॉर्ड विलिंग्डन साहेबांनीं म्हणजे त्या वेळच्या व्हाईसरॉय साहेबांनीं उचलेला होता. राजवाडे स्मारकार्थ काम करणाऱ्या मंडळींना राजकीय प्रक्षोभांत बळी पडावयाचें नव्हतें. केवळ राजवाड्यांच्या आदराप्रित्यर्थ एक संशोधनमंडळ उघडण्याची त्यांची कल्पना होती. त्यामुळें आचार्यांसारख्यांकडून स्मारकाच्या उद्‌घाटनाचा समारंभ होणें आतां त्यांना भितीप्रद वाटूं लागलें. आचार्य आल्यावर यावर कांही तोड काढण्याचा विचार त्या मंडळींनीं केला, व आचार्यांचें धुळ्यांत प्रथमच आगमन झालें. आचार्यांपुढें अडचण मांडण्यांत आली. आचार्यांच्या भाषणावरचा कोणता हि निर्बंध आचार्य कबूल करणें शक्य नाहीं. राजकारण मुळीं च नको, अमूक तऱ्हेनें च बोलावें, तमुक उल्लेख करूं नये, असल्या गुलामगिरींत आचार्यांचें भाषण होणें शक्य च नाहीं ही गोष्ट स्मारकमंडळाच्या चालकांच्या लक्षांत आली. मग त्यांनीं वेळेवर नियंत्रण घालण्याची युक्ति योजली. अनेकांचीं भाषणें व्हावयाचीं आहेत, इंदूरच्या महाराणी आल्या आहेत, औपचारिक प्रकाराला अवसर पाहिजे—अनेक गोष्टी आचार्यांना सांगितल्या गेल्या. आचार्य म्हणाले, "भाषण व्हावें च अशी हि कांहीं जरुरी नाहीं. मी आपला राजवाड्यांविषयीं आदर प्रदर्शित करून, दर्शन घेऊन न बोलतां परत येईन. शेंवटी भाषण फक्त ५ मिनिटें ठरलें. आचार्य मंडळींबरोबर पायीं च स्मारकमंदिराकडे जाण्यास निघाले. मंदिरामध्यें सरकारी अंमलदार व इंदूरच्या राणीसाहेब असल्यामुळें पोलिसांचा पक्का बंदोबस्त होता. पोलीस जाऊं देईनात. आचार्य उघड्या अंगावर केवळ एक कांबळी टाकून पायीं मंडळींबरोबर निघाले होते. येथें घोडागाडी, मोटार इ. वाहन नाहीं. पोषाखाचा बडेजाव नाहीं. केवळ सहज साधा शेतकरी पोषाख. जाऊं कोण देणार? येथून तेथून सर्व बाह्य दृष्टीनें भारलेल्या जगांत बिचारे पोलीस दुसरें काय पाहणार?

पोषाखीपणा जेथें नाहीं, तेथें थोरपणा त्यांना कल्पिता येणें शक्य च नव्हतें.—शेवटीं आचार्यांजवळील भक्त मंडळींनीं कोठून तरी एक आडरस्ता शोधून आचार्यांना मंडळीच्यापाशीं आणलें. राणीसाहेबांशेजारीं च आचार्यांना उच्चासनावर बसविण्यांत आलें. ते दृश्य मोठें विलक्षण होतें. परंतु निःसंशय अंतर्बाह्य राजवाड्यांना शोभून दिसेल अशी च आचार्यांची तत्वनिष्ठ भूमिका होती. क्षणभर आचार्यांच्या गंभीर, कृश, घोंगडीयुक्त आणि चिंतनशील मूर्तीकडे सगळ्यांचे लक्ष वेधून गेलें. आचार्यांना ५ मिनिटें बोलण्याला दिलीं होती. आचार्यांनी ४ मिनिटांत च भाषण संपविलें. “इतिहासाचें संरक्षण कागदपत्रें करूं शकत नाहींत. कागदपत्रांच्या आधारानें आमचा इतिहास उज्ज्वल आहे हें सिद्ध करून हि परकीयांना तें पटणार नाहीं. जर आमचा इतिहास उज्ज्वल असेल तर वर्तमानकाळीं आम्ही हीनदीन कां? आमची आजची कृति जर उज्ज्वल असेल तरच आमचा इतिहास थोर असें जग म्हणेल. नुसती कागदपत्रें अदाह्य इमारतींत ठेवून इतिहास उज्ज्वल होत नाहीं. आम्ही करंट्याप्रमाणें वागूं तर सर्व कागदपत्रें भस्म झाल्यासारखींच आहेत.” अशा आशयाचें तें भाषण होतें. चार मिनिटाचें च भाषण आचार्य व त्यांच्या बरोबरीची मंडळी लगे च परत आली.

आचार्यांचा मुक्काम या वेळीं शालिग्राम सेठ यांच्या बंगल्याजवळील एका स्वतंत्र बंगल्यांत ठेवण्यांत आला होता. पश्चिम खानदेशचे थोर कार्यकर्ते बाळूभाई मेहता, ठकार व इतर मंडळी आचार्यांजवळ वारंवार येऊन आपल्या कामाची माहिती देत असत. दोन्ही वेळच्या प्रार्थनेला हि बरीच मंडळी जमत असत. धुळ्यांत मुख्य ज्या कार्यक्रमासाठीं आचार्यांचे आगमन झाले त्या खेरीजचे च कार्यक्रम महत्त्वाचे आणि विस्तृत ठरले. त्या वेळीं ठकार ‘मुकटी’ येथे ग्रामसेवेचे कार्य करीत होते. तेथें हि एक कार्यक्रम झाला. धुळ्याजवळील कापडणें या गांवी एक कार्यक्रम करण्यांत आला. खुद्द धुळ्यात व्यापारी वर्गात, हरिजनांत, खाजगी सभेंत असे तीन चार कार्यक्रम झाले. या वेळीं सर्वत्र ऑर्डिनन्स राज्य सुरू झाले होते. आचार्यांनी सरकारी दडपशाहीवर, अन्यायावर, तीव्र शब्दांत प्रकाश पाडण्यास सुरुवात केली. भयभीत मनांना वीरश्रीची स्फूर्ति लाभेल असे आचार्यांचे शब्द सर्वत्र व्याख्यानांतून निनादू लागले. एका व्याख्यानांत तर श्री. ठकार इतके सद्‌गदित होऊन गेले कीं, त्यांचे अश्रु त्यांना आवरेना. आचार्यांचें सर्व समाजासांठीं धुळें येथें विजय व्यायामशाळेंतील पटांगणांत व्याख्यान ठेवलें होतें. लोकांची गर्दी विशेष स्वरूपाची होती. आचार्यांना हि विलक्षण स्फुरण चढलें होते. स्वतंत्र वातावरणांत जनताजनार्दनासमोर त्यांनीं निर्भयतेची यथेच्छ फोड केली. सर्व जनता चित्रवत् स्तब्ध होऊन गेली. यानंतर आचार्यांना मोटारीनें जळगांवपर्यंत नेण्यांत आले.

श्री. भाऊ पानसे व दत्तू दास्ताने हे दोघे आश्रमाचें विद्यार्थी आचार्यांबरोबर वर्ध्यापासून होते च. गोपाळराव काळे व द्वारकानाथ हरकरे हे मुंबईला गेले होते. ते धुळ्याला येऊन आचार्यांना मिळाले. जळगांवपर्यंत पोचविण्यासाठी म्हणून श्री. रामेश्वर सेठ धुळ्याहून बरोबर गेले होते. अशी ही आचार्यांसह सहा मंडळी जळगांवला पोंचली. ७ जानेवारीचा हा दिवस. जळगांवला पोंचल्यावर पूर्व खानदेशांतील प्रमुख कार्यकर्ते श्री. अण्णासाहेब दास्ताने पकडले गेल्याचें कळलें. अण्णासाहेब दास्तान्यांचा जळगांव जवळ च पिंप्राळे या ठिकाणी एक आश्रम होता. दास्ताने पकडले गेल्यांचे समजल्यावर सदर आश्रमांत जाऊन येण्याचें आचार्यांनीं ठरवलें. जळगांवचे लोक सरकारकडून पकडापकडी झाल्यानें अगदीं भयभीत होऊन गेलेले होते. तेव्हां जळगांवला रात्री व्याख्यान करण्याचे निश्चित करुन आचार्यांनीं तशी सूचना दिली. जळगांव कॉं. कमिटी समोर सकाळीं ८॥ च्या सुमाराला आचार्यांची मोटार उभी होती. आजुबाजूला घोळका जमला होता व तेथेंच ५/१० मिनिटांत आचार्यांनी सर्व परिस्थितीची माहिती घेतली. आपल्या व्याख्यानाची सूचना दिली व लगेच पिंप्राळे आश्रमांत जाण्याचे ठरविलें. या ठिकाणीं पोलीस उभे होते च. त्यांनीं लगेच बातमी डी. एस्. पी. कडे कळविली. डी. एस्. पी. ची मोटार लगेच आचार्यांची मोटार पिंप्राळे आश्रमांत

अनुक्रमणिका

जाते न जाते तों च हजर झाली. डी. एस्. पी. नें सर्वांना आपल्या बरोबर येण्यास सांगितले. तेव्हां सर्व मंडळीसह या दोन मोटारी प्रथम डी. एस्. पी. च्या बंगल्यावर गेल्या. तेथून पुन्हां डी. एस. पी. नें या मोटारी कलेक्टरच्या बंगल्यावर नेल्या. तेथेंच सर्वांची स्नानें व बरोबर आणलेल्या पदार्थांचा फराळ झाला. शेंवटीं कंटाळून 'रात्रीं आम्हांस वर्ध्याला जाण्यासाठीं मेल गांठावयाची आहे', 'आम्हास येथें किती वेळ तिष्ठत बसावें लागेल' अशासारखा मंडळींनीं प्रश्न विचाराला. त्यावर 'तुम्हांला पकडलें आहे' असें सांगून जळगांवच्या कोर्टाजवळील 'लॉकअप' मध्यें नेण्यांत आलें. लॉकअप मधल्या त्रासाला सीमा नव्हती. अत्यंत अरुंद जागा, जवळच पायखाना, त्यांत किडे पडलेले. अशा त्या ठिकाणी सर्व मंडळी ४/५ दिवस कोंबलीं गेली.

**दग्धं दग्धं पुनरपि पुनः कांचनं कांतवर्णम् ।**

सोनें जसजसें अग्नींत वितळत जातें तसतसें तें अधिकाधिक समुज्वल होत जातें. थोर पुरुषांना जसजसे अधिक कष्ट पडतात तसतसें त्यांचे तेज अधिकच वाढत जाते, ही गोष्ट खरी. पण कष्ट निराळे आणि किळस येणारा ओंगळपणा निराळा. अशा या ओंगळ वातावरणांत—लॉकअपमध्ये—आचार्य डोळे मिटून केवळ ध्यानस्थ बसत. या ध्यानबळावरच त्यांनी हा ओंगळपणा सहन केला. ध्यानानें सर्व बाह्य सृष्टि दूर होते. कर्मानें सृष्टीची सेवा व अहंतानाश, ध्यानानें सृष्टीपासून अलिप्तता व शांति, भक्तीनें सृष्टीशीं समसरता व आनंद आणि ज्ञानानें सृष्टिनाश व कैवल्य—ही परमार्थ मार्गातली सोपान परंपराच आहे. या लॉकअपमध्यें ५-६ दिवस काढल्यानंतर, पिंप्राळ्याच्या बेकायदा संस्थेंत जाण्याच्या आरोपावरून आचार्यांना ६ महिने व ५० रु. दंड व इतरांना कांही कमी अशी शिक्षा सुनावण्यात आली व १७ तारखेला धुळ्याला जेलमध्यें आणण्यांत आले. रस्त्यांत हातकड्या घालण्याचा प्रयोग केला गेला. पण आचार्यांचे हात इतके लहान कीं त्यांतून हातकड्या सहज निघून जात. त्यामुळें तो प्रयोग तसाच राहिला.

धुळें जेलमध्यें आचार्य येणार हें जेलमधील कित्येक व्यक्तिंच्या बोलण्यावरून जेलरला कळलें होतें. आचार्य आल्याबरोबर जेलरनें नित्याप्रमाणें झडती वगैरे न घेता आचार्यांसकट सर्वांना आंत सोडले. धुळ्याचा जेल हा गांवापासून फार दूर नाहीं. त्याचे मुख्य दार उत्तरेकडे आहे. आंत शिरल्याबरोबर उजवीकडे जेलचे ऑफिस, डावीकडे माडीची जागा व मुलाखती देण्याचे ठिकाण आणि त्याच्या पलीकडे स्त्रीविभाग आहे. ऑफिस टाकून दक्षिणेकडे आणखी एक फाटक ओलांडून गेल्याबरोबर उजवीकडे युरोपियन वॉर्ड लागतो. या ठिकाणी एकमेकाला लागून अशा स्वतंत्र चार खोल्या आहेत. येथेंच आचार्यांना ठेवण्यात आलें. आचार्यांना बी क्लास मिळाल्यामुळे येथें ठेवले होतें. या खोल्यात बी क्लास म्हणून किंवा युरोपियन वॉर्ड म्हणून कोणती हि सोय केली होती असें नाहीं. येथें प्रत्येकाला स्वतंत्र खोली इतकेंच. संडासाची हि येथें सोय नव्हती. या चार खोल्यांपलीकडे पुष्कळ जागा टाकून पश्चिमेकडे क्वारंटाइन व त्यापलीकडे हॉस्पिटल आहे. त्याचप्रमाणें जवळ च दक्षिणेकडे कैद्यांच्य निरनिराळ्या अशा मोठ्या खोल्या आहेत. जेलला मध्यवर्ती असें एक लहानसें टॉवर आहे. टॉवर पलीकडे दक्षिणेला 'बारा कोठे' नामक कैदी राहण्याची जागा असून बारा कोठ्याजवळ पूर्वेला लांबलचक स्नानाची फरशी व विहीर आहे. बारा कोठ्याच्या दक्षिणेला कैद्यांचे कपडे वगैरे ठेवण्याची जागा आहे. या जागेच्या दक्षिणेला बऱ्याच मोठ्या लांब बराकी आहेत. त्यातील एका बराकीला कडी बराक हे नांव पडलें होतें. येथें च आचार्यांची गीतेवर प्रवचनें झाली. या बराकीपलीकडे दक्षिणेला कामाचे निरनिराळे कारखाने आहेत. या नंतर दक्षिणेला जेलची भिंत लागते. असें हें धुळें जेलचें अंतःस्वरूप आहे. सुमारें एक हजार कैद्यांचा समावेश होईल असा हा जेल आहे.

या वेळीं धुळें-जेलमध्यें वैष्णव नांवाचा गुजराथी जेलर होता. त्याचा स्वभाव लहरी असे. कधीं तो सरळ वागे तर कधी लहर आली म्हणजे वक्र हि होई. त्यावरून कित्येक लोकांची समजूत झाली होती कीं तो नशा हि करीत असावा. आचार्यांकडे या जेलरसंबंधी नाना प्रकारच्या तक्रारी येत असत. आचार्य नेहमीं निःपक्षपातपणें तटस्थतेनें आणि मनुष्यांतल्या सद्भावांकडे पाहून निर्णय देत असत. थोड्या च दिवसांत जेलरवर आचार्यांचा विलक्षण प्रभाव पडला. तो आचार्यांना गुरुतुल्य मानू लागला. आचार्यांना त्यांने सबंध जेलमध्यें कोठें हि जाण्याची आणि कोणाशीं हि बोलण्याची मोकळीक दिली त्यामुळें सत्याग्रही कैदी ज्याप्रमाणे त्याच्यासंबंधी आचार्यांजवळ तक्रारी करीत त्याप्रमाणें तो हि आचार्यांजवळ सत्याग्रही कैद्यांसंबंधी तक्रारी करी. आचार्य जेलमधून सुटून परत वर्ध्याला आल्यावर हि त्यानें आचार्यांना असें एक थोडेंसें तक्रारीवजा पत्र लिहिलें होतें व आचार्यांनीं त्याचें उत्तर हि दिलें होतें. जोरजोरानें एकमेकांविरुद्ध तक्रारी करणाऱ्या या दोन्ही पक्षांना आचार्य प्रथम शांत करी. "तुम्ही नाहीं काय म्हणतां. खरोखर हा जेलर अत्यंत वाईट जेलर आहे".—असें म्हटल्यावर आचार्य जेलरमधील एखाद्या चांगल्या गोष्टीकडे लक्ष वेधी आणि तक्रार करणाऱ्यांची असम बाजू सम करी. मग तक्रारीचा योग्य तो विचार करी. ही च गोष्ट जेलर सत्याग्रहींसंबंधी तक्रार करीं त्या वेळी हि अशीच प्रत्ययास येई. क्रोधादि विकारांनें मनुष्याला कोणतें हि योग्य ज्ञान होत नाहीं म्हणून वृत्ति सम ठेवून नेहमी विचार करावयास पाहिजे. आचार्य असा विचार करूं शकत असत, म्हणून च त्यांच्याकडे हे ज्ञानदानाचे आणि न्यायदानाचे काम वारंवार येत असें. कैद्यांना काम देतांना तरुण, म्हातारा, अशक्त, सशक्त कांहीच विचार न करतां काम दिले जाई. तेंव्हा महत्त्वाचीं कठिण कामें जेलरच्या या लहरी स्वभावानुसार करण्यापेक्षा स्वयंसेवक पद्धतीने करण्यांचे आचार्यांनी ठरविले व त्याप्रमाणें एकमेकाला मदत करीत खेळीमेळीने स्वयंपाक, चक्की इत्यादि कामें सहज पार पडूं लागलीं. एखादें काम अपुरें असेल, एखादा मनुष्य थकला असेल, कोठे कांहीं उणें राहून गेले असेल तर ते लगेच आचार्यांच्या युक्तिकुशलतेनें पार होऊन जात असे. काम करणाऱ्या माणसांजवळ आचार्य क्षणभर हि उभे राहिले तरी तेवढ्याने काम करणाऱ्याला परम समाधान प्राप्त होत असे. लहान मोठा, शिकलेला बिनशिकलेला, प्रसिद्ध अप्रसिद्ध कसा हि मनुष्य असो आचार्यांच्या ज्ञानमय वार्तालापांत तो इहलोक पार विसरून जाई. गुरुत्वाची, आचार्यत्वाची खरी भूमिका ती ही च.

**यत्कटाक्षशशितांद्र चंद्रिका—**
**पापधूतभवतापजश्रमः ।**
**प्राप्तवानहमखंड वैभवा**
**नंदमात्म पदमक्षयं क्षणात् ॥**
**(विवेकचूडामणि ४८८)**

परंतु या सर्वांचे च हें भाग्य कोठलें? आचार्यांचा सर्वश्रेष्ठ थोरपणा कित्येक रजोगुणी व्यक्तीस सहन होत नसे.

**मृगमीन सज्जनानां तृणजलसंतोषविहितवृत्तीनाम् ।**
**लुब्धकधीवर पिशुना निष्कारणवैरिणो जगति ॥**

—जगांत संतसज्जनांचा हा नेहमींचा च अनुभव आहे. या अनुभवाप्रमाणें कांहीं व्यक्ति वेदोपनिषदादींचा आधार घेऊन आचार्यांना वेडेवांकडे प्रश्न वितंडवादी पद्धतींनें विचारीत असत. आचार्य शांतपणें त्या त्या प्रश्नांचा निकाल लावीत असत. कित्येक जण प्रत्यक्ष आचार्यांना कोणता हि प्रश्न न विचारतां आचार्यांचें

सांगणें किंवा प्रवचन संपलें म्हणजे मुलांना, अडाणी मंडळींना उलटा च उपदेश देण्याचा प्रयत्न करीत. कित्येकांना वाटे हे तर केवळ उपदेश च करतात. स्वतः चक्कीसारखीं कठिण कामें काय त्यांच्याच्यानें होणार आहेत? —पण हा भ्रम होता. आचार्यांची प्रकृति या वेळीं जरी अतिशय अशक्त झालेली होती, (सुमारें ९५-९६ पौंड आचार्यांचें वजन होतें) त्यांचे हात जरी अतिशय कोमल होते, तरी त्यांच्या ठिकाणीं अभ्यासवैराग्याचें प्रचंड सामर्थ्य होतें. त्यांनी हळूंहळूं चक्कीची सुरुवात करून उत्तरोत्तर दळण्याचा अधिकाधिक अभ्यास चालविला. परंतु जेलर व इतर थोर व्यक्तींनीं आचार्यांच्या शरीर प्रकृतीला दळणें योग्य नाहीं म्हणून मुद्दाम आग्रहपूर्वक त्यांना दळण्यापासून परावृत्त केलें. आचार्यांशीं स्वतःच्या रजोगुणी स्वभावामुळें निष्कारण वैर करणाऱ्या अत्यल्प मंडळींखेरीज चळवळींत आलेल्या परंतु व्यसनी लोकांची निराळी च गंमत असे. एकदां एक गृहस्थ, सकाळच्या प्रहरीं आचार्यांना ठेवलें होतें त्या युरोपियन वॉर्डांत आले. शेजारीं च बाळूभाई मेहतांची खोली होती. सदर गृहस्थ बाळूभाई मेहतांना म्हणतात, "मला जरा हरिपाठ करावयाचा आहे". बाळूभाई म्हणाले, "करा. माझ्या खोलींत कंदिल हि आहे." थोडा वेळ जातो न जातो तों च बाळूभाई हंसत हंसत आचार्यांना सांगण्यासाठीं आले, "हरिपाठ पाहायला चला". सदर गृहस्थ बाळूभाईंच्या खोलींत रामप्रहरांत धूम्रपान करीत होते!

परंतु व्यसनी असो कीं रजोगुणामुळें निष्कारण मत्सरी असो, आचार्यांची सर्वांकडे समतामय नजर असे. त्याच्या रोजच्या दिनक्रमांत सर्वांची एकदां भेट व्हावी अशी च पद्धति ठरलेली असे. आचार्य सकाळीं ३॥ - ३॥। ला उठत व प्रातर्विधी करून प्रार्थना करीत. तद्नंतर तास दीडतास स्वाध्यायांत जात. ८ वाजल्यानंतर ते सर्व जेलमध्यें ठिकठिकाणीं मंडळींना भेटून येत असत. त्या त्या माणसांच्या अडचणी ते लक्षांत घेत, त्या त्या मंडळींना त्या त्या परिस्थितीप्रमाणें बोध देत आणि दहाच्या सुमाराला परत येत. लगे च सूत कांतण्याला सुरुवात होई. शास्त्रशुद्ध सूत कांतण्यासाठीं या वेळीं अनेक सत्याग्रही कैदी येथें येत असत. हा कार्यक्रम पुरा झाला कीं जेवण होई. आचार्यांच्या जेवणांत 'बी क्लास' असून हि दूध तूप नसे. कारण तेथें गाईचें दूध मिळत नसे. जेवणानंतर थोडी विश्रांति घेऊन आचार्य २-२॥ च्या सुमारास स्नानास जात. तासभर स्नान, कपडे धुणे, इ. मध्यें वेळ जाई. यापुढें पुन्हां सूत कांतणें, प्रश्नोत्तरें, नाना विषय वाद, तक्रारी वगैरे चालत. हा कार्यक्रम झाल्यानंतर बहुधा पुन्हां संध्याकाळीं जेलची फेरी करून आचार्य परत येत.

संध्याकाळचें जेवण झाल्यानंतर तुळसी रामायण वाची. तें ऐकण्यासाठीं मंडळीं हजर च असत. या नंतर सर्व जण आपापल्या ठिकाणीं कोंडले जात आणि रात्रीं आचार्य स्वतःच्या खोलींत गाढ झोपी जात असा सामान्यतः दिनक्रम असे.

येणेंप्रमाणें धुळें जेलमध्यें आचार्यांच्या वास्तव्यामुळें एक प्रकारें आश्रमाची संस्थापना झाली होती. येथें स्वावलंबी पद्धतीवर—शरीर परिश्रमाच्या तत्त्वावर सर्व क्रिया चालत. सूत कांतणें, विणणें, नाना प्रश्नांवर चर्चा, सत्य अहिंसेच्या सिद्धांतानुसार न्यायनिवाडा, सर्वांनीं एकत्र समतेनें राहणें, दोन्ही वेळां प्रार्थना—ऋषींच्या आश्रमाचें स्वरूप सहज च जेलला आले. थोर पुरुषाच्या वास्तव्यानें त्या त्या वसतिस्थानाचें स्वरूप च सर्वथैव पालटतें. तें घोर अरण्य असलें तरी तेथें अहिंसक आश्रम तयार होतो. तेथें व्याघ्रसिंह हि गरीब गाय बनतात. येथें सर्वत्र शांति आणि आनंद नांदूं लागतो, तेथें ज्ञानाचा झरा वाहू लागतो. कारागृह वरून वरून पण आंतून ऋषींचा आश्रम अशी स्थिति थोर पुरुषाशिवाय होऊं शकत नाहीं. केवळ आश्रमांत दिसणाऱ्या बाहेरच्या क्रिया सुरू केल्यानें आश्रम बनणार नाहीं. थोर पुरुषाजवळची

विलक्षण प्रेरक अव्यक्त शक्ति असल्याशिवाय बाकीचीं कर्मे व्यर्थ होत. येथें आश्रमाच्या देखाव्याला साजेशीं बाहेरचीं दर्शनें आंतरिक शक्तिमुळें स्वाभाविकपणें च होतीं. त्यामुळें च धुळें-जेल अंतर्बाह्य आश्रम बनला.

**"चित्त शुद्ध तरी शत्रु मित्र होती ।**
**व्याघ्र हि न खाती सर्प तया" ॥**

बाहेरच्या बगीच्यांत ज्यांना काम मिळे त्यांच्या पायांत लोखंडी कडे खुणेसाठीं घालण्याची जेलची पद्धति होती. सत्याग्रहींना वाटे आम्ही का चोरी केली? आम्ही पळून जाणार आहोंत? आमच्या पायांत कडी! —हा अपमान आहे. आचार्य सांगत—यांत काय अपमान. हा तर अलंकार आहे. आम्ही चोर नाहीं हें काय भांडून सिद्ध करावयाचें आहे? चित्तशुद्धि असेल तर आपोआप च सर्व गोष्टी होतात. कोणत्या हि कैद्याला स्त्रीविभागांत जाण्याची परवानगी जेलमध्यें केव्हां हि दिली जात नाहीं. पण आचार्यांना याच सहजचित्तशुद्धीच्या जोरावर जेलरनें ही परवानगी दिली होती. त्याप्रमाणें आचार्य तेथें जात. स्त्रियांना चार समाधानाच्या गोष्टी सांगत. स्थितप्रज्ञाचे धर्मदर्शन करवी. ह्या चित्तशुद्धीचें भरत खंडांतील मोठें साधन जी भगवद्गीता—जी आश्रमांत सकाळीं नित्यपाठांत असावयाची, जिच्या चिंतनांत आचार्य नेहमीं गर्क असत—तिच्यासंबंधीं विवरणात्मक प्रवचनें आतां जेलमध्यें दर रविवारीं एक याप्रमाणें आचार्यांना विनंति केल्यावरून सुरू केली गेली. या प्रवचनांनीं जेलमध्यें चित्तसंशोधनाचें अपार काम केलें. लोक चातकाप्रमाणें त्या प्रवचनांची वाट पहात. एकेक अध्याय त्या ठिकाणीं विवरिला जात असे. अंतःकरणांतल्या पवित्र वृत्ति त्यामुळें जागृत होत. कुंडलिनी जागृत झाली म्हणजे ज्याप्रमाणें ती वरवर जाऊन मस्तकांत प्रवेश करते व सर्व बुद्धीचा ताबा घेते त्याप्रमाण अंतःकरणांतल्या त्या पवित्र भावनांनीं बुद्धि भरून जाई. ती प्रवचनें त्या जेलमधल्या माणसांना अमृतासारखीं झालीं. या जेलमध्यें आलों! धन्य झालों! हें अमृत आम्हांस अनायासें मिळालें! असे अनेकांचे उद्गार निघूं लागलें. या वेळीं जेलमध्यें दोन्ही खानदेशचे बहुतेक कार्यकर्ते होते च. त्या शिवाय महाराष्ट्रांतले, गुजराथचे, मुंबईचे अनेक थोर, प्रख्यात, त्यागी कार्यकर्ते होते. सर्वांना या गीतामृतानें वेड लावलें. "दुग्धं गीतामृतं महत्". हा गीतेचा गौरवाचा श्लोक आतां प्रत्यक्ष अनुभूतीचा विषय झाला. या वेळीं जेलमध्यें जमनालालजी होते. त्यांनीं महात्माजींना लिहिलें कीं "या प्रवचनांनीं माझ्या जीवनावर फार मोठा परिणाम केला. पू. विनोबांच्या सहवासानें माझ्या जीवनसृष्टींत एक नवीन च सृष्टि निर्माण झाली". एकेक अध्यायाचे एकेक प्रवचन साने गुरुजी उतरून घेऊं लागले. रात्रीचा दिवस करून लघुलेखकाप्रमाणें त्यांनीं हीं प्रवचनें जवळ जवळ शब्दशः उतरलीं. त्यांचे मोठे उपकार झाले. अनेकांनीं त्या वेळीं हीं प्रवचनें उतरविलीं. कोणी त्यांचे गुजराथी केलें, कोणी मुद्दे टिपले, कोणी विशेष भाग टिपला. प्रत्येकाला हा एक अलभ्य लाभ वाटला. जैनांना जैनमत, हिंदूंना भारतीय संस्कृति, मुसलमानांना इस्लामचें तत्त्व—सर्वांना सर्व कांहीं भव्य, दिव्य, उच्च, शुद्धिकारक, जीवनोपयोगी जें कांहीं—तें सर्व एकदम मिळत असल्याचा भास झाला. "तच्च संस्मृत्य संस्मृत्य रूपमत्यद्भु तं हरेः"—गीता सांगतेवेळीं भगवान् श्रीकृष्णाचें जें दिव्य स्वरूप प्रकट झालें तसें च आचार्यांचें हि स्वरूप लोकांना दिसे. ते चिंतनयुक्त अनुभवाचे खोल आणि अमोल, मोजके आणि समर्पक, सरळ आणि सुंदर बोल प्रत्येकाच्या हृदयामध्यें खोल ठसले जात. त्यामुळें जेलमधल्या व्यवहारांतली पुष्कळ च अडचण दूर झाली. भाजींत मीठ कमी पडलें झाली चर्चा सुरू, हा जो बाह्य जीवनाचा प्रकार दिसतो तो मग येथें कमी होऊं लागला. या जिभेला एवढी चट काय म्हणून लावावी. एक कणभर मीठ कमी झाले म्हणून माझें महान् ज्ञान मीं तेथें लावावें काय?—माझें वजन एक पौंड वाढलें हा च दैहिक विचार मी सतत करावा काय? देहाचें हे वजन ही माती आहे—शुद्ध माती आहे. असलीं दृष्टांतादाखल आलेलीं प्रवचनांतलीं वाक्यें ऐकून कित्येक जाडजूड मंडळींनीं तर आपलें वजन हि कमी करण्याचा गंभीरपणें प्रयत्न सुरू केला. आत्मज्ञानाच्या सिद्धांतांनीं नवीन च संचार

अनुक्रमणिका

झाला. कर्माचा सिद्धांत, अकर्माची परमरमणीय अवस्था, संन्यासी आणि कर्मयोगी यांची तुलना, निर्गुण आणि सगुण भक्ताची तुलना—गीतामाउलीच्या भांडारांतल्या अनेक अपूर्व चिजा आचार्य जसजसे लोकांपुढें मांडूं लागले तसतसे लोक त्या ब्रह्मविद्येंत तल्लीन होऊं लागले. कित्येक प्रसंगीं आचार्यांच्या डोळ्यांतून अनावर अश्रुधारा वाहात. तें दृष्य पाहाणाऱ्यांचें हि चित्त त्यामुळें धुऊन पार स्वच्छ होई. पवित्र पुरुषाच्या अश्रुबिंदूंत विलक्षण सामर्थ्य असते.

**बिंदू तथापि हि तयांत अपार सिंधु**

असा त्याचा महिमा असतो. गीताप्रवचनांनीं गीतामाउलीच्या प्रेमाची पाखर सर्वांना मिळाली. जो तो त्या विचारांत रंगून गेला. तो रविवार म्हणजे ज्ञानसूर्याच्या वर्षावाचा वार. त्या वेळीं सर्व एकत्र जमत. जेलर हि येई. दत्तचित्त आणि उद्ग्रीव होऊन सर्व तीं प्रवचनें ऐकत. कित्येक लोकांची शिक्षा संपल्यामुळें त्यांना जेल सोडून जाण्याचा प्रसंग आला. पण त्या प्रवचनांमुळें आपण केवढे अभागी आहों असें त्यांना वाटलें. घरीं आईची भेट होईल पण ही गीतामाउली अंतरते—अशी त्यांची द्विधा अवस्था झाली. ज्ञानाचें आकर्षण सर्व गुरुत्वाकर्षणांहून मोठें आहे. बाहेर जाणारे लोक बाहेर गेले पण ते आपलें चित्त येथें ठेवून गेलें. बाहेर हि त्यांच्याजवळ प्रवचन उतरविलेल्या वह्या होत्या. त्या दुसऱ्या लोकांनीं पाहून त्यांचा लाभ घेतला. शेंवटीं १८ वा अध्याय आला. त्या दिवशीं तो कलशाध्याय संपवितांना आचार्यांच्या वाणीचें स्फुरण विलक्षण होतें. साक्षात् सरस्वती च तेथें बोलत होती. साने गुरुजींना त्या अध्यायाचें प्रवचन पूर्णपणें उतरून घेतां आलें नाहीं. इकडे उतरवावें कीं त्यांत चित्त तल्लीन होऊन हात थांबावा अशी कांहीं चमत्कारिक दशा ती होती. संजयाची गीतेंतली ती स्थिति सर्वांच्या अनुभवाला आली. भारतीय संस्कृतीचें च स्वरूप गीताप्रवचनांच्या निमित्ताने आचार्यांच्या द्वारें धुळें जेलमध्यें प्रकट झालें. २१—२—३२ ला गीताप्रवचनाची सुरुवात झाली आणि १९—६—३२ ला प्रवचनांची समाप्ति झाली.

त्याचप्रमाणें आधुनिक भारत ज्यांनी बनविला त्या न्या. रानडे, ॲनी बेझंट, राजा राममोहन राय, रामकृष्ण परमहंस, रवीन्द्रनाथ टागोर, महात्मा गांधी, अरविंद घोष, लो. टिळक, दयानंद सरस्वती—या थोर पुरुषांच्या जीवनाचें रहस्य हि आचार्यांच्या तोंडून ऐकण्याचा योग या वेळीं जेलमधल्या कार्यकर्त्यांना लाभला होता.

मुदत संपली (१४—७—३२) आचार्यांची धुळें जेलमधून सुटका झाली. जमनालालजी मागें च राहिले. त्यांना अधिक सजा होती. (एकूण १॥ वर्ष सजा) दुसरे अनेक कार्यकर्ते जेलमध्यें राहिले. आचार्यांच्या सुटकेमुळें मागें राहिलेल्यांना फार वाईट वाटलें. तथापि त्यांच्याजवळ आचार्यांनी दिलेले अनेक निर्णय, प्रसंग, आचार्यांनी घालून दिलेली शिस्त, आचार्यांची स्वतःची आचरणपद्धती आणि गीताप्रवचनांचें अमृत इतकी भरभक्कम सामग्री होती. ती जेलमध्यें च नव्हे तर सर्व जीवनाला पुरेशी होती. त्याशिवाय धुळें जेलमध्यें च गीताईची प्रथमावृत्ति निघाली. श्री. बरवे वकील बाहेरून येथें प्रुफें आणून देत व आचार्य तीं तपाशीत असत. संस्कृत न समजणाऱ्या बहुजनसमाजाला व कार्यकर्त्यांना गीताईचें मोठें च आश्वासन देऊन आचार्य जेलमधून बाहेर पडले. दोन्ही खानदेश, नाशिक जिल्हा आणि ठिकाणचे कांहीं कार्यकर्ते यांना आचार्यांच्या सहवासाचा लाभ मिळून आचार्यांनी अनेकांचीं हृदयें अद्वैताच्या भूमिकेशीं जोडून घेतली.

●●●

अनुक्रमणिका

# प्रकरण ४६ वें

## कॉटन मार्केट (कापूस बाजार)

**वर्धा** स्टेशनजवळ च एक कॉटन मार्केट आहे. कापसाच्या हंगामांत ही जागा कापसाच्या खरेदी-विक्रीच्या वर्दळीचें केंद्रस्थान बनलेली असावयाची. एका अर्थाखेरीज म्हणजे पैशाखेरीज जगांत कांहीं च अर्थ नाहीं अशी येथें नित्यस्थिति. अर्थ हा च परमार्थ मग तो कशा हि तऱ्हेनें मिळवावा ही च जेथें रूढी, त्या स्थळीं परमार्थी पुरुषाचा निवास होणें ही गोष्ट खरोखर अघटित च समजावयास पाहिजे. परंतु येथें तसा योग घडून आला ही गोष्ट मात्र खरी.

आचार्य धुळें जेलमध्यें पकडले गेल्यानंतर जमनालालजी वर्ध्याला आले होते. व त्यांनीं आश्रमीय मंडळींची एक सभा आश्रमाच्या गच्चीच्या माडीवर भरविली होती. याठिकाणीं बापूजी आणि आचार्य हि अनेक वेळा राहिलें होतें. आश्रमची मंडळी व जमनालालजी संध्याकाळच्या सुमाराला या माडीवर बसली होती. आचार्य पकडल्यामुळें व जमनालालजी वगैरे प्रमुख कॉंग्रेसचे पुढारी पकडले जाणार ही खात्री होती च, त्यामुळें, पुढें आश्रमीयांनीं काय धोरण ठेवावें, कोणी कसकसें काय काय काम करावें, चळवळींत कोणी भाग घ्यावा, विधायक, शिक्षणादि कार्य करणाऱ्यांनीं काय करावें वगैरे अनेक गोष्टींची चर्चा या सभेंत झाली. या वेळीं आश्रमीय मंडळींबरोबर बाळकोबा, छोटेलालजी, जाजूजी अशी प्रमुख अनुभवी मंडळी होती. कन्याश्रमाच्या मुली हि होत्या. सभेंत जमनालालजींनीं सर्वांचीं मतें, कामें वगैरे समजून घेतलीं आणि त्याप्रमाणें योजना ठरली. कन्याश्रमादि संस्था राजकारणांत भाग घेणार नाहींत हें निश्चित केलें. नंतर जमनालालजी वर्ध्याहून गेले, ते पकडले च गेले; आणि धुळें जेलमध्यें कांहीं दिवसांनी आचार्यांच्या सान्निध्यांत हि त्यांना पोंचविण्यांत आलें.

इकडे मध्यप्रांत व वर्धा जिल्ह्यांत सरकारची दडपशाही सुरू झाली. आश्रमीय मंडळींचा खेड्यापाड्याशीं संबंध जडलेला च होता. या वेळीं आश्रमवासीयांनीं खेड्यापाड्यांत जाऊन मूक प्रचार करून एकामागून एक सत्याग्रहींच्या तुकड्या करून अधिकाऱ्यांना सळो कीं पळो करून सोडलें. चळवळीच्या बातम्या खेड्यापाड्यांत पोंचविण्यासाठीं आश्रमांतली तरूण मंडळी वीस वीस मैल मजला मारून साइक्लोस्टाइलवरचीं बातमीपत्रें पोंचवू लागले. लोकांना नाना प्रकारच्या सूचना देऊं लागले. आश्रमाचें काम हि नित्याप्रमाणें सुरळीत चालू होतें. खेड्यांतले सत्याग्रही स्वयंसेवक कोणी हि आश्रमांत उतरत नसत. त्यांची सोय गांवांत अन्य स्थळीं केली होती, त्यामुळें आश्रममध्यें कोणत्या हि तऱ्हेचा फरक दिसून येत नसे. प्रार्थना, विणकाम, सूत कांतणें, स्वाध्याय, गृहकृत्यें—नेहमींप्रमाणें च चाललेलें सर्व शांत आणि आरण्यकजीवन दिसून येई. खेड्यांतील सत्याग्रही मात्र वर्ध्याला येऊन सत्याग्रह करीत, भाषणें देत. त्यामुळें हें सर्व कसें चालतें याचा अधिकाऱ्यांना उलगडा होत नसे. शिक्षा झालेले सत्याग्रही दंड होईल या भयानें स्वतः च्या घराचा पत्ता न सांगतां सत्याग्रहाश्रम—वर्धा असा पत्ता सांगत. त्यामुळें अधिकाऱ्यांना हि आश्चर्य वाटे कीं या आश्रमांत आहेत तरी किती माणसें! पांचपांचशें माणसांनीं आपलें घर—आपला पत्ता आश्रम म्हणून सांगितला होता. इकडे आश्रममध्यें येऊन तपास केला तर त्यांना ठराविक आश्रमीय च आढळून येत. त्यामुळें कलेक्टर, कमिशनर असे अधिकारी आश्रमची पहाणी करून गेले. मधून मधून आश्रम जप्त होणार अशा अफवा हि येऊं लागल्या. आश्रम जप्त झाल्यास सर्वांची त्या दृष्टिनें तयारी होती च. शेंवटीं कांहीं आगापिछा नसतांना एके दिवशी पहांटे चार वाजतां आश्रमला एकदम मिलिटरीचा गराडा पडला.

अनुक्रमणिका

कलेक्टर स्वतः हातांत टॉर्च घेऊन आला होता. त्यानें त्या वेळचे आश्रमचे मुख्य शिवाजी यांना आश्रम व आश्रमची मालमत्ता जप्त केल्याचा हुकूम दाखविला. कोणाला हि पकडण्याची त्याची इच्छा नव्हती. जो तो आपलें खासगी सामान घेऊन बाहेर जाऊं शकतों असें त्यानें सांगितलें. परंतु तसें करण्याला कुणीं च तयार नव्हतें. सोल्जरांनी त्यामुळें बऱ्याच जणांना ढकलून, सोट्या मारून, आश्रमच्या हद्दीबाहेर हांकून दिलें. जिकडे तिकडे सोल्जर मोडतोड करूं लागले. पुस्तकालयाचीं पुस्तकें त्यांनीं अस्ताव्यस्त केलीं. परंतु कलेक्टरनें मिलिटरी अधिकाऱ्यांना बजावलें कीं येथें सौम्यतेनें वागावें. त्याप्रमाणें मग विशेष त्रास न देतां सरकारी मॅजिस्ट्रेटसमोर आश्रमच्या सर्व सामानाची यादी करून सायंकाळीं कुलुपें लावून पहारा बसविण्यांत आला. सर्व आश्रमीय पुन्हां कंपौंडांत आले होते त्यांना पकडून ट्रेसपासचा गुन्हा लावून कोतवालींत कोंडण्यांत आलें. मालक चोर ठरला! चोर मालक झाला! कोणत्या हि तऱ्हेनें मालकी न ठेवणाऱ्या आश्रमीयांसारख्या सेवकांना पकडून सरकारनें पापांत मोठी च भर टाकली. लवकरच ३/४ दिवसांनी आश्रमीय सदस्यांवर खटले भरून त्यांना चार महिन्याची सक्तमजुरी देण्यांत आली.

आचार्य धुळें जेलमधून सुटले तेव्हां आश्रम जप्त झाला होता. तेथें सरकारी पहारे होते. कन्याश्रम जप्त नव्हता. जाजूजी, बाळकोबा यांना पकडले नव्हते. आचार्यांबरोबर जेलमध्यें गेलेले भाऊ पानसे, द्वारकानाथजी, हरकरे आचार्यांच्या आधींच सुटले होते. आचार्य सुटल्याबरोबर त्यांचें वर्ध्याला येणें स्वाभाविक होते. परंतु "अमुक एक स्थळीं च गेले पाहिजे असें नाहीं, कोठें हि राहावें, सर्व जग आपलें आहे" अशा विचारानें आचार्य वर्ध्याला येणार हि नाहीं, अशा तऱ्हेची कुणकुण सुटून आलेल्या कांहीं आश्रमीय मंडळींना लागली. त्यामुळें श्री. बाबाजी मोघे हे आचार्य सुटण्याच्या सुमाराला धुळ्याला गेले व आचार्यांना घेऊन वर्ध्याला आले. आचार्यांबरोबर चार मंडळी असावयाची च. त्यामुळें आचार्यांच्या राहण्याची म्हणजे आश्रमची व्यवस्था स्टेशनजवळील कॉटन मार्केटमध्यें केली होती. अशा तऱ्हेने कॉटन मार्केटच्या जागेंत आचार्य आणि आश्रमीय मंडळी राहण्याचा असा हा विलक्षण योगायोग निर्माण झाला.

एक बराकीवजा असें मोठें घर होतें. शेजारी दोन तीन खोल्या. आजुबाजूला मैदान. समोर स्टेशन. एका बाजूला गांवाची सुरुवात जमनालालजींच्या मोठ्या हवेलीने च जणूं झाली असें वाटे. आचार्यांचें निवासस्थान झाल्यापासून या ठिकाणीं पूर्वी कधीं हि न झालेल्या हालचाली दिसून येऊं लागल्या. जेथे दलाल आणि व्यापाऱ्यांची वर्दळ तेथे निराळा च व्यापार सुरूं झाला. त्या कॉटन-मार्केटच्या लहानशा जागेंत आचार्यांच्या सत्संगतींत राहण्यासाठीं लोक येऊं लागले. आश्रमीय कार्यकर्त्यांची ये जा सुरूं झाली. कार्यकर्त्यांच्या कार्यविषयक सभा हि भरूं लागल्या. बाहेरच्या उघड्या जागेवर पाटावर बसून तेथें गीताभ्यासादि वर्ग हि सुरू झाले. नाना प्रकारचे लोक सल्लामसलतीसाठीं येऊं लागले. कापसाच्या बाजारांत ज्याप्रमाणे एक च माल कापूस, त्याखेरीज गोष्ट नाहीं त्याप्रमाणें येथें हि एक च गोष्ट, भक्तिप्रेमाचा आनंद.

**प्रेमाच्या बाजारीं । आनंदाचा मेळा ।**
**देव भक्तांसंगें नाना रसरंगें करीतसे लीला ॥**

या वेळीं आचार्य आणि त्यांच्याबरोबरचे आश्रमवासी सुटलेले होते च. परंतु ज्यांना आधीं सजा झालेली होती असे पुष्कळ आश्रमवासी एकामागून एक सुटून येत होते. चळवळ हि चालू होती. स्वयंसेवक सत्याग्रह करून जेलमध्यें जात होते. कित्येक मागें राहिलेले आश्रमवासी जेलमध्यें गेले. जेलमधून आलेले आश्रमवासी ठिकठिकाणीं तालुक्यांत विभागले गेले. आचार्यांच्या सल्ल्याप्रमाणें ते खेड्यांत काम करूं

अनुक्रमणिका

लागले. त्या सर्व आश्रमवासीयांना एकमेकांच्या हालचाली कळाव्या, मार्गदर्शन प्राप्त व्हावें या हेतूनें एक आश्रमवृत्त काढण्याचा उपक्रम सुरूं झाला. छोटेलालजी कॉटन मार्केटमध्यें राहून आश्रमाची इतर सर्व व्यवस्था पहात. त्याप्रमाणें या वृत्ताचें हि काम करूं लागले. ही आश्रमवृत्ताची कल्पना मूळची साबरमतीची. प्रभुदास गांधी यांनीं साबरमतीला प्रथम आश्रमवृत्त सुरू केलें होतें. एक वृक्ष गेला तरी बीजरूपानें हजारों वृक्ष तयार होत असत. गुरु गेला तरी शिष्य वाढत्या संख्येनें तयार होत जातात. त्याप्रमाणें मूळ आश्रम जरी जप्त झाला होता, तरी त्या आश्रमाच्या अनेक शाखा आतां तालुक्याच्या खेड्यापाड्यांत काढण्यांत आल्या. तालुक्यांत पंधरा ठिकाणीं या वेळीं निरनिराळे कार्यकर्ते विभागले गेले. हे कार्यकर्ते त्या त्या ठिकाणीं लोकांच्या मदतीनें आश्रमासारखें केंद्र स्थापून जीवनसंस्थेचा आदर्श दाखविण्याचा त्याचप्रमाणें चळवळीचें लोण आमजनतेपर्यंतच पोंचविण्याचा प्रयत्न करूं लागले. या प्रयत्नांत मार्गदर्शन आणि उत्साह मिळविण्यासाठीं ते मधून मधून आचार्यांकडे कॉटन मार्केटमधील आश्रमांत येत, आचार्य त्यांना सल्ला देत, जप्त आश्रमाजवळच्या कन्याश्रमात फिरण्याच्या निमित्तानें मधून मधून जात, कॉटन मार्केटमध्यें शिकविण्याचें काम करीत, जवळ च जमनालालजींच्या दुकानावर राहाणाऱ्या मुली शिकण्यासाठीं म्हणून येत, त्यांच्याबरोबर कधीं कधीं फिरत जात. तालुक्यांतील इतर मंडळी, गांवांतील मंडळी, परगांवांहून येणारीं माणसें या सर्वांशीं बोलण्याचें आणि मार्गदर्शनाचें काम त्यांना करावें लागे. शिवाय धुळें जेलमधून सुटल्यापासून अनेक बाहेरच्या कार्यकर्त्यांशी पत्रव्यवहार वाढला होता. पत्राद्वारें अनेक प्रश्न आचार्यांना विचारण्यांत येत, त्यांची उत्तरें देण्यांचें एक मोठें च काम असे. आतांपर्यंत आचार्यांचीं जाणारीं पत्रें कोणी उतरवून ठेवीत नसे. या पत्रांतील महत्त्वाचा शाश्वत भाग पुढें आणि चालू काळीं उपयोगी असल्यानें तो उतरवून ठेवण्याची कल्पना छोटेलालजींच्या मनांत आली. ते हीं पत्रें नीटपणें उतरवून ठेवूं लागले. छोटेलालजींचे हे एक उपकार च समजले पाहिजेत. या वेळीं आचार्यांनीं मधून मधून निरनिराळ्या खेड्यांत फिरण्याचा उपक्रम सुरूं केला. बापूजींच्या हरिजनासंबंधीचा येरवडा करार झाला त्या वेळचा प्रसिद्ध उपवास या च वेळीं झाला होता. या च सुमाराला आचार्यांनीं बापूजींना दोन पत्रें लिहिलीं होतीं. हीं दोन पत्रें व बापूजींचें उत्तर यावरून त्यावेळची कल्पना उत्तम प्रकाराने येत असल्यामुळें तीं तीन्हीं गुजराथीं पत्रें येथे उतरवून घेऊं—

पवनार :
दिनांक २ ऑगस्ट १९३२.

पूज्य बापूनी सेवामां,

घणा दिवसथी लखवानो विचार करतो हतो. आजे तो शरुवात करी ज दऊं. मंदिरनी हकीकत तो हवे जूनी थई गई. त्यां हतो त्यां सुधी आपणा भाईओनी अने बेहनोनी गुनावाळा गणाताओनी तेमज राजबंदीओनी जेटली शक्य हती तेटली सेवा करी एम कही शकाय. गीतानी समश्लोकी पण तेज वखते प्रगट थई. जमनालालजीए तेनी नकलो आपने मोकली छे. ते मळी थशे. आपनुं मराठी क्यां सुधी आव्युं ते हुं जाणतो नथी. महादेवभाई ते जरूर जोई जाय अने मने सूचनाओं करे एम इच्छुं छुं.

मारी प्रकृति उत्तम छे. वजन तो जेलमां हतुं एटले ९२ नी आसपास छे. दूध, घी छोडवाने हवे २॥ वरस थया छे. अमुक मुदतने माटे अथवा कायमनुं एमाथी एक पण संकल्प कर्या वगर में ए छोड्युं छे. वजन ओछुं छें एम मने पण लागे छे. जो के उत्साहमां खामी लागनी नथी. अने आटला वजनमां पण लगभग ६ माईल फरवानुं २१ पौंड दळवानुं १॥ लट कांतवानुं अने संभाषण, चर्चा, वांचन इत्यादि करी शकतो हतो.

अनुक्रमणिका

एटले हुं निश्चिंत छुं. छता दूध, घी वगर वजन वधारवाने सारुं आप कंई सूचनाओं करो तो प्रयोग करी जोईश.

वर्धा तालुकामां काम सरस थयुं एम कही शकाय. ५०० भाईओं अने बेनो जेलयात्रा करी चूक्या छे. अने हजी उत्साह तो छे ज. लगभग ७० गामडाओ ए आमां भाग लीधो छे. गामडाओनी कुलसंख्या ३०६ छे. मारी दृष्टीए माणसोनी संख्या करता गामडाओनी संख्यानुं वधारे महत्त्व छे.

मारी प्रवृत्ति अत्यारे गामडामां आश्रमो स्थापवानी छे. एवा दस एक स्थान तालुकामां करवानी इच्छा छे. अत्यार सुधी ६ स्थानो बन्या छे. जो के स्थिर नहिं कही शकाय. एवा तो मने बेज लागे छे. आ कल्पना में जेलमां ज करी हती. अने जमनालालजीने ते बहु पसंद आवी हती. गामडामां विखराओी जवानी आपनी कोचरबथी ज कल्पना हती. आ वखते एनो अमल करीने पछी ज बीजी कई हाथमां लेवानी एवो संकल्प छे. में दृष्टीए हुं हमणां जुदाजुदा गामडाओमां थोडाक दिवस रेहेवानो विचार करूं छुं. भिवापुर ९ दिवस रह्यो. सुरगांव ४ दिवस, अने ३ दिवसथी अहीं आव्यो छुं. वर्धानी साथे रोज नो संबंध राख्यो छे. भाई कुंदर रोज सांजे ज ज्या हुं होऊ छुं त्यां टपाल इ. लावे छे. ते सवारे मारी पासेथी चिठ्ठिओ इ. लई जाय छे.

सांजनी प्रार्थनामां वखत गामडाओमां ८ नो अनुकूल आवे छे. सवारे ४ वाग्या प्रार्थना करीज दऊं छुं. उठवानुं ३॥ वाग्यां. बपोरे तकली उपासना एटले ८—८ कलाकना ३ टुकडाओ ठीक थाय छे.

तकलीनी साथे मौन राख्युं छे. सामान्य सेकडों लोको ने माटे तकली बहु उपयोगी थई पडी छे. सुरगांवमां २० जण रोज तकली उपासना माटे आवता.

हुं जोऊं छुं के नित्य कांतवानो प्रचार कर्या वगर खादीने गति आपवानो दुसरो रास्तो नथी. कांतवाना नियमवाळा अमे जेलमां आश्रमवासीओ हता तेज. मने तो लागे छे खादीनी मंदगतीनुं आज कारण छे. खादीना उत्पत्तीनुं अने विक्रीनुं जे काम चाले छे (जो के ए हमणां मंद पडी गयुं छे) एता करता स्वावलंबन नुं महत्त्व विशेष छे. पण मनें तो आ बन्ने कार्य करता आ बन्ने कार्य ने अपनाववाने माटे यज्ञप्रचारनुं बहुं महत्त्व लागे छे. ए दृष्टीए बधा मित्रोनी साथे हमणां हुं चर्चा करी रह्यो छुं. आ कार्यमां तकलीनुं हुं असाधारण स्थान जोऊं छुं. आ यज्ञप्रचारकार्यमां आपणा तरफथी सूचनाओ जोइये.

छोटेलालजी, गोपाळराव वाळुंजकरजी अने बीजाओ फर्या ज करे छे. आवखते आश्रमना ना ना छोकराओए पण सरस काम कर्युं. कृष्णदास गांधी महाराष्ट्र चर्खा संघमां सुंदर कार्य करे छे. बधाने संतोष आपी शक्या छे. वर्धा जाऊं त्यारे एमने मळवानुं याद छे. बाळकोबानी तबियत हजी नबळी छे. कन्याओ अने छोकराओ ने एकाद कलाक शिखवाडे छे. प्रभुदास सूचवे छे के ए अल्मोडा जाय. हवानो एटलो मोटो फरक एमने अनुकूल थशे के केम ए हुं जाणतो नथी. आप शुं सूचवो?

जमनालालजीनुं धुलिया आवेला त्यारे २०८ हतुं. हुं छुट्यो त्यारे १७० हतुं. हवे एथी ओछु करवानी जरूर नथी. एम आमारी वच्चे वात थएली. एटले दूध विगेरे लेवानुं कहेलु. हवे १६५ एटले ६ पौंड घट्युं थे. मने तो अजी चिंता जेऊं लागतुं नथी. पण जानकीबेन बहु फिकर करे छे. में जमनालालजीने अने जेलरने लख्युं छे. जमनालालजीनो जवाब आव्यो नथी. जे जेलरनुं आव्यो ए पत्रनुं सरनामुं जमनालालजीए लख्युं

हतुं. एमा जेलरे लख्युं हतुं के चिंतानु कारण नथी. बधुं नियमित चाले छे. भाऊ साबरमती ठीक काम करी रह्यो छे. जो के बंधकोशथी हैराण छे. लखे छे के आपनी सूचनाथी तळवळकरने शरणे गयो छे.

गीताईनी पेहेली पांच हजारनी आवृत्ति खपी गई छे. बीजी छपाय छे. सरदार श्रीने प्रणाम.

विनोबाना दंडवत् प्रणाम.

कृतयुगी विनोबा,

तमारा कृतयुगनो द्वेष करवानुं कई कारण नथी. अमारी पासे पण कृतयुगी सरदार छे. (कृतं संपद्यते चरन्—या विनोबांच्या वृत्तीवरून हें लिहिलें). एटले तमाराथी एक मुठ्ठी तो वध्या ज ने? तमने खबर छे सरदार तो घणो वखत चालता ज होय छे. पोतानो नीपजे तो खावानुं पण चालता ज. ने गीता तो चालता ज घोखे छे. उच्चारने सारू तमारी पासे मोकलवा जोइये. अने तमारा हाथमां एक बेतरनी सोटी मोकवी जोइये. पण ए ल्हावो तमने मळे त्यारे.

तमे गरीबोने खूब फोसलावो छो. मारा जेवा गरीब ज्यारे तमारा कागळनी झंखना करे त्यारे एने लख्युं ज नहीं. अने ज्यारे ते मृत्युशय्यानी तैयारी करे त्यारे हवे लखीश एम लख्युं पण हवे देव जाणे कृतयुगीनी प्रतिज्ञा खोटी नथी जती जाणी. एटले तमारा प्रतिज्ञाना पालनने खातर पण मारे पथारी थी उठवानुं होय तो भले. तो तमारा कागळ नियमसर मळवा करवानी आशा राखीश.

आम टायलुं करी गंभीर कागळो लखी रह्यो छुं. तेमांथी मन खेच्युं अने साथे साथे ए पण सुच्युं के तमारा काम ने माटे टीका करवा जेवुं कशुं ज जणातु नथी. आ अग्निपरीक्षाथी देह अने जीव बन्ने पसार थई निकळशे तो कई लखवा जेवुं हशे तों लखीश. तमारो कागळ साचुं छुं.

तमारा विषे बांधेली बधी मारी आशाओ लगभग फलती आवी छे. एटले हवे पछीनी फळशे ज. लगभग नो अर्थ शरीर ने विषे छे. तमारूं शरीर वज्ररूप थवानी आशा बांधी हती. हवे थाय तो कोने खबर?

यरवडा मंदिर, १६-९-३२.

बापूना आशीर्वाद.

वर्धा : १३-१०-३२

पूज्य बापूनी पवित्र सेवामां,

आपना अनशन विषे हूं लगभग निश्चिंत छूं. केम के संतो ने शूळीए चडाववानी ताकद हिंदुस्थानमां हशे एम हूं मानी शकतो नथी. ते कदा च हशे तो पछी बेवकूफोमांथी ॲपॉसलो पण केम पैदा न थाय? जेलमां जवाने कारणे कुवाओ अने मंदिरो हरिजनो माटे खुल्ला करवानुं बंद पड्युं. पण लगभग बधा महत्त्वना मंदिरो खुला थया छे.

अनुक्रमणिका

शिवाजी, शंकरराव इ. ८ जण छुट्या छे. शिवाजीए गामडामां फरवानी शरुवात करी दीथी छे. बीजाओ तैयारीमां छे. शिवाजी, शंकररावनुं शरीर कईंक नबळुं थयुं छे. एक भाईने श्वासनी तकलीफ थई छे. बाकी बधा ठीक छे. महादेवभाई तथा सरदारने प्रेमपूर्वक प्रणाम.

विनोबाना दंडवत् प्रणाम.

वरील पत्रावरून कॉटन मार्केटमधील आचार्यांच्या त्या वेळच्या एकंदर आश्रमनिवासाची कल्पना येऊन शिवाय पत्रांतली सौम्य, नम्र आणि मर्यादेची मांडणी लक्षांत येते. लवकर च जप्त झालेला आश्रम सरकारनें परत केला. आश्रमचें जप्त केलेलें बहुतेक सामान परत दिलें. बहुतेक म्हणण्याचें कारण इतकेंच कीं, गीतारहस्यासारखीं एकदोन पुस्तकें आक्षेपार्ह म्हणून दिली नाहींत! सरकारी माणसांचें ज्ञान मोठें अजब होतें! बापटशास्त्रांच्या ब्रह्मसूत्र भाष्यांतल्या बादरायणाचार्य आणि शंकराचार्यांचीं चित्रें पाहून आश्रमचे हे दोन पुढारी आहेत असे सरकारी लोक समजत होते. आश्रम परत मिळाल्यावर जिकडे तिकडे झाडझूड करून, चुना लावून आश्रमच्या इमारती पूर्वींप्रमाणें पांढऱ्या स्वच्छ केल्या गेल्या.

**वासांसि जीर्णानि यथा विहाय**
**नवानि गृह्णाति नरोऽपराणि**
**तथा शरीराणि विहाय जीर्णान्**
**अन्यानि संयाति नवानि देही ॥**

जीर्ण वस्त्रें टाकून नवीन देह धारण केल्याप्रमाणें हा पूर्वीचा च आश्रम आतां अधिक समुज्वल दिसूं लागला. परंतु आचार्यांच्या मनांत आतां या जागेंत आश्रम करावा असें नव्हतें. आश्रम जप्त झाल्यानंतर खेड्यांत अनेक आश्रम निघावे या कल्पनेप्रमाणें च मुख्य आश्रमचें हि केंद्र येथें राहूं नये असा च आचार्यांचा कल होता. त्याप्रमाणें यापुढें आचार्य या आश्रमांत खास कारणामुळें च मधून मधून राहिले. आचार्यांचें नेहमींचें निवासस्थान येथून बदललें तें कायमचें च. आश्रमचीं कांहीं माणसें जरी येथें दिसत होतीं तरी आश्रमचें स्थान हि मानसिकदृष्ट्या आचार्यांबरोबर च बदललें असें म्हणण्यास हरकत नाहीं. आचार्यांचें आणि आश्रमाचें स्थान यापुढें खेड्यांत गेलें आणि तें हि हरिजनवस्तीच्या खेड्यांत गेलें. परंतु या निवासासंबंधीची माहिती पुढें च पहावयास पाहिजे.

●●●

अनुक्रमणिका

# प्रकरण ४७ वें

## कन्याश्रम

**आचार्य** आणि आचार्यांच्या आश्रमाच्या पवित्र सान्निध्यांत मुख्यतः कार्यकर्त्यांच्या मुलींची कन्याशाळा जमनालालजींनीं निर्माण केली होती. साबरमती-आश्रम हरिजनांना देऊन टाकल्यानंतर साबरमती आश्रमांतील पुष्कळशा मुली या कन्याश्रमांत सामील झाल्या. बापूजींच्या इच्छेप्रमाणें च ही गोष्ट घडून आली. लहान नदीला मोठी नदी मिळत नाहीं. मोठ्या नदीला लहान नदी मिळते. परंतु येथें उलट स्थिति झाली. येथली कन्याशाळा लहानशी असून साबरमतीच्या मुली अधिक होत्या. साबरमती आश्रमांतल्या पुष्कळशा कन्या येथें आल्यावर जणूं ही कन्याशाळा त्या आश्रमीय कन्यांत लीन झाल्यासारखी झाली. एका तऱ्हेनें येथल्या कन्याशाळेचें जीवन वाढलें. तिकडे बापूजींनीं साबरमती आश्रम हरिजनांना देऊन टाकला त्याप्रमाणें येथल्या आश्रमची जागा कन्याशाळेला दिली गेली आणि त्याचें कन्याश्रमांत रूपांतर झालें.

आचार्यांच्या आश्रमांतले कांहीं कार्यकर्ते येथें व्यवस्थापक, शिक्षक, सेवक अशा स्वरूपांत शेवटपर्यंत होते. आचार्यांचें येथें येणें जाणें व राहणें हें स्वाभाविकपणें च कन्याश्रमाचा आध्यात्मिक आधार असें मानलें गेलें होतें. कन्यांची संख्या वाढल्यामुळें जागा हि अपुरी पडली. त्यामुळें नवीन इमारत बांधून जागा वाढविण्यांत आली. पंडित खरे यांच्या पत्नी लक्ष्मीबाई खरे या स्वयंपाकादि सर्व कामावर देखरेख ठेवीत व स्वतः अतिशय मेहंनत घेत. पुढें हिंदुस्थानांतल्या बहुतेक प्रांतांतून अनेक मुली बापूजींच्या व जमनालालजींच्यामुळें येथें दाखल झाल्या. तरी हिंदी, गुजराथी आणि महाराष्ट्रीय अशा तीन प्रांतांतल्या मुली अधिक होत्या. त्यांच्यासाठीं निरनिराळे पगारी शिक्षक हि नेमले गेले. मुख्य शिक्षक नाना आठवले हे पुण्याचे असून टिळक महाविद्यालय, समर्थ विद्यालय, इत्यादि राष्ट्रीय संस्थांचे अनुभवी होते. अतिशय सौम्य वळणाचे असे हे गृहस्थ काकासाहेब कालेलकरांच्या पूर्ण परिचयाचे होते. त्यांचा पुढें येथें च अंत झाला. कुटुंबी शिक्षक कन्याश्रमाजवळ च अलग राहूं लागले. एकेकटे शिक्षक कन्याश्रमांत च रहात व कन्याश्रमाच्या रसोड्यांत जेवीत. मूळच्या लहानशा कन्याशाळेला बापूजींच्यामुळें भारतीय स्वरूप प्राप्त झालें. हा जरी कन्याश्रम होता तरी येथें विधवा आणि प्रौढ वयाच्या भगिनी हि शिकत असत.

पूर्वींच्या कन्याशाळेचें कांहीं वातावरण, कांहींसें साबरमतीचें वातावरण, कांहीं येथल्या आश्रमाचें वातावरण, कांहीं बापूजी आणि पुढाऱ्यांच्या आगमनाचें वातावरण, असा या कन्याशाळेंत संमिश्र वातावरणाचा प्रकार होता. त्यामुळें आचार्य प्रत्यक्ष येथें पुष्कळ दिवस राहिले. त्यांचें येथें येणेंजाणें नित्य जरी होते तरी आश्रमाप्रमाणें केवळ एकसूत्री अशा पद्धतीनें काम चालत नसे. कन्या, विधवा, प्रौढ स्त्रिया या सर्वांना निरनिराळ्या विषयांचें प्रत्यक्ष शिक्षण शाळेंतल्याप्रमाणें पुष्कळसें मिळालें पाहिजे अशा तऱ्हेचा एक विचारप्रवाह आंतून वहात असे. जीवनसंस्थेची कल्पना नसणाऱ्या लोकांची मजल या पलीकडे जाणें शक्य हि नव्हतें. कर्व्यांच्या स्त्रियांच्या संस्थांप्रमाणें च ही एक संस्था व्हावी असा एक विचार-ओघ होता. जमनालालजीसारख्यांची द्विविध दृष्टि होती. येथील स्त्रिया या पुरुषांप्रमाणें कार्यकर्त्या तयार व्हाव्या व ओळखीच्या गरीब कार्यकर्त्यांच्या मुलींची शिक्षणाची सोय हि व्हावी असें त्यांना वाटे. बापूजींचा भर औद्योगिक शिक्षण, शरीरश्रम आणि नीतिवर्धनावर च मुख्य होता.

अनुक्रमणिका

आचार्यांची पद्धति थोडी वेगळी असे. आचार्यांना अर्धवट काम करण्याची संवय नव्हती. त्यामुळें त्वयार्ध मयार्ध असें त्यांनीं कांहीं च केलें नाहीं. मुलींचा एक हि वर्ग त्यांनीं घेतला नाहीं. तथापि दोन्ही वेळच्या प्रार्थनेंत आचार्य हजर राहात. तकलीउपासनेच्या वेळीं हि आचार्य हजर असत. दर रविवारीं सकाळीं आठ वाजतां आचार्यांचें कन्याश्रमाच्या गच्चीवर प्रवचन ठेवलेंलें असे. त्यांतून मुलींना आणि शिक्षकांना जीवनपाथेय आणि शिक्षणदृष्टि प्राप्त होई. अशीं पुढील विषयांवर एकूण १६ प्रवचनें झालीं :—(१) साहित्य; (२) आकारावरून मनुष्यजीवनाचा दुहेरी प्रकार; (३) सेवांग शिक्षा; (४) जीवनसाधना की दैनिकता; (५) मनुष्य के पापपुण्य और भौतिक घटना; (६) रात्रिमौनरहस्य; (७) सेवार्थ धुनना; (८) तकली उपासना; (९) शिक्षण और बाल्यकाल; (१०) आत्मचिंतन; (११) आमच्या आध्यत्मिकतेचें एक गमक; (१२) बापूजी व स्त्रियांची जागृति; (१३) मुलामुलींचें परस्पर वर्तन; (१४) गीता; (१५) रोजनिशी; (१६) कन्याश्रमाच्या सत्राच्या अंतीचें प्रवचन—हीं सोळा हि प्रवचनें हिंदींत झालीं. आणि शिक्षक व मुली दोहोंना हि तीं नवीन दर्शन प्राप्त करून देणारीं ठरलीं.

"काव्यंयशसेऽर्थकृते व्यवहारविदे शिवेतरक्षतये" काव्यहेतूच्या विशदीकरणाचें हें प्रसिद्ध चरणद्वय घेऊन आचार्यांनीं पहिल्या प्रवचनांत साहित्याचा नवीन चतुर्विध हेतु सांगितला. मूळचे हे दोन चरण ज्यानें लिहिलें त्यानें त्यांचा अर्थ अगदीं च क्षुद्रपणें केलेला आहे. पण दगडांतून मूर्ति निर्माण करावी त्याप्रमाणें या श्लोकार्धांतून साहित्याचा उत्तमोत्तम हेतु आचार्यांनीं विशद करून सांगितला. साहित्याचा प्रथम हेतु—'यशोगान'—यशोगान परमेश्वराचें म्हणजे च सत्याचें. सत्याचें यशोगान म्हणजे अखेर जय सत्याचा च होतो हें हृदयांत ठसविणें. साहित्याचा दुसरा हेतु जीवनाचा—जीवनांतील क्रियांचा—नीट अर्थ समजून सांगणें, साहित्याचें तिसरें लक्षण ज्यायोगें व्यवहार ज्ञानमय होईल अशी सोय करून देणें, साहित्याचा चवथा हेतु व्यष्टि आणि समष्टीच्या पापाचा नाश होईल. चित्तशुद्धि हा साहित्याचा शेवटचा हेतु आहे. आचार्यांच्या या भाषणाचा शेवट असा आहे.

**"स वाग्विसर्गो जनताघविप्लवो**  
**यस्मिन्प्रति श्लोकमबध्यवत्यपि**  
**नामान्यनंतस्य यशोंकितानि यत्**  
**श्रुण्वंति गायंति गृणंति साधवः**

वही साहित्य—वही वाग्विसर्ग—ग्रंथरचना सज्ञन सुनते हैं, गाते हैं, गा के नाचते हैं कि जिसमें भगवान का यश वर्णित हो. जिससे चित्तशुद्धि हो. फिर भले ही उसमें भाषा की दृष्टी से चाहे जितनी गलतियां क्यों न हो. ऐसा साहित्य कि जो ईश्वर का—सत्य का—यशोगान करें. जीवन का अर्थ समझायें. व्यवहारशिक्षा दे. और जीवन की—चित्त की—शुद्धि करे—वह अवश्य शिक्षा में होना चाहिए"—दुसऱ्या प्रवचनांत आकारावरून मनुष्यजीवन पशुहून सर्वथैव कसें निराळें आहे हें आचार्यांनी समजावून सांगितलें. पाश्चात्य विकासवादाप्रमाणें खाण्यापिण्याच्या जरूरीमुळें मनुष्य विकसित झाला नाहीं. तर ज्ञानजिज्ञासेमुळें तो तयार झाला आहे. मनुष्याचा उभा आकार हा इतर प्राण्याहून सर्वथैव वेगळा आहे. जेथें पाय तेथें च डोकें हा पशूचा आकार आणि त्याच्या जीवनाचा हि तो च प्रकार आहे. परंतु मनुष्याचे पाय पृथ्वीवर आणि डोकें आकाशांत आहे. अनंत विचारांच्या सृष्टित डोकें सतत निमग्न असावें ही त्यांत योजना आहे. "लोकेऽस्मिन्द्विविधा निष्ठा" या भगवंतांच्या उक्तीचा मनुष्याच्या आकारांत पडताळा मिळतो. भूमीवर राहून मनुष्यानें कर्में करावीं आणि अनंत विचाराकाशांत त्याच्या मस्तकानें नेहमीं विहार करावा असें त्याचा आकार सांगतो. केवळ कर्मानें किंवा सेवेनें मानवजीवन पूर्ण होणार नाहीं. उच्च विचार आणि सेवा ह्यांची जोडी

अनुक्रमणिका

राहिली पाहिजे तर च मनुष्यता सिद्ध होईल. देह हें क्षेत्र आहे. या क्षेत्राद्वारें भूमातेची सेवा करावयाची आणि डोकें उंच राखून अनंत सृष्टीचें ज्ञान करून घ्यावयाचें—आकाशब्रह्माची उपासना करावयाची—या प्रवचनांत मानवजीवनसंबंधीं केवळ मनुष्याच्या बाह्य आकारावरून आचार्यांनीं एक नवीन विचार मांडला. तिसरें प्रवचन शिक्षणासंबंधीं झालें. शिक्षण हें शिक्षणासाठीं नव्हे तर सेवेचें अंग म्हणून—सेवेला जरूर म्हणून आवश्यक आहे; ही शिक्षणाची मूलदृष्टि पाहिजे. पाणिनीचें व्याकरण वेदाच्या अर्थासाठीं वेदांग म्हणून निर्माण झालें. पतंजलीनें वाक्यशुद्धीसाठीं व्याकरण, चित्तशुद्धीसाठीं योगशास्त्र, व शरीरशुद्धीसाठीं वैद्यकशास्त्र लिहिलें अशी आख्यायिका आहे. ही च खरी दृष्टि आहे. शिक्षण हें सेवेसाठीं हवें. ज्ञानतृष्णा म्हणून शिक्षण घेणें ही गोष्ट अगदीं च वेगळी आहे. वास्तविक सर्व शिक्षणाचें—सर्व ज्ञानाचें मूलतत्त्व हातीं येणें ही शिक्षणांत महत्त्वाची गोष्ट आहे. कारण सर्व शास्त्रांचें तत्त्व एक च आहे. व्याकरणांत ज्याप्रमाणें नामाची व्याख्या देऊन त्याचीं उदाहरणें देतात, त्याप्रमाणें मूळ एक तत्त्वज्ञान आहे. बाकीचे विषय हे त्या व्याख्येचे दृष्टांत आहेत. दुनियेंत जितके विषय आहेत त्या सर्वांचें मूलतत्त्व जाणलें जातें असें जें शिक्षण तें च अध्यात्म होय. अध्यात्म म्हणजे च आत्मज्ञान हा शिक्षणाचा आधार आहे. त्याचप्रमाणें शरीरारोग्य हें सेवेचें मूलधन आहे. शरीरारोग्य हा शिक्षणाचा दुसरा आधार आहे. तिसरीं शिक्षणांतील महत्त्वाची गोष्ट म्हणजे सामान्य ज्ञान. या सामान्य ज्ञानाच्या योगानें दुसऱ्यांच्या सेवेची कदर मनुष्य करूं शकतो. परंतु स्वतः सेवा करावयाची तर एखाद्या उपयुक्त विषयाचें विशेष ज्ञान पाहिजे. सेवांग शिक्षणाचें हें चवथें अंग आहे. अशा तऱ्हेनें सेवांग-शिक्षणाची चतुरंग कल्पना या तिसऱ्या प्रवचनांत आचार्यांनीं दिली. ज्ञानतृष्णेसाठीं रिकाम्या वेळेंत व्यवस्था करणें हें एक पांचवें शिक्षणाचें अंग परिशिष्टासारखें आचार्यांनीं या च प्रवचनांत सांगितलें.

प्रवचनांचें असें सार काढून त्या प्रवचनांची नीट कल्पना हि येणार नाहीं. कित्येक वस्तूंचें सार काढतां च येत नाहीं. प्रतिभायुक्त वस्तूंचे संक्षेप, विस्तार, सार, इत्यादि सर्व प्रकार प्रतिभाशून्य बनतात. म्हणून प्रतिभायुक्त कृतींचें समग्र अवलोकन हें च महत्त्वाचें असतें. आचार्यांच्या व्याख्यानाप्रमाणें च आचार्यांचा सोळा लटी कांतण्याचा प्रयोग हि मुलींना पहावयास मिळत असे. त्या भव्य गच्चीवरच्या माडीवर आचार्य पहांटेपासून थेट संध्याकाळपर्यंत अखंड सूत कांतीत असत. ज्ञान आणि कर्म आणि त्यांत मिसळलेली अपूर्व भक्ति हें सर्व पारमार्थिक सार येथें मूर्तिमंत झालेंलें मुलींना पहावयास मिळे. हा देवांना हि दुर्लभ असा लाभ होत होता. याचा सर्वांच्या जीवनावर अव्यक्त ठसा उमटला असला च पाहिजे. यांत तिळमात्र शंका नाहीं.

तथापि येथलें वातावरण आचार्यांच्या नेहमींच्या कार्यपद्धतीप्रमाणें एकसूत्री नव्हतें. येथें नेमलेंलें कांहीं नवीन शिक्षक आश्रमांत जीवनांत घोळलेले, अनुभवी आणि पूर्ण निष्ठावान् नव्हते. मुलींच्या या संस्थेची नैतिक जबाबदारी फार मोठी होती. ती जबाबदारी पार पाडण्याला सर्व शिक्षक लायक होते असें दिसून आलें नाहीं. किंबहुना मर्यादेचीं, व्यवहाराचीं सामान्य सूत्रें हि कित्येक शिक्षकांच्या आचरणांत दिसून येत नसत.

**यदीच्छेत्परमां प्रीतिं त्रयस्तत्र विवर्जयेत् ।**
**विवादद्रव्यसंबंधः परोक्षे दारभाषणम् ॥**

जर कोठें हि प्रेम रहावें अशी कल्पना असेल तर तीन गोष्टी वर्जाव्या. वृथा वादविवाद, द्रव्यसंबंध, स्त्रियादींशीं परोक्ष भाषण.—हें सुभाषित अगदीं सामान्य गोष्टी सांगणारें आहे. पण त्या सामान्य गोष्टी हि आंगवळणीं पडल्यानें जो लाभ व्हावयाचा त्याची हि कित्येक शिक्षकांना कल्पना नसे. या कन्याश्रमांत बापूजींच्या

अनुक्रमणिका

सूचनेप्रमाणें कित्येक मुलींच्या डोक्यावरचे केस त्यांच्या खुशीनें च अजिबात काढून टाकले होते. त्यांत स्वच्छतेचा मुद्दा तर होता च पण केसांशिवाय कन्या ही कल्पना च कित्येकांना करवत नाहीं. असें हें वृथा बंधन हि त्यांत तोडलें जात होतें. केशविहीन कन्यका विशोभित दिसतात कीं सुशोभित दिसतात? ही गोष्ट कितपत योग्य? —अशा तऱ्हेची चर्चा हि कित्येक करतांना आढळून येत. शिवाय कित्येक मुली पुरुषांप्रमाणें, पाटलोण सदरा वगैरे पोषाख करीत ही गोष्ट कितपत योग्य आहे? यांत मानसशास्त्रदृष्ट्या कांहीं दोष आहे काय वगैरे विवाद पुष्कळ वेळां जेवतांना हि आढळून येई. कोणती हि गोष्ट शिक्षकांनीं वाटेल तेथें चर्चावी हा शिक्षकांचा निःसंशय मोठा दोष समजला जाईल. अशा तऱ्हेच्या मर्यादांचें अतिक्रमण झाल्यानें कन्याश्रम बंद करावा अथवा पूर्णपणें तो आचार्यांनीं आपल्या हातीं घ्यावा असा प्रश्न जमनालालजी, बापूजी यांच्यापुढें उभा राहिला. खुद्द बापूजींनीं कन्याश्रम चालवावा अशी हि एक कल्पना होती. यावरून कन्याश्रमाला केवढें महत्त्व दिलें जात होतें हें लक्षांत येतें. त्या वेळीं जमनालालजींच्या सूचनेवरून आचार्यांनीं एक लेखीपत्र जमनालालजींना लिहून दिलें होतें.

●●●

अनुक्रमणिका

# प्रकरण ४८ वें


## प्रीतिसंगम

(अर्थात् नालवाडी-निवास)

**नदी** म्हटली म्हणजे पवित्रतेची पवित्रता डोळ्यांपुढें उभी राहते. तिच्या संगमांत पवित्रतेची परिसीमा वाटूं लागते. त्यामध्यें पुन्हां प्रीतिसंगमाची भर पडली म्हणजे जी अपूर्वता निर्माण होते, तिच्या योगानें मानवमनाची भेदबुद्धि हा एक केवळ भास आहे असें क्षणभर वाटल्यावांचून रहात नाहीं. मानवमनांतल्या भेदबुद्धीनें सर्वत्र सुखमय असलेल्या ईश्वरीसृष्टीचा विनाश करून दुःखी दुनिया निर्माण केली. ती दुःखी दुनिया सुखी व्हावयाची तर दुःखाच्या ठिकाणीं सुख, सुखाच्या ठिकाणीं आनंद, आनंदाच्या पुढें शांति अशा अनेक पायऱ्या गांठून ईश्वरी सृष्टीचा स्वर्ग डोळ्यांपुढें उभा रहावयाचा. त्यासाठीं भेदाचा उत्तरोत्तर निरास करीत जावयास पाहिजे, प्रेमाचा उत्तरोत्तर परिपोष व्हावयास पाहिजे. भेद हा च मुख्य भेद आहे. यासाठीं च आचार्यांनीं आश्रमप्रचारकांची खेड्यांत योजना केली होती. हिंदुस्थानांतला मुख्य भेद खेडीं आणि शहरें, सुशिक्षित आणि निरक्षर, दुसरा भेद स्पृश्य आणि अस्पृश्य. हा भेद नष्ट करण्याचा खेड्यांमध्यें प्रयत्न केला गेला होता. बापूजींच्या १९३२ च्या येरवडा कराराच्या उपवासानंतर स्वतः आचार्यांनीं खेड्यांत फिरून अवलोकन केलें आणि चळवळींत आश्रम जप्त होऊन परत मिळाला तरी खेड्यांत च रहावयाचें असें त्यांनीं निश्चित ठरविलें. त्यांत तें खेडें पूर्ण हरिजनवस्तीचें, वर्धा-नागपूर रोडवरचें, १॥ मैलांवरचें निवडलें. तें च नालवाडी. येथें आचार्यांच्या निवासामुळें सेवेचा आणि हरिजनसेवेचा खरोखर च प्रीतिसंगम झाला! आचार्यांच्या वर्धा तालुक्यांतल्या खेड्यांतील प्रचारकार्याचें जणूं नालवाडी हें एक फळ च निर्माण झालें. या फळांत भावी ग्रामसेवादि संस्थांचें बीज होतें.

वास्तविक नालवाडी खेडें हें मूळचें जुनें खेडें नाहीं. वर्ध्याच्या कलेक्टरच्या बंगल्याजवळ च हरिजन लोकांची पूर्वी वस्ती होती. ती वस्ती हालवून या वस्तीला नागपूर रोडवरचें हें ठिकाण दिलें गेलें. या खेड्याची त्या वेळीं सुमारें ५०० वस्ती होती. नवीन खेडें म्हणून एकापरीनें इतर खेड्यांच्यासारखी या खेड्याची अव्यवस्थित रचना नाहीं. कांहींशीं रचना येथें दिसे. आचार्यांनी येथें राहण्याला सुरुवात केली ती कशा तऱ्हेनें? येथें काय आचार्यांसाठीं नवीन जागा बांधली?—नाहीं. रस्त्याला लागून असलेलीं कांहीं घरें ओलांडलीं कीं, बकऱ्या कोंडण्याची बांबूच्या कामट्यांची वर साध्या कौलाचें छप्पर असलेलीं जागा होतीं. ती घेऊन तेथें च आचार्यांचा निवास सुरूं झाला. फार मजेदार जागा होती ती. आचार्यांच्या निवासामुळें तिच्याकडे बघण्याची दृष्टि बदलली होती हें खरेंच. पण ती बदललेली दृष्टि सोडली तरी ती जागा अतिशय उत्तम होती, असें म्हणावें च लागेल. तिची उत्तमता तिच्या मोकळेपणांत होती. नागपूर रोडवरून जाणाऱ्या सडकेवरच्या मोटारींची धूळ येथें मध्यंतरी कांहीं घरें आड असल्यामुळें कांहींशी कमी येई, तथापि रात्रंदिवस धुळीचा त्रास होता. हा त्रास सोडला तर जागा आल्हाददायक होती. मोठमोठ्या ठिकाणचे नकाशे दिले जातात पण असल्या साध्या सुंदरतेचें नमुने दुर्लक्षिले गेल्यामुळें मोठीं ठिकाणें क्षणभर पहायचीं आणि रहायचें मात्र कसें तरी अशी स्थिति सर्वत्र आढळून येते. ही पहा ती जागा.

अनुक्रमणिका




या जागेंत आचार्यांनीं राहण्याला सुरुवात केली. परंतु वास्तविक आचार्य नालवाडीला किंवा वर्ध्याला रहात होते हा भाग सर्व वरवरचा च. नालवाडीला राहण्यास येतांना आचार्यांनी बापूजींना एक पत्र लिहिलें त्यांत एक वाक्य होतें— “मी इतके दिवस वर्ध्याला राहिलों च नाहीं. मी आपल्या आज्ञेंत राहिलों.” बुद्धीचें परमोच्च शिखर गांठलेल्या पुरुषाची केवढी ही श्रद्धा! बापूजी हि यामुळें सद्‌गदित झाले. त्यांनीं या पत्राला पुढीलप्रमाणें उत्तर दिलें—

“तमे महत्त्वना कामोना केंद्र थशो.”

—बापूजींच्या पत्राप्रमाणेंच पुढें येथें मोठमोठ्या सेवेच्या योजना आचार्यांभोवतीं घडून आल्या यांत शंका नाहीं.

परंतु सुरुवातीला आचार्यांभोवतीं फक्त विद्यार्थ्यांचें च वातावरण होतें. दास्तान्यांचीं मुलें, जमनालालजींच्या मुली, नामदेव नांवाचा धनगर विद्यार्थि, भाऊ पानसे अशी विद्यार्थीमंडळी हळूंहळूं नालवाडीला जमत चालली. आचार्य साबरमतीहून वर्ध्याला आले तेंव्हा ही विद्यार्थीमंडळी घेऊन च आले होते. आचार्यांचें अंतरंग विद्यार्थ्यांपाशीं च अधिक खुलें होत असे. त्यामुळें ही स्थिति अगदीं स्वाभाविक होती. तथापि आश्रमचे एक धुरंधर कार्यकर्ते गोपाळराव वाळुंजकर हे लवकर च आपल्या कुटुंबासह येथें एका अलग घरांत राहूं लागले व त्यांच्याकरवी ग्रामसुधारणेकडे आचार्य लक्ष देऊं लागले. येथले आश्रमवासी पायखाने साफ करतात म्हणून या हरिजनवस्तीमध्यें हि आश्रमवासी हे अस्पृश्य ठरले. हरिजन लोक आश्रमीयांना आपल्या विहिरीवर पाणी भरूं देईनात. एकदां एका विद्यार्थ्याला या कारणासाठीं मार हि बसला. तरी आचार्यांतर्फेचें काम सरळ चालू च होतें. गांवामध्यें साफसफाई करण्याचें, गांवच्या लोकांना उद्योग मिळवून देण्याचें, गांवांत उत्तम शाळा तयार करण्याचें — अनेक तऱ्हेनें गांवचे काम हाती घेतलें गेलें होतें. गांवांतले लोक नेहमींप्रमाणें साशंक नजरेनें च आश्रमच्या या प्रवृत्तींकडे पहात. तथापि परिचय

हळूंहळूं वाढूं लागला. मधून मधून आश्रममध्यें काय काम चालतें हें पाहण्यासाठीं हरिजनमुलें डोकावूं लागलीं. खाण्यापिण्याला नीट मिळत नाहीं, घरीं कोणती हि नीट व्यवस्था नाहीं तरी केवळ निसर्गामुळें ज्यांच्या अंगावर तेजाची चमक दिसून येई अशीं तीं सांवळ्यारंगांचीं मुलें आश्रममध्यें मधून मधून कुतूहलानें डोकावतांना पाहून आचार्यांना बालकृष्णाची आठवण होई! बालत्व आणि देवत्व दोन्ही सुंदर! मिळून बालकृष्णत्व सुंदरांतील सुंदर!! — ईश्वरी भावनेंनें आचार्य त्या मुलांकडे पाहात. आचार्यांभोंवतालच्या विद्यार्थ्यांच्या बाबतींत हि आचार्यांची ही च दैवी दृष्टि दिसून येई. त्यामुळें गणिताचें शिक्षण असो कीं गीतेचें शिक्षण असो, भाषा विषय असो कीं व्याकरण विषय असो, अथवा केवळ नुसतें साधें बोलणें हि कां चाललेलें असेना—आचार्यांजवळ सदैव दैवी वातावरण वेढलेंलें असे. यामुळें च आचार्यांचे एकनिष्ठ विद्यार्थी आचार्यांपासून मिळालेला बोध थोडा थोडा स्वतःसाठीं उतरवून ठेवण्याचा. प्रयत्न करीत. यामुळें च आचार्यांच्या विद्यार्थ्यांना इतरांकडे शिकणें हि बहुधा पसंत पडत नसे. उघड च आहे. कोणापाशीं शिकतों हें च महत्त्वाचें, काय शिकतों हें महत्त्वाचें नाहीं. सर्वविषय शेवटीं एका च आध्यात्मिक विषयांत विलीन होऊन जातील अशी जेथें सहज सोय तेथें अन्यत्र शिकणें रुचेल कसें? आधीं आत्मज्ञान आणि मग जरूरी पुरतें अन्यज्ञान हा सिद्धांत सांगून पटणार नाहीं. त्याला प्रत्यक्ष सांगणारा तशा तऱ्हेचा विलक्षण अनुभवी पुरुष पाहिजे. आणि त्या अध्यात्माच्या अनुभवाच्या वैभवापुढें इतर भाराभर विषय तुच्छ आहेत ही प्रतीति आली पाहिजे. तशी प्रतीति विद्यार्थ्यांना आचार्यांच्या बाबतींत स्पष्टपणें येत असे. तारुण्यांत तत्त्वज्ञानाची वाढती वृत्ति आणि साधुसंगतीची आवड उत्पन्न व्हावी असें आचार्यांचें प्रेरक शिक्षण असे.

**किंबहुना स्वधर्मीं थोरू । अवसरीं उदारू ।**
**आत्मचर्चे चतुरू । एऱ्हवी वेडा ॥**

असा विद्यार्थि आचार्यांजवळ टिकूं शकत असे. विद्यार्थ्यांच्या ठिकाणीं कमालीचें मार्दव पाहिजे. परंतु तितकें च अध्यात्मिक तेज हि पाहिजे याचें हि शिक्षण आचार्यांकडे पाहून च सहज प्राप्त होई.

**तरि मऊपणें बुबुळें । झगडतां हि परी नाडळे ।**
**एरवी फोडी कोराळें । पाणी जैसें ॥१६·१५५ ॥**

एकदां आचार्यांकडे शिकणारी एक मुलगी मूळच्या आश्रमच्या जागेकडे कांहीं कामानिमित्त जात होती. जवळचा पायरस्ता शेतांतला होता. एका गुराखी मुलानें दुष्टपणें त्या मुलीचा हात धरण्याचा प्रयत्न केला. मुलीनें त्याला हिसडून ती निसटून गेली. मागून त्या मुलीला थोडें भय हि वाटलें. परंतु असें धैर्य दाखविलें गेलें तें अंशतः तरी आचार्यांच्या शिक्षणाचें कार्य मानावें च लागेल.

या नालवाडी आश्रममध्यें विद्यार्थी आणि विद्यार्थिनी एकत्र राहात असत. थोर गुरूच्या आश्रमांत स्त्री-पुरुष, विद्यार्थी-विद्यार्थिनी एकत्र राहण्यांत कोणती च हरकत नाहीं. वातावरण सहज च पवित्र आणि मर्यादायुक्त असल्यामुळें येथें शीलाचाराचें अतिशय उत्कृष्ट संवर्धन व्हावें यांत मुळीं च नवल नाहीं. समाजामध्यें स्त्री आणि पुरुष हा भेद आहे ही गोष्ट खरी तथापि स्त्रीपुरुष दोघांना एकत्र च राहून समाजांत जीवन व्यतीत करावयाचें असतें. खेड्यापाड्यांत स्त्रीपुरुष एके ठिकाणीं शेतावर मजुरी करतात. घरीं आईबाप, बहिणभाऊ हें च वातावरण असतें. तें च पवित्र आणि उद्योगमय वातावरण सर्वत्र राहण्याला कोणती च हरकत नाहीं. मुळांत स्त्रीपुरुषभेद हा खरा नसून आत्मा हा केवळ अभिन्न अशा स्वरूपाचा आहे. कृत्रिम भेद करून पवित्रता रहात नाहीं. पवित्रतेसाठीं विवेक आणि वैराग्य, ज्ञान आणि उद्योग यांचें

वातावरण पाहिजे. स्वातंत्र्याबरोबर मर्यादा पाहिजे. वास्तविक मुलामुलींच्या किंवा स्त्रीपुरुषांच्या संमिश्र समाजांत मनुष्याचें शील कमी होण्याचा संभव कमी असून तें वाढण्याचा च अधिक संभव आहे. स्त्रीपुरुषांत किंवा मुलामुलींत मलिनता आली तर तो अस्वाभाविक प्रकार असून ती विकृति आहे. स्वाभाविक स्थिति नव्हें. आचार्यांच्या आश्रमांत मुलें-मुली, विद्यार्थी-विद्यार्थिनी एकत्र राहण्याचा हा नालवाडीला पहिला च प्रसंग होता. आचार्यांच्या दैवीं प्रभावामुळें येथें विद्यार्थ्यांची उन्नति उत्तम तऱ्हेनें होत होती. तरी हि आचार्यांची नजर फार तीक्ष्ण होती. कोणी हि प्रार्थनेला हजर नसेल किंवा दुपारच्या १२ वाजतांच्या तकली उपासनेला हजर नसेल किंवा कोणी हि आपल्या कामांत अथवा अभ्यासांत हयगय केली तर आचार्यांना मुळीं च खपत नसे. एकदां केलेली सूचना पुन्हां करावी लागणें हें आचार्यांच्या शिस्तींत सहन केलें जात नसे. त्यामुळें आचार्यांना येथें प्रथम तीन दिवसांचा उपवास करावा लागला (ता. २-४-१९३३). विद्यार्थांसाठीं आचार्यांनीं हा प्रथम च उपवास केला होता. साबरमती आश्रम बापूजींनीं हरिजनांना समर्पण केल्यामुळें तेथील सर्व मुली व कांहीं शिक्षक वर्धा येथें मूळ आश्रमच्या इमारतींत आले होते व तेथें आचार्यांच्या तालमींत तयार झालेले कांहीं शिक्षक काम करीत होते. आचार्य मधून मधून तेथें जात असे. नालवाडी आश्रमपासून हा कन्याश्रम फार दूर नव्हता. त्या ठिकाणीं शिक्षकांना जी शिस्त लावून दिली होती ती शिस्त एकदां तुटल्यामुळें आचार्यांनीं सात दिवसांचे उपवास केले होते (ता. ७-६-१९३४). या उपवासांत च आचार्यांनीं गीताध्यायसंगति—सात दिवसांत गीतेचा पाठ—हा विषय पत्राद्वारें बापूजींच्या पुढें त्यांच्या इच्छेवरून मांडला होता.—पुढें गीताध्यायसंगति हें एक लहानसें पुस्तक च छापण्यांत आलें. या दोन्ही उपवासांची हकीकत रोजनिशीच्या स्वरूपांत जमनालालजींची आचार्यांजवळ शिकत असलेली मुलगी मदालसा हिनें लिहून ठेवलेली होती. लवकर च बापूजी हि वर्ध्याला आले. जमनालालजींनीं बापूजींना सर्व हकिकत कळविली होती. उपवासाच्या ४ थ्या दिवशीं ता. १०-६-१९३४ ला दुपारीं ४॥ ला बापूजी नालवाडीला आले. १० मिनिटेंपर्यंत आचार्यांशीं बोलणें झालें. बापूजींनीं नालवाडीऐवजीं मूळ आश्रमांत (कन्याश्रमांत) राहण्याची सूचना केली. त्या वेळेला मोठी वावटळ सुटली होती; तरी बापूजी पायीं च गेले. आचार्यांचें सामान घेऊन आचार्य व मदालसा मोटारींतून आश्रमांत आले. उपवासांत अनेक मंडळींशीं बोलणें व कामामुळें ताण पडत होता. म्हणून डॉक्टरांच्या सांगण्यावरून कांहीं दिवस आचार्यांनीं मौन ठेवलें होतें. १३-६-१९३४ ला उपवास सुटले. आश्रमच्या इमारतीच्या व्हरांड्यांत सकाळीं ७ ला उपवास सुटले. त्या वेळीं नालवाडीची, कांहीं खेड्यांची व आश्रमची मंडळी आली होती. बापूजी हि आले होते. आचार्यांनी स्वतः च भजनें म्हटलीं होतीं—

(१) फिरविलें देऊळ जनामाजीं ख्याति । नामदेवा हातीं दूध प्याला
(२) राम निकाई अपनी है सबही को नीक, ज्यों यह सांची है सदा तौ नीको
(३) पाहि न केहि गति पतितपावन......
(४) सुंदर सुजात कृपानिधान अनाथपर कर......
(५) प्रभु तरू कपि डारपर ते किये आपुसमान
    तुलसी कहूं न रामसे साहिब सीलनिधान

आचार्यांनीं इतकीं भजनें म्हटल्यावर एका विद्यार्थ्यानें धून आणि वैष्णवजन पद म्हटलें. यानंतर बापूजींनीं आपल्या हातानें ८ औंस मोसंबीचा रस दिला व उपवास समाप्ति झाली. उपवास समाप्तिनंतर हि एकदां एका विद्यार्थ्याला मर्यादाधर्म समजावण्यासाठीं आचार्यांचें मौन होतें म्हणून आचार्यांना स्वतःच्या डोक्यावर हातानें भारून घ्यावें लागलें होतें; कारण Fools rush in where angels fear to tread देवदूत जिथें पाऊल टाकण्याला भितात तिथें मूढ धसतात.

अनुक्रमणिका

यानंतर दोन च महिन्यांनीं एका सनातन्याला स्वयंसेवकानें मारल्यावरून बापूजींनीं आत्मशुद्धीसाठीं ७ आगस्ट १९३४ पासून १४ आगस्ट १९३४ पर्यंत सात दिवसांचा उपवास कन्याश्रमाच्या गच्चीच्या माडींत केला. १४ आगस्ट १९३४ ला या माडीवरच्या हॉलमध्यें आश्रमीय व इतर लोकांची गर्दी झाली होती. आचार्य एका कोपऱ्यांत बसत होते. इतक्यांत कोणाचें तरी लक्ष जाऊन आचार्यांना बापूजींच्या थोडें जवळ बसविण्यांत आलें. उपवाससमाप्तीच्या मांगल्यानिमित्त पहिल्या प्रथम आचार्यांनीं पुढील अर्थपूर्ण अभंग म्हटला—

**माझे मनोरथ पावले जैं सिद्धी । तयीं पायीं बुद्धि स्थिरावली**
**समाधान जीव राहिला निश्चळ । गेली हळहळ स्मरणें हें**
**त्रिविध तापाचें झालेंसें दहन । सुखावलें मन प्रेमसुखें**
**महालाभ वाचे वसे पांडुरंग । अंगाअंगीं संग अखंडित**
**जीवनाचा झाला ओलावा अंतरीं । विश्व विश्वंभरीं सामावलें**
**तुका म्हणे माप करूं आले सिगे । धार-बोळ गंगे पूर वाहे**

बापूजींच्या उपवाससमाप्तिनंतर आचार्यांच्या डोळ्यांतून भावावेशामुळें दोन अश्रुबिंदु ओघळले.

आचार्य जरी बापूजींच्या सूचनेप्रमाणें आश्रमांत राहूं लागले तरी आश्रम आणि कन्याश्रम एका च जागीं दोन संस्था ठेवण्याची आवश्यकता नाहीं अशा कल्पनेनें आश्रम या जागेवरून कायमचा च हलविला गेला. जीं थोडीं माणसें व विद्यार्थी येथें होते ते सर्व नालवाडीला गेले आणि मूळ आश्रमच्या जागीं केवळ कन्याश्रम चालू झाला. कन्याश्रमांत मुख्य म्हणून आचार्यांच्या तालमींतले बाबाजी मोघे यांना नेमण्यांत आले. छोटेलालजींना हि हिशेब वगैरे करण्याचें काम सोपविण्यांत आलें. आचार्य हि कन्याश्रम बंद करीपर्यंत येथें राहिले. परंतु नालवाडीला हि आचार्य पुष्कळ वेळ देत असे.

या वेळेपर्यंत आश्रमच्या सकाळच्या प्रार्थनेंत गीताईपाठ दाखल झाला होता च. परंतु त्या शिवाय नालवाडीला आचार्यांनी आश्रमच्या एकादश व्रतांचे श्लोक तयार केले होते ते हि दोन्ही वेळच्या प्रार्थनेंत सुरू झाले. नालवाडीप्रमाणें कन्याश्रमांत हि हे श्लोक म्हणण्याचा प्रघात सुरू झाला. कन्याश्रमांत बापूजींच्या मुक्कामांत त्यांच्याकडे येणाऱ्या हजारों साधकांच्या द्वारें हे श्लोक सर्व हिंदुस्थानभर पसरले. आचार्यांनी सर्व व्रतांचा ज्या मानानें आपल्या ठिकाणीं संग्रह केला त्या मानानें अन्य कोणी या व्रतांचा संग्रह करू शकला नाहीं. आणि म्हणून च आश्रमव्रतांचा संग्रह केलेले श्लोक नित्यपाठांत असावेत ही कल्पना हि कोणाला आली नाहीं.

**अहिंसा, सत्य, अस्तेय, ब्रह्मचर्य, असंग्रह**
**शरीरश्रम, अस्वाद, सर्वत्र भयवर्जन ॥**
**सर्वधर्मी समानत्व, स्वदेशी, स्पर्शभावना**
**हीं एकादश सेवावीं नम्रत्वें व्रतनिश्चयें ॥**

या दोन च श्लोकांत तत्त्वसंस्मरणाची सोय करून देऊन आचार्यांनी साधकांवर फार च मोठे उपकार केलें असें म्हणावें लागेल. या श्लोकासंबंधीं १० मार्च १९३४ ला "आपली जीवनसृष्टि" म्हणून एक नालवाडीला

प्रवचन हि झालें होतें. बापूजींना हे श्लोक अतिशय आवडल्याचें त्यावेळच्या हरिजनबंधूमधील साप्ताहिक पत्रावरून हि दिसून येईल. १२ जानेवारी १९३३ च्या हरिजनबंधूंत हे श्लोक दिलेले असून पुढीलप्रमाणें मजकूर लिहिला आहे—

कालांतरानें नालवाडीला गोपाळराव वाळुंजकरांनीं हरिजनांच्या कामांत समरस होण्यासाठीं म्हणून चामड्याच्या धंद्याचा हळूंहळूं अभ्यास केला. व आचार्यांच्या सल्ल्यानें क्रमाक्रमानें एक मोठें चर्मालय नालवाडीला निर्माण झालें. विणकाम हि येथें हळूंहळूं वाढूं लागलें. विणकरांसाठीं लहानलहान घरें घेतलीं गेलीं. नालवाडीची आचार्यांभोवतालची प्रवृत्ति एकामागून एक वाढत चालली. येथें अनेक मोठमोठे राष्ट्रभक्त, देशपरदेशांतले विख्यात लोक आचार्यांकडे येत आणि चटईवर बसून अनेक प्रकारचे संवाद होत. जमनालालजी किती तरी वेळां आपल्याबरोबर नव्या नव्या मंडळींना घेऊन येत आणि त्या बकऱ्या कोंडण्याच्या जागेंत वार्तालाप आणि नानातऱ्हेच्या कार्यविचारांत आचार्यांबरोबर समरसलेले दिसून येत. बापूजींच्याकडे आलेले अनेक लोक हि आचार्यांकडे नालवाडीला येऊं लागले. महादेवभाईंनीं बापूंच्या अनासक्तियोगाचें इंग्रजी भाषांतर करण्याचें सुरू केलें होतें. ते या वेळीं जेलमध्यें होते. तेथून एकंदर गीतेबाबत त्यांना आलेल्या शंका ते आचार्यांना विचारीत असत. त्या जवळ जवळ १०० प्रश्नांना येथून च आचार्यांनीं उत्तरें दिलीं. ते प्रश्न व त्यांचीं उत्तरें जवळच्या मंडळींनीं उतरवून आपल्या संग्रहीं ठेवलीं. या वेळीं आचार्यांनीं स्वतः रोज १६ लटी कांतण्याचा कार्यक्रम सुरू केला होता. हा कार्यक्रम अद्भुत च म्हणावा लागेल. आचार्य दोन्ही हातानें कांतीत असे. या संबंधी आचार्यांनीं एकाला एका पत्रांत माहिती दिली आहे.

(१) कांतणें १६ लटी.

(२) त्याबरोबर खालील कामें.—पत्रें वाचविणें—लिहविणें सुमारें २॥ तास, अध्यापन मुख्यतः श्रवणरूपै १॥ तास, मुलाखती, चर्चा इत्यादि १ तास, मौनपूर्वक कांतणें ४ तास = ९ तास. एकंदर मौनाचा वेळ १२ तास; बोलण्याचा वेळ १२ तास; तकलीवर गति वाढविण्याचे प्रयोग हि आचार्यांतर्फे सतत चालू होते. या प्रयोगांचा चरखासंघादि मोठ्या संस्थांना अनेक तऱ्हेनें लाभ मिळाला. ८/८ तास तकलीवर अखंड कांतण्याचे प्रयोग झाले. आचार्यांचे विद्यार्थी सत्यव्रत आणि भाऊ या दोघांनीं तकलीमध्यें प्रगतीचा अग्रेसरमान पटकावला होता. पण त्यामागें आचार्यांची प्रेरणा मुख्य होती. तिच्या अभावीं दोघे हि ढिले पडते. गीताईच्या प्रसारार्थ महाराष्ट्रभर फिरण्याची एक कल्पना आचार्यांच्या डोळ्यांसमोर आली. आणि त्यासाठीं प्रथम पंढरपूरच्या यात्रेंत दोघे आश्रमवासी पाठविले होते. महाराष्ट्रांतील तमाम सर्व यात्रांत जर आश्रमप्रचारकासारखे लोक जाऊं लागले व तेथें तत्वसंकीर्तन करूं लागले तर केवढें मोठें कार्य होईल. तेथल्या भोळ्या निरक्षर जनतेला केवढा आधार मिळेल! भोंदू साधूंच्यावर लोकांची श्रद्धा आहे तिचें स्थान बदलून त्यांची श्रद्धा डोळस होईल. गीतेसारख्या ग्रंथावर हिंदुस्थानची श्रद्धा एकवटल्यास अज्ञानाचा अंधकार दूर होईल अशा अनेक कल्पनांचे गीताईप्रचार हें मध्यकेंद्र झालें. खरोखर नालवाडीनिवासांत आचार्यांनीं नेहमींच्या सहजपद्धतीनें काय काय केलें हें सांगणें च कठिण आहे. येथें सरंजाम कार्यालय, गोसेवेचे केंद्र, गोपुरीची वसाहत, इत्यादि गोष्टी निर्माण झाल्या तो हि नालवाडीनिवासाचा विकास होता. एकदां नालवाडीला ज्ञानसत्राचा कार्यक्रम च राखला गेला होता. आचार्य नालवाडीला सुमारें ५ वर्षें तरी राहिले. तेवढ्या अवधींत त्यांच्या भोंवतीं अनेक सेवायोजनांची गर्दी उठून गेली होती. त्या वेळची आचार्यांची या सर्व लोकसेवेच्या योजनासंबंधींची एक मधुर कल्पना त्यांच्या एका पत्रावरून उत्तम तऱ्हेनें समजूत येते :—

अनुक्रमणिका

श्री. 						भुसावळ २० : ३ : ३६

तुम्ही तिकडचें काम संपवून जेव्हां कधीं वर्ध्याला येऊं शकाल तेव्हां शक्य तर पवनूर तुम्ही घ्यावें अशी मीं कल्पना केली आहे. आणि चर्मालय ज्याप्रमाणें सार्वजनिक जबाबदारीनें चालत आहे त्याप्रमाणें एक विणकाम संस्था चालावी आणि त्यांत शंकररावांची शक्ति वापरली जावी अशी मीं कल्पना केली आहे. पाहूं काय शक्य होतें तें.

पण शक्य झाल्यास ही एक सुंदर कल्पना आहे. कारण हिच्या मुळांशीं एक दृष्टि आहे. ती दृष्टि आतां स्पष्ट करतो. माझ्या मनांत उत्पन्न होणाऱ्या नाना कल्पनांविषयीं रामदासांचें एक वचन फार लागूं पडतें आणि तें माझ्या नेहमीं लक्षांत असतें.

**त्या कल्पना कोणास कळाव्या । कोणे येऊन आटोपाव्या**
**ज्याच्या त्यानें कराव्या । बळकट बुद्धीं ॥**

अशापैकीं च एक कल्पना आतां मी मांडीत आहे. माझ्या मनावर तिचें साम्राज्य च आहे असें म्हटलें तरी चालेल. आपल्या सिद्धांतांचा, विचारांचा, कल्पनांचा आणि जीवनाचा सार्वभौम प्रचार करण्याला तीन संस्थांची आणि तिहींची जोड घालणाऱ्या एका संयोजक व्यवस्थेची आवश्यकता आहे. एक जीवनविषयक प्रयोग करणारी आध्यात्मिक संस्था, जिच्यांतून नाना सेवकांचा, साधकांचा आणि शोधकांचा झरा वाहात राहील हिला आपण आश्रमसंस्था म्हणू. सध्यां वल्लभ वगैरे मंडळी ह्या विभागांत आहेत. दुसरी, निष्पन्न सेवकांना सेवाकार्य देऊन तद्विषयक उद्योग करणारी ग्रामसेवक-संस्था. ज्याला आपण ग्रामसेवामंडळ म्हणतो आणि ज्यांत तुम्ही मंडळी आहांत. तिसरी व्यापक क्षेत्रांत वाणी आदि द्वारा अनुभवलेल्या विचारांचा प्रचार करणारी प्रचार-संस्था. जें कार्य आज गीताईच्या आधारानें शिवाजी करीत आहे. ह्या तिघांचा जोड घालणारी, जिला आपण संस्था म्हणूं नये पण व्यवस्था म्हणावें, ती चौथी योजना, जें काम मजकडे आहे आणि ज्यांत दत्तात्रेयाची शक्ति खर्च पडणार आहे.

ह्या चार योजनांचा जर सुव्यवस्थित विकास करतां आला तर आपल्याकडून अपेक्षित ती योजना पूर्ण होईल. पैकीं आश्रमसंस्थेविषयीं माझी कल्पना अशी :— शरीरपरिश्रम हें जिचें शरीर, नित्यस्वाध्याय ही जिची वाणी आणि नैष्ठिक व्रताभ्यास हें जिचें हृदय अशी ती संस्था असावी. तिच्या भोंवतीं सुतारी, लोहारी, चांभारी, विणकाम, कृषि, गोरक्षा इ. उद्योगांच्या आश्रमानुकूल धोरणानें चाललेल्या पण आश्रमाहून स्वतंत्र अशा व्यावहारिक संस्था असाव्या. आश्रमांतील मंडळींनीं ह्या आसपासच्या संस्थांत शरीरश्रमाच्या वेळेपुरतें जावें आणि त्या त्या संस्थेंतील इतर मंडळींबरोबर मजुरांप्रमाणें मजुरी करून कमाई करावी आणि ती कमाई आश्रमांत जमा व्हावी. आणि आश्रमीय मंडळींच्या बाकीच्या वेळेची व्यवस्था आणि नियमन आश्रमानें करावें. ज्यांत आहारशुद्धि, स्वाध्याय, प्रार्थना, तकलीउपासना, व्रताभ्यास, आत्मपरीक्षण इ. वस्तु असाव्यात. म्हणजे अनेक व्यावहारिक संस्थांचा परीघ आश्रमरूपी मध्यबिंदूच्या आसपास असावा. अशा व्यावहारिक संस्था आज चर्मालय आणि सरंजाम कार्यालय ह्या दोन आहेत. तशी च एक विणकामाची व्हावी आणि सर्वांना इष्ट वाटलें तर शंकररावांची शक्ति त्यांत खर्च पडावी.

विनोबा

अनुक्रमणिका

आचार्यांना या अवधींत एका थोर गृहस्थानें भक्ति कशी करावी हा प्रश्न विचारला होता. त्याला आचार्यांनीं जें उत्तर दिलें त्यानें त्यांच्या अंतरंगाची किंचित् कल्पना येईल.

वर्धा

दिनांक १५ जुलै १९३५.

तुम्ही जेलमधून भक्तीच्या विकासासंबंधी प्रश्न विचारला होता. तो माझ्या नीट लक्षांत आहे. तुम्हांला अजून त्या प्रश्नाचें समाधानकारक उत्तर मिळालें नाहीं असें तुमचें म्हणणें आहे. मला हि तसें च वाटतें. पण अशा प्रश्नाचें समाधानकारक उत्तर देणें सोपें नाहीं. 'आधारावांचुनी काय सांगसी कहाणी' सांगणाऱ्याला तरी आधार पाहिजे ना? ऐकणाऱ्याची इमारत श्रद्धेवर उभी राहूं शकते. सांगणाऱ्याला अनुभवाशिवाय दुसरा पाया चालायचा च नाहीं.

भक्ति कशी करावी हें मी जाणतों असें अजून मला वाटत नाहीं. भक्तीचा एक रूढ माग, सर्वत्र चाललेला, तुमच्या आमच्या डोळ्यांसमोर आहे च. पण तो तुमच्या हि डोळ्यांत भरत नाहीं. आणि माझ्या हि डोळ्यांत भरत नाहीं. त्याला दोष देण्याची तर इच्छा नाहीं च. त्यानें जनतेंत भाविकपणाचा थोडा फार ओलावा राखला आहे हें कबूल केलें च पाहिजे. पण हा "भक्तीचा मार्ग" असें किती हि सहानुभूतीनें पाहिलें तरी म्हणवत नाहीं.

भक्तीचा मार्ग म्हटल्यास अति सोपा, म्हटल्यास अति कठिण असा आहे. एक च मार्ग असा दुहेरी कसा आहे? मुलाची सेवा करणें आईला सोपें आहे, दाईला कठिण आहे. मुलाची सेवा सोपी तर नाहीं च. परंतु प्रेमाचा ओलावा जिथें आहे तिथें काठिण्य उरत नाहीं.

देव भावाचा भुकेला आहे असें सगळें च म्हणतात. ह्याचा अर्थ तो अमुक एका पद्धतीचा भुकेला नाहीं असा आहे. पद्धतशीर भक्ति कोणती हें मला तर माहीत नाहीं च. पण कोणास माहीत आहे तें कोणास माहीत. मला वाटतें देवाची भक्ति कशी करावी हें देव च जाणतो. 'देवा मला भक्ति काय ती ठाऊक नाहीं, मी आपला तुझें नाम गातों' असें जेव्हां तुकाराम म्हणतो तेव्हां मी त्या म्हणण्यांत त्याचा विनय पाहात नाहीं. तें त्याचें वाक्य मला यथार्थ वाटतें. 'स सर्वविद्भजति मां' हें च खरें आहे. ज्याला स्वामीचें स्वरूप समजलें तो च त्या स्वामीची यथार्थसेवा—भक्ति—करूं शकेल. ईश्वराचें आकलन झाल्याशिवाय त्याच्या भक्तीच्या पद्धतीचें यथार्थज्ञान होणें नाहीं. पण ईश्वर अशा पद्धतीची आमच्यासारख्या अज्ञान बालकांकडून अपेक्षा च राखत नाहीं. तो प्रेमाची, खरेपणाची, भावाची, अपेक्षा राखतो.

भावपूर्वक केलेली अविरोध भूतसेवा, प्रेमपूर्वक भाकलेली देवाची करुणा, श्रद्धापूर्वक घेतलेले त्याचें नाम हें च आपल्या हातचें आहे. मला असें वाटतें, आज मी १६ लटी कांतून राहिलों आहे, ह्यांत माझी सर्व भक्ति भरलेली आहे. ह्याहून अधिक मी काय करूं शकणार होतों? भक्तीचें साधन जर तंबोरा हें होऊं शकतें तर चरखा हें हि होऊं शकलें च पाहिजे.

भक्तीच्या वाङ्मयाच्या समुद्रांत माशासारखा मी राहिलों आहे असें म्हणतां येईल. पण इतकें असून खरी भक्ति मला लाभली आहे असें अजून म्हणतां येणार नाहीं. तुकारामाचा एखादा अभंग ऐकून मी विरघळून जातो. पण तेवढ्यानें भक्ति मला कळली असें होत नाहीं.

अनुक्रमणिका

परंतु दोनचार वर्षांपासून एक वेगळा च अनुभव येऊन राहिला आहे. तुकारामाच्या अभंगाचा जसा परिणाम व्हावा, हूबेहूब असा च चरख्याचा किंवा कोंबड्याच्या किंवा जात्याच्या—हीं केवळ उदाहरणें दिलीं—आवाजानें माझ्या चित्तावर परिणाम होतो. ही हि भक्ति आहे असें म्हणतां येणार नाहीं. सृष्टीशीं सहानुभूति ह्यांत थोडी फार दिसतें असें म्हणतां येईल.

सूर्याच्या दर्शनानें कधीं कधीं डोळे भरून येतात, कधीं कधीं एखाद्या मित्राच्या डोळ्याकडे पाहता पाहतां त्याचें बोलणें ऐकतां ऐकतां रुपांत आणि शब्दांत विलक्षण फरक भासतो. धुळ्याच्या सार्वजनिक सभेंत व्याख्यान देत असतांना एकदां श्रोत्यांकडे नजर टाकली आणि एकंदर सर्व रूप पालटून गेलें. हा प्रकार नेहमीं होत नाहीं पण कधीं कधीं होतो. मी पाहतो कीं माझा देव आसपासच्या प्रेमी मंडळींत च आटून गेला आहे. त्यांच्यापैकीं कित्येकांच्या संगतींत असतांना इतकी पावनता वाटते कीं ह्याहून वेगळें ईश्वरदर्शन काय असेल अशी हि क्षणभर शंका येते. पण ही हि भक्ति असेल असें म्हणता येणार नाहीं. मानवाशीं सहानुभूति असें ह्याला नांव देतां येईल.

कधीं कधीं चिंतन करतांना तद्रूपता येऊन देहाचा विसर पडल्यासारखा होतो. अनेक पवित्र वस्तूंचें—ऋषि,संत, आई इत्यादींचें—तीव्र स्मरण होतें. पण ही हि भक्ति च आहे असें म्हणतां येणार नाहीं. चित्ताची चिंतनपरता ह्यांत दिसून येते असें म्हणतां येईल.

अशा प्रकारें कांहीं अनुभव आणि त्यांचा उणेपणा जो भासला तो मांडला. भक्ति अजून मला कळली नाहीं. तेव्हां मी ती तुम्हास काय सांगूं? पण भक्तीची आवश्यकता मला पटली आहे; तशी च तुम्हांला हि पटली आहे. भक्तीचें शेवटलें किंवा मधलें स्वरूप काय आहे, हें जरी आपणांस सांगता न आलें तरी भक्तीची आवश्यकता पटणें हें भक्तीचें पहिलें स्वरूप आहे, असें निश्चितपणें म्हणतां येईल. ह्या पत्रांत आतां ह्याहून अधिक कांहीं लिहिण्याची इच्छा होत नाहीं.

विनोबाचे प्रणाम

—अशा प्रकारें प्रेम भक्तिसेवेचा नालवाडी निवास हा प्रीतिसंगम ठरला! आचार्य नालवाडीला रहावयाला आल्यानंतर नालवाडी च काय सबंध वर्ध्याला च अशाप्रकारें प्रीतिसंगमाचें स्वरूप प्राप्त झालें. बापूजींचें येथें कायमचें निवासस्थान, मगनवाडीला ग्रामोद्योगाचें प्रयोगकेंद्र, सेवाग्रामला बापूजींच्या ग्रामसेवादिकांचें ठिकाण, वर्धाशिक्षण योजना, हिंदीशिक्षण केंद्र, गोपुरीची वसाहत, महारोगी सेवामंडळ, महिलामंडळ—अशा संस्था, अनेक संघ, अनेक सेवेचीं स्थानें अनेक सेवकांचा मेळावा वर्ध्याला जमनालालजींच्या निमित्ताने निर्माण झाला, हा हि प्रीतिसंगमाचा च प्रकार होय! आचार्यांची १९२१ ते १९३३ सालपर्यंतची १२ वर्षांची आश्रमाची तपस्या फळाला येऊन एका परीनें वर्ध्याला बापूजी जमनालालजी आणि सेवक व संस्थांच्यामुळें भारतीय संस्कृतीचें केंद्र निर्माण झालें. सव जगभर वर्ध्याचें नांव विख्यात झालें. तथापि आचार्य जगाला अज्ञात च होते.

**सा त्वस्मिन्परम प्रेमरुपा ।**

या पराभक्तीच्या प्रीतिसंगमांत अखंड मज्ञन करणाऱ्या आचार्यांकडे ज्यावेळेला बापूजींनीं निर्देश केला, तेव्हां बाह्य जगाचें लक्ष त्यांच्याकडे किंचित् वेधलें.

•••

अनुक्रमणिका

# प्रकरण ४९ वें

## ज्ञानगंगेचे कांहीं संवाद-बिंदु

**नालवाडीला** काय किंवा कन्याश्रमांत काय, बसलेल्या स्थितींत काय किंवा फिरतांना काय, आचार्यांच्या ज्ञानगंगेचा प्रवाह सारखा चाललेला आढळून यावयाचा. साधा प्रश्न असो कीं गुंतागुंतीचा प्रश्न असो, विधायक कार्यक्रमाची चर्चा चालों कीं, तत्त्वज्ञानाची चर्चा असो, व्याकरणाचा प्रश्न मांडला जावो कीं अर्थशास्त्राचा मांडला जावो—कोणता हि प्रश्न, कोणती हि चर्चा, कोणता हि संवाद—कांहीं कां असेना—नवीन दर्शन असलेले, सुव्यवस्थित मांडणीचे, अनुभवसिद्ध तर्कावर उभारलेले, प्रेरक, दिव्य आणि मोजक्या शब्दांतले विचार आचार्यांच्या मुखांतून प्रकट व्हावयाचे. ज्ञानांत कोठे च खंड नाहीं. ज्ञानाचा प्रवाह एकसारखा चालू च.

**न हि ज्ञानेन सदृशं पवित्रमिह विद्यते ।**

ज्ञानासारखे पावन जगांत कांहीं च नाहीं.

असें असलें तरी जगांत ज्ञानसंग्राहक फार च थोडे आढळून येतात. येथें केवळ एका व्यक्तिच्या अल्पशा सहजसंवादांतून व श्रवणांतून प्राप्त झालेल्या कन्याश्रमांतील व नालवाडींतील सात ज्ञानबिंदूंचें केवळ ओझरतें दर्शन मांडलें गेलें आहे. त्यावरून आचार्यांपाशीं असलेल्या ज्ञानगंगेची कल्पना करणें शक्य नाहीं. आपल्या जवळच्या लहानशा कुपींत आणलेंलें गंगाजळ पवित्र खरें च. परंतु त्यावरून त्या पापतापनाशिनी परमपवित्र गंगेची काय कल्पना येणार? तशी च येथली स्थिति आहे. तथापि या ज्ञानगंगेच्या संवादबिंदूवरून आचार्यांभोंवताली असलेल्या वातावरणाची कांहींशी कल्पना येते. या संवादात एक सहजसंवाद आचार्य आणि बापूजींमध्यें झालेला असून तो जवळजवळ शब्दशः उतरला गेला आहे. केवढें तें पावनस्मरण आहें! ज्ञानगंगेच्या या संवादसप्तबिंदूंना पुढील नांवें विषयाच्या सामान्य स्वरूपावरून दिलेली आहेत तारखांच्या क्रमाप्रमाणें हें बिंदू पुढें मांडले आहेत. त्यांतलें एक प्रवचन आहे. ते पुढील संवादाला आधार आहे.

(१) यज्ञ, दान, तप
(२) यतिभंग, संवत्सररूपकालात्मा
(३) व्याकरणाची चर्चा, मामेकं शरणं व्रज, दैवासुरसंपत्ति
(४) दोन छोटे संवाद
(५) योगपरंपरा, संन्यास व कर्मयोग
(६) सांख्य, योग, वेदांत, भक्ति आणि जडवाद
(७) संत, ब्रह्मचर्य, तुळसीरामायण, त्रिगुण, दैवासुरसंपत्ति, स्त्रीपुरुष, वार्धक्य.

## यज्ञ-दान-तप

आज मी कांहीं सांगूं इच्छितो. तेवढ्यासाठीं येथें बसलों आहे. मी सोळा लटी कांतून राहिलों होतों. पण रोज संध्याकाळीं हात दुखत असे. रात्रीच्या विश्रांतीनें तो ठीक होईल असें मानून मी त्या हातापासून काम घेत च होतो. व तो देत हि होता. पण क्वेटा दिनाच्या दिवशीं अर्धा उपवास होता. त्या दिवशीं तर हात फार च दुखूं लागला. तेव्हां मी डाव्या हातानें कांतणे सुरू केले. व आज सबंध डाव्या हातानें च कांतले. आज सहा लटी झाल्या. एवढ्या लटी होण्याला नेहमींपेक्षां वेळ हि गेला. तरी सोळा लटींपेक्षां हें काम पुष्कळ च झालें असें मी मानतों. कारण डाव्या हाताला कांतण्याचा अभ्यास मुळीं च नाहीं. त्यामुळें मला त्रास हि बरा च झाला. मी असें मानतों कीं ५/६ दिवसांत डाव्या हाताला अभ्यास होईल. माझा उजवा हात दुखूं लागला तेव्हां मला तें भगवंतांचें वाक्य आठवलें. “निमित्तमात्रं भव सव्यसाचिन्” जर भगवंतांची भक्ति करावयाची आहे, जर पूर्ण काम करावयाचें आहे, भगवंतांच्या हातांतले हत्यार व्हावयाचें आहे, तर कोणतें हि अंग अपुरें राखतां कामा नये. एवढ्यासाठीं ‘सव्यसाचिन्’ म्हटलें. आता मी अभ्यासानें डाव्या हातानें जेव्हां सोळा लटी कांतूं लागेन त्यानंतर आठ अशा दोन्ही हातांना लटी वाटून देतां येतील. त्याच्या योगानें शरीराला सम व्यायाम मिळेल. विषम व्यायामानें तोटा होतो हें मला माहीत होते. परंतु जोपर्यंत चालत होतें तोपर्यंत चाललें. आतां वेळ आली तेव्हां डावा हात सुरू झाला. समजा, जे एक लट कांततात त्यांचा रहाट थोडा बिघडला तर ते त्याची विशेष पर्वा करीत नाहींत. कारण कीं एक च लट कांतावयाची आहे बिघडला रहाट तर बिघडूं दे. थोडा जास्त वेळ लागेल असा मनुष्य विचार करतो. पण माझा रहाट बिघडून कसें चालेल. कारण त्यामुळें माझें काम लांबेल व ताण भयंकर पडेल. याचा अर्थ हा च कीं पूर्ण काम घेतल्याशिवाय कामांत बुद्धि दाखल होत नाहीं. कामाचा पूर्ण विकास होत नाहीं. आतां पूर्ण कामाची कल्पना केल्यामुळें च या डाव्या हातानें कांतणें सुरू झालें. त्याशिवाय अधिक लवकर कसें कांततां येईल याचा मी शोध करीत आहे. पण इतकें कांतावयाचें नसतें तर हा शोध विशेष मनांत भरला नसता. ज्यांना या कामांत रस आहे व थोडें बहुत समजतें हि त्यांच्याशीं हि मी या बाबतींत चर्चा करून राहिलों आहे. चक्राचा आकार मोठा करून किंवा अन्य उपायांनीं जर आठ तासांत किंवा त्याच्यापेक्षां लवकर सोळा लटी होतील तर ह्या खेडेगांवांतल्या लोकांत तें काम सहज सुरू होईल. आज भिवापूरचे लोक माझ्याकडे आले होते. १६ लटी होताहेत म्हणून त्यांनीं साक्षात् पाहिलें च. एकदा सोळा लटी जास्त आहेत हा भ्रम गेला म्हणजे काम सुलभ होईल. माझ्या ठिकाणीं ही वस्तु सिद्ध झाली ती जगांत सिद्ध च झाली म्हणून समजा. “जें पिंडीं तें ब्रह्मांडीं” युक्लिडच्या सिद्धांताप्रमाणें च हा सिद्धांत आहे. एका त्रिकोणाचे गुणधर्म ते च दुसऱ्याचे ते च तिसऱ्याचे समजावयाचे. आज राष्ट्रांत काम करणाऱ्यांची बुद्धि खादीच्या चळवळीच्या बाबतींत कुंठित झाल्यासारखी झाली आहे. त्यांना त्यामुळें नवीन दिशा मिळेल. जर मला यावर स्वावलंबन सिद्ध करतां आलें तर इतरांना तें सहज होईल. माझ्यापेक्षां गति ज्यास्त असणारीं पुष्कळ मुलें व मुली आहेत.

हें मीं एकप्रकारें तप च सुरू केलें आहे. कार्यकर्त्यांच्या कुंठित बुद्धीला चालना देण्याला ‘यज्ञ-दान-तप’ हा उपाय मीं योजला आहे. या सोळा लटी कांतण्याला मी तप म्हणतो. पण यज्ञ तकलीवर कांतल्याशिवाय होत नाहीं. अर्धा तास मी तकलीवर कांततो तो यज्ञ. यज्ञभावनेनें रहाटावर कांतणाऱ्याचा यज्ञ होत च नाहीं, असें मी म्हणत नाहीं. पण माझा यज्ञ मात्र रहाटावर कांतून होत नाहीं. यज्ञाला सर्व सुलभ-साधन पाहिजे. तें तकली हें च आहे. करोडों लोकांना तकलीवर कांतण्याची सोय आहे. हा यज्ञ झाला. दान हि मीं सुरू करून दिलें च आहे. रोज एक तोळा सुंदर पिंजलेले पेळू राष्ट्राकरतां देणें याला मी

दान मानतो. येथल्या ५/६ मुली असें दान मला देतात. पण बाकीच्यांचे पेळू सोळा लटी कांतण्यासाठीं उत्तम नसतात. असें कां? या कन्याश्रमांत जर उत्तम पेळू मिळणार नाहींत तर बाहेर कोठें मिळतील? मी दयेला म्हटलें 'तुझे पेळू उत्तम आहेत ना?" तर ती म्हणाली, 'तुम्ही आठ तास कांततां तर या पेळूंनीं फार तर साडे आठ तास कांतावें लागेल.' पण मी अशा उत्तराची अपेक्षा करतो कीं, 'विनोबा माझे पेळू घ्या तुमचा अर्धा तास वेळ वांचेल.' आधीं च माझ्यावर इतका भार आहे तो वाढवावयाचा कां कमी करावयाचा? शांतीनें मला पेळू दिले ते उत्तम नव्हते. आतां ती समजली आहे. प्रयत्न करीत आहे. जर उत्तम पेळू करण्याची इच्छा असेल तर त्याची बाबाजींकडून योजना करवून घ्यावी लागेल. शेतांतून साफ कापूस वेंचून घ्यावा लागेल. पावसाळ्यांत कधीं कधीं पिंजणे होणार नाहीं. तर तो दिवस सोडून दिला. पण बाकी रोज पिंजलें च पाहिजे. अशी कल्पना करूं नये कीं मी एकदम पांच तोळे पिंजून देईन. रोज काय?

मीं यज्ञ-दान-तप सांगितलें. यज्ञ तर चाललाच आहे. तप हि सुरू झाले. पण या मुली मला दान देत नाहींत. त्याचें कसें करणार? मुली म्हणतील—"पहा, अभ्यास, काम, पेळूचें दान आमच्यावर भार तरी किती लादणार आणखी?" पण असें म्हणतां कामा नये. तो गरुड नाहीं कां विष्णु भगवानाचें वाहन. विष्णुला तर पाठीवर घेतो च पण जर विष्णु म्हणाले, "लक्ष्मी हि आज बरोबर येणार आहे" तर तो म्हणतो "वाः छान, येऊं द्या." मी तयार आहे पाठीवर घेण्याला. पण जर भगवान म्हणाले "मी तर आहे च लक्ष्मी हि येणार शिवाय माझे भक्त हि आहेत" तरी तो आपला तयारच. त्याला कांहीं त्यांचा फारसा भार वाटत नाहीं. तसेंच आपलें पाहिजे.

मुलींमध्यें सुंदरता, नीटनेटकेपणा पाहिजे. मुलींनीं सुंदर पेळू करावे. सर्व कामें—प्रत्येक गोष्ट उत्तम तऱ्हेनें करावी व गरुडाप्रमाणें सेवेला सिद्ध राहण्याची इच्छा बाळगावी.

## संवाद २

## यतिभंग, संवत्सररूपकालात्मा

[२७-६-१९३५ दुपारीं ३। वाजतां अनुष्टुभ् छंदाचें लक्षण (गीताईंतील) ठरविण्यासाठीं शिवाजी वर आले. अगोदर च विनोबांच्या सांगण्यावरून अनुष्टुभाचे चार चार भाग पाडून त्यांचे प्रस्तार मांडलेला कागद त्यांनीं विनोबांच्याजवळ दिलेला होता. ते प्रस्तार व गीताईंतील अनुष्टुभाचें शिवाजींनीं केलेलें पृथक्करण पाहून लक्षण ठरवावयाचें होतें. जवळ च दत्तू इंग्रजी कवितांचीं पुस्तकें व डिक्शनऱ्या उघडून बसला होता......चर्चा सुरू झाली.]

शिवाजी :—"गीताईंत किंवा अन्यत्र आठ अक्षरांचा चरण मानण्याची आवश्यकता दिसत नाहीं. चाराचा एक चरण मानून लक्षण ठरवावें."

विनोबा—"नाहीं, तसें जर केलें तर यतिभंग वाटेल तितक्या ठिकाणीं होईल."

शिवाजी—"यतिभंगाचा दोष आठ अक्षरी चरण पाडून हि गीताईंत आला च असेल."

विनोबा—"असें गीताईंत बहुधा नाहीं. कोठें राहून गेलें असेल तर दाखव."

शिवाजी—"त्या दृष्टीनें मी अद्याप पाहिलें नाहीं. पण पहावें लागेल. पण 'जन्ममृत्युजरारोगदुःखदोषविचारणा' येथें कसें?".

विनोबा—"येथें यतिभंग नाहीं. सबंधच्या सबंध समास आहे. येथें तो तुटला जातो इतकें च."

शिवाजी—"मी अशा च तऱ्हेचीं उदाहरणें गीताईंत असतील असें म्हणतो."

विनोबा—"असें उदाहरण आणखी एखादें निघेल. पण मोरोपंतांच्या काव्यांत वाटेल तेथें विराम केलेले असतात. गीताईंत ज्ञानपूर्वक हें टाळलें आहे. हें शेलेचें काव्य हि येथें आहे. त्यांत हि असें च दिसून येते. पण अजून गीताईंत अशीं स्थळें राहून गेलेलीं आहेत. तीं मला खटकतात च. मूळ गीतेंत अशीं स्थळें आहेत तीं गीताईंत सुधारलीं आहेत. पण मूळ गीतेंत अशीं स्थळें नाहींत तेथें हि ती गीताईंत क्वचित आली आहेत. उ. कौन्तेय प्रति जानीहि न मे भक्तः प्रणश्यति" ही प्रसन्न रचना झाली तसें गीताईंत नाहीं. 'माझा' पद एका बाजूला पडतें. 'भक्त नाश न पावतो' असें म्हणून हि चालणार नाहीं असें हि नाहीं. मोरोपंतासारखी रचना केली तर ती वाचण्याला च उपयोगी पडावयाची. ऐकतां ऐकतां कळणार नाहीं व निरक्षर लोकांना तिचा उपयोग नाहीं. गीतेंत हि स्थितप्रज्ञाच्या श्लोकांत "विषया विनिवर्तन्ते निराहारस्य देहिनः ।—रसवर्ज्यम्" या दूरान्वयामुळें प्रसन्नता जाते. आतां संस्कृत असल्यामुळें सगळें च गोड लागतें तो भाग वेगळा. दुसरें तपाम्यहमहं वर्षं' येथें रचना तुटली त्यामुळें बरें वाटत नाहीं. शिवाय येथें क्रम हि बरोबर दिसत नाहीं. म्हणून गीताईंत 'तापतों सूर्यरूपें मी' असें लिहून सोडितो असें केलें आहे. कारण उन्हाळ्यानंतर पावसाळा हा सहज-क्रम आहे. पण गीतेंत तसा क्रम दिलेला नाहीं. हा संवत्सररूपकालात्मा आहे. तो तीन तऱ्हेनें प्रकट होतो. हिवाळा उन्हाळा पावसाळा. ज्ञानेश्वरांनीं काय लिहिलें आहे याच्यावर पहा.

शिवाजी—(ज्ञानेश्वरी पाहून)

'मी सूर्याचेनि वेषें । तपे तैं हें शोषे
पाठीं इंद्र होऊनी वर्षे । तैं पुढतीं भरे' ९—१९

विनोबा—"हां, म्हणजे ज्ञानेश्वरांनीं 'अमृतं चैव मृत्युश्च सदसच्चाहमर्जुन" या खालच्या ओळीप्रमाणें द्वंद्व घेतलें आहे. बरें, शंकराचार्य काय म्हणतात पहा."

शिवाजी—(भाष्य उघडून)

"तपामि अहं आदित्यो भूत्वा कैश्चित् रश्मिभिः उल्बणैः अहं वर्षंकैश्चित् रश्मिभिः उत्सृजामि उत्सृज्य पुनः निगृहामि कैश्चित् रश्मिभिः अष्टभिः मासैः पुनः उत्सृजामि प्रावृषि ।"

विनोबा—"हां, भाष्यकारांनीं मी म्हणतो तसें च घेतलें आहे. पण पुन्हां मुळाप्रमाणें साधण्याचा हि प्रयत्न केला आहे. इ. इ. इ.

(ता. ८-७-३५ संध्याकाळची वेळ ६ वाजतां आश्रमांतील गच्चीच्या मागच्या बाजूस विनोबा उघड्यावर जेवत आहेत. बाळकोबा समोर चटईवर बसले आहेत.)

शिवाजी—"रक्ष शब्द गीताईंत आला आहे. मूळ संस्कृतांत तो रक्षस् आहे."

अनुक्रमणिका

विनोबा—"पंतांनीं हि रक्ष शब्द पुष्कळ वेळां वापरलेला आहे. नपुसकलिंगी सकारान्त शब्द असला म्हणजे त्याचा स् काढून मराठींत तो शब्द वापरलेला दिसतो. मनस् चें मन, तेजस् चें तेज झालें तसें च रक्षस् चें रक्ष झालें. दुर्वासस् चें पंतांनीं दुर्वासा केले आहे. तें च बरोबर दिसतें. कारण सकारान्त पुल्लिंगी शब्द असला कीं त्याचा स् काढून मराठींत अकारान्त शब्द घेतला जातो. असें दिसते उ. चंद्रमस् चें चंद्रमा होतें. चंद्रम होत नाहीं.

शिवाजी—"पण 'दुर्वास' शब्द फार रूढ आहे."

विनोबा—"रूढ तर आहे च पण मूळ दुर्वासस् शब्द नपुंसकलिंगी कल्पून त्याचें दुर्वास केलेलें दिसतें. नचिकेतस् शब्दाबद्दल हि नचिकेता असें च म्हणतात."

शिवाजी—"गीतेंत अठराव्या अध्यायाच्या शेंवटीं शेवटीं "मामेकं शरणं व्रज" म्हटलें आहे. व तत्पूर्वी च—तीन श्लोकांपूर्वी 'तमेव' म्हणजे ईश्वराला शरणं गच्छं म्हटलें आहे. तर या दोन वाक्यांत फरक काय झाला?"

विनोबा—"त्या दोन वाक्यांत फरक असा आहे कीं, ईश्वर म्हणजे हृदयस्थ. हृदयांत असलेला. वमी म्हणजे सगुण गुरु. हृदयांतल्या प्रेरणेकडे पाहून तुला जसें वाटेल तसें कर असें म्हटलें. तत्पूर्वी प्रकृति तुझ्याकडून करवील च 'मिथ्यैष व्यवसायस्ते' असें म्हटलें आहे. त्या वाक्यांत गुलामगिरी वाटण्याचा संभव आहे. म्हणून हृदयस्थ परमेश्वराला म्हणजे अंतस्थ प्रेरणेला शरण जाण्यास सांगितलें. या अंतस्थ प्रेरणेला शरण जाणें हें 'गुह्याद्‌गुह्यतरम्' म्हटलें आहे. पण पुढें साक्षात् स्वतःला च शरण यावयास सांगितलें आहे. अंतस्थ ईश्वराला शरण जाणें म्हणजे ती निर्गुण वस्तु आहे. पण साक्षात् गुरुलाच शरण जाणें ही सगुण वस्तु झाली. ती सुलभ सोपी असल्यामुळें व निर्गुण स्वीकारून सगुणांचें महत्त्व दाखविण्यासाठीं स्वाभाविकपणें च मला शरण ये असें सांगितलें, व याला 'सर्वगुह्यतम्' म्हटलें. गीता हि वस्तुतः इथें च संपते. कारण 'मा शुचः' हा उपसंहाराचा शब्द हि येथें सांगून टाकला आहे.

**सर्वधर्मान्परित्यज मामेकं शरणं व्रज**
**अहं त्वा सर्वपापेभ्यो मोक्षयिष्यामि मा शुचः**

अशोच्यानन्यशोचस्त्वं येथून सुरुवात व मा शुचः येथें उपसंहार. पण अर्जुन मोहग्रस्त झाला आहे येथून सुरुवात मानली तर 'नष्टो मोहः' येथें उपसंहार मानावयाचा. 'बुध्दौ शरणमन्विच्छ' हें अगदीं च Rationalistic वाक्य आहे. 'तमेव शरणं गच्छ' ईश्वराला शरण जा हें त्याच्या पुढें जाऊन सांगितलेलें आहे. पण येथें हि अर्जुनावर च सर्व सोपविलेंलें आहे. समजा, एखाद्यानें पूर्ण समाधान होईल असा परीक्षणपूर्वक गुरु केला आणि त्या गुरुला हि शिष्याला Lead करतां येईल. तसें च पाहिलें तर कोणी च गुरु नाहीं. पण आपण आपल्याला Lead करतो च कीं नाहीं? त्याप्रमाणें शिष्याला हि Lead करण्याची शक्यता असली—म्हणजे शिष्याची सर्व स्थिति गुरूला माहीत असली, कांहीं आडपडदा, दोघांत कांहीं फरक नाहीं अशी स्थिती असली तर गुरूवर सर्व सोपवून दिलें म्हणजे झालें. तें किती सुलभ होईल. तें च येथें सांगितलें आहे. 'अहं त्वा सर्वपापेभ्यो मोक्षयिष्यामि' कांहीं फिकिर करूं नको मी पाहून घेतो सर्व. वस्तुतः ही गोष्ट कांहीं सोपी नाहीं. पुष्कळ माणसें म्हणतात कीं 'मी सोंपविलें तुमच्यावर सर्व' पण तें फार कठिण आहे. म्हणून च सर्वगुह्यतमम् म्हटलें आहे. ईश्वराला सोंपविणें निर्गुण तर मला सोपविणें सगुण आहे. मी म्हणजे गुरू किंवा

सगुण. ईश्वर म्हणजे अंतःप्रेरणा किंवा निर्गुण असा अर्थ घ्यावयाचा. नवव्या अध्यायांत हि 'इदं तु ते गुह्यतमं' म्हणून शेंवटीं 'मन्मना भव मद्‌भक्तो मद्याजी मां नमस्कुरु' असें म्हटलें आहे. बरोबर तसें च हि म्हटलें आहे. 'अहं त्वा सर्वपापेभ्यो मोक्षयिष्यामि' नवव्या अध्यायांत मोक्षसे अशुभात् म्हटलें आहे.

शिवाजी—"ठीक आहे पण "मा शुचः संपदं दैवीम्......" या वाक्यांत हि "मा शुचः" आलेंलें आहे."

विनोबा—"या वाक्याचा लोक जसा अर्थ घेतात तसा मी घेत नाहीं. 'मा शुचः' म्हणजे भिऊं नकोस. 'मा शुचः संपदं दैवीमभिजातोसि पांडव' म्हणजे अर्जुना, तूं दैवी संपत्तींत जन्मला आहेस. भिऊं नकोस. मी हे वाक्य केवळ अर्जुनाला उद्देशून मानीत नाहीं. तूं च एक दैवी संपत्तींत जन्मला आहेस असा त्याचा अथ नाहीं. तूं म्हणजे सर्व च माणसें. मनुष्य दैवी संपत्तींत जन्मला आहेस त्याला भिण्याचें कारण नाहीं. असा अर्थ मी करतों. मनुष्यांत आसुरी गुण नसतात असें नाहीं. पण पशूंत जसें अज्ञान असतें तसें मनुष्यांत नसतें. मनुष्य कसा हि असो, तो दंभी असो, लुच्चा असो, अभिमानी असो, त्याला दंभ चांगला, लुच्चेपणा चांगला असें कधीं च वाटत नाहीं. मनुष्य किती हि अस्वच्छ राहो, कचरा ही चांगली वस्तु आहे असें कांहीं तो मानीत नाहीं. म्हणजे च मनुष्यमात्राचा जन्म दैवी संपत्तींत झालेला आहे. जन्मतःच मनुष्य आसुरी संपत्तीचा नसतो. मनुष्य जन्मतःच आसुरी संपत्तीचा असणें शक्य नाहीं. हें च पहा ना, ही दैवी संपत्ति, ही आसुरी संपत्ति हा फरक तरी कोणी केला मनुष्यानें च ना? ज्ञानाशिवाय असा फरक करतां येणें शक्य नाहीं. ज्ञान हें दैवी संपत्तीचें लक्षण आहे. अज्ञान आसुरी संपत्तीचें लक्षण आहे. तेव्हां 'मा शुचः संपदं दैवीम्......' या वाक्यांत मनुष्यमात्राला आश्वासन आहे. केवळ अर्जुनाला च उद्देशून तें वाक्य घ्यावयाचें नाहीं. मनुष्य पशूप्रमाणें आसुरी संपत्तीचा नाहीं तेव्हां त्याला भिण्याचें कारण नाहीं."

मोघेजी—"पशु आसुरी संपत्तीचा म्हणता तर 'दंभो दर्पोऽभिमान......' इ. आसुरी संपत्तीचीं लक्षणें पशूंच्या ठिकाणीं असतात काय?"

विनोबा—"पशूंत अज्ञान असतें. त्यांत हें सर्व नाहीं कां येत?"

मोघेजी—"होय, अज्ञानांत सर्व च आले म्हणा."

विनोबा—"मी जीवशिवाचीं कल्पना अशी च मानली आहे. शिवाची कल्पना लोकांनीं निराळी च केली आहे. आतां मी जो आहे तो जीव. पण मला जें व्हावें असें वाटतें तो शिव. दंभ दर्प यांना Positive बाजू भासते म्हणून पशूसंबंधीं हा प्रश्न उद्‌भवला कीं पशूंत हि दंभ दर्प असतात कीं काय? पण वस्तुतः आसुरी संपत्ति Positive नाहीं च मुळीं. आपण अंधार हा प्रकाशाचा अभाव आहे असें म्हणतों. पण प्रकाशाला अंधाराचा अभाव असें म्हणत नाहीं. कारण प्रकाश Positive आहे. अंधार केवळ अभाव आहे. प्रकाशाला गति आहे तशी अंधाराला गति नाहीं. आसुरी संपत्ति हि तशी च आहे. आसुरी संपत्ति म्हणजे दैवी संपत्तिचा अभाव आहे. म्हणून च 'दंभोदर्पोऽभिमानश्च' म्हणून शेंवटीं 'अज्ञानं च' म्हटलें आहे. जेथें ज्ञान नाहीं ती आसुरी संपत्ति. या दृष्टीनें पाहिलें तर कुणी च आसुरी संपत्तींत जन्मत नाहीं. कारण आसुरी संपत्तीला अस्तिभाव च नाहीं. जरी आपल्याला गाढ अंधकार भासला तरी तेथें हि प्रकाशाचा पूर्ण अभाव असतो असें नाहीं. तसें च येथें हि समजावयाचें आहे."

शिवाजी—मग "दैवी संपत्तीच्या उलट आसुरी संपत्ति असें कां म्हटलें नाहीं?"

अनुक्रमणिका

विनोबा—"तेराव्या अध्यायांत जसें ज्ञानाच्या विपरीत तें अज्ञान असें म्हटलें आहे, तसें च म्हणून येथें हि संपविलें असतें. पण येथें आसुरी संपत्तीचा विस्तार वर्णिला. कारण दैवी संपत्तीचें वर्णन आतांपर्यंत पुष्कळ केलें होतें. त्यामुळें आसुरी संपत्तीचा अधिक खुलासा करण्याची जरूर वाटली."

शिवाजी—म्हणून च "दैवो विस्तरशः प्रोक्त" म्हटलेलें दिसतें.

विनोबा—पण ह्याचा अर्थ ह्या च अध्यायांत विस्तारानें सांगितलें असा घ्यावयाचा नाहीं. शिवाय "दैवो" म्हणजे दैवी संपत्ति नव्हे. तर "तद्वान्" असा अर्थ आहे. स्थित प्रज्ञ, योगी, त्रिगुणातीत, भक्त इ. इ. दैवी संपद्वान् पुरुषांची वर्णनें आतापर्यंत केलीं. आतां आसुर संपत्तिवान् पुरुषाचें वर्णन ऐक 'आसुरं पार्थ मे श्रुणु'—असा याचा अर्थ आहे. आसुर पुरुषांचें ताबडतोब चित्र हि पुढें उभें केलें आहे. मी पहिल्या अध्यायांत टिप्पणी लिहिलेली आहे. या सोळाव्या अध्यायाचे हे, म्हणजे पहिले तीन, दैवी संपत्तिचे व नंतरच्या आसुरी संपत्तीच्या लक्षणांचा एक श्लोक पहा म्हणून. तूं ती टिप्पणी पाहिलीस काय?

शिवाजी—"होय. ती मी पाहिली पण माझ्या लक्ष्यांत आली नाही. मी थोडा विचार केला; पण जास्त विचारासाठीं तेवढी च सोडून दिली."

[टिप्पणी– ($\frac{१}{४-६}$ आणि $\frac{१}{८}$) ह्या जोडीबरोबर पहा ($\frac{३६}{१-३}$ / $\frac{१६}{४}$)

विनोबा—"पहिल्या अध्यायांत जसें दोन्ही सैन्याचें वर्णन केलें आहे. त्यांत पांडवांकडच्या सैन्याचें तीन श्लोकांत व कौरवांकडच्या सैन्याचें एका श्लोकांत वर्णन आहे. तसेंच येथें आहे. पहिल्या तीन श्लोकांत दैवी संपत्तिच्या सेनेचें वर्णन करून पुढें एका श्लोकांत आसुरी संपत्तीचें वर्णन केलें."

शिवाजी—"त्या टिप्पणीचा अर्थ आता लक्ष्यांत आला."

विनोबा—"दुसरी एक गोष्ट आज च रहाटावर कांतीत असतां चिंतनांत येऊन गेली. बहुतेक वेळ वर्ग घेण्यात च जातो. त्यामुळें चिंतनाला फार वेळ नसतो च. पण आज किंचित् वेळ उरला त्यांत चिंतन झालें."

**"तानहं द्विषतः क्रूरान्संसारेषु नराधमान्**
**क्षिपाम्यजस्त्रमशुभान् आसुरीष्वेव योनिषु**
**आसुरीं योनिमापन्ना मूढा जन्मनि जन्मनि**
**मामप्राप्यैव कौन्तेय ततो यान्त्यधमां गतिम्"**

—आसुरी योनींतून उत्तरोत्तर खाली जातां जातां शेंवटीं आसुरी संपद्वान् कोठे जातों? त्याच्या पतनाला कांहीं अंत आहे किंवा नाहीं? –आई ज्याप्रमाणें मुलगा कसा हि असो, त्याच्याकडे तिचें लक्ष असतें व तो हि आईजवळ जाऊं शकतों तसें च बरोबर येथें आहे. किती हि खालच्या आणि मूढ योनींत असो, जीवाला परमेश्वराच्या आठवणीची शक्यता आहे. त्याला बुद्धि नसेल, न्यायव्याकरणादि पृथक्करण त्याला करता येणार नाहीं, पण हृदय असल्यामुळें हृदयांत दुःखानें ईश्वराचें स्मरण होणें कधीं ना कधीं शक्य आहे च. एवढ्याच साठीं 'मामप्राप्यैव कौन्तेय' म्हटलें आहे. थोर थोर योग्यांना हि ईश्वरप्राप्ती होत नाहीं. असें असतां 'मामप्राप्यैव कौन्तेय ततो यान्त्यधमां गतिम्' मला न मिळविता हे आसुरी योनींतींल लोक उत्तरोत्तर खांली

जातांत हे म्हणण्यांत स्वारस्य काय? त्याचा अर्थ च असा कीं ‘मामप्राप्यैव’ म्हणजे माझ्याकडे न वळतां, माझें स्मरण न होतां मला न मिळविता याचा कांहीं च अर्थ होत नाहीं. मी आसुरी योनींत त्यांना कां टाकतो तर त्या दुःखानें तरी ते माझ्याकडे येतील, मला मिळतील. म्हणजें अगदीं मूढांतल्या मूढ योनींत हि ईश्वरभक्तीची शक्यता आहे हें यावरून दिसून येतें.

शिवाजी—“मामप्राप्यैव” या पदांवरून असें दिसतें कीं याहून अन्य अर्थ करणें चुकीचें ठरेल.

विनोबा—“त्या वाक्यामुळें तर आहे च. पण त्या वाक्याचा हा अर्थ च आईच्या अनुभवाशिवाय कल्पिता येत नाहीं.”

इतक्यांत प्रार्थनेची सुरुवात झालीं असें मुलींनी सांगितलें. पाऊस पडत होता म्हणून प्रार्थना गच्चीवरील हॉलमध्येच ठेवली गेली होती. विषयाचा ओघ एकदम बंद पडला. भगवंताच्या स्मरणांत तो मिसळला. पण प्रार्थनेंत हि “मामप्राप्यैव” चा ध्वनि उमटत होता.

## दोन छोटे संवाद

आज तारीख ९ ऑगस्ट १९३५. सायंकाळची वेळ. जेवण आटपून विनोबा गच्चीवर फिरत आहेत. आकाश खुलें आहे, सभोवार सृष्टीवर हिरव्यागार गवताची झूल पडली आहे. स्वच्छ आणि सुखकारक वारा मंद मंद वाहून राहिला आहे, गच्चीवरून क्षितिजापर्यंतचा सर्व प्रदेश दिसत आहे, तें समोर चितोडें गांव, तसें च तें बोरगांव,—तेंथें च काकासाहेब रहात आहेत. समोरच नालवाडी, नुकतीच पेरणीं केल्यामुळें आजूबाजूचीं तीं हिरवीं शेतें. समोरच्या शेतांत पांढरी शुभ्र दिसणारी ती नित्य-स्थाणु समाधि किती ही रमणीय सृष्टि! भगवंताची ही लीला पहात पहात विनोबा इकडून तिकडे फिरत आहेत. ते का सौंदर्यदृष्टीनें ह्या सृष्टीचें अवलोकन करीत असतील? नव्हे, आई सुंदर आहे किंवा नाहीं इकडे मुलाचें लक्ष च जात नाहीं. “ती आपली आहे—अगदीं आपलीं च, सर्वस्वी ती आत्मरूप आहे. किती प्रेमळ! निव्वळ बोधाची मूर्ति!! मांगल्याची परमसीमा!!!” —मुलाच्या मनांत मातेविषयीं याहून अन्य विचार काय येणार? त्या मातेची दृष्टि घेऊन, ह्या सृष्टीची दृष्टि करून, चिंतनाची नवीन नवीन विश्वें तो रचीत असतो. विश्वकर्म्याची कला त्याच्या चिंतनापुढें फिकी पडते. फिरतां फिरतां शिवाजींनीं मध्यें च प्रश्न विचारला. लगेच संवादाला सुरुवात झाली. अशा तऱ्हेनें त्या नव्या दुनियेचें दार किंचित् किलकिलें झालें व तेथल्या अमोल रत्नराशींच्या किंचित् अस्फुट दर्शनाचा लाभ झाला. (संवाद ऐकत जवळ च वल्लभभाई व कृष्णदास गांधी उभे होते.)

शिवाजी—“प्रज्ञा आणि बुद्धि असे दोन शब्द स्थितप्रज्ञाच्या श्लोकांत वापरले आहेत. स्थितप्रज्ञ आणि स्थितधी मुनि यामध्यें कांहीं भेद दाखविण्याचा उद्देश आहे काय?”

विनोबा—प्रज्ञा आणि बुद्धि यामध्यें तसा कांहीं फरक नाहीं. “तदस्य हरति प्रज्ञां” या ठिकाणी ज्ञानेश्वरांनीं मात्र विशेष अर्थ केलेला असावा असे दिसतें.

**“जैसी नाव थडिये ठाकितां । जरी वरपडी होय दुर्वाता**
**तरी चुकलाही मागौता । अपावो पावे**
**प्राप्तेंही पुरुषें । इंद्रियें लाळिलीं जरी कौतुकें**

अनुक्रमणिका

**तरी आक्रमिला जाण दुःखें । सांसारिकें"**

असें लिहून प्रज्ञा म्हणजे पलीकडे गेलेल्या थोर पुरुषाची बुद्धि, असा अर्थ सुचविला आहे असें दिसतें. तरी नक्की त्याच्या मनांतला भाव सांगता येणार नाहीं. स्थितधी मुनि आणि स्थितप्रज्ञ असा फरक कित्येकांनीं केला आहे. पण तसा अर्थ करण्याचें कांहीं कारण नाहीं. वस्तुतः स्थितप्रज्ञ हा शब्द अर्जुनाच्या प्रश्नापूर्वीच्या श्लोकावरून सुचलेला आहे. "समाधौ अचला बुद्धिः यदा स्थास्यति निश्चला"—यावरून स्थितप्रज्ञ समाधिस्त हे शब्द निघाले.

शिवाजी—"ज्ञात्याच्या हि मनाला इंद्रियें खेंचून नेतात हें विशेष सांगितलेंलें दिसतें." (तदस्य हरति प्रज्ञां......)

विनोबा—"अशी अजब शक्ति आहे. ती ज्ञात्याच्या हि मनाला ओढून नेते. 'यदा संहरते चायं.....' येथून 'तस्माद्यस्य महाबाहो.....' येथपर्यंत इंद्रियनिग्रह कां करावा, कसा करावा हें सांगितलें आहे. प्रयत्न आणि बुद्धि परिपूर्ण वापरून इंद्रियनिग्रह करावयाचा. परंतु मनांतील सूक्ष्म वासना तरी हि जात नाहींत असा अनुभव येतो. आपला Force कमी पडतो असें अनुभवास येतें. तेवढ्यासाठीं सांगितलें 'युक्त आसीत मत्परः' म्हणजे भक्तीची येथें आवश्यकता आली. सबंध दुसऱ्या अध्यायांत भक्ति कोठें आली नाहीं. ती तेथें च फक्त आली आहे. उघड च आहे सिद्धांत (सांख्य) सांगितलें त्याचें Application योग सांगितला आतां उरतें काय? परंतु तेवढ्यानें पुरे पडत नाहीं असा अनुभव येतो. बारा बारा वर्षे जी वासना मनांत उद्भवली नाहीं ती एकाएकीं समोर उभी राहते. कशी येते कोठून येते कांहीं कळत नाहीं. तेवढ्यासाठीं 'युक्त आसीत मत्परः' म्हटलें आहे. मी मुद्दाम अनासक्तियोगांत बापूंच्याकडून या श्लोकावर नोट घालायला लावली. (नोट—एटले भक्तिविना—ईश्वरनी सहायविना पुरुष प्रयत्न मिथ्या छे) त्या नोटेनें कांहीं विशेष लक्ष्यांत येत नाहीं म्हणा. कारण कीं त्यांनीं एका ओळींत च ती संपविली आहे. प्रयत्न आणि बुद्धीची पराकाष्ठा करणें म्हणजे च 'युक्तत्व' तें तर पाहिजे च. पण तेवढ्यानें मनोमळ निःशेष धुवून निघत नाहीं. म्हणून 'युक्त आसीत मत्परः' म्हटलें आहे. अशा रीतीनें सांख्य व योगांतर भक्तीचा महिमा दाखविला आहे."

शिवाजी—"टिळकांनीं हि 'मत्परः' यावर एक लहानशी नोट लिहिली आहे."

विनोबा—"होय, पण तींत असें आहें कीं, मत्पर यांत भक्तीचें सूतोवाच झालें आहे—म्हणजे पुढील ९—१२ वगैरे अध्यायांतील भक्तीयोगाचें."

शिवाजी—"होय, त्यांचें असें च म्हणणें आहे."

विनोबा—"पण माझी थिअरी अशी आहे कीं गीता दुसऱ्या अध्यायांत समाप्त च होते. जर येथें भक्ति सांगितली नसती तर तेवढी अपूर्ण च राहिली असती. म्हणून हि भक्तिचें येथें स्थान आहे. वस्तुतः चालू विषय भक्तिचा नाहीं. पण तिच्याशिवाय चालत नाहीं असा अनुभव येतो. तेराव्या अध्यायाचा विषय सगळा क्षेत्रक्षेत्रज्ञाचा पण तिथें हि "इति क्षेत्रं तथा ज्ञानं..." "मद्भक्त एतद्विज्ञाय मद्भावायोपपद्यते" असा भक्तिमय उपसंहार केला चौदाव्या अध्यायांत सांख्यशास्त्र संपवलें तेथें हि भक्ति आणली च. "मां च योऽव्यभिचारेण भक्तियोगेन सेवते । स गुणान् समतीत्यैतान् ब्रह्मभूयाय कल्पते" पंधरावा अध्याय वेदांताचा तेथें भक्तीचें काय काम? पण तेथें हि पहा. उपसंहार करतांना "यो मामेवमसंमूढो जानाति पुरुषोत्तमम् । स सर्वविद्भजति

माम् सर्वभावेन भारत" असा भक्तिमय उपसंहार केला. सर्वमय परमेश्वराचा महिमा तेथें हि दाखविला. कारण भक्तिशिवाय पूर्ति होत नाहीं. बुद्धीच्या हातांत इंद्रियें येत नाहींत. पुढाऱ्याच्या हातांत अनुयायी पाहिजेत, त्याच्या मागोमाग त्यांनीं यावे. परंतु त्याच्या ऐवजीं अनुयायांच्या मागें पुढारी जातात. बुद्धीप्रमाणें मन व मनाप्रमाणें इंद्रियें वागली पाहिजेत. पण होतें उलट. इंद्रियांमागें मन व मनामागें बुद्धि जाते. म्हणून "ध्यायतो विषयान्पुंसः" हा श्लोक मनावरच्या आक्रमणाचा व त्याच्या पुढचा बुद्धीवरील आक्रमणाचा आहे. कारण इंद्रियामागें मन व मनामागें बुद्धि जाते. तिसऱ्या अध्यायांत हि "इंद्रियाणिमनो बुद्धिरस्याधिष्ठान" असें म्हटलें आहे. इंद्रियें—मन—बुद्धि असा च क्रम आहे. 'यो बुद्धेः परतस्तु सः' असें म्हणून 'एवं बुद्धेः परं बुद्ध्वा संस्तभ्यात्मानमात्मना। रूजहि शत्रुं महाबाहो कामरूपं दुरासदम्' असा उपसंहार केला. म्हणजे पुन्हां प्रयत्न आणि बुद्धि पूर्ण चालवून बुद्धीपलीकडच्या परमेश्वराची–त्याच्या भक्तीची आवश्यकता दाखविली च. परवां मी सांगत होतो ती नोट आतां पुरी केली. १६ व्या अध्यायांत नुसतें नीतिशास्त्र आहे. पण तेथें हि भक्ति शिवाय गति नाहीं. "मामप्राप्यैव कौन्तेय ततो यान्त्यधमां गतिम्" आसुरी जीवाचें पतन कोठपर्यंत माझें स्मरण त्याला नाहीं तोपर्यंत. म्हणजे त्याला बुद्धि नसली तरी तो हि तरूं शकतो. कारण भक्ति शक्य नाहीं असा जीव च नाहीं. भक्ति Instinctively प्रत्येक जीवमात्राला आहे च. ईश्वराकडे एक तर ज्ञानानें जातां येईल किंवा भक्तीनें, प्रेमानें जातां येईल. ज्ञान बुद्धि सर्वांना च लभ्य असेल असें नाहीं. भक्ति मात्र सर्वांनाच Instinctively आहे.—म्हणजे शक्य आहे."

शिवाजी—"जर भक्ति आहे तर बुद्धि हि असली च पाहिजे."

विनोबा—"तसें च पाहिलें तर जो जो म्हणून जीव आहे त्याला थोडी चिच्छक्ति, चिति आहे. पण ती जगण्यापुरती बुद्धि. ती बुद्धि ईश्वरी ज्ञानाला योग्य अशी बुद्धि नव्हे. असें कांहीं साधन असलें च पाहिजे, कीं जें सर्वांना लभ्य आहे. तें साधन कोणतें?—तें साधन म्हणजे प्रेम, भक्ति. "स्त्रियो वैश्यास्तथा शूद्रास्तेऽपि यान्ति परां गतिम्" याचा अर्थ हा च आहे. इतकें च नव्हे तर "येऽपि स्युः पापयोनयः" असें हि पुढें म्हटलें आहे—जे कोणी पापयोनि असतील तें सुद्धां तरून जातात. पापयोनि म्हणजे कोण? के ते?—"स्त्रियो वैश्यास्तथा शूद्राः"—असें शंकराचार्यांनीं म्हटलें आहे. पण माझें मत तसें नाहीं. शंकराचार्यांनींसुद्धां त्या वेळच्या समजुतीप्रमाणें एक उत्तर देऊन टाकलें आहे इतकें च. शिवाय त्या ठिकाणीं पापयोनि कोण हा कांहीं मुद्दा नव्हता. पापयोनि तरतात एवढें च सांगावयाचें आहे."

शिवाजी—"बरोबर आहे. त्या वेळीं कांहीं तो मुद्दा नव्हता."

विनोबा—"पण माझें म्हणणें असें कीं पापयोनि म्हणजे स्त्रीवैश्यशूद्र नव्हेत. त्यांना ज्ञानाची शक्यता आहे. साधनें नाहींत इतकें च. टिळकांनीं पापयोनि म्हणजे गुन्हेगार जाती असा अर्थ केला आहे. पण गुन्हेगार जातींत ज्ञानाची शक्यता काय नाहीं? तेव्हां ज्यांना ज्ञानाची शक्यता च नाहीं ते पापयोनि पश्वादि, असा अर्थ. माझा पापयोनि या शब्दाचा अर्थ असा आहे. पण पापयोनि म्हणजे पश्वादि, धेन्वादि मात्र नव्हे. कारण गाईच्या ठिकाणीं बुद्धि आहे. म्हणजे ज्यांना ज्ञानाची शक्यता नाहीं ते पश्वादि पापयोनि. ज्यांना शक्यता आहे परंतु साधनें नाहींत ते स्त्रीवैश्यशूद्रादि. ज्यांना ज्ञानाची शक्यता आहे व साधनें हि आहेत ते ब्रह्मर्षि, राजर्षि असा याचा अर्थ झाला. ज्यांना हातपाय आहेत, त्यांना ज्ञानाची शक्यता आहेच. पण ज्यांना साधनें नाहींत व ज्यांना शक्यता हि नाहीं. त्यांचा परमेश्वराशीं संबंध कसा यावयाचा? त्यांचा परमेश्वराशीं संबंध येतो तो हृदयाच्या बाजूनें. परमेश्वराशीं संबद्ध आहेत च. समजा आंधळा मनुष्य आहे तर त्याला सूर्य दिसणार नाहीं म्हणून त्याचा सूर्याशीं कांहीं च संबंध येऊं शकणार नाहीं असें थोडें च आहे. त्याच्या

चामडीला सूर्यप्रकाशाचा स्पर्श होतो. ऊष्णतेच्या योगानें त्याचा सूर्याशीं संबंध येतो. वर्तुळाचा Circumference वर निरनिराळे बिंदू परस्परांपासून किती हि भिन्न अंतरावर असोत. पण ते सर्व बिंदु मध्यबिंदूशीं सारखे च संबद्ध आहेत. ईश्वर हा जीवनाचा मध्यबिंदु आहे. त्याचा सर्वांशीं संबंध आहे च. बुद्धिमान्, स्त्रीवैश्यशूद्र, पश्वादि जडजीव यांच्यांत परस्परांत किती हि अंतर असो परमेश्वराशीं ते सर्व सारखे च संबद्ध आहेत. Circumference वरचे बिंदू च मध्यबिंदूला पाहात नाहींत. आपलीं तोंडें त्यांनीं दुसरीकडे फिरवली आहेत त्याला तो मध्यबिंदु काय करणार? तो सर्वांना पहात च आहे. त्याची दृष्टी सर्वांवर सारखी आहे.

"वेदाहं समतीतानि वर्तमानानि चार्जुन
भविष्याणि च भूतानि मां तु वेद न कश्चन"

* * *—इतक्यांत बापू गच्चीवर आल्याचें वल्लभभाईंनीं सांगितलें. चि. गुलाबनें लगबगीनें चटई आंथरली तिच्यावर बसतां बसतां च ते म्हणाले—

बापू—"केम विनोबा, आजे कांई बोलवुं छे के?"

विनोबा—"ना विशेष नथी. पण थोडुं बोलीज लऊं"

बापू—"हां, केम के हुं पण जरा वेलो ज आव्यो छुं"

विनोबा—"में कांतवानी शरुवात करी त्यारथी ज रोज हाथ दूखतो हतो. रात्रे ऊंघ लीधा पछी ए ठीक थशे एम हुं मानतो हतो. पण तेम बन्धु नथीं. ने छेवटे हात वधारे दुखवा लाग्यो"

बापू—"ए तो दूखे ज. एक हाथथी आटलुं काम न लई शकाय"

विनोबा—"छेवटे डाबा हाथ थी शरुवात करी. पेहेले दिवसे छ लट कांती पण तेने बार कलाक लाग्या"

बापू—"बार कलाक लाग्या के?—हा, ए तो पेहेलो दिवस एटले तो लागेज ना?"

विनोबा—"पण नऊ दिवस पछी डाबे हाथे बार लट कांती शक्यो. आजे तो बन्ने हाथ थी कांत्यु छे"

बापू—"केटलुं थयुं"

विनोबा—"सत्तर लट"

बापू—"एम के? सत्तर लट थई? कांई थाक लाग्यो के?"

विनोबा—"ना जी, प्रमाणमां बहु ओछो"

अनुक्रमणिका

बापू—“हा, ए हुं पण जोई शकुं छुं. कारण शुं के बन्ने हाथे काम करवाथी समता आवी जाय छे. एटले थाक ओछो ज लागे तो. हुं तो लखुं छुं पण खरो ने डाबे हाथे?”

विनोबा—“लखवा करता कांतवुं घणुंज सेहेलुं”

बापू—“ए तो बरोबर छे. डाबे हाथे अमुक ज काम करवुं ने जमणे हाथे अमुक करवुं एमां कांई विशेष अर्थ न बतावी शकाय. जापानी लोको कहे छे ते खबर छे ना? तेओ कहे छे “अमे तो दुनियामां बमणा छिए केम के अमे बन्ने हाथे काम करी शकिये छिए. बन्ने हाथे काम करे छे तेथी ए लोकोमां कंई उणप देखाई आवे छे एम तो नहीं ज कहीं शकाय. ए लोकोनुं शरीर पण सारूं होय छे. बुद्धि ने आत्मा पण उन्नत छे एम में तो जोयुं छे.”

विनोबा—“बन्ने हाथे कांतता आंखने पण समता मळी जईने दृष्टि पण थकती नथी.”

बापू—“ए छे ज. पण वळी एवी दलील करवार पण छे के डाबा हाथने वधारे काम न अपाय.”

विनोबा—“जेम उपरथी समता देखाय छे तेम शरीरनी अंदर बन्ने बाजूना अवयवो समान नथी. तेथी एवी दलील थई शके.”

बापू—“ए छे. पण मारो अनुभव पण मने कहे छे ना के ए दलीलमां कांई वधु वजुद नथी. एम तो दरेक बाजूनी दलीलमां ओल्यु कांईक सत्य तो रहे ज छे. ने जापानी माणसोमां आपणे नथी जोतां?—आजे मारी पासे जापानी साधु छे. ते तो साधारण गणाय. कोई बहु बुद्धिशाली एम् तो न ज केहेवाय. पण ए जे काम करे छे जे अने आपिये तो तो शांतीथी करतो ज जाय छे. ने जो ने एनाउपर कोई पण जातनो अंकुश नथी छतां. ए केवो पोताना कार्यक्रममां, प्रार्थनामां बब्बे कलाक मश्गुल थई जाय छे. एने शुद्धतानो केवो ख्याल छे. एणे बजारमाथी पोताने माटे जापानी कपडुं आण्युं. भाऊए मने एनी खबर आपी. मे भाऊने कहयुं के तुं एने समजावजे. कारण शु के तुं तकली शिखवाडे छे तेने. हुं कहुं तो संभव छे के एने बहु खराब लागे. पछी में कहयुं एणे के जे देशमां तुं रहे छे ते देशनुं कपडुं वापरवुं जोइये. जापानमां जापानी कपडुं स्वदेशी गणाय. पण अत्यारे तो तारु स्वदेशी आ छे. एणे तो एकदम कबूल कर्युं ने कांई दलील न करी. में आजे एक गंभीर भूल करी. एनो गुरु छे ते हिंदुस्थानमां बौद्धधर्मनो प्रचार करे छे. एने हवे पैसा पण मळे छे घणा. पण एणे कोई दिवस हाथ लंबांवीने, अपीलो काढीनें, घर घर भटकीने पैसा मेळव्या नथी. एनी श्रद्धा छे के जे यश एने मळयुं छे ते तो मात्र अनुष्ठानने प्रतापे. एटले जापानमां जेम के इंग्लंडमां हमणा हिंसक पवन वहे छे छतां त्यां पण ऋषिओ तो छे ज.

* * *? (इतक्यांत भाषणाचा ओघ आहारावर गेला) लिंबडो मोटा प्रमाणमां खाइए तो नुकसान थाय पण आमली थी एम नथी थतुं. अपवासमां लिंबडो चालतो नथी एम मने अनुभव थयो छे. पण एकलो लिंबडो खावो ज होय तो एनी साथे गोळ के मरी होवी जोइए. भणसाळीए पूछयुं के हुं एकलो लींबडो खाऊं? त्यारे में कह्युं के तमारा त्यागमां हुं दखल देतो नथी. पण मने ए वस्तु प्रिय नथी. में कह्युं के साथे गोळ खाओ तो? तेनी एणे ना ज पाडी. इ. इ. इ.”

विनोबा—“एमना विचारो एक ज दिशामां जाय छे एम जणाय छे”

अनुक्रमणिका

बापू—“बहुज”

—इतक्यांत घंटा झाली. प्रार्थनेसाठीं सर्वजण उठले. संवादाची समाप्ति झाली. प्रार्थनेला जातां जातां गीतेच्या त्या श्लोकाचें स्मरण झाले.

सततं कीर्तयन्तो माम् यतन्तश्च दृढव्रताः
नमस्यन्तश्च मां भक्त्या नित्ययुक्ता उपासते ।

## योग परंपरा, संन्यास व कर्मयोग

(ता. ३१ जुलै १९३५ मंगळवार सायंकाळ. स्थळ सत्याग्रहाची गच्ची. वल्लभभाई, शिवाजी, मोघेजी उभे आहेत. वारा जोरानें वाहात आहे. जिकडे तिकडे थंड हवा पसरली आहे. विनोबा फेऱ्या घालीत आहे.)

शिवाजी—“अपरं भवतो जन्म परं जन्म विवस्वतः । कथमेतद्विजानीयां त्वमादौ प्रोक्तवानिति?” असे अर्जुन म्हणतो. पण हें काय म्हणणे आहे? सूर्याचा जन्म पलीकडचा असून त्याला योग कृष्णानें सांगणें काय अशक्य आहे?”

विनोबा—“त्याचा अर्थ असा कीं सृष्टीच्या आरंभी हा योग सूर्याला सांगितला—ज्या वेळीं सूर्य उत्पन्न केला त्या वेळीं.”

वल्लभभाई—“सूर्य म्हणजे हा सूर्य असा अर्थ कां घ्यावा? विवस्वान् नावांचा राजा असा अर्थ कां घेऊं नये?

विनोबा—“शब्द विवस्वत् आहे. विवस् म्हणजे प्रकाश. तेव्हां विवस्वत् म्हणजे सूर्य. पण तो सूर्य आजचा नव्हे. पुरातन सूर्य घ्यावयाचा.”

शिवाजी—“संन्यास निव्वळ सिद्धि आहे आणि कर्मयोग साधन हि आहे. अशी कल्पना शंकराचार्यांची दिसत नाहीं. पांचव्या अध्यायाच्या सुरुवातीच्या श्लोकावर शंकराचार्यांनीं भाष्यामध्ये याच्या उलट स्थिति मांडलेली आहे. त्यांचे म्हणणें असें कीं “कर्मयोग हें साधन आहे व संन्यास हें हि साधन आहे. पण सिद्धाचा ज्ञानमय संन्यास निराळा. साधन संन्यास शमदमयुक्त च परंतु ज्ञानरहित” हें कसें?”

विनोबा—“होय त्यांनी असें म्हटलें आहे.”

शिवाजी—“तसेंच हा ज्ञानरहित संन्यास श्रेष्ठ कीं कर्मयोग श्रेष्ठ असा प्रश्न उपस्थित करून त्याला उत्तर जें दिलें त्यांत “शमदमात्मक संन्यास कर्मयोगापेक्षां कठिण. म्हणून “कर्मयोगो विशिष्यते” म्हटलें आहे. “असें त्यांचें म्हणणें आहे. संन्यासांत शमदम लागतात तसे कर्मयोगांत लागत नाहींत काय?”

विनोबा—“संन्यासांत शमदम लागतात म्हणजे तेथें केवळ शमदमात्मक अवस्था आहे. सगुणनिर्गुणासारखें आहे हें. संन्यासांत निव्वळ शांति आहे ती कांहीं सामान्यतः जमत नाही. केवळ स्वस्थ

राहावयाचें कसें? तेव्हां कर्मयोग सोपा. तेथें शमदम आहेत पण केवळ स्वरूपानें नाहींत. संन्यासांत नुसता शमदम आहे."

शिवाजी—"पण शंकराचार्यांचें असें हि म्हणणें आहे कीं सिद्धावस्थेंत कर्म शक्य नाहीं. हें कसें?"

विनोबा—"त्यांच्या म्हणण्याचा कल असा आहे कीं संन्यासांत—सिद्धावस्थेंत कर्म जवळ जवळ नाहीं असें च होईल. आणि हें म्हणणें खरें आहे. तसें च पाहिलें तर ज्ञान झालें कीं देह गळून च पडावा. पण कुंभाराच्या चाकाची उपमा देऊन तो राहूं शकतो हें जसें दाखविलें जातें, त्याप्रमाणें सिद्धावस्थेंत कर्म हि राहूं शकतें असें दिसतें. प्रत्यक्ष भगवान हि मी कर्म करतो असें म्हणतात. तेव्हां संन्यासांत कर्म उरत नाहीं असें तर म्हणणे शक्य नाहीं. पण तें जवळ जवळ नाहीसें होतें ही गोष्ट मात्र खरी आहे. दुसरें असें मानलें जातें कीं 'ज्ञानी ज्ञानामुळें अकर्मी राहील तर लोक आळशी होतील—त्याचें उदाहरण घेऊन'—हें म्हणणें चुकींचें आहे. खरा ज्ञानी असेल व ज्ञानामुळेंच अकर्मी असेल, तर लोक तो अकर्मी असून हि कर्मयोगांत पूर्वीपेक्षा जास्त तन्मय होतील. आळशी राहणार नाहींत."

शिवाजी—"मग भगवान असें कसें म्हणतात कीं मी जर कर्म सोडीन तर लोक माझें अनुकरण करतील?"

विनोबा—"कारण जो ज्ञानी आहे तो थोडा च स्वतःला ज्ञानी समजतो. तो असा च विचार करणार कीं माझें पाहून लोकांना वाईट वळण पडूं नये."

गीताध्यायसंगति

## सांख्ययोग, वेदांत भक्ति आणि जडवाद

(तारीख १६ ऑगस्ट १९३५, सकाळीं ९ वाजतां) सत्याग्रहाश्रमाच्या गच्चीवरील खोलींत विनोबा एका पाटावर निजले आहेत. जवळच्या घोडीवर शंकराचार्यांचें गीताभाष्य, मॅक्समूलरचा ऋग्वेद, सांख्यसूत्रे, जेकबचा उपनिषद्वाक्यकोष, मॉनियर विल्यम्सची संस्कृत डिक्शनरी, महेंन्द्रनाथांचे बंगाली भाषेंतलें रामकृष्ण कथामृत व इतर अनेक वेदवेदांताचीं पुस्तकें ठेवलेलीं आहेत. रहाट व जवळच्या कपाटांतील सुताचा ढीग कर्मयोगाची साक्ष देत आहे. बाजूच्या खिडक्या उघड्या आहेत. आसपासची शुभ्र गच्ची, मुक्त वातावरण आणि गाढ एकांत!!! —इतकी पवित्र आणि रमणीय जागा कोठें असेल? "जर स्वर्ग कोठें असेल तर येथें च आहे, येथें च आहे. येथें च आहे" असें काश्मीरचें वर्णन केलें जातें. ताजमहालची आणि वेरुळचीं वर्णनें हि अशीं च मोहक आहेत. पण या जागेची सर त्यांना येईल काय? महात्माजी आणि विनोबांच्या वास्तव्यामुळें मोठमोठे कार्यकर्ते, साधक, तपस्वी, संन्यासी अनेक थोर लोक येथें येऊन गेलेले, नित्य सकाळ-संध्याकाळ होणारी प्रार्थना येथें अव्यक्तरूपानें मूर्तिमान झालेली, नाना तऱ्हेचे अभ्यासाचे आणि ज्ञानाचे वर्ग येथें चालत त्यामुळें अध्यात्मविद्येला हि वास करण्याला हें च स्थान पसंत पडलेंलें. एकसारखें तन्मयतेनें अखंड सूत कातण्याचा भक्तिमय देखावा येथें च दिसे. विनोबांची सोळा लटी सूत कांतण्याची ही च जागा. सकाळ-संध्याकाळ केव्हां हि जा. रहाटाच्या अंतः संगीताबरोबर "प्रेम अमृताची धार वाहे देवा हि समोर" हें दृश्य आहेच. देवासमोर नंदादीप आणि अभिषेकाची धार, ज्ञान आणि भक्तिमय कर्मयोग सतत चालूच दिसावयाचा. मग आज असें कां? विनोबा स्वस्थ कां निजले आहेत? कोणी सांगावे?

अनुक्रमणिका

महासागराचा ठाव कोण घेणार? पण ही स्थिति फार वेळ टिकली नाहीं. थोड्या च वेळांत नित्याप्रमाणें ज्ञानसत्राची सुरुवात झाली. या ज्ञानसत्राचा लाभ घेण्याला उपयोगी व्हावें म्हणून प्रथम विनोबांनीं बापूंना लिहिलेल्या एका पत्राची सबंध नक्कल पुढें मांडूं :—

"८ जून १९३४ हें मी उपवासाच्या तिसऱ्या दिवशीं लिहवीत आहे. उपवासाचीं कारणें जमनालालजींकडून आपणास कळतील. गीतेच्या साप्ताहिक पाठक्रम कसा असावा याबाबत आपण जे मुद्दे रुजू केले होते त्यांचीं उत्तरें मला द्यावयाचीं होतीं तें मी विसरलों नव्हतों. पण थोडक्यांत उत्तरें देण्याऐवजीं ह्या प्रश्नांच्या निमित्तानें गीतेंतील अध्यायांच्या संगतीविषयींची माझी कल्पना एकदा सविस्तर मांडावी असें मीं योजिलें होतें. तें मी अजून करूं शकलों नाहीं. पुढें केव्हां तरी करीन. पण तूर्त आपल्या प्रश्नापुरती उत्तरें तरी आतां दिलीं च पाहिजेत, म्हणून थोडक्यांत उत्तरें देण्याचा प्रयत्न करीत आहे.

आपल्या पत्रांत आपण नवीन सुरूं केलेल्या पायीं यात्रेबद्दल आपण माझा अभिप्राय विचारला होता. पुष्कळ कार्यकर्त्यांना आपल्या अलीकडच्या विचित्र कृतींपैकीं ही एक कृती भासते. पण मला ही पायीं यात्रेची बातमी ऐकतांच अत्यंत आनंद झाला.

आतांपर्यंतच्या हरिजन-प्रचार-कार्यांत आपल्या शरीराला तर अत्यंत श्रम होत होता च. पण त्या मानानें खोल काम तितकेंसें होत नव्हतें. असा मला सारखा भास होई. ह्या नवीन कल्पनेनें आपली तकलीफ कमी होऊन शिवाय परिणाम निःसंशयपणें फारच खोल होणार आहे. सत्य हें स्वयंप्रचारी आहे हें आपलें म्हणणें मला अक्षरशः पटतें.

आतां गीतेबाबत—गीतेचा पहिला अध्याय तर बीजरूप च आहे. पण त्याचे च थोडे "आखात" दुसऱ्या अध्यायांत शिरलें आहें. ह्याचें कारण भगवंतांचें प्राथमिक उद्‌गार श्लोक २, ३ आणि अर्जुनाची शरणता यांना स्वतंत्र स्थान देण्याची आवश्यक्ता भासली हें होय. प्रत्यक्ष गीतेची सुरुवात २/११ पासून झाली. तेथून सबंध दुसऱ्या अध्यायांत गीतेचा मुख्य विषय संपूर्णपणें थोडक्यांत सांगितला आहे.

(१) जीवनाचे शास्त्र—आत्म्याची अमरता इत्यादि, ज्याला गीता सांख्य-बुद्धि म्हणते.

(२) जीवनाची कला—समत्वबुद्धिपूर्वक कर्में कशीं करावीं, ज्याला गीता योग-बुद्धि म्हणते.

(३) जीववाचें शास्त्र आणि कला—सांख्यबुद्धि आणि योगबुद्धि, दोन्ही ज्याच्या ठिकाणी स्थिर झालीं आहेत अशा परम आदर्शाचे–गुरुमूर्तीचें वर्णन (ज्याला गीता स्थितप्रज्ञ म्हणते.)

(४) स्थितप्रज्ञतेचा अंतिम परिणाम—ब्रह्मनिर्वाण.

ब्रह्मनिर्वाणापर्यंत पोंचल्यानंतर वास्तविक सांगायचें कांहीं शिल्लक उरत नाहीं.

या ठिकाणीं हें सांगितलें पाहिजे कीं स्थित-प्रज्ञ आणि ब्रह्मनिर्वाण हे दोन शब्द गीता सोडून सबंध संस्कृत वाङ्मयांत (म्हणजे अर्थात् गीतेच्या पूर्वीच्या) कुठें ही सांपडत नाहींत. म्हणजे हे गीतेचे स्वतंत्र

आणि विशिष्ट शब्द आहेत. भक्त, ज्ञानी, योगी आणि मुक्ति परमपदप्राप्ति, अपुनरावृत्ति इत्यादि शब्द गीतेंत आहेत. पण ते गीतेचे स्वतंत्र नाहींत.

संपूर्ण प्रवास थोडक्यांत पूरा केला. त्याची सविस्तर उजळणी अर्जुनाच्या प्रश्नावरुन अध्याय ३ ते ५ यांत करावयाची आहे. अर्जुनानें तिसऱ्या अध्यायांत विचारलेला प्रश्न जर विचारला नसता तर गीता दुसऱ्या अध्यायांत संपली हें निश्चित. जीवनाचें तत्त्वज्ञान, जीवनाची कला (कौशलम्), आदर्श गुरु आणि अंतिम फलित इतकें सांगितल्यानंतर सांगावयाचें काय बाकी राहतें?

तिसऱ्या अध्यायांत कर्म करण्याचीं कारणें भगवान् सांगत आहेत. बुद्धि श्रेष्ठ खरी पण कर्माशिवाय ती लाभत च नाहीं. त्याला काय करावयाचें? व्यक्तीची आजीविका (शरीर-यात्रा), समाजसेवा (यज्ञ), चित्तशुद्धि (संसिद्धि) आणि लोकसंग्रह हीं कर्में करण्याचीं उत्तरोत्तर कारणें आहेत. तिसऱ्या अध्यायाला आपण गीतेची चावी म्हणतो, तें अक्षरशः खरें आहे. अर्जुन प्रश्न न विचारतां, तर ही चावी आम्हांस न मिळती. भगवंतांनीं तर केव्हां च ब्रह्मनिर्वाणापर्यंत मजल मारली होती.

ह्यापुढें चवथ्या अध्यायांत कर्माची व्यापक व्याख्या केली आहे. कर्म म्हणजे जीवनप्रवाहांत प्राप्त झालेलें बाह्य-कर्म, हें तर खरें च पण त्याशिवाय तें कर्म समत्वपूर्वक होण्याला ज्या अनेक वस्तूंची जरूर लागते, उदाहरणार्थ, इंद्रियनिग्रह, स्वधर्मरूप प्रत्यक्ष कर्म आणि त्याच्या जोडीला अंतःशुद्धिकारक हीं व्यापक किंवा विशेष कर्में अशी दुहेरी जोड जमली म्हणजे शेवटीं अकर्मदशा प्राप्त होते. इतका हा चवथ्या अध्यायाचा विषय होय.

पण ही अकर्मदशा दिसायला दुहेरी दिसून पडते. (१) सर्व कर्में करून तीं मुळीं च न केल्यासारखीं होणें (योग), आणि (२) मुळींच कर्में न करतां सर्व कर्में केल्यासारखें होणें (संन्यास), या दुहेरी अकर्मदशेची तुलना पांचवा अध्याय करतो. योग आणि संन्यास तत्त्वतः दोन्ही एकच आहेत. (श्लोक ३ ते ५). पण साधकाच्या दृष्टीनें संन्यासापेक्षां योग सुलभ आहे (श्लोक ६ ते १२). म्हणजे संन्यास ही केवळ अंतिम भूमिका च होऊं शकते. पण योग ही साधकावस्था होऊन शिवाय अंतिम अवस्था होऊं शकते, असा निष्कर्ष निघाला. ह्यापुढें पूर्ण योगी म्हणजे च संन्यासी पुरुषाचें रमणीय वर्णन श्लोक १३ ते २६ पर्यंत केलें आहे. पैकीं श्लोक २४, २५ आणि २६ हे योगाच्या म्हणजे च संन्याशाचा गीतेनें ठरविलेला जो अंतिम मुक्काम ब्रह्म-निर्वाण तो सांगणारे आहेत. ह्या तिन्ही श्लोकांत ब्रह्म-निर्वाणाचा तीनदां उच्चार केला आहे तिकडे लक्ष द्यावें. माझ्या ह्या लिहिण्यांत जेथें जेथें श्लोकांचा उल्लेख येईल तेथें तेथें मूळ गीता पाहून घेणें जरूर आहे.

सारांश, दुसऱ्या अध्यायांत जो मुक्काम गांठला होता तो च पुन्हां ५/२६ पर्यंत गांठला. दुसऱ्या अध्यायांतला प्रवास 'क्रिश्चियनचा' म्हटल्यास हा दुसरा प्रवास आमच्यासारख्या दुबळ्या 'क्रिश्चियनांचा' होय.

पण ह्यापुढें पांचव्या अध्यायांतील २७, २८ आणि २९ हे तीन श्लोक काय करीत आहेत, हा महत्त्वाचा प्रश्न आहे. कारण या प्रश्नाच्या उत्तरांत आपल्या प्रश्नांचे उत्तर आहे. या प्रश्नाच्या उत्तरासाठीं आपणाला एकदम बाराव्या अध्यायांत उडी मारली पाहिजे. माझ्या मतें बारावा अध्याय म्हणजे भक्तीच्या भाषेंत पांचवा अध्याय होय. आणि पांचवा अध्याय म्हणजे कर्माच्या भाषेंत बारावा अध्याय होय. भक्तीच्या भाषेंत बोलावयाचें म्हणजे मुळीं च कर्में न करतां सर्व कर्में करणें ही जी संन्यासदशा ती एक प्रकारची

निर्गुण-उपासना आहे. आणि सर्व कर्में करून अलिप्त राहणें ही जी योगावस्था ती एक प्रकारची सगुण उपासना आहे. आणि या दोन उपासनांची तुलना हा बाराव्या अध्यायाचा विषय आहे. आणि त्या तुलनेचा निकाल पांचव्या अध्यायांतील तुलनेच्या निकालाप्रमाणें च हुबेहूब दिला आहे. तत्त्वतः योग आणि संन्यास जसे एक आहेत, त्याप्रमाणें सगुण-उपासना आणि निर्गुण-उपासना एक च आहेत. कारण दोन्ही ईश्वराकडे नेणाऱ्या आहेत. पण साधकाच्या दृष्टीनें विचार करतां योग जसा सुलभ त्याप्रमाणें सगुणोपासना सुलभ होय. योगावांचून परभारें संन्यास गांठणें तसें च अशक्यप्राय आहे (५/६ पूर्वार्ध). सगुणावांचून निर्गुण गांठणें तसें च अशक्यप्राय होय (१२/५ उत्तरार्ध). या १२/५ च्या उत्तरार्धांशीं १८/११ च्या पूर्वार्धाची तुलना करून पाहण्यासारखी आहे. म्हणजे कर्माच्या आणि भक्तीच्या दृष्टीनें एक च प्रश्न कसा उत्पन्न होतो आणि त्याचें एक च उत्तर कसें आहे हें लक्षांत येतें. संन्यासाला आणि निर्गुणोपासनेला देह आडवा येतो. हें सर्व विवेचन अध्याय ५ आणि अध्याय १२ यांचें नातें समजावून सांगण्यासाठीं आहे. म्हणून च बाराव्या अध्यायांत फलत्यागाची भाषा येते. (१२/११-१२) आणि पांचव्या अध्यायाचा शेवट भक्तींत केला जातो. (५/२९).

आतां प्रश्न असा कीं सगुण-उपासना आणि निर्गुण-उपासना ह्यांचें मागें मोठें वर्णन करून मग त्यांची तुलना बाराव्या अध्यायांत केली आहें कीं १२ व्या अध्यायांत हा सगळा नव्यानें च विषय आला आहे? माझें याला उत्तर असें कीं, मागें, वर्णिलेल्या विषयाची ही तुलनेनें परिसमाप्ति केलेली आहे. पांचव्या अध्यायापर्यंत गीतेंतील मुख्य वस्तु संपली आहे. अध्याय ६ ते १७ निष्काम-कर्माच्या सिद्धीसाठीं निरनिराळीं साधनें सांगणारे अध्याय आहेत. आणि १८ वा अध्याय उपसंहाराचा होय. पैकीं मधल्या साधनाध्यायांतील अध्याय ६ ते १२ हे सात अध्याय मिळून गीतेंतील उपासना-कांड होय. त्यांत पुन्हां ६ ते ८ अध्याय प्राधान्यानें अव्यक्त-उपासना आणि ९ ते १२ हे अध्याय प्राधान्यानें व्यक्त-उपासना सांगतात. प्राधान्यानें मुद्दाम म्हणतो, कारण गीता तार्किक पद्धतीनें तुकडे पाडून वर्णन करीत नाहीं. सगुणांत निर्गुण येऊन जाते. अशी गीतेची दृष्टी आहे. ६ ते ८ मध्यें निर्गुण किंवा अव्यक्त-उपासना कशी आणि ९ ते १२ मध्यें सगुण किंवा व्यक्तउपासना कशी याचा विचार करावा लागेल. पण तत्पूर्वी अध्याय ५ मधील शेंवटचे तीन श्लोक काय करतात हें सांगण्याची आतां वेळ आली आहे. ५/२७-२८ हे दोन श्लोक अव्यक्तोपासना सुचवितात आणि ५/२९ व्यक्त किंवा सगुण उपासना सुचवितो. हा शेवटचा श्लोक ५/१४, १५ शीं वरून वरून विरोधी भासतो हें आपल्या लक्ष्यांत आलें आहे. आणि म्हणून तो भासमान विरोध काढून टाकणारी म्हणजे सगुण-निर्गुणाचा समन्वय सुचविणारी नोंद अनासक्तियोगांत ५/२९ खालीं आली आहे. सारांश पांचव्या अध्यायांतील शेवटचे तीन श्लोक अध्याय ६ ते १२ मध्यें येणाऱ्या द्विविध उपासनेच्या प्रस्तावनेदाखल आहेत.

[दुपारीं १२॥ ते ३ पर्यंत मधून मधून थांबत इतकें लिहून घेतलें. यापुढचें शक्य तर उद्यां पाहूं.]
९-६-३४.

### दिवस चौथा

गीतेची निर्गुणोपासनेची कल्पना काय आहे हें समजण्यासाठीं अध्याय १२ तील श्लोक १, ३, ४ आणि ५ उपयोगी आहेत. त्यावरून गीता निर्गुणोपासनेचे अव्यक्तोपासना आणि अक्षरोपासना ह्या संज्ञांनीं वर्णन करते (१२/१, ३) आणि त्याचें अंग म्हणून 'सन्नियम्येन्द्रियग्रामं सर्वत्र समबुद्ध्यः' । (१२/४ पूर्वार्ध) अशी साधना सांगते. आणि हा सर्व मार्ग अधिक क्लेशकारक आहे असा अभिप्राय देते. अक्षरोपासना हा शब्द श्लेषात्मक समजावयाचा आहे. अक्षर म्हणजे अविनाशी ब्रह्म हा एक अर्थ, आणि अक्षर म्हणजे ॐकार हा दुसरा अर्थ. पैकीं 'सन्नियम्येन्द्रियग्रामं सर्वत्र समुबुद्ध्यः' ह्या वर्णानानें सबंध सहावा अध्याय सुचविला आहे हें

अनुक्रमणिका

उघड आहे. सातव्या, आठव्या अध्यायांत अव्यक्त अक्षर उपासना स्पष्ट आहे. ७/२४, ८/३, ८/२०, ८/२१ इत्यादि आणि ॐकार-रूप अक्षरोपासना ८/१३ मध्यें आहे. आणि त्या ॐकारोपासनेंचें साधन म्हणून सहाव्या अध्यायांतील साधनेचा पुनरुच्चार ८/१०, ८/१२ त केला आहे. हा सर्व मार्ग कठिण आहे ही वस्तु सहाव्या अध्यायांत अर्जुनाकडून प्रश्न वदवून 'अनेकजन्मसंसिद्धः' इत्यादि पदांनीं सुचविली आहे च. अर्थात् निराश होण्याचें कारण नाहीं हा ध्वनि तेथें काढला आहे च. पण कठिणता आहे हें नक्की. ही सर्व अव्यक्तोपासना म्हणजे पतंजलीचें योगशास्त्र होय. योगशास्त्रांतील हा विषय पतंजलीच्या च शब्दांत मधलीं मधलीं सूत्रें गाळून पण क्रम न सोडतां थोडक्यांत मांडतो—

(१) अथ योगानुशासनम् ।
(२) योगश्चित्तवृत्तिनिरोधः ।
(३) तदा द्रष्टुः स्वरूपेऽवस्थानम् ।
(४) अभ्यास-वैराग्याभ्यां तन्निरोधः ।
(५) ईश्वर-प्रणिधानाद्वा ।
(६) तस्य वाचकः प्रणवः । (प्रणव म्हणजे ॐकार).
(७) तज्जपस्तदर्थ-भावनम् ।

पैकीं पहिल्या चार सूत्रांचा सर्व विषय म्हणजे गीतेचा सहावा अध्याय. पांचवें सूत्र म्हणजे सातवा अध्याय. सूत्रें ६, ७ म्हणजे ८ वा अध्याय. या ठिकाणीं हें सांगितलें पाहिजे कीं 'ईश्वरप्रणिधानाद्वा' हें सूत्र 'अभ्यासवैराग्याभ्याम्' याचा विकल्प नाहीं. म्हणजे अभ्यासवैराग्य करा किंवा ईश्वरप्रणिधान करा असें नाहीं. अभ्यासवैराग्याला ईश्वरप्रणिधानाची जोड द्यावयाची आहे. ईश्वरप्रणिधान म्हणजे ईश्वराचें ध्यान असा अर्थ आहे.

* अशी फुली पहा.

आतां आपण व्यक्तीपासनेकडे वळूं. गीतेंतील व्यक्तोपासना अव्यक्तोपासनेशीं विरुद्ध नाहीं. अव्यक्ताचा च व्यक्त हा प्रकाश आहे. ही उपासना म्हणजेच श्रीमद्भागवत, तुलसीरामायण इत्यादि ग्रंथांत वर्णिलेला आणि साधुसंतांनीं गाइलेला सुप्रसिद्ध भक्तिमार्ग होय. आणि तो ९ ते १२ या अध्यायांचा विषय आहे.

हा सर्व योगशास्त्रीय विषय ६ ते ८ मध्यें संपूर्णपणें आला असून शिवाय अग्निमार्ग, धूममार्ग ही योगशास्त्रीय परिभाषा हि आठव्या अध्यायांत देऊन आठवा अध्याय पूरा केला आहे.

अव्यक्तोपासनेचें स्वरुप ध्यान ह्या शब्दानें मांडतां येईल. भक्तिमार्ग म्हणजे प्रेम होय. याला च राजमार्ग किंवा राजविद्या म्हणतात. ९/२ यांतील मुख्य विशेष म्हणजे हा प्रत्यक्षावगम आहे ९/२. केवळ श्रद्धेचें यांत काम आहे. आणि हा आचरण्यास अत्यंत सुलभ आहे. सुसुखं कर्तुम् ९/२. अव्यक्तोपासनेसारखा कठिण नाहीं. केवळ श्रद्धेच्या अभावीं लोक इकडे येत नाहींत. बाकी सर्वांनीं यांत यावें असा हा मार्ग आहे. ९/३. मानुषी रूप ही ईश्वराची च मूर्ति आहे. त्याची सेवा हा च या मार्गाचा विशेष होय. मानुषी रूपाची अवज्ञा हातून घडल्याबद्दल अर्जुनाला पश्चात्ताप करावा लागला आहे. ११/४१. भक्तीची नवीन दृष्टि लाभल्यानंतर मानुषी रूप पाहून अर्जुनाला आनंद होत आहे. ११/५१. सर्व यज्ञांत ज्ञानयज्ञ श्रेष्ठ हें खरें, पण हरिप्रेमानें

रंगलेलीं माणसें हरिनाम-स्मरणरूप जपयज्ञ श्रेष्ठ समजतात. १०/२५. ज्ञानदाता भगवान् समर्थ आहे. १०/१०, ११. सहाव्या अध्यायांत सांगितल्याप्रमाणें सर्व इंद्रियांचें आणि मनाचे सर्व व्यापार बंद करण्याऐवजीं भक्तिमार्गांत ते परमेश्वराला वहावयाचे असतात. ९/२७. पापयोनि, पुण्ययोनि इत्यादि कोणता हि भेद हा मार्ग जाणत नाहीं. हा धर्म सर्व वर्णांना मोकळा आहे. कारण, येथें केवळ प्रेमाचें काम आहे. ९/३२. 'नित सेवा नित कीर्तन, ओच्छव' हें या मार्गाचें स्वरूप आहे. ९/१४, १०/९, ११/३६. नमस्कार करणें, नम्र होणें ही सर्वांत मोठी उंची होय. ९/१४, ९/३४, ११/३६, ३७, ३९, ४० इत्यादि. ९/२ मधील 'धर्म्यम्' आणि ९/३ मधील 'अश्रद्दधानाः' या दोन पदांशीं १२/२० मधील 'धर्म्यामृतम्' आणि 'श्रद्दधानाः' या पदांची तुलना करावी, म्हणजे बाराव्या अध्यायांत संपविलेला विषय नवव्या अध्यायांत सुरू केला होता हें लक्ष्यांत येईल. 'ये तु धर्म्यामृतमिदम्' १२/२० म्हणजे बाराव्या अध्यायांतील 'भक्त-लक्षण-रूप धर्म्यामृत असा हि अर्थ सूचित आहे. (ह्या अमृतशब्दाशीं ९/३ मधील मृत्यू शब्द तोलून पहा). तसें च नवव्या अध्यायाचा शेवटचा श्लोक म्हणजे च अकराव्या अध्यायाचा शेवटचा श्लोक होय. आणि ह्या दोन श्लोकांना उद्देशून १२/१ मधील 'एवम्' शब्द आहे, असें समजलें पाहिजे. अधिक विस्तार करीत नाहीं. थोडक्यांत सांगावयाचें म्हणजे १०-११-१२ ह्या तीन अध्यायांपासून नववा अध्याय कांहीं केल्या अलग करतां येत नाहीं. नववा अध्याय मातृस्थानीं असून १०-११ तिचीं लेकरें आहेत. ११/१ मध्यें अर्जुन माझा मोह गेला म्हणत आहे तें नवव्या अध्यायाला उद्देशून च होय. 'परमं गुह्यं अध्यात्मसंज्ञितम्' (११/१) म्हणजे नवव्यांतील राजविद्या राजगुह्य च होय. अध्याय ६ ते ८ मधील अव्यक्तोपासना आणि अध्याय ९ ते १२ मधील भक्तीमार्ग यांतील फरक थोडक्यांत सांगावयाचा तर ॐकार आणि रामनाम यांतल्या फरकासारखा आहे.

आपल्या मुख्य प्रश्नाचें उत्तर एवढ्यांत येऊन जातें. तथापि विषयपूर्तीसाठीं पुढील संगति देतों.

अध्याय १३, १४, १५ म्हणजे ज्ञान-मार्ग होय. ज्ञानमार्ग भक्तिमार्गाहून वेगळा आहे हें सांगावयास नको च. तरी गीतेनें त्यांत हि भक्तीची भर घातली आहे च. पहा 'मद्‌भक्त' १३/१८ तसें च १४/२६, १५/२९. पण हा मार्ग अव्यक्तोपासनेहून हि वेगळा आहे. अव्यक्तोपासनेंत ध्यान, भक्तिमार्गांत प्रेम आणि ज्ञानमार्गांत विचार अथवा विवेक प्रधान होय. ध्यानमार्ग म्हणजे मुख्यतः पतंजलि, भक्तिमार्ग म्हणजे वैष्णवसंप्रदाय आणि ज्ञानमार्ग म्हणजे सांख्य आणि वेदान्त. पहा 'वेदान्तकृत्' १५/१५, ज्ञानमार्ग सांगितल्यावर वास्तविक गीता संपली असें मी मानतो. 'इति गुह्यतमम् शास्त्रम्' १५/२० याचा अर्थ पंधरावा अध्याय तर खरा च पण आतापर्यंत सांगितलेले सर्व गीताशास्त्र असा मी करतो. 'शास्त्र' शब्द गीतेनें प्रथम येथें च वापरला असून त्यानंतर तो च शब्द पुढें अध्याय १६ च्या अखेरीस आणि अध्याय १७ प्रारंभीं आला आहे.

यापुढें अध्याय १६, १७ हे मी परिशिष्टाप्रमाणें समजतो. त्यांत गीतेचें सर्व समाजशास्त्र आलें आहे. समाजशास्त्राचा सर्व आधार समाजांतील व्यक्तींच्या शुभवृत्तींवर म्हणजे सद्‌गुणांवर (अध्याय १६) आणि तदनुरूप शुभकृतींवर म्हणजे सात्त्विक यज्ञदान-तपांवर (अध्याय १७) अवलंबून आहे. हे दोन्ही अध्याय नवव्या अध्यायाचीं परिशिष्टें होत. सोळावा अध्याय म्हणजे ९/१२, १३ चें परिशिष्ट आहे. सतराव्या अध्यायाचा सोळाव्या अध्यायाशीं जोड तर १७/१ मधील अर्जुनाच्या प्रश्नानें दाखविला आहे च. पण त्याशिवाय तो अध्याय म्हणजे ९/२७ मधील भक्तिमार्गीय मुख्य विधींचें सविस्तर स्पष्टीकरण करणारें परिशिष्ट होय.

'यदश्नासि' म्हणजे सतराव्यांतील 'आहार'.
'यज्जुहोषि' म्हणजे सतराव्यांतील 'यज्ञ'.
'ददासि' म्हणजे सतराव्यांतील 'दान'.

अनुक्रमणिका

‘तपस्यसि’ म्हणजे सतराव्यांतील ‘तप’.

‘तत्कुरुष्व मदर्पणम्’ म्हणजे सतराव्यांतील ‘ॐ तत्-सत्’ प्रकरण.

समर्पणविधि हा भक्तिमार्गाचा आत्मा होय. पण समर्पण करावयाचें म्हणजे वाटेल तें समर्पण करतां येत नाहीं. शुद्ध सात्त्विक च समर्पण करतां येतें. हें १७ वा अध्याय सांगतो. १७ व्या अध्यायाला आश्रमाच्या दृष्टीनें मी कार्यक्रमयोग हें नांव देतों. सकाळच्या प्रहरीं उठून आधीं प्रार्थना करावी (‘श्रद्धा’), मग नास्ता इत्यादि करून (‘आहार’), सेवा-कार्याला आरंभ करावयाचा (‘यज्ञ,’ ‘दान,’ ‘तप’), शेवटीं संध्याकाळच्या प्रार्थनेंत हें सर्व समर्पण करावें. (‘ॐ तत्सत्’).

ह्यानंतर १८ वा अध्याय म्हणजे सर्व विवेचनाचें पुन्हां एकदां थोडक्यांत दिग्दर्शन आहे. गीतेची पहिली पंचाध्यायी जो मुख्य विषय सांगते तेथून च १८ व्या अध्यायाची सुरुवात झाली आहे. आणि अंत सर्व साधनांतील अत्युत्तम साधन, नवव्या अध्यायापासून सांगितलेला जो भक्तिमार्ग त्यांत केला आहे. ९/१ आणि ९/३४ हे दोन श्लोक एकत्र वाचून मग १८/६४ आणि १८/६५ हे श्लोक वाचावे. नवव्या अध्यायाला गीतेंत एक विशेष प्रकारचें स्थान आहे. तो अध्याय संतांचा अत्यंत लाडका आहे. ज्ञानेश्वरमहाराज नवव्या अध्यायाचें पठण करीत करीत समाधिस्थ झाले. स्त्रीशूद्रादिकांसाठीं हा अध्याय धांवून येतो. भक्तिमार्गाचा त्यांत कळस आहे. तो अध्याय ऐकून अर्जुनाला अत्यंत आनंद झाला. (१०/१ प्रीयमाणाय) (‘प्रीयमाणाय’ याचा अर्थ ‘अनासक्तियोगांत’ चुकला आहे तो सुधारून घेऊं. ‘प्रीयमाणाय’ म्हणजे ‘आनंदित थनारने’) म्हणून १० वा अध्याय भगवंतांनीं आपण होऊन सांगितला आहे. त्यानें अर्जुनाचा मोह-नाश झाला असें ११/१ सांगतो. १२ वा अध्याय म्हणजे त्याच्या श्रेष्ठतेवर शिक्कामोर्तब होय. १६-१७ हीं त्याचीं परिशिष्टें आहेत. १८ व्याचा शेवट म्हणजे च नवव्याचा च पुनरुच्चार आहे.

अशा प्रकारें गीतेंतील अध्यायांच्या संगतीविषयींची माझी कल्पना थोडक्यांत मांडली आहे. सविस्तर यथासमय पाहूं.

आज येथें च संपवितों. बाकी थोडें उरलें आहे तें उद्यां.

## दिवस पांचवा

१०-६-६४.

वरील विवेचनांत आपल्या प्रश्नांचीं उत्तरें येऊन जातात. पहिल्या पांच अध्यायांचा विषय आणि सहाव्या अध्यायाचा विषय हें अगदीं वेगवेगळें आहेत. आपण जी रामगीता उर्फ गीता-प्रवेशिका रचली आहे त्यांत पहिल्या पांच अध्यायांतला एक हि श्लोक नाहीं आणि सहाव्या अध्यायांतले एकदम आठ श्लोक आहेत. आतां समत्वप्राप्तीचें साधन म्हणून सहाव्या अध्याय पांचव्याला जोडावा. त्यांत हि दिशाभूल होते. आसन, प्राणायाम, प्रत्याहारादि हा च एक समत्वप्राप्तीचा अद्वितीय उपाय असा त्यानें भास निर्माण होईल. तो सर्वथा इष्ट नाहीं. वास्तविक समत्व हा गीतेंतला मध्यबिंदु. आणि सर्व साधनांचें हें च फळ गीतेला अपेक्षित आहे. उदाहरणार्थ तेराव्या अध्यायांतील विवेकाचें हि फलित समत्व हें च अपेक्षित आहे. अ. १३/२७, २८. म्हणून सहावा अध्याय पांचव्या अध्यायाला जोडणें बरोबर नाहीं. बाराव्या अध्यायाच्या विचारसरणीला तें धरून होणार नाहीं, हें मीं वर सांगितलें. अव्यक्त उपासना म्हटली तरी ती उपासना च

अनुक्रमणिका

आहे. म्हणून त्यांत ही एक प्रकारचा भक्तिभाव गृहीत च आहे. आणि त्या दृष्टीनें अध्याय ६, ७, ८ या तिन्ही अध्यायांत भक्तीचा उल्लेख थोडा फार आहे च. तथापि ज्याला भक्तिमार्ग म्हणतात तो 'इदं तु' हा जो 'तु' कार तो आठव्या अध्यायापासून नवव्या अध्यायाला वेगळा पाडण्यासाठीं च आहे. हा 'तु' शब्द 'अनासक्तियोगांत' सुटला आहे. तो त्यांत घालावा लागेल. 'तु' म्हणजे 'हवे'. थोडक्यांत सर्व सांगून झालें. आतां गीतेचा साप्ताहिक पाठ-क्रम निष्कर्षांसह देतों.

(१) शुक्र. अ. १-२ स्थिरबुद्धि (सर्व प्रवास थोडक्यांत).
(२) शनि. अ. ३-४-५ निष्काम कर्म (प्रवास सविस्तर).
(३) रवि. अ. ६-७-८ ध्यान-मार्ग (अव्यक्तोपासना).
(४) सोम. अ. ९, १०, ११, १२ भक्ति-मार्ग (राजविद्या, अव्यक्ताशीं अविरोधी व्यक्तोपासना).
(५) मंगळ. अ. १३, १४, १५ ज्ञान-मार्ग (विचार, विवेक).
(६) बुध. अ. १६-१७ शुभवृत्ति (शुभकृतीसह).
(७) गुरु. अ. १८ त्याग.

हें मीं मराठींत लिहवून घेतलें आहे. कारण मला ती व्यक्तोपासना आहे. गुजराती कांहींशी अजून अव्यक्त वाटते. उपवासांत सुलभ साधन पत्करलें.

ॐ तत्सत् ता. १०-६-३४".

शिवाजी—"बापूंना लिहिलेल्या पत्रांत ६-७-८ अध्यायांत पतंजलीचें सर्व योगशास्त्र आलें आहे असें वाक्य आहे. तें वाचून पतंजलीचें योगशास्त्र त्यांत कसें काय आहे हें समजून घेण्याच्या इच्छेनें सर्व सूत्रें वाचलीं. त्यांचा शब्दकोष तयार केला. अशासाठीं कीं भिन्न भिन्न ठिकाणीं शब्दाचे अर्थ भिन्न केले आहेत, कीं एक च आहेत तें समजावें. सूत्रें साधारण समजलीं पण पूर्ण समाधान झालें नाहीं. कित्येक सूत्रांचें टीकाकारांनीं केलेलें स्पष्टीकरण पटलें नाहीं. उ. 'अपरिग्रहस्थैर्ये जन्मकथंतासंबोधः' अपरिग्रह स्थैर्यामुळें पूर्वजन्मांचें ज्ञान कसें काय होणार समजत नाहीं."

विनोबा—"सूत्रांतली दृष्टि मला पटते. परिग्रहाचे बुद्धिवर पडदे आलेले असतात. अपरिग्रहाच्या अभ्यासानें एकेक पडदा गळून जातो आहे. स्मृति तीव्र होत चालली आहे, असा अनुभव येणें सहज आहे. मग अनेक जन्मांच्या अनुभवरूप संस्काराची स्मृति—त्यांच्या स्थूल तपशीलाची स्मृति नव्हे—प्राप्त होणें शक्य आहे. पण तें ॲनि बेझंटनें पुस्तक लिहिलें आहे ना कीं मी अमुक जन्मांत अमुक होतें. माझे आईबाप अमुक होते. इ.— असा जन्मकथंता याचा अर्थ करावयाचा नाहीं. या असल्या माहितीचा काय उपयोग? अनंत जन्मांतले आईबाप, नाना संबंधीं, नाना कृत्यें जर आठवूं लागलें तर मनष्य घाबरून च जाईल. बुद्धीवर केवढा बोजा पडेल! तो एक प्रचंड परिग्रह होऊन बसेल. टीकाकार तर्काला, अनुभवाला पटेल असें लिहीत नाहींत. म्हणून नवीन टीका व्हावयास पाहिजे. पण तशी टीका करावयाची म्हणजे ग्रंथ सगळा स्पष्ट झाला पाहिजे."

शिवाजी—"एकंदर १९५ सूत्रांत ५०० शब्द वापरले आहेत. म्हणजे नवीन शब्द फार वापरले आहेत. शिवाय सरळ शब्द न वापरतां चमत्कारिक शब्द वापरण्याची सूत्रकारांची कां प्रवृत्ति व्हावी तें कळत नाहीं."

अनुक्रमणिका

विनोबा—“त्याचें असें दिसतें कीं सूत्रकारांच्या शेंकडों वर्षें परंपरा चालत असाव्या. त्या त्या संप्रदायांत तेवढे च ते शब्द रूढ असावे. त्यामुळें संप्रदायाबाहेरच्या माणसाला ते चमत्कारिक वाटावयाचे च.”

शिवाजी—“धूम्रमार्ग आणि अग्निमार्ग ही योगशास्त्रातली भाषा हि गीतेंत आली आहे असें पत्रांत लिहिलें आहे. पण पातंजल योगसूत्रांत तर हे मार्ग आलेले दिसत नाहीत?”

विनोबा—“पातंजल योगसूत्रांत नाहींत पण ब्रह्मसूत्रभाष्यांत हे योगमार्ग आहेत. म्हणून आलेलें आहे.”

शिवाजी—“या पत्रांत जीं सूत्रें दिलीं आहेत. तींच मुख्य योगसूत्रें समजावयाचीं काय? एवढ्यांत पातंजल योगशास्त्र साररूपानें येतें काय?”

विनोबा—“होय”.

शिवाजी—“ईश्वरप्रणिधानाद्वा” येथें विकल्प नाहीं असें पत्रांत म्हटलें आहे. पण किशोरलालभाईंनीं जीवनशोधन या ग्रंथांत तर स्पष्टपणें हे दोन मार्ग आहेत असें म्हटलें आहे. म्हणजे येथें विकल्प आहे असें म्हटलें आहे.”

विनोबा—“होय. बहुतेकांनीं तसा अर्थ केला आहे. पण जर विकल्प असता तर पतंजलीनें ईश्वर शब्दासंबंधीं विस्तृत करून पुष्कळ सूत्रें खर्ची घातली नसती.”

शिवाजी—“मग ‘वा’ शब्दाचा अर्थ काय?”

विनोबा—“ती पद्धति आहे लिहिण्याची. शिवाय “अभ्यासवैराग्याभ्यां तन्निरोधः” अभ्यासवैराग्यानें जर निरोध झाला तर ईश्वरप्रणिधाची जरूर आहे असें नाहीं. कारण सर्वत्र भरलेला ईश्वर अभ्यास—वैराग्यांत हि येऊन जातो च. एवढ्यासाठीं वा शब्द घातला आहे. पण तो विकल्पार्थी नव्हें.”

शिवाजी—“तस्य वाचकः प्रणवः” या च सूत्राचें महत्त्व काय? प्रणव च ईश्वराचा वाचक होऊं शकतो काय?”

विनोबा—“प्रणव च ईश्वराचा वाचक होऊं शकतो असें नाही. पण राम, कृष्ण किंवा दुसऱ्या अन्य नामांना इतिहास व चरित्र आहे. तसें प्रणवाचें नाहीं. प्रणव निव्वळ ईश्वराची च संज्ञा आहे. ज्ञानेश्वरांनीं मोठी मौज केली आहे सतराव्या अध्यायांत—

**जे देवो येती गाऱ्हाणें “कष्टले संसारशीणें ।**
**तया ओ दे नांवें जेणें । तो संकेतु हा”**

ते म्हणतात ईश्वराला हांक मारल्याबरोबर तो जी ‘ओ’ देतो तो च ‘ॐ.”

अनुक्रमणिका

शिवाजी—“प्रणव ईश्वराचा सूचक आहे हें ठीक आहे. पण मग नुसतें ईश्वर च म्हटलें तर?”

विनोबा—“त्यामध्यें ‘ईश्’ धातु आहे. ईश्वर शब्दाला त्यामुळें विशिष्ट अर्थ आहे. तसें ॐ मध्यें नाहीं. म्हणून ॐला निव्वळ ईश्वरसंज्ञा म्हणावयाची”

शिवाजी—“पतंजलि किंवा योगशास्त्रकार ईश्वर हा सृष्टींतून कांही निराळा आहे असें मानतात काय?”

विनोबा—“होय. सांख्यांच्या प्रमाणें ते निरीश्वरवादी नाहींत. ते हा तिसरा पुरुष मानतात.”

शिवाजी—“हें नीट लक्ष्यांत आलें नाहीं.”

विनोबा—“म्हणजे असें कीं सृष्टींत एकदम जड आणि चेतन असे दोन भाग पडतात. सांख्य याला प्रकृति आणि पुरुष म्हणतात. पण याहून अन्य तिसरा कोणी ईश्वर म्हणून ते मानीत नाहींत. सांख्य फक्त विवेक करतात. सांख्य म्हणजे विवेक.”

शिवाजी—“योगी प्रकृति आणि पुरुष मानतात काय?”

विनोबा—“योगी प्रकृति आणि पुरुष, जड आणि चैतन्य दोन्ही जड च ठरवितात. दोन्ही प्रकृति च. ते दोन्ही जड ठरवून ती प्रकृति फेकून देऊन वृत्तिनिरोध करून ईश्वरांत लय साधण्याचा प्रयत्न करतात.”

शिवाजी—“मग जडवादी आणि योगी यांच्यांत फरक काय?”

विनोबा—“जडवादी सर्व जड च समजतात. व योगी हि सर्व जड समजतात, हें दोहोंत साम्य आहे. पण योगी सर्व जग जड ठरवून तें Reject करतो व वृत्तिनिरोध करण्याचा प्रयत्न करतो. याच्या उलट जडवादी सर्व जग जड ठरवून तें Accept करतो. व त्यांत च पृथक्करण करीत बसतो. हा या दोघांत फरक आहे.”

शिवाजी—“सांख्य आणि वेदान्तदृष्टींत फरक काय?”

विनोबा—“सांख्य प्रकृति-पुरुष असा विवेक करतात पण वेदांत्यांचें म्हणणें असें कीं ज्याला तुम्ही जड म्हणतात तें हि चैतन्य च आहे. फरक इतका च कीं तें सुप्त आहे. म्हणजे वेदांती सर्व च चैतन्यमय समजतो. आपण पाहात नाहीं कां, माती जड दिसते पण पाऊस पडला म्हणजे तिच्यांतून किडे च किडे उत्पन्न होतात. जडांचें चैतन्य बनतें आणि चैतन्याचें जड बनतें, ही घडामोड सारखी चाललेली च आहे. म्हणून वेदांती सर्व च चैतन्यमय समजतो. पुष्कळांना असें वाटतें कीं वेदांत म्हणजे विवेक, पृथक्करण, पण तें बरोबर नाहीं. पृथक्करण, विवेक हें सर्व सांख्य झालें. वेदांत ही उपासना आहे. सूर्याची उपासना, चंद्राची उपासना, झाडाची उपासना—त्या तुळशीला पाणी घाला, तिला प्रदक्षिणा घाला, ही सगळी वेदांताची उपासना. ब्रह्मसूत्रांत हि हें येतें.”

अनुक्रमणिका

शिवाजी—“वेदांती ईश्वर मानतात काय?”

विनोबा—“वेदांती ईश्वर मानतात पण द्वैती भक्तिमार्गाप्रमाणें ते क्षर आणि अक्षर पुरुषाहून भिन्न असा ईश्वर मानीत नाहींत.”

शिवाजी—“भक्तिमार्गी सर्वत्र ईश्वर आहे असें मानींत नाहींत काय?”

विनोबा—“भक्तिमार्गी ईश्वराचे गुण—दयाप्रेमादि–सर्वत्र आहेत. म्हणजे तो नाना गुणरूपांनीं सर्वत्र आहे असें समजतात. पण पुन्हां ईश्वर निराळा करतात च.”

शिवाजी—“मग गीतेला कोणता मार्ग अभिप्रेत आहे?”

विनोबा—“गीता कोणची हि दृष्टि चूक ठरवीत नाहीं. कसें हि पहा माझ्यामध्यें च सर्व आहे असें गीतेंचें म्हणणें आहे. बाजारांत निरनिराळे जोडे ठेवले आहेत तेथें अमुक चांगला अमुक वाईट असा प्रश्न नाहीं. तुमच्या पायांत कोणता बसतों तें पहा. जो बसत असेल तो घेऊन जा. कांहीं दिवसांनीं कदाचित् पाय वाढल्यामुळें अथवा अन्य कारणांमुळें दुसरा जोडा द्यावा लागेल. तर तो हि द्या. जीवनाची ही दृष्टि आहे. १३ व्या अध्यायांत सांख्य, विवेक, पंधराव्यांत वेदांत, ६–७–८ मध्यें गीतेनें योग सांगितला.”

शिवाजी—“जड आणि चेतन ओळखण्याची खूण काय?”

विनोबा—“त्याची खूण अशी कीं जेथें जेथें भावना प्रतीत होते तेथें तेथें चैतन्य समजावयाचें. माझ्यासारखी च भावना जेथें दिसतें तेथें चैतन्य स्पष्ट आहे.”

शिवाजी—“मग वेदांती जडाच्या ठिकाणीं हि चैतन्य मानतात त्याला कांहीं पुरावा आहे काय?”

विनोबा—“होय, सूर्य उगवला म्हणजे माझ्या जड शरीरावर जो परिणाम व्हावयाचा तो तर होतो च पण त्या शिवाय मनांत कांहीं भावना निर्माण होतात त्याचें कारण काय? जडापासून जड परिणाम च होईल. भावना निर्माण होणें शक्य नाहीं. यावरून तेथें कांहीं चैतन्य आहे हें च सिद्ध होतें.”

शिवाजी—“सूर्योदयानें सर्वांच्या मनांत एक च भावना उत्पन्न होत नाहीं.”

विनोबा—“होय, या दत्तूला पाहिल्याबरोबर कोणाला बरें वाटेल. कोणाच्या मनांत तिरस्कार उत्पन्न होईल. हे निरनिराळें भाव हे आपल्या संबंधावर अवलंबून आहेत. म्हणजे ते आपल्यावर अवलंबून आहेत. पण कसा हि असो भाव उत्पन्न होतो हा कांहीं केवळ आपला गुण नव्हें. कांहीं च नसतांना भाव निर्माण होत नाहीं. तेव्हां समोरच्या पदार्थातील चैतन्यामुळें च भावोत्पत्ति होऊं शकते हें निश्चित. म्हणून वेदांती सर्व च चैतन्यमय मानतात. याच्या उलट जडवादी व योगी सर्व च जड समजतात. पण योगी सर्व जड ठरवून ईश्वरांत लीन होण्याचा प्रयत्न करतो. जडवादी आपल्याला स्वतःला नेमका गाळून सृष्टीचें परीक्षण करूं पाहतों. जडवादी व योगी यांचें फक्त एका च बाबींत साम्य आहे. पण दृष्टि अगदीं भिन्न आहे. तसें च सांख्य आणि जडवादी ईश्वर मानीत नाहींत. परंतु सांख्य पुरुष चैतन्यमय समजतात. तसे जडवादी मानण्यास

तयार नाहीं. म्हणून येथें हि जडवादी व सांख्य यांचें संपूर्ण जुळत नाहीं (१) वेदांती—संपूर्ण चैतन्यवादी व ईश्वरवादी. (२) जडवादी संपूर्ण जडवादी व निरीश्वरवादी. (३) योगी जडवादी व ईश्वरवादी. (४) सांख्य जड–चैतन्य विवेकवादी व निरीक्षरवादी अशी ही सगळी दृष्टि आहे."

शिवाजी—"योगी जड चेतन दोन्ही जडच ठरवितो. मग तो स्वतःला काय समजतो?"

विनोबा—"तो स्वतःला कांहीं न समजावें या च प्रयत्नांत असतो. आपलें अस्तित्व च उरूं नये असें त्याला वाटतें. संपूर्णपणें ईश्वरांत लीन व्हावें ही च त्याची इच्छा असते."

शिवाजी—"आर्त, जिज्ञासु, अर्थार्थी, ज्ञानी हे भक्तांचे भेद सांख्य योग वेदांत या तत्त्वांना अनुसरून केले आहेत काय?"

विनोबा—"नाहीं. तेथें बुद्धि, भावना, कर्म याला अनुसरून ते भेद आहेत."

संवाद १

**संत, ब्रह्मचर्य, तुलसीरामायण, त्रिगुण, दैवासुरसंपत्ति, स्त्रीपुरुष वार्धक्य**

संध्याकाळ, नालवाडीच्या त्या चौकोनी झोपडीच्या हॉलमध्यें विनोबा जेवण घेत आहेत. जेवण म्हणजे निव्वळ संत्र्याच्या फोडी व दूध. मधून मधून बोलण्यासाठीं येणारे मारवाडी विद्यालयांतील शिक्षक श्री....हे जवळ च बसले आहेत. बोलणें चाललें आहे. दार लावलेंलें आहे. झोपडीच्या फटीमधून संध्याकळचे शेवटचे किरण आंत येत आहेत.—विषय मुळांतून काय चालला होता हें समजण्याला मार्ग नाहीं. परंतु संतांनीं जें काहीं लिहिलें आहे तें अनुभवावर कसून घेतलें पाहिजे. हा मुख्य मुद्दा दिसत आहे. (श्री. शिवाजी खांबाजवळ चटईवर बसतात)

विनोबा—"संतांनीं पुष्कळ लिहून ठेवलें आहे. पण तें तसेंच्या तसें च सर्व माना असें म्हणण्यास मी तयार नाहीं. तें अनुभवाला जुळलें पाहिजे. वैद्यशास्त्रांत वनस्पति सांगितली. ही घेतली असतां शौचाला साफ होते. ती घेतली, एकानें—दुसऱ्यानें—तिसऱ्यानें—अनेकांनीं अनेक वेळां घेतली. पण गुण आला नाहीं. अशा स्थितींत त्या वनस्पतीचा सांगितलेला गुण मान्य करणें शक्य कोटींत येत नाहीं. संतांनीं विषयाची भयानकता सर्वत्र वर्णन केली आहे, हें पाहाण्यासारखें आहे."

श्री.—"पण संत संसारांत रहात होते असें हि दिसून येतें हें कसें?"

विनोबा—"ते संसारांत रहात होते याचा हि नीट विचार केला पाहिजे. संसारांत जे जे असतात, ते सर्व सारखे च समजणें योग्य नाहीं. तसे च जे अविवाहित असतात ते हि सर्व सारखे च समजणें हि वस्तुस्थितीला धरून नाहीं. केवळ पुत्रनिष्ठेनें संगम करणारा व विषयीं हे दोघे सारखे मानणें अगदीं च बुद्धिशून्यतेचें लक्षण आहे. तसें च विवाह केला नाहीं एवढ्यानें च ब्रह्मचारी होत नाहीं. ब्रह्मचर्य वेगळें च आहे. हा विवेक पाहिजे. वस्तुतः ब्रह्मचारी आणि खरा गृहस्थाश्रम यांत फार फरक नाहीं च. विचार करा. केवळ पुत्रासाठीं किंवा दोन अथवा तीन पुत्रासाठीं ज्यानें संगम केला त्याची संयमशक्ति आणि विषयीं

मनुष्यांची स्थिति सारखीच मानावयाची काय? शेतकरी शेतांत बी पेरीत नाहीं कां, तसें च हें आहे. बीं फुकट गेलें तर शेतकऱ्याला केवढें दुःख होते. तसें च ज्याच्या योगानें मन, बुद्धि यांना पोषण मिळतें—महान् कार्यें करतां येतात तें वीर्य व्यर्थ जाणें विचारी पुरुषाला कसें पसंत पडेल? संतांनीं मी म्हणतो असा आदर्श गृहस्थाश्रम केला होता काय हा एक विचाराचा प्रश्न आहे. संतासंतांत हि फरक आहे. सामान्यतः सर्व च संत वरच्या दर्जाचे असले तरी त्यांत फरक आहे च. तें कोठून आलें? तें ब्रह्मचारी होते च यांत शंका नाहीं. तेव्हां सगळे च संत सारखे नसतात. आपल्याला जरी दिसलें हें पक्षी सगळे वर उडून गेले तरी ते सगळे वर सारख्या च अंतरावर नसतात. गेले—वर गेले. आपल्याला ते सारखे च दिसतात. पण ते जाणतात आपआपसांत काय फरक आहे तो. शास्त्रांत सांगितलेला गृहस्थाश्रम आणि ब्रह्मचर्य यांत फरक नाहीं. गृहस्थाश्रम विषयसेवनासाठीं ही कल्पना च बरोबर नाहीं. गृहस्थाश्रमांत हि ब्रह्मचर्य हें च ध्येय आहे. सर्वत्र ब्रह्मचर्याची साधना आहे. प्रथम अध्ययनानें, सहजतेनें ब्रह्मचर्य, नंतर पुत्रनिष्ठेनें ब्रह्मचर्य, त्यापुढें लोकसेवेनें ब्रह्मचर्य व शेवटीं आत्मचिंतनानें ब्रह्मचर्य अशी ही ब्रह्मचर्याची साधना आहे. आज गृहस्थाश्रम बहुधा व्यभिचार आहे. स्वपत्नीशीं व्यभिचार इतका च फरक. ब्रह्मचर्याला कांही तरी 'ब्रह्म' पाहिजे त्याशिवाय 'चर्य' कशाचें. ब्रह्म म्हणजे कांहीं तरी व्यापक वस्तु. अध्ययन, पुत्रनिष्ठा, लोकसेवा, आत्मचिंतन या सर्वांच्या द्वारें ब्रह्मचर्य साधेल. पण यांतल्या सर्व वस्तु आवश्यक आहेत असें नाहीं. मुख्य शेवटची वस्तु आहे. अध्ययनाची हि जरूरी आहे च असें नाहीं. बापूंना हें मीं काल च लिहिलें आहे. तें पत्र तूं बघितलेस ना शिवाजी?"

शिवाजी—"नाहीं, अद्याप तें मीं बघितलें नाहीं."

विनोबा—"या विषयावर मी सावळीला बापूंशीं दोन तीन तास बोललों होतो. प्रायः त्यांचा माझा विचार भिन्न पडत नाहीं. पण एके ठिकाणीं मला तसें भासल्याबरोबर मी तें त्यांना कळविलें. त्यानंतर दोन तीन तास याची चर्चा झाली. बापूंना नवीन प्रकाश मिळाल्यासारखें वाटलें. व त्यावर हरिजनांत त्यांनीं तीन 'आर्टिकल्स' लिहिलीं. विषयसेवनासाठीं गृहस्थाश्रम ही कल्पना च मुळांत चुकीची आहे. या दृष्टीनें संतांच्या गृहस्थाश्रमाकडे पहावयाचें म्हणजे त्याचा नीट इतिहास पाहिजे व तो त्यांनीं च लिहिलेला पाहिजे. (इतक्यांत जेवण आटोपून विनोबा नेहमींप्रमाणें फिरण्यास निघाले. बरोबर गोपाळराव काळे, भाऊ हे हि चालत होते)."

शिवाजी—"हिंदी तुलसीरामायण व जामदारांचें रामायण यांत फरक आहे असें दिसतें. कारण दोहोंतलें दोहे जुळत नाहींत."

विनोबा—"होय असा फरक आहे."

शिवाजी—"जामदारांनीं रामायण बरें तयार केलें आहे असें वाटतें."

विनोबा—"जामदारांप्रमाणें अद्याप हिंदीमध्यें हि रामायण तयार झालें नाहीं. सुभाषितें सूची हि थोडक्यांत त्यांनीं दिली आहे."

शिवाजी—"एकूण भाषांतर हि गोड वाटतें. त्यांना लिहिण्यांत शेवटपर्यंत कंटाळा आल्याचें दिसत नाहीं."

अनुक्रमणिका

विनोबा—“त्यांच्या आयुष्याचें तें च काम. त्यांत त्यांची भक्ति दिसून येते.”

शिवाजी—“तुलसीरामायणांत नीति, मर्यादा, यांचें धोरण फार सूक्ष्म दिसतें. उदा. रामचंद्र बागेंत गेले आहेत, तेथें बागवानाला विचारून च त्यांनीं फुलें तोडलीं, हें सांगण्याला तुलसीदास विसरले नाहींत. परंतु एकंदरींत तें न तें च पुन्हां पुन्हां पुष्कळ वेळां सांगितलें आहे. त्यामुळें एकूण रामायणाचें पृथक्करण होण्याची आवश्यकता आहे. मराठींत असा ग्रंथ नाहीं. त्यामुळें मोठी उणीव भासतें.”

विनोबा—“मोरोपंतांनीं लिहिलें आहे पण भाषा लौकिक नाहीं म्हणून त्याचा उपयोग होण्यासारखा नाहीं. तुलसीदासांनीं तसें केलें नाहीं. भाषा त्यांनीं लौकिक घेतली ‘न हि धरम न अरथ न काम’ जोडाक्षरें शक्य तितकी टाळली. आजकाल मुलांसाठीं बिनजोडाक्षरीं कथा लिहितात. तुलसीरामायणांत शें. ८० बिन जोडाक्षरी भाग आहे. अशा लौकिकतेमुळें ग्रंथ उपयोगी होऊं शकला.”

शिवाजी—“पण तुलसीरामायणांत लांबलांब समास हि आढळतात. उपमारूपकादि प्रकार हि लौकिक नाहींत. काव्यनाटकादिकांची छाया सर्वत्र दिसून येते.

विनोबा—“तुलसीदासांनीं कथा अध्यात्मरामायणांतून घेतली. सरणी काव्य, नाटकांची ठेवली. भाषा जनसमुदायाची वापरली, नीति स्वतःची आणि भक्ति भागवतावरून असें हें पृथक्करण आहे. कृष्णभक्तिपर जसें भागवत आहे. त्याप्रमाणें रामचरित्र असावें अशा कल्पनेनें तुलसीरामायण तयार झालें. मराठींत ज्यास्तींत ज्यास्त सोपी भाषा ज्ञानदेवांनी वापरली आहे. “ओवीचेनि प्रबंधें । आबाळसुबोधें” असें त्यांनीं स्वतः च म्हटलें आहे.”

शिवाजी—“शंकराचार्यांनीं ब्राह्मण, क्षत्रिय, वैश्य, शूद्रादिकांना सत्त्वरजतमाचें तत्त्व लावलें आहे तें कितपत योग्य ठरतें?”

विनोबा—“त्यांनीं सामान्यतः वृत्ति दाखवली आहे. त्यांत हटकून ब्राह्मण म्हणजे सात्त्विक च अशी कल्पना केलेली नाहीं.”

शिवाजी—“पण एकंदरींत त्यामुळें श्रेष्ठकनिष्ठभाव येतो किंवा नाहीं?”

विनोबा—“सत्त्वरजतमांत नेहमीं श्रेष्ठकनिष्ठभाव दाखविलेला नसतो. तत्त्वज्ञानदृष्टीनें तीन गुण दाखविले आहेत. त्यांत नीतिदृष्टि नाहीं. फक्त वृत्ति दाखवलीं.”

शिवाजी—“तसें च ‘शुनि चैव श्वपाके च पंडितः समदर्शिनः’ या श्लोकांत हि शंकराचार्यांनीं सत्त्वरजतम दाखविलें आहे.”

विनोबा—“होय, ती दृष्टि आहे च.”

शिवाजी—“गीतेंत सत्त्वरजतमाचा फार च विस्तार केला आहे, असें वाटत नाहीं कां? इतका विस्तार न करतां सत्त्वरजतमाचे नुसतें तत्त्व सांगून भागलें नसतें कां?”

अनुक्रमणिका

विनोबा—“गीतेंत सत्त्व-रज-तम हें केवळ एकाच कल्पनेनें आलेलें नाहीं. कोठें सांख्यांच्या कल्पनेप्रमाणें तत्त्वज्ञान म्हणून तें आलेंले आहेत. नीति म्हणून आलें आहे. तसें च त्रिगुणांच्या पलीकडे जाण्याच्या कल्पनेनें हि आलेंलें आहे.”

शिवाजी—‘यज्ञ-दान-तपःकर्म न त्याज्यं कार्यमेव तत्’ या श्लोकावरून कार्य म्हणून जेथें जेथें आहे, तेथें तेथें यज्ञ दान तप समजावें असें काकांनीं सुचवलें.”

विनोबा—“होय, तसें मानण्याला हरकत नाहीं.”

शिवाजी—“दैवी संपत्तीमध्ये ब्रह्मचर्याचा उल्लेख नाहीं. कारण दैवी संपत्तीचें गुण हे सामाजिक गुण आहेत असें काकासाहेबांनीं लिहिलें आहे. त्यांच्याशीं माझें या बाबतीत थोडें बोलणें हि झालें.”

विनोबा—“असें म्हणतां येणार नाहीं. कारण अभय, सत्त्वसंशुद्धि इ. गुण ब्रह्मचर्याखेरीज कसे लाभतील? शिवाय दैवी संपत्तीच्या गुणांत ब्रह्मचर्य सांगितलें नाहीं असें हि म्हणतां यावयाचें नाहीं. कारण तप सांगितलें आहे. तपामध्यें ‘ब्रह्मचर्यमहिंसा च शारीरं तप उच्यते’ हा ब्रह्मचर्याचा स्पष्ट उल्लेख आहे च. त्यामुळें हें म्हणणें टिकावयाचें नाहीं.

शिवाजी—“सतराव्या अध्यायांत प्रथम च जो प्रश्न विचारला आहे त्याचें कारण नीटसें लक्षांत येत नाहीं.”

विनोबाः—“सोळाव्या अध्यायांत वर्तन दोन प्रकारचें सांगितलें. एक शास्त्रीय व दुसरें स्वैर. आतां अर्जुनानें असा प्रश्न विचारला कीं स्वैर वर्तन हि नाहीं आणि शास्त्रीय वर्तन हि नाहीं परंतु आपल्या श्रद्धेप्रमाणें चालणारा जो आहे, त्याची ती श्रद्धा ग्राह्य समजावी किंवा नाहीं? त्याला उत्तर दिलें आहे. शास्त्रीय पूजन म्हणजे माझें पूजन. सत्त्वस्थ देवांची पूजा करतात म्हणून ‘देवान् देवयजो यान्ति’ म्हटलें आहे. पण शास्त्रीय पूजन म्हणजे ‘यांति मद्याजिनोऽपि मां’. याच्या उलट स्वैर वर्तन. ‘यान्ति देवव्रता देवान्’ श्रद्धा आहे पण शास्त्र नाहीं. कशावरून? ‘तेऽपि मामेव कौन्तेय यजन्त्यविधिपूर्वकम्’ याचें मीं असें भाषांतर केलें आहे. ‘अविधिपूर्वकम्’—परी मार्गास सोडुनी. तसें च, सोळाव्या अध्यायांत केलें आहे. ‘जो शास्त्र-मार्ग सोडूनि’ शास्त्रीय मार्ग म्हणजे माझी पूजा. मार्गाला सोडून म्हणजे देवादिकांची पूजा. बाकीचा स्वैर मार्ग. स्वैर वर्तन अथवा अहंकार पूजा. म्हणून नवव्या-अध्यायांत सांगितलें ‘यत्करोषि यदश्नासि यज्जुहोषि ददासि यत्.’”

शिवाजी—“एकंदर सतराव्या अध्यायांत हा श्रद्धात्रयविभाग अगदीं अलग पडतो. आहार, यज्ञ, दान, तप यांत हा येत नाही. ‘यत्करोषि यदश्नासि’ हा श्लोक म्हणजे सबंध सतरावा अध्याय. त्यांत श्रद्धात्रयाचा काय संबंध?”

विनोबा—“संबंध असा आहे कीं ‘अश्रद्ध्या हुतं दत्तं तपस्तप्तं कृतं च यत्.....’ यज्ञ-दान-तपांत श्रद्धा पाहिजे. हें उपसंहारांत सांगून गीतेनें सतराव्या अध्यायांत श्रद्धात्रयाची उपयुक्तता दाखवली. उपसंहार करण्याची गीतेची विलक्षण हातोटी दिसून येते.”

अनुक्रमणिका

शिवाजी—"शास्त्र-मार्ग" म्हणजे स्वैर वर्तनाच्या विरुद्ध संयमयुक्त वर्तन असा सहज च अर्थ निघत नाहीं काय?"

विनोबा—"सोळाव्या अध्यायांतल्या त्या विशिष्ट स्थळीं तसा अर्थ करतां येतो."

शिवाजी—"तत्त्वज्ञानामध्यें पृथक्करण करतांना सगुण-निर्गुण, साकार-निराकार, जडचेतन असें पृथक्करण करतात असें दिसतें. परंतु स्त्री-पुरुष असा भेद स्पष्ट दिसत असतांना तो भेद कोठें च दाखवीत नाहींत हें कसें? शिवाय व्याकरण हें एक दर्शन मानलें आहे. व्याकरणांत मात्र हा भेद दिसतो. तसा तत्त्वज्ञानांत भेद मानायला नको काय? काकांनीं प्रकृति-पुरुष यांत असा भेद मानला असावा असें बोलतां बोलतां सुचवलें."

विनोबा—"प्रकृति—पुरुष, शिव-शक्ति या संबंधीं पुष्कळांनीं अशी कल्पना केली आहे. परंतु तसें मानतां येत नाहीं. रामदासांनीं हि Double Principle मानावें असें लिहिलें आहे. कशावरून? फळावरून मुळांत जरी एक च आत्मतत्त्व दिसत असलें तरी फळांत भिन्नता दिसते म्हणून. पण त्यांचा हि असा अर्थ दिसत नाहीं, कीं मुळांत खरोखर च फरक आहे. वाटल्यास असें म्हणतां येईल कीं प्रकृतीचे सत्त्व-रज-तम हे तीन गुण त्याच्या पुढें हा द्विधा भेद."

शिवाजी:—"स्त्रीपुरुष हा गुणभेद आहे काय?"

विनोबा—"नाहीं, वृत्तिभेद आहे."

शिवाजी—"जीवाच्या विकासक्रमांत स्त्रीपुरुषभेदाचा कांहीं क्रम मानतां येईल काय?"

विनोबा—"तसें सांगणें कठिण आहे"

शिवाजी—"व्याकरणांत हा भेद आला आहे मग तो एका दर्शनानें मान्य केला आहे असें समजावयाचें काय?"

विनोबा—"रामदासांनीं या हि बाबतींत लिहिलें आहे! ते म्हणतात ओहोळ म्हटलें तरी पाणी च, नदी म्हटलें तरी पाणी च. त्यांत स्त्रीपुरुष भेद नांवाला आहे." तत्त्वनिर्देशांत नपुंसकलिंगी शब्द च ज्यास्त बरा. जसा ब्रह्म शब्द."

शिवाजी—"बाल्य, तरुण इत्यादि अवस्था हा हि वृत्तिभेद आहे काय?

विनोबा—"नाहीं, त्यांत विकास आहे. कित्येक लोक बाळपणाचे गोडवे गातात. पण मला असें कधीं च वाटलें नाहीं कीं मी लहान असतों तर कसें 'बरें' झालें असतें. एका दृष्टीनें बालाची अवस्था ज्ञानासारखी दाखवता येते. पण आंतून कांहीं तेथें ज्ञान नसतें."

शिवाजी—"मग वृद्धावस्था ही सर्वांत उत्तम अवस्था मानावी लागेल?"

अनुक्रमणिका

विनोबा—“होय, ती विकसित अवस्था आहे. तरुणापेक्षां वृद्धाच्या ठिकाणीं ज्यास्त पवित्रता भासते च. हें च पहा. ती वाळुंजकरांची वृद्ध आई होती ना, ती माझ्याजवळ तास तास बसे पण मला वेळ फुकट जातो असें वाटत नसे. गंगूताईंशीं बोलतांना तसें होत नाहीं. तसें च या काशीबेनशीं बोलतांना हि फार पवित्रता वाटते. किती सात्त्विक वृत्ति! याचा अर्थ असा नाहीं कीं प्रत्येक वृद्धाची विकसित अवस्था असते च. पुष्कळ वेळा उलट स्थिति हि दिसून येते.”

—इतक्यांत प्रार्थनेची घंटा झाली. जिकडे तिकडे शांत शांत होऊन गेलें. ‘बोलीं अबोलणें संगीं च असंग’ या मधुर संगीतानें आधीं च उच्च वातावरणांत विहरणारें मन भावमयतेच्या अनंत साम्राज्यांत संचार करूं लागलें.

●●●

अनुक्रमणिका

# प्रकरण ५० वें

## प्रवासांतील कार्यक्रम

**नालवाडी** आणि कन्याश्रमांत असतांना आचार्यांना बाहेरच्या कार्यक्रमानिमित्त कांहीं ठिकाणीं जावें लागलें होतें. पश्चिम खानदेशांत या अवधींत आचार्यांचें दोन वेळां येणें झालें होतें. या दोन्ही प्रसंगाची माहिती “चोवीस तासांचा कार्यक्रम” आणि “दोन आश्रम” या सदरांत संगृहीत केल्यामुळें ते प्रसंग प्रत्यक्ष च डोळ्यापुढें उभें राहतात आणि आचार्यांच्या प्रवासांतील कार्यक्रमाची व अखंड ज्ञानमयतेची त्यामुळें सहज कल्पना येते.

### “चोवीस तासांचा कार्यक्रम”

“फळाफुलाछायेनें” परिणत झालेली ती सत्याग्रहाश्रमाची पवित्र शाखा, महात्माजींचें तें शांतिमय निवासस्थान, तें हरिजनांना सर्वांत आधीं मोकळें केलेलें जमनालालजींचें लक्ष्मीनारायणाचें मंदिर, तो जाजूजींचा चर्खा संघ, तेथली ती कन्याशाळा, तो अनेक एकनिष्ठ सेवकांचा आसपासच्या खेड्यांत प्रदक्षिणा घालणारा मेळा, आणि ह्या सर्वांना अलिप्ततेनें भक्तिज्ञानाचा आधार देणारे ते संन्यासी आचार्य विनोबा!!!—वर्धा गांवाचें नांव ऐकल्याबरोबर भक्ताच्या मनाची कांहीं चमत्कारिक स्थिति होते! त्याला तेथें ज्ञानेश्वरांची वाणी फळीभूत झालेली दिसते.

**तयाचिये देशींचां झाडीं । कल्पतरूतें होडी ।**
**न जिणावें कां एवढीं । मायबापें असतां ।**
**ते पाषाणही आघवे । चिंतारत्नें कां नोहावे ।**
**तिये भूमिके कां न यावें । चैतन्यत्व ।**
**तयाचिया गांवींचिया । नदी अमृतें वाहाविया ।**
**नवल काय राया । विचारी पां ।**
**तयाचे बिसाट शब्द । सुखें म्हणो येती वेद ।**
**सदेह सच्चिदानंद । कां नोहावे ते ।**

* * * * * *

—आज बाळूभाई वर्ध्याहून आले. रात्रीची वेळ. त्यांच्याभोंवतीं मोजका भक्तगण उत्सुकतेनें वर्ध्याची हकीकत ऐकत होता. जवळ च एक दिवा तेवत होता. सर्वत्र स्तब्धता पसरली होती. साधुचरित बाळूभाई!—त्यांच्या तोंडून वर्ध्याची हकीकत ऐकतांना तल्लीनता कां होणार नाहीं? एका मागून एक गोष्टी बाळूभाई सांगत गेले.—गांधी-सेवासंघाची बैठक झाली. किशोरलालभाई अध्यक्ष झाले, महात्माजींनीं ग्रामोद्योगाविषयीं विनोबांनीं व्यक्तिगत सेवेसंबंधीं समजावून सांगितलें. मंडळी ऐकत च होती. शेवटीं बाळूभाईंनीं “विनोबा दहा तारखेस येथें येणार आहेत”—या शब्दांनी प्रसाद वाटला. आणि या छोटेखानी कीर्तनाची समाप्ति झाली.

अनुक्रमणिका

*            *            *            *            *            *

—तेव्हांपासून धुळ्याला एका अर्थानें विनोबांच्या आगमनाची तयारी सुरू झाली. त्यांना कोठें न्यावें, त्यांना कोठें उतरवावें, त्यांच्या बरोबर तर हरिजन विद्यार्थी येणार; त्याचें कसें काय?—आपल्याला तर त्यांत आनंद च आहे. पण लोकांत गैरसमज होईल. विनोबा त्यांच्या बरोबर च जेवणार, लोक याचा विपरीत अर्थ करतील. इ. इ. विचारणा सुरू झाली.

*            *            *            *            *            *

—इतक्यांत विनोबा दहा तारखेच्या ऐवजीं पहिल्या च तारखेस येणार, असें पत्र आलें! — शून्य शून्यांत मिळून गेलें! रामेश्वरजींकडे तयारी सुरू झाली. घराला सफेती लावली, झाडझूड केली, जिना नीट केला. चित्तांतल्या परिग्रहाप्रमाणें खोलींतल्या अडगळीचा विनोबांना अतोनात कंटाळा. खुर्च्या, टेबलें, तसबिरी, फोटो, कपाटे, खुंट्या, खिळे—पुस्तकें—विनोबांना कांहीं नको. नुसती शांत—स्वच्छ—ऐसपैस खोली. आंत स्वच्छ हवा खेळत आहे. सूर्याचें किरण पसरले आहेत. ते जवळ च पाणी पिण्यासाठीं ठेवलेल्या स्वच्छ लोट्यावर पडून तो झळकत आहे, जमिनीवर ती कृष्णाचें स्मरण करून देणारी काळीभोर घोंगडी पसरली आहे. तिच्यावर बसून सूत कांतणें चाललें आहे. रहाटांतून निघणारा ॐ—ॐ ध्वनि वातावरणांत मिसळला आहे, समोर मंडळी जिज्ञासेनें बसली आहेत, त्यांना विनोबा कांहीं सांगत आहेत, असा देखावा विनोबांच्या खोलींत नेहमीं दिसावयाचा व ज्ञानेश्वरांनी म्हटलें आहे त्याप्रमाणें प्रतीति यावयाची.

**मोटकी देहाकृति उमटे । आणि निजज्ञानाची पांहाट फुटे**
**सूर्यापुढें प्रगटे । प्रकाश जैसा**
**तैसी दशेची वाट न पाहतां । वयसेचियां गांवा न येतां**
**बाळपणीं च सर्वज्ञता । वरी तयातें**
**मग तिये सिद्धप्रज्ञेचेनि लाभें । मनचि सारस्वत दुभे**
**सकल शास्त्रें स्वयंभें । निघती मुखें**

ही सर्व पद्धति माहीत असल्यामुळें रामेश्वरजींनीं जवळचा शाळिग्राम शेटजींचा बंगला झाडून साफ ठेवला.

*            *            *            *            *            *

तारीख १ जानेवारी १९३५ सकाळीं साडे आठ वाजतां विनोबा आणि त्यांचे विद्यार्थी व अण्णा सोलव मोटारींतून उतरले. रामेश्वरजींकडे मंडळी जमली च होती. सर्वांनीं एकामागून एक नमस्कार केले. शिवाजींना गीताईचीं प्रुफे तपासण्यास दिलीं. थोडा वेळ मंडळी औपचारिक प्रश्नोत्तरें करतात न करतात तों च नानासाहेब ठकार बोलण्याच्या उद्देशानें आले. विनोबा रहाटावर कांतीत होते. जिल्ह्यांतील कार्यक्रम रचण्यासंबंधींची आपली अडचण अतिशय व्यवस्थित आणि नम्र शब्दांत मांडण्यास नानासाहेबांनीं सुरुवात केली.

नानासाहेब—"इकडच्या लोकांमध्ये—आणि सगळी च कडे—अस्पृश्यता-निवारणाच्या चळवळीसंबंधीं गैरसमज आहेत. आम्ही तोंडानें फक्त सार्वजनिक ठिकाणची अस्पृश्यता जावी असे म्हणतों.

अनुक्रमणिका

पण आमचा आंतला उद्देश सबगोलंकार करण्याचा आहे; अशी लोकांची समजूत आहे. आपण जेथें जेथें जाल तेथें तेथें हरिजनाबरोबर जेवणार. त्यामुळें आम्ही काय करावें? हा प्रश्न आहे."

विनोबा—"तुम्ही काय करावें तें तुमचें तुम्ही पाहून घ्या. मी काय करावें? मी माझ्या पद्धतिप्रमाणें हरिजन विद्यार्थ्यांबरोबर जेवणार."

नानासाहेब—"परंतु कोणा हि गृहस्थाकडे उतरणें कठिण जाईल."

विनोबा—"मला कोठें गृहस्थाकडे उतरावयाचें आहे?"

नानासाहेब—"आपल्याला तें ठीक आहे. पण आम्हांला लोकांना समजावून सांगणें कठिण जाईल. तेव्हां मी म्हणतों समाजाला एकदम न बिचकवतां, सार्वजनिक ठिकाणांप्रमाणें च अस्पृश्यांना आपल्या बैठकींत बसवावें. आपल्यांत त्यांना ज्यास्त मिसळवावे. अशा तऱ्हेनें हळूंहळूं समाजाचीं मतें पालटतां येईल. शिवाय कॉंग्रेसनें हि सार्वजनिक ठिकाणीं अस्पृश्यता पाळूं नये एवढें च म्हटलें आहे."

विनोबा—"मी तुमच्यातर्फे येथें आलों आहे. जेथें तुम्हांला अडचण होईल असें वाटेल तेथला कार्यक्रम रद्द करा. मी स्वतंत्र जेव्हां येईन तेव्हां हा प्रश्न च राहणार नाहीं. जो इतके दिवस आश्रममध्यें नम्रतेनें राहिला, ज्याच्या इतका स्वच्छ मनुष्य क्वचित् च दिसेल, ज्याचा आहारविहार अत्यंत शुद्ध आहे त्याला मी अलग कसा ठेवूं? मला माझ्या व्यवहारांत यत्किंचित हि फरक करण्याचें कारण दिसत नाहीं. मला जेथें जेथें न्याल तेथें तेथें मी त्यांच्याबरोबर जेवणार इतकें च काय पण सभेंत हि हाच विषय मांडीन. हा विषय टाळून मला अन्य विषयावर बोलणें शक्य नाहीं. वस्तुतः माझा कार्यक्रम कोठें हि झाला नाहीं तरी मला त्यांत कांहीं च वाटणार नाहीं. माझें काम यशस्वी च आहे. हें च पहा रामेश्वरजींच्या घरीं हा सत्यव्रत (हरिजन विद्यार्थि) स्वयंपाक घरांत सर्वांबरोबर बसून जेवला तर तें हि लहान कार्य नव्हे."

नानासाहेब—"रामेश्वरजींच्या घरीं चालेल पण इतरांच्या घरीं कठिण जाईल. आमची तेवढी तयारी नाहीं. जरी आम्ही तुमच्या पंक्तीला जेवलों नाहीं, तरी लोक समजतील हे आमच्या देखत च जेवत नाहींत. बाकी यांना हें च कार्य करावयाचें आहे. शिवाय रामेश्वरजींप्रमाणें गंगूताईंना हें पसंत आहे असें नाहीं."

विनोबा—"कां बरें? त्या आश्रमांत राहिल्या आहेत. त्यांनीं तर हरिजनांच्या हातचें खाल्लें आहे."

नानासाहेब—"पण त्यांना कांहीं हें पटत नाहीं. रामेश्वरजींच्या दडपणामुळें हा सत्यव्रत जरी स्वयंपाक घरांत वावरला तरी त्या हरकत करणार नाहींत. स्वतंत्रपणें कांहीं त्या हरिजनाला स्वयंपाकघरांत येऊं देणार नाहींत."

विनोबा—"असें तर होणार च. लोखंडाला स्वतंत्रपणें तरण्याची शक्ति नाहीं. तें लाकडाबरोबर—होडीबरोबर तरतें. स्वतंत्रपणें त्याला पाण्यांत टाकलें तर तें बुडणार च. बापूजींचें असें च नाहीं कां? बा बापूजींच्या जवळ सतत असून बापूंचीं सर्व च मतें त्यांना पटतात असें नाहीं. पण सहधर्माबरोबर एक च मार्ग पत्करला जातो. दोन जीव एके ठिकाणीं आले म्हणजे असें व्हावयाचें च. तरी ह्यांत जबरदस्तीचा कांहीं

अनुक्रमणिका

प्रश्न नाहीं. बापूंनीं बांना संपूर्ण स्वातंत्र्य दिलें आहे. समाजाला विवेक शिकविण्याची वेळ टाळून कसें चालेल?"

नानासाहेब—"आम्हांला अमुक मर्यादेपर्यंत हरिजनांत लोकांनी मिसळावें हें सांगतां येईल. पण समाजाला एकदम सर्व गोष्टी पटणें शक्य नाहीं. संतांनीं सुद्धां व्यक्तिशः हरिजनांची अस्पृश्यता दूर करण्याचा त्या त्या प्रसंगीं प्रयत्न केला. पण त्यांनीं सर्व च गोष्टींना एकदम सुरुवात केली नाहीं."

विनोबा—"तें संतांनीं काय केलें तें असो! त्याचा इतिहास कोणी पहावा? तुकाराम एक कीं दोन हा जेथें वाद, तुलसीदासानें लग्न केलें कीं नाहीं येथून च जेथें सुरुवात आहे; तेथें इतिहास काय पहावा? पितृपूजा च समाजांतून नष्ट झाली! नुसती श्राद्धाची तांत्रिक क्रिया केली म्हणजे झालें! हिंदु समाजा इतका प्राचीन समाज दुसरा कोणता च नाहीं. परंतु देशांत दीर्घकाल टिकलेली अशी एक हि संस्था नाहीं. युरोपियन समाज अलीकडचा पण पांचशें पांचशें वर्षे अबाधित चाललेल्या संस्था तिकडे आहेत, युनिव्हर्सिट्या आहेत, त्यांचे व्यवस्थित इतिहास लिहिले आहेत. जीवनाची कदर नाहीं, संतांची माहिती नाहीं. इतिहास च नाहीं. तेव्हां इतिहास कोण सांगणार? —पण संतांच्या वेळीं खरोखर हा प्रश्न च नव्हता. जिथें संस्कृतमधलें ज्ञान मराठींत आणलें तरी विरोध होत होता; तेथें हा प्रश्न उभा कसा होईल? तरी ज्या ज्या वेळेला प्रसंग आला त्या त्या वेळेला संतांनीं स्वयंस्फूर्तीनें अस्पृश्यता निवारण केलें च. अज्ञानी समजुतींचा पहिला कोट फोडण्यांत च संतांची सर्व शक्ति खर्च झाली. आतां मात्र वेळ अशी आली आहे कीं तुम्ही आम्ही मरूं तेव्हां अस्पृश्यतेसंबंधीं कांहीं कार्य होईल. गांधी हरिजनांसाठीं प्राण देतात आणि मी हरिजनांपासून समाजभीतीनें अलग होऊं? या कार्यांत मरण आलें तरी बेहेत्तर. त्यांत च खरा रस आहे. मांजर सुद्धां उपाय नाहींसा झाला म्हणजे उलटतें, तसें आहे. आतां उपाय नाहीं. या खोट्या समजुतीचा निरास केला च पाहिजे. रामानुजाचार्य स्नान करून हरिजन विद्यार्थ्यांच्या खांद्याचा आधार घेऊन रोज आपल्या मठांत जात असत. ही गोष्ट तर कांहीं आजकालची नाहीं? रामानुजाचार्यांचे दोन लाडके शिष्य होते. एक अंत्यज आणि एक ब्राह्मण. दोघांच्या खांद्यावर हात ठेवून ते नदीवरून स्नान करून येत. त्यांना केवढा विरोध झाला असेल! मी एका मंदिरांत गेलों. मंदिर हरिजनांना मोकळें नाहीं. माझे हात त्या मूर्तीपुढें जोडले गेले नाहींत. दगडाला नमस्कार करूं कीं काय? तेथें देवाची कल्पना होऊं शकत नाहीं."

नानासाहेब—"कॉंग्रेसनें खाण्यापिण्यासंबंधींची बाब मुग्ध च ठेवली आहे. सार्वजनिक ठिकाणीं अस्पृश्यता मानूं नये एवढेंच जाहीर केलें आहे."

विनोबा—"त्याचा अर्थ असा केला कीं अस्पृश्य नीच म्हणून त्याबरोबर जेऊं नये. उच्चनीच भावावर अन्नव्यवहार अवलंबून आहे तर ती चुकीची समजूत आहे. खानपान व्यवहार, रोटीबेटी व्यवहार, उच्चनीचतेवर अवलंबून नाहीं, हें मी कॉंग्रेसतर्फे म्हणून हि सांगूं शकतो. त्याचें शास्त्र निराळें आहे. डॅ. अभ्यंकरांच्या ऑपरेशनसारखा हा प्रश्न आहे. ऑपरेशन नाहीं केलें तर पायाची सूज वाढून पाय वर वर सडत जाणार. केलें तर जखम बरी होईल कीं नाहीं ही शंका. कारण "डायबेटिक" रक्त झालेलें. समाजाच्या अज्ञानी समजुतींची उपेक्षा केली तर समाजाचा नाश होईल. समाजाविरुद्ध चाललें तर लोकक्षोभ होईल. कांहीं तरी एक पत्करलें च पाहिजे. आतां बलिदान केलें पाहिजे."

इतक्यांत अप्पासाहेब रणदिव्यांनीं आपणास हि समाजाच्या अस्पृश्यतेचा कसा त्रास झाला हें सांगितलें.

अनुक्रमणिका

नानासाहेब—“ह्या प्रश्नाचा विचार करतांना लोकांच्या भावना दुखविल्या जाणार नाहींत हें हि पाहिलें पाहिजे.”

विनोबा—“समाजाला विवेकाचा धर्म शिकवलाच पाहिजे. इन्फ्लुएंझामध्यें माझ्या घरची बहुतेक मंडळी आजारी पडली. मी त्या वेळीं साबरमतीला होतो. रघुनाथरावांचें मला पत्र आलें म्हणून मी घरीं गेलों. त्यानंतर बहुधा दोन तीन दिवसांनीं माझी आई वारली. मी त्या वेळीं वडिलांना म्हणालों—“ब्राह्मणांच्या हातून क्रिया करण्यावर माझी श्रद्धा नाहीं. ब्राह्मणांकडून क्रिया न करतांच आईला अग्नि द्यावा.” वडिलांचें हि या बाबतींत माझ्यासारखे च मत होतें. पण ते म्हणाले, “यांत तुझ्या आईच्या समजुती पाहिल्या पाहिजेत. आपल्या मताचा प्रश्न नाहीं.” मी म्हणालों—“एक तर तिचें मत आपल्याहून वेगळे होतें च असें निश्चित सांगतां येत नाहीं. पण वेगळें असण्याचा जास्त संभव गृहीत धरून हि जर तिच्यापुढें असा प्रश्न होईल कीं क्रियाकर्मांतरें न करतां तिला मुलाच्या हाताने अग्नि मिळेल अथवा मुलाशिवाय क्रियाकर्मांतरें होऊन नेहमींप्रमाणें अग्नि मिळेल तर ती खात्रीनें मुलाच्या हातचा अग्नि पसंत करील.” कारण मी पहात असें कीं नागपंचमीला ती माझ्याकडून पाटावर गंधाचा नाग काढून घेई. मी आईला म्हणे “आई, बाजारांत नागाचीं उत्तम चित्रें मिळतात तीं सोडून माझ्या हातच्या वेड्यावांकड्या नागाची पूजा कशाला?” आई म्हणे, “तुझ्या च हातचें चांगलें.” मुलाच्या हातचें चित्र चांगलें अशी तिची समजूत होती. शेवटीं मी श्मशानांत गेलों नाहीं. अर्धे गांव मला शिव्या देत होतें. पण मला अजून त्या गोष्टीचा पश्चात्ताप होत नाहीं. मीं केलें तें योग्य च केलें असें वाटतें.”

या वेळीं जेवणाची तयारी झाली. विनोबा आंत गेले. स्वयंपाक घरांत सर्वांचीं पानें मांडलीं होतीं. विनोबांनीं सत्यव्रतनला येथें बसण्यास कांहीं हरकत आहे कां अशा अर्थाचा गंगूताईस प्रश्न विचारला. हरकत आहे असें कळतांच ते सर्व मंडळींसह बाहेर जेवावयास बसले. रामेश्वरजींना या प्रकारामुळें फार वाईट वाटलें. हें पाहून विनोबा हंसत हंसत “कोणावर जबरदस्ती तर करतां येत नाही?” असें म्हणाले. जेवतांना अप्पासाहेब रणदिवे स्वतःची हकिकत सांगत होते. ब्राह्मणाकडे गेलों म्हणजे कित्येक वेळां मला गोठ्यांत हि बसावें लागे इ. हकिकत ते सांगत होते.

*　　　　*　　　　*

यानंतर बरोबर बारा वाजतां तकली उपासना सुरू झाली. विनोबांची तकली उपासना कधीं चुकावयाची नाहीं. वेळ हि इकडचा तिकडे व्हावयाचा नाहीं. ते बाराचे ठोके पडले—सूर्यनारायण डोक्यावर आला कीं ती मौन उपासना सुरू व्हावयाची च. हजारो लोकांना उपासना करावयाची तर रहाट कोठून आणणार? “जेथें जातो तेथे तूं माझा सांगाती” अशी ती तकली! जगन्माता च ती! जमलेली मंडळी तिच्या उपासनेत सामील झाली. “जेवणासाठीं जरी मंडळी जमली नाहीं तरी चालेल, किंबहुना जेवण्यासाठीं जमण्याची कांही जरूरी नाहीं; एकत्र जमण्यांत जेवणाचा हेतु नसावा. परसाकडेला नाहीं कोणी बोलावीत! पण तकली कांतण्यासाठीं हजारों माणसांना एकत्र आणले पाहिजे.” असें विनोबा नेहमीं म्हणतात. आश्रमांत रामनवमीचा उत्सव केला. त्या निमित्ताने सर्व मंडळी जमून तकली कांतू लागली. तो गंभीर देखावा—मौन राखून लहान मोठे स्त्रीपुरुष सर्व जण तकली कांतीत आहेत हें पाहून, विनोबांना साक्षात् परमेश्वराचें दर्शन झाल्यासारखें झालें. डोळ्यांतून अनावर अश्रुधारा वाहूं लागल्या. मंडळींना या संवेदनेचा अनुभव नाहीं. त्यांना कोणी मेलें अगर अशी च कांहीं सुखदुःखाची गोष्ट झाली म्हणजे अश्रु यावयाचे. रामकृष्ण परमहंस नेहमीं म्हणत “अरे, परमेश्वरासाठीं कोण रडतो? बायकोसाठीं, पोरासाठीं, पैशासाठीं

अनुक्रमणिका

सर्व च रडतात.” ईश्वराच्या दर्शनासाठीं अश्रु येत नाहींत मग ईश्वर दर्शनानंतरच्या अश्रूंची काय कथा? आरंभ च नाहीं तेथ मुक्कामाची कल्पना कोठून येणार? उपासनेनंतर मंडळींनीं थोडा वेळ विश्रांति घेतली.

*                    *                    *

३-३॥ वाजतां शाळिग्रामजींच्या बंगल्यांत विनोबांकडे पुन्हां मंडळी जमली. प्रत्येकाला प्रश्न विचारावयाचे होते. कोणाचे खासगी प्रश्न, कोणाचे अभ्यासासंबंधीं, कोणाचे सांसारिक तर कोणाचे आहारासंबंधी. येथे कोणच्या हि प्रश्नाला ना नाहीं. मोठीं मोठीं कोडीं लीलेने सहज उलगडलीं जातात. “सहज बोलणें हितउपदेश—या स्तेषां स्वैरकथा स्ता एव भवंति शास्त्राणि।” प्रथम शिवाजींना गीताईचें काम सोपविल्यामुळें तत्संबंधींचें पत्र झरझर लिहून स्वतः वाचून दाखविलें. त्यांत शिवाजींनीं सुचविलेली दुरुस्ती केली— (कामाचा आणि नम्रतेचा हा पदार्थपाठ च शिवाजींना सुचवला जात होता.)

**बाळबोध अक्षर । घडसूनि करावें सुंदर**
**जें देखतां चि चतुर । समाधान पावती**
**वाटोळें सरळें मोकळें । वोतलें मसींचें काळें**
**ओळी चालल्या ढाळें । मुक्तामाळा जैशा**

विनोबांचें अक्षर समर्थांच्या उक्तीची साक्ष पटवितें. लिहितांना थांबण्याची जरूर नाहीं, क्षणाचा हि विचार नको, ऐसपैस जागा सोडलेली, शोध नाहीं. खोडाखोड नाहीं, कृत्रिमता नाहीं ती लेखणी सरासर एक सारखी अस्खलित गंगाप्रवाहाप्रमाणें चालूं.

**कां फेडित पापताप । पोखित तीरींचे पादप**
**समुद्रा जाय आप । गंगेचें जैसे**

तीं अक्षर म्हणजे ज्ञानी पुरुषाचा ब्रह्मविकार! —अनेकांना त्याच्यापासून स्फूर्ति मिळावयाची!

*                    *                    *

नंतर प्रश्न विचारणाऱ्या मंडळींबरोबर विनोबा फिरावयास गेले. लहानपणापासून फिरणें हा विनोबांच्या जीवनाचा एक महत्त्वाचा भाग होऊन बसला आहे, त्याला ते धार्मिक महत्त्व देतात. रोज दहा पंधरा मैल फिरणे म्हणजे त्यांना खेळ वाटतो. फिरण्याचे महत्त्व ते नेहमीं सांगतात—“हैदरअली पश्चिम किनाऱ्यावरून पूर्व किनाऱ्यावर केव्हां आला हें कोणास हि समजत नसे. शत्रु एकदम चकित होऊन जात. राघोबा भरारी आपल्या भराऱ्याच्या जोरावर शत्रूला पराजित करीत असे. शंकराचार्यांनीं आसेतु-हिमाचल पर्यटन केलें. “पर्यटन परिव्राजकाचा धर्म च आहे.” नाना तऱ्हेनें फिरण्याचें महत्त्व ते सांगावयाचे.

*                    *                    *

संध्याकाळच्या जेवणानंतर, सकाळपासून बोलण्याच्या इच्छेनें बसलेल्या एका मद्रासी प्रवाशाशीं विनोबा थोडेसें बोलले. त्याच्या प्रांताची माहिती त्यांनीं विचारलीं. भूगोलाचें सूक्ष्म अवलोकन त्या प्रवाशाला

हि आश्चर्यजनक वाटत होतें! नवीन निघालेल्या सह्याद्री मासिकाचा अंक चाळून त्यांतील सह्याद्रीच्या घाटांचें चित्र दाखवून ते म्हणाले ह्यांत एवढी च आकर्षक वस्तू आहे. इतकें त्यांचें भूगोलाविषयीं प्रेम.

**"समुद्रवसने देवि पर्वतस्तनमंडले ।**
**विष्णुपत्नि नमस्तुभ्यं पादस्पर्शं क्षमस्व मे" ॥**

भूमातेविषयींचा विनोबांचा भक्तिभाव रोज प्रार्थनेंत प्रकट होतो. तसा च तिच्या ठायीं असलेल्या तीर्थस्थानांचा, साधुसंतांच्या स्थळांचा अभ्यास करण्यांत हि प्रकट होतो. विनोबांना हा अभ्यास परम आनंद देणारा वाटतो!

* * *

संध्याकाळ—सूर्यास्ताची वेळ. आकाशांत सायंप्रभा पसरलेली. पक्षी आपापल्या घराकडे धांव घेत आहेत. अशा त्या प्रशांत वेळीं सर्व मंडळी जेवण उरकून उघड्या हवेंत गच्चीवर बसली. नाना तऱ्हेचें बोलणें सुरू झालें.

विनोबा—"सेवाकार्य चोवीस तास चालवील तो च सेवक. बाकी मग सगळे सहायक म्हणावयाचे. ऋषभदासजी दुकानाचें काम करून प्रत्येक मालावर ठराविक फायदा घेऊन आपल्याकडून होईल ती पैशाची मदत करतात. पण ते सेवक नव्हेत. सहाय्यक."

रामेश्वरजी—"प्रत्येक मालावर ठराविक फायदा कसा होणार? कधीं तोटा हि येईल."

बाळूभाई—"सरासरी फायदा पहावयाचा. एका मालांत तोटा आला तर दुसऱ्यांत थोडा जास्त फायदा येईल."

रामेश्वरजी.—"व्यापारांत फायदा होण्यासाठीं मालाचा भाव वाढविण्याची वाट पाहणें योग्य आहे कीं नाहीं?"

विनोबा—"भाव वाढविण्यासाठीं वाट पाहाण्यास हरकत नाहीं. पण लोकांच्या जीवनाला ज्या वस्तूंची अतिशय जरूरी आहे. अशा प्राथमिक जरूरीच्या वस्तूंचा भाव वाढेल या लोभानें त्या दुकानांत राखून ठेवणें अधर्म आहे. लोक इकडे त्या वस्तूसाठीं तळमळत आहेत. आणि हा आपल्या पोळीवर तूप ओढू पाहतो हा धर्म कसा होणार?"

रामेश्वरजी—"भुईमुगाच्या शेंगांचा भाव वाढेल म्हणून वाट पहावी किंवा नाहीं?"

विनोबा—"त्याला कांहीं विशेष हरकत नाहीं. भुईमूग कांहीं प्राथमिक गरजेची वस्तू नव्हे—शिवाय व्यापाऱ्यानें दरवर्षाचें बजेट हि बरोबर केलें पाहिजे.

बाळूभाई—"बिनचूक बजेट करणें कठिण. कारण मालाचा भाव नक्की नसतो."

अनुक्रमणिका

अण्णा सोलर—“आमच्या शेतींत आम्ही अशा तऱ्हेनें बजेट करतो. गेल्या सालचा फायदा पाहून त्याप्रमाणें या वर्षीचा खर्च ठरवावयाचा.”

विनोबा—“हां, ही पद्धति विचार करण्यासारखी आहे.”

बाळूभाई—“शेती आणि व्यापारांत थोडा फरक नाहीं कां?”

विनोबा—“हो, शेती फक्त अस्मानी कृपेवर अवलंबून. पण व्यापारावर अस्मानी सुलतानी दोहोंचा परिणाम होतो.”

रामेश्वरजी—“समाजाला व्यापाराची विशेष जरूरी आहे काय?”

विनोबा—“विशेष जरूर आहे असें नव्हे. सर्वांना गरजेचा माल राखून ठेवावा लागेल. पण तें शास्त्र फार मोठें आहे. बाळूभाईंनीं त्याचा जेलमध्यें अभ्यास केला आहे. ते सांगतील. आजकाल मोठ्या मोठ्या गोष्टींविषयीं लोक बोलतील. पण साध्या गोष्टी त्यांना समजणार नाहींत. सर्वांची संपत्ति सारखी करावी, कारखाने राष्ट्राचे असावे, किती तरी गोष्टी सांगतील, पण म्हशींचा प्रश्न कसा सोडवावा, बकऱ्यांची वाढ पुष्कळ होते, त्यांचें काय करावें, हें मोठेमोठे हि सांगूं शकत नाहींत.”

बोलतां बोलतां सृष्टीवर अंधाराचा पडदा पडूं लागला. तारे चमकूं लागले. शांतीचे साम्राज्य सुरू झाले. आकाश, तारे, वृक्ष, वनस्पति जणूं काय प्रार्थनेसाठीं तयार झाले!— या वेळीं पक्षी हि ध्यानस्थ बसलेले दिसतात. आश्रमाच्या इमारतींत छपरागलतच्या कोपऱ्यावर ते निस्तब्ध बसून राहतात. त्यांना त्रास दिलेला विनोबांस खपत नाहीं. “निद्रा समाधिस्थितिः” या वचनाची ते साक्ष देतात, सर्वत्र स्तब्दता पसरली, प्रत्येकानें आपलें चित्त आणि आसन व्यवस्थित करण्याचा प्रयत्न केला. बरोबर आठ वाजतां शिवाजींनीं प्रार्थनेला सुरुवात केली. स्थितप्रज्ञाचें श्लोक झाल्यावर तें रैदासाचें प्रसिद्ध पद म्हणण्यांत आलें.

**प्रभुजी, तुम चंदन हम पानी ।**
**जाकी अंग अंग बास समानी ॥**
**प्रभुजी, तुम घन बन हम मोरा ।**
**जैसे चितवत चंद्र चकोरा ॥**
**प्रभुजी, तुम दीपक हम बाती ।**
**जाकी ज्योति बरै दिनराती ॥**
**प्रभुजी, तुम मोती हम धागा ।**
**जैसे सोनहि मिलत सुहागा ॥**
**प्रभुजी, तुम स्वामी हम दासा ।**
**ऐसी भक्ति करै रैदासा ॥**

प्रार्थनेनंतर विनोबांनीं त्यांच्या येण्यासंबंधीं चार शब्द सांगितले.

आज सकाळीं मी येथें आलों. मंडळींना पाहून मला अतिशय आनंद झाला. असा आनंद नेहमीं च होतो. कारण मला मंडळींविषयीं आंतून प्रेमाची ओढ लागते. परंतु, प्रेम असून हि मी माणसांसंबंधी मोह राखीत नाहीं. माझ्याकडे माझ्या शक्तींच्या मानानें पुष्कळ मंडळी काम करीत आहेत. त्याचें कारण हें च. मी इकडे येणार हें ऐकून मनोहरजी मला भेटण्यासाठीं आले. मी चर्खा कांतीत होतो. ते म्हणाले—"गेल्या कांहीं दिवसांत वर्धा तालुक्यांत बाहेरचीं पुष्कळ माणसें काम काय चाललें आहे हें पाहण्यासाठीं म्हणून आली. मामा फडके थेट सावंगीपर्यंत जाऊन आले. आपल्या तेथें कांहीं विशेष काम चाललें आहे असें नाहीं. पण एका विचाराची मंडळी येथें जशी दिसतात तशी अन्यत्र दिसत नाहींत. हा येथला विशेष आहे." हें त्यांचें म्हणणें अक्षरशः खरें आहे.

असें असलें तरी वर्ध्याच्या माणसांप्रमाणें सर्वत्र जीं थोडीं फार माणसें काम करीत आहेत; त्या सर्वांकडे माझें लक्ष आहे. जेथें जेथें कळकळ आहे तेथें तेथें माझे मन वेधतें. त्याला मध्यें नद्या पर्वत किंबहुना मोठमोठे देश हि आड येत नाहींत. वर्ध्याहून माझें मन जें निघतें तें एकदम हरिद्वारला जातें. तेथें ते देवशर्माजी आहेत. वेदाचा अभ्यास करून त्यांनीं कांहीं पुस्तकें लिहिलीं आहेत. माझ्याकडे त्यांनी ती पुस्तकें पाठविलीं होतीं. येथें हि (खानदेशांत) कळकळीची माणसें आहेत. सटाण्याला ते पोतनीस आणि त्यांची ४—५ मंडळी आहेत. या सर्वांकडे माझें लक्ष आहे.

आपणांमध्यें या कलेक्टरी पद्धतिमुळें जिल्ह्याचा संकुचित अभिमान उत्पन्न झाला आहे. आपल्याला माणसांकडे लक्ष दिलें पाहिजे. प्रांत जिल्हा ह्या जड वस्तु आहेत. पश्चिम खानदेशाच्या मंडळींनीं सटाण्याकडे लक्ष ठेवलें पाहिजे. सटाणें फार दूर नाहीं. खानदेशच्या सीमेवर च आहे म्हटलें तरी चालेल.

आपल्या माणसांकडे लक्ष ठेवावयाचे म्हणजे त्यांना चैनींत ठेवावयाचें नाहीं. रामेश्वरजींनीं विचारलें सटाण्याच्या मंडळींना मी काय मदत करूं शकेन. मदत त्यांच्या कार्याशीं समरस झाल्यानें होईल. एवढ्यासाठीं च आज मी जेवतांना रामेश्वरजी मंडळींना संत्री देत असतां नको म्हटलें. संत्र्यांची काय जरूर? ते बिचारे जेवत होते. त्यांना त्या महाग संत्र्यांचा रस कशाला? आजारी, माणसांना फळें द्यावीं. विनाकारण औषधांत पैसे घालविण्यापेक्षां आजाऱ्यांना फळें दिलेलीं चांगली. मी पोतनिसांना पाहतो आहे, त्यांचे शरीर पूर्वीपेक्षां पुष्कळच चांगले झालें आहे. तें का चैनीनें झालें? नव्हे त्यांना कामाचा रस आहे त्यामुळें शरीर पुष्ट झाले.

तिकडे वऱ्हाडमध्यें हिरालालजी आहेत. अतिशय विक्षिप्त, तऱ्हेवाईक, त्रासदायक मनुष्य. परंतु एकसारखा काम करतो. शरीराची बिलकुल पर्वा नाहीं. खेड्यापाड्यांतून हिंड हिंड हिंडतो. एक घोडें ठेवलें आहे. त्यावर बसून फिरतो. किशोरलालभाई सांगत होते, "हा घोड्यावरून पंचवीस पंचवीस मैल हिंडतो पण त्या घोड्याला खायला हि देत नाहीं. फक्त चरायला सोडून देतो." मी हिरालालजींना विचारले तुम्ही घोड्याला खायला कां देत नाहीं? ते म्हणाले—"अहो, मला तरी कुठें नीट खायला मिळतें?" — देहाची पर्वा न करतां काम करणारा मनुष्य! त्याच्याकडे लक्ष कां जाणार नाहीं?

जेलमध्यें त्यानें उपवास केले. तो कोणाचें च ऐकणारा मनुष्य नाहीं. शेवटीं डॉ. पटवर्धनांनीं मला तार केली. मी जेव्हां त्याला उपवास सोडण्यासंबंधीं लिहिलें तेव्हां तो जेलरला म्हणतो, "आतां माझ्या अधिकाऱ्याचा हुकूम आला म्हणून मी उपवास सोडतो. तुमचा हुकूम मी मानीत नाहीं." त्याचें असें माझ्यावर प्रेम आहे. याचें कारण इतकें च कीं मी माणसांच्या देहाचा मोह राखीत नाहीं. बाळकोबांचे हि माझ्यावर

किती प्रेम! भरतलक्ष्मणाच्या प्रेमाची उपमा फार मोठी समजली जाते. पण मला तर बाळकोबांचें प्रेम भरतलक्ष्मणाच्या प्रेमाहून जरा सुद्धां कमी वाटत नाहीं.

अशा माणसांच्या भेटी घेण्यासाठी मी इकडे आलों. अमुक ठिकाणीं गेल्यानें काय काम होईल, कार्यक्रम काय होईल हा प्रश्न च नाहीं. कामाचें काय? काम आपण कोण करणार? परमेश्वर माकडाकडून हि कामें करवतो. कळकळीच्या माणसांचा आंतरिक संबंध हें च काम, अशीं माणसें भेटलीं म्हणजे किती आनंद होतो. तें म्हटले आहे ना—"देतां आलिंगन वैष्णवांसी" मनोहरजींसारखा मनुष्य भेटला म्हणजे किती समाधान होतें! शरीराची पर्वा नाहीं, ज्यास्ती बोलावयाचें नाहींत, अखंड कामांत मग्न, त्यांची शांति किती!—हे वऱ्हाडचे सोलव आले आहेत. हे हि मला बोलावीत आहेंत. योग आल्यास जाणें होईल. सेवा करावी. सज्जनांच्या भेटी घ्याव्या, यांत च श्रेय आहे.

*　　　*　　　*

यानंतर मौन. विनोबा प्रार्थनेनंतर नेहमी मौन राखतात. मौनाचें महत्त्व आम्हांला समजत नाहीं. परंतु त्यांच्या महत्त्वाला सीमा नाहीं. मौनानें आपली वृत्ति आंत वळवून, आंतून मिळालेली स्फूर्ति दिवसा बाहेर वाटण्याची सत्पुरुषांची नेहमींची पद्धति आहे. मौनांतून परतत्त्व स्पर्शानें पावन झालेली महाकाव्यें निघतात. रात्रींच्या ध्यानातून दिवस बनतो. दिवस ध्यानाची वाणी बनते. ध्यानाला हातपाय फुटतात, विश्वसंसाराचा पंसारा तें आपल्या शिरावर घेतें, ते कांसव नाहीं कां? चालावयाचे झालें म्हणजे अवयव बाहेर, नाहीं तर आंत. देवळांत हि कूर्ममूर्ति एवढ्यासाठीं च ठेवलेली असते. दिवसांतून रात्रींचा आणि रात्रींतून दिवसाचा बेमालूम कोंब फुटतो; त्याप्रमाणें मौनांतून दिवसाची सगळी साधना फुटून निघावयाची आणि आईच्या कुशींत निजणाऱ्या बाळाप्रमाणें रात्रीं ती सगळी ध्यानाच्या सुखसमाधींत मग्न व्हावयाची. केवढा हा मौनाचा प्रभाव!—ह्या सर्व गोष्टी ध्यानांत घेतल्या म्हणजे सत्पुरुषाचा सर्व कार्यक्रम न पाहतां हि ओळखतां येतों. दिवसा कर्मयोग; संधिकाळीं प्रार्थना; भक्ति; रात्रीं ध्यान—समाधि; चोवीस तासांचा कार्यक्रम.

●●●

अनुक्रमणिका

# प्रकरण ५१ वें

## दोन आश्रम

**पश्चिम** खानदेशात कासारा आणि नावरी या दोन ठिकाणीं पू. विनोबाजींच्या हस्तें आश्रम उद्‌घाटन समारंभ व्हावयाचा होता. म्हणून मंडळी गडबडींत होती. तारीख ३ एप्रिल १९३५ ला सकाळीं चाळिसगांव स्टेशनवर मंडळी जमा झाली. पुण्याहून अण्णासाहेब दास्ताने, पूर्व खानदेशातील कांहीं कार्यकर्ते, पू. विनोबा, त्यांच्याबरोबर अच्युत देशपांडे, दत्तू, तुकाराम ठाकूर धुळ्याहून मोटार घेऊन आलेला श्रीराम व चर्चा करण्यासाठीं शिवाजी आले होते. मंडळींसह मोटार आठ वाजतां धुळ्याला येऊन पोंचली. ताबडतोब कामाला सुरुवात झाली. सबंध महाराष्ट्राच्या नकाशासंबंधी छंदासंबंधी चर्चा झाली. बाळूभाईंनी कासाऱ्याच्या कार्यक्रमासंबंधी चर्चा केली. हजामत चालली असतांना हि कामांत खंड पडला नाहीं. त्या वेळीं गीताईंतील शब्दांच्या व्युत्पत्तीचा कच्चा खर्डा पुढें ठेवून बोलणें चाललें होतें—“तस्मादसक्तः सततं कार्यं कर्म समाचर”—भगवंतांची आज्ञा च प्रत्यक्षरूपांत दिसत होती!!!

* * *

जेवणाची वेळ झाली. मंडळींच्या स्वागताच्या रूपानें रामेश्वरजींच्या भोजनप्रेमाला साहजिकच भरती आली होती. पानांवर निरनिराळे पदार्थ व फळें ठेवलीं होतीं. अर्थात् बिनमसाल्यांचे शुद्ध सात्त्विक असे च हे पदार्थ होते. ते पदार्थ पाहून विनोबा म्हणाले “इतके पदार्थ पाहून मी घाबरून च जातो! माझें जेवण नीट होत नाहीं. पाहून च तृप्ति होते. भणसाळीभाईंनीं ५०—५५ दिवस उपवास केले. त्यानंतर ते वेडे झाले. त्या वेडांत ते मोठमोठ्यानें हांका मारीत पेढा लाव, बरफी लाव, असें त्यांचें एकसारखें चाले. बाळकोबा, सुरेंद्रजी मला त्यासंबंधी पत्रें लिहींत. मीं म्हटलें यांत आश्चर्य काय? ५०—५५ दिवसांचे उपवास म्हणजे काय सामान्य वस्तु आहे? त्यांची तशी अवस्था झाली पण आमची कशी होईल हें कोण सांगूं शकतो! ते असे एकसारखे मागत सुटत. पण त्यांना कोणी कांहीं देत नसे. त्यांच्या भोवती जर पुष्कळसे पदार्थ ठेवले असते तर त्यांची पाहूनच तृप्ति झाली असती.”

* * *

जेवण ‘झाल्यानंतर नेहमींप्रमाणें तकली उपासनेला मंडळी बसली. विनोबांची गति आतां सरासरी ११५ येऊं लागली आहे. मंडळी गंभीरपणें कांतीत होती. कांतल्यानंतर दत्तूचा “गोल्डन ट्रेझरी” चा वर्ग विनोबा घेऊं लागले. अलीकडे दत्तू विनोबांबरोबर असल्यामुळें रोज त्याचा वर्ग चालू असतो. अहो भाग्यच ते! “गोल्डन ट्रेझरी” विनोबांचे आवडतें पुस्तक. उच्च काव्यानंदांत जवळ बसणाऱ्यास वेळेचें भान रहात नाहीं, इतका आकर्षक वर्ग! जादूनें भारल्याप्रमाणें ऐकणाऱ्याची स्थिति होते! “कविः क्रान्तदर्शी”—नवीन स्फुरणानें भरलेलीं वाक्यें—त्यांचें स्पष्टीकरण —ज्ञानाचा अस्खलित ओघमनुष्याला मंत्रमुग्ध करतो! “शिष्यस्तोहं शाधि मां त्वां प्रपन्नम्” ही वृत्तिमात्र पाहिजे.

* * *

अनुक्रमणिका

यानंतर येथें जमलेल्या मंडळींना स्वकर्तव्याविषयीं विनोबांनीं उपदेश केला. ते म्हणाले, "स्वतः सर्वस्व अर्पण केल्याशिवाय आतां आपले काम पुढे जाणार नाहीं." आता सर्व पुढाऱ्यांची बुद्धि थकलेली आहे. काय करावें हे कोणाला हि नीट समजत नाहीं." परवां वर्ध्याला सकाळची प्रार्थना झाल्यावर लक्ष्मीदासभाई माझ्याकडे येऊन बसले. अंधारामुळें दोन-चार मिनिटें मला समजलें च नाहीं. ते म्हणाले, "विनोबा, आतां खादीचें कसें होणार? कांहीं सुचत नाहीं. हे काम आतां पुढें सरकत च नाहीं." त्यांच्यासारख्यांची ही स्थिति मग इतरांना काय सुचणार? माझी बुद्धि सुद्धां कित्येक दिवस काम देईना. पण मी हार कधीं खात नाहीं. ताबडतोब मला मार्ग सुचला. माझा सर्व वेळ मी कांतण्याकडे दिला. रहाट कांतता कांतता मला स्फूर्ति मिळूं लागली. नाना कल्पना मिळूं लागल्या. उदाहरणार्थ साधनपरीक्षणाचा एक सिद्धांतच मला कळला. जें साधन लवकर आत्मदर्शन करील तें उत्तम समजावें. जें साधन तें साधन बनविण्यासाठी लागणारा खर्च ज्यास्तीत जास्त लवकर भरून काढील, त्याची आत्मदर्शन करण्याची शक्ति अधिक. आत्मदर्शनाचा हा अर्थ. या दृष्टीनें तकली हेंच सर्वोत्तम साधन ठरेल." इ. इ. इ.

*　　　　*　　　　*

संध्याकाळीं फिरतां फिरतां नाना प्रकारचे प्रश्न मंडळी विचारीत होती. त्यामध्यें च गीतेसंबंधीं हि किंचित प्रश्नोत्तरें झाली.

शिवाजी—"१८ व्या अध्यायांत माझा मत्सर करतो त्यास ज्ञान सांगूं नये इ. विवेचन आलें आहे, त्याचा अर्थ काय?"

विनोबा—"मी म्हणजे, येथें परमात्मा असा अर्थ आहे. परमात्म्यासंबंधी ज्याला निष्ठा नाहीं, जो नास्तिक आहे त्याला सांगून उपयोग होणार नाहीं. उपदेशाचें ग्रहण व्हावयाचें नाही."

शिवाजी—"मंदिरांत अस्पृश्य तर येत नाहींत च (त्यांना मोकळीक नसल्यामुळें व शिक्षणाच्या अभावामुळें) पण तेथें प्रवचनादि कार्यक्रम करण्यानें त्यांना मोकळीक नाहीं असे होतें. तर मंदिरांत कार्यक्रम ठेवण्यासंबंधीं काय धोरण असावें?"

विनोबा—"शक्य तितकें मंदिरांत हे कार्यक्रम नसावे च" यानंतर प्रार्थना होऊन जिकडे तिकडे शांत आणि सामसूम झालें.

तारीख ४ एप्रिल १९३५ सकाळीं नित्याप्रमाणें प्रार्थनादि कार्यक्रम झाले. मंडळीं बरोबर चर्चा व सूत कांतणें चाललेंच होतें. इतक्यांत त्यांनी सर्व संभाषण बंद करून किशोरलालभाईंना पत्र लिहिण्यास सुरुवात केली. पत्र गीतेसंबंधी असून किशोरलालभाईंनीं केलेल्या (गुजरातींत) स्थितप्रज्ञाच्या श्लोकाच्या भाषांतराविषयीं सूचनावजा होतें. भाषांतर बापूजींनीं मान्य केलें असून महादेवभाईंनीं त्याला कांहीं सूचना जोडल्या होत्या. तें भाषांतर व पत्र पुढील गीता चर्चेस्तव उपयोगी म्हणून पुढें देऊं—

**स्थितप्रज्ञना लक्षणो**

(गीता अ. २ श्लो. ५४ थी ७२)

अनुक्रमणिका

अर्जुन बोल्या

स्थितप्रज्ञ समाधिस्थ तेना, केशव चिन्ह शां?
स्थिरबुद्धि वदे केम बेसे रहे फरे

भगवान बोल्या

ज्यारे जे छोडीं दे, पार्थ कामना मनजी बधी
आत्मामां ज रहे तुष्ट के वाये स्थितप्रज्ञ ते
दुःखे जे दुःख ना पाये, तृष्णा ना सुखनी करे
विना रागभयक्रोध ते मुनि स्थिरबुद्धिनो
क्यां ये मोह ना जेने सारुं के नरसुं माये
न करे हर्ष ने द्वेष तेनी बुद्धि थई स्थिर
पार्थ काचबो जेम संकेले सहु अंगने,
भोगधी, इंद्रियो तेम खेंचें, ते स्थिरबुद्धिनो.
विषयोरे, भले शांत निराहरी मनुष्यना
परंतु रस ना वामे, ते वाम आत्मदर्शने.
यत्नो छतांय ज्ञानी ये नरनुं मन
इंद्रियो खेचती मस्त वेगथी विषयो भणी.
विषयोनु धर्ये ध्यान तेमां आसक्ति उपजे
जन्मे आसक्ति थी काम कामथी क्रोध ऊपजे
क्रोधथी मूढता आवे, मूढता स्मृतिने हरे
स्मृतिनाश हणे बुद्धि बुद्धिनाशे स्वनाश छे
परंतु राग ने द्वेष छोडी स्वाधीन इंद्रिये
विषये वर्ततो योगी पामे चित्तप्रसन्नता
पामे प्रसन्नता तेना दुःखोनो क्षय थाय छे
प्रसन्नचित्तवाळानी बुद्धिशीघ्र बने स्थिर
भमती इंद्रियोमांथी, जेनी पूंढे भमे मन
वायु खेचे जळे नौका, तेम ते बुद्धिने हरे
माटे जे अंकुशे राखे इंद्रियो विषयोथकी
चोपासे थी महाबाहो नेनी बुद्धि थई स्थिर
जे निशा सर्वभूतोनी तेंमा जाग्रत संयमी
जेमां जाग्रत सौ भूतो ते निशा मुनि ज्ञानिनी
सदा भराता स्थिरमूळ सागरे
पेसे जळो जेम सहु दिशेथी
जेमा प्रवेशे सहु काम तेम
ते शांति पामे न हि भोगप्रेमी
छोडी सौ कामनाओने जे वर्ते थई निस्पृही
अहंता ममता छांडी ते पामे शांति भारत

अनुक्रमणिका

**आ छे ब्राम्ही स्थिती पार्थ ते पाम्ये मोहना रहे**
**राखता अंतकाळे ये ब्रह्मनिर्वाणने लहे**

विनोबांचें पत्र—

१—"वदे, बेसे, रहे फरे' आमां चार वस्तुओ थाय छे. त्रण जोइए "हरे फरे" —(महादेवभाई)—सारु लागतुं नथी।

२—"ज्यारे जे"—आने माटे "त्यारे ते" जोइए. "यदा" शब्द कालवाचक नथी. लक्षणवाचक छे. भाषांतर "प्रजहाति यदा कामान्" जेवुं करिये तोये चाले जुओ. आनुं निगमन "विहाय कामान् यः सर्वान्" (श्लो. ७१).

३—आात्मना तुष्टः—"आात्मना" रही गयुं—"आत्मा थकीज रे" 'तुष्ट' — महादेवभाई बरोबर नथी. आामां 'आत्मना एव' थाय छे.

४—के 'वाये स्थितप्रज्ञने—"स्थित–प्रज्ञ" शब्दनुं उच्चारण आमां पतित थाय छे.

५—छोडी दे—मने आवुं व्याकरणहीन उच्चारण गमतुं नथी.

६—दुःखे जे दुःख ना पामे—आमां एकज "दुःख" शब्दना (१) दुःखदायक संजोग अने (२) मानसिक व्यथा आम बे अर्थ लेवा पडे छे. तेने बदले "उद्वेग" शब्द शो खोटो?

७—ते मुनि स्थिर बुद्धिनो—मुनि ते स्थिर बुद्धिनो चालशे? "ते मुनि" बोलवा जातां नि दीर्घ थाय छे ते मने कठे छे.

८—'क्यां ये मोह ना जेने'—आमां ७ अक्षर छे. आठ जोइए.

९—"अनभिस्नेह" नो अर्थ "मोह" बहु दूर जाय छे.

१०—पार्थ काचबो जेम—७ अक्षर

११—"भोगथी विषय" शब्द जोइए. आनुं निगमन श्लोक ६८ छे. मूळमां बन्ने ठिकाणे इंद्रियार्थ आवे छे.

१२—"स्थितधी ठर्यो"—महादेवभाई, मने बन्ने शब्दो गमतां नथी।

१३—"विषयो रे" भले शांत—आ मने मुद्दल गमतुं नथी। विषय त्यागनी मर्यादा अने उपयुक्तता बन्नेनुं दर्शन गीतानां मूळ श्लोकमां मने थाय छे. जुओ १८ मां अध्यायमां "शब्दादीन् विषयान् त्यक्त्वा रागद्वेषौ व्युदस्य च."

अनुक्रमणिका

१४—ज्ञानी ये नरनुं मन—“ज्ञानीं नो अर्थ ओछो कखो पडे छे. मूळमां ‘विपश्चित्’ छे. मनुमां छे.—“बलवान् इंद्रियग्रामो विद्वांसमपि कर्षति” “ज्ञात्याच्याहि मनास” (गीताई) ज्ञानी शब्दनी उच्चता जाळववी योग्य छे.

१५—तेनी बुद्धि थई स्थिर—अहीं तेम ज ५७ मां ‘बुद्धि’ ने बदले ‘प्रज्ञा’ शब्द राखवो उपयुक्त छे. “स्थितप्रज्ञ” शब्द वापरवोज छे पछी “तेनी प्रज्ञा थई स्थिर” कहेवामां “स्थिर-प्रज्ञ” नो अर्थ स्हेजे. आवी जाय छे.

१६—बुद्धि—नाशे स्व–नाश छे—अप्रसन्न अने क्लिष्ट लागे छे.

१७–‘विषय वर्तता योगी पामे चित्त–प्रसन्नता”—आटलो ज चरण जाणे विषयोमां वर्तवानुं महत्त्व वर्णन करतो होय नहीं तेम लागे छे. आनो संबंध आगळना “स्वाधीन इंद्रिये” नी साथे छे पण कान उपर जो तो आटली ज असर थाय छे.

१८—“विधेयात्मा—योगी आ बरोबर नथी. विधेयात्मा एटले स्वामी अथवा मालक.

१९—“दुःखोनो क्षय थाय छे—आमां सर्वदुःखानां हानिनो भावार्थ तो आवे छे. केम के ‘क्षय’ शब्द पूर्णार्थक छे. छतां ‘सर्व’ शब्द आवे तो सारुं “अस्य—तेनां” छोटी शकाय.

२०—प्रसन्न चित्तवाळानी—“बाळो” मने कवितामां गमतो नथी.

२१—बने स्थिर—“बने” कठे छे.

२२—अयोगीने नहीं बुद्धी इ.—अयोगी. एटले योगी नहीं ते जेम के संन्यासी, पत्थर, पाणी इ. अयुक्त शब्द पारिभाषिक छे. तेनो अर्थ इंद्रियनिग्रहविनानो एवो थाय छे. जुओ अ. ५ मां “अयुक्तः काम कारेण फले सक्तो निबध्यते” “वळी ‘अयोगी’ शब्द कृत्रिम अने नवो प्रयोग गणाय. तेथी ‘अयुक्त’ शब्द राखवो योग्य.

२३—अयोगीने नहीं बुद्धी अयोगीने न भावना इ.—मूळ श्लोकनो अक्षरार्थ आमां आवे छे. पण मूळ श्लोकनो भाव टीकाकारो भाग्ये ज समज्या छे. अने आ भाषांतरमां मूळनी जेम ज ते मुग्ध रहे छे. मुख्य प्रकरण स्थितप्रज्ञनुं छे. एटले बुद्धि स्थिर करवानुं. तेने अगे इंद्रिय-निग्रहनुं प्रकरण श्लोक ५८—६८ मां आवे छे. इंद्रियनिग्रहवगर बुद्धी नथी ये वस्तु अन्वय अने व्यतिरेक बन्ने रीते दर्शावी (श्लोक ६२—६५) अने हवे बुद्धीने अभावे शी रीते नाश छे ते बतावे छे.

अनुक्रमणिका

**युक्ति**

**।**

**बुद्धि** **(एटले संयम)**

**।**

**भावना** **—आवो आमां क्रम छे—मूळनो अन्वय आम करवो जोइए—नास्ति बुद्धिः अयुक्तस्य (अप एत) न च अयुक्तस्य भावना इ.**

**।**

**शांति**

**।**

**सुख**

आम अर्थ न करिये तो "भावनावगर शांति अने सुख नहीं, अने युक्तिवगर भावना नहीं माटे युक्त था" आवो अर्थ छे. तो पछी "नास्ति बुद्धिः अयुक्तस्य" ए वचन अद्धर रही जाय छे. अर्थ आवो जोशो. "बुद्धीवगर भावना, शांति, सुख नहीं अने युक्तिवगर बुद्धि नहीं. माटे युक्त था." भावना एटले बुद्धिमाथी उत्पन्न थती निष्ठा. आ सरणी गीताईमा स्पष्ट करी छे.

२४—क्यांथी सुख अशांतने—आना करतां महादेवभाईनुं "क्यांथी शांतिविना सुख" पसंद करूं छुं.

२५—जेनी पूंठे भले मन....ते बुद्धिने हरे—आ संबंध बरोबर नथी. इंद्रिय बुद्धिने हरे छे. एम केहवानी मतलब नथी. "विचारतां इंद्रियाणां (मध्यें) यत् (इंद्रीय) मनः अनुविधियते"—एम तमे लीधुं लागे छे. हुं मानुं छुं काम—यत् मनः (जे मन) विचारतां इंद्रियाणां अनुविधियते.

महादेवभाईए लीधुं छे आम—यन्मनः (यस्य मनः) विचारतां इंद्रियाणां अनुविधियते तस्य (अस्य) तत् मनः.....इत्यादि.

२६—अंकुशे राखे विषयो थकी—थकी अंकुशे राखवुं—ए भाषांतरमांथी अर्थ निकळतो नथी. नळी आ छे निगमन श्लोक ५८ नुं ते ना जेवी भाषा आमां होय तो सारुं.

२७—तेनी बुद्धी थई स्थिर—जुओ सूचना १५.

२८—माटे जे....."तेथी जे" सारूं.

२९—ते निशा मुनि ज्ञानिनी—व्याकरण-दोष. आम कही शकाय ते ज्ञानी मुनिनी निशा.

३०—"सरा भराता स्थिरमूळ"—सदा भरांता छतां स्थिरमूळ—एवो अर्थ प्रकट थवो जोइये.

३१—स्थिर-मूळ—आनो अर्थ हुं समज्यो नथी.

अनुक्रमणिका

३२—सदा भराता स्थिर-मूळ सागरे—छंद बरोबर नथी. अक्षरो १२ थया ११ जोइये.

३३—पेसे जळो जेम सहु दिशेथी—आपूर्यमाणमां तो सहु दिशेथी कर्‍युं लागे छे. घणा आम अर्थ करे छे. “हुं ए मानतो नथी.” “आपूर्यमाणपक्ष” अने “अपक्षीयमाणपक्ष” एम बे संज्ञायो शुक्लपक्ष अने कृष्णपक्षने माटे उपनिषदमां आवे छे. आ-पूर्यमाण एटले ‘नित्य भरातो’ अने अपक्षीयमाण एटले नित्य क्षीण थतो. तेथी, आपूर्यमाणनो अर्थ “सदा भराता” मां आवी गयो....‘सहु दिशेथी’ अनधिकृत.

३४—जेमां प्रवेशे—आम कहेवाथी अर्थ प्रकट थतो नथी. शमी जाय छे एवा अर्थनो जोइये. जुओ ‘अनासक्ती-योग’ अने गीताई.

३५—जेमां प्रवेशे सहु काम नीचेना चरणमां भोग-प्रेमी छे. तेथी काम ने बदले “भोग” शब्द हुं पसंद करूं छुं.

३६—ते शांति पामे न हि भोगप्रेमी—आवो अन्वय छे. गीतामां ते वधारे स्पष्ट थाय छे. ‘स शांतिमाप्नोति न कामकामी’ गुजराती भाषांतरमां “ते शांति पामे न ही” एमे सहेजे लई शकाय छे. अने किशोरलालभाईने ते ज जोइये छे. आखो भव्य श्लोकविषयीं माणसनुं वर्णन छे एम तेओ समजे छे ते कोई पण रीते मान्य करी शकातुं नथी. ते शांति पामे, न जे भोग-प्रेमी एवा अर्थक कंईक जोइये—(छंदमा केम मुकाय ते जोवुं पडशे).

३७—भोग—प्रेमी—‘ग’ उपर आगळनां ‘प्र’ नो आघात आवे छे, ते छोडवो पडे छे. कदाच गुजरातीमां ए चालतुं हशे —काम-कामी-नो अर्थ ‘प्रेमी’ मां आवतो नथी. जुओ गीताई ‘भोग-लुब्ध’ ७१ + कामनी पाछळ पडेलो एनी झंखना करतो एवो अर्थ छे.

३८—जे वर्ते थई निःस्पृही—अर्थ ठीक छे. पण “स्थितप्रज्ञ केम फरे” ना जबाव जेवुं कंईक आमां अभिप्रेत छे. तेथी—“जे फरे” वधारे सुंदर. ‘फरे नो’ अक्षराथ थई जाय एवो डर राखवानी जरूर नथी.

३९—थई निःस्पृही—व्याकरण “निस्पृह” मागे छे. तेनी मागणी स्हेजे पूरी पाडी शकाय.

४०—“भारत” अनधिकृत पादपूरण देखाय छे.

४१—आ छे ब्राह्मी स्थिति पार्थ—“आ ब्राह्मी स्थिति छे पार्थ” चाले? स्थिति मां “ति” दीर्घ बोलवी पडे छे. ते एम तो गुजरातींमां खपी जशे. पण मारी मनःस्थिति ए सहन करती नथी.

४२—राखंता अंतकाळे ये—आमा हुं सहमत नथी. ब्राह्मी स्थिति प्राप्त थया पछी “नैनां प्राप्य विमुह्यनि” मोहनो संभव ज नथी एम कह्यां पछी “राखंता” इ. निरर्थक लागे छे. ब्राह्मी स्थिति प्राप्त थया पछी मनुष्य चलित थतो नथी. अंतकाळ जेवा निष्फळ गणातो समये पण चलित थतो नथी. अने तेथी ब्रह्म-निर्वाण मेळवे छे एवो अर्थ छे. आमां ब्राह्मी स्थितीनो महिमा छे. अंतकाळविषयक कर्तव्यसूचना आमां हुं जोतो नथी.

अनुक्रमणिका

## परिशिष्ट—सूचना

४३—“स्थितप्रज्ञना चिन्ह शां?” एम कही वळी पाछुं “स्थिरबुद्धि बुद्धि वदे केम” इ. (यापुढें मराठींत मजकूर) अलग प्रश्न, स्थितप्रज्ञ, स्थिरबुद्धि असे वेगळे शब्द वापरून विचारल्यामुळें स्थितप्रज्ञ आणि स्थिरबुद्धि दोन वेगवेगळीं माणसें आहेत कीं काय असा भास होतों. मूळ गीतेंत च असें आहे. पण संस्कृतांत तें चालून जाते म्हणून तो ‘स्थिरबुद्धि’ शब्द अजीबात गाळतां आला तर चांगलें होईल.

धुलिया ४-४-३५.

श्री. किशोरलालभाई,

तुम्हांला आज हें रवाना करावयाचे च होतें. त्याप्रमाणें शेवटीं रवाना करीत तर आहे. पण तें हि थोडें घाईनें च. विधायक सूचना करणें माझ्या गुजराती ज्ञानाच्या अपूर्णतेमुळें कठिण च म्हणून टीकात्मक सूचना च बहुतेक केल्या आहेत.

विनोबाचे प्रणाम.

*　　　　*　　　　*

यानंतर मोटारलॉरींत बसून मंडळी कासाऱ्याच्या समारंभासाठीं निघाली. परंतु मध्यें च अकरा मैलांवर मोटार बिघडल्यामुळें सर्व मंडळीसह मोटार धुळ्यास परत आली. मग टूरिंग कारमध्यें निवडक मंडळी तेवढी कासाऱ्याकडे गेली. ठरलेल्या कार्यक्रमाला दोन—अडीच तास उशीर झाला. मंडळी बरी च जमली होती. गेल्याबरोबर कार्यक्रमाला सुरुवात झाली. मंडळीमध्यें स्त्रिया व मुलें हि बरीं च असल्यामुळें आरंभीं फार गलका भासला. विनोबांनीं त्या गलक्यामध्यें च सुरुवात केली. “आपुलीया बळें नाहीं मी बोलत” हा अभंग प्रथम म्हणून लोक शांत झाल्यावर त्यांनीं भाषणास सुरुवात केली.

“माझ्या खेडेगांवांतल्या भावांनो आणि बहिणींनों, तुम्ही येथें जमला आणि विशेषतः येथें बऱ्या च प्रमाणांत महिला आल्या याबद्दल मला फार आनंद झाला. दुसरी गोष्ट —आम्ही लवकर येणार होतों. पण मध्यें च मोटार बिघडल्यामुळें उशीर झाला याबद्दल क्षमा कराल. मोटारवाल्यामुळें मोटार बिघडली हें जरी खरें आहे, तरी त्याबद्दल त्याला दोष देण्यांत, त्याच्यावर रागावण्यांत कांहीं हंशील नाहीं. माणसाच्या हातून होते च. तेव्हां उशीर झाल्याबद्दल क्षमा मागणें च योग्य ठरेल. तिसरी गोष्ट मला सांगावयाची ती ही कीं, सर्वांनीं बोलणें चालूं असतांना शांती राखावी. आणि चौथी गोष्ट अशी कीं कोणी जर मध्यें च बोलत असेल तर बोलूं नका म्हणून कोणी म्हणूं नये. तें माझें काम. मी तें पाहून घेईन. मी फार वेळ सांगणार नाहीं. थोडा च वेळ सांगेन. पण तें सांगण्यापूर्वी ते तिकडे दूर कोण बसले आहेत त्यांनीं जरा जवळ येऊन बसावें म्हणजे सर्वांना ऐकूं येईल, व सांगण्याला बरें पडेल.

आपण हे सर्व लोक आणि या बहिणी कशासाठीं जमलो? येथें मेजवानी नाहीं, खिरापत हि येथें मिळावयाची नाहीं. मग मेजवानी कुठली? मग आपल्या येण्याचें कारण काय? तुमच्या गांवांत आज देव आला आहे म्हणून आम्ही येथें जमलों. तो देव कोठें राहतो? तुम्ही म्हणाल देव आकाशांत राहतो. देव

अनुक्रमणिका

आकाशांत राहतो हें खरें च आहे. पण तो जमिनीवर हि राहतो. या भूमिमातेमध्यें हि त्याचा वास आहे. तो सगळीकडे च राहतो. तरी पण तो आज येथें आला आहे. देव सगळीकडे राहतो. तरी तो कोठें ज्यास्त राहतो, कोठें कमी राहतो. उदाहरणार्थ नदींचें पाणी कोठें खोल, कोठें उथळ असतें. देव सगळीकडे च राहतो. पण तो साधुसंतांच्या हृदयांत विशेष रीतीनें असतो. आज तुमच्या गांवांत साधु राहण्यास आले. म्हणून मी म्हणतों कीं तुमच्या गांवीं देव राहण्यास आला.

तुमच्या गांवी दोन माणसें राहण्यास आलीं. बाळूभाई (मेहता) तुमच्या परिचयाचे च आहेत. त्यांची ओळख मी काय करून देऊं? पण तुम्हांला नसलेली ओळख मी करून देतों. बाळूभाई आजकालची पुष्कळ विद्या शिकले. मॅट्रिक, बी. ए., एम्. ए., एल्. एल्. बी. सर्व कांहीं शिकले. आतां फक्त वेड लागावयाचें उरलें होतें. तें वेड महात्माजींनीं लावलें. तें वेड म्हणजे सेवेचें वेड. धुळ्याला जेलमध्यें त्यांची सेवावृत्ति मीं पाहिली. या ठिकाणीं हे यशवंतराव पाटील आहेत, हे सीताराम पाटील आहेत, या भल्या लोकांची कांहीं सेवाचाकरी करावी या हेतूनें तुमच्या गांवीं हे आले आहेत. आणि दुसरे सेवक जे आहेत ते निजामच्या राज्यांतले आहेत. ते धुळ्यास जेलमध्ये होते. नंतर नाशिक जिल्ह्यांत त्यांनीं काम केलें आणि आतां ते तुमच्याकडे आले आहेत. त्यांचें नांव अच्युत देशपांडे. तर हे दोन सेवक तुमच्या गांवीं आले म्हणून मी म्हणतों कीं आज तुमच्या येथें देव आला आहे.

आतां तुमचें काम काय? मी थोडक्यांत गोष्ट सांगतों. पूर्वी मी किल्ले पहात पहात, साधुसंतांच्या भेटी घेत घेत कांहीं दिवस महाराष्ट्रांत फिरलों. पायीं च फिरत असे. त्या वेळची गोष्ट. फिरतां फिरतां मी गेलों रायगडावर. आतां मी या मुलांची परीक्षा च घेतो. रायगड माहीत आहे रे कोणाला?—एक मुलगा (भीत भीत) “समाधि आहे तेथे.” “अरे, समाधि खरी पण कोणाची?” मुलगा, “शिवाजी महाराजांची”. त्या समाधीची गंमत पाहिली. शिवाजी महाराजांना आज दोन-तीनशें वर्षे झालीं तरी अजून त्यांची समाधि नीट झाली नव्हती. किल्ल्यावर शिवाजी महाराजांची खूण कांहीं च नव्हती. तेव्हां मी विचार करूं लागलों ही शिवाजी महाराजांची राजधानी येथें आज एक लहानशी पडकी भिंत दिसते. या पलीकडे शिवाजी महाराजांचें कांहीं च शिल्लक नसावें याचें कारण काय असावें? काय हे झोपड्यांत रहात असावेत? पण चमत्कार असा कीं पुढें प्रतापगडावर फिरावयास गेलों. तेथें देवीचें भव्य देऊळ पाहिलें. दगडानें बांधलेलें मंदिर तें. बांधलें केव्हां तर शिवाजी महाराजांच्या वेळीं. पण जसें आतां च बांधलें आहे असें दिसलें. हा असा फरक कां? शिवाजी महाराजांचें घर सुद्धा शिल्लक नाहीं. आणि हें देऊळ अगदीं शाबूत नवें कोरें असें कां व्हावें? ही काय मौज आहे? याचें कारण शिवाजी महाराजांच्या गुरुची शिकवण. देवाचें वैभव वाढवावें ही त्यांची शिकवण. देहाचें वैभव नको. वैभव देवाचें पाहिजे. या देहाला मिरविण्यांत काय अर्थ आहे? हा देह तर शेवटीं उरत नाहीं च. सांगा, येथें कोणाच्या पणजोबांचें पणजोबा हयात आहेत? नाहींत. कां नाहींत? येथें नदीच्या कांठीं कोठें स्मशान आहे ना? तें च याचें कारण. काय रे मुला तूं स्मशानांत गेला होतास कां कधीं? मुलगा—“नाही”. “मग हें बघ तुला हि एकदां तेथें जावे लागेल बरं कां” (सर्व हंसतात) —म्हणून शिवाजी महाराजांच्या गुरुंनीं शिकविलें होतें की वैभव देवाचें वाढवावें. देहाचे वैभव नको.

गांवच्या लोकांना असें वाटलें पाहिजे कीं आम्ही आमचें घर कसें हि चालवून घेऊं. पण आश्रम? आपलें हें मंदिर? —यांत कांहीं उणें पडूं देणार नाहीं. आश्रम ही गांववाल्यांना अभिमानाची वस्तु झाली पाहिजे. असें वाटलें पाहिजे कीं आमच्यामध्यें जी कला आहे, जें शास्त्र आहे, जें वैभव आहे तें सर्व आश्रमामध्यें पाहून घ्या. आपल्या पूर्वजांची वृत्ति हि अशी च होती. मठांत, आश्रमामध्यें, मंदिरांत तें आपलं सारसर्वस्व ओतीत. घरची विशेष पर्वा करीत नसत. ही आपल्या पूर्वजांची वृत्ति अजून आपल्यामध्यें

अनुक्रमणिका

थोडीबहुत आहे. म्हणून अजून हि लोक त्याग करतात, निस्वार्थी वृत्ति दाखवितात, देवाची भक्ति करतात. इंग्रजी गॅझेटियर असतें. भूगोलाची त्यांत माहिती असते. त्यामधें तो साहेब काय लिहितो माहीत आहे? काय म्हणतो तो? तो म्हणतो, "हे महाराष्ट्रांतले लोक गरीब आहेत, कंगाल आहेत, तसें च मूर्ख हि आहेत. गरीब आहेत तर थोडा शहाणपणा असावा कीं नाहीं? पण तो हि नाहीं. हे असे मूर्ख कीं तो पंढरपूरला ठोंब्या आहे ना? —विटेवरचा ठोंब्या—त्या विठोबाच्या दर्शनाला हे लोक इतकें दारिद्र्य असून पैसे खर्च करून येतात. काय हा मूर्खपणा?" मी म्हणतो या मूर्खपणांत गोडी आहे. तुम्हीं सेवेंत, आश्रमासाठी आपली शक्ति खर्च करा. आपल्या लोकांचा हा मूर्खपणा शिका.

तुमच्या गांवांत जे दोन चाकर आले आहेत, त्यांच्याकडून भरपूर काम घ्या. तुम्ही हि काम करा. कोणचें काम? तें समजावें म्हणून एक गोष्ट सांगतो. मी फिरत फिरत औदुंबराला गेलों. दत्ताचें स्थान, कृष्णाकाठीं हें स्थान आहे. इतर देवळें अमंगळ, अस्वच्छ असतात पण येथें तसें नाहीं. येथें आसपास कचरा दिसला नाहीं. याचें कारण असें कीं येथें येणारे लोक सेवेसाठीं येतात. त्यांना सेवेकरी म्हणतात. अशिक्षित लोक येतात असें नाहीं. चांगलें शिकलेले लोक, मोठेमोठे श्रीमान लोक येतात. ४/६ महिने राहतात. आणि सेवा कोणची करतात? झाडू घेऊन सफाई करण्याची सेवा करतात, एक झाडतो, लगे च तेथें च दुसरा झाडतो. असें एकामागून एक दिवसभर झाडण्याचें काम चालतें. त्यामुळें तेथें कचरा बिल्कुल नाहीं. जागा अगदीं स्वच्छ होते. ही च सेवा येथें हि करावयाची आहे. येथें झेंडा आहे कां? मंडळी— "नाही"—मी हें च सांगणार होतों. आश्रम ओळखण्यासाठीं झेंड्याची मुळीं च जरूर नाहीं. आरशासारखी स्वच्छ जागा असेल तो आश्रम समजावा. हें आश्रमाचें चिन्ह. आश्रमाची जागा इतकी व्यवस्थित पाहिजे कीं येथें आल्याबरोबर पवित्रता वाटावी. येथें रहावें अशी इच्छा व्हावी. ही व आणखी अशी च दुसरी सेवा करावयाची व करवून घ्यावयाची. हें च बाळूभाईंचें व तुमचें काम.

याशिवाय तुम्हाला एक सूचना कराविशी वाटते. बाळूभाईंकडून तुम्ही वाटेल तेवढें काम घ्या पण त्यांची दशा पोतेऱ्यासारखी करूं नका. सेवा घ्या पण पोतेऱ्यासारखे त्यांना कोपऱ्यांत ठेवूं नका. त्यांच्याकडे लक्ष द्या. त्यांचें म्हणणें ऐका. त्यांचा उपयोग करून घेऊन त्यांच्या गरीब स्वभावामुळें त्यांची दरकार करावयाची नाहीं असें करूं नका.

तुम्ही आणि ते एकरूप व्हावें. तुमचें त्यांचें प्रेम जमो, तुम्हांला परमेश्वर सुबुद्धि देवो, खरी संपत्ति वाढो. आरोग्य, ज्ञान यांचा लाभ होवो. सर्वांची चित्तशुद्धि होवो इतकें मागणें मागून मी संपवितो."

*　　　　*　　　　*

यानंतर दुसऱ्या दिवशीं परत धुळ्यास येण्यासाठीं विनोबा व मंडळी मोटारींत बसली. तत्पूर्वी सर्व दिवस, मुकटी, सटाणें व कासारा येथील कार्यकर्त्यांशीं त्यांच्या प्रश्नांविषयीं पुष्कळ चर्चा झाली. मोटारींतून हि संभाषण बंद झालें नाहीं. विशेषतः व्याकरण व थोडीशी अर्थशास्त्राची चर्चा झाली.

विनोबा—"काय रे, प्रादि हे उपसर्ग आहेत ना?"

शिवाजी—"होय. पण पाणिनी त्यांची अव्ययांत हि गणना करतो."

अनुक्रमणिका

विनोबा—“बरें तूं सर्व विभक्तीप्रत्ययांना अव्ययांत गणण्याची कल्पना सुचवतोस त्यांत ई आ प्रत्ययांचें कसे काय?”

शिवाजी—“स्वर असल्यांमुळें शब्दांशीं—(व्यंजनाशीं) ते मिसळून जातात. म्हणून मी त्यांना प्रत्यय म्हणतो. अव्यय म्हणत नाही.”

विनोबा—“पण त्यांना हि अव्ययांत गणलें तर कसें? ते शब्दांत मिसळतात एवढाच उल्लेख केला म्हणजे झाले.”

शिवाजी—“होय, कांहीं हरकत दिसत नाहीं.”

विनोबा—“बरें, अव्ययीभाव समास?”

शिवाजी—“तो हि अव्यय च.”

विनोबा—“विभक्तीचें लक्षण काय? ‘मी फळ खातो’ आणि ‘मी फळास खातो’ या ठिकाणीं एक सप्रत्यय द्वितीया म्हणावी व दुसरी अप्रत्यय द्वितीया म्हणावी?”

शिवाजी—“होय, तसें म्हणण्यास मुळींच हरकत नाहीं.”

विनोबा—“पण हल्लींचें वैय्याकरण तर तसें म्हणत नाहींत.”

शिवाजी—“तें खरें पण त्यांत कांहीं हरकत दिसत नाहीं. ज्ञानेश्वरींत मूळ शब्दाची कोणची हि विभक्ति होते. आणि तें योग्य च आहे. कारण समासांत शब्दापुढें शब्द ठेवतात तेव्हां प्रत्येक शब्दाची कोणची हि विभक्ति होण्याचें अंतर्गत सामर्थ्य त्यांत गृहित धरलें जातें. शिवाय मूळ अवस्थेंत शब्दापुढें नुसतें शब्द ठेवून च अर्थ व्यक्त करीत असले पाहिजेत. त्यामुळें प्रत्येक शब्दास कोणची हि विभक्ति व्यक्त होते. तुलसीरामायणांत हि असें च दिसून येतें.”

विनोबा—“मग तूं कोठें गेला होतास? नागपूर. या प्रश्नोत्तरांत नागपूर हें उत्तर व्याकरणशुद्ध म्हणावें लागेल.”

शिवाजी—“होय नागपूरला असें च म्हणण्याची जरूर नाहीं. व असें च म्हटलें जातें असें हि नाहीं.”

विनोबा—“स्त्रीलिंगी प्रत्ययांची आवश्यकता काय? प्रत्येक वेळां लिंगभेद दाखविण्याची जरूर कां भासावी? मी जातों किंवा जाते यांत गमनक्रियेबरोबर स्त्रीत्व किंवा पुरुषत्व दाखविण्याची जरूर आहे कीं काय? पोषाखांत असा भेद असण्याची कल्पना समजूं शकते. पण प्रत्येक वेळीं हा भेद कशासाठीं पाहिजे?”

शिवाजी—“तशी जरूर दिसत नाहीं. मराठ्यांच्या बायका तर पुरुषाप्रमाणें च बोलतात.”

विनोबा—"याचा अर्थ असा होतो कीं हे लिंगप्रत्यय अशा वेळीं निघाले असावे कीं ज्या वेळीं स्त्रीपुरुषांत विशेष फरक मानण्यास सुरुवात झाली. खालच्या समजल्या जाणाऱ्या लोकांत स्त्रीपुरुष एकमेकांत ज्यास्त मिळतात त्यामुळें भेद रहात नाहीं. तसें च सर्वांचें पूर्वीं असावें."

शिवाजी—"ही कल्पना संभवनीय आहे."

विनोबा—"त्याप्रमाणें च वरच्या अल्पसंख्याक वर्णांची भाषा शुद्ध समजण्याचें कारण काय? खालच्या बहुजनसमाजाच्या भाषेचें व्याकरण कां लिहूं नये? तुकारामासारखा सर्वांच्या भाषेंत बोलणारा चुकला असें म्हणण्यापेक्षां आपण च चुकलों असें म्हणणें योग्य नाहीं कां?"

शिवाजी—"होय असें दिसतें खरें."

*　　　　*　　　　*

दुसऱ्या दिवशीं सकाळीं पांच वाजतां धुळ्याहून पायीं नावरीला साने गुरूजींचा आश्रम उघडण्यांसाठीं मंडळीसह विनोबा निघाले. नावरीला पोंचेपर्यंत कोणाला वेळेचें भान हि नव्हतें. कारण गीतेविषयीं सुंदर चर्चा चालू होती.

शिवाजी—"स्थितप्रज्ञाच्या लक्षणांत 'संगात् संजायते काम', इ. श्लोकांची आवश्यकता काय?"

विनोबा—"स्थितप्रज्ञाच्या लक्षणांत प्रथम सूक्ष्म आणि पुढें स्थूल लक्षणें सांगितलीं आहेत. प्रथम निषेधक आणि विधायक लक्षण सांगितलें. आत्मसंतोष हें अतिशय सूक्ष्म लक्षण. त्याच्यापुढें निर्विकारता हें पहिल्यापेक्षां ज्यास्त स्थूल लक्षण. यापेक्षां ज्यास्त स्थूल लक्षण अनासक्ति आणि सर्वांत स्थूल लक्षण इंद्रियनिग्रह. सर्वांत स्थूल म्हणून सर्वांना उपयोगी अशा साधनाचा म्हणजे इंद्रियनिग्रहाचा ५८ ते ६८ दहा श्लोकांत मुद्दाम ज्यास्त विस्तार केला आहे.

शिवाजी—"किशोरलालभाईंच्या पत्रांत लिहिल्याप्रमाणें "स्थित्वा स्यामंतकालेऽपि याचा अर्थ ब्राह्मी स्थिति अंतकाळीं हि टिकली तर च ब्रह्मनिर्वाण प्राप्ति होते असा जर करावयाचा नाहीं तर अंतकाळाचा उल्लेख च कशासाठीं केला?"

विनोबा—"हें ब्राह्मणपरिव्राजकन्यायाप्रमाणें आहे. ते ब्राह्मण जेवावयाला आले म्हटलें म्हणजे त्यांत संन्यासी हि आले च. पण ते ब्राह्मण आले. संन्यासी हि आले असें म्हणण्यांत ज्यास्त पुष्टि आहे. तसें च "एषा ब्राह्मी स्थितिः पार्थ नैनां प्राप्य विमुह्यति" हें विधान केल्यावर त्याला अंतकाळीं मोह होत नाहीं हें निश्चित. पण मूळ वाक्याच्या पुष्टीसाठीं च हें विधान आलें आहे. पण ब्राह्मी स्थिति थोडा वेळ लाभली तरी ती अंतकाळपर्यंत टिकवली पाहिजे या कल्पनेंत मूळ विधानाला च धक्का बसतो. होतें काय कीं असें म्हणण्यामध्यें ब्राह्मी स्थिति ज्ञानमय कल्पिली जात नाहीं तर ती ध्यानमय अशासारखी दिसते. ध्यान जरी आज साधलें तरी तें अंतकाळीं जमलें पाहिजे असा अर्थ आहे याचा. गांधींचा अर्थ व टिळकांचा अर्थ या बाबतींत दिसावयाला एक आहे पण दोहोंत फरक आहे. गांधींच्या म्हणण्याचा भावार्थ असा कीं ब्राह्मी स्थिति लाभली तरी ती लाभली याची कसोटी काय? ती कसोटी अंतकाळीं टिकणें ही आहे. पण त्याच्यापुढें

अनुक्रमणिका

जाऊन ती अंतकाळपर्यंत टिकवणें हा टिळकांचा अर्थ मूळ वस्तूला धक्का लावतो. गीताईंत एवढ्या च साठीं 'टिकूनि अंतकालीं हि ब्रह्मनिर्वाण मेळवी' असें भाषांतर केलें आहे. त्यांत गांधींचा अर्थ हि समावून गेला आहे. शंकराचार्यांनीं अंतकाळीं जरी ही स्थिति प्राप्त झाली तरी ब्रह्मनिर्वाण प्राप्ति होते असा अर्थ करून मूळ वाक्याला धक्का लागण्याची आपत्ति टाळली आहे. हा एक भक्तिमार्गांत जसें सांगावें तसें सांगण्याचा प्रकार झाला. सातत्यावर जोर दिला तर च शेवटीं सुबुध्दि होते या आठव्या अध्यायाला म्हणण्याला त्यामुळें बाध येतो."

शिवाजी—"ब्रह्मनिर्वाण आणि ब्राह्मी स्थितींत फरक आहे काय?"

विनोबा—"ब्रह्मनिर्वाण आणि ब्राह्मी स्थितींत तसा फरक नाहीं. पण जो आहे तो देहाच्या अंगानें आहे. देह असतांना ब्राह्मी स्थिति देहपातानंतर ब्रह्मनिर्वाण. ब्राह्मी स्थिति म्हणजे याच्यांत ब्रह्ममयता आली आणि ब्रह्मनिर्वाण म्हणजे हा ब्रह्मांत मिसळला—ब्रह्मांत लीन झाला. हा फरक त्या दोन शब्दांत च स्पष्ट होतों."

शिवाजी—"मोक्ष आणि ब्रह्मनिर्वाण ह्यांत कांही फरक आहे काय?"

विनोबा—"मोक्ष आणि ब्रह्मनिर्वाणांत कांहीं फरक नाहीं. पण दृष्टींत फरक आहे. ब्रह्मनिर्वाण हा शब्द गीतेचा खास पारिभाषिक शब्द आहे. मोक्ष हा सर्वसामान्य लोकांना कळेल असा शब्द आहे. सामान्य लोकांना संसार दुःखमय दिसतो म्हणून त्यांतून सुटण्याची कल्पना त्यांना सहज समजण्याजोगी आहे. मोक्ष म्हणजे दुःखांतून, बंधनांतून सुटका. मुमुक्षु हा शब्द हि असा च बनला. म्हणजे Negative शब्द आहे हा. सुटका झाली खरी पण मग हा कशांत जाऊन पडला तें कांहीं यांत समजत नाहीं. पण त्याची साधारण लोकांना जरूर नसते. आतां स्वराज्याची कल्पना घ्या. लोकांना जर असें सांगितलें कीं स्वराज्य म्हणजे त्यांत आपल्याला स्वावलंबनानें राहतां येईल तर तें लोकांना रुचणार नाहीं. त्यांना जर सांगितलें कीं स्वराज्य मिळाल्यावर दुःखें जातील, कर कमी होईल तर तें त्यांना पटेल. कारण त्यांना त्याचा नित्य त्रास होत असतो. ब्रह्मनिर्वाण हा शब्द Positive आहे. ब्रह्मनिर्वाण म्हणजे ब्रह्मांत लीन होणें. मोक्ष म्हणजे सुटणें. दुःखांतून सुटला— आगींतून निघाला पण पुढें कोठें गेला—तें ब्रह्मनिर्वाणांत समजून येतें."

शिवाजी—"समाधिस्थ" म्हणजे काय?

विनोबा—"समाधिस्थाची गीतेची कल्पना योगसमाधीची नाहीं. अर्जुनाची सुद्धां तशी कल्पना नाहीं. म्हणून च 'स्थितप्रज्ञस्य का भाषा' इ. विचारून ताबडतोब तो कसा राहतो, फिरतो कसा, बोलतो कसा असा प्रश्न विचारतो. गीतेची कल्पना ध्यानसमाधीची नाहीं. मागच्या च श्लोकांत 'स्थास्यति निश्चला समाधी'—या शब्दांकडे लक्ष देऊन अर्जुन स्थितप्रज्ञ शब्द वापरतो. व गीताईत 'स्थिरावला समाधींत' हें याच दृष्टीनें लिहिलें आहे. समाधि ही येथें ध्यानमय नसून ज्ञानमय आहे. पण कित्येक टीकाकारांनी असा अर्थ केला आहे. त्यांनीं अर्जुनाच्या प्रश्नाचे दोन विभाग च केले आहेत. एक 'स्थितप्रज्ञस्य का भाषा समाधिस्थस्य' म्हणजे योग समाधींत मग्न झाल्यांचें लक्षण काय? दोन नंतर समाधींतून, व्युत्थान पावल्यावर तो बोलतो कसा चालतो कसा इ".

शिवाजी—"पण या अर्थाप्रमाणें पुढें उत्तरें दिलेलीं दिसत नाहींत."

विनोबा—“होय म्हणून च हा गीतेचा अर्थ नाहीं.”

शिवाजी—“या निशा सर्वभूतानां । हा श्लोक व यापुढचें दोन श्लोक यांचा स्थितप्रज्ञलक्षणांत कितपत समावेश होतो?”

विनोबा—“यांचा स्थितप्रज्ञलक्षणांत अंतर्भाव करतां येणार नाहीं. यांत स्थितप्रज्ञाच्या तिहेरी अवस्थांचें वर्णन केलें आहे. ज्ञानी पुरुषाच्या तीन अवस्था आहेत. कारण ब्रह्म तीन प्रकारांनीं मानतां येईल. ॐ तत् आणि सत्. ॐ ब्रह्म म्हणजे सदसत् सर्व ब्रह्म. तत् ब्रह्म म्हणजे सत् हि नाहीं आणि असत् हि नाहीं, तें तत् ब्रह्म. सत् ब्रह्म म्हणजे निव्वळ, निखळ शुद्ध ब्रह्म. पण ब्रह्म निव्वळ असत् आहे असें आपण म्हणूं शकत नाहीं. बाजारांत गहूं घ्यावयास गेलों तर एक तर निवडलेले शुद्ध गहूं घेऊं अथवा न घेतां परत येऊं. पण निव्वळ खडे च घेऊं असें कांही होणार नाहीं. तसें च ब्रह्माचें आहे. ज्ञानी पुरुषाच्या, स्थितप्रज्ञाच्या अवस्था अशा च आहेत. ‘या निशा सर्वभूतानां’ यामध्ये ज्ञानीपुरुष जग ओळखीत नाहीं. त्याचा जगाशीं विरोध दाखविला. पुढल्या श्लोकांत तो समुद्रासारखा गंभीर राहतो, आपल्या पोटांत सर्व जगाला सामावून घेतो अशी स्थिति आहे आणि तिसऱ्या श्लोकांत तो जगाशीं केवळ एकरूप होतो. ‘पुमांश्चरति निःस्पृहः’ परंतु या तिन्ही अवस्था उत्तरोत्तर वरच्या किंवा खालच्या पायऱ्या नाहींत किंवा त्यांत श्रेष्ठकनिष्ठ असा भेद नाहीं. हें लक्षांत ठेवलें पाहिजे. जगाशीं जेथें विरोध दाखविला तेथें तत्‌ब्रह्माची स्थिति व्यक्त झाली. पुढील श्लोकांत सत ब्रह्माच्या कल्पनेनें स्थितप्रज्ञाची स्थिति व्यक्त झाली व त्यापुढें ॐ ब्रह्माची अवस्था दाखविली.”

शिवाजी—“ब्रह्मनिर्वाण हा शब्द बौद्धांच्या निर्वाण ह्या शब्दावरून सुचला असावा काय?”

विनोबा—“तसें नाहीं. असा संभव दिसतो कीं ब्रह्मनिर्वाणांतले ब्रह्म काढून टाकून अथवा निघून जाऊन बौद्धांनीं सुटसुटीत निर्वाण शब्द वापरला असावा.”

शिवाजी—“गीतेचें वैशिष्ट्य स्थितप्रज्ञाच्या श्लोकांत आहे असें म्हणतां येईल काय?’

विनोबा—“होय. गीतेचा विशेष या श्लोकांत प्रतीत होतो.”

शिवाजी—“बापूजींनीं हे श्लोक सुरू केले ते हा सर्व अर्थ लक्ष्यांत घेऊन सुरू केले काय?”

विनोबा—“नाहीं. या बाबतींत बापूजींशीं माझें बोलणें झालें आहे. ते लंडनमध्यें होते. स्वतः स्वयंपाक करीत असत. त्यावेळेला आसपास मोहाचें वातावरण पसरलें होतें. तेव्हां इंद्रियनिग्रहाचें प्रकरण पाहून विशेषतः त्यांनीं प्रार्थनेंत याची सुरुवात केली.”

शिवाजी—“अव्यक्तादीनि भूतानि व्यक्तमध्यानि भारत । या श्लोकाचें भाषांतर मध्य तो व्यक्त भासतो असें गीताईंत केलें आहे. त्यामुळें प्रथम मला आनंद झाला कारण त्यांत अर्थ स्पष्ट झालासा वाटला. पण आतां अशी शंका येते कीं दोन अव्यक्तांतलें व्यक्त हा जसा भास तसाच दोन व्यक्तांतलें अव्यक्त हा हि भास च. तर व्यक्त भास कीं अव्यक्त भास हें कसें समजावें?”

अनुक्रमणिका

विनोबा—“अव्यक्त शब्दाचा अर्थ न कळल्यामुळें असें वाटणें साहजिक आहे. दोन रात्रींत दिवस कीं दोन दिवसांत रात्र हें कोणीं कसें ठरवावें? अव्यक्त म्हणजे न दिसणें एवढा च अर्थ नाहीं. अव्यक्त म्हणजे आत्मरूप अवस्था. व्यक्त हा भास असून अव्यक्त आत्मरूपता त्याच्या ठिकाणीं आहे च हें सांगावयाचें आहे.”

शिवाजी—“स्त्रिया बिघडल्या म्हणजे च तेवढा वर्णसंकर होतो आणि पुरुष बिघडन वर्णसंकर होत नाहीं हें कसें? यांत गीतेची काय दृष्टि आहे?

विनोबा—“यांत गीतेची अनुदार किंवा असमान दृष्टि नाहीं. उलट स्त्रियांची योग्यता गीता ज्यास्त मानते. किल्ला पडला तरी हरकत नाहीं एक वेळ, पण बालेकिल्ला पडतां कामा नये. ही जी दृष्टि ती च येथें आहे. हिंदु धर्म स्त्रियांना धर्माचा आधार समजतो. आधार च गेल्यावर सर्व समाज पतित होणार च.”

शिवाजी—“असें समजण्याचें कारण काय? ही हि विषमता च नव्हे काय?”

विनोबा—“यांत विषमता नाहीं. निसर्गतः च असें आहे. प्राणि-मात्रांत हि हें दिसून येतें. निदान कांहीं दिवस तरी पशूंत हि स्त्री जातीकडून अपत्यसंगोपन केलें जातें. पण अपत्याला पुरुषजाति ओळखत च नाहीं. त्यामुळें समाजसंरक्षणाचा आधार स्त्रिया च आहेत. स्त्रीपुरुषापेक्षां अधिक विकसित आहे. म्हणून च गीतेनें ‘वाणी श्री कीर्ति नारीणा क्षमा मेधा धृति स्मृति’ असा निर्णय दिला आहे. स्त्रियांच्या योग्यतेविषयीं गीतेचा अभिप्राय त्यांत व्यक्त होतो.”

शिवाजी—“अठराव्या अध्यायांत संन्यास आणि त्यागाचा प्रश्न निघाला असतां सत्त्व, रज, तम यांच्यासंबंधी सांगण्याची काय आवश्यकता प्राप्त झाली?”

विनोबा—“कारण राजसतामस कर्मांचा पूर्ण त्याग केल्यानें व सात्त्विक कर्में निरहंकार केल्यानें त्याग सिद्ध होतों हें दाखविण्यासाठीं.”

शिवाजी—“सत्त्वगुण म्हणजे रजतमांची साम्यावस्था काय?”

विनोबा—“नाही. रजतमांची साम्यावस्था निद्रा आणि ध्यान समाधींत होतें. रजाचा पर्याय तम आणि तमाचा च पर्याय रजोगुण होतो. जागून जागून मनुष्य थकला म्हणजे झोप घेतो व झोपून झोपून थकला म्हणजे जागा होतो.”

शिवाजी—“धर्मपद वाचलें. त्यांत गीतेप्रमाणें प्रसन्नता वाटत नाहीं. सिद्धांत मांडलेले आहेत असें आढळून येत नाहीं.”

विनोबा—“हां, बरोबर आहे. धर्मपदापेक्षां मला बायबल (न्यू स्टेटमेंट) जास्त आवडतें. पण त्यांत हि कांहीं तरी Missing वाटतें, तसें गीतेंत नाहीं. बापूंची बुद्धांशी तुलना करतात. पण बापू च एकदां मला म्हणत होते कीं ‘बुद्धांत आणि माझ्यांत फरक आहे.’ बुद्ध विशेष अर्थानें प्रचारक होते असें वाटतें. तसें बापूंचें नाहीं. बुद्ध करुणेनें व्याकूळ होतात. चरख्याचा हता मोडला तर तो जसा मनुष्य शांत राहून दुरुस्त करू

अनुक्रमणिका

शकतो तसें च समाजांत जें उणें असेल तें शांत आणि स्थिरबुद्धीनें दूर करावयाचें ही बापूंची वृत्ति आहे. बुद्धामध्यें करुणेची व्याकुळता दिसून येते. तशी व्याकुळता बापूंमध्यें नाहीं."

शिवाजी—"म्हणजे बुद्ध Reformer होते विशेषतः व बापू सिद्धांती आहेत असें च ना?"

विनोबा—"होय. त्यामुळें च बौद्धांच्या वाङ्मयांत समतोलपणा राहिला नाहीं. उदाहरणार्थ मघांशीं निघालेला स्त्रियांचा प्रश्न. स्त्रियांची निंदा करण्याचा त्या संप्रदायांत प्रघात च पडून गेला. आपल्याकडे हि साधुसंतांनीं, स्त्रियांची भरपूर निंदा केली आहे. पुरुषापेक्षां आठपट वासना त्यांच्यांत असते! स्त्रिया म्हणजे मायेचा पुतळा! नाना तऱ्हेनें स्त्रियांची नालस्ती केली आहे. मात्र ज्ञानेश्वरांनी स्त्रियांची कोठें हि निंदा केलेली आढळून येत नाहीं. धुळ्याच्या जेलमध्यें मीं दासबोध वाचला. त्यामध्यें प्रारंभाला च जवळ जवळ एक कादंबरी लिहिली आहे. ती आतां रुचत नाहीं. एक वेळ मनाला वैराग्याचें वळण तिच्यामुळें मिळालें. पण त्यांत सत्य नाहीं. तसें च नरदेह दुर्लभ आहे इ. गोष्टी सांगतांना नरदेह म्हणजे पुरुषदेह असा स्पष्ट भास मला झाला. आतां तूं पाहून घे मी म्हणतों तसें आहे कीं नाहीं तें. सांख्यांनीं हि प्रकृति पुरुष इत्यादि गोष्टी मांडल्या त्याचा हि प्रकृति माया म्हणजे स्त्री. ती नटी आहे. पुरुषाला भुरळ पाडते इ. गैरसमज केला गेला."

शिवाजी—"बरोबर आहे स्त्रियांसंबंधीं अनुदार विचार आपल्या वाङ्मयांत फार आले आहेत. त्यांना वेदाचा अधिकार नाहीं. ज्ञानाचा अधिकार नाहीं. अशी त्यांची हीन दशा केली गेली आहे. बुद्धांप्रमाणेंच बापू हि कधीं कधीं एका टोंकाचें लिखाण लिहितात असें नाहीं कां?"

विनोबा—"नाहीं. मला असें भासलें नाहीं."

शिवाजी—"विवेकानंदांच्या लेखभाषणांत तर निःसंशय समतोलपणा आढळत नाहीं. कित्येक वाक्यें तर बेजबाबदार वाटतात."

विनोबा—"हो, तसें दिसतें. पण विवेकानंदांची त्यांत च खुबी आहे. विवेकानंद म्हणजे ज्वालामुखी. अत्यंत शुद्ध, कळकळीने भरलेला, मोकळ्या मनाचा, उघड बोलणारा असा मनुष्य होता तो. एकदां गोरक्षणासंबंधीं विवेकानंद म्हणाले "हे हिंदु लोक गोरक्षण गोरक्षण म्हणून बैलासारखे बुद्धिहीन झाले आहेत." हें त्यांचें वाक्य कांहीं दिवसांनीं अश्विनीकुमार दत्तांच्या कानीं आलें. तेव्हां ते एकटे च विवेकानंदांना भेटले व म्हणाले, "का रे नरेंद्र, तूं आतां धर्माचा आचार्य झालास तुला असें बोलणें शोभतें कां रे?" त्यावर विवेकानंद म्हणतात, "कोण म्हणतें शोभतें म्हणून?" त्यांनीं सरळपणानें सांगितलें यांत सगळी विवेकानंदांची गोडी आहे. त्यांनीं आपला बचाव करण्याचा प्रयत्न केला नाहीं. दुसरें असें कीं बापूंनीं जीवनाच्या प्रत्येक बाबीचा विचार केला आहे. ते मनूसारखे आहेत. विवेकानंदानीं तत्त्वज्ञान धर्म यांचा च प्रामुख्यानें विचार केला होता."

अण्णासाहेब दास्ताने—"संन्यास हि तुमच्या म्हणण्याप्रमाणें सिद्धि असल्यामुळें आणि कर्मयोग हें साधन हि होऊ शकतें त्यामुळें कांहीं तरी कर्म करीत राहणें हें च श्रेयस्कर नव्हे काय?"

शिवाजी—"कर्मयोग कर्मयोग जे म्हणतात त्यांचा सगळा जोर कर्मावर असतो. परंतु असायला पाहिजे निष्कामतेवर."

अनुक्रमणिका

विनोबा—"बरोबर आहे. म्हणून च बापूजींनीं 'अनासक्तियोग' नांव दिलें. त्यांनीं गीता सर्व लिहून काढली. नंतर मी त्यांना म्हणालों, "बापू, याला नांव काय देणार?" ते म्हणाले, "नांव होय? नांवाचा मीं तर विचार च केला नाहीं." तिकडे काकासाहेब हि नांवासाठीं त्यांच्या पाठीस लागले. मग त्यांनीं विचार करून नांव ठरविलें."

शिवाजी—"गीता ही महाभारतांत नंतर घातली आहे असें युरोपियनांचें मत आहे. महाभारताची भाषा आणि गीतेचा भाषा यावरून त्यांनीं अनुमान काढलें असावें असें दिसतें."

विनोबा—"महाभारतात अनेक विषय आलेले आहेत. शांतिपर्वाची भाषा आणि गीतेची भाषा यांत साम्य दिसेल. महाभारताइतका विशाल ग्रंथ पाश्चात्यांत लिहिला गेला नाहीं. गीतेचा विषय एकदम भिन्न पडल्यामुळें आणि महाभारताच्या विस्तृततेमुळें पाश्चात्यांना तसें वाटत असावें. तसें मानलें तरी अगदीं योग्य ठिकाणीं तो ग्रंथ बसविला आहे असें म्हणावें च लागेल."

शिवाजी—"टिळकांची अर्थ करण्याची पद्धति कर्मयोगपर असल्यामुळें म्हणजे कर्मयोगाचा आग्रह असल्यामुळें अर्थात् काय फरक पडला?"

विनोबा—"सिद्धांत त्यामुळें डळमळित झाले. शंकराचार्यांचा ज्ञानाविषयीं आग्रह असल्यामुळें त्यांचे सिद्धांत तरी चुकीचे आढळणार नाहींत. बिंदूची व्याख्या च ज्याची चुकली त्याची सर्व भूमीती च ढाळणार. ब्रह्मसूत्रभाष्य लिहितांना किंवा उपनिषद्‌भाष्य लिहितांना शंकराचार्यांना जो विश्वास वाटत होता तो गीताभाष्यांत दिसत नाहीं. गीताभाष्य भाष्यासारखें च गीतेवर टिप्पणि आहे. "अतस्तद्विवरणे रत्नः क्रियते मया" या प्रस्तावनेवरून हि हें दिसतें अर्थात् त्यांत विनयाचा आणि गीतेविषयीं आदराचा भाग आहे च. ज्ञानेश्वरांची ज्ञानेश्वरी मात्र अनुभवावरून लिहिलेली आहे. परंतु सहाव्या अध्यायांतले योगाचें वर्णन योगसिद्धि इत्यादी गोष्टी केवळ पूर्वग्रंथांतल्या वर्णनावरून लिहिलेल्या दिसतात.

* * *

नावरी येथें गीतासंवादांत केव्हां आलों कांहीं कळलें नाहीं. सर्वांनीं मिळून तेथें तकली उपासना केली. आलेल्या मंडळींना उपासनेसंबंधीं थोडक्यांत सांगून पायीं च विनोबा व मंडळी परत धुळ्यास दुपारीं उन्हांत येण्यास निघालीं. रस्त्यांत सकाळसारखें बोलणें निघालें नाहीं. तरी मधून मधून कांहीं प्रश्नोत्तरें चाललीं होतीं. सायंकाळीं धुळ्यास येऊन पोंचलों. नित्याप्रमाणें सायंप्रार्थना होऊन सर्व निद्रेच्या शांतीचा अनुभव घेऊं लागले.

* * *

आज सकाळीं फार मजेदार प्रश्नोत्तरें झालीं. अप्पासाहेब रणदिव्यांचा मुलगा दत्तू व विनोबा यांच्या संभाषणांतलीं हीं प्रश्नोत्तरें. भाईसाहेब रणदिव्यांनीं दत्तूशीं तुम्ही कांहीं बोलावें अशी विनंति केल्यामुळें दत्तू विनोबांकडे आला होता. संभाषण चालू असतांना एकीकडे कापूस निवडणें चालू होते.

विनोबा—"तूं कोण?"

अनुक्रमणिका

दत्तू—“मी आप्पासाहेबांचा मुलगा दत्तू. काल भाईसाहेबांनीं सांगितलें म्हणून आज तुमच्याशीं बोलण्यासाठीं आलों आहे.”

विनोबा—“हल्लीं तूं काय करीत असतोस?”

दत्तू—“हल्लीं घरीं च आहे. मधून मधून बगीच्यांत जाऊन शेतीची माहिती घेत असतो.”

विनोबा—“तूं काय शिकला आहेस?”

दत्तू—“इंग्रजी पांचवी”

विनोबा—“मग शाळा कां सोडून दिलीस?”

दत्तू—“मी नॅव्हिगेशन शिकण्यासाठीं गेलों होतों. पण मला घेतलें नाही.”

विनोबा—“तुझा आवडता विषय कोणता?”

दत्तू—“माझा आवडता विषय मेकॅनिक्स आहे.”

विनोबा—“मेकॅनिक्सला तर फिजिक्सची जरूर लागते.”

दत्तू—“हें सर्व थिअरिटिकल ज्ञान चुकीचें असतें. प्रॅक्टिकल च खरें.”

विनोबा—“सर्व थिअरिटिकल ज्ञान चुकीचें?”

दत्तू—“हो, मला तसा अनुभव आला आहे.”

विनोबा—“कसा काय?”

दत्तू—“इकडे विजेच्या बाबतींत तसा अनुभव आला. विजेमध्यें बिघाड झाल्याबरोबर जे मोठमोठे इंजिनियर होते ते त्यांच्या थिअरिटिकल ज्ञानाप्रमाणें शोधूं लागले, काय झालें म्हणून. पण त्यांना कांहीं च कळलें नाहीं. पण तें च एका साध्या मजुरानें सुधरून दिलें. कारण प्रॅक्टिकल ज्ञानामुळें. त्याला तें समजलें होतें. याच्या उलट पुस्तकांत खोटी च थिअरी लिहिली आहे.”

विनोबा—“त्या मजुराच्या अनुभवाप्रमाणें थिअरी लिहिली तर ती हि खोटी च ठरेल.”

दत्तू—“नाहीं. पण ज्ञान थिअरीनें होत नाहीं. प्रॅक्टिकलनें, काम केल्यानें, अनुभवानें ज्ञान होतें. शिवाय जे थिअरी शिकतात ते कामाला निरुपयोगी होतात. त्यांना काम करण्याची इच्छा च होत नाहीं.”

अनुक्रमणिका

विनोबा—“बरें, तुझा दुसरा आवडता विषय कोणता?”

दत्तू—“शिकार”

विनोबा—“तूं कोणकोणत्या शिकारी केल्यास?”

दत्तू—“मागें मालेगांवच्या जवळ झोडग्याच्या जंगलांत डुकराच्या व काळविटाच्या शिकारी केल्या.”

विनोबा—“वाघाची शिकार नाहीं केलीस का?”

दत्तू—“हो, दोन वेळां शिकारीस बसलों, पण वाघ मारला गेला नाहीं.”

विनोबा—“कां बरें?”

दत्तू—“एकदां वाघ हुसकला पण तो आला च नाहीं. दुसऱ्यान् दा त्याला गोंळी मारली पण ती कानाला चाटून गेली व तो पळून गेला.”

विनोबा—“उंचावर बसून आपण सुरक्षित शिकार करण्यांत धाडस नाहीं. त्यापेक्षां तलवारीनें, भाल्यानें शिकार करण्यांत जास्त धैर्य नाहीं कां?”

दत्तू—“रिव्हॉल्वरनें जवळ जाऊन मारण्यांत हि धाडस आहे च.”

विनोबा—“बरें, आणखी तुझा आवडता विषय कोणता?”

दत्तू—“जनावरें पाळण्याचा मला षौक आहे.”

विनोबा—“जनावरें कोणती?”

दत्तू—“ससे, मोर, वाघ, हरणें इत्यादि.”

विनोबा—“म्हणजे शिकार करणें आणि शिकारीचीं जनावरें पाळणें हा आवडीचा विषय असें च कीं नाहीं?”

दत्तू—“हो”

विनोबा—“आणखी कांहीं आवडीचा विषय?”

अनुक्रमणिका

दत्तू—“नाहीं. मला माझ्या आवडत्या विषयांचा अभ्यास करण्याला वाव मिळत नाहीं. माणसानें क्रूर असावें. पण आपल्यासारखे जे आहेत, आपल्या टोळींतले, आपल्या बैठकींतले त्यांना मदत करावी. त्याप्रमाणें मला कोणी मदत करीत नाहींत.”

विनोबा—“माणसानें क्रूर असावें?”

दत्तू—“हो”

विनोबा—“वाघसिंहाप्रमाणें?”

दत्तू—“हो”

विनोबा—“क्रूरतेनें तर सिंह, वाघ जवळ जवळ नष्ट च झाले आहेत. पूर्वी हजारों सिंह, वाघ होते पण आज क्वचित आढळतात.”

दत्तू—“याचे कारण त्यांना बुद्धि नाहीं.”

विनोबा—“म्हणजे क्रूरतेबरोबर माणसाला बुद्धीची हि जरूर आहे तर?”

दत्तू—“होय बुद्धि हि पाहिजे च.”

विनोबा—“बुद्धि ज्यास्त पाहिजे कीं क्रूरता?”

दत्तू—“क्रूरता ज्यास्त पाहिजे. बुद्धि थोडी कमी पडली तरी चालेल. क्रूरतेसाठीं मांस हि खाल्लें पाहिजे.”

विनोबा—“मग तूं मांस खातोस कीं नाहीं?”

दत्तू—“आमच्या घरांत आमचे आईबाप, काका वगैरे वडील मंडळी कोणी च मांस खात नाहींत. मी व माझ्या बहिणी मांस खातों.”

विनोबा—“घरांत जर मांस शिजवीत नाहींत तर कोठें मांस खातां?”

दत्तू—“मी इराण्याच्या हॉटेलांत खातो. बहिणी नातलगांकडे खातात.”

विनोबा—“बेंजामिन फ्रँकलिननें How I cheated myself म्हणून आपल्या मांस सोडण्याची गोष्ट लिहिली आहे. जगांतल्या थोर पुरुषांपैकी एक थोर पुरुष म्हणून फ्रँकलिनची योग्यता मोठी आहे. त्यानें लिहिलें आहे, “मी मांस अजिबात सोडून दिलें. पुढें एके दिवशीं आम्ही होडींत बसून प्रवासाला निघालों. तिथें होडींतले सर्व लोक मांसाचे निरनिराळे पदार्थ खातांना मला फार आग्रह करूं लागले व कळवळ्यानें

विचारूं लागले कीं ‘तुम्ही कां खात नाहीं?’ मी आपलें ‘मी खात नाहीं मला नको’ एवढें च सांगितलें. पुढे होडी चालतां चालतां अशी गंमत झाली कीं पाण्यांत एक मोठा मासा दुसऱ्या जातीच्या एका लहान माशाला खातांना आढळला तेव्हां मीं म्हटलें, “चोरा मी तुला खात नाहीं आणि तू मात्र त्या लहान माशाला खावेंस काय? बरें तर मी तरी तुला कां सोडावें?”—तेव्हांपासून मी मांस खाऊं लागलों. पण तुला फळापेक्षां मांस ज्यास्त आवडते का रे?”

दत्तू—“होय”

विनोबा—“बरें, मिठाईपेक्षां?”

दत्तू—“हो, मला गोडापेक्षां तिखटमिठाचे पदार्थ जास्त आवडतात. मांसांत भरपूर तिखट मसाला असतो.”

विनोबा—“तुझें आतांपर्यंतचें शिक्षण कोठें झालें?”

दत्तू—“कांहीं खामगांवच्या राष्ट्रीय शाळेंत व कांहीं येथें.”

विनोबा—“खामगांवची राष्ट्रीय शाळा कां सोडलीस?”

दत्तू—“कारण तेथें राष्ट्राभिमान वाढेल असें शिक्षण दिसलें नाहीं. दुसरें राष्ट्रीय शिक्षण देणाऱ्यानें नीतीनें वागावयास पाहिजे. ती नीति हि तेथें आढळून आली नाहीं तेथले शिक्षक अनीतिमान् आहेत.”

विनोबा—“कोणते शिक्षक नीतिहीन आहेत?”

दत्तू—“मला आतां सर्वांचीं नांवें आठवत नाहींत. पण परांजपे, पुरवार, पंधे—हे सर्व शिक्षक नीतिहीन आहेत.”

विनोबा—“तेथें नीतिहीन लोक आहेत हें तूं अप्पासाहेबांना सांगितलेंस काय?”

दत्तू—“नाहीं.”

विनोबा—“कां? मला च मग कसें सांगितलेंस?”

दत्तू—“कारण तुम्ही त्याच पंथांतले व पुढारी आहां. त्यामुळें तुम्हाला ही गोष्ट कळविल्यास तुम्ही सुधारणा करूं शकाल अशी माझी कल्पना.”

*　　　　*　　　　*

अनुक्रमणिका

अप्पासाहेब, भाईसाहेब, रामेश्वरजी, सुकाभाऊ इत्यादि मंडळींशीं त्यांच्या त्यांच्या प्रश्नानुरूपं बोलून विनोबा संध्याकाळच्या गाडीनें येवल्याकडे निघून गेले. आश्रम उघडल्याचें वर्तमानपत्रांत कोठें हि आलें नाहीं. फार गाजावाजा, कार्यक्रमाचा पोषाखी कोलाहल इत्यादि प्रकार कांहीं च दिसून आले नाहींत. बाळूभाई आणि साने गुरुजींसारख्या सेवकांचे आश्रम अत्यंत सहजसुंदर रीतीनें उघडले गेले. भगवद्गीतेची चर्चा प्रत्येक आश्रम उघडण्यापूर्वीं झाली. ज्यांना संतसंगतीची गोडी आहे अशा चार सज्ञनांच्या आगमनानें उद्‌घाटन समारंभ सुशोभित झाला. आणि हे दोन आश्रम पश्चिम खानदेशांत विजय स्तंभाप्रमाणें सर्वांच्या आदराचें स्थान होवोत अशी कोण इच्छा करणार नाहीं? दक्षिणेकडे बिभीषण आणि उत्तरेकडे हनुमान या दोन चिरंजीव सेवकांना मागें ठेवून रामचंद्र निजधामास गेले. खानदेशांतले हे दोन आश्रम ठिकठिकाणीं मारुतीविभीषणांची स्थापना करून आपली जीवनयात्रा सार्थ करतील या च आशेनें सत्पुरुषांनीं आश्रमाची कल्पना काढली असेल यांत शंका नाहीं. आश्रम या नांवाशीं किती महान् सत्पुरुषांचीं स्मरणें आणि विचार निगडित झालेले आहेत याची ज्याला कल्पना नाहीं त्याला या लहानशा उपक्रमांतले महान बीज कसें कळणार? हजारों युगें लोटलीं आणि नाना प्रकारच्या शेंकडों संस्था निर्माण झाल्या तरी आश्रमसारखी परमरमणीय आणि पावन कल्पना एका हि संस्थेंत समाविष्ट होऊं शकली नाहीं. भावी कालांत हे आश्रम काय करतील ते परमेश्वराला च माहीत. पण नुसत्या अशा कामाचा उपक्रम ही हि एक महान घटना आहे म्हणून ज्ञानेश्वरांनीं च म्हटलें आहे.

**जैसी दीपकलिका धाकुटी । परी बहु तेजाते प्रकटी ।**
**म्हणोनि सुबुद्धि हे थेकुटी । म्हणो नये ॥**

●●●

अनुक्रमणिका

# प्रकरण ५२ वें

## ग्रामसेवा मंडळ

**God** made the country and man made the town—ईश्वरानें देश निर्माण केला आणि माणसानें शहर निर्माण केलें. ईश्वरानें व्यापकता निर्माण केली आणि माणसानें संकीर्णता निर्माण केली. ईश्वराची शक्ति अनंत म्हणून त्याची सृष्टि हि अनंत असावयाची. मनुष्याची शक्ति सांत म्हणून त्याची निर्मिति ही सांत च असेल. परंतु सांत निर्मिति ही गोष्ट वेगळी आणि संकीर्णता ही गोष्ट वेगळी. सांततेमध्यें मर्यादा आहे. संकीर्णतेंत कोंडमारा आहे. मर्यादायुक्त सांतता ही व्यापकतेची—अनंततेची उपासक आहे. परंतु संकीर्णता ही ईश्वरी सृष्टीची विरोधक आहे. ईश्वरानें नद्या समुद्र निर्माण केले तर मनुष्य विहिरी तळीं निर्माण करील ही मर्यादा झाली. परंतु मनुष्य जर चिखलाचीं डबकीं निर्माण करूं लागला तर तो ईश्वरी सृष्टीचा द्रोह झाला. ईश्वरानें अपार जंगल निर्माण केलें तर मनुष्य शेती आणि बागबगीचा निर्माण करील; पण त्यानें जर चहा तंबाखू, भांग, गांजा यांची उत्पत्ति आरंभिली तर तो ईश्वरी सृष्टीचा द्रोह झाला. ईश्वरानें देश निर्माण केला तर माणसानें तदनुकूल लहान लहान गांवें निर्माण करावीं, ही गोष्ट ईश्वरी सृष्टीशीं अविरोध ठरेल, परंतु त्यानें मोठमोठीं शहरें निर्माण केलीं तर ती गोष्ट ईश्वरी सृष्टीशीं पूर्ण विरोधक ठरेल. कारण ईश्वरी सृष्टींतील मुबलक जमीन, मैदानें, टेकड्या, ओहोळ, वृक्षवनस्पति, पशुपक्षी येथें असणार नाहींत. तेथलें आकाश कमी होईल. तेथें रात्रीं सर्वांना तारका दिसणार नाहींत. ईश्वरी सृष्टींतील शांति येथें अनुभवास येणार नाहीं. तेथें ईश्वरी सृष्टीप्रमाणें मुबलक हवा आणि सूर्याचा प्रकाश लाभणार नाहीं. तेथें झटकन गांवाबाहेर पडून ईश्वरी सृष्टींत मिसळतां येणार नाहीं.

ईश्वरी सृष्टींत वृक्षवनस्पति इतर पशुपक्षादि प्राणि आणि मनुष्य यांचे सामंजस्य पाहिजे. केवळ मनुष्याचा च अपरंपार विस्तार ही गोष्ट ईश्वरी सृष्टीला मारक ठरते. केवळ मनुष्याचा च अपरंपार विस्तार झाल्यानें मनुष्यत्व च उरत नाहीं. मनुष्यविस्ताराला संयमपूर्वक आळा घातल्याखेरीज ईश्वरी सृष्टीचा आनंद लाभणार च नाहीं. मनुष्याची अपरंपार वाढ झाल्यानें जंगलें पूर्णपणें तुटलीं, हिंस्र गणले जाणारे प्राणि तर मारले गेले च परंतु मनुष्याला उपयोगी अशा गुरांना हि चरण्याला भरपूर गुरचरण राहिलें नाहीं. शिवाय माणसामाणसांत एकमेकांवर कुरघोडी करण्याचे प्रयत्न सुरू होऊन मारामारीच्या शोधांत मनुष्य एकसारखा पुढें जाऊं लागला. एकमेकांवर मारामारीच्या शोधांनीं कुरघोडी करावयाची त्याचप्रमाणें उद्योगधंदा केंद्रित करून यंत्रशक्तीनें दुसऱ्यावर आपला माल लादून कुरघोडी करावयाची असा प्रकार सुरू झाला. आणि जग त्रस्त होऊन गेलें. जुलमी लोक आणि गुलाम लोक असे जगांत दोन प्रकार निर्माण झाले. मग सवत्र समता निर्माण व्हावी म्हणून कल्लोळ उसळला. दुष्काळांत ज्याप्रमाणें कोणी अधिक भाकर खात असला म्हणजे ती सहन न व्हावी आणि तिचा वांटा मिळावा असा ओरडा निर्माण व्हावा त्याप्रमाणें सर्वत्र भिकारडेपणानें समतेचा टाहो निर्माण झाला. हा समताविषमतेचा प्रश्न च देवाच्या दुनियेंत उपस्थित होत नाहीं. माझ्या घरीं मला घडाभर पाणी पुरतें मी तेवढें च भरतो. दुसरा कोणी ५० घडे पाणी भरत असेल तर मला त्याचा अभिलाष बाळगण्याची जरूरी च काय? पाण्याचें वैपुल्य जेथें आहे, नद्याच्या नद्या जेथें ईश्वर पाणी वरून झोकून देतो तेथें त्या पाण्याबाबत प्राण्यांमध्यें झगडा होण्याचें कारण च उरत नाहीं. जेथें विपुल पाणी आहे तेथें पाण्याच्या बाबतींत साम्यवैषम्याचा कांहीं प्रश्न च उद्भवत नाहीं. ईश्वराच्या सृष्टींत ऐश्वर्य भरलेलें आहे. तें ऐश्वर्य नष्ट केल्यानें च हा प्रश्न उद्भवतो. एका ज्वारीच्या दाण्याचे जर शेंकडों दाणे ईश्वर देतों तर भाकरीसाठीं हलकल्लोळ कां व्हावा? कारण मनुष्यानें स्वतःची अपरंपार वाढ केली.

अनुक्रमणिका

विषयोपभोगाला कांहीं च सीमा राहिली नाहीं. ईश्वरीसृष्टीपासून मनुष्य विमुख होऊन कृत्रिम शहरांत राहूं लागला. शरीरपरिश्रम त्यानें सोडला. जीवनाच्या नित्याच्या गरजा यंत्राच्या उत्पादनांतून तो भागवूं लागला. स्वतःला शहरांत कोंडून तो नागरिकतेचे गोडवे गाऊं लागला. शस्त्र आणि यंत्राच्या जोरावर तो दुसऱ्याला गुलाम करूं लागला. स्वतः परावलंबी बनला. त्यामुळें सर्वत्र भाकरीसाठीं हलकल्लोळ निर्माण झाला. हा हलकल्लोळ दूर करावयाचा आणि ऐश्वर्यांत—ईश्वरी साम्राज्यांत प्रवेश करावयाचा तर नागरिकता सोडून ग्रामीणतेकडे नजर दिली पाहिजे. आणि ग्रामीणतेचें केंद्र ऋषींची आरण्यकसंस्कृति झाली पाहिजे. लहान लहान गांवें, विपुल गुरचरण, गांवांत गृहोद्योग आणि ग्रामोद्योग, आजूबाजूला अरण्य, त्या गांवासन्निधच्या अरण्यांत विद्येचीं लहान लहान ऋषितुल्य केंद्रें. जेथें जीवनाचे अनेक प्रयोग आणि सर्व साधना अशी सर्व ईश्वरी सृष्टीची उपासक रचना झाली पाहिजे. नगर हें मनुष्यांच्या संस्कृतीचें केंद्र नसून ऋषींचें आरण्यकजीवन हें मानव-संस्कृतीचें केंद्र बनलें पाहिजे. तेवढ्यासाठीं मानवजीवनांत ब्रह्मचर्य ही वस्तु आधारभूत गणली पाहिजे.

**अथ यदरण्यायनमित्याचक्षते ब्रह्मचर्यमेव तत् ।**

हा सिद्धांत पटला पाहिजे. ब्रह्मचर्यावर जीवनाची उभारणी व्हावी म्हणजे ऋषींचा आश्रम हें जीवनाचें केंद्र व्हावें.

**माहेरीचा काय येईल निरोप । म्हणूनियां झोंप नाहीं डोळा ।**

अशा तऱ्हेनें ग्रामीण जनतेचें लक्ष आश्रमीय जीवनाकडे वेधलेलें असावें.

या दृष्टीनें आचार्यांचा वर्ध्याचा आश्रम (नालवाडी) हा वर्धा तालुक्यामध्यें स्फूर्तीचें, चळवळीचें केंद्र झालेला च होता. परंतु आश्रम जीवनाच्या प्रयोगाकडे सर्व ग्रामीण जनतेचें लक्ष केंद्रित होण्याला अधिक परिचय आणि कालावधीची जरूर अपेक्षित होती. वर्धा हें हिंदुस्थानच्या स्फूर्तीचें केंद्र झालेंलें होतें. चोहोंकडून येथें येणाऱ्या जिज्ञासू लोकांना येथें ग्रामसेवेच्या कार्याचा नमुना पहावयास मिळण्याची अपेक्षा असणें स्वाभाविकहोतें. जुन्याखेड्यांची सुधारणा करून जवळ जवळ आदर्श खेडें तयार करणें हें एक काम आणि ग्रामसेवेच्या कार्यकर्त्यांची स्वयंपूर्ण आदर्श खेड्यासारखी वसाहत निर्माण करणें हें दुसरें काम, शिवाय सबंध हिंदुस्थानांतून ग्रामसेवेच्या साधनांची जी मागणी सुरू होती ती पुरविण्याचें हें तिसरें कार्य करावें या दृष्टीनें आश्रमातर्फे आचार्यांच्या स्फूर्तीनें जें प्रचारकमंडळ निर्माण झालें होतें, त्यांतूनच व्यवस्थित “ग्रामसेवामंडळ” या संस्थेची ६ मे १९३४ रोजीं संस्थापना करण्यांत आली.

प्रचारकमंडळांत नसलेले परंतु आचार्यांच्या तालमींत तयार झालेले जमनालालजींचे पुतणे राधाकिसनजी बजाज हे हि या ग्रामसेवा मंडळांत दाखल झाले. खुद्द जमनालालजींची दृष्टि हि ग्रामसेवामंडळाकडे होती च. परंतु हिंदुस्थानांतल्या अनेक मोठमोठ्या प्रवृत्ति कॉंग्रेस वर्किंग कमिटीचें काम, बापूजींच्याकडे सेवादृष्टीनें नित्य नजर आणि हिंदुस्थानभर पसरलेल्या स्वतःच्या प्रेमी मेळाव्याकडे पाहणें या सर्व गोष्टींमुळें जमनालालजी तसें ग्रामसेवा मंडळाकडें प्रत्यक्ष लक्ष देणें ही गोष्ट शक्य नव्हती. राधाकिसनजी बजाज हे व्यावहारिकदृष्ट्या काटेकोर, हिशेबी, जमनालालजींचीं धोरणें माहीत असणारे, अतिशय परिश्रमी असल्यामुळें ग्रामसेवामंडळाला विनावेतन सर्व काळ काम करणारा एक संरक्षक शिपाई च प्राप्त झाला असें म्हणतां येईल. जमनालालजींप्रमाणें व्यापारधंद्यांत नांवलौकिक मिळविण्याची आणि लाखों रुपये

कमविण्याची कुवत असून केवळ ग्रामसेवेला आपलें जीवन वाहण्याची राधाकिसनजी बजाज यांची प्रवृत्ति ही निःसंशय आचार्यांच्या स्फूर्तीचा आणि जमनालालजींच्या उदाहरणाचा परिणाम होता.

राधाकिसनजींच्या यशस्वी नेतृत्वाप्रमाणें ग्रामसेवा मंडळांत त्यांना च तुल्यबळ अशी आचार्यांच्या सत्संगाचा लाभ घेतलेली अनेक मंडळी होती. त्यामुळें मंडळाच्या बैठकींत पुष्कळ वेळां वादविवादाचा और च रंग चढत असे. मल्लांच्या कुस्तीचे डावपेंच या मंडळाच्या वादविवादांत जणूं काय निरनिराळीं रूपें घेऊन वावरतांना दिसत.

**तीर्थे तीर्थे निर्मलं साधुवृंदं**
**वृंदे वृंदे तत्त्वचिंतानुवादः**
**वादे वादे जायते तत्वबोधः**
**बोधे बोधे सच्चिदानंदरूपम्**

साधुवृंदांतल्या वादामधून एक अपूर्व च बोध निर्माण व्हावयास पाहिजे. परंतु ग्रामसेवा मंडळांतली ही मंडळी सेवक खरी च, सत्संगाचा लाभ घेतलेली हि खरी तथापि वादाचा निकाल न होतां शेवटीं अनेक वेळां आचार्यांकडे जाऊन—

**बोधे बोधे सच्चिदानंदरूपम् ।**

हा अनुभव या मंडळींना वारंवार घ्यावा लागत असे. याचें कारण आचार्यांच्या प्रमाणें इतरांचें जीवन मननावर उभारलेंलें नव्हतें. आचार्यांचें जीवन मननानें पूर्ण व्याप्त झाल्यामुळें आचार्यांच्या मनाला मनपणा उरला च नव्हता. तें मन केवळ एक निर्णायक बोधकेंद्र बनलें होतें. या दृष्टीनें आचार्यांचें जीवन हें च खरें जीवन होतें व तो च ग्रामसेवामंडळाचा आधार होता.

**तरवोऽपि हि जीवन्ति जीवन्ति मृगपक्षिणः ।**
**स जीवति मनो यस्य मननेनोपजीवति ॥**

आचार्यांच्या छत्रछायेखालीं ग्रामसेवामंडळाचा झपाट्यानें विकास होत गेला. ज्याप्रमाणें वृक्षाला एकामागून एक शाखा फुटाव्या तशी ग्रामसेवामंडळाची स्थिति झाली. येथें विणकाम आणि विणकामाचे प्रयोग सुरवातीपासून चालू होते च. त्याला हि व्यापक स्वरूप देण्यांत आलें. चरखासंघाचें भांडार हि ग्रामसेवामंडळानें च चालविण्याचें सुरू केलें. वस्त्रस्वावलंबी लोकांची वाढ सुरू झाली. सुरगांवसारख्या ठिकाणीं सर्वत्र खादीमयता निर्माण व्हावी म्हणून तेथें प्रयोग सुरू झाले. अनेक विणकऱ्यांना विणण्याला लावून खादीची प्रगति करण्यांत आली. ग्रामसेवेचा खेड्यांतला प्रचार पूर्वीच्या इतका आतां चालू नव्हता तरी तिकडे हि ग्रामसेवामंडळाचें लक्ष होतें. वाळुंजकरांनीं चर्मालय काढलें च होतें. तें हि वाढविण्यांत आलें. त्या चर्मालयाच्या नागपूर, यवतमाळ अशा अनेक शाखा काढण्यांत आल्या. मध्यप्रांतांतले चामड्याचे प्रमुख खरीदणारे अशी आख्या ग्रामसेवामंडळाच्या चर्मालयाला प्राप्त झाली. लाखों रुपयांचें भांडवल या धंद्यांत टाकलें गेलें. अनेक मजूर कुटुंबें चर्मालयाच्या आसपास राहूं लागलीं. मृत जनावरांना फाडण्यापासून त्यांची चरबी, त्यांचे मांस, त्यांचीं शिंगें, त्यांचीं हाडें, त्यांचे खूर, सर्वांचा उपयोग करण्यापर्यंतचा सर्व शिक्षणविभाग येथें उभारला गेला. वाघ, सिंह, हरीण, डुक्कर, काळवीट, उंदीर, साप, अस्वल यच्चयावत्

प्राण्यांचीं चामडीं येथें येऊं लागलीं. अगदीं रेशमासारख्या मृदु चामड्यापासून तों दगडासारख्या कडक चामड्यापर्यंतचे सर्व प्रकार येथें तयार होऊन एक चर्मसृष्टि तयार झाली. जन्मानें ब्राह्मण असून वाळुंजकरजींनीं हा धंदा येथें शिकविण्याला उत्तम वातावरण निर्माण केलें. "वर्णानां ब्राह्मणो गुरूः" याचा हा च अर्थ. जो जो उद्योग पडता असेल तो स्वतः शिकून त्याची ऊर्जित दशा आणून तो त्या त्या लोकांना शिकविणें हें ब्राह्मणाचें काम. हें वाळुंजकरजींनीं येथें उत्तम तऱ्हेनें निर्माण केलें. चामड्याच्या टॅनरीत सामान्य माणसांना स्वाभाविकपणें च दुर्गंध येई. वाळुंजकरजी म्हणत हा दुर्गंध नाहीं, हा एक गंधविशेष आहे इतकें च! इतके ते त्या कामाशीं तन्मय झाले. त्यामुळें च हा उद्योग ग्रामसेवामंडळांत विस्तार पावला. आपल्या वडील बंधूंना हि वाळुंजकरजींनी येथें आणून गोसेवाचर्मालयाचें काम सांभाळण्याचें शिकविलें. हिंदुस्थानांतून बापूजींच्याकडे येणारे हजारों लोक गोसेवाचर्मालय व तेथील काम पाहण्यासाठीं येऊं लागले. भाऊ पानसे या आचार्यांच्या विद्यार्थ्याचा नेतृत्त्वाखालीं चरखा व खादीच्या सरंजामाच्या कामाचा उत्तम विकास झाला. चांद्याच्या, बल्लारशाच्या जंगलांतलीं लांकडें आणून, त्या लाकडांना योग्य आकार देऊन साधे चरखे, पेटीचे चरखे, पिंजणी, रेचे—अनेक तऱ्हेचा उद्योग येथें सुरू झाला. या उद्योगांत चर्मालयाप्रमाणें हजारों रुपयांचें भांडवल टाकलें गेलें. भाऊ पानसे स्वतः रात्रंदिवस प्रत्येक कामावर देखरेख करीत असल्यामुळें येथें नुकसानी आली च नाहीं. काटकसरीनें, अक्कलहुशारीनें, नाना हिकमतीनें आणि संशोधनानें हा सरंजामाचा. कारखाना चालविला गेला. हिंदुस्थानभर माल जाऊं लागला. मागणी पुरविणें पुष्कळ वेळां अशक्य होई. हें सरंजामकार्यालय पाहून देशांत अनेक ठिकाणीं सरंजामकार्यालयें निर्माण झालीं. सरंजामांत लोखंडाचा उपयोग करावा लागे तेवढ्यासाठीं कोल्हापूरचे रहिवासी, आचार्यांवर अनन्यनिष्ठा असलेले मेथे मास्तर, येथें आले. त्यांच्या देखरेखीखालीं लोखंडी ओतकाम, कातकाम, लेथचें काम सुरू झालें. तकल्या, चरख्याच्या चाती येथें च होऊं लागल्या. विजेचा उपयोग करून घेण्यांत आला. नवीन नवीन संशोधन, नवीन नवीन प्रयोग होऊं लागले. सरंजामकार्यालयांत सुतारी, लोहारी दोहोंचें काम एकत्रित होतें. येथें हि अनेक मजुरांना उत्तम प्रकारें काम करण्याची संधि मिळाली. आचार्यांचे जुने विद्यार्थि रामदासभाई हे शिंपी जातीचे. जळगांवच्या राष्ट्रीय शाळेंतून योगायोगानें १९२१ सालानंतर आश्रमांत आलेले. ते ग्रामसेवेच्या प्रचारार्थ वर्धा जंगलांत दूर जंगलांतल्या मानोली गांवीं रहात आणि मोठ्या कष्टाळूपणानें तेथल्या लोकांची सेवा करीत. तेथें त्यांनीं कांहीं गाई ठेवून अल्प प्रमाणावर गोसेवेचा प्रयोग आरंभला. त्या प्रयोगाला पूर्ण अनुकूल क्षेत्र द्यावें या दृष्टीनें ग्रामसेवामंडळानें त्यांना सदर प्रयोग येथें च करण्याचें सुचवून येथें ग्रामसेवामंडळातर्फे एक मोठी गोशाळा बांधण्यांत आली. वर्धा भागांतील च गौळाऊ जातीच्या गाईंची जोपासना करून गाईंचे दूध, उत्तम बैल, उत्तम सांड, दुधांत सकसपणा असे सर्व गुण आणण्याचे प्रयोग केले गेले. गाईंचें शेण व इतर कचरा यांच्या खताचे शास्त्रीय खड्डे खणून खताची उपयुक्तता वाढवली गेली. एकेका पिढींत गाई उत्तरोत्तर सुधारण्याचा प्रयोग, सुधारलेल्या गाई खेड्यांत पसरविण्याचा प्रयोग, खेड्यांतल्या लोकांचें गाईचें दूध घेऊन गोसेवेची गोडी लावण्याचे प्रयोग, गोसेवेंतले असे अनेक प्रयोग करण्याला ही गोशाळा एक उत्तम क्षेत्र निर्माण झालें. गांवांत गोरसभांडार ठेवून गांवांतल्या लोकांना उत्तमोत्तम गाईचें दूध पुरविण्याची सोय केली गेली. हिंदुस्थानच्या जीवनांतल्या मूलभूत उद्योगांत या गोशाळेच्या स्थापनेनें फार मोठी प्रयोगाची भर घातली या गोशाळेप्रमाणें मग आजूबाजूला अनेक गोशाळा निघाल्या.

नालवाडीला हा सर्व पसारा मावणें शक्य नव्हतें. म्हणून एक कार्यकर्त्यांची नवीन च वसाहत निर्माण करण्यांत आली. नालवाडीपासून या वसाहतीचें अंतर एकदोन शेतीचें च होतें. या वसाहतीची मांडणी आदर्श खेड्याची रचना कशी असावी या कल्पनेप्रमाणें उत्तम झालेली होती. ठराविक साच्याचीं कौलांरू बसतीं घरें, त्यांत चारी बाजूला भिंती. परंतु मध्ये भिंतीऐवजीं बांबूच्या लिंपलेल्या भिंती, प्रत्येक घराभोवतीं,

समोर आणि मागें विस्तृत जागा. स्नानासाठीं बांबूच्या भिंतीची खोली. लांकडे-जळण ठेवण्यासाठीं खोली. पाणी सांठविण्यासाठीं हौद. आजूबाजूला भाजीफुलझाडें लावण्याची सोय. बसण्यानिजण्यासाठीं सोपे. एकेका व्यक्तीला एकांत रहावा म्हणून तेवढ्यापुरत्या खोल्या—राधाकिसनजींनीं आपली सर्व बुद्धि खर्च करून खेड्यांतल्या मयसभेचें च हें काम निर्माण केलें होतें! या वसाहतीला प्रार्थनेचा मोठा चौक, सर्वांच्या स्वयंपाकासाठीं धान्यादींचें कोठार, नित्त्याच्या वस्तु मिळण्यासाठीं दुकानाला जागा, निरनिराळ्या कारखान्याच्या कचेऱ्यांना जागा, पाहुण्यांच्यासाठीं जागा, चराचे फिरते पायखाने, चिमणीचे पायखाने, पावसाळ्यासाठीं पायखाने, सार्वजनिक स्नानगृहें, रहाटगाडग्याची विहीर, लघ्वीसाठीं तट्ट्याची मजबूत लाकडी चौकटीचीं घरें, विस्तृत रस्ते—कमींत कमी खर्चांत ज्यास्तींत ज्यास्ती सोई, सौंदर्य आणि आदर्श उभारण्याचा राधाकिसनजींचा प्रयत्न त्यांच्या धडाडीमुळें या वसाहतींत किती तरी प्रमाणांत यशस्वी झाला. या ग्रामसेवामंडळाच्या वसाहतीचें नांव बापूजींनीं (३० सप्टेंबर १९४१) गोपुरी असें ठेवलें.

या वसाहतीवर जमनालालजींची हि दृष्टि खिळली. शें-सवाशें कार्यकर्त्यांच्या कुटुंबी मेळाव्याजवळ च आपण हि येऊन जाऊन रहावें असें त्यांना वाटूं लागलें. मग त्यांनीं हि एक गवताची झोपडी या वसाहतीजवळ असलेल्या टेकडीवर बांधली. तेथून महिलाश्रम दिसे, काकावाडी दिसे, बजाजवाडीचा भास होई आणि या वसाहतीवर हि दृष्टि जाई. समोर दूर डोंगर दिसत. जमनालालजींच्या उच्च आणि विशाल दृष्टीप्रमाणें च त्यांची झोपडी हि यथायोग्य स्थानीं निर्माण झाली. या वसाहतींत राधाकिसनजी बजाज यांनीं आपलें निवासस्थान केलें. आणि इतरांप्रमाणें च एका घरांत ते राहूं लागले. येथें च जमनालालजींच्या वृद्ध मातोश्री रहात असत. अशा तऱ्हेनें येथें गोपुरींत गोकुळाचा देखावा निर्माण झाला. दर रविवारीं येथें सर्व रस्त्यांची व चौकाची सार्वजनिक सफाई होई. सकाळसंध्याकाळच्या प्रार्थना, सूत्रयज्ञ, नानाप्रकारच्या सभा, पाहुणे मंडळींचें आगमन, नाना कार्यांची चर्चा यामुळें गोपुरी गजबजून गेलेली असे. राधाकिसनजींचें घर हें येथल्या सर्व प्रवृत्तींचें केंद्र, येथें अनेक गोष्टींचा सारखा उहापोह चाले.

या वसाहतीजवळ च गोशाळेला लागून शेती हि घेण्यांत आली. विहिरी खणल्या गेल्या. गाईंसाठीं ओला चारा आणि माणसांसाठीं भाजी होऊं लागली. त्याचप्रमाणें तेलघाणे हि चालविण्यांत येऊं लागले. जवळच्या गांवांमधून शिंदीचीं झाडें असल्यामुळें शिंदीच्या गुळाचें काम हि ग्रामसेवामंडळानें सुरू केलें. राजकारणादि प्रवृत्तींसाठीं गोपाळराव काळे यांची योजना झाली. गीताईचें प्रकाशन जमनालालजींनीं केल्या वेळेपासून तिच्या प्रचाराची योजना आचार्यांनी केली होती, व प्रचार अव्याहत चालू होता. या गीताईच्या प्रकाशनाखेरीज आतां आचार्यांच्या विचारांच्या अन्य प्रकाशनाची तरतूद व्हावी म्हणून प्रकाशनविभाग निर्माण झाला. गीताईमागून 'मधुकर' हा महाराष्ट्रधर्मातील निवडक संग्रह छापला गेला आणि त्यानंतर इतर प्रकाशनाला हळूंहळूं सुरुवात झाली. ग्रामसेवावृत्तं मासिक ग्रामसेवामंडळाचें मुखपत्र म्हणून निघूं लागलें. या वसाहतीला आजारी लोकांसाठीं एखादा सेवावृत्तीचा धन्वंतरी मिळावा असे प्रयत्न केले गेले. परंतु राधाकिसनजी हे च येथले सामान्य आजाराचे धन्वंतरी ठरले. बायोकेमिकची आणि वैद्यांचीं सामान्य औषधें आग्रहाआग्रहानें देऊन ते आपले प्रयोग करीत. आणि प्रसंगविशेषीं डॉक्टरला हि बोलावीत. रोगाप्रमाणें च निरनिराळ्या मंडळींच्या निरनिराळ्या अडचणी, प्रवास, वेतन, कर्ज, लग्न, जन्म, मरण अनेक प्रसंगीं ज्या गरजा उभ्या रहात त्या संबंधींची चिंता आचार्यांना विचारून ग्रामसेवामंडळाचे कार्यकर्ते करीत असत. अमुक इतक्या वेतनावर कोणाला हि पैसा पगार म्हणून द्यावयाचा नाहीं, ही येथली शिस्त होती. कारण पैशाच्या संग्रहासाठीं येथें रहावयाचें नसून सेवेसाठीं रहावयाचें व नाइलाज म्हणून कौटुंबिक खर्चासाठीं अमुक मर्यादेच्या आंत पगार घ्यावयाचा अशी येथली कल्पना होती. येथल्या कार्यकर्त्यांच्या स्त्रियांनीं हि सर्व काळ स्वयंपाकादिगृहकार्यांत अडकून न पडतां नवीन नवीन सेवेचीं कामें करावीं व

एकसारखें ज्ञान संपादन करीत जावें अशी मंडळाची आणि आचार्यांची अपेक्षा असे. त्याप्रमाणें सर्व वसाहतीचें एक च स्वयंपाकघर करून त्यांत सर्वांनीं जेवून स्त्रियांना घरकामापासून मुक्त करावें असे हि प्रयोग येथें केले गेले. चळवळीमध्यें बहुतेक स्त्रिया व कार्यकर्ते पकडले जाऊन ही वसाहतच्या वसाहत जप्त झाली होती. व तेथें पोलिसांचे पहारे बसले होते. या रीतीनें ही वसाहत हें एक कार्यकर्त्यांचें कुटुंब असें बनलें होतें.

ग्रामसेवामंडळाच्या या वसाहतीच्या एका टोंकाला टेंकडीवर जमनालालजींची झोपडी होती आणि नालवाडी गांवांत दुसऱ्या टोंकाला आचार्यांची झोपडी होती. जमनालालजी आणि आचार्य दोहोंच्यामध्यें हें सर्व ग्रामसेवामंडळ समावून गेलें होतें. आचार्यांनी ज्ञान आणि वैराग्य, भक्ति आणि उपासना यांचें एक टोंक गांठलें होतें. आणि कर्म आणि राष्ट्रसेवेच्या योजनांचें जमनालालजींनीं एक टोंक गांठलें होतें. दोन्ही गोष्टींचें मीलनस्थान ग्रामसेवामंडळ व्हावें असा याचा उघडपणें अर्थ होतो. जमनालालजींना शेवटचें गोसेवेचें कार्य घेऊन येथें च रहावयाचें होतें. अन्य सर्व कार्यांतून निवृत्त होऊन गोसेवा हें च जीवनाचें कार्य त्यांनीं केलें होतें. अखिल हिंदुस्थानच्या गोसेवेची परिषद येथें आचार्यांच्या अध्यक्षतेखालीं जमनालालजींनीं भरवली. परंतु आयुष्याचा एकाएकी अंत होऊन जमनालालजींच्या झोपडीच्याजवळ जमनालालजींच्या ऐवजीं त्यांची समाधि च निश्चलत्वानें राहूं लागली! तथापि या समाधीची हि प्रेरणा कमी स्फूर्तिदायक नव्हती. आचार्यांचा मुक्काम हि नालवाडीहून कधीं च हालला होता. ते पवनारला रहात असत. ग्रामसेवामंडळाच्या वसाहतींत आचार्य प्रत्यक्षपणें असे राहिले च नाहींत. तरी सदासर्वदा कोठें हि असून या वसाहतीला, आणि ग्रामसेवामंडळाला त्यांचा सल्ला मिळत असे.

**कीं मागें गुप्त उभा अससी प्रेमें उभारूनी बाहे ।**

असा त्यांचा मार्गदर्शनाचा ठसा सर्वत्र उमटलेला होता. या ठशामुळें च ग्रामसेवामंडळ गोपुरीची वसाहत, तेथल्या अनेक प्रवृत्ति, तेथले अनेक प्रयोग, तेथल्या अनेक परिषदा, तेथले अनेक समारंभ, तेथले अनेक निर्णय, तेथले अनेक विचार यांकडे हिंदुस्थानांतल्या विधायक कार्यकर्त्यांचे डोळे सदोदित लागलेले असत. ग्रामसेवामंडळानें ग्रामसेवेचा सर्व आदर्श जरी उभारला नाहीं तरी एका दृष्टीनें आचार्यांच्या सत्सहवासामुळें ग्रामसेवेचा पूर्ण लक्षवेध केला यांत शंका नाहीं.

●●●

## प्रकरण ५३ वें

## गीताईचा प्रचार

**यं इमं परमं गुह्यं मद्‌भक्तेष्वभिधास्यति ।**
**भक्तिं मयि परां कृत्वा मामेवैष्यत्यसंशयः ॥**
**न च तस्मान्मनुष्येषु कश्चिन्मे प्रियकृत्तमः**
**भविता न च मे तस्मादन्यः प्रियतरो भुवि ॥**

**माझ्या** भक्तगणांत जो कोणी हें परमरहस्य सांगेल तो माझी पराभक्ति करून निःसंशय मला येऊन मिळेल. त्याच्यासारखा माझें प्रिय करणारा जगांत कोणी च नाहीं. त्याच्या इतका प्रिय पुढें दुसरा कोणी हि जगांत होणार नाहीं—भगवद्‌गीतेच्या शेवटीं भगवंतांनीं हे उद्‌गार काढले आहेत! भगवद्‌गीतेच्या उपदेशाचें भगवंतांच्या अंतःकरणाला केवढें महत्त्व वाटत आहे त्याचें हे उद्‌गार प्रत्यक्ष साक्षी आहेत. परंतु केवळ एवढी च गोष्ट नाहीं. भक्तांच्या मेळ्यांत गीता सांगणारा जो परमभक्त त्याची येथें भगवंतांनी मुक्तकंठानें प्रशंसा केली आहे. त्याच्यासारखा दुसरा कोणी च भगवंतांना प्रिय वाटत नाहीं. याचें कारण काय? याचें कारण भक्तांच्या आधीं मेळा तयार करण्याचें महत्कार्य करून त्या मेळ्यामध्यें भगवंतांचा उपदेश सांगून तो ठसविणें असें दुहेरी कार्य हा परमभक्त करीत असतो. केवळ स्वतःजवळ भक्ति आहे ही गोष्ट वेगळी आणि भक्तीचा रंग दुसऱ्या अनेकांना लावून भक्तांचा एक मेळा तयार करणें ही गोष्ट वेगळी. केवळ स्वतःजवळ भक्ति असणें ही वैयक्तिक गोष्ट झाली परंतु भक्तांचा मेळा तयार करणें ही व्यापक निर्माणकला आहे. या कलेमध्यें ईश्वराचें ऐश्वर्य भरलें आहे. तुटपुंजी भक्ति स्वतःकरितां कदाचित् पुरेल एक वेळ पण भक्तांचा मेळा निर्माण होण्याला भक्तीची अपरंपार शक्ति स्वतःजवळ साठवली पाहिजे. वाटीभर पाण्यानें स्वतःची तृषा भागेल पण अनेकांची तृषा भागविणारी विहीर ही वस्तु वेगळी आहे. स्वतःला एखाद्या दिवलीचा प्रकाश पुरेल पण अनेकांना स्वच्छ प्रकाश द्यायचा तर तें सूर्याचें च काम. एवढ्यासाठीं च भगवंतांनीं या भक्तराजाची प्रार्थना केली. कारण असा भक्त भगवंतांना हि दुर्मिळ वाटला. अर्जुन—मारुति—उद्धव—शंकराचार्य—ज्ञानदेव या पलीकडे ही भक्तमालिका सरकणें च कठिण दिसतें. या च मालिकेंत बसण्याला योग्य अशी आचार्यांची भूमिका तयार झाली होती. धुळें जेलमध्यें आणि बाहेर हि त्याच्या भोवतीं भक्तांचा मेळावा तयार झाला होता. त्या मेळ्यांत अनेक वेळां भगवंतांच्या उपदेशाचे रहस्य त्यानें अतिशय तन्मयतेनें सांगितलें होते. त्यामुळे भक्तीबरोबर ज्ञानाची नेमकी दृष्टि कशी असते याचा अनेक वेळां अनेकांना प्रत्यय आलेला होता. हा च खरोखर भगवंतांनी म्हटलेला गीतेचा प्रचार!

परंतु गीताईचा आचार्यांच्या द्वारें मराठींत अवतार झाल्यापासून ज्याप्रमाणें सूर्यापासून निघालेले एकेकटे किरण हि प्रकाशप्रचार करीत असतात, त्यासाठीं सूर्याला जागचें हलावें लागत नाहीं, त्याप्रमाणें गीताईचा प्रचार आचार्यांच्या अनेक चाहत्यांच्या द्वारें हळूं हळूं होत च गेला. गीताईप्रचारासाठीं आचार्यांना जागचें हालण्याची आवश्यकता नव्हती. ६-२-१९३१ ला गीताईचें लेखन पुरें झालें होतें. तेव्हांपासून आश्रमांत हस्तलिखित प्रती तयार होऊं लागल्या. लगेच अनेकांनीं गीताईचे पठन हि सुरू केलें. धुळें जेलमध्यें गीताई प्रसिद्ध झाल्याबरोबर तिच्या आवृत्त्या एकामागून एक खपून गेल्या. परंतु गीताईप्रचाराची योजना अशी त्यांत कोणती च नव्हती. सहजपणें गीताईचा प्रचार होत होता. गीताईसारखा अद्‌भुत ग्रंथ मराठीभाषेंत तयार झाला आहे तर तो मराठी भाषा चालणाऱ्या सर्व भागांत उपलब्ध झाला पाहिजे. अशी

अनुक्रमणिका

जमनालालजींची हि स्वाभाविकपणें च इच्छा होती. यासाठीं आचार्यांनी एका आश्रमवासीयाला प्रेरणा दिली. नेहमींप्रमाणें यांत योजनाबद्ध व्यवस्थित प्रचाराची व्यवस्थित आचार्यांची अपेक्षा होती. कारण महाराष्ट्रांत गीताई उपलब्ध करून देणें म्हणजे शहरांत बुकसेलर्सकडे पुस्तकें ठेवून भाडोत्री प्रचारक नेमून वरवर प्रचार करणें नव्हे. महाराष्ट्राचे क्षेत्र उत्तरेकडे कमाल नर्मदा नदी—निदान तापीपासून दक्षिणकडे तुंगभद्रेपर्यंत तरी तें धरावयास पाहिजें च. दीड लाख चौरस मैलांचें हें क्षेत्र झालें. महाराष्ट्रांत सुमारें २॥ कोट लोकवस्ती. सुमारें ३५/४० हजार गांवें. नगर, नाशिक, पुणें, सातारा, सोलापूर, पूर्व खानदेश, पश्चिम खानदेश, कुलाबा, रत्नागिरी, ठाणें, हे मुंबई प्रांतांत मोडणारे जिल्हे. वर्धा, नागपूर, चांदा, भंडारा, उमरावती, अकोला, बुलढाणा, यवतमाळ, हे मध्यप्रांतातले मराठी जिल्हे, औरंगाबाद, बीड, नांदेड, परभणी, उस्मानाबाद, बेदर, गुलबर्गा–हे निजामशाहींतील जिल्हे, मुंबई आणि मुंबईचीं उपनगरें, जव्हार, जंजिरा, भोर, औंध, फलटण, अक्कलकोट, सावंतवाडी, कोल्हापूर, कुरूंदवाड दोन्ही पात्या, मिरज दोन्ही पात्या, सांगली, जत, बांसदा, सुगणें—हीं महाराष्ट्रांतलीं संस्थानें, बडोदें, इंदूर, धार, ग्वाल्हेर हीं महाराष्ट्रा बाहेरचीं संस्थांनें इतक्या ठिकाणीं हा प्रचार व्हावा अशी आचार्यांची कल्पना होती.

ही भव्य कल्पना होती यांत शंका नाहीं. परंतु, प्रचाराचा क्रम कसा असावा याची यामध्यें कांहीं च कल्पना येऊं शकत नव्हती. निदान सुरुवात करण्यासाठी तरी अशा कल्पनेची जरूर होती. ज्याप्रमाणें आकाशांत रात्रीं तारका नुसत्या फुलून निघाल्या आणि जिज्ञासेनें मंडळी पाहण्यासाठीं गोळा व्हावी. आतां दाखविणाऱ्यानें कोणत्या आधारानें त्या दाखवाव्या हा च मुख्य प्रश्न उपस्थित होतो. आकाशगंगेच्या आजूबाजूला ठळक तारे आहेत ते पहात पहात त्या अनुरोधानें मग इतर तारे दाखवावे, अथवा चंद्राच्या मार्गावरचे तारे दाखवावे, अथवा ध्रुव दाखवून आजूबाजूचे तारे दाखवीत चलावे असा कांही तरी क्रम दाखविणाऱ्याला स्वीकारावा लागतो. म्हणजे या अनंत आकाशांत प्रेक्षकाची समजूत पटून तारकांची ओळख होत जाते. तेव्हां याप्रमाणें प्रचाराचा कोणता क्रम ठेवावा हा प्रचारकापुढें मोठा प्रश्न होता.

**नक्षत्रताराग्रहसंकुलाऽपि ।**
**ज्योतिष्मती चंद्रससैव रात्रिः ॥**

हजारो तारे असून हि केवल एका चंद्रानें च रात्रीला प्रकाशाचा लाभ व्हावयाचा त्याप्रमाणें या बाबतींतल्या ताऱ्यांप्रमाणें लुकलुकणाऱ्या अनंत कल्पनांचा कांहीं च उपयोग न होता आचार्यांच्या सहज मार्गदर्शनानें सौम्य स्वच्छ चंद्रप्रकाशाप्रमाणें प्रचारकाला मार्ग समजावयाचा. महाराष्ट्रांत निदान कमींत कमी वीस पंचवीस हजार लोक एके ठिकाणीं जमतात, अशा यात्रांचीं ठिकाणें २०० तरी आहेत. अशा ठिकाणीं प्रचारकानें जावें. तेथें लोकांपुढें निदान गीताईचें पुस्तक नुसतें दाखविलें तरी केवढी मोठी सेवा होईल! मिशनरी लोक शेकडों वर्षे याप्रमाणे प्रत्येक यात्रेंत हजर राहून बायबलचा प्रचार करतात. त्या ठिकाणी गीताप्रचारक नसावा ही शोचनीय गोष्ट होय. या तर झाल्या नुसत्या प्रमुख यात्रा. परंतु बारीक सारीक यात्रा आणि अनेक देवस्थानें, अनेक ठिकाणचे उत्सव, अनेक ठिकाणच्या सज्ञनांचीं स्थानें, निरनिराळे बाजार, लोकसमुदाय जमा होण्याचीं जीं जीं ठिकाणें त्या त्या ठिकाणीं जाऊन ज्याप्रमाणें स्वामी पुढें सेवक उभा त्याप्रमाणें गीताई घेऊन लोकांपुढें प्रचारक उभा असावा अशी हि एक कल्पना आचार्यांच्या बोलण्यांत येऊन गेली.

त्याप्रमाणें प्रथम रामदास, प्रभाकर दिवाण, वाळुंजकरजी हे पंढरपूरच्या यात्रेंत पांच हजार गीताई घेऊन गेले. तेथें ६०० पुस्तकें खपली. हजारों गरीब लोकांनीं तीं पाहिलीं. त्याप्रमाणें च नंतर पुन्हां पुन्हां

अनुक्रमणिका

एकदां शिवाजी व श्रीराम हे पंढरपूरच्या यात्रेंत गेले व तेथें त्यांनीं थोडें प्रचारकार्य केले. सज्जनगडच्या यात्रेला हि शिवाजी व वाळुंजकर एकदां जाऊन आले. तेथें थोडें अवलोकन झालें. यानंतर शिवाजी एकटे च चार महिने महाराष्ट्रांत प्रमुख प्रमुख ठिकाणीं धांवतां दौरा करून अवलोकन करून आले. मुख्यतः सातारा, पैठण, औरंगाबाद, कुलाबा, पुणें, ठाणें या जिल्ह्यांत त्यांचें फिरणें झालें. या वेळीं चार हजार पुस्तक खपली. ठिकठिकाणीं प्रवचनें झाली. निरनिराळ्या व्यक्तींचा, संस्थांचा परिचय झाला. त्यांत आढळून असें आलें कीं, मोठीं शहरें, मोठ्या संस्था, आणि मोठीं म्हणविणारीं माणसें हा सर्व पोकळ डोलारा आहे. तेथें बहुधा कोणतें हि कार्य व्हावयाचें नाहीं. तेथें बडेजाव, लौकिक देखावा, व्यर्थ वादविवाद, पोकळ दिखाऊ बोलणें या पलीकडे फार तथ्यांश न आढळल्यामुळें गीताईप्रचाराची तऱ्हा म्हणजे जेथें बहुधा कोणी जात नाहीं. अशा खेड्यांमधून च हिंडावयाचें व सरळ जनतेची च गांठ घ्यावयाची. सर्व हिंदुस्थानांत मोठ्यांतली मोठी संस्था ठिकठिकाणीं, जी आढळते ती म्हणजे लोकलबोर्डाच्या शाळा. अशा शाळेंत सामान्य विद्यार्थी आणि सामान्य शिक्षक आढळून येतात. हिंदुस्थानांतली साक्षरता ती जणू इतकी च. या, साक्षरतेची गांठ घ्यावयाची दिशा आंखण्यांत आली. महाराष्ट्रातल्या तत्कालीन अडीच कोटी लोकांपैकीं साक्षर लोक शेंकडा ५/१० असतील नसतील. मिळून लाख दोन लाख लोकांत च हा ग्रंथ जावयाचा. या दृष्टीनें शिवाजींनीं व्यवस्थित जिल्हावार प्रथम फिरण्यास सुरवात केली. १९३५ सालीं या तऱ्हेनें फिरण्यासाठीं ते निघाले. त्यांच्याबरोबर सुकाभाऊ चौधरी, शिवरामपंत बाबाजी हे वृद्ध गृहस्थ होते. उमरावती, सौंसर, नागपूरमधील काटोल, पूर्व खानदेश, पश्चिम खानदेश, इतके विभाग ७/८ महिन्यांत फिरून आले. १०/११ हजार गीताई खपल्या. जिल्ह्यांतल्या प्रमुख खेड्यांत ५ वर्ग, ७ वर्ग शाळा असलेल्या ठिकाणीं जावयाचें, शाळेंत विद्यार्थ्यांसमोर बोलावयाचें, रात्रीं गांवांत प्रौढांसमोर बोलावयाचें, मंदिरांत स्त्रियां वगैरें समोर बोलावयांचें, गांवांत घरोघर फिरून प्रचार करावयाचा. ही प्रचाराची पद्धति होती. फिरत असतांना कोठें तरी मध्यवर्ती ठिकाणीं दोनतीन हजार पुस्तकें ठेवावयाचीं व सर्वांनीं आपल्याबरोबर ५/६ शें पुस्तकें घेऊन बहुतेक पायीं च प्रवास करावयाचा असा शिरस्ता असे. गीताईच्या एकदम पांच हजार प्रती विकत घेतल्या कीं त्यावर अमुक इतकें कमिशन मिळत असे. या कमिशनमध्यें च सर्व प्रवासखर्च भागविला गेला. आचार्यांनी शिवाजी इत्यादि गीताईप्रचारकांच्या प्रवासासाठीं एक हजार रुपयांची रक्कम राखली होती. परंतु त्या रकमेपैकीं एक पै हि घेतली गेली नाहीं. अशा प्रकारें ८-१० वर्षे प्रचारकार्य चाललें होतें. त्यांत शिवाजी, शिवरामपंत बाबाजी हे नित्य प्रचारक होते. इतर कोणी मधून मधून बरोबर फिरत असत. दरवर्षी सुमारें ६ महिने फिरणें होई. आणि बहुधा १० हजारांच्या जवळपास गीताई खपत. हें फिरण्यांचे काम एकसारखें होत नसें. महिना दीड महिना फिरावें, १५/२० दिवस एके ठिकाणीं रहावें अशा क्रमानें फिरणें होई. फक्त एका वर्षी एकसारखें सहा महिने फिरणें चाललें होतें. मंदिरांत हरिजनांना बंदी असल्यामुळें पुढें तेथें प्रवचनें करणें बंद केलें. पावसाळ्यांत फिरणें बंद असे. दि. ३-२-१९३४ रोजीं शिवाजींनीं प्रथम गीताई प्रचाराला सुरवात केली आणि ४४ सालपर्यंत गीताईप्रचार चालू होता. ४२ च्या चळवळीपासून फिरणें पुष्कळसें बंद होतें. एकूण सुमारें ७/८ वर्षांत ८१० गांवें फिरून झालीं. एकूण सुमारें ८० हजार गीताई खपविल्या गेल्या. निजामाचें राज्य, कोल्हापूर संस्थान, मुंबई, बडोदे, पूर्व खानदेश, पश्चिम खानदेश, ठाणें, नाशिक नगर, सोलापूर, कुलाबा, पुणें, सातारा, बेळगांव, बुलढाणा, उमरावती, नागपूर, सौंसर इतक्या भागांत प्रचार झाला. मुख्यतः धुळें व क्वचित येवलें, ठाणें, कोल्हापूर, शेंदुर्जना इतक्या ठिकाणीं मध्यवर्ती केंद्र करून हा प्रचार केला गेला. प्रचार करण्यापूर्वी भूगोलाचा हि अभ्यास केला गेला. महाराष्ट्राचे सर्व नकाशे जमा केले. त्यांतील गांवांची अकारानुक्रमी यादी तयार केली. सर्व भूगोल जमविले. एक लाख प्रती खपेपर्यंत साधारण प्रचारक्रम चालूं ठेवावा अशी आचार्यांची कल्पना होती. कारण एक लाख प्रती खपणें म्हणजे कुटुंबांत पांच माणसें धरलीं तर पांच लाख माणसांना गीताई माहीत झाली असें होतें. एक लाख प्रती केव्हां च खपल्या. महाराष्ट्रांतील साक्षरतेच्या मानानें प्रथम पायरी म्हणून ही गोष्ट पुरेशी मानावी लागेल.

अनुक्रमणिका

शिवाजी इत्यादींनीं केलेला प्रचार निव्वळ परिव्राजक पद्धतीचा होता. जेथें जावयाचें तेथें कार्यक्रम ठरवून जाणें होत नसें. ओळख हि नसत. वजनदार माणसाच्या ओळखी घेऊन जाण्यापेक्षां अवधूत पद्धतीनें बिन ओळखीनें च जावें, असें त्यांचें धोरण असे. त्या त्या ठिकाणीं जे बोलावतील त्यांच्याकडे जेवण होई. जेवणासाठी खर्च मुळीं च केला नाहीं. प्रवासखर्च कमींत कमी असे. सुमारें १०० रुपयांच्या आंत च वर्षाचा प्रवासखर्च असे. कारण सर्व प्रवास मुख्यतः पायीं असे. या प्रचारांत आपण केवळ कर्तव्यबुद्धींनें फिरत राहणें. फिरतां फिरतां होईल तें होईल ही च निरपेक्ष वृत्ति होती. कधीं कधीं १६/१६ मैल फिरून एक हि पुस्तक खपत नसें, तर कधीं उलट हि प्रकार होई. गीताई खपून मागणी शिल्लक उरे. कधीं कधीं उपवास करण्याचा प्रसंग येई, कधीं पाणी मिळालें नाहीं, कधीं स्नान नाहीं, कोठें आजारीपणांत च १०/१० मैल चालणें भाग पडे. प्रचारांतल्या सर्व गंमती उपभोगावयास सांपडत. गीताईप्रचार ही आचार्यांच्या दृष्टींनें एक महान वस्तु होती. स्वतः आचार्याला गीताईप्रचार च केवळ करावा अशी प्रेरणा असे. या गीताईवर जर महाराष्ट्राचें लक्ष केंद्रित केलें तर पुष्कळ भाकड ग्रंथ धर्माच्या नांवानें जे हजारो लोक वाचतात, त्यांतून लोकांची सुटका केल्यासारखें होईल, आणि हा शुद्ध धर्मग्रंथ लोकांना मिळून त्यामुळें अपरंपार कल्याण होईल. अशी आचार्यांची दृष्टि होती. गीताई प्रचाराच्या निमित्तानें अनेक प्रकारच्या उपयुक्त माहितीचीं टांचणें घेत जावी अशी आचार्यांची अपेक्षा असे.

आचार्यांच्या अपेक्षेप्रमाणें गीताईप्रचार झाला असें म्हणतां आलें नाहीं तरी त्या दिशेनें प्रयत्न केला गेला एवढी गोष्ट खरी. एका बाजूनें शिवाजी इत्यादींनीं परिभ्रमणानें गीताईप्रचार केला. दुसऱ्या बाजूनें खादी भंडारांतून गीताईची ओळख झाली. तिसरें गीताईप्रचाराचें मोठें साधन जेल. बापूजींच्या एकामागून एक येणाऱ्या चळवळींत जेल भरून जात. त्या ठिकाणीं निवांतपणें गीताईचा पाठ केला जाई. निदान बहुतेक सर्व जेलमध्यें स्थितप्रज्ञाचे श्लोक मराठींत सर्व लोक म्हणूं लागलें. आचार्यांचे भक्तगण ठिकठिकाणीं होतें त्यांनीं हि गीताईचा प्रचार केला. शिवाजींनीं मुख्यतः गीताई उपलब्ध करून देण्यांचें काम केलें. या कामांत प्रवचनें वगैरे होत. पठन, मनन, परिशीलन, कितपत होतें हें पाहण्यास शिवाजींना अवसर नसे. मुख्यतः विद्यार्थ्यांत गीताई प्रसृत झाली. आश्रमादिकांतून गीताईचें पठन चालू होतें च. संबंध गीताई पाठ करणारे सुमारे ५० जण निघाले गीताईचा शिवाजींनीं फावल्या वेळीं कोश रचला आणि तो आचार्यांपुढें मांडला. आचार्यांनीं शिवाजींना ७ महिने वेळ दिला व पवनारच्या पवित्र परंधाम आश्रमांत धाम नदीच्या तीरावरील लाल बंगल्यांत रोज तास दीड तास देऊन तो कोश आचार्यांनीं शास्त्रशुद्ध तऱ्हेनें पूर्ण करविला. कोश कसला, तें महाभाष्य च तयार झालें. गीताईच्या त्या कोशाप्रमाणें महाराष्ट्रांत एका हि ग्रंथाचा एक हि कोष तयार झालेला नाहीं. हा कोश निर्णायक कोशाचा आणि भाष्याचा आदर्श म्हणजे महाराष्ट्रांतल्या अर्थ निर्णायक वाङ्मयेतिहासांतला मुकुटमणि च निर्माण झाला, यांत शंका नाहीं. सेवाग्राम आश्रममध्यें बापूजींनीं गीतेचा च पाठ रोजच्या सकाळच्या प्रार्थनेंत ठेवला होता. परंतु त्यांना हि गीताईचा पाठ च ठेवणें योग्य वाटलें. त्या संबंधीं त्यांनीं आचार्यांना लिहिलें.

सेवाग्राम :

१८ ऑगस्ट १९४५.

चि. विनोबा,

तमारो कागळ मळयो. नई तालीम विजे हुं जोई जईश.

अनुक्रमणिका

जे में वार्याथी न कर्युं ते हार्याथी कर्युं छे. एटले के संस्कृत गीतापाटने बदले गीताईनो पाठ गई कालथी शरू कर्यो. हुं जोई गयी के संस्कृत कोई करतुं नथी. जे छे तेच छे. एओ पण गीतापुरतो संस्कृत अभ्यास नथी करता. ते नथी करी शकता. वळी सूर नो चाले ज नहीं. अने वधारे दुःखद नो ए लाग्युं के गीतापारायण ए सवारनी प्रार्थनानो भाग होवां छतां गीतापाठ शरू थाय ते वखते केटलाक चाल्या जाय. एनुं कारण तपासतां पण नजीकुं लाग्युं. आनी मने खबर छे नहीं. परम दिवसे जे खबर पडी ने एवे वखते विधारी लीधुं के जो हिंदी मराठी के गुजराती हुं चलाकं तो कदाच तो वेहेलो रस पेदा थई शके. केम के लोकोने अर्थ वेहेलो समजाय. गीताईथी शरू कर्यु केम के आ प्रदेशमां मराठी प्रधान पद भोगवे छे. सवारना जे प्रार्थनामां आवे छे ते एटला ओछां होय छे के एने सारूं गमे ते चाले. पण गीताईनो ध्वनि मने बहु मीठो लाग्यो छे. एमां कारण ए होई शके के शिवाजीना मोठेथी घणीवार पाठ सांभळ्यो. अने मने गमी गयो. किशोरलाल छे एनो ध्वनि मने पोताने हजी रुच्यो नथी. मधुर स्वरथी ए पाठ गानारने में हजी सांभळया नथी. बारडोलीमांज ए सांभळवानो प्रसंग आव्यो हतो. ते पण थोडो ज. अने कानने ए बेसीज न शक्यो. हिंदीमां हरिभाऊ ए हमणां प्रगट कर्यो छे. ए हुं तपासी पण नथी शक्यो. एटले एने तो अडवानुं मन पण न थाय. एटले स्हेजे गीताईनो पाठ शरू कर्यो.

ए लखवानुं कारण तो काले शिवाजीने जोया ए उपरथी जो ए अहिंदा थोडो वखत रोकावाना होय अने ललचाळी शकाय तो आ आरंभने वखते ओछामां एक अठवाडीक आवी शके तो मने गये. ए जे ओ थवाना होय ते ने करी शके अने जे ढबे ए गीताईपाठ करे छे ए ढबे केटलाक झीली ले.

बापुना आशीर्वाद.

याप्रमाणें गीताईचा प्रचार गीताई विक्रीपासून तो महात्माजींसारख्यांच्या स्थानीं गीताईचा पाठ दाखल होईपर्यंत, गीताईचें कोशरूपानें भाष्य रचीपर्यंत १०/१२ वर्षांत केला गेला. हें सर्व आचार्यांच्या पुण्याईचें च फळ होतें. शिवाजी फिरतांना नेहमीं म्हणत कीं, प्रचार आपण कोण करणार? तो होणार च आहे. आपण केवळ गीताईचे गठ्ठे वाहून ग्राहकांना देण्यासाठीं फिरणें एवढें च आपलें काम. तुकाराममहाराजांसारख्यांनीं जर म्हणावे कीं,

**फोडिलें भांडार धन्याचा हा माल ।**
**मी तव हमाल भार वाही ॥**

—मग इतरांनीं स्वतःला काय म्हणावें? तुकाराममहाराजांसारखा हमाल होण्याचें भाग्य काय सामान्य म्हणावयाचें? पण असे हमाल आपण आहोंत हें म्हणणें हि गीताईप्रचारकाला शक्य नाहीं. शिवरामपंत बाबाजी म्हणत गीताईच्या निमित्तानें मला यात्रा घडत आहे. गीताईचा प्रचार महाराष्ट्रांत होणें यांत नवल नाहीं. पण गुजरातमध्यें गीताईच्या धर्तीवर किशोरीलालभाईंनीं, हिंदीं प्रांतांत हरिभाऊ उपाध्याय इत्यादीनीं हि त्या त्या भाषेंत पद्य गीता भाषांतरें करून गीताईचें एक प्रकारें अनुकरण केलें. व त्या दृष्टीनें अन्य प्रांतांत गीताईचा एक प्रकारें प्रचार झाला. गीताईच्या आवृत्तींवर आवृत्ती निघत चालल्या. ठळक अक्षराची गीताई, लोकनागरी लिपींतलीं गीताई, गीता आणि गीताई— अनेक प्रकारें गीताईचें प्रकाशन झालें. गीताईचा स्टिरिओ करून ठेवला. आचार्यांनीं गीताईचीं अधिकरणें पाडलीं. ह्या अधिकरणांप्रमाणें नामाभिधानाचे श्लोक रचले. गीतेचे १८ श्लोकांत सार काढले. गीता चिंतनिका ही आचार्यांजवळ लिहिलेली होती. आचार्यांच्या गीताप्रवचनांचें हिंदींत भाषांतर होऊन सर्वत्र त्यांचा फैलाव झाला.

अनुक्रमणिका

गीताईप्रचाराची पहिली पायरी केव्हांच ओलांडली गेली. यापुढें विचाराचा प्रचार होण्याची अपेक्षा आचार्यांनीं प्रकट केलीं. विचारांचा प्रचार म्हणजे गीताईच्या विचारांचा—ब्रह्मविचाराचा—जीवनाच्या मूलभूत विचारांचा प्रचार.

**ना आदि गुरू शंकरा । लागोनि शिष्यपरंपरा ।**
**बोधाचा हा संसरा । जाला जो आमुतें ॥**
**तो हा तूं घेऊनि आघवा । कळीं गिळितयां जीवां ।**
**सर्वं प्रकारी धांवा । करीं पा वेगीं ॥**

—ही च विचार प्रचाराची प्रेरणा आचार्यांपाशीं स्वतःसिद्धपणें होती. ब्रह्मविचाराच्या आकलनाची भव्य मनोभूमिका, ब्रह्मविचार पचवणारी आचाराची तीव्र तयारी, ब्रह्मविचाराच्या प्रचाराची तेजस्वी वाणी आचार्यांपाशीं होती. ती प्राप्त करून या त्रिविध साधनानें

**आतां आमोद सुनास आले । श्रुतीसी श्रवण रिघाले ।**
**आरसे उठिले । लोचनेसी ॥**
**आपुलेनि समीरपणें । वेल्हावती विंझणे ।**
**कीं माथे चि चापेपणें । बहकताती ॥**
**जिव्हा लोधली रसें । कमळ सूर्यपणें विकासे ।**
**चकोरें चि जैसे । चंद्रमा झाली ॥**
**फुलें चि झालीं भ्रमर । तरूणी चि झाली नर ।**
**झालें आपुलें शेजार । निद्राळू चि ॥**
**चूताकुंद झाले कोकिळ । आंग तलपे मलयानिल ।**
**रस झाले सकळ । रसनावंत ॥**

असा सर्वत्र अद्वयानंदवैभवाचा लाभ गीताईप्रचाराच्या निमित्तानें व्हावा ही च आचार्यांच्या गीताईच्या विचारप्रचारासंबंधीं अपेक्षित भूमिका होती.

●●●

अनुक्रमणिका

## प्रकरण ५४ वें

## परंधाम—पवनार—आश्रम

**जें आर्तांसि कारणें । संसारश्रमाचें विसकुणें ।**
**तें श्रीऋद्धिपूर देखिलें तेणें । दुरौनियां ॥**
**रोगिया अमृतपानु । लाहे तान्हैला जीवनु ।**
**स्वामि झालेया प्रसन्नु । जैसे सेवकां होए ॥**
**सासुरवासें शीणली । तिथे भेटे जेवि माऊली ।**
**असो हे तैसी परी झालो । श्री ऋद्धिपूर देखिलेआं ॥**
**धांडोळितां तीन्ही लोकां । मी उपमा न देखे आणिका ।**
**जे जाले जगदेकनायका । क्रीडास्थान ॥**
**तें हें कैवल्यबीजाचें क्षेत्र । कीं निवृत्तांचें परत्र ।**
**कीं परसुखाचें छत्र । मांडिलें आर्तांसि ॥**
**कीं धर्माची उत्तरवेठ । कीं सिद्धीची ऊळगवट ।**
**ना तो संसृतीसि ताठ । वज्रलेप ॥**
**श्रुतिस्मृतीचेनि अर्थे : । स्वधर्मे अनुष्ठाते ।**
**जेथें सदाचार नांदते । ब्रह्मविद ॥**

**परंधाम** पवनार आश्रमाचें दर्शन घेतल्याबरोबर ह्या ओव्या डोळ्यांपुढें उभ्या राहतात. या पवित्र स्थानाचें याहून अन्य वर्णन काय करणार! पवित्र धाम नदीच्या कांठावर उच्च स्थानीं भव्य चंद्रशाला असलेलें तें विशाल शांत आणि गैरिक रंगानें झळकणारें स्थान पाहिलें म्हणजे प्रेक्षक थक्क होऊन जातो! येथें बहिरंगांचा अंतरंगाशीं बेमालूम मेळ पडलेला दिसून येतो! संन्यासी महापुरुषाच्या निवासस्थानार्थ च निर्मिलेंलें हें स्थान असावें ही खूण तेव्हां च पटतें. प्रेक्षक धाम नदीच्या पुलावरून वर्धा-नागपूर रोडनें आल्याबरोबर समोर च रस्त्यावर महादेवाचें पांढरें शुभ्र मंदिर त्याला दिसतें. त्या मंदिराजवळच्या रस्त्यानें धाम नदीच्या कांठाकांठानें थोडें अंतर गाडीरस्त्यानें त्याला चालून जावें लागतें. धाम नदीच्या कांठावरचें काळे कभिन्न खडकाचे इतस्ततः पडलेले भाग नदीच्या भव्यतेंत भर घालतात. पावसाळ्यांत या खडकांमुळें च नदी फेसाळून केवळ दुधाची च बनून प्रेक्षकापुढें प्रश्न उभा राहतो.

**नाहे पवित्र करुणा सरितामिषें कुणाची?**
**कल्लोल लोक गाती गाणीं जिच्या गुणाचीं ॥**

प्रेक्षक पुढें जाऊं लागतो तो उजव्या बाजूला लहानशी टेकडी चढावी लागते. ही टेकडी चढल्याबरोबर समोर च पहिल्याप्रथम एक लहानशी कौलारू झोपडी दिसते. हिच्यामध्यें पूर्वी रसोडा असे. आतां जवळ गेल्याबरोबर "भरतमंदिर" ही पाटी दिसते. आंत डोकावल्याबरोबर पहिल्या प्रथम भरतभेटीचें तें भव्य पुरातन चित्र हजारों वर्षांपूर्वीच्या मूर्तिकारानें एका अभंग दगडांत खोदलेंलें दिसतें. फार वर्षे झाल्यामुळें चेहरे अस्पष्ट झाले तरी मूर्ति रामलक्ष्मणभरतसीतामारुती अशी सर्वच्या सर्व शाबूत. आचार्यांनीं तो भगवत्प्रसाद मानला. म्हणून त्यांनी ती तेथें स्थापली आणि तिचें मंदिर तयार करविलें. या टेकडीवरच्या

जागेंत च पाया खोदतां खोदतां ती सांपडली. येथें आणखी अशा च किती तरी मूर्ति फुटलेल्या तुटलेल्या स्थितींत मिळाल्या. या बाजूला शेतांत दगडाचे पाय च केवळ पडलेले आहेत, कोठें एखादें तोंड च हंसतें आहे, कोठें अभय देणारा एखादा हात च दिसतो आहे, अशा न ओळखूं येणाऱ्या येथल्या अनेक मूर्ति या स्थानाचें पूर्वकालीन महत्त्व सहज च सुचवून प्रेक्षकाला अज्ञात काळांत ओढून नेतात. येथें निःसंशय पूर्वी एखादें भव्य कलामय मंदिर असलें पाहिजे. धाम नदीच्या दगडांमधून च त्या मंदिराच्या मूर्ति आणि मंदिराचें मुख्य दगडी काम बनविलें गेलें असलें पाहिजे. समोर धाम नदी आणि जरा उंचावर हें कलामय देवाचें आसनमंदिर. गांवाला म्हटलें तर जवळ म्हटलें तर गांवापासून अलिप्त असें स्थान पूर्वीच्या त्या उपासकांनी खरोखरच योग्य प्रकारें निवडलें असें च म्हणावें लागते. अज्ञात काळांतल्या त्या साधकांनीं ज्याप्रमाणें हें स्थान उपासनामंदिर म्हणून योग्य निवडलें. या परंधाम आश्रमाला हि हें योग्य स्थान निवडलें गेलें असें कोण म्हणणार नाहीं? कारण

**जो संतीं वसविला ठावो । संतोषासि सावावो ।**
**मना होय उत्सावो । धैर्याचा ॥**
**अभ्यास चि आपणयातें करी । हृदयातें अनुभव वरी ।**
**ऐसी रम्यपणाची थोरी । अखंड जेथ ॥**

अशी स्थिति येथें आढळून येते. धाम नदीच्या परतीरावर असल्यानें या स्थानाला परंधाम हें नांव आचार्यांनीं दिलें. परंतु तें ऐकल्याबरोबर

**यद्गत्वा न निवर्तंते तद्धाम परमं मम ।**

हा चरण आपोआप च डोळ्यांपुढें उभा राहतो आणि त्याचा येथें अनुभव हि येतो.

**स्वभावें वाटे येतां । जरी वरपडा जाहला अवचिता ।**
**तरी सकामुही तरी माघोता । निघों विसरे ॥**

हा अनुभव आचार्यांच्या पवित्र सान्निध्यानें येथें कैक लोकांना आला आहे. त्यामुळें च शेंकडों लोकांचीं पत्रें आचार्यांकडे येत कीं आम्हांला निदान आठ दिवस तरी येथें राहूं द्यावें. असो, त्या भरतराममंदिरांतल्या मूर्तीसमोर प्रेक्षक गंभीरपणें एकटा च आंत जाऊन उभा राहतो, तेथें त्याला जणूं त्या दगडांतली ती मूर्ति म्हणजे आपल्या मानसमूर्तीची प्रतिमा च वाटूं लागते! आचार्य येथें विष्णुसहस्रनाम म्हणत, अनेक स्तोत्रें गात, वेदांतले पवित्र मंत्र म्हणत. भरतभेटीचें हें दृश्य किती मनोरम आणि मर्यादायुक्त! कित्येक चित्रांत राम आणि भरताच्या गाढ आलिंगनाचा देखावा दाखविलेला असतो. तो दिसण्याला फारसा उत्तम दिसत नाहीं. गाढ आलिंगन हा एक आवेश आहे. तो स्थायीभाव नाहीं. या मूर्तींत रामचंद्रानें भरताचा हात आपल्या हातांत घेतला आहे. रामालगत सीता उभी आहे. लक्ष्मण बेफिकीरपणें दुसरी च कडे पहात असून सीतेमागें हनुमंत लपल्यासारखा दिसत आहे. असा हा भरतभेटीचा पुतळा भरतभेटीचें खरें दृश्य पुढें उभा करतो. पवित्र, पूज्य, प्रिय व्यक्तीची भेट ही आवेशयुक्त असूं शकत नाहीं. तेथें गांभीर्य, मूक भाव, पूज्यता! तोंडानें केवळ तांत्रिक गोष्टी बोलल्या तरी मनानें च अधिक बोलणें, सान्निध्याच्या सहवासाचा मिश्र आनंद! —त्या भेटीचें रस्हय कसें उलगडणार? पण या मूर्तीमध्यें जणूं तें रहस्य उलगडून पुढें मांडलेलें आहे. ही च खरोखर कलाकाराची आध्यात्मिक कला होय. अति प्रकाश नाहीं, अति अंधार नाहीं, झरोक्यांनीं युक्त अशा

त्या भरतराम मंदिरातल्या झोपडींत ही काळ्या पाषाणाची मूर्ति साधकाच्या मनांत भक्तीची परमोच्च भावना निर्माण करून आपल्याप्रमाणें च साधकाला निस्तब्ध करून टाकते.

**सिय राम प्रेम पियूष पूरन होत जनमु न भरत को ।**
**मुनि मन अगम जम नियम सम दम विषम व्रत आचरत को ।**
**दुख दाह दारिद दंभ दूषन सुजस मिष अपहरत को ।**
**कलिकाल तुलसी से सठन्हि हठि राम सनमुख करत को ।**

—तुलसीदासजींनीं भरताला च जवळ जवळ रामायणाचा नायक केला आहे. रामायणांतला हा रामभरताचा मीलनप्रसंग खरोखर एक फार मोठा अद्भुत प्रसंग आहे. या पवित्र आश्रमांत पहिल्या प्रथम च हें दृश्य पाहून सर्व रामायणांतला हा कलशप्रसंग च येथें पाहिला असें वाटतें! यापुढचें रामायण फिकें वाटतें. रामभरताची भेट झालीं येथें च खरें रामायण संपले. येथें सात्त्विक सुखाची परमसीमा गांठली गेली. रामभरताप्रमाणें अनेक साधकांच्या भेटीगांठी होत राहाव्या आणि सत्संगानें पावन होऊन प्रत्येकानें आपलें जीवनपाथेय बांधून घ्यावें हा च या परंधामस्थानाचा हेतु.

भरतराममंदिरांतून कांही वेळ थांबून, त्या गंभीर दृश्यानें पावन होऊन तेथें त्या मूर्तीला प्रदक्षिणा घालून सर्व बाजूनें पुनःपुन्हा न्याहाळून प्रेक्षक मंदिराबाहेर आल्याबरोबर आपण एकदम उच्च वातावरणात आलों याचा प्रेक्षकाला अनुभव येतो. भरतराममंदिरांतून चार पावलें पुढें गेल्याबरोबर आणखी एका चौथऱ्यावर प्रेक्षक चढतो. चढतांना समोर च आणखी एक मूर्ति आणि त्या मूर्तीसाठी बनवलेंलें उघडें मंदिर दिसतें. मूर्तीमध्यें

**मल्लवेष धरिला अभिराम । श्रीधर प्रभुसवें बळराम ॥**

असा भाव दिसतो. लंगोट घालून कोणाचें तरी मर्दन केलेली ती मूर्ति आणि तिच्याजवळ असलेले ते गोपगण म्हणावे कां आणखी कांहीं कल्पना तेथें आहें हें सांगता येत नाहीं. कित्येक मंडळी या प्रश्नाची भवति न भवति करीत पुष्कळ वेळ उभी असतांना दिसत. कांहीं हि असो. विश्वरूप राक्षसाचें दमन करणारी ही मल्लमूर्ति ईश्वराची च एवढें मात्र नक्की.

चौथऱ्यावर जाऊन त्या गैरिक रंगाच्या इमारतींत प्रवेश करण्यापूर्वी प्रेक्षक आणखी धाम नदीच्या बाजूने नजर टाकतों. तो पाण्याचें केवढें मोठें तरी धरण त्याला दिसतें. त्या धरणांतून धो धो धो धो वाहणाऱ्या, फेसाळलेल्या पाण्याच्या धारा पहांत च उभें रहावें असें वाटतें. आपल्या शुभ्र प्रवाहांनी, आपल्या फेसाळलेल्या तरंगांनी, मनावरचें तरंग नष्ट करून नदी मनुष्याला उन्मन करीत असते. त्या धरणामध्यें अडविलेंलें पाणी म्हणजे एक मोठा आरसा च वाटतो. आकाशाची कमान त्यांत नेहमीं शाबूत उमटलेली दिसते. तीरावरचे वृक्ष या आरशांत निजरूप पहात उभे!

**पानी में देखती है झुकझुकके गुलकी टहनी ।**

खरोखर निर्मळ जीवन हा आत्मरूप पाहण्याचा आरसा च म्हटला पाहिजे! पावसाळ्यांत तर या स्थानाची शोभा अवर्णनीय होऊन जाते. हें दृश्य पहात थोड्या वेळानें मुख्य इमारतींत शिरण्यासाठीं प्रेक्षक पुढें जातो.

अनुक्रमणिका

प्रथम मोठ्या व्हरांड्यांतून त्याला आंत जावें लागतें. प्रेक्षक मुख्य इमारतींत आंत गेल्याबरोबर भव्य असा एक च एक हॉल, भव्य खिडक्या आणि दारें, वर हवेसाठीं बसविलेल्या जाळ्या त्याला दिसतात. मनाचा येथें एकदम विकास झाल्याचा भास होतो. या इमारतीला एका बाजूला एक मोठें तळघर केलेंलें आहे. ध्यानमंदिर हें त्याचें नांव. त्या तळघराला पाहून मनाला मोठा आनंद होतो. या मोठ्या हॉलला एका बाजूला लाकडाचें एक पार्टिशन केलेंलें आहें. या पार्टिशनजवळ च प्रेक्षकाला आचार्यांची बैठक दिसते. आचार्यांची बैठक म्हणजे समोर एक मोठें रुंद टेबल. बसण्यासाठीं जाजमवजा दुहेरी जाड सुताचें शुभ्र कापड. बाजूला पुस्तकें ठेवण्याची शेल्फ. मागें टेकण्यासाठीं एक उंच फळी. टेबलासमोर भेटण्याला येणाऱ्या मंडळींसाठीं बैठकीच्या लांब च लांब निळ्या रंगाच्या पट्ट्या. टेबलावर कागद उडून जाऊं नयेत म्हणून पांढरे शुभ्र गारेचे मोठ मोठे दगड ठेवलेले. दऊत शाई, स्लेटपाटी, पाटीची पेन्सिल होल्डरमध्यें बसवलेली. ज्ञानेश्वरी, उपनिषदें, योगशास्त्र, गीता, गीताई, कुराण, ग्रंथसाहेब,—सर्वच्या सर्व टेबलावरची पुस्तकें अतिशय वरच्या दर्जाची! प्रेक्षक ही बैठक पाहून गद्‌गद होऊन जातो. येथून खिडक्यांमधून पवनारच्या टेकडीचा भाग स्पष्ट दृग्गोचर होतो. तेथली पांढरी मशीद तर एकदम डोळ्यांत भरते. अशा या स्थानीं त्या बैठकीवर आचार्यांची ताठ बसलेली मूर्ति जेंव्हां प्रेक्षक पाहतो तेव्हां

## गुहाहितं गुह्वरेष्ठं पुराणम्

अशा धगधगीत अग्नीची च ती प्रतिमा घडलेली आहे काय असें वाटून त्याचें मन तेथें च निश्चल होऊन जातें. प्रेक्षकाची दृष्टि आतां अन्यत्र वळणें शक्य नाहीं. त्यांत पुन्हां जर आचार्य कांहीं सांगत असले तर त्या अमृतप्राशनापलीकडे सृष्टी च नाही अशी प्रेक्षकाची दशा व्हावयाची. तथापि आचार्यांच्या या पवित्र आश्रमांतली प्रत्येकं वस्तु हीहि बोधाची च मूकमूर्ति असल्यामुळें प्रेक्षक आचार्यांसमोरून उठून मुद्दाम इकडे तिकडे पाहूं लागतो. तो इमारतीच्या चारी बाजूला फिरतो. त्याला सर्वत्र विस्मयावह देखावा दिसतो. आश्रमाचें कंपौंड त्याच्या पूर्णपणें दृष्टिपथांत येतें. ती बाजूची विहीर, तेथें मोटेची सोय, गोलाकार विहिरीभोवतीं फरशीं, जवळ च लिंबाचीं झाडें, समोर आल्यागेल्या लोकांसाठी राहण्याच्या, उत्तम व्हरांडा असलेल्या खोल्या, दोन्ही बाजूला विणकाम, सुतारकाम, तकल्या इत्यादि बनविण्याची लोकसेवेच्या आयोगाची स्थानें. एका बाजूला स्वयंपाकगृह असा देखावा पाहून प्रेक्षक आपल्या डोळ्यांना धन्य मानूं लागतो. मुख्य इमारतीचा जिना चढून तो गच्चीवर जातो. मुख्य इमारतीला वर सर्वत्र मोठी लांबरुंद गच्ची आहे. या गच्चीवर हि एक आणखी लहानशी जिना नेऊन केलेली गच्ची आहे. हें येथलें सर्वांत उंच स्थान. येथून प्रेक्षकाची नजर अगदीं दूरपर्यंत पोंचते—ती हनुमानटेकडी, ती नागटेकडी, तें दूर टेकडीवर वसलेंलें महाकाळ गांव, तो सेलू घोराडचा रस्ता, तें जवळचें पवनार गांव, चारी बाजूला त्याला ही देवाची दुनिया दिसूं लागते. अशांत त्याला पवनारचा एखादा मनुष्य गच्चीवर भेटला तर तो त्या जवळच्या पवनार गांवचा इतिहास हि सांगतो. आणि प्रेक्षकाला तो अनायासें ऐकायला मिळतो. पवनार गांव फार जुना आहे. येथें एक वेळ पवन राजाची राजधानी होती. येथें सध्यां जरी २/३ हजारच वस्ती असली तरी पूर्वीं हे गांव फार मोठें होतें. या गांवाला मोठा कोट होता. येथें अजून हि कोटाचे दरवाजे दिसतात. मुसलमानांच्या आमदानींत हि हें मोठें स्थान होतें. ऐन अकबरींत यांचां उल्लेख आहें. येथें दोन दोन मैल पांढरीची जमीन आहे. जिकडे तिकडे चौफेर पडक्या स्थानांचे चबुत्रे दिसतात. येथें मातीच्या ढिगाऱ्यांतून अजून हि त्या वैभवशाली लोकांचे सोनें नाणीं वगैरे वस्तु सांपडतात. हें ऐकतां ऐकतां प्रेक्षक मनांत म्हणूं लागतो योगायोगानें पवनार गांवानें अनेक उलाढाली पाहिल्या आणि येथें महापुरुषांची वस्ती हि झाली. आणखी काय पाहिजे? इतिहास म्हणजे अनेक उलाढाली आणि इतिहासाचें सार म्हणजे सत्पुरुष असा अर्थ केल्यास न सांगता हि येथें सारासकट सर्व इतिहास भरून राहिलेला प्रेक्षकाला आढळतो.

अनुक्रमणिका

तरी येथें हा परंधाम आश्रम झाला कसा? आचार्य येथें आले कसे? वगैरें प्रश्न प्रेक्षकांपुढें उभे राहतांत च. त्या प्रश्नांची उत्तरें मिळाल्याखेरींजचा इतिहास त्याला फिकां वाटतो. त्या प्रश्नांची उत्तरें मिळावीं म्हणून तो नम्रपणें तेथें असलेल्या कोटींबाबाजींसारख्या वृध्द आश्रमवासीयाला प्रश्न विचारतो. आणि मग त्याला याचा सर्व उलगडा होतो.

प्रेक्षक—बाबाजी येथें आश्रम कसा काय झाला? आपण थोडी माहिती द्याल का?

कोटीजी—ही जागा मूळ जमनालालजींच्यासाठी तयार करविली गेलीं. कामाच्या व्यापामुळें वर्ध्याला जमनालालजींना मुळीं च विश्रांती मिळत नसे. तेव्हां मधून मधून विश्रांतीसाठी येथें रहावें या हेतूनें ही जागा तयार झाली. पहिल्याप्रथम हल्ली आहे यापेक्षा हि फार मोठी जागा बांधण्याची सुरवात केली. परंतु एका वादळांत त्या भिंती पडल्या. म्हणून मग तेवढा भाग सोडून ही हल्लींची जागा बांधली. त्या पडलेल्या भागाचा चौथरा मुख्य इमारतीसमोर आहे.

प्रेक्षक—मग जमनालालजी येथें येऊन रहात असत कां?

कोटीजी—होय. मधून मधून रहात असत. त्यांचा कोणी तरी एखादा नोकर बरोबर असे. बहुतेक दूध आणि फळांवर ते रहात. नोकर स्नान, मालिश, बिछाना, आहार इ. सर्व व्यवस्था ठेवी. आणि सेठजी केवळ लंगोटी नेसून हातांत दंड घेऊन या आश्रमाच्या आवारांत हिंडत. त्या वेळी त्यांची उंच भव्य मूर्ति पाहून हे कोणी सेठ आहेत असें कोणास हि वाटणें शक्य नसे. जमनालालजींप्रमाणें मग त्यांच्या दुकानावरची मंडळीं, महिलाश्रमाची मंडळी, असे कोणी ना कोणी येथे येऊन राही. चार दिवस विश्रांति घेऊन मग जावयाचे असें हें विश्रामस्थान झालें. कोणी कोणी बरोबर शिदोरी बांधून आणीत. नदींत स्नान करून, फराळ करून संध्याकाळी मग रमतगमत वर्ध्याला परत जावयाचे असें अजून हि चालतें.

प्रेक्षक—आचार्य येथें केव्हां आले?

कोटीजी—नालवाडीच्या धुळीमुळें, १६/१६ लटी कांतण्याच्या परिश्रमामुळें, दूध सोडून देण्याचा प्रयोग केल्यामुळें, एकसारखें चिंतनमनन, ग्रामसेवा मंडळादि संस्थांचे अनेक प्रश्न, बाहेरच्या मंडळींचे अनेक प्रश्न या सर्वांमुळें आचार्य एकसारखे कृश होत गेले. त्यांत पुन्हां फैजपूर कॉंग्रेसमध्ये ताप आला आणि ताण हि पडला, त्यामुळें आचार्यांच्या प्रकृतीचा जमनालालजी आणि बापूंच्या पुढें एक प्रश्न उभा राहिला. बापूजी म्हणूं लागले कीं अल्मोड्याला जावें. आचार्यांना ही कल्पना रुचली नाहीं. कित्येकांना वाटे आचार्यांचे दांत खराब झाले आहेत. पायोरिया आहे. त्यामुळें प्रकृति बिघडली असावी. आचार्यांनी जमनालालजींना कळविले कीं मी माझा प्रयोग करतों तो सफल नाहीं झाला तर मग तुमच्या कल्पनेंप्रमाणें करू असें म्हणून आचार्य या पवनारच्या स्थानीं प्रकृतीसाठीं आले. त्यांत प्रकृतीबरोबर कामाचा विचार, गरीब लोक कोठें अल्मोड्याला जाऊं शकतात असा विचार, अनेक तऱ्हेचे विचार होते.

प्रेक्षक—बाबाजी, आपण केव्हां आलांत या ठिकाणीं?

कोटीजी—मी पवनारला आल्याला १२ वर्षें होऊन गेलीं. आचार्यांचा हि पवनारचा फार जुना संबंध आहे. गणपतराव बोकडे आणि त्यांच्या भाविक पत्नी विठाबाई यांची आचार्यांवर फार भक्ति. वर्ध्याला

आश्रम स्थापून झाल्यापासून गणपतरावांचा आश्रमाशीं संबंध आला. गणपतराव हे शेतकरी, मेहनती, प्रयोगी. ते दरवर्षी आश्रमाच्या सुरवातीपासून आपल्या शेतींतलें धान्य पोतें दीडपोतें आश्रमाला अर्पण करीत. मधून मधून येऊन जिज्ञासेनें चर्चा करीत. या गणपतरावांच्याकडे आश्रमाची मंडळी पूर्वी राहिलेली आहेत. त्यांच्या घरीं जणूं आश्रमाचें एक लहानसें स्थान च झालेंलें होतें. मी हि हें स्थान होण्यापूर्वी गांवांत गणपतरावांकडे रहात असें. आचार्य हि राहिलेले आहेत. गांवांत आश्रमातर्फे परिश्रमालय काढलेंलें आहे. तेथें हि मी असें. हें स्थान झाल्यावर येथें राहूं लागलों.

अशा संवादांतून प्रेक्षकाला येथली सर्व कल्पना सहज च मिळून जाते.

आचार्य येथें राहूं लागल्यानंतर, जमनालालजी वारल्यानंतर, हें स्थान ग्रामसेवामंडळ या संस्थेला जमनालालजींनीं देऊन टाकलें. अशा रीतीनें ही आश्रमाची जागा तयार झाली. शेतीसाठीं नदीकाठीं जवळ च एक शेत हि घेतलें गेलें. आचार्य येथें रहावयास आले तेंव्हा त्यांची प्रकृति अगदीं क्षीण झालेली होती. खोकला नेहमीं च असे. येथें गाढ एकांत. त्या वेळीं क्वचित् च कोणी तेथें जात असे. आचार्यांना या ठिकाणीं भरपूर एकांत, विश्रांति आणि शांति मिळाली. सर्व विषय डोक्यांतून काढून टाकून आचार्यांनीं पुष्कळशी झोप घेण्यास सुरवात केली. सबंध मुगाच्या डाळीची खिचडी, तूप, दूध, दही असा आहार सुरू केला. दोन वेळां स्नान. सूर्यकिरणांमध्यें दोन दोन तास आचार्य समाधिस्थ बसत. येथल्या गच्चीवर आणि आजूबाजूच्या जागेंत केव्हां हि मन लागेल तसे फिरावें, बाहेर हि सुरगांवच्या रस्त्याला, नागटेकडीकडे, सेवाग्रामच्या रस्त्यावर, महारोगी सेवा मंडळाकडे आचार्यांनीं फिरण्यास जावें. दोन वेळच्या प्रार्थना, मधून मधून ग्रंथावलोकन, वर्तमानपत्रें चाळणें—अशा कार्यक्रमांत आचार्यांची प्रकृति हळूं हळूं सुधरूं लागली. वजन ९३ पौंडावर गेलें होतें तें १२८ पर्यंत झालें. देहावर सूर्यतेज चमकूं लागलें. स्नायु परिपुष्ट झाले. सर्व लोकांना मोठा चमत्कार वाटला.

येथून तीन मैलांवर सुरगांव. तेथें ग्रामसेवेचा प्रयोग चालला होता, तेथें वल्लभभाई होते, तेथल्या मंडळींना; महारोगी सेवा मंडळ येथून ३ मैल येई. तेथें मनोहरजी मुख्य कार्यकर्ते होते, तेथल्या मंडळींना, सेवाग्राम येथून तीन साडेतीन मैल येईल; तेथें बापूजींच्या आसपासच्या लोकांचा—अनेक संस्थांचा मेळावा—तेथल्या हि मंडळींना—हें स्थान मध्यवर्ती होतें, रोज कोणी ना कोणी कार्यकर्ते प्रत्येक ठिकाणाहून येथें आचार्यांकडे यावयाचे च. नागपूरहून हि मोटारीनें कोणी कोणी येत. वर्ध्याहून जमनालालजींची मंडळी मोटारीनें कधीं कधीं येत आणि एखादा दिवस राहून जात. कित्येकांचे आचार्यांकडे येण्याचे वार च ठरल्यासारखे झाले होते. हे कोण?—तर वल्लभभाई, ८ दिवसांनीं येथें येण्याचा त्यांचा नेम च. हे कोण?—तर शिवरामपंत बाबाजी, पंधरा दिवसांनीं यांची फेरी व्हावयाची च. हे कोण?—तर हे पंढरिनाथ यांचा हि येथें येण्याचा एक दिवसाआड क्रम ठरलेला. हे कोण?—तर आशादेवी, आर्यनायकम् आणि शांताबाई नारगोळकर—तालिमीसंघाच्या कार्यासंबंधीं चर्चा करण्यासाठीं आले आहेत. हे कोण?—हे कृष्णचंद्रजी. बरोबर चार मंडळी घेऊन सेवाग्राम आश्रमांतून हे सायंकाळीं, शुक्रवारीं यावयाचें. दोन्ही वेळच्या प्रार्थना करून आचार्यांसमेत गोष्टि करून परत जावयाचे. हे कोण?—तर मनोहरजी. महारोगी सेवा मंडळांतील कांहीं प्रश्नांची चर्चा करीत आहेत. हे भाऊ पानसे आणि कुंदर दिवाण रोज नालवाडीहून सायंकाळीं येथें येतात, आचार्यांबरोबर थोडे बोलतात, येथल्या पवित्र वातावरणांत निजतात, सकाळीं उठून जातात. हे कोण?—हे मेथे मास्तर—हे हि सरंजाम कार्यालयांतून रोज रात्रीं पायीं येतात आणि सकाळीं उठून प्रार्थना करून जातात. ह्या मुली कोण?—ह्या महिलाश्रमाच्या मुली. या शेजारच्या गांवांत ग्रामसफाई करून आल्या आहेत. येथें नदीवर स्नानजेवण करतील. आचार्यांकडे त्यांचा एखादा गमतीदार वर्ग होईल आणि

मग त्या पायीं ५/६ मैल परत महिलाश्रमांत जातील. हे विद्यार्थी कोण?—हे आसामहून आले आहेत. आचार्यांकडून कांहीं बोध मिळेल म्हणून त्यांच्यासमोर हॉलमध्यें बसले आहेत. आचार्य त्यांना कांहीं तरी सांगत आहेत. बाहेरून मधून मधून विद्यार्थ्यांच्या हंसण्याचा आवाज ऐकूं येत आहे. विद्यार्थी खूष होऊन बाहेर पडत आहेत. हे कोण? तर हे चर्खासंघाचे लोक आहेत. यांच्याशीं खादीशास्त्रासंबंधीं चर्चा चालू आहे. त्यांत कृष्णदास गांधी प्रमुखपणें दिसत आहेत—असा देखावा येथें सदासर्वदा दिसून येई. नेहमीं रेंग्या, गाड्या, सायकली, मोटारी उभ्या. पादचारी लोकांची वर्दळ तर सतत चालू असावयाची. यात्रेच्या ठिकाणीं ज्याप्रमाणें कोणी ना कोणी यावयाचे च, त्याप्रमाणे येथें आचार्यांकडे कोणी ना कोणी येत च असत. भाविक, खेडवळ आणि बायाबापड्या डोकें टेकून नमस्कार करीत. कॉंग्रेसचे लोक हि कांहीं भानगड उपस्थित झाली म्हणजे येथें यावयाचे. त्याशिवाय धाम नदीच्या पंचधारेवर निरनिराळ्या पर्वांना हजारों श्रद्धाळू लोक स्नानादिंसाठीं येत आणि जातांना आचार्यांचें दर्शन करून जात. त्या लोकांना प्रश्नादि विचारण्याचा प्रश्न नसे. पवित्र स्थानीं यावें, सत्पुरुषदर्शन घ्यावें आणि कृतार्थतेनें जावें हा च त्यांचा कार्यक्रम. आश्रमीय वातावरणांत लग्न केलेले वधूवर हि कित्येक वेळां नमस्कारार्थ येत.

आचार्यांनीं या स्थळीं विश्रांति घेतली. अनेक कार्यकर्ते वर्ध्याहून, सुरगांवहून, नालवाडीहून, सेवाग्रामहून येथें विश्रांति आणि ज्ञानबोधासाठीं येत, त्यामुळें आचार्यांनीं या स्थानाला एक वेळ “दासविश्रामधाम” असें मधुर नांव दिलें होतें. कार्यकर्त्या थोर पुरुषाच्या विश्रांतींत—आरोग्यसाधनेंत हि लोकसंग्रह सहज च होत असतो. कारण कोणत्या हि अवस्थेंत त्याची साधना च लोकसंग्रह करीत असते. आचार्यांच्या रोजच्या दिनचर्येंत च असा लोकसंग्रह सहज गुंफला जाई. आचार्य दररोज सकाळीं ३॥ वाजतां उठत. नंतर ४ ला गच्चीवर अगर मुख्य इमारतीसमोरच्या जागेंत नदीशेजारीं प्रार्थना होई. प्रार्थनेनंतर आचार्य अभ्यास करीत. त्या वेळीं हि कोणी समोर बसून रहात. या वेळीं आचार्यांनीं मूळ अरबी भाषेंतून मोठ्या कसोशीनें कुराणाचा अभ्यास केला. एखाद्या हाफिज मौलवीला हि म्हणतां येणार नाहीं अशा मधुर, उच्च आणि बिनचुक स्वरांत पहांटेच्या वेळीं आचार्य कुराणाचें पठन करीत. तो आवाज इमारतींत घुमत राही. त्या शांत वेळीं थेट नागपूर रोडपर्यंत तो आवाज येणाऱ्याजाणाऱ्यांना ऐकूं येई. कुराणाच्या अभ्यासाच्या निमित्तानें आचार्यांनीं जवळच्या मुसलमानांशीं संबंध जोडला. त्या लोकांना आचार्यांविषयीं फार आदर वाटे. कुराणपठनानंतर सूर्योदय पाहून त्याप्रमाणें आचार्य घड्याळ लावीत. सूर्योदय पाहण्यांत केवढा बोध. सूर्याला च भगवंतांनीं प्रथम योग सांगितला. योग म्हणजे—ईश्वराशीं—सृष्टीशीं जनतेशीं जोडणें. जोडलेला तो योगी. योगाचें खरें शिक्षण संतांजवळ मिळतें. पण असे संत सर्वत्र नसतात. म्हणून गीतेंत योगासाठीं सूर्याचें उदाहरण. सूर्य योगी कसा?

१) रोज सेवेला हजर.
२) सेवेला हजर पण नम्र. दाराला धक्के देत नाहीं.
३) मंगल किरण टाकून आनंदांचें वातावरण पसरवितो.
४) घाण साफ करून स्वतः अलिप्त राहतो.
५) अलिप्त राहतो कारण स्वतः उंच राहतो.
६) इतकी सेवा करून पुन्हां सेवेचें भान नाहीं.

७) सेवेची जाणीव करून दिली तरी जाणीव उत्पन्न होऊं च शकणार नाहीं इतकी त्याची सहज सेवा.

अनुक्रमणिका

८) त्याला अमंगलता माहीत च नाहीं. अंधार, थंडी, घाण यांची ओळख हि नाहीं.

—अशा सूर्यानें मनूला सांगितलेला योग प्रत्येक मानवाला मिळेल. जो घेईल त्याला मिळेल. आचार्यांचें सूर्य पाहून घड्याळ लावणें ही एक साधी बाब परंतु त्यांत केवढा बोध! केवढें योगग्रहण! केवढा लोकसंग्रह! यानंतर अल्पाहार केल्यानंतर बहुधा ४/५ मैल फिरण्याला जात. फिरणें अति जोरानें असावयाचें. फिरतांना अनेक जण बरोबर असत. त्यांना आयता लाभ होई. फिरून आल्यावर स्नान करून आचार्य वर्तमानपत्रें चाळीत. नंतर ग्रंथवाचन, पत्रलेखन, मुलाखती १०॥—१०॥। ला आहार घेऊन अर्धा तास विश्रांति. नंतर पुन्हां पत्रव्यवहार, मुलाखती, सूत कांतणे, आश्रमांतल्या विणकामांत, सुतारी कामांत, रसोड्यांत, निरनिराळ्या ठिकाणीं अवलोकन, त्या त्या ठिकाणीं सूचना देणें असें संध्याकाळपर्यंत चालें. संध्याकाळीं ५/६ मैल फिरणें असे च. प्रार्थनेपूर्वी आहार घेतेवेळीं निजण्याच्या पाटावर आचार्य बसलेले असत. या वेळीं पवनारची आजूबाजूची लहानापासून थोरापर्यंत कोणी हि मंडळी येऊन भोवतीं बसत. तेथें आचार्यांच्या वार्तालापांत बोध, शांति आणि विश्रांति यांचा सर्वांना रोज लाभ मिळे. हा पहा एक प्रसंग. प्रेक्षकाची ही डायरी च आहे. ती च येथें उतरली आहे.

दिनांक २० नोव्हेंबर १९४५.

श्री. रामदासभाई यांच्या गोशाळेच्या रेंगीत बसून पवनारला यावयास निघालों. सायंकाळ. सूर्यबिंब लाल प्रकाश टाकीत झाडांतून अस्ताला जातांना पाहिलें. सृष्टि सर्व करुण. एकदम भावांतर झालें. अर्ध्या रस्त्यांत गेलों तों प्रतिपच्चंद्र उगवला. एक च कला कमी. जीवजगतावर रुपेरी प्रकाश टाकीत तो वर आला. आजूबाजूचीं शेतें हिरवी पण पांढरी आणि टवटवीत दिसत होती. पवनारनदीचा पूल आला. खळखळ आवाज. लाल बंगल्यावर सामान उतरून खोलींत नेलें. पूज्य विनोबा हॉलमध्यें दक्षिणाभिमुख बसले होते. तेलगू गृहस्थ अप्पाराव त्यांच्यासमोर बसलेले होते. पूज्य विनोबांचें द्रविड भाषांचें वाचन चाललें होतें. विनोबा तामीळ किती उत्तम वाचतात.—मदुरैप्पटणत्तिल नरकीर न् एन्ड्रु ओरुवन इरुंदाळ... अस्पष्ट ध्वनि. माझ्या खोलीची व्यवस्था लावून मी पूज्य विनोबांसमोर बाजुला बसलों. पवनारची बरी च मंडळी, आश्रमाचे कोटीजी वगैरे सर्व प्रार्थनेसाठीं येऊन बसले होते. संवाद चालू होता. (एक शिक्षक शेजारच्या पवनार गांवीं रात्रीं लोकांना वर्तमानपत्रें वाचून दाखवितात त्यांना उद्देशून).

विनोबा.—"वर्तमानपत्र वाचून दाखवितांना पुढें नकाशा पाहिजे. म्हणजे तें तें स्थळ नकाशांत मंडळींना दाखवितां येतें. त्यानें चांगलें समजतें."

शिक्षक.—"होय. तसें करतां येईल."
(एक गृहस्थ काम करून बरे च लांबून येणारे होते त्यांना उद्देशून).

विनोबा.—"तुमचें चालणें किती होतें? ४-५ मैल?"

गृहस्थ.—"होय. दुरून यावें लागतें."

विनोबा.—"दुरून यावें लागतें ही तर तुमची चैन झाली."

अनुक्रमणिका

देवाजी.— (हंसतात)

विनोबा.—“कोटी बाबाजींसारखे आतां तुम्ही म्हातारे व्हाल. जे नियमानें चालतात ते दीर्घायुषी होतात असा अनुभव आहे. परवां ठक्कर बापा आले होते तें सांगत होते— ‘माझें वय ७५ वर्षांचें. माझ्यानें चालवत नाहीं. पण माझे गुरु प्रो. कर्वे ८६ वर्षांचे अजून ५ ते ६ मैल नियमानें चालतात. चालणारे दीर्घजीवी होतात.”

कोटीजी.—“नियमानें चालतात ते दीर्घायुषी होतात’ या वाक्याचे दोन अर्थ आहेत (हंशा).”

विनोबा.—“होय तो श्लेष झाला.”

शिक्षक.—“होईन संकरद्वारा मी चि घातास कारण’ याचा अर्थ मला नीट समजला नाहीं. ‘संकर’ म्हणजे काय?

विनोबा.—“संकर म्हणजे अव्यवस्था. मी जर कर्म करणार नाहीं तर लोक आळशी होतील. अव्यवस्था माजेल हा अर्थ.”

देवाजी.—“संकर” म्हणजे मिश्रण असा आमचा समज होता.

विनोबा.—“तो अर्थ आहे च. मिश्रण म्हणजे अव्यवस्था. तांदुळांत गहूं मिसळले, झाली अव्यवस्था.”

देवाजी.—“पण तांदुळांत डाळ मिसळून खिचडी होते.”

विनोबा.—“मुद्दाम हेतुपुरस्सर तांदुळांत डाळ मिसळली ती खिचडी. तो संकर नव्हे. संकर म्हणजे अव्यवस्थेनें मिसळ.”

—यानंतर घंटा होऊन प्रार्थना सुरू झाली. प्रथम हरिः ॐ यं ब्रह्मा...हा श्लोक. नंतर स्थिरावला समाधींत हे १९ श्लोक, नंतर नामदेवाचा पुढील अभंग.

**देव दयानिधि भक्तांचा कैवारी । नाममात्रें तारी सर्वंलागी ।**
**तया देवराया गांवें हो आवडी । लागे मनीं गोडी सर्वकाळ ॥**
**नाहीं यातीकुळ उंचनिंच भेद । भाव एक शुद्ध पाहतसे ।**
**नामा म्हणे काय सांगावें नवल । अखंड दंडलें व्योमाकार ॥**

पूज्य विनोबांनीं गद्यांत वाचला. नंतर त्याचा अगदीं सरळ अर्थ सांगितला. मग अत्यंत साध्या, मधुर आणि गंभीर चालीनें तो म्हटला. पुढें गायत्री मंत्र ईशावास्यमंत्र— ‘असतो मा सद्‌गमय’ ही प्रार्थना, ‘औजबिल्लाहि....’ हा फातेहा, ‘सब्ब पारस्स अकरणं’ हा बुद्धधर्मीय श्लोक, ‘माळिये जेउतें नेलें’ ही ओवी, ‘अविनयमपनय विष्णो’ हा श्लोक, ‘एक ॐकार सतनाम’ ही शीख प्रार्थना, ‘राम हि केवळ प्रेमपियारा’ हा

दोहा पूज्य विनोबाजींनीं म्हटला. राजा राम राम राम । सीता राम राम राम—ही धून सर्वांकडून म्हणवून एकादशव्रत श्लोक म्हणून पूज्य विनोबांनीं प्रार्थना समाप्त केली. त्याबरोबर प्रार्थनेचा दुमदुमणारा घोष बंद होऊन धाम नदीचा "धो धो" ध्वनि कानीं आला.

सकाळपासून संध्याकाळपर्यंत जवळ जवळ असा कार्यक्रम चाले. रात्रीं आचार्य उघड्यांत झोपी जात. मच्छरदाणी लावलेली असे. शेजारच्या शेतावर शेती आणि गोरक्षणाचे प्रयोग, खांडण विंचरणाचे प्रयोग, तुनाईचे प्रयोग, पुनाईचे प्रयोग आचार्य येथें करवी. आहाराचे आणि आरोग्याचे प्रयोग नेहमीं च चालत. आचार्यांचा आहार अगदी तोललेला. अद्ययावत् शास्त्राप्रमाणें आहारांत कॅलरीज् किती, स्नेह किती, शर्करा किती, ओज किती, प्रोत किती, आयोडिन किती, मीठ किती, स्टार्च किती, व्हायटामिन्स किती—सर्वांचे गणित, सर्वाचा तक्ता आचार्यांच्या टेबलावर तयार असे. मद्रास प्रांतांतला चटणी वाटण्याचा महादेव बाहेरच्या ओट्यावर पडलेला असे. सर्व विणकरांनीं मिळून एकत्र काम करावें व सर्वांची मजूरी समान वाटून घ्यावी असें प्रयोग आचार्यांनीं येथें करविले. दुबट्याचे प्रयोग येथें झाले. प्रथम सत्याग्रही म्हणून युद्धविरोधी भाषण आचार्यांनीं येथें असतांना पवनार गांवीं केलें. येथें १९४२ नंतर एक मोठी मोडतोडीच्या कटाची केस आश्रमवासीयांवर केली गेली होती. आचार्यांनीं सुरगांवचें भंगीकाम येथे च राहून ३ वर्षें सतत केलें होतें. रोज आचार्य सकाळीं उठून सुरगांवला जात व रस्त्यावर पडलेल्या मलाची सफाई करून परत येत. पाऊस असो कीं वादळ असो, थंडी असो कीं ऊन असो, यत्किंचित् हि पर्वा नाहीं. ठरलेल्या वेळीं आचार्य उघड्या अंगानें खांद्यावर पावडें टाकून या कामासाठीं जात. त्या वेळीं लोक आचार्यांकडे टकमक टकमक पहात. कित्येक वेळां मोठी प्रतिष्ठित मंडळी हि आचार्यांबरोबर येत. नागपूरचे मंत्री हि मधून दिसावयाचे. आचार्यांचें भंगीकाम हा वीर पुरुषाचा एक आविर्भाव होता. सुरगांवच्या मलसफाईच्या निमित्ताने हा अज्ञानावर चढविलेला एक हल्ला होता. या स्थानीं च आचार्यांचे अनेक ग्रंथ प्रकाशिले गेले. ज्ञानदेवांचीं भजने, त्याची चिंतनिका, ईशावास्यवृत्ति, स्थितप्रज्ञदर्शन असे अनेक बहुमोल ग्रंथ येथें असतांना प्रकट झाले. गीताईच्या कोशाचें काम येथें असतांना च एकसारखें रोजीं दोन तास याप्रमाणें सात महिने चाललें होतें. त्या वेळच्या कामाची किंचित् कल्पना कोशकाराच्या डायरीवरून येऊं शकेल. हा पहा त्या डायरींतला एक उतारा.

सोमवार, दिनांक १४ जानेवारी १९४६.

नित्याप्रमाणें प्रार्थना....नंतर थोडा वेळ पडून राहिलों. स्नान, नास्ता, झाडझूड, कोशलेखन. आज पूज्य विनोबा गच्चीवर फिरत होते. बरोबर महादेवी होती. त्यांचें बोलणें मधून मधून ऐकूं येत होतें. मी कामांत होतों. महादेवीला पूज्य विनोबा सांगत होते—सृष्टि, सर्व जन ईश्वरमय दिसले पाहिजेत. महादेवी आश्रमांतील माणसांसंबंधी कांहीं तक्रारी मांडीत होती. पूज्य विनोबा म्हणाले—तुमच्या आमच्यांत हा च फरक आहे. आम्हांला गुण ताबडतोब कळतात. दोष कळण्याला पुष्कळ काळ लागतो. तुमचें याच्या उलट. १०।। पर्यंत नित्याप्रमाणें लेखनादि. १०।।-११ थोडी विश्रांति. ११-१२ जेवण. १२—४॥ कुंदरशीं बोलणें. विषय, तो पुण्यापर्यंत प्रवास करून आला. तेव्हां ठिकठिकाणची हकीकत व माझा ज्ञानेश्वरी कोश छापण्यासंबंधीं. ४॥-५॥ कोशपूर्वतयारी. ५॥—७॥ पूज्य विनोबांकडे कोशकार्य. कोशकार्य चालू असतां मध्येंच मनोहरजी आले. त्यामुळें कामांत खंड. त्यांच्याशीं पूज्य विनोबांचें थोडें सहज बोलणें झालें. मनोहरजी अशक्त दिसत होते.

विनोबा—काय चालत आला का?

अनुक्रमणिका

मनोहरजी—नाहीं. सायकलवर. आज काम संपून थोडा वेळ राहिला होता. तेव्हा डोकें मोकळें करण्यासाठीं आलों. दुसरा कांहीं उद्देश नाहीं.

विनोबा—सायकलवर बसून त्रास नाहीं होत? काल मी एका विद्यार्थ्याला सांगत होतों सायकलचा वेग ताशीं ५/१० मैल, उलट वाऱ्याचा वेग २-४ मैल मिळून कधीं कधीं १५/२० मैलांचा वारा छातीला लागतो.

मनोहरजी—तें खरें. (हंसत हंसत) अगदीं पहिल्यांदा ग्रामप्रचाराला आश्रमांतली मंडळी निघाली तेव्हां सगळे जण सायकलवर बसत. तेव्हां तुम्ही, मी व मोघे बाबाजी हे तिघे पायीं चालत. परंतु मीं महारोगीसेवेचें काम सुरू केल्यापासून सायकल वापरूं लागलों आहें. यापुढें सायकलवर बसणें बंद करण्याचा विचार करीत आहें. सध्यां परिस्थिति अशी आहे कीं, प्रत्यक्ष महारोग्यांच्या सेवेचें काम मीं करावें आणि बाकी काम इतरांनीं तेव्हां मला फिरण्याचें विशेष काम हि पडणार नाहीं. डॉक्टर देखील महारोग सेवेला कंटाळतात. म्हणतात अगदीं जरूर तेव्हां च आम्हांला बोलवा. तेव्हां मीं पाहिलें कीं हें काम आपण च करावें.

विनोबा—तुमचा तिथें तो कोण केशव कीं कोण काम करतो ना?

मनोहरजी—केशव कोण?

मी—गंगाधर.

विनोबा—हो गंगाधर. तो आला होता माझ्याकडे. त्याच्यासंबंधी थोडें बोलतों.

मनोहरजी—शिवरामपंत बाबाजी हि त्याच्यासंबंधी माझ्याशीं बोलले होतें.

विनोबा—त्याची पत्नी फार आजारी राहते, काय कारण याचें?

मनोहरजी—ती दोन वेळां धुपावली होती. आणि नंतर एकंदर अशक्त च होत गेली.

विनोबा—गंगाधरला तुम्ही काय देतां?

मनोहरजी—पूर्वीं २५, हल्लीं महागाई म्हणून ३०.

विनोबा—साम्ययोगमंदिरांत प्रत्येकाला निदान १७ रुपये खर्च येतो. तेव्हां तुम्ही त्याला ४० रुपये तरी द्यावयास पाहिजेत.

मनोहरजी—त्यांच्या राहण्याची हि शाश्वति दिसत नाहीं.

अनुक्रमणिका

विनोबा—तें गृहीत धरून हि इतके पैसे द्यावयास पाहिजेत. कारण हीं माणसें महारोग्यांत काम करतात. त्यांत धोका आहे. त्यांच्या खाण्यापिण्याची व्यवस्था बरोबर झाली पाहिजे.

—मनोहरजी यानंतर नमस्कार करून उठले. पण बाहेर जाऊन पुन्हां थोड्या वेळांनें आले व म्हणाले—"एक मिनिट वेळ घेतों तुमचा—बापूजींनीं विधायक कार्यक्रमांत महारोगी सेवेचा आतां अंतर्भाव केल्याचें तुम्ही वाचलें काय?"

विनोबा—होय मीं तें वाचलें.—लगेच मनोहरजी आनंदित होत्साते हंसत हंसत निघाले. त्यांच्या पाठमोऱ्या मूर्तीकडे थक्क होऊन मी पाहात राहिलों. केवढी ही सेवेची तळमळ! केवढें धैर्य! केवढा त्याग! पुन्हां कंदिलासमोर गीताईकोशाचें काम सुरू झाले.

'दक्षता' शब्दाचा अर्थ 'व्यवस्था शक्ति', 'कार्यकुशलता' असा देण्यास पूज्य विनोबाजींनीं सांगितले. हा क्षत्रिय गुण.

'दक्षिण' शब्दाचा अर्थ म्हणजे दक्षिणायनाचा अर्थ उत्तरायणाप्रमाणें च बाहेर तद्विरोधी भाषेंत द्यावयास सांगितला.

'दंड' चा माझा अर्थ शिक्षा होता. विनोबा म्हणाले 'हा अर्थ ठीक नाहीं' मी म्हणालो 'शिक्षा म्हणजे शिक्षण असा हि एक अर्थ होतो'. विनोबा म्हणाले 'तो होतो, पण तो एकदम लक्षांत येत नाहीं व येथें लागू होत नाहीं. भाष्य पहा—मग दंड (आत्म) दमन असा अर्थ त्यांनीं दिला. ते म्हणाले 'दम' म्हणजे नेहमीं शमदम घेतात. संन्याशाजवळ दंड असतो तें त्याचें चिन्ह. दंभ शब्दावर त्यांनीं बरा च विचार केला. शंकराचार्यांनीं पुष्कळ ठिकाणीं 'धर्मध्वजित्वं' अर्थ केला आहे तो वाचला. आणि नंतर भिन्न भिन्न स्थळीं त्यांनीं तीन अर्थ दिले.

'दया' शब्दाचा मी 'करुणा' हा अर्थ दिला होता. त्याला पूज्य विनोबांनीं दुःखितांविषयीं हा शब्द जोडण्याला सांगितलें. आणि शिवाय 'दुसऱ्याचें दुःख निवारण करण्याविषयीं तळमळ' हा अर्थ जोडायला सांगितला. ते म्हणाले, करुणा शब्दांत कृ=करणें धातु आहे. नुसता कारुण्यभाव मनांत उद्भवणें एवढें बस नसून त्यांत कांहीं तरी करण्याची गोष्ट गृहीत आहे.

'दंड मी दमवंतांचा' याविषयीं सांगितलें कीं पांडवांनीं वनवासांत दमन केलें. त्याला अनुलक्षून 'दंड' विभूति आहे. शेवटीं शेवटीं विभूति पांडवचरित्राकडे वळल्या आहेत.

'दर्प' शब्दाचा १८/५३ मध्यें मी मुद्दाम सौम्य अर्थ केला होता. तो पूज्य विनोबाजींनीं बदलवला. ते म्हणाले—१८/५१ ते १८/५६ पर्यंत सगळी गीता च आली आहे. १८/५१ स्थिरबुद्धि, १८/५२ ध्यानयोग, १८/५३ दैवी संपत्ति, पुढें ब्रह्मज्ञान. पुढें भक्ति.

'दर्भ' शब्दाविषयीं म्हणाले—'दर्भ च कां? लाकडी ठोकळा फळी नाहीं चालणार?' मी म्हणालो—'नाहीं, दर्भांत इलॅस्टिसिटी आहे'. विनोबा म्हणाले—दर्भ च पाहिजे, चामडें च पाहिजे असा विधि नको आहे व्हायला आसनाचा. दर्भ जमिनीची ओल न लागावी म्हणून खालीं. वर चामडें आणि स्वच्छतेसाठीं धूतवस्त्र

अशी आसनाची योजना दिसते. 'न देव जाणती माझा प्रभाव न महर्षि हि' हें वचन ठीक आहे. पण 'देव दानव कोणी हि तुझें रूप न जाणती' यांत दानव जाणत नाहींत यांत विशेष काय? श्रीधरी टीका पाहू—'श्रीधराने युक्ति काढली—अनुग्रहकारी आहे हें देव जाणत नाहींत व निग्रहकारी आहे हें दानव जाणत नाहींत. श्रीधर कधीं कधीं अशी युक्ति योजतो' —विनोबा म्हणाले. ७॥-८ जेवण. ८।-९ प्राथना. महादेवीनें भजन म्हटलें. ९ ला निद्रा...एक गोष्ट लिहिण्याची राहून गेली. संध्याकाळीं ४॥ वाजतां पूज्य विनोबा कुंदर बरोबर गच्चीवर फिरत असतां कोशकार्यासंबंधी म्हणाले—'आणखी दोन महिने तरी लागतील. म्हणजे एकूण चार महिने झाले या कामाचें. गीताईला एवढा वेळ लागला होता. एक प्रकारें भाष्य च चाललें आहे हें. भाष्यकाराचें भाष्य आणि यांत फरक असा कीं कदाचित् तें बरोबर असलें तरी समग्र शब्दावलोकनपूर्वक हें आहे. भाष्यकारांच्या डोळ्यांपुढें पुष्कळशीं वचनें असणार च. त्यामुळें त्यांचें अवलोकन हि बरेंच पूर्ण म्हणावें लागेल. कदाचित् शिष्यादिक कोश करून हि भाष्यकारांपुढें मांडीत असतील. मग भाष्य रचून झाल्यावर ते कोश ठेवीत नसतील असें हि संभवनीय आहे.

—नालवाडी सोडल्यापासून तों थेट बापूजींच्या निधनापर्यंत सेवाग्रामला सर्वोदयपरिषद होईपर्यंत आचार्यांचें परंधाम-पवनार हें निवासस्थान राहिलें. जवळजवळ ८/९ वर्षांचा हा कालावधि. या अवधींत आचार्यांचा बरा च काळ जेलमध्यें गेला. बापूजींच्या निर्वाणानंतर येथें बापूजींच्या अस्थि विसर्जिल्या केल्या, त्या वेळीं आचार्यांनी च प्रार्थना केली. लाख्खों लोक जमले होते. नदी सर्व आच्छादली जाऊन तेथें लोकांचा समुद्र निर्माण झाला होता.

**हे मोर चित्त! पुण्यतीर्थे धीरे! जागो रे महामानवेर सागर तीरे ।**

रवींद्रनाथांची उक्ति त्या वेळीं प्रत्यक्ष मूर्त स्वरूपांत दिसत होती.

जें ठिकाण जमनालालजीं सारख्या महाभक्ताच्या विश्रामार्थ निर्माण झालें, त्यामुळें जेथें अनेक दासांचें विश्रामधाम बनलें, जेथें अचार्यांचा दीर्घ काल निवास झाला, जिथें गीताईकोशासारखे अद्‌भुत ग्रंथ निर्माण झाले, जेथें अनेक कार्यकर्त्यांचा मेळावा मधमाशांच्या मोहळाप्रमाणें रात्रंदिवस जमत राहिला, जेथें पुरातन कालांतल्या भग्न मूर्तींनीं इतिहासाचें मंगल स्वरूप दाखवून दिलें, जेथें जनकल्याणार्थ अनेक प्रयोग झाले, जेथें जगद्वंद्य महात्म्याचें अस्थिविसर्जन झालें, जेथें गांधीघाटासारख्या योजना निघाल्या—त्या पवित्र परंधाम आश्रमाची महनीयता कोणत्या शब्दात वर्णन करावी? तें स्थान पाहिल्याबरोबर

**देखोनि देवनगरीं । साष्टांगे नमस्कारी ॥**

या पलीकडे प्रेक्षकाला दुसरें कांहीं च सुचूं नये यांत नवल काय?.

●●●

अनुक्रमणिका

# प्रकरण ५५ वें

## फैजपूर कॉंग्रेस

**हिंदुस्थानांत** ब्रिटिश राज्य झाल्यापासून अत्यंत व्यापक प्रमाणावर देशाच्या हितासांठीं झटणारी देशाची प्रतिनिधीभूत अशी एकमेव कॉंग्रेस ही च संस्था निघाली. पन्नास वर्षे या संस्थेनें निरनिराळ्या तऱ्हेनें देशाच्या स्वराज्यासाठीं प्रयत्न केले. १९२१ पासून महात्माजींच्या नेतृत्त्वाखालीं ही संस्था चालत आली. महात्माजींनीं या संस्थेचा संपूर्ण कायापालट केला. या संस्थेला मदत करणाऱ्या परंतु स्वतंत्र अशा विधायक कार्याच्या अनेक देशव्यापी संस्था त्यांनीं स्थापिल्या. कॉंग्रेसचीं वार्षिक अधिवेशनें आतांपर्यंत मोठमोठ्या शहरांत भरत आलेलीं आहेत. परंतु खरा हिंदुस्थान खेड्यांत असल्यानें यापुढें खेड्यांत च कॉंग्रेसचें वार्षिक अधिवेशन भरावें अशी कल्पना महात्माजींनीं कॉंग्रेसपुढें मांडली. ती कल्पना सर्वांना मान्य झाली.

परंतु खेड्यांत कॉंग्रेसचें अधिवेशन भरवावयाचें ही गोष्ट अगदीं नवीन होती. त्यामुळें अधिवेशनाच्या यशस्वितेविषयीं अनेक लोकं साशंक होते. शिवाय कमींत कमी खर्चात, खेड्याला साजेल अशा साहित्यांत खेडेगांवचें लोक हि हा नमुना पाहून पुढें उत्साहानें कॉंग्रेस करूं शकतील, अशी ही कॉंग्रेस झाली पाहिजे; ही महात्माजींची मुख्य कल्पना होती. केवळ खेड्यांत कॉंग्रेसचें अधिवेशन भरविण्यांत स्वारस्य नसून खेड्यांतल्या लोकांचा तींत ज्यास्तींत ज्यास्त भाग असेल, खेड्यांत च अधिवेशनाच्यासाठीं लागणारी मजूरी वाटली जाईल. ग्रामीण पद्धतीनें आणि ग्रामोद्योगाच्या तत्त्वावर कॉंग्रेस अधिवेशन होईल यांत च खेड्याच्या कॉंग्रेसची खरी मधुर कल्पना होती. पण ती पार पाडणें हें त्यावेळीं मोठें साहसाचें काम वाटत होतें.

महात्माजींना त्यांत कांहीं च कठिण वाटत नव्हतें. त्यांची क्रांतदर्शी दृष्टि हें काम सहज होईल असें सांगत होती. कारण

**यथेच्छाभोग्यं वो वनमिदमयं मे सुदिवस ।**
**सतां सद्भिः संगः कथमपि हि पुण्येन भवति ॥**
**तरुच्छाया तोयं यदापि तपसो योग्यमशनं ।**
**फलं वा फूलं वा तदपि न पराधीन मिह वः ॥**

ही त्यांच्या स्वतःच्या आश्रमांतली पद्धति त्यांच्या नित्य अनुभवाची होती. खेड्यांतलें अधिवेशन म्हणजे आरण्यक आश्रमीय अधिवेशन व्हावें अशी बापूजींची अपेक्षा होती. ही अपेक्षा पार कोण पाडणार? महाराष्ट्रांत ही अपेक्षा पार पडूं शकेल असें हि बापूजींना वाटत होतें. कारण चर्खा-संघाचे कार्यकर्ते महाराष्ट्रांत मोठ्या प्रमाणावर तयार झालेले, त्यागी कार्यकर्त्यांची, मेहनती लोकांची महाराष्ट्रांत वाण नाहीं, म्हणून महाराष्ट्रांत च ही खेड्यांतली कॉंग्रेस करण्याचें ठरलें.

महाराष्ट्रांत कॉंग्रेसच्या चळवळीची नेहमीं चिंता वाहणारे देव, दास्ताने इत्यादींनीं कॉंग्रेसची जागा पाहण्यास सुरवात केली. साताऱ्यांकडे जागा पहावी कीं खानदेशांत पहावी असे अनेक वैकल्पिक विचार चालले होते. खानदेशांत हि उत्राणला गिरणातिरीं जागा बरी कीं फैजपूरला बरी, अशा अनेक तुलना झाल्या. शेवटीं पूर्व खानदेशमधील यावल तालुक्यांतील फैजपूर गांवाच्या जवळ हें स्थान नक्की केलें गेलें.

अनुक्रमणिका

काँग्रेस खानदेशांत आल्या मुळें दोन्ही खानदेशांतून मुख्यतः पूर्व खानदेशांतून कार्यकर्ते भराभर जमूं लागले. कामाच्या अनेक समित्या नेमल्या गेल्या. काँग्रेससाठीं स्वयंसेवकांची भर्ती करण्यांत आली. काँग्रेसविरोधी लोक या वेळीं, ही काँग्रेस कशी अयशस्वी होते इकडे डोळे लावून होते. नाना प्रकारची हेटाळणी त्यांनीं सुरू केली. स्वयंसेविकादलावर बापूजींच्या आश्रमांत राहिलेल्या प्रेमाबाई कंटक होत्या. विरुद्ध पक्षानें भगिनींविरुद्ध वाटेल तें लिहिण्याला सुरवात केली. महाराष्ट्र दरिद्री म्हणून पैशाची हि अडचण उपस्थित झाली. टिळकांनंतर अखिल भारतीय तोलाचा पुढारी महाराष्ट्रांत काँग्रेसमध्यें नसल्यामुळें इतर प्रांत हि या नव्या अधिवेशनाच्या प्रयोगाविषयीं पुष्कळ साशंक होते. अशा अनेक कारणांनी खुद्द बापूजींनीं च फैजपूरला येऊन बसावें आणि त्यांच्या अस्तित्वानें अनेक अडचणी दूर व्हाव्या आणि नवीन अधिवेशनाचा प्रयोग यशस्वी व्हावा अशी हि एक कल्पना सुचवली गेली. परंतु ती गोष्ट तितकीशीं शक्य नव्हती.

त्यांच्याऐवजीं आचार्यांनीं च फैजपूरला जावें असें ठरलें आणि त्याप्रमाणें आचार्य फैजपूरला दाखल झाले. आचार्यांबरोबर नेहमींप्रमाणें दोनतीन विद्यार्थी होते. आचार्यांचीं धुळें जेलमधलीं प्रवचनें ऐकून दोन्ही खानदेशचे कार्यकर्ते भारून गेले होते. त्यामुळें स्वाभाविक च या कार्यकर्त्यांना अतिशय आनंद वाटला. आतां येथें कोणता हि गोंधळ होवो, कोणती हि भानगड होवो ती मधून सहज पार पाडतां येईल असा त्यांना आत्मविश्वास वाटूं लागला. पहिली कल्पना अशी होती कीं, या खेड्यांतल्या काँग्रेससंबंधीं खेड्यांतल्या जनतेची सहानुभूति वळवून घ्यावी, खेड्यांतल्या लोकांनीं या काँग्रेसमध्यें मोठ्या प्रमाणावर हजर राहावें, त्यांना काँग्रेसच्या कार्याची नीट कल्पना यावी, काँग्रेस आणि आपण एकरूप च आहोंत असें त्यांना वाटावें यासाठीं आचार्यांनीं ठिकठिकाणीं खानदेशमधल्या खेड्यांत फिरून लोकांना समजावून सांगावें. परंतु रोज सोळा लटी कांतण्याचा प्रयोग, नालवाडीच्या रस्त्यावरच्या धुळीचा सतत त्रास, अनेक तऱ्हेचे चिंतन, दूध किंवा दुधाच्या कोणत्याहि पदार्थाशिवाय राहण्याचा प्रयोग यामुळें आचार्यांची प्रकृति एकसारखी क्षीण होत गेलेली होती. तशांत फैजपूरचें फिरण्याचें काम पडलें. या स्थितींत आचार्यांना एकदम ताप येण्याला सुरवात झाली. थंडीताप होता तो. तो १०५° पर्यंत सहज जाई. मूळच्या अत्यंत क्षीण प्रकृतींत या तापानें फार च क्षीणता आणली. या तापासंबंधीं श्रीकृष्णदास जाजूजींच्या जवळ आचार्यांचें बोलणें झालें होतें. त्यावरून एक गूढ गोष्ट प्रकट झाली. ज्या वेळीं हा ताप आला बरोबर त्या च वेळपर्यंत आचार्यांनीं जीवंत ठेवण्याबद्दल परमेश्वरापाशीं प्रार्थना केली होती. आचार्यांनीं ही प्रार्थना केवळ कांहीं साधनासिद्धीसाठीं च केली असली पाहिजे. आणि आश्चर्य हें कीं आचार्यांना बरोबर या च वेळीं अतिशय जोराचा ताप येऊं लागला! तेव्हां आचार्यांना वाटलें कीं या तापांत आपण जगत नाहीं. जाजूजींनीं ही गोष्ट आचार्यांच्या तोंडून ऐकली तेव्हां ते आचार्यांना म्हणाले—"यापुढें हि परमेश्वराजवळ आपण आणखी प्रार्थना करावी." आचार्यांनीं यावर नुसतें हास्य केलें.

तापामुळें क्षीणता अतिशय आली. कांहीं दिवसांनीं ताप हळूंहळूं निघून गेला. परंतु मग खेड्यांत फिरण्याचें काम रहित करावें लागलें. साने गुरुजी, सुकाभाऊ चौधरी असे कांहीं लोक या दृष्टीनें खेड्यांत फिरत च होते. आचार्यांचा मुक्काम या वेळीं काँग्रेसचें जें ठिकाण होतें त्यापासून सुमारें मैलभर अंतरावर एका बंगल्यामध्यें होतें. आचार्य या तापानंतर केवळ दूधफळावर राहूं लागले. त्यांच्या जवळचे विद्यार्थी काँग्रेसच्या रसोड्यांत जेवून येत. काँग्रेसचें नगररचनेचें काम चाललें होतें. तेथें आचार्य सकाळसंध्याकाळ फेरी मारून येत. त्या वेळीं कामाच्या अनेक गोष्टींचा उलगडा होई. बाकीच्या वेळांत तेथें विद्यार्थ्यांना शिकवणें, स्वतः वेदादिकांचें अध्ययन आणि मुलाखती असा कार्यक्रम चालत असे. या वेळीं वर्ध्याहून आश्रमीय मंडळी हि मोठ्या प्रमाणांत काम करण्यासाठीं फैजपूरला जमा झाली. सेवाग्राम आश्रमामधले रामदास गुलाटी हे खास नगररचनेसाठीं म्हणून आले. ते उत्तम एंजिनियर असून त्यांनीं नगररचनेचें काम

उत्तम प्रकारें केलें. त्यांच्या जोडीला बंगालचे नंदलाल बोस हे सुप्रसिद्ध कलाकार खेड्यांतल्या कलेचा ठिकठिकाणीं आविष्कार करीत होते. थोड्या च दिवसांत जिकडे तिकडे बांबूची दुनिया दिसूं लागली. मोठमोठ्या दरवाजांपासून तो स्वयंसेवकांच्या राहण्याच्या झोंपड्यापर्यंत सर्वत्र बांबूचा च उपयोग केला होता. हातसडीचे तांदूळ आणले होते, हातघाण्याचें पीठ दळलें होतें, निरनिराळ्या नमुन्याचीं जातीं आणलीं होतीं. बैलघाण्याचें तेल वापरलें जात होतें. गाईचें च दूध वापरणाऱ्या व्रती लोकांसाठीं गाई आणविल्या गेल्या. अनेक प्रकारें ग्रामीण उद्योग सुरू करून खानदेशांतील खेड्यांतले लोक जमा केले होते. पायखान्यासाठीं अप्पासाहेब पटवर्धनांच्या हाताखालीं उत्कृष्ट स्वयंसेवक ठेवून माती टाकण्याची—सफाईची—व्यवस्था ठेवली होती. कोल्हापूरपासून नागपूरपर्यंतचे महाराष्ट्रीय कार्यकर्ते जमा झाले होते. कोणतें ना कोणतें काम जो तो कसोशीनें करीत होता. काँग्रेस फार वर्षांनीं—४० वर्षांनीं महाराष्ट्रांत येत होती. काँग्रेसचें हें ५० वें अधिवेशन. पुन्हां बापूजींच्या कल्पनेचें हें प्रथम अधिवेशन. येथें कोणती हि उणीव वाटतां कामा नये अशी साहजिक च सर्वांची इच्छा होती.

**फलमधुकुसुमांनीं वृक्ष पूजोत सारे ।**
**स्फुटकमलसुगंधी मंद वाहोत वारे ॥**
**मधुरतर करावा शब्द येथें शकुंतीं ।**
**फिरुनि सहज आला राम कीं या वनांतीं ॥**

रामचंद्र वनांत येत असतां जी स्वागतभावना वनदेवतांच्या मनांत होती, ती च रामराज्य आणणारी महात्माजींची काँग्रेस खेड्यांत येत असतांना सर्वांची होती. आचार्य या सदिच्छेमध्यें जणूं गुप्तरूपानें सर्वांना कार्यप्रेरणा देत होते. फुलाची माळ दिसावी परंतु ती माळ ज्यावर टिकून राहते तो धागा दिसूं नये त्याप्रमाणें आचार्यांची स्थिति झाली होती. आचार्य अनेक तऱ्हेनें येथल्या कार्यकर्त्यांना टिकविणारा दुवा होता. महाराष्ट्रांतले कार्यकर्ते चांगले परंतु विनाकारण भांडणारे—एकाचे दोन, दोनाचे चार, चाराचे आठ असें विभाजन करण्याची भेदबुद्धि येथें सर्वत्र पसरलेली. आठाचे चार, चाराचे दोन, दोनाचे एक येथें होणें दुरापास्त. जो तो अभिमानानें भरलेला. तुळशीदासजींनीं म्हटलें आहे, "पापमूल अभिमान." कार्यकर्त्यांत हें बखेड्याचें पाप पदोपदीं निर्माण होई. तें पाप नष्ट करून तेथें शांति आणि कार्यप्रवणता निर्माण करण्याचें कार्य आचार्य सहजतेनें करीत असत. हें च आचार्यांच्या अस्तित्वाचें फैजपूरमधलें खरें कार्य होतें. ही च काँग्रेसची मुहूर्तमेढ होती. तशी फैजपूर काँग्रेसच्या टिळक नगराची विधिपूर्वक मुहूर्तमेढ आचार्यांचे हस्तें २ ऑक्टोबर १९३६ ला सकाळीं आठ वाजतां गांधी जयंतीचा प्रसंग साधुन रोवण्यांत आली. तो प्रसंग दाखविणारा फोटो हि काढण्यांत आला होता. या प्रसंगीं आचार्यांनीं कार्यकर्त्यांना भ्रातृभावाचा उपदेश केला. खेड्यांतल्या काँग्रेसचें महत्त्व व खेड्याकडे काँग्रेसची प्रथमपासून गति हि सांगितली. साधेपणानें व काटकसरीनें शोभा करण्याची सल्ला याच भाषणांतून आचार्यांनीं दिली. आणि या कार्यापासून आंतरिक लाभ प्राप्त करून घेण्याचा उपदेश केला. या मुहूर्तमेढीच्या प्रसंगाला अनुलक्षून नवाकाळनें एक सुंदर अग्रलेख लिहिला होता. त्यांत आचार्यांची भूमिका मार्मिकपणें मांडण्यांत आली आहे. हा पहा त्यांतला पहिला च भाग.—"शुक्रवार ता. २ हा तारखेनें येणारा गांधी जयंतीचा दिवस फैजपूर येथें टिळक नगराची मुहूर्तमेढ रोवण्यासाठीं निश्चित करण्यांत आला, व त्याप्रमाणें आसपासच्या खेड्यांतील तीनचारशें स्त्रीपुरुषांच्या समोर श्री. विनोबाजी भावे यांच्या हस्तें विधिपूर्वक मुहूर्तमेढ रोवण्यांत आली. महात्मा गांधींच्या वाढदिवशीं, लोकमान्य टिळकांच्या नांवाच्या काँग्रेसनगराची मुहूर्तमेढ रोवण्यास श्री. विनोबाजी भावे लाभले हा त्रिवेणीसंगम च म्हणण्यास हरकत नाहीं. प्रयागास गंगायमुनेच्या संगमांत गुप्त सरस्वती येऊन मिळाली आहे असें समजतात. फैजपूर खेड्यांत येणारी काँग्रेस ही लोकमान्य टिळक आणि महात्मा गांधी यांच्या

अनुक्रमणिका

चळवळीचा संगम होऊन जात आहे. लोकमान्यांचा स्वराज्यावरील कटाक्ष आणि हें स्वराज्य स्वदेशीनें च मिळवून दाखविण्याचा महात्माजींचा दीर्घ खटाटोप, ह्यांचा मेळ कॉंग्रेसच्या धोरणांत स्पष्ट दिसून येतो. स्वराज्य हें लक्ष्य आणि स्वदेशी हा बाण असें मानलें तर श्री. विनोबाजी भावे ह्यांनीं आपल्या भाषणांत म्हटल्याप्रमाणें हा बाण लक्ष्यावर जाऊन पोंचणें न पोंचणें हें सोडणाऱ्याच्या वृत्तीवर अवलंबून असतें. निरहंकारानें देशकार्य करण्याची वृत्ति ही गुप्त सरस्वतीसारखी आहे. श्री. विनोबाजी भावे हे ह्या वृत्तीचे प्रतीक आहेत असें म्हणण्यास हरकत नाहीं. देशकार्य करण्याची लोकमान्यांची आणि महात्मा गांधींची वृत्ति श्री. विनोबाजी भावे यांच्या रूपानें अवतरली आहे असें म्हणणें अतिशयोक्तीचें होणार नाहीं......"

यानंतर मधून मधून आचार्य जवळपासच्या शेतकऱ्यांकडे जात आणि त्यांना हि आपलेंसें करून घेत. नवाकाळ १९ डिसेंबरच्या १९३६ च्या अंकांत या संबंधींची बातमी पुढीलप्रमाणें दिली आहे—"विनोबा भावे नियमानें आजूबाजूच्या खेड्यांत प्रवचन करीत फिरत आहेत व राष्ट्रीय चळवळीचें स्वरूप शेतकऱ्यांना समजेल अशा सुलभ रीतीनें सांगत आहेत. काल संध्याकाळीं विनोबा भावे १६ मैलांवर असलेल्या सातोद खेड्यांत प्रवचनास गेले होते. रस्ता बैलगाडीचा असल्यामुळें वाटेंत त्यांची मोटार चकारींत अडून राहिली. त्या ठिकाणीं अर्धा एक तास मोटार बाहेर काढण्यांत गेला, व गाडी पुढें चालू लागली तों वांकणावर एका खड्ड्यांत चाक जाऊन गाडी डाव्या अंगास कलली व मोठा अपघात होण्याचा संभव होता परंतु सुदैवानें संकट टळलें. सभेचा वेळ होऊन गेला. गाडी गांवापासून एक मैलावर अडून राहिली. परंतु गांवांत ही बातमी कळतां च १००/१५० लोक 'महात्मा गांधी कीं जय' अशा आरोळ्या करीत मोटारजवळ आले, सहज लीलेनें त्यांनीं गाडी खड्ड्यांतून उचलली व आपल्या गांवाकडे गर्दी करून जवळ जवळ ओढत च नेली. प्रवचनाच्या ठिकाणीं मुलें, स्त्रिया, म्हातारे व तरुण यांची एक च गर्दी होती. त्यांचा उत्साह कमालीचा होता. गांधींचा आणि कॉंग्रेसचा संदेश घेऊन येणारा इसम बहुजनसमाजाला प्यारा होवून राहिला आहे हें स्पष्ट दिसत होतें. त्यांचा आग्रह, उत्साह व उत्कंठा ही खरोखर कौतुकास्पद होती. विनोबांनीं रात्रीं ९-३० च्या सुमारास प्रवचन केलें—"कॉंग्रेस ही तुमची च आहे. कॉंग्रेस राष्ट्राला सन्मार्ग दाखवीत आहे, तुमच्या दारापाशीं सूर्याच्या किरणासारखी आली आहे, आपलीं दारें, खिडक्या बंद ठेवूं नका. सर्व राष्ट्राचें दर्शन फैजपूरांत तुम्हाला होणार आहे." वगैरे उपदेश अत्यंत कळकळीनें त्यांनीं केला. त्यांच्या हृदयस्पर्शी व बालबोध शब्दांचा शेतकऱ्यांच्या हृदयावर विलक्षण परिणाम झाला. या च बातमीदारानें नवाकाळ या च अंकांत पुढील बातमी दिली आहे.—"आज रोजीं संध्याकाळीं ५-३० वाजतां श्री. विनोबा भावे यांच्या हस्तें शिबिराचें उद्‌घाटन झालें. श्रीमती प्रेमाबाई कंटक यांनीं शिबिराच्या कार्याचा अहवाल वाचला व प्रस्तुत शिबिराचें वैशिष्ट्य दाखविलें. शेतकरी भगिनींची स्वयंसेविका दलांत भर होत आहे. वरच्या वर्गाच्या स्त्रियांबरोबर मिळून मिसळून तत्परतेनें काम करण्याची त्यांची हिंमत कौतुकास्पद आहे."

याप्रमाणें फैजपूरचें टिळक नगर उभारण्याचें आणि अनेक प्रवृत्तींचें काम आचार्यांच्या गुप्त परंतु कार्यकारी शक्तीनें चाललेलें होतें. मध्यंतरी पाऊस आला, नाना तऱ्हेचीं विघ्नें आलीं, कार्यकर्ते क्षणभर निराश झाले, तरी कार्याचा वृक्ष एकदम बहरून निघाला. तो पाहून फैजपूरला येणाऱ्यांना विस्मय वाटला.

**एकाएकीं कोठुनि आलीं मधुर फळें वृक्षाला?**
**एकाएकी कोठुनि आला बहर फुलांचा त्याला?**
**किमया घडली कैशी? नव्हतें तें चि कुठुनियां झालें?**
**देवाघरचें लेणें कोणीं कसें येथें घडलें?**

अनुक्रमणिका

असा आश्चर्योद्गार सर्वत्र निघूं लागला.

**विस्मय वाटे क्षणांत कायापालट झाला याचा ।**
**रूक्ष वृक्ष तो फळुनी डोले वैभवमंडित साचा ॥**

कार्य फळाला आलें म्हणजे स्वाभाविक च त्याला प्रशंसक भेटतात.

**त्याच्या ठायीं आतां सारे द्विजगण उडुनी येती ।**
**तेथें केवळ लुब्ध होउनी करिती संतत बसती ॥**
**गाणीं गाती कितेक कोकिल आतां संतत तेथें ।**
**मूकत्वाला वाचा फोडी कधीं उलूक चि जेथें ॥**

कार्य फळाला आलें म्हणजे त्याच्या भोवतीं मग सहज च अनेक लोक घोटाळूं लागतात!

**तो च वृक्ष का ऐशी शंका पाहुनि वाटे त्याला ।**
**इतका पालट त्याच्या अंगी एकाएकीं झाला ॥**

या कार्यवृक्षांत एवढा पालट झाला कीं तो च हा पूर्वीचा भिकार वृक्ष का अशी शंका यावी. परंतु या सर्वांत आचार्यांची एक च दृष्टि होती. हा बाहेरचा कार्यवृक्ष तेव्हां च फळला म्हणावयाचा जेव्हां त्याप्रमाणें जीवनांत पालट होईल.

**पालट तूं हि जीवनवृक्षा । टाकी रुक्षत्वाला ।**
**फळतां जींवन सारें जगतीं काय उणें मग तुजला ॥**
**वसंतसंगें एकाएकी वृक्ष बहरतो पाही ।**
**सत्संगानें फळुनी तूं हि केवळ गुणमय होई ॥**

—म्हणून च आचार्य कोणत्या हि बड्या कार्यक्रमांत, कोणत्या हि मिरवणुकीला, कोणत्याहि सभेला किंवा खुद्द अधिवेशनाला हि गेले नाहीं. नाहीं म्हणण्याला एक प्रसंग उद्भवला त्यामुळें अधिवेशनाचे अध्यक्ष जवाहरलाल नेहरूंकडे व तदनुषंगानें आधीं बापूजींकडे आचार्यांना शंकरराव देवांनीं नेलें. तो प्रसंग असा—महाराष्ट्रांत पैशाची उणीव असल्यामुळें फैजपूरच्या कॉंग्रेसनगरकार्यांत हि सर्वत्र योग्य काटकसर करण्याची कल्पना निघणे स्वाभाविक होतें. एका कार्यकर्त्यांच्या सभेंत आचार्यांनीं काटकसरीची एक बाब सहज सुचवली. "अधिवेशनाला गरीब शेतकऱ्यांनीं जर तिकिटें घ्यावयाचीं तर दोनतीनशें वर्तमानपत्राचे बातमीदार फुकट सोडण्याची जी पद्धति ती बंद कां करूं नये? त्यांनीं तिकिटें घेऊन जावें."—ही गोष्ट सर्वांना पटली. बापूजींच्या कानीं जेव्हां ही गोष्ट गेली तेव्हां ते हि म्हणाले. "बरोबर आहे. या कॉंग्रेसपासून ही सुरवात करणें योग्य आहे."—परंतु इकडे बातमीदारांच्या कानावर ही गोष्ट आली तेव्हां त्यांनीं सभा भरवून "आमची गळचेपी" "आम्हांला मज्जाव" असा कांगावा जवाहरलाल नेहरूंकडे केला. तेव्हां जवाहरलालजींच्या पुढें वस्तुस्थिति मांडण्यासाठीं शंकरराव देवांनीं आचार्यांना नेलें. प्रथम जवाहरलालजी संतापून कांहीं एक न ऐकतां म्हणाले—"येथें हा नाझीझम चालविला आहे." त्यावर आचार्य शांतपणे म्हणाले—"पंडितजी यांत नाझीझम कोठें आहे? येथें पत्रकारांना, बातमीदारांना मज्जाव नाहीं. गरीब

शेतकरी तिकीट खरेदी करतो तर या शहरांतल्या पत्रकारांना ती गोष्ट कठिण नाहीं. ही खेड्याची गरीब काँग्रेस आहे म्हणून हा विचार मांडला आहे. शेवटीं आपण जें पसंत कराल तें च करावयाचें आहे". हे आचार्यांचे बोल ऐकून पंडितजी शांत झाले व म्हणाले— "तुमचा विचार ठीक आहे पण पत्रकारांना विनामूल्य अधिवेशनाला येऊं द्यावें असें मला वाटतें."—यापुढें हा प्रश्न सुटला च. परंतु बापूजींनीं आग्रह धरला. पण मग आचार्य या भानगडींत पडले नाही.

आचार्य जरी काँग्रेसच्या कोणत्या हि कार्यक्रमाला गेले नाहीं तरी आचार्यांना काँग्रेसनगरमध्यें कुटुंबनिवासांत पहिली च झोपडी रहावयास दिली होती. तेथें मात्र अनेक लोकांची दिवसभर रीघ लागलेली असे. आचार्य काँग्रेसनगरपासून मैलभरावर बंगल्यांत राहात असत. तेथून या झोपडींत हि आले नसते परंतु कार्यकर्त्यांच्या आग्रहास्तव येथें राहिले. बाहेर सकाळीं थंडीचा कडाका पडलेला असे. तरी आचार्यांच्या प्रार्थनेला पहांटे मंडळी यावयाची च. प्रार्थनेनंतर आचार्य चार शब्द सांगत ते ऐकण्याला ही मंडळी अतिशय उत्सुक असत. आचार्य भागवत याच झोपडींत मुद्दाम राहिले होते. साने गुरुजी हि संध्याकाळीं गरम पाणी पिण्यासाठीं येत आणि हंसत हंसत निघून जात. जमनालालजी हि यावयाचे. जाजूजी, चर्खा संघाची मंडळी, मधून मधून प्रेमाबाई अशी अनेक मंडळी आचार्यांभोवतीं बसलेली च दिसत. कोणाला आचार्यांशीं विशेष बोलावयाचें असेल तर आचार्य सांगत "मला वेळ आहे तिकडे अधिवेशन चालू असते तेव्हां. मग या झोंपडींत मी एकटा असतो. खुशाल आपण बोलूं"—आचार्य फिरण्याच्या वेळीं हि अनेकांशीं बोलत. काँग्रेसच्या अधिवेशनानें सर्व लोक खूष झाले. जेवण्याला वाढतांना स्त्रियांची फौज पाहून, त्यांची टापटीप पाहून इतर प्रांतांतल्या लोकांना आश्चर्य वाटलें. कारण इतर ठिकाणीं पडदा! खेड्याची काँग्रेस यशस्वी झाली. आचार्य हि नंतर वर्ध्याला निघून गेले. या प्रसंगानें कोल्हापूरपासून नागपूरपर्यंतच्या कार्यकर्त्यांना आचार्यांची ओळख पटली, हें या काँग्रेसचें एक मोठें भाग्य होतें. ईश्वरी योजनेनें च सर्व गोष्टी होतात. आचार्यांचें दर्शन सर्व कार्यकर्त्यांना व्हावें यांत ईश्वराचा निःसंशय कांहीं तरी हेतु असला पाहिजे. आचार्य प्रत्यक्ष काँग्रेसमध्यें नसले तरी ते एक काँग्रेसची—देशाची मोठी शक्ति आहे, ही गोष्ट कार्यकर्त्यांच्या नजरेस आणणें हा च तो ईश्वरी हेतु असेल काय?

●●●

अनुक्रमणिका

# प्रकरण ५६ वें

## अद्वितीय सत्याग्रही

**तो प्रसंग** मोठा विलक्षण होता. ब्रिटिश सरकारने, त्यांचें राज्य म्हणून, हिंदुस्थानला न विचारतां जर्मनीविरुद्ध युद्धांत सामील केलें. आणि सर्व हिंदी लोक स्वेच्छेनें युद्धांत सामील आहेत असा देखावा निर्माण केला. इंग्रजांवर त्या वेळीं मोठी आपत्ति आणली होती हिटलरनें! अशा वेळीं इंग्रजांना नरम करण्याला बरी संधि आहे, आतां आपल्या स्वराज्याच्या चळवळीला चांगला अवसर आहे, प्रतिपक्षी कमजोर झाला कीं आपल्याला संधि मिळाली, प्रति पक्षावर दुसऱ्या कोणी हल्ला केला कीं आपल्याला बरें वाटावें— अशी सर्वसामान्य चालत आलेली मनोवृत्ति होती. परंतु बापूजींची स्वराज्याची चळवळ शुद्धीवर उभारलेली चळवळ होती. सिद्धीसाठीं वाटेल तें करावें, संधि साधून 'येन केन प्रकारेण' सिद्धि मिळवावी असली भ्याड मनोवृत्ति बापूजींपाशीं नव्हती. प्रतिपक्षी भौतिकदृष्ट्या किती हि बलवान असो, त्याच्या बाजूला सबंध दुनिया का असेना, जर सत्य आपल्या बाजूला आहे तर त्या सत्याचा विजय होईल च होईल. ही जाज्वल्य आत्मनिष्ठा बापूजींपाशीं होती. म्हणून इंग्रज लोक युद्धाच्या पकडींत आहेत अशा वेळीं त्यांच्या कमजोरीपणाचा आपण मुळीं च फायदा घ्यावयाचा नाहीं. एकीकडे ही भूमिका, आणि दुसरीकडे अहिंसेच्या दृष्टीनें कोणत्या हि युद्धाला अहिंसक पुरुषाचा विरोध असला पाहिजे. निदान युद्धविरोधाचें भाषणस्वातंत्र्य तरी प्रस्थापित केलें च पाहिजे, दुसरीकडे हि अन्य भूमिका; अशा पेंचप्रसंगांत बापूजी आणि बापूजींच्या अनुसंधानानें चालणारी काँग्रेस त्या वेळीं पडलेली होती.

या पेंचप्रसंगांतून बापूजींनीं तोड काढली आणि काँग्रेस वर्किंग कमिटीपुढें आपला विचार मांडला. तीन दिवस चर्चा चालू होती. वर्किंग कमिटींतल्या सर्व लोकांना तो विचार पटला नाहीं. पटेल कसा? विचार फार सूक्ष्म होता. युद्धविरोधी भाषणस्वातंत्र्य प्रस्थापित करण्यासाठीं संपूर्ण संयमी, संपूर्ण शुद्ध, संपूर्ण ईश्वरपरायण, संपूर्ण व्रतसंपन्न, काँग्रेसचें आणि बापूजींचे धोरण संपूर्ण आत्मसात् केलेला पुरुष शोधून तद्वारा सत्याग्रह करवून, इंग्रजांच्या अडचणीच्या वेळीं त्यांना पकडींत हि पकडावयाचें नाहीं आणि त्यांच्या पकडींत हि सांपडावयाचें नाहीं, अशी ही मोठी नाजूक योजना होती. यासाठीं च स्वतः बापूजी या सत्याग्रहापासून अलग राहिले. कारण त्यांच्या प्रचंड वजनामुळें इंग्रज अडचणींत सांपडलें असतें. सत्याग्रहाच्या तालमेंत तर पूर्ण सिद्ध परंतु जगतांत पूर्ण अप्रसिद्ध असा सत्याग्रही बापूजींनीं मनापुढें आणला. आपल्या शुद्धीच्या आणि सिद्धीच्या जोरावर इष्टकार्य बिनचूक साधील व अप्रसिद्ध आणि पूर्ण अलिप्त असल्यामुळें कोणावर हि कसल्या हि पूर्वग्रहाचें वजन तर पडणार नाहीं अशा तऱ्हेचा लोकविलक्षण मानसन्मान आणि लौकिकाची ज्याच्याजवळ कांही च किंमत नाहीं असा अलौकिक पुरुष या कार्यासाठीं बापूजींनीं शोधून काढला! शोधून काढला म्हणजे बापूजींनीं योजला इतकें च. त्यासाठीं बापूजींना मोठा शोध करावा लागला असें नाहीं. हा पुरुष त्यांच्याजवळ च होता. परंधाम—पवनार—वर्ध्यापासून फक्त ५ मैलांवर व शेंगांवपासून ३/३॥ मैलांवर—तो रहात होता. बापूजींनीं या कामीं त्याची योजना करण्याचें ठरविल्याबरोबर ते सायंकाळच्या सुमाराला मोटारींतून परंधाम पवनारला आले. बरोबर त्यांनीं आपलें जेवण हि आणलें होतें. चर्चा करतांना अधिक वेळ झाला तर मोटारींतून च जेवण करण्याची त्यांची कल्पना होती. बापूजी परंधाम पवनारला प्रथम च आले होते. पुन्हां कधीं त्यांचें येथें आगमन झालें नाहीं. त्यामुळें त्यांचें शेवटचें आगमन हि हें च. आल्याबरोबर हंसत हंसत ते म्हणाले—"विनोबा तमने केद करवा माटे

आव्यो छुं"—लगे च घोंगडीवर बसून बरा च वेळ दोघांची एकांतांत चर्चा झाली. तींतून वैयक्तिक सत्याग्रहाची अपूर्व योजना जगाला मिळाली.

१९ ऑक्टोबर १९४० च्या हरिजनसेवकमध्यें सत्याग्रह या सदराखालीं बापूजींनीं चार स्तंभाचा विस्तृत लेख लिहून त्यामध्यें आपली योजना जाहीर केली. या योजनेमध्यें सत्याग्रही व्यक्तीच्या शुद्धीवर फार मोठा जोर दिला आहे. कारण अहिंसेच्या अत्यंत नाजूक कसोटीचा हा प्रसंग होता.

"मैंने श्री. विनोबाजी के साथ कई योजनाओं पर चर्चा की है ताकि हम तमाम आवश्यक घर्षण और जोखिम से बचे रहें. विचार यह है कि तमाम कार्रवाई मनुष्य से बन पडे उतनी अहिंसक बनायी जाये!"

"यह देखने की बात है कि मैं शुद्ध अहिंसा का उदाहरण खडा करने में कहां तक कामयाब होऊंगा।"

"मुझसे सवाल पूछा गया है कि अगर मैं सत्याग्रह की शुद्धता को इतना वजन देता हूं तो मैं खुद सिविल नाफरमानी क्यों नहीं करता? जैसे मैं पहले कह चुका हूं कि पहले की तरह इस बार मैं यह इस वास्ते नहीं करना चाहता कि कॉंग्रेस की किसी और कार्रवाई के बनिस्बत मेरे कैद होने से सरकार की परेशानी और भी बढेगी. मैं इसलिए भी बाहर रहना चाहता हूं कि अगर कोई असाधारण स्थिति खडी हो जाये तो उसे मैं काबू में ला सकूं।"

या उताऱ्यावरून सत्याग्रहाच्या शुद्धीवर आणि अहिंसेच्या नाजूक कसोटीवर बापूजींचा केवढा कटाक्ष होता हें समजून येतें. सर्व युद्धांना विरोध, चालू युद्धाला विरोध, या युद्धांत सामील झाल्यानें शास्त्रास्त्रांत प्राविण्य मिळविण्याची संधि म्हणून युद्धाला मदत असे तीन पक्ष त्या वेळीं हिंदुस्थानांत होते. म्हणून केवळ युद्धविरोधी भाषणस्वातंत्र्यासाठीं कॉंग्रेसतर्फे बापूजींनी एकमेव सत्याग्रही निवडला. आणि तो निवडून "श्री. विनोबा भावे कौन है? मैंने उन्हें ही इस काम के लिए क्यों चुना? और किसी को क्यों नहीं?" अशी सुरवात करून, त्याचा आपल्या सहज सरळ आणि संक्षेपयुक्त भाषेंत अगदीं कमींत कमी आणि आवश्यक तो परिचय या च लेखांत १॥ स्तंभांत करून दिला. या च सत्याग्रहाला निवडण्यांत आपली भावना त्यांनीं पुढील शब्दांत व्यक्त केली होती. "मेरी पसंदगी सिद्ध करने के लिए विनोबा का यह परिचय विगतवार देना मुझे जरूरी था। शायद मेरे जीवन में यह अंतिम सत्याग्रह होगा। इसलिए स्वाभाविक रूप से ही मैं चाहूंगा कि यह शुद्धतम हो।" आपल्या आयुष्यांतल्या शेवटच्या सत्याग्रहाला शुद्धतम सत्याग्रही म्हणून "प्रथम सत्याग्रही" असें सत्याग्रहांतलें अग्रेसर स्थान बापूजींनी या पुरुषाला दिलें होतें, ही गोष्ट जशी महत्त्वाची तशी च या सत्याग्रहाची हि या प्रसंगींची भावना पाहणें ही हि गोष्ट अति महत्त्वाची आहे. त्यांच्या पुढील निवेदनांत ती स्पष्टपणें दृग्गोचर होते.

"युद्धविरोधी सत्याग्रहाचा आरंभ करण्याची गंभीर जबाबदारी मी कोणत्या मनःस्थितींत स्वीकारीत आहे आणि माझा काय करण्याचा विचार आहे, ह्याविषयीं कल्पना जनतेला आगाऊं देणें मला कर्तव्य वाटतें. गांधीजींच्या विस्तृत निवेदनांत त्यांनीं आपली योजना मांडली च आहे. माझ्यापुरतें थोडक्यांत निवेदन करीत आहे.

चोवीस वर्षांपूर्वी मी गृहत्याग करून बाहेर पडलों तों केवळ ईश्वर-दर्शनाच्या अभिलाषेनें. जनतेची सेवा हें त्याचें सर्वोत्तम आणि सुलभ साधन अशा दृढ श्रद्धेनें जनसेवेला आतांपर्यंतचें जीवन वाहिलें. ही मीं जनतेची नव्हे पण माझी च सेवा केली असें मानलें आणि अनुभवलें. अनंत दोषांनी भरलेला मी जीव त्याच्या चरणाला पात्र कसा होईन ह्या शिवाय दुसरी तळमळ मला राहिली नाहीं. आज सत्याग्रहाची जबाबदारी उचलीत आहें. त्यांत हि माझ्यापुरता माझा तो च आहे.

अहिंसेविषयीं मला पूर्ण श्रद्धा आहे. मानवसमाजाचे सर्व प्रश्न सोडविण्याचें तें एक च साधन आहे असें मला वाटतें. खादी, हरिजन-सेवा, जातीय ऐक्य इत्यादि विधायक कार्यक्रम ह्या मी अहिंसेच्या च बाह्य प्रवृत्ति समजतो. ह्या प्रवृत्ति चालविण्यांत आणि त्यांचा विकास करण्यांत माझे चोवीस तास खर्च होतात असें म्हणण्यांत अत्युक्ति नाहीं. सरकारनें युद्धविरोधी प्रचाराला मनाई करून ह्या सर्व विधायक प्रवृत्तींच्या मूल आधारावर च घाला घातला असें मला वाटतें. म्हणून व्यक्तिगत सत्याग्रहाच्या आरंभाची जबाबदारी मीं स्वीकारावी असें जेव्हां मला सुचविण्यांत आलें तेव्हां तें मान्य करण्यांत मला विचाराची अडचण वाटली नाहीं.

युद्ध ही वस्तु च मानवाला न शोभणारी आहे असें मी मानतों. त्यांतून लढाऊं आणि बिनलढाऊं लोकांत फरक न करणारें सांप्रतचें यांत्रिक युद्ध ही तर निर्दयतेची कमाल आहे. या युद्धानें मनुष्य पशूच्या अवस्थेला जाऊं पहात आहे. त्यानें कोणाला च लाभ होण्यासारखा नाहीं. हिंदुस्थान स्वराज्याचा उपासक आहे. स्वराज्य म्हणजे सर्वांचें राज्य. हें अहिंसेनें च मिळायचें. कॉंग्रेसनें गेलीं वीस वर्षें अहिंसेची शक्ति निर्माण करण्यांत खर्च केली आणि कांहीं यश हि मिळविलें. जर ह्या युद्धांत हिंदुस्थान जबरदस्तीनें ओढलें गेलें आणि त्याचा आम्ही प्रतिकार केला नाहीं तर कॉंग्रेसची ही कमाई वाया जाणार आहे.

जर्मन नाझीवाद आणि ब्रिटिश साम्राज्यवाद ह्यांत विशेष फरक करण्याचें कारण नाहीं. लोकशाहीच्या बचावासाठीं आम्ही लढत आहोंत असें ब्रिटिश मुत्सद्दी म्हणतात. पण हिंदुस्थानला लोकशाही लागू करण्याची त्यांची तयारी दिसत नाहीं. उलट अगदीं साधें अहिंसेच्या मर्यादेंतलें भाषणस्वातंत्र्य हि ते नाकारतात. मग काय करावें? स्वस्थ बसावें तर हिंसेचा प्रचार होतो आणि अहिंसेची गळचेपी होते. उलट संकटांत सांपडलेल्या सरकारला अडचणींत टाकण्याचें हि अहिंसेला जमत नाहीं. म्हणून व्यक्तिगत सत्याग्रहाचा मार्ग गांधीजींनीं निश्चित केला आणि त्याचा हि आरंभ तूर्त एका च व्यक्तीपासून करण्याचें ठरवून तें अतिशय कठिण पण अहिंसक या नात्यानें मला टाळतां न येण्यासारखें काम माझ्यावर सोंपविलें आहे.

सरकारनें मला मोकळें ठेवलें तर लोकांत जावें आणि युद्धांत भाग न घेण्याविषयीं त्यांना मला साधेल तितक्या सौम्य भाषेंत विनवावें असें मीं ठरविलें आहे. तसें करतांना अहिंसेचें एकंदर तत्त्वज्ञान आणि चालू युद्धाची भयानकता मी लोकांना समजावीन. नाझीवाद, फाशीवाद, साम्राज्यवाद, हे एका च माळेचे मणी कसे आहेत तें माझ्या दृष्टींनें मी दाखवीन. कॉंग्रेसनें आपलें ध्येय कायम ठेवून, पण सरकारला अडचणींत न टाकावें म्हणून उत्तरोत्तर कमी मागण्या कशा केल्या आणि शेवटची केवळ जिवंत राहण्यापुरती पुष्कळांच्या दृष्टींनें अगदीं मिळमिळीत भाषणस्वातंत्र्याची मागणी केली, ती हि कशी नाकारली गेली हा इतिहास मी लोकांना सांगेन. सारांश, चालू युद्धाला कोणत्या हि प्रकारें मदत करणें कसें अयोग्य आहे हें लोकांना विचारानें पटविण्याचा प्रयत्न करीन. शेवटीं युद्धांत मदत न करण्याच्या पवित्र पण अकरणात्मक

कर्तव्याबरोबर प्रत्यक्ष करण्याचा खादी इत्यादि विधायक कार्यक्रम लोकांनीं जोरानें कसा करावा हें हि मी लोकांना सांगेन.

माझ्यावरची जबाबदारी अतिशय मोठी आणि मी तर अनेक दोषांनीं भरलेला ह्याची जाणीव मला आहे. तिचा जर मी विचार करीत बसलों तर माझें धैर्य च खचून जाईल. पण तें खचून जात नाहीं ह्याचें एक च कारण आहे. तें हें च कीं ईश्वराच्या कृपेनें आणि सज्जनांच्या आशीर्वादानें ही जबाबदारी माझे दोष जाळण्याला उपयोगी होईल अशी मी उमेद करीत आहे. ईश्वर मला बळ देवो."

**विनोबा.**

—"ईश्वरदर्शनाशिवाय दुसरी तळमळ नाहीं" आणि "मी अनेक दोषांनीं भरलेला जीव आहे" या निवेदनांतल्या नुसत्या दोन वाक्यांत च आत्मशुद्धीची संपूर्ण कल्पना स्पष्ट होण्याजोगी आहे. आत्मशुद्धि म्हणजे ईश्वराचा शोध आणि आत्मशुद्धि म्हणजे जीवाच्या ठिकाणीं असलेल्या अशुद्धीचा विनाश. या दोन्ही गोष्टींसाठीं च आतांपर्यंत ज्याचें सर्व प्रतिभामय जीवन खर्ची पडलें त्याच्या या निवेदनांत जबाबदारीची पूर्ण जाणीव आणि अहिंसक पद्धतीचा सर्व उलगडा उत्तम तऱ्हेनें यावा यांत आश्चर्य नाहीं. प्रथम सत्याग्रही म्हणून स्वीकारलेलें कार्य यशस्वी व्हावें म्हणून पुढीलप्रमाणें वडिलांचा आशीर्वाद हि मागितला होता.

पवनार :

दिनांक १३ ऑक्टोबर १९४०.

पूज्य बाबा,

माझें सत्याग्रहाचें ठरलें आहे. एक दोन दिवसांचा अवधि आहे. सरकार काय करतें तें कळेल च. भाषणस्वातंत्र्याचा अधिकार गमावण्याची तयारी करणें म्हणजे आत्मनाश च आहे. त्यामुळें भाषणाचा हक्क बजावणें भाग आहे. युद्धकार्यांत लोकांनीं मदत करूं नये हें त्यांना समजावून सांगायचें आहे.

मीं हें आशीर्वाद मागण्यासाठीं लिहीत आहे. तुमच्या जीवनांतून मला जें शिक्षण मिळालें आहे तें निरंतर उपयोगी पडत आहे.

शिवाजी गीताईच्या प्रचारांत सोलापूरकडे हिंडत आहे. त्यानें लिहिलेंलें 'भाष्य' तुम्हांला मिळालें आहे च. उत्तम मेहनतीनें लिहिलें आहे. बाळकोबा पंचगणीला आहे. त्याची तब्येत सुधरत आहे. रामेश्वरजी आज येथें आहेत. आज संध्याकाळीं धुळ्यास जातील.

विनाबाचे साष्टांग प्रणाम.

अशा रीतीनें सत्याग्रहाची सर्व तयारी होऊन युद्धविरोधी भाषणस्वातंत्र्याचा पहिला सत्याग्रह १७ ऑक्टोबर १९४० रोजीं पवनार येथें झाला. खरा हिंदुस्थान खेड्यांत असल्यानें, परंधाम पवनारजवळ असल्यानें स्वाभाविकपणें च सत्याग्रहाला हें स्थान पसंत केलें गेलें. यापुढचा सत्याग्रह हि खेड्यांत च करण्याचें आचार्यांनीं ठरविलें. बापूजींनीं हि ती गोष्ट समुचित मानली आणि त्याप्रमाणें लेख हि लिहिला. पवनार वर्ध्यापासून पांच मैलावर असल्यानें वर्ध्याहून कांहीं मंडळी आचार्यांचें युद्धविरोधी भाषणस्वातंत्र्य प्रस्थापित करणारें पहिलें भाषण ऐकण्यासाठीं गेलीं होती. भाषण सुरू करण्यापूर्वीं अनेक सुताचे हार

घालण्यांत आले. या भाषणाला पवनारच्या लोकांप्रमाणें आचार्यांच्या नित्यसहवासांतल्या निरनिराळ्या संस्थांत काम करणारी मंडळी, महिलाश्रमाच्या मुली, आश्रमांतले कार्यकर्ते, जमनालालजी, महादेवभाई असा मेळावा जमलेला होता. महादेवभाई भाषण उतरवून घेत होते. मधून मधून पाऊस पडत होता तरी लोक भाषण ऐकण्यांत तल्लीन झाले होते. भाषण चालू असतां एकानें फोटो हि घेतलेला आढळून आला.

या सत्याग्रहाच्या प्रसंगानें सर्व हिंदुस्थानभर एक मोठा आश्चर्याचा धक्का बसला. सत्याग्रहाची ही अपूर्व रीत आणि अप्रसिद्ध अशा या सत्याग्रहाचें बापूजींनीं स्वतः केलेलें वर्णन त्यामुळें या सत्याग्रहासंबंधीं माहिती छापण्याची चोहोंकडे एक च धडपड सुरू झाली. पण माहिती कोठून मिळणार? ताबडतोब माहिती मिळाल्याखेरीज ती वर्तमानपत्रांत छापणार कशी? अशी जरी अडचण होती तरी कांहीं वर्तमानपत्रांना महादेवभाईंनीं बापूजींच्या बरोबर च २० ऑक्टोबर १९४० च्या हरिजनमध्यें लिहिलेल्या “An acceptable sacrifice” या लेखाचा आधार मिळाला. महादेवभाईंनीं झेंडा सत्याग्रहाच्या वेळीं आचार्यांविषयी लिहिलेल्या लेखाचा च या लेखांत पुनरुच्चार केला होता. महादेवभाई या लेखाच्या शेवटीं म्हणतात— “It is to such a one the honour has come of being the first Satyagrahi in a Campaign that Gandhiji will strive to make the most unsallied from the point of view of non-violence to be chosen for the honour is a great thing; to have been chosen without having ever desired it is greater still.”

भावे कुलवृत्तांतांत वडिलांच्या आग्रहांमुळें शिवाजींनीं पूर्वी च लिहिलेलें संक्षिप्त जीवनचित्र मराठी वर्तमानपत्रांनीं समग्र दिलें होतें. ब्रह्मचर्य, ब्रह्मचिंतन, ब्रह्मविहार अशी आचार्यांची तिहेरी भूमिका थोडक्यांत त्यांत दिलेली होती. काकासाहेब कालेलकर, दादा धर्माधिकारी वगैरेंनीं हि त्या वेळीं आचार्यांविषयीं लेख लिहिले होते. स्वाभाविकपणें च वर्तमानपत्रांतल्या या लेखांत गुणगौरव होता. बापूजींनीं या पुरुषाला एकदम केवढी मोठी प्रसिद्धि दिली त्याबद्दलचा मजकूर हि पुष्कळांनीं दिला होता.

कीर्ति ही हा पुरुष किती तुच्छ मानीत असे याची लोकांना यत्किंचित हि कल्पना नव्हती. बापूजींनीं प्रकाशांत आणला म्हणून च हा पुरुष हिंदुस्थानपुढें आला. अन्यथा आला नसता ही गोष्ट सर्वथैव खोटी होती. ज्या मानानें याची योग्यता होती त्याच्या शतांश हि बापूजी त्याला प्रकाशांत आणूं शकले नाहींत, कारण मूळची निर्गुण भूमिका सगुणांत पूर्णपणें आणणें ही गोष्ट सर्वथैव अशक्य होती. वास्तविक हा स्वयंप्रकाश होता.

‘न तत्र सूर्यो भाति न चंद्रतारकं नेमा विद्युनो भांति कुतोऽयमग्निः’ असला विलक्षण आध्यात्मिक प्रकाश या पुरुषाजवळ होता. तो अप्रसिद्ध होता तरी स्वतःसिद्ध होता. प्रसिद्धीनें त्याला सिद्धि मिळावयाची नव्हती. ती त्याच्याजवळ अगोदर च होती. प्रसिद्धीचा प्रकाश पडून त्याला कोणती हि नवीन खुलावट प्राप्त होत नव्हतीं. अरेरे! हें रत्न अद्यापि आपल्याला माहीत नव्हतें ना! आपण त्याच्या लाभापासून वंचित च राहिलों ना? बरें झालें, त्याच्या माहितीचा आतां आपण लाभ प्राप्त करून घेऊं; असली वृत्ति जवळ जवळ कोणाची च नव्हती. ज्याला त्याला वाटे या पुरुषाला प्रसिद्धीचा केवढा मोठा लाभ मिळाला! काय नशीब याचें! महात्माजींनीं केवढें अद्वितीय स्थान याला दिलें! “कोष्येष संप्रति नवः पुरुषावतारः” म्हणून हिंदुस्थानभर ज्याच्या त्याच्या तोंडी हा कसा जाऊन बसला! याचा अर्थ इतका च कीं आत्मप्रतिष्ठा हा च मोठा पुरुषार्थ लोक समजत होते. सत्याग्रही मनुष्याला सत्याखेरीज अन्य वस्तूचें महत्त्व च असतां कामा नये. परंतु लोक असे विलक्षण कीं सत्याग्रहांतून हि प्रसिद्धि काढतील! निष्काम कर्माचें हि फळ विचारतील! तुकाराममहाराजांनीं उगी च म्हटलें नाहीं.

अनुक्रमणिका

**“लोक जैसा ओक धरितां धरवेना ।**
**अभक्तां जिरेना संतसंग” ॥**

या सत्याग्रहाच्या निमित्तानें हा महापुरुष पुढें आला. त्याचा सत्संग पाश्चात्यविद्याविभूषित वर्तमानपत्री चळवळ्या लोकांना मुळीं च जिरवितां आला नाहीं. म्हणून स्वाभाविकपणें च यापुढचीं सत्याग्रहाचीं भाषणें खेड्यांतल्या भाविक लोकांपुढें केलीं गेलीं.

पवनार, सुरगांव, सेलू, देवळी या चार ठिकाणीं युद्धविरोधी भाषण स्वातंत्र्याचा हक्क बजावण्यासाठीं भाषणें झालीं. सर्व ठिकाणीं भाषणांचें रिपोर्ट महादेवभाई देसाई यांनीं घेतले. उत्तरोत्तर भाषणांत सौम्यता येत चालली होती. शेवटीं देवळीहून पहांटे रोहिणी या खेड्याकडे जाण्याला निघण्याच्या वेळीं च (ता. २१–१०–४०) अटक झाली. प्रार्थना करण्यासाठीं पोलिसांकडून थोडा वेळ मागून घेण्यांत आला. लगेच प्रार्थना झाल्याबरोबर ४॥ ला पोलिसांनीं या प्रथम सत्याग्रहीला मोटारींतून वर्धा जेलमध्यें नेलें. जेलमध्यें दुपारीं १२ । वाजतां खटला चालला त्या वेळीं महादेवभाई देसाई, जाजूजी, किशोरलालभाई, राजकुमारी अमृतकुंवर आणि जमनालालजी अशी निवडक मंडळी हजर होती. भारत संरक्षण कायद्याच्या ३४ व ३८ कलमांखालीं अटक केली गेली होतीं. कोर्टांत आचार्यांनी आपलें निवेदन सादर केलें होतें व आपला धंदा सूत कांतणें असा सांगितला होता. कोर्टानें तीन महिन्यांची साधी सजा दिली. या सजेचे प्रतिध्वनि चोहोंकडे उमटले. ठिकठिकाणीं हरताळ पाळले गेले. मुंबई कॉर्पोरेशनची बैठक तहकूब झाली. भुलाभाई देसाईसारख्यांचीं भाषणें झालीं. या सर्व गोष्टी स्वाभाविकपणें स्वयंस्फूर्तीनें झाल्या. वास्तविक बापूजींनीं हरताळ पाळणें वगैरे गोष्टींना अनुमति दिलेली नव्हती. परंतु वर्ध्यासारख्या ठिकाणीं जेथें आचार्यांचा अनेक लोकांवर आणि संस्थांवर दृढपरिणाम झालेला होता, तेथें अशा गोष्टी अपरिहार्य समजून त्यांना या बाबतींत मनाई हि करण्यांत आली नव्हतीं. सजा झाल्यानंतर आचार्यांना नागपूर जेलमध्यें नेण्यांत आलें.

आचार्य आतांपर्यंत विधायक कार्यक्रमांत सर्वांना मार्गदर्शक ठरलेले च होते. परंतु राजकारणादि जीवनाच्या इतर सर्व विषयांत हि त्यांच्यापासून नवीन प्रेरणा प्राप्त होईल अशी शक्ति त्यांच्याजवळ स्वयंसिद्धपणें आहे याची कल्पना हिंदुस्थानांतल्या अनेक लोकांना नव्हती. कॉंग्रेसतर्फे आणि बापूजींतर्फें प्रथम सत्याग्रही म्हणून आचार्य जे पुढें आले तो केवळ एक योगायोग नव्हता. तें परमसत्य होतें. कॉंग्रेसच्या राजकारणांत आणि बापूजींच्या अनेक सार्वजनिक प्रवृत्तींमध्यें मुळीं च नसून हा पुरुष एकदम कॉंग्रेस आणि बापूजींचा एकमेव प्रतिनिधी बनू शकला ही आश्चर्यकारक घटना नव्हे. तो आतांपर्यंत प्रतिनिधीस्वरूपांत कोणाला दिसला नव्हता, तरी जसा गुरूत्वमध्यें हा कोणाला दिसत नसून ही वस्तूचा तोल त्यामुळें च रहात असतो. त्याप्रमाणें त्याची स्थिति होती. गुरूत्व ज्याच्यापाशीं आहे, तो अप्रसिद्ध असो, दिसण्याला लघु असो, कोठें ही तो दडलेला असो, त्याचे आकर्षण हें सर्वांवर लागू व्हावयाचें च.

**कुसुमस्तबकस्येव द्वे गतीह मनस्विनः ।**
**मूर्ध्नि वा लोकस्य शीर्यते वन एव वा ॥**

भर्तृहरीनें एका च श्लोकांत ही भूमिका अत्यंत मार्मिक तऱ्हेनें विशद केली आहे. कित्येक योग्यता नसतां प्रतिनिधित्व करीत असतात. कित्येकांची योग्यता असून त्यांना प्रतिनिधित्व प्राप्त होत नाहीं. परंतु या वेळीं योग्यता आणि प्रतिनिधित्व यांचा संपूर्ण मेळ जमला होता. यानंतर वैयक्तिक सत्याग्रह्यांच्या हिंदुस्थानभर प्रांतोप्रांती अनेक मालिका तयार झाल्या. त्यांत अनेक श्रेष्ठ आणि कर्ते पुरुष होते. परंतु ह्या प्रथम

सत्याग्रह्याच्या तोडीची दुसरी व्यक्ती उभ्या हिंदुस्थानांत आढळली नाहीं हें हिं तितकें च खरें आहे. त्यामुळे हा केवळ प्रथम सत्याग्रही च नव्हता तर खरोखर तो अद्वितीय सत्याग्रही होता. आणि म्हणून “अनामिका सार्थवती बभूव” ही कालीदासाच्या बाबतींतली उक्ति या सत्याग्रहाच्या बाबतींत येथे संपूर्णपणे सार्थ ठरली यांत तिळमात्र शंका नाहीं.

●●●

अनुक्रमणिका

## प्रकरण ५७ वें

# अद्वैत दर्शन

### (वर्धा शिक्षण योजना)

**बरें सत्य बोला यथातथ्य चाला । बहु मानिती लोक तेणें तुम्हांला ।**
**धरा बुद्धि पोटीं विवेकीं मुलें हो । बरा गुण तो अंतरामाजि राहो ॥ १ ॥**
**सदा दांत घोसिनि तोंडा धुवावें । कळाहीन घाणेरडे तें नसावें ।**
**सदा सर्वदा प्रेत्न सोडूं नका रे । बहुसाल हा खेळ कामा नये रे ॥ २ ॥**
**दिसांमाजि कांहीं तरी तें लिहावें । प्रसंगी अखंडीत वाचीत जावें ।**
**वयें श्रेष्ठ रे दास्य त्याचें करावें । बरें बोलणें सत्य जीवीं धरावें ॥ ३ ॥**
**बहु खेळ खोटा सदालस्य खोटा । समस्तांसि भांडेल जो तो करंटा ।**
**बहुतां जनालागि जीवें झिजावें । भलें सांगती न्याय तेथें भिजावें ॥ ४ ॥**
**हिसेबी सदा न्याय सांडूं नका रे । कदाचित अन्याय होतां धका रे ।**
**जनीं सांडितां न्याय रे दुःख होतें । माहा सुख तें ही अकस्मात जातें ॥ ५ ॥**
**प्रचीतीविणें बोलणें वेर्थ वाया । विवेकविणें सर्व ही दंभ जाया ।**
**बहु सज्ञला नेटका साज केला । विचारेविणें सर्व ही वेर्थ गेला ॥ ६ ॥**
**वरी चांगलें अंतरीं गोड नाहीं । तया मानवाचें जिणें वेर्थ पांहीं ।**
**वरी चांगलें अंतरी गोड आहे । तयालागि कोणी तरी शोधिताहे ॥ ७ ॥**
**सदा अंतरीं गोड ते सांडवेना । कदा अंतरीं वोखटें तें खपेना ।**
**म्हणोनी बरा गुण आधीं धरावा । महा घोर संसार हा नीरसावा ॥ ८ ॥**
**भला रे भला बोलतीं तें करावें । बहुतां जनांच्या मुखें येश घ्यावें ।**
**पुढें सेवटीं सर्व सांडूनि जावें । मरावें परी कीर्ति रूपें उरावें ॥ ९ ॥**

**शिक्षणाचें** कार्य एका दृष्टीनें अगदींच सोपें आहे आणि एका दृष्टीनें अतिशय कठिण आहे. ज्याच्याजवळ ज्ञानाचा अधिकार आहे आणि कळकळीचें हृदय आहे तेथें समर्थांच्या उपदेशाप्रमाणें शिक्षणबोध सहजच स्फुरत जातो. समर्थांनीं अगदीं लहान मुलांना म्हणून परंतु अतिशय कळकळीनें हा बोध दिला आहे. त्यांत किती सहजतेनें आणि कळकळीनें समर्थ सांगत आहेत. या त्यांच्या सांगण्यामध्यें जें शिक्षण भरलें आहे तें कृत्रिम तऱ्हेनें हजार प्रकार करून मिळण्याजोगें नाहीं. आणि तें केवळ लहानांना च उपयोगी आहे असें ही नाहीं. तें सर्वोपयोगी आहे. खरोखर थोर शिक्षकाला शिकविणें ही एक लीला आहे । त्याला शिकवावें कसें हें माहीत नसून हि त्याच्या इतके उत्तम कोणी च शिकवूं शकत नाहीं. त्याला शिकवावें कसें हें माहीत नसतें याचा अर्थ या बाबतींत तो एवढा वैभवशाली असतो कीं, शिकविण्याच्या तऱ्हांची गणती त्याच्यापाशीं असूं शकत नाहीं. महासागरावरच्या लाटांचा का हिशोब आहे? कां त्यांची कांहीं पद्धती आहे? बिलकूल बेहिशेबी बिनपद्धतीच्या जीवनाच्या प्रचंड ऊर्मि! तेथें जीवनाची नुसती लयलूट!! तेथें उणीवेचें नांव नाहीं!!! कुबेराच्यापाशीं गेल्यावर त्याला कोणी विचारलें कीं मला तुम्ही धन द्याल तें कसकशा क्रमानें द्याल? प्रथम खुर्दा अधिक द्याल? का बंदे नाणें अधिक द्याल? का सोन्याचांदीच्या लगडीं द्याल? तुमची पद्धती काय आणि तुम्ही किती द्याल? कुबेरापाशीं असला कृपण हिशेब कोठला! तो म्हणेल मी वाटेल तितकें आणि

वाटेल तसें धन देईन! हेंच खरें उदार शिक्षण! बाकीचें पद्धतींत बसविलेलें तोलून जोखून दिलेंलें शिक्षण किती कां चांगलें असेना तें कृपण-शिक्षण यांत शंका नाहीं!

परंतु असले आचार्यांसारखे बोधाचे सागर; शिक्षणाचे कुबेर; अनुभवाचे हिमालय कोठून लाभणार? म्हणून परमकारुणिक होऊन बापूजींनीं एका निमित्तकारणांनें वर्ध्याला शिक्षणाची एक परिषद भरवली. त्या परिषदेंत निरनिराळ्या पद्धतींच्या कसरती जाणणारे तज्ञ आणि त्या तऱ्हेचे विचारी शिक्षणशास्त्रज्ञ; त्याचप्रमाणें अर्थशास्त्रज्ञ आणि शिक्षणमंत्री; राष्ट्रीय शिक्षणाचे अनुभवी लोक आले होते. बापूजींनी या परिषदेचें अध्यक्षस्थान स्वीकारलें होतें. ही गोष्ट सर्वथैव योग्य झाली. शिक्षणाची पद्धति जी दाखवावयाची; शिक्षणाचे प्रकार जे मांडावयाचे तें आत्मवैभवी पुरुषाचें च काम. उत्तम तऱ्हेंचें पक्वान्न बनवावयाचें तें गर्भश्रीमंताच्या साहित्यानें च बनविणें योग्य. करंट्यांच्या घरच्या दरिद्री तऱ्हांनीं आत्मतृप्ती होईल असें पक्वान्न बनवावयाचें नाहीं. म्हणून बापूजींनीं वर्धाशिक्षणपरिषदेंत जें प्रथम भाषण केलें तींत आणि तत्पूर्वी हरिजनमध्यें आचार्यांना एक प्रकारें केंद्र करून आपलें शिक्षणविषयक विचार मांडलें. हा यासंबंधीचा हरिजनबंधूमधला उतारा—

“यद्यपि विनोबा और मैं केवल पांच मील के अंतर पर रहते हैं, फिर भी चूं कि दोनों अपने-अपने काम में लगे हुए हैं, और दोनों का स्वास्थ्य भी कुछ गिरा हुआ है, इसलिए हम क्वचित ही एक-दुसरे से मिल पाते हैं। अतएव बहुत कुछ काम पत्रव्यवहार से कर लेते हैं।”

“आपके शिक्षा-विषयक ताजे विचार मुझें बहुत ही रुचे हैं। मेरे विचार इसी दिशा में काम कर रहे हैं। ‘उद्योग-शिक्षण’ इस तरह की द्वैतभाषा मुझे अच्छी ही नहीं लगती। मैं तो ‘उद्योग-शिक्षण’ के अद्वैती समीकरण में विश्वास रखता हूं। निःसंदेह मैं यह मानता हूं, कि शिक्षा स्वावलंबी हो सकती है। मैं तो समझता हूं कि जिसमें स्वावलंबन नहीं, ग्रामों की दृष्टी से, उसे हम शिक्षा कह ही नहीं सकते। इस विषय में आपके विचारों से मैं पूरी तरह सहमत हूं। इसलिए इस पर विशेष रूप से कुछ लिखने की इच्छा नहीं होती। हाँ, इनका प्रयोग करने की इच्छा होती है। कुछ किया भी है, और ईश्वर की मर्जी हुई तो इस विषय का अंतिम निर्णय करने की भी आशा रखता हूं।”

ये विचार विनोबा के ऐसे ही एक पत्र से मैने लिए है। मेरी दृष्टी में इनका बहुत महत्त्व हैं; क्योंकि इस दिशा में जो प्रयोग विनोबा ने किये हैं, उतने जहां तक मैं जानता हूं, मैने या मेरे दूसरे साथियों में से किसी ने नहीं किये हैं। तकली की गति में जो क्रांतीकारक वृद्धि हुई है, उसकी जड में विनोबा की प्रेरणा और उनका अथक श्रम रहा है। बडी संस्था का संचालन करते हुए भी उन्होंने आठ-आठ, दस-दस घंटों तक चर्खे और तकली पर काम किया हैं, और शिक्षण में इस उद्योग को उन्होंने शुरू से महत्त्व का स्थान दिया है। अतएव जिसे मैं अपनी मौलिक शोध मानता हूं—मेरा मतलब—उद्योग द्वारा स्वावलंबी शिक्षा से हैं—उससे विनोबा सहज ही पूरी तरह सहमत हैं। यह चीज मेरे लिए तो बहुत ही उत्साह-वर्धक है। मैंने उनका यह मत इसलिए यहां दिया है कि जो विनोबा को पहचानते हैं, वे इससे अपनी श्रद्धा को बलवान बनायेंगे अथवा जिनमें श्रद्धा नहीं हैं, वे श्रद्धालू बनेंगे।

श्री. विनोबा का समर्थन मेरे लिए कोई नयी बात नहीं है। और ‘हरीजन-बंधु’ के पाठकों को भी इसमें कोई नयापन नहीं मालूम होगा। लेकिन उनके समर्थन का न मिलना मेरे लिए बडी दुविधा की बात हो

अनुक्रमणिका

जाती है। जिस चीज को मैं अपने पुराने-से-पुराने साथियों को न समझा सकूं, उसे जनता को समझाने की कोशिश, न सिर्फ मेरी मूर्खता, बल्कि धृष्टता भी समझी जायेगी। (हरिजन बंधु १० : १० : १९३७).

इसलिये मेरी दरख्वास्त यह है कि हम सिर्फ उद्योग या दस्तकारी ही न सिखायें, बल्कि इन्हीं के जरिये बच्चों को सारी तालीम दें। मसलन् तकली ही को ले लीजिए। इस तकली का सबक हमारे विद्यार्थी का पहला सबक होगा, जिसके जरिये वह कपास का, लंकाशायर का और अंग्रेजी सल्तनत का बहुत इतिहास सीख सकेगा। मैं खुद भी यह कर रहा हूं। (शिक्षा में अहिंसक क्रांति कार्यविवरण पृ. ७).

"तकली को मैंने एक मूर्त उदाहरण के रूप में सुझाया है, क्योंकि विनोबा को इसका सबसे ज्यादा व्यावहारिक अनुभव है। अगर इसके बारें में किसी के कुछ एतराजात हों, तो उनका जबाब देने के लिए वह यहां मौजूद है।" (शिक्षा में अहिंसक क्रांती कार्यविवरण पृ. ११).

या लहानशा तीन उताऱ्यांवरून हि बापूजींच्या शिक्षणयोजनेचें रहस्य येण्याजोगें आहे. आचार्यांना बापूजींनीं या नव्या शिक्षण योजनेचा एक प्रकारें अध्वर्यु ठरविला तरी खुद्द बापूजींची जीवननिष्ठा आणि सबंध आयुष्य या योजनेपाठीमागें खर्च झालेलें होते. थेट दक्षिण आफ्रिकेंतील फिनिक्स आणि टॉल्स्टाय फार्म येथील अनुभव, साबरमतीच्या राष्ट्रीय शाळेचा आणि आश्रमाचा अनुभव, गुजराथ-विद्यापिठाचा अनुभव बापूजींच्यापाशीं भरपूर होता. हिंदुस्थानांतल्या राष्ट्रीय शाळांचा अनुभव, शांतीनिकेतन, गुरुकुल कांगडी, जामिया मिलिया, टिळक महाविद्यालय, दक्षिणामूर्ती, प्रो. कर्व्यांची स्त्रीशाळा अशा अनेक संस्थांची माहिती प्रत्यक्षपणानें बापूजींच्या पाशीं होती. सर्व हिंदुस्थानभर सतत फिरल्यामुळें महत्त्वाची एक हि शिक्षण संस्था, महत्त्वाची एक हि शिक्षण प्रवृत्ति बापूजींच्या नजरेंतून सुटलेली नव्हती. त्यामुळें बापूजी स्वतः मोठे शिक्षण शास्त्रज्ञ म्हणून जरी पुढें आलेले नव्हते तरी त्यांच्या या बाबतींतल्या अनुभवाला, अवलोकनाला, जगांत तोड नव्हती, असेंच मानावें लागतें. बापूजींनीं स्वतःच्या बिनतोड जीवननिष्ठेंनें ही योजना पुढें मांडली आणि आचार्यांसारख्या आत्मवैभवी पुरुषाला केंद्र करून तिचें कार्य चालू केलें या दुहेरी गोष्टीमुळें या योजनेला फार मोठी स्वगत शक्ति प्राप्त झाली.

या शिक्षण पद्धतींतली अतिशय वैभवशाली गोष्ट म्हणजे ती परिश्रमनिष्ठेवर, स्वावलंबनावर, अहिंसेवर आणि ग्रामसेवेवर उभारलेली आहे.

**अंगानां मर्दनं कृत्वा श्रमसंजातवारिणा ।**

आपल्या निढळाच्या घामाची भाकर खाऊं. भाकरींसाठीं खर्डेघाशीची चाकरी करण्याची केविलवाणी अवस्था न यावी अशी महान उत्साहाची ही योजना होती. आपल्या डोळ्यांपुढें जी सृष्टि दिसते त्या सृष्टीला आकार देऊन जीवन निर्माण करण्याची कला या शिक्षणपद्धतींत गृहीत होती. हिंदुस्थानांत चोहींकडे जमीन पसरलेली आहे; या जमिनीची मशागत कशी करावी, येथें सर्वोत्कृष्ट धान्य कसें पिकेल, येथें भाजी आणि फळें उत्तम तऱ्हेनें कशीं निर्माण करतां येतील, येथें हरतऱ्हेची इमारती आणि जळाऊ लाकडें कशीं उत्पन्न करतां येतील, येथल्या वृक्षवनस्पती वेलींझाडें या सर्वांचा अन्न, औषध, जळण, घरें, हत्त्यारें, नावा, पूल, तेलघाणें इत्यादीं जीवनाच्या हरतऱ्हेच्या बाबींसाठीं कसा उपयोग करतां येईल. येथल्या दगडांचा काय उपयोग होईल. पाटे, वरवंटे, दगड्या, प्याले, डोण्या, डबर, फरश्या, मूर्ती, इत्यादी अनेक तऱ्हेनें दगडाचें रूपांतर कसें करतां येईल, मातीचीं मडकीं, गाडगी, रांजण, परळ, कुंडे, विटा, कौले, तवे, माठ इत्यादि

वस्तू कशा बनवितां येतील, मातीचा रोगनिवारणार्थ कसा उपयोग होईल, पानापाचोळ्याचा खतांत उपयोग कसा होईल, पानाचे द्रोण, केरसुण्या, झाप, चट्या कशा तयार करतां येतील. लोखंड, तांबे, पितळ, कासें या सर्वांचे काय काय बनवितां येईल, विहिरी कशा पाडाव्या, बंधारे कसे घालावे, दोर कसे वळावें, घरें कशीं बांधावीं, खतें कशीं तयार करावीं, फळांचे रस कसे टिकवावे, मधमाशा कशा पाळाव्या, कागद कसे तयार करावे, शिंदी ताडी इत्यादींपासून गुळसाखर कशी तयार करावी, गुरांची जोपासना कशी करावी, दूध कसें वाढवावें, चामड्याचा उपयोग कसा करावा, जीवनाला लागणाऱ्या यच्चयावत् गोष्टी सृष्टीपासून कच्च्या स्वरुपांत मिळतात त्या आपल्याला उपयोगी पक्क्या स्वरूपांत कशा रूपांतरीत करून घ्याव्या ही उद्योगी दृष्टि, जें जें दृष्टीस पडेल तें तें उपयोगांत आणून रूपांतरीत करून तेथें जीवन निर्माण करण्याची दृष्टि, सर्वत्र सुव्यवस्था, जीवन, ज्ञान आणि आनंद निर्माण करण्याची दृष्टि विद्यार्थ्याला मिळाली पाहिजे हा या शिक्षणयोजनेंतला महान आशय होता. एवढ्यासाठीं वस्त्रविद्या आणि तिची प्रतिनिधी तकली. तिला बापूजींनीं हस्तोद्योग, ग्रामोद्योग, या दृष्टीनें शिक्षणाचा मूलोद्योग, शिक्षणाचा नेत्र, शिक्षणाचें वाहन किंवा शिक्षणाचा मध्यबिंदु बनविला, कारण आबालवृद्धांना ही गोष्ट आवश्यक आहे. एक वेळ मनुष्य अन्नावांचून राहील पण वस्त्रविहीनता सभ्यतेच्या विरूद्ध आहे. समाजांत वस्त्रांवाचून क्षणभर हि राहणें शक्य नाहीं. शिवाय चरखा तकली कांतणें ही गोष्ट सर्वांना शक्य हि आहे. म्हणून कापूस लावण्यापासून, निंदण्यापासून, कापूस वेचणीपासून तों सरकी काढणें, खांडणविंचरण आणि अनेक पद्धतीनें पिंजणें, तकलीवर, चरख्यावर उत्तम सूत काढणें, कापड विणणें, नौवार नाड्या, आसनें, टॉवेल, सतरंज्या, धोत्रें, लुगडीं तयार करणें, दुबटा करणें असल्या सर्व गोष्टींचें शास्त्रशुद्ध हस्तोद्योगी, गृहोद्योगी आणि ग्रामोद्योगी शिक्षण देणें हें या पद्धतीचा प्राण गणलें गेलें होतें.

**शरीरा शरीरश्रमें अन्न द्यावें ।**
**शरीरश्रमाचा चि भोक्ता असावें ॥**

ही दृष्टि आणि कुवत विद्यार्थ्यांत जर आली तर शरीरश्रम टाळून दुसऱ्याच्या परिश्रमानें मिळालेले पदार्थ उपभोगण्याची जी वृत्ति जगभर फैलावली आहे. आणि विषमतेचें मुख्य बीज च जिच्यामध्यें भरलेलें आहे ती नष्ट होईल असा या शिक्षणपद्धतींत अखिल जीवनव्यापी विशाल दृष्टीकोन भरलेला होता. शिवाय शिक्षण म्हणजे केवळ लिखापढी किंवा केवळ षोपटपंची अथवा केवळ बुद्धिजीवन ही जी समजूत सर्वत्र पसरलेली आहे, तिचा उच्छेद या पद्धतीनें होईल आणि लेखन, वाचन, पठन आणि बौद्धिक विकास हा उद्योगाबरोबर च होऊं शकतो. आणि तसा तो झाला तर च तो समर्थ आहे. या पद्धतीनें सर्वत्र समजून येईल हे हि या पद्धतीचें वैशिष्ट्य होतें.

लेखन, वाचन आणि उद्योग हें च काय परंतु जीवनांतली कोणती हि वस्तु विभाग पाडून शिकविणें ही गोष्ट च खऱ्या शिक्षणाला मारक आहे. जीवनांतले क्रिया आणि बोध हे दोन अविभाज्य अंश असून यच्चयावत् सर्व विषय परस्परसंबद्ध, परस्परनिगडित, परस्परांत मिसळलेले, परस्परावलंबी असे आहेत. त्यामुळें समवाय पद्धतीनें न शिकविलेला हरतऱ्हेचा उद्योग हि लंगडा ठरतो. ज्याप्रमाणें केवळ लिखापढी बौद्धिक विषय समवायी उद्योगाच्या अभावी असमर्थ ठरतात. म्हणून या पद्धतींत केवळ उद्योगशिक्षण नाहीं, अथवा बुद्धिप्रधान उद्योगशिक्षण नाहीं, अथवा उद्योगबुद्धि दोहोंना समान महत्व, असें हि शिक्षण या पद्धतींत नाहीं, तर येथें उद्योग आणि बोध, कर्म आणि ज्ञान यांचा अवर्णनीय असा हा समवाय आहे. येथें हें कीं तें, हें गौण कीं तें श्रेष्ठ, हें आणि तें अशी भाषा च वापरतां येत नाहीं. येथें हें आणि तें दोन नाहींत च अशा अद्वैताच्या भाषेशिवाय अन्य कल्पना च होऊं शकत नाहीं. बापूजींनीं एवढ्यासाठींच आचार्यांच्या पत्रांतला वर उधृत

अनुक्रमणिका

केलेला उतारा नवजीवनमध्यें मुद्दाम दिला होता. आणि केवळ उद्योग आणि बौद्धिक बाबींत च हें अद्वैत आहे असें नव्हे तर दोन उद्योगांत अथवा दोन विषयांत हि हीच गोष्ट लागू होते. समवाय सर्वत्र लागू होतो.

**"इदं शरीरं कौंतेय क्षेत्रमित्यभिधीयते"**

या एका च लहानशा वाक्यांत छंद, अलंकार, शेती, शरीरविज्ञान, अध्यात्म, व्याकरण, भाषा सर्वांचा समावेश होतो.

**रोषोऽपि निर्मलधियां रमणीय एव ।**
**लोकंपृणैः परिमलैः परिपूरितस्य ।**
**काश्मीरजस्य कटुताऽपि निवांतरम्या ॥**

हा श्लोक शिकवितांना काश्मीरचा भूगोल, तेथली शेती, मानसशास्त्र, सौंदर्यशास्त्र, काव्य, अलंकार—अनेक विषय एकत्र गुंफले जातील आणि अशा तऱ्हेचा हा बोधसमुच्चय विद्यार्थ्याला केवळ सच्चिदानंदाचा च लाभ करून देईल. त्या ऐवजीं या तासाला गणित, दुसऱ्या तासाला व्याकरण, तिसऱ्या तासाला काव्य असे घंटाघंट्यानें बदलणारे विषय विद्यार्थ्याच्या डोंक्यांत यत्किंचित् हि ठसत नसून एखाद्या विषयाची पकड विद्यार्थ्यांच्या बुद्धीवर बसते न बसते तों च दुसऱ्या विषयानें पहिल्या विषयाचा छेद उडवावयाचा अशी सर्वत्र विलक्षण अवस्था दिसून येते. समवाय पद्धतींत हा दोष पूर्णपणें नष्ट होतो. निरनिराळे विभाग पाडून विषय ग्रहण करण्याची कुवत येऊं शकेल अशी हि समवाय पद्धतींत तरतूद नाहीं असें नाहीं. परंतु हें हि लक्षांत घेतलें पाहिजें कीं समवाय म्हणजे कसेंतरी करून बांधलेली आवळ्याची मोट किंवा बोडण नव्हें.

**श्वयुबमघोनामतद्धिते ।**

पाणिनीनें श्वान तरुण आणि इंद्राला एका च सूत्रांत ओंवलें आहे. याचें कारण व्याकरणांतला विशिष्ट प्रत्यय आहे. तरी हि पाणिनीवर विनोदानें

**विचारवान् पाणिनिरेकसूत्रे ।**
**श्वानंयुवानंमद्यवानमाह ॥**

म्हणून टीका झाली आहे. हा विनोदाचा भाग सोडला तर ज्याप्रमाणें पाणिनीची कृति व्याकरणप्रत्ययावर उभी असल्यानें निष्कलंक ठरते, त्याप्रमाणें समवायशिक्षण देणाऱ्याजवळ जेव्हा अद्वैताचा प्रत्यय असेल तेव्हां च त्याचें शिक्षण निष्कलंक ठरेल. ज्याशीं सर्व विषयांच्या अद्वैताचा, शिष्य आणि गुरूमधील अद्वैताचा अपूर्व एकात्मक अनुभव असेल तो च हें समवाय शिक्षण देऊं शकतों. पदार्थविज्ञानांत ज्याप्रमाणें इलेक्ट्रान्सची जुळणी अमुक तऱ्हेची ठरलेली असावयाची किंवा अणुवादी जसे द्वयणूक त्र्यणूक अशी ठरीव पद्धति मानतात तशी समवाय हा कांहीं ठरीवं प्रकारचा साचा नाहीं. हें जडाद्वैत नसून चैतन्याद्वैत आहे, म्हणून येथें शिक्षण देणारा आणि शिक्षण घेणारा असा हि भेद पडणार नाही. येथें गुरुशिष्य दोघे हि शिक्षण घेणारे आणि शिक्षण देणारे! पुन्हां शिक्षण देतों घेतो कोण, केव्हा, कसें याचें भाव हि राहणार नाही, अशी हि विलक्षण पध्दति. खरें म्हणावयाचें तर थोर आचार्यांची ब्रह्मविद्या शिकविण्याची च हि पद्धति म्हटली पाहिजे. येथें केवळ बौद्धिक शिक्षण चाललें आहे असा हि देखावा दिसेल पण तें केवळ बौद्धिक शिक्षण नसेल. येथें

अनुक्रमणिका

कधीं केवळ उद्योग चालू आहे असें दिसेल तरी तो केवळ उद्योग नसेल. हें शिक्षण अमुक ठरीव देखाव्यांत हि बसूं शकेल असें म्हणतां येत नाहीं. हें शिक्षण बापूजींनीं सात वर्षांचे म्हणून ठरविलें तरी त्यांना हें शिक्षण जन्मभर चालावयाचें व जन्मापूर्वी गर्भावस्थेपासून सुरू व्हावयाचें याची पूर्ण जाणीव होती. शिक्षणांत स्त्रीपुरुष किंवा मुलगा आणि मुलगी असा हि फरक करण्याची जरूर या पद्धतींत मानलेली नाहीं. कारण आत्मा हा एकच आहे. लिंगभेद गौण आहे. परंतु एका बाजूला लिंगभेद हि विशेष न मानणारी ही पद्धति प्रकृतिभेदाचा हि विचार करून त्या त्या व्यक्तीला तसा तसा विषय पचनीं पाडण्याचा मार्ग शोधते. तेथे स्त्रीपुरुषाच्या वैशिष्ट्याला उपयुक्त शिक्षण या पद्धतींत गृहीत आहे हे सांगण्याची आवश्यकता च नाहीं. स्त्री, पुरुष व्यक्ति यांचें वैशिष्ट्य लक्षांत घेतलें च पाहिजे. पण भेद काढून टाकला पाहिजे. हा या पद्धतीच्या समवायाचा आणखी एक अर्थ आहे. गरीब, श्रीमंत हा भेद येथें नाहीं च. फीवर आणि पैशावर हें शिक्षण उभारलेंलें नाहीं. स्वावलंबनावर हि पद्धति उभी आहे. श्रीमंत गरीब या भेदाप्रमाणें च सुशिक्षित अशिक्षित हा भेद निर्मूल करणारी ही पद्धति आहे. करीण जो जो शिकला तो तो शरीरपरिश्रमाला मुकला, तो तो शहरांत जाऊन बसला, अशी दुर्दशा न व्हावी हा या शिक्षणपद्धतींतला व्यापक हेतू होता. जितका जितका शिक्षक वरच्या दर्जाचा तितका तितका तो कॉलेजमधल्या मोठ्या मुलांना च लाभावयाचा. ही दुरावस्था या योजनेंत नव्हती. उलट मुलें ज्या मानानें लहान त्या मानानें शिक्षक हि वरच्या दर्जाचा पाहिजे, कारण लहान मुलगा हा पाया आहे तो कच्चा ठेवतां कामा नये अशी च बापूजींची कल्पना होती. शिक्षण घेत असतां मुलांना आपल्या भावी जीवनक्रमाची पूर्ण कल्पना पाहिजे. किंबहुना जें शिक्षण मुलें घेतात तें च व्यापक प्रमाणावर भावी जीवन आहे असें झालें पाहिजे. पुढें काय करणार या संबंधीचे अज्ञान आणि पुढें काय करावें या संबंधीची चिंता या शिक्षण-पद्धतींत उरतां च कामा नये अशी ही जीवननिष्ठ शिक्षण-पद्धति कल्पिलेली होती. शिक्षण घेतो त्या वेळीं जीवन नाहीं व जीवनाची जबाबदारी आली तेव्हां शिक्षण बंद असला प्रकार या पद्धतींत चालणें शक्य च नव्हतें. शिवाय शाळा आणि घर यामध्यें जें मोठे थोरलें कृत्रिम अंतर पडतें तें नष्ट केल्याखेरीज संपूर्ण शिक्षण विद्यार्थ्याला मिळूं शकत नाहीं. या दृष्टीनें खरें म्हटलें म्हणजे सर्व गृहरचना च बदलली पाहिजे. शालीन कुटुंबे आणि कौटुंबिक शाळा निर्माण झाल्या पाहिजेत एवढा व्यापक विचार या पद्धतींत गृहीत होता. व्यक्ति आणि घर, घर आणि शाळा, शाळा आणि गांव यामध्यें विरोध तर असतां कामा च नये, पण परस्परानुकूलता, परस्परसहकार्य आणि परस्परसंबंधाची एक साखळी निर्माण झाली पाहिजे. ज्याप्रमाणें दोरी वळली म्हणजे पक्की होते त्याप्रमाणें व्यक्ति, कुटुंब, शाळा, गांव यांची एक दोरी वळली गेली पाहिजे. शिक्षक व मुलें हरतऱ्हेची ग्रामसेवा करतील आणि शाळा हि गांवभर पसरेल; शाळेचें वातावरण फक्त मुलांभोवती न राहता तें सर्वत्र पसरून आपोआप प्रौढशिक्षण होईल. रोजच्या रोज मुलांचें स्वावलंबन आणि प्रत्यक्ष सेवा-दर्शन ग्रामवासियांच्या कौतुकाचा आणि आनंदाचा विषय होऊन आईबापांना मुलांचा किंवा त्यांच्या शिक्षणाचा बोजा न वाटतां त्यांची एकसारखी मदत च होत राहील. मग शाळेंत सक्तीनें मुलें घालण्याचा प्रश्न सुटेल. केवळ परीक्षेसाठीं मुलें तयार करावयाची व पुस्तकी-लेखी परीक्षेच्या ४/५ दिवसांत ती पासनापास ठरवावयाची असली स्थिति यापुढें राहणार नाहीं. मुलांची परीक्षा नित्य होत च राहील. परीक्षेचा आणि उपाधीचा मोह या शिक्षणांत राहणार नाहीं. रोज खरी परीक्षा होत राहील. शाळेंमध्यें कधीं तरी शाळेचा निरीक्षक यावयाचा व घाईघाईनें निरीक्षण करून त्यानें शेरे मारावयाचे याचें हि महत्त्व यापुढें राहणार नाहीं. मुलांचे पालक, गांवचे सर्व लोक, गांवचे प्रमुख तज्ञ सर्व च निरीक्षक होतील व रोजच्या रोज त्यांना शाळेची परिस्थिति कळत राहील. अशा सहजशिक्षणांत शिक्षकांचें काम बहुतांशीं अनावरणाचे च राहील. दगडांत मूर्ति लपलेली च आहे. तिच्यावरच्या आवरणाचा भाग फोडून ती प्रकट करणें एवढे च शिक्षणाच्या कलेचें काम राहील अशी ही शिक्षणयोजना होती.

अनुक्रमणिका

इंग्रज सरकारची शिक्षण पद्धति बहुतांशीं कारकून निर्माण करणारी होती. शिवाय तींत स्वदेशहित मारलें जाईल अशी हि व्यवस्था केलेली असे. तद्विरुद्ध राष्ट्रीय शिक्षणाची कल्पना उभी राहिली. परंतु राष्ट्रीय शिक्षणांत सार्वभौम सिद्धांत स्वरूपाची शिक्षण कल्पना नव्हती. थोडासा उद्योगाचा प्रयत्न, स्वदेशप्रेम, त्यागाची आवड, स्वभाषेंतून शिक्षण असें कांही गुण राष्ट्रीय शिक्षणाच्या हिदुस्थानभरच्या चळवळींत होते व इंग्रज सरकारविरोधी चळवळींत या राष्ट्रीय शाळेंतील विद्यार्थ्यांनीं भरपूर काम केलें. तथापि राष्ट्रीय शिक्षणांत विश्वव्यापी शिक्षण योजना नव्हती. ती या योजनेंत बापूजींनीं निर्माण केली. निर्माण केली म्हणण्यापेक्षां बापूजींच्याजवळ जें जीवनदर्शन अनुभवानें तयार झालें होते, त्यांतून च ही शिक्षणपद्धति तयार झाली असे म्हटले पाहिजे. बापूजींच्या अध्यक्षतेखाली भरलेल्या या शिक्षण परिषदेंत या पद्धतीवर निरनिराळे आक्षेप हि घेतले गेले. परीक्षेमुळें विद्यार्थ्यांवर पाठ्यक्रमाचा जुलूम होतो तसा या पद्धतींत उद्योगाचा जुलूम होईल. शिक्षकांचा पगार हि उद्योगांतून निघावयांचा असल्याकारणानें शिक्षक मुलांवर उद्योगाची जबरदस्ती करतील त्याचप्रमाणे या उद्योगपद्धतीमुळे लेखन, वाचन, गणित, इतिहास, भूगोल इत्यादि विषय कच्चे राहतील. या पद्धतीनें आधुनिक यंत्रयुगांतून मुलगा मध्ययुगांत जाईल व तेणेंकरून तो जीवनांत मागे पडेल. त्याचप्रमाणें मुलें उद्योग करूं लागल्यानें आधीं च बेकार असलेले लोक अधिक बेकार होतील—असले आक्षेप घेतले गेले होते. तथापि त्यांत फारसा अर्थ नव्हता. बापूजींनी मुद्दाम या परिषदेंत आचार्यांचे विचार सर्वांना ऐकविले. वेळाचें आणि परिषदेचे बंधन असल्यामुळें आचार्यांचे सर्व शिक्षणविषयक विचार या लहानशा व्याख्यानांत समावणें शक्य नव्हतें. तथापि या व्याख्यानांत आचार्यांनीं स्वतःच्या नालवाडीच्या प्रयोगांतल्या चालू अनुभवसिद्ध गोष्टी मांडल्या होत्या.

**'उद्योगिनं पुरुषसिंहमुपैति लक्ष्मी'**

निरूद्योगी शिक्षण किती हि चांगले असलें तरी तें वांझ असून त्यापासून लक्ष्मीचा लाभ घेणें शक्य नाहीं. शिवाय उद्योगामुळें बौद्धिक शिक्षण कच्चें राहील. हा फार मोठा भ्रम होता. ज्याप्रमाणें परिश्रमानें मनुष्याला अधिक भूक लागून पचन उत्तम प्रकारानें होतें त्याप्रमाणें जीवनांतल्या कर्मयोगानें ज्ञानाची भूक लागून ज्ञानाचें पचन अतिशय सुलभतेनें होतें. ज्ञानाचें पचन होण्याला पुन्हां तें ज्ञान जीवनोपयोगी असलें पाहिजे. ज्या माहितीचा बोजा वाटतो असल्या सनावळ्या, असले पोपटपंची इतिहास, असलीं निरुपयोगीं गणितें व्याकरणाची अर्थशून्य घोकणी जीवनाला कोणत्या च प्रकारें उपयोगी पडत नसल्यामुळें परीक्षेपर्यंत हा बोजा उचलणें एवढें विद्यार्थी कसेंबसें करतो, पुढें तो बोझा फेकून देतो. पास झालेल्या विद्यार्थ्यांची पुन्हां परीक्षा घेतली तर तो पुन्हां पास होणें बहुधा शक्य नसतें. कित्येक विद्यार्थी तर वर्षभर अभ्यास करीत च नाहींत कारण वर्षभर हा बोजा बाळगण्यापेक्षां परीक्षेच्या आधीं २—३ महिने च तो बाळगावा व परीक्षा झाल्यावर तो एकदम पटकून द्यावा अशी कॉलेजमधल्या कित्येक विद्यार्थ्यांची स्थिति असते. जे विद्यार्थी मरेमरेतो अभ्यास करून मोठीं बक्षिसें मिळवितात त्यांच्या हि पचनी ती शुष्क माहिती पडूं शकत नाही. उलट जीवनरस सुकून जाऊन असे विद्यार्थी पुढील जीवनाला निरुपयोगी आणि अल्पायु ठरतात. ज्ञान वाढविण्याची हौस कोणात च राहात नाहीं. शिक्षण म्हणजे एक शिक्षा; एक गुलामी अशी स्थिति होऊन सुशिक्षित म्हणविणारा मनुष्य करमणुकीच्या साहित्या पलीकडे कांहीं च पाहात नाहीं. पोट भरण्यापलीकडे कोणता हि पुरुषार्थ तो करूं शकत नाहीं कोणती हि नवीन गोष्ट तो शिकूं शकत नाहीं. अशा परिस्थितींत शिक्षक आणि विद्यार्थ्यात यत्किंचित हि संबंध रहात नसून मित्रामित्रांत हि जन्मभर टिकणारा प्रेमसंबंध क्वचित च दिसून येतो. कारण उघड आहे. जेथें जीवन नाहीं तेथें जीवनसंबंध आणि जीवनविकास कोठून असणार!

अनुक्रमणिका

प्राथमिक म्हणविलें जाणारें हे सात वर्गाचें शिक्षण पुष्कळसे श्रेष्ठ स्त्रियांच्या हातांत असावे, यांत श्रवणानें च ज्ञान अधिक दिलें जावें. मुळाक्षरें शिकविण्याच्या अगोदर लहान लहान सुंदर चित्रे मुलांना काढून द्यावीं. पोपट, कावळे, चिमण्यांची चित्रे मुलें हौशीन काढतील. रूक्ष अ आ इ ई ची घोकणी आणि घोटणी मुलांचा ताजा मेंदू पूर्ण शिणवून टाकते. एकदां ही मजेची चित्रसृष्टि हातांत आली म्हणजे मुलांचे हात वळतील मग मुळाक्षरें मुलाक्षरें (मुलांची अक्षरें) होतील. ती काढण्यांत त्यांच्या हाताला त्रास पडणार नाही. मुलांना चित्रकलेचें उपयुक्त ज्ञान ज्याप्रमाणें दिलें जावें त्याप्रमाणें संगीता चें हि शिक्षण दिलें जावें. पं. विष्णु दिगंबर पलुस्कर म्हणत कीं स्वराज्याप्रमाणेंच स्वर-राज्याची हि स्थापना झाली पाहिजे. मुलांचे आवाज सुधरून त्यांना हिंदुस्थानांतल्या थोर संतकवींची उत्तमोत्तम भजनें एका आवाजांत म्हणतां आली पाहिजेत. या हि साधनांच्या द्वारें सामाजिकतेची साधना झाली पाहिजे. व्यायाम, कवायत, शिस्त यांची हि मुलांना आवश्यकता आहे, मुलांचे लेखन अतिशय वळणदार आणि शुद्ध असावें, वाचन अस्खलित असावें, इतिहास, भूगोल, गणित प्रत्येक विषयाची मूलदृष्टि, प्रत्येक विषयांचे वर्तमान जीवन आणि स्फूर्ति मुलांना प्राप्त व्हावी. प्रत्येक विषय पक्का, उपयोगी आणि सतत वर्धमान, सर्व जीवनाशीं सुसंबद्ध असा विचार होत जावा, ज्ञानाची आवड वाढत जावी, प्रत्येक विषयांत पावित्र्य मांगल्य यांची सूक्ष्म दृष्टि असावी—अशा सूक्ष्मतिसूक्ष्म हजारों सूचना या वर्धाशिक्षण पद्धतींत बापूजींच्या कल्पनेंत होत्या.

आचार्यांचें सर्व जीवन च ज्ञानमय आणि शिक्षणमय होते. त्यामुळें बापूजींच्या कल्पनेप्रमाणें या नव्या शिक्षण योजनेला बापूजींना आचार्यांचा फार मोठा आधार मिळाला. बापूजींनीं या परिषदेंत मुलांचा अभ्यासक्रम ठरविण्यासाठी जी समिति नेमली तींत आचार्यांना हि नेमलें. आचार्यांनीं या समितीच्या बैठकींत आणि नंतर सेवाग्रामला चालू झालेल्या आशादेवी आर्यनायकम यांच्या शाळांत अपूर्व अशी ज्ञानदृष्टीची मदत केली. आचार्यांच्या तालमित पवनारला आणि नालवाडीला अनेक विद्यार्थी आणि आश्रमवासी तयार झाले होते. त्यांचा हि शिक्षक तयार करण्यासाठीं आचार्यांच्या द्वारे फार मोठा उपयोग झाला. तकलीचे प्रयोग, खांडणविंचरण, सळीफळी, खादीचे दुबटा इत्यादि प्रयोग हें सर्व आचार्यांचें च काम होतें. तें सर्व वर्धाशिक्षणपद्धतीच्या द्वारे हिंदुस्थानांतल्या अनेक विद्यार्थ्यांत पसरलें. आचार्यांनी मूलोद्योग-कांतणें म्हणून कांतण्यावर या शिक्षण पद्धतीच्या दृष्टीनें एक अगदीं मौलिक असें लहानसें पुस्तक लिहिलें. बापूजींना तें फारच आवडलें. या पुस्तकाच्या अनुकरणानें मग दुसरीं अनेक पुस्तकें झालीं. आचार्यांनीं अनेक वर्ग घेऊन दाखविले. खरोखर आचार्यांखेरीज ही शिक्षणयोजना लंगडी च ठरती. परंतु योगायोग फार वेगळा होता. निदान शिक्षणतज्ञांना तरीं आचार्यांनीं हें स्पष्ट दाखवून दिलें कीं, ही योजना हि सामान्य वस्तु नाहीं. पाश्चात्यांनी 'प्रॉजेक्ट मेथड' किंवा आणखी अशाच दुसऱ्या नांवानें जरी मुलांनां कांहीं उद्योग द्वारा शिक्षण द्यावे अशी कल्पना निर्माण केली असली तरी बापूजींची ही योजना सर्वथैव वेगळ्याच तऱ्हेची आहे. ती शिक्षणतज्ञांना जरी नवी भासत नसली तरी ती पूर्णपणें नवी आहे. इतकेंच काय पण ती सर्व जगाला नवजीवन देणारी आहे; आचार्यांनीं ही गोष्ट ज्याप्रमाणें परिषदेतल्या स्वतःच्या भाषाणांत दाखवून दिली त्याप्रमाणें या योजनेला सतत बहुमूल्य मदत करून ही गोष्ट त्याने सर्वांना पटविली. आतांपर्यंत जें अद्वैत तत्त्वज्ञानाचे विषय होतें तें शिक्षणांत आचार्यांनीं प्रत्यक्ष करून दाखविलें.

**कां गंगायमुना उदक । वोघ बळें वेगळिक ।**
**दावी होऊनि एक । पाणीपणें ॥**
**न मोडतां दोन्ही आकार । घडिलें एक शरीर ।**
**हें अर्धनारी नटेश्वर । रूपीं दिसे ॥**
**मोतिये मिळोनि बहुवे । एकावळीचा पाडु आहे ।**

अनुक्रमणिका

**परी शोभे रूप होये । एक चि तेथ ॥**
**फुलां फुलसरां लेख चढे । द्रुती दुजी अंगुली न पडे ।**
**श्लोक अध्याय नेणें पाडें । जाणावे हे ॥**
**सात शतें श्लोक । अध्यायां अठरांचे लेख ।**
**परी देवो बोलिले एक । जें दुजें नाही ॥**

—गंगायमुनेचे ओघ जरी वेगळे दिसले तरी पाणी एकच. अर्धनारी नटेश्वर यांतील स्त्रीपुरुष भेद हा भासिकच कारण शरीर एक च. मोत्यांच्या सरांत मोती किती हि असोत शोभा एक च. फुलांच्या हारांतली फुलांची गणती वाढेल पण सुवास एक च. गीतेचे अध्याय निरनिराळे, श्लोक हि सातशें, पण भगवान बोललें तें एकं च त्याप्रमाणें शिक्षणांत कर्म, ज्ञान उद्योग, शिक्षण, असें भाग पाडले तरी ते खोट. त्यांत जीवन हें एक च! शिक्षणांत किती हि विषय दाखल होवोत त्यांतली प्रतिभा एक च!! शिक्षणांत एकामागून एक चढत्या पायऱ्या कशा हि असोत त्यांतलां प्राण हा एक च!!! ही शिक्षणशास्त्राची गीता अध्याय श्लोक कसे हि मांडो त्यांतला परम अर्थ एक च —अद्वैत! अद्वैत!! अद्वैत!!!

●●●

अनुक्रमणिका

# प्रकरण ५८ वें

## महारोगी सेवा मंडल

**आश्रमप्रचारक** तालुक्यांत फिरूं लागल्यापासून, तालुक्यांत आढळून येणारी अनेक तऱ्हेची जनतेची परिस्थिति आश्रमप्रचारकांच्या मननांत येऊं लागली. प्रत्येक प्रचारकाचें वळण आणि भूमिका ही भिन्न भिन्न तऱ्हेची असल्यामुळें प्रत्येकाचें अवलोकन आणि चिंतन जरी ग्रामसेवेला अनुकूल असलें तरी तें सर्वथैव वेगवेगळ्या तऱ्हेनें होई. कोणाला अमुक एक गोष्ट महत्त्वाची वाटे तर कोणाला दुसरी च एखादी गोष्ट महत्त्वाची वाटे, कोणाच्या मनावर या गोष्टीचा पगडा बसे तर कोणाच्या मनावर निराळ्या च गोष्टीचा ठसा उमटे. त्यामुळें ग्रामसेवेच्या क्षेत्रांत नित्य नव्या नव्या कल्पना उत्पन्न होत. परंतु त्या सर्व सेवेच्या कल्पनांमध्यें एक अगदीं च वेगळी, एक अगदीं च अपूर्व, अतिशय महत्त्वाची, सर्वांनी उपेक्षिलेली आणि सेवकाच्या तपश्चर्येची परमावधि अपेक्षिणारी कल्पना या ग्रामप्रचारकांपैकीं एकाच्या मनांत उद्भवली हें आचार्यांच्या ग्रामप्रचारकमंडळाचें आणि ग्रामसेवेचें खरोखर महद्भाग्य मानावें लागेल. ती कल्पना म्हणजे तालुक्यांतील महारोग्यांची सेवा करण्याची कल्पना! आणि ती कल्पना ज्यांच्या मनांत आली ते थोर आश्रमसेवक श्री. मनोहर बळवंत दिवाण!!

आचार्यांशीं विचारविनिमय करून या कार्याला मनोहरजींनीं वाहून घेतलें, आणि आचार्यांच्या छत्रछायेखालीं आतांपर्यंत हिंदुस्थानांत न घडलेली घटना घडून आली. ती घटना म्हणजे महारोगी सेवामंडळाची संस्थापना! अहो! ज्या रोगाचें नुसतें नांव घेतलें तरी अंगावर शहारे येतात अशी सर्वांची मनस्थिति, तेथें त्या रोग्यांच्या सेवेला सर्व जीवन वाहून घेण्याची कल्पना मनांत उद्भवणें, ती कल्पना पुनः पुन्हां घोळली जाणें, त्याप्रमाणें निरिच्छ अशा जीवनांत ही च एक इच्छा ठेवून त्या कार्याला लागणें या सर्व च गोष्टी आश्चर्यकारक नाहींत काय? अशा सेवेची परंपरा जर हिंदुस्थानांत चालत आलेली असती, तर या गोष्टीचें आश्चर्य मनांत आलें नसतें. परंतु हिंदुस्थानांत हीनदीन दुबळ्या महारोग्यांची ममतेनें सेवा करण्याची परंपरा दुर्दैवानें मुळीं च नाहीं. ही परंपरा ख्रिस्ती लोकांत निर्माण झाली. त्यामुळें महारोग्यांची सेवा जगांत आणि हिंदुस्थानांत फक्त ख्रिस्ती मिशनऱ्यांनीं केली. दुसऱ्या कोणाचें हि लक्ष इकडे गेलें नाहीं. ख्रिस्ती लोक ही सेवा करतात असें पाहून हि या सेवेची कल्पना उद्भवली नाहीं. तशी ती उद्भवली तरी तिच्यांत एवढें मोठें आश्चर्य नव्हतें. परंतु प्रत्यक्ष महारोग्यांचें दर्शन घडून केवळ अनुकंपेमुळें ही कल्पना उद्भवली त्यामुळें ही कल्पना खरोखर च अद्‌भुत मानावी लागते. एका हिंदु मनुष्यानें अशा सेवेची परंपरा नसतांना केवळ अनुकंपेनें प्रवृत्त होऊन या कार्याला स्वतःला वाहून घेतलें ही घटना हिंदुधर्माला नवचैतन्य प्राप्त करून देणारी झाली यांत यत्किंचित हि शंका नाहीं. आचार्यांच्या केवळ धर्मदृष्टीनें सेवा करण्याच्या जीवनवृत्तीला ही घटना सहज च अतिशय पोषक झाली!

**पाणी एकोपंत द्रवुनि विकल तृषित रासभा पाजी ।**
**तें लक्षभोजनापरि झालें म्हणतात साधु बापा जी ॥**

एकनाथांची ही दयावृत्ति या महारोगीसेवाकार्यांत प्रतिक्षणीं ठेवावी लागल्यामुळें संतांच्या सेवाकार्याची सत्परंपरा च या महारोगीसेवामंडळानें निर्माण केली.

अनुक्रमणिका

या महारोगीसेवेचा आरंभ कसा झाला याबाबत श्री. मनोहरजी यांनीं सर्वोदय या मासिकांत एक लहानसा लेख च लिहिला होता. त्यांच्याकडून वास्तविक हा लेख लिहविला गेला होता (सर्वोदय १९३८ अंक ५). बेंबळा आणि वर्धा नदीच्या संगमावर वर्धा तालुक्यांतील सावंगी हें गांव वसलेंलें आहे. आचार्यांच्या इतर ग्रामसेवकांप्रमाणें या गांवाच्या आसपासच्या क्षेत्रांत ग्रामसेवेनिमित्त ग्रामपर्यटन करीत असतां मनोहरजींनीं हें गांव आपलें केंद्र बनविलें होतें. गांवाजवळ च एक दत्तात्रेयाचें स्थान आहे. तेथें यात्रा भरते. या यात्रेंत एकदां मनोहरजी गेले होते. पावणेतीनशें पायऱ्या चढून लोक दर्शनाला जात होतें. तेथें प्रत्येक पायरीवर भिकारी बसलेले असत व ते बहुधा महारोगी असत. हे महारोगी कुठले? तपास करतां कळलें इथलें च आजूबाजूचें. अशा रीतीनें या प्रश्नाकडे मनोहरजींचें लक्ष लागलें. वर्धा तालुक्यांतील महारोग्यांची संख्या वगैरेंचा तपास केला. निरनिराळ्या ग्रंथांचा अभ्यास केला. प्रश्न उभा राहिला कीं, हा प्रश्न महत्त्वाचा आहे, महारोग्यांची सेवा झाली च पाहिजे. या रोगाच्या उच्चाटनाचा प्रयत्न अवश्य झाला पाहिजे. पण हें काम कोण करणार? शेवटीं मनोहरजींनीं स्वतः हें काम करावें असा निश्चय केला. आश्रमतर्फे म्हणजे आचार्यांतर्फे या कामासाठीं स्वतंत्र मंडळ बनविण्याची १९३५ मध्यें परवानगी मिळाली व अशा तऱ्हेनें या कामाची सुरवात झाली.

यानंतर ख्रिस्ती मिशनऱ्यांच्या संस्थेंत जाऊन मनोहरजींनीं अनुभव घेतला. चांदखुरीचे डॉ. गास, एम्. डी. यांनीं सर्व प्रकारें या कामाचा अनुभव घेण्याची संधि दिली. या च डॉक्टरांच्या खटपटीनें डॉक्टर नसतांना कलकत्त्याच्या स्कूल ऑफ ट्रॉपिकल मेडिसिनच्या परीक्षेंत बसण्याची मनोहरजींना परवानगी मिळाली. ही परवानगी फक्त ख्रिस्ती लोकांना च बहुतेक मिळावयाची. प्रथम या प्रश्नाकडे लक्ष, नंतर या तालुक्यांतील शेंकडा एक इतक्या या रोगाच्या प्रसाराची कल्पना, नंतर चांदखुरीला शिक्षण. इतकें झाल्यानंतर १९३६ च्या मे महिन्यांत महारोगीसेवामंडल—वर्धा ही संस्था स्थापण्यांत आली. १९३६ पासून येळीकेळी येथें उपचार केंद्र सुरू केलें. दर आठवड्याला येथें रोगी उपचार घेण्यासाठीं येत. वर्ध्याच्या हॉस्पिटलमध्यें हि यासंबंधींची खटपट करून रोग्यांच्या उपचाराची आस्था मनोहरजींनीं निर्माण केली. स्वतः फिरून गांवांतून पै-पैसा मदत मिळविली. प्रारंभी पैशाची मदत फार च थोडी मिळाली. औषधें वगैरे सवलतीच्या दरानें मिळूं लागली. मनोहरजींच्या विलक्षण परिश्रमानें महारोगीसेवामंडळ या संस्थेला हळूंहळूं आकार प्राप्त होऊं लागला. उपचारकेंद्रें तालुक्याच्या सर्व बाजूला वाढविण्यांत आली. पांच वर्षांत कुष्ठनिवासाची मध्यवर्ती योजना सिद्ध झाली. ५ ऑगस्ट १९३६ ला येळीकेळी येथें एका मोडक्या पडीत इमारतींत मंडळाचें पहिलें उपचारकेंद्र सुरू झालें. तें च केंद्र ता. २ ऑक्टोबर १९४१ ला दत्तपूर येथें नेऊन मंडळानें त्याचें रुग्णालय व कुष्ठनिवासांत रूपांतर केलें. नालवाडीपासून पवनारकडे जाणाऱ्या सडकेवर दत्तपूर या रीठ (रिक्त) जागीं वर्ध्यापासून ३॥ मैलावर ही दत्तपूर कुष्ठी वसाहत सुरू झाली. येथें उत्तम तऱ्हेचा दवाखाना, सूक्ष्मदर्शकयंत्रादि सर्व साहित्य, रोग्यांची राहण्याची उत्तमोत्तम सोय, पुस्तकालय, स्त्रीरोग्यांची अलग व्यवस्था, शेती, सूतकाम, स्वयंपाकगृहें, स्नानगृहें, स्वतंत्र विहिरी, स्वतंत्र शेती, बागबगीचा अशा तऱ्हेनें ही वसाहत एका तऱ्हेनें खेड्याचा आदर्श नमुना—उद्योगी, यावत्शक्य स्वावलंबी, आनंदी, रोगांशीं झगडणाऱ्या साधकांचा आश्रम बनली. गव्हर्नर, अधिकारी, पुढारी सर्वांचें लक्ष या संस्थेनें वेधलें. मग मदत हि वाढूं लागली. ही संस्था पहाण्यासाठीं अनेक लोक येऊं लागले. वाढतां वाढतां या संस्थेनें गोपुरीपेक्षां हि अधिक जागा व्यापली. मनोहरजींच्या कळकळीनें शेकडों रोगी दुरुस्त झाले. येथें कोणत्या हि पक्षाचा, कोणत्या हि मताचा, कोणत्या हि जातीचा, धर्माचा, पंथाचा, कोणी हि आला तरी त्याला या भूतदयेच्या कामानें विरघळून टाकावें अशी ही पक्षातीत व्यापक संस्था बनली. एकखांबी द्वारकेप्रमाणें एका मनोहरजींच्या आधारावर या संस्थेची केवढी ही भरभराट झाली!

अनुक्रमणिका

पवनारच्या आचार्यांच्या निवासस्थानाकडे जातांना प्रत्येक जण ही संस्था पाहिल्याखेरीज जाणें शक्य च नसे. जणूं महादेवाचें दर्शन घेण्यापूर्वी नंदीचें दर्शन घ्यावें त्याप्रमाणें पवनारला आचार्यांचें दर्शन घेण्यास जातांना या वसाहतीचें दर्शन घेऊन च जावें अशी आकर्षकता या संस्थेनें निर्माण केली. येथें ओंगळपणा असेल, आतां महारोगाच्या भयानक किळसवाणेपणाचें दर्शन होईल अशा कल्पनेनें पछाडलेला मनुष्य हि येथली स्वच्छता, व्यवस्था पाहून मनाशीं म्हणतो—“अरे! आम्ही निरोगी असून आमच्या घरीं इतकी व्यवस्था, स्वच्छता, सुंदरता नाहीं आणि हें रोग्यांचें—त्यांतून महारोग्यांचें स्थान असून हि येथें इतकी व्यवस्था, स्वच्छता असावी ना! आश्चर्य आहे!” बिनबडेजावाच्या झोपडीवजा च परंतु व्यवस्थित अशा त्या कुष्ठधामाच्या खोल्या म्हणजे एकूण इतकी कठिण तिरस्करणीय आणि भयानक तर नाहीं! अशी हि एक वृत्ति पाहणाऱ्याच्या मनांत निर्माण व्हावयाची. ही वृत्ति ही च सेवेला खरी मदत आहे. महारोगीसेवामंडळांत खरोखर जागती जिवंत प्रत्यक्ष मदत करणारी मूर्ति कोणती उभी असेल तर ते एकटे मनोहरजी च यांत तिळमात्र संशय नाहीं!

पण ही इतकी असामान्य सेवा करणारी मूर्ति मनोहर नांवाप्रमाणें मनोहर नाहीं, किंवा तिच्या ठिकाणीं कोणता हि बडेजाव नाहीं. कोणी हि येवो, लहान मोठा, गरीब श्रीमंत, पैसे देणारा न देणारा—कसा हि असो, त्याला संस्था दाखवितांना तो च शिरस्ता, ती च कळकळ, तो च एक ध्यास! जेवणाचा, निद्रेचा, विश्रांतीचा, करमणुकीचा, नातेवाईकांचा, स्नेह्यासोबत्यांचा, वाचनाचा, लेखनाचा—सर्वांचा येथें विसर पडलेला!!! तेथें महारोगीसेवा ही च एक तळमळ!!! —आचार्य नेहमीं म्हणत—“कार्याच्या योजनांची तेवढीशी जरूर नाहीं. तळमळीचा माणूस पाहिजे. मग बाकीचे कार्य ईश्वर पाहून घेईल.” ही संस्था आणि या संस्थेचें संचालक मनोहरजी यांचें दर्शन घेतल्याबरोबर त्या वचनाचा अगदीं घवघवीत असा ठसा मनावर उमटतो. मनोहरजी संस्थेचे हिशेब, संस्थेचा पत्रव्यवहार, संस्थेचीं प्रगतिपत्रकें, संस्थेचीं माहितीपत्रकें, अभिप्रायवह्या—सर्व बाबी कशा अगदीं चोख ठेवीत गेले! येथें भोंगळपणाला मुळींच जागा नाहीं. त्यांचें अक्षर हि नमुनेदार! एखाद्यानें क्षुल्लक जरी देणगी दिली तरी त्याची पावती देतील, आभार मानतील, स्वतःला जणूं ऋणी समजतील. पुन्हां भिकाऱ्याप्रमाणें, इतर संस्थांतल्याप्रमाणें दीनता नाहीं. येनकेन प्रकारेण मदत मिळविण्याची वृत्ति नाहीं. नुसती कोणी संस्था पाहिली तरी तेवढ्यानें खूष! तीं च तीं च पत्रकें देणें, ती च ती च माहिती सांगणें, त्या च त्या च इमारती दाखविणें या सर्वाचा कंटाळा नाहीं. उलट प्रत्येक वेळीं उत्साह आणि उल्हास! खरोखर महारोगीसेवेला असा मनुष्य मिळणे च कठिण!

मराठी भाषेंतलें महारोगासंबंधाचें पहिलें उत्कृष्ट पुस्तक लिहून मनोहरजींनीं महाराष्ट्राची उत्कृष्ट सेवा केली. या च पुस्तकाचें हिंदी भाषांतर हि झालें. आचार्यांनीं या पुस्तकाला “भूतदयेचा मंत्र आणि विनियोग” असा मार्गदर्शक लेख लिहून दिला. तो लेख ‘धर्मसूत्र’ या दृष्टीनें सर्वांना च नवीन दर्शन करून देणारा आहे. ‘आधीं केलें मग सांगितले’ हें या ‘महारोग’ पुस्तकाचें वैशिष्ट्य आहे. या वैशिष्ट्यामुळें च बापूजींनीं प्रथम सत्याग्रही म्हणून आचार्यांचा परिचय करून दिला. त्यांत मनोहरजींचें नांव न देतां त्यांचा कार्यस्वरूपानें गौरवपूर्ण उल्लेख केला आणि विधायक कार्यांत महारोगी-सेवेचा अंतर्भाव करून घेतला.

आचार्य येतांजातां अनेक वेळीं या संस्थेंत जात. मनोहरजी हि झटकन सायकलीवर बसून अनेक वेळा परंधामला येत व महारोगीसेवेची चर्चा करीत. अशा रीतीनें महारोगीसेवामंडळ हें मंडळ स्वतंत्रच परंतु आचार्य आणि आचार्यांच्या इतर कार्यांशीं एकप्रकारें निगडित झालेंलें असे. या मंडळाच्या एका बाजूला १॥-२ मैलांवर परंधाम-पवनार-आश्रम अशी स्थिति असल्यामुळें, जमनालालजी आणि बापूजींमुळें उत्पन्न झालेल्या अनेक संस्था जवळपासच्या परिसरांत असल्यामुळें ही महारोगी संस्था एकाकी राहिली नाहीं. ही

संस्था जणू उत्तम सत्संगांत वसली गेली. सत्संगाला पोषक अशा वैराग्याचा हि येथें अभ्यास होतो. कित्येक विकोपाला गेलेले महारोगी वेडे होतात, कित्येकांना स्वतः कांहीं हि करतां येत नाहीं. अशा स्थितींत येथें मनोहरजीं सारख्या सेवकांच्या सेवेची कसोटी होते. रोग्याचे हाल बघवत नाहींत. मानवदेहाची किळसवाणी अवस्था डोळ्यांपुढें उभी राहून वैराग्याचा अभ्यास दृढतर होत जातो.

महारोगी सेवा मंडळांत सेवा, एकांत, आश्रमजीवन, खेड्याचा आदर्श, स्वावलंबन, सत्संग, वैराग्य अनेक गुणांचा अभ्यास करण्याला पूर्ण वाव देऊन आपल्या आप्तइष्टांशीं हि झगडून मनोहरजींनीं आचार्यांना अत्यंत इष्ट असें कार्य चालविलें आहे. या कार्यामुळें दुसऱ्या हि अनेक ठिकाणीं अशा प्रकारची सुरवात झाली आहे. या कार्याला किंवा कोणत्याहि महत्कार्याला थोर सेवकांची अस्खलित परंपरा निर्माण झाल्याखेरीज खरी मजबुती प्राप्त होणार नाहीं. आचार्यांनीं निःस्पृहपणें आध्यात्मिक मित्रमंडळ आणि सेवामंडळ कसें निर्माण करावें याचा आपल्या उदाहरणानें धडा घालून दिला असल्याकारणानें आचार्यांचें हें उदाहरण हें च या महारोगी-सेवा-मंडळाचें खरें जीवनपाथेय आहे असें म्हणण्याखेरीज गत्यंतर कोणतें?

●●●

अनुक्रमणिका

# प्रकरण ५९ वें

## द्वितीय सत्याग्रह : साद्यंत वृत्त

दिनांक १७ जानेवारी १९४१.

**१. शेगांव आणि वर्ध्याचा सत्याग्रह :**

**"एकमेवाद्वितीयम्"** अशा कोटींतला पहिला सत्याग्रह पवनारला स्वतःच्या निवासग्रामीं च करण्यांत आला. हिंदुस्थानभर त्याचा पडसाद उमटून अखिल हिंदुस्थानचें राजकारण सत्याग्रहाभोवतीं केंद्रित झालें. या गोष्टीला तीन महिने होत आले. वांट्यास आलेली तीन महिन्याची सजा १५ जानेवारी १९४१ ला संपवून पू. विनोबाजी वर्ध्यास आले. लगे च महात्माजींच्या सल्ल्याने सत्याग्रह करण्याचें ठरविण्यांत आलें. आचार्य आतां थोडे दिवस तरी बाहेर राहतील, पूर्वीप्रमाणें त्यांच्या सहवासाचा लाभ आपणांस मिळेल, नित्य नवीन प्रकाश पाडणारे त्यांचे ज्ञानगर्भ शब्द आपणांस ऐकावयास मिळतील, ही स्थिति आतां राहिली नाहीं. येथल्या चिरपरिचित, नित्याच्या, साध्याभोळ्या खेड्यांतील लोकांना मार्गदर्शन करण्याऐवजीं अखिल हिंदुस्थानच्या सर्व सत्याग्रह्यांना मार्गदंर्शन करण्याचें कार्य आतां वाट पहात होतें. त्यामुळे सत्याग्रही सुटला तरी त्याला सत्याग्रहाशिवाय दुसरें कांहीं सुचतां कामा नये ही भूमिका या महापुरुषाच्या द्वारें सिद्ध होणें स्वाभाविक होतें त्याप्रमाणें सर्व तयारी झाली. आणि १७ जानेवारी १९४१ ला, सुटल्यापासून दोन च दिवसांनीं सेवाग्रामला सकाळीं ९ वाजतां सत्याग्रह ठरला. पावसाळ्यांत नद्या भरवेगाने ज्याप्रमाणें समुद्राकडे धाव घेतात त्याप्रमाणें जिकडून तिकडून परिचित मंडळी सेवाग्रामला जमली.

He walks for those who cannot walk
and talks for those who cannot talk.

—तुका म्हणे आतां उरलों उपकारापुरता—ही स्थिति असल्यामुळें या गडबडींत हि आचार्यांच्या पाठीमागें अनेक लोकांचे अनेक खासगी प्रश्न सोडविण्याचें काम होतें. ही स्थिति असल्यामुळें सुकाभाऊंच्या झोपडींत त्यांचें कांहीं बोलणें चाललें होतें. तेथें कांहीं मंडळी सकाळची न्याहारी करीत होती. कोणी परस्परांशी थट्टाविनोद करीत बोलत उभे होते. आज भाषण झाल्याबरोबर ताबडतोब आचार्यांना पकडण्यांत येईल असा कोणी तर्क करीत होते, तर कोणी भाषणप्रसंगासाठीं बैठक, व्यासपीठ इत्यादींच्या तयारीला लागले होते. फोटो घेण्यासाठीं फोटोग्राफर तयार होते तसे रिपोर्टासाठीं रिपोर्टर हि सज्ज होते. नवीन आलेली मंडळी परस्परांना रामराम करीत विनोबाजी कोठें आहेत या चौकशींत होती. एकंदरींत औत्सुक्य, गांभीर्य, परस्पर भेटीचा आनंद अशा संमिश्र भावनेनें तें वातावरण भारलें होतें. हा साधारण ७॥-७॥ चा सुमार होता. सूर्याचे किरण सर्वत्र पसरले. सेवाग्रामच्या झोपड्यांवर त्यांचा प्रकाश पसरूं लागला. आणि त्या लहानशा खेड्याजवळ च सेवेसाठीं महात्माजींची जी वसाहत झाली होती, जी प्रयोगशाळा तेथें उघडण्यांत आली होतीं, जीं अनेक कामें तेथें चालत होतीं त्या अनेकविध कार्यांच्या आणि कार्यकर्त्यांच्या निरनिराळ्या झोंपड्या हि प्रकाशित होऊं लागल्या. जिकडे तिकडे बांधकाम करण्याची गर्दी होती. महात्माजी म्हणजे घडामोडींचें मोठें केंद्र! ते जेथें तेथें हिंदुस्थान! त्यामुळें त्या सेवाग्रामच्या खेड्यापाशीं हें हिंदुस्थानचें केंद्र अगदीं स्वाभाविकपणें वसलें गेलें होतें. 'हिंदुस्थान खेड्यांत आहे' त्या महात्माजींच्या

वाक्याची जणूं काय येथें प्रत्यक्ष मूर्तिच घडली जात होती. हिंदुस्थानांतली सर्वांत मोठी संस्था काँग्रेस. त्या काँग्रेसच्या कचेरीचा तंबू येथें च दिसत होता. वर्धा शिक्षण योजनेचें प्रयोगकार्य येथें होतें, गोरक्षण आणि शेतीचें कार्य हि होतें, शिवाय महारोग्याचें हि प्रयोग बापूजींनीं चालविले होते. आहारशास्त्राचे प्रयोग तर नेहमीचे च चालू असावयाचे. या सर्व कार्यांमुळें वर्ध्यापासून दूरचे सहा मैलावरचें हें खेडें पण येथें येणाऱ्याजाणाऱ्यांची नेहमीं रीघ लागलेली असावयाची. मोटारी, टांगे, सायकली येथें उभ्या नाहींत असें बहुधा व्हावयाचें नाहीं. त्याप्रमाणें यावेळीं हि देखावा दिसत होता. या च सुमाराला आचार्य सुकाभाऊंच्या झोपडींतून बाहेर पडले. ही सर्व बालगोपाल मंडळी होती. वल्लभभाई, भाऊ, सीतारामजी कारेमोरे, दगडूभाऊ, चावदसभाऊ अशी आश्रमची नेहमींची मंडळी होती च शिवाय खेड्यांतली मंडळी हि होती. सर्व मंडळी तालिमी संघाच्या ऑफिसच्या ओट्यावर बसली आणि संभाषण सुरू झालें.

शिवाजी—"आतां जवळ जवळ महाराष्ट्र गीताई प्रचाराच्या निमित्तानें फिरून झाला. फक्त रत्नागिरी जिल्हा राहिला. यापुढें कोठें फिरावें हा प्रश्न आहे. निजामशाहींत तर भाषणाला बंदी आहे."

विनोबा—"वऱ्हाड घेतां येईल."

शिवाजी—"फिरत असतांना ज्या ठिकाणीं हरिजनांना प्रवेश नाहीं, त्या ठिकाणीं सार्वजनिक कार्यक्रम करीत नाहीं. परंतु अशा ठिकाणीं पहाणीच्या दृष्टीनें जातों तर अशा ठिकाणीं जावें कीं जाऊं नये?"

विनोबा—"जाऊं नये."

शिवाजी—"गीताईचा प्रचार सामान्यतः मुलांत च होत आहे. मोठीं माणसें जड झाल्यासारखीं दिसतात."

विनोबा—"व्यवहारानें माणसें जड होणार च. तरुणांत च गीताई खपेलं हें उघड आहे."

यानंतर आणखी कांहीं चर्चा झाल्यानंतर वेळ झाला म्हणून मंडळी उठली. आशादेवींनीं पाया पडून पहिला सुताचा हार आचार्यांच्या गळ्यांत घातला. जानकीबाई बजाज आजारी होत्या. त्यांचे कांहीं खासगी प्रश्न होते. त्यांच्याशीं ५/१० मिनिटें बोलणें करून बापूजींच्या झोपडीपाशीं आचार्य व कांहीं मंडळी आलीं. झोंपडीबाहेर बा उभ्या होत्या. त्यांना आचार्यांनीं लवून नमस्कार केला. "केम चाल्या?" असें हंसत हंसत त्यांनीं विचारलें. या वेळीं बापूजी झोंपडींत नव्हते. राजकुमारी अमृतकुंवर या आंत होत्या. त्यांनीं दुसरा सुताचा हार दिला. थोड्या च वेळांत बापूजी आले. त्यांच्या पाठीमागें कन्नू गांधी आपल्या कॅमेऱ्यासह सज्ज होते. बापूजींना आचार्यांनीं लवून नमस्कार केला. बापूजींनीं स्वतःच्या सुताचा हार घातला. हार जरा लहान होता. तो डोक्यांत जाईना. ज्ञान्याच्या मस्तकांतून जाऊं शकेल असें कोणतें हि बंधन या जगांत नाहीं ही च सूचना ह्या दृश्यांतून मिळत होती. थोड्या प्रयत्नानें तो हार गळ्यांत विराजमान झाला. जाओ बापूजींनीं आज्ञा दिली. मंडळींचा मेळावा सभास्थानाकडे धांवला. सभास्थान फार दूर नव्हतें. परंतु तेथपर्यंत सुताच्या हारांचा ढीग पडला. सभेच्या ठिकाणीं एक व्यासपीठ केलेंलें होतें. टेकण्याला लोड, बसण्याला पांढरी शुभ्र खादीची चादर, दोन्ही बाजूला तिरंगी झेंडे लावले होते. सूर्याचे किरण तोंडावर पडूं नयेत म्हणून सीतारामजी कारेमोरे यांनीं एक झेंडा हातांत धरून त्याची सावली पाडली होती. भीष्माचार्यांची उशी जशी बाणाची, तशी येथें सावली हि झेंड्याची च पाडलेली! महादेवभाई देसाई बाजूला

अनुक्रमणिका

रिपोर्ट घेण्यासाठीं सज्ज होऊन बसले होते. त्यांच्याजवळ च पंडित सुंदरलालजी बसलेले होते. पू. कस्तुरबा हि आल्या होत्या. बरोबर जाहीर केलेल्या वेळेप्रमाणें भाषणाला सुरवात झाली. सर्व सभा चित्रासारखी तटस्थ बसली. एकामागून एक वाक्यें गंगेच्या प्रवाहाप्रमाणें पुढे पुढें वहात गेलीं आणि श्रोत्यांची चित्तवृत्ति केवळ तदाकार होऊन राहिली.

"प्रह्लादाला रामनाम घेण्याला राक्षसांनी अडथळा केला ही पुराणांतली गोष्ट लहानपणीं वाचली. तेव्हां वाटे—इतक्या निरुपद्रवी गोष्टीला विनाकारण कां प्रतिबंध केला, ही गोष्ट खरी असेल? पण आज प्रत्यक्ष तोच अनुभव येत आहे. माणसानें कोणाला मारूं नये. इतकी निरुपद्रवी गोष्ट सांगण्याला प्रतिबंध आहे. बरें, जें एकमेकांचे शत्रु आहेत, ज्यांनीं लढण्याची तयारी केली आहे, जे शस्त्रास्त्रांनीं सज्ज आहेत ते एकमेकाला मारीत आहेत म्हणावे तर तसें नाहीं. जे निःशस्त्र आहेत, ज्यांचे कोणाशीं हि वैर नाहीं, जीं बिचारीं केवळ अर्भकें आहेत, जे लोक हॉस्पिटलमध्यें रोगी होऊन पडले आहेत, ज्या स्त्रियांना आपल्या कुटुंबसेवेखेरीज राजकारणांतले कांहीं कळतसुद्धां नाही—त्यांच्यावर बॉंब टाकण्याला काय लढाई म्हणावयाचें? रात्र नाहीं, दिवस नाहीं, लहान पहात नाहींत, मोठा पहात नाहींत, स्त्रिया, मुलें, म्हातारे मारीत सुटतात याचा अर्थ काय? काय जर्मनीच्या घरांचे आणि इंग्रजांच्या घरांचें हि वैर आहे? इंग्लंडमधील झाडें आणि जर्मनींतलीं झाडें हि युद्धांत सामील आहेत काय?—परंतु इतकी साधी गोष्टसुद्धां समजून सांगणें गुन्हा आहे. जेलमधून सुटून दोन दिवस झाले नाहींत तो मी लगे च ही च गोष्ट सांगण्यासाठीं पुन्हां येथें आलों तो काय वेड लागले म्हणून?—ही गोष्ट सांगणें हा धर्म आहे. परंतु त्यांत हि अधिकारी अनधिकारी असा भेद आहे. ज्यांना महात्माजींची आज्ञा आहे अशा कांहीं लोकांना हा अधिकार आहे. बाकीच्यांनीं युद्धाला मदत तर मुळींच करायची नाही. शिवाय विधायक कार्यक्रम करावयाचा. आपापसांत सर्वांनीं एकी करावी. हरिजनांशीं प्रेमानें वागून स्पृश्यास्पृश्यभेद काढून टाकावा. खादीचा प्रसार करावा. जगांत द्वेषाचा फैलाव होत आहे तर आपण प्रेमाचा फैलाव करूं या. महात्माजींचा आशीर्वाद घेऊन मी येथें हें जें समजावून सांगितलें—जर सरकार मला सुटे ठेवील—तर ही च गोष्ट मी सर्वत्र सांगत फिरेन. कारण ही गोष्ट सांगणें हा धर्म आहे. मी केवळ धर्मभावनेनें च हें काम स्वीकारलें आहे इ. इ. इ."

—भाषण अर्धा तास च झालें. परंतु प्रत्येकाच्या अंतःकरणांत खोल उमटलें. त्याचा ठसा कधीं च पुसला जावयाचा नाहीं, इतकी त्याची खोली होती. भाषणाच्या काय किंवा कोणत्या हि कामाच्या काय लांबीरुंदीपेक्षां त्याची खोली हि अधिक महत्त्वाची ठरते. येथें तसें च झालें.

पुष्कळांची कल्पना होती कीं भाषणांत च अटक होईल. पण अधिकाऱ्यांना विनोबाजींचीं भाषणें ऐकावींशीं वाटतात म्हणून भाषण झाल्यावर अटक होईल अशी हि कल्पना कोणी कोणी करीत होते. पण सरकारी अधिकाऱ्यांनीं आचार्यांना सलाम करण्यापलिकडें कांहीं केलें नाहीं. व्याख्यान आटोपून मंडळींसकट आचार्य पुन्हां तालिमीसंघाच्या झोंपडीच्या समोर मैदानांत आले. थोडा वेळ पुढच्या कार्यक्रमाची चर्चा झाली. रात्रीं वर्ध्यास गांधी चौकांत व्याख्यान ठरविलें च होतें. मंडळी परत जिकडे तिकडे जाऊं लागली. आचार्य मैदानांत उन्हांत उघडे फिरूं लागले. उन्हांत फिरण्याचा त्यांचा रोजचा कार्यक्रम च ठरलेला असे. या सूर्योपासनेचा त्यांच्या शरीरावर घवघवीत ठसा उमटलेला होता. सूर्यप्रकाशामुळें सर्व शरीर घासून लखलखीत केलेल्या तांब्याच्या तुकड्याप्रमाणें तेजस्वी दिसे. या वेळीं फिरतां फिरतां शरीरविषयक बोलणें च चाललें होतें.

विनोबा—“सर्व मंडळी निराश झाल्यासारखी दिसली. आणि सर्वांचें म्हणणें दिसलें कीं, शरीर क्षीण होण्याचें कारण दांत आहेत. पायोरियामुळें शरीर क्षीण झालें आहे. तेव्हां दांत काढून टाकावे. पण मीं विचार केला कीं, एकदां प्रयोग करून तर पहावा. मग दांतामुळें शरीर बिघडलें असें ठरलें तर दांत काढावे. त्याप्रमाणें प्रयोग केला. विश्रांति, सूर्यस्नान, खणणें, फिरणें—असा प्रयोग चालूं झाला. हळूंहळूं शरीर वाढत गेलें. ९५ ते १३० वजन झालें. तेव्हां शरीरांत तशी विकृती नव्हती ही गोष्ट नक्की. पायोरिया होता च पण त्यामुळें च शरीर क्षीण झालें नव्हतें. आतां दांत हि काढून टाकलें.”

शिवाजी—“दांत काढल्यामुळें उच्चारांत थोडा फरक वाटतों.”

विनोबा—“पूर्वींचे दांत पुढें आलेले वांकडेतिकडे होते. तसे च नवीन बसविण्याचें कारण नव्हतें. त्यामुळें जिभेच्या स्पर्शस्थानांत थोडा फरक पडून तसें भासत असेल.”

शिवाजी—“बाळकोबांची प्रकृती हि मनावर घेतल्यास पूर्ण सुधरूं शकेल असें वाटतें. पण त्यांना तसा आत्मविश्वास दिसत नाहीं.”

विनोबा—“पुष्कळ दिवसांच्या अनारोग्यामुळें आत्मविश्वास नसणें अस्वाभाविक नाहीं. तो ज्या बिनचूक तऱ्हेनें राखतो ती मोठी गोष्ट आहे.”

—इतक्यांत नालवाडीला जाण्यासाठीं मोटार तयार आहे असें मोघेजींनीं सांगितलें. मोटारींत मोघेजी, मदालसा, वल्लभभाई, शिवाजी इतकी मंडळी विनोबांबरोबर बसली होती. मोटारींत हि बोलणें सुरूं च होतें.

मोघेजी—आतां मिळालेल्या हारांचें काय करावयाचें?

विनोबा—मागच्या तीन महिन्यापूर्वींच्या मिळालेल्या सुताचें तर कापड च तयार केलें.

मोघेजी—आतां मिळालेल्या सुताचा लिलाव करून टाकावा.

विनोबा—मला ही पद्धत पसंत नाहीं. बापूजी लिलाव करतात तें ठीक आहे. त्यांत त्यांची दृष्टि जनसेवेची आहे. पण मला तो विचार पटत नाहीं. मला गणित प्रिय आहे. पण हा हिशोब कांहीं मला जुळत नाहीं. जमनालालजी हि जेलमध्यें असा च हिशोब करीत असतात. अमका मनुष्य विनोबाजींच्या किती सहवासांत आला. त्यावरून त्याची प्रकृति किती बदलेल, त्याच्यावर किती परिणाम झाला, असा त्यांचा विचार एकसारखा चालूं असतो.

मदालसा—काकाजी बाहेर सुद्धां असा सूक्ष्म विचार करीत असतात. ते असा परिणाम नेहमीं पहात असतात.

विनोबा—माझी परिणामाची एक च कसोटी आहे. ती म्हणजे माझें समाधान किती वाढलें. आत्मसंतोष ही च मी परिणामाची कसोटी ठरविली आहे. त्यामुळें असल्या हिशोबाचा बोजा रहात च नाहीं.

अनुक्रमणिका

इतक्यांच मोटार महिलाश्रमाच्या फाटकांत शिरली. येथें मदालसेला उतरावयाचें होतें. थत्तेजी, लेले आणि मालतीताई मोटार थांबता च मोटारीकडे आल्या. सर्वांनीं हात जोडले.

विनोबा—थत्तेजींनीं दांत काढले, नवे बसवले. पण शरीर सुधरलेले दिसत नाहीं.

मदालसा—होय. त्यांना स्वतःच्या कामाविषयीं संतोष नसावा. त्यांना ज्यास्त जबाबदारीचें काम दिलें तर कदाचित् तब्येत सुधरेल.

विनोबा—तशी सबंध महिलाश्रमाची जबाबदारी त्यांच्याकडे होती. पण तें काम त्यांना जमलें नाहीं. थोडा वेळ मोटार मदालसेच्या बंगल्याजवळ थांबून हां हां म्हणतां नालवाडीला दाखल झाली. मंडळी उतरली आणि स्नानादि कार्यासाठीं जिकडे तिकडे पांगून गेली. आतां सुमारें १२ चा सुमार झाला. या ठिकाणीं लहान लहान झोपड्यांत निरनिराळे कार्यकर्ते रहात. शेगांव ही महात्माजींची वसाहत आणि येथें आचार्यांचें केंद्र. शेगांवपेक्षां हि येथें कार्याचा दांडगा व्याप होता. येथें रामदासभाईंची गोशाळा, वाळुंजकरजींचें चर्मालय, भाऊसाहेबांचें सरंजाम कार्यालय, विणकाम, असा निरनिराळ्या कार्याचा पसारा पसरला असून बांधकाम हि भर जोरांत चालू होतें. सेवेच्या एवढ्या मोठ्या व्यापामध्यें एकत्र जेवणें तर शक्यच नव्हतें. कुटुंबी लोक आणि इतर यांची अलग अलग व्यवस्था असे. या वेळीं खरें म्हटलें तर जेवावयास जावयाचें परंतु विनोबाजींच्या झोपडींत दत्तू दास्ताने विनोबाजींना जें इंग्रजी लिखाण वाचून दाखवीत होते तें ऐकण्यांत मंडळी गुंग होऊन गेली होती. महादेवभाई देसाई दिल्लीला वॉइसरॉयच्या सेक्रेटरीकडे गेले असतां त्यांचें झालेलें लांबलचक संभाषण महादेवभाईंनीं टाईप केलेले येथें पाठविले होतें. तें च हें लिखाण. संभाषण मोठें खोंचदार, मार्मिक आणि मनोरंजक होतें. त्यांत इत्यर्थ एवढा च होता कीं, सरकारला कोणीकडून तरी गांधीजींनीं मदत करावी, निदान विरोध तरी करूं नये, गांधीजींच्या चळवळीचें स्वरूप अनात्याचारी आहे तर कांहीं विनोबांसारखे अपवाद सोडले तर बाकीच्यांचीं भाषणें तशीं नसतात. शिवाय युद्धविरोधी चळवळींना प्रतिबंध न करणें ही गोष्ट सरकारला शक्य च नाहीं. कारण विनोबा, जवाहरलालसारख्यांचा परिणाम हजारों लोकांवर झाल्याशिवाय राहणार नाहीं शेवटीं हें लिखाण संपल्यावर मंडळी जेवावयास गेली. जेवणानंतर आचार्यांच्य खोलींत तकलीयज्ञ सुरूं झाला. कार्याच्या व्यापामुळें पूर्वीप्रमाणें सर्व मंडळी आतां तकलीयज्ञासाठीं एकत्रित जमूं शकत नसत. बीजस्वरूपांत असतांना पानें, फुलें, फळें, शाखा सदासर्वदा एकत्रित च असतात. परंतु त्यांचा विकास होऊन विशाल वृक्ष झाला म्हणजे तीं फाकून जातात. पुन्हां एकत्र येणें त्यांना शक्य नसतें. या बाबतीत कांहींसें असें च झालें होतें. परंतु आचार्यांबरोबर कांहीं मंडळी कांतण्याला बसली होती च. यानंतर संध्याकाळपर्यंत मंडळी आपापल्या उद्योगांत होती. सूर्य खालीं उतरला. संध्याकाळ होत आली. चर्खा संघाचे श्रीकृष्णदास जाजू या सुमाराला मुद्दाम भेटण्यासाठीं म्हणून पायीं आचार्यांकडे आले. या वेळीं नालवाडीच्या प्रार्थनेच्या जागीं बैठक टाकलेली होती. तिच्यावर आचार्य बसले होते व संध्याकाळचे जेवण घेत होते. जाजूजी तेथें च बैठकीवर बसले. ते बसले न बसले तों च एका बाजूनें बुद्धसेन फोटो घेण्यासाठीं तयारीनें उभा राहिला. तेव्हां आचार्य म्हणाले—हा नाद चांगला नाहीं. आणि मग थोडा वेळ त्यावर च बोलणें चाललें.

विनोबा—लहानपणापासून च माझ्या मनांत फोटो काढण्याविषयीं तिरस्कार होता. आमच्या घरांत आमचे आजोबा मोठे व्रतकर्कश. परंतु ते सुद्धां फोटोला बसले. पण आमची आई बसली नाहीं. ती म्हणे फोटो काढविण्यांत तेज रहात नाहीं. आणि मला तेव्हांपासून तिचा तो विचार बिनचूक पटला. तिला हा विचार कसा काय सुचला हें सांगता येत नाहीं.

अनुक्रमणिका

जाजूजी—आजकाल सर्वत्र बहिरंगी वातावरण झालें आहे. आपले च आपण फोटो काढतात. वर्तमानपत्रांत पाठवतात, आपला उदोउदो करून घेतात अशी पद्धत च पडली आहे. खोलपणा मुळीं च उरलेला नाहीं. आणि या इलेक्शनांत जो गोंधळ होतो त्याचा तर कांहीं सुमार नाहीं.

विनोबा—मोरोपंतानें लिहिलें आहे.

**"आत्मस्तुति परनिंदा मिथ्याभाषण नये कधीं वदना"**

त्याच्या अगदीं उलट स्थिति इलेक्शनमध्यें होत असते.

जाजूजी—आपली प्रकृति जेलमध्यें कशी काय राहिली?

विनोबा—प्रकृति बरी राहिली. ५/७ पौंड वजन उतरलें; तेथल्या पोळ्या कच्च्या असल्यामुळें. या वेळीं व्यवस्था करून घेणार आहे.

जाजूजी—काय आश्चर्य सांगावें, इतके जरी पेंचांत आहेत तरी इंग्रजांच्या कारभारांत कांहीं फरक पडत नाहीं. त्यांचें जसें पूर्वीचें तंत्र तसें च आज हि चालूं आहे. त्यामुळें हा सत्याग्रह लवकर संपेल असें दिसत नाहीं.

शिवाजी—वर्तमानपत्रांत वाचलें होतें कीं युद्ध संपले तरी सत्याग्रह चालू ठेवण्याचा महात्माजींचा विचार आहे.

जाजूजी—हो. तसें तर राहील च. कारण नुसतें युद्ध संपून काय? हिंदुस्थानला ते जर कांहीं च देणार नाहींत तर सत्याग्रहाशिवाय दुसरा मार्ग च काय आहे?

शिवाजी—दिल्लीच्या रस्त्यानीं सर्व सत्याग्रह्यांनीं जावयाचें ह्याचा अर्थ कांहीं लक्षांत आला नाहीं.

जाजूजी—धर्माधिकारी हि असें च म्हणत होते.

विनोबा—सगळ्यांना एक दिशा त्यांत दाखवली आहे. मीं बापूंना सांगितलें कीं या तालुक्यांतली कांहीं गांवें घेईन. आणि न पकडलें तर त्याच्या उत्तरेकडच्या तालुक्यांत जाईन. मी माझ्यापुरता दिल्लीकडे जाण्याचा असा अर्थ समजलों आहे. तेव्हां बापूजी म्हणाले "बरोबर आहे." इतक्यांत गांधी चौकांतल्या व्याख्यानासाठीं मोटर आली. तींत जाजूजींसह आचार्य बसले.

जाजूजी—मि. ॲमेरींनीं पार्लमेंटमध्ये आपली स्तुति केली होती.

विनोबा—पण पकडण्याचें कारण काय? विनाकारण सजा दिली काय?

अनुक्रमणिका

जाजूजी—पार्लमेंटमध्ये जवाहरलालजींना ४ वर्षे सजा ही ज्यास्त सजा झाली असें म्हटलें गेलें त्या वेळीं विनोबांना थोडी च सजा दिली आहे, असें हि ॲमेरी म्हणाले होते.

शिवाजी—इथला मॅजिस्ट्रेट एकूण बरा असावा.

विनोबा—मी त्याच्यासमोर बसलों होतों खटल्याला. त्या वेळीं तों च जणूं काय गुन्हेगार आहे अशी त्याची चर्या दिसत होती. बोलतां बोलतां मोटार केव्हां च गांधी चौकांत येऊन पोंचली. लोक अजून जमले नव्हते. हळूंहळूं जमत होते. थोडा वेळ जमनालालजींच्या भव्य गच्चीवर विनोबाजी फिरत राहिले. सभेंत लाऊड स्पीकरची व्यवस्था केली होती. जमतां जमतां २/३ हजारपर्यंत माणसें जमलीं. शेजारच्या लक्ष्मीनारायणाच्या मंदिरांत आरती सुरूं झाली. हिंदुस्थानांत हरिजनांना उघडे केलेंलें हें पहिलें मंदिर. थोड्या च वेळांत आरती समाप्त झाली आणि व्याख्यान सुरूं झालें.

सकाळच्या सेवाग्रामच्या भाषणांतले मुद्दे च येथें विस्तारानें सांगण्यांत आले. आणि शेंवटीं कळकळीनें सांगितलें कीं, तुम्ही खादी वापरा, सामुदायिक उपासना करा, घरांतल्या सर्व माणसांना उपासनेंत सामील करीत जा. आज हिंदुस्थानांत अशी सर्वसुलभ आणि उपयोगी उपासना कांतण्याखेरीज दुसरी दाखवितां येणार नाहीं. माझी आई तुळशीला पाणी घातल्याखेरीज मला खाऊं देत नसे. तिनें ही उपासनेची दृष्टि दिली. इंग्रज या खादीनें आणि सत्याग्रहानें स्वराज्य कसा देईल अशी शंका च नको. एक होता राक्षस. त्यानें आपल्याजवळ एक मनुष्य ठेवला होता. त्याला राब राब राबवावा आणि नेहमीं 'खाऊन टाकतों' म्हणून भीति दाखवावी असा त्याचा कार्यक्रम होता. शेवटीं माणसानें त्रासून सांगितलें 'खाऊन टाकतो, खाऊन टाकतों म्हणतोस तर खाऊन टाक एकदांचा' झालें. राक्षसाची सगळी शक्ति गेली. कारण त्याला मनुष्याला खाऊन टाकावयाचा नव्हता. तर त्याला बैलाप्रमाणें राबवावयाचा होता. इंग्रजांचें असें च आहे. त्यांना कांहीं इथल्या लोकांना मारून टाकावयाचें नाहीं. तर गुलामाप्रमाणें राबवावयाचें आहे. तेव्हा इंग्रजांची भीति सोडली कीं आपल्या हातांत स्वराज्य आलें च. म्हणून सर्वांनीं सुताची उपासना करावीं. भीति सोडावी. एक दिवस मृत्यु येणार आहे हें लक्षांत ठेवून आपल्या देहाचें सार्थक केलें पाहिजे इ. इ. इ. उद्यां नागझरीला रात्रीं ९ ला कार्यक्रम आहे (सत्याग्रहाचा) असें जाहीर केल्यावर सभा संपली. मंडळी आचार्यांसह नालवाडीला परतली. प्रार्थना होऊन सबंध दिवसाचा कार्यक्रम हि संपला. आज तर विनोबाजींना पकडलें नाहीं. उद्यां काय? अशा शंकित स्थितींत सर्व जण झोपीं गेले.

**न जाने जानकीनाथ प्रभाते किं भविष्यति ।**

दिनांक १८ जानेवारी १९४१.

**२. नागझरीचा सत्याग्रह :**

रात्रींचा अंमल संपून ब्राह्ममुहूर्ताला सुरवात झाली. वाऱ्याची हालचाल सुरूं झाली. 'रात रहे जाहरे पाछली खट घडी । साधु पुरुषने सुइ न रहेवुं' हें तत्त्व सांगणाऱ्या नेहमींच्या आश्रमांतल्या घंटेचा घण् घण् आवाज ऐकूं आला. मुखमार्जनादि करून मंडळी जमूं लागली. आपापल्या आसनावर बसून मंडळी प्रार्थना करूं लागली. किती मंगल दृश्य हें! आणि त्यांत च समोर आचार्यांची मूर्ती बसलेली! गंगा इथून तिथून सारखी च पण काशीप्रयाग अशा ठिकाणीं तिचे महत्त्व अधिक. प्रार्थना रोजची च. पण आज औत्सुक्य,

अनुक्रमणिका

पवित्रताभाव, एकाग्रता, तन्मयता अधिक. दूध तें च पण त्यांत साखर मिसळल्यावर गोडीत केवढा फरक पडतो. दुधाच्या रूपांत फरक नाहीं. पण रसांत केवढें परिवर्तन! प्रार्थनेंतल्या ह्या परिवर्तनाचें कारण काय आणखी सांगावयास पाहिजे? प्रातःस्मरणाचा हा मंगल कार्यक्रम आटोपला. आज नागझरीला जावयाचें. त्या तयारीला मंडळी लागली. कॉंग्रेस कार्यकर्ते मोहनलाल छाजेड पहांटे च मोघेजींकडे आले. आज नागझरीला जाण्यापूर्वी च बहुतेक अटक होईल अशी त्यांनीं बातमी आणली. या वेळीं आचार्यांच्या झोपडींत कंदिल जळत होता. निजण्याच्या लाकडी पाटावर आचार्य बसले होते. वल्लभभाई, भाऊ पानसे, पंढरीनाथ, गोखले, रामेश्वरजी, सीतारामजी, शिवाजी इत्यादि मंडळी समोर बसलेली दिसत होती. बोलणें चालूं होतें व मंडळी ऐकत होती.

विनोबा—प्रत्येक माणसानें आपल्या अर्ध्या तासाच्या सुताच्या गतीची नोंद ठेवली आणि ती जर मुख्य केंद्राला कळवली, आणि अशी गावोंगांवच्या लोकांची नोंद येथें येऊ लागली तर एक मजबूत संघटना होईल. याज्ञिकांचा मोठा संघ तयार होईल. राष्ट्रांत कांहीं चैतन्य नाहीं अशी स्थिति असतां कामा नये.

रामेश्वरजी—अशी नोंद जर येथें येऊं लागली तर ती तपासणें वगैरेसंबंधींचें एक मोठें च काम होऊन बसेल.

विनोबा—त्याची व्यवस्था करतां येईल. ठिकठिकाणीं च या नोंदी तपासल्या जातील अशी व्यवस्था करणें कांहीं कठीण नाहीं. (इतक्यांत मदालसा येते).

विनोबा—एकटी च आलीस काय?

मदालसा—होय, कंदिल घेऊन आलें.

विनोबा—रस्त्यानें भीतिबिती वाटते कीं नाहीं?

मदालसा—वाटते.

विनोबा—चंद्र असतांना कमी वाटत असेल.

मदालसा—होय चंद्रप्रकाश असतो त्यामुळें.

कोणी तरी—शिवाय चंद्राची सोबत असते.

विनोबा—आणि अंधाऱ्या रात्रीं ताऱ्यांची सोबत असते. चंद्र तर बिचारा एकटा तारे किती तरी. (सर्व जण हंसतात.) — (मध्येंच भाऊनें पाळलेलें लहान कुत्रें मंडळींच्या जवळ जाऊन बसतें. त्यामुळें भाऊ त्या कुत्र्याला एक थप्पड मारतो.)

विनोबा—अगोदर अनावश्यक अशा कुत्र्याला पाळण्याचा परिग्रह करावयाचा आणि तो परिग्रह त्रास देऊं लागला कीं मारण्याची हिंसा करावयाची हा खासा कार्यक्रम आहे! (सर्व जण हंसतात).

कोणी तरी—तकलीच्या प्रयोगांत लाकडाच्या तकलीचा प्रयोग अजून नीट झाला नाहीं असें वाटतें.

विनोबा—तो नीट झाला नाहीं हें खरें च. पण मला त्यावरून एक निराळी च कल्पना सुचली आहे. ट्रॉट्स्कीला हातोड्यानें मारल्याचें वाचलें तेव्हां ही गोष्ट लक्षांत आली. ज्या हातोड्यानें मजुरीचें काम करावयाचें त्या च हातोड्यानें प्रतिपक्षाला मारला म्हणजे तें हत्यार हिंसक हत्यार झालें. आपली ही जी तकलीची सळी आहे ती सुद्धां या दृष्टीनें घातक होऊं शकेल. उपासनेला साधन असें पाहिजे कीं त्याचा दुरुपयोग हि होणार नाहीं. ह्या दृष्टीनें हि लाकडी तकलीचा विचार केला पाहिजे. लाकडी तकली ज्यास्त स्वावलंबी आहे. कोणाला हि करतां येईल.—अशा तऱ्हेचा संवाद चालू होता. झुंजूमुंजू होऊन अरुणोदयाची छटा पसरली. जो तो प्रातःस्नानाच्या तयारीला लागला. आचार्यांच्या सामानाची मदालसा आणि वल्लभभाईंनीं तयारी केली. त्यांचें स्नानादि सर्व उरकून सकाळची न्याहरी हि होऊन गेली. मोटार हि तयार च होती. मोघेजी, बुद्धसेन, शिवाजी, गद्रेजी इतकी मंडळी आचार्यांबरोबर मोटारींत बसलीं. बाकीची मंडळी आगगाडीनें देवळीवरून नागझरीला यावयाची असें ठरलें. मोटार चालणार इतक्यांत मदालसेनें तिळगूळ आणला. पण त्या वेळीं तिळगूळ कोण घेणार?—मोटार चालू झाली आणि संवाद हि चालू झाला.

शिवाजी—कर्म ब्रह्मोद्भवं विद्धि ब्रह्माक्षरसमुद्भवम् ।
तस्मात्सर्वगतं ब्रह्म नित्यं यज्ञे प्रतिष्ठितम् ॥

या एका च श्लोकांत ब्रह्म शब्दाचे दोन अर्थ घ्यावे लागतात. ज्ञानेश्वरांनी ब्रह्म शब्दाचा अर्थ वेद केला आहे.

**(तया पर्जन्या यज्ञीं जन्म । यज्ञाते प्रकटी कर्म**
**कर्मासि आदि ब्रह्म । देवरूप**
**मग वेदातें परापर । प्रसवतसे अक्षर**
**म्हणऊनि तें चराचर । ब्रह्मबद्ध ॥)**

विनोबा—गीतेंत ८ व्या अध्यायाच्या सुरवातीला ७ प्रश्न विचारले आहेत. त्यांत ‘अक्षरं ब्रह्मपरमं’ अशी ब्रह्माची कल्पना मांडली आहे. त्याला अनुसरून ‘अक्षर’ शब्दाचा ‘ब्रह्म’ अर्थ केला. आणि ज्यापासून कर्म उद्भवतें त्या ब्रह्म शब्दाचा प्रकृति अर्थ केला.

शिवाजी—गीताईचें प्रेमळ स्वरूपः ‘समत्व-योग’ हा लेख वाचला काय?

विनोबा—होय.

शिवाजी—त्यांत मांडलेला मुद्दा बरोबर आहे ना?

विनोबा—बरोबर आहे. ज्ञानेश्वरांच्या लक्षांत तो मुद्दा आलेला होता असें दिसतें.

‘अर्जुना समत्व चित्ताचें । तें चि सार जाण योगाचें । जेथ मन आणि बुद्धीचें । साम्य आथी ॥’ या त्यांच्या भाषेवरून असें दिसतें.

अनुक्रमणिका

शिवाजी—‘समत्वयोग’ या शब्दांत भावरूप आणि अभावरूप दोन्ही कल्पनांची सूचकता आहे. हा मोठा च गुण समजला पाहिजे.

विनोबा—‘अनासक्ति-योग’ हा शब्द अभावरूप आहे. त्यानें अनासक्ति नको म्हणजे काय पाहिजे हें कळत नाहीं, हें खरें पण तो शब्द ‘साधन-दर्शक’ आहे. आणि ‘समत्वयोग’ हा शब्द ‘साध्य-दर्शक’ आहे. समत्व साधावयाचें अनासक्तीनें च. अनासक्ति-योग या नांवांत हा गुण आहे.

शिवाजी—परंतु त्या नांवावर एक आक्षेप घेण्याजोगा आहे. ‘मय्यासक्तमनाः पार्थ’ असें भगवंतांनीं म्हटल्यामुळें तें नांव पूर्णपणें सार्थ ठरत नाहीं.

विनोबा—मय्यासक्त म्हणजे च अनासक्तीची दुसरी बाजू.

शिवाजी—वल्लभभाईंनीं स्थितप्रज्ञावर लेखमाला लिहिली. त्यांत ‘कामात्क्रोधोऽ भिजायते’ या वाक्यावरचें त्यांचें लिखाण बरोबर झालें नाहीं.

विनोबा—कामाला अडथळा झाला तर च क्रोध उद्‌भवतो ही चुकीची कल्पना होऊं नये म्हणून गीताईंत “क्रोध कामांत ठेविला” अशी भाषा वापरली आहे.

शिवाजी—ज्ञानेश्वरांनीं तर जेथ काम उपजला । तेथ क्रोध आधीं चि ठेला, असा ‘आधीं’ शब्द घातला आहे.

विनोबा—ज्ञानेश्वरांची अशी पुष्कळ ठिकाणीं ‘सूक्ष्म दृष्टि’ आहे.

शिवाजी—महाराष्ट्राचा भूगोल लिहिण्याची कल्पना केली तर त्यांत कोणकोणत्या बाबी येतील?

विनोबा—थोडा इतिहास त्यांत येईल. सर्वसामान्य माहिती देतां येईल. कार्यदृष्टीनें महत्त्वाच्या ठिकाणांची कल्पना देतां येईल. मुख्यतः थोडक्यांत सुटसुटीत अशी रचना झाली पाहिजे. बारीक सारीक माहिती दिली तर फार च मोठा ग्रंथ होईल. या वेळीं मोटार देवळीला येऊन पोंचली. मोटार थांबवली. देवळीची कांहीं मंडळी मोटारीजवळ येऊन बोलूं लागली.

मंडळी—देवळीला कार्यक्रम ठेवावयाचा कीं नाहीं?

विनोबा—नाहीं. मागल्या वेळीं देवळीला आलों च होतों. आतां नागझरीचा कार्यक्रम ठरलेला आहे. न च पकडलें तर पुढें परत येतांना पाहूं—(मोटारवाला मोटारींतून उतरून कोठें गेला होता. तो यावा म्हणून देवळीची मंडळी ‘वाह्यात् वाह्यात्’ म्हणून त्याला हांका मारूं लागली.)

शिवाजी—‘वाह्यात्’ नांव आहे मोटारवाल्याचें?

अनुक्रमणिका

मंडळी—लहानपणीं वाह्यातपणा करीत असेल म्हणून वाह्यात् नांव पडलें. आतां सर्व जण त्याला वाह्यात् नांवानें च हांका मारतात.

विनोबा—वाहीद नांव असेल, त्याचा वाह्यात् अपभ्रंश झाला.

शिवाजी—महाभारतकालीं युद्ध रात्रीं करावयाचें नाहीं असा नियम होता. पण रामायणकालीं तसें दिसत नाहीं.

विनोबा—रामायणांतलें युद्ध राक्षसांचें होतें तसें महाभारतांतलें नव्हतें.

शिवाजी—काकासाहेबांनीं मनाच्या श्लोकांची एक आवृत्ति काढली ती पाहिली काय?

विनोबा—पाहिली. त्यांत प्रस्तावनेंत काकासाहेबांनीं दोन महत्त्वाचे मुद्दे मांडले आहेत.

(१) मनाचे श्लोक म्हणणारी "नीतिशिक्षकांची फौज" निर्माण करावयाची होती समर्थांना (२) मनाला च कां बोध केला? या संबंधींच्या काकासाहेबांच्या कल्पना अतिशय उत्तम कल्पना आहेत.

शिवाजी—नानासाहेब देव म्हणतात कीं "परपीडेवरी नसावें अंतःकरण" ही अहिंसेची मर्यादा असावी. आत्मसंरक्षणार्थ हिंसा चालेल पण दुसऱ्यावर आक्रमण करण्याची इच्छा नको.

विनोबा—हिटलर हि हें च म्हणतो. तो कुठें परक्यावर आक्रमण करतो असें म्हणतो आहे? आत्मसंरक्षणाची च त्याची भाषा आहे.

शिवाजी—निरपवाद अहिंसा ही अनीति आहे असें सावरकर सांगूं लागले आहेत.

विनोबा—तशीं पाश्चात्यांत हि मतें आहेत. एक जण तर मला म्हणत होता मनुष्य हा सर्वांत उत्क्रांत प्राणि असून मनुष्यदेहाशिवाय पशूंना सद्‌गति नाहीं. म्हणून पशूंचें मांस माणसानें खाण्यांत त्याला सद्‌गति देण्याचें पुण्य आहे.—मोटार नागझरीला आली. सर्वजण उतरून खंडेराव जाधवांच्या बगीच्यांत गेले. गांवाच्याजवळ च पण अलग असा हा सुंदर बगीचा असून, त्यांत एक लहानशीं राहण्याची जागा हि केली होती. बसण्यासाठीं एक मांडव घातला होता. मांडवासमोर बैल बांधण्याची जागा होती. मांडवाला लागून मागच्या बाजूला संत्री, मोसंबीं लावलेलीं होतीं. विहिरीला विपुल आणि गोड पाणी असे. भाजीपाला लावण्याची सोय त्यामुळें चांगली च झालेली होती. खंडेराव जाधव हे या गांवचे प्राण म्हटलें तरी चालेल. त्यांचें ठिकाणीं धैर्य, शौर्य, धडाडी हे गुण चांगले च विकसित झालें होतें. गांवांत ते म्हणतील तें झालें च पाहिजे अशी गांवावर त्यांची पकड होती. त्यांच्या पाठीमागें हा १०/१२ शें वस्तीचा गांव कोणती हि स्वार्थत्यागाची गोष्ट करण्यासाठीं तयार असे. १९३० मध्यें त्यांच्याबरोबर गांवांतून ५० स्त्रीपुरुष जेलमध्यें गेले होते. शरीरानें हि ते धिप्पाड होते. आश्रमीयांशीं त्यांचा चांगला च परिचय असे. ते नसल्यामुळें गांवांत आणि त्यांच्या बगीच्यांत एक प्रकारची उदास छटा पसरली होती. आचार्य सुटले तत्पूर्वी दोन च दिवसांपूर्वी १३ जानेवारी १९४० रोजी त्यांचें देहावसान झालें. एक चांगला कार्यकर्ता गेला. मुद्दाम आचार्य नागझरीला येण्याचें हि हें च कारण होतें. तेव्हां आल्याबरोबर खंडेरावांच्या संबंधीं हकीकत स्वाभाविकपणेंच विचारली.

नागझरीच्या जमलेल्या मंडळींनीं हि सर्व हकीकत सविस्तर रीतीनें सांगितली. यानंतर फिरतां फिरतां चर्चा सुरू झाली.

शिवाजी—नाथांच्या अभंगांची निवड फार सुंदर तऱ्हेची झालेली आहे. त्यांत सोपेपणा पुष्कळ आहे. पण कांहीं भाग गूढ वाटतो च. त्यांत नाथांची ओळख करून घेण्याची दृष्टि नसली तरी नाथांची चांगली ओळख होते.

विनोबा—अशा मोकळ्या अभंगांत नाथादिक संतांचें जसें दर्शन होते असें त्यांच्या प्रबंधग्रंथांत होत नाहीं. नाथांच्याप्रमाणें ज्ञानेश्वरांचें हि अभंग निवडले आहेत. सुमारें १५० झाले आहेत. नामदेवांचे अधिक होतील. आणि तुकारामाचे सर्वांत ज्यास्त होतील.

शिवाजी—एकनाथांच्या अभंगांत चित्तशुद्धि, नामस्मरण, सत्संगति वगैरे प्रवाह दाखवला असला (प्रस्तावनेंत) तरी ४० विभागांची नीट कल्पना येत नाहीं.

विनोबा—पहिल्या प्रकरणांत अनित्य-भावना सांगितली. दुसऱ्यांत कर्मयोगाची प्राथमिक अवस्था आहे. हा तेविसावा अभंग गीतेच्या आपूर्यमाणम् या श्लोकाशीं ताडून पाहण्याजोगा आहे. समुद्रापेक्षां योगी श्रेष्ठ असें यांत दाखविलें आहे, तें विशेष आहे. ४ थ्या प्रकरणांत साधन-शुद्धि आहे. पांचव्या प्रकरणांतला पहिला च श्लोक गीतेच्या ७ व्या अध्यायाची आठवण करून देतो. त्याच्या ह्यापुढच्या श्लोकांत लक्षणा सांगितली आहे.

शिवाजी—२८ व्या प्रकरणांतला हा १९४ वा अभंग आई म्हणत असे.

विनोबा—होय, आईचे अभंग घेऊन च टाकले ह्यांत. कांहीं कांहीं विचार पाहण्याजोगे आहेत. हा विसाव्या प्रकरणांतला ३८ वा अभंग “संत माय बाप म्हणतां । लाज वाटे बहु चित्ता” हा विशेष विचार आहे. हा विचार अगदीं तीव्रतेनें मांडला आहे. संतांना मायबाप म्हणतांना लाज वाटते म्हटलें आहे.

शिवाजी—कांहीं कांहीं अभंग आणि इतर संतांचे अभंग यांत पुष्कळ सादृश्य दिसतें.

विनोबा—१७ या प्रकरणांतला ११७ वा श्लोक ज्ञानेश्वरीसारखा च आहे. हें प्रकरण हरिकीर्तनाचें आहे. (२० व्या प्रकरणांतला १४० वा अभंग संत केवळ घातकी). हा विचार हि पाहण्याजोगा आहे. असें एकनाथी भजनें या पुस्तकांतले अनेक विचार दाखविले गेले. नंतर निराळ्या विषयांवर बोलणें सुरू झालें.

शिवाजी—सर्वोदयांत ईशावास्योपनिषदावरचें लिखाण छापलें गेलें आहे. मराठींत त्याचें पुस्तक तयार केलें तर?

विनोबा—तें ईशावास्योपनिषद् बापूंसाठीं च लिहिलेलें आहे. छापावयाचें तर अधिक लिहावयास पाहिजे.

शिवाजी—गीतेच्या तोडीचें लिखाण संस्कृतांत दुसरें कोणतें दाखवितां येईल?

विनोबा—गीतेच्या तोडीचें नव्हे परंतु त्या दिशेनें पाहतां येईल असें एक योगशास्त्र आहे. संयमाचें शास्त्र च त्यांत बनवून टाकलें आहे. आणि दुसरा ग्रंथ म्हणजे ब्रह्मविद्येचा. म्हणजे उपनिषदें, बायबल व इतर ग्रंथांत पुष्कळशी रूपकात्मकता आहे. गीता हें बिनचूक शास्त्र असून शास्त्राची कर्कशता त्यांत नाहीं.

शिवाजी—गीता हा तत्त्वदृष्ट्या सार्वभौम ग्रंथ आहे. पण तो हिंदु धर्माच्या वातावरणांतला ग्रंथ आहे.

विनोबा—गीतेंत हिंदुधर्माचा अध्याय १० वा, पण त्या अध्यायांतल्या गोष्टींना भगवंतांनीं हि फार महत्त्व दिलें आहे, असें नाहीं. त्यांत च त्यांनीं म्हटलें आहे "अथवा बहुनैतेन किं ज्ञातेन तवार्जुन?" गीतेशिवायचे ग्रंथ पहावयाचे तर भागवत पाहतां येतें. त्यांतलें कांहीं श्लोक तर फार च गोड आहेत. मनुस्मृतींत हि 'ऋषयो दीर्घसंध्यत्त्वात....इत्यादि स्वतंत्र विचार आढळतात. विष्णुसहस्त्रनाम हि गोड आहे.

शिवाजी—विष्णुसहस्त्रनामांत विशेष काय आहे?

विनोबा—ईश्वराच्या नांवानें सिद्धांत गाऊन दाखविण्याची पद्धति दिसते त्यांत 'धर्म गोप्ता' म्हटलें कीं 'यदा यदा हि धर्मस्य—' याचें स्मरण होऊन जातें. कांहीं रचना छंदांत बसण्याच्या दृष्टीनें केलेली आहे—"भूतभव्य भवत्प्रभुः" अशासारखी.

शिवाजी—समर्थांचे अभंग वगैरेंची निवड कोणत्या धोरणानें करण्याची कल्पना आहे?

विनोबा—समर्थ मनाच्या श्लोकांत चांगले प्रकट होतात. त्याला अनुसरून च निवड करावयाची आहे.

शिवाजी—जेलमध्यें गीतेवर कांहीं सांगितलें काय?

विनोबा—या वेळीं नागपूर जेलमध्यें २४ प्रवचनें झालीं.

शिवाजी—पण तीं तेथें कोणी उतरून घेतलीं नसतील?

विनोबा—नाहीं. पण ब्रिजलाल बियाणी रोज कांहीं तरी प्रश्न घेऊन येतात. त्यांना १/१॥ तास देतो. ते मात्र उतरून घेतात.

यापुढील कार्यक्रम जेवण विश्रांतिनंतर शाळेंत ठेवण्यांत आला होता. तेथें च तकली उपासना हि झाली. नंतर शिक्षकांनीं मुलांचे कार्यक्रम करविले. हिंदुमहासभा आणि काँग्रेस असे दोन वाद या बिचाऱ्या कोवळ्या मुलांच्याकडून पाठ करवून त्याचा संवाद करण्यांत आला. खेड्यांत जोंपर्यंत उच्च दर्जाचे शिक्षक जात नाहींत तोंपर्यंत कोणती हि शिक्षण योजना असो, मुलांना उत्तम शिक्षण मिळणें ही गोष्ट शक्य नाहीं. या कार्यक्रमानंतर शाळेच्या मैदानांत आचार्यांच्या हस्तें झेंडा फडकविण्याचा कार्यक्रम होऊन मंडळी परतली. संध्याकाळ झाली. पक्षी आपापल्या घरट्यांत जाऊं लागले. गुरें घरीं परत येऊं लागली. त्यांच्या गळ्यांतल्या घंटांचा आवाज होऊं लागला. Those evening bells, How many a tell their music tells! त्या घंटांच्या मधुर भाषेचा भाव कोण सांगणार?—मंडळी थोडा वेळ मांडवांत बसली. गद्रेजींनीं सत्याग्रहाचीं

अनुक्रमणिका

पद्यें विनोबाजींना दाखविलीं. त्यांत ब्रिटिश युद्धास मदत करणें 'हराम' आहे असें एक वाक्य होतें. तें विनोबाजींनीं बदलण्यास सांगितलें. "हराम" म्हणजे वर्ज्य एवढा च मूळ अर्थ असला तरी मराठींत त्याचा विपरीत अर्थ होतो हें त्याचें कारण होतें. संध्याकाळ झालीं. मांडवांत विनोबाजी जेवण्यास बसले. आजूबाजूला शिवाजी, रामेश्वरजी, गंगूताई, दगडूभाऊ, चावदसभाऊ, बुद्धसेन—अशी मंडळी बसलेली होती. इतक्यांत बोलणें चालू असतां च गंगूताईंस फिट् आली. त्यामुळें त्या पडल्या. रामेश्वरजींनीं त्यांना सावध केलें. थोडा वेळ मग त्या च विषयावर बोलणें झालें.

कोणी तरी—फिट् म्हणजे बेशुद्धि च ना?

शिवाजी—नाहीं. बेशुद्ध अवस्थेंत मनुष्य लवकर सावध झाला नाहीं तर मरण्याची धास्ती आहे. पण फिट्मध्यें तशी धास्ती मुळीं च नाहीं. डॉक्टर लोकांना अजून त्याचा उलगडा झाला आहे असें म्हणतां येत नाहीं.

विनोबा—अजून मानसशास्त्रांतल्या पुष्कळ गोष्टी कळावयाच्या च आहेत. कित्येकांच्या अंगांत येतें हा काय प्रकार आहे याचा हि कांहीं नीट उलगडा झालेला नाहीं.

शिवाजी—पण ही गोष्ट नक्की आहे कीं, अंगांत येणें, फिट् येणें अशा गोष्टी स्त्रिया व मुलें यांच्यांत ज्यास्त दिसतात.

विनोबा—कारण त्यांच्यांत भावनेचें प्राबल्य अधिक. त्यांच्यावर कोणत्या हि गोष्टीचा ताबडतोब परिणाम होतो.

शिवाजी—अज्ञान अवस्थेंत ज्ञान ग्रहण करण्याला भावनामयता अनुकूल आहे. त्यामुळें च लहान मुलें कोणती हि गोष्ट लवकर ग्रहण करतात असें दिसतें. मग ही स्थिति चांगली असें कां म्हणूं नये?"

विनोबा—भावनेबरोबर तर्क हि वाढला पाहिजे. भावना आणि तर्क हीं सारखींच वाढत गेलीं पाहिजेत. मोठेपणीं तर्क वाढतो पण भावना कमी होते हें उपयोगी नाहीं. दोहींचा पूर्ण मेळ असावयास पाहिजे. याला च ज्ञानेश्वरांनीं 'मन बुद्धीचें साम्य म्हटलें आहे.'

—इतक्यांत वर्ध्याहून सायकलवरून भाऊ आला. दिवसभर सरंजाम कार्यालयाचें काम करून ५/५॥ ला कार्यालय बंद करून अंधारांतून सायकलवर ५/६ मैल रस्ता वाईट असतां धडपडत येणें ही गोष्ट सत्सहवासाच्या आवडीशिवाय कशी होणार? विनोबांना हि त्याच्या येण्याचें आश्चर्य वाटलें. सर्वांचीं जेवणें होऊन प्रार्थना झाली. प्रार्थनेंत एकनाथांचीं भजनें म्हणण्यांत आलीं. व्याख्यानाला अजून थोडा वेळ होता. तेव्हां पुन्हां बोलणें सुरू झालें.

विनोबा—जर्मनीची या वेळची लढाई विलक्षण शिस्तीची आणि कार्यकुशलतेची झाली. जर्मनांमधे व्यवस्थाशक्ति विलक्षण दिसते. ७०/७० लाख फौज अगदीं सुव्यवस्थित चालविणें हे सामान्य काम नाहीं.

शिवाजी—इंग्लंडची ही चिकाटी असामान्य म्हटली पाहिजे.

विनोबा—होय. इंग्रज लोकांत चिकाटीचा गुण फार मोठा आहे. धीर खचूं न देतां शांतपणें आपलें ध्येय धिम्मेपणानें साध्य करण्याची त्यांची हातोटी या वेळीं हि असामान्य आहे. नेपोलियनचा इंग्रजांच्या धिम्मेपणामुळें च पराजय झाला.

शिवाजी—या दृष्टीनें पाहिलें तर आपल्या चळवळी अजून पुष्कळ च मागें आहेत असें दिसतें.

विनोबा—या वेळची बापूंची चळवळ पुष्कळ शिस्तीनें चाललेली आहे. एका माणसाच्या तंत्रानें बिनतक्रार सर्व कामें चालत आहेत. या शिस्तीचा सरकारवर पुष्कळ परिणाम झालेला आहे.

—या वेळीं व्याख्यानाची वेळ झाल्याचें सांगण्यांत आलें. मंडळी उठली. व्याख्यानाची जागा जवळ च होती. तेथें उंच व्यासपीठ तयार केलें होतें. माणसांची चिक्कार गर्दी होती. स्त्रिया हि पुष्कळ जमल्या होत्या. आरंभीं शाळेंतल्या एका लहान परंतु धीट मुलानें पद्यगायन केलें. नंतर नागझरींतल्या १०—१२ संस्थांतर्फे सुताचे हार घालण्यांत आले. “माझ्या खेडेगांवांतल्या भावांनो आणि बहिणींनों” असें संबोधन करून विनोबाजींनीं व्याख्यानाला सुरुवात केली. या वेळीं ८॥ वाजले होतें. सरकारी रिपोर्टर रिपोर्ट घेत होते. इकडे बुद्धसेन आणि भाऊ पानसे यांनीं ही रिपोर्ट घेण्यास सुरुवात केली. व्याख्यानाचा पूर्वभाग स्वाभाविकपणें च खंडेरावांसंबंधींचा होता. खंडेराव बहादुर होते, त्यांची हिम्मत, लोकसेवेची तळमळ, मला माहीत होती. त्यामुळें मी सत्याग्रह करीन तेव्हां नागझरीला जाईन अशी माझी कल्पना होती च. २६ तारखेला स्वातंत्र्यदिन आहे त्या च दिवशीं खंडेरावजींचे १२ दिवस पूर्ण होतात. पण तोंपर्यंत सरकार मला बाहेर राहूं देईल याची शाश्वती नाहीं. म्हणून मी मुद्दाम आज येथें आलों. खंडेराव गेले. आपण हि जाणार च आहो. या जगांत कायमचा कोणी च राहणार नाहीं. तेव्हां सर्वांनीं त्यांचे गुण घ्यावे. त्यांचे दोष त्यांच्या देहाबरोबर गेले. त्यांचे गुण घ्याल तर त्यांना हृदयांत सांठवलें असें होईल. आणि गुण न घ्याल तर त्यांना मारून टाकलें असें होईल. देह गेल्याचें दुःख नाहीं. आत्मा कधीं मरत नसतो. त्यांचें कार्य पुढें चालवा तर त्यांना आनंद होईल. असा पूर्वार्ध झाल्यानंतर उत्तरार्धांत नेहमींचे सर्व युद्धविरोधविषयक मुद्दे तर सांगितले च पण एका महत्त्वाच्या नवीन मुद्याचें या ठिकाणीं आविष्करण करण्यांत आलें. अहिंसेच्या योगानें शत्रूचा मित्र बनवितां येतें. वाल्या कोळ्याची गोष्ट तुम्हांला माहीत आहेच. वाल्या कोळ्यानें नारदावर हल्ला करण्यासाठीं म्हणून चाल केली असतां नारद शांतपणें उभे राहिले. ती नारदांची शांति पाहून च वाल्या कोळी चकित झाला आणि शेवटीं वाल्या कोळ्याला नारदानें उपदेश करून त्याच्या पापकर्मापासून त्याला परावृत्त केलें. ही गोष्ट तर सर्वांना च माहीत आहे. आतां प्रश्न असा करतात कीं तुमची गोष्ट अगदीं खरी आहे. पण सगळे च नारद कसें होऊं शकतील? तर त्याला उत्तर असें कीं, सगळे च नारद नाहीं झाले तरी चालू शकेल. आज जर्मनीमध्यें काय सगळे च हिटलर आहेत? हिटलर एक च आहे. पण त्या एका हिटलरच्या तंत्राप्रमाणें सर्व जण चालतात. एका शिस्तीनें राहतात. त्याप्रमाणें नारद एक च असला—गांधी एक च असला तरी आज आपण सर्व त्यांच्या शिस्तीबरहुकूम वागूं तर हिटलरप्रमाणें आपल्याला अहिंसेनें हि मोठमोठे परिणाम घडवून आणतां येतील. — हा नवीन महत्त्वाचा मुद्दा हें च नागझरी च्या भाषणाचें वैशिष्ट्य होते. भाषण झाल्यानंतर बहुतेक सर्व मंडळी शाळेंत झोपलीं. ६ वाजेपर्यंत उठवूं नका. प्रार्थना त्यानंतर करूं असें सांगून विनोबाजी बगीच्यांतील मांडवांत निजले. दिवे मंद झाले. सर्व जण झोपी गेले. आकाशांतील रत्नदीप मात्र जागत होते. अथवा जागत होते तरी कोणी म्हणावे?

**तेल न बाती बुझ नहिं जाती ।**
**नहिं जागत नहिं सोती । नजर न आवे आतमज्योती ॥**

अनुक्रमणिका

दिनांक १९ जानेवारी १९४१.

**३. सोनेगांवचा सत्याग्रह :**

विनोबाजी निजले होते त्या नागझारीच्या बगीच्यांत शेजारीं टोपल्यांत झांकलेलीं पुष्कळ कोंबडीं होतीं. त्यांनीं पहांटे तीन वाजल्यापासून ऱ्हस्व-दीर्घ-प्लुत स्वरांत ओरडण्याला सुरुवात केली. त्यामुळें विनोबाजींची झोपमोड होऊन ते अगोदर च उठले व त्यांनी प्रार्थना हि म्हटली. १/२ माणसें या वेळीं जागीं होतीं. बाकीची मंडळी सहा वाजेपर्यंत शाळेंत झोपून राहिली. स्नान वगैरे आटोपून सोनेगांवला जाण्याची तयारी केली गेली. विनोबाजींची खाण्यापिण्याची सर्व व्यवस्था दगडूभाऊ, बुद्धसेन मोठ्या मेहनतीनें करीत असत. त्यांना दही लागे. तें वेळोवेळीं विरजण्याचें काम पडे. त्यांची सर्व भांडी वगैरे त्यांनीं अलग काढून ठेवलीं. आतां विनोबाजींचा सकाळचा फराळ झाल्यावर निघावयाचें अशी, तयारी झाली. विनोबाजी सकाळीं न्याहारी घेत होते. संभाषण चालू होतें. गद्रेजी, मोघेजी, चावदस, दगडूभाऊ, सीतारामजी, शिवाजी, रामेश्वरजी इत्यादि मंडळी बैठकीवर बसलेली होती.

शिवाजी—आजच्या संतांविषयीं सामान्यतः आदर दिसत नाहीं. ५०० वर्षांपूर्वीच्या संतांविषयीं आदर वाटतो. वस्तुतः मागच्यांची भूतकाळांमुळें आपल्याला नीट कल्पना हि येऊं शकत नाहीं.

विनोबा—भूतकाळांतल्या संतांची बरोबर कल्पना येऊं शकेल. जसा रेडिओवर दूरचा आवाज बरोबर ऐकूं येतो म्हणतात तशी भूतकाळांतली सर्व कल्पना बरोबर ग्रहण करतां येईल.

शिवाजी—म्हणजे मागच्या काळांत जातां येईल असा अर्थ समजावयाचा काय?

विनोबा—होय. आवाज जसा सर्वत्र पसरतो, रेडियोनें तो ग्रहण होतो; त्याप्रमाणें कोणता हि विचार नष्ट होत च नाहीं. तो सर्वत्र भरून च राहतो. तो ग्रहण कसा करावा हा च प्रश्न आहे. ग्रहणसामर्थ्य मात्र सर्वत्र असत नाहीं. ज्याला ग्रहणसामर्थ्य आहे. त्याला मागच्या संतांची बिनचूक कल्पना येऊं शकेल.

शिवाजी—भूतकाळाप्रमाणें मग भविष्यकाळांत हि जातां येईल काय?

विनोबा—भविष्यकाळांत जाण्याचा प्रश्न च नाहीं.

शिवाजी—भूतकाळांतली प्रत्येक कृति हि समजूं शकेल काय?

विनोबा—प्रत्येक कृति समजण्याची आवश्यकताच काय आहे? विचार हा मुख्य आहे ना?

शिवाजी—मीमांसकांनीं सृष्टि शब्दप्रभव मानली आहे. याचा अर्थ ती विचारांपासून उत्पन्न झाली असा मानावा लागेल.

विनोबा—होय. विचार आणि भाषा अलग राहूं च शकत नाहींत. वास्तविक आपण जें जें पाहतों तो एक विचार आहे. सृष्टि ज्ञानस्वरूप आहे. म्हणून ज्ञानेश्वरांना तिच्यांतून अनेक तऱ्हेनें बोध मिळवितां आला.

अनुक्रमणिका

मी उन्हांत फिरत होतों. सहज समोरच्या झाडाकडे लक्ष गेलें. नवीन पानांमुळें झाड अगदीं हिरवेंगार दिसत होतें. वरून प्रखर ऊन तापत होतें. तरी तें हिरवेंगार राहिलें होतें. तेव्हां मला दिसलें कीं हा एक स्वच्छ विचार च उभा आहे झाडाच्या रूपानें. वरून तपस्या आंतून भक्तीचा ओलावा. वरून अनासक्ति आंतून भक्ति.

शिवाजी—पण सृष्टींतील प्रत्येक वस्तु हा अमुक च विचार आहे असें कसें म्हणतां येईल? दुसऱ्या कोणाला त्यांतून आणखी कांहीं विचार सुचेल.

विनोबा—हा च सगुणांतला दोष आहे. सगुण हें विविध-स्वरूप आहे. निर्गुणाचें तसें नाहीं. निर्गुण निश्चित एकस्वरूप आहे. छोटेलालजी विहिरींत पडून वारलें. तेव्हां मी हाच विचार सांगितला होता. अव्यक्त दशा निश्चित आहे. पण व्यक्त हें भ्रमात्मक आहे. एक जण मला एकदां म्हणाला मोठ्या माणसांजवळ राहून लहान माणसांचा विकास होत नाहीं. जसा मोठ्या झाडाच्या सावलींत लहान झाडांचा विकास होत नाहीं. मीं त्याला उत्तर दिलें ही गोष्ट चुकीची आहे. मोठा मनुष्य हा स्वार्थी कल्पिला तर हें म्हणणें बरोबर आहे. पण तो जर निस्वार्थी असेल तर त्याच्यापासून लहानाचा फायदा झाला च पाहिजे. सृष्टीच्या दर्शनानें भिन्न भिन्न विचार उत्पन्न होतील हें सृष्टींचें वैभव हि आहे.

शिवाजी—सृष्टीचा नित्य परिचय झाल्यामुळें व्यावहारिक दृष्टि च डोळ्यापुढें उभी राहते. शेण पाहिलें कीं सारवणाचा एक पदार्थ या शिवाय तेथें अधिक दर्शन होत नाहीं. परंतु ज्ञानेश्वरांचें तसें दिसत नाहीं. त्यांना अगदीं साध्या वस्तूंमधून निराळें च दर्शन होत असावें असें दिसतें.

विनोबा—म्हणून च सृष्टि ही माया आहे असे म्हणण्याकडे त्यांचा कल नाहीं. सृष्टि ब्रह्मस्वरूप च आहे. फक्त ती साकार झाली. विचार हा आकाराला आला.

शिवाजी—लेण्यांमध्यें असें च दिसून येतें.

विनोबा—अव्यक्त वेड्यावांकड्या पर्वतांत लेणें अप्रकट च आहे. वेरूळचें लेणें पाहिल्यावर ज्ञानेश्वरांनीं ज्ञानेश्वरीला 'देशीकार लेणें' म्हटलें आहे. त्याचा अर्थ लक्षांत आला.

शिवाजी—अजिंठ्याचें लेणें पाहिलें काय?

विनोबा—नाहीं.

शिवाजी—ग्रिफिथ साहेबांनीं अजिंठ्यावर एक सुंदर पुस्तक लिहिलें आहे.

विनोबा—या इंग्रजी भाषेनें ज्ञान मेलें.

मोघेजी—इंग्रजी नको असेल तर शिकूं नये पण तिच्यामुळें ज्ञान मेलें कसें?

अनुक्रमणिका

विनोबा—अशीं च पुष्कळशीं पुस्तकें लिहून ठेवलीं त्यांनीं. त्यामुळें बसल्या बसल्या पुस्तकें वाचतात आणि ज्ञान झालें असें आमचे लोक मानतात. प्रत्यक्ष ज्ञान काय पुस्तकाच्या माहितीनें होतें?

मोघेजी—मग मराठींत अशीं पुस्तकें लिहिलीं तर?

विनोबा—तरी हि ज्ञान मरेल च. हिंदुस्थानची माहिती मिळविण्यासाठीं मनुष्य फिरूं लागला तर त्याला केवढा अनुभव मिळेल? रस्त्यांत गुजराती, मारवाडी, बंगाली—किती तरी भाषांचा परिचय होईल. पोषाख, न्यारीरीति, तीर्थक्षेत्रें, साधुसंत, संस्था—या सगळ्यांचें प्रत्यक्ष ज्ञान काय पुस्तकांनीं होणार आहे? मला तर हीं पुस्तकें पाहिलीं म्हणजे तुकारामबोवांचा अभंग आठवतो—

**कामक्रोध आड तडिले पर्वत । राहिला अनंत पैलीकडे**

तसें या पुस्तकांच्या पलीकडे ज्ञान आहे. पुस्तकें ओलांडून गेल्याशिवाय ज्ञान लाभावयाचें नाहीं.

गद्रेजी—मग इंग्रजीनें च ज्ञान मेलें असें कां म्हणतां? पुस्तकानें ज्ञान मेलें असें म्हणावें पाहिजे तर.

विनोबा—त्याचें कारण आहे. त्या लोकांना इकडची दृष्टि नाहीं. नुसती माहिती मिळवून कसला तरी भलता च पोषाख ते तिला चढवतात. अबूचें सूर्यमंदिर पाहून त्यांनीं लिहिलें आहे कीं, ती कुठली ग्रीकांची का आणखी कोणाची पद्धति पाहून हें मंदिर बांधलें असावें व त्यावरून तें इतक्या वर्षांपूर्वीचें असावें. कारण काय तर मंदिरांत बाहेर इतकी नकशी किंवा कला दाखवीत नाहींत, जितकी आंत दाखवितात. सूर्यमंदिरांत आंत-बाहेर सर्वत्र सारखी च कला दाखविली आहे. त्यांना सूर्यदेवतेची कल्पना नाहीं. सूर्य ही प्रकाशाची देवता आहे. आंत-बाहेर सर्वत्र प्रकाश देणाऱ्या देवतेच्या मंदिरांत आंत-बाहेर साम्य असावयाचें च. ही दृष्टि त्यांना नाहीं.

शिवाजी—निरुक्तकारांनीं ऐतिहासिक रस्ता सोडून देऊन एका शब्दाच्या अनेक व्युत्पत्त्या सुचविल्या यांत तत्त्व कोणतें आहे?

विनोबा—प्रत्येक वस्तु ही अनंत भाव दर्शविणारी आहे. हे भाव दाखविण्याचा निरुक्तकारांनीं प्रयत्न केला आहे. त्यांचा प्रयत्न आध्यात्मिक आहे.

शिवाजी—शब्दांतून च ते भाव दाखविण्याचा अट्टहास कां?

विनोबा—कारण आपण ज्ञानपूर्वक शब्द-संकेत करतों. त्या त्या वस्तूला शब्द योजला हा विचारपूर्वक—ज्ञानपूर्वक योजला आहे. तेव्हां शब्दांतून च ते भाव दाखवावयाचे.

शिवाजी—विचार च आकाराला येऊन जगांतल्या वस्तु झाल्या असें मानलें तर जगांतल्या वस्तूंत रूपांतर होतें तसें विचारांचें होतें काय?

विनोबा—विचारांचेंहि रूपांतर होतें. विचार अव्यक्त-दशेला जातात.

अनुक्रमणिका

शिवाजी—पॉल ब्रंटनचें हिंदुस्थानांतल्या साधूंसंबंधींचें एक पुस्तक मानेकरजींनीं दिलें होतें. त्यांत त्यानें रमण महर्षीसंबंधीं फार आदरपूर्वक लिहिलें आहे. तें वाचलें काय?

विनोबा—पण तोच पॉल ब्रंटन आतां त्यांच्या अगदीं विरुद्ध झाला आहे. रमण महर्षींचा भाऊ अरुणाचलाचा मालक च बनला आहे. असें असून रमण महर्षि त्याला कांहीं च सांगत नाहींत असें त्याचें म्हणणें आहे.

शिवाजी—पॉल ब्रंटननें रामकृष्ण परमहंसांचे शिष्य मास्टर महाशय यांचा फार गौरव केला आहे.

विनोबा—रामकृष्णांचे शिष्य मला हि भेटले. ते मोठे खोल नसले तरी सरळ दिसले.

शिवाजी—विचार च नाना वस्तुरूपानें—जगरूपानें आकाराला आला ही गोष्ट पटते पण केवळ मघाच्या झाडाच्या दृष्टांतानें नीट लक्षांत येत नाहीं.

विनोबा—ज्ञानेश्वरांनीं अहिंसेचें वर्णन केलें आहे.

**लीलाकमळें खेळणें । कां पुष्पमाळा झेलणें ।**
**न करी म्हणे गोफणें । ऐसें होईल ॥**
**हालवतील रोमावळी । यालागीं आंग न कुरवाळी ।**
**नखांची गुंडाळी । बोटांवरी ॥**

यांत नखांची गुंडाळी कां म्हटलें? ही मूर्तिमंत अहिंसा आहे. गुंडाळी झाल्याकारणानें नखांचीं टोकें कोणाला लागण्याची भीति नाहीं. कदाचित् कोणाला नख लागलें च तर गुंडाळलेला गुळगुळीत स्पर्श होईल. हा जो नखांचा गुंडाळलेला आकार आहे हा अहिंसेच्या विचाराचाच आकार नाहीं का?

शिवाजी—होय.

—यानंतर सोनेगांवला जाण्यासाठीं सर्वजण उठले. रस्त्यांत हि बोलणें चालूं च होतें.

शिवाजी—नानासाहेबांच्या वाग्देवतामंदिरांत समर्थांवर पांच प्रवचनें झालीं. त्यांत समर्थांचा ब्राह्मणांविषयींचा पक्षपात, हरिजनांविषयीं हीन उद्‌गार, धटासि आणावा धट हे विचार अग्राह्य आहेत असें मीं सांगितलें तें नानासाहेबांना पसंत पडले नाहींत.

विनोबा—समर्थांच्या हयातींत च त्यांच्या शिष्यांत भांडणें लागलीं होतीं. आणि सर्वांनीं एवढी मोठी संघटना केली होती म्हणतात. पण ते गेल्यानंतर लगे च ती तुटून पडली. आणि बहुतेक सगळे लोक सांसारिक आणि अतिस्वार्थी झाले याचें कारण काय? याचीं बीजें समर्थांत च कांहीं असलीं पाहिजेत.

शिवाजी—ख्रिस्ताच्या शिष्यांनीं हि ख्रिस्ताला फसविलें होतें. यावरून त्याचा दोष ख्रिस्ताकडे कसा येईल?

अनुक्रमणिका

विनोबा—ख्रिस्ताच्या असमत्वाचा तो परिणाम आहे. ख्रिस्ताला फाशी चढवला हें हि त्याच्या असमत्वाचें दर्शक आहे. त्याच्या भाषेंत कटुता असली पाहिजे.

शिवाजी—या दृष्टींनें ज्ञानेश्वरांची भाषा आदर्श ठरेल. त्यांच्या बालवयांत च इतका छळ झाला असून त्यांनीं लोकांविषयीं कोठें हि अनुदार उद्‌गार काढले नाहींत.

विनोबा—त्यांचे उदाहरण आश्चर्यकारक आहे. अहिंसेचें तें फार मोठें उदाहरण आहे.

शिवाजी—बापूजींची हि भाषा अशी च नाहीं का?

विनोबा—तें इतिहास ठरवील. बापूंच्या पूर्वीच्या भाषेंत कटुता आढळून येते. त्यांच्या भाषेचा विकास होत गेला आहे.

शिवाजी—समर्थांचे कांहीं अग्राह्य विचार सोडल्यास बाकी बहुतेक विचार घेतां येण्याजोगें आहेत.

विनोबा—त्यांचे अग्राह्य विचार कोणकोणते त्याची एक यादी कर.

शिवाजी—ती सहज करतां येईल.

विनोबा—समर्थांचें जें गुप्त राजकारण आहे त्याचा मी अर्थ केला आहे विधायक कार्यक्रम. विधायक कार्यक्रम म्हणजे त्यांच्या वेळचा त्यांनीं ठरविलेला कार्यक्रम.

शिवाजी—त्याला गुप्त राजकारण म्हणण्याचें कारण काय?

विनोबा—कारण विधायक कार्यक्रम जरी राजकारण नव्हे, तथापि त्याचा राजकारणावर जितका अचूक परिणाम होतो, तितका प्रकट राजकारणानें हि होत नाहीं.

शिवाजी—त्या वेळच्या विधायक कार्यक्रमाची समर्थांची काय कल्पना होती?

विनोबा—अजून ती पूर्णपणें पहावी लागेल. तरी कांहीं कांहीं मुद्दे त्यांचे विधायक कार्यक्रमाचे—म्हणजे च गुप्त राजकारणाचे काढले आहेत. प्रातःकाळीं उठावें, शौचाला दूर जावें, दांत घासावें, वस्त्रें स्वच्छ धुवावीं, सूर्यनमस्काराचा व्यायाम करावा, इत्यादि शिकवणींत आरोग्याचा मुद्दा आहे. त्यांच्या विधायक कार्यक्रमाचा हा एक मुद्दा झाला. दुसरा मुद्दा ज्ञानप्रचाराचा. बाळबोध अक्षर सुंदर लिहावें. पोथ्यांचा संग्रह करावा हा त्यांत उद्देश दिसतो. तिसरा मुद्दा प्रौढशिक्षण. कीर्तनादींच्या द्वारें हें शिक्षण व्हावयाचें. चौथा मुद्दा अन्यायप्रतिकारभावना. अन्यायप्रतिकारभावना त्यांनीं जागृत केली. न्यायअन्याय कदापि समान नव्हे ह्या वाक्यावरून हें दिसून येतें. असें रामदासांच्या विधायक कार्यक्रमाचे मुद्दे होते. ते सगळे एकत्रित केले पाहिजेत.

शिवाजी—दासबोधांत अध्यात्माचा विषय सर्वांत जास्त आला आहे.

विनोबा—समर्थांचा अंतरात्मा हा निश्चळ नाहीं. तर तो चळवळ करणारा आहे. या संबंधींचे त्यांचे विचार तपासले पाहिजेत.

शिवाजी—समर्थांनीं ज्ञानेश्वरांच्या अमृतानुभवांतील शिवभक्तिसमावेशनाप्रमाणें शिवशक्तिनिरूपण समासाची रचना केलेली दिसते.

विनोबा—ज्ञानेश्वरांनी एक रूपक केलें आहे. तसें समर्थ्यांचें दिसत नाहीं. 'नरदेह हा स्वाधेन। सहसा नव्हे पराधेन' हें जे समर्थांनीं नरदेहाचे वर्णन केलें आहे. त्यांत नरदेह म्हणजे पुरुषदेह असा त्यांच्या म्हणण्याचा अर्थ दिसतो. अशी चर्चा चालतां चालतां सोनेगांव आलें. २०० घरांचें सुमारें हजार वस्तीचे हें गांव आहे. सोनेगांव आबाजी म्हणून या तालुक्यांतलें हें प्रसिद्ध ठिकाण आहे. आबाजी महाराज संत पुरुष होऊन गेलें,. त्यांचे हें ठिकाण. त्यांचें गांवाच्या मध्यभागीं उंच, प्रशस्त जागा असलेलें, चारी बाजूला कोट बांधलेलें स्थान आहे. त्यांत गोपालकृष्ण व लक्ष्मीनारायणाचीं दोन मंदिरे आहेत. कार्तिक वद्य द्वादशी व आषाढ वद्य प्रतिपदा या दोन तिथींस मोठी यात्रा व उत्सव होतो. या मंदिरांत हरिजनांना प्रवेश नाहीं. तरी मंदिराच्या उंच पायऱ्या चढल्या बरोबर उजव्या बाजूला गच्ची लागते. तेथे वामनराव दाणी यांचें घर आहे. तेथें विनोबाजी आणि त्यांच्या बरोबरीच्या मंडळींची उतरण्याची व्यवस्था केली होती. वामनराव दाणी हे स्वतः सत्याग्रहांत दाखल झालेले होते. त्यांना दंड हि झालेला होता. त्यांच्या घरीं हरिजनांना मज्जाव नसे. त्यांचा आश्रमीयांशीं हि दृढ परिचय होता. सुमारें १० पर्यंत तेथें आणखी थोडी चर्चा झाली.

रामेश्वरजी—रामसीतेच्या चित्रांत सीता रामाच्या मांडीवर दाखविली हें कसें?

विनोबा—त्यांत ईश्वरी भक्ति आणि ईश्वराचें ऐक्य दाखविलें आहे. ईश्वराची अलिप्तता त्यांत दर्शविली आहे. अशा चित्रांत कोणाला हि—हजारों लोक पहात असून विकाराची कल्पना होऊं शकली नाहीं.

—यानंतर दगडूभाऊ, बुद्धसेन वगैरे मंडळी विनोबाजींच्या स्वयंपाकाच्या कामाला लागलीं. विनोबाजींच्या शरीराच्या मानानें त्यांचा आहार अतिशय कमी असे. पोटांत जरा हि जास्त वजन त्यांना खपावयाचें नाहीं. तरी मंडळींचा जेवतांना थोडाबहुत आग्रह चाले च. कोणी हिं संत्रें एवढें घ्या. त्यांत काय पाणी च आहे असें म्हणे. तर कोणी पपईचा आग्रह करी. दही, पोळी, एखादी भाजी, असा त्यांचा आहार असे. पोळ्या अगदीं पातळ आणि पूर्ण पक्क्या असल्याशियाय ते खात नसत. म्हणून प्रत्येक ठिकाणीं दगडू भाऊ सारखी मंडळी स्वयंपाक स्वतःच करीत. जेवल्यानंतर विनोबाजी अर्धा पाऊण तास विश्रांति घेत. तोंडावर माशा बसूं नयेत म्हणून धोतर वगैरे घ्यावें तर श्वासोश्वास घेतां येत नाहीं म्हणून तेवढा च तोंडावर घेण्याचा मच्छरदाणीचा कपडा असे. अशी प्रत्येक बाबींत विचारपूर्वक योजना या प्रवासांत हि चालू च होती. मंडळींचीं स्नानें व्हावयाचीं होतीं. ज्यांना थंड पाण्याची संवय नव्हती असे गद्रेजींसारखे अशक्त सत्याग्रही ऊन पाण्याच्या शोधांत आपल्या ओळखीच्या ठिकाणीं निघून गेले. कारण या गांवीं आश्रमीयांचें पुष्कळ च येणें जाणें झालेलें होतें. १२/१ च्या सुमारास मंडळींचीं जेवणें झालीं. आणि गच्चींत च तकली उपासना सुरू झाली. या वेळीं गच्चींत सावली होतीं. शाळेंतली मुलें हि तकली पेळू घेऊन आलीं होतीं. तकलीउपासनेनंतर तेथें च गांवच्या प्रमुख मंडळींशीं चर्चा सुरू झाली. चर्चेचा विषय खादी, सूत कांतणें, वस्त्रस्वावलंबन असा होता. वामनरावांचे वडील बंधु आबाजी दाणी पूर्वी खादीधारी असून अलीकडे त्यांनी ती सोडून दिली होती. त्यांना उद्देशून मोघेजी— "आतां तरी खादी वापरा."

आबाजी दाणी—“आम्हांला ती परवडत नाहीं.”

विनोबा—तुम्हांला सूत कांतता येते ना?

मोघेजी—ते तर पूर्वी कातीत च असत.

कोणी तरी—गांवांतल्या भांडणामुळें त्यांनीं खादी सोडून दिली.

विनोबा—भांडणाचा खादीशीं काय संबंध? भांडणामुळें जेवण सोडून दिलें का? खादी वापरून हि भांडण होऊं शकेल.

आबाजी दाणी—खरें म्हणजे आळसामुळें कांतत नाहीं.

यानंतर वर्तमानपत्रांत सत्याग्रहांची बातमी न छापली जावी या सरकारच्या वृत्तीविषयीं बोलणें निघालें. त्यावर विनोबाजींनीं एक उपाय सुचविला.

विनोबा—यावर एक तोड आहे. इंग्रजांच्या किंवा जर्मनांच्या कोणत्या च युद्धाची बातमी कोणत्या च वर्तमानपत्रानें छापू नये. या गोष्टीचा परिणाम झाल्याशिवाय राहणार नाहीं.

मोघेजी—हा विचार कोणी सुचविला नाहीं. पण याचा मोठा परिणाम होईल.

—यापुढें बोकड मारण्याच्या कल्पनेसंबंधीं बोलणें निघालें.

विनोबा—बोकड बुकलून मारण्याच्या कल्पनेंत प्राण ब्रह्मांडीं जाऊन मग तो मुक्त होतो ही कल्पना दिसते. शस्त्रांनीं न मारण्यांत हा उद्देश दिसतो. हिंदुस्थानांत मांसाहार केला जातो. तो खरोखर बाटण्या पुरता च केला जातो.

मोघेजी—बाटण्यापुरता च कसा?

विनोबा—मांसाहार कांहीं रोज करीत नाहींत. क्वचित मांस खातात. म्हणजे मांसाहारी आहे एवढें म्हणण्यापुरता मांसाहार आहे. रोज मांस खायचें तर तें हिंदुस्थानांत परवडणार नाहीं.

मोघेजी—कां?

विनोबा—रोज माणशीं निदान ८ तोळे मांस तर पाहिजे. म्हणजे कुटुंबाला पौंडभर तरी मांस आहे. या गांवांत २०० कुटुंबे आहेत. त्यांना २०० पौंड मांस रोजचें हवें म्हटलें तर किती बोकडे लागतील?

गंगाधर कोमटी (या गांवचे एक मालुजार)—साधारणपणें एका बोकडाचें ८ शेर मांस होतें.

अनुक्रमणिका

विनोबा—म्हणजे रोज १०/१५ बोकड तरी पाहिजेत. रोजचे इतके बोकड मारावयाचे म्हणजे बकऱ्या किती तरी ठेवाव्या लागतील. त्यांच्या चरण्याची सोय करावी लागेल. हिंदुस्थानांत मुळीं माणशीं एक एकर जमीन आहे. तेव्हां हें जमणार कसें?

गंगाधर कोमटी—रोज मांस खाणें शक्य च होणार नाहीं.

विनोबा—म्हणून मांसाहार हिंदुस्थानांत परवडणार नाहीं. उगी च बाटण्यापुरतें लोक मांस खातात. आहारदृष्टींनें आणि कोणत्या च दृष्टीनें त्यांत कांहीं अर्थ नाहीं.

—अशी चर्चा होतां होतां संध्याकाळ झाली. पुलगांव-देवळी रस्त्यावर पुलगांवच्या रस्त्यानें विनोबाजी फिरण्यास निघाले. आबाजी दाणी त्यांच्याबरोबर होते. मोघेजी, रामेश्वरजी वगैरे मंडळीं बरी च मागें होती. आबाजी दाणी यांच्याशीं चाललेलें बोलणें पूर्णपणें ऐकूं येत नव्हतें. तरी मधून मधून थोडा संवाद ऐकूं येत होता. प्रथम शिवाजींनीं प्रश्न काढला.

शिवाजी—वर्धा शिक्षण योजनेंत चित्रकला दाखल केली आहे. पण सगळे रंग परदेशी येतात. आणि स्वदेशी रंग जरी झाले तरी त्यांची आवश्यकता काय? रंगाशिवाय चित्रकला शिकवावी.

विनोबा—रंगांचें शिक्षणांत महत्त्व आहे. बालमनावर त्यांचा परिणाम होतो. निरनिराळ्या रंगांत निरनिराळे भाव असतात. निळा रंग हा प्रेमाचा रंग आहे. गुलाबी रंग आसक्त प्रेमाचा रंग आहे.

आबाजी दाणी—आतां माझ्याच्यानें दुसरें कांहीं होणार नाहीं. माझें वय हि झालें.

विनोबा—कां? तुमचें वय काय? तुम्ही तर अजून मध्यम वयाचे आहा.

आबाजी दाणी—हो. पण उत्साह वाटत नाहीं.

विनोबा—मी आयुष्याचे ५ भाग पाडले आहेत. पहिली २० वर्षें बाल्य, दुसरी २० वर्षें तारुण्य, त्यापुढें २० वर्षें प्रौढ, त्यापुढें म्हणजे ८० पर्यंत वृद्ध. आणि ८० ते १०० जीर्ण. वृद्धावस्थेपर्यंत काम करतां येते. जीर्णावस्थेंत काम होणार नाहीं. तुम्हांला तर अजून ५० टक्के हि मार्क मिळाले नाहींत. ५० टक्के मार्क मिळाले तो पास समजावयाचा. ५० वर्षें ज्याला झाली, त्याला २५ मार्क. पुढें ७५ पर्यंत एक एक मार्क म्हणजे तो पास झाला. त्यानंतर २५ वर्षांत दर वर्षाला दोन दोन मार्क अशी परीक्षेची कल्पना आहे.

आबाजी दाणी—मला शेती उत्तम कशी करावी तें सांगा.

विनोबा—उत्तम शेतींत गोरक्षण येतें. कमींत कमी एक गाय, दोन बैल शेतकऱ्याजवळ पाहिजेत. कुंकुवाशिवाय स्त्री तशीं विहिरीशिवाय शेती समजली पाहिजे. आपल्यापुरता भाजीपाला, कांहीं फळझाडें आपल्या शेतींत पाहिजेत. आपल्या कापडाकरतां कापूस काढतां येईल. धान्य आपल्यापुरतें. तेलधान्य हि काढून घ्यावें. बाकी मग विकण्यासाठीं माल काढावा—कापूस, भाजी, धान्य वगैरे. त्याचे पैसे कामापुरते

येतील. कर्ज करूं नये. गाईची निगा ठेवावी. तिचें दूध घरीं होईल. वासरें वाढवून बैल विकतां येतात. तुम्ही स्वतः शेतींत राबणार काय?

आबाजी दाणी—नाहीं.

विनोबा—मग शेती कशाची? शेतींत स्वतः मेहनत केली पाहिजे. ऊन, वारा, पाऊस, प्रकाश यांचा शरीरावर चांगला परिणाम होतो. तो शेतींत चांगला अनुभवावयास मिळतो. —या वेळीं संध्याकाळ झालेली होती. मंडळींसकट विनोबा परत आले होते. गच्चीवर बसले. इतक्यांत मंदिराच्या भिंतीवर काढलेल्या जयविजयाच्या चित्राकडे पाहून मोघेजी म्हणतात—

मोघेजी—हे चार हात कशाला वाढले?

विनोबा—"देवादिकांचीं चित्रें नुसती सुंदर असून उपयोग नाहीं. त्यांत अमानुषता दिसली पाहिजे. सामान्य माणसाप्रमाणें वाटून उपयोग नाहीं. म्हणून चार हात काढतात. डोळे हि असे च कानापर्यंत—आकर्णपूर्ण नेत्र. असें माणसाचे डोळे नसतात."

—आतां दिवेलावणी झाली. जेवण्याचें बोलावणें आलें च होतें. विनोबाजींचें जेवण बुद्धसेन वगैरेंनीं तयार केलें. मंडळीं हि समोर च बसली. जेवण आटोपून कांहीं मंडळीं गच्चीवर बसली. कांहीं विनोबाजींच्या बरोबर आंतल्या खोलींत बसली. भाऊ पानसे यांचा धाकटा भाऊ गजानन वर्ध्याहून आला होता. त्यानें नमस्कार केला. त्याच्याशीं थोडा वेळ संवाद झाला.

विनोबा—आतां चित्रकला कोठपर्यंत आली?

गजानन—अजून दोन वर्षें तरी लागतील.

विनोबा—मुंबईत खर्च फार होत असेल?

गजानन—काटकसरीनें राहतो. स्वतःच स्वयंपाक करतो. एक वेळ जेवतो.

विनोबा—लोकांना नाहींत रहायला घरें. पावसाळ्यांत वरून सर्वत्र गळणार. आणि हा त्या भिंतीला पेंटिंग लावणार! बरें तुला चित्रकला येते. तसें कांहीं गोणेंबिणें?

गजानन—नाहीं. एखादें भजन म्हणूं शकेन.

भाऊ—नाहीं तर काढील एखादें सीनेमांतलें पद म्हणजे झालें! (सर्व हंसतात).

विनोबा—याला एकदां आश्रमांत आला होता तेव्हां चाळे करूं लागला म्हणून कोंडला होता खोलींत. लहान होता त्या वेळीं.

अनुक्रमणिका

भाऊ—आतां हि जागा आहे कोंडण्याला तुमच्या पवनारच्या बंगल्यांतल्या वरच्या खोलींत! (सर्व हंसतात).

विनोबा—भाऊ हि तामस आहे थोडासा. लहानपणीं लोणच्यांतल्या मिरच्या खात असे असें सांगत होता.

भाऊ—तुम्ही तेवढें च लक्षांत ठेवलें वाटतें!

विनोबा—मीं याला कोंडला होता. मनोहरजी वेडे झाले होते तेव्हां त्यांना दोन पऱ्हाट्या मारल्या होत्या. आणि पुरुषोत्तम गांधीला एक छडी मारली होती. ही हिंसा झाली कीं काय तें पहा."

दगडू भाऊ—"छे छे, ती हिंसा थोडी च झाली. हात आपले मारायला गेले एवढें च!" (मंडळी हंसतात)

—इकडे व्याख्यानाची तयारी झाली होती. मंदिराच्या पायऱ्यांवर च व्याख्यानें होत. त्याप्रमाणें मंडळी बसली होती. व्याख्यानाची तयारी झाली म्हणून मोघेजींनीं सांगितलें. मंडळींसह विनोबाजी उठले. आजूबाजूच्या खेड्यांची हि मंडळी आली होती. प्रत्येक व्याख्यानांत सामान्य मुद्दे सांगून रोज एक एक नवीन मुद्दा सांगत जावयाचा क्रमानें हीं सत्याग्रहाचीं व्याख्यानें चालू होतीं. त्याप्रमाणें शेतकरी हा युद्धप्रिय नसतो हा नवीन मुद्दा या व्याख्यानांत सांगितला. "शेतकरी हा जगाचा पालक आहे." पण त्याची या राज्यांत अन्नान्नदशा झाली आहे. इंग्रज येण्यापूर्वी अशी स्थिति नव्हती. इंग्लंडला रोज १३ कोटी रुपये खर्च येतो. आपला रोजचा भोजनखर्च माणशीं दोन आणेसुद्धां नाहीं. पण या हिशोबानें हिंदुस्थानच्या रोजच्या भोजनखर्चाच्या तिप्पट खर्च इंग्लंड युद्धासाठीं रोज करीत आहे. हा पैसा सरकार कोठून आणतें? शेतकऱ्यांकडून. बरें याचा उपयोग काय? तर निरपराधी बायका-मुलांवर विमानातून बाँब फेकणें. इंग्रज म्हणतो तुमच्यावर संकट आलें आहे. तुमचें रक्षण करतों आम्ही. आमची अन्नान्नदशा झाली आहे. यापेक्षां आणखी संकट कोणतें येणार आहे? इतकें असून म्हणतात इंग्लंडला मदत करा. मदत कोठून करा? आणि कशासाठीं? माणुसमारीसाठीं. आपण सहकार्य करतों म्हणून यांचें सर्व चाललें आहे. आम्हांला न विचारतां च इंग्रजांनीं आम्हांला युद्धांत सामील केलें आहे. जसा शेतकरी बैलाला न विचारतां नांगराला जुंपतो तसें आम्हांला इंग्रजांनीं बैल बनविलें. या वेळीं या लढाईशीं आम्हांला कांहीं कर्तव्य नाहीं, असें स्पष्ट सांगितलें पाहिजे. चूप बसलो तर कर्तव्य केलें नाहीं, असें होईल. शेतकऱ्याला खरोखर लढाई नको च असते. लढाई मुत्सद्दी लोक उपस्थित करीत असतात. आणि शेतकऱ्याला शिपाई बनवितात. शेतकऱ्याला आपलें घर प्रिय असते. लढाई ही भांडवलवाल्यांची असते. म्हणून युद्धाला मदत देऊं नका. स्वावलंबी व्हा. दर माणशीं ४ रुपये वर्षाला कपड्याचे धरले तर कपड्यापायीं दर वर्षी ४ हजार रुपये बाहेर जातात. ते सूत कांतण्यानें गांवांत च राहतील. या युद्धांत शेतकऱ्यांचें किंवा खरोखर कोणांचें च हित नाहीं. ही गोष्ट लक्षात ठेवा", इत्यादि भाषण झालें. बुद्धसेननें तें उतरून घेतलें. रात्र बरी च झाली. लोक आपापल्या घरीं गेले. जिकडे तिकडे सामसूम झाली. सर्वत्र निःस्तब्धता पसरली होती. उद्याचा कार्यक्रम आगरगांवचा होता. रोज नवीन गांव, रोज नवीन चर्चा, रोज नवीन विचार, हा एक पर्वकाळ च आला आहे अशा विचारांत मंडळी झोपी गेली. भेदाचा पडदा पार नष्ट झाला. देवाच्या जवळ देव आणि भक्त असतांना कांहीं वेळ भक्ति, कांहीं वेळ ज्ञान, तसें रात्रीं अद्वैत, दिवसा आनंद असा हा कार्यक्रम आजच्या दिवसापुरता समाप्त झाला.

अनुक्रमणिका

दिनांक २० जानेवारी १९४१.

**४. आगरगांवचा सत्याग्रह :**

सोनेगांवहून सकाळीं उठून प्रार्थना प्रातर्विधि इत्यादि उरकून आगरगांवकडे जाण्याची सिद्धता झाली. सकाळीं नवीन गांवीं जावयाचें. दिवसभर तेथें नाना तऱ्हेची चर्चा व्हावयाची. विधायक पाहणी आणि उपासनादि स्वतःचा कार्यक्रम व्हावयाचा. जसा एखादा भक्तांचा मेळावा जमावा तशी एक लहानशी यात्रा च त्या गांवीं भरावयाची. संध्याकाळीं सत्याग्रहाचें प्रवचन होऊन पुन्हां सकाळीं दुसरें गांव. असा हा सुंदर कार्यक्रम चालला होता. सरकार आतां लवकर पकडणार नाहीं, अशी बहुतेकांची समजूत होऊं लागली. विनोबाजींना पकडत नाहींत तोपर्यंत चार दिवस आपण त्यांच्या सहवासाचा लाभ घेऊं या, अशा मनोवृत्तीनें आलेली मंडळी विनोबाजींबरोबर ज्यास्त किती दिवस राहणार हा एक प्रश्न होता. सोनेगांवीं आदल्या च दिवशीं विनोबाजींनीं एकेकाला परत जावें म्हणून सुचविलें होतें. पण प्रत्येक जण एकेक दिवस अधिक वाढविण्याच्या वृत्तींत होता. आगरगांव तर पाहूं मग पुढचें ठरवूं असें म्हणत मंडळी विनोबाजीं बरोबर चालूं लागली. नेहमींप्रमाणें चर्चेला हि सुरवात झाली.

शिवाजी—“जवाहरलाल नेहरूंनीं आपल्या आत्मचरित्रांत बापूजींच्या हृदयपरिवर्तनाच्या सिद्धांताविषयीं एक शंका मांडली आहे. त्यांचें म्हणणें असें कीं, एक व्यक्ति, दुसऱ्या व्यक्तीचें हृदयपरिवर्तन करूं शकेल. पण हृदय च नसलेल्या सबंध राज्ययंत्राचें परिवर्तन कसें होईल?

विनोबा—यंत्राला हृदय हि नाहीं. म्हणून परिवर्तनाचा प्रश्न च नाही.

शिवाजी—मग प्रतिपक्षी राज्यसत्तेचें परिवर्तन कसें होणार?

विनोबा—प्रथम हें लक्षांत घेतलें पाहिजे कीं, आधीं परिवर्तन स्वतःचें आणि स्वतःच्या लोकांचें झालें पाहिजे. त्याशिवाय प्रतिपक्षांचें होणार नाहीं. स्वतःच्या लोकांचें हृदयपरिवर्तन झालें तर प्रतिपक्षाचें हृदयपरिवर्तन झालें च पाहिजे. याचें कांहींसें प्रत्यंतर गेल्या वीस वर्षांतील आपल्या आणि प्रतिपक्षाच्या परिवर्तनाकडून लक्षांत यावयास पाहिजे.

शिवाजी—प्रतिपक्षाशीं असहकार केल्यानें त्याला अमुक एक गोष्ट करावयास भाग पाडल्यासारखें होतें. यांत हृदयपरिवर्तन झालें असें कसें म्हणतां येईल?

विनोबा—दाब म्हणजे प्रेशर आणि कोअर्शन म्हणजे जबरदस्ती यांतला फरक लक्षांत घेतला पाहिजे. हृदयपरिवर्तन करण्यांत दाबाचा एक भाग असणार च. पण ती जबरदस्ती नव्हे. हृदयपरिवर्तन हें दोन तऱ्हेनें होतें आणि दोन्ही तऱ्हा एका च वेळीं अवलंबाव्या लागतात. वृत्तींनें हृदयपरिवर्तन ही एक तऱ्हा. परिस्थितींनें हृदयपरिवर्तन ही दुसरी तऱ्हा. आपल्या लोकांनीं अहिंसा, सेवावृत्ति वाढवावयाची व स्वावलंबनाची परिस्थिति बनवावयाची याचा प्रतिपक्षावर परिणाम झाला च पाहिजे. परिस्थिति आणि वृत्ति या दोहोंमध्ये पालट करण्याचा प्रयत्न करणें म्हणजें च ज्ञानप्रसार करणें आहे. मनुष्य प्रौढ, अनुभवी झाला म्हणजे त्याला ब्रह्मचर्य पटू लागते. मग वानप्रस्थाश्रम घेणें त्याला योग्य वाटतें. तसें तरुणपणीं बऱ्या च लोकांना जमावयाचें नाहीं. याचें कारण काय? तर परिस्थिति. तेव्हां परिस्थिति बदलल्यानें जो दाब येतो ती

अनुक्रमणिका

कांहीं हिंसा नव्हे. तो दाब यावयास पाहिजे च. पुन्हां परिस्थिति हिंसक रीतीनें आपण बदलत नाहीं. त्यांत कोणाचें नुकसान करण्याची वृत्ति नाहीं.

शिवाजी—साताराला गेलों होतों तेव्हां राजाशीं (शि. गो. भावे) मधून मधून बोलणें होई. राजाचें म्हणणें जगांत कोणतें हि तत्त्व "ॲबसोल्यूट" असें नाही. सापेक्ष जगत् आहे. म्हणून तुमची अहिंसा, सत्यादि तत्त्वें हि सापेक्ष च आहेत.

विनोबा—तीं जगाच्या सापेक्षत्वामुळें जीं काय सापेक्ष असतील तीं असोत. आपण तीं निरपेक्ष अंगिकारलीं तर च स्वाभाविक जेवढीं सापेक्ष असतील तेवढीं राहतील. आपण त्यांत ढवळाढवळ करण्याचें कारण नाहीं.

चालतां चालतां आगरगांव आलें. घरांच्या भिंतींवर मोठ्या ठसठशीत आणि सुंदर अक्षरांत विनोबाजींच्या सत्याग्रहाचें भाषण जाहीर केलेंलें दिसत होतें. आगरगांवीं गेल्याबरोबर मंडळी स्नानादि कार्यक्रमास लागली. थोड्या वेळानें विनोबाजींचें जेवण तयार झालें, व ते जेवून विश्रांति हि घेऊं लागलें. त्यानंतर मंडळींचीं हि जेवणें आटोपली. विनोबाजींनीं विश्रांति संपवून खांडणविंचरणाचे पेळू करण्याचें आजपासून सुरू केलें. त्यांच्या हाताला घाम सुटत असल्यामुळें त्यांना तें काम तितकें सुलभ नव्हतें. हा खांडणविंचरणाचा कार्यक्रम आटोपल्यावर शाळेंत बोलावणें आलें. तेथें तकली-उपासना झाली. नागझरीला झाले तसे मुलांचें संवाद झाले. या संवादांत कांहीं अर्थ नव्हता. त्यानंतर असले बाष्फळ संवाद मुलांकडून करवूं नयेत म्हणून विनोबाजींनीं गंभीरपणें सांगितलें. आणि हा कार्यक्रम आटोपला. या वेळीं देवळीहून श्री. भागवत भेटण्यासाठीं आलें. त्यांच्याबरोबर आगरगांवच्या टेकडीकडे विनोबाजी फिरण्यास गेले. भागवत हे देवळीचें कार्यकर्ते. विशेष शिक्षण नाहीं. परंतु कळकळीनें आणि शांत स्वभावानें सार्वजनिक कार्य करण्याची हातोटी त्यांना साधलेली होती. त्यांच्याशीं चाललेलें बोलणें ऐंकू येत नव्हतें. कारण ते व विनोबाजी बरे च पुढें निघून गेले होते. मागून शिवाजी, मोघेजी, वगैरे टेकडीकडे येत होते. थोड्या च वेळांत सर्व जण टेकडीवर चढले. टेकडी फार ऊंच नव्हती. पण ही संध्याकाळची वेळ होती. वारा वहात होता. आजूबाजूला चांगली दूरवर नजर पोंचत होती. तेथें च खडकाळ जागेवर मंडळी बसली. बोलणें कांहीं च चालू नव्हतें. परंतु उच्च वातावरणामुळें मन प्रफुल्लित झालें होतें. थोडा वेळ तेथें बसून विनोबाजी व मंडळीं परतली. भागवतांशीं बोलतां बोलतां कांहीं तरी लिखाणासंबंधी बोलणें निघालें.

शिवाजी—सासवडचे आचार्य भागवत म्हणत होते, या काळाला उद्बोधन करणारें लिखाण कादंबरीच्या द्वारें च होऊं शकेल. इतर लिखाण लोक वाचीत नाहींत. महाराष्ट्रांत अशी मार्गदर्शक कादंबरी एक विनोबाजी च लिहूं शकतील. त्यावर मी म्हणालों कादंबरी विनोबाजी लिहिणें शक्य नाहीं.

विनोबा—मी 'ब्रह्मजिज्ञासा' कादंबरी लिहिणार होतों. आणि अजून हि तो विचार रहित केला आहे असें नाहीं.

—आतां दिवेलागणी झाली. हातपाय धुवून विनोबाजी जेवावयास बसले. महाराष्ट्राच्या अंकांत विनोबाजींचा उल्लेख करून कांहीं तरी टीका केली होती. ती मोघेजी वाचून दाखवीत होते. त्यानंतर मंडळींचीं हि जेवणें आटोपून उघड्यांत बैठकीवर प्रार्थना झाली. मंडळी हळूं हळूं जमूं लागली. रात्रीं ९ ला व्याख्यानाला सुरवात झाली.

अनुक्रमणिका

"माझ्या खेडेगांवांतल्या मंडळींनो, तुमच्या गांवीं विद्यामंदिर आहे. त्यामुळें मला येथें बोलावणें आलें होतें. पण त्या वेळीं न येतां आज सत्याग्रही म्हणून मी तुमच्यापुढें आलों आहे. सत्याग्रह म्हणजे काय व तो कशासाठीं हें मी तुम्हांला समजावून सांगणार आहे. आपला देश अफाट, भाषा, धर्म सर्व भिन्न भिन्न. पण आपण एके ठिकाणीं नांदतों. युरोपांत एक धर्म असून ते लोक एकमेकांचे गळे कापून राहिले आहेत. ते लोक मोठमोठे शोध करणारे, विमानें, आगबोटी काढणारे आहेत. पण समंजसपणाचा शोध कांहीं त्यांनीं अजून शोधून काढला नाहीं. ते आपापसांत लढून च राहिले आहेत. इंग्रज म्हणतात आम्हांला लढाईत मदत करा. पण लढाईनें कोणाचें हि कल्याण होणार नाहीं. हिंदुस्थानांत युरोपियन लोक आले तेव्हांपासून त्यांच्यांत लढाया सुरू च आहेत. २५ वर्षांपूर्वीच्या लढाईत जर्मनीला चिरडून टाकण्यांत आलें. त्याचा सूड जर्मनी आतां उगवीत आहे. अशा या लढाया वाढत च आहेत. काँग्रेस हि वाढत आहे. पण ती आहे अहिंसेची. इंग्रज येण्यापूर्वी हिंदुस्थान सुखी होता. आतां शेतीशिवाय आपल्याजवळ कांहीं च उरलें नाहीं. मुसलमान राजे होते तरी देशांतली संपत्ति येथून त्यांनीं बाहेर नेली नाही. पण इंग्रज दर वर्षी येथून पैसा नेऊन राहिला आहे. पैसा काय पण हाडें सुद्धां नेतात. त्यानें हिंदुस्थानची जमीन निकस होत आहे. या सर्व परिस्थितीमुळें आपलें आयुष्य हि कमी कमी होत चाललें आहे. आम्हांला इंग्रजी राज्यांत शेंकडा १० जणांना जेमतेम शिक्षण मिळतें. मजुराला मजुरी २ पैसे व अधिकारी वर्गाला लठ्ठ पगार. दुष्काळ पडला तर शाळा-मास्तरांचा पगार कमी करतात. पण अधिकाऱ्यांचा तेवढा च. काँग्रेस-मंत्री फक्त ५०० रु. पगार घेत असत. आणि यांचे पगार ५-५ हजार. आम्हांला हें इंग्रज राज्य असें घातक ठरलें आहे. इंग्रजांपैकीं कांहीं म्हणतात लढाईनंतर तुम्हांला स्वराज्य देऊं, कित्येक तर तुम्हांला स्वराज्य आहे च म्हणतात. आणि कित्येक जण तुम्ही आपापसांत भांडता, तुम्ही स्वराज्याला लायक नाहीं असें म्हणतात. आणि पुन्हां लढाईत आम्हांला मदत करा हें आहे च. लढाईत आमचा तर फायदा नाहीं च पण इंग्रजांचा किंवा दुसऱ्या कोणाचा हि फायदा नाहीं. पण हें सांगितलें तर सरकार अडवतें. एवढ्यासाठीं हा सत्याग्रह आहे. आतां तुम्हीं सर्वांनीं सत्याग्रह करावयाचा नाहीं. पण प्रत्येक जणानें स्वावलंबनाचा कार्यक्रम करावयाचा. निदान १०० तरी खादीधारी या वर्षीं या गांवांत होऊं द्या. हरिजनांचा विटाळ मानूं नका. कुत्र्यामांजरांचा नाहीं विटाळ मग माणसाचा विटाळ कसला? हिंदु-मुसलमानांत सलोखा राखा. शेतीचा धंदा सोडून लढाईंत भाग घेणें किंवा या पवित्र धंद्यांत कमावलेली कमाई माणुस मारीला देणें यापासून दूर रहा." अशा आशयाचें भाषण झालें. व्याख्यानाला नागझरीची हि मंडळी आली होती. पुढच्या दुसऱ्या दिवसाचा कार्यक्रम लोणीला ठेवल्यांचें जाहीर केलें होतें. लोणीचें पुष्कळसे लोक महानुभावपंथी आहेत. तेथें कसें काय जमेल अशी नागझरीच्या मंडळींनीं शंका काढली. "ते लोक तर असें आहेत कीं तुम्ही तेथें गेली कीं सगळे आपापल्या घराला कुलुप लावून निघून जातील शेतांत. तेथें कधीं च सभा झाली नाही." असें नागझरींचे पांडबा म्हणालें— हें ऐकल्यावर विनोबाजींना तर तेथें जाण्याचा जास्त उत्साह वाटला. ते म्हणाले असें असेल तर तेथें गेलें च पाहिजे. तेथें आजपर्यंत सभा झाली नाहीं. म्हणतां तर तेथें सभा करणें हें कर्तव्य च आहे. आपल्या व्यवस्थेचा कांहीं प्रश्न नाहीं. शिवाय महानुभावांची माहिती तेथें मिळेल तो लाभ आहे च." असा हा बोध मिळून मंडळी झोपी गेली.

**विघ्नैः पुनःपुनरपि प्रतिहन्यमानाः ।**
**प्रारब्धमुत्तमजना न परित्यज्ञंति**

दिनांक २१ जानेवारी ४१ व २२ जानेवारी ४१

## लोणीचा सत्याग्रह व अटक

अनुक्रमणिका

आज आगरगांवहून लोणीला जावयाचें. मंडळी तयार झाली. आगरगांवच्या लांब च लांब ओटीवर विनोबाजी सकाळची न्याहारी घेत होते. त्या वेळीं पुढील संवाद झाला.

विनोबा—समर्थांनीं रामोपासना केली त्यासंबंधी महाराष्ट्रांत अशी कल्पना झालेली आहे कीं विठोबा म्हणजे कांहीं हि न करणारा म्हणून रामोपासना प्रचलित केला. पण विठोबा, राम यांत समर्थ भेद मानीत असतील असें दिसत नाहीं. जनार्दनपंत दत्ताचे उपासक होते. पण नाथांचें कुलदैवत कृष्ण होतें. तरी जनार्दनपंतांनीं दत्तोपासना नाथांना सांगितली नाहीं. एका उपासनेचा उच्छेद करून दुसरी मांडावी हें हिंदुधर्मांत नाहीं च कोठें. तरी नाथांनीं एकादशस्कंदांत अवधूतोपाख्यानांत गुरुच्या कुलदैवताचा गौरव केला आहे. त्याचें कारण हें कीं “द्विः शंर नाभिसंधत्ते रामो द्विर्नामाभिभाषते” असें जाज्वल्य सत्य आणि अमोघ सामर्थ रामांत आहे.

शिवाजी—महाराष्ट्राचें खास दैवत कोणतें?

विनोबा—पांडुरंग हें महाराष्ट्राचें खास दैवत दिसतें.

मोघेजी—कंबरेवर हात ठेवून तो स्वस्थ च उभा आहे आपला!

विनोबा—शंकराचार्य गेले होतें एकदा विठोबाच्या दर्शनाला. त्यांनीं त्याचा अर्थ सांगितला. ‘प्रमाणं भवाब्धेरिदं मामकानां । नितंबः कराभ्यां धृतो येन तस्मात्’—भवसमुद्र काय कंबरेएवढा च आहे. माझ्या भक्तांनो भिऊं नका. बुडण्याची भीति नाहीं. असें विठोबा कंबरेवर हात ठेवून दाखवितो. शिवाय देवानें च हातांत धनुष्य घेतलें तर भक्तानें काय करावयाचें? म्हणून स्वतः प्रयत्न करण्यासाठीं विठोबा स्वस्थ आहे. तुकारामबोवांनीं म्हटलें च आहे “तटस्थ हें ध्यान विटेवरी”—हें तटस्थ, अलिप्त ध्यान आहे. ते म्हणतात ही मी ओळख पक्की धरली आहे. “तुका म्हणे नेत्रीं केली ओळखण । तटस्थ हें ध्यान विटेवरी” पांडुरंग हें मोठें गूढ दैवत आहे. याच्यांत जैन-हिंदूंचें एकीकरण आहे. त्यामुळें तो आहे नागडा. जैन म्हणत च होते कांहीं दिवसांपूर्वी कीं हा आमचा देव आहे म्हणून. ज्या वेळीं महाराष्ट्रांत जैनांचें प्राबल्य होतें तेव्हांपासून जैन हे मोठे शिक्षक होते. ते एकीकरणाचा असा प्रयत्न करीत च होते. “श्रीगणेशायनमः ॐ नमः सिध्दं” हें त्यांनीं शिकविलें. ॐ नमः सिद्धं म्हणजे नमो सिद्धाणं. गणपतीच्या नमनाबरोबर जैनाच्या सिद्धाला नमस्कार केला आहे. विठोबाच्या मूर्तींत हि जैन आणि हिंदूंच्या एकतेचा प्रयत्न केला. म्हणून तो नागवा ठेवला. पण हिंदूंच्या कल्पनेला जुळण्यासाठीं तो लहान मुलगा ठेवला आहे. त्या बालमूर्तीच्या डोक्यावर दिली भाकरी. तो च शंकर. शैव वैष्णव एकत्रित करण्याचा प्रयत्न हि त्या मूर्तींत झाला होता. कानडी मराठी एकीकरण हि त्यांत आहे. विठ्ठल हें नांव कानडी आहे. शिवाय उत्तर हिंदुस्थानांत हि त्याचा नामदेवानें प्रचार केला होता. मोरोपंतांनीं म्हटलें—

**विठ्ठल नाम प्रसिद्ध देवाचें ।**

नरसीमेहत्याचा नामदेव गुरु होता. तो “नैरसैंयाचा स्वामी” म्हणतो. मिराबाई सुद्धां “विठ्ठल वरने वरी” असें म्हणते.

शिवाजी—महाराष्ट्रांत संप्रदाय कोणकोणते आहेत?

अनुक्रमणिका

विनोबा—महानुभाव, वारकरी, रामदासी, लिंगायत, जैन, कांहीं कबीरपंथीं एवढे प्रमुख पंथ दिसतात.

शिवाजी—महानुभाव संप्रदाय तर पंजाबांत हि आहे.

विनोबा—कांहीं अफगाणिस्तानांत हि आहेत. पण तेथें हि त्यांचें वाङ्मय मराठींत च आहे. पंजाबचे महानुभाव सुद्धां मराठीं च ग्रंथ वाचतील. महानुभावांचा चक्रधर स्वतः गुजराथी असून त्यानें सूत्रें रचलीं तीं मराठींत. महानुभावांत प्रचारसामर्थ्य असलें पाहिजे. म्हणून तो संप्रदाय पंजाबपर्यंत पोंचला.

शिवाजी—नामदेवानें हि पुष्कळ प्रचार केला होता.

विनोबा—नामदेव तर फार मोठा प्रचारक होता. तो ज्ञानेश्वरांपेक्षां ५ वर्षांनीं मोठा होता. पण त्यानें ज्ञानेश्वरांशीं दोस्ती केली. ग्रंथसाहेबांत नामदेवाचीं ५८ तरी पदें आहेत.

मोघेजी—ते लोक नामदेवाला काय म्हणतात?

विनोबा—छिपीका नामा. नामदेव शिंपी होता. पण तो शिंपीतून जन्मला अशी दंतकथा जोडली गेली आहे. त्यानें देऊळ फिरविलें. त्याचें दूध देव प्यायला इत्यादि नामदेवाचें चमत्कार पंजाबमध्यें प्रचलित आहेत. रामतीर्थ नामदेवाचा उल्लेख करतात. नामदेव पहिल्या प्रथम लुटारूचा धंदा करी. चांगला मजबूत हि होता. पुढें शंकराच्या देवळांत त्याच्या संबंधीं स्त्रियांचें तिरस्कारयुक्त चाललेंलें बोलणें त्यानें ऐकलें व त्याला पश्चाताप झाला. मग तो शंकराला शरण गेला. शंकरानें त्याला पंढरपूरला जा म्हणून दृष्टांत दिला. पण तो लुटारु म्हणून त्याला त्या वेळीं कोणी जाऊं देईना. तेव्हां 'पतीत पावन नाम ऐकुनी आलों मी दारा' हें पद त्यानें म्हटलें. पुढें त्याच्या वर्तनांतला पालट पाहून सर्व साधुसंतांना तो मान्य झाला. पंढरपूरच्या पांडुरंगाचा तो फक्त झाला. ज्ञानेश्वरांच्या वेळेला पंढरपूरसाठीं मोठी वर्गणी गोळा झाली.

शिवाजी—महानुभाव संप्रदायांत कृष्ण आणि दत्ताची उपासना आहे. ते गीता मानतात.

विनोबा—महानुभावांचा दत्त म्हणजे त्रिमूर्ति दत्त नाहीं. तो भागवतांतला अवधूत आहे. महानुभावांच्या दत्ताला तीन तोंडें नसतात. महानुभाव संप्रदाय म्हणजे भागवतसंप्रदाय च आहे—गीता भागवत मानणारा.

मोघेजी—कुराणांत तत्त्वज्ञान आहे काय?

विनोबा—कुराणांत सगुण निराकारभक्ति आहे. साकाराची भक्ति होऊं शकत नाहीं. साकाराची सेवा. सगुणाची भक्ति.

शिवाजी—निर्गुण निराकाराचें काय?

विनोबा—निर्गुण निराकाराची ओळख. अनुभव.

अनुक्रमणिका

शिवाजी—मग ध्यान कशाचें?

विनोबा—सगुण साकाराचें.

शिवाजी—कर्मयोग आणि सेवेंत फरक काय?

विनोबा—निष्कामता आली म्हणजे कर्मयोग. मीं दिल्लीला हा विचार मांडला होता. सेवा व्यक्तीची. भक्ति समाजाची. कारण व्यक्ति साकार. समाज निराकार. गांधी म्हणतातच ना जीवंत माणसाची भक्ति होऊं शकत नाहीं.

शिवाजी—जीवंत माणसाची भक्ति केली तर काय होईल?

विनोबा—ती आसक्ति ठरेल. म्हणून मनुष्याच्या—मग ती व्यक्ति कोणी हि असो—पाया पडणें विलक्षणच वाटतें.

—यानंतर लोणीकडे जाण्यासाठीं विनोबाजी, गद्रे, शिवाजी, चावदसभाऊ, दगडूभाऊ इत्यादि मंडळीसह उठले. मोघेजी अगोदर च गेले होते. रामेश्वरजी आणि सीतारामजी या दोघांनीं आतां परत जावें असें विनोबाजींनीं सांगितल्यामुळें ते मागें च राहिले. रस्त्यांत हि नेहमींप्रमाणें चर्चा चालू होती. लोणीचें अंतर २–२। मैल असेल. प्रथम गांवाच्या नांवावरून च बोलणें निघालें.

शिवाजी—महाराष्ट्रांत लोणी नांवाचीं गांवें पुष्कळ च आहेत. ग्रामनामांच्या व्युत्पत्तीवरून अनुमानें काढलेला एक लेख राजवाड्यांनीं लिहिला आहे. त्यांत लोणी नांव आलें कीं नाहीं आठवत नाहीं.

विनोबा—राजवाड्यांनीं महानभावांच्यावर हि कांहीं लिहिलें आहे ना?

शिवाजी—महानुभावांची गुप्त लिपि त्यांनीं शोधून काढली. आपले ग्रंथ आपल्या संप्रदायाबाहेरच्या लोकांना कळूं नयेत एवढ्यासाठीं त्यांचे सर्व ग्रंथ त्या लिपींत लिहिले आहेत. बहुधा यामुळें च महानुभावांविषयीं लोकांत आदर राहिला नसावा.

विनोबा—त्यांच्या गुप्ततेचें कारण शोधलें पाहिजे. मुसलमानी आक्रमणापासून बचाव होण्यासाठीं म्हणून त्यांनीं गुप्तता ठेवण्याचा प्रघात सुरू केला असावा. महानुभावांच्या काळ्या कपड्यांचे हि हें च कारण असावें. मुसलमानांच्या फकीरांसारखे हे लोक त्यामुळें दिसत असणार. त्यामुळें मुसलमानी लष्कर वगैरेंकडून त्यांस त्रास होत नसावा.

शिवाजी—राजवाड्यांनीं महानुभावांची लिपि उकलल्यापासून आतां महानुभावांच्या वाङ्मयाचें बरें च प्रकाशन झालें आहे.

विनोबा—(गद्रेजींना उद्देशून) या गांवीं आपल्यापैकीं कोणी कधीं आलें होतें काय?

अनुक्रमणिका

गद्रेजी—मी आलों होतों, मागें फिरत असें त्या वेळीं. त्यानंतर सगळीकडचें फिरणें च बंद झालें.

विनोबा—फिरण्याची योजना हवी. त्याशिवाय खेड्यांची स्थिति कळत नाहीं.

शिवाजी—मी हि येथें मागें फिरत असतां उभ्या उभ्या आलों होतों. पण त्याला पुष्कळ दिवस झाले.

—असा संवाद चालू असतां च गांव दिसूं लागलें. मध्यें एक लहानसा नाला होता. तो ओलांडून सरळ रस्त्यानें गेल्याबरोबर मुख्य मालगुजाराच्या घराच्या दारासमोर, मोघेजी मालगुजाराच्या दिवाणजीशीं बोलत असतांना दिसले. मोघेजींनीं लगे च मंडळींना आंत नेले. सदर मालगुजार ह्या गांवीं रहात नसून त्यांचे दिवाणजी नेहमी येथें रहात व त्यांचा च सर्व कारभार असे. दोन बाजूला ओटी. मध्यें जाण्याचा रस्ता. तेथून शेजारी च आंत गुरांचा गोठा. गोठ्यासमोर चारी बाजूला खोल्या असलेंलें लांब च लांब मोठें आणि बंदिस्त अंगण. अंगणांत एका बाजूला विहीर. बाजूच्या पत्र्यावर लाल मिरच्या वाळताहेत. समोर २/३ रेंग्या उभ्या करून ठेवल्या आहेत, असा तेथला देखावा होता. विनोबाजींसह मंडळी आंत गेली. ती दोन बाजूच्या ओट्यावर कोणी इकडे, कोणी तिकडे अशी बसली. ओटीवर बैठक टाकलेली होती. दिवाणजीनें अगोदरपासून च आंबट तोंड केलें होतें. तेव्हां “या बसा” चा शिष्टाचार हि जवळ जवळ झाला नाहीं असें च म्हणण्याइतका झाला. गांवच्याबद्दल नागझरीच्या लोकांनीं अगोदर च माहिती सांगितल्यामुळें हा प्रकार अनपेक्षित नव्हता च. विनोबाजींनीं लगे च ओटीवर बसल्या बसल्या दिवाणजीशीं बोलण्यास सुरवात केली.

विनोबा—काय दिवाणजी! येथें सगळे च महानुभाव आहेत?

दिवाणजी—नाहीं नाहीं. दुसरे पुष्कळ लोक आहेत.

विनोबा—मग महानुभावांचा गांव कसा?

दिवाणजी—येथले प्रमुख लोक महानुभाव आहेत म्हणून महानुभावांचा गांव म्हणतात. (या वेळीं गांवांत नवागत टोळीची माहिती सर्वत्र पसरून तेथ ली मंडळी एक एक अशी ओटीवर जमा होऊं लागली).

विनोबा—येथें काय मांसाहार कोणी च करीत नाहींत?

शाळा मास्तर—बहुतेक नाहीं च.

दिवाणजी—कोणी महाराचे पोट्टेपाट्टे खात असतील चोरून थोडें.

विनोबा—उघड तर कोणी खात नाहीं ना?

मास्तर—नाहीं.

विनोबा—महानुभावांच्या अहिंसा तत्त्वावर च व्याख्यान देण्यासाठीं मी आलों आहें. सभेबिभेची व्यवस्था होईल ना दिवाणजी?

अनुक्रमणिका

दिवाणजी—गांवच्या लोकांवर आहे.

विनोबा—भीतिबिति तर वाटत नाहीं?

दिवाणजी—नाहीं. भीति कशाची म्हणा!

विनोबा—आमच्या मंडळींना तुमच्या गांवीं जेऊं तर घालाल ना?

दिवाणजी कांहीं च बोलत नाहींत.

विनोबा—नाहीं येथें जेवण झालें तरी हरकत नाहीं. एक दिवस उपवास करूं. पण कार्यक्रम होईल च ठरल्याप्रमाणें.
—तरी दिवाणजी गप्प च!
(इतक्यांत गांवची इतर मालगुजार वगैरे मंडळी येतात).

विनोबा—या गांवची जमीन किती आहे?

दिवाणजी—जमिनीची आराजी असेल १५ शें एकर.

विनोबा—सारा किती आहे?

कोणी तरी—वायदा होय? असेल २-२॥ हजार.

विनोबा—दिवाणजी महानुभाव आहेत?

दिवाणजी—नाहीं. कृष्णपक्षी.

विनोबा—या गांवांत ज्यास्त शिकलेला कोण आहे?

शाळा मास्तर—नारायण मास्तर.

विनोबा—हे कोण?

शाळा मास्तर—हे पांडुरंग पाटलांचे चिरंजीव.

विनोबा—यांचें आडनांव काय?

कोणी तरी—लोणकर.

विनोबा—येथें मालगुजार किती?

नारायण मास्तर—येथें तिघे मालगुजार लोणकर आहेत. त्यांत बळिराम पाटील म्हणजे हे दिवाणजी आहेत, यांचे मालक यांचा मुख्य ८ आणे हिस्सा आहे. बाकी एक मारवाडी आणि इतर तिघे मालगुजार आहेत.

विनोबा—पांडुरंग पाटलांना नारायणमास्तरखेरीज मुलें किती?

कोणी तरी—पांडुरंग पाटलांना दाखवून—कारण ते समोर च बसले होते—यांना १२ मुलें आहेत. सर्व कुटुंब एकत्र आहे. यांच्या घरांत ४५ माणसें आहेत.

विनोबा—हीं सर्व माणसें एकत्र राहतात?

नारायण मास्तर—होय.

विनोबा—(नारायण मास्तरांना) तुम्ही किती शिकला आहां?

उत्तर—एफ् ए पर्यंत.

कोणी तरी—नारायणमास्तर मोठे वादविवाद करणारे आहेत.

विनोबा—आपल्याला कांहीं इथें वाद करावयाचा नाहीं.

कोणी तरी—नाहीं. तसे नाहीं. ते महानुभाव पंथाचे अभ्यासी प्रचारक आहेत. कीर्तन करतात जागोजागीं. शंकासमाधान करतात.

विनोबा—तुम्ही प्रचार करतां म्हणजे काय गांवोंगांव फिरतां?

नारायणमास्तर—होय.

विनोबा—मग तुमच्याकडे महानुभावांचे ग्रंथ हि पुष्कळ असतील.

नारायणमास्तर—हो बहुतेक आहेत.

विनोबा—तुमच्याकडे आलें पाहिजे पुस्तकें पाहायला.

नारायण मास्तर—या साधारण ९॥-१० च्या सुमाराला. माझ्याकडे पंजाबांतून फकीर आले आहेत. त्यांची व्यवस्था लावावयाची आहे मला. कोण येईल माझ्याबरोबर?

कोणी तरी—मास्तर येतील.

—नंतर मास्तरांच्या बरोबर विनोबाजी आणि शिवाजी गांव पाहण्यास गेले. प्रथम मास्तरांच्या घरापासून च सुरवात केली. घर साधारणतः बरें होतें. फिरतांना प्रश्नोत्तरें चालूं होतीं.

विनोबा—तुमचें नांव काय मास्तर?

मास्तर—बापुराव गायकवाड.

विनोबा—तुम्ही कुठले?

मास्तर—सेलूचा मी.

विनोबा—तुम्हाला पगार किती मिळतो?

मास्तर—१९ रुपये. त्यांत कपात २ रु. आहे. शिवाय ऑक्टोबरपासून पगार मिळाला नाहीं. मागें सुद्धां पांच महिन्यांचा पगार मिळाला नव्हता. त्यांतला आतां दोन महिन्याचा मिळाला आहे.

विनोबा—गांवची लोकसंख्या किती?

मास्तर—७७५.

विनोबा—घरें किती?

मास्तर—१८०.

विनोबा—महारघरें?

मास्तर—५०, महारपुरे दोन आहेत. मांगपुरा एक असून त्यांचीं १५, १६ घरें आहेत.

विनोबा—मुसलमानांची वस्ती किती?

मास्तर—मुसलमानघर एक च आहे. ते तिघे भाऊ आहेत. त्यांना शेतीवाडी वगैरे कांहीं नाहीं.

विनोबा—येथें न्हावी किती?

मास्तर—दोन न्हावी आहेत. एक न्हावी वैद्यकी करतो.

विनोबा—शिंपी किती आहेत गांवांत?

अनुक्रमणिका

मास्तर—दोन शिंप्यांचीं दुकानें आहेत (त्यांपैकीं एक जण गणपतराव जाधवांचें नातलग आहेत. नालवाडीला राहिलेले आहेत. असें हि आणखी कळलें).

विनोबा—येथें दुकानें किती?

मास्तर—तीन दुकानें आहेत.

विनोबा—सार्वजनिक विहिरी येथें किती आहेत?

मास्तर—५/६ आहेत शिवाय लोकांच्या आवारांतल्या आणखी ५ विहिरी तरी असतील.

—अशा रीतीनें संवाद होतां होतां गांव दाखवीत दाखवीत मास्तर शाळेंत घेऊन गेले. शाळा गांवाबाहेर जवळ च होती. शाळेच्या बाहेर महानुभावांचें मंदिर होतें. तेथें महानुभावपंथीं एकमुखी चतुर्भुज दत्ताची मूर्ति होती. हरिजनांना मंदिरांत जाण्यास परवानगी नव्हती. त्यांना फक्त मंदिराच्या बाहेरच्या दरवाजाच्या आंत जातां येत होतें. पुढें परवानगी नव्हती. त्यामुळें विनोबा मंदिरांत गेले नाहींत. शाळेंतली मुलें बाहेर थंडीची उन्हांत तापली होती. तेथें च मास्तरांनीं मुलांना जमविलें. पुन्हां प्रश्नोत्तराला सुरवात झाली.

विनोबा—शाळेंत मुलें किती?

मास्तर—पटावर २७; हजर २०.

विनोबा—या मुलांत मुली किती?

मास्तर—मुली चार.

विनोबा—महाराचीं मुलें किती?

मास्तर—महाराचा मुलगा एक.

विनोबा—महानुभावांचीं मुलें किती?

मास्तर—आठ.

—यानंतर मास्तरांनीं मुलांना एक धडा वाचावयास सांगितला. त्यांत रानगवत आणि धानगवत असा एक पाठ होता. मुलगा भीत भीत कसें तरी वाचीत होता.

विनोबा—रानगवत म्हणजे काय?

—मुलांपैकीं कोणी च बोलेना.

अनुक्रमणिका

मास्तर—(ओरडून) रानगवत काय तें माहीत नाहीं का?

विनोबा—रानगवतापासून च पुढें धानगवत झालें.

मास्तर—आम्हांला तरी कुठें ही कल्पना होती—तर आम्ही मुलांना सांगणार?

—यानंतर विनोबाजींनीं एखाद्या मालगुजाराचें घर पाहण्याची इच्छा प्रदर्शित केल्यावरून मास्तरांनीं दाजीबा लोणकरांच्या घरीं नेलें. दाजीबाचें घर गढीवर होतें. वरती विहीर. विहिरीजवळ न्हाणीघर. पाणी फुकट जाऊं नये म्हणून अळू लावलेंलें. एक अंजिराचें मोठें झाड हि तेथें लावलेंलें आहे. आंतली जागा चांगली दिसली. गोपालकृष्णाच्या दोन तसबिरी लावल्या होत्या. मध्यें महात्माजींचा फोटो होता. जवळ कांहीं ग्रंथ होते. तो देव्हारा पाहून विनोबा म्हणाले—

विनोबा—गोपाळकृष्णाच्या तसबिरी तर तुम्ही ठेवल्या आहेत. पण गाईचें दुभतें आहे का घरीं?

उत्तर—नाहीं.

विनोबा—कारण?

उत्तर—दूध काढायला गेलें कीं गाईच्या थानांतून रक्त च निघते. कोणी तरी करणी केली आहे.

विनोबा—तुमच्या च गाईला करणी केली आहे कां गांवांतल्या सगळ्या गाईंना करणी केली आहे.

उत्तर—सगळ्या च गाईंना करणी केली आहे.

—यानंतर नारायणमास्तरकडे महानुभावांचीं पुस्तकें पहाण्यासाठीं विनोबाजी गेले. नारायण मास्तरांचे घरीं महानुभावांचीं पुष्कळ च पुस्तकें दिसली. चक्रधराचीं सूत्रें पहावयास मिळालीं. या सूत्रांची महानुभावी लिपि नारायणमास्तर भराभर वाचवून दाखवीत होते. महानुभावांची लिपि देवनागरी लिपीच्या उलटापालटीनें तयार केली आहे. एक सूत्र फार च मजेदार होतें. महानुभावी साधूनें प्रेताची टाकून दिलेली वस्त्रें हि वापरण्यास हरकत नाहीं. असें लिहून पुढें चक्रधरानें सूचना दिली होती कीं "पण कपड्यांसाठीं कोणी मरावे अशी इच्छा करूं नये." पुस्तकें पाहून विनोबा परत आले. सर्व मंडळींची जेवणाची व्यवस्था पांडुरंग पाटलाकडे झाली. परंतु जेवतांना ते म्हणाले—"आम्हांला विचारलें पोलिसांनीं कीं या मंडळींना कां जेऊं घातलें?—तर आम्ही सांगू कीं, ते उतरले दुसरीकडे आहेत. आपल्या गांवीं कोणी बाहेरून आले तर त्याला जेऊं घालण्यांत काय गुन्हां झाला?" हे विनोबांना मागून कळले तेव्हां ते म्हणाले—"ज्यांच्याकडे उतरलों ते दिवाणजी म्हणतील आम्हांला काय? आम्ही त्यांना जेऊं थोडें च घातलें आहे? कोणी मनुष्य आपल्या गांवांत आला तर त्याला जागा देण्यांत काय गुन्हा आहे?—ही चांगली गंमत आहे"—या च वेळीं बापूजींकडून एक मनुष्य आला. बापूजींना विनोबांची रोजची हालचाल कळली पाहिजे असा निरोप त्यानें आणला होता. त्याला विनोबांनीं आतांपर्यंतचा कार्यक्रम दिग्दर्शित करणारें पत्र देऊन परत रवाना केला. दुपारीं विश्रांती, तकली उपासना वगैरे कार्यक्रम झाला. संध्याकाळ झाली. पुढच्या गांवची व्यवस्था करण्यासाठीं मोघेजी रवाना झाले. गांवांत सभेची व्यवस्था कोणी च करीनात. सर्व जण भयभीत झाले होते.

दवंडी हि कोणी देईनात. दगडूभाऊ, चावदसभाऊ वगैरेंनीं दवंडी दिली. दवंडी दोन वेळां दिली. ज्यानें त्यानें आपापल्या घराचें दार बंद करून घेतलें. रात्रींचीं जेवणें झालीं. आगरगांवची मंडळी बैठक आणि पेट्रोमॅक्स घेऊन आली. महानुभांवांच्या दत्ताच्या देवळाजवळ एका चौरंगावर व्यासपीठ तयार केलें होतें. गांवच्या मंडळींना पुष्कळ बोलावणीं करून हि कोणी येईना. नागझरीहून मंडळी आली. पण समोर बैठकीवर कोणी बसेनात. या सगळ्याचें कारण मूळची भीति हें तर होतें च. पण संध्याकाळीं च सर्कल इन्स्पेक्टर व दारोगा मोटार घेऊन आले होते. त्यामुळें सर्व लोक अधिक च भयभीत झाले. आगरगांवच्या एका माणसानें तर ओरडून सगळ्यांना सांगितलें “बैठकीवर बसला म्हणून तुम्हाला कोणी पकडून नेणार नाहीं. या आम्ही नाहीं का बसलों बैठकीवर.” शेवटीं कांहीं मंडळी येऊन बसली. आणि व्याख्यानाला सुरवात झाली. व्याख्यानांत गांवांतल्या भीतिग्रस्त वातावरणाविषयीं स्वाभाविकपणें च पहिल्या प्रथम समजूत दिली गेली. आणि नंतर मग सत्याग्रहाचे नेहमीचे मुद्दे सांगितले गेले. “माझ्या खेडेगांवांतल्या प्रिय मंडळींनो, काल आगरगांवला व्याख्यान झालें. आज येथें आलों. या वेळीं सुटल्याबरोबर ताबडतोब दोन दिवसांनीं सेवाग्रामला सत्याग्रह सुरू करून नागझरीला खंडेराव वारले म्हणून गेलों. नंतर आगरगांवला बोलावणें आलें म्हणून आगरगांव घेऊन तुमच्या गांवीं लोकांशीं परिचय करावा, महानुभाव पंथाची माहिती करून घ्यावी म्हणून आलों. लोक म्हणाले येथें दहा वर्षांत सभा च झाली नाहीं. हें ऐकून मला वाटलें कीं, येथें अवश्य अवश्य आलें पाहिजे. येथें आलों. महानुभावांचे ग्रंथ पाहिले. गांवांत फिरलों. तेव्हां मला सर्वत्र भीतीचें वातावरण दिसलें. हे लोक कोणाला भितात? लहानपणीं मी बागुलबोवाला भीत असें. मग आईनें सांगितलें रामनाम घेतलें कीं भुतें पळतात. माझी आईवर श्रद्धा होती. पुढें तर डोंगरांतून एकटा च रात्रीं फिरलों तरी कांहीं वाटत नसे. मी गांवांत विचारलें लोक कोणाला भितात? तेव्हां कळलें कीं, दारोगा साहेबाला. (या वेळीं रिपोर्ट घेणारा दारोगा हंसला) मी जर दारोगा असतों तर लोकांना सांगितलें असतें कीं, तुम्ही मला कां भितां? मी तुमचा—जनतेचा सेवक आहें. चोऱ्यामाऱ्या होऊं नयेत म्हणून मी जनतेंत फिरतों. लंडनमध्यें लोकांना पोलिसाची भीति वाटत नाहीं. उलट त्यांना त्यांच्याविषयीं प्रेम वाटतें. कोणी मुलगा रस्ता चुकला असेल तर तेथला पोलिस त्याला घरीं पोंचवितो. आपल्याला शिक्षण नाहीं म्हणून पोलिसाची भीति वाटते. लहानपणीं मीं प्रथम जेव्हां एक साहेब पाहिला तेव्हां मला तो विलक्षण च वाटला. ऊंचच्या ऊंच चिरूट ओढीत फिरत होता तो. त्याच्या चेहऱ्यावर माणुसकी कशी ती मुळीं च नव्हती. हे साहेब उन्मत्तपणे वागतात म्हणून त्यांची भीति वाटते. महानुभावांचें तत्त्व आहे कीं, प्राणिमात्राची हिंसा करूं नये. पण एवढ्यानें धर्म पुरा होत नाहीं. माणसाला द्वेष व भय नको असें झालें म्हणजे अहिंसा पटली. भय गेल्याशिवाय अहिंसा समजली असें होत नाहीं. हिंदुस्थानच्या ४० कोटी लोकांवर थोडेसे लोक राज्य करतात याचें कारण हि भीति हें च आहे. प्रत्येकाला मरण हें ठेवलेलें च आहे. मग भीति कशाची? जुलमी लोकांचा जो जुलूम चालतो तो लोकांच्या भीतीवर चालतो. मी आगरगांवीं गेलों तेथें शाळेंत एक म्हण लावली होती. “ज्याच्या हातीं शाळा छडी, तो चि ठेवी राष्ट्र-घडी.” शिक्षक काय ढोरक्या आहे? मीं मास्तरांना सांगितलें कीं, ही म्हण कामाची नाहीं. आमची समजूत ही कीं, छडी मारली कीं काम होतें. तसें इंग्रजांना वाटतें कीं दडपशाही केली कीं काम होते. येथें असें कळलें कीं आठवड्यांतून लोक दोनदां भजन करतात. भक्ति आणि भीति दोन्ही एके ठिकाणीं राहूं च शकत नाहीं. “हरिचिया दासा। नाहीं भय चिंता आशा” एका मित्राकडे मी दहा वर्षांपूर्वी गेलों होतों तो मित्र म्हणाला, तुमचें सर्व काम उत्तम आहे. पण तुमची जेवणाची सोय दुसरीकडे करा. कारण मला भीति वाटते. मी म्हणालों, धिक्कार तुमच्या नादानपणाला. ह्यांत माणुसकी नाहीं.” ह्यानंतर पूर्वींच्या भाषणाप्रमाणें सत्याग्रहाची भूमिका समजावून सांगितली. आणि भाषण संपविलें. गद्रेजींनीं सत्याग्रहाचे अभंग म्हटलें आणि हा कार्यक्रम समाप्त झाला.

अनुक्रमणिका

ज्या अर्थी सर्कल, दारोगा, दोन पोलीस मोटार घेऊन आले आहेत त्या अर्थी बहुधा विनोबाजी पकडले जातील असें समजून विनोबाजींचें सर्व सामान तयार ठेवलें. पकडल्याबरोबर मंडळींनीं हि वर्ध्याला निघून जाण्याची सर्व सोय असावी म्हणून तयारी करण्यांत आली. सकाळीं आगरगांवांतल्या मंडळींनीं एक खाचर पाठवून देण्याचें कबूल केलें. आणि निजानीज झाली. परंतु रात्रीं कोणाला च नीट झोप लागली नाहीं. कारण शेजारच्या गोठ्यांत बरेचसे बैल होते. त्यांच्या गळ्यांतल्या घंटा सारख्या वाजत होत्या. आणि तीन वाजल्यापासून च गुरें सोडून देऊन तेथल्या नोकरांनीं झाडझुडीला सुरवात केली. विनोबाजी झोपले होते तेथें खुशाल खराटे घेऊन धूळ उडवीत झाडणें चाललें होतें. ४ वाजले. प्रार्थना झाली. आतां पकडतील मग पकडतील अशा मनःस्थितींत सर्व होते. परंतु जिकडे तिकडे स्वच्छ दिसूं लागले, अरुणोदय झाला तरी पकडण्याचे चिन्ह दिसेना. विनोबाजी अंगणांत बसले होते. मंडळी बोलत होती. गद्रेजी एका बाजूला दातण करीत होते. इतक्यांत दारोगा आणि सर्कल त्या ठिकाणीं मोटार घेऊन आले. प्रथम त्यांना येतांना गद्रेजींनीं पाहिलें. आल्याबरोबर त्यांनीं विनोबाजींना सलाम केला. 'काय आहे?' म्हणून विचारतां "आपके खिदमतमें आये है" असें सर्कल साहेबांनीं म्हटलें. विनोबाजींनीं नंतर तेथें च न्याहारी केली. दारोगा सर्कल वगैरेंना हि उरलेला फलाहार दिला. चावदस, गद्रेजींनीं हि सत्याग्रह केला होता. परंतु त्यांना पकडलें नव्हतें. ते म्हणाले "आम्हाला हि कां पकडत नाहीं?" "आपको तो देहली जानेके लिये रख्खा है, आप जाईये मजेसे देहली" असा सर्कस साहेबांनीं विनोद केला. हा गृहस्थ शीख असून बरा होता, असें दिसलें. विनोबाजींचें सामान तयार च होतें. तें सर्व मोटारींत घातलें. मोटारींत दारोगा पुढें आणि सर्कल मागें विनोबांबरोबर बसले. या वेळीं एक फोटो घेण्यांत आला. विनोबाजींनीं एकनाथी भजनाचें पुस्तक वाचण्यास सुरवात केली. मोटारीचा घर्रर आवाज झाला आणि मोटार पुढें निघून गेली. त्या मोटारीच्या अगोदरच सायकलनें बुद्धसेन भर वेगांत वर्ध्याला गेला. आणि ही बातमी त्यानें फोननें सर्वत्र पसरून दिली. वर्ध्याच्या रस्त्यांत या बातमीचे बोर्ड लागले. इतर मंडळीहि लोणीहून बैलगाडींत बसून वर्ध्याला दाखल झाली.

जागृति आल्यावर जसें स्वप्न निघून जावें तसें हें झालें. विनोबाजींच्या सहवासांत मंडळींना जगाची पूर्ण विस्मृति पडली होती. ते पकडले गेले. आणि मग मंडळी हे दिवस कसे गेले हें समजलें सुद्धां नाहीं, या आश्चर्यांत दंग होऊन गेली. तथापि अजून हि विनोबाजींचा खटला व्हावयाचा होता. त्यामुळें त्यांच्या नित्य सहवासांत खंड पडला असला तरी तिकडे सर्वांचें लक्ष वेधल्यामुळें पूर्णपणें या स्वप्नांतून जागृति आली होती असें म्हणतां येत नाहीं. गाढ झोपेंतून स्वाभाविकपणें मनुष्य एकदम जागा होत नाहीं. झोपेचा गाढपणा थोडा थोडा कमी होतो. झोपेची पकड हळूं हळूं सुटूं लागते. आणि मग मनुष्य झोपेच्या पैलातीरावरून जागृतीच्या ऐलतीरावर येऊन पोंचतो. सूर्य कांहीं एकदम उगवत नाहीं. हळूं हळूं त्याचा प्रकाश पडत जातो. तसें च हें झालें. अजून हि खटला ऐकावयाचा आहे या व्यवधानांत मंडळी गुंतली होती. खटला एक दिवस पुढें ढकण्यात आला. रात्रीं वर्ध्याला गांधी चौकांत मोठी सभा भरली. बाबू राजेंद्रप्रसाद आणि आचार्य कृपलानी यांनीं विनोबाजींच्या अटकेचा अर्थ लोकांना विशद करून सांगितला. आणि हा अटकेचा दिवस संपला.

●●●

# प्रकरण ६० वें

## खटल्याचा दिवस

दिनांक २३ जानेवारी १९४१

**तारीख** २३ जानेवारी १९४१. वर्धा जेलचें फाटक. सकाळीं ९॥—१० ची वेळ. खटला जेलमध्यें ठेवला गेल्यामुळें, जेलवर अनेक लोक कुतूहलानें आलेले होते. महादेवभाईंचा टांगा अगोदरच येऊन ते आंत जाऊन विनोबाजींशीं बोलत होते. कोर्टाला सादर करण्याच्या स्टेटमेन्टविषयींचें बोलणें असावें. इतर मंडळी आपली जेलच्या फाटकाबाहेर कोणी झाडाखालीं बसलीं होती, कोणी उभी होती, कोणी जेलच्या दरवाजाजवळच्या बाकावर बसलेली होती. हा त्रिशंकूसारखा न इकडे न तिकडे असा काळ गप्पा छाटण्यांत, इकडेतिकडे फेऱ्या मारण्यांत किंवा उगी च इकडेतिकडे शून्य दृष्टींनें पाहण्यांत घालवण्यापलीकडे कोण काय करणार? इतक्यांत राजेंद्रबाबूंची मोटार आली. ते हि खटला ऐकण्यासाठीं आले होतें. साधेपणा त्यांच्या रोमरोमांत जणूं काय मुरलेला होता. ते येतांच बसलेली मंडळी उठून उभी राहिली. त्यांना बसण्याचा आग्रह करूं लागलीं. त्यांना आपल्यासाठीं मंडळी उठली हें आवडलें नाहीं. ते हि मग उभे राहिले. मंडळी हि उभी राहिली.

जेलच्या बाहेरचीं झाडें वाऱ्यानें डुलत होतीं. जेलच्या उंच भिंतीच्या आंत तीं झाडें सहज बघू शकत होतीं. पण बाहेरच्या माणसांना जेलरच्या हुकुमाशिवाय आंत कोण घेणार? जेलच्या फाटकांतून कोणी आंत गेली कीं कुलुप. बाहेर आला कीं कुलुप. त्या कुलपाची दिवसांतून अशी किती तरी वेळ उघडझांप व्हावयाची. तें कुलुप असें अनेक वेळां उघडलें गेलें आणि लावलें गेलें तरी हुकुमाशिवाय तें उघडलें जावयाचें नाहीं. बाहेर मंडळी तिष्ठत उभी आहेत. त्यांचा दर्जा काय आहे, त्यांत राष्ट्राचे कर्णधार उभे आहेत कां सामान्य माणसे उभी आहेत याची त्या कुलुपाला आणि त्या कुलपाच्या नित्य सान्निध्यांत असलेल्या जड शिपायाला काय परवा! तो हि बाहेरच्या मंडळीप्रमाणें आंत उभा राहिलेला होता. तो हि खरोखर कैदी च होता. आणि जेलर तरी काय, त्याची जात कैद्याची च. मुक्तपणें ह्या जगांत राहणारे फार च थोडें? अशा एका मुक्तात्म्याला आज हे अनेक प्रकारांनीं बद्ध झालेले लोक जेलच्या बंधनांत अडकविण्यासाठीं धांवपळ करीत होते. तेवढ्यासाठीं साक्षीपुरावे गोळा करून ठेवलेले, व्याख्यानाच्या वेळीं हजर असणारे दारोगे, आपापल्या कागदांसह सज्ज झाले. न्यायाधिशांची स्वारी हि मोटारींत बसून तेथें आली. त्यांच्यासाठीं जेलचे फाटक उघडलें आणि लगें च नेहमींप्रमाणें पुन्हा बंद झालें. बाहेरून मंडळींनीं खटल्यासाठीं हजर राहूं इच्छिणाऱ्या मंडळींची यादी आंत न्यायाधीशांकडे पाठवली. त्यांची मंजुरी आल्यावर एकेक मनुष्य आंत सोडला गेला. ज्यांना परवानगी मिळाली नाहीं ते बिचारे बाहेर तसे च उभे राहिले.

आंत गेल्याबरोबर समोर च जेलरसाहेबांचें खुर्च्या, टेबलें मांडलेंलें ऑफिस दिसलें. तेथून डाव्या हाताला एका लहानशा कैदी ठेवण्याच्या जागेंत कोर्ट बसलें होतें. विनोबाजींना निजवण्याबसण्याला ही च जागा दिली होती. पुरावा दाखल करणारे दारोगे दोन्ही बाजूला खुर्चीवर बसले. राजेंद्रबाबूंसह इतर प्रेक्षक मंडळी कैद्यांच्या निजण्याच्या ओट्यावर बसली. विनोबाजींना बसण्याला न्यायाधिशांसमोर खुर्ची दिलेली होती. जवळच्या लोखंडी गजाच्या मोठ्या खिडकीसमोर महादेवभाई सूत कांतीत होते. त्यांच्या कांतण्याचा मधुर ध्वनि तेथें घुमून राहिला होता.

अनुक्रमणिका

खटल्याच्या कामाला—साक्षी पुराव्याला सुरवात झाली. ती एक कवाईत च होती. तो एक खेळ, ती एक गंमत अशा च दृष्टीनें प्रेक्षक मंडळी पहात होती. जेथें एकपक्षीं काम चालतें, तेथें काम वस्तुतः बंद च पडतें. खेळांत एक पक्ष भाग च घेईना तेथें खेळ उतरतो च कुठें? असें होतें तरी न्यायाधिशाला आणि सरकारी अधिकाऱ्यांना तो खेळ वाटत नव्हता. केवळ हुकुमाचे बंदे म्हणून, पोटासाठीं नोकरी करतों म्हणून एका निरपराध मनुष्याला—त्यांतून अनेकांच्या आदराचा विषय बनलेल्या महापुरुषाला केवळ तांत्रिक तऱ्हेनें दोषी ठरवून बंधनांत टाकण्याची कवाईत आपण करणार आहोंत याची जाणीव त्यांच्या चेहऱ्यावरून पुसली जाऊं शकत नव्हती. मधून मधून घाम पुसण्याच्या निमित्ताने खिशांतून ते रुमाल काढीत. आणि तो घाम बिचारा रुमाल पुसून हि टाकी. पण घाम पुसल्यावर तर चेहऱ्यावरची चलबिचल उलट ज्यास्त च स्पष्ट उमटे. तरी या च न्यायाधिशाचा चेहरा लाल झाला. मान खालीं घालून तो हलक्या आवाजांत पुराव्यादाखल पुढें केलेल्या भाषणासंबंधीं दोन्ही दारोग्यांना प्रश्न विचारीत होता. त्या कागदांवर लाल पेन्सिलीच्या खुणा करीत होता. पण केवळ तांत्रिक तऱ्हेनें. इकडे समोर विनोबाजी खुर्चीवर हातांत स्टेटमेन्ट घेऊन निश्चल बसले होते. त्यांच्या चेहऱ्यावरून कसलें हि अनुमान काढतां येत नव्हतें. "नैषा तर्केण मतिरापनेया"—अशी ब्रह्ममय निर्विकार अवस्था त्यांच्या ठिकाणीं मुद्रित झाली होती. ते निव्वळ सहजावस्थेंत बसले होते. प्रेक्षक मंडळींत स्त्रिया होत्या. अगदीं अजाण मुलें होतीं.—तीं मधून मधून गडबड करीत होतीं. मुख्यतः जमनालालजींकडची मंडळी, आश्रमाची मंडळी असा तो समूह होता. सर्वांच्या मनांत आतां शिक्षा किती होईल याचे तर्कवितर्क चालू होते. "आपला धंदा काय?" न्यायाधिशानें विचारलें. त्याला "कांतणें" म्हणून उत्तर दिलें. पण न्यायाधिशाला तें ऐकूं गेलें नाहीं. तेव्हां फिरून प्रश्न विचारला. त्यावेळीं महादेवभाई किंचित् हंसले. न्यायाधिशांना आपणाला हंसले असें वाटून ते "हें तांत्रिक प्रश्न आहेत. पण विचारावे लागतात." असें महादेवभाईंकडे वळून घाईघाईनें इंग्रजींत बोलले. विनोबाजींनीं आपला धंदा "स्पिनिंग" म्हणून सांगितला. विनोबांचा धंदा दाखविण्यासाठीं तर महादेवभाई समोर कांतीत नव्हते? म्हणून तर त्यांना हंसूं आलें नाहीं? विनोबाजींचा धंदा खरोखर च कांतण्याचा होता. हें उत्तर कांहीं मुद्दाम ठरवून दिलेंलें नव्हतें. तें सहज उत्तर होतें. पवनारला, नालवाडीला, कन्याश्रमांत, साबरमतीला जेथें जेथें ते गेले आणि राहिले तेथें तेथें त्यांनीं भरपूर आणि सतत कांतीत राहून पुन्हां अनेक तऱ्हेनें कांतण्याचे संशोधन करून त्याचे सिद्धांत बसविले होते. खटल्याचें काम थोड्या च वेळांत संपलें.

शेवटीं विनोबाजींनीं आपलें स्टेटमेन्ट वाचून दाखविलें. न्यायाधिशांनीं तें न वाचतां च फाईल करण्याची इच्छा दर्शविली. परंतु विनोबाजींनीं स्टेटमेन्ट वाचून दाखविण्याचें च नक्की ठरविलें. साध्या मराठींत लिहिलेंलें हें स्टेटमेन्ट अगदीं च लहान होतें. बापूजींच्या सल्ल्यानें तें तयार केलें होतें.

"जेलमधल्या चिंतनानें सत्याग्रहाचें धोरण बिनचूक आहे; अशी माझी खात्री पटली आहे. काँग्रेसची प्रवृत्ति आजच्या मारामारीच्या युगांत निःसंशय शांतीची आहे. व्यक्तींच्या हेतुभेदांवरून लढ्याचें स्वरूप ठरणार नसून तें सत्याग्रह करणाऱ्यांच्या कृतीवरून ठरेल. सारा हिंदुस्थान जर या मार्गाचा अवलंब करील तर सर्व कलहाचा शेवट होईल. त्या वेळीं ब्रिटिश, नाझी, फाशी कोणता हि साम्राज्यवाद नामशेष होईल. पण असा चमत्कार सहसा होईल अशी काँग्रेसवाद्यांना आशा आहे असें नाहीं. पण असें असलें तरी काँग्रेस आपलें पवित्र कार्य सोडूं शकत नाहीं. आपली निष्ठा जगापुढें जाहीर करण्याची काँग्रेसला ही च संधि आहे. या ध्येयाचा माग घेण्यांत च हिंदुस्थानचें स्वराज्य आणि दलित राष्ट्रांची सुटका आहे. म्हणून काँग्रेसच्या सविनय प्रतिकारानें झोटिंग राष्ट्रांना मदत होतें, असें म्हणणें म्हणजे काँग्रेसची बदनामी आहे. काँग्रेस झोटिंगशाहीचा तर अधिक च तीव्र प्रतिकार करीत आहे. हा प्रतिकार कोणाला हि उपद्रव देणारा नाहीं. पण हें जोपर्यंत ब्रिटिश सरकारला कळत नाहीं. उलट या गोष्टीला तें गुन्हां समजतें तोपर्यंत माझ्यासारख्या

अनुक्रमणिका

काँग्रेसवाद्यांनीं हा कल्पित गुन्हा करून त्याबद्दलची शिक्षा आनंदानें भोगली पाहिजे. कारण हा गुन्हा करणें आम्ही एक सामाजिक व राजकीय पुण्यकार्य समजतो."

अशा आशयाचें स्टेटमेन्ट वाचून दाखविल्यावर कोर्टाचें काम संपलें. आतां शिक्षा सुनावणार या कल्पनेनें प्रत्येक जण उत्सुक झाला होता. परंतु "जज्मेंट उद्यां देऊं" म्हणून न्यायाधीश उठले. लगे च मंडळी विनोबाजींच्या भोवतीं गोळा झाली. विनोबाजींचें बाबू राजेंद्रप्रसाद यांच्याशीं थोडें औपचारिक बोलणें झालें "आजे जजमेंट नहीं एटले विनोबा तमने अहिया एक दिवस वधारे रहेवुं पडशे" असें महादेवभाई म्हणाले. जेलर घाई करूं लागला. आल्या रस्त्यानें मंडळी बाहेर आली. खाड्कन जेलचें कुलुप लागलें. आणि मंडळी आपापल्या स्थानीं याच कल्पनेनें निघून गेलीं कीं उद्यां पुन्हां—पुनरागमनाय च.

●●●

अनुक्रमणिका

# प्रकरण ६१ वें

## निकालाचा दिवस

दिनांक २४ जानेवारी १९४१

**आज** निकालाचा दिवस. ११-११। चा सुमार. जेलच्या फाटकावर मंडळीं कालच्याप्रमाणें च जमली. आज हिंगणघाटच्या श्री. घटवाईंना येथें पकडून आणलें होतें. त्यांच्या भेटीसाठीं हि त्यांचे आप्तइष्ट आले होतें. आज केवळ निकाल असल्याकारणानें ज्यास्त मंडळी येणार नाहींत जेलवर असें वाटलें होतें. पण आज कालच्यासारखी च गर्दी होती. न्यायाधीश घाईघाईनें मोटारींतून उतरले. थोड्या च वेळांत मंडळींना परवानगी मिळतां च सर्व जण कालप्रमाणें जेलमध्यें दाखल झाले. न्यायाधीश श्री. कुंटे उभे च होते. तीन आरोपांबद्दल प्रत्येकीं सहा-सहा महिने सजा त्यांनीं उभ्या च सुनावली. तुम्हांला बी क्लास दिला असून सर्व सजा एकदम च भोगावयाची असें हि त्यांनीं सांगितलें. त्यामुळें खरी सजा सहा च महिने होती. सर्वांना आश्चर्य वाटलें. पुष्कळांचे अंदाज चुकले. महादेवभाईंनीं न्यायाधिशांजवळ जज्मेन्ट मागितलें. त्या लांब जजमेन्ट मध्यें.

"The accused committed three offences, believing as I find in his moral right to do a particular thing and he did so in a temperate and sober language."—अशा तऱ्हेचे उद्‌गार त्यांत काढण्यांत आले होते. केवळ पोटासाठीं नोकरी करणाऱ्यांपासून यापेक्षां जास्त अपेक्षा करणें शक्य हि नाहीं. आणि जोपर्यंत स्वतःची भूमिका अशा माणसांनीं स्पष्ट केली नाहीं तोपर्यंत त्याच्यासंबंधीं तर्क करण्यांत हि अर्थ नाहीं. झालें. शिक्षा होऊन गेली. न्यायाधिशानें सर्वांना अभिवादन केलें. विनोबाजींना एकेक जण नमस्कार करून जेलच्या बाहेर पडला. तरी ते अद्यापि वर्धा जेलमध्यें च होते. त्यांना नागपूरला आज च मोटारीमधून नेतील, त्या वेळीं त्यांचें दर्शन व्हावें म्हणून कित्येक मंडळी नालवाडीच्या मोटाररस्त्यावर बसून राहीली. त्यांचा तो हेतु सफळ हि झाला. दुपारीं ४-४॥ च्या वेळीं विनोबाजींना घेऊन नागपूरकडे जाणारी पोलीस अधिकाऱ्यांची मोटार जात होती. अधिकाऱ्यांनीं ती उभी करवली. विनोबाजी ४ शब्द बोलले. मोटार नागपूरकडे निघून गेली आणि हा सत्याग्रहाचा मंगलसोहळा ६ महिन्यांपुरता समाप्त झाला.

●●●

अनुक्रमणिका

# प्रकरण ६२ वें

## सत्याग्रहाची परिसमाप्ती

**आचार्यांची** १२ जुलै १९४१ रोजीं नागपूर जेलमधून सुटका झाली. दुपारीं बापूजींना भेटण्यासाठीं ते सेवाग्रामला गेले. सायंकाळीं नालवाडीला प्रार्थना झाली. त्यांत त्यांनीं स्वतःसंबंधीं, जेलमधल्या कार्यक्रमासंबंधीं पुढीलप्रमाणें प्रवचन केलें. १५ ऑगस्ट १९४१ च्या ग्रामसेवावृत्ताच्या अंकांत त्याचा गोषवारा आलेला आहे.

"पहिल्या प्रथम माझ्यासंबंधीं च सांगतो. एकूण ९ महिन्यांत ९ रत्तल वजन कमी झालें. त्यापैकी ६ रत्तल वजन भरून आलें. आहार येथल्या सारखा च घेत होतो. माझा कार्यक्रम—सकाळची प्रार्थना आसपास चारी बाजूला निजलेल्यांना त्रास होऊं नये म्हणून मनांतल्या मनांत करीत असे. त्यानंतर प्रातर्विधि, वाचन, अल्पाहार, आणि मग ८·३० वाजेपर्यंत दोन वर्ग. एक वर्ग संस्कृत वाल्मिकिरामायण, रामकृष्णाचा (जमनालालजींच्या मुलाचा) आणि दुसरा वर्ग गीतेसंबंधीं चर्चा. वर्गानंतर फिरावयास जातो. नंतर हल्लीं मी थोडें लिहूं लागलों आहें तें लिहीत असतों. त्यानंतर भोजन, विश्रांति. मग थोडा वेळ सूत कांततो. नंतर सार्वजनिक सूतकताई येथल्यासारखी च अर्धा तास होते. त्यांत सर्व तर सामील नसतात पण अर्धेअधिक असतात. कताईनंतर आदल्या दिवसाच्या कांतलेल्या तारांची नोंद होते. त्यानंतर एक मनुष्य वर्तमानपत्रीय बातम्या टांचून टिपून आणलेल्या असतात त्या ऐकवतों. त्यानंतर फिरणें. संध्याकाळच्या जेवणानंतर २० मिनिटें काम नसतें. यानंतर सायंकाळची प्रार्थना. हल्लीं प्रार्थनेंत स्वराज्याची आपली काय कल्पना आहे तें सांगतों. रामायण वाचीत होतों. पण डोळ्याच्या कारणानें तें बंद केलें आहे. प्रार्थनेनंतर ८॥ ला झोप व सकाळीं ४ ला जागृति. माझ्या डोळ्यासंबंधीं लोकांना कमी अधिक माहिती मिळाली असेल. डोळा थोडा कमजोर झाला आहे ही गोष्ट खरी आहे. कुराणाच्या अभ्यासानें हें झालें आहे. एरवीं हि झालें तर असतें च. पण आज आलेला थकवा ५–६ वर्षांनंतर आला असता. या थकव्यामुळें अधिक वाचण्या-लिहिण्याची शक्यता आतां नाहीं. कर्तव्य म्हणून जेवढें वाचावें-लिहावें लागतें, त्यापेक्षां जास्तीची जरूरी पण नाही. मीं डोळ्यांना त्रास देण्याचें बंद केलें आहे. सकाळीं फक्त अर्धा तास कुराणासाठीं देतों. यानंतर तेथल्या वातावरणासंबंधीं सांगावयाचें तर तेथें निरनिराळे लोक आहेत. प्रांताचे अध्यक्ष आहेत, तालुक्यांचे अध्यक्ष आहेत, असेंब्लीचे सभासद वगैरे पुष्कळ अधिकारी लोक आहेत. त्यांच्यापासून पुष्कळ घेण्यासारखें आहे. माझ्या लक्षांत एक गोष्ट आली कीं, या सर्व समाजाला एकत्र राहावयाचें तर त्यांच्यांत कांहीं सामुदायिक भावना निर्माण करावयास हवी. सामुदायिक भावना निर्माण करण्याकरतां मला तकली साधन रामबाण वाटतें. या गोष्टीचा अनुभव जेलमध्यें पुष्कळ लोकांना आला. माझें जेव्हां सुटावयाचें ठरलें तेव्हां मंडळींनीं ठरविलें कीं, उद्यां रोजच्या अर्ध्या तासाऐवजीं एक तास कांतावयाचें आणि तें सूत विनोबांना द्यावयाचें. काल मी सुटायच्या वेळीं सर्व लोक एकत्र आले होतें. त्यांनीं प्रेमाची संज्ञा म्हणून तें सूत दिलें आहे. ही समुदाय-भावना आहे. एप्रिलच्या ६ किंवा १३ कोणत्या तरी एका तारखेला कांहीं मंडळींनीं २४ तास अखंड सूत कांतलें. त्यांत विशेष गोष्ट ही होती कीं दोन माणसांनीं अखंड २४ तास दोन तकल्या चालविल्या. असला प्रयोग आपल्या येथें आतांपर्यंत केला गेला नव्हता. तो तेथें झाला. त्यापैकीं एकानें २४ तासांत २१ लटी कांतल्या. तासांत एक लट पडली असती तर गति बरी पडली असें म्हटलें असतें. कांतणारानें दोन्ही पायांनीं सूत कांतले. त्याला थकवा तर आला होता च. पण तो मुख्यतः बसण्याचा होता. हात किंवा पोटरी दुखली असा नव्हता. यानंतर येथील मंडळींना कांहीं गोष्टी सांगावयाच्या आहेत. माझें

अनुक्रमणिका

लक्ष खांडण विंचरणाच्या प्रयोगाकडे लागून राहिलें आहे. त्यासंबंधीं मी लेख हि लिहिला होता आणि त्यांत सूचित केले होतें कीं मंडळींनीं या संबंधीचे आपले अनुभव मला कळवावें. परंतु त्यासंबंधीं कोणाकडून माझ्याकडे कांहीं आलें नाहीं. मीं जेलमध्ये खांडणविंचरण सुरू केलें. परंतु माझ्या बोटांच्या घामाच्या अडचणीमुळें तो प्रयोग बंद करावा लागला. तरी पण जो कांही अनुभव आला त्यावरून विचार करतां सर्व क्रिया करून एका घंट्यांत एक लट होण्यास हरकत नाहीं. त्या क्रियेंत अपार शक्ति आहे. त्यासाठीं आपल्या येथल्या बऱ्या च मंडळींनीं रोज नियमानें अर्धा तास घालविणें उपयोगाचें होईल. आपल्या मंडळींनीं आपल्या जीवनाच्या तत्त्वांचा अभ्यास केला पाहिजे. आपल्या येथील मंडळींना आपल्या सर्व तत्त्वज्ञानाची माहिती असावयास पाहिजे. खादी-शास्त्राच्या ज्या परीक्षा निघाल्या आहेत त्या तर द्याव्या च. शिवाय आपल्या येथील सर्वांकडून ग्रामोद्योग, खादी वगैरे तत्त्वांचा अभ्यास झाला पाहिजे. आपल्या मंडळींत हिंदु-मुसलमान ही भावना नाहीं. पण आपल्या मनांत तशी भावना नाहीं म्हणून आतां आपल्याला कांहीं करावयाचें नाहीं असें नाहीं. आज सर्वत्र जे दंगेधोपे होऊन राहिले आहेत त्यांत प्राणहुति देण्याची पाळी आली तर खुशाल प्राण सोडतां यावे अशी आपली तयारी पाहिजे. या यादवींत प्राण देण्याची आपल्यावर पाळी आली तर तो शुभमुहूर्त वाटला पाहिजे. आपलें प्रेम उत्कर्षाला पोंचलें असेल तर च आपण तसें करूं शकूं. प्रेमाच्या अभावीं असें होणार नाहीं. एकमेकांविषयींचें प्रेम परिपूर्ण आणि उत्कट असलें पाहिजे. आत्तां च आपण रामायणांत असें वाचलें कीं, रामचंद्र जटायूला सांगून राहिले आहेत कीं, “बा जटायू! तुझ्या पुण्यानें च तुला गति मिळाली आहे. जे परहितांविषयीं नेहमीं तत्पर असतात त्यांना या जगांत दुर्लभ असें कांहीं च नाहीं.” आपल्या चित्तांत कोणत्या हि प्रकारचा भेदभाव नसला पाहिजे. तर च आपण कसोटीला टिकूं. येथें प्रार्थना उत्तम होऊन राहिली आहे. पण शेवटीं जी सूतनोंद होते त्यांत सर्वांचीं नांवें दिसत नाहींत. तीं नावें असावयास पाहिजेत. या बाबतींत पाश्चात्य राष्ट्रांचा दाखला घेण्यासारखा आहे. ३०—३० लाख माणसें दोन्ही बाजूला लढून राहिलीं आहेत. केवढी त्यांची रचना-शक्ति. किती अफाट व्यवस्था! शत्रूच्या हातांत आपली मालमत्ता पडूं नये म्हणून आपलें ठिकाण सोडून जातांना मालमत्ता जाळून टाकतात. त्यांत त्यांची अपार सहनशक्ति आहे. या सर्व कृतींत द्वेष, हिंसा पुरेपूर आहे. पण त्याबरोबर च त्याग व व्यवस्थाशक्ति हि आहे. लढाईंत जीं जीं ठिकाणें जिंकीत जातात त्या ठिकाणीं त्यांना आपल्याबरोबर वीज, रेल्वे, पाणी, अन्न, सर्व कांहीं घेऊन जावें लागतें. ही त्यांची रचनाशक्ति आपल्यांत यावयास पाहिजे. आणि आपल्याला ती सहज असावयास पाहिजे. या आपल्या सूत-नोंदण्याच्या लहानशा क्रियेंत आपल्या जिवंत श्रद्धेचा अंश ओतला पाहिजे. आतां पहा ना, मला जर हें वळण लागलें नसतें तर मी जेलमध्यें जाऊन काय करूं शकलों असतों? आज जेलमध्यें जी प्रेमाची गांठ दिसून राहिली आहे ती एरवी दिसली नसती. तेथें एकूण ६५ चरखासंघाचे सभासद महिन्यांत हजार वार सूत देणारे झाले. हा सर्व परिणाम कशाचा आहे? आतां हें सर्व किती दिवस टिकेल तें एका परमेश्वराला च माहीत. परंतु आपण जेथें जेथें जाऊं तेथें तेथें असें वातावरण आपल्याभोवती निर्माण झालें पाहिजे. सूर्य जेथें जेथें जातों तेथें तेथें आपले किरण तो आपल्या बरोबर च घेऊन जातो.”

१४ जुलै १९४१—सायंकाळी नालवाडीला युद्धविरोधी भाषण.
१५ जुलै १९४१—वर्धा जेलमध्ये खटला.
१६ जुलै १९४१—१ वर्ष साध्या कैदेची शिक्षा.

आचार्यांच्या तृतीय सत्याग्रहाच्या वेळीं सरकारनें तडकाफडकीं निकाल केला. सुटल्यापासून प्रत्येक वेळीं ७२ तासांच्या आंत आचार्यांनीं सत्याग्रह केला होता. सत्याग्रह करण्याला इतका हि वेळ न लागता. पण नागपूर जेल ते वर्ध्यापर्यंतचा प्रवास, बापूजींशीं सल्लामसलत, इतका वेळ लागण्याचीं अपरिहार्य अशीं कारणें

अनुक्रमणिका

होतीं. वास्तविक जेलमधून सुटल्याबरोबर तत्क्षणीं सत्याग्रहाला सुरवात करावी असें आचार्यांचें या वेळीं या बाबत स्पष्ट धोरण होते.

१६ जुलै १९४१ ला आचार्यांना एक वर्ष सजा झाला खरा. परंतु जेलमध्यें १ वर्ष रहावें लागलें नाहीं. ४ डिसेंबर १९४१ ला च नागपूर जेलमधून आचार्यांचीं सुटका झाली. कारण सरकारनें कोणतें हि धोरण बदलल्याचें दर्शविलें नाहीं तरी सत्याग्रहींचा बिनशर्त सुटका केली. युद्धपरिस्थिति उत्तरोत्तर बदलत चालली होतीं. जपान, अमेरिका युद्धांत सामील झाल्यानें युद्ध जगभर पसरलें. सिंगापूर ब्रम्हदेशचा जपाननें हां हां म्हणतां ताबा घेतला. जर्मनी हि रशियावर तुटून पडून त्याचा फन्ना पाडतो असें दिसूं लागलें. हिंदुस्थानचें संरक्षण अशक्य च आहे अशी परिस्थिती इंग्रजांना स्पष्ट दिसून आली. त्यामुळें चर्चिलसारखे हिंदुस्थानचे विरोधी आणि साम्राज्याचे महामेरु हि डळमळले. हिंदुस्थानशीं म्हणजे कॉंग्रेसशीं कशी तरी तडजोड करावी अशा मनस्थितींत पुढें सर स्ट्रॅफर्ड क्रिप्स यांना कॉंग्रेसशीं वाटाघाटी करण्याला हि पाठविले. त्यामुळें व्यक्तिगत सत्याग्रह पुढें चालविण्यांत आला नाहीं.

या वैयक्तिक सत्याग्रहाच्या १ वर्षाच्या लढ्यांत २०/२५ हजार माणसें जेलमध्यें गेलीं. एक प्रकारें हिंदुस्थान आचार्यांना ओळखूं लागला. तरी आचार्यांची खरी ओळख मध्यप्रांताला च झाली असें म्हटलें पाहिजे. कारण मध्यप्रांतांतले बहुतेक सर्व नामवंत कार्यकर्ते आणि सार्वजनिक जीवनांतलें प्रतिष्ठित लोक वैयक्तिक सत्याग्रहांत आचार्यांबरोबर जेलमध्यें होतें. १९२१ पासून वर्ध्याला आश्रम स्थापन झाला होता. आणि आचार्य तेथें रहात होतें. परंतु आचार्यांची खरी ओळख मध्यप्रांतांतल्या सर्व कार्यकर्त्यांना पटलेली नव्हतीं. १९३२ च्या जेलमध्यें नाशिक आणि खानदेशच्या कार्यकर्त्यांना आचार्यांची जशी अगदीं पक्की ओळख पटली तशी च स्थिति या वेळीं मध्यप्रांतांतल्या कार्यकर्त्यांची झाली. बहुतेक कार्यकर्ते आचार्यांकडे आकर्षित झाले. प्रथम सत्याग्रही ही निवड पूर्ण सार्थ आहे याची येथल्या प्रत्येकाला खात्री पटली. इतकें च काय पण इतके दिवस ही ओळख पटूं शकली नाहीं याची कित्येकांना हळहळ वाटूं लागली. जेलमध्यें रात्रंदिवस या कार्यकर्त्यांसमेत राहिल्यामुळें आचार्यांना हि सर्वांची नीट कल्पना येऊं शकली. आचार्यांची ओळख आधीं व्हावयाची नाहीं आणि एकदां झाली तर जन्मभर ती टिकावयाची असा विलक्षण योगायोग येथें हि दिसून आला.

मोठमोठे नामवंत पुढारी आचार्यांपुढें जेलमध्यें अतिनम्रभावानें बसत आणि अनेक विषयांवरचे त्यांचे बहुमोल विचार ऐकत. वऱ्हाडचे प्रसिद्ध ब्रिजलाल बियाणीजी यांनीं आचार्यांकडून स्वराज्यविषयक मूलभूत विचार ऐकले व आचार्यांचे लेखक बनून त्यांचें "स्वराज्यशास्त्र" हे अद्‌भुत पुस्तक बाहेर आले. हिंद-स्वराज्यानंतर या विषयावरचे इतके मौलिक पुस्तक दुसरें दाखवितां येणार नाहीं; असें काकासाहेब कालेलकरांनीं हि याचें महत्त्व सर्वोदय मासिकांत नमूद केलें आहे. ब्रिजलालजींनीं जमनालालजींच्या सांगण्यावरून हिंदीमध्यें आचार्यांचें एक संक्षिप्त चरित्र हि टाइप करून तयार केलें तें प्रसिद्ध मात्र झालें नाहीं. एकनाथांच्या भजनांच्या प्रस्तावनेच्या शेवटीं आचार्यांनीं लिहिलें आहे. "वेगवेगळ्या वेळीं वेगवेगळीं वचनें उपयोगी पडतात. आज जेलमध्यें मला ह्या संग्रहांतील खालील वचन काम देत आहे.

**भक्तिज्ञानाविरहित गोष्टी इतरा न कराव्या ।**
**प्रेमभरें बा वैराग्याच्या युक्ति विवराव्या ॥**

अनुक्रमणिका

भक्तिज्ञानवैराग्याला मूलभूत जीं एकादशव्रतें त्यांतील सत्य, अहिंसा, ब्रह्मचर्य अस्वाद, अस्तेय या पांच व्रतांचें आचार्यांनीं अभंगांत रूपांतर केलें आहे. त्यामुळें तीं “अभंग-व्रतें” झाली. ग्रामसेवावृत्तांत तीं त्या वेळीं क्रमानें छापलीं जाऊन नंतर त्यांचें पुस्तक हि प्रकाशित केलें गेलें. बापूजींनीं “मंगलप्रभात” या पुस्तकांत व्रतांचें जे स्पष्टिकरण केलें होतें त्याचें हें पद्यस्वरूप होतें. या व्रतामुळें च आचार्यांना बापूजींच्या आश्रमाचें आकर्षण वाटलें होतें. या व्रतांच्या सूक्ष्म नि सूक्ष्म अभ्यासांत त्यांचीं वर्षानुवर्षें गेलीं होतीं. तेव्हां आचार्यांनीं या व्रतांना अभंग स्वरूप दिलें ही क्रमप्राप्त च गोष्ट झाली.

अशा प्रकारें सर्व हिंदुस्थानासाठीं स्वराज्यशास्त्र, साधकांसाठीं अभंग-व्रतें, नाथ, ज्ञानदेवांचीं भजनें अशा बहुमोल कृती तयार होऊं शकल्या. त्याशिवाय आचार्यांनीं जेलमध्यें जे विधायक कार्यक्रमाचें चिंतन केलें त्याचा हि लाभ वेळोवेळीं ग्रामसेवावृत्तांतील लेखांच्या द्वारें, भाषण संभाषणातून अनेक लोकांना मिळाला आणि हा व्यक्तिगत सत्याग्रह येथें समाप्त झाला.

●●●

अनुक्रमणिका

# प्रकरण ६३ वें

## मद्रासकडील दौरा

(२५ डिसेंबर १९४१ सायंकाळ ते ५ जानेवारी १९४२ सायंकाळपर्यंत)

**व्यक्तिगत** सत्याग्रह स्थगित झाल्याबरोबर म्हणजे तो प्रश्न काँग्रेस वर्किंग कमिटींत विचारांधीन असतांना च दक्षिण भारत हिंदीप्रचार सभेचा ११ वा पदवीदान समारंभ आचार्यांच्या हस्ते करवावा व त्या समारंभाचे अध्यक्षस्थान आचार्यांनीं विभूषित करावे या उद्देशानें त्या सभेचे मंत्री श्री. सत्यनारायणजी पवनारला आचार्यांकडे बापूजींची आगाऊ च अनुज्ञा घेऊन आले. त्यामुळें आचार्यांनीं ती गोष्ट स्वीकारली. आचार्यांबरोबर त्यांचे दोन विद्यार्थी सेवक होते. त्या दोघांनीं त्या वेळीं आचार्यांच्या दौऱ्याची हकीकत पत्रद्वारें कळविली होती. ती येणेंप्रमाणें—

प्रिय बंधूंनों,

पूज्य विनोबांची येथील प्रवासाची हकीकत जाणण्याला आपण सर्व मंडळी उत्सुक असणार च हें सर्व ओळखून वेळांत वेळ काढून पत्र लिहिलें आहे.

आम्ही तारीख २५ डिसेंबर १९४१ ला सायंकाळी ६—३५ ला ग्रँड ट्रंक एक्सप्रेसनें निघालों. तिसरा वर्ग. गाडींत गर्दी होती हें पोंचवावयाला आलेल्या मंडळींना माहीत च आहे. जवळ जवळ तशी च गर्दी शेवटपर्यंत राहिली. डबा रंगरुटांनीं व्यापला होता. शिवाय गाडींत तिसऱ्या वर्गाचे डबे च कमी. त्यांत पुन्हा धूम्रपानाचा त्रास. रात्रीं १० च्या सुमारास विनोबांच्या शेजारी बसलेला माणूस पेंगत पेंगत विनोबांच्या मांडीवर डोकें टकून झोपून गेला. थोड्या वेळानें शेजारीं बसलेल्या कांहीं गृहस्थांच्या हें लक्षांत आलें. त्यांनीं त्याला उठविलें आणि मूर्खा, तुला इतकें हि कळत नाहीं काय वगैरे गोष्टी सुनवल्या. विनोबांनीं त्या गृहस्थांना तसें न करण्याविषयीं आणि झोपलेल्या माणसांला झोपूं देण्याविषयी सुचविलें. पण लोकांच्या रागावण्यामुळें तो माणूस बाजूला डोकें टेकून निजला. विनोबा मधून मधून झोपण्याचा प्रयत्न करीत होते. पण मिनिटा मिनिटानें त्याच्या अंगाला कोणाचा तरी स्पर्श, धक्का हिस्का लागावयाचा आणि प्रयत्नांत अडथळा व्हावयाचा. हे सर्व दूर संडासाजवळ, सामानाच्या गर्दींत रंगरूटांमध्यें उभा राहून पहात होतों. अर्थात् दुसरा कांहीं इलाज नव्हता. विनोबांना झोपायला जागा मिळवून देणें कांहीं कठीण नव्हतें. पण त्यासाठीं इतरांना सांगून खटपट करण्याला विनोबांची संमति नव्हती. चांद्याच्या स्टेशनवर डब्यांतील एक दोन माणसें उतरल्यानंतर सर्व सामानाचे डाग मोजून घेतले. आणि त्यांची जागा हि लक्षांत घेतलीं. विनोबांना पांघरण्याला एक ऐंडी दिली. पण तिचा फारसा उपयोग झाला नाहीं. कुंदरजींनीं सगळी रात्र उघड्यानें च काढली. मी जाकीट घालून बसलों होतों. थंडी फारशी नव्हती. धूम्रपानामुळें डब्यांत उकडण्याइतकी जरी नाही तरी थंडी न वाजण्याइतकी उष्णता होती. रंगरूटशिपाई मधून मधून गडबड गोंधळ करीत तेव्हां त्यांना दाटून बाचाबाची करून दाबून ठेवावें लागे. डब्यांत सगळे लांबचे प्रवासी होते. आमच्याजवळ असलेल्या पाण्याच्या खुजावर सगळ्या लोकांची धूम होती. जो तो पाणी मागायचा. पाणी संपलें कीं स्टेशनवरून पाणी भरून आणीत असूं. बल्लारशाच्यापुढें निजाम स्टेटमध्यें ग्रँड ट्रंक साध्या पॅसेंजर गाडीप्रमाणे प्रत्येक स्टेशनवर थांबत जात होती. निजाम स्टेटच्या स्टेशनावर पाण्याची नीटशीं व्यवस्था

दिसली नाहीं. पहाटे पहाटे एका शिपायाच्या अंगावर अंग रेटून सुमारें एक तास झोपलों. सकाळीं ६ च्या सुमाराला डोणाकल स्टेशन लागलें. या वेळीं बाहेर दिसूं लागलें होतें. कुंदरजींनीं शौचमुखमार्जन करून डब्यांतील पायखाना स्वच्छ धुवून काढला. नंतर विनोबांनीं शौचमुखमार्जन करून कांहीं वेळानें दह्याचा नास्ता केला. आम्ही दोघांनी हि केळीं खाल्लीं. विनोबा म्हणाले तूं निदान बारा केळीं तरी नास्ता केला पाहिजेस. मीं आश्चर्य प्रकट केलें. तेव्हां म्हणाले बारा केळीं म्हणजे फार नाहींत. बारा केळीं म्हणजे ३६० उष्णांक होतात. या वेळीं बाहेर चें दृश्य बरेंचसें नवीन भासलें. विशेष म्हणजे श्वेतकमलें आणि ताडांची बनें. स्टेशनाचीं नांवे इंग्रजी; तेलगू व उर्दू लिपींत. विनोबांनीं तेलगू लिपि उलगडून दाखविली. ती एक मौज होती. रेल्वे लाईनच्या बाजूनीं आपल्याकडे पाहायला न मिळणारीं अशीं तुरीचीं, तंबाखूचीं आणि सरकूंची (सरकू हें एक बाभळीप्रमाणें जळाऊ लाकूड देणारें झाड आहे) शेतें दिसलीं. मध्यंतरी विनोबा कांहीं वाचीत होते. इतक्यांत एका स्टेशनवर कोकटीं रंगाचीं वस्त्रें, हातांत थैला, डोक्यावर लांब भारदस्त शेंडी असा एक माणूस आमच्या डब्यांत डोकावला. मी एकदम ओरडलो— 'सूर्यनारायणजी आले'! विनोबांनीं हि त्यांच्याकडे पाहिलें. सूर्यनारायणजींना डब्यांत घेतलें. सूर्यनारायणजी आम्हाला घेण्यासाठीं तेनालीहून मद्रास-कलकत्ता मेलनें पुढील स्टेशनावर जाण्यासाठीं निघाले होते. त्यांनी नास्ता आणला होता. पण विनोबांचा आणि आमचा नास्ता आगाऊ च आटोपल्यामुळें त्यांनी आणलेल्या नास्त्याची गरज पडली नाहीं. विनोबांशी कांहीं वेळ सूर्यनारायणजींचें बोलणें झालें. नंतर विनोबा मद्रासचे मुख्य प्रसिद्ध वर्तमानपत्र "हिंदू" वाचूं लागले. इकडे आम्ही सूर्यनारायणजींशीं बोलूं लागलों. ते म्हणाले— "विनोबा पूर्वी आपले होते. पण आतां आपलें असून सर्व हिंदुस्थानचे झाले आहेत. त्यांनीं दोन दिवस राहावें अशी माझी इच्छा होती. पण मी त्यांना तसें कसें सांगूं?" मीं म्हटलें "ते सगळ्या हिंदुस्थानचे तर असतील पण 'आपले' मुख्य आहेत. आपण जरूर असल्यास त्यांना सांगू शकतो." ते म्हणाले— "विनोबाजींच्या स्वागताची जंगी तयारी करणार होतो. पण तुमचे पत्र आलें की, तेनालीला विनोबा घर म्हणून राहिले आहेत. सार्वजनिक कार्यक्रम फारसा ठेवावयाचा नाहीं. म्हणून मी मित्रांशिवाय इतर लोकांना जाहींर केलें नाहीं." अशा प्रकारें गोष्टी झाल्या. नंतर बेझवाडा स्टेशन आलें. बेझवाड्याला विनोबा गाडीखालीं उतरले. शेकडों कार्यकर्ते स्वागतासाठीं आले होतें. एका वर्तमानपत्राच्या प्रतिनिधींनें मला विचारलें कीं, "विनोबांचें कांहीं स्टेटमेंट आहे काय?" मीं त्याला सांगितले कीं, "कोणत्या हि प्रकारच्या प्रत्यक्ष राजकीय कार्यक्रमासाठीं विनोबाजी आले नसून विधायक कार्यक्रमांतील एक अंग असलेल्या राष्ट्रभाषेचा प्रचार करणाऱ्या दक्षिणभारत हिंदी प्रचार सभेच्या फंक्शनमध्यें भाग घेण्यासाठीं आलेले आहेत." बेझवाड्याहून कांहीं कार्यकर्ते आमच्याबरोबर तेनालीला आले. कांहीं मंडळींनीं विनोबांकडून पत्रद्वारे वेळ मागून घेतला होता. त्यांच्याशीं विनोबांनी बोलणें केलें. बेझवाड्याहून तेनालीला येतांना मध्यें कृष्णानदीचा सुमारें मैलभर लांब पूल लागतो. त्या ठिकाणीं बरेंच रमणीय दृश्य दिसतें. पिकांना पाणी कालव्याच्या द्वारे देण्यांत येते. ९॥ वाजतां तेनालीं स्टेशन आलें. दहाबारा स्वयंसेवकांनी आमचें सामान डब्यातून काढलें. स्टेशनवर शेकडों लोक आणि स्टेशनच्या बाहेर हजारों लोक जमलें होतें. विनोबांचें स्वागत करण्यांत आलें. विनोबा, सूर्यनारायणजी, कुंदरजी वगैरे सर्व मोटारींतून सूर्यनारायणजींच्या घरी गेले. मी सगळें सामान गाड्यांत भरून आलों. सामान बरेंच होतें. त्यामुळें मोठ्या काळजीनें रहावे लागे. तेनाली तालुका असल्यामुळें मोठें शहर आहे. गांवांत लोकांचे थवेच्या थवे स्टेशनावरून घराकडे परत चालले आहेत. विनोबा बंगल्यावर येऊन पोचलें. विनोबा कार्यकर्त्यांशीं बोलण्यांत गुंतलें. मी भोजनाच्या व्यवस्थेंत च राहिलों. ११॥ वाजतां भोजनाला गेलों. भोजनाच्या प्रसंगी भंगी, मुसलमान, ब्राह्मण, ब्राह्मणेतर इत्यादि सर्व जातीचे लोक होते. अर्थात् अशा प्रकारची योजना मुद्दामहून करण्यांत आली होतीं. येथे च मी थोडा सूर्यनारायणजींचा परिचय करून देतो.—डॉ. सूर्यनारायणजी हे डोळ्यांचे खास तज्ञ डॉक्टर आहेत. पू. विनोबांची सूर्यनारायणजींशीं १९३६ सालीं ची भेट. या भेटींने सूर्यनारायणजींच्या जीवनांत पूर्ण परिवर्तन झालें. मोतीबिंदूसारख्या कठिण नेत्ररोगाच्या

शस्त्रक्रिया—ज्यांसाठी इतर तज्ञ शेंदोनशें रुपयें घेतात—सूर्यनारायणजी ८/१० रुपयांत या अल्प मोबदल्यांत करून देतात. अशा प्रकारें त्यांनीं शेकडों लोकांना उपकृत केलें आहे. त्यांचें घर आश्रम बनला आहें. त्यांनी स्वतःच्या घराला आश्रम म्हणून च नांव ठेवलें आहे. आश्रमांत लहानमोठे मिळून १०/११ सभासद आहेत. सूर्यनारायणजी हिंदी जाणतात. बाकी आश्रमांत हिंदी जाणणारे कोणी नाहींत. त्यांच्या पत्नी गुणसुंदरी यांना थोडें हिंदी समजते. आश्रमांतील एका मुलाला सूर्यनारायणजींनी विनोबा असें नांव ठेवलें आहे. आश्रमांत आहार सेवाग्रामच्या आहारासारखाच आहे. पू. विनोबांनी त्यांच्या आश्रमांचाच आहार घेतला. आश्रमांत दुसरा आहार बनत नाहीं. तारीख २६ ला दुपारी ४॥ वाजतां आश्रमांत सभा झाली. सुमारे ४०० श्रोतृसमुदाय होता. विनोबांचें भाषण हिंदींत झालें. त्यांचें भाषांतर सूर्यनारायणजी करीत होते भाषणांत हिंदुमुस्लिम ऐक्य, हिंदी प्रचार, अस्पृश्यता निवारण आणि खादी ग्रामोद्योग हे चार मुद्दे होते. सायंकाळीं मुसलमान समाजास भेट दिली. तेथें डॉ. अब्दुल गझननीं, कडून फातेहा श्रवण केलें. आणि मुसलमानांना दोन शब्द सांगितले. सायंकाळीं १ मैल फिरून आल्यावर भोजन, प्रार्थना वगैरे कार्यक्रम होऊन सुमारें ९ वाजतां आम्हीं मंडळीं झोपलों. प्रार्थना तेलगूमध्यें झाली. फिरतांना गांवांतील १०० मोठमोठी मंडळी आली होती. तारीख २७ ला सकाळी ४॥ ला प्रार्थना झालीं. प्रार्थना आणि गीतापठण तेलगूमध्यें झालें. सकाळीं तेनालींतील हिंदी ट्रेनिंग कॉलेज, ग्रामोद्योग शाळा, कुटीरशिल्प, नीलकालशाई कारखाना इत्यादि संस्थांना भेटी दिल्या. आणि ९ वाजतां आम्ही मद्रासला जाण्यासाठीं ग्रँड ट्रंकनें निघालों. ग्रँडट्रंकमध्यें बसायला जागा बरी मिळालीं. वर्तमानपत्रांतून पू. विनोबांच्या आगमनाची वार्ता इकडे सगळीकडे पसरली होती. तेनालीनंतर प्रत्येक स्टेशनवर विनोबांच्या दर्शनासाठीं लोकांची गर्दी जमत होतीं. सगळ्यांच्या तोंडांत एकच शब्द! तो म्हणजे फर्स्ट सत्याग्रही विनोबा भावे. ११॥ वाजतां विनोबांचे जेवण झालें. १२॥ वाजतां विनोबा झोपले. गाडींत प्रत्येक जण विनोबांची झोप मोडू नयें म्हणून आणि त्यांना कोणत्या हि प्रकारें त्रास होऊ नये ह्याची काळजी घेत होता. विनोबांनी रेल्वेमध्यें त्यांच्या राजनितिविषयक लिखाणाचें अवलोकन केलें. नेलूर स्टेशनवर कांहीं सत्याग्रही जमलें होतें. त्यांत एकाने विनोबांचे हस्ताक्षर मागितलें. तेंव्हां विनोबा म्हणाले कीं, युरोपमधून उसन्या घेतलेल्या पुष्कळश्या वस्तूंतींल ही एक वस्तु आहे. असें म्हणून त्यांनी हस्ताक्षर देणें त्यांनी नाकारलें. नंतर रस्त्यांत कांही बाया तेलगू भजन गात होत्या. त्यांचे भजन सुमारे तासभर ऐकलें. सायंकाळीं ६॥ वाजतां मद्रास सेंट्रल स्टेशनवर आम्हीं येऊन पोंचलों. तेथें स्टेशनवर आणि स्टेशन बाहेर हजारो लोक जमले होते. राष्ट्रीय कार्यकर्ते आणि विद्यार्थी वर्ग बरा च होता. येथें च युवकसंघानें पू. विनोबांना मानपत्र अर्पण केले. त्यांत कित्येक रेल्वे कामगार हि सामील होते. लोकांचा उत्साह अलोट होता. मोटरनें त्यागरायनगर गांठलें. आमच्यासाठी सभेच्या वसाहतींत एका कोपऱ्यांत एक छानशीं झोपडी बांधली होती. स्थान रम्य वाटलें. रात्री ९·३० ला झोपलो. ता. २८ ला सकाळीं स्नान, नास्ता वगैरे झाल्यावर ८ ते ९·३० पर्यंत दक्षिण भारत हिंदी प्रचार सभेच्या कार्यकर्त्यांचे संमेलन झालें. ८ ला सभेचे सर्व कार्यकर्ते पू. विनोबांकडे जमले. त्यांनीं आपापल्या प्रांतांतील—तामिलनाड, केरळ, कर्नाटक, आंध्र आणि मद्रास शहर—येथील कार्याचा व्यवस्थित परिचय दिला. सन १९१८ पासून ही संस्था कार्य करीत आहे. हिचे १,२०० प्रचारक असून ते दोन हजारांहून अधिक केंद्रांत काम करीत आहेत. परीक्षाकेंद्रें ६०० आहेत. स्नातक सुमारें १,५०० असून आजपर्यंत लाखाहून अधिक लोक परीक्षेस बसले आहेत. स्त्रियांना हिंदीची विशेष गोडी आहे. लाखो स्त्रीपुरुष कामचलाऊ हिंदी शिकले आहेत. ठिकठिकाणीं हिंदी दुभाष्यें तर मिळतात च. समजणारे हि पुष्कळ आढळून येतांत. १०·३० वाजतां विनोबांनी प्रदर्शनाचें उद्‌घाटन केलें. ११·३० वाजतां भोजन वगैरे. ४·३० वाजतां पदवीदान झालें. समाज विशाल होता. वातावरणांत उत्साह आणि गांभीर्य दिसत होते. प्रथम हिरवा रूमाल खांद्यावर घेतलेल्या स्नातकांची मिरवणूक सभास्थानीं आलीं. मिरवणुकीचा पुढाकार विनोबांकडे होता. आचार्यकृत प्राचीन समावर्तनविधीचा हा आधुनिक प्रकार आहे. सर्वजण स्थानापन्न झाल्यावर “जय जय प्यारा भारत देश” हें

अनुक्रमणिका

मंगलगायन गाइलें गेलें. त्यानंतर सभेच्या कार्यास आरंभ झाला. मंत्र्यांनी आपली निवेदनें सादर केलीं. तदनंतर स्नातकस्नातिकांकडून आचार्यांनी म्हणजे विनोबांनी प्रतिज्ञा वदविली, प्रमाणपत्रें वितरण केलीं, यशोभाजन (रजतपात्र) पात्राच्या स्वाधीन केलें आणि दीक्षांतींचें अनुशासनरूप भाषण केलें. विनोबांनीं अर्थात च नेहमींच्या रीतीप्रमाणें लिखीत भाषण दिलें नाहीं. व्याख्यान सुमारें दीड तास झालें. सर्वत्र परिपूर्ण शांति होती. शेवटीं शेवटीं भाषा आणि भाव कडीवर कडी करीत कळसास पोचला. भाषणानंतर भेटीस येणाऱ्या लोकांची विनोबांच्या झोपडींत रीघ लागलीं. भेटीस आलेल्यांत तामिळ भाषेचे साहित्यसेवक हि होते. ते तकरार करीत होते कीं, शिक्षित लोक तमिळची अवहेलना करतात. तमिळ गायनाला मजलशींत स्थान नाहीं. त्यानंतर त्यांनी तमिळ साहित्यांची थोडी थोरवी सांगितली. थोडें कंबरामायण म्हणून दाखविलें आणि निरोप घेतला. कांहीं लोक विनोबांचे हस्ताक्षर मागत तेंव्हां विनोबा त्यांना सांगत “नो ऑटोग्राफ, नो फोटोग्राफ” तथापि कांहीं लोकांना विनोबांनी सही दिली. एका लहान मुलानें पेन्सिलींने ५ मिनिटांत विनोबांचे एक रेखाचित्र काढलें. त्यावर विनोबांनी त्याला सही दिलीं. त्या सहीच्या कागदाबद्दल एका व्यापाऱ्याने त्या मुलाला २० रुपये दिले. ता. २९ ला सकाळीं स्थानिक रामकृष्णमिशनचे लोक भेटीस आले होते. त्यांच्या कार्याची माहिती ऐकली. विद्यालयांत त्यांनी आतां मिलचें सूत सोडून हातसुताचें विणकाम करायला पाहिजे अशी वेळ आली आहे. मिलचे सूत फुकट मिळत असलें तरी तें सोडून हातचें काढायला पाहिजे आणि त्याचें च विणकाम केलें पाहिजे त्यांत च पुरुषार्थ आहे इत्यादि सांगून त्यांना निरोप दिला. त्यानंतर अड्यारला स्व. ॲनी बेझंटची संस्था आहे ती पहायला गेलों. तेथें फारसें कांहीं पाहिलें नाहीं. पुस्तक विक्रीच्या विभागातून एक पुस्तक विकत घेतलें आणि एक सुंदर वडाचें झाड पाहिलें. त्या वडाचें वैशिष्ट्य हें की, त्याला जीं नवीन मुळे फुटली होतीं, त्यांना पाणी देऊन एकच झाड पण अशा अशा रीतींनें खूप विस्तृत केलें आहें. त्या वडामुळें विनोबांना समाधान वाटलें. त्यांना त्यांत पुष्कळ आध्यात्मिक गोष्टी आढळल्या, असें दिसलें. आम्ही अन्य गोष्टी पहायला सांगितले तेव्हां विनोबा म्हणाले अजबघरांत प्रत्येक वस्तू पाहूंन हें काय तें काय म्हणून विचारलें तरी चालतें. अशा धार्मिक जागेत नुसतें फिरून चालतें व्हावें. कारण अशा ठिकाणीं हवेंत धार्मिकता असते, तेवढ्यानें च जो कांहीं फायदा व्हावयाचा तो होऊन जातो. तेथून येतांना समुद्राचे दर्शन घेतलें. भव्य नीलवर्ण गंभीर समुद्र पाहून हर्ष झाला. त्यानंतर आम्हीं हरिजनसेवकसंघातर्फे चाललेली हरिजन शाळा व छात्रालय पहायला गेलों मुलें सुमारे चाळीसेक होतीं. तेथें सुतारी, लोहारी, वेताचें विणकामं, कागदकाम आणि कताई इतके उद्योग चालतात. दोन तास तदुपकारक रेंखनादि शिक्षण दिलें जातें. वैकुंठएकादशीचा दिवस होता. मुलांना उद्देशून विनोबांचे एक छोटेसें सुंदर व्याख्यान झालें. परततांना हरिजनांसाठीं चालविलेल्या एका दवाखान्याला हि भेट दिली. दुपारीं २ ला खास प्रचारकांसाठी एक व्याख्यान झालें. कालच्याप्रमाणें हे हि चांगले १॥ तास रंगलें होतें. खूप परिणामकारक झालें. यांत अहिंसक समाजाची स्थिति कशा प्रकारें होईल तो सर्व कार्यक्रम सविस्तर विवरला गेला. ५ च्या सुमाराला त्यागराज नगरवासियांतर्फे—मुख्यतः विद्यार्थी मंडळातर्फे—विनोबांना मानपत्र अर्पण करण्यांत आले. त्याच्या उत्तरांत विनोबांचे एक भाषण झालें. हा कार्यक्रम संपल्यानंतर भोजनादि आटोपून मद्रास शहराच्या उत्तर भागांत रायपुरम् मध्ये एका जागीं विनोबांनी गांधीजींच्या चित्राचें अनावरण केले. तेथे हि एक मानपत्र देण्यांत आले. उत्तरादाखल चार शब्द बोलून सावकार पेठेंत गुजराथी समाजाला भेट दिली. येथे मानपत्रादिवाचन आणि समाजाचें प्रास्तविक निवेदन झाल्यानंतर विनोबांनी छोटेंसें गुजराथी भाषण केलें. यानंतर आम्हीं सरळ मद्रासच्या इग्मोर स्टेशनवर पोंचलों. गाडीत बसलों आणि चारपांच मिनिटांत गाडी चालूं झाली. गाडींत जागा पुष्कळ होती. सकाळीं ७॥ वाजतां मदुरेला पोंचलों. स्टेशनवर स्थानिक प्रसिद्ध पुढारी वैद्यनाथ अय्यर, शिवरामकृष्ण वकील आणि इतर प्रमुख कार्यकर्ते स्वागतार्थ हजर होते. वैद्यनाथजी अय्यर यांच्या घरीं स्नान वगैरे करून मीनाक्षींचे देऊळ पहायला सुमारें ९॥ वाजतां गेलों. देवळासमोर हजारों लोक होते. संपूर्ण देऊळ सुमारें १॥ तास पाहिलें. देवालयातर्फे

दैवी प्रसादरूप देवीचें दर्शन करविलें. शिरोवस्त्र आणि माळा अर्पण करून विनोबांचा सत्कार करण्यांत आला. देवळांत प्रवेश करण्यांपूर्वीपासून च विनोबा भक्तीनें व हर्षानें भरून गेले होते. मीनाक्षीच्या देवळांत तर सुमारे १५ मिनिटें विनोबांच्या डोळ्यांना अश्रूंची धार च लागली होती. सारखें स्फुंदन चाललें होते. त्यांना देऊळ दाखविणारे मार्गदर्शक तर पहात च राहिले. त्यांचे दाखविणें संपले तरी ही मूर्ति हलत च नाहीं आणि डोळ्यांतून सारखें अश्रू गाळींत आहे, हे पाहून सर्वांना आश्चर्य वाटल्यांवाचून राहिलें नाहीं. पूज्य विनोबाजींची ही स्थिति पाहून अनेक भाविक लोकांच्या आणि त्या बरोबर माझ्या हि डोळ्याला पाझर फुटल्याशिवाय राहिला नाहीं. मित्रांनो, विनोबांच्या ह्या बाह्य स्थितींचें वर्णन मी तुम्हांला लिहिलें. त्यांची आंतरस्थिति काय असेल हें मी कसें लिहूं? मला प्रत्येक क्षणीं चैतन्यमहाप्रभूंची आठवण होई. चैतन्यमहाप्रभू अनेक वेळां देवळांत जाण्यांसाठी निघाले. पण कधीं एक फर्लांग तर कधीं दोन फर्लांग दूर जाऊन भावविवश होऊन हर्षातिरेकानें समाधिस्थ होऊन देहभान विसरून जात. अत्यंत प्रयत्नानें ते देवळाची एक पायरी चढूं लागलें. संतांच्या ह्या दशेची कल्पना आपणास कशी येईल? या देवालयाची विशालता, कल्पकता, शिल्प कौशल्य अपूर्व आहे. मंदिर पाहतां पाहतां ११ झालें. भोजनोत्तर दुपारीं कार्यकर्त्यांची सभा झालीं. सभा आटोपल्यावर मदुरेहून १०-११ मैलांवर सुंदरराजाचें एक सुंदर देवालय अगदीं डोंगराच्या पायथ्याशीं वसलेलें आहे तें पहायला गेलों. मीनाक्षी मंदिरातल्या प्रमाणें येथें हि देवस्थानातर्फे सत्कार झाला. देवळालगत देवस्थानातर्फे कागद बनविणें चालतें. हें काम करणारा आपल्या आंजीला शिकलेला निघाला. येथें हि विनोबांना देवालयातर्फे हारतुतांची शिरोवस्त्रे मिळालीं. ७l ला मद्रासची गाडी गांठायची होती. अवकाश थोडा होता. तरी त्यांतल्या त्यांत सहोदरीसंघ, हिंदीप्रचार संघ, हरिजन्वसतीगृहें इत्यादि संस्थांना भेटी द्याव्या लागल्या. भोजन उरकून स्टेशन गांठले. गाडींत चढलों. ता. ३० संपली. दुसरेंदिवशीं सकाळीं ८ च्या सुमारास मद्रासेंतील महाराष्ट्र भवनास भेट द्यावयाची होती. परंतु आमची गाडी १० ला पोचलीं. स्टेशनहून सरळ भवनाला गेलों. विनोबांचे 'दोन शब्द' झाले. आणि त्यागरायनगरांत मोटरनें आलों. १२-४० ला कावली पॅसेंजर गांठावयाची होती. भोजन श्री. सत्यनारायणजींच्या घरीं आलें. त्यांच्या कुटुंबाचा तसा आग्रह होता. वास्तविक भोजन के. भाष्यम् आयंगार यांच्याकडे व्हावयाचें होतें. अखेर त्यांच्याकडे गेलों. दोन मिनिटे बसलों. बोललों आणि स्टेशन गांठून गाडींत चढलों. स्टेशनास्टेशनावर दर्शनार्थी असावयाचे च. सायंकाळीं ६-४० ला नेल्लोरला पोंचलों श्री. राघवैय्या स्टेशनवर स्वागतास हजर होते. मोटारींत बसून सरळ सभेंस गेलों. सभेचें ठरलें नव्हतें. परंतु आयत्या वेळीं मंजूर केलें येथें सुमारें पाऊण तास विनोबांचें व्याख्यान झालें. व्याख्यानास खूप गर्दी होती. मुसलमान प्रायः कोणी नव्हता. नेलोरला हिंदु मुसलमानांचे दंगे नुकतेच थांबले होते. परंतु वातावरण साफ नव्हतें. ह्या च विषयावर मुख्यतः बोलणें झालें. इतर हि हिंदी, ग्रामोद्योग, इत्यादि विषय आले होते. सभेंत विनोबांना ११६ रुपयांची थैली अर्पण करण्यांत आली. ती तेथील अनादि लोकांच्या कार्यार्थ श्री. राघवैय्या यांच्या स्वाधीन करण्यांत आलीं. घरीं येऊन स्नान, भोजन, प्रार्थना करून झोपलों. झोंपून उठलों तो नवीन वर्ष लागलें होतें. सकाळीं नेलोरमधील अनादिच्छात्रांचे वसतिगृह आणि अनादि लोकांतील कताई पाहिलीं. विनोबांचे लहानसें भाषण झाले. हा कार्यक्रम आटोपल्यावर मोटरनें कावलीला गेलों. सामान आगगाडीनें माणसाबरोबर आगाऊ रवाना केलें होतें. कावलीला १० ला पोंचलों. गेल्याबरोबर सभेंत भाषण झालें. तेथें हि ११६ रु. ची थैली अर्पण करण्यांत आलीं. ती तेथें अनादि लोकांच्या औषधालयार्थ श्री. राघवैय्यांच्या हवाली करण्यांत आली. सभेनंतर कावलीवासी शास्त्रीपंडित आणि मुसलमान मौलवी इत्यादि लोक भेटीस आले होतें. पंडितांनी विनोबांना संस्कृत भाषेंत एक मानपत्र दिलें. मुसलमान गृहस्थ विनोबांना कुराण अवगत आहे हें जाणणारा होता. विनोबांनी त्याच्याकडून "फातेहा" म्हणवून घेतली आणि संथ व मधुर रीतींने कशी म्हणावीं तें स्वतः गाऊन दाखविलें. पंडितांकडून हि ऋग्वेदाचें पहिले सूक्त म्हणवून घेतलें. त्यांत त्यांना थोडे सहाय्य केलें. शास्त्रीमंडळीं संस्कृतबद्दल वाद घालींत होतीं. त्यांना सद्यःस्थितींत हिंदीचे स्थान समजावून सांगितले.

अनुक्रमणिका

संवाद मधून मधून संस्कृतांत झालें. भोजनोत्तर लगे च गाडी गांठावयाची होती. १।—१॥ च्या सुमारास गाडींत चढलो. विनयाश्रमासाठीं नीडब्रोलु स्टेशनवर सायंकाळीं ४॥ ला उतरलों. सीतारामशास्त्री आणि मंडळीं स्टेशनवर हजर च होती. मोटरने १०—११ मैलांवर असलेल्यां कल्याण कावूर गांवी—जेथें विनयाश्रम तालीवनांत वसला आहे—पोंचलों. एक दोन फर्लांग सेवक सेविका दुतर्फा उभ्या होत्या. मंगल तोरणें आणि स्वागतवाक्यें दिसत होतीं. पाद्य आणि आसन ग्रहण केल्यानंतर आश्रमाच्या ६ च्या सायंप्रार्थनेला गेलों प्रार्थनेनंतर विनोबांनी आपली आश्रमाची कल्पना सांगितलीं. त्यांत त्यांनी दोन्ही प्रार्थना, दिवस भराचें काम आणि शेजारच्या गांवची सेवा हीं तीन अंगे तिपाईच्या तीन पायांसारखीं समान महत्त्वाची असल्याचें सांगितलें. प्रवचनानंतर विनोबांच्या हस्तें अखंड ज्योत पाजळण्यांत आली. विनयाश्रमाच्या उत्सवाच्या सप्ताहांत ती तेवत रहावयाची आहे. ह्यानंतर भोजनें झालीं. थोड्या वेळानें निद्रेचा आश्रय घेऊन प्रस्तुत दिवस बंद केला. दुसरें दिवशीं तारीख २ ला कावूर जें ४—५ फर्लांग सडकेपासून दूर आहे—तेथें सायंकाळी ४॥ ला गेलों. विनोबांच्या हस्तें नवीन बांधलेल्यां विनयाश्रमाच्या हरिजन भजनमंदिराचें उद्‌घाटन झालें. विधि समंत्र झाला. ह्या मंदिरांत भारतमातेचें उठावदार चित्र स्थापण्यांत यावयाचे आहें. त्यांत गांधींची मूर्ति हि ठेवणार आहेत. मंदिराचा उपयोग रात्रिशाळेसाठीं व्हावयाचा आहे. सूर्यनारायणजींच्या प्रास्ताविकानंतर विनोबांचे भाषण झालें. भाषणांत विनोबांनीं पंचखांबी ग्रामस्वराज्याचें चित्र रेखाटलें. प्रेम, स्वच्छता, उद्योग, विद्या आणि निर्भयता हे ते पांच खांब आहेत. सभेंत सुमारे ४५० गांवकरी उपस्थित होते. प्रारंभी हरिजन मुलीचे सुंदर गायन झालें. संगीताचें शिक्षण पद्धतशीर आणि सक्तीचें आहे. सभेच्या स्थानीं च आजची सायंप्रार्थना झाली. हा कार्यक्रम आटोपल्यावर मंडळी घरोघर निघून गेलीं. आणि आम्हीं आश्रमांत परतलों. वर्ध्याहून मद्रासकडे जाणाऱ्या ग्रँड ट्रॅकच्या रस्त्यांत निडुब्रोलु स्टेशन आहे. निडुब्रोलुहून १० मैलांवर विनयाश्रम आहे. विनयाश्रमहून समुद्र सुमारे ८ मैल आहे. आश्रमची जमीन ३३ एकर आहे. तींत छोटीशी गोशाळा, शेती, दवाखाना, छापखाना, ढोर-दवाखाना वगैरे कामें चालतात. ८—१० पक्कीं घरे आणि ८—१० कच्च्या झोपड्यां. विनोबा अशा च एका कच्च्या झोपड्यांत उतरले आहेत. आवारांत एक तलाव खणून घेतलां आहे. विनयाश्रमच्या जवळ असलेल्या एका खेड्याला संपूर्ण खादीधारी करण्याचा प्रयत्न चालला आहे. गांवांत १,५०० पैकीं ५०० खादीधारी आहेत. येथें वस्त्रस्वावलंबनाचें कार्य चाललें आहे. निसर्गशोभा बरी आहे. जिकडे तिकडे हिरवेगार गालिचे पसरल्यासारखे दृश्य आहे. सगळा टापू ताडाच्या, नारळाच्या झाडांनी भरलेला आहे. विनयाश्रमाची स्थापना श्री. (गोल्लापुडी) सीतारामशास्त्री यांनी केली असून ते च त्याचे विश्वस्त हि आहेत. आश्रमचे उद्‌घाटन १९३३ सालीं गांधीजींच्या हस्तें झालें. तारीख ३ ला सकाळीं जरदुष्ट्र आणि येशू ह्यांचे पुतळे आश्रमांतून मिरवत कावूर गांवी नेण्यांत आले. आणि तेथील विश्वसंदेशमंदिरांत त्यांची स्थापना करण्यांत आली. पुतळ्यांचे अनावरण विनोबांच्या हस्तें झालें. येथें हि विनोबांचे भाषण झालें. दुपारी २-३० ला आश्रमाच्या मंडपांत सभा झालीं. सर्व स्त्रीपुरुष कांतीत होतें. सुमारे ७०० लोक. त्यांचे कांतणें पाहून झाल्यावर विनोबांचें भाषण झाले. हा कार्यक्रम आटोपतांच मोटरनें निडुब्रोलु स्टेशन गांठले. आणि ग्रँडट्रंक एक्स्प्रेसनें मूलसाठीं रवाना झालों. चांद्याला तारीख ४ ला सकाळी ६ ला पोंचलों. खुशालचंदजी स्टेशनवर घ्यायला आले होतें. त्यांच्याकडें प्रातर्विधी वगैरे आटोपून मोटारनें १० ला मूलला पोचलों. मूलचें कार्य पाहिलें. संध्याकाळीं कार्यकर्त्यांशीं बोलणें झाले. रात्रीं गांवांत विनोबांचे व्याख्यान झालें. दुसरें दिवशीं पॅसेंजरनें चांद्यास आलों. खुशालचंदजीकडे जेवण झाले. चांद्यातील लोकांपुढे एका हायस्कूलच्या माडीवर व्याख्यान झाले. येथून वर्ध्याच्या गाडींत बसलों. ठरल्याप्रमाणें ६ ला वर्धा.

•••

## प्रकरण ६४ वें

## वर्धा-यात्रेचे वीस दिवस

(दैनंदिनींतील त्रुटित उतारे)

**तारीख** १५ जानेवारी १९४२ ते तारीख ५ फेब्रुवारीं १९४२ वीस दिवस वर्ध्याला कोठल्या कोठें निघून गेले. या वीस दिवसांत तेथें किती तरी घडामोडी झाल्या. ऑल इंडिया कॉंग्रेस कमिटी, गोसेवा परिषद, नेत्रयज्ञ या तेथें वीस दिवसांत घडलेल्या सर्वांना माहीत असलेल्या ठळक जाहीर गोष्टी, पण येथें नेहमी अव्याहत किती तरी उलाढाली चालतात. या च वेळीं नव्हे, नेहमीं च वर्धा हें अनेक कार्यांच्या प्रेरणेचें मूलकेंद्र असल्यामुळें कार्यकर्त्यांनीं गजबजून गेलेंलें असावयाचे. जगाला शांति देण्यासाठीं सतत प्रयत्न चालावयाचें. त्यामुळें कार्यकर्त्यांचें, संस्थांचे, योजनांचे येथें ठिकठिकाणीं बागबगीचे च फुललेले दिसावयाचे. दिल्ली शहर शेकडों वर्षें राजधानीचें शहर असल्यामुळें निरनिराळ्या राजांनीं आपापल्या कल्पनेप्रमाणें दिल्ली शहराची निरनिराळ्या तऱ्हेची मांडणी केली. त्यामुळें दिल्लीच्या आसपास २५ मैलपर्यंत जिकडे तिकडे पडलेल्या अनेक शहरांचे अवशेष आढळून येतात. ही महम्मद तघलखची दिल्ली तर ही हुमायनची दिल्ली, ही शहाजहान दिल्ली तर ही इंग्रजांची नवी दिल्ली—असे पाहणाऱ्याला एका च शहराचे अनेक प्रकारचे ऐतिहासिक दर्शन होतें. वर्ध्याला हि अशी पंचक्रोशी आणि असे च निरनिराळ्या शहरांचे नव्हे पण संस्थांचें विविध दर्शन होतें. फरक इतका च कीं दिल्लीचें दर्शन हें गतकाळाचें पडकें दर्शन. येथें वर्तमानकाळाचें जिवंत स्वरूप. ही पहा मगनवाडी—ग्रामोद्योगाच्या प्रयोगाचें प्रचंड केंद्र. ही बजाजवाडी—जमनालालजींच्या आतिथ्याचें अद्‌भूत कार्ययंत्र, या महिलाश्रमच्या टोलेजंग इमारती,—हें नवभारत विद्यालय, हें हरिजन छात्रालय, हें कॉ. कॉलेज, या काका साहेबांच्या हिंदीप्रचारकेंद्राच्या इमारती, ही जमनालाल बजाज यांची चोहीकडे नजर टाकणारी अगदीं साधी गवताची झोपडी. येथून च ही पुढें गोपुरी लागली, हें राधाकिसन बजाज यांचें घर, ही गोशाळा, हें परिश्रमालय, हें सरंजाम कार्यालय, हें वाळुंजकरजींचें चर्मालय, ही नालवाडी, येथें विनोबांची ही झोपडी पाहण्यास किती तरी लोक येतात. यापुढें मैल दीड मैलावर मनोहरजींच्या महारोगी सेवेच्या इमारती—असें कोठपर्यंत वर्णन देणार? नुसती संस्थांची एकामागून एक रीघ च लागलेली. पण या सर्व संस्थांमधली मूलदृष्टि ही च खरी बाकीचें सर्व नश्वर. प्राण हा च खरा. बाकी सर्व कलेवर. प्राण कोणता? या सर्व संस्था आणि कार्यें ज्यांच्या प्रेरणेवर ती. बापूजी, विनोबा, जमनालालजी यांच्यासारखी अपूर्व संतमंडळी आणि त्यांचा सत्संग हा च तो प्राण. या सत्संगासाठीं च या संस्थांचीं ही साधनें या साधनांच्या द्वारें सेवा करावयाची आणि सत्संग अंतःकरणांत भरून घ्यावयाचा. येथले सगळे लोक सेवेकरी, आपल्याला लागलेला हा भवरोग—महारोग्याच्या हि पेक्षां अतिशय दुष्ट अशी ही अनेक जन्माची व्याधि नष्ट व्हावी म्हणून येथें सेवेकरी होऊन यायचें आणि चर्मालयांत किंवा परिश्रमालयांत किंवा गोसेवेच्या किंवा खादीच्या कार्यात अथवा शेतींत आपला देह राबवून सेवा करावयाची. सेवा करीत करीत देह जसा झिजेल, हळूं हळूं अहंता जशी झडेल, तसा हा रोग झडून जावयाचा, मग आत्मानंदाच्या पुष्टिसाठीं येथल्या एकेक सत्पुरुषाकडे जाऊन केवळ बसावयाचें. फक्त एवढें च काम. तेथें मग दुसरें कांहीं करावयास नको. येथलें वातावरण, येथलें साधे हि संवाद, येथली प्रत्येक वस्तु म्हणजे ब्रह्मज्ञानाच्या बोधाची मूर्ति च! येथल्या प्रत्येक गोष्टींत बुद्धीची सूक्ष्मता, शुद्धीची उज्ज्वलता, भक्तीची रसमयता भरलेली च. जितकी पात्रता तितकें ग्रहण होईल. सेवेनें पात्रता वाढवा. आणि येथें नुसतें येत जा.

असें हें सत्पुरुषांच्या सहजस्थितीचें रहस्य माहीत असल्यामुळें च आम्ही मंडळी बाळूभाई मेहतांसह ऑल इंडिया काँग्रेस कमिटी व गोसेवा परिषदेच्या निमित्तानें येथें आलों. १६ जानेवारी १९४२ रोजीं धुळ्याहून वर्ध्यास येऊन पोंचलों. सामानसुमान भाऊकडे ठेवून, स्नानादि आटोपून, विनोबांच्या झोपडींत गेलों. विनोबा नेहमींप्रमाणें फिरण्यासाठीं गेले होते. थोड्या वेळांत विनोबा आले. त्यांना नमस्कार केला आणि लगे च संभाषणाला सुरवात झाली.

विनोबा—“विचारपोथी पुष्कळांनीं उतरून घेतली आहे. आतां ती छापावी असें वाटतें. कारण कीं निरनिराळ्या उतरणाऱ्यांनीं उतरतां उतरतां बरे च पाठभेद करून टाकलेले मी पाहिले.”

शिवाजी—“पण विचारपोथी छापली तरी ती नीट सर्वांना समजेल असें वाटत नाही.”

विनोबा—तिच्या मर्यादित ५०० प्रती काढावयाच्या. त्यांतला हेतु इतका च कीं, अधिकृत प्रत पुढें असावी. पुन्हां विचारपोथी छापावयाची नाहीं च.

रामेश्वरजी—“अधिक प्रती लागल्या तर?”

विनोबा—“मूळ छापलेल्या प्रतीवरून उतारा करून घ्यावा.”

शिवाजी—“नानासाहेब देव समर्थ-चरित्र लिहीत आहेत. त्यासंबंधीं बोलतांना ते म्हणाले कीं, माझी लिहिण्याची पद्धति भाविक पद्धति आहे. तार्किक, चिकित्सक पद्धति नाहीं.

विनोबा—भाविक पद्धति असली आणि तार्किक पद्धति नसली तरी हरकत नाहीं. पद्धति लिहिण्याची कोणती हि असो. पण लेखकाला संपूर्ण दर्शन पाहिजे. रामदास हे त्या काळीं एकदम च थोर पुरुष झाले असें एकांगीं दर्शन बरोबर होणार नाहीं. कोणता हि थोर पुरुष हा एकटा च एकदम उत्पन्न झालेला नसतो. त्या काळांत तो विचारप्रवाह वाहत च असतो. तदनुसार च तो थोर पुरुष झालेला असतो. कालात्मा ओळखला पाहिजे. एक काळ असा होता कीं, त्या वेळीं सर्व जगभर संत च निर्माण झाले. तत्पूर्वी चोहोंकडे जगांत धर्मसंस्थापक च निर्माण झाले. हा जगांतल्या विचारांचा प्रवाह न ओळखतां एकदम च एखादा थोर पुरुष झाला असें लिहणे अपूर्ण ठरेल.”

शिवाजी—“ही दृष्टि नानासाहेब देवांना आहे कीं नाहीं याची मला कल्पना नाहीं. पण रामदासांच्या राजकारणाशीं अवास्तव संबंध जोडल्यामुळें हि त्यांच्यासंबंधीं विकृत कल्पना झालेल्या आहेत.”

विनोबा—“रामदासांच्या पाठीमागें राजकारणी आणि ज्ञानेश्वरांच्या पाठिमागें साहित्यिक लागले आहेत. त्यांतून त्या बिचाऱ्यांची सुटका होईल तेव्हां खरी.”

जेवण्याचा वेळ झाल्यामुळे हें बोलणें तितकें च राहिलें. दुपारीं ऑल इंडिया कॉ. कमिटी होती. विनोबा तेथें फक्त बापूजींच्या भाषणासाठीं गेले होते. पण आज ते आले नाहींत. बजाजवाडींत ऑल इंडिया काँग्रेस कमिटीसाठीं मोठें तट्ट्याचें नगर—अभ्यंकरनगर—तयार करण्यांत आलें होतें. महिलाश्रमच्या स्वयंसेविका आणि इतर स्वयंसेवक आपल्या गणवेषांत इकडे तिकडे फिरतांना दिसत होत्या. मुख्य मंडपांत

अनुक्रमणिका

प्रवेश केल्याबरोबर तेथें व्यासपीठावर जवाहरलाल, राजगोपालाचारी, अध्यक्ष मौ. अबुल कलम आझाद वगैरे पुढारी मंडळी बसलेली दिसली. आज येथलें ऑल इंडिया काँग्रेस कमिटीचें सर्व काम समाप्त व्हावयाचें होतें. त्याप्रमाणें पुष्कळ वादविवाद आणि चर्चा होऊन संध्याकाळीं ७-३०, ८-०० च्या सुमाराला बैठक समाप्त झाली. वंदेमातरम् गीत गाईलें गेलें. राधाकिसन बजाज यांनीं १०-११ दिवस नेत्रयज्ञ होणार आहे असें लाऊड स्पीकरवरून जाहीर केलें. डॉ. मोघा हे मोतीबिंदु केवळ एका क्षणांत काढून टाकणारे म्हणून प्रख्यात होते. त्यांना येथें आणवून ११-१२ दिवस हजारों लोकांना फुकट नेत्रोपचार करविण्याची ही जमनालालजींची योजना होती. अंधाराचा पडदा दाट होत चालला. चोहोंकडे शांति पसरली. नालवाडीला प्रार्थनेच्या जागीं रामेश्वरजी, शिवाजी वगैरे मंडळी ऑ. इं. चा मंडप सोडून टांग्यांतून झपाट्यानें आलीं अणि प्रार्थनेंत सामील झालीं. समोर विनोबाजी बसले होते. आधींच्या अपार शांतीमध्यें प्रार्थनेनें अधिक च भर पडली. आणि यात्रेचा पहिला दिवस समाप्त झाला.

* * *

१७ जानेवारी १९४२ सकाळची वेळ. नालवाडीची विनोबाजींची झोपडी. महावीरप्रसाद पोद्दार येतात.

महावीरप्रसाद—(विनोबांना) "मैं आपके चरण छूना चाहता हूं।"

विनोबा—"उसकी आवश्यकता नहीं. परमात्मा सब जगह है। उसकी वंदना हो सकती है।"

महावीरप्रसाद—"जी, आपके लेखों की किताब सस्ता साहित्य मंडल ने छपवायी है। उसका दूसरा संस्करण निकल रहा है। उसकी बडी मांग है।

विनोबा—"मैंने वह किताब देखी। सहज ही देखते-देखते उसमें एक गलती नजर आयी (चूक दाखवितात).

महावीरप्रसाद—(चूक स्वीकारून) "जी. मैं उसमें जरूर शुद्धि करूंगा।" तात्या देशपांडे (महाराष्ट्र प्रांतिक काँ. चे सेक्रेटरी) व जळगांवचे देवकीनंदन येऊन बसतात. महाराष्ट्रांत विनोबाजींनीं दौरा काढण्यासंबंधीं बोलतात.

देवकीनंदन—"प्रत्यक्ष जरी महाराष्ट्रांत काम दाखवितां येणार नाहीं, तरी आपल्यासारख्यांच्या विचारश्रवणानें हि पुष्कळ कार्यक्षमता येईल."

विनोबा—"पहिला श्रोता येथें जो आपण होऊन आला तो किती कार्य करतो; त्यावरून मग पुढच्या अनेक श्रोत्यांचें गणित करूं (तात्या व देवकीनंदन हंसतात) मला लोक म्हणतात प्रचार करा. १०—१२ वर्षांपूर्वी मी प्रचाराला नालायक होतों असें समजत होतों. लोक समजत होतें कीं ते प्रचाराला लायक आहेत. आणि मी अधिक लायक आहे. परंतु मी म्हणे मी च जर नालायक आहे तर तुम्ही तर अधिक च नालायक असलां पाहिजे. आतां १०—१२ वर्षांच्या कार्यानंतर मी अधिक लायक झालों असें समजतों.

अनुक्रमणिका

कारण येथें प्रत्यक्ष कांहीं कार्य उभें होऊं शकलें. नुसता च प्रचार केला असतां तर ज्या गोष्टी मी सांगतों त्या दाखवितां आल्या नसत्या. प्रत्यक्ष कांहीं दाखविल्याशिवाय नुसत्या सांगण्याचा उपयोग कमी."

तात्या देशपांडे—"या वेळीं लोकांना मार्गदर्शन करून देण्याची फार आवश्यकता आहे. ज्यांच्याजवळ पैसा आहे त्यांनीं या युद्धपरिस्थितींत त्या पैशाचें रक्षण कसें करावें असे जनतेचे अनेक प्रश्न आहेत."

विनोबा—"पैसा सुरक्षित राहण्याला तो जनतेंत खर्चून टाकणें, विधायक कार्यांत अडकवणें हा उत्तम उपाय आहे. एखाद्यानें पुष्कळशी जमीन घेऊन ठेवली तर तो कदाचित सुरक्षित झाला तरी खरेदी करणारा धोक्यांत आला. तेव्हां सर्वांचा विचार करूं पाहतां विधायक कार्यांत पैसा खर्च करणें हें च योग्य ठरतें."

देवकीनंदन—"मी प्रथम माझ्या जिल्ह्याची आपल्याला थोडक्यांत कल्पना देतों. (थोडक्यांत विधायक कार्याची जिल्ह्यांतली कल्पना देवकीनंदन देतात) अशा परिस्थितींत आपल्या येण्यानें विधायक कार्याला चालना मिळेल अशी माझी समजूत आहे. आपला आमच्या जिल्ह्याशीं परिचय हि आहे. त्यामुळें उपयोग होईल."

विनोबा.—"तुमच्या जिल्ह्यांत काय झालें आहे कीं जिकडे तिकडे फाटाफूट. याचें तोंड इकडे त्याचें तोंड तिकडे असें दिसतें. तत्त्वज्ञानांत सांगतात कीं प्रलय व्हायचा. एकाचे अनेक होत होत शेवटीं सर्व विभागून शून्य होऊन जावयाचें. याच्या उलट उत्पत्तीची प्रक्रिया. अनेकाचे एक असे होत होत उत्पत्ति व्हायची. उत्पत्तिप्रलयाची प्रक्रिया मोठी गमतीची आहे ही. शिवाय दुसरें असें कीं आतां कामाची हि तऱ्हा उपयोगी नाहीं. काय म्हणाले आमच्या जिल्ह्यांत ५०० खादीधारी आहेत. ५०० खादीधारी कसें तर एक इथे एक तिथें. म्युनिसिपालिटीच्या कंदिलासारखे. असे नकोत. तर सबंध गांवच्या गांव खादीधारी किती आहेत हें पाहिलें पाहिजे. मापण्याची—आपलें कार्य मापण्याची ही एक तऱ्हा. दुसरी तऱ्हा या कामांत आतां संसार किती लोकांनीं सोडला. वरच्या वर्गांतून कामाची मापणी करावयाची तर ती अशी खालच्या खेडवळांत मापणी करावयाची, तर सबंध गांवच्या गांव किती खादीधारी झाले तें पहावयाचें. हीं दोन मापें आहेत. एक वरून एक खालून. आतां खादीं-दर्शन चार तऱ्हेनें झालें पाहिजे.—(१) दुकानाची खादी, (२) उत्पत्ति व विक्रीची खादी, (३) विस्तारलेलें स्वावलंबन, (४) सधन काम. या चारही तऱ्हेनें कामाची प्रगति झाली पाहिजे. आमचे तात्या देशपांडे डोक्यावर तेलांचा बुधला घेऊन फिरतील. "तेल घ्या जी तेल—ग्रामोद्योगी तेल." असें म्हणत फिरतील तेव्हां काम होईल. देवकीनंदननीं आतां संसार सोडून या च कामांत तनमनधन अर्पण केलें पाहिजे. बरें, शंकरभाऊंच्या रोगाचें कसें काय?"

देवकीनंदन—"सध्यां प्रकृति बरी आहे. पण त्यांना मानसिक च रोग मुख्य आहे. आपल्याला क्षय आहे ही भावना त्यांना मुख्य त्रास देणारी आहे. आपल्या सांगण्यानें त्यांच्यावर हि चांगला परिणाम होईल."

विनोबा—"निरोगी माणसाचें ज्ञान रोग्याला उपयोगी पडत नाहीं. रोगी झाल्यावर आपली हि स्थिति तशी च होण्याचा संभव आहे."

तात्या देशपांडे—"विचार समजावून सांगण्याच्या दृष्टीनें 'मराठी हरिजन' काढावें."

अनुक्रमणिका

देवकीनंदन—“तें आपण च काढाल तेव्हां होईल. महाराष्ट्रांत तरी कोणी तें काढूं शकणार नाहीं. गांधीजी इंग्रजी, गुजराथी, हिंदी हरिजन काढतात त्याप्रमाणें मराठी हरिजन काढण्याची सोय झाली पाहिजे.”

विनोबा—“गांधीजींनीं मराठी हरिजन काढूं नये असा मी सल्ला देईन. इंग्रजी ते काढतात तें जगासाठीं. हिंदी राष्ट्रासाठीं. गुजराथी मातृभाषा म्हणून. मराठींत त्यांनीं काढायचें तर बंगालींत कां काढूं नये?”

देवकीनंदन—“गांधीजींनीं काढायचें म्हणजे तेथल्या कोणी तरी तें काम करायचें.”

विनोबा—“येथल्या लोकांना आधीं च पुष्कळ कामें आहेत. येथली मंडळी भारावलेलीं आहेत. सायंकाळीं कोणाचें तोंड पाहावेसें वाटत नाहीं. सकाळीं कांहींशीं तोंडें बरीं दिसतात. (सगळे हंसतात)—पण तुम्ही म्हणता हा मुद्दा—मराठी हरिजन काढण्याचा—विचार करण्याजोगा आहे. काकासाहेब, किशोरलालभाई वगैरेंच्या सल्ल्यानें त्याचा विचार करतां येईल.”

देवकीनंदन—“मग पूर्वखानदेशांत आपण येणार.....ना?”

“विनोबा—“तुम्हांला ४/५ दिवस देऊं”

तात्या देशपांडे—“महाराष्ट्रांत—पुण्याकडे...?”

विनोबा—“पूर्व खानदेश पाहूं आधीं. मग पुढें विचार करूं”

—येथें हें संभाषण संपून सर्व मंडळी आपापल्या कामाला निघून गेली. दुपारीं आज ऑल इंडिया कॉं. कमिटीसाठीं उभारलेल्या मंडपांत विधायक कार्यक्रमाची समजूत देण्यासाठीं बापूजींनीं खास मंडळी बोलावली होती. या सभेसाठीं विनोबा, बाळूभाई, शिवाजी, कुंदर, रामेश्वरजी भर उन्हांत चालले होते. रस्त्यानें बाळूभाईंच्या ख्रिस्तचरित्राविषयीं बोलणें निघालें (बाळूभाईनीं ख्रिस्तचरित्र हस्तलिखित स्वतः अभ्यास करून लिहून विनोबांना अवलोकनार्थ दिलें होतें.).

विनोबा—“बाळूभाई तुम्ही एकदां ख्रिस्तायन वाचा. दुसरें असें कीं तुम्ही जी बायबलमधलीं नांवें तशीं च ठेवलीं आहेत, त्यांचें हिंदीकरण करा. ईसा, मूसा असें हिंदीकरण करतां येईल. ८ कोटी मुसलमानांना तर हीं नांवें परिचित आहेत.”

बाळूभाई—“बाप्तिस्मा” या शब्दाला कोणता शब्द द्यावा?”

विनोबा—“दीक्षा” शब्द द्यावा. बॅप्टिस्ट म्हणजे दीक्षादार. येशू हा श्रमण होता. श्रम करणारा तो श्रमण. जॉन दि बॅप्टिस्ट ब्राह्मण होता. ब्राह्मणाला श्रम करण्याची आवश्यता नाहीं. दोघे हि सेवक होते. येशू चिडखोर होता थोडासा.

अनुक्रमणिका

शिवाजी—"सॉक्रेटीस?"

विनोबा—"सॉक्रेटीस तर लोकांना चिडविणारा आणि मजा पाहणारा होता. ख्रिस्ताला सुळावर चढविला, सॉक्रेटीसला विष देऊन मारलें, यांत या दोघांच्या ठिकाणीं हि दोष दिसून येतो. "जो न लोकांस कंटाळे। ज्यास कंटाळती न ते" हें सूत्र पूर्णपणें त्यांच्या ठिकाणीं दिसून आलें नाहीं."

—इतक्यांत ऑल इंडिया कॉं. कमिटीच्या मंडपापर्यंत विनोबांसह मंडळी येऊन पोंचलीं. मंडपांत प्रवेश केल्याबरोबर ब्रिजलाल बियाणी यांनीं विनोबांना नमस्कार केला. विनोबा व पुढारी मंडळी बसली होती. त्यांच्याजवळ बापूजींचें बोलणें नीट ऐकूं यावें म्हणून बसले. बापूजींनीं सांगण्यास सुरवात केली. मध्यें च ते म्हणाले, एखाद्या म्हातारीने चर्खा चालवला तर तो तिला रोटी देईल. पण जवाहरलाल चर्खा चालवितात तेव्हां तो स्वराज्याचा मार्ग ठरतो. बापूजींना कित्येकांनीं लेखी प्रश्न हि विचारले होते. त्या सर्वांना उत्तरें देऊन बापूंनीं हा कार्यक्रम १। तासांत पुरा केला. झटकन् विनोबा व मंडळी परत नालवाडीस जाण्यास निघाली. रस्त्यांत बाळूभाईनीं वर्ध्याची पंचक्रोशी शिवाजींसह फिरण्याची गोष्ट काढली. त्यावर विनोबा म्हणाले—"तपस्येला एक मनुष्य, अभ्यासाला दोन—म्हणजे एकमेकांच्या सहाय्यानें अभ्यास चांगला होतो—प्रवासाला तिघे असावेत आणि मेल्यावर उचलण्याला कमींत कमी चार पाहिजेत."—असें भाषण चाललें असतां च चर्मालय लागलें. विनोबा व मंडळी नालवाडीस पुढें गेली. शिवाजी व बाळूभाई वाळुंजकरजींकडे जेवण्यासाठीं राहिले. संध्याकाळचा वेळ होता. बाळूभाई व शिवाजी जेवण करून जमनालालजींना भेटण्यासाठीं त्यांच्या झोपडींवर गेले. दोघांनीं हि नमस्कार केला. कोठून आला? प्रकृति कशी? काय करतां? असें दोन तीन औपचारिक प्रश्न झाल्याबरोबर जमनालालजींनीं कार्यविषयक प्रश्न विचारण्यास सुरवात केली.

जमनालालजी—"बाळूभाई, गोसेवासंघाचे सभासद झाला कीं नाहीं तुम्हीं?"

बाळूभाई—"नाहीं. अजून झालों नाहीं. पण होण्याची इच्छा आहे."

जमनालालजी—(जल्दीने) "अरे...कौन है अंदर—बालूभाई को गोसेवासंघ का सदस्यपत्र दे दो. बालूभाई आप अभी सदस्यपत्र पर सही दे दीजिए. कोई आपत्ति तो नहीं?"

बाळूभाई—"नाहीं. मला सभासद व्हावयाचें च होतें. पण मजजवळ आतां वर्गणी नाहीं."

जमनालालजी—"कोई हरकत नहीं. पीछे से वर्गणी भेज दीजिए. आप पर हमारा भरोसा है. शिवाजी, तुम्ही झाले का नाहीं सभासद?"

शिवाजी—"नाहीं."

जमनालालजी—"मग तुम्ही होऊन जा आतां बाळूभाईच्या बरोबर वर्गणीदार. कां कांहीं शंका आहे?"

अनुक्रमणिका

शिवाजी—“मी तर कित्येक वर्षांपासून गाईचें च दूध तूप खातों. न मिळेल तर तसें च चालवून घेतों. मी आहें च सभासद. मला आणखी सही करण्याची काय आवश्यकता?”

जमनालालजी—“आप सभासद हैं वो दूसरों को कैसे मालूम हो जाय? संघ के पास तो कम से कम ऐसे आदमियों की यादी रहनी चाहिए. खेडे पर घूमते हो गीताई प्रचार करने के लिए तो गाय का घी दूध बिलकूल नहीं मिलता?”

शिवाजी—“नाहीं. बहुतेक कोठें च मिळत नाहीं. आणि क्वचित् मिळालें तरी तें चांगल्या गाईचें नसतें म्हणून मी घेत नाहीं.”

जमनालालजी—“तुम्ही सभासद झाला तर ही सर्व माहिती संघाला कळविणें शक्य होईल. त्याचा इलाज काय करावा त्यासंबंधीं विचार करतां येईल.”

“शिवाजी—“मी विनोबाजींना विचारतों, यासंबंधीं मग सांगतों.”

जमनालालजी—“कांहीं हरकत नाहीं. विचार करून कळवा. मला तर वाटतें कीं देशाला या कामाची फार जरूरी आहे. जितके सभासद गोसेवा संघाचे होतील तितके केले पाहिजेत.”

शिवाजी—“तें बरोबर आहे.”

जमनालालजी—“बरं. बियाणीजींनीं विनोबांचें चरित्र लिहिलें आहे तें वाचलें कां?”

शिवाजी—“भुसावळला मी गीताईच्या दौऱ्यांत असतांना वल्लभभाईंनीं तें पाठवून दिलें होतें. तेथें च मीं तें २-३ तासांत वाचून टाकलें.

जमनालालजी—“कसा काय अभिप्राय आहे तुमचा त्याविषयीं?”

शिवाजी—“त्यांच्या माहितीप्रमाणें त्यांनीं लिहिलें आहे.”

जमनालालजी—“मला नुसती टीकाटिपणी नको आहे.—तें चरित्र चांगलें नाहीं; त्यांत अशी उणीव आहे आणि तशी उणीव आहे. विधायक कांहीं सांगा. या चरित्रांत तुमची मदत काय होईल तें स्पष्ट करा.”

शिवाजी—“धोत्रेजींना विनोबाजींविषयीं चांगली माहिती आहे. ते, गोपाळराव ही मंडळी मदत करूं शकतील.”

जमनालालजी—“धोत्रेजींचीं खुशामत करावी लागेल. खुशामत करायला हि हरकत नाहीं. जर त्याप्रमाणें काम होईल तर. राधाकिसन, वल्लभ, प्रत्येकजण म्हणतो कीं, विनोबांचे सगळे लेख, भाषणें जें कांहीं आहे तें शिवाजींजवळ आहे.”

अनुक्रमणिका

शिवाजी—“हें म्हणणें बरोबर नाहीं. मी विनोबांच्या लोकभाषणांचा अभ्यास करतों. त्यामुळें येथून वेळोवेळीं लेखभाषणें मी मागविलीं आणि ती च उतरलेलीं आहेत. तसा इतर अभ्यास हि मी करतों.”

जमनालालजी—“इतर अभ्यास तर ठीक. पण सध्यां विनोबांच्या विषयीं जेवढें कांहीं प्रकाशित होईल तेवढें जरूरीचें आहे. हिंदुस्थानला त्याची फार आवश्यकता आहे.’

शिवाजी—“विनोबाजींचें चरित्र असें काय आहे? विचार हें च मुख्य आहे.”

जमनालालजी—“जें काय आहे चरित्र तें. पण त्यापासून हिंदुस्थानला केवढा लाभ आहे (इतक्यांत महावीरप्रसाद पोद्दार येतात.).

महावीरप्रसाद—“इसमें नाम करने की इच्छा हो तो वो भी हो सकता है.”

जमनालालजी—“नाम करनेकी इच्छा नहीं है नाम छिपाने की इच्छा है.”

महावीरप्रसाद—“शिवाजी आप हमको मदद करेंगे विनोबाजी के लेख प्रसिद्ध करने में?”

शिवाजी—“जी हां उनके प्रसिद्ध मराठी लेख हैं उसका हिंदी उत्था हो सकता है.”

जमनालालजी—“सबका त्याग किया, अपरिग्रह रखते हो, मगर शिवाजी विनोबाजी का सब विचारधन अपने पास लेके बैठे हो—बडे पूंजीपती बनना चाहते हो.”

महावीरप्रसाद—“अच्छा, उनका अप्रसिद्ध साहित्य क्या क्या है?”

शिवाजी—“अभी विचारपोथी कर के एक अप्रसिद्ध किताब छपवाने की बात हो रही है. खुद विनोबाजी की संमति है. मगर उसकी सिर्फ ५०० नकल छपवाना है और दूसरा संस्करण करना ही नहीं ऐसा विनोबाजी कहते हैं.”

जमनालालजी—“ये बात कैसी? दूसरा संस्करण करना नहीं—५०० ही प्रत छपवाना—ये राइट तुमको किसने दिया?”

शिवाजी—“लेखक की इच्छा की बात है ये.”

जमनालालजी—“ये हमारा राइट है. तुमको मालूम है न, जो कुछ विनोबाजी का छपवायेंगे उसके प्रकाशक हम हैं. ये प्रकाशक का राइट है.”

शिवाजी—“आप प्रकाशक हैं यह मालूम है. मगर आपको विचारपोथी छपवाने की बात चल रही है यह भी मालूम नहीं?”

अनुक्रमणिका

जमनालालजी—“तुम लोग विनोबाजी के तंत्र में रहनेवाले—सब अपने अपने स्वतंत्र कार्य करते हो. हमको कोई बतलाता नहीं. हम विश्वास रखते हैं कि ये ठीक काम करेंगे.”

शिवाजी—“बराच वेळ झाला. येतों.”

जमनालालजी—“जाण्यापूर्वी पुन्हां एकदां मला भेटून जा. विनोबांना गोसेवासंघाचे सभासद होण्याविषयीं हि विचारा आणि त्यांच्या चरित्राविषयीं हि......”

शिवाजी—“सभासद होण्याविषयीं विचारीन. पण चरित्राविषयीं विचारणार नाहीं.”

जमनालालजी—“विचारलें तर काय गुन्हा होईल का?—तुम्हांला माहीत नसेल मी याबाबत बापूंशीं हि चर्चा केली होती. त्या वेळीं विनोबाहि होते. बापूंची हि विनोबांचें चरित्र प्रसिद्ध करण्याला हरकत नाहीं. बापू म्हणाले शिवाजींनीं चरित्र लिहिलें तर तें प्रसिद्ध करण्याला कांहीं च हरकत नाहीं. त्यांत परीक्षा करण्याचा प्रश्न येत नाहीं. पण ब्रिजलालजींच्या चरित्राबाबत तपासून पहावें लागतें.”

शिवाजी—“बाळकोबांनीं ब्रिजलालजींनीं लिहिलेंलें चरित्र पाहिलें कां?”

जमनालालजी—“नहीं. उनको बताना तो चाहिए. मैं विनोबाजी का चरित्र प्रसिद्ध करने का आग्रह रखता हूं. उसमें अंधश्रद्धा नहीं है. ये तो तुम मानते हो ना शिवाजी? मेरी सिर्फ इतनी इच्छा है कि हिंदुस्थान को विनोबाजी का पूरा लाभ मिले.”

—शिवाजी व बाळूभाई जमनालालजींना नमस्कार करून नालवाडीकडे जाण्यास निघाले. जमनालालजींचा सत्संग किती केला तरी अपुरा च. पण रात्र झाली होती. जमनालालजी थकलेले होते. तिकडे प्रार्थनेची वेळ झालीं. म्हणून झपाझप पावलें टाकून त्या झोपडींत वसणाऱ्या महापुरुषाच्या शुद्धबुद्धीविषयीं बोलत बोलत नालवाडीला प्रार्थनेच्या स्थळीं दोघे हि येऊन पोचले. कारण आज सकाळींच विनोबांनीं प्रार्थनेविषयीं पुढीलप्रमाणें सांगितलें होतें.

“प्रार्थना अतिशय व्यवस्थित आणि भक्तिमय झाली पाहिजे. दोन प्रार्थनांत भरपूर ८ तासांचें अंतर राखावें. झोंप पूर्ण झालेली असावी, अशी योजना करावी. पण प्रार्थनेंत सर्वांनीं हजर राहिलें पाहिजे. आपल्या येथें मिलिटरी शिस्तीपेक्षां ज्यास्त शिस्त पाहिजे. मिलिटरी शिस्त जबरदस्तीची असते. येथें प्रत्येकानें अंतःकरणपूर्वक शिस्त पाळली पाहिजे. नुसता बाह्याचार नको आहे. “रंगले त्यांत ओतूनि बुद्धि निश्चय जीवन”—अशी आपली स्थिति पाहिजे. मीं बापूजींना परवां सांगितलें कीं आपल्या यशस्वितेचें माप प्रार्थना. प्रार्थनेवरून आपलें यशापयश मापावें. येथें आश्रमांत आपण जें जें करतो तें च राष्ट्रांत पसरविणें चाललें आहे. येथल्या आपल्या सर्व कृति अत्यंत महत्त्वाच्या आहेत. याचा प्रत्येकानें विचार करावा. येथें ढील मुळीं च उपयोगाची नाहीं. ढील हा आपल्या राष्ट्राचा रोग आहे.”

*　　　　　*　　　　　*

अनुक्रमणिका


तारीख १८ जानेवारी १९४२ पहांटे प्रार्थनेनंतर बाळूभाई, शिवाजी व शिवरामपंत बाबाजी सेगांवला जाण्यास निघाले. वरोड्यावरून रेल्वेचें फाटक ओलांडून प्रथम बाळकोबाजींची झोंपडी लागली. तिच्यांत बाळकोबा नव्हते. ते वरोड्याला कॉंग्रेससभासद करण्यासाठीं गेले होते. टेकडीच्या पायथ्याशीं असलेली ती अतिशय साधी आणि सुंदर झोंपडी आध्यात्मिक मुनीचें स्मारकच वाटत होती. तशांत तो सकाळचा वेळ होता. बालसूर्याचे कोमल किरण चोहोंकडे फाकलेले होते. या झोपडींत कांहीं दिवस मीराबाई राहिलेल्या होत्या. झोपडी सोडून टेकडी चढून सेगांवच्या रस्त्यावर आल्याबरोबर दुरून बापूजींचें दर्शन झालें. ते फिरण्यासाठीं आलेले होते. बरोबर एक दोन मुली आणि माणसें दिसत होती. प्रथम सुकाभाऊंकडे जाऊन स्नान वगैरे केलें. बाळूभाईंची सेगांव आश्रमचें भोजन घेण्याची इच्छा असल्यामुळें त्याप्रमाणें रसोड्यांत कळविलें. कृष्णदास गांधी, चिमणलालभाई, किशोरलालभाई, वगैरेंना भेटलों. आशादेवी, मीराबाई, प्रभाकर दिवाण, सरदार पृथ्वीसिंह हि भेटले. जेवणाची घंटा झाली. आज जवाहरलाल नेहरू, यांची मुलगी, त्यांची बहीण, डॉ. महमूद, राजगोपालाचारी वगैरे कॉंग्रेसचे महाजन जेवण्यासाठीं आले होते. व्हरांड्याच्या एका कोपऱ्यावर बापूजी व बा बसलेल्या होत्या. सर्वांचीं पानें मांडलीं. जवाहरलाल बापूजींच्या जवळ च बसले. शिवाजींनीं बापूजींना नमस्कार केला त्या वेळीं बापूजींनीं दोन मिनिटांत त्यांच्या शारीरिक प्रयोगाविषयीं माहिती सांगितली. जेवण सुरू झालें. जेवण्यांत भाज्यांचा भरपूरपणा प्रामुख्यानें नजरेंत भरत होता. जवाहरलाल वगैरे पाहुण्यांसाठीं डबलरोटी हि होती. जेवण आटोपल्यावर बापूजींकडे गेलों. जवाहरलालजी आणि इंदिरा यांच्याशीं बापूंचें बोलणें चालूं होतें. तें संपल्यावर त्यांच्याशीं थोडें बोलणें झालें. जवळ च राजगोपालाचारी बसले होते. “ऑल इंडिया कॉं. कमिटींतील निर्णयासंबंधीं विनोबांना काय वाटतें” असा बापूजींनीं शिवाजींना प्रश्न विचारला. “माझें कांहीं याविषयीं त्यांच्यांशीं बोलणें झालें नाहीं.” असें शिवाजींनीं उत्तर दिलें. नमस्कार करून बाळूभाईंसह ते रामदास गुलाटींकडे थोडा वेळ बसले. नंतर सगळा दुपारचा वेळ म्हणजे दोन ते पांच पर्यंत येथील शेतीचे काम करणारे बलवंतसिंह यांच्याबरोबर शेतीचें निरीक्षण केलें. बाळूभाई शेतीसंबंधींची सर्व माहिती टिपून घेत होते. त्यानंतर जेवणाची घंटा झाली. जेवण झाल्यानंतर कृष्णदास गांधींबरोबर बोलणें झालें. प्रार्थनेची घंटा झाली. बाळकोबांचे परिचारक, भोजूभाऊ यांजबरोबर प्रार्थनेला गेलों. रात्रीं सुकाभाऊंकडे निजलों. थंडी बरी च पडली होती. सकाळीं उठून प्रार्थना केली. स्नानादि आटोपून खादीविद्यालयाचें अवलोकन केलें. तेथें विद्यार्थ्यांबरोबर कांहीं प्रश्नोत्तरें झालीं. त्यानंतर शेगांवचे विणकाम वगैरे सुकाभाऊंनीं दाखविलें. जेवण करून कनू गांधीकडे गेलों. त्यानें बापूजींच्या ५/७ फोटोचे अल्बम दाखविले. थोडा वेळ कृष्णदास गांधींकडे बसून बाळकोबांच्या झोपडींवर गेलों. ते जेवीत होते. चाऊन चाऊन खाण्याच्या कल्पनेनें जेवणांत त्यांचे २ तास सहज जात. तेथें हास्यविनोदांत बाळकोबांबरोबर सत्संगाचा लाभ घेऊन महिलाश्रमाकडे निघालो. महिलाश्रमची सर्व माहिती बाळूभाईंनीं लिहून घेतली आणि पुन्हां परत नालवाडीस येऊन रात्रीं मुक्काम केला.

*　　　　*　　　　*

२० जानेवारी १९४२ प्रार्थनेनंतरचा सकाळचा वेळ. स्थळ नालवाडीची पू. विनोबांची झोपडी. प्रथम शिवाजींनीं A. I. C. C. च्या ठरावासंबंधी विनोबांना काय वाटलें हा बापूजींचा प्रश्न निवेदन केला. सेवाग्रामची एकंदर हकीकत सांगितली. बाळकोबांचें वरूडला कॉंग्रेस मेंबर करण्यासाठीं जाणें व त्यावरील आपलें मत त्यांनीं प्रकट केलें सेवाग्रामच्या आहारांत भाजीची अत्यधिक मात्रा असते ती बरोबर नाहीं असें हि ते म्हणाले. गीताईसंबंधीं स्वामी आनंद यांच्याशीं झालेंलें बोलणें हि त्यांनीं सांगितलें. हें सर्व निवेदन ऐकून पू. विनोबांनीं गीताईप्रचारासंबंधींची पुढील कल्पना सुचविली. महाराष्ट्रांतील २०० तालुक्यांत— प्रत्येक तालुक्यांत एक माणूस निर्माण करावा. त्यानें दरवर्षी ५०० प्रती खपवाव्या. सुरवात निदान

अनुक्रमणिका

जिल्ह्याला एका माणसापासून तरी व्हावी. पुढें ते म्हणाले पारशिवणीच्या चिंतामणराव तिडक्यांनीं मला बोलाविलें. मीं त्यांना म्हटलें तुमच्या गांवीं ज्या वेळीं ६० पुरुष आणि १५ स्त्रिया गीताईचा पाठ करूं शकतील त्या वेळीं मी येईन. त्यांनीं येत्या रामनवमीपर्यंत ही गोष्ट होईल असें उत्तर दिलें. यानंतर यात्रांच्या ठिकाणीं गीताईप्रचाराची कल्पना त्यांनीं मांडली. तेथें कांहीं होवो न होवो. पण गीताईप्रचार झाला पाहिजे. वास्तविक हिंदुमहासभा, वर्णाश्रमसेवासंघ वगैरेंनीं हें काम करावयास पाहिजे. आतांपर्यंतचा गीताईचा प्रचार हा व्यापक प्रमाणावर झाला. परंतु आतां तो खोल झाला पाहिजे. बहुधा पांच वर्षांत व्यापक प्रचार संपेल असें ते म्हणाले. नंतर ते म्हणाले. हिंदुस्थानांतला धर्मप्रचार थांबलेला च आहे. कित्येकांना वाटतें राजकारणांत सत्य अहिंसा कशाला पाहिजे? साधुसंतांना अहिंसासत्य पाहिजे. वस्तुतः संतांपेक्षां आपल्याला सत्यअहिंसा ज्यास्त पाहिजे. कारण आपल्याला धर्म व्यवहारांत आणायचा आहे. लोक उलट च मानीत आहेत. संतांच्या वेळीं नुसतें च सत्य होतें. आपला सत्याचा आग्रह आहे. संतांचें कार्य आणि आपलें कार्य यांत फरक आहे. ते उपदेश करून मोकळे होत. लोक त्याप्रमाणें न वागले तर ते नशिबावर सोपवून देत. पण गांधींचा प्रचारक असा विचार करील कीं, मी उपदेश करतो. पण लोक त्याप्रमाणें ऐकत नाहींत ह्यांत माझें कोठें तरी चुकत असलें पाहिजे. म्हणून च माझ्या उपदेशाची छाप लोकांवर पडत नाहीं. म्हणून गांधींच्या माणसाला नेहमीं जागरूक रहावें लागतें. संतांप्रमाणें भक्तीचा उमाळा आला. वृत्ति भक्ति रसांत तल्लीन झाली कीं समाधान झालें असें चालत नाहीं. संतांपाशीं नाममहात्म्य होतें. गांधींच्या प्रचारकाजवळ सत्यमाहात्म्य पाहिजे. म्हणून च नेहमी सत्य अहिंसेचा सूक्ष्म विचार हवा. मी विधायक कार्यक्रमासंबंधीं जें चक्र काढलें आहे, त्याच्या केंद्रस्थानीं शून्याकार पोकळी ठेवली आहे. ही




पोकळी म्हणे अव्यक्त ईश्वरदर्शक आहे. या पोकळीच्या दोन्ही बाजूला सत्य आणि अहिंसा द्विदल धान्याप्रमाणें आहेत. आणि म्हणून ज्याप्रमाणें द्विदल धान्याचा भेद झाला म्हणजे त्यांतून फलनिष्पत्ति होणार नाहीं त्याप्रमाणे कोणत्या हि कार्यामध्यें सत्य आणि अहिंसेची फारकत झाली तर तें कार्य यशस्वी होणार नाहीं. पूर्वीची कल्पना होती कीं साधूनें कोणास ठकवितां कामा नये. पण आतां साधू हि ठगता कामा नये. तो लोकांस फसविणार नाहीं हें तर ठीक च. पण त्याला हि लोक फसविणार नाहींत अशी कसोटी आली. रामकृष्ण परमहंसांच्या गळ्याला आंतून गळूं झालें तरी ते उपदेश करीत असत. तेव्हां लोक म्हणत कीं हे केवढे ज्ञानी! गळूं झालें असून सुद्धां यांचें उपदेशांचें कार्य चालूं च आहे! परंतु हे ज्ञानी तर यांना गळूं झालें च कसें असें आपल्या विचारसरणीत म्हटलें जाईल. कारण गळूं होणें हें विकाराचें च लक्षण आपण मानतों. ज्ञानी मनुष्याला गळू झालें तरी तो ज्ञानी; अशी दृष्टि आपली नाही. वर्ध्याला पहिल्या प्रथम आश्रमस्थापना झाली ती जमनालालजींच्या बगीच्यांत. हल्लीं मगनवाडी आहे तिथें. त्या च ठिकाणीं डॉ. कूर्तकोटी उतरले

होते. त्यांना मी विचारलें, आपण खादी कां वापरीत नाहीं? ते म्हणाले “मी संन्यासी आहें. मला सर्व ब्रह्मच आहे. हें स्वदेशी, हे विलायती असा भेद मी करूं शकत नाही.” त्यावर मीं म्हटलें—“जेवतांना सर्व ब्रह्म असलें तरी कोणी कोळसे वाढले तर खाल काय? त्याप्रमाणेंच अन्नांत जसा विवेक येतो तसा वस्त्रांत हि पाहिजे.” हें माझें म्हणणें ऐकल्याबरोबर ते रागावले. माझ्याबरोबर रमणिकलालभाई होते. त्यांना त्यांचे एकंदर म्हणणें आणि रागावणें मोठें चमत्कारिक वाटलें. ते जैन अहिंसक आहेत. ते म्हणाले “मग येथें समता आणि साधुता कोठें राहिली?” पण १९१८ सालीं मी महाराष्ट्रांत फिरलों तेव्हां कऱ्हाडला माझीं प्रवचनें झालीं. करवीर पीठाच्या शंकराचार्यांचा मुक्काम होता. ते माझ्या प्रवचनाला त्या मठांत च माझीं प्रवचनें होत त्यामुळें यदृच्छया हजर राहात असत. ते असें कूर्तकोटींसारखे संतापी दिसले नाहींत. माझ्या प्रवचनांची त्यांच्यावर चांगली छाप पडली होती. कारण प्रवचनें संपल्यावर एक दिवस त्यांनीं मला भेटीला बोलावलें. तेव्हां मी त्यांच्याकडे गेलों होतों. ते म्हणाले—“वासरूं जरी गाईकडे आलें नाहीं तरी गाईला वासराचे वात्सल्य असतें. त्याप्रमाणें आपण जरी माझ्या भेटीला आला नाहीं तरी मी आपणाला बोलावलें आहे. आपलें गीतेचें प्रवचन मला आवडलें. गीतेचा प्रचार ठीक च आहे. परंतु आपण संध्येचा प्रचार करावा अशी माझी इच्छा आहे.” मी म्हणालो—“संध्येचा प्रचार ही चांगली गोष्ट आहे. गायत्रीमंत्रानें, सूर्योपासनेनें मनुष्य बलवान् बनतो. त्याला एक प्रकारची शक्ति प्राप्त होते. ही गोष्ट खरी आहे. परंतु जी गोष्ट सर्व वर्णांचे लोक करूं शकतील त्या च गोष्टीचा मी प्रचार करूं शकेन. ज्या अर्थी चारी वर्णांच्या लोकांना संध्योपासना करण्याची कल्पना आपणांला मान्य नाही, त्या अर्थी आपल्या कल्पनेप्रमाणें मी प्रचार करूं शकणार नाहीं. गीता ही कोणत्या हि वर्णाला शिकविण्याला हरकत नाहीं म्हणून मी गीतेवर बोलत असतों.”

*　　　*　　　*

२१ जानेवारी १९४२ नालवाडी. बुद्धसेन मद्रासच्या दौऱ्याची हकीकत सांगत होता.

शिवाजी—“आतां ग्रामसेवावृत्त बंद होणार व मराठी हरिजन काढणार असें ऐकतों?”

बुद्धसेन—“होय, अशी चर्चा झाली होती काल सेगावला विनोबा गेले होते तेव्हां. किशोरलालभाईंना विनोबा म्हणाले २-३ दिवसांत काकासाहेब येतील मग करूं विचार याचा.”

शिवाजी—(विनोदानें) “मग तूं मराठी नवजीवनचा मॅनेजर हो.”

बुद्धसेन—(हंसत) “मी हमाल होईन. रॅपर लावीन. टिकिटें चिकटवीन. टपाल इकडून तिकडे पोंचवीन.”

शिवाजी—“हल्लीं हि तूं ग्रामसेवावृत्तीचा मॅनेजर आहेस ना?”

बुद्धसेन—“होय.”

शिवाजी—“मग काय, मराठी हरिजनचा हो तसा च.”

बुद्धसेन—“माझें मिशन विनोबांची सेवा.”

अनुक्रमणिका

शिवाजी—(बाळूभाईंकडे वळून) “हें काय साधारण काम आहे? हें तर असामान्य कार्य झाले.”

बाळूभाई—“वा :! वां :! खरोखर हें मोठें च मिशन झालें.”

शिवाजी—“विनोबांची सेवा सगळी अगदीं बरोबर करीत असशील. कांहीं चुकत नसेल. पण मनुष्य आहे. चूक होते च कधींमधीं?”

बुद्धसेन—“मनुष्य आहे. चुक होते असें नाहीं. सावधपणा नसल्यामुळें चूक होते. पण बहुतेक त्यांचे काम बरोबर होतें. मद्रासच्या दौऱ्यांत पीठ, डाळ, कोळसे, शेगडी, घासलेट सगळे सामान इथून घेतलें होतें. विनोबांना वेळेवर गणिताप्रमाणें बरोबर ११ वाजतां बाहेर जेवण कोण देणार? थोडा कमज्यास्त वेळ होतो च. म्हणून सर्व काम स्वतःच करीत होतो. अगाऊ पुढच्या मुक्कामीं सूचना कळवीत होतो. मद्रासी लोकांची भक्ति अपूर्व होती. प्रत्येक स्टेशनवर मोठी गर्दी जमे. विनोबांना आमंत्रणावर आमंत्रणे येत. विद्यार्थी ऑटोग्राफसाठीं गर्दी करीत. त्यांना विनोबा सांगत कीं “हे एक विलायती खूळ आहें. द्या सोडून.” तसें च फोटोचें. ते म्हणत “नो ऑटोग्राफ नो फोटोग्राफ.” (शिवाजी व बाळूभाई हंसतात).

शिवाजी—“आणखीं मानपत्रांची हि भरमार झाली असेल.”

बुद्धसेन—“मानपत्रें पुष्कळ मिळालीं होतीं. तीं विनोबांनीं फेकून दिली आगगाडीतून नदींत. मजजवळ चुकून एक राहिलें होतें. तें मीं हि मग फेकून दिलें.

बाळूभाई—(दुःखित स्वरानें) असें कां बरें केलेंत तुम्हीं?”

शिवाजी—“तरी कांहीं मानपत्रें कुंदरनें मला दिली आहेत च.”

बुद्धसेन—“असतील त्यांच्याजवळ राहिलेलीं कांहीं”

*　　　*　　　*

दोन दिवस चर्मालय, परिश्रमालय, सरंजाम कार्यालय वगैरेंचें अवलोकन करण्यांत गेले.

*　　　*　　　*

२३ जानेवारी १९४२ नालवाडी. स्थळ—विनोबांची झोपडी. सकाळ. बाळूभाई, शिवाजी, वल्लभभाई, भाऊ पानसे वगैरे मंडळी पू. विनोबांसह बसलीं होतीं. इतक्यांत राधाकिसनजी व महावीरप्रसाद पोद्दार यांच्यासह जमनालालजी आले. तेथल्या चटईवर बसले व त्यांनीं एकदम बोलण्यास सुरवात केली.

जमनालालजी—“विनोबा, आपने महावीरप्रसादजी को चरण भी छूने नहीं दिया ये क्या?”

अनुक्रमणिका

विनोबा—“मैंने उनको कहा सब जगह परमात्मा है, उसकी वंदना हो सकती है. मेरे चरण छूने की जरूरत नहीं.”

जमनालालजी—“जरूरत है या नहीं कौन ठहरायेगा—अच्छा इनकी पहचान करा देता हूं—ये बडे सीदेसीदे दीखते हैं, मगर इनके पास काफी पैसा है. बडे लेखक हैं. एक जगह टिकते नहीं. नारदजी हैं.”

महावीरप्रसाद—“नारदजी बतलाने में इनका मतलब है लडाई झगडे से. मगर मैं भक्त कर के नारदजी को पहचानता हूं. तो ये हि अर्थ क्यों न लिया जाये?”

जमनालालजी—“जहां जाते हैं वहां झगडा किये बिना रहते नहीं.”

राधाकिसनजी—(लक्ष्मीनारायणाचें मंदिर मध्यें च तडा गेल्यामुळें नवीन बांधणे सुरूं होतें त्यासंबंधींचा नकाशा दाखवून) “अब सब मंदिर हि नया हो रहा है. तब भगवान का गर्भागार भी बदल दिया जाये तो क्या हरकत है?”

विनोबा—“मंदिर नया बंधवाना नहीं है. प्राणप्रतिष्ठा नयी करनी नहीं है. मूर्ति नयी नहीं है. बाहर कितना भी फर्क करो लेकिन मूर्ति और मूर्ती की जगह पुरानी ही है. यह भावना कायम रखने के लिए गर्भागार भी बदलना नहीं चाहिए.”

जमनालालजी—“मेरी भी यही राय है.”

महावीरप्रसाद—“यही बराबर होगा.”

जमनालालजी—“आपके चरित्र का तो बापू ने निर्णय दिया है—प्रसिद्ध करने में हरकत नहीं.”

विनोबा—“जीवित रहते हुए चरित्र ठीक नहीं. और किसी का भी चरित्र क्या चारित्र्य लेना चाहिए.”

जमनालालजी—“जो कुछ हो हम विचार कर लेंगे. क्यों वल्लभ गोसेवासंघ के सदस्य बने या नहीं?”

वल्लभभाई—“मैं असभ्य सभ्य हूँ.”

जमनालालजी—“महावीरप्रसादजी चाहते हैं कि आपका सत्संग मिलें. आपसे कुछ बातचीत हो जाये.”

विनोबा—“मेरे घूमने के वखत आ सकते हैं.”

अनुक्रमणिका

जमनालालजी—"अच्छा महवीरप्रसादजी अब विनोबाजी का क्यों फिजूल वखत लें—चलिए—" (नमस्कार करून जातात)

*                    *                    *

२३-२४ दोन दिवस पवनार व सुरगांवला गेले, सुरेंद्रजी, बाळूभाई, सुरजमल मामा, शिवरामपंत बाबाजी प्रथम पवनारला गणपतराव बोकडे यांचे शेतीचे प्रयोग पाहण्यास गेले. गणपतरावांच्याकडे जेवण करून बंगल्यावर कोटीजी व नामदेवशीं थोडेंसें बोलणें करून सुरगांव गांठलें. तेथें नानाजी महाराज, वल्लभभाई वगैरेंच्या भेटी घेऊन तेथल्या कामाचें अवलोकन करून २४ ला संध्याकाळीं नालवाडीस येऊन पोंचले.

*                    *                    *

२५ जानेवारी १९४२ नालवाडी. सकाळी ८ वाजतां विनोबा नित्याप्रमाणें फिरण्यासाठीं निघाले. बरोबर शिवाजी, रामेश्वरजी, बाळूभाई मेहता, अच्युतराव देशपांडे, कुंदर व गोपाळराव काळे होते. सकाळचा मनोहर समय होता. थोडीं थंडी आणि वारा होता. विनोबांच्या अंगावर कांहीं नव्हतें. चालतां चालतां संभाषणाला सुरवात झाली.

गोपाळराव—"काल सेवाग्रामला किशोरलालभाईंकडे गेलों होतों. मराठी हरिजन पत्र काढण्यासंबंधीं बोलणें चाललें होतें. इतक्यांत बापू तिथें आले. त्यांनीं काय गोष्टी चालल्या आहेत म्हणून विचारलें. "मराठी हरिजन काढण्यासंबंधीं चाललें आहे" असें सांगतां च "हां काढो. जरूर काढो" असें ते म्हणाले. किशोरलालभाई हि अनुकूल दिसले."

विनोबा—"त्यांत तुम्हांला हि रस दिसतो च आहे. तुम्ही महाराष्ट्रधर्म चालविले च आहे."

गोपाळराव—"दादा धर्माधिकारी हि मदत करतील. भाषांतरे वगैरे करणें सहज आहे असें ते म्हणालें."

विनोबा—"मग तुमचें म्हणणें काय?"

गोपाळराव—"तुम्ही त्यांत लेख दिले पाहिजेत. दुसरे काय?"

विनोबा—"मला तुमचे हें समजत नाहीं कीं लेख हि तुम्ही मागता आणि वर्तमानपत्रांत "डेफिसिट" येतो ते पैसे हि मागतां हें कसें?

गोपाळराव—"कोण मागतो पैसे?"

विनोबा—"कां बरें? ग्रामसेवामंडळाला ८०० रु. नुकसानी आली ना?"

अनुक्रमणिका

गोपाळराव—“ती ग्रामसेवामंडळ सोसणार.”

विनोबा—“हें मला परवडणार नाहीं. पुढच्या वर्षी असें च चाललें तर तें बंद करावें लागेल. ग्रामसेवामंडळा चे पैसे म्हणजे आमचेच पैसे ना?”

गोपाळराव—(विनोदी स्वरांत) “सगळ्या जगाचे पैसे तुमचे च आहेत तर तुमच्या जवळ नाहीं मागणार तर कोणाजवळ पैसे मागणार (सगळे हंसतात).”

विनोबा—“इतर ठिकाणीं प्रकाशन केलें तर माझ्या पुस्तकाबद्दल—माझ्या लेखांबद्दल ५०० रु. मिळतील. उलट येथें तर लेख हि मागतां आणि मासिकाचा खर्च भागेल इतका प्रचार हि करीत नाहीं. मासिकाचा तोटा हि आमच्याजवळ मागतां हें कसें जमेल?”

गोपाळराव—“हें तर मोठेपणाचें लक्षण आहे. राजे लोक आपणाला मेजवान्या लोकांकडून करवतात. स्वतःच पैसे देऊन सगळी सामग्री पाठवून देऊन. तसें च आहे हें.” (सगळें च हंसतात).

सुरेंद्रजी—“सिद्धांतदृष्टीने तर हें बरोबर आहे. पण....”

गोपाळराव—“विनोबा मानतात च कीं अव्यक्त विचार चोहींकडे फिरत च राहतो. तो जेथें ग्राहक असतो तेथें ‘टच’ होतो च.”

सुरेंद्रजी—“पण इतरांना हि त्याचा उपयोग होण्याला विचार व्यक्त करणें हि चांगलें.”

गोपाळराव—“हें हि खरें च आहे. आम्हांला एक माहीत आहे. विनोबा काय आहेत म्हणून. आम्ही त्यांचे विचार वाचतो. पण इतरांना माहीत नाहीं त्याचें काय? शिवाजी महाराज गीताई प्रचार करतात म्हणून कांहीं प्रचार होतो. पण ॲडव्हरटाइसमेन्ट नाहीं, कांहीं नाहीं कसें व्हायचे?”

विनोबा—“तुम्ही करून पहा. शिवाजी जो प्रचार करतो तो करूं च द्या. आणखी शिवाय ॲडव्हरटाइझमेन्ट करा कांहीं ज्यास्त प्रचार होतो कां पहा?”

गोपाळराव—“तें बरोबर आहे.”

विनोबा—“माझा या नुसत्या लिहिण्यावर विश्वास नाहीं. त्याची कांहीं योजना कराल कीं नाहीं? महाराष्ट्रांत २०० तालुके आहेत. दोनशें प्रचारक तुम्ही तयार करा. २० हजार, १५ हजार अशा कांहीं प्रती काढा. मग मराठी हरिजनांत मी लिहितों.”

गोपाळराव—“तसें होत नाहीं म्हणून तर हा प्रयत्न करायचा. ७ लाख खेड्यांत एकेक मनुष्य असेल तर काम होईल तसें च तुमचें म्हणणें आहे हें होतां होता प्रचार होईल.”

विनोबा—“काय बाळूभाई तुमचें काय म्हणणें आहे?”

अनुक्रमणिका

बाळूभाई—“महाराष्ट्र, वऱ्हाड नागपूरच्या काँग्रेसच्या अध्यक्षांना बोलवावें......

विनोबा—(बाळूभाईचें बोलणें तसें च पुढें चालवून) “त्यांची एक मीटिंग करावी, आणि किती वर्गणीदार होतील तें अजमावून पहावें असें च ना?”

बाळूभाई—“होय.”

शिवाजी—“त्यांत मुंबईचे अध्यक्ष कां नकोत?”

गोपाळराव—“मुंबईला आहेत दुसरीं पत्रें”

विनोबा—“ते कां नकोत? ते हि बोलवा. म्हणजे कोण कोण झाले?”

गोपाळराव—“शंकरराव देव, पूनमचंद राका, ब्रिजलाल बियाणी, भुलाभाई देसाई.”

बाळूभाई—“आणखी काकासाहेब गाडगीळ.”

विनोबा—“ते कोणी नकोत. माझा कांहीं यावर विश्वास नाहीं. यानें कांहीं होणार नाहीं तुम्ही आपल्या शक्तीवर काम करायचें असेल तर करा. असा जर प्रचार होत असला तर शंकरराव देवांच्या लोकशक्तीचें काय झालें बाळूभाई?”

बाळूभाई—“तें तोट्यांत च आहे.”

विनोबा—“कोणती तरी एक योजना पाहिजे. संतांनीं आध्यात्मिक योजना केली. कबीर शेले विणतो आहे, गाणीं गातो आहे—त्याचा प्रचार होईल जगांत केव्हां व्हायचा तो—अशा भूमिकेंत तो होता. ही भूमिका मला पटते. तुळशीदासांनीं ४५ व्या वर्षी तुळसीरामायण लिहिलें आणि ९० वर्षे ते जगले. म्हणजे ४५ वर्षे त्यांनी प्रचार केला. ठिकठिकाणीं तें गाऊन दाखविलें, म्हणवून घेतलें तेव्हां त्याचा प्रचार झाला. व्यक्तिगत आध्यात्मिक प्रचार म्हटला तर तो निष्ठेनें च व्हावयाचा. व्यापक प्रचार करावयाचा तर तशी त्याप्रमाणें योजना हवी.”

बाळूभाई—“युद्धासंबंधीं लिहिलें तर पत्राचा पुष्कळ खप होईल.”

विनोबा—“युद्धासंबंधी म्हणजे?”

बाळुभाई—“युद्धकालीन संकटपरिस्थितींत कसें वागावें इत्यादि लिहिलें तर.”

गोपाळराव—“नाहीं. त्याची लोकांना विशेष आवड नाहीं. आवड आहे युद्धाच्या बातम्यांची.”

विनोबा—“तें जपानच्या जोरावर अवलंबून आहे. तो दिल्लीवर आला. कलकत्त्यावर आला या बातम्या त्यांच्या हातांतल्या. ती बाब काय आपल्याला उपयोगी?

रामेश्वरजी—“जपान दिल्लीवर आला तर रेल्वेसुद्धां बंद होतील. वर्तमानपत्र कसें चालेल?”

(बोलतां बोलतां हनुमानगडच्या टेकडीवर सर्व मंडळी पोंचली. टेकडीवरची जमीन दगडगोट्यांनीं भरलेली होती. आजूबाजूचा विस्तृत देखावा चित्ताकर्षक वाटत होता. समोर मगनवाडी, वर्धा शहर, रामनगरचे बंगले दिसत होते. बोलणें खडकाळ जमिनींतल्या शेतीवर चालू झालें.)

विनोबा—“तो कागावा आला होता ना जपानचा, त्यानें असल्या शेतीचें मोठें गुणगान केलेंलें आहे, माहीत आहे ना सुरेंद्रजी?”

सुरेंद्रजी—“नाहीं. तो कोठें आला होता?”

विनोबा—“बापूंकडे, तो जपानचा गांधी समजला होता. पण कागावा तरी माहीत आहे ना? नाहीं तर कागावा कोण एथपासून च सुरवात होईल. त्याला बापूंनीं सांगितलें कीं “तुम्हीं जपानचा कां निषेध करीत नाहीं?” त्यावर तो म्हणाला “तसा निषेध केला तर होतें तेवढें हि काम व्हावयाचें नाहीं.” असा ज्याच्या त्याच्या पाठीमागें संसार लागून राहिला आहे. पण मी संसार सोडला आहे. मला हें असें बंधन नाहीं.”

गोपाळराव—“तुमचें सगळें च निराळें आहे. वर्तमानपत्रांत जाहिराती हि घेत नाहीं. तें सेल्फ सपोटिंग हि झालें पाहिजे.”

रामेश्वरजी—“भारतांत जाहिराती घेतात. त्यांत एक जाहिरात युद्धाच्या सट्ट्याची होती. आणि तो सट्टा म्हणजे वेश्यांचा नाच.”

विनोबा—“समजलों. त्याचा तपशील नको आहे”.

रामेश्वरजी—“पण अशा जाहिराती कां घ्याव्या?”

विनोबा—“तें धोरणावर आहे. एक वर लिहून टाकले कीं जाहिराती कोणत्या हि घेऊं. त्यांचें आम्हांला कांहीं लागत नाहीं. म्हणजे आटोपलें.”

गोपाळराव—“लेखांबद्दल हि असें होऊं शकतें.”

विनोबा—“होय. यांतील सगळ्या विचारांबद्दल संपादक जबाबदार नाहीं असें लिहिलें म्हणजे झालें (इतक्यांत टेकड्याचे माथ्यावर मंडळी आली. तेथें एक दगड होता. तेथें विनोबांनी हातांत असलेली शाल ठेवली. आणि आसनमांडी घालून ताठ असे ते बसले. समोर मग मंडळी हि तशी च बसली. Sermon on the mount चा च हा देखावा! पुन्हां बोलणें सुरू झालें).

अनुक्रमणिका

विनोबा—“मी आहें गणिती. तेव्हां गणिताच्या भाषेंत मी मांडतों. गणितात शून्याच्या निरनिराळ्या सापेक्ष व्हॅल्यू आहेत. मोठ्या रकमेसमोर लहान रक्कम ठेवली तर ती शून्य होते. हा शून्याचा एक प्रकार आहे. तसें सगळें चाललें आहे. सगळ्या चळवळी शून्यांत चाललेल्या आहेत. मला हा अल्पसंतोष चालत नाहीं.”

सुरेंद्रजी—“अल्पसंतोष ही चांगली वस्तु नाहीं काय?”

विनोबा—“साधी रहाणी असावी वगैरे अर्थानें ठीक आहे. पण अल्पसंतोष म्हणजे आत्मसंतोष नव्हे.”

सुरेंद्रजी—“आत्मसंतोष आणि अल्पसंतोष एक च.”

विनोबा—“त्यांत जमीन अस्मानाचा फरक आहे. बरें बाळूभाई, आतां तुमचा प्रश्न घेऊं. मामांना मी सल्ला दिला कीं तुम्हीं खांडणविंचरणाचे प्रयोग करा. चार चार तास रोज. सध्यां इतकें पुरें आहे. मग कामाचे बघू.”

गोपाळराव—“मग आमच्या प्रश्नाचें काय?”

विनोबा—“टॉल्स्टॉयनें लिहिलिहि लिहिलें. लोक तें सर्व वाचत. पण कोणी कुदळ हातांत घेईना. असा आहे हा प्रचार.”

सुरेंद्रजी—“पण त्याच्या लिहिण्याचा तुमच्यावर तर परिणाम झाला नाहीं ना?”

विनोबा—“तो तर झाला च. तसा परिणाम होतो च आहे. पण तो प्रेसमुळें नव्हे. तो त्याच्या स्वतःच्या आचरणामुळें. बॉल्शेव्हिजमचा प्रचार कांहीं पुस्तकांनीं झाला नाहीं. त्यांनीं एक गोष्ट सिद्ध केली. ती एक हवा तयार झाली. ती वाहिल्याशिवाय कशी राहील?”

सुरेंद्रजी—“पण मध्यें पहाड आला म्हणजे हवा रुकते च.”

विनोबा—“होय. या छपाईचा हा पहाड आला कीं हवा रुकणार च (सगळे हंसतात) मी ठरविलें च आहे कीं हें असलें प्रकाशन म्हणजे अप्रकाशन च आहे. एक मोठा प्रकाशित पुस्तकांचा ढिगारा पडतो आहे त्यांत आपलें पुस्तक दडवून टाकणें च आहे हें!”

सुरेंद्रजी—“या प्रश्नाकडे दुसऱ्या हि दृष्टीनें पाहतां येईल. सध्यां जरी वर्तमानपत्र तोट्यांत चाललें तरी पुढें तें सेल्फ सपोर्टींग होईल.”

विनोबा—“पहा एकंदरींत कसें काय जमेल तें. जें काय कराल तें आपल्या शक्तीच्या जोरावर करा. बरें बाळूभाई तुमच्या पश्चिम खानदेशांत कोठें आशा दिसतें.”

अनुक्रमणिका

बाळूभाई—“शहाद्याला काम बरें होईलसें वाटतें!”

विनोबा—“तुमच्या पश्चिम खानदेशात शिवाजी फिरतो आहे. आज हा ध्रुव, पुढे आणखी ध्रुव बदलला, असें कधीं साक्री तालुका बरा, कधीं शिंदखेड तालुका बरा आतां शहादें तालुका बरा.”

संभाषण चालू असतां च नालवाडी आली. संवाद संपला.

*　　　　*　　　　*

२५ जानेवारी १९४२ आज दुपारीं विनोबांचें बाळूभाईंशीं बोलणें झालें. तें बाळूभाईंनीं पुढीलप्रमांणें सांगितलें—

बाळूभाई—“तरुणांचा संग्रह कसा करावा?”

विनोबा—“मी तरुणांना स्वतंत्रता शिकवितों पण त्यांच्यांत संयम करण्याचा विवेक आला पाहिजे हें मुख्य सूत्र लक्षांत ठेवून काम करावें. मी १९१७ सालीं वांईला होतों. तेव्हां तेथें ५/७ जाती चालवीत होतो. त्या वेळीं माझ्या भोवतीं तरुण जमा झाले होते. त्या दळणाच्या मजूरींतून ५०/६० रुपये मिळाले. नंतर त्याचीं पुस्तकें विकत घेतलीं. मग मागाहून लोकांकडून हि पुस्तकें मिळालीं. असा स्वावलंबनाचा मार्ग तरुणांना मिळाला पाहिजे. त्याबरोबर च वैराग्य पाहिजे. वैराग्याचा विशेष प्रभाव पडतो. आणि प्रगति ही असामान्य होते. अशा या दोन मार्गांनीं प्रयत्न केलेला फुकट जात नाहीं. वांईला माझ्याबरोबर बर्वे नांवाचे तरुण होते, ते गेल्या वर्षीं पवनारला मला भेटण्यासाठीं आले होते. इतका परिणाम त्यांच्यावर होऊं शकला. एकदां तरुणांशीं असा संबंध आला कीं तो परिणामकारी होतो च. आणि त्यांतून च कांहीं तरुण विशेष तऱ्हेनें आपल्याला मिळतात. शिवाजीचें पहा. त्याला वडिलांनीं कांहीं ड्रॉईंग एन्ग्रेव्हिंग शिकविलें होतें. मराठी ६ यत्ता त्याच्या झाल्या होत्या. पण तो येथें आला. येथें पुष्कळ ‘स्कोप’ मिळाला. महाराष्ट्रांत अनेक विद्वान आहेत त्यापेक्षां तो कमी वाटत नाहीं. आतां ६ वर्षें गीताईचा प्रचार केला आहे त्यानें. आणखी ६ वर्षें प्रचार होईल. मग मी विचारीन त्याला त्या संबंधीं”.

२५ जानेवारी १९४२ नालवाडी, संध्याकाळचा वेळ. विनोबा फिरावयास जातात. बरोबर महादेवी, शिवाजी, कारवारचे एक कार्यकर्ते, कुंदर व भाऊ हि येतात. नालवाडीहून म्हसाळ्याच्या रस्त्याला विनोबा फिरावयास निघतात. कारवारचे गृहस्थ मुख्य संभाषण सुरू करतात. विनोबांनीं कारवारकडे गोकर्ण-महाबळेश्वर मंदिर उघडण्यासाठीं यावें इत्यादि त्यांच्या बोलण्याचा विषय. तो पूरा करून ते विचारतात.

कारवारी गृहस्थ—“मला असें वाटतें कीं बापूजींच्या ‘रघुपती राघव राजाराम’ या म्हणण्याचा रेकॉर्ड घ्यावा. त्यांचा असा एक रेकॉर्ड इंग्लंडमध्यें घेतला गेला आहे. पण बापूजी या गोष्टीला कबूल होणार नाहींत असें वाटतें. पण मालवीयजींना सांगून त्यांच्या करवीं हें काम करविल्यास होईल तर बरें असें वाटतें. तर आपला काय विचार आहे या बाबतींत?”

विनोबा—“मला हा विचार तितकासा रुचत नाहीं. ही एक अगदीं च स्थूल मानवपूजा झाली. तिच्यांतून कांहीं लभ्यांश दिसत नाहीं. दुसरें असें कीं, लोकांवर बापूच्या तोंडच्या भजनाच्या रेकॉर्डचा जो

परिणाम तुम्ही कल्पिता तो तर तुम्ही आम्ही जे त्यांच्या आसपासचे लोक—त्यांच्या भजनाचा परिणाम होणार नाहीं तर तो त्यां रेकॉर्डनें काय होणार? ही स्वाभाविक रीत च नव्हे. पुष्कळ लोक फोटो घेतात. ऑटोग्राफ घेतात यानें कांहीं त्यांच्या वर परिणाम व्हावयाचा नाहीं. हा एक भोळसरपणाचा प्रकार आहे. यांतून अनेक वाईट गोष्टि निघतात. तें अमक्या बोवाचें चरणतीर्थ घ्यावें, तें तमक्याचें वस्त्र च घ्यावें असें रूप त्याला येतें. ही ईश्वरपूजा होत नाहीं. आध्यात्मिकता यानें उरत नाहीं."

कारवारी गृहस्थ—"आपल्या म्हणण्याचा मला विचार केला पाहिजे. एकदम च कांहीं मी सांगूं शकत नाहीं. पण हें सायंटिफिक जग आहे. येथें अशा वस्तूंचा उपयोग होणार नाहीं? पूर्वीची गोष्ट वेगळी नाहीं कां?"

विनोबा—"हा भ्रम आहे. आतां सायन्सचे शोध लागले. आगगाड्या झाल्या. पण लोक तितके च भोळे आहेत. लोक कोठें सायंटिफिक झाले आहेत? परवां मला भेटायला आलेले गृहस्थ सांगत होते कीं, बर्लिनमध्ये नुसतीं अस्ट्रॉलाजीचीं १२ मासिकें चालतात."

कारवारी गृहस्थ—"हेर हिटलरचा ही या गोष्टीवर विश्वास आहे असे ऐकतों. बरें, माझा दुसरा प्रश्न असा आहे कीं, माझ्या दृष्टीनें तर कर्नाटक सबंध बापूजींच्या पाठीमागें आहे असें वाटत नाहीं. पण कारवारमधले कार्यकर्ते तसे आहेत. ह्या बीजाचें रक्षण केलें पाहिजे. कारवारमधल्या कार्यकर्त्यांना वर्ध्याला पाठवितां येईल आणि त्यांचा येथें सतत संबंध राहिला तर हें जमेल असें मला वाटतें."

विनोबा—"हा विचार ठीक आहे. पण सर्वच लोकांची अशी येथें योजना होऊं शकत नाहीं. मी हा च विचार कार्यकर्त्यांपुढें मांडीत असतो, तो असा कीं कार्यकर्त्यांचें काम ११ महिने चालावे. १ महिना त्यांनीं सर्व काम सोडून येथें यावें. येथें शिकण्यासारखें शिकावें. येथल्या आध्यात्मिक चर्चा वगैरेंमधून त्याला मग सबंध वर्ष स्फूर्ती मिळेल व तो ताजातवाना होईल. पंजाबमधून अशी च मागणी आली होती. जाजूसाहेबांनीं व किशोरलालभाईनीं मी अशी कार्यकर्त्यांसंबंधीची योजना करावी असें मांडलें होतें. पण मीं या बाबतींत कांहीं योजना केली नाहीं. येथें अशी स्वाभाविक पद्धती आहे च. हे अच्युतराव देशपांडे आले आहेत येथें. १०/१५ दिवस राहतील आणि मग खांडणविंचरण शिकून जातील. असें येथें चालत च आहे. पण त्या संबंधींची कांही योजना ठरविलेली नाहीं. काहीं कामें योजनेची, कांही स्वाभाविक अशीं चालावयास पाहिजेत. हें स्वाभाविक काम आहे. इतक्यांत मंडळींसह विनोबा स्वतःच्या झोपडीपाशीं आले आणि हा संवाद समाप्त झाला.

*　　　　*　　　　*

२६ जानेवारी १९४२ सोमवार. आज स्वातंत्र्यदिन. सकाळीं विनोबा व महावीरप्रसाद गोपूरींतून परत येत असतांना विनोबा सांगत होते—

विनोबा—"नाझीवादांत एक गुण आहे. ते पूर्वपरंपरेला धरून बोलतात. त्यामुळें एक आकर्षण निर्माण होतें. आतां त्यांत पुष्कळ विपरीत कल्पना त्यांनीं करून ठेवल्या आहेत तें वेगळें. नाझी आर्य आहेत. ते च जगावर राज्य करण्यास लायक आहेत. इ. इ. पण त्यांतला आकर्षक मुद्दा आहे तो हा च आहे. लोक सर्वसामान्यपणें पूर्वपरंपरेला धरण्याच्या वृत्तीचे असतात. हिंदुमहासभावाल्यांची हि ती च पूर्वपरंपरा

सांगण्याची रीत असते. त्यामुळें लोक आकर्षित होतात. तुम्ही लोकांना सांगणार तुमचे पूर्वज मूर्ख होते, त्यांचा हरिजनांवर जुलूम होता. तुम्ही ही मूर्ख आहा. आम्ही मात्र शहाणे. मूर्ख होते, त्यांचा हरिजनांवर जुलुम होता. तुम्ही ही मूर्ख आहा. आम्ही मात्र शहाणे. तर तें लोकांना पटणें कठीण पडतें. मी असें सांगतो कीं संतांनीं हें च काम केलें आहे. तें च आम्ही पुढें चालवितो. यांत नवीन कांहीं नाहीं. संतांच्या वेळेला हरिजनांना ग्रंथांतच प्रवेश नव्हता. तो बाहेरचा कोट फोडण्यांत त्यांचे श्रम खर्ची पडले. आतां मंदिर प्रवेशाचा आंतला कोट आमच्यासाठी राहिला आहे. याचा अर्थ असा नाहीं कीं, पूर्वजांचे कांहीं चुकलें तर तें चूक म्हणावयाचें नाहीं. किंवा पूर्वींच्या मध्यें परिवर्तन करावयाचें नाहीं. परिवर्तन तर सारखें होत रहावयाचें. हिंदुधर्मांत नाहीं तर अनेक स्मृती कशा झाल्या असत्या? परिवर्तन करावयाचें हा तर स्वभाव च आहे हिंदुधर्माचा. उलट ब्रिटीश राज्यांत हिंदु लॉ नक्की करून हिंदुधर्माला बंधनांत टाकलें आहे. तेव्हां आम्हीं त्यांच्याविरुद्ध आहो. हा झगडा जुन्याला सोडून हि नाहीं. फूल पानांतून रस घेते. पण पानांत आणि त्याच्यांत केवढें परिवर्तन होतें. फळ फुलांतून रस घेतें पण तें फुलाहून वेगळें च दिसतें. तसें परिवर्तनाचें आहे.

*　　　　*　　　　*

२६ जानेवारी १९४२ सोमवार सकाळीं विनोबा फिरून आल्यानंतर विनोबांच्या झोपडींत मंडळी बसली—बाळूभाई, शिवाजी, एक मद्रासी संन्यासी, बुद्धसेन, कुंदर, इ. इ. प्रारंभी फ्रॅंटियरचे एक गृहस्थ हैदरची फ्रॅंटियरकडे मागणी करीत होते. त्याला विनोबांनीं राधाकिसनजींकडें तपास करून मग पाहूं, तूर्त मनुष्य देण्याजोगा नाहीं असें धरून चालावें असें उत्तर दिलें. नंतर बाळूभाईंच्या हिंदुमुसलमान संस्कृतीच्या हस्तलिखीत पुस्तकाची चर्चा निघाली. युद्ध परिस्थितींत कसें वागावें या संबंधींच्या बाळूभाईंच्या लेखनींबाबत बाळूभाईनीं प्रश्न विचारला—

बाळूभाई—“आपण लेख वाचून पाहिलेत ना?”

विनोबा—“होय, बुद्धसेननें वाचलें व मीं ऐकलें.”

बाळूभाई—“आपल्या त्या संबंधीं काय सूचना आहेत?”

विनोबा—“त्यांतला तो चकमकीचा उल्लेख नको असें वाटतें. कारण त्यामुळें तुम्हीं त्या जुन्या युगांत लोकांना नेऊं इच्छिता असा भास होईल.”

बाळूभाई—“मला असें वाटतें कीं पेट्यांचा भाव फार च वाटला तर तसें करावें च लागेल.”

विनोबा—“त्या शिवाय कांहीं सुचवितां येणार नाहीं कां?

कुंदर—“धुनी ठेवावी.”

विनोबा—“अग्निहोत्र आलें तें पूर्वींचें. पण पेटीच्या मानानें त्यांत खर्च कसा काय होईल?”

अनुक्रमणिका

कुंदर—“त्यांत काय गोवरी ठेवावयाची?”

बाळूभाई—“गोवऱ्या जाळावयाच्या नाहींत असें हि आम्ही सांगतों.”

कोणी तरी—“ही पंचाईत च आहे!”

कुंदर—“मग चकमक ही चालेल. शास्त्रीय चकमक वेगळी च आहे.”

विनोबा—“ती वेगळी काय आहे ती अगोदर आपण केली तर ती सांगण्यात मौज. आपण कांहीं च करावयाचें नाहीं आणि लेख लिहावयाचा अशानें काय होणार? ही निष्क्रियता आहे. माझा चकमकीवर आक्षेप नाहीं. आक्षेप आहे आपण कांहीं न करतां लिहिण्यावर. हें मी पाहून च राहिलो आहे. बुद्धीपुरस्पर कोणती च गोष्ट होत नाहीं तुमच्याकडून. मद्रासच्या दौऱ्यांत तेनालीला गेलों. तेथें त्या गृहस्थानें माझा साबू पाहून विचारलें च कीं “हा विलायती साबू वापरण्यांत कांहीं विशेष आहे काय?” शौचाला गेल्यानंतर हात धुण्यासाठी तो साबू बुद्धसेननें घेतला होता. पण त्यांत कांहीं बुद्धि वापरली नव्हती. मध्यें या लोकांनीं आश्रमांत दिवे सुरू केले गोड्या तेलाचे. पण त्यांत प्रकाश मंद पडतो. आतां त्यांनीं कंदील घेतलें. त्यांचा प्रकाश तसा च मंद आहे. आणि ते सगळे जर्मनीचे. आपण जर्मनीचे दिवे वापरावयाचे आणि चकमकीचे लेख लिहावयाचे हें रुचत नाही.”

(बाळूभाईंनीं यापुढें हिंदु मुस्लीम संस्कृतीवर पुस्तक लिहिलें तत्संबंधीं प्रश्न विचारला.)

बाळूभाई—“आपण सगळीं प्रकरणें पाहिलीं कां?”

विनोबा—“मी चाळून गेलों आहे. तुम्ही पॅरिग्राफ पाडले आहेत. त्या पॅरिग्राफची पहिलीं वाक्यें पाहिलीं कीं पुढचा सगळा अंदाज मला झाला च. त्याप्रमाणें सर्व पुस्तक चाळलें.”

बाळूभाई—“त्यांत आपणाला काय वाटते?”

विनोबा—“तुम्ही जो हिंदुमुस्लीम समन्वयाचा भाग लिहिला आहे तो धोक्याचा आहे.”

* * *

२६ जानेवारी १९४२ दुपारीं स्वातंत्र्यदिनासाठीं गांधी चौकांत सूत कांतण्याचा कार्यक्रम ठेवला होता. त्यासाठी विनोबा पायीं नालवाडीहून निघाले. बरोबर शिवाजी, बाळूभाई, रामेश्वरजी, कुंदर, बुद्धसेन वगैरे मंडळी होती. रस्त्यांत बोलणें चालूं च होतें. प्रचारांतले अनुभव शिवाजी सांगत होते. भजन, भोजन, संगीत गोष्टी इत्यादींमुळे खेड्यापाड्यांत प्रचार होऊं शकतो. असें ते म्हणाले. त्यावर विनोबा म्हणाले—“बरोबर आहे. संगीताचा उपयोग आहे च. भोजनाची ही आवश्यकता आहे. प्रसाद शब्द भारतीयेतर भाषणांत भोजन या अर्थीं आढळत नाहीं. अन्नदानांत विशेषता ही कीं तें देण्यांत कसला हि दोष नाहीं. इतर दानांत तसें नाहीं.” मध्ये च ते म्हणाले— “मला जर कोणती प्रेरणा असेल तर ती धर्मप्रचाराची, इतक्यात रस्त्यांत “शादी-लगन” अशी सिनेमाची पाटी त्यांनीं पाहिली. त्यावर ते म्हणाले—“शादी ब्याह” हा शब्द

अनुक्रमणिका

मुसलमानांच्या संस्कृतिक ऐक्याचा—बुध्या घडवून आणलेल्या ऐक्याचा सूचक आहे. जसा हरिहर हा शब्द शैववैष्णवांच्या ऐक्याचा प्रयत्न सूचीत करतो." असें बोलणे चालू असतांच गांधीचौक—जमनालालजींच्या घरासमोरचा तो सुप्रसिद्ध चौक आला. तेथें बैठकी घातल्या होत्या. मोठ्या चौरंगावर गाद्या घालून मोठ्या लोकांसाठीं उच्चासन तयार करून ठेवलें होतें. मोघेजी, शरयुताई, दादा धर्माधिकारी व्यवस्था पहात होते. विनोबा आल्याबरोबर त्यांना उच्चासनावर बसण्यास सांगण्यांत आले. "आमचे पाय धुळीनें भरलेले आहेत. या गादीवर काय बसावें?" असें विनोबा म्हणालें. त्यावर पाय धुण्यास पाणी आणून देऊं? म्हणून शरयुताईंनीं विचारलें—पण विनोबांनीं वर बसण्याचें नाकारलें. बापूजींची तसबीर ठेवा तेथें. असें त्यांनीं सांगितल्यावरून तसबीर ठेवण्यांत आली. तकलीवर सूत कातणारे व चर्ख्यावर सूत कातणारे त्याचप्रमाणें स्त्रिया व पुरुष असे गट केले होते. स्त्रियांमध्ये महिलाश्रमच्या मुली च पुष्कळशा होत्या. जमनालालजी विजार घालून कांतण्याला बसले होते. अर्धा तास हा कार्यक्रम अतिशय सुंदर तऱ्हेनें चालला. नंतर तो बंद करून दादा धर्माधिकाऱ्यांनीं सर्वांकडून स्वातंत्र्याच्या प्रतिज्ञेचा उच्चार करवला आणि हा गंभीर कार्यक्रम समाप्त झाला. विनाकारण भाषणे आणि इतर कार्यक्रम कोणता ही झाला नाहीं.

*　　　　*　　　　*

२६ जानेवारी १९४२ नालवाडी. रात्रीची प्रार्थना. विनोबाजींनीं विणकरांना उद्देशून पुढीलप्रमाणें सांगितलें.—"मी रोज एकदां तरी विणकामांत जातों. पण विणकरांची गती अगदीं च मंद दिसते. याच्या दुप्पट तरी गती होऊं शकेल. हिंदुस्थानांत हा च सर्वत्र रोग आहे. मला मगनलालभाई ही सांगत होते दक्षिण आफ्रिकेंतली गोष्ट. ते तिकडे पुष्कळ दिवस होते. तिथे हिंदी मजूर ८ आण्यांत मिळत असला आणि जपानी मजूर रुपया रोजाचा असला तरी जपानी मजूर ठेवला जातो. कारण हिंदी मजूर रेंगाळत काम करतो. कामाकडे लक्ष देत नाहीं. काम बिघडवतो. एकूण तो परवडत नाहीं. हिंदी मजुराची ही च सर्वत्र जगभर कीर्ती आहे. काम नसेल करावयाचें तर नका करूं, अर्धा वेळ काम करा. त्यांनें अर्धा वेळ रिकामा तरी मिळेल. रेंगाळत मेल्यासारखे काम केल्यानें कांहींच साधत नाहीं. दुसरी गोष्ट पाहिली ती अशी कीं, येथें १७ भाग आहेत, काल मी गेलों तेव्हां पांच च चालू होतें. कां? तर सूत घेण्यासाठीं इतके विणकर खोळंबून राहिले होते. बाळकोबा साबरमतीला होता. त्यानें ताणी संपण्याच्या अगोदर च विणकराजवळ दुसरी ताणी ठेवून द्यावी अशी दक्षता ठेवली होती. तर असा खोळंबा होता कामा नये. तिसरी गोष्ट म्हणजे जपानचा कपडा आतां येणार नाहीं लढाईमुळे. तर विणकरांनीं स्वतः कांतावें, स्वतः विणावें तें महाग पडत नाहीं. ही मी त्यांच्या कल्याणाची गोष्ट सांगतो. चवथी गोष्ट विणकरांच्या घरीं दळलें गेलें पाहिजे. गिरणीच्या पिठांतलें सत्त्व जातें. विणकरांचा—गरीबांचा आधार मुख्यतः धान्य. त्यांतलें सत्त्व जातां कामा नये. विणकर म्हणतील हा बरा जेलमध्ये होता. बाहेर आल्यामुळे आमच्यामागे दळण्याचें लचांड लावतों. तर तसें नाहीं. एथल्या सर्व विणकरांचा हिशेब केला तर वर्षाला दळण्याचे ५० रुपये वाचतील. सकस अन्न मिळेल आणि व्यायाम होईल.

*　　　　*　　　　*

२७ जानेवारी १९४२ सकाळीं ८ वाजतां पवनारकडे फिरण्यासाठीं विनोबा निघाले. त्यावेळीं बाळूभाई, शिवाजी, अच्युतराव, रामेश्वरजी बरोबर होते. तालिमी संघाच्या शिक्षकांसाठीं ५०० पुस्तकांची एक सूची करण्यासंबंधीं विनोबांनीं सांगितलें. त्यापुढें भक्तीसंबंधीं बोलणें निघालें. विनोबा म्हणाले—"मी नागपूर जेलमध्यें असतांना लोक विचारीत महाराष्ट्रीय भक्तीचा विशेष काय? भक्ती, ज्ञान, कर्म हे तीन

मार्ग असतां द्विविधा निष्ठा कां? मी योगाशिवाय संन्यासाचा पुष्कळ प्रयोग केला. पण तो कठीण असा अनुभव आला. योग आणि संन्यास निष्ठा खऱ्या पण त्या भक्तीच्या च. भक्ति वेगळी नाहीं च. महाराष्ट्रीय भक्तीचें स्वरूप देवतेला मातृस्वरूप मानणे हें विशेष दिसतें. विठाई, कान्हाई, गुरुमाउली वगैरे. कदाचित् माझ्या मातृप्रेमामुळें हें भासत असेल. भक्तीमध्यें स्त्रीपुरुषासंबंधींची भक्ती ती मधुरा. तिचा ब्रह्मचर्य हा अर्थ. ज्ञानेश्वरांच्या ज्ञानेश्वरींत याचा थोडा पुरावा आहे. पण त्यांच्या अभंगांत याचा ज्यास्त पुरावा सापडतो. नामदेवांच्या अभंगांत तळमळ अधिक. नामदेवानें विठ्ठल नामाचा प्रचार केला. मिराबाईसुद्धां "विठ्ठल वरने वरी" असें म्हणते. शिखांच्यामध्यें नामदेवानें विठ्ठल प्रचार केला. नामदेव फार मोठा प्रचारक होता. रामदास निरीक्षण करीत करीत फिरले. त्यांनीं कांहीं मठ संघटना केली पण नामदेव त्यांच्यापेक्षां ही मोठे प्रचारक होते. ज्ञानेश्वरींत जें योगशास्त्र आलें आहे तें भक्तीचें महत्त्व दाखविण्यासाठीं." यानंतर "एरसनो स्वाद शंकर जाणै के जाणे शुक जोगी रे, कंई एक जाणे ब्रजनी रे गोपी थणे नरसयो भोगी रे" या पदांतींल 'भोगी' शब्दांचा अर्थ "भोगून" असा नवीन च विनोबांनीं सुचविला. असें बोलणें चालू होतें तों च पवनारचा लाल बंगला आला. तेथें पाय धुऊन विनोबा थोडा वेळ बसले. रामेश्वरजींनीं देवांच्या रामदास रामदासी मासिकांत बापूजींच्यावर चारित्र्यभ्रष्टतेचा आरोप केल्याचें सांगितलें. अशा मासिकांत लेख देणें योग्य होणार नाहीं असें हि त्यांनीं प्रतिपादन केलें. व्यक्तीच्या आरोपासंबंधीं विनोबा म्हणाले हा ज्याच्या त्याच्या परिचयाचा प्रश्न आहे. तुम्हाला अमुक व्यक्ति श्रेष्ठ वाटते त्यांना ती कनिष्ठ वाटते. पण चारित्र्य हें तुमचें मान्य तत्त्व आहे तसें च त्यांचें ही आहे. त्यांचें जेव्हां चारित्र्यशून्यता हें तत्त्व होईल तेव्हां तुमचा त्यांचा विरोध आला असें होईल. विरोध व्यक्तीविषयक येत नाहीं. तत्त्वविषयक येतो. काशीला असतांना मिशनऱ्यांनीं कृष्ण व्यभिचारी म्हणून निंदा केली. त्यांना दुसरे लोक मारायला धावले. मीं सांगितलें कृष्ण कसा ही असो. व्यभिचार दोघांना ही नापसंत आहे. तेव्हां दोघांचा तात्त्विक विरोध कुठें उतरला? यानंतर मंडळींसह विनोबा परत येण्याला निघाले. येतांना उन बरें च होते. विनोबा नेहमींप्रमाणें सपाट्यांत उन्हांतून चालले होते. बाळूभाईंना ते ताठ चालण्यासंबंधीं म्हणाले—"मी पूर्वी थोडासा वांकलों होतो. पण कांही दिवस कंबरेवर हात ठेवून छाती काढून चालण्याचा अभ्यास केला. लोकांना तें विलक्षण भासे. पण आतां सहज झालें ताठ चालणे. ताट चालणें म्हणजे जग जसें मुठींत आलें असें वाटतें. आणि जरा कां वांकले कीं वाटतें सर्व जगाचा भार आपल्यावर आला. आपण त्याखाली दबून जातो. जेवतांनासुद्धां मी ताठ बसून जेवतों. एकदां जेलमध्यें पूनमचंद राका मला म्हणाले, तुम्ही जेवतांनासुद्धा पोटाला ढील देत नाहीं. मी म्हटलें ताठ बसल्यानें पोट माझ्या ताब्यांत राहतें.

*　　　　　*　　　　　*

२८ जानेवारी १९४२ सकाळीं आठ वाजतां विनोबा बाळकोबांच्या झोपडीकडे फिरावयास निघाले. बरोबर शिवाजी, बाळूभाई, अच्युतराव देशपांडे होते. संभाषणास सुरवात झाली.

अच्युतराव—"कुराणांत ब्रह्मचर्याला महत्त्व दिलें नाहीं म्हणतात हें कसें?"

विनोबा—"कोण म्हणतो? कुराणांत वाक्य च आहे कीं हवस म्हणजे वासना नाहींशी करशील तर तुला देवासमोर ताठ उभें राहतां येईल."

अच्युतराव—"हवस म्हणजे वासना यांतून ब्रह्मचर्यांचें अनुमान कसें करावयाचें?"

अनुक्रमणिका

विनोबा—“हवस म्हणजे सामान्य अर्थानें—जनरली—वासना. पर्टीक्युलरली—कामवासना—स्त्रीविषयक वासना.”

अच्युतराव—“मद्रासच्या आपल्या एका भाषणावर उर्दू पत्रांत टीका आली आहे. त्यांत आपण तेथें “हिंदी” शब्दावर कसा आक्षेप घेतला नाहीं असें म्हटलें आहे.”

विनोबा—“हिंदी उर्दू एक च आहे मुळीं. एखाद्यानें दाढी राखली कीं झाली उर्दू. हजामत केली कीं हिंदी एवढा च फरक. मूळ माणूस एक च. हे लोक उगीच च नसते भेद दाखवतात. वास्तविक भेद नाहीं च. मी कुराणांतील दहा बाराशें धातूंचे वेदांतील धातूंशीं साम्य पाहिलें आहे. त्यामुळें मला अरबी—संस्कृत हा भेद च दिसत नाहीं. दोन्ही भाषा सारख्या च वाटतात.”

बाळूभाई—“भारतीय आर्य व ते एक च काय?”

विनोबा—“दोघे हि तिसऱ्या एकाचे वंशज असण्याचा संभव आहे. पण भाषेंत तर पुष्कळ साधर्म्य मी पाहतों. तुमचा ‘खुप’ धातु आहे ना. ‘खुपिया’ मध्यें येतो तो. तो ‘गुप्’ धातुवरून च आला आहे. त्याचें “खौफनाक” मध्यें जें रूप आहे तें ‘क्षुभ्’ वरून आलें आहे. कुराणांत हा धातु ‘खाफ’ वगैरे प्रकारें पुष्कळ वेळां आला आहे. संस्कृत दोन धातूंवरून हा धातु साधला. अथवा राजवाड्यांच्या भाषेंत ते दोन धातू च समजावे. कुराणांत अल्ला शब्दाला कांहीं व्युत्पत्ति नाहीं असें मानतात. पण मी म्हणतों तो ‘आत्मा’ च आहे. अरबी ‘ला’ आणि संस्कृत ‘मा’ एका च अर्थी आहेत. लाम्, मीन, नून—एल्, एम्, एन् एकामागें एक येत असून ते बहुतेक नकारार्थी आहेत. म् चा ल् झाला आणि ‘आत्मा’ चा ‘अल्ला’ बनला. यांत अत् धातू च आहे. ला म्हणजे नकार. एम्—मा म्हणजे संस्कृतांत नकार आणि एन् म्हणजे न म्हणजे नकार हें तर प्रसिद्ध च आहे. राजवाड्यांनीं ज्ञानेश्वरीच्या नवव्या अध्यायाचें संस्कृत भाषांतर केलें आहे. पुरें केलें आहे कीं नाहीं तें माहीत नाही.”

शिवाजी—“पुरें केलें आहे.”

विनोबा—“तें भाषांतर नाहीं म्हणतां येणार. व्युत्पत्तीच्या दृष्टीचें तें भाषांतर आहे. कुराणाचें हि बरेचसे तसे करतां येण्यासारखें आहे संस्कृतांत.

‘इहदिनस् सिरातल् मुस्तकीम’

हा मुस्तकीम् शब्द घ्या. ‘सरळ’ असा त्याचा अर्थ आहे. त्यांत कम् धातु आहे. कायम, मुक्काम, मुकीममध्यें तो येतो. ‘मक्कम’ या गुजराथी शब्दांत तो आला आहे. मराठींत तो भक्कम झाला आहे. गुजराथींत ‘भण’, मराठींत ‘म्हण’ तसा हा प्रकार आहे. मराठींतला खांब हा शब्द स्तंभ् पासून असेल असें पुष्कळांना वाटतें. पण अथर्ववेदांत खंभ् धातु येतो, त्याचा अर्थ टीकाकार स्तंभ देतो. पण तो मूळ स्तंभ धातूवरून च झाला आहे असा संभव दिसतो. ‘हमद्’ धातु पहा.‘स्तु’ चें च तें रुप आहे. ‘स’ चा ‘ह’ झाला. ‘त’ चा ‘द’ झाला. ‘अल् हम्दु लिल्लाहि रब्बिल्’ म्हणजे प्रभु. आणि ‘आलम्’ पर्याप्त पासून झाला. तसाच ‘खतम्’ शब्द हा समाप्तचें रूप आहे. ‘तम्’ ची उलटापालट झाली. अशी उलटापालट होते. त्याला वर्णव्यत्यास म्हणतात. उदाहरणार्थ ‘घमघम’ ‘मघमघ’. ‘उर्दू’ शब्द घे. त्याचा बाजार संघ असा अर्थ आहे ना? Hoard शब्दासारखा

शब्द आहे तो. तो वृंद च आहे. ‘वृद’ म्हणजे समुदाय. उर्दू म्हणजे समुदायाची भाषा. (ही शब्द चर्चा चालू असतां रस्ता थोडासा चुकला. बाळकोबांच्या झोपडीकडे जाण्यासाठीं मग रेल्वे लाईनवर चढावें लागलें. मग पुन्हां बोलणें सुरू झालें).

विनोबा—“कुराण” ‘व्युत्पत्ती’ वगैरे आतां पुरे. आतां दुसरा कांहीं विषय काढा.”

बाळूभाई—“आम्ही काय विषय काढणार. आपण च सांगा आम्हांला.”

विनोबा—“जगाचें मूलतत्त्व हें असें. त्याचें पुढें पंचीकरण झालें. तीं प्रकृति अशी आहे. त्रिगुण असे आहेत—हें सगळें अद्वैताचें आतांपर्यंत चाललेंलें रूप आहे. मला अद्वैताचा अनुभव घेण्याचें म्हणजे ‘सहानुभूती नें घेण्याचें महत्त्व वाटतें’ आतांपर्यंतची तऱ्हा वैज्ञानिक झाली. तें नुसतें जाणणें झालें. सहानुभूति म्हणजे केवळ मनुष्य-मनुष्य स्त्री-पुरुष असा च अर्थ नाहीं. तर मनुष्य-पशु, मनुष्य-वनस्पति असा सगळा अद्वैतानुभव सहानुभूतीनें आला पाहिजे. स्पृश्यास्पृश्यभेद कां असें मीं एकाला विचारलें. तो म्हणाला तुमची समजूत चुकीची आहे. स्पृश्यास्पृश्य भेद नाहीं. पण विवेक आहे. मीं त्याला म्हटलें कीं, स्पृश्यास्पृश्यांत भेद नसून विवेक आहे कीं काय हा मुद्दा अलाहिदा आहे. पण तुझी एक कल्पना मला पटते. भेद आणि विवेक वेगळा. विवेक केला पाहिजे पण भेद असतां कामा नये हें महत्त्वाचें तत्त्व आहे. लग्नाचें घ्या. जातीचा अभिमान म्हणजे वास्तविक लग्नाभिमान आहे. अमुक तऱ्हेचें ब्रीड तयार करावयाचें. त्याला मग विशिष्ट लग्नें लावलीं पाहिजेत, असें येथें आहे काय?—(इतक्यांत बाळकोबांची झोपडी लागली. बाळकोबा उठले. त्यांच्या जवळ च रामदास गुलाटी बसले होते).

विनोबा—“वजन किती आहे?”

बाळकोबा—“११३”

विनोबा—“आहार काय आहे?”

बाळकोबा—“दूध, केळीं, मनुका, लोणी, पोळी.”

(विनोबा कागदावर सर्व आहार टिपून घेतात व टिपलेल्या आहारांतील कॅलरीज् काढून त्यांची बेरीज करतात.)

विनोबा—“हा आहार वजन वाढविणारा तर नाहीं च. पण यांत वजन कमी च होत जाईल. कारण शरीराला पाहिजें तितकें जळण च यांत नाहीं. बरें लोणी न घेतां तूप घेतलें तर?”

बाळकोबा—“लोणी पचायला सुलभ असते ना?”

विनोबा—“पचायला सुलभ म्हणजे सारक आहे. तूप पोषक आहे.”

बाळकोबा—“शेगांवला तर लोणी पचायला सुलभ समजलें जातें.”

अनुक्रमणिका

विनोबा—“शेगांवचे प्रयोग नको सांगू. मी प्रयोग केला तो शेगांवच्या कल्पनांच्या अगदीं विरुद्ध. वेदामध्यें हि कुठें लोण्याचा उल्लेख येत नाहीं. “घृतस्य धारा अभिचाकषीति”—या वेदवचनाचा उल्लेख केला त्यांत थोडा श्रद्धेचा भाग येतो. तर तुपाचा प्रयोग करून पहा.”

बाळकोबा—“मग पाश्चात्य-ग्रंथांत लोण्याची कां प्रशंसा?”

शिवाजी—“त्यांना तूप माहीत च नाहीं.”

विनोबा—“शिवाजी म्हणतो ना त्यांना तूप च माहीत नाहीं म्हणून. तसें च दिसतें.”

रामदास गुलाटी—“उन लोगों में मांस विशेष प्रमाण में खाया जाता है. उनको उतनी फॅट की जरूरत भी नहीं.”

शिवाजी—“लोणी पॅरफिनसारखें आहे.”

विनोबा—“बरोबर आहे. शौचाबिचाला त्यानें साफ होतें. तें पोटांत टिकत नाहीं. तसें च शेगांव चें भाज्याबिज्यांचें खूळ आहे. (शेगांवला डॉ. दास यांनीं भरमसाट भाजी खाल्ली पाहिजे असे प्रयोग चालविले होते) तें उपयोगी नाहीं.”

बाळकोबा—“भाज्यांत क्षार असतात. मिनरल्स असतात म्हणतात ना?”

विनोबा—“मिनरल्स पाण्यांत हि असतात. दुधांत आहेत. मिनरल्सचें काय? भाजी ज्यास्त नको. विनाकारण पोटाला भार का? हें शरीराचें शास्त्र मी फार मोठें कठिण मानीत नाहीं. क्षयरोग किंवा गुडघे दुखणें असा कांहीं रोग च झाला असेल तर गोष्ट वेगळी. बाकी गणितानें शरीर बिनचूक वाढूं शकतें. त्यांत कांहीं कठिण गोष्ट मी मानीत नाहीं.”

—आणखी थोडा वेळ बसून विनोबा परत जाण्यास निघाले. रस्त्यांत बाळूभाईंशीं बोलणें चालू होतें.

बाळूभाई—“मोठ्या लोकांचीं मुलें चांगलीं असें क्वचित् च दिसतें. फक्त जवाहरलालजींचें च एक उदाहरण आहे. टिळकांचीं मुलें चांगलीं निघालीं नाहींत. बापूजींचा हिरालाल हि वाईट निघाला.”

विनोबा—“बापूंच्या दुसऱ्या मुलांमध्यें चांगलेपणा आहे. म्हणजे प्रयोग पूर्ण निष्फळ झाला नाहीं. (सगळे हंसतात.) पुत्र तीन प्रकारचे. औरस, दत्तक आणि मानस. औरस पुत्रांत आईबापांचे गुणदोष उतरणें शक्य असतें व तो इस्टेटीचा सारखा च हक्कदार होतो. दत्तक पुत्राला इस्टेटीचा हक्क असतो पण आईबापांचे गुणदोष त्यांच्यांत येत नाहींत. मानसपुत्रांत इस्टेट हि नाहीं आणि गुणदोष हि नाहींत. गीतेंत म्हटलें आहे ना—‘मद्भावामानसा जाता!’ इतक्यांत नालवाडीची झोंपडी आली. बाळूभाई, शिवाजी, अच्युतराव वगैरे जेवण्यासाठी निघून गेले.”

*			*			*

अनुक्रमणिका

ता. २९ जानेवारी १९४२ गुरुवार. नालवाडी सकाळीं ८ वाजतां. गोपाळराव झोपडींत बसले होते. शिवाजी व बाळूभाई येऊन बसतात.

विनोबा—“(कुराण वाचन बंद करून गोपाळराव काळ्यांना)” या गतीनें मी आणखी दोन वर्षांत मौलाना बनेन.

गोपाळराव—“दोन वर्षें कशाला लागताहेत तुम्हांला?”

विनोबा—“सध्यां ज्यास्त वेळ देत नाहीं. तसा पुष्कळ वेळ दिला कुराण वाचनाला तर काय सहा महिन्यांत सुद्धां मौलाना होतां येईल.” (असें म्हणून विनोबा उपरणें घेऊन फिरावयास जाण्यासाठीं उठले. बरोबर शिवाजी, गोपाळराव, बाळूभाई, अच्युतराव व कुंदर होते. फिरतांना बोलणें सुरू झालें.)

गोपाळराव—“होय. तें कळलें मला. परवां गोसेवेसंबंधीं चर्चा चालली होती जमनालालजींकडे. सूर्यभानच्या लग्नासंबंधीं हि बोलणें निघालें होतें. नामदेवरावाची मुलगी आश्रमांत राहिली आहे तेव्हां जबाबदारी एक प्रकारें जमनालालजी मानतात. सूर्यभानला यासाठीं बोलावणें पाठविलें आहे. सूर्यभान म्हणत होतां मला यांत विचारण्याचें कारण नाहीं. तुम्ही कराल तें मला प्रमाण च आहे.”

विनोबा—“तसा तो मुलगा चांगला आहे.”

गोपाळराव—“तो इकडे तिकडे पुष्कळ फिरला. मुंबईला स्वतंत्र राहिला तरी तो बिघडला नाहीं हें च पाहयचें.”

विनोबा—“होय. ही गोष्ट खरी आहे. त्यानें हिंदुस्थानभर प्रवास हि केला आहे. उदयशंकर बरोबर. तुमची गोसेवासंघाची सभा आली आहे तर तुम्ही कांहीं विचारबिचार केला कीं नाहीं?”

गोपाळराव—“आम्ही गोरक्षण केलें होतें थोडेंसें एकदां. त्यावरून बनलेले आमचे कांहीं अनुभव आहेत. ते आम्ही मांडूं. पण इतर लोकांपुढें मांडण्याची आमची हिंमत नाहीं. तुमच्यापुढें मांडू पाहिजे तर.”

विनोबा—“काय तुमचा अनुभव?”

गोपाळराव—“बापाचा मुलीवर आणि आईचा मुलावर परिणाम होतो हा जो तुमचा विचार त्याचा अनुभव आला आहे. तसा वळूचा मुख्य परिणाम होतो च. पण गाय जर चांगली असेल तर बैल चांगले होतात. व वळू चांगला असला तर वासऱ्या चांगल्या होतात.”

विनोबा—“विचारपोथींत मी हा विचार लिहून ठेवला आहे. कारण त्या शिवाय सृष्टींत समता जमेल कशी? बॅलन्स राखण्याचा मुद्दा आहे त्यांत सृष्टीचा.”

गोपाळराव—“विचारपोथींत हा विचार आहे कीं नाहीं तें मला आठवत नाहीं. पण तुमच्याकडून तो ऐकला आहे खरा. तुम्हांला मुख्य भाषण करावें लागणार आहे परिषदेंत.”

अनुक्रमणिका

विनोबा—“कां? बापू उद्‌घाटन करणार आहेत. त्यांचें भाषण होईल च.”

गोपाळराव—“तरी पण तुम्हांला बोलावें लागणार च.”

विनोबा—“तें बोलूं. मला भाषण लेखी मागत होते. मीं म्हटलें तशी माझी पद्धत नाहीं. वेळेवर बोलेन मी.”

गोपाळराव—“बरोबर आहे. त्यांत स्फूर्ति रहात नाहीं. काय बोलणार त्याचा थोडा अंदाज?”

विनोबा—“बोलूं साधारण बापूंच्या भाषणाकडे पाहून. कांहीं त्यांचें म्हणणें विस्तारूं, कांहीं नवीन सांगूं.”

गोपाळराव—“बापूजी धनुष्य-तकली, धनुष्य-तकली म्हणून राहिले आहेत. तिचा प्रचार त्यांच्या लेखांत करीत आहेत. तुमच्याकडे तसें कांहीं दिसत नाही?”

विनोबा—“मला नव्या तुनाईचा प्रचार करावयाचा आहे. तुम्ही सुद्धां करां थोडें काम म्हणजे तुम्हांला हि कळेल त्याचें शास्त्र.”

गोपाळराव—“पण येथें धनुष्य-तकल्या सरंजाम-कार्यालयांत मिळत हि नाहींत. एकदां विचारलें होतें तेव्हां धनुष्य-तकली प्रयोगावस्थेंत आहे म्हणून येथें करीत नाहींत असें कळलें.”

विनोबा—“त्यांत प्रयोग कसला. तकलीसारखें च आहे तें. मांडीवर कांततो तसें च धनुष्यतकलीचें.”

गोपाळराव—“पण चर्खे तयार करणें जड. येथें धनुष्य-तकलीची जरूरी आहे. म्हणून तिच्या प्रचाराची आवश्यकता आहे.

विनोबा—“प्रचाराची आवश्यकता आहे नई तुनाईबद्दल. कारण त्यामुळें पिंजण्याचा प्रश्न सुटतो. कांतण्यावांचून अडलें नाहीं. अडलें आहे पिंजण्याशीं तें जर सिद्ध होईल तर हां हां म्हणतां लोक कांतूं लागतील, इतकी त्यांत शक्ति आहे.”

गोपाळराव—“शहरांत आम्ही कांतणे सुरूं केलें आहे.”

विनोबा—“शहरांतलें कांतणें उपयोगी नाहीं. शहरांत कापड पुरविण्याची योजना आम्ही केली आहे. हां, कार्यकर्त्यांना शिकवावयाचें असेल तर गोष्ट निराळी. जसें मीं रामेश्वरजींना सुरगांवला पाठविलें आहे. बाळूभाईंना नई तुनाई शिकून घ्यायला सांगितलें आहे. मला तुनाईचा प्रचार कसा होईल ही चिंता च नाहीं. बापूंजवळ एखादा एक्सपर्ट घेऊन जाईन व त्यांना खांडणविंचरण दाखवून तुनाईवर लेख लिहून त्यावर सही करा म्हणेन कीं झाला प्रचार.”

अनुक्रमणिका

(इतक्यांत एकदम शिवाजी प्रश्न विचारतात)

शिवाजी—“गीतेंत त्रिगुणातीत सांगितला आहे. त्यांत प्रकाश, मोह, उद्योग म्हणजे सत्त्व, रज, तम प्राप्त झालें असतां खेद किंवा आकांक्षा त्याला नाहीं असें म्हटलें आहे, तें लक्षांत येत नाहीं. वास्तविक सत्त्वगुण पाहिजे. रजतम नको असें असावयास पाहिजे.”

विनोबा—“त्रिगुणातीतावर कोणाचें च भाष्य नीट झालेंलें दिसत नाहीं. ज्ञानेश्वरांनीं तर फार च घोटाळा केला आहे. किंवा ते काय लिहितात तें नीट समजत नाहीं. शंकराचार्यांनीं कांहीं बरें लिहिलें आहे. माझ्या म्हणण्याप्रमाणें उपक्रमाने उपसंहार केला आहे.”

**इदं ज्ञानमुपाश्रित्य मम साधर्म्यमागताः ।**
**सर्गेऽपि नोपजायंते प्रलये न व्यथंति च ॥**

यांत सर्गप्रलयाची गोष्ट काढली आहे. ते माझ्या साधर्म्याला आले ज्ञानाचा आश्रय करून म्हणजे मग त्यांना सर्ग म्हणजे उत्पत्तीनें किंवा प्रलयानें कांहीं होत नाहीं हें दाखविलें आहे, उपसंहारांत—

**प्रकाशं च प्रवृत्तिं च मोहमेव च पांडव ।**
**न द्वेष्टि संप्रवृत्तानि न निवृत्तानि कांक्षति ॥**

राजसिकाला रजोगुण हवा, तामसाला तमोगुण हवा, सात्त्विकाला सत्त्वगुण हवा. पण सत्त्व, रज, तम तिन्ही हवे असा कोणी दिसतो कां?”

शिवाजी—“नाहीं.”

विनोबा—“तसा जो तो आसक्त. आसक्ताला सत्त्व, रज, तम नष्ट झालें तर त्यांची आकांक्षा असते. म्हणजे जगाची आकांक्षा असते. त्याच्या उलट विरक्ताला म्हणजे मुमुक्षूला सत्त्व, रज, तम, प्रवृत्त झाले म्हणजे सृष्टीची प्रवृत्ति झाली तर त्याचा द्वेष वाटतो. जग हें विरक्ताला शत्रु वाटतें. गुणातीताला तसें कांहीं च नाहीं. म्हणून संप्रवृत्तानि’, ‘निवृत्तानि’ या भाषेनें तिन्ही एकदम घेतलीं पाहिजेत असें दिसतें.”

शिवाजी—“त्रिगुणातीताला स्वतःला सत्त्वगुण पाहिजे. रजतम नको असें नाहीं कां?”

विनोबा—“त्रिगुणातीताचा हा श्लोक हि आहे त्याची व्याख्या. त्याला देह आहे तेव्हां त्याला सत्त्व, रज, तम तिन्ही आहेत. ते त्याच्या ठिकाणीं निरुपद्रवी आहेत. झोंप आली तर तो झोंपेल. ‘निद्रा समाधिस्थितिः’—तेथें शांति असेल. रजोगुण असला तर तो सत्कर्मे करील. अशी त्याची अवस्था आहे. मी शरीर नव्हे, मी च आत्मा आहे. मला या अवस्था लागू नाहींत, अशी त्याची स्थिति असेल. एकदां बाबा गर्द्यांनीं मला प्रश्न विचारला. “ज्ञानी पत्ते खेळेल कीं नाहीं? मीं त्यांना म्हटलें—“पत्ते खेळणें हें चित्तशुद्धीचें साधन म्हणून त्यानें पूर्वी केलें. तें सिद्धावस्थेंत तसें च चालू राहिलें असें तुम्ही कल्पितां कां? तर तसें नाहीं. मग तो कशासाठीं खेळेल? तो खेळेल कीं नाहीं हें मी सांगत नाहीं. पण तो जरी खेळला तरी त्या त्याच्या खेळण्यानें लोकसंग्रह होईल च. कारण पुष्कळसे लोक पत्ते खेळतांना भांडतात, जुगारी करतात, ती

अनुक्रमणिका

त्याच्या खेळण्यानें टळेल. लोकसंग्रहाची व्याख्या च "लोकस्य उन्मार्ग प्रवृत्तिनिवारणं लोकसंग्रहः" अशी केली शंकराचार्यांनीं. तेव्हां तो खेळेल पत्ते. पण खेळेल च असें हि नव्हें. खेळणार च नाहीं असें हि नाहीं. पण तो जें काय करील त्यानें लोकसंग्रह होईल च. हें मात्र निश्चित. आणि त्यानें कांहीं नाहीं केलें तरी लोकसंग्रह होईल."

शिवाजी—"मग निषिद्ध कर्मांचें कसें? त्यानें निषिद्ध कर्में केलीं तर लोकसंग्रह होईल."

विनोबा—"तें आहे ना—

**यस्य नहंकृतो भावो बुद्धिर्यस्य न लिप्यते ।**
**हत्वाऽपि स इमांल्लोकान्नहंति न निबध्यते ॥**

त्यावर शंकराचार्यांनीं लिहिलें आहे कीं तो निषिद्ध हि कर्में करून त्याला लेप लागत नाही. "तो निषिद्ध कर्में करूं" असें ज्ञानदेवांनीं लिहिलें आहे. तें भाष्याला अनुसरून लिहिलें आहे. पण ही व्याख्या आहे. ज्ञान हें अनंत आहे. त्या अवस्थेला पोंचलेला ज्ञानी मनुष्य, दाखवावयाचा तर तो हि अनंत दाखवावा लागतो. त्याला सांत भाषा चालत नाहीं. एक तर तो कर्म मुळींच करीत नाहीं. दुसरें तो सर्वकाळ सर्व कर्में करतो. असें दुहेरी म्हणावें लागतें. तेव्हां ती व्याख्या होते. दोन टोकें मिळावीं लागतात. जें शंकराचार्य ज्ञान्याच्या ठिकाणीं यत्किंचित् हि कर्म मानीत नाहीं तें सामान्य कर्म तर राहूं च दे निषिद्ध कम हि तो करतो असें म्हणतात याचा हा अर्थ आहे. (या वेळीं झोपडींत सर्वांनी प्रवेश केला व चटईवर सर्व बसले.) पण ज्यांना ज्ञान्याच्या हातून लोकसंग्रह व्हावा असें वाटतें, अशा पंथाचे जे लोक टिळकांसारखे आहेत—त्यांना हां अर्थ मान्य होत नाहीं. ते मग म्हणतात ज्ञान्यानें सत्कर्म च केलें पाहिजे. आणि व्यवहारी भूमिकेंत उतरलें म्हणजे ते म्हणणें बरोबर हि आहे. पण ज्ञान्यानें काय करावें हें आम्हीं अज्ञान्यांनीं कशासाठीं ठरवावयाचें? त्याला तें समजत नाहीं तर तो ज्ञानी च कशाचा? म्हणजे असें कीं, ज्ञान्याला लोकसंग्रह करावा लागत नाहीं. तर तो त्याच्या हातून होतो च. तो सहज आहे. ज्ञानी माणसांचा लोकांवर परिणाम व्हावयाचा तो च लोकसंग्रह."

गोपाळराव—"हें म्हणणें ठीक आहे. पण याच्या उलट जी तुमची कसोटी कीं ज्ञान्याचा परिणाम नाहीं झाला तर तो ज्ञानी कशाचा? हें आम्हांला पटत नाहीं."

विनोबा—"मग ज्ञानाची कसोटी काय?"

गोपाळराव—"ज्याचें त्याचें प्रारब्ध असतें त्याप्रमाणें त्याचा विकास होतो. म्हणून समजा ज्ञान्याच्या संगतींत राहिलेल्या मनुष्यानें चोरी केली तर तेवढ्यानें ज्ञानी हा ज्ञानी च नाहीं हें तुमचें म्हणणें मला पटत नाहीं. तें त्या माणसाचें प्रारब्ध आहे."

विनोबा—"पण त्याच्या प्रारब्धानें च याला सत्संग लाभला ना? तर त्या लाभलेल्या सत्संगाचा परिणाम अपेक्षित नाहीं काय?"

गोपाळराव—"परिणामाची अपेक्षा ठीक आहे. पण परिणाम न झाला तर त्यांत ज्ञानी माणसाची उणीव कशी हें आम्हांला समजत नाहीं."

अनुक्रमणिका

विनोबा—“हें तर काय पण ज्ञानी माणसाला फोड झाले तरी त्याला पूर्ण आत्मज्ञान नाहीं असें बापू मानतात ना?”

गोपाळराव—“तें आम्हांला पटत नाहीं. काय म्हणे रामकृष्णांना गळ्याला फोड झाले. तर ह्यांना पूर्ण ज्ञान नव्हतें. (हात जोडून) म्हणजे आतां कमाल च झाली. रौक्व ऋषींना हि ज्ञान नव्हतें असें तुम्हीं म्हणणार?”

विनोबा—“होय. आम्ही तर म्हणतों च.”

गोपाळराव—“फोडांचा आणि ज्ञानाचा काय संबंध आहे?”

विनोबा—“ज्ञानी म्हणजे सत्त्वगुणी समजतां कीं नाहीं?” सत्त्वगुणाचा परिणाम काय आहे? ‘प्रकाशकम् अनामयम्’ या ‘अनामय’ शब्दाकडे कांही लक्ष द्याल कीं नाही?”

गोपाळराव—“त्याचा शारीरिक अर्थ नाहीं घेत आम्हीं.”

विनोबा—“मग गीतेंत सात्त्विक राजस तामस आहार कशासाठीं सांगितला? राजस आहार रोगवर्धक म्हटला आहे ना?”

गोपाळराव—“म्हटला आहे. पण त्याचा ज्ञानाशीं संबंध नाहीं. ज्ञान्याला काम नसेल, क्रोध नसेल हें आम्ही मानतो. पण म्हणे डोकें दुखलें झालें गेलें ज्ञान लगे च. हें आम्हांला पटत नाहीं. आतां आम्हीं तुमच्या सहवासांत राहिलों ३० वर्षे. मग तुम्ही आम्ही सारखे झालों कां? ‘आपुल्यासारीखे करिती तात्काळ’ हें मी मानीत नाहीं. हा ज्याच्या त्याच्या प्रारब्धाचा विषय आहे. ज्ञानी फक्त चांगलें वातावरण उभें करतों. आतां नाहीं त्याचा परिणाम झाला तर तो काय करणार त्याला?”

विनोबा—“मी आपुल्यासारिखे करण्याची गोष्ट बोलत नाहीं. मी फक्त त्याच्या संगतींतल्या माणसांकडून निषिद्ध कर्में होणार नाहींत एवढा च परिणाम अपेक्षितों. आणि शंकराचार्यांनीं बिनचूक तसा च लोकसंग्रहाचा अर्थ सांगितला आहे. ‘लोकस्य उन्मार्गप्रवृत्तिनिवारणं’ म्हटलें आहे ना? लोकांच्या उन्मार्गप्रवृत्तिनिवारणापासून ‘आपणासारिखे करिती तात्काळ’ एथपर्यंत लोकसंग्रहाचा प्रांत आहे. पण कमींत कमी एवढें तर मानलें च पाहिजे ना कीं, ज्ञानी स्वतः लग्न करणार नाहीं, कारण त्याच्या ठिकाणीं काम च नाहीं, तर काम्य-कर्म कसें होणार? पण तो दुसऱ्याला विवाहाचा सल्ला देऊं शकेल. पण व्यभिचाराचा, चोरीचा, खुनाचा, निषिद्ध कर्मांचा सल्ला देईल का? त्याच्या संगतींतले लोक विवाह करोत, पण ते व्यभिचार, चोरी करतील तर ज्ञानी माणसाच्या ज्ञानीपणाला कमीपणा आला नाहीं का?’

गोपाळराव—“ज्ञानी खुनाचा सल्ला देणार नाहीं. पण खुनी मनुष्य त्याच्या संगतींत असला म्हणजे तो ज्ञानी ज्ञानी च नव्हे हें आम्हांला पटत नाहीं.”

विनोबा—"तुम्हांला माहीत आहे ज्ञान झालें म्हणजे त्याच्या इंद्रियांतून प्रकाश फैलावतो असें म्हटलें आहे गीतेनें? ज्ञानाचा प्रकाशच जर दिसेना बाहेर तर तें ज्ञान कशाचें? लोक—त्याच्या बाजूचे—हा आरसा च आहे ज्ञान्याच्या ज्ञानाचा."

गोपाळराव—"असें ज्ञानी माणसानें म्हणावें हें मला मान्य आहे. त्यांत कांहीं वाईट नाहीं."

विनोबा—"नाहीं. खोटें च कशाला तसें मानावें? वस्तुस्थिति नसतां असें मानणें ही एक मोठी च हिंसा होईल. खोटी च कल्पना करावयाची, मग जवळच्या माणसाच्या दोषाबद्दल गांधीप्रमाणें उपवास करावयाचें हें फार मोठें हिंसाकर्म होईल."

गोपाळराव—"तुमचें हें समजत नाहीं कीं परिणामावरून कसें माप काढतां तुम्हीं ज्ञानाचें? बिहारचा भूकंप झाला तर तो आमच्या च पापामुळें झाला हें सगळे संबंध आमच्या लक्ष्यांत येत नाहींत."

विनोबा—"आधीं भूकंप झाला हा पापामुळें झाला हें तरी तुम्ही मानतां कां? मग कोणत्या पापामुळें झाला ते पुढें पाहूं."

गोपाळराव—"पापामुळें भूकंप झाला हें आम्ही मानीत नाहीं. पण पापामुळें झाला असें मानलें तर त्यांत कांहीं बिघडत नाहीं. आपल्या सुधारणेला त्याचा उपयोग होईल. ईश्वर नसला तरी त्याचा उपयोग आहे असें कित्येक म्हणतात तसें आमचें आहे."

विनोबा—"हें बरोबर नाहीं. जसें वाटत असेल तसेंच मानलें पाहिजे. हा प्रॅग्मॅटिझम उपयोगी पडणार नाहीं."

गोपाळराव—"मग भूकंप हा पापाचा च परिणाम कशावरून?"

विनोबा—"कोण म्हणतो? तो ज्याला जसा लागू होईल त्यावर अवलंबून आहे. एखाद्याला जर भूकंपामुळें अगदीं आनंद झाला. समाधि लागली तर तो त्याच्या पुण्यामुळें झाला म्हणावयाचा."

गोपाळराव—(हसत) "म्हणजे मग सीतेंप्रमाणें त्यानें, हे धरणीमाते! मला ठाव दे! असें च म्हणावयास पाहिजे!" (सगळे हंसतात)

विनोबा—"भूकंप झाला तो पृथ्वीच्या पोटांतल्या हालचालींनें झाला. पण तो आम्हांला दुःखकारक लागू पडला म्हणजे आमच्या पापामुळें च. असें हें आहे. म्हणून कमींत कमी ज्ञान्यानें आपल्या संगतींत असलेल्यांच्या हातून निषिद्ध कर्में झालीं तर आपलें ज्ञान तेवढें कच्चे असें मानलें च पाहिजे, हा मूळ मुद्दा लक्षांत घेतला पाहिजे."

गोपाळराव—"तें बापूंचें म्हणणें आम्हांला पटत नाहीं. आतां तें आम्ही बापूंना सांगत नाहीं. तुम्हांला सांगतों."

अनुक्रमणिका

विनोबा—“खोलींत दिवा असेल तर खिडकींतून प्रकाश पडेल ना? यांत न समजण्याजोगें काय आहे? ज्ञानाचा प्रकाश हा गुण आहे. तो जर न दिसेल तर ज्ञान नाहीं हें सिद्ध होतें. बापूंचें म्हणणें मला पटतें.”

गोपाळराव—“शंकराचार्यांना भगंदर झालें ते ज्ञानी नाहींत, रामकृष्ण परमहंसांना गळूं झालें तें ज्ञानी नाहींत. दयानंद विषप्रयोगानें मेले ते ज्ञानी नाहींत, हृदयनाथवर परिणाम झाला नाहीं रामकृष्णांचा, गेलें त्यांचें ज्ञान! म्हणजे तुमच्या म्हणण्याचा अर्थ असा कीं, जगांत तुमच्या व्याख्येप्रमाणें ज्ञानी कोणीच झालें नाहींत!”

विनोबा—“असें मीं केव्हां म्हटलें? माझें म्हणणें असें कीं, जगांत ज्ञानी पुष्कळ झाले पण तें ज्ञात च कुठें झालें? हे जे सगळे दिसतात तुम्हांला ते त्यांच्या निरनिराळ्या गुणांमुळें प्रसिद्ध दिसतात. शंकराचार्यांच्या ठिकाणीं रजोगुण असावा हें तर त्यांच्या भाष्यावरून हि दिसतें. ‘माझें नामरूप हारपो’ असें म्हटलें आहे ना ज्ञानेश्वरांनीं?”

गोपाळराव—“पण त्यांचें नांव राहिलें आहे च!”

विनोबा—“त्यांचा प्रयत्न तसा होता, पण तो साधला नाहीं पुरा. खरा ज्ञानी आत्मरूप च होईल. बस् लोक म्हणतील याचें नांव काय करावयाचें—आत्मा—आत्मा—आत्मा! असें त्याच्या बाबतींत होऊन जाईल. उपनिषदांचे ऋषि त्यांनीं एवढें ज्ञान दिलें पण त्यांचें नांव कोठें राहिलें?”

गोपाळराव—“ज्ञानाचा प्रकाश पडतो असें तुम्ही च म्हणता ना?

विनोबा—“प्रकाश पडतो म्हणजे का त्याचें नांव टिकून राहतें? टिकण्यावर काय आहे? सात्त्विक माणसानें बांधलेली झोपडी?? टिकली नाहीं. आणि ताजमहाल अजून दिसतो म्हणजे ताजमहाल बांधणारा हा ज्ञानी थोडा च ठरणार!”

गोपाळराव—“बरें, तुमचे डोळे बिघडले आहेत तर तुम्ही आत्म ज्ञानी नव्हे असें म्हणावयाचें काय?”

विनोबा—“माझा प्रश्न च काय? बरें, बाळूभाई तुम्हांला पटतो कां हा विचार?—रामकृष्णांना गळूं झालें तर तो अज्ञानाचा परिणाम असला पाहिजे.”

बाळूभाई—“होय. खाण्यापिण्याच्या कमीजास्तपणाचा हा परिणाम दिसतो.—पण आपले डोळे पूर्वी एकदां बिघडले होते. पण त्यामुळें आपल्या ज्ञानाला बाध येतो असें कसें?”

विनोबा—“हा प्रश्न वेगळा आहे. कसें हि असो. मी असें मात्र मानतो कीं ज्ञान्याचें आरोग्य उत्तम असलें च पाहिजे. बापू सुद्धां मानतात.”

अनुक्रमणिका

शिवाजी—“भौतिक ज्ञानाच्या अभावीं समजा त्याच्या अन्नांत नकळत वीष मिसळलें गेलें तर त्याला रोग होईल कीं नाहीं?”

विनोबा—“जर त्याची जीभ शुद्ध जीभ असेल तर त्याला तत्काळ कळेल. अन्न ग्रहण च होणार नाहीं.”

गोपाळराव—“प्राचीन काळचे ऋषि मांस खात असत त्यांना हि तुम्ही अज्ञानी ठरवाल.”

विनोबा—“आम्ही आज दूध पितों. दोन लाख वर्षांनीं कदाचित् पोरेंसुद्धां म्हणतील कीं हे कसे लोक होते? आचळे ओढून दूध पीत होते!—पण. त्या त्या वेळच्या समाजांत मानल्या गेलेल्या निषिद्ध गोष्टि तरी ज्ञान्याच्या संगतींत असलेल्यांच्या हातून घडूं नयेत ही ज्ञानाची कसोटी मानावी च लागेल. (या सगळ्या संवादांत ११ वाजले. मंडळी उठली.)

विनोबा—“पुष्कळ झाले. विषय बरा पिंजून निघाला.” (आलेंलें इंग्रजी वर्तमानपत्र दत्तोबांस वाचावयास सांगितलें. मंडळीं हि तें वाचन थोडें एकून आपापल्या उद्योगाला निघून गेलीं.)

तारीख २९ जानेवारी १९४२ गुरुवार. दुपारची ३॥—४ ची वेळ. शिवाजी कुंदरच्या जवळ खांडणविंचरण करीत होतें. इतक्यांत चावदस भाऊंनीं विनोबा बोलावतात म्हणून सांगितलें. लगे च शिवाजी उठून विनोबांच्या झोपडींत गेले. बाळूभाई मेहता यांच्याबरोबर बोलणें चालू होतें. (बाळूभाईंनीं पश्चिम खानदेशांत आश्रम स्थापण्यासंबंधी प्रश्न काढला होता.)

विनोबा—“आश्रमासारखी जीवनसंस्था स्थापावयाची तर ती स्वाभाविक व्हावी लागते. कृत्रिम तऱ्हेनें होऊं शकत नाहीं. आपल्याजवळ श्रद्धायुक्त अशीं भक्कम माणसें असावीं लागतात. तीं आगाऊ तयार नसतां आश्रम तयार होऊं शकत नाहीं. शिवाय आश्रम ही प्रयोगाची—लेबोरेटरीसारखी—संस्था. ती सगळी च अद्‌भुत. तेथें अद्‌भुत शोध लागतील तसें कांहीं च व्हावयाचें नाहीं. तेव्हां या दृष्टीनें आश्रमला लागणारा पैसा हि अतिशय स्वाभाविकपणें श्रद्धायुक्त तऱ्हेनें आला पाहिजे. सार्वजनिक फंड जसे करतात तशा तऱ्हेचा तो पैसा उपयोगाचा नाही. माझ्या अनुभवावरून हि असें च दिसतें. माझ्यापाशीं आगाऊं च कांहीं माणसें काम करणारीं तयार होतीं. श्रद्धेचीं. तसें च मला जो पैसा मिळाला आहे तो अतिशय श्रद्धेनें मिळाला आहे. रामेश्वरजींनीं कांहीं हजार रुपये—किती ते नक्की माहीत नाहीं.—दिले. तसें च सीतारामजींचें. मी सहज सार्वजनिक कामाला प्रत्येकानें मदत करावी अशासारखें कांहीं बोलत होतों. तें त्यांनीं ऐकलें आणि लगे च सुरुवात करून दिली. ते उत्पन्नाचा एक दशांश देतात. त्यांचे पांचशे रुपये मीं महारोगी-सेवा-मंडळाला दिलें. कारण इतक्या श्रद्धेचे ते पैसे त्या कामांत खर्च केलेले बरें. जमनालालजींचें हि असें च आहे. त्यांच्या ठिकाणीं अपार श्रद्धा आहे. आपण आश्रम काढला तर आपलीं मुलें त्यांत पाठविलीं पाहिजेत ही त्यांना तळमळ! आपण आश्रमवासी झालें पाहिजे अशी त्यांची श्रद्धा! राधाकिसन, कमलनयन, मदालसा, अशांना ते ठेवत च गेले. तर अशी स्थिति असल्याशिवाय आश्रमासारखी जीवनसंस्था निघूं शकत नाहीं. पण तिच्या अभावीं तुम्ही असें करूं शकता—आपण व्यक्तिगत प्रार्थना करतों तर ती सामुदायिक करावी. सकाळीं नाहीं लोक येणार तर संध्याकाळीं तरी जमवावें. तसें च सूत कांतण्याचें. सूत कांतणें सामुदायिक होईल तितकें करण्याचा प्रयत्न करावा. शिवाय ज्या ज्या म्हणून संस्था असतील तेथें मधून मधून जावें, तेथें कांहीं सेवा करावी. त्यांना सूत कांततों शिकवितों म्हणावें. त्यांच्यांत मिसळावें. कधीं तेथें जेवण्याला च जावें असें करतां

अनुक्रमणिका

करतां माणसें हातीं लागावयाचीं, सामुदायिकता यावयाची आणि सेवा व्हावयाची. हिंदुस्थानांत असें दिसतें कीं, व्यक्ति आपल्या जोरावर कांहीं काम करतात. पण सामुदायिकता त्यांत येत नाहीं. कार्यकर्ते श्रीमंत वर्गांतून मिळत नाहींत, अगदीं बकाल वर्गांतून हि कार्यकर्ते मिळत नाहींत, कारण त्यांना सर्वच तंगी असते. कार्यकर्ते बहुधा मध्यम वर्गांतून मिळतात. (इतक्यांत तेथें भाऊ तुनाई करण्यासाठीं आला. आणि मग त्याला तुनाई संबंधीं सांगण्यांत सगळा वेळ गेला. विनोबाजींचे डोळे तपासावयाचे होते. त्यासाठीं बजाजवाडींत जमनालालजींनीं बोलावलें होतें. तेथें डॉ. मोघा यांच्याकरवीं जमनालालजींनीं नेत्रयज्ञ करविला. म्हणजे हजारों लोकांच्या डोळ्यांतला मोतीबिंदु एकेका मिनिटांत ऑपरेशन करून त्यांनीं काढला. इतके ते प्रवीण होते. त्यांच्याकडून विनोबांचे डोळे तपासविण्याचा आग्रह जमनालालजी कां धरणार नाहींत?—त्याप्रमाणें विनोबा निघाले. बरोबर बाळूभाई, शिवाजी, कुंदर, भाऊ वगैरे मंडळी होती. रस्त्यांत प्रश्नोत्तरें चालू झालीं.)”

शिवाजी—“त्रिगुणातीताच्या श्लोकांत स्थितप्रज्ञाच्या श्लोकांसारखी स्पष्टता भासत नाहीं. ती केवळ व्याख्या दिसते. त्यांत साधन दिसत नाहीं.”

विनोबा—“कां? पहिले दोन श्लोक त्रिगुणातीताच्या व्याख्येचे आहेत. पुढचे दोन साधनाचे आहेत.”

शिवाजी—“लोकसंग्रह म्हणजे उन्मार्गप्रवृत्ति निवारण हें खरें. पण हा अर्थ त्या शब्दांतून कसा निघतो तें लक्षांत येत नाहीं.”

विनोबा—“लोकसंग्रह म्हणजे लोकांना जमवणें नव्हें. तर लोक जे उन्मार्गांत भिन्न भिन्न फाकले गेले आहेत त्यांना वाटेवर आणणें. संग्रह करून हा अर्थ होऊं शकतो. उन्मार्गांत जे भेदले गेले आहेत ते सन्मार्गाच्या वाटेवर आणावयाचे.”

शिवाजी—“मी चि कर्मीं न वागेन जरी आळस झाडुनी—या वाक्यांत भगवंताला आळस असतो असें दिसते हें कसें?”

विनोबा—“हें वाक्य ईश्वराला लागू नाहीं. देहधारी व्यक्तिला लागू आहे. कृष्णानें स्वतःचा दाखला दिला आहे.”

शिवाजी—“न मे पार्थाऽस्ति कर्तव्यं असें हि म्हटलें आहे.”

विनोबा—“तें म्हटलें आहे पण तें ज्ञानी पुरुषाच्या व्याख्येप्रमाणें म्हटलें आहे. देहधारी पुरुषाला लोकसंग्रह हा राहतो च. पण त्यांत हें लक्षांत ठेवलें पाहिजे कीं ‘लोकसंग्रहमेवाऽपि’ ही भाषा वापरली आहे. स्वतःसाठीं कांहीं करण्याची जरूर नाहीं. आणि लोकसंग्रहासाठीं करावयाचें अशी येथें कल्पना नाहीं. मला दुपारीं निजण्याला—विश्रांति घेण्याला हरकत नाहीं. पण दुसऱ्यांना मी निजलों तर आळशी संवय लागेल असें मानणारा जो पुरुष आहे तो लोकसंग्रह करीत नाहीं. मला जर दुपारीं निजणें योग्य असेल तर त्यानें त्या निजण्यानें च लोकसंग्रह होणार आहे. मला प्रार्थनेची जरूर नाहीं आणि लोकांसाठीं प्रार्थना करावयाची असें नाहीं. ज्यांत माझें हित आहे त्यांत लोकांचें अहित होणार च नाहीं. माझे हित आणि लोकांचें हित यांत जो विरोध कल्पिला जातो तो बरोबर नाहीं.”

शिवाजी—"अकराव्या अध्यायांत 'ऋतेऽपि त्वां न भविष्यंति सर्वे' याचें 'हे नष्ट होतील तुझ्याविना हि' असें केलें आहे. कित्येक तर तुझ्याखेरीज हे सगळे नष्ट होतील असा अर्थ करतात."

विनोबा—"असा केला आहे ज्ञानेश्वरांनीं अर्थ. पण तूं नाहीं मारलेस तरी हे मरणार च आहेत हा अर्थ बरा दिसतो."

शिवाजी—"मग निमित्रमात्रं भव सव्यसाचिन ह्याचा अर्थ काय?"

विनोबा—"तूं निमित्त हो म्हणजे आपलें कर्त्तव्य कर. त्यांत सध्यसाचिन् शब्दाचा येथें विशिष्ट अर्थ आहे. निमित्तमात्र व्हावयाचें म्हणजे दोन्ही हातांनीं काम करावयाचें. आपली सर्व शक्ति वापरावयाची. तर च निमित्तमात्र होतां येतें. कर्मयोगाचा आदर्श आहे तो. येथें हें विशेषण विशेष अर्थानें आलें आहे."

शिवाजी—"गीतेंतील सर्व च विशेषणें साभिप्राय आहेत काय?"

विनोबा—"असें कांहीं टीकाकार मानतात. पण 'त्यक्त्वोत्तिष्ठ परंतप' येथें उत्साह येण्यासाठीं साभिप्राय विशेषण दिसतें असें कांहीं सर्वत्र दिसत नाहीं."

शिवाजी—"गीतेंत हीं अशीं विशेषणें कां येतात? ही पद्धति काय आहे?"

विनोबा—"अक्षरें कमी पडलीं घातलें एक विशेषण—असे च कांहीं दिसतें.

**संन्यासस्य महाबाहो तत्त्वमिच्छामि वेदितुम् ।**
**त्यागस्य च हृषीकेश पृथक्केशिनिषूदन ॥**

या श्लोकांत तीन विशेषणें आलीं आहेत. वास्तविक या श्लोकांत प्रश्न अगदीं च लहान आहे. तेव्हां श्लोकांत तीन विशेषणें घालून श्लोक भरून दिला. मीं तीं विशेषणें काढलीं आहेत. पण मला हि

**संन्यासाचें करसें तत्त्व त्यागाचें हि करसें असे**

असें करावें लागून प्रश्न दोनदां विचारावा लागला आहे. कारण तेवढी जागा भरली पाहिजे."

शिवाजी—"काकासाहेब असें मानतात कीं हीं विशेषणें आल्यानें 'उवाच' म्हणण्याचें कार्य होतें."

विनोबा—"होतें. पण सर्वत्र असें निश्चित नाहीं. मीं स्थितप्रज्ञाच्या श्लोकांत असें केलें आहे. अर्जुनाच्या प्रश्नांत

**कृष्णा,** सांग कसा बोले

म्हटलें आहे, तसें शेवटीं श्रीकृष्णाच्या तोंडी

अनुक्रमणिका

असें घातलें आहे."

(इतक्यांत गोसेवासंमेलनासाठीं मंडळी जमली होती, त्या बजाजवाडींतील राधाकिसनजींच्या बंगल्याजवळ मंडळी आली व विनोबांसह गोसेवासंमेलनासाठीं आधीं चर्चेचें काम चाललें होतें त्या खोलींत शिरलीं. खोली फार मोठी नव्हती. मंडळी अगदीं गर्दीनें बसली होती. एका फार च मोठ्या लोडाला टेकून गादीवर जमनालालजी बसले होते. विनोबाजींना तेथें च गादीवर बसविण्यांत आलें. विनोबांबरोबरची मंडळी हि गर्दींत कशी तरी बसली. थोडा वेळ विनोबांना काय चर्चा चालू आहे हें सांगण्यांत आलें. जमनालालजींनीं राधाकिसनजींना डॉक्टरकडे जाऊन विनोबा आले आहेत म्हणून वर्दी देण्यास सांगितलें. लगे च राधाकिसनजी परत येऊन विनोबांना डॉक्टरकडे घेऊन गेले. बरोबरची मंडळी हि उठली. जमनालालजी हि उठले. डॉक्टरनें नमस्कार केला.)

'आपको तकलीफ देने के लिए इन्होंने (जमनालालजींनीं) मुझे लाया है' ।—विनोबा हंसत हंसत म्हणाले.

डॉक्टर—"मुझे तकलिफ होगी तो मै जरूर कहूंगा."

बंगल्यांत डॉक्टरनें विनोबांना एका खुर्चीवर बसवून समोर दूर अक्षरांची पाटी धरली व एकामागून एक काचा बदलवून डोळ्यांची परीक्षा आरंभिली. कागदांवर कांहीं लिहून घेतलें. विनोबांसह मंडळी परत नालवाडीकडे परतली. थोडा वेळ डोळ्यांची श्री. सूर्यनारायणजींनीं परीक्षा केली तशी च ही परीक्षा झाली यांत नवल कांहीं नाहीं इत्यादि गोष्टि निघाल्या. पुढें गीतेविषयी संवाद चालू झाला.

शिवाजी—"न चा शुश्रूषवे वाच्यं" याचें भाषांतर गीताईंत श्रवणेच्छा नसे ज्यास असें केलें आहे. पण शुश्रूषा म्हणजे सेवा जो करीत नाहीं—असा अर्थ कां घेतां येणार नाहीं?"

विनोबा—"कारण येथें प्रश्न प्रचाराचा आहे. उगी च जो ऐकत नाहीं त्याला कशाला सांगावें? मिशनरी लोकांसारखें. 'य इमं परमं गुह्यं मद्‌भक्तेष्वभिधास्यति' इत्यादींवरून सांगण्याचा मुद्दा येथें विशेष आहे. तेव्हां "जो ऐकण्याला तयार नाही" हा अर्थ येथें ज्यास्त योग्य होय. शिवाय 'इदं ते नातपस्काय' म्हटलें च आहे, त्यांत म्हणजे तपांत सेवा वगैरे येऊन च जाते. (मध्यें च कांहीं तरी सामान्य प्रश्नोत्तरें झालीं. नंतर नालवाडीच्या गोशाळेजवळ मंडळी आली. मधून मधून रस्त्यानें अतिशय आदरानें नमस्कार करणारे भेटत च होते. संवादाच्या ओघांत विनोबा म्हणाले)—सूर्य आणि आपला डोळा यामध्यें आकाशाचा पडदा आहे असें पूर्वी मानलें जात होतें. तसें आतां मानलें जात नाहीं. सूर्य आणि डोळा यांत आकाशानें संबंध साधला आहे. आतां जिन्ससारखे गणिती आणि ज्योतिषी जगांत सर्वत्र अद्वैत आणि चैतन्यमय अद्वैतसंबंध मानण्यापर्यंत आले आहेत. पूर्वीची तीन परिमाणें पुरेशी नाहींत. चौथें एक परिमाण असावें असें दिसतें. मी तर असें मानतों कीं बर्लिनचा रेडिओ इथें ऐकूं येतो त्याप्रमाणें भूतकाळांतले सगळे आवाज येथें पसरलेले च आहेत. ते हि ऐकूं येण्याचा शोध लावणे शक्य आहे."

शिवाजी—"म्हणजे भौतिक शोध?"

अनुक्रमणिका

विनोबा—“होय, म्हणजे असें कीं, यंत्र दाबलें कीं वाल्मीकीचा काळ, ख्रिस्तपूर्व ९००० वर्षे वाल्मिकी आश्रमांत रामायण सांगत आहेत तो आवाज तसा च ऐकू येईल.”

शिवाजी—“रूपाचें कसें? आवाज जसा सर्वत्र पसरला आहे तसें रूप हि पसरलें आहे काय?”

विनोबा—“त्या बाबतींत मी निःशंक नाहीं. पण अशक्य वाटत नाहीं.”

कुंदर—“हे सगळे आवाज एकमेकांत मिसळणार कसें नाहींत?”

विनोबा—“त्यांचे निरनिराळे प्रवाह कल्पिणें शक्य आहे. पूर्वी मी मानीत होतो कीं, पूर्वजन्माचें स्मरण असणें शक्य नाहीं. पण आतां जेलमध्यें अधिक विचार करतां असें वाटतें कीं, शक्य आहे. ‘जाणतो सगळे मी ते अर्जुना तूं न जाणसी.’ या चौथ्या अध्यायांतील श्लोकांवरून मला असें वाटतें कीं जीवाला पूर्व जन्माचें भान शक्य आहे. पण ज्ञान शक्य नाहीं. तें ईश्वराचें राखीव च आहे. पण आतां तसें वाटत नाहीं.”

शिवाजी—“गीतेंत ‘प्रेतें आणि भुते खेतें पूजिती लोक तामस’ असें म्हटलें आहे. तर भुतांची कल्पना लाक्षणिक आहे काय?”

विनोबा—“लाक्षणिक म्हणण्याचें कारण नाहीं. सूक्ष्म देहाची योनि कल्पिणें शक्य आहे.”

शिवाजी—“भुतांच्या ठिकाणीं एकदम प्रकट होण्याची, गुप्त होण्याची शक्ति कोठून आली?”

विनोबा—“सूक्ष्मतेमुळें तसें शक्य आहे. पण त्याला भिण्याचा कांहीं प्रश्न नाहीं. अशा कित्येक योनि आतां हि फिरत असतील आपल्याजवळ.”

कुंदर—(हंसत) “त्यांचा आपल्याला धक्का बसत असेल मग?”

विनोबा—“धक्का कशाला? तुमच्या मधून च जात असतील त्या. योनींतले प्राणी त्यांत काय आहे?”

कुंदर—“म्हणजे तुम्ही आतां चमत्कार मानूं लागला विनोबा असें दिसतें.”

बाळूभाई—“रेडा ज्ञानेश्वरांनीं बोलविला हें शक्य आहे काय?”

विनोबा—“त्याचा मी इतका च अर्थ करतों कीं, ब्राह्मणाची किंमत—त्यांच्या वेदपठनाची किंमत—सरासरी रेड्याच्या आवाजाइतकी च केली त्यांनीं.”

कुंदर—“हें पटण्याजोगें आहे. नामदेवाचें दूध देव प्याला हें तुम्ही मानतां काय?”

विनोबा—“होय”.

अनुक्रमणिका

कुंदर—“म्हणजे…? तुमचें कांहीं समजत नाहीं. कार्यकारणभाव नाहीं तो चमत्कार मानतात. पण जगांत कार्यकारणभावाशिवाय असे चमत्कार होतात असें मी मानीत नाहीं. तुम्हीं आम्हांला यांतला कार्यकारणभाव समजून द्या विनोबा.”

विनोबा—“नामदेवानें कळवळून प्रार्थना केली दूध पिण्यासाठी. तेव्हां त्या वेळीं तेथें आले असेल एखादें मांजर. तें दूध प्यालें. नामदेवाला देव च दूध प्याला असें वाटलें.”

कुंदर—(हंसत) “हें चांगलें आहे स्पष्टीकरण!”

विनोबा—“ती देवाची मूर्ति ज्याला देव वाटली त्याला मांजर कां देव वाटणार नाहीं?”

शिवाजी—“ख्रिस्तानें डोळ्यांवर हात ठेवला आणि लगे च त्या माणसाला डोळे आले तें शक्य आहे काय?”

विनोबा—“पूर्ण शक्य आहे.”

कुंदर—“हें कसें शक्य आहे. मला तर हें मुळीं च पटत नाहीं.”

विनोबा—“तुला हें पटतें ना कीं एखाद्याला मुंगळा चावला. पण वाटलें साप चावला आणि त्या भावनेनें तो मेला?”

कुंदर—“होय”.

विनोबा—“याच्या उलट एखाद्याची अशी पूर्ण श्रद्धा असेल—अगदीं थोडी सुद्धां कमी असतां कामा नये—कीं मला गुरूच्या हाताचा—सत्पुरुषाच्या हाताचा स्पर्श झाला कीं डोळे येतील—तर आंधळ्याला डोळे येतील. यांत मी अशक्य कांहीं च पहात नाहीं.”

बाळूभाई—“मृत मनुष्य उठविल्याच्या गोष्टि खऱ्या आहेत काय?”

विनोबा—“मृतप्राय माणसें उठविण्याची मी कल्पना करूं शकतों. पण मृत माणसें उठणें शक्य नाहीं असें मला वाटतें.”

शिवाजी—“याचें कारण काय?”

विनोबा—“त्यांत मोठी अडचण आहे. मरण हें प्रारब्धक्षयावर आहे. तें मरण एकदां आल्यावर पुन्हां मनुष्य परत येणें शक्य दिसत नाहीं.”

भाऊ :—“ ४/५ भाकरींत हजारों लोक जेऊं घातलें अशा गोष्टि आहेत त्याचें काय?”

अनुक्रमणिका

विनोबा—“तशीं पुष्कळशीं रूपकें हि असतात.”

कुंदर—“मरण हें जर प्रारब्धावर तर त्याला डोळे येणें हें हि त्याच्या प्रारब्धावर च मानावें लागेल. सगळ्या च गोष्टि प्रारब्धावर मानाव्या लागतील. तुमचें हें मला समजत नाहीं, एक तर सगळे चमत्कार झूट तरी समजा किंवा सगळे खरे तरी समजा.”

शिवाजी—“त्यांत फरक आहे. जीवनांत पुरुषार्थ आहे. तसें मरणांत नाहीं.”

कुंदर—“रामकृष्णांशीं देवी बोलत असे हें तुम्ही खरे मानता?”

विनोबा—“हें शक्य आहे.”

कुंदर—“हें कसें शक्य आहे? ती मूर्ति बोलत होती ती कोणत्या तऱ्हेनें बोलत होती?”

विनोबा—“ती त्यांच्याशीं बोलत होती. तें बोलणें दुसऱ्या कोणाला ऐकूं जात होतें असें आहे कां? ती वैखरी वाणी च नव्हती. ती निराळी वाणी होती. तें बोलणें फक्त रामकृष्णांना च ऐकूं येई.”

बाळूभाई—“ख्रिस्ताचे पुनरुत्थान झालें हें खरें समजावयाचें काय?”

विनोबा—“होय, त्यांत काय अशक्य आहे. तो त्यांच्या शिष्यांना दिसला. त्यानें शिष्यांना स्फूर्ति दिली.”

बुद्धसेन—“कसा दिसला?”

कुंदर—“विनोबा, याची उपपत्ति लागल्याशिवाय कांहीं आमचें समाधान होणार नाहीं.”

विनोबा—“ध्यानाच्या योगाने दिसूं शकतें असें.”

कुंदर—“तो जो देह ख्रिस्ताचा गेला तो च पुन्हां दिसला?”

विनोबा—“तो देह तर गेला च. पण तसा च तो पुन्हां ध्यानानें दिसणें शक्य आहे.”

कुंदर—“त्याचा स्पर्श होणें, शब्द ऐकणें शक्य आहे?”

विनोबा—“होय. त्यांत कांहीं अशक्य नाहीं. (या वेळीं पूर्ण अंधार पडला होता. चावदसभाऊ वगैरे मंडळी संवाद ऐकण्यास झोपडींत आली.)”

बुद्धसेन—(आश्चर्यानें हंसून) “हें एक चमत्कारिक च दिसते बुवा!”

अनुक्रमणिका

शिवाजी—“स्वप्नांत नाहीं कां दिसत? तसें च हें.”

विनोबा—“जागृतींत जे तुम्ही पाहतां तो हि ध्यानाचा च परिणाम आहे. सर्व ध्यानमय आहे.”

कुंदर—“हें कसें?”

विनोबा—(जवळचे एक पाकीट दाखवून) “हें पहा ही जागृति. यांत हें दुसरें पाकीट घातलें ही निद्रा. यांत हें तिसरें पाकीट घातलें तें स्वप्न तसें च ध्यान.”

बाळूभाई—“ज्ञानेश्वरांनी भिंत चालवली हें खरें काय?”

विनोबा—“नाहीं. तें मानतां येत नाहीं.”

शिवाजी—“चेतन चेतनाच्या संबंधानें चमत्कार वाटणाऱ्या गोष्टि घडून येतात असें दिसतें. जड-चेतन अशा संबंधाचें चमत्कार होऊं शकत नाहींत असें दिसतें.”

विनोबा—“मी तर असें हि मानतो कीं, ध्यानामुळे अग्नि हा थंड आहे अशी भावना झाली तर अग्नींत बोट घालून सुद्धां अगदीं बर्फासारखें वाटेल.”

बुद्धसेन—“त्याचा हात जळणार नाहीं कां?”

विनोबा—“हात जळेल. पण त्याला तें कळणार नाहीं.” त्याला थंडगार वाटेल. तसें च थंड पाण्यांत हात घालून त्याच्या ध्यानभावनेमुळें हात भाजला असें त्याला होईल.”

चावदस—“पुरुषाची स्त्री आणि स्त्रीचा पुरुष कोणी करतो म्हणतात.”

विनोबा—“पुरुषाची स्त्री आणि स्त्रीचा पुरुष होणें सहज शक्य आहे. पुरुषाचे स्तन च ही गोष्ट दाखवितात. पुरुषाचें चिन्ह नाहींसें होत होत तें आंत जाऊन स्त्री होणें शक्य आहे.”

कुंदर—“परकाया प्रवेश शक्य आहे काय?”

विनोबा—“जंतू देखील आपल्या शरीरांत शिरतात!” (सगळे हंसतात.)

कुंदर—“विनोबा, हें तुमचें म्हणणें बरोबर नाहीं. जंतू स्वतःच्या शरीरासकट प्रवेश करतात. पण परकायाप्रवेश वेगळा आहे.”

विनोबा—“परकाया प्रवेश म्हणजे दुसऱ्याचें मानसशास्त्र पूर्ण समजतो.”

कुंदर—“हें च तें मला पटत नाहीं.”

अनुक्रमणिका

विनोबा—"मला तूं विचारतोस तर मी माझे च मत सांगणार कीं नाहीं?"

कुंदर—"योग्याला सर्व कांहीं समजतें. सर्व ठिकाणचें कळतें असें तुम्ही मानतां काय?"

विनोबा—"कालस्थलाच्या केंद्रबिंदूंत जर एखाद्याचें मन स्थिर झालें तर त्याला कोठें काय चाललें आहे हें समजण्याला हरकत नाहीं असें वाटतें."

या संवादांत पुष्कळ वेळ गेला. प्रार्थना लवकर होणार म्हणून मंडळी उठली. प्रार्थना आज १५ मिनिटे उशीरा व्हावयाची असें विनोबांनीं ठरविलें. मंडळींचीं जेवणे झालीं नव्हती म्हणून ही सवलत. बाहेर चंद्रप्रकाश पडला होता. नवचैतन्याचा प्रकाश प्रत्येकाच्या हृदयांत विराजमान झालेला होता. अशा अवस्थेत मंडळी जेवण्याला गेली. जेवण झाल्यावर ताबडतोब प्रार्थना होऊन जिकडेतिकडे शांति पसरून गेली.

* * * * * *

३० जानेवारी १९४२, नालवाडी. शुक्रवार सकाळीं ८ वाजतां हनुमानगडच्या टेकडीच्या रस्त्यानें विनोबा नेहमींप्रमाणें फिरण्यास निघाले. गोपाळराव काळे, कुंदर, शिवाजी, बाळूभाई, अच्युतराव देशपांडे ही मंडळी बरोबर होती. विनोबांनीं च प्रश्न काढला.

विनोबा—"गीतेंत आहे ना 'धूमेनाव्रियते' तेथें कांहीं तरी चूक आहे असें माझ्या मनांत राहून गेलें आहे."

कुंदर—"तें रूप बरोबर आहे."

विनोबा—"विव्रियते असें कांहीं रूप होतें कीं नाहीं?"

कुंदर—"तसें होत असेल. पौनःपुन्यवाचक पण येथें आव्रियते बरोबर आहे."

विनोबा—"मग मला वाटतें प्रजहिह्येनं या ठिकाणीं कांहीं तरी घोटाळा असावा. त्यामुळें माझ्या मनांत हें राहिलेंलें दिसतें."

कुंदर—"प्रजहिह्येनम्" पाहिजे. यांत हां धातूचें रूप आहे. प्रजहि ह्यात 'हन्' चे रूप आहे. ते 'जहि शत्रुं महाबाहो' येथें पुढें आलें आहे.

शिवाजी—"गीतेंतले सगळे पाठभेद कोठें छापले आहेत?"

विनोबा—"भांडारकर रिसर्च इंस्टिट्यूटमध्यें महाभारत छापलें जात आहे. त्यांतील भीष्मपर्वांत गीता आहे. त्यांत बहुधा गीतेचे उपलब्ध पाठभेद असतील."

शिवाजी—"गीतेंत उपनिषदांतील अवतरणें आलीं आहेत तीं फरक करून कां आली आहेत?"

अनुक्रमणिका

गोपाळराव—“उपनिषदांतील वचनें कोणती?”

विनोबा—“सर्वे वेदा यत्पदमामनन्ति” च्या ऐवजीं गीतेंत “यदक्षरं वेदविदो वदंति” अशीं वचनें आलीं आहेत. शूद्राला श्रुतीचा अधिकार नाहीं. गीता स्त्रीवैश्यशूद्रांसाठीं. तेव्हां हें एक कारण दिसतें.”

गोपाळराव—“हें एक अजब च कारण काढलें तुम्हीं.”

विनोबा—“भागवतांत ईशावास्योपनिषत् सगळें आलें आहे. त्यांत ‘ईशावास्यमिदं सर्वं’ हा मंत्र ‘ईश’च्या ऐवजीं आत्मा असा फरक करून घेतलेला आहे. तेवढ्यानें हें सगळें उपनिषत् शूद्रांना हि वाचतां येतें.”

बाळूभाई—“एवढ्या फरकानें तें झालें कां निराळें? कमाल आहे बुवा!”

गोपाळराव—“केवळ स्वरांत फरक केला तरी ती श्रुति शूद्राला ऐकण्याला हरकत नाहीं असे आहे.”

बाळूभाई—“कवीनामुशना कविः, महर्षीणां भृगुरहं, सिद्धानां कपिलो मुनिः, मुनीनामप्यहं व्यास :—याचें कांहीं स्पष्टीकरण?”

विनोबा—“कवि शब्दानें ईश्वरी प्रेमाचीं गाणीं गाणारा घ्यायचा. तो कोणी उशनस् नांवाचा होऊन गेला—ज्याचा वेदांत हि उल्लेख आहे. उशनस् हा शब्द वश् धातुवरून झाला. ईश्वरी प्रेमाचीं गाणीं गाऊन वश करणारा तो उशनस् त्यावरून च वेन शब्द झाला वेदांतला. व्हीनस् रोमन देवता ती हि प्रेमाची च देवता.”

शिवाजी—“टिळकांनीं अशी च कल्पना मांडली आहे—ओरायनमध्यें.”

विनोबा—“वेन म्हणजे शुक्र. व्हीनस म्हणजे हि शुक्र. शुक्राला च पुल्लिंगी काव्य हें नांव आहे. नपुंसकलिंगी काव्य शब्द निराळा. पुल्लिंगी कवि शब्द हि आहे च. तसा काव्य शब्द हि आहे. चंद्र ही प्रेमाची देवता आहे. पण तो येऊन गेला आहे नक्षत्रांत. तेव्हां उशनस् म्हणजे शुक्र घेण्याला हरकत नाहीं. ‘सिद्धानां कपिलो मुनिः’ सिद्ध म्हणजे सिद्धांती. ज्यांनीं एखादा नवीन सिद्धांत शोधून काढला ते सिद्धांती. कपिलांनी जो सिद्धांत शोधून काढला त्याच्यापुढें कांहीं ज्ञान अजून गेलें नाहीं.”

बाळूभाई—“ऑटमचें वगैरे ना?”

विनोबा—“होय. महाभारतांत एक श्लोक आहे. ‘ज्ञानंच लोके यदिहास्ति किंचित् । सांख्यागतं तच्च महन्महात्मन्.”

शिवाजी—“‘गंधर्वयक्षासुरसिद्धसंघाः’ यांतले सिद्ध कोण?”

अनुक्रमणिका

विनोबा—“ही एक देवयोनि आहे.”

शिवाजी—“पण शंकराचार्य ‘सिद्धाः कपिलादयः’ म्हणतात.”

विनोबा—“तसें घेण्याला हरकत नाहीं. वेदांत हि कपिलाचा पहिला ज्ञानी म्हणून उल्लेख आहे. ‘ऋषिं प्रसूनं कपिलं यस्तमग्रे ज्ञाने बिभर्ति जायमानं च परेयत् ।’ कपिल ही विभूति सांगून गीता सांख्य तत्त्वज्ञानाचा उल्लेख करीत आहे.”

गोपाळराव—“कपिल—देवहूति ते च कपिल?”

विनोबा—“होय, ते च. त्यांनीं प्रथम आपल्या आईला च ज्ञान सांगितलें. आतां महर्षि भृगु. भृगु हें विद्येत विद्येचे आचार्य होते. भृगर्वे वारुणिः । वरुणं पितरमुपससार अधी हि भगवो ब्रह्मेति । अन्नं ब्रह्मेति व्यजानात्—असा उपनिषदांत उल्लेख आहे. भृगु हा वरुणाचा पुत्र.”

गोपाळराव—“मानसपुत्र?”

विनोबा—“मानसपुत्र असला तरी कोणाचा तरी औरसपुत्र तो असतो च. वरुण ही देवता आहे. त्यानें प्रथम ब्रह्मज्ञान मिळविलें. ते अन्न ब्रह्म सांगितलें. म्हणजे चर्खारोजी. त्याशिवाय चालावयाचें नाहीं. पुढें तेवढ्यानें भागेना म्हणून प्राण ब्रह्म सांगितलें. असें करता करतां आनंदमय ब्रह्मापर्यंत मजल आली. असा हा महर्षि भृगु झाला. म्हणजे गीतेंत हा उपनिषदांचा उल्लेख आला विभूतींमध्यें.”

गोपाळराव—“सप्तर्षींतले भृगु का दुसरे कोणते आणखी?”

विनोबा—“ते सप्तर्षी च कोठें नक्की आहेत? गीतारहस्यात ‘महर्षयः सप्त पूर्वे’ यावर लिहितांना ही सगळी भानगड मांडली आहे टिळकांनीं. माझी सप्तर्षींची कल्पना वेगळी आहे. उपनिषदांत च सांगितलें आहे कीं दोन डोळे हे ऋषि, दोन कान हे ऋषि, दोन नागपुड्या ते च ऋषि. आणि ही जी खाणारी—अद् म्हणजें खाणें—जीभ ती अत्री.”

शिवाजी—“अत्रि शब्दाची काकासाहेबांनीं निराळी व्युत्पत्ति लावली आहे. त्यांनीं म्हटलें आहे. ‘अ + त्रि’. दत्तात्रेय हे त्रिगुणी. त्या त्रिगुणांच्या पलीकडचा तो अत्रि. त्याचा वडील.”

विनोबा—“ही गंमतीची व्युत्पत्ति झाली. यांत दत्तात्रेयाला कमीपणा येतो. तो त्रिगुणापलिकडचा पाहिजे तें उलट च होते. दत्तात्रेयाला तीन तोंडे पण त्याचें हृदय त्या पलीकडचें. तो त्रिगुणापलीकडचा. त्याच्या चित्रांत गाय आणि कुत्री दाखवितात. त्यांत चांडाळ, हत्ती आणि ब्राह्मण हि दाखवायला पाहिजे. म्हणजे ते “विद्याविनयसंपन्ने ब्राह्मणे गवि हस्तिनि शुनि चैव श्वपाके च पंडिताः समदर्शिनः” चें चित्र होईल. महर्षि झालें. आतां मुनींत व्यास. मुनि म्हणजे मनन करणारा. व्यासांनीं प्रस्तुत मनन जें गीता तें मांडलें. म्हणून त्यांची विभूति गीतेंत आली आहे. प्रस्तुतः जें तें च उत्तम हा सिद्धांत आहे. कित्येक राष्ट्रीय शाळेचे शिक्षक तक्रार करतात. आम्हांला रद्दी मुलें मिळालीं आाहेत. पण तीं च उत्तम. प्रस्तुत जें असतें तें च उत्तम. म्हणून गीतेंत अर्जुन हा हि विभूति आहे. गुरुपुढें प्रस्तुत जो शिष्य उभा आहे तो च महत्त्वाचा. तसा शिष्यापुढें

अनुक्रमणिका

प्रस्तुत गुरु जो बसला आहे त्याचें च महत्त्व. म्हणून कृष्ण हि विभूति. तेव्हां कपिल हें सांख्य, भृगु म्हणजे उपनिषत्, उषनस् म्हणजे वेद. आणि व्यास म्हणजे गीता. अशा या विभूति झाल्या. आणखी कांहीं आहेत कां?”

शिवाजी—“रुद्रादित्य वगैरे आहेत.”

विनोबा—“त्या देवता झाल्या. मानवविभूति एवढ्या च मला वाटतें.”

शिवाजी—“चंद्रमा आणि शशी यांत फरक काय?”

विनोबा—“एक च. चंद्र आल्हादकारक. तो च शशी शब्दानें पूर्ण घ्यावयाचा.”

कुंदर—“चंदयति छंदयति अशी आहे त्याची व्युत्पत्ति.”

विनोबा—“चंद्र तो च अरबी ‘कमर’.”

कुंदर—“हें कसें बुवा?”

विनोबा—“च चा क होतो च. ङ. ञ. ण. न. म. या अनुनासिकांची उलटापालट होते. चंदरमधील न चा म झाला. बाकी र तसा च राहिला. मी तर म्हणतो कीं कोणत्या हि वर्णाचा कोणता हि वर्ण होऊं शकतो. च चा क, क चा ग, असें बनत च असतें. साफ शब्द स्पष्ट शब्दावरून झाला. वेदांत एक “पश्पशान्हिक” आहे. त्याचा अर्थ तो च. साफ साफ आन्हिक. (सगळे हंसतात.)

(या वेळीं हनुमानगडची टेकडी चालण्यास सुरवात झाली.)

कुंदर—“हें पश्पशान्हिक स्पष्टवरून कसें झालें कळलें नाहीं.”

विनोबा—“रामदासांनीं स्पष्टचें पष्ट केलें आहे.”

गोपाळराव—“आणखी कोणी स्पष्टचें पुसट न करों म्हणजे झालें! (सगळे हंसतात).

(यावेळीं मंडळी जवळ जवळ टेकडी चढून गेली. विनोबा मातींत बसले. बाळूभाईंनीं आपली लोई अंथरली. नाहीं म्हणतां म्हणतां ते तिच्यावर बसले. सूर्याचे किरण चोहीकडे चमकत होते पुन्हां बोलणें सुरूं झाले.)

विनोबा—“वेदांत शन्स म्हणतात सूर्याला. अरबींत शम्स म्हणतात.”

शिवाजी—“हंस शब्द आहे ना सूर्याला?”

अनुक्रमणिका

विनोबा—“होय. पण तो वेगळा.”

गोपाळराव—“यावरून दिसतें कीं, पूर्वींचे प्रचारांतलें शब्द हल्लीं बदलले.”

विनोबा—“असें च होतें. म्हणून तामीळ वगैरे भाषा ज्या संस्कृताहून वेगळ्या भासतात त्यांचें मूळ पाह्यचें तर आणखी पलीकडे जायला हवें. कारण मूळ सगळे एक च आहे.”

शिवाजी—“मूळ एक च असें कां? निरनिराळे मानवसमाज असतील त्यामुळें निरनिराळ्या भाषा झाल्या.”

विनोबा—“तें खरें. पण मनुष्य एक च ना?”

शिवाजी—“ईश्वर एक कीं दोन या वादांत ईश्वर एक दाखविण्याची जी युक्ति सांगतात ती पटत नाहीं.”

विनोबा—“कुराणांत दोन ईश्वर नाहींत हें तर खरें च. पण भाष्यांत हि असें च म्हटलें आहे. एक ईश्वर म्हणेल प्रलय करावा. दुसरा म्हणेल उत्पत्ति करावी. दोघांचें जमावयाचें कसें?”

शिवाजी—“हें च लक्षांत येत नाहीं. कारण दोन माणसांत झगडा होत नाहीं असें दिसतें. मग दोन ईश्वरांत च झगडा कां व्हावा?”

विनोबा—“ते दोघे सामंजस्यानें चालले तर त्या दोन ईश्वरांना एकसारखा च विचार करण्याची प्रेरणा ती एक च असणार. तेव्हां ती एक प्रेरणा तो च ईश्वर ठरला. तो एक च!”.

(यानंतर बोलणें ज्ञान्याच्या प्रकृतिसंबंधीं निघालें.)

विनोबा—“ज्ञानी हि वागतो त्याच्या स्वभावास धरूनियां” याचा अर्थ कांहीं वेगळा च करतात. म्हणजे ज्ञानी हि प्रकृतीचा बंदा असतो, लाचार असतो, असा अर्थ केला जातो. पण ज्ञान्यानें आपली प्रकृति ज्ञानमय बनवली आहे. तो त्याप्रमाणें च चालणार. तो का तुमच्यासारखा चालेल? ‘निग्रहः किं करिष्यति’ याचा अर्थ हि भलता च करतात. निग्रह करून काय होणार? निग्रह करून म्हणजे प्रकृतीचा निग्रह करून काय होणार. प्रकृति बदलण्यासाठीं निग्रह हें तत्त्व हवें च.”

कुंदर—“ज्ञानी हि वागतो त्याच्या स्वभावास धरूनियां” हें तुमचें इंग्रजीसारखें भाषांतर झालें. ‘त्याच्या’ काय? आपल्या म्हणावयाचें तें?”

गोपाळराव—“इंग्रजी म्हणजे वाईट थोडें च आहे?”

विनोबा—“सर्वनाम कशासाठीं असतें? नामाची पुनरावृत्ति टाळण्यासाठीं ना? त्याच्या म्हणजे कोणाच्या? ज्ञान्याच्या. तेव्हां त्याच्या घालून पुनरावृत्ति टाळली.

अनुक्रमणिका

(या नंतर अहिंसेच्या उर्दू भाषांतरासंबंधीं बोलणें चाललें)

विनोबा—“अहिंसेला ‘उर्दू’ भाषेंत ‘अदमत शद्दुद्’ म्हणतात. त्यांत ‘शद’ = बलवान हा धातु आहे. पण त्यानें पूर्ण अर्थ प्रकट होत नाहीं. म्हणून उर्दूंत हि अहिंसा शब्द च लिहिला पाहिजे. प्रत्येक शब्दाभोवतीं वाङ्मयांतील प्रयोगामुळें आपले खास भाव असतात. ते बाजूला सारून शब्द घेतां येत नाहीं. स्वराज्यांत जो भाव आहे तो स्वातंत्र्यांत नाहीं. स्वतःला किंवा परक्याला ताणून ताणून जें झालें ते स्वातंत्र्य! तंत्र शब्द च मुळीं ‘तन्’ पासून बनलेला आहे. ‘न स्त्री स्वातंत्र्यमर्हति’ अशा प्रकारच्या स्वातंत्र्याच्या अनिष्टतेचे हि आम्ही वाग्व्यवहार करतों. स्वातंत्र्याला वेदांत ‘स्वराज्य’ शब्द येतो. तो मोठा सुंदर वाटतो. ‘यतेमहि स्वराज्ये’ । राज् म्हणजे शोभणारा. सूर्य हा स्वराट् म्हणजे स्वयंप्रकाश. चंद्र हा अन्यराजा आहे. तो परप्रकाशित आहे म्हणून जे चंद्राची उपासना करतात ते ‘क्षय्यलोका भवंति’ असें आम्ही बोलत आलों. कालिदासानें राजा शब्द रंज् पासून घेतला आहे. राजा प्रकृतिरंजनात् असें त्यानें म्हटलें आहे. हा प्रकृति शब्द हि किती सुंदर आहे! आत्म्याला जशी प्रकृति तशी राजाला प्रकृति. बापूंनीं स्वराज्याला पूर्ण शब्द जोडून दिला आहे. पूर्ण स्वराज्य म्हणजे गोल वर्तुळ. वर्तुळ म्हणजे च गोल. तरी हि म्हणावयाचें गोल वर्तुळ.”

शिवाजी—“नानासाहेब देव रामदासांना आर्यचाणक्य ठरवितात. ‘मला भासला आर्य-चाणक्य जैसा’ अशी त्यांनीं कविता च लिहिली आहे. पण कित्येकांना यांत रामदासाची योग्यता कमी करण्यासारखें वाटतें.”

विनोबा—“आहे तसें रामदासांचें गुप्त राजकारण. तें म्हणतात हें जें तुमचें प्रकट आहे तें राजकारण च नव्हें. चर्चिलचें राजकारण काय प्रकट आहे? त्याचें राजकारण म्हणजे विधायक कार्यक्रम. त्याचा परिणाम व्हायचा. पण तें राजकारण म्हणून दिसावयाचें नाहीं. म्हणून गुप्त.”

शिवाजी—“रामदासांनीं दासबोध किती वर्षांत लिहिला. प्रथम कोणता भाग लिहिला. इत्यादि संबंधीं वाद आहेत.”

गोपाळराव—“या ऐतिहासिक वादांत काय तात्पर्य?”

विनोबा—“रामदासांनीं पहिल्यांदा नमनाचा दशक लिहिला. मग त्यांनीं जिकडे तिकडे मूर्ख च मूर्ख पाहिले. त्यांचीं लक्षणें लिहिलीं. यानंतर शहरांतले लोक म्हणजे पढतमूर्ख दिसले त्यांनीं त्यावर लिहिलें. हें झालें नीतिशास्त्र. नीतिशास्त्रानंतर वैराग्य. नीतिशतकानंतर वैराग्यशतक आहे ना भर्तृहरीचें. मनाच्या श्लोकांत ही असें च आहे. ‘मनाचीं शतें ऐकतां दोष जाती’. मी शिवाजीला तें सगळें समजावून सांगितलें आहे. वैराग्य झाल्यानंतर भक्ति सांगितली. आणि मग ब्रह्मज्ञानाला सुरुवात केली. परमात्मा निश्चळ सांगितला. पण पुढें चळवळ आली. त्या संबंधीं तत्त्वज्ञान पाहिजे च. म्हणून अंतरात्मा घेतला. तो चंचल घेतला. देवबलात्कार सांगितला. १२ वाजले म्हणजे तो खायला लावतो. हा बलात्कार झाला. अशी ही दासबोधाची मांडणी दिसते.”

कुंदर—“दासबोध अगदीं अव्यवस्थित आहे.”

अनुक्रमणिका

शिवाजी—“त्यांत नीट पाहिलें तर व्यवस्था आढळून येते.”

गोपाळराव—“अव्यवस्थेंत हि व्यवस्था पाहता येते.”

विनोबा—“त्यांत व्यवस्था नाहीं असें नाहीं.”

गोपाळराव—“कुराणासारखा आहे तो ग्रंथ.”

विनोबा—“नाहीं. कुराणांत व त्यांत फरक आहे. मनाचे श्लोक मात्र एका बैठकींत लिहिले आहेत.”

शिवाजी—“बापूजींनीं म्हातारी चर्ख्यावर कांतते ती आणि जवाहरलाल कांततात त्यांत म्हातारीला गौणपणा दिला आहे, तें रुचत नाहीं.”

विनोबा—“तें बरोबर आहे. मुळांत कांतण्यांत च जर स्वराज्य मिळविण्याची शक्ति नसेल तर जवाहरलालजींचें कांतणें स्वराज्य मिळवूं शकणार नाहीं. वास्तविक असें म्हणावयास पाहिजे होतें कीं, स्वराज्यसंपादनाची जितकी शक्ति जवाहरलालजींच्या ज्ञानपूर्वक कांतण्यांत आहे, तितकी एका निर्बुद्ध म्हातारीच्या कांतण्यांत नाहीं. शंकराचार्यांनीं “यदेव विद्यया करोती श्रद्धयोपनिषदा तदेव वीर्यवत्तरं भवति” या वचनांतील भाष्यांत—‘वीर्यवत्—तरम्’ चा खुलासा केला आहे. जें वीर्यवान् आहे मूळचें तें च कर्म ज्ञानश्रद्धा तत्परतापूर्वक केल्यास ‘वीर्यवत्तर’ म्हणजे अधिक वीर्यवान् होईल. कर्म च निर्वीर्य असेल तर तें वीर्यवत्तर होणार नाहीं. पण समोर च जवाहरलाल बसले होते त्या दिवशीं—तेव्हां म्हटलें त्यांना पाहून.”

गोपाळराव—“हें तुमचें बरोबर नाहीं म्हणणें.

विनोबा—“रामदास म्हणतात.

**वेड्यास वेडें म्हणो नये । वर्म कदापि बोलों नये ॥**
**तरी च घडे दिग्विजयो । निःस्पृहासी ॥**

येथें खुशामत करण्याची गोष्ट सांगत नाहींत रामदास. निःस्पृहाची ही स्थिति आहे. समोरच्याला पाहून असें म्हणणें ही खुशामत नव्हे. परवां च बापू म्हणाले कीं, माणसांमाणसांतली अहिंसा ही कांहीं धार्मिक अहिंसा नव्हे. ही राजकीय अहिंसा आहे.”

गोपाळराव—“तसे स्पष्टीकरण केलें त्यांनीं. चांगलें केलें.”

“विनोबा—“लोक समजतात गांधींची धार्मिक अहिंसा आहे ही. पण धार्मिक अहिंसेत श्वासोच्छ्वासांत जंतु मरतात त्याचा हि विचार येतो. राजकारण एवढें व्यापक झालें आहे कीं त्यांतून आज कोणी सुटूं च शकत नाहीं. गांधींची स्वतःची धार्मिक अहिंसेची दृष्टि असली तरी राजकारणांतून ते सुटू शकत नाहींत. कोणी च साधु हल्लींच्या स्थितींत राजकारणांतून सुटूं शकला नाहीं. दाखवितां कां?

अनुक्रमणिका

शिवाजी—“रवींद्रनाथ टागोर?”

विनोबा—“हें उदाहरण अगदीं च निरुपयोगी आहे. रवींद्रनाथांनीं ‘जनगणमनअधिनायक’ लिहिलें. सर पदवी परत केली. नॅशनॅलिझममध्यें काय आहे पहा.”

गोपाळराव—“राजकारणापासून ते अलग समजतां येत नाहींत.”

अच्युतराव—“रवींद्रनाथांनीं आजारी असून हि रॅथबोन बाईंना उत्तर दिलें.”

कुंदर—“अरविंद घोष?”

शिवाजी—“पूर्वीं त्यांनीं राजकारण केलें होतें च.”

विनोबा—“पूर्वींचे राहूं दे. आज त्यांनीं युद्धाला ३,५०० रुपये दिले.”

शिवाजी—“रामकृष्ण?”

विनोबा—“हें एक असें उदाहरण दिसतें. पण ते जड होते. चांगल्या अर्थानें जड होते. त्यांच्या वेळची परिस्थिति हि भिन्न होती. तथापि सर्व बंगालच्या राजकारणाला स्फूर्ति देणारी प्रेरकता त्यांच्यांत होती. त्यांनीं प्रेरक राजकारण केलें असें हि म्हणतां येईल. विवेकानंदांचे तर स्पष्ट च आहे राजकारणी वळण.”

शिवाजी—“पण रामकृष्ण मिशनमध्यें राजकारण करूं नये असा त्यांनीं निर्बंध घातला आहे. आणि विवेकानंद हिंदुस्थानचें हित राजकारणांत नसून धर्मामध्यें आहे असें म्हणत असत.”

विनोबा—“राजकारणाचा लुच्चेगिरी—फसवेगिरी असा कांहींसा अर्थ होता म्हणून. पण त्यांना अस्पृश्यतानिवारण मान्य होतें. दरिद्रनारायण शब्द त्यांचा च.”

(पुढें मोवेजींच्या स्वयंसेवकांसंबंधीं बोलणें निघून मंडळी परत नालवाडीस येऊन पोंचली.)

* * *

तारीख ३१ जानेवारी १९४२ नालवाडी. शनिवार. आज पूज्य विनोबा बापूजींकडे सेवाग्रामला गेले. प्रार्थना झाल्यावर स्नान करून, नास्ता करून जमनालालजींनीं पाठविलेल्या बैलांच्या गाडींतून जमनालालजींच्या झोपडीवर गेले आणि त्यांच्यासह शेगांवला जाऊन १० वाजतां परत आले. बाळूभाई झोपडींत येऊन बसले. त्यांनीं प्रश्न विचारण्यास सुरुवात केली.

अनुक्रमणिका

बाळूभाई—“स्वाध्यायासाठीं काय करावें तें आपण सांगा. मी चर्खा कांतण्याच्या वेळीं गीता म्हणत असतों. पण आणखी काय करावें तें सुचवा. बापूजींनीं अनासक्तीयोग लिहिला. त्यांत मूळ श्लोक दिले नाहींत. केवळ अर्थ दिला आहे. तो अर्थ वाचतां वाचतां जें समाधान होतें तें श्लोक म्हणून होत नाहीं.”

विनोबा—“ठीक आहे.”

बाळूभाई—“येथें प्रार्थनेंत रामायण म्हणतात. त्याच्यापूर्वी अर्थ वाचतात. त्या अर्थात गोडी लागते, तेवढी रामायण वाचनांत वाटत नाहीं.”

विनोबा—“माझें उलट आहे. मूळ तुळशीरामायण गातांना कांहीं विशेष च आनंद होतो. कालचा तो रामायणांतला विचार किती मधुर होता!”

**रामचरित जे सुनत अघाहीं ।**
**रसविशेष जाना तिन्ह नाहीं ॥**

रामचरित्र ऐकून जे तृप्त होतात त्यांना रामचरित्राचें रहस्यच कळलें नाहीं. हा फार च महत्त्वाचा विचार आहे.”

बाळूभाई—“व्रतविचार मी जेलमध्यें वाचीत असे. त्यांत हि समाधान होई. पण आणखी कांहीं सुचवा म्हणजे त्याप्रमाणें रोज करीन. सूत कांतणें झालें च पाहिजे तसा स्वाध्याय झाला च पाहिजे. त्या शिवाय जेवावयाचें नाहीं तर च तें होईल.”

विनोबा—“गीता, व्रतविचार, गीताबोध—हे च आपले मुख्य चिंतनाचे ग्रंथ. ज्ञानेश्वरी त्यांत च आली. अनुभवावर उभारलेले ग्रंथ च पाह्यचे.”

बाळूभाई—“(दुःखित स्वरानें) दुसरी गोष्ट माझ्या ठिकाणीं असलेल्या ‘इन्फिरिऑरिटी कॉम्प्लेक्सची’.

विनोबा—“इन्फिरिऑरिटी कॉंप्लेक्स?”

बाळूभाई—“या कासाऱ्याच्या फेल्युअरपासून माझ्या हातून कांहीं च झालें नाहीं, हा एक न्यूनतेचा विचार नेहमीं डोळ्यांसमोर येतो.”

विनोबा—“त्याला इन्फिरिऑरिटी कॉप्लेक्स म्हणतां येणार नाहीं.”

बाळूभाई—“नाहीं त्याला तसें म्हणतां येणार नाहीं. पण आतां ग्रामसेवेचा विचार काढला कीं पोटांत धस्स च होतें.”

अनुक्रमणिका

विनोबा—“बाळूभाई, तुमच्या कासाऱ्याचें फेल्युअर झालें तसें इथें हि पांच दहा प्रयोग निष्फळ ठरले. असें व्हावयाचें च. तुमच्या कासाऱ्याचें असें झालें कीं, तुम्ही तेथें जाऊन बसला पण खानदेशच्या मंडळींनीं तुमच्या कामाची उपेक्षा केली. तुम्ही तेथें न राहतां परत यावें असें बोलूं लागले. मी वल्लभला सुरगांवला पाठविले आहे. त्याला प्रथम तर तेथून कोणी माणूस मिळणार नाहीं, अशी कल्पना दिली होती. त्यानें तेथून माणसें निर्माण करावी ही दृष्टि ठीक च होती. पण त्याच्या पाठिशीं आमचें सगळें मंडळ आहे. आम्ही त्याला आयसॉलेट केला नाहीं. मी तुमच्याकडे पंढरीला पाठविला. अच्युत, दांडेकर तेथें होते. पण सगळी बाहेरची मंडळी. खानदेशनें माणसें हि दिलीं नाहींत. गांव तयार करावयाचा तर कार्यकर्ता मनुष्य एकाकी पडून उपयोगी नाहीं. तसें पाहिलें तर आमच्यापाशीं जास्तींत जास्त उपयोगी माणूस म्हणजे वल्लभ. पण त्याला तेथें पाठविल्यावर इकडचीं कामें—नालवाडीचीं—कांहीं कमी होतात च. तरी तसें आम्ही मनांत हि आणीत नाहीं. उलट वल्लभकडे महादू पाठविला. पंढरी आहे च. अशीं माणसें मी पाठवीत च गेलों. लिबियामध्यें रॉमेलला मदत पाठवून हिटलरनें त्याचा दर्जा वाढवून त्याला उत्साह दिला च. आज च वर्तमानपत्रांत वाचलें हें. पराजय झाला म्हणून परत बोलावलें असतें तर काय झालें असतें? मागच्या मंडळानें असा सतत पाठिंबा द्यावयास हवा च. शिवाय दुसरें असें कीं खेड्याच्या कामांत थोडें यश मिळालें—जसें तुमच्या कासाऱ्याला रस्ता केला—त्याचा थोडा उत्साह आला होता—तर तो उत्साह, तें थोडेंसें यश भोगूं देतां कामा नयें. त्याचा उपयोग करून आणखी कामें काढीत च गेलें पाहिजे. सुरगांवला वस्त्रस्वावलंबनांत थोडें पाऊल पुढें पडतांच लगे च सफाई काढली. आतां तेथली शाळा घेतली. घाण्याचें काम केलें. एकामागून एक जे आपले विधायक १३ मुद्दे ते सगळे गांवांत सिद्ध झाले पाहिजेत. आतां च जमनालालजींशीं बोलणें झालें आहे. तेथें गांवांत सर्वत्र गाईच राखावयाच्या अशी योजना करावयाची आहे. असें करीत गेलें पाहिजे. एका गांवीं अनेक रीतींनीं काम सुरू केलें पाहिजे.”

बाळूभाई—“खानदेशांत या दृष्टीनें काय करावें?”

विनोबा—“तुम्ही असें करा. पहिल्यांदा तेथल्या सगळ्या संस्थांची यादी करा. जेथें अगदीं च अशक्य होईल त्याखेरीजच्या सर्व संस्था गांठा. व्यायामशाळा, बोर्डिंगें, हायस्कुलें, शाळा, लायब्ऱ्या, अशी सगळी माहिती काढा. प्रत्येक सार्वजनिक संस्था नमूद पाहिजे. मग ग्रामसेवावृत्ताचा प्रचार करावा. लढाईचें भय हिंदुस्थानला जवळ आलें आहे. ग्रामोद्योगाशिवाय आतां चालणार नाहीं. प्रत्येक खेड्यानें स्वावलंबी बनलें पाहिजे या मुद्यावर सरकारचें व आमचें कॉमन ग्राऊंड आहे. सरकारला हि तें पाहिजे च आहे कारण सरकार या वेळीं कोणती च व्यवस्था करूं शकत नाहीं. ग्रामसेवेंतील फेल्युअरपासून आपणाला नवीन कांहीं तरी शिकतां आलें पाहिजे.

(यानंतर बाळूभाईंनीं विनोबाजींच्या पश्चिम खानदेशमधील दौऱ्याच्या कार्यक्रमासंबंधीं बोलणें केलें. ११-११॥ वाजले होते. विनोबा जेवण घेत होते. मंडळी हि जेवण्यासाठीं उठली.).

*　　　*　　　*

१ फेब्रुवारी १९४२ रविवार. आज गोसेवासंमेलनाचा दिवस. पू. जमनालालजींनीं गोसेवेचें कार्य हातीं घेतल्यापासून एक च ध्यास घेतला. हिंदुस्थानांत गोवंशसुधारणा कशी व्हावी या च चिंतेनें त्यांनीं गोपुरीमध्यें प्रभातकाळापासून निजेपर्यंत वास्तव्य केलें. गाईच्या महान प्रश्नासाठीं त्यांनीं ही परिषद बोलावली. अध्यक्ष पंडित मदनमोहन मालवीय नियुक्त केले. पण त्यांच्या अशक्त व वृद्ध स्थितीमुळें ते

अनुक्रमणिका

उपस्थित राहूं शकले नाहींत. त्यांनीं आपला संदेश पाठविला. मग दुसरा अध्यक्ष कोण होणार? या पवित्र कार्याला तसा च पवित्र माणूस पाहिजे. बुद्धिमान् असून हि जमनालालजींची श्रद्धा अपार. त्यांनीं विनोबाजींना अध्यक्ष केलें. सकाळीं ८ वाजतां नित्याप्रमाणें फिरण्यासाठीं विनोबा गेले असतांना स्वामी आनंद मुद्दाम परिषदेंतील विषयचर्चेच्या दृष्टीनें चर्चा करण्यास आले होतें. दुपारीं बरोबर दोन वाजतां परिषदेला सुरुवात झाली. ऑल इंडिया कॉंग्रेसकमिटीसाठीं उभारलेल्या भव्य तट्ट्याच्या मंडपांत च परिषदेला सुरुवात झाली. परिषदेला गोवंश सुधारणेबाबत प्रयत्न केलेले १२ तज्ञ आलेले होते. गोसेवासंघाचे ६५ सभासद उपस्थित होते. शिवाय पू. बापूजी, महादेवभाई, काका कालेलकर, किशोरलालभाई, सतीशचंद्र दासगुप्ता, कस्तुरबा, घनश्यामदास बिरला इ. १४ प्रमुख बडीं माणसें होतीं. त्याशिवाय प्रेक्षकसमुदाय होता तो वेगळा च. उंच व्यासपीठावर मोठे लोड ठेवले होते. त्याला टेकून बापूजी, बा, राजकुमारी अमृत कुंवर, सरदार दातारसिंग अशी मंडळी बसली होती. विनोबा अध्यक्ष असल्यामुळें ते हि बसले होते. राधाकिसनजी सभेचें काम करण्यासाठीं हालचाल करणारा हरकाम्या अशा भूमिकेंत व्यासपीठाखालीं बसले होते. पू. जमनालालजी हि व्यासपीठाजवळ च बसले होते. लाऊड स्पीकरची व्यवस्था होती. वंदेमातरम् गीत झालें. बापूजींचें उद्‌घाटनाचें भाषण झालें. महादेवभाई रिपोर्ट घेत च होते. कन्नू गांधींनीं आपला कॅमेरा सज्ज ठेवून पू. बापू व विनोबा यांचा फोटो काढला. या वेळीं आकाशांत एकाएकी ढग जमले. टपाटंपीला सुरवात झाली. विनोबाजींचें अध्यक्षीय भाषण सुरू झालें. त्यांनीं लाऊड स्पीकरचा उपयोग केला नाहीं. भाषण नीटपणें ऐकूं येईना. तशांत वरच्या तट्ट्यांतून व्यासपीठावर बापूजींच्या डोक्यावर पाणी गळणार असा रंग दिसूं लागला. ओम् (जमनालालजींची मुलगी) उठून कस्तूरबांना पांघरण्याला शाल घेण्याचा आग्रह करूं लागली. दुसरी मंडळी उठली. एकानें बापूजींच्या डोक्यावर मोठी परात च धरली. मोठा हंशा पिकला. विनोबाजींचें भाषण चालू च होतें. त्यांना हा एवढा मोठा हंशा कां पिकला हें समजेना. मग जमनालालजींनीं त्याचें कारण सांगितलें. विनोबाजींनीं पुढील आशयाचे भाषण केलें. “प्रिय बंधुभगिनींनो, मी एक जंगली जनावर आहे. मला शहरी सभ्यता माहीत नाहीं. उपनिषदाला आरण्यक म्हणतात. आरण्यक म्हणजे जंगली वाङ्मय. त्यांत ईश्वराचें वर्णन आहे. तो कोणाची पर्वा करीत नाहीं. कोणाशीं बोलत नाहीं. तशी च माझी स्थिति आहे. मराठी भाषेंत हि दरबारीपणा नाहीं. मी लेखी व्याख्यान देत नाहीं. कारण माझी तशी पद्धति नाहीं. गोसेवासंघ या नांवाकडे प्रथम लक्ष देऊं. गो-सेवा हेतुपूर्वक वापरलेला शब्द आहे. आम्ही कोणाचें हि रक्षण किंवा नाश करूं शकत नाही. म्हणून सेवा शब्द आहे. वेदांत गाईच्या सेवेचें वर्णन आहे. गाई ५०/५० शेर दूध देत. गाईमुळें पुष्टि मिळते. गाय शरीराला शोभिवंत बनविते, असे वेदांत उल्लेख आहेत. सेवा करण्यांत उपयोगहीन सेवा नको. आणि सेवाहीन उपयोग नको. हें सूत्र लक्षांत ठेवावें. गाय पाळतांना स्नेहमय वर्तन ठेवल्यानें तिचें दूधं वाढतें. हा पवनारच्या नामदेवचा अनुभव आहे. कालिदासानें गोसेवाचा आदर्श “स्थितःस्थितामुश्चलितः प्रयातां” या श्लोकांत दाखविला आहे. संघासंबंधीं हि विचार केला पाहिजे आज सांघिक प्रयत्नाशिवाय गोवंश सुधारणें शक्य नाहीं. गाईचें च दूधतूप वापरूं अशी प्रतिज्ञा घेणें आज अत्यावश्यक आहे. गाय आणि म्हैस यांच्या तुलनेंत म्हैस मागें पडतें. कारण तिच्या टोणग्याचा उपयोग नाहीं. बैल खाऊन ट्रॅक्टर द्वारा शेती केली तर? असा हि प्रश्न विचारला जातो. पण मानवसमाज वाढेल तसतसें मांसाशन परवडणार नाहीं. युरोप अमेरिकेंत हि हें लक्षांत येत चाललें आहे. म्हणून च वेदांत

**गोभिष्टरेव अमतिं दुरैवाम् ।**
**यवेन क्षुधं पुरुहूतं विश्वम् ।**

अनुक्रमणिका

हें वचन आलें आहे. तेव्हां प्रत्येकानें गाईची सेवा करावी. आणि खादी ग्रामोद्योग, गोसेवा ही सर्व एक च सकलांग विधायक दृष्टि ठेवून काम करावें."

यानंतर प्रतापसेठजींनीं एक ठराव मांडला व त्याचें दातारसिंग यांनीं समर्थन केले. आणि आजचा कार्यक्रम समाप्त झाला.

* * *

तारीख २ फेब्रुवारी १९४२ नालवाडी. सकाळची प्रार्थना. पू. विनोबांनीं हिंदींत पुढीलप्रमाणें प्रवचन केलें—

मैं देख रहा हूं कि हमारे कार्य जैसे होने चाहिए वैसे नहीं होते। वैसे काम तो चल रहा है। और बाहर के आदमी भी देखते हैं। लेकिन जैसे होना चाहिए, जैसे प्रफुल्लित दीखना चाहिए वैसे नहीं होता है। इसका कारण ईश्वर पर भरोसा रखने की वृत्ति हमारे में नहीं है। यानी जितना रस हमको इन कामों में आता है उतना ईश्वर की प्रार्थना में नहीं आता है।

हमारे सब काम भी ईश्वर की प्रार्थना है ऐसा ही मैं मानता हूं। लेकिन ईश्वर की प्रार्थना में हमको रस नहीं है इसी लिए हमारे सब कामों में ईश्वर की उपासना ईश्वर के साथ अनुसंधान नहीं है। वैसा अनुसंधान होने से हमारे कामों में जो वेग, जो स्फूर्ति आनी चाहिए वह आ सकती है। इसकी मिसाल हमको हमारे संकल्प में ही मिलती है। एक निश्चय कर लेने में हमको कैसे होगा इसमें कुछ दिक्कत आयेगी क्या ऐसी चिंता रहती है। लेकिन अगर संकल्प निश्चय उचित है तो ऐसी फिकर हमको करनी नहीं चाहिए। ऐसी फिकर करने से ईश्वर पर हम भरोसा रखते नहीं है ऐसा सिद्ध होता है। यानी हमारे में भक्ति नहीं है।

मैं देखतां हूं कि प्रार्थना के वख्त पर बातचित होती है। मीटिंग भी रखते हैं। चर्चा भी कर लेते हैं। इन बातों से पता चलता है कि हमको प्रार्थना में कितनी दिलचस्पी है। जिनका विश्वास हि नहीं है उनको ये बात लागू नहीं होती। जैसे हमारे काम चर्मालय आदि देखने को लोग आते हैं। वैसे हमारी प्रार्थना भी अगर समृद्ध हो, भक्तियुक्त हो, तो लोग आयेंगे। लेकिन लोग आने के लिए हमको कुछ करना नहीं है। हमें प्रार्थना में इतने मग्न हो जाना चाहिए कि लाखों आदमी हमारी प्रार्थना में सम्मीलित है ऐसा हमको लगना चाहिए। बापू भी इस बात को हमारे सामने सत्य अहिंसा के रूप में रखते है। भक्ति, सत्य, अहिंसादि व्रतों के सिवाय तो हो नहीं सकती। भक्ति और सत्यअहिंसादि व्रतों में फर्क नहीं है। और एक बात ध्यान में रखनी चाहिए। यहां प्रार्थना में आनेवाले लोगों को ऐसा नहीं समझना चाहिए कि हम प्रार्थना में आतें हैं और दूसरे आते नहीं है। ऐसा विचार करनेवालों की प्रार्थना प्रार्थना नहीं है इ. इ. इ.

* * *

२ फेब्रुवारी १९४२ नालवाडी. सायंकाळची प्रार्थना. प्रार्थनेनंतर विनोबा मुख्यतः विणकरांना उद्देशून म्हणाले— "आपल्या येथें २५ विणकर आहेत. म्हणजे २५ कुटुंबांची मिळून १०० माणसें झालीं. शिवाय आश्रमचीं माणसें आहेत च. या सर्वांनीं संध्याकाळच्या प्रार्थनेंत हजर राहिले पाहिजे. ज्यांनीं कांहीं काम आहे, जे आजारी आहेत, असे कांहीं लोक नाहीं हजर राहूं शकणार. पण बाकी बहुतेकांनीं हजर राहिलें

पाहिजे. पुष्कळ ठिकाणी ७ दिवसांनीं जमून ३/३ तास भजन करतात. तसें येथें नाहीं. त्याची जरूर हि नाहीं. विणकरांना व इतरांना दिवसभर काम असतें. त्यांनीं तीन तास रात्रीं जागणें योग्य नाहीं. परंतु रोज या ठिकाणीं भजन चालतें. प्रार्थना होते. त्यांत १५/२० मिनिटें जातात. यांत देवाची भक्ति येते. देवाची भक्ति दिवसभर भजन केल्यानें होतें असें नाहीं. नारदांची गोष्ट आहे. सकाळीं उठावें भजन करावें. दुपारीं भिक्षा मागावी. पुन्हां भजन करावें असा त्यांचा दिवसभराचा कार्यक्रम होता. नारदांना आपल्या भक्तीचा गर्व झाला. परंतु भगवान् म्हणाले माझा श्रेष्ठ भक्त एक शेतकरी आहे. त्या शेतकऱ्याचा कार्यक्रम म्हणजे सकाळीं उठावें, रामराम करावें. शेतांत जावें. काम करावें. दुपारीं थोडी भाकर खावी. पुन्हां काम करावें. संध्याकाळीं थकून गेल्यावर निजतांना थोडे नांव घ्यावें. असा त्याचा कार्यक्रम होता. नारदांना मोठें आश्चर्य वाटलें. हा भक्त कसा आणि श्रेष्ठ भक्त कसा? तेव्हां भगवंतांनीं नारदांना काठोकाठ तेलानें भरलेलें एक भांडें देऊन तें एके ठिकाणीं पोंचविण्यास सांगितले. नारद त्याप्रमाणें तें भांडें घेऊन गेले. जरा इकडे तिकडे लक्ष गेले असते तर काय झालें असतें? (काय रे नामदेव? प्रार्थनेंत जवळ बसलेल्या एका विणकराच्या मुलाला उद्देशून—कांहीं उत्तर येत नाही. हे पाहून—तुझें लक्ष नाहीं वाटतें?—एक जण दुसरा विणकराचा मुलगा उत्तर करतो—तेल सांडलें असतें) हं, मग भगवंतांनीं विचारलें नारदाला तेलाचें भांडे नेत असतांना भजन केलें का? माझें किती वेळ स्मरण केलें? नारद म्हणाले सगळें लक्ष तेलाकडे होतें. भजन कसें. करणार? आणि आपलें स्मरण तरी कसें होणार?—भगवान् म्हणाले—दिवसभर कष्ट करून थोडें सकाळीं संध्याकाळीं भजन म्हणणारा शेतकरी म्हणून च खरा श्रेष्ठ भक्त आहे. तो संसारी असून माझें स्मरण करतों—कष्ट करून थकला असला तरी करतो तेव्हां नारद समजले. (जवळ बसलेल्या विणकराच्या लहान मुलाला हातानें हलवून—समजलें का नामदेव?—हंसला—झालें.) सायंप्रार्थना संपली.

* * *

३ फेब्रुवारी १९४२. दुपारीं बजाजवाडींत विनोबाजी जात असतां सुरेंद्रजींबरोबर नाना तऱ्हेची चर्चा झाली. त्यांत यंत्रासंबंधीं विनोबाजींनीं पुढीलप्रमाणें पृथक्करण मांडलें :

यंत्रे, तीन प्रकारची.

(१) विनाशक—बंदुका, तोफा, टॅक्स, वगैरे. या यंत्रांचा सर्वस्वी निषेध च करावयास पाहिजे. हीं निषिद्ध यंत्रे.

(२) अत्युत्पादक—उदाहरणार्थ, मोठमोठे यांत्रिक कारखाने—प्राथमिक गरजांच्या वस्तू सोडून अशीं यंत्रें मर्यादित वापरण्यास हरकत नाहीं.

(३) गत्युत्पादक—उदाहरणार्थ टेलिफोन, मोटार इत्यादि, या यंत्रांचा स्वीकार करतां येईल पण त्यांचें अवलंबन नको.

* * *

३ फेब्रुवारी १९४२ मंगळवार, नालवाडी. आज जेठालालभाई आले. त्यांनीं अनंतपूरच्या आपल्या कामांतल्या अपयशासंबंधीं विनोबांना निवेदन केलें. नेहमीप्रमाणें ८ वाजतां सकाळीं त्यांच्याबरोबर बाळूभाई,

शिवाजी, रामेश्वरजी, कुंदर इत्यादि मंडळी फिरण्यासाठीं गेली. बोलणें मुख्यतः जेठालाल भाईशीं चाललें होतें. आकाशांत अभ्रे आलीं होती. पाण्याचे शिंतोडे थोडे पडत होते. जेठालालभाईंच्या बोलण्यांत मुख्यतः २०/२५ वर्षे त्यांना जो अनुभव आला तो निराशाजनक होता अशा तऱ्हेचा भाव होता. मधून च ते म्हणाले—"लोकांत चैतन्याचें इंजेक्शन देण्याची जरूरी आहे. केवळ सेवेची फॅक्टरी काढून होणार नाही." त्यावर विनोबा म्हणाले—"चैतन्याचें इंजेक्शन समाजाला दिलें पाहिजे ही गोष्ट खरी च. पण इंजेक्शन कांहीं सर्व शरीरभर देत नाहींत. इंजेक्शन अमुक एका स्थानीं च द्यावयाचें असतें. त्या ठिकाणी इंजेक्शन दिलें कीं सर्व शरीरभर फैलावतें. तें स्थान म्हणजे आपण स्वतः."

आज गोपुरीमध्यें गोसेवासंघांतर्फे गोसेवेच्या बाबतींत विशेषज्ञ लोकांची सभा भरावयाची होती. त्यामुळें गोपुरींत विनोबा मंडळींसह गेले. तेथील परिश्रमालयांत थोडा वेळ झाला. मगन रहाटावर दोन्ही हातांनीं कांतणाऱ्या सव्यसाची बाया, साध्या रहाटावर सरासर सूत कांतणारी मुलें, तकलीवर कांतणारी मुलें, हा सर्व देखावा कोणाला हि सद्गदित करणारा होता. या ठिकाणीं खांडणविचरण्याचे प्रयोग आतां झाले पाहिजेत अशा तऱ्हेची सूचना तेथील व्यवस्थापक हैदर यांना देऊन विनोबा परिश्रमालयाच्या बाहेर पडले. गोपुरींतील सभेच्या स्थानीं आले. तेथें ११ वाजेपर्यंत विशेषज्ञ लोकांची चर्चा झाली.

* * *

३ फेब्रुवारी १९४२ सकाळची वेळ. सुमारें ६—६॥ चा सुमार. नालवाडीची झोंपडी, विनोबा आणि कुंदर यांची स्वराज्यशास्त्राच्या प्रस्तावनेसंबंधीं चर्चा चालू असतांना—

विनोबा—"तूं नेहमीं व्याकरणाच्या खटपटींत असतोस. कांहीं विचारदृष्टीनें का सुचवीत नाहींस?"

कुंदर—"व्याकरणाच्या शिथिलतेनें लोकांच्यामध्यें एक छिद्र पडतें. तें न पडावें म्हणून मी व्याकरणाची चर्चा करतो."

विनोबा—"मला शिथिलता नको च आहे. पण लोकांना प्रयोगस्वातंत्र्य दिलें पाहिजे."

कुंदर—"मी केवळ शिथिलता येऊं नयें या दृष्टीनें पाहतों."

विनोबा—"मी दोन्ही दृष्टींनीं पाहतों."

* * *

४ फेब्रुवारी १९४२ बुधवार. नालवाडी. आज पाऊस पडत असल्यामुळें प्रार्थना झोपडींत झाली. सूर्यभाननें 'मनुवा रामनामरस पीजे' हें पद म्हटलें. प्रार्थना संपल्यावर विनोबा हिंदींत बोलले.

काल जेठालालभाई माझ्याशीं बोलले. पुष्कळ विस्तारपूर्वक त्यांनीं आपलें म्हणणें सांगितलें. त्यांनीं लक्ष्मीदासभाईंबरोबर रामेश्वरला काम केलें. नंतर बिजोलिया आणि आज १०—१२ वर्षें झालीं अनंतपूरला त्यांनीं काम केलें. अशीं २०—२२ वर्षें त्यांचीं या कामांत गेलीं. परंतु हल्ली त्यांना त्यांचे सहकारी सोडून गेले

अनुक्रमणिका

असून फक्त एक च गृहस्थ त्यांच्याबरोबर राहिले आहेत. त्यामुळें त्यांनीं पूर्वी जो कामाचा विस्तार केला होता, अनेक गांवांत त्यांचें काम चाललें होतें, तें त्यांनीं सर्व सोडून दिलें आहे. आणि ते या निर्णयावर आले आहेत कीं, बाह्य काम खादी किंवा गोरक्षण किंवा कोणत्या हि सेवेच्या कामाचा लोभ हा बरोबर नसून व्यक्तीचा विकास होईल, त्या मानानें आसपास सेवा करणें हें च खरें आहे. त्यांच्या भाषेंत असें केलें नाहीं तर सेवा होत नाहीं. पण सेवेची फॅक्टरी होते. या त्यांच्या विचाराप्रमाणें त्यांची पूर्वीची सर्व प्रवृत्ति आतां बंद झाली आहे. हा हि विचार त्यांना कधीं कधीं येतो कीं, बाह्य आडंबराचा त्याग करावा हा जो माझा हल्लींचा विचार आहे त्यांत हि कांहीं अतिशयता येते कीं काय, किंवा ती हि एक बाह्य वस्तु तर होत नाहीं? पण तें कसें हि असो, बाह्य आडंबर सोडून व्यक्तीचा स्वाभाविक विकास होऊन काम व्हावयाचें तर पुढील पांच गोष्टींची जरूर आहे असा त्यांनीं निष्कर्ष काढला. पहिली गोष्ट भक्ति पाहिजे. दुसरी गोष्ट जें करू नये तें करूं नये आणि जें केलें पाहिजे तें अवश्य केलें करावें. म्हणजे ही नीति झाली. तिसरी गोष्ट आपल्या शरीराकडून कांहीं तरी कार्य झालें पाहिजे रोज. म्हणजे माझ्या भाषेंत हें शरीरश्रमाचें व्रत झालें. यानंतर चवथी गोष्ट त्यांनीं सांगितली कीं, कांहीं तरी एकमेकांवर उपकार झाला पाहिजे. अशा पांच गोष्टी त्यांच्या अनुभवाच्या म्हणून मीं ऐकल्या. मला ही गोष्ट लहानपणापासून च माहीत होती—म्हणजे अगदीं स्वाभाविकपणें च होती. मी बाह्य अवडंबराला कधीं च महत्त्व देत नसे. त्यामुळें माझ्याभोवतीं हल्लीं जरी बरें च काम उभें झालें असलें—तें योग्य च आहे—तें अस्वाभाविक उभें केलें नाहीं—तरी खादी, चर्मालय या सर्व प्रवृतींत माझी एक च दृष्टि आहे. ती म्हणजे शुद्धीची व्यक्तीची शुद्धि होण्याला आजूबाजूला वातावरण उभें असलें म्हणजे मदत होते या दृष्टीनें, सामुदायिकतेसाठीं या गोष्टि करावयाच्या आडंबरासाठीं नव्हे. वातावरणाप्रमाणें च व्यक्तीच्या शुद्धीचें माप, शुद्धीची कसोटी पाहण्यासाठीं हि उपासनेच्या दृष्टीनें ज्या गोष्टी आपण करूं त्या गोष्टींची सामुदायिक जरूरी आहे. अभिज्ञेची कल्पना ही या च दृष्टीनें मी केलेली आहे. पेळू त्यामुळें पुष्कळसे हातांत येतील आणि ते देतां येतील अशी अभिज्ञेची गोष्ट नाहीं. आणि तसा तिचा मी प्रसार केलां नाहीं. गोसेवासंघाचे सभासद करण्याचे ज्या तऱ्हेनें केलें जात आहे. या तऱ्हेनें अभिज्ञेचा प्रसार केला नाहीं. यात मी गोसेवासंघाची निंदा करीत नाहीं, अभिज्ञेची सूचना माझ्या या उपासनेंत जे सहमत आहेत, ज्यांचा कांहीं येथें आध्यात्मिक संबंध आहे अशांना च मी प्रायः केली आहे. अभिज्ञेसंबंधीं मीं सांगितलें आहे. आतां ही अभिज्ञा चालू व्हावयास पाहिजे. मी स्वतः देत नसे आतांपर्यंत अभिज्ञा. नागपूरजेलमध्यें सुरवात केली. या महिन्याची अभिज्ञा राहिली आहे माझी. कर्ज ही फार भयंकर वस्तु आहे. पण जर अभिज्ञेची ही कल्पना तुम्हांला पटणार नाहीं आणि तुम्ही मला सोडून दिलें तरी माझा उत्साह मुळीं च कमी होणार नाहीं मी एकटा पडेन. पण तें शक्य नाहीं. कारण ही वस्तु मी लहानपणापासून शिकलों आहे दासबोधांतून :—

ज्ञानी आणि उदास। समुदायाचा हव्यास

मी कोणी ज्ञानी नाहीं. परंतु साधकाभोवतीं साधना करणारे उभे रहावयाचे च हा माझा अनुभव आहे. लहानपणापासूनचा अनुभव आहे. तेव्हां जेठालालभाईंचा जो अनुभव भक्ति, नीति, शरीरपरिश्रम, परोपकार प्रार्थना तो लक्षांत ठेवून स्वतःची शुद्धि व सामुदायिक साधना या गोष्टि साधल्या पाहिजेत.

दुसरी गोष्ट देवशर्मांचें पत्रक. तें त्यांनीं माझ्याकडे पाठवून दिलें आहे. भ्रातृमंडळ स्थापण्यासाठीं तें पत्रक काढलें आहे. भ्रातृमंडळांत जे ब्रह्मचर्यानें आणि अवैतनिक राहतील त्यांना च घेण्यात येईल. अशी कल्पना आहे. म्हणजे त्यांतल्या मुख्य दोन वस्तु आहेत. ब्रह्मचर्य आणि अपरिग्रह. तें पत्रक मला उत्साहवर्धक वाटलें. परंतु मी त्यांत दाखल होणार आहे असें नाहीं. कारण त्यांतली कल्पना या आश्रमांत आहे च. वास्तविक खरा ब्रह्मचारी आणि खरा गृहस्थ यांत संयमदृष्टीनें मी फारसें अंतर पहात नाहीं. खऱ्या

अनुक्रमणिका

गृहस्थधर्माविषयीं मला आदर होता. पण मला हें कबूल केलें पाहिजे कीं संतानोत्पत्तीच्या क्रियेविषयीं मला पूर्वी लहानपणीं तिरस्कार होता. पण आतां मी तसें मानीत नाहीं. जसें खोटें बोलणें हें पाप आहे, तशी ही क्रिया मी मानीत नाहीं. उलट ती मी अतिशय पावन क्रिया मानतों. आणि या विषयासंबंधीं बोलतांना आता मी अत्यंत पावनतेचा अनुभव घेतो. शेतकरी जसें शेतांत बी पेरतो तसें बीज पेरण्याची ही क्रिया आहे. मला लहाणपणीं या क्रियेचा तिरस्कार होता. त्यामुळें माझें कांहीं नुकसान झालें आहे असें वाटत नाहीं. त्या तिरस्कारांत वैराग्य होतें. जुन्या संतग्रंथांत—मुख्यतः भर्तृहरीसारख्या संस्कृत ग्रंथांत हें वैराग्य दिसतें. त्या क्रियेचा जर मला तिरस्कार नसता तर माझा विकास निराळ्या तऱ्हेचा झाला असता असा हि संभव आहे. पण तें सोडून देऊं. तसें पाहिलें तर या क्रियेविषयीं मला तिरस्कार होता असें हि म्हणतां येणार नाहीं. कारण माझे गृहस्थाश्रमी मित्र हि होते. मी त्यांचा तिरस्कार केला नाहीं. त्यावरून त्याच्या मुळाशीं वैराग्य भाव च होता. परंतु खरा गृहस्थाश्रम हल्लीं दुर्मिळ आहे तसा खरा ब्रह्मचर्याश्रम हि दुर्मिळ च आहे. हल्लींचा गृहस्थाश्रम म्हणजे व्यभिचाराची एक सोय च आहे. म्हणून बापूंनीं जेव्हां लिहिलें होतें हरिजनमध्यें कीं "पतिपत्नींचा संगम संतानोत्पत्तीच्या इच्छेशिवाय होऊं शकतो. असा वेळ असतो कीं त्या वेळीं संगमानें उत्पत्ति होत नाहीं". "तर हीं वाक्यें मला भाल्यासारखीं बोचलीं. पण मी एकदम बोललों नाहीं. सारखा दोन महिने विचार करीत होतो. सावलीच्या संमेलनाच्या वेळीं त्यांना मीं माझा विचार सांगितला कीं खरा गृहस्थाश्रमी संतानोत्पत्तीसाठीं च संगम करूं शकतो. शेतकऱ्यानें बी पेरलें आणि तें उगवलें नाहीं तसा संगम निष्फळ जाईल तर त्याला दुःख होईल. आणि शेतकरी जसा दुःखित होऊन, नाईलाज होऊन पुन्हां धान्य पेरील तशी त्याची प्रवृत्ति होईल. शेतकऱ्याचें धान्य फुकट गेलें तर ती एक बाह्य गोष्ट झाली. पण वीर्य फुकट गेलें तर शेतकऱ्यापेक्षां हि त्याला अधिक दुःख होईल. गृहस्थाश्रमी ही क्रिया केवळ संतानोत्पत्तीसाठीं च करील. आणि तींत मी अत्यंत पावनता पाहतो. तींत गुप्तपणा कांहीं च नाहीं. पण एकीकडे अशासाठीं करावयाची कीं, मुलांना, विद्यार्थ्यांना, सर्वांना तिची जरूर नाहीं. तिच्यांत चोरीसारखें कांहीं च नाहीं. जेव्हां मी हा विचार बापूंच्यां पुढें मांडला तेव्हां त्यांना एक नवीन स्फूर्ति मिळाली. असे प्रसंग माझे आणि बापूंचे आणखी दोन-तीन झाले आहेत कीं, ज्यामुळें बापूंना नवीन प्रकाश मिळाल्यासारखें झालें. त्यांनीं सावली संमेलनांत मला ही गोष्ट लोकांना—तेथें जमलेल्या लोकांना—समजावून सांगण्यासाठीं सांगितलें. मीं विचार करतो एवढेंच उत्तर दिले. पण मग त्यांनीं अधिक आग्रह केला नाहीं. माझा हा विचार पूर्वींचाच आहे. कोणत्या हि विचाराची परंपरा मिळेल तर मला बरें वाटतें. पण ती न मिळाली तरी विचार च प्रधान. कसें हि करून तो जुन्यांतून काढावयाचा अशी कल्पना नाहीं. वास्तविक या विषयाचा विचार करणें, बोलणें हें हि असभ्य मानतात. पण मला तसें वाटत नाहीं. या संबंधींचे अनुभव अवश्य एकत्रित झाले पाहिजेत. गृहस्थाला हि मला विचारतां येईल कीं तुझा गृहस्थाश्रम कसा काय चालला आहे? तुझा काय अनुभव आहे? पण ती गोष्ट माझ्या स्वतःच्या वृत्तीवर आणि समोरच्या माणसाच्या साधकवृत्तीवर अवलंबून राहील, तेव्हां खरा ब्रह्मचारी आणि खरा गृहस्थ यांत मी फरक करीत नाहीं. खरा गृहस्थ संतानोत्पत्तीसाठीं च संगम करील आणि नंतर पतिपत्नि एकमेकांचा विकास करतील, सेवा करतील. पण या क्रियेसाठीं एकत्र होणार नाहींत. परंतु तुलना च जर करावयाची तर जो व्याप नको म्हणून, देशसेवेसाठीं किंवा अन्य उच्च हेतूसाठीं ब्रह्मचारी राहिला त्यांत आणि खऱ्या गृहस्थाश्रमात संयमदृष्टीनें जरी फारसा फरक नसला तरी जो मोक्ष मिळविण्याच्या इच्छेनें ब्रह्मप्राप्तिसाठीं ब्रह्मचारी राहिला त्याच्यांत आणि खऱ्या गृहस्थाश्रमांत पुष्कळ फरक आहे. माझी स्वतःची हीच भावना आहे. मला एकच लगन आहे. ब्रह्म—ब्रह्म—ब्रह्म होऊं शकेल तर हा देह शेवटचा च व्हावा ही इच्छा. बाकी ईश्वराला माहीत. ब्रह्मप्राप्तीची इच्छा असेल तो कधीं हि संतानोत्पत्तीची क्रिया करणार नाहीं. कारण ही इच्छा म्हणजे अविद्या—माया आहे. ज्या अविद्येतून हा देह झाला त्या देहद्वारा आणखी हि देह उत्पन्न करण्याला तो निमित्त होऊं देणार नाहीं. तसा मायेंतून कोण सुटला आहे? मला मोक्षाची इच्छा आहे ही मायेची च आहे. 'मी' 'इच्छा' ही सर्व माया च आहे. संतानोत्पत्तीचा हि स्थूल

अनुक्रमणिका

अर्थ घेण्याचें हि कारण नाहीं. शिष्य हि संतान च. कपिल मुंनींनीं सांख्य शास्त्र शोधलें हें हि साधन च आहे. पण एवढा मोठा दृष्टांत कशाला? माझा च दाखला आहे. मला खांडणविंचरण तकलीमधले जे शोध, ज्या कल्पना सुचल्या त्यांत वीर्यशक्तीचा पूर्ण वाटा आहे. त्या शिवाय हे शोध लागूं शकत नाहीं. म्हणून सर्वांनीं या गोष्टीचा विचार करावा.

देवशर्मांच्या भ्रातृमंडळांतली दुसरी गोष्ट अवेतनाची. आपल्या येथें वल्लभ ८ का १० रुपये घेतो. पण हें वेतन ही व्यवस्था आहें हें कांही वेतन नव्हें. त्याचा तो पुरा हिशेब देईल. असें नाहीं म्हणणार कीं ही माझी खासगी बाब आहे. ज्या दिवसापासून मीं घर सोडलें तेव्हांपासून मीं कोणतें हि मासिक, वर्तमानपत्र, कोणतें हि पुस्तक माझें खासगी असें मागवलें च नाहीं. साबरमतीला नवजीवन माझ्या नांवाचें येत नसे. मी दुसऱ्या कोणाचें वाची. पण समजा त्याची जरूरी च असती तर मी दोन आणे देऊन सार्वजनिक वाचनालयांत गेलों असतों. दुनियेंत कोणी १०० रुपये मिळवील. तर त्याची योग्यता अधिक समजतील. पण येथें १० रुपये वल्लभ घेतो. तर तो ९ घेईल किंवा ८ घेईल. तर तो अधिक योग्यतेचा असें माप नाहीं. किंवा त्याला जरूर असेल ज्यास्ती पैशाची तरी हि त्याची योग्यता कमी होणार नाहीं. अपरिग्रहाचें माप सार्वजनिक रुचि आहे कीं खासगीपणा आहे यावर म्हणजे अस्वादवृत्तीवर अवलंबून आहे. कोठें मंदिर पाहण्याला, म्युझियम पाहण्याला गेला तर ती गोष्ट खासगी होईल. मी मलबारमध्यें हरिजनांसाठीं उघडलेंलें मीनाक्षीचें मंदिर पाहण्यासाठीं गेलों. पण ती खासगी गोष्ट नाहीं. त्यांत सार्वजनिक हेतु होता. मला वत्सलेचें पत्र आलें कीं, तुम्ही मद्रासच्या दौऱ्यावर एवढ्या लांब गेला तर आमच्यासारख्याला भेटण्याला येणार नाहीं का?—हें भेटणें होणार नाहीं. ती खासगी गोष्ट आहे. नाशिकला जर सार्वजनिक कामासाठीं गेलों आणि भेट झाली तर गोष्ट वेगळी. किंवा मला जर कळलें कीं वत्सला आजारी आहे आणि सेवेची जरूरी आहे तर मी ताबडतोब निवेन. याच अपरिग्रहाच्या कल्पनेनें मीं घर सोडल्यापासून खासगी पत्र पाठविलें नाहीं. वर्तमानपत्र, डॉक्टर, पुस्तक खासगी असें कांहीं नको. डॉक्टरचा उपयोग मीं केला आहे दांत बसविले तेव्हां. पण प्रार्थना अशी आहे कीं, मला डॉक्टर नको. वायकम सत्याग्रहाच्या वेळीं मला बायकमला बापूजींनीं पाठविलें होतें. जवळ च शंकराचार्यांचें गांव होतें. पण मी तेथें गेलों नाहीं. भावाला जरी मीं पत्र लिहिलें तरी भाऊ म्हणून लिहीत नाहीं. सार्वजनिक दृष्टीनें च लिहितों. ब्रह्मचर्य, गृहस्थाश्रम, वानप्रस्थ आणि संन्यासी ह्यांच्यांत आम्ही नवीन भर टाकली आहे. जुन्याचा आधार मिळेल तर मी घेत च असतो. गृहस्थाश्रमाबाबत तर मला जुना च आधार मिळाला आहे.

*  *  *

तारीख ५ फेब्रुवारी १९४२ विनोबा व कुंदरचें बोलणें चाललें असतांना संततिनियमनासंबंधीं विनोबा म्हणाले—"मार्क्सनें माल्थसच्या थियरी ऑफ पॉप्युलेशनची निंदा केली आहे. त्याच्या मतें आजची ही स्थिति भांडवलशाहीमुळें झाली आहे. तिच्यामुळें आज गरीब, अधिक गरीब आणि श्रीमंत अधिक श्रीमंत होत आहेत. वास्तविक शेती शास्त्रीय पद्धतीनें केल्यास पोषणशक्ति अपार आहे. ह्याचा अर्थ असा नाहीं कीं संयमाची जरूर नाहीं. परंतु त्याची जरूर लोकसंख्या कमी व्हायला पाहिजे, म्हणून नाहीं. तर आपली आध्यात्मिक शक्ति वाढावी म्हणून आहे. जे प्राणि अधिक प्रमाणांत प्रजनन करतात ते गुणांत कमी असतात. उलट जे प्रजनन कमी करतात ते गुणांत वरचढ असतात. पण हें कृत्रिम उपायांनीं करून होणार नाहीं. त्यामुळें यंत्राचें महत्त्व च कमी होतें. होणारी प्रजा च कमजोर होईल."

*  *  *

अनुक्रमणिका

५ एप्रिल १९४२ श्री. देवशर्मा यांच्याशीं चर्चा चालू असतां पुढील प्रमाणें विनोबा बोलले—

**गोभिष्टरेम अमतिं दुरेवाम्**
**यवेन क्षुधं पुरुहूत विश्वाम्**

विश्वभर अमति फैलली आहे; आणि क्षुधा फैलली आहे. यवा इतकें दुसरें कोणतें हि प्रोटीन जमिनींत उत्पन्न होत नाहीं. ते क्षुधानिवारक आहे. दुधाच्या योगानें—मांसाहाराची जी जगभर फैललेली अमति, दुर्बुद्धि ती तरूं. दूध पवित्र कां? कोणत्यातरी अनैतिकतेंतून वाचविलें त्यानें म्हणून.


ऋग्वेदाच्या १,००० ऋचांचा नाश झाला आहे.
जातवेदाः कृष्णागिरसाचें १० मंडलांत।
अंगिरस—शिष्य वा सुत। घोरांगिरस—कृष्णाय देवकीपुत्र। कृष्ण गोपालाचें सूचन मानतां येईल.

*　　　*　　　*

५ फेब्रुवारी १९४२ कुंदरबरोबर चर्चा करतांना—‘१ वाङ्मूल ॐ। तिची उपपति—त्रिपदा. २४ अक्षरांहून अधिक नसावी. आदर्श ॐ नमोजी आद्या।’

●●●


अनुक्रमणिका



## अनुक्रमणिका




आजोबा (आईचे वडील) श्री. बळवंतराव वैद्य




आजोबा आणि आजी, श्री. शंभुराव—सौ. गंगाबाई

अनुक्रमणिका



श्री. नरहर भावे (वडील)


जन्मस्थान—गागोदेचे घर

# अनुक्रमणिका




विनोबा-कुटी—साबरमती आश्रम




महिलाश्रम 'गीताई' चे जन्मस्थान १९३२

अनुक्रमणिका




मधले बंधू—बाळकोबाजी




लहान बंधू—शिवाजी

## अनुक्रमणिका




तीन बंधु—शिवाजी, विनोबा, बाळकोबा.



कौमारे आचरेत्, प्राज्ञो धर्मान् भागवतानिह ।

अनुक्रमणिका



"मी नेहमीच बांपूच्या आज्ञेत राहिलो....."

अनुक्रमणिका




परंधाम आश्रमात राष्ट्रपती राजेन्द्रबाबूसोबत—१९४८




१९५२—सेवापुरी सम्मेलनांत सामूहिक कताई.

अनुक्रमणिका



उत्तर प्रदेश पदयात्रा, १९५२—अपघातामुळे गुडघा दुखावला तरी बैलगाडीतून यात्रा चालूच राहिली.



भारतातील प्रथम ग्रामदान—मंगरोठचे ग्रामदान पत्र समर्पण ग्रामस्थांनी वाटेवर येऊन केले.

अनुक्रमणिका



"या यज्ञांत अनेक शबरींनी आपली बोरे आणि अनेक सुदामांनी आपले तांदूळ टांकले आहेत माझ्यासाठी ही एक स्मरणीय भक्तिगाथा झाली आहे"

अनुक्रमणिका




पदयात्रेत बालगोपालांसह, तामिळनाडू—१९५६

# अनुक्रमणिका



कन्याकुमारीला तीन समुद्राच्या संगमस्थानी शरीरात शक्ती असेतों अखंड पदयात्रेचा संकल्प करतांना—
१९५७.



येलवाल (कर्नाटक) सर्व पक्षांच्या नेत्यांच्या बैठकीचे वेळी पंडित जवाहरलालजींसह—१९५७

अनुक्रमणिका



काश्मीर यात्रा—१९५९




कर्नाटक पदयात्रेत गीताई चिंतनिकेसंबंधी शिवाजींशी चर्चा—१९५८

## अनुक्रमणिका



पंजाब यात्रेत गुरूवाणीचे श्रवण



बागी समर्पण—१९६०

# अनुक्रमणिका



जयप्रकाशजींच्या सेखोदेवरा आश्रमात शांति सैनिकांच्या सभेत डाव्या बाजूला शांति सैनिकाचा रूमाल बांधलेले जयप्रकाशजी

अनुक्रमणिका




आसाम पदयात्रा—१९६१



आसाम पदयात्रा—ग्रामस्थांकडून पारंपारिक स्वागत—१९६२

अनुक्रमणिका




बंगाल यात्रा—सायंकालीन सभा



बोधगया सर्वोदय संमेलन, १९५४—कार्यकर्त्यांशीं हितगुज


अनुक्रमणिका



“एक आहे तकली, बाकी सर्व तकलीफ”

# अनुक्रमणिका


अंबर चरखा कताई






चरखा कताई

अनुक्रमणिका



ब्रह्मविद्या मंदिर—आश्रम परिसरात सफाई

# अनुक्रमणिका



ब्रह्मविद्या मंदिर—श्रमदान

# अनुक्रमणिका




ब्रह्मविद्या मंदिर—बालमित्र बाबाजी मोघे आणि बाळूभाई मेहतासोबत




चौघ बालमित्र—उजवीकडून : भाई धोत्रे, बाबाजी मोघे, गोपाळराव काळे आणि विनोबा

## अनुक्रमणिका



ब्रह्मविद्या मंदिर—जानकीदेवी बजाजसोबत




कंदिलाच्या प्रकाशात—लेखन

अनुक्रमणिका




"दिसामाजी काहींतरी लिहावे"

# अनुक्रमणिका




पत्रलेखन




संक्रामक प्रसन्नता

# अनुक्रमणिका




पत्रलेखन




नित्य वाचन आणि मनन

अनुक्रमणिका




"एक गुना खाना
दो गुना पीना
तीन गुना काम करना
चार गुना हंसना"



ध्यानावस्था

## अनुक्रमणिका




विचारमग्न

# अनुक्रमणिका




चिंतनमग्न

अनुक्रमणिका




गांधीस्तंभाजवळ ध्यानस्थ. (याच्या शेजारीच विनोबाजींची अंतिम क्रिया झाली)




भरत-राम मंदिर व मागे विनोबांची कुटी

अनुक्रमणिका

—आश्रम परिसरांत सांपडलेलें ५ व्या शतकांतील शिल्पे




—आश्रम परिसरांत सांपडलेलें ५ व्या शतकांतील शिल्प

# अनुक्रमणिका



भरत-राम मूर्तिजवळ

## अनुक्रमणिका



प्रसन्नवदन

# अनुक्रमणिका



ब्रह्मनिर्वाणाच्या दोन दिवस आधीं



अंतिम दर्शन—१५-११-१९८२

## अनुक्रमणिका




धाम नदीच्या पात्रांत अंतिम संस्कार—१६-११-१९८२



अंतिम संस्काराच्या स्थानीं बनवलेलें स्मारक

अनुक्रमणिका

# परिशिष्ट

## पूज्य विनोबाजींचे कवितेत पत्र

**ताताला मातेला वंदन करितों तदीय नंदन मी**
**तदनंतर प्रभूतें चरणाचा हीन दीन दास नमी**
**तुमच्या आशीर्वादें कृपाकटाक्षें तसा प्रभूच्या हि**
**कुशलीं नांदतसे हा सुत तुमचा आश्रमीं तसा गेहीं**
**प्रेयोभूमिगृहातें सोडुनियां श्रेय आश्रमस्थानीं**
**आलों खिन्न वियोगें परि केले मुदित आश्रमस्थांनीं**
**मातेचें मन संतत चिंतुनि दीना मुलास कळकळते**
**चिंता वृथा कशाला? माय जगाची तिला सकळ कळतें**
**प्रार्थितसें यास्तव कीं कधिं न धरावें तुम्हीं विषादास**
**प्रभुची कृपा असे जरि तरि न मरे प्राशुनी विषा दास**
**सामर्थ्य मदाशीर्वादीं किमपि नसे परंतु रीतीतें**
**अनुसरूनी प्रेमानें अर्पी शिवकृष्णदत्तशांतीतें.**

**सत्याग्रहाश्रम :** **विनोबा.**
**दिनांक १-१-१९१७.**

सदर आर्याबद्ध पत्र पूज्य विनोबाजींनीं आश्रमांत म्हणजे साबरमती आश्रमांत गेल्यावर घरीं (बडोद्याला) लिहून पाठविलें. तें वडिलांनी (न. शं. भावे) टाईप करून ठेवलें. ते अद्यापि तसे च आहे. यांत पूज्य विनोबाजींची आर्याभारतप्रेमाची यमकादींची छाप सहज दिसून येते.

## गोपाळराव काळे यांस पत्र

मित्रवर्य गोपाळराव यांस,

सा. न., वि. वि., आपलें कृपापत्र पावलें. स्वाभाविक वृत्तीमुळें पत्र लांबणीवर पडत चाललें होतें, तें लिहिण्याची बुद्धि आज होत आहे. ता. ४-१—रविवार रोजीं आश्रमांतून निघालों तेव्हांपासून थोडीशी माहिती यथाक्रम प्रविष्ट करतों. अमदाबादेहून गाडींत बसल्यापासून प्रारंभी च एक शास्त्री भेटला. त्याच्या बरोबर गीतेसंबंधानें चर्चा करण्यांत बडोद्यापर्यंतचा काळ आनंदानें गेला. त्यानंतर आपली भेट झाली. पुढें सुरतेस एक मीमांसाशास्त्रांतील प्रवीण गृहस्थ भेटले. त्यांच्याशीं संभाषण करण्यांत मुंबईपर्यंतचा काळ व्यतीत झाला. त्यानें गृह्यसूक्ताचा ग्रंथ लिहिला आहे. तत्संबंधीं खटपटी करतां ते मुंबईस जात होते. त्यांची आमची जुनी ओळख निघाली. त्यांना टिळकांना भेटण्याकरतां मी घेऊन जाणार होतों. पण जमलें नाहीं. असो, त्यानंतर कांहीं काळ मुंबईत इतस्ततः संचार करण्यांत गेला. तेथून पुण्य नगरींत दाखल झालों. अनाथ विद्यार्थिगृहांत उतरलों. संध्याकाळचे पांच वाजले होते. गायकवाड वाड्यांत जाऊन टिळक केव्हां येणार म्हणून नरसोपंतांना विचारलें. १/२ दिवसांत येतील म्हणून उत्तर आलें. तत्क्षणीं लोकशिक्षणकर्ते

ओक यांचा तपास करण्यास निघालों. दोन तासांत पत्ता लागला नाहीं. तेवढ्या अवधींत दोनशे लोकांना तरी विचारलें असेल. 'लोक-शिक्षण' म्हणजे एक मासिक आहे याची दाद सुद्धां फारच थोड्यांना दिसली. शिवाय सुशिक्षित व विद्यार्थी यांनाच मी विचारीत गेलों. पुण्याची ख्याति किती पोकळ आहे याचा अनुभव मिळाला. कित्येकांनीं थापा सुद्धां ठोकल्या. पण मी फसण्यासारखा नव्हतों. असो यानंतर २ दिवसांनीं टिळकांची भेट झाली. भेटीतला प्रकार जवळ जवळ 'गुरोस्तु मौनं व्याख्यानं शिष्यास्तु छिन्नसंशयः' असा झाला असें म्हटलें तरी चालेल. सामान्य माहिती देत आहे. "विशेष" पत्रांत लिहितां येत नाहीं. तथापि खालील प्रश्न एका मुमुक्षु वेदांत्याचे आहेत अशा दृष्टीनें वाचलेत. थोडी गंमत आहे.

प्रश्न.—आपणास सत्समागम झाला आहे काय?

उत्तर.—नाहीं (यावरून दादासाहेब, तात्यासाहेब, दाजीसाहेब आणि दुसरे हि साहेब यांची योग्यता टिळकांच्या मतानें उघड आहे. प्रश्न ज्या अर्थांत विचारलेला आहे त्याच अर्थात उतर आहे).

प्रश्न.—आपली जन्म-मरणाची भीति सुटली काय?
(सदर प्रश्न गांधींना विचारला असता उत्तर काय? आपण कल्पना करावी)

प्रश्न.—आपण अमृतानुभव पाहिला आहे काय?

उत्तर.—नाहीं.

प्रश्न.—बीजक ग्रंथ आपले वाचनांत आहे काय?
(कबीराचा एक उत्कृष्ट ग्रंथ)

उत्तर.—नाहीं. मी प्राकृत ग्रंथ फारसे वाचले नाहींत. ज्ञानेश्वरी मात्र थोडीशी पाहिली आहे. संस्कृत ग्रंथ वाचणेचा मला लहानपणापासून नाद होता. ते मात्र मी बहुतेक सगळे वाचले आहेत. गीतेच्या त्या ७०० श्लोकांसंबंधीं तुम्हांस कांहीं कमीज्यास्त विचारावयाचें असल्यास विचारा. यापुढील प्रश्नोत्तरें देतां येत नाहींत. वरील प्रश्नोत्तरावरून अनेक अनुमानें निघणेंसारखी आहेत. परंतु ती सर्व आपल्या तर्ककुशल डोक्यावर सोंपवितों. या महात्म्यास साष्टांग नमस्कार घालून घरीं आलों. पुढील ४-५ दिवसांत काय प्रकार घडले असतील याची आपण मी भेटेपर्यंत खुशाल कल्पना करावी. मुदतबंदीचा करार मी करीत नाहीं. एवढें मात्र मी सांगतों कीं पर्वती वगैरे पाहणेस सुद्धां वेळ मिळाला नाहीं. परंतु "यशवंतराव खरे" ही सामाजिक कादंबरी मात्र दोन रात्रींत वाचून काढली. कादंबरी या नात्यानें ही मोठीशी चांगली नसेल. नसेल कशाला? नाहींच. परंतु यशवंतरावांच्या नांवानें ९९ हिश्श्यानें माझें च ६/७ वर्षांपूर्वींचें चित्र मला पहावयास मिळालें. पुढें थोडी करमणूक झाली. प्रकृतानुसरामः मुमुक्षुचे संपादक राजमान्य भिडे मला भेटण्यासाठी २/४ वेळा माझ्या घरीं आले होते. परंतु मी त्यांना भेटलोंच नाहीं. मित्रवर्य तांबे यांना भेटलों. तासभर बोलत होतों. पुण्याची हवा तांब्यांना चांगलीच मानवलेली दिसली. आपण आतां वांईस दाखल होऊं या. तो पहिलाच दिवस. सकाळची वेळ कृष्णेमध्यें, श्री समर्थांच्या स्पर्शनानें पवित्र झालेल्या कृष्णेमध्यें, स्नान करून परमधन्य झालों. त्या वेळच्या भावनेचें वर्णन करणेचें सामर्थ्य माझ्यांत नाहीं, हें मी प्रांजलपणे कबूल करतों. पुन्हां वाईस असतांना कृष्णेच्या स्नानाची इच्छा झाली नाहीं. उघडच आहे. "लोकः प्रयागवासी कूपे स्नानं समाचरति।" येथें ४/२ माणसांची ओळख झाल्यावर ज्ञानेश्वरीवर बरीच प्रवचनें सुरू

केलीं. त्यानें बरेंच काम झालें. १/२ उपयोगी गृहस्थ मिळाले. त्यामुळें चौंडेबुवांच्या गोरक्षणांत प्रवेश करतां आला. मला अर्थात् निरीक्षणाचें काम करावयाचें होतें. तें साध्य झालें. संस्थेंत असंख्य दोष आहेत, ते मी त्यांच्यापुढें मांडलें सुध्दां. परंतु संस्था उपयुक्त आहे, असा माझा ग्रह झाला. पुढें येथील मोफत वाचनालयाची व ग्रंथसंग्रहालयाची भेट घेतली. वाचनालयाची अगदींच खालावलेली स्थिति दिसली. वरून देखावा मात्र मोठा. आंत पहावें तों कांहीं नाहीं. फर्ग्युसन कॉलेजचा डिबेटिंग क्लब घ्या, वाईचें मोफत वाचनालय घ्या, अथवा चौंडेबुवांचें गोरक्षण घ्या, सर्वत्र 'बडे घरका' इत्यादि म्हणीप्रमाणें प्रकार दिसून आला. म्हणूनच माझी आपणा सर्वांना सविनय विनंति आहे कीं, बाहेरच्या डामडौलाकडे न पाहतां कांहींतरी भरीव काम करा. असो. वाचनालयाच्या व्यवस्थापकांस भेटून त्यांना त्यांचे दोष उघड सांगून कांहीं सुधारणा सुचविल्या. परंतु त्यांचा उत्साह इतका अवर्णनीय दिसला कीं ते म्हणाले, 'सर्व व्यवस्था तुमच्याच ताब्यांत देतों. तुम्ही आपल्या मनाप्रमाणें सुधारणा करा. मला हें काम फारच त्रासदायक झालें असून माझ्या हातून कांहीं सुधारणा होऊं शकतील असें वाटत नाहीं'. मी त्यांना सांगितलें कीं मला दुसरीं कामें असल्यामुळें तसें करतां येत नाहीं. नंतर आपल्या संस्थेची (म्ह. तुमची) त्यांस माहिती दिली. त्यांच्या बोलण्यावरून असें दिसून आलें कीं शंकर मोरो रानडे यांच्या चिरंजीवांच्या जवळ मराठीचा मोठा संग्रह आहे. तो मिळण्यासारखा आहे. तो मिळाल्यास आपण यत्न करून पहावा. इंग्रजीचा हि मोठा संग्रह (त्यांच्या सांगण्याप्रमाणें वीस हजार) रानडे यांच्यापाशीं होता. एवढ्याश्या संस्थेंत सुद्धां 'भांडणे' सुरू झाल्याचें दिसलें. यावरून आपणां सर्वांस बोध घेतां येण्यासारखा आहे. येथील पुस्तकालयांत सुमारें २॥ हजार पुस्तकें आहेत. आपण हि आणखी ८/९ महिन्यांत २ हजार पुस्तकें जमविण्याचा विचार केलेलाच आहे व त्या दिशेनें आपण प्रयत्न करीत च आहांत, अशी माझी पूर्ण खात्री आहे. येथील व्यवस्था नीटशी दिसली नाहीं. परंतु येथून आपणांस एक गोष्ट घेण्यासारखी आहे. त्यांनीं सुमारें दोनशें—अडीचशें मासिकें एकत्र केलीं आहेत. त्या दिशेनें आपण यत्न करीत नव्हतों. सर्व वर्ण मिळाल्यास घ्यावयाचें असें आपलें धोरण होतें. पण आतां मला वाटतें मिळतील तितकी व तीं मासिकें मिळविण्याचें धोरण स्वीकारावें. हें बरें. त्या गोष्टीचा सभेंत स्वतंत्र विचार होईलच. आपली "मोहीम" रेंगाळतां कामा नये म्हणजे झालें. पुढें येथील निरनिराळ्या घाटांचे उत्सव सुरू झाले. महाप्रसाद वगैरेला मी जात नव्हतों. परंतु गणपती आळीच्या घाटावरील उत्सवांत एक, ब्राह्मणशाहीच्या (म्ह. आमच्या) घाटावरील उत्सवांत दोन अशी तीन प्रवचनें जाहीरपणें केलीं. ती तीन्ही लोकांना फारच पसंत पडून परिणामकारक झालीं. गीता, तुकाराम व रामदास या तीन विषयांवर माझीं प्रवचनें होतीं. पैकीं पहिल्या विषयावरील व्याख्यानांचा इतका परिणाम झाला कीं एक विद्यार्थी भर रस्त्यावर माझ्या पाया पडला आणि 'वन् फाइन मॉर्निंग आय रोज अँड फाइंड मायसेल्फ फेमस' या बायरन कवीच्या उक्तीप्रमाणें वाईस माझी (व त्याबरोबर आमच्या आश्रमाची हि) स्थिति झाली. यानंतर गोव्यांत उत्सवासाठीं गेलों होतों. तेथें गीतेवर दोन, उपनिषदावर एक, नारद भक्तिसूक्तांवर एक, तुकारामाविषयीं एक व स्वतंत्र एक अशी ही सहा प्रवचनें केलीं. तेथील ब्रह्मवृंदांत खळबळ उडून मला दोन ठिकाणी मोठा वाद करावा लागला. एका शास्त्र्यांनीं तर मोठ्या संतापानें माझें उपनिषदांवरील प्रवचन चाललें असतांना शांकरभाष्याविषयीं मला जोरांत प्रश्न विचारला. परंतु व्यासपीठावर मी बसलों होतों त्या गोष्टीचा फायदा घेऊन त्याचा व एकंदर शास्त्रीवर्गाचा दसपट जोरानें मी समाचार घेतला. परंतु या सर्व प्रकरणांत लोक माझ्या बाजून होते. पुढें पुढें माझ्या घरीं (म्ह. मी उतरलों होतों तेथें) १०/५ मंडळी रोज येऊन माझ्याशीं कटकट करीत बसत. व मला त्यांचें समाधान करावें लागे. माझीं प्रवचनें किती उत्तम झाली असतील याविषयीं खालील पुरावा बस होणार आहे. डिटेक्टिव्ह पोलिसाची स्वारी उघड उघड आमच्या घरीं येऊन माझा पत्ता, नांव वगैरे सर्व लिहून घेऊन गेलीं. मी त्याला सांगितलें कीं—इथें बसतों तसा तुरुंगांत बसण्याला हि माझी हरकत नाहीं. गांव लहानसाच आहे. पण उत्सवाच्या निमित्तानें ५०० लोक बाहेरच सहज जमतात. येथें उसाचा रस 'रेट' प्यालों. तो पीत असतांना—इंद्रियस्येंद्रियस्यार्थे रागद्वेषौ

अनुक्रमणिका

यवस्थितौ । तयोर्न वशमागच्छेत्तौ ह्यस्य परिपंथिनौ ॥ या गीता श्लोकांशीं व टिळकांनीं केलेला अर्थात् आठवण झाल्याशिवाय राहिली नाहीं. येथील काटेंश्वराचें देवालय फारच उदात्त रमणीय अशा देवालयांत वसलें आहे. दोन्ही बाजूंनीं कृष्णा नदीचा प्रवाह जात असून मध्यें देऊळ आहे. प्रातःकाळची शोभा अवर्णनीय च. या गांवांत ८/९ दिवस होतों. तेथें दुसऱ्या गांवची पुराणाचीं आमंत्रणें ठेवलीं आहेत. काय होईल तें खरें. येथें एक चमत्कारिक योगायोग म्हणजे रा. तगारे यांचे मामलेदार काका ज्या घरांत रहात होते तेथें च मी उतरलों होतों, हा होय. प्रवासापासून मिळणारें ज्ञान व होणारें सुख केवढें मोठें असतें त्याचा गेल्या वर्षांतील अनुभव सांगूं लागलों तर एवढें च म्हणेन की या ज्ञानापुढें व त्या सुखापुढें ज्ञानेश्वरी आदि वाचन हि कमीच आहे. मग संस्कृत व इंग्रजी गटारें ज्यांत विद्यार्थी आनंदानें पोहत असतात त्यांची काय कथा? परीक्षांपेक्षां हि उच्चतर कर्तव्य पार पाडण्यास विद्यार्थी पुढें आले पाहिजेत. असें आतां मागासलेले पुढारी सुद्धां म्हणूं लागले आहेत ही भाग्याची गोष्ट आहे. असो. येणेंप्रमाणें आपल्या इच्छेप्रमाणें कांहीं माहिती आपणांस कळवीत आहें. आपली तृप्ति करण्याचें सामर्थ्य माझ्यांत नाहीं, हें मी जाणून आहें. पण आपण एवढेंच गोड मानून घ्याल तर आपल्या उदार मनाला तें योग्यच होईल. नारायणशास्त्री मराठे यांच्या प्राज्ञमठासंबंधीं निरीक्षण झालें नसल्यामुळें आजच कांहीं लिहितां येत नाहीं. एवढें म्हणण्यास हरकत नाहीं कीं शास्त्रीबोवासारखा निरभिलाष विद्वान् लाखांत सुद्धां मिळावयाचा नाहीं. तसेंच ही संस्था म्हणजे वाईचें एक भूषण आहे. परंतु तूर्त इतकें च पुरे. मुंबई ग्रंथसंग्रहालयाचा कॅटलॉग निर्णय सागरांत छापला आहे. परंतु निर्णय सागरांत छापलेलीं पुस्तकें निर्णय सागरांत मिळतातच असें नाहीं. उदा. कुंभकोण मुनीचें महाभारत निर्णय सागरांत छापलें असून तें कुंभकोणासच मिळतें. तेव्हां तेथें न मिळाल्यास ग्रंथसंग्रहालयास लिहावें. तसेच बायबलचे विसरू नये. गांवांत प्लेगचे फुटाणे भाजण्याचें काम छान चाललें आहे. विशेष सोडून दिल्यास एकंदर फुटाणे फटाफट फुटत आहेत. तरी पण माझी काळजी ईश्वर करण्यास समर्थ असल्यामुळें तुम्हीं वा दुसऱ्या कोणी हि करण्याची जरुरी नाहीं. माझी प्रकृति चांगली आहे. महाबळेश्वर, प्रतापगड वगैरे पाहण्याचें मनांत आहे. ईश्वर काय घडवितो तेवढेंच पाहणें आहे.

येणेंप्रमाणें माझी हकीकत झाली. आपल्याकडून सविस्तर हकीकतीचें पत्र येईलच. आपल्या परीक्षांचा ऐन मोसम चालला असेल. प्रथम वर्षाची परीक्षा तर होऊनच गेली असेल. परीक्षेचा निकाल हि ज्याच्या त्याच्या अभ्यासाप्रमाणें गोडच झाल्याशिवाय राहणार नाहीं. तगारे बहुतेक जूनमध्यें बडोद्यास येतील असें वाटतें. रा. रा. देशपांडे साताऱ्यास जाणार असल्यास त्यांचा पत्ता मला कळवावा. म्हणजे तेथें गेल्यास भेटतां येईल. काका कालेलकर व आनंदानंद यांजबरोबर हिमालयांत गेलेले बुवा मर्ढेकर भेटले होते. त्यांचें माझें संभाषण हि झालें. रा. पुरोहितांना परस्पर आपण च पत्र लिहावें. मला ते दाद देतील असें वाटत नाहीं. मोघेजी, धोत्रेजी व आपण आपल्या आयुष्याचें धोरण अजून ठरविलें आहे कीं नाहीं? निदान ठरविण्याचा प्रयत्न तरी चालला आहे कीं नाहीं? हा प्रश्न पुन्हां एकदां विचारून ठेवतों. आयुष्य संपावयाच्या आंत निकाल झाल्यास ठीक तुम्हांला दोष लावण्याची माझी मुळींच योग्यता नाहीं. मी माझ्या मनास एकच प्रश्न विचारीत आहें, (टिळकांना विचारलेला २ रा) त्याचें समाधानकारक उत्तर मिळेपर्यंत मला कांहींच बोलावयाचा हक्क येत नाहीं. तरी आपल्या कार्याकडे दृष्टि लावा इतकी विनंति केल्याशिवाय राहवत नाहीं. तुमच्या आमच्या सारखे तरुण तपश्चर्या करूं लागल्यास भारतभूमीचा उद्धार लांबणीवर आहे काय? पुस्तकालयाचें एक काम पूर्ण तडीस गेल्यास आपणांस एक प्रकारची दिव्य शक्ति, आत्मविश्वास उत्पन्न होईल असा मला भरंवसा वाटतो. मोघ्यांनीं आपला मुलगा देशासाठींच तयार करावा अशी त्यांना विनंति करण्याचें अप्रस्तुत साहस मी करतों. याचा त्यांनीं जरूर विचार करावा. सर्व मित्रमंडळींस नमस्कार. मागील पत्रांत उल्लेख केलेल्या मंडळींस पत्र दाखविणें. भारतमातेच्या हांकेला बहिरे होऊं नका, हीच विनंति. वंदे मातरम्.

अनुक्रमणिका

वाई : **विनायक नरहर भावे.**

ता. १-३-१७.

## पू. बापूंना वांईहून पाठविलेले पत्र (१०-२-१९१८)

परम पूज्य बापूजी,

एक साल पहले अस्वास्थ्य के कारण आश्रम के बाहर गया था। यह तय हुआ था। कि दो तीन मास वाई रह कर आश्रम लौट आऊंगा। पर एक साल बीत गया। फिर भी मेरा कोई ठिकाना नहीं। इस कारण मैं आश्रम आऊंगा या नहीं अथवा जीवित हूं या नहीं यह शंका वहां हुई होगी। पर मुझे कबूल करना चाहिए कि इस बारे में सारा दोष मेरा ही है। वैसे मामा (फडके) को मैंने एक दो पत्र लिखे थे उनमें लिखा था कि 'सत्याग्रह' शुरू होने की बात आती हो तो मुझे जरूर लिखिएगा। मैं सबकुछ छोड कर तुरंत ही आ पहुचूंगा। नहीं तो जिस लोभ के कारण मैं आश्रम के बाहर रह रहा हूं वह पूरा होने पर ही आश्रम में प्रवेश करूंगा। आश्रम छोड कर मै चला गया हूं ऐंसा भी शक किसी को हुआ हो तो उसमें भी दोष मेरा ही है; क्योंकि पत्र न लिखने की मेरी आदत है। पर इतना तो लिखना ही चाहता हूं कि आश्रम ने मेरे हृदय में खास स्थान प्राप्त कर लिया है, इतना ही नहीं अपितु मेरा जन्म ही आश्रम के लिए है, ऐसी श्रद्धा बनी है। तो फिर प्रश्न उठता है कि मैं एक वर्ष बाहर क्यों रहा?

जब मैं दस वर्ष का था तभी मैंने ब्रह्मचर्य-व्रत का पालन करते हुए देशसेवा करने का व्रत लिया था। उसके बाद मैं हाईस्कूल में दाखिल हुआ। उस समय मुझे गीताजी का शौक लगा। पर मेरे पिताजी ने दूसरी भाषा के तौर पर फ्रेंच लेने की आज्ञा दी तो भी गीता पर का मेरा प्रेम कम नहीं हुआ था और तभी से मैंने घर पर ही खुद-ब-खुद संस्कृत का अभ्यास शुरू कर दिया था। मेरा निश्चय था कि वेदांत और तत्त्वज्ञान का भी अभ्यास करूं। मैं आपकी आज्ञा ले कर आश्रम में दाखिल हुआ। पर उसी समय वेदांत का अभ्यास करने का अच्छा मौका हाथ लगा। वाई में नारायणशास्त्री मराठे नामक एक आजन्म ब्रह्मचारी विद्वान विद्यार्थियों को वेदांत तथा दूसरे शास्त्र सिखाने का काम करते हैं। उनके पास उपनिषदों का अध्ययन करने का लोभ मुझे हुआ। इस लोभ के कारण वाई में मै ज्यादा समय रह गया। इतने समय में मैने क्या-क्या किया, वह लिखता हूं।

जिस लोभ के खातिर मैं इतने दिनों आश्रम से बाहर रहा वह मेरा लोभ और उसका कार्य नीचे लिखे अनुसार है :—

(१) उपनिषद, (२) गीता, (३) ब्रह्मसूत्र और शांकरभाष्य, (४) मनुस्मृति, (५) पातंजल योगदर्शन-इन ग्रंथों का मैंने अभ्यास किया। इसके अलावा (१) न्यायसूत्र, (२) वैशेषिकसूत्र, (३) याज्ञवल्क्य स्मृति इन ग्रंथों को पढ गया। अब मुझे अधिक सीखने का मोह नहीं है। अपने आप ही जो पढना होगा वह पढ लूंगा। दूसरा काम था स्वास्थ्य-सुधार, जिसके लिए मैं वाई गया था, उस बारे में—

स्वास्थ्य-सुधार के निमित्त पहले तो मैंने १०-१२ मील घूमना शुरू किया। बाद में ६ से ८ सेर अनाज पीसना शुरू किया। आज ३०० सूर्य नमस्कार और घूमना, यह मेरा व्यायाम है। इससे मेरा स्वास्थ्य ठीक हो गया।

अनुक्रमणिका

आहार के विषय में पहले छः महिने तक तो नमक खाया। बाद में उसे छोड दिया। मसाले वगैरह बिलकुल नहीं खाये और आजन्म नमक और मसाले न खाने का व्रत लिया। दूध शुरू किया। बहुत प्रयोग करने के बाद यह सिद्ध हुआ कि दूध बिना बराबर चल नहीं सकता। फिर भी अगर इसे छोडा जा सकता हो तो छोड देने की मेरी इच्छा है। एक महिना केवल केले, दूध और निंबू पर बिताया। इससे ताकत कम हुई। आज मेरी खुराक नीचे दिये अनुसार है।

दूध १॥ सेर (६० तोला), भाखरी २ (२० तोला ज्वार की), केले ४-५, निंबू १ (मिल जाये तो)। अब आश्रम पहुंचने पर अपना भोजन आपकी सलाह ले कर तय करने का विचार है। स्वाद के लिए अन्य कोई पदार्थ खाने की इच्छा ही नहीं होती। फिर भी ऊपर लिखा मेरा आहार बहुत अमीरी है, ऐसा महसूस करता हूं। रोज का खर्च लगभग नीचे लिखे अनुसार—

| | |
|---|---|
| केले और निंबू | —) |
| ज्वार | )॥ |
| दूध | —॥ |
| कुल | =)।।। |

इसमें और क्या फेरफार करना चाहिए, वह आपसे मुझे जानना है। सो मुझे पत्र द्वारा लिखिएगा।

**कार्य**

१. गीताजी का वर्ग चलाना। उसमें ६ विद्यार्थियों को अर्थसहित सारी गीता सिखायी। बिना पारिश्रमिक के।

२. ज्ञानेश्वरी छः अध्याय। इस वर्ग में चार विद्यार्थी थे।

३. उपनिषद् नौ, इस वर्ग में दो विद्यार्थी रहे।

४. हिंदी प्रचार—मै स्वयं अच्छी हिंदी नहीं जानता, फिर भी विद्यार्थियों को हिंदी के समाचारपत्र पढने पढाने का क्रम रखा।

५. अंग्रेजी दो विद्यार्थियों को सिखायी।

६. यात्रा लगभग ४०० मील पैदल। राजगढ, सिंहगढ, तोरणगढ आदि इतिहासप्रसिद्ध किले देखे।

७. प्रवास करते समय गीताजी पर प्रवचन करने का क्रम भी रखा था। आजतक ऐसे कोई ५० प्रवचन किये। अब यहां से आश्रम आते हुए पहले पैदल बंबई जाऊंगा और वहां से रेल से आश्रम पहुचूंगा। मेरे साथ २५ वर्ष का एक विद्यार्थी प्रवास कर रहा है। मुझसे गीता सीखने का उसका विचार है। मैं अधिक से अधिक चैत्र शुक्ल प्रतिपदा को आश्रम पहुचूंगा।

अनुक्रमणिका

८. वाई में विद्यार्थी-मंडल नाम की एक संस्था स्थापन की। उसमें एक वाचनालय खोला और उसकी सहायता के लिए चक्की पीसनेवालों का एक वर्ग शुरू किया। उसमें मैं और दुसरे १५ विद्यार्थी चक्की पीसते। जो मशीन की चक्की पर पिसवाने ले जाते उनका काम हम (एक पैसे में दो सेर हिसाब से) करते और ये पैसे वाचनालय को देते। पैसेवालों के लडके भी इस वर्ग में शामिल हुए थे। वाई पुराने विचारवालों का स्थान होने से और इस वर्ग में हम सब हाईस्कूलों में पढनेवाले ब्राह्मणों के लडके होने के कारण सब हमें मूर्ख ही समझते। इतने पर भी यह वर्ग कोई दो मास चला और वाचनालय में ४०० पुस्तकें इकट्ठी हो गयीं।

९. सत्याग्रहाश्रम के तत्त्वों का प्रचार करने का मैंने काफी प्रयास किया।

१०. बडोदा में १०-१५ मित्र हैं। इन सबको लोकसेवा करने की इच्छा है। इस कारण वहां तीन वर्ष पहले हमने मातृभाषा के प्रचार के लिए एक संस्था स्थापित की थी। इस संस्था के वार्षिकोत्सव में गया था (उत्सव यानी संस्था के सभासद इकट्ठे हो कर क्या काम किया और आगे क्या करना है इसकी चर्चा)। उसमें मैने हिंदी प्रचार करने का विचार रखा। मेरी श्रद्धा है कि वह संस्था यह काम जरूर करेगी। आपने हिंदी प्रचार का जो प्रयत्न शुरू किया है उसमें बडौदा की यह संस्था काम करने को तैयार रहेगी।

अंत में सत्याग्रहाश्रमनिवासी के तौर पर मेरा आचरण कैसा रहा यह कहना आवश्यक है।

अस्वादव्रत—इस विषय पर भोजनसंबंधी प्रकरण में ऊपर लिखा जा चुका है। बंडी, कोट, टोपी वगैरा न पहनने का व्रत लिया है। इस कारण शरीर पर भी धोती ही पहन लेता हूं। करघे पर बुना कपडा ही इस्तेमाल करता हूं।

स्वदेशी, परदेशी का संबंध मेरे पास है ही नहीं (आपके मद्रास के व्याख्यान के अनुसार व्यापक अर्थ न किया हो तो ही)।

सत्य-अहिंसा ब्रह्मचर्य—इन व्रतों का परिपालन अपनी जानकारी में मैंने ठीक ठीक किया है, ऐसा मेरा विश्वास है।

अधिक क्या कहूं? जब भी सपने आते हैं तभी मन में एक ही विचार आता है, ईश्वर मुझसे कोई सेवा लेगा? मैं पूर्ण श्रद्धा से इतना कह सकता हूं कि आश्रम के नियमों के अनुसार (एक को छोड कर) मैं अपना आचरण रखता हूं, यानी मैं आश्रम का ही हूं। आश्रम ही मेरा साध्य है। जिस एक बात की कमी का मैंने उल्लेख किया है वह है अपना भोजन (यानी भाखरी) स्वयं बनाना। मैनें इसका भी प्रयत्न किया। पर प्रवास में यह संभव न हो सका।

सत्याग्रह का या दूसरा कोई (शायद रेल संबंधी सत्याग्रह शुरू करने का) सवाल पैदा होता हो तो पहुंच जाऊंगा, नहीं तो ऊपर लिखे समय पर अवश्य ही।

इधर आश्रम में क्या फेरफार हुए हैं तथा कितने विद्यार्थी हैं? राष्ट्रीय शिक्षा की क्या योजना है? मुझे अपने आहार में क्या परिवर्तन करना चाहिए, यह जानने की मेरी प्रबल इच्छा है। आप स्वयं मुझे पत्र लिखे। ऐसा विनोबा का आपको, पितृतुल्य समझनेवाले आपके पुत्र का—आग्रह है।

मैं दो चार दिन में ही यह गांव छोड दूंगा।

विनोबा के प्रणाम।

(यह पत्र पढ कर "गोरख ने मछिंदर को हराया। भीम है भीम" यह उद्गार बापू के मुंह से निकले थे। सुबह उनको इस प्रकार उत्तर दिया)

तुम्हारे लिए कौनसा विशेषण काम में लाऊं यह मुझे सूझता नहीं। तुम्हारा प्रेम और तुम्हारा चरित्र मुझे मोह में डुबो देता है। तुम्हारी परीक्षा करने में मैं असमर्थ हूं। तुमने जो अपनी परीक्षा की है, उसे मैं स्वीकार करता हूं। और तुम्हारे लिए पिता का पद ग्रहण करता हूं। मेरे लोभ को तुमने लगभग पूरा ही किया है। मेरी मान्यता है कि सच्चा पिता अपने से विशेष चरित्रवान् पुत्र पैदा करता है। सच्चा पुत्र वह है जो पिता ने जो कुछ किया हो उसमें वृद्धि करे। पिता सत्यवादी, दृढ, दयामय हो तो स्वयं अपने में ये गुण विशेषता से धारण करे। यह तुमने किया है ऐसा दीखता है। तुमने यह मेरे प्रयत्नों से किया हैं, ऐसा मुझे नहीं मालूम होता। इस कारण तुमने मुझे जो पिता का पद दिया है, उसे मैं तुम्हारे प्रेम की भेट के रूप में स्वीकार करता हूं। उस पद के योग्य बनने का प्रयत्न करूंगा और जब मै हिरण्यकश्यप साबित होऊं तो प्रल्हाद भक्त के समान मेरा सादर निरादर करना।

तुम्हारी यह बात सच है कि तुमने बाहर रह कर आश्रम के नियमों का बहुत अच्छी तरह पालन किया है। तुम्हारे आश्रम में आने के बारे में मुझे शंका थी ही नहीं। तुम्हारे संदेश मामा (फडके) ने मुझे पढ कर सुनाये थे। ईश्वर तुम्हे दीर्घायु करे और तुम्हारा उपयोग हिंद की उन्नति के लिए हो, यही मेरी कामना है।

तुम्हारें आहार में किसी प्रकार का परिवर्तन करने का अभी तो मुझे कुछ नहीं लगता। दूध का त्याग अभी तो मत करना। इतना ही नहीं आवश्यकता हो तो दूध की मात्रा बढाओ।

रेलविषयक सत्याग्रह की आवश्यकता अभी नहीं है। पर उसके लिए ज्ञानी प्रचारकों की आवश्यकता है। यह संभव है कि शायद खेडा जिले में सत्याग्रह करना पडे। अभी तो मै रमताराम हूं। दो-एक दिन में दिल्ली जाऊंगा।

विशेष तो जब आओगे तब। सब तुमसे मिलने को उत्सुक हैं।

बापू के आशीर्वाद।

(बाद में बापू के उद्गार—"बहुत बडा मनुष्य है। मुझे अनुभव होता रहा की महाराष्ट्रियों और मद्रासियों के साथ मेरा अच्छा संबंध रहा है। मद्रासी तो इस समय रहे नहीं; परंतु महाराष्ट्रियों में तो किसी ने मुझे निराश किया ही नहीं। उसमें भी विनोबा ने तो हद कर दी!")

## श्रुतिमाउली—वेद (१९१८)

तारीख १० फेब्रुवारी १९१८ आईचा मृत्यु दिन विनोबाजी म्हणाले आम्ही हि जाणार हे उद्गार प्रस्तुत लेखकाने स्वतः ऐकले आहेत. नंतर पूज्य विनोबाजींनी ज्ञानेश्वरमहाराजांच्या 'नाही श्रुतीपरौती

माउली जगा' या उक्तीप्रमाणे वेदाला आईच्या ठिकाणीं मानून बडोद्यास वेदाभ्यास सुरू केला. लोकमान्य टिळक, अरविंद, ग्रिफीथ इत्यादी १४/१५ महापुरुषांचें वेदावरचे लिखाण त्यांनी आत्मसात् केले. व त्याप्रमाणे जीवन जगण्याचा प्रयत्न केला. वीस हजार वर्षांपूर्वीचा वेद. तो समजणे कठीण. आध्यात्मिक, ऐतिहासिक, भौगोलिक अनेक तऱ्हेनें वेदांचा अभ्यास केला जातो. पण वेदांचा बिनचूक अर्थ समजणे शक्य नाहीं, म्हणून तो करूंच नये. तो केवळ शब्दराशि आहे. कर्मकांडी लोकांनी वेदाचा अर्थ केवळ यज्ञयाग असा केला आणि स्वर्गप्राप्ति हा उद्देश ठेवला.

विनोबाजी वेदचिंतन करीत. पण तें लिहून ठेवीत नसत. अनेकांनी त्यांना विनंति केली पण वेदांचा अर्थ लिहिण्याचे त्यांनी मान्य केलें नाही.

वेदांचा अर्थ च काय पण उच्चार सुद्धा स्त्री, शूद्रादींनीं करणे योग्य नाही, असे म्हटलें गेलें. पण वेदांत च स्त्रिया ऋचाकर्त्या आहेत. तेव्हा हा प्रश्न सहज च रुढीमुळें व अज्ञानामुळें उत्पन्न झाला ही गोष्ट उघड आहे. जर शमदमादि साधन जवळ असेल तर कोणी हि वेदाभ्यास करूं शकतो.

पूज्य विनोबाजींचे वेदाध्ययन जवळ जवळ शेवटपर्यंत चालूं होते. पूज्य विनोबाजींनी ब्रह्मविद्या मंदिरात ऋग्वेदसार ग्रंथ छापविला. नंतर या सारातील हि एकूण ८३ मंत्र नित्यपाठाकरितां निवडले आहेत. फक्त महत्त्वाचा या सारग्रंथाचा आणि ऋग्वेदाचा हि शेवटचा मंत्र आहे—

समानीव आकूतिः समाना हृदयानि वः<br>
समानमस्तु वो मनो यथा वः सुसहासति ।

तुमची आकूती म्हणजे भावना, तुमचीं हृदयें, तुमचे संकल्प, समान असावेत की ज्यामुळें तुमची उत्तम संघटना बनेल.

## आईच्या मांडीवर (१८-४-१९५८)

आई म्हणाली, मला जरुरीच्या कामासाठीं जरा बाहेर जायचें आहे. ही न्याहारी या कपाटांत ठेवली आहे. जरूर खा. ऐकलेंस? अत्यंत प्रेमानें आई आपल्या लाडक्याला सांगत होती. आईचा नियम होता कीं शाळेंतून मुलगा घरीं आला कीं ताटलींत खाण्याचे तयार करून त्याला देई.

पण आज आईला कोठें जरुरीच्या कामासाठीं बाहेर जावयाचें होते. तिने न्याहारीचें स्थान बजावून दाखवून दिलें. पण तिला शंका होती च.

परत आली तर शंका खरी च होती. तिनें पाहिलें, न्याहारी तशीच्या तशीच पडलेली होती. मुलगा मागणें किंवा स्वतः हातानें घेऊन खाणें जाणतच नव्हता. मग आईनें निश्चय केला कीं ही खाऊ घालण्याची वेळ कधींच टळू देतां कामा नये.

अनुक्रमणिका

पण एक वेळ सर्व लोक आईच्या माहेरीं गेले होते. मुलांना तर आजोळीं जाणें आवडतें च. दोघे लहान आईच्याबरोबर गेले. पण मोठ्यानें तें रद्द करून पुस्तकालयाचा आश्रय घेणें पसंत केलें. वाचण्याचा शौक, उत्तमोत्तम पुस्तकालय, विद्यालयाला सुट्टी!

आई म्हणाली पहा हे पांच रुपये येथे ठेवले आहेत. आंब्याचे दिवस आहेत. रोज आंबे खात जा.

भोजनाची व्यवस्था एके ठिकाणीं केली होती. त्यामुळें कांही च अडचण नव्हती. परंतु आईला शंका होती च कीं रुपये तसेच राहून न जावोत. आपल्या लाडक्याचा स्वभाव जाणत च होती.

परत आली तेव्हां प्रथम त्या जागेला पाहिले, जेथें पैसे ठेवले होते, ते तसेच होते. तिच्या डोळ्यांत अनावर अश्रु उभे राहिले. तिनें निश्चय च केला कीं विन्याला सोडून आतां कधीं हि जायचें नाहीं. असें होते आईचें प्रेम आणि अशी होती विन्याची मातृनिष्ठा!

पुष्कळांना कळत नाहीं कीं विनोबा निरपेक्ष, निरुपायिक होऊन महाराष्ट्रांत जाण्याची गोष्ट करीत आहेत. प्रवेशतां च ते म्हणाले कीं बायबलमध्यें म्हटलें आहे, मागा म्हणजे मिळेल. पण मी निश्चित केलें आहे कीं मागायचें नाहीं. मागा आणि मिळवा हा प्रयोग आजपर्यंत झाला. कामधेनूप्रमाणें लोकांनीं हि अपार दिलें. बिहारमधें म्हटलें सहावा हिस्सा द्या. कित्येक लोक विनोदानें म्हणत कीं यांची फी रोज दोन हजार एकरांची आहे. किंवा रोज दहा हजारांची हि आहे. लोकांनीं तितकी जमीन दिली. उत्कल ते केरळ सर्व च मागितलें तें मिळालें. शांति-सेना झाली.

पण आतां? तर आतां निश्चय केला आजपर्यंत मागितलें तें मागितलें. आईच्या जवळ काय कोणाला मागावें लागतें? ती तर वाट च पाहते, कीं केव्हां येईल घरांत, आलो कीं लगेच भोजन नाश्ता तयार. कधीं खेळांत गुंग झालों तर स्वतः आठवण देई. चल जेवणाची वेळ झाली! असे कितीतरी प्रसंग, कीं रात्री १०/१० वाजेपर्यंत विनोबा घरीं आले नाहीं. आई वाट बघे.

अशी च वाट गेल्या वर्षापासून महाराष्ट्र माउली का आपल्या विचित्र मुलाची पहात होती? जसजसा विलंब होत होता तसतशी ती विरहव्याकुळ होत होती. पण आतां तिनें ऐकलें कीं २३ मार्चला प्रजासूययज्ञाचा दिग्विजयी विश्वशांतीचा संदेशदाता येत आहे. तेव्हां वत्साला गाय तशी या महाराष्ट्रमातेची स्थिति झाली. यांत आश्चर्य नाहीं. जणूं काय राम च चौदा वर्षांनंतर स्वामित्वरूपी महासुराचा वध करून अयोध्येमधें येत आहे. आणि महाराष्ट्रमाता हर्षित होत आहे.

म्हणूनच स्वाभाविक होतें कीं महाराष्ट्राचे आबालवृद्ध सर्वांच्या हृदयांत उत्साहाचा पूर आला. सीमेवर हजारों लोक आले होते. महाराष्ट्राचे सर्वांत वयोवृद्ध नेते अण्णासाहेब कर्वे यांचा आशीर्वाद मिळाला. गोसेवक तपोवृद्ध चौंडेमहाराज स्वतः आले होते. श्री. काकासाहेब गाडगीळ, यशवंतराव चव्हाण, एस. एम. जोशी, आचार्य अत्रे, सरदेसाई, चितळे, नाईक, निंबाळकर, देवकीनंदन, देवगिरीकर, इत्यादी सर्व पक्षांचे कर्णधार हर्षित होऊन आले होते. गावोंगावीं हर्षोद्रेक झाला होता. १०/२०, ३०/३० वर्षे किंबहुना अधिक वर्षे सेवेंत निमग्न झालेले कार्यकर्ते उपस्थित होते. जणू महाराष्ट्राची भक्ति, शक्ति, मुक्ति साकार झाली होती. कधीं हि अनुभवला नाहीं असा शक्तीचा भावावेश येथें अनुभवला. महाराष्ट्र माउलीच्या या लाडक्या विलक्षण पुत्राचा गौरव करण्यासाठीं सर्व बांधव आज एकत्र झाले होते. तो भाव प्रगट होणें च शक्य

नाहीं. एकनाथांच्या प्रसिद्ध गीताने त्याने महाराष्ट्र मातेचें वंदन केलें. त्यांत जनताजनार्दनाचे रहस्य समजावलें आहे—निरभिमानता. भाषणाच्या सुरुवातीला च विनोबांनीं सांगितलें, प्रिय बंधुनों! मी तुमच्याकडे सर्व अभिमान सोडून आलों आहें. त्या एकाच वाक्यानें विद्युतसंचार झाला, भाषा, प्रांत, जाति, पक्ष इत्यादिंचा पक्षाघात कोठल्याकोठें निघून गेला. हा विनोबा प्रेमानें एका प्रांतातून दुसऱ्या प्रांतांत अग्रेसर होत गेला. तुलसी आणि कबीराच्या प्रांतांतून, चैतन्य आणि जगन्नाथ यांच्या चरणांपासून शंकर आणि रामानुजांचें, बसवेश्वरांचें दर्शन घेऊन आज मी ज्ञानोबा माउलीच्या चरणी... आतां एक अक्षर हि बोलणें कठिण झालें. झाले, भक्तीगंगेला महापूर आला. बिलकुल अलग दुनियेंत राहणारी ही व्यक्ति! एका ध्येयाशिवाय दुसरें कांहीं च न जाणणारा, प्रेमशक्तीशिवाय दुसऱ्या कोणत्याच शक्तीला न मानणारा. म्हणून या पृथ्वीवर मानवतेला खंडित करण्याची गोष्ट ऐकतांच त्याला असह्य होते. म्हणून संयुक्त महाराष्ट्र, संयुक्त कर्नाटक विश्वाच्या संदर्भात असेल तरच त्याला मंजूर. अन्यथा तो हे शब्द हि ऐकूं इच्छित नाहीं. 'जय जगत्' च्या उद्घोषाहून कमी उद्घोष त्याला मान्य नाहीं.

आगमनाच्या वेळीं प्रेमाचा साक्षात्कार झाला. उत्तरादाखल अगदीं थोडक्यांत विनोबा बोलले. मी आपल्या सेवेला हजर आहें. आपण माझ्यापासून जें काम घेऊ इच्छाल तें घ्या.

संध्याकाळपर्यंत अलगअलग लोक व्यक्तीशः सामूहिकरीत्या भेटले. सकाळच्या प्रार्थनेंत मतभेद असून हि सगळ्यांच्या अगदीं अंतःकरणांतल्या अंतःकरणाला भाषणामुळें प्रेरणा मिळाली होती. तो आला, त्यानें पाहिले व त्यानें जिंकलें हा च देखावा होता.

पण त्याच्या मनांत एक च भावना होती, मी आपल्या आईच्या मांडीवर बसण्याला आलों आहें. आतां मला मागायचें नाहीं. न मागतां च मिळवायचें आहे. आणि तुला मिळेल च असा आश्वासनाचा आईचा आशीर्वाद आहे.

## मोघेजींचा आश्रमप्रवेश (२४-१०-१९२१)

मोघेजींचें पूर्ण नांव महादेव अनंत मोघे. त्यांना भाऊ-बहीण कोणी नव्हतें. ते कोकणांतले. त्यांचे वडील बडोद्याला पोलिस खात्यांत होते. ते उंच, धिप्पाड, पहाडी आवाजाचे होते. कासार फळ्यांत रहात. विनोबांचे वडील प्रथम बडोद्याला गेले ते हि कासार फळ्यांत. मोघेजी वडिलांच्या उलट अगदीं बुटके.

मोघेजींचे वडील व आत्याबाई कोंकणांत गेल्यामुळें व विनोबांचे वडील हि कोठें कामाला गेल्यामुळें विनोबांना खाणावळींत जेवावें लागलें. मोघेजी हि तेथे जेवत होते. तेथें त्यांची व विनोबांची प्रथम ओळख.

मोघ्यांचे विषय मूळचे कच्चे, त्यामुळें ते बडोदा कॉलेजच्या आवारांत विमलेश्वर मंदिरांत जॉमेट्री घोकत बसत. तेथें विनोबा त्यांना खेचून बाहेर नेत. म्हणत थेरम कसले घोकतो? ते समजून घ्यावयाचे असतात. मग ते विनोबांबरोबर १०/१५ मैल फिरत. मोघेजी विद्यार्थी मंडळांत होते च.

विनोबा हुशार म्हणून त्यांची संगति मोघेजींच्या वडिलांना बरी वाटे. गांधींची अहिंसा मोघेजींच्या वडिलांना पटत नसे. मुंबईला कांहीं दिवस मोघेजींनीं नोकरी केली. पण ती सोडून ते साबरमती आश्रमांत दाखल झाले. वडिलांना कळविलें नव्हतें च. तेव्हां मोघेजींच्या वडिलांचा पारा चढला. मोघेजींचें लग्न

होऊन त्यांना मुलें हि झाली. पुढें मोघेजी साबरमती सोडून वर्ध्याला आले. तेथे ग्रामसेवामंडळांत दाखल होऊन त्यांनी आंजीला केंद्र केलें. तेव्हां वर्ध्याला त्यांच्या आत्याबाई आल्या व विनोबांच्या हातापाया पडल्या. ढळढळा रडल्या. विनोबाजी म्हणाले, मोघ्यांना परत जावयाचे असेल तर माझी हरकत नाहीं. मग मोघेजींचे वडील हि आले. तेथल्या विणकामांत शिरून ताणीचे तार तोडले. त्यांचे सोबती मधे पडले. मग तूं चोर म्हणून तुझ्यावर खटला भरतो म्हणून गेले. मोघेजींनीं महाराष्ट्र धर्म साप्ताहिकाचा हि महाराष्ट्रांत पुष्कळ प्रचार केला. मोघेजी भाऊ पानसे यांना पुत्र मानीत. त्यांच्या घरीं गोपुरीला रहात व ब्रह्मविद्या-मंदिरांत येणेंजाणें करीत. त्यांना सर्वजण बाबाजी म्हणत. त्यांना गोड आवडे. वाचन, मनन, विनोबांचा सहवास. मोघेजींचे आयुष्य मोठ्या आनंदांत व्यतीत झालें. शेंवटी त्यांना मूत्रविकार जडला. त्यांना नागपूरला मेडिकल कॉलेजमध्ये नेलें. पण व्यर्थ. परत आश्रमांत आले. बेशुद्ध होते. लगेच विनोबाजी तेथें त्यांच्याकडे गेले. त्यांनीं डोळे उघडले. पण ओळखले कीं नाहीं माहीत नाहीं. लगेच प्राण गेला. ब्रह्मविद्या-मंदिरांत ते सर्वांना वडिलांसारखे च होते. पुढें सर्व क्रियाकर्मांतरें झालीं. बडोद्याहून हि लोक आले. जन्मभर विनोबांची साथ त्यांनी केली. शेवटपर्यंत मित्र राहिले. जायचें सर्वांनाच, पण मित्रत्वानें महनीयता मिळवून जाणारे विरळा. बाबाजी मोघे वारले तो दिवस १८ एप्रिल (भूमिक्रांति दिन) १९७६ हा होता.

## गोपाळराव काळे यांचा आश्रमप्रवेश (१९२२)

विनोबाजींचा व गोपाळराव काळे यांचा परिचय १९१० मधें झाला. विनोबाजी कापडीपोळेंत राहण्याला आले तेव्हां काळे शंकरपोळेंत अगदीं जवळ रहात. त्यामुळें हा परिचय दृढ झाला. विनोबाजीं बरोबर काळे रोज १०/१२ मैल फिरण्यास जात. अनेक विषयांवर चर्चा चाले त्यामुळे त्यांना भान च रहात नसे. घरांसमोर हि चर्चा चाले ती रात्रीं ११ पर्यंत. आमच्या आजूबाजूला लोक जमत, पण त्यांना कांहीं समजत नसे. ते निघून जात. काळे व विनोबा लायब्ररींत हि वाचनांत पुष्कळ वेळ घालवीत. काळे आणि विनोबाजी शाळेंत थोडा वेळ जात. थोड्या अभ्यासानें पास होत. विनोबांच्या वडिलांच्या सांगण्यावरून विनोबांनीं फ्रेंच भाषा घेतली होती, काळ्यांनी संस्कृत, काळ्यांनी विनोबाजींमध्ये शंकराचार्यासारखी बुद्धि आणि बुद्धासारखी भावना पाहिली. विनोबाजींचे ब्रह्मचर्य सहजस्फूर्त होतें. केवळ सदरा नुसता आंगावर घेऊन विनोबांबरोबर काळे हि बडोद्यासारख्या शहरांत उन्हांत पावसांत फिरत. दासबोध, आर्याभारताचा विनोबांनी खूप अभ्यास करून ते पाठ केले होते. मराठींत विनोबा अद्वितीय होते. शिक्षक १०० मार्क देण्याऐवजी केवळ १/२ मार्क कमी देत. पुढे विद्यार्थीमंडळ काढलें. त्यांत पुष्कळ ग्रंथ ठेवले. विनोबाजींची व्याख्यानें अद्‌भूत असत. त्यांचे वैराग्य अतिप्रखर होते. त्यामुळे ते कठोर भासत.

काळ्यांचें लग्न झालें. विनोबा नाराज होतें पण त्यांनीं काळ्यांची मैत्री कायम ठेवली. ते काळ्यांना गोप्या म्हणत. विनोबाजी पुढे बापूंकडे साबरमतीला गेले. कांहीं दिवस वाईला राहून अनेक शास्त्रें शिकले व प्रवचनांनी सर्व लोकांना चकित केले. काळ्यांना आश्रमाच्या राष्ट्रीय शाळेंत शिक्षक म्हणून विनोबांनीं बोलावले. नंतर गोपाळराव वर्धा आश्रमांत गेले. तेथें काळ्यांनी विनोबांबरोबर सर्व कामांत अपार श्रम घेतलें. शेवटीं विनोबाजी भूदानपदयात्रेंत होते. तेव्हां काळ्यांना क्षयरोग झाला. त्यांचे सर्व आप्त हि स्वर्गवासी. ते एकदा मध्यप्रदेशचे खाद्य मंत्री हि झाले होते. शेवट आला. ३१-५-१९६२ ला ते गेले. ७२ वय होते. सर्वांना हळहळ वाटली. गोपुरीचे ते प्राण होते.

अनुक्रमणिका

## वायकोम सत्याग्रह (१९२४)

वायकोम (केरळ) मधे शंकराचे एक मंदिर आहे. हरिजनांना तेथें जाण्याची मनाई होती. तेथले पुजारी त्यांचा अतिशय छळ करीत. त्यासाठीं गांधीजींच्या आदेशानुसार विनोबाजी तेथें गेले. तेथें विनोबांनी कार्यकर्त्यांशीं चर्चा करून सर्व परिस्थिति नीट समजाऊन घेतली. मग विनोबाजींनीं तेथे जत्थेच्या जत्थे पाठविण्यास सुरुवात केली. पोलिसांनी अत्याचार फार केले. मग गांधीजी स्वतः तेथें गेले. पावसाळ्यांत गळ्याएवढ्या पाण्यांत रहावें लागलें. पण कोणी हि सत्याग्रह सोडला नाहीं. पोलिसांना हि फार त्रास पडला. वर्तमानपत्रांत अत्याचाराचीं वर्णनें येत. गांधीजी अधिकाऱ्यांना भेटले व शेंवटीं एक वर्ष चार महिन्यांनीं सत्याग्रह यशस्वी झाला.

सत्याग्रहांत त्यावेळीं कोणकोण होते हें समजण्याला आता मार्ग नाहीं. प्रत्येक सत्याग्रहींत भिन्नभिन्न गुण असतात. ते एकमेकांना उपयोगी पडतात. असा सहवास अन्य ठिकाणीं लाभणें शक्य नसतें. सत्याग्रह विचाराखेरीज तेथें अनेक विषयांचें विचारमंथन होतें. सामूहिक ध्यान, प्रार्थना, अध्ययन इत्यादींचा हि लाभ होतो. वेगळ्या प्रांतांतले हवापाणी खाणेपिणें यांत ग्राह्य काय अग्राह्य काय याचा हि विचार होई.

एकूण गीतेंत म्हटल्याप्रमाणें 'तुष्यन्ति च रमन्ति च' असा हा सगळा सत्याग्रह सोहळा झाला.

## ऐक्यपरिषदेंत दिल्लीला (१९२४)

हिंदु-मुसलमानांच्या तेढीमुळें बापूंनीं उपवासाचा शेंवटचा आश्रय घेतला. अनेकांनीं त्यांना म्हटलें, वाट पहा.

१८ तारखेची सकाळ. सर्वांचे चेहरे उतरले. इतक्यांत एक वृद्ध मुसलमान दारावर धक्के देऊन आंत शिरला व त्यानें गांधीजींच्या हातांत हात मिळवला. त्याच्या आनंदाला पार नव्हता. मग शौकतअल्ली महंमद अल्ली आले व म्हणाले हिंदु-मुसलमान भांडणे सोडत नाहींत म्हणून यांनीं २१ दिवसांचा उपवास केला आहे हें तुम्हांला माहीत नाहीं? तो मुसलमान म्हणाला पावभर दूध प्या व आराधना करा. बापू म्हणाले उपवासांत आराधना होत नाहीं काय?

मग ऐक्यपरिषदेंत अनेक ठराव झाले. गोवध, वाद्यें वाजविणें, धर्मांतर आणि पतितपरावर्तन. असे अनेक ठराव झाले. उपवास पार पडला.

प्रार्थना झाली. नंतर हकीमजी आणि अन्य लोकांकडून पूर्ण मदत देण्याचें आश्वासन मिळालें. बापू म्हणाले, मी केवळ ईश्वरशरण आहे. 'रघुवीर तुमको मेरी लाज' हें भजन बाळकोबाजींनीं म्हटलें. अनेकांचे संदेश आले. विनोबांकडून बापूंनीं भगवद्गीतेच्या कांही अध्यायांचा पाठ करविला. कठोपनिषद म्हणविलें. मालवीयजी फारच खूष झाले व त्यांचा व विनोबाजींचा संबंध तेव्हापासून वाढला. ते एकदां जमनालालजींबरोबर वर्ध्याला आश्रमांत हि आले. बाळकोबाजींनीं 'रघुकुलरीति सदा चली आई' हें भजन म्हटलें. शेवट गोड झाला. महात्माजींची प्रकृति हळूंहळूं सुधरली. पू. विनोबाजी व बाळकोबाजी परतले.

अनुक्रमणिका

## विनोबाजी बापूंना भेटण्याला पुण्याला (२४-१-१९२४)

बापू जेलमध्यें होते तेव्हां कित्येक दिवस त्यांचे पोट दुखलें, शेंवटीं पुण्याला हॉस्पिटलमधे नेलें. ऑपरेशन कर्नल मॅडक यांनी केलें. एकदम दिवे गेले. मग पॅट्रोमॅक्स आणून ऑपरेशन झाले.

स्वाभाविक च विनोबा बापूंना भेटण्याला गेले. देवदास, रामदास सर्वांना आनंद वाटला. बापूंनीं विचारलें, ‘केम छे? सारा ने?’

विनोबा म्हणाले ‘आपनी अने ईश्वरनी कृपा.’

बापू म्हणाले, ‘तुमची उपनिषदांची लेखमाला मी जेलमधें वाचली. ती पुरी करा.’

मग विनोबांनीं गोपूकाकांना लिहिलें कीं बापू नेहमींच प्रसन्न असतात, पण या वेळची त्यांची निर्मळता आणि प्रसन्नता कांहीं अपूर्वच. असा दुसरा पुरुष माझ्या पाहण्यांत नाहीं.

## मनोहर बळवंत दिवाण यांचा आश्रमप्रवेश (१९२६)

मनोहरजी बुलढाण्याचें. १९०१ सालचा जन्म. १९१७ मधें ते खामगांवला आले. ते नेहमी प्रथम श्रेणींत पास होत. नागपूरच्या मॉरिस कॉलेजमधें होते. पुढें उत्तीर्ण झाल्यावर १९२६ पर्यंत खामगांवच्या टिळक राष्ट्रीय शाळेंत त्यांनीं उत्कृष्ट अध्यापन कार्य केलें,

ते १९२६ मधें आश्रमांत आले. १९३० सालपर्यंत उत्तम सेवा केली. नंतर मनोहरजी पुलगांवला सहा वर्षे ग्रामसेवेंत राबले. पुढें केळझर सत्याग्रहांत गेले. १९३४ मधें सावंगी येथें कुष्ठरोगी पाहून १९३६ मधें महारोगी सेवामंडळ स्थापन केलें. त्यांना पद्मश्री ही पदवी मिळाली. महारोगी सेवा ख्रिस्ती लोक जगभर करतात. पण मनोहरजी हा पहिला भारतीय महापुरुष ही सेवा करणारा. पुन्हां मिशनऱ्यांना लाखो रुपयांची मदत, तर मनोहरजींना पैची हि मदत नाहीं? मनोहरजींनीं सेवेचें उपचार कार्य उत्तम शिकून घेतलें. मनोहरजी ग्रामसेवा करीत सतत फिरत. त्यांना सगळे लोक आमंत्रणें देत. इतके ते लोकप्रिय होते. फिरतांना धोतर, पिशवी, तकळी, पेळू एवढें च सामान ते ठेवीत व पायीं फिरत. मनोहरजी कातण्याविणण्यांत प्रवीण होते. त्यांचें अक्षर अति उत्कृष्ट. कुष्ठकार्यातून ते १९५९ सालीं निवृत्त झाले. तेव्हां मॉरिस कॉलेजमधें त्यांचा मोठा सत्कार झाला. असा पुरुष आपल्या येथें होता याचा कॉलेजला अभिमान वाटला. मनोहरजींनीं भूदानांत हि काम केलें. मनोहरजी एकदां सभेंत म्हणाले, पुढच्या जन्मी मी हें च काम करीन. त्यांना हजारों पत्रें येत. विश्रांति मिळेना. रात्रीं झोंप नाहीं. तेव्हां गुप्तपणें प्रस्तुत लेखकाच्या सांगण्यावरून धुळ्याला १८ दिवस विश्रांतीला आले. विश्रांति मिळाली. पण लोक तेथें हि हुडकीत आले. जावें लागलें. त्यांना संन्यास घेण्याची इच्छा होती. ते सन्यासी च होते. त्यांना पॅंक्रियासचा विकार होता. पण रक्तदान घेण्याचें त्यांनीं स्वीकारलें नाहीं. ते दर महिन्याच्या शेंवटीं विनोबांकडे येऊन त्यांच्या पाया पडत. शेंवटी १५ फेब्रुवारी १९८० रोजी एका रिक्शाचा धक्का लागून ते बेशुद्ध पडले. शुद्धीवर येतांच म्हणाले आतां मी देह ठेवतो, धन्य हे जीवन यापलीकडे काय म्हणणार!

अनुक्रमणिका

## शांति (२२-१०-१९३१)

शांति विनोबांची बहिण. जन्म १९०६. स्थळ गागोदें. मूळ नांव द्वारका, पण अतिशय शांत स्वभावामुळें शांति नांव पडलें. वर्ण सांवळा. श्रीकृष्ण काळा, यमुना हि काळी. कोणत्याच शाळेंत गेली नाहीं. पण र ट फ करीत वाची. इसापनीति वाची. इसापनीतींतल्या चित्रांवरून च ती गोष्टी सांगे. आई कधीं कधीं विनोदानें म्हणे तुला काथोड्याकडून विकत घेतली. मग ती ओक्साबोक्शी रडे. मग आई तिला जवळ घेऊन समजूत करी. मग लगेच हंसे. तिला दागिन्याची आवड नव्हती. ती आईचें पाहून पाहून सर्व स्वयंपाक शिकली.

शांति मोठी झाली तेव्हां आईला मदत करी. शांति आईला सर्व कामांत थोडी थोडी मदत करी. आई जेवतांना गोविंद गोविंद म्हणे. तिला घास लागे. तेव्हां शांति पाणी देई. आई प्रस्तुत लेखकाला आणि शांतीला रोज कंगोरे असलेल्या शिंपीनें चंदन हाताला लावी. आम्ही आईकडे दोघे पुष्कळ वेळ पाहत राहत असूं. आम्हाला वाटे आमची आई देवी च आहे! आईबरोबर शांति लक्ष्मणमहाराजांच्या मठांत कथा-कीर्तनाला हि जाई. कमेटी बागेत गेल्यावर तेथलें जिवंत असल्यासारखे पुतळे पाहून तिला नवल वाटे. तेथले पेंढा भरलेले वाघ-सिंह पाहून ती भिऊन रडे. आम्ही हात लावूं तरी तिला खात्री वाटत नसे. शांति मला आबा म्हणे. सर्कस पहायला गेली असताना एकदां मला अफाट गर्दीमुळें परत यावें लागलें. मी सकाळीं हिरमुसला पाहून मला ती काय झालें म्हणाली. मी हकीकत सांगतांच ती बाबांकडे गेली व त्यांना सगळी हकीकत सांगितली. मग बाबांनीं मला व शांतीला अगदीं अगोदर सर्कशींत पुढच्या भागीं बसविलें. आम्हीं सर्कस मनमुराद पाहिली. पण राममूर्तीच्या छातीवर दगड व हत्ती उभा पाहून ती रडूं लागली. तिला वाटलें आतां राममूर्ति चिरडून मरणार! मग बाबांनीं समजाविलें. नंतर एकदा पहिल्यांदा च निघालेला भस्मासुर मोहिनी हा मूक सिनेमा आम्ही पाहण्याला गेलों. तसेंच पानपतचा मोबदला व त्राटिका नाटक हि आम्ही शांतीबरोबर पाहिलें.

मी व शांति आईबरोबर वांईला गेलों. तेव्हां शांति मजबरोबर खेळे. आजोबा मना करीत. आजी म्हणे भाऊ बहीण आहेत. खेळायला काय हरकत? आजोबा म्हणत आतांपासूनच मर्यादा शिकवली पाहिजे. आजोबा शांतीला उभी च ठेवीत. मुलीच्या जातीनें बसतां कामा नये (मोठ्या माणसांसमोर) अशी त्यांची शिस्त होती.

वांईहून परत आल्यावर थोड्याच दिवसांत शांतीचें लग्न झालें. शंकरराव केळकरांशीं लग्न लागलें. लग्नाची मिरवणूक निघाली तेव्हां शांतीसह आम्हीं हत्तीवर प्रथम बसलों. लग्नांत सगळे आप्तइष्ट आले होते. विनोबाजी अर्थात् नव्हतेच. शांतीचे सासर बडोद्याजवळ कर्जणमियांगांव येथें होतें. तेथें जमीनजुमला आणि मोठीं घरें होतीं. गाई आणि दूधदुभतें भरपूर होतें. लग्नांत बडोद्यांतले सर्व प्रसिद्ध लोक आले होते. पुढें शांतीला क्षयरोग झाला. पण घरीं म्हणजे सासरीं काम करावें लागे. त्यामुळें तो वाढत गेला. शेंवटीं शांतीला शोचनीय मृत्यु प्राप्त झाला. तिला तीन मुली होत्या. शांतीचा मृत्यु २२-१०-१९३१! म्हणजे पंचवीस वर्षेच ती जगली.

## नवजीवन साहित्यमंदिराचे उद्‌घाटन (९-१-१९३४)

मंगळवार, सकाळीं ९ वाजतां. स्थळ : लक्ष्मीनारायण मंदिर, वर्धा.

अनुक्रमणिका

श्री. शिवाजी, स्वामी आनंद व इतर मंडळी होती. फार लोक नव्हते. विनोबाजी—मूर्तिपूजा हा हिंदु धर्माचा एक सात्त्विक मूर्खपणा आहे. साहित्य विक्रीचें दुकान उघडण्याच्या समारंभाची जरूर नव्हती. काम सुरू करणें म्हणजे उघडणें. पण मनुष्यस्वभावानुरूप ही मूर्तिपूजेसारखी क्रिया आहे.

दोन प्रकारचे विचार जगांत निर्माण झाले. एक, जर विचारांत सामर्थ्य असेल तर आपोआप प्रचार होईल. तो विचार आचरणांत आणला म्हणजे पुरे. विचाराचा जबरदस्तीनें प्रचार करण्याची जरूर नाहीं.

दुसरा विचार असा—मला जो विचार मिळाला आहे, तो दुसऱ्यावर जबरदस्तीनें लादावयाचा. त्यांत दुसऱ्याचें हित आहे असें मानावयाचें. धर्मांतर जबरदस्तीनें करावयाचे. हें योग्य नाहीं.

उलटपक्षीं आपला विचार कोणाला द्यावयाचा च नाहीं हा संकुचितपणा हि उपयोगी नाहीं. माझी उपासना गुपित असो. पण ती गुप्त असतां कामा नये. मिशनरी लोकांप्रमाणें आंधळेपणाने प्रचार नको.

गीतेंत १० व्या अध्यायांत “बोधयंतः परस्परं” म्हटलें आहे. एकमेकांनीं एकमेकांपासून द्यावें घ्यावें. संकुचितपणा असा कीं महाराष्ट्रांतले लोक मानतात कीं स्वराज्य आमच्याशिवाय मिळणें शक्य नाहीं. ही संकुचित अभिमानाची गोष्ट आहे. ईश्वर निरभिमानी लोकांकडून काम करवितो.

म्हणून माझें ज्ञान कोणाला द्यावयाचें च नाहीं, तें माझ्यापाशीं च ठेवावयाचें ही संकुचितता नको. त्यामुळें ज्ञान नष्ट होतें. ज्ञान देण्यानें वाढतें. त्याचप्रमाणें माझ्या आचरणांत नसलें तरी जबरदस्तीनें तें ज्ञान असून हि लोकांवर लादावयाचें हें हि नको. प्रत्येकानें नम्रपणें आचारपूर्वक आपला विचार लोकांना द्यावा. कोणता हि विचार आचारहीनपणें लादूं नये.

## विनोबा गागोदें गांवीं (१९३५)

विनोबाजींचा जन्म गागोद्याचा. आजोबा व काका यांच्याकडून त्यांना वाचन, वृत्तदर्पण इत्यादि शिक्षण मिळालें. तेथें विनोबा रानावनांत खूप हिंडत. तेथें करवंदें, तोरणें, अळुरणें खूप मिळत. डिंक व बोरें खाण्यांत हि त्यांना आनंद वाटे. रात्रीं बेरात्रीं डोंगरावर जाण्याची त्यांना भीति वाटत नसे. आई सकाळीं गुरगुट्या भात, तूप, मीठ, मेथकूट, पापड घालून देई तेव्हां खुष होत. बाकी जेवणाकडे त्यांचें लक्ष नसे. त्यांना आई म्हणजे परब्रह्म. तिच्यापुढें सर्व शून्य. जन्मापासून ब्रह्मनिर्वाणापर्यंत आईची भक्ति, आईंचे पुण्य स्मरण झालें नाहीं असा दिवस गेला नाहीं. आईच्या स्मरणानें त्यांच्या डोळ्यांतून अश्रुधारा वहात. भर सभेंत हि हें दृश्य दिसे.

गागोद्याला १९३५ सालीं विनोबाजी गेले. तेव्हां घर अगदीं लहान वाटूं लागलें. मला विचारतां मी म्हटलें मला हि असाच अनुभव आला. तेथें सर्वांना फार आनंद वाटला. तेथली विहीर, शेती, लंगोटी लावलेले लोक गांवच्या विहिरीवर डुबक् डुबक् आवाज संगीतापेक्षां हि मधुर वाटे. गावकऱ्यांच्या भजनांत गेलें. ‘दुःख बांदवडी आहे हा संसार’ हें ऐकून विनोबांना फार आनंद झाला. त्यांनीं लिहिले येथल्या डोंगरांना पाहून तृप्त झालों. मी पहाडावर राहणारा, कोणी योग्याच्या आश्रमांत राहणारा, हरीण, वाघ, सिंह असेन आणि या जन्मांत मनुष्य झालों असेन. पण अजून पुरा मनुष्य झालों नाही.

## विनोबांचें ४० वर्षें झालीं म्हणून अल्प निरीक्षणपर पत्र (७-९-१९३५)

तीर्थस्वरूप मामांचे सेवेसी,

९ चें पत्र मिळाले! ४० वर्षांचीं स्मरणें जागृत झालीं. प्रथम आपण विचारलेली माहिती—मी, बाळू व शिवाजी आम्ही तिचे भाऊ. बाळूचा जन्म जमखंडीला झाला. तो उरुळी कांचन येथें निसर्गोपचार केंद्र चालवितो. शिवाजी प्रचार कार्यात हिंडत असतो. नुकताच सहा महिने माझ्याजवळ राहून गीता-कोशाचें काम करून गेला प्रचारासाठीं. आमचे वडील बडोद्यास च असतात. त्यांचा पत्ता—न. शं. भावे, काळुपुरा, बडोदें.

मी जमखंडीला दोनदा आलों होतो. चौदाव्या वर्षी व बाळूच्या जन्माच्या वेळीं. त्यावेळीं आमच्या आजोबांविषयींची आठवण, घरांत शिरण्यापूर्वी एक लहान आंगण. ते उजव्या बाजूला पुड्या बांधीत. अगदीं लहान पुड्या. गुंजभर औषध. तशा पुड्या मी करून पाही. पण साधत नसे.

भेटीची इच्छा आपण दर्शविली आहे. केव्हां हि होऊं शकते. मी लिहिलेली गीताई पाहिली का? नसेल तर पाठवून देईन. आपल्या घरांतील लहान थोरांची हकीकत लिहावी. वडील मंडळीस नमस्कार. धाकट्यांस, आशीर्वाद.

विनोबाचे प्रणाम.

पू. बाबांच्या सेवेसी,

फार दिवस झाले. पत्र लिहिलें नाहीं. ४० वर्षें पुरीं होत आहेत म्हणून पत्र. वयाची २० ॥ वर्षें घरांत व इतकींच बाहेर. बाळूचें आज टी. बी. मुळें एक मोठें तप चालूं आहे. तो ही तपाचीच संधी मानतो. आनंदी असतो. शिवबा सतत प्रचार करीत हिंडतो. त्याचा ज्ञानाकडे प्रथमपासून सूक्ष्म कल. असे हे दोघे तप आणि ज्ञानाला वाहिले आहेत. मी, १०/१० तास कातणें व शिकवणें इत्यादि करतों. प्रकृति बरी आहे. लहानपणीं पारशी डॉक्टरचे नेहमीं औषध असे. आतां तसें नाहीं. आपली आई गेल्या नंतरची तपस्या खरोखर विस्मयकारक वाटते. आईचें स्मरण, आपला आशीर्वाद, सत्संग आमची तपस्या वाढवील असा भरवंसा.

—विनोबाचे साष्टांग प्रणाम.

## विनोबाजींची प्रकृति सुधारली (१९३८)

नालवाडीला रस्त्यावरची धूळ रात्रंदिवस रहदारीमुळें पू. विनोबाजींना फार बाधक झाली. एकसारखा खोकला येऊं लागला. तेव्हां बापूजींनी सुचवलें कीं कोठें तरी हवेच्या ठिकाणीं जावें. विनोबाजींनीं कळविलें कीं मी परंधाम पवनारला जाऊन पाहतों. तेथें प्रकृति सुधारली नाहीं तर अन्यत्र जाण्याचा विचार करूं. त्याप्रमाणें विनोबाजी गेले. पुलावरच दोनदां 'संन्यस्तं मया संन्यस्तं मया' म्हणाले आणि लाल बंगल्यांत राहिले. तेथे तूप व खिचडी आणि दहीं घेत. फळांत पपई घेत. त्यांचे वजन ७६ पौंड होते ते अकरा महिन्यांत १२० पौंड झालें. कोणता हि विचार मनांत आणणें, शिकवणें, कांहींच करीत नसत.

थोडें थोडें फिरणें, शक्तीप्रमाणें वाढविलें. जवळ दोन-तीन विद्यार्थी होते. वजन वाढल्याचें ऐकून बापूंना फारच आश्चर्य वाटलें. आणि आनंद झाला. विनोबाजींना आनंद झाला कीं श्रीमंताप्रमाणें हिल स्टेशनवर जावें लागलें नाहीं.

## पू. विनोबाजींना खणतांना भरतराम मूर्ति सापडली (१९३८)

१९३२ साली विनोबाजींनी धुळे जेलमध्यें गीता प्रवचनें सांगितलीं. त्यावेळी भरताचें वर्णन करतांना जर कोण्या कारागिरानें भरत आणि राम यांचें चित्र वा शिल्प तयार केलें तर तें भरत राज्य करीत असून हि कृश, किंचित ठेंगणा, रामाची भेट झाली या आनंदांत, इत्यादि वर्णन केलें आणि आश्चर्याची गोष्ट पवनारला कुदळीने खणत असतां त्यांना हूबेहूब भरतरामाची मूर्ति मिळाली. हा एक साक्षात्कार च झाला. सगळीकडे आनंदी आनंद झाला. मग अनेक मूर्ति निघाल्या. अनेक आश्रमवासीयांनीं त्या खोदून काढल्या. प्रथम त्या कोठें तरी होत्या पण मग व्यवस्थित मंदिर बांधले. प्राणप्रतिष्ठा करून ती मूर्ति आणि अन्य मूर्ति सुरक्षित राहतील अशी त्यांची व्यवस्था केली. गंगेची मूर्ति तर खरोखर अप्रतिम आहे. तिच्या खाली दगडावर ब्राह्मी लिपींत लेख आहे. वाकाटक घराण्यांतल्या एक भक्तिमती राणीनें हें मंदिर बांधलें. १॥ हजार वर्षांपूर्वी— मग इतिहास संशोधक हि आले. त्यांनीं फोटो घेतले. कालनिर्णय केला. वर्तमानपत्रांत लेख लिहिले. आतां तर तेथें रोज सकाळ-संध्याकाळ आरती होते. एकादशीला भजनें होतात. भरता सारखा भक्त झाला नाहीं. त्याच्या वरून च 'भारत' नाम भारताला पडलें.

## पू. जमनालालजींचा स्वर्गवास (१२-२-१९४२)

सेवाग्रामला फोन आला, जमनालालजी अत्यवस्थ, बेशुद्ध. लगेच बापू निघाले. बरोबर बिर्ला होते. आदल्या दिवशीं जमनालालजी हास्य विनोद करून सेवाग्रामहून परत आले होते. चँग कै शेक वर्ध्याला येणार. त्यांची बडदास्त ठेवण्यांत गर्क होते. त्यांचें तेंच मुक्त हास्य. तेंच बोलणें. तीच कामाची गडबड.

जमनालालजींचा रक्तदाब वाढला. औषध आणण्यासाठीं मोटार गेली. तों च त्यांचा प्राण गेला.

गांधीजींची भेट होऊ शकली नाहीं. वय अवघें ५२ वर्षें. त्यांच्या मृत्यूच्या वार्तेनें सगळ्यांना मोठा धक्का बसला. वर्ध्यांत सर्वत्र हरताळ पडला. सर्व संस्थांच्या नाड्या च एकदम आखडल्या.

संध्याकाळीं गोपुरींत त्यांचें दहन झालें. विनोबांनीं ईशोपनिषद् म्हटलें. त्यांच्या वृद्ध मातेचें गांधीजींनीं सांत्वन केलें आणि पत्नी तर सती जाण्याला धांवल्या. त्यांना बापूंनीं धरलें. बापू म्हणाले, जमनालालजींच्या पश्चात जोगी बना—त्यांचें गोसेवेचें कार्य करा. त्या दुःखानें वेड्या झाल्या. बापू म्हणाले, आपलें सारें धन कृष्णार्पण करा. स्वतः कृष्णार्पण व्हा. ती ११ फेब्रुवारी रात्र होती. बापूंनीं त्यांच्या सर्व आप्तइष्टांना त्यांचीं त्यांचीं कर्तव्यें सांगितलीं. गांधीजींना जमनालालजी गेल्यानें अपार दुःख झालें. पुढें महादेवभाई गेल्यानें असें च दुःख झालें. म्हणाले मगनलाल, जमनालाल, महादेव आपापल्या क्षेत्रांत अद्वितीय होते. त्यांची जागा कोणींच घेऊं शकत नाही. सभेंत विनोबाजींनीं त्यांच्या थोर गुणांचे प्रगट भाषण केलें. जवाहरलालजी, जाजूजी सर्वांनीं कळवळून आपले अनुभव सांगितले. अर्थात् हे पुढारी वर्ध्याला नव्हते. खरोखर असा पुरुष झाला नाहीं.

अनुक्रमणिका

## पू. विनोबांचा वेलोर जेलमधें उपवास (३-३-१९४३)

१९४२ मधें भारत सोडा या आंदोलनात सर्वांनी मरेपर्यंत जेलमधें उपवास करावा असें म्हटलें. पण नंतर त्यांनीं तें बदललें. महादेव देसाई त्यांच्या विरुद्ध होते. सर्वांना हे झेपणें शक्य नाहीं असें त्यांचें म्हणणें होतें.

पुढें बापूंनीं २१ दिवस उपवास सुरू केले. विनोबाजींनीं हि वेलोर जेलमधें २१ दिवस उपवास केले. डॉ. महोदय विनोबाजीं बरोबर जेलमधें होते. ते स्वतःच डॉक्टर असल्यामुळें उपवासांत घेण्याची सावधगिरी जाणत होते. कित्येकांना उपवासांत पित्ताची वांति होते. जीव घाबरतो. नाडी कमजोर होते. म्हणून कित्येक उपवासांत थोडें लिंबू व सोडा घेतात. पुष्कळ पाणी प्यावें. पण तें जात नाहीं. मळ कडक होतो. आपलें बावीस फूट आंतडें असतें, त्याची काळजी घ्यावी लागते. एनिमा घेणें बरें असतें. कित्येकांना मुळींच झोंप लागत नाहीं.

उपासानंतर रसाहाराची जरूरी असतें. पण जेलमधें तो कोठून मिळणार? जेलमधल्या जाडजूड भाकरी विनोबाजी एरवी हि खाऊं शकत नव्हते. उपासानंतर भयंकर भूक लागते. संयमाची फार आवश्यकता असते. विनोबाजींना संयम सहज होता. डॉ. महोदयांनी भाकरीवरचा पापुद्रा प्रथम थोडा थोडा देऊन पुढें विनोबाजींना पूर्ण सुधरवलें. पण जाडजूड भाकरी ते खाऊं शकत च नसत. फक्त पापुद्रे वाढवले. एवं च हा उपवास पार पडला. विनोबाजींनीं वेलोरमधें तमिळ, तेलगू, मल्याळम, कन्नड या चारी भाषा शिकून घेतल्या.

## पहिली गोसेवा परिषद् (१-२-१९४७)

पहिली च गोसेवा परिषद् जमनालालजींनीं आटोकाट मेहनत घेऊन भरवली. परिषदेंत व्यवस्था उत्तम होती. मंचावर फक्त बापू व विनोबा बसत. जमनालालजी खालीं च बसत—समोर बसत. अनेक प्रतिनिधी, वाईहून चौंडेमहाराज व त्यांचे सहकारी होते. अनेक गोप्रेमी मंडळी आली होती. शामियानां उत्तम उभारला होता. बा, बापू, विनोबा मंचावर बसले. इतक्यांत पाऊस सुरू झाला. तेव्हां एकानें बा, बापूंच्या डोक्यावर पाणी गळतें म्हणून परात धरली. विनोबांना हें कळलें नाहीं. विनोबांचें भाषण चालूं होते. बापू व श्रोते एकदम त्या परातीमुळें हसूं लागले. विनोबाजींच्या भाषणांत हंसण्यासारखे कांहींच नव्हतें. तेव्हां ते म्हणाले काय? लगेच त्यांना परात दाखविण्यांत आली. बापूंचें हि भाषण झालें. श्रीमन्नारायण हि होते च. स्वामी आनंद गोसेवासंघाचे सेक्रेटरी झाले. जमनालालजी म्हणाले, जो तो आपल्या लहरीप्रमाणें चालतो. मी तर स्वामींच्यावर हि डिसिप्लिनरी ॲक्शन घेण्याला कमी करणार नाहीं. स्वामी चूप! गांधीजी म्हणाले. इतक्यात सुरवात झाली नाहीं तोंच डिसिप्लिनरी ॲक्शन! सर्व हंसले. जेवण खाणाची व्यवस्था, अर्थात सुंदर होती. पण दुर्दैव हें कीं ३० दिवसांनी अचानक जमनालालजींचा मृत्यू. सर्व गोंधळले. पुढें माता जानकीदेवी अध्यक्ष झाल्या.

## विनोबांचें सुरगांवला रोज भंगीकाम (२-४-१९४७)

विनोबाजी रोज कुदळ-फावडें घेऊन वीराप्रमाणें सकाळीं ८ वाजतां पवनारहून सुरगांवला निघत. जाऊन येऊन ६ मैल होई. बरोबर अनेक वेळां मोठे मोठे विद्वान, राजकारणी व अनेक थोर पुरुष असत.

एकानें विचारलें, हें काम आपण किती दिवस करणार? उत्तर २० वर्षे फार पाऊस पडून नदी ओलांडू शकत नसत तेव्हां विनोबाजी ओरडून परतिरावरच्या लोकांना सांगत, तुमचा सेवक येऊन गेला. तुमचा भंगी येऊन गेला, हो ऽऽऽ! पूर उतरला तर उद्यां येईन. विनोबांच्या प्रेरणेंनें गावांत जिकडे तिकडे सफाई केली जाई. परदेशी लोकांना येथली खेडीं उकिरडे वाटतात. तसें होता कामा नये. पुढे अनेक कामांमुळें देशभर फिरावें लागलें. त्यामुळें हें काम बंद पडलें.

साबरमतीला जेव्हां बाळकोबा-विनोबांनी भंगी काम सुरू केलें तेव्हां एकदम खळबळ उडाली होती, पण बापू आल्यावर त्यांनीं त्याची प्रशंसा केली. पूर्वी तेथें हें काम भंगी करी. नंतर सर्व लोक करण्यामधें धन्यता मानूं लागले. महाराष्ट्रांत बाया हि रस्त्यावर शौचाला बसतात. मैल्यांचे खत होत नाहीं. स्वतंत्र खताचे पायखाने केले तर तेथें हि जात नाहींत. पण आसाम, कोंकण, गोवा, केरळ येथें लोक दूर जंगलांत शौचाला जातात. तरी त्यांचें हि खत होत नाहीं ते नाहीं च. सदर खताचा गोबरगॅस हि होऊं शकतो. दिवे हि लागूं शकतात. पण लक्षांत कोण घेतों. शेणामाजी नांदति शेणकिडे. यासाठीं च विनोबा, बाळकोबा म. गांधी, महादेवभाई देसाई, बाळूभाई मेहता यांच्या सारख्या थोर पुरुषांनीं हें काम हातीं घेतलें.

## वडिलांचा (न. शं. भावे) स्वर्गवास (२९-१०-१९४७)

### शारदीपौर्णिमा

विनोबाजींचें मित्र मोघेजी बडोद्याला गेले असतां पू. बाबांना (विनोबाजींच्या वडिलांना भेटले. त्यांची तबियत अतिशय खालावलेली पाहिली. विनोबाजींना कळविलें. विनोबाजींनीं लगेच शिवाजींना लिहिलें. ते बडोद्याला गेले. बाबा काळुपुऱ्यांत जोशींच्या घरीं रहात होतें. २ मजले वर गेले तो मोघेजी होते च, बाबांनीं ओळखलें नाहीं. शिवाजी म्हणून नमस्कार केला. मग म्हणाले तूं आलास पण माझें कोणतें हि काम करूं देणार नाहीं. मोघेजी व मी म्हणालों पण आतां येथें राहणें योग्य नाहीं. ते म्हणालें मी बरा आहें. मजबरोबर भोजूभाई, कुंदर दिवाण व प्रल्हाद चौधरी होते. आम्हीं २ दिवसांसाठी साबरमती आश्रमांत जाऊन आलों. येतांच बाबांच्या पायावर सल्फ्यूरिक ॲसिड पडून ते जखमी पाहिले. मग डॉक्टर बोलावला. शशी जोगळेकर व शांतीचे यजमान केळकर हे हि आहे. बाबांना कळून चुकलें कीं आतां येथें राहणें योग्य नाहीं. मग सर्व सामानाचे पेटारे भरले. त्यांत दाहक ॲसिडें हि होतीं. पार्सल केलें. प्रल्हाद चौधरींनें अमदाबादला जाऊन स्पेशल डबा करवून आणला. शशीला व रामाला बाबांचे कपडे दरबारचा ड्रेस इ. सर्व देऊन टाकलें. बाबांना घेऊन मोटारीनें स्टेशनवर आलों. खुर्चीवरून डब्यांत बसविलें. इतक्यांत दाहक सामान गाडीनें नेता येत नाहीं म्हणून कळलें. लगेच नानासाहेब शारंगपाण्याकडून ते परत आणवलें. गाडी नरडाण्याला थांबली. तेथून रामेश्वरसेठ यांची खास माणसें आली होती. त्यांनी मोटारींतून धुळ्याला आणलें. गोशाळेंत एक खास जागा होती, तेथें त्यांना ठेवलें. मुख्य शुश्रूषा मी च करी. वैद्य येऊन ड्रेसिंग करीत. जवळ जवळ जखम बरी होत आली. त्यांना दूध आणि मोसंब्याचा रस देत होतो. ते ४० वर्षे केवळ दूध व सोयाबीन वर राहिले होते. त्यांची संगीताचीं पुस्तकें व सर्व वाद्यें बरोबर आणलीं होती. त्यांना नेहमी गुंगी असे. सर्व ठीक होत चाललें. पण एकाएकी पोटांत दुखूं लागलें. डॉक्टर आले. पोटांत वायु का पाणी, कांही निर्णय होईना. शेवटीं तार करून विनोबाजींना बोलावलें. वैद्य डॉक्टर झाले. सूरजमलमामांनी एरंडेल दिले पण उपयोग झाला नाहीं. त्यांना श्वास लागला. दुपारी त्यांना आपण जाणार हें कळलें. संध्याकाळी त्यांना उठवून बिछान्यावर बसविले. चंद्रोदयाच्या वेळीं त्यांचा योग्याप्रमाणें प्राण गेला. लगेच दहनक्रिया केली. गांवातले लोक आले. त्यांनी अनेक भजने म्हटलीं. विनोबाजींनी हि धर्म जागो निवृत्तीचा

इत्यादि भजनें म्हटलीं. जिकडे तिकडे तारा केल्या, रघुनाथराव भावे, गोपिकाकाकू, राम-कृष्ण भावे आले. १३ दिवस राहिले. विनोबाजींनीं अस्थि विसर्जन केले. त्या जागी एक वृंदावन रावसाहेब गोगट्याकडून करविलें आणि परिजातकाचे झाड जवळ लावले. एक आरसपानाची लहानशी स्लॅप वृंदावनावर लावली. त्यावर 'अवघे चि सुखी असावे ही वासना' व शारदीपौर्णिमा २९-१०-१९४७ ही अक्षरे खोदवली. बापूचें हि पत्र आले. त्यांत त्यांनी बाबांचा खूप गौरव केला होता.

विनोबाजी व बाकी सगळे जिकडे तिकडे रवाना झालें. वर्तमानपत्रांत सत्याग्रही पित्यांचे देहावसान अशा तऱ्हेचे मोठमोठे लेख आले होते. बाबांचे संगीताचे सामान बाळकोबाजींना दिले. २५ हजार रुपये ग्रामसेवा मंडळाला दिले. रंगाचें सामान महाराष्ट्र चर्खा संघाला दिले. भांडीकुंडीं रामेश्वरजी यांना दिलीं. झालें सर्व समाप्ति झाली.

केवळ त्यांचें पुण्यस्मरण मागें राहिले. शारदी पौर्णिमा आली कीं तें स्मरण होतें च. धुळ्याला त्यांच्या समाधीवर परिजातकाची फुले पडतात. ते वारले तेव्हां त्यांचे वय ७३ होतें.

## गांधीजींचें बलिदान १३ दिवस

### गांधीजींचा १३ दिवस राष्ट्राने शोक पाळला

परंधाम पवनार (३१-१-१९४८)

यावेळीं गांधीजींचे शरीर यमुनातळीं दग्ध होत आहे व सर्व देशभर प्रार्थना चालली आहे. खुनी माणसाविषयीं सरदार म्हणाले कीं गांधीजींच्या चेहऱ्यावर दयाभाव होता. आपणही क्रोध येऊ देऊ नये. श्रीकृष्णानें व्याधाला हि अशीच क्षमा केली होती. व्याधानें अज्ञानाने बाण मारला येथें जाणूनबुजून खून केला. गांधी हिंदुधर्माची हानी करीत आहेत या गैरसमजाने त्यांचा खून झाला. वस्तुस्थिति अगदीं उलट होती. त्यांचा मृत्यु तरी किती पावन! प्रार्थनेला जातांना मृत्यु. त्यांचा आपण शोक करूं नयें. यापुढें आपण एकमेकांना बोध देत राहिलें पाहिजे.

### सामुदायिक प्रार्थना

(शांतिकुटीर गोपुरी १-२-१९४८)

हिंदुस्थानांत सत्पुरुषाची हत्या कधीं झाली नाहीं, हा अभिमान गेला. जेथें सामुदायिक प्रार्थना चालते, तेथें ईश्वर असतो असे नारदाचें वचन आहे.

शांतिकुटीर गोपुरी (२-२-१९४८)

सरदारांची सूचना आहे कीं हिंसेने कार्य होणार नाहीं. आपण शांतीची शक्ति वाढविली पाहिजे. हिंसेंत शक्ति नाहीं. या हिंसेमागें एक क्रूर विचारसरणी आहे. ती अहिंसेनें च दूर होईल. येशू गेल्यावर

त्याच्या शिष्यांनीं महापराक्रम केला तसें आपलें झालें पाहिजे. आम्हांला चंदनाप्रमाणें झिजलें पाहिजे. आम्हीं जर क्रोध करूं तर हत्येंत सामील होऊं.

### वर्ध्याच्या नागरिकांना

(गांधी चौक वर्धा ३-२-१९४८)

गांधीजी १५ वर्षें येथे राहिले. आपणाकडे त्यांच्यामुळें देशपरदेशचे हजारो लोक येत. म्हणून आपणावर फार मोठी जबाबदारी आली आहे. सरकारचे हात मजबूत केले पाहिजेत.

### खादी मध्यबिंदु

(शांतिकुटीर गोपुरी ४-८-१९४८)

बापूंच्या शिकवणीचा मध्यबिंदु खादी. खादीच्या आजूबाजूला सर्व कार्ये वसविलीं. गांधीजी हजारों कामांत वेळ काढून कांतीत. आपलें ही असें च झाले पाहिजे.

### विज्ञान आणि अहिंसा

(शांतिकुटीर गोपुरी ५-२-१९४८)

गांधींच्या हत्येबद्दल सर्वच राष्ट्रांनीं निषेध केला आहे. पण गेल्या युद्धांतला प्रसिद्ध सेनानी मॅक आर्थर म्हणतो कीं गांधींच्या मार्गाशिवाय आमचें चालावयाचें नाहीं. जगांत शांति नांदणार नाहीं. हिंसा वाढेल तर विज्ञान सर्व जगाला खाऊन टाकील. विज्ञान आणि अहिंसेनें जगांत स्वर्ग निर्माण होईल. आपण प्रायश्चित्त करायचें तर हिंसा चित्तांतून काढून टाकली पाहिजे.

### रामांपेक्षा नाम थोर

(शांतिकुटीर गोपुरी ६-२-१९४८)

व्यक्ति मोठी तिच्या विचारामुळें. ती गेली म्हणजे शुद्ध विचारच उरतो. म्हणून रूपापेक्षां नाम श्रेष्ठ. नाम म्हणजे विचार. विचारसूचक नादानेंच शेंवटीं शांति मिळेल. नामस्मरणानें हृदयपरिवर्तन होतें. संत मेल्यानंतर लाखो लोकांचें हृदयपरिवर्तन करतात. बापूंच्या जाण्यानें आमची श्रद्धा कमी होणार नाहीं.

### महात्मा गांधींचें स्मारक

(शांतिकुटीर गोपुरी ७-२-१९४८)

गांधीजींच्या बाह्य स्मारकानें कांहीं होणार नाहीं. त्यांच्या हत्येची जबाबदारी आपणा सर्वांची आहे. आपला विचारदोष आपण काढला पाहिजे.

### स्मारकाबाबत निर्णय

(शांतिकुटीर गोपुरी ८-२-१९४८)

अनुक्रमणिका

बापूचें मंदिर असावे अशी एक सूचना आहे. या भावनेची कदर मी करतों. पण हा विचार धोक्याचा आहे. गांधींना कोणी अवतार हि म्हणतील, त्यांना मानव च राहूं देणें योग्य होईल.

### ईश्वर अल्ला तेरे नाम

(शांतिकुटीर गोपुरी ९-२-१९४८)

सर्व धर्मांच्या शुद्धीसाठीं आणि एकतेसाठीं गांधीजींचें बलिदान झालें आहे. हिंदु मुसलमान भेद पूर्वी नव्हता राजकीय कारणामुळें आतां आला. कुराणांत म्हटलें आहे—धर्म एक आहे. पंथ वेगळे. म्हणून ईश्वर अल्ला तेरे नाम हा मंत्र समन्वयाचा आहे.

### सामुदायिक अहिंसेची गरज

(शांतिकुटीर गोपुरी १०-२-१९४८)

आज सर्व राष्ट्रें गांधीजींचा मार्ग जगाला योग्य म्हणत आहेत. जग गोंधळलें आहे. आपण शंकासमाधान केलें पाहिजे.

### दोन स्मरणें

(शांतिकुटीर गोपुरी ११-२-१९४८)

आज जमनालालजींचा ७ वा पुण्य दिवस. गांधीजींचा श्राद्धदिन. आज च दोघा महापुरुषांची राख येथे आली. दोघांचीं जीवनें समरसून गेलीं. गांधीजींना येथे आणण्याचें श्रेय जमनालालजींनाच आहे. दोघेहि चंदनाप्रमाणे लोकसेवेत झिजले. आपण हि परोपकार करण्याला शिकलें पाहिजे.

### परमात्म्यांत लय

(पंचधारातीर्थ, परंधाम, पवनार १२-२-१९४८)

एक पवित्र आत्मा लीन झाला, त्यानें सर्वांवर प्रेम केलें. आपण हि तसेंच करायला शिकूं.

### संकल्प

(शांतिकुटीर गोपुरी १२-२-१९४८)

येथें धामनदीच्या तीरीं जें दृश्य आपण पाहिलें तें पुनर्जन्मासारखें होतें. ईशावास्य म्हणतांना मला जी अनुभूति आली ती शब्दानें सांगता येणार नाहीं. आज जणूं परमात्म्याचा साक्षात्कार झाला. मी भक्तीभावानें प्रणाम केला. मी कलश पहात नव्हतों साक्षात् भक्तीभाव पहात होतों. आम्हांला ईश्वर बळ देवो असा संकल्प आपण केला पाहिजे.

### सर्वांभूती भगवद्भाव

(८-२-१९४८)

अनुक्रमणिका

इथें मी प्रथम आलों. पण विचारसंबंधानें मी इथलाच आहे. त्या ख्रिस्त महापुरुषानें म्हटलें शेजाऱ्यावर प्रेम करा. शत्रूवर प्रेम करा. परस्परांवर प्रेम करा. आणि सेवा करतांना सर्वत्र भगवद्भाव ठेवा.

## आमचे चौकीदार

(९-२-१९४८)

गांधीजींची एकादश व्रतें हे आमचे चौकीदार आहेत. या व्रतांचें पालन करण्याचा आपण प्रयत्न केला पाहिजे.

## कर्मयोगनिष्ठा

(१०-२-१९४८)

आपण सेवेचा कर्मयोग केला च पाहिजे. भक्ती, ज्ञान, ध्यान, यामुळें कर्म टाळतां कामा नयें. आपणाला समाज देतों. त्याची सेवा करणें आपला धर्म आहे.

## सेवाग्राम रचनात्मक कार्यकर्ता संमेलन

(१३-३-१९४८ ते १५-३-१९४८)

संमेलनांत धोत्रेजी, राजेंद्रबाबू, काकासाहेब, कमलनयन बजाज, विनोबा, दास्ताने, कुमारप्पा, राधाकृष्ण बजाज, शंकरराव देव, आर्यनायकम्, प्रफुल्लबाबू, जाजूजी, आशादेवी, कृपलानीजी, कोंडा वेंकटप्पय्या, जे. पी., दादा धर्माधिकारी, देवदास गांधी, झाकिर हुसेन, जवाहरलालजी, अप्पा पटवर्धन, दिवाकरजी, तुकडोजी, सुंदरलालजी, गोकुळभाई भट, गुलझारीलाल नंदा, केंथान, वल्लभस्वामी, सूचेता कृपलानी, श्रीमन्नारायण, बाळासाहेब खेर, भगवानदीनजी, स्वामी आनंद, बाळूभाई मेहता, आचार्य भागवत, शिवाजी भावे इत्यादि ९० लोक होते.

दादा धर्माधिकाऱ्यांनीं रिपोर्ट उशीरा दिल्याबद्दल दिलगिरी प्रदर्शित केली. विनोबाजी व जवाहरलालजींनीं सांगितले कीं बाहेरच्या भयापेक्षां स्वराज्याला अंतर्गत भय मुख्य आहे. शिवाय विनोबाजी म्हणाले कीं गांधींच्या नांवानें सांप्रदायिकता दाखल होऊं नये. त्याचप्रमाणें साधनशुद्धी ही अत्यंत महत्त्वाची गोष्ट आहे.

११ मार्च १९४८

राजेंद्रबाबू अध्यक्ष. धोत्रेजींचे प्रास्ताविक भाषण, उदघाटन पंडितजींनीं करावें. गांधी सेवासंघाचे अध्यक्ष अप्पा पटवर्धन लहान भाषण करतील. अध्यक्षांच्या भाषणापूर्वी किशोरलाल भाई बोलतील.

विनोबा म्हणाले आमची श्रद्धा किती हा पहिला प्रश्न.

काकासाहेब—अप्पा पटवर्धनांखेरीज कोणी ही अहिंसक प्रतीकार करून दाखविला नाहीं.

अनुक्रमणिका

दास्ताने—निराशेचें कांहीं च कारण नाहीं.

कमलनयन बजाज—सरकार अहिंसक प्रतीकार करूं शकत नाहीं. ती प्रतिकारशक्ती आम्हांलाच उभी करावी लागेल.

राजेंद्रबाबू—आमचें ध्येय अहिंसक समाजरचना हें असावे. त्यांत मतभेदाला स्थान नाहीं. पण चर्चा करूं शकता.

कलेलकर—बापूंचा उद्देश छोटी जमात बनविण्याचा नव्हता. सर्व देशभर व्यापक अहिंसक प्रतीकार करावयाचा ही त्यांची कल्पना होती. परकीय आक्रमणाला अहिंसक प्रतीकार कसा करावा हा मोठा प्रश्न आहे.

श्रीमन्नारायण—अहिंसेविषयी संशय नाहीं. प्रश्न अहिंसक संरक्षण आणि प्रतीकाराचा आहे. खुद्द बापूंचें हि संरक्षण आम्ही करूं शकलों नाहीं.

शंकरराव देव—आम्हीं सर्व मिळून काय करूं शकतों कीं नाहीं हा हि प्रश्न विचारणीय आहे. सामाजिक अहिंसेसाठीं आम्हीं विनोबांचा आधार घेऊं शकतो.

कुमारप्पा—सामाजिक संगठन कसे केले पाहिजे तें आम्हीं दाखवून दिलें पाहिजे.

आर्यनायकम्—बापू म्हणाले होते केवळ उद्योग शिकण्यासाठी नई तालीम नाहीं. अहिंसक समाज कायम व्हावा म्हणून हें साधन आहे.

(११-३-४८)

प्रफुल्लबाबू—ज्यांचा सामूहिकतेवर विश्वास नाहीं त्यांनीं एकत्रित येण्यांत अर्थ नाहीं. अरविंद म्हणाले होते कीं व्यक्ति किती ऊंच आणि अवनत होऊं शकते हें आम्हीं दाखवून दिलें आहे. आमचा हा राष्ट्रीय दोष आहे.

राजेंद्रबाबू—अहिंसक समाजाबद्दल प्रश्न नाहीं. सरकारी नीति आणि आमची नीति यांत टक्कर झाली तर काय करावयाचे हा प्रश्न आहे.

जाजूजी—आमच्या समस्यांसाठी संस्थेची जरूर आहे. गांधींचें नांव सोडून आम्ही संघ बनवावा.

जी. रामचंद्रन—बापू आमच्यासाठीं एकीकरण-बिंदु होते. आतां कदाचित विनोबा हें काम करूं शकतील.

प्यारेलालजी—बापूंची सेवक-संघाची कल्पना नैतिक होती. सत्तेपासून कॉंग्रेसनें अलग रहावें असें त्यांचें मत होतें.

अनुक्रमणिका

धोत्रेजी—संघ बनवणें सर्वमान्य झालें आहे. पण त्याला रुंदावणार कोण हा प्रश्न आहे.

राजेंद्रबाबू—नवीन माणसें कामाला का येत नाहींत हा प्रश्न आहे.

प्यारेलालजी—आमच्या कामांत रुचि आणण्याची आमच्यांत शक्ती नाहीं.

किशोरलालभाई—बापूंच्याकडे नेहमी अनेक नवीन लोक आकर्षित होत असत.

(११-३-४८)

कृपलानीजी—रचनात्मक कमेटीला सत्याग्रह कमेटी म्हणावें.

धोत्रेजी—संघाचा मुख्य कोण हा प्रश्न आहे.

विनोबा—संघांत बंधुभाव असावा. संघात येण्याला कोण अयोग्य कोण योग्य इ. भेद नको. जो येतो म्हणेल तो योग्य च समजावा. दरवर्षी एक मेळा भरावा, खाण्यापिण्याची व्यवस्था ज्याने त्यांनें करावी. कताई, सफाई सर्वांनीं मिळून करावी. संघाचा सदस्य अपरिग्रही असावा.

झकीरसाहेब—विनोबांची योजना दिली असल्यामुळें चांगली आहे.

जाजूजी—मेळा ठीक आहे. पण मेळा कोण करील?

कमलनयन बजाज—चर्चा येथे थांबते कीं समस्या सोडविणारी मुख्य व्यक्ति कोण?

स्वामी आनंद—मला वाटतें विनोबांच्या भूमिकेंत फरक नाहीं.

शंकरराव देव—विनोबांच्या योजनेंत मेळा, वर्तमानपत्र या गोष्टी आहेत.

पं. सुंदरलाल—आपल्या योजनेंत लाखो लोक येतील यासाठी थोड्याशा गोष्टी मांडाव्या.

(१२-३-१९४८)

ठक्करबापा—बंधनाशिवाय सदस्य होऊ शकत नाहीं. त्यासाठीं योग्यतेची अट हवी च. फंड हवा च. फंडाशिवाय दुनियेंत कोणतें च काम होत नाहीं.

मौलानासाहेब—बापूंचें मिशन मानवता बनवण्यांचें होतें.

जाजूजी—अलग अलग संघांना एकच आणणारा एक संघ असावा.

अनुक्रमणिका

जे. पी.—चर्चा पुष्कळ झाली. पण स्पष्ट कांहीं कळत नाहीं. विनोबाजी म्हणतात धन-संग्रह नको, साधन-संग्रह हवा. पण जन-संग्रह सुद्धा हवा. कामासाठीं धन-संग्रह हवा च.

कृपलानीजी—संघाचें नांव काय असावें?

कालेलकर—सर्वोदय-संघ बापूंचा खास शब्द आहे.

झकीर हुसेन—गांधीसेवासंघ नांव होते च तें कां ठेवूं नये.

कुमारप्पा—हें नांव ठीक नाहीं. त्यांत गांधींची सेवा असाही अर्थ निघू शकतो.

आर्यनायकम्—बापू चर्खा अहिंसेचे प्रतीक मानीत होते. म्हणून आम्हाला कातण्याची अट मान्य केली पाहिजे.

(१३-३-१९४८)

दादा धर्माधिकारी—गांधीजींच्या ध्येयाला मानणाऱ्यांची एक मंडळी कायम होईल. तर एका संगठनाचे रूप घेऊ शकेल.

विनोबा—संघ व्यापक हवा तर आम्हीं कोणत्याही अटी घालूं नयेत.

किशोरलालभाई—आमची श्रद्धा विनोबांवर आहे. तितकी कोणावर हि नाहीं. तेव्हां विनोबा म्हणतील तें मान्य करावें.

ठक्करबापा—आमच्यापुढें ३ प्रश्न आहेत. हरिजन, आदिवासी आणि लहान मुलें.

देवदास गांधी—मला विनोबांचें म्हणणें पटतें. सारा देश बापूचा संघ इतक्यात पंडितजींचें आगमन झालें.

धोत्रेजी—सर्वांच्या तर्फे मी पंडितजींचे हार्दिक स्वागत करतो.

श्रीमन्नारायण—आम्हांला शांतिसेनेच्या प्रश्नावर विचार केला पाहिजे.

मौलाना आझाद—विनोबाजींची सर्वोदय योजना मानवसमाजाच्या सेवेविषयीं आहे.

विनोबा—पंडितजी सरकारचे प्रतिनिधी या दृष्टीनें मी त्यांच्याकडे पहात नाहीं. ते गांधी कुटुंबांतले.

अनुक्रमणिका

अप्पा पटवर्धन—मी गांधी सेवासंघातर्फे आपले हार्दिक स्वागत करतों. बापूंची हत्या हें आव्हान आहे. पंडितजी येथे आले ही त्यांची कृपा आहे. मी सर्वातर्फे राजेंद्रबाबूंना विनंती करतों की त्यांनीं अध्यक्षपद विभूषित करावे. धोत्रेजीनी दुजोरा दिला.

अध्यक्ष राजेंद्रबाबू—आम्हीं सर्व मुष्किल परिस्थितींत येथें आलों आहोंत. गांधीजींनीं सत्य-अहिंसेला दुनियेसमोर ठेवले. गांधीजींच्या विचाराचा या देशांत व अन्य देशांत प्रचार केला पाहिजे. गांधींचा विचार मानणाऱ्यांचें संगठन होऊ शकतें कीं नाहीं? सरकार आणि काँग्रेसचा सबंध? याशिवाय मनुष्यत्व बचावणें हा मुख्य प्रश्न आहे.

विनोबा—सरदार साहेब, पंडितजी व बंधु भगिनींनो, मी गांधीजींनीं पाळलेले जंगली जनावर आहे. पुष्कळ लोक मला नवीन वाटतांत जरी त्यांची नांवे मी ओळखतों. रूपाहून नाम श्रेष्ठ. पंडितजी बापूंचे खरे वारस आहेत. आपल्या प्रत्येक कार्यांत साधनशुद्धींचें मुख्य महत्त्व आहे. आमचा संबंध नावाशीं नव्हे कामाशीं हवा. गांधीजींचा संघ सर्व हिंदुस्थानांत आहे. गांधीचा मुख्य विचार सत्य आणि शुद्धीचा होता. ट्रस्टीशिपचा अंमल केला पाहिजे.

पंडितजी—माझ्या अडचणी अनेक आहेत. पण मी आपला एक विश्वासू अनुयायी आहे.

विनोबा—संघात दाखल होण्यासाठीं वयोमर्यादा नसावी. शंकराचार्यासारखा मग त्यांत दाखल होऊं शकणार नाहीं. बापूंच्या विचारांविषयी अधिकारवाणीनें व्यवस्था देणारी कोणती हि समिति आवश्यक नाहीं. एक मंत्री पुरे आहे.

तुकडोजी—आपण अध्यक्ष, सेक्रेटरी असे कांहींच बनवू नये. नाहीं तर जागोजागी गांधींचे महंत तयार होतील.

जैनेंद्रकुमार—सर्व रचनात्मक संस्थेचें मुख्य राजेंद्रबाबू च असावे.

राजेंद्रबाबू—हा तर मोठा अन्याय होईल. लोकांना वाटेल रचनात्मक कार्यांत मी च एक महान आहे.

१३-४-१९४८

विनोबा—सज्जनता कोणाची खास वस्तु नाहीं. मी जेलमधून सुटलो व गांधीजींना म्हणालो मला संस्थामधें अडकावयाचें नाहीं. मला सज्जनांची सेवा करावयाची आहे. गांधीजींनी हें मान्य केले. गांधीनी देह सोडतेवेळी ईश्वराचे नांव घेतलें होतें. ईश्वर सर्वरूप—म्हणून सर्वोदय नांव बरे. मी गांधींचे विचार घेतले तसे अनेकांचे. पण ते आतां माझे विचार झाले.

तुकडोजी—बापूंची नक्कल करण्याचा प्रयत्न करूं नये. बापूंना रस्ता बलिदानाचा आहे.

अनुक्रमणिका

१४-३-१९४८

राजेंद्रबाबू—शरणार्थींचा मोठा च प्रश्न आहे.

सुचेता—शरणार्थींना काम आणि घर देण्याचा प्रश्न आहे.

बाळासा. खेर—सिंधमधून लाखो शरणार्थी आले आहेत. त्यांना काम देण्याचा प्रश्न आहे. ते शेती करूं शकत नाहीं.

श्रीमन्नारायण—नांवाचे महत्त्व फार आहे. उत्तर भारतांत समाज शब्दाचा वाईट अर्थ आहे. आर्य समाजाप्रमाणें लोक गांधी समाज म्हणतील. म्हणून 'समूह' शब्द असावा.

राजेंद्रबाबू—समूह जनावरांचा हि असतो.

कालेलकर—सैनिक आमचा सदस्य होऊ शकेल?

राजेंद्रबाबू—त्याचा निर्णय तोच करील.

सरलाबेन साराभाई—स्त्री-पुरुषांना समान हक्क हवेत.

आशादेवी—मातृत्व सर्वांत मोठी प्रतिष्ठा आहे.

पं. सुंदरलालजी—हिंदी स्वाभाविक भाषा आहे. हिंदुस्थानी कृत्रिम आहे. म्हणून हिंदी जगेल. हिंदुस्थानी मरेल.

राजेंद्रबाबू—शरणार्थींचा प्रश्न पुन्हा विचारांत घ्यावा.

प्रफुल्लबाबू—शोषणहीन समाजरचना झाली पाहिजे.

पं. सुंदरलालजी—शरणार्थी वसवणें म्हणजे मोठें झाड उपटून दुसऱ्या ठिकाणीं लावण्यासारखे दुष्कर आहे. पण कसे हि असो आज आम्हीं विनोबाजींना प्राप्त केलें आहे.

किशोरलालभाई—शेंवटी आमच्याकडून जी काहीं कमतरता झाली असेल त्याबद्दल मी अतिथींची क्षमा मागतो.

राजेंद्रबाबू—माझ्या हातून अनेक चुका होतात. मला येथें का अध्यक्ष बनवले समजत नाहीं.

अनुक्रमणिका

## विनोबाजींच्या पोटांत अल्सर

(१-११-१९४९)

विनोबाजींचे पोट अधून मधून दुखूं लागलें. डाव्या बाजूला दुखे. मग बोरियम देऊन एक्सरे घेतला. वर्धा हॉस्पिटलमधेच तपासणीं झाली. डिओडिनल अल्सर असल्याचें आढळून आलें. आतां उपाय सतीशचंद्र दासगुप्तांच्या पुस्तकांत सांपडला. केवळ गोड दही व तें दिवसांत ५\६ वेळा घ्यावयाचें. कायमची दुरूस्ती क्वचितच होते. मग हा आहार सुरू केला. पोट रिकामें ठेवावयाचें नाहीं. मध, लोणी हे हि उपयोगी. छेना चालतो. फरमेंटेशन होता कामा नये. मीठ चालत नाहीं. हालचाल कमी केली पाहिजे. पपैयाचा हि प्रयोग केला. पण त्यांना हे विविध प्रयोग आवडत नसत. त्यांचा एकतेकडे कल असे.

हें अल्सर का झालें हा हि शोध त्यांनी घेतला. त्यांनीं केवळ कांदा भाकरी सारख्या रूक्ष अन्नाचा प्रयोग केला होता. दूध पूर्ण सोडून दिलें होतें. अधिक मानसिक चिंतेनें हि अल्सर होतें. विनोबाजींना चिंता कसलीच नव्हती पण चिंतन मात्र सतत असे. त्याचा हि परिणाम होताच. अल्सर आहारानें, औषधानें पूर्ण नष्ट होते. क्वचितच बरें होतें. २०\२० वर्षें प्रयत्न करून हि यश मिळत नाहीं. पुढें हळू हळू विनोबाजींचें दुखणें कमी झालें. अल्सरवाल्यांनी चालणें कमी करावयाचे. पण विनोबाजी भूदान पदयात्रेंत रोज २५\२५ मैल आणि ते हि जोरांनें चालत. तेच म्हणून टिकले. पण शेवटपर्यंत अल्सर राहिलें.

## राजघाट दिल्ली येथें झालेलें विनोबाजींचें प्रार्थनोत्तर भाषण

प्रार्थनोत्तर भाषण : ३०-३-१९४८

आजचा हा पहिला च प्रसंग मी येथे बोलत आहें. पूर्वी बापूंच्या उपवासात त्यांच्यापुढे मी कठोपनिषदावर बोललों.

सुरवात प्रार्थनेनें होत आहे. बापूंच्या जीवनाची अखेर प्रार्थनेनें च झाली. स्वराज्य मिळाले. आतां बापूंचे मानव सेवेचें काम करावयाचे आहे. जगांत युद्धाची तयारी चालली आहे. पण हिंदुस्थान योग्य मार्गाने चालला तर जगाला वाचवूं शकेल.

## जयपूरला गोसेवा संघाचें उद्‌घाटन

भाषण : १६-१२-१९४८

भारताचें जीवन गाईबैलांशिवाय चालणें अशक्य आहे. मांसाहार-त्यागासाठीं पूर्वजांनीं गोदुग्धाहार सांगितला. गोसेवा कठिण नाहीं. विज्ञानाचा उपयोग करून गोवंश सुधरला पाहिजे. गाय भाररूप होणें शक्य नाहीं. ती खत देते. मेल्यानंतर हि तिच्या शरीराचा उपयोग होतो. वनस्पति तूप घातक आहे.

## कॉंग्रेसभवन, पुणें : प्रार्थनोत्तर प्रवचन

२१-८-१९४९

पुष्कळ वर्षांनंतर मी येथें येत आहें. येथल्या दशक्रोशींत ज्ञानदेव, तुकाराम दोन महापुरुष झाले. अलिकडे रानडे, गोखले, टिळक झाले. या नगरीला पुण्य नगरी नांव पूर्वजांनीं ठेवलें होतें.

अनुक्रमणिका

पूर्वजांच्या पुण्याईवर जगणें योग्य नाहीं. तींत भर घातली पाहिजे. येथल्या अनेक संस्था त्यागानें चालविल्या जात आहेत हें ठीक आहे. येथें नवीन दृष्टि नाहीं. पूर्वजांविषयीं प्रेम असावे पण मिथ्या अभिमान नको.

देशाभिमान, भाषाभिमान, जात्याभिमान हे अभिमान योग्य नाहींत. प्रेम हा शब्द योग्य आहे. आर्जव म्हणजे सरळता पण त्याचा अर्थ हांजी हांजी झाला. उदासीन म्हणजे वरच्या भूमिकेवरचा पण त्याचा अर्थ झाला खिन्न. हे अर्थ योग्य नाहींत.

भारत म्हणजे सर्वांचें भरण करणारा, सर्व विश्वाला ज्ञानभरण करून देणारा. भारत स्वतंत्र झाला आतां स्वतंत्र बुद्धि ठेवा. पूर्वजांच्या पराक्रमाचा अभिमान सोडा. प्रेम ठेवा तुमच्यातला च एक या भावानें दोन शब्द मी बोललों.

## पू. विनोबाजींच्या उरुळी कांचन येथें एक सप्ताह विश्राम

(१८-८-१९४९)

### निसर्गोपचार केंद्र, उरळी कांचन (पुणे)

उरुळीचें हवापाणी उत्तम. तेथें आश्रमासाठीं १० हजार रुपये लोकांनीं दिले व गांधींना राहणें सोईस्कर म्हणून हें स्थळ गांधींनीं पसंत केलें. गांधींजी येथें ८ दिवस च राहूं शकले. एकादश व्रतपालनांत जितके यशस्वी तितका निसर्गोपचाराचा लाभ, असे गांधीजी म्हणत. या संस्थेचा रीतसर ट्रस्ट केला गेला. या संस्थेचे १३ कार्यकर्ते सभासद होते. शिवाय ३ भगिनी ४ बंधू असे आणखी लोक. येथले बाळकोबाजी, मणिभाई, कृष्णचंद्रजी इत्यादि लोक ब्रह्मचारी. संस्थेसाठीं बाळकोबाजींनीं आफ्रिकेंत व भारतांत फिरून लाखो रुपये मिळवले. रोग्यांकडून निवासादि खर्चामुळें हि लाखों रुपये मिळतात. गोशाळा आणि फळभाज्यांची शेती हि येथें उत्तम केली जाते. गोबर गॅस प्लँट हि आहे. येथें द्राक्षें, लिंबें, संत्री, पेरू इत्यादि फळें पुष्कळ प्रमाणांत रोग्यांसाठीं केली जातात. येथली निसर्गोपचाराची लायब्ररी इतकी मोठी आहे कीं साऱ्या एशियांत अशी लायब्ररी नाहीं. व्यवस्था चोख असून, जनरल वॉर्ड, खास वॉर्ड, स्त्रियांसाठी वॉर्ड अशी व्यवस्था आहे. टब बाथ, स्टीम बाथ, मालिश, मातीच्या पट्या सर्व व्यवस्था आहे. उपवास, हळूहळूं आहार, तक्रकल्प, दुग्धकल्प, द्राक्षकल्प हि केले जातात. विदेशी लोक हि लाभ घेतात. तुकडोजी, आचार्य अत्रे यांसारखे प्रसिद्ध पुरुष हि याचा लाभ घेऊन गेले. बाहेरचे लोक येऊन हि लाभ घेतात. व्यायामासाठी खास सोय आहे. रेड लाईट देण्याची सोय आहे. गर्दी इतकी कीं वर्ष वर्ष प्रवेश मिळत नाहीं. निसर्गोपचारावर व अन्य पवित्र विषयावर वेळोवेळी प्रवचनें होतात. बाळकोबाजी ब्रह्मसूत्रादि आध्यात्मिक वर्ग घेत. त्यांच्या नुसत्या दर्शनानें लोक धन्य समजत. ते खोलीच्या बाहेर कधीं च जात नसत. सकाळ-संध्याकाळ प्रार्थना होतात. बाळकोबांच्या सुताची ठाणेंच्या ठाणें तयार होतात. ते उत्तम भजनें ही गात. सतार वाजवित. आहाराची उत्तम व्यवस्था, फिरण्याची व्यवस्था. विनोबाजींनीं १ सप्ताहांत सर्व गोष्टींचें अवलोकन केलें. रोग होऊ न देणे यावर त्यांचा भर. कोणत्या हि पॅथीचा आग्रह नको. सर्वांविषयी सिंपथी असावी असें त्यांचें म्हणणें.

अनुक्रमणिका

## कांचनमुक्तीचा प्रयोग

(१-१-१९५०)

फार पूर्वी नाणीं नव्हती च. ६०/७० वर्षापूर्वी हि खेड्यांत धान्यव्यवहार होता. पैशामुळें धान्याचे भाव बदलतात. वास्तविक धान्य हाच धान्याचा भाव. धान्याबद्दल इतकी पवित्रता होती कीं चोराला सांगत धान्य हातांत घे. त्या धान्यामुळें तो खोटें बोलूं शकत नसे. ही सत्य-धान्य-शक्ती गेल्यामुळें आज तंटे बखेडे वाढले. कित्येक श्रीमंत स्त्रियांच्या कानांत २०/२० हजारांच्या हिऱ्याच्या कुड्या दिसतात. मग चोर कान कापणारच. यामुळेंच परंधाम पवनार येथें कांचनमुक्तीचा प्रयोग फार महत्त्वाचा झाला. या प्रयोगांत द्वारको, रणजित भाई इत्यादि १७ स्त्रीपुरुष होते. हा प्रयोग ३। वर्षें चालला. कांहींची वजनें उतरलीं. पण शेतींत काम केल्यानें ते तेजस्वी दिसूं लागले. स्वयंपाक सर्व मिळून करीत. वस्त्रस्वावलंबन होतें. प्रार्थनेमुळें सर्वांना स्फूर्ति वाटे. कांहीं थकले, कांही थोडे आजारी हि झाले. आज खेड्यांत सरकारावलंबन च पुष्कळसें आहे. खेड्यांत जर कांचनमुक्तीनें सर्व धंदे केले तर स्वावलंबन होऊं शकेल.

**ग्रामे ग्रामे सभा कार्या ग्रामे ग्रामे च कीर्तनम् ।**
**पाठशाला मल्लशाला गवां सदनमेव च ॥**

अशा तऱ्हेचीं खेडीं होतील. हरिजन, मुसलमान हे भेद जातील. भिन्न भिन्न भाषा व लिप्या हि शिकतां येतील. वर्णाश्रमधर्म प्रस्थापित होईल. मोठमोठ्या कारखाखान्यांची जरूरी राहणार नाही. प्रजेची बेसुमार वाढ होणार नाहीं. तंट्यांचा निकाल गांवांतच होईल. मांसाहार होणार नाहीं. व्यसनें राहणार नाहींत. हवापाणी, मोकळी जागा, सत्यमय जीवन आपोआप नांदेल. जीवन विचारावर उभें राहील. मनुष्य, अन्य प्राणि आणि वनस्पतीसृष्टि यांचा तोल राहील. विषमता हाताच्या बोटाप्रमाणें फार च थोडी उरेल. छापखानें, पुस्तकालयें इत्यादि लहान लहान साधनें खेड्यांत पसरतील. कीर्तनें, प्रवचनें होतील. विवाह थोड्या खर्चांत होतील. जीवनदृष्टी विकसित होईल. आत्मतुष्टि पसरेल. श्रमांत विश्राम आणि विश्रामांत श्रम होईल. पोषाख साधे राहतील. परस्पर मैत्री, समान वाढेल. कांचनमुक्तीचें एवढें महान सामर्थ्य आहे. ते केल्यानें होईल च.

## गीताई-शब्दार्थ-कोश

(१९४५-४६)

प्रस्तावनेंत विनोबाजी लिहितांत—गीताईं त 'मी' कोठें च नसावा अशी स्थिति होती. या कोशांत सगळा 'मी' च आहे. कठिण शब्दाचा सोपा अर्थ देणें असें या कोशाचें स्वरूप नाहीं. शब्दापेक्षांहि दिलेला अर्थ कठिण होऊन बसेल. उदा. अभ्यास—असकृदावृत्ति, म्हणजे सामान्य वाचकाला एक समस्याच होऊन बसेल. टिप्पण्या पुष्कळ दिसल्या तरी विपुल नाहींत. शंकराचार्य आणि ज्ञानेश्वरादि भाष्यकारांच्या मुख्य अर्थांना बाध येणार नाहीं अशीं येथें रचना आहे. कोशांतल्या चिंतनाप्रमाणें ज्यानें त्यानें स्वतंत्र चिंतन करावें अशीं यात दृष्टि आहे. या कोशांभाष्याचें सर्व काम पूर्ण होऊन तौलनिक अध्ययन हि यांत होऊ शकतें.

प्रस्तुत लेखकानें हा कोश अकारविल्ह्यानें तयार केला व पूज्य विनोबाजींपुढें मांडला. अर्थ इत्यादि सर्व पूर्ण विनोबाजींचे च. त्यांचा अनुभवपूर्वक वेदोपानिषदांपासून सर्व संत ग्रंथांचा अभ्यास यांत जणू परिपाकरूपानें अव्यक्तपणें उतरला आहे.

अनुक्रमणिका

प्रस्तुत लेखक आणि विनोबाजींनीं मिळून ७ महिन्यांत या कोशाची रचना झाली. गीताई प्रचारांचें सुमारें ९ वर्षाचें काम संपवून प्रस्तुत लेखक परत परंधामला आला तेव्हां लाल बंगल्यांत पायऱ्या उतरल्याबरोबर तो विनोबाजीं समोर बसे आणि लेखन होई. अशा रीतीनें गीताई प्रचारानंतर हा जणू काय महाप्रसाद च लाभला.

## भूदान गंगा

१९५१ सालची गोष्ट. शिवरामपल्ली संमेलनासाठीं विनोबांनीं तेथें जावें असा आग्रह रचनात्मक कार्य करणाऱ्या थोरामोठ्या मंडळींनीं केला. विनोबांनीं विचार करून सांगितलें. “मी जाईन पण पायीं पायीं—” कारण काय? त्यावेळीं पवनार ला परंधाम—आश्रमांत विनोबांचा कांचनमुक्तीचा प्रयोग चालूं होता. ‘कांचनमुक्ति’ चा प्रयोग करणारी व्यक्ति वाहन यात्रा कशी करणार? विनोबांची पदयात्रा सुरू झाली.

शिवरामपल्ली चें संमेलन संपलें. वर्धेला परतायचें होतें. परंतु हिंसारूपी दावानलांत तेलंगणा भडकलें होतें. विनोबांची पावलें तेलंगणाकडे वळलीं. १५ एप्रिल रोजीं आपल्या निवडक साथींसह विनोबा शिवरामपल्लीहून पहांटे निघाले आणि सूर्यादयाच्या सुमारास हैद्राबादला पोहोंचलें. तेथें जेलमधें कम्युनिस्टांची भेट घेतली. चर्चा झाली. तेथून ते पायीं निघाले. नलगोंडा जिल्ह्यांतील पोंचमपल्ली गांवी पोहोंचले. गांवच्या हरिजनांनीं जमिनीची मागणी केली. विनोबा म्हणाले, “किती जमीन पाहिजे?” हरिजन म्हणाले, “८० एकर, ४० एकर वलीताची आणि ४० एकर कोरडवाहू”. विनोबांनीं विचारलें, “एवढ्यानें तुमचें काम होईल काय?” हरिजनांनी उत्तर दिलें, “शेती आणि इतर हि कांहीं कामें आम्ही करतो.” “तुम्हाला समजा आम्ही जमीन मिळवून दिली तर तुम्ही सर्व मिळून कास्त कराल कीं, अलग—अलग?”

“सर्व मिळून करूं.” किंचित् विचार करून त्यांच्यातील प्रमुखाने असें उत्तर दिलें. विनोबा म्हणाले, “मला एक अर्ज लिहून द्या, तुमच्यासाठीं जमीन मिळविण्याचा प्रयत्न करूं.” एवढें बोलल्यानंतर विनोबा काहींसे अंतर्मुख झालेले दिसले. कांहीं वेळ शांतींत गेल्यानंतर ते पुन्हां गांववाल्यांना उद्देशून म्हणाले, “समजा, सरकारकडून जमीन मिळायला उशीर लागला तर तुमच्यापैकी कुणी यांत कांहीं करूं शकते का?” तेवढ्यांत रामचंद्र रेड्डी नावाचें गृहस्थ उभे झाले आणि नम्रतेने म्हणाले, “माझ्या वडीलांचीं इच्छा होती की या अशा लोकांना थोडी जमीन द्यावी. माझे वडिल आतां नाहींत. परंतु मी माझ्या-आम्हां पांच भावांच्या तर्फे शंभर एकर जमीन ह्या लोकांना दान देतों. त्यांतील पन्नास एकर वलिताची आणि पन्नास एकर कोरडवाहू जमीन आहे.” शुभ्रवस्त्रधारी, कृशकाय विनोबांच्या चेहऱ्यावर एकदम एक तेज प्रगट झाले. आणि नंतर ते रामचंद्र रेड्डींच्या चेहऱ्याकडे बघत राहिले. या घटनेचा उल्लेख करतांना विनोबा नेहमी सांगत कीं, “मी जमीन मागितली आणि जमीन मला मिळाली यांत मला ईश्वरी संकेत दिसला. त्या दिवशी रात्रीं मला झोंप आली नाहीं. रात्रीच्या काळोखांत माझा ईश्वराशीं संवाद झाला. माझ्या समोर एक आवाहन उभें झालें. देव बोलला, ‘अहिंसेवर जर तुझी पूर्ण श्रद्धा असेल तर, तुला संधि मिळाली आहे. तूं मागत जा, तुला जमीन मिळेल.’ माझ्या लक्षांत आलें, देवाचें हें काम अपूर्ण नसतें. तो बाळाच्या पोटांत भूक देतो, तर आईजवळ दूधहि देतो……”

अशी ही भूदान गंगा १८ एप्रिल १९५१ रोजीं वाहू लागली. विनोबांनीं सांगणें सुरू केलें.—“हवा, पाणी, सूर्यप्रकाश हें सर्व जसें देवाने निर्माण केलें आहे आणि त्यावर जसा सर्वांचा समान अधिकार आहे, त्याचप्रमाणें ही जमीन हि देवानेच निर्माण केली आहे. ती आपली सर्वांची माता आहे. आपण भूमीचे मालक

होऊं शकत नाहीं, सेवक होऊं शकतों, पुत्र होऊं शकतों.— हा भूदान—यज्ञ भारतीय संस्कृतीला अनुसरून आहे. भूमि समस्या ही जागतिक समस्या आहे. यात सर्वांनी सहभागी व्हावें."

२७ जून १९५१ रोजीं विनोबांचें पवनारला आगमन झालें. एवढ्या अवधींत बारा हजार एकर भूमींचें दान प्राप्त झालें होतें. विनोबा पुन्हां चिंतन—मननांत मग्न झालें. परंधार आश्रमाचा कांचनमुक्तीचा प्रयोग चालूच होता. या सुमारास प्रथम योजना आयोगांचे सदस्य श्री. रा. कृ. पाटील विनोबांच्या भेटीस आले. त्यांनी पंचवर्षीय योजनेंविषयीं चर्चा केलीं. यानंतर पं. जवाहरलाल नेहरूंचें निमंत्रण विनोबांना आलें. प्रथम पंचवर्षीय योजना आयोगाची चर्चा करण्यांसाठीं विनोबांनीं दिल्लीस यांवें अशी पंडितजींची इच्छा होती. विनोबांनीं उत्तर लिहिलें, "आपल्या निमंत्रणाप्रमाणें मी येत आहे. परंतु मी माझ्या गतीनें, म्हणजे पायीं येत आहें." १२ सप्टेंबर १९५१ या दिवशीं विनोबा दिल्लीसाठीं पदयात्रा करीत निघाले. दररोज त्यांचा एका गांवीं मुक्काम राही. दिवसांतून दोन-तीन भाषणें त्यांचीं होत. त्यांत ते आपला विचार मांडूं लागलें. "आपल्याला शोषणरहित समाज निर्माण करावयाचा आहे. भारतांत एकूण पांच करोड लोक भूमिहीन आहेत. त्यांच्यासाठीं पांच करोड एकर जमीन मिळायला हवीं. जमीन मिळविण्याचे तीन उपाय होऊं शकतात— कत्तल, कायदा, करुणा. कत्तलींनें प्रश्न सुटत नाहींत, हें इतिहास सांगत आहे. कायद्यांनें करू पाहूं तर त्यांत हृदयें जोडलीं जाणार नाहींत. राजसत्तेद्वारें काम होऊं शकलें असतें तर गौतमबुद्धानें राज्यसत्तेचा त्याग कां केला? तात्पर्य, करुणेचाच मार्ग श्रेष्ठ. कुठल्या हि समस्येचा परिहार प्रेमाच्या मार्गानें करणें इष्ट. समाजांत समानता हवी ती कशी? हाताच्या पांच बोटांसारखी! आपली पांच हि बोटे अगदीं समान असतील तर या हातानें आपण साधें भांडें सुद्धां उचलूं शकलों नसतों तेव्हां ही जी समता आहे, ही विवेकयुक्त आहे. ज्याला जशी जरूर तसें त्याला काम आणि अन्न मिळायला पाहिजे."

जमिनीचें निमित्त घेऊन विनोबांनी समग्र विचार समजावीत अवघा देश पायाखालीं घातला. कश्मीर ते कन्याकुमारी, द्वारका ते दिब्रुगड अशी त्यांची तेरा वर्षे पायपीट अखंड झाली. ते म्हणत, "नदीला सुट्टी नाहीं, ती सतत वाहतच असते; वारा सतत वाहतच असतो; तशी ही यात्रा चालूच राहणार." १९५२ च्या बुद्धपौर्णिमेला लखनऊ शहराच्या विराट् सभेंत विनोबा बोलले, "भगवान बुद्धाने पेरलेले बीज अंकुरीत होत आहे. भूमिसमस्या शांतिमय मार्गानें सोडविण्याचा हा प्रयत्न आहे. हें आमचें 'धर्मचक्र प्रवर्तनाचें' कार्य होय."

योजना आयोगासमोर त्यांनी मूलभूत विचार ठेवला, ग्रामस्वावलंबनाशिवाय तरणोपाय नाहीं असें सांगून त्यांनीं "खादी, ग्रामोद्योग, नई-तालीम" चे महत्त्व सांगितले. योजना वरून करण्याऐवजीं खालून वर योजना करीत गेलें पाहिजे. 'गावां'ला केंद्र करून सर्व योजना करण्यास सुचवलें. "अन्नं बहु कुर्वीत तद् व्रतम्" हा शास्त्रविचार सांगितला. सरदार पटेलांनीं एकदां एक विचार प्रगट केला होता, त्यांचें म्हणणें होतें, "आतां आपल्याला 'वॉर पोटेंशियल' (युद्ध-साहाय्यक शक्तिशाली) उद्योगांची आवश्यकता आहे." विनोबांनी आपला विचार मांडला— "भारताला 'पीस—पोटेंशियल' (शांति साहाय्यक शक्तिशाली) उद्योगांची आवश्यकता आहे, म्हणजे ग्रामोद्योगाची जरूर आहे."

शिक्षणाविषयीं विनोबा नेहमीं म्हणत कीं, "आज जे शिक्षण दिलें जातें तें अगदींच निरूपयोगी आहे, शिक्षण संस्था बेकारांना जन्म देणाऱ्या आहेत. स्वराज्यानंतर जसा जुना झेंडा चालत नाहीं, तसेंच 'जुनें शिक्षण' बदलून 'नवें शिक्षण' आलें पाहिजे. जसा न्याय-विभाग हा सरकारी नियंत्रणाखालीं नसतो, स्वतंत्र असतो, तसेच शिक्षण-विभाग हि सरकारी नियंत्रणाखालीं नसावा."

अनुक्रमणिका

स्वराज्य आलें, परंतु स्वराज्याचें पार्सल केवळ दिल्लीतच पोहोंचलें आहे. गांवागांवात पोहोंचणें बाकी आहे, समाजाला आपआपली शक्ति अर्पण केली पाहिजें. जसे दुर्गादेवीला प्रत्येक देवतेनें आपलें शस्त्र अर्पण केलें. त्यानंतर च दुर्गादेवी नें महिषासुराचें मर्दन केलें, तसें समाजांतील प्रत्येक व्यक्तींनें आपल्याजवळ जें असेल त्याचा एक अंश समाजरूपी देवतेला अर्पण करावा आणि भेदासुराचा बीमोड करावा असें ते सांगत. स्वराज्यानंतर समाजाचा पाया अधिक खोल आणि मजबूत करायला हवा असें ते सांगत.

उत्तर प्रदेशाच्या यात्रेंत जयप्रकाश नारायण विनोबांच्या भेटीस आले आणि त्यांनीं विनोबांशी दीर्घ चर्चा केली. या नंतर जयप्रकाशजी विनोबांच्या कामांत सामील झाले.

हिंसा विरोधी, दंडनिरपेक्ष अशा तिसऱ्या शक्तीचें म्हणजेच अहिंसा-शक्तीचें आवाहन हि विनोबांनीं केलें. 'भूदानमूलक, ग्रामोद्योग-प्रधान अहिंसक क्रांतींसाठी' स्वतःचें जीवनदान त्यांनीं घोषित केलें.

'सामूहिक समाधि' चा एक विलक्षण विचार विनोबांना सुचला, तो रामकृष्ण परमहंसाच्या समाधि-स्थानीं! ते म्हणाले, "महापुरुषांच्या जीवनांतील अनुभवांना सामाजिक रूप देणें हें माझ्यासारख्या सेवकाचें काम आहे. समाधीमधें दुःख नसतें, तसें समाजिक-समाधीमधेंहि क्लेश राहणार नाहींत.—विविध प्रकारचें क्लेश, संघर्ष चालू आहेत. या सर्व झगड्यांपासून आपण मोकळे होऊ तेव्हां आम्हांला सामाजिक समाधींचें समाधान मिळू शकेल."

अशा तऱ्हेनें मौलिक विचार देत देत विनोबांची भूदानाची यात्रा चालू होती. पुढें भूदानाची परिणति ग्रामदानांत झाली. मंगरौठ (उ. प्र.) हें प्रथम ग्रामदान १९५२ च्या २३ मे ला जाहिर झालें. उत्कलच्या यात्रेंत कोशपुट जिल्ह्यांत हजारों ग्रामदानें झालीं. संपत्तीदानाचा विचार हि पुढें आला. गांधीजींनी सांगितलेल्या ट्रस्टीशिपच्या सिद्धांताचे संपत्तिदान हें व्यापक स्वरूप होय.

१९५६ सालीं कांचीपुरम् (तामिळनाडु) चें सर्वोदय संमेलन झालें. त्यांत विनोबांनी सांगितलें,. "सर्वोदयाचा आधार ब्रह्मविद्या आहे. विज्ञानयुगांत अतिमानस भूमिकेवर आपलें चिंतन असावें. आता यापुढें व्यक्तिगत नेतृत्वाच्या जागीं 'गणसेवकत्वा' चा उदय होत आहे."

पाँडेचरीच्या आश्रमांत माताजीं चे आशार्वाद विनोबांना लाभले. माताजींनी विनोबांच्या हातीं एक शुभ्र निशिगंधा चें फूल ठेवलें. त्या म्हणाल्या, "तुम्ही दिव्यतेसाठीं जगतां, दिव्यतेसाठीं काम करीत आहांत आणि दिव्यतेसाठींच तुम्हांला उत्कंठा आहे."

केरळच्या क्रिश्चन चर्चच्या बिशपांशीं विनोबांची चर्चा झाली. विनोबां चे म्हणणें होतें कीं, येशू ख्रिस्तानें जी शिकवण दिली, "जसें स्वतःवर करता तसेंच प्रेम शेजाऱ्यावर करा" या शिकवणीनुसारच ग्रामदानाची कल्पना आहे....... "प्रॉपर्टी (मालकी) पवित्र वस्तु आहे, परंतु ती प्राप्त करण्यासाठीं साधन हि प्रॉपर (योग्य) असावें. स्वामित्वविसर्जन ही पवित्रतम गोष्ट आहे."

१९५८ सालीं दिनांक २८ मे ते ३ जून पंढरपूरला सर्वोदय संमेलन झालें. ६३ वर्षांच्या वयांत विनोबा प्रथमच पंढरपुरला आले होते. तेथें मुस्लिम, ख्रिश्चन लोकांसह मंदिरांत प्रवेश केला होता.

अनुक्रमणिका

'च२+स=क्रांति' हे सूत्र महाराष्ट्र यात्रेंतच विनोबांनी सांगितलें. आंतून चित्तशुद्धि आणि बाहेरून समाज—परिवर्तनाचे कार्य, असे दोन्ही मिळून क्रांति होईल, असे ते म्हणत.

२२ सप्टेंबर १९५८ रोजीं विनोबांनीं गुजराथेंत प्रवेश केला. गुजराथच्या यात्रेंत तीर्थयात्रेसारखी त्यांची भावना होती. एका भाषणांत ते म्हणाले, "प्रत्येक गुजराथी माणसाच्या चेहऱ्यांत मला गांधीजींचें दर्शन होतें". पहिल्या दिवशीं गांधीजींच्या स्मरणानें विनोबांना अश्रू आवरेनात!

बार्डोलीच्या मुक्कामांत विनोबांनी 'ग्रामदान म्हणजे अभयदान' हा विचार सांगितला. ते असें हि म्हणाले, "गुजराथचें हृदय वैष्णव आहे तर बुद्धी व्यावहारिक. दोन्हीचा जेथें योग होतो, मेळ होतो, तेथें योगेश्वर कृष्ण आणि धनुर्धर अर्जून एकत्र राहतात. आणि परिणामस्वरूप तेथें श्री, विजय, भूति मिळते".

बडोद्याला विनोबांनीं विद्यार्थी मंडल स्थापलें होते. त्यावेळचे कांहीं मित्र एकत्रीत झाले. विनोबा म्हणाले, "मैत्री चें नातें सर्वश्रेष्ठ आहे. दास्यभक्तीचें युग संपलें, आतां सख्यभक्तीचें युग आलें आहे".

"विज्ञान युगांत राजकारण हें आऊटडेटेड (कालबाह्य) आहे". हा विचार भावनगरच्या भाषणांत मांडला होता.

"सत्याग्रह नैमित्तिक कार्यक्रम नाहीं, ती प्रतिक्षणाची प्रक्रिया आहे. सत्याग्रहांत हार-जीत हा सौदा नाहीं, त्यांत दोन्ही पक्षांचा विजय आहे. विचारनिष्ठा च सत्याग्रहाचें प्राणतत्त्व आहे".

पुढें राजस्थानांत पदयात्रा पोहचली. अजमेरला सर्वोदय संमेलन झालें. अजमेरच्या दर्गा-शरीफ मध्ये विनोबांनीं महिलांसह प्रवेश करून तेथें 'सर्वधर्म प्रार्थना' केली. ही एक विशेष घटना मानली जाईल.

कश्मीरच्या यात्रेंत विनोबांनीं साडेतेरा हजार फूट ऊंचींचा पीरपंजाल पहाड चढून एक विक्रम केला. हिमाच्छादीत त्या शिखरावर पद्मासनावर बसून अर्धातास ध्यान केलें. कश्मीर यात्रेंत हि विनोबांनीं अनेंक महत्त्वपूर्ण विचार मांडले. "समस्यांचें निराकरण राजकारणांनें होणार नाहीं, अध्यात्माने होईल. राजकारणाचें आणि पांथिक धर्माचे दिवस संपले. आतां यापुढें राजकारणाच्या जागीं विज्ञान येईल आणि पांथिक धर्माचीं जागा अध्यात्म घेईल.

राजकारण+पांथिक धर्म=सर्वनाश.
विज्ञान+अध्यात्म=सर्वोदय."

हा विचार तेथेंच प्रगटला.

कश्मीरहून परत येतांना पठानकोटला प्रस्थान आश्रमाची परिकल्पना झाली. अमृतसरच्या सभेत विनोबा म्हणाले होते, "मंदिरात जातांना आपण जोडे बाहेर ठेवतो. तसे गुरुद्वारात जातांना राजकारणरूपी जोडे बाहेर ठेवले पाहिजेत".

येथें कांहीं काळ विनोबांची अज्ञात यात्रा झाली. पुढे मध्यप्रदेशांत भिंड-मुरैना क्षेत्रांत डाकूंची शरणागती ही ऐतिहासिक घटना घडली. विनोबांना येथें जणु अहिंसेचा साक्षात्कार झाला.

अनुक्रमणिका

इन्दौर शहरांत विनोबा एक महिना राहिले. इन्दौरला 'सर्वोदय-नगरी' करण्याची तसेंच अशोभनीय पोस्टर्स हटविण्याची सूचना तेथेंच केली. शहरांत संडास सफाईचें कार्य केलें. 'शुचिता से आत्मदर्शन' ही प्रवचन माला तेथेंच झाली. कस्तुरबाग्राम या मातृस्थानीं 'सप्तशक्ती' चें विवेचन केलें. 'शांतीरक्षा आणि शीलरक्षा हे महिलांचें कर्तव्य आहे'. असें विनोबांनीं स्पष्ट केलें.

१९६० च्या सप्टेंबर ३० तारखेला पंडीत नेहरूंचें पत्र विनोबांना मिळालें. त्या काळांत असम प्रांतात भाषेच्या प्रश्नावरून अशांती निर्माण झाली होती. विनोबांनीं असमच्या दिशेनें यात्रा सुरू केली. वाटेंत उतरप्रदेश, बिहार, पश्चिम बंगाल या प्रांतात यात्रा झाली. बिहार प्रांतात "बीघे में कठ्ठा, दान दो इकठ्ठा" हें अभियान त्यावेळी जोरांत झालें.

तारीख ५ मार्च १९६१ रोजीं असम प्रांतात विनोबांची यात्रा सुरू झाली. "ग्रामदान हें सामुहिक उत्थानाचें कार्य आहे, जो स्वतः स्वामी बनेल तो 'अ-वैष्णव', कारण सृष्टीचा स्वामी विष्णू!" असम यात्रेंत असे विचार व्यक्त झालें. असमच्या उत्तरेला नॉर्थ-लखीमपूर जिल्ह्यांत बरींच ग्रामदानें मिळालीं. विनोबांनीं असमच्या मुख्यमंत्र्यांपासून सर्वांनाच जागृत केलेंत. असमची समस्या, बाहेरचे लोक बेकायदेशीर रितीने आंत येऊन राहण्याची, या समस्येवर ग्रामदान हा इलाज आहे. सीमाक्षेत्रांत ग्रामदानाच्या आवश्यक्तेवर विनोबांनीं भर दिला होता.

असमच्या यात्रेनंतर विनोबांनीं पूर्व पाकिस्तानची यात्रा केली. (५ सप्टेंबर ते २० सप्टेंबर १९६३). पूर्व पाकिस्तानांत ही भूमिदान मिळालें. मिळालेली जमीन त्याच वेळी वाटली गेली. "वर्ल्ड फेडरेशनचें पहिले पाऊल 'भारत-पाक फेडरेशन' आहे. याने दोन्ही देशाच्या समस्या सुटतील" असें विनोबांनीं तेथें सांगितलें.

या यात्रेनंतर पुनः कांहीं दिवस पश्चिम बंगालची यात्रा झाली. २५-१२-१९६३ रोजीं नवग्राम येथें पंडीत नेहरू भेटीस आले होते. ही या उभयतांची अखेरची भेट ठरली. बंगाल नंतर उडीसातून यात्रा करीत विनोबा १९६४ मध्यें सेवाग्रामला आले. सेवाग्रामला मोफतविणाई योजनेची घोषणा झाली.

१३ वर्षें, ३ महिने, ३ दिवसांनंतर ब्रह्मविद्या-मंदिर, पवनार, येथें विनोबा पोहोंचलें. ब्रह्मविद्या-मंदिराच्या स्थापनेनंतर हे विनोबांचे प्रथमच आगमन होतें.

येथें विनोबांना 'लॅबरंथाइन व्हर्‌टिगो' या आजारानें डोक्यात चक्कर येऊं लागली. त्यामुळे पदयात्रा स्थगित करून ब्रह्मविद्या-मंदिरातच त्यांचा मुक्काम वर्षभर राहिला. पुढें १९६५ मध्यें 'तूफानयात्रा' सुरू झाली. ही वाहन यात्रा होती. या यात्रेंतच बिहारमध्ये दरभंगा जिल्हादानाची घोषणा झाली. पुढें बिहार-दानाचा संकल्प झाला. ऑक्टोबर १९६९ मध्यें राजगृह येथें सर्वोदय संमेलन झाले. या संमेलनानंतर बादशाह अब्दुल गफ्फार खान यांचे भेटीच्या निमित्ताने विनोबांचे २-११-६९ रोजीं वर्धा येथे आगमन झालें.

## ब्रह्मविद्या-मंदिर

लोकापवादाने व्यथित झालेले ज्ञानदेव महाराज झोपडीचें दार बंद करून आंत बसून राहिले तेव्हां लहानगी मुक्ताबाई त्यांना म्हणाली होती, 'ताटी उघडा ज्ञानेश्वरा!' 'जो जगावेगळे कांहीं करतो त्याला

जगाचें, लोकांचें बोलणे सहन करावे लागते'—असें तिने आपल्या वडील भावाला समजावून सांगितले. 'ताटी उघडा ज्ञानेश्वरा!' असें मुक्ताबाई म्हणूं शकली कारण काय? तिने 'स्वतःचें दार' उघडे केले होते.

ब्रह्मविद्येच्या नांवानें विनोबाजींनी आपले घर सोडले होते. म्हणून त्यांनी काय केले? आपआपली घरें-दारें सोडून भूदान चळवळीत काम करणाऱ्या भगिनींसाठी 'ब्रह्मविद्यामंदिरा' च्या रूपाने 'ब्रह्मविद्येचें दार' मोकळे करून ठेवले!

१९५९ साली पदयात्रा चालूं असतांना च विनोबाजींनी 'ब्रह्मविद्या-मंदिर' नांवाच्या आश्रमाची स्थापना केली. विनोबाजींची पदयात्रा चालू च होती, त्यांचें सर्वच कार्यक्रम चालणे, बोलणे इत्यादि 'ब्रह्मविद्ये' साठीच होते. परंतु भगिनींना त्यांनी स्थिर साधनेसाठी परंधाम-पवनार या आपल्या आश्रमांत पाठवून दिले, आणि सांगितले, 'या पुढे या, 'ब्रह्मविद्यामंदिरां' त तुम्हा मुलींनी सामूहिक साधना करायची आहे.' सुरवातीची कांहीं वर्षे पत्रद्वारा विनोबाजींनी भगिनींना मार्गदर्शन दिले आणि दुरून च ब्रह्मविद्येच्या सामूहिक साधनेच्या या इवल्याशा रोपांची त्यांनी जोपासना केली.

पुढें १९६४-६५ साली पदयात्रा करीत च विनोबाजी पवनारला आले होते आणि आजाराच्या निमित्ताने त्यांचे ब्रह्मविद्यामंदिरात जवळ जवळ एक वर्ष राहणे झाले. त्या वेळच्या त्यांच्या वास्तव्यांत ब्रह्मविद्या-मंदिराच्या अंतर्बाह्य जीवनाला त्यांनी जवळ राहून आकार दिला. त्यानंतर १९७० पासून, जीवनाची अखेरची १२ वर्षे क्षेत्रसंन्यास घेऊन ते ब्रह्मविद्यामंदिरात च राहिले आणि सूक्ष्म कर्मयोगाच्या अभिध्यानाने त्यांनी या आश्रमाची बैठक मजबूत केली.

ब्रह्मविद्या-मंदिर हें स्त्रियांच्या सामूहिक आध्यात्मिक साधने चें स्थान. श्रम आणि स्वाध्याय, भक्ति आणि ब्रह्मचर्य! सामूहिक साधनेच्या विकासाची ही दिशा त्यांनी दाखवली. विनोबाजींचें स्वतःचें जीवन म्हणजे कर्म-ज्ञान-भक्ति यांचा सुभग समन्वय. श्रम, स्वाध्याय, भक्ति द्वारें त्यांनी कर्म-ज्ञान-भक्ति या तीन तत्त्वांना उजाळा देण्याची दिशा दाखवली. ब्रह्मचर्याच्या रूपानें भगिनींना त्यांनी 'निर्गुणसाधने' चा संकेत दिला. 'सामूहिक—साधना' याचा वारंवार उच्चार त्यांनी धृवपदासारखा च केला.

'मी आणि माझें' हे तोडा, 'समूहांत अधिष्ठित असलेल्या ईश्वर चरणीं आपली सर्व शक्ति समर्पित करा!', 'एका शरीराच्या अवयवांप्रमाणें एकमेकींशी जोडलेल्या रहा!'. 'शारीरिक श्रमाचा अंगिकार करा आणि समाजातील विषमतेच्या बीजाला मूळासकट काढून फेंकण्याचा मार्ग स्वीकारा! स्वाध्याय करा आणि त्याच्या मदतीने स्वतःला ओळखा! मनुष्याच्या जन्माचा हेतु काय आहे, कुठे कसें पोहचायचें आहे याचे चिंतन करा! ईश्वराची भक्ति करा आणि चित शुद्ध करा, शुद्ध चित्तामध्ये ईश्वर स्वतःच येऊन बसेल. ब्रह्मचर्याच्या साधनेने स्त्रियांची आध्यात्मिक जागृति करावी, स्त्रियांचे प्रेम-सेवा-त्याग हे गुण कुटुंबापुरतेच सीमित आहेत. ते व्यापक करीत जावे आणि त्या गुणांच्या हाती च समाजाचे नेतृत्व सोपवावे, याने अहिंसक समाज साकार होण्याची दिशा मिळेल."

वरील सर्व विचारांना मूर्त रूप देण्याचा एक नम्र प्रयत्न चालू आहे पवनारच्या ब्रह्मविद्या-मंदिरात. ३० भगिनीं आणि ७ बंधूंचा एक लहानसा समूह येथें एकत्र राहतो. आश्रमांत शेती, गोशाळा, छापखाना आहे. 'मैत्री' नांवाचें हिंदी मासिक येथें छापले जाते. आश्रमचें मुख-पत्र असलेले हें मासिक १९६४ पासून नियमित प्रकाशित होत आहे. आश्रमाची वृत्ति, प्रवृत्ति, चिंतन, प्रयोग इत्यादिविषयी माहिती 'मैत्री' मासिकांत

प्रकाशित होते. विनोबाजींचे विचार अर्थात्च यांत प्रकाशित होत असतात. या खेरीज इतर या विचाराला अनुरूप असें लेख यांत असतात. गांधी-विनोबा विचारांचे चाहते या मासिकाचें ग्राहक आहेत आणि या सर्वांचे एक कुटुंब बनले आहे.

'कन्नड विश्वनागरी' नांवाचें पाक्षिक हि येथून प्रकाशित होते. कन्नड भाषा आणि नागरी लिपि असें याचें स्वरूप आहे. भारताच्या अलग-अलग भाषांचें नागरी लिपिमध्ये प्रकाशन करून देशाच्या भावनात्मक एकतेला बळकट करण्याची यांत दृष्टि आहे. अलग-अलग भाषा त्या त्या लिपिमध्ये प्रकाशित होतात आणि व्हाव्या शिवाय नागरी लिपीचा हि उपयोग करावा असे विनोबाजींचें म्हणणे असे.

गोशाळेच्या रूपानें गो-संवर्धन, कृषि-उपासनेने फळ-भाजी-स्वावलंबन साधण्याचा प्रयत्न आहे. सूत-कताईद्वारे वस्त्र-स्वावलंबनाचा प्रयोग हि चालू आहे. दिवसभरांत तीन वेळा सामूहिक प्रार्थना होते. गांधी-विनोबा विचारांची ही आध्यात्मिक प्रयोगशाळा पाहण्यास देशभरांतून तसेच विदेशांतून हि अतिथि आणि दर्शनार्थी येत राहतात. शिवाय वेळोवेळी शिबिरे आणि संमेलने हि ब्रह्मविद्या-मंदिराच्या प्रांगणात होत राहतात. या निमित्ताने व्यापक समाजाशी विचारांचें आदान-प्रदान होत असते.

ब्रह्मविद्या-मंदिराच्या प्रवृत्तीचें हें विविध पैलू येथील दैनंदिन जीवनाचें अंगच आहेत. या सर्व पैलूंना ब्रह्मविद्येचें अधिष्ठान देणें, आत्मशक्ति जागृतीचें माध्यम बनविणें आणि त्याच प्रकाशांत आंतर-बाह्य तसेच व्यक्तिगत आणि सामाजिक जीवनाची घडण करणें—असें हें आहे ब्रह्मविद्या-मंदिराचें इषत् दर्शन!

## हिंदुधर्माची व्याख्या

**यो वर्णाश्रमनिष्ठावान् गोभक्तः श्रुतिमातृकः**
**मूर्तिं च नावजानाति सर्वधर्मसमादरः**
**उत्प्रेक्ष्यते पुनर्जन्म तस्मात् मोक्षणमीहते**
**भूतानुकूल्यं भजते सवै हिंदुरिति स्मृतः**
**हिंसया दूयते चित्तं तेन हिंदूरितीरितः ॥**

—हिंदुधर्माच्या अनेकांनीं अनेक व्याख्या केल्या आहेत. परंतु विनोबांची सदर व्याख्या सर्वव्यापक आणि समन्वयकारी आहे यांत शंका नाहीं.

यांत वर्णाश्रमाप्रमाणें वागणें, संपूर्ण गोवंशहत्याबंदीसाठीं व गोसदनांसाठीं सामूहिक रीतीनें प्रयत्नशील राहणें, मूर्तिपूजा न केली तरी तिची अवगणना होऊं न देणें, सर्व धर्मसमभाव ठेवणें, पुनर्जन्म ही संशयास्पद बाब असली तरी, अनेक धर्मांना मान्य नसली तरी तत्संबंधी विचार करणें, निदान मोक्षाचा तरी प्रयत्न करणें आणि कमींत कमीं हिंसा होऊं न देणें इतक्या विचारणीय आणि आचारणीय बाबी आहेत.

अनुक्रमणिका

## पू. किशोरलाल मश्रूवाला यांचा स्वर्गवास

(९-९-१९५२)

जन्म ५-१०-१८९०. त्यांचे पूर्वज वैष्णवसंप्रदायाचे. त्यांना लहानपणापासून च दम्याचा रोग होता. त्यांचें लग्न गोमतीबेन या सच्छील स्त्रीशीं झालें. त्यांनीं शेंवटपर्यंत किशोरलालभाईंची उत्तम, नर्सहून हि उत्तम सेवा केली. किशोरलालभाईंनीं ३ वर्षें वकीली केली. १९१७ मध्यें किशोरलालभाई चंपारणमधें बापूंकडे गेले. बापूंनीं त्यांची रोगी अवस्था पाहून त्यांना आश्रमांत पाठवून दिलें. तें साल १९२२ होतें.

ईश्वरसाक्षात्कारासाठीं ते एकटेच झोंपडी बांधून राहिले. केदारनाथजींना त्यांनीं गुरू केले. केदारनाथजी आश्रमांतच होते. पुढें दोघे आबूच्या पहाडांत गेले. तेथें त्यांना केदारनाथजींच्यामुळें साक्षात्कार झाला. ती तारीख १२-५-१९२६. नंतर केदारनाथजींच्या आज्ञेप्रमाणें त्यांनीं गुजराथ विद्यापीठांत महत्त्वाचें काम सुरू केलें.

किशोरलालभाईंनीं अतिशय उत्तम लिखाण केलें. जीवन-शोधन, गांधीविचार दोहन इत्यादी ६ पुस्तकें त्यांनीं लिहिली. हरिजन आणि सर्वोदय पत्रांत हि त्यांचे लेख येत. बापू गेल्यावर हरिजन पत्राचें संपादन त्यांनीं यशस्वी रीतीनें केलें. भूदान आंदोलनाचे त्यांनीं उत्तम समर्थन केलें. पुढें ते गांधीसेवासंघाचे अध्यक्ष झाले. ते जेलमध्ये हि गेले. शेंवटीं जीवनाचा अंत आला. दमा होता तरी ते सतत हंसतमुख असत. त्यांचे जीवन पवित्र, प्रेमळ, प्रांजळ आणि परोपकारमय होतें. ९-९-१९५२ मध्यें त्यांचा मृत्यु झाला. विनोबाजींशीं त्याचा अतिप्रेमळ संबंध होता.

## चांडीलाचा आजार

(१२-१२-१९५२)

१८ मैल चालून आले. मॅलिग्नंट मलेरियात विनोबाजी. आश्चर्य. चांडील बंगालच्या सरहद्दीवर. येथें पुढें चालणें शक्य च होईना. थांबले. आजाराची बातमी सर्वत्र पसरली. विनोबाजींनीं औषध घेण्याचें नाकारले. भारतभरांतून मोठमोठे लोक, डॉक्टर, वैद्य आले. आम्हीं हि पोंचलों. बंगाली नर्सेस रात्रंदिवस खडा पहारा करीत होत्या. त्यांना कामच नसे. बाळकोबाजी हि आले. बाळकोबाजींना नेहमी प्रसन्न पाहून लोकांना वाटे विनोबाजी आजारांतून उठतील च. विनोबाजींचे सेक्रेटरी विनोबांची स्थिती डायरीत नोंदीत. पांच पांच उत्तम डॉक्टर होते ते सर्वकांहीं लिहित. बिहारचे मुख्य मंत्री श्रीबाबू आले. वारंवार हात जोडून आम्हांला संकटांतून सोडवा, औषध घ्या म्हणत. 'आपको कुछ हवा तो सारे बिहार की लाज जाएगी' म्हणत. विनोबाजी नुसते हसत. विमला ठकार जे. पी. हि आले. विमला ठकार यांनीं निर्बल के बलराम हें भजन अत्यंत करुण स्वरांत म्हटलें. बंगालचे मुख्य मंत्री बिधानचंद्र रॉय आले. राजेंद्रबाबू आले. बिधानचंद्र रॉय ब्रह्मचारी. ते उत्तम डॉक्टर, त्यांनीं पूर्णपणे तपासणी केली. राजेंद्रबाबू म्हणाले, 'हम कोई काम के नहीं, आप डॉक्टर ही कामके.' शेंवटीं वल्लभस्वामींची विनंति यशस्वी झाली. डॉक्टरांनीं लगेच कॅमोक्वीन दिलें. ताप हळंहळूं उतरत गेला. सर्वत्र आनंदीआनंद. विनोबा आधी म्हणाले होते कीं चांडील हे विनोबाचे वॉटर्लू होणार. पण आतां उलट झालें.

राजेंद्रबाबू म्हणाले यापुढें पदयात्रा सोडा. विनोबाजींनीं तें कबूल केलें नाहीं. जवाहरलाल नेहरू हि येऊन गेले. विनोबाजी तेथें ३ महिने राहिले.

अनुक्रमणिका

## पू. विनोबाजींना रॉयल मेगॅसिस पारितोषिक

(ऑगस्ट १९५८)

(१) प्रथम पूज्य विनोबाजी भावे यांचे थोडक्यांत इंग्रजीमध्ये अतिशय सुंदर चरित्र दिलेलें आहे. हें प्राइज पूज्य विनोबाजींना असें म्हणून दिलेलें आहे कीं ते प्रथम सत्याग्रही. अनेक वेळां केवळ समाजकार्यासाठीं जेलच्या हालअपेष्टा भोगलेले, भारतातले सर्वश्रेष्ठ तत्त्वज्ञानी, अतिशय साधेपणा, भारतातल्या सर्व भाषा आणि विदेशांतल्या भाषा हि जाणणारे, वेदांपासून तो कुराणापर्यंत सर्व प्रमुख धर्मग्रंथांचा अभ्यास करणारे.

(२) १९५१ मधें भूदानयज्ञाची आजपर्यंत जगाच्या इतिहासांत कधीं हि न घडलेली चळवळ पूर्णपणें यशस्वी करणारे, कम्युनिझमला तोंड देणारे अहिंसा-सत्याचा बापूंचा मार्ग जगाला आश्वर्यांत टाकून चोखाळावयाला लावणारे.

(३) राष्ट्राराष्ट्रांतले, धर्माधर्मांतले वैषम्य आर्थिक, सामाजिक, शैक्षणिक, राजकीय स्थितींतली हि विषमता दूर करण्याचा मार्ग दाखविणारे.

(४) शांतिसेना, आचार्यकुल, ग्रामस्वावलंबन, शासनरहित आणि शोषणरहित समाजरचना प्रतिपादन करणारे, एकादशव्रतांचें संपूर्ण आदर्श आचरण करणारे.

(५) स्त्रीशक्तीचें आवाहन करणारे, खादी कार्याला प्राधान्य देणारे, आणि त्याप्रमाणें ब्रह्मविद्या-मंदिरात, ब्रह्मचर्यपूर्वक सामूहिक साधनेचा आदर्श दाखविणारे, स्त्रियांच्या हातांत जगताचा कारभार असावा म्हणजे अहिंसा प्रेम वात्सल्याचा जगभर प्रसार होऊन युद्धें थांबतील असें प्रतिपादन करणारे.

(६) व्यसनें, आळस नष्ट करून शरीरश्रमावर राष्ट्रें उभे करण्याचा उपदेश देणारे.

(७) ब्रह्मचर्यानें जगाच्या लोकसंख्येचा प्रश्न सोडविण्याचा उपदेश करणारे.

(८) आणि शेंवटी सत्याग्रहाबरोबर सत्यग्राही बनण्याची मौलिक सूचना देणारे, रंगभेद, जातिभेद, हरिजन, गिरीजन, परिजन, हिंदु, मुसलमान, ख्रिस्ती, पारशी, शीख इत्यादी सर्व धर्मीय लोकांना प्रमुख मानवधर्म समजावणारे आणि जयपराजयानें दृष्टचक्र चालतें तें थांबविण्यासाठीं निःपक्ष, निर्वैर आणि निर्भयतेचा उपदेश देणारे आणि जय जगत् चा उपदेश देणारे म्हणून हें मॅगेसिस पारितोषिक देण्यांत आलेलें होतें. तें २० हजार डॉलर्स म्हणजे ६० हजार रुपयांचें होतें. पूज्य विनोबाजींनीं तें साधकांसाठीं म्हणजे त्यांनीं गरीबांची, दलितांचीं, खेड्याखेड्यांचीं सर्वांगीण आध्यात्मिक पायावर विचार, आचार, उच्चार आणि संचार द्वारा सतत प्रगत साधना करावी म्हणून देऊन टाकलें.

अनुक्रमणिका

## आजोबांच्याकडे पुन्हां विनोबाजी

(१०-१०-१९५८)

५७ सालच्या अगोदरची गोष्ट. तुंगभद्रा नदी. सुखद थंडीचे दिवस. रुक्मिणीमाता आपल्या दोघा सुकुमार बालकांना घेऊन आत्याबाईकडे आल्या. एक बालक ५ महिन्यांचा व एक ५ वर्षांचा. उमाबाईआत्या. आत्याबाईंचे आई व दोघां मुलांवर फारच प्रेम. हे हावनूर गांव. घर मोठें. प्रवेशद्वाराजवळ च एक मोठी विहीर. प्रवेश करतांच आंत मोठी कचेरी. या आजोळी श्रीमंती फार. ५०० एकर जमीन. दोन तीन खोल्या. भरतराम मंदिराएवढे पूजेचें मंदिर. आंत मोठा देव्हारा. रुक्मिणीमाता मोठ्या मुलाला रोज तुंगभद्रा नदीवर नेई. त्या मुलाच्या म्ह. विनोबांच्या पायांत कांहींच नसे. नाचत बागडत, चिखल तुडवीत ते रुक्मिणीमातेबरोबर तुंगभद्रेवर जात. कधीं दाईचा हात धरून कधी धावत आईच्या पुढें जाऊन तुंगभद्रेंत बुड्या मारीत. मग नदींतले शालिग्राम गोटे जमा करावयाचे. चार महिने असें झालें.

आज ५७ वर्षानंतर त्याच हावनूरला, त्याच तुंगभद्रेच्या काठीं आल्यानें विनोबाजी सद्गदित झाले. अश्रु अनावर. लोक स्वागतासाठीं हजारों संख्येनें उभे होतें. स्वागतसमारंभ होत होता, पण मन विनोबाजींचे त्या पूर्वीच्या काळांत च मग्न. लोकांनीं विनंति केली, श्रवणेच्छा पुरी करा. सकाळचा वेळ. विनोबाजींना बोलवेना. पूर्वीच्या स्मरणानें विनोबाजी वारंवार गद्गद होत होते. ती तुंगभद्रा, तिचा सुखद स्पर्श, तिचा पावन किनारा, तोच आज हेमंत ऋतु. तशांत आग्रहानें स्नान करविणारी ती दयाळू, स्नेहमयी आई! बोलणें कुंठित, लोक हि भावमग्न झालें, शेवटीं कसेबसे बोलले—आईने माझे कधीं खोटे लाड केले नाहींत. नदींत थंडीत ती मला स्नान करवी. ज्या घरीं ५७ वर्षांपूर्वी राहिलों होतों तें आज तसेंच आहे. येथें पुढें हि राहूं शकतो पण आतां विनोबाची जगांतली सर्वच घरे आपली घरें आहेत. कागदावर नकाशा काढावा त्याचप्रमाणें तेथला सर्व देखावा होता. दुधाचा आग्रह झाला. पण भावावेगामुळे पिववेना शेंवटी ३ आचमन दूध घेतलें. तुंगभद्रेकडे वळले. आईचीं स्मरणें मनांत दाटून गेली. आई चांद्रायणव्रतांत अगदींच अल्प आहार घेई, अरेरे! मी त्यांत हि भाग पाडी. प्रेमानें ती खाऊ घाली. आईची केवळ आमच्यावरच माया नव्हती तर ती माउली विश्वावर माया करी. पुढें बोलणें बंद, अनावर अश्रु.

**धन्य ती आई धन्य ती तुंगभद्रा ।**

## जीवन महामंत्र

(१९५८)

**वेदवेदांतगीतानाम्**
**विनुना सार उध्दृतः ।**
**ब्रह्म सत्यं जगत् स्फूर्तिः**
**जीवनं सत्यशोधनम् ॥**

शंकराचार्यांचा प्रसिद्ध श्लोक आहे—

**ब्रह्म सत्यं जगन्मिथ्या**
**जीवो ब्रह्मैव नापरः ॥**

अनुक्रमणिका

म्हणजे ब्रह्म सत्य आहे. तेंच एकमेव सत्य आहे. आणि जगत मिथ्या आहे म्हणजे तें टिकत नाहीं. कालस्थल दोन्ही दृष्टींनीं तें क्षणिक आहे. जीव आणि ब्रह्म एक च आहे. जीव जगाच्या घोटाळ्यांतून सुटला म्हणजे तो ब्रह्मस्वरूप च होतो.

शंकराचार्यांचें ऋण पू. विनोबाजी इतकें मानतात की त्याला तुलना नाहीं. त्याबरोबर च ज्ञानेश्वरांचें हि तें अतुलनीय ऋण मानतात. तेव्हां 'ब्रह्म सत्य' हें शंकराचार्यांचें शब्द त्यांनीं घेतलें आणि ज्ञानेश्वरांचे 'जगत् स्फूर्ति' हे शब्द घेतले. प्रत्यक्ष परिचय आणि अगाध ऋण असलेले गांधीजी, त्यांचे तत्त्व 'जीवनं सत्य शोधनम्' हें घेतलें आणि वेदवेदांतगीतादींचें सार यांत आलें असें त्यांनीं म्हटलें. असा हा अद्‌भूत जीवनमंत्र आहे.

**वेदांतो विज्ञानं विश्वासश्चेति शक्तयस् तिस्रः ।**
**यासां स्थैर्ये नित्यम् शांति-समृद्धीः भविष्यतो जगति ॥**

## अमृतसरमध्यें साहित्यिकांची परिषद

(११-११-१९५९)

अमृतसरमध्यें केवळ शीख साहित्यिक होते असें नव्हे. सर्व प्रांतांतले साहित्यिक होते. यापूर्वी काशी विद्यापीठ, पटना, गया, बलरामपूर, बालेश्वर, पुरी, पवनार, हैद्राबाद—अशीं याविषयीं विनोबाजींचीं भाषणें झालीं आहेत. ती पुस्तकाकारांत हि आहेत. शिवाय निरनिराळ्या प्रसंगीं ते साहित्याविषयीं बोललेले आहेत.

साहित्य शब्द कशाच्यातरी सहित चालणारा आहे. साहित्य जीवननिष्ठेच्या प्रकाशासाठीं उद्‌भूत होतें. गांधीजी साहित्यिक नव्हते. त्यांच्यामुळें अनेक भाषांत उत्तम साहित्य निर्माण झालें आहे. रविंद्रनाथ टागोरांचें हि असेंच आहे. साहित्य आणि सत्य एक असते तेव्हां त्यांतली काल्पनिकता जाते. शंकराचार्यांनीं मंगल, पावन, प्रेरक साहित्य निर्माण केलें. तसें साहित्य असलें पाहिजे. साहित्यांत वैविध्य पाहिजे. पण भेद नसावा. साहित्यिक निर्विकार हवा. मोजक्या शब्दांत त्यानें प्रगटीकरण करावें. उणें न काढणें ही हि साहित्यिकांची मोठी सेवा आहे. स्वातंत्र्याचा साहित्यिकांनीं विचार करावा. गांधींसारख्या महापुरूषांचा विचार करावा. मी साहित्यिक नाहीं. पण साहित्यिकांविषयीं मला प्रेम आहे. साहित्य आत्महेतु, ईश्वरहेतु आणि अहेतुक हि असतें. रवींद्रनाथ उच्च साहित्यिक खरे पण त्याहून हि उच्च अज्ञांत साहित्यिक असू शकतात. तुलसीदास अद्‌भुत साहित्यिक होते.

सत्याशिवाय राहवत नाहीं तें साहित्य. साहित्यांत मुख्य गुण खरेपणा. राजाश्रित साहित्य नको. इसापनीति, गीता आणि युक्लिड ही माझी उत्तम साहित्य पुस्तकें आहेत.

## चंबलघाटी क्षेत्रांत डाकूंचें आत्मसमर्पण

(१०-५-१९६० ते २२-५-१९६०)

बाबा म्हणतात पोलीस, डाकू, बेकार तीन जमाती आहेत. डाकूंची समस्या म्हणजे संमानपूर्वक समता स्थापणें. डाकू ही प्रतिक्रिया आहे. भलता संग्रह आणि भलती गरीबी. त्यांत मध्यभागी डाकू. मुख्य डाकू तर धनसंग्रह हा आहे.

अनुक्रमणिका

मध्यप्रदेशांत डाकूश्रेत्रांत जें कांहीं झालें तें मला अनपेक्षित होतें. या क्षेत्रांत मला जो अनुभव आला तसा पूर्वी कधीं हि आला नव्हता. कठोर हृदयाचे विरघळले. ज्यांनीं डाकूगिरी केली त्यांना आतां पश्चात्ताप होत आहे. इकडे पोलीस इकडे डाकू, दोहोंमधें जनता भरडली जात आहे.

मुंबईत लुकमान डाकू लपून होता. त्याला कळलें बाबा या प्रदेशांत आला. तो हि आपल्या टोळीसह आला. त्याला वाटलें त्याच्यावर जबरदस्ती होणार नाहीं. तो भिंडपर्यंत बाबाबरोबर राहिला.

पोलिसांनीं कांहीं डाकू नष्ट केले. तसे कांहीं उत्पन्न हि केले. पण वीसहि डाकूंनीं आत्मसमर्पण केलें. हें केवढें आश्चर्य. या डाकूशरणागतीची देशविदेशांत ख्याति झाली. जर्मनीहून पत्र आलें आहे कीं ते त्यांच्या भाषेंत यावर ग्रंथ लिहीत आहेत. हा प्रचार आम्हीं केला नाहीं. भारतीय संस्कृतीनें केला. चंबल खोऱ्यांत लपण्याला पुष्कळ जमीन आहे. पोलीस तेथें कांहीं करूं शकत नाहींत. पैसेवाले हा प्रदेश सोडून गेले आहेत. डाकूंच्या आत्मसमर्पणाचें श्रेय १६ आणे परमेश्वराचें आहे. हें सर्व भगवंतांला समर्पण.

## अशोभनीय पोस्टर सत्याग्रह

(५-११-१९६०)

इंदूरमध्यें विनोबाजी एक महिना राहिले. त्यांचीं ठिकठिकाणीं उद्‌बोधक व्याख्यानें झालीं. पण जिकडे तिकडे अशोभनीय पोस्टर्स दिसत. अशोभनीय पोस्टर्स म्हणजे तरुणास्त्रियांचीं अचकट विचकट चित्रें. हीं चित्रें सिनेमामध्ये हि दाखवतात व सिनेमावाले च तीं लावतात. मग तीं सार्वजनिक ठिकाणीं लावण्याला काय हरकत? असा प्रश्न अनेकांनीं म्हणजे सिनेमाशौकिनांनीं विचारला. त्याला विनोबाजींनीं उत्तर दिलें, सिनेमाला पैसे खर्चून ज्याची मर्जी तो जातो. येथें इच्छा नसून हि अनेकांना तीं पाहावीं लागतात व लज्जित व्हावें लागतें. तेव्हां ती फाडून टाकण्याचा सत्याग्रह केला पाहिजे. त्याप्रमाणें सत्याग्रहाची यशस्वी योजना झाली. मग सिनेमावाले फक्त सिनेमागृहाबाहेरच तेवढीं हीं चित्रें लावू लागलें. अशीही लज्जाजनक कहाणी आहे.

## सुरगांवला नानाजी महाराज यांचा स्वर्गवास

(२-१२-१९६०)

नानाजी महाराज नागपूरला शिक्षक होते. त्यांना त्यांच्या अनेक नातेवाईकांच्या मृत्यूमुळें वैराग्य प्राप्त झालें. ते मग सर्वत्र तीर्थयात्रा करीत साधुसंतांच्या भेटीगाठी घेत फिरले. यात्रा सर्व पायींच. जवळ सामान किरकोळ. दैवयोगानें सुरगांवला उतरले. अथाचित वृत्ति. पण भिक्षा मागत नसत. पुष्कळ दिवस उपास होत. शहरांत तर कोणी बोलावीत च नसे. एक वेळ जेवण. संध्याकाळी पावभर दूध. चटईवर झोंप. गांवकरी म्हणाले महाराज येथें रहाल का? हो म्हणांले. ते एका जुन्या मंदिराजवळ बसले होते. बरीच गांवकरी मंडळी हि होती. मंदिर पडेल असें नव्हतें. एकदम काय प्रेरणा झाली नानाजी म्हणाले चला सर्व जण दूर पळा. लगेच सर्व दूर गेले. आणि काय चमत्कार मंदिर एकदम कोसळलें. नानाजींमुळें सर्व वाचले. नानाजींच्या सर्व पाया पडले. व म्हणाले महाराज आतां कायमचे येथें रहा. नानाजी म्हणाले राहीन पण येथें एक हि व्यसनी नसावा.

अनुक्रमणिका

मग गोपाळकृष्णाचें मंदिर गांवकऱ्यांनीं बांधलें. नानाजींसाठीं चार खोल्या जवळ च बांधल्या. नानाजींचा सत्संग सर्वांना मिळूं लागला.

नानाजी कोठें हि जात नसत. फक्त पवनारला पू. विनोबाजींकडे जात. ते लोकांना आयुर्वेदिक औषधें देत. लोक बरे होत. तंटे-बखेडे गांवांतच सोडवत. सूत कांतणें, विणणें हि गांवांत होऊ लागले. गौरवर्ण, मध्यम उंची, कपाळाला गंध, पवित्र आचरण त्यामुळें त्यांना न ओळखणारे हि हे सत्पुरुष आहेत असे एकदम ओळखत. सकाळ संध्याकाळ रोज प्रार्थना, गीताई-पठन. रस्त्यांची सफाई होई. नानाजींना रोज एका घरी जेवण्याला बोलावीत. पुढें पुढें मठावरच ताट पोंचविलें जाई. बाबाजी मोघे, पंढरीभाऊ, रामदासभाई, वल्लभस्वामी तेथें वर्षानुवर्षे राहिले होते. नानाजींकडे ५/५० मैलांवरून रोगी औषधासाठीं, येत व बरे होऊन जात.

नानाजींना ७५ वर्षें झाली. साधा मलेरिया ताप. त्यांत ते वारले. सर्व लोक हळहळले. नानाजी महाराजांमुळें अद्याप गांवात भक्तिभाव, खादी, ज्ञानेश्वरीवाचन, सफाई थोडी फार आहे. असे सत्पुरुष जर प्रत्येक खेड्यांत असतील तर काय पाहिजे? खेडीं म्हणजे देवमंदिरे च होतील.

### पू. विनोबाजींनीं स्थापन केलेले ६ आश्रम

(१) समन्वय आश्रम, बोधगया (बिहार)
(२) ब्रह्मविद्या-मंदिर पवनार, जिल्हा वर्धा (महाराष्ट्र)
(३) प्रस्थान आश्रम, पठानकोट (पंजाब)
(४) विश्वनीडम्, बेंगलोर
(५) विसर्जन आश्रम, इंदौर (मध्यप्रदेश)
(६) मैत्री आश्रम, लीलाबाडी, नॉर्थ लखीमपूर (आसाम)

आद्य श्री. शंकराचार्यांनीं भारताच्या ४ कोपऱ्यांत ४ आश्रम असेच १४५० वर्षांपूर्वी स्थापन केले. तेथें चालत जाणे सोपे नसे. (१) श्रृंगेरी कालड्री येथें (२) जगन्नाथपूरी, (३) द्वारका, (४) हिमालयात ऋषीकेश—असे ४ आश्रम. त्यांत अनेक संन्यासी रहात असत. गीता, उपनिषदें अभ्यासीत, भिक्षा-वृत्तीनें रहात. स्वाद्वभं न तु आच्दनां—हें सूत्र असे. अशा अस्वाद व्रताप्रमाणें अहिंसा ब्रम्हचर्यादि सर्व व्रतें ते पालन करीत. हे सर्व संन्यासी ४ महिने पावसाळ्यांत आश्रमांत रहात. बाकी ८ महिने विचरण करीत. महावाक्याचें सतत चिंतन करीत. संचार केवळ एकेकटेच करीत. मुख्यतः खेड्यांतून संचार. काशी, कांची, अवंतिका इ. मोठ्या शहरांत प्रसंगानें जाणें. दंड, कमंडलु आणि छाटी कफनी इतकीच वस्त्रें.

**जातिनीति कुल गोत्र दूरगं**
**नामरूप गुणदोष वर्जितं ।**
**देशकाल विषयाति वर्ति यद्**
**ब्रह्म तत्त्वमसि भावयात्मनि ॥**

विचरण करतांना हेंच चिंतन. स्त्रियांना संन्यासाचा अधिकार नाहीं. विनोबाजींनीं वरील साही आश्रमांत तो सगळ्यांना दिला. सर्वांत सत्य, ब्रह्मचर्य, अहिंसा दि व्रतेंच मुख्य ठरली. हा अपूर्व योग विनोबाजींच्या मुळें

अनुक्रमणिका

साही आश्रमांत आला. स्वावलंबनाने राहणें. शरीर परिश्रम करणें हें ओघानेंच आलें. स्वच्छता, पावित्र्य परस्पर भाषा शिक्षण, गोसेवा, पूर्ण स्वातंत्र्य, स्वैरता नव्हे.

**ब्रह्मविद्या सुप्रस्थानं । विसर्जनसमन्वयौ**
**वल्लभत्वंच मैत्रीच । षडंगैः साधनं स्मृतयः**

अशी मग सहजच कारिका तयार व्हावी यांत नवल काय?

## मेथे मास्तरांचा स्वर्गवास

(१३ मे १९६३)

१९१६ सालीं कोल्हापूरला विनोबाजींचें ज्ञानेश्वरीवर प्रवचन झालें तें ऐकून ते विनोबाजींकडे आले. आजन्म ब्रह्मचारी. ते कृश, थोडे वाकलेले. सुतारी कामांत अतिशय प्रवीण होते. त्यांचा पोशाख अगदी साधा. हातानें काढलेल्या सुताचा. गोपुरीला रोज पायी सुतारीसाठी १०/१२ मैल अनवाणी जाणें येणें करीत. ते घोंगडीवर झोपत. ताप असला तरी त्यांचें काम चालूंच असे. धाम नदीवर थंड पाण्यात स्नान करीत. साबू इ. कांहींच नाहीं. विनोबांना रोज पाया पडून नमस्कार करीत. त्यांच्या सुतारीच्या कामाची गणतीच नाहीं. पदयात्रेत हि मधून मधून रहात. त्यांनी सुतारीचे अनेक शिष्य तयार केले. विनोबाजींकडे ते ३६ साल राहिले. ते लहान मुलांना हि लवून नमस्कार करीत इतके नम्र. विनोबाजी म्हणत येशू क्रिस्त हि ब्रह्मचारी व सुतार. तेव्हां १९६४ मध्यें विनोबाजी जेव्हां येथें आले ते हां त्यांच्याच झोंपडींत राहूं लागले. ते विनोबांची आज्ञा होताच एका क्षणांत प्राणार्पणाला तयार असत. ते उत्तम पोहणारे होते. त्यांची इच्छा भरतराममंदिरांत देह सोडण्याची होती. विनोबा म्हणत मेथे मास्तर म्हणजे येशु क्रिस्तच आमच्या बरोबर आहे. ते पहिल्या महायुद्धांत इंग्लंडला पळून गेले. तेथें त्यांना सुतारी काम च मिळाले. ते कोल्हापूरला गेले तेथें च ते स्वर्गवासी झाले. पण त्यांचा प्राण याच भरत-राममंदिरांत च राहिला यांत शंका नाहीं.

## पू. विनोबाजी टॉयफाइडनें आजारी

(८-८-१९६४)

पवनार आश्रम. विनोबाजींच्या आजारानें सर्ववर्तमानांत चिंता. धुळ्याहून प्रस्तुत लेखक व सुरजमलमामा दोघे पवनारला आलों. टॉयफाइडची आधुनिक औषधी आधींच बरोबर आणली.

पोंचल्या बरोबर लाल बंगल्यांत बराच जमाव. कोणत्या पॅथीचें औषध द्यावें ही चर्चा करीत होता. आम्हांला विचारता आम्हीं म्हणालों आम्ही कोणतीच पॅथी जाणत नाहीं. ज्यामुळें विनोबाजी लवकरांत लवकर बरे होतील ती पॅथी हवी. विनोबाजी औषध घेत नव्हते. फार धोका होता.

मग डॉक्टरांचा घोळका विनोबाजींकडें गेला. विनोबाजींनीं विचारलें तुमच्या औषधानें पूर्ण बरें होण्याची खात्री आहे काय? डॉक्टर एकमेकांकडे पाहूं लागले. आम्ही सुचविल्यावरून दोघे डॉक्टर म्हणाले—आपका ज्वर निश्चित जायेगा । १०० फी सदी यह बात हम कहते हैं. विनोबाजी किंचित् हंसून म्हणाले. आप ईश्वर ही बने ऐसा समझना होगा. डॉक्टर म्हणाले हम ईश्वर कैसे बन सकते हैं. लेकिन ईश्वर ने ही यह अचूक दवा दी है. हम केवल निमित्त हैं. मग विनोबाजींनीं विचारलें कौनसी पॅथी? मेरा तो सिंपथी

पर विश्वास है. डॉक्टर म्हणालें यह पॅथी आज ही हमने सुनी । आपको गरीब का गरीब हो उसका मुफ्त उपचार करना चाहिये, विनोबा म्हणाले. डॉक्टर म्हणालें जी हां यह भी पाठ हमे नया ही मिला.

नंतर औषध. पण तें कोणीच आणलें नव्हतें. आणावयाचें तर ५ मैल दूर जावें लागत होते. आम्ही लगेच टॉयफाइडचें औषध डॉक्टराना दाखविले. आणि म्हटलें ये चलेगा क्या? डॉक्टर उत्तरले यही तो अक्सीर दवा है. औषध दिलें. रात्रीं दरदरून घाम सुटला. ताप ३ दिवसांत पूर्ण उतरला क्रमाक्रमानें आरोग्य पूर्णपणानें लाभलें. विनोबाजींनी पूर्णपणें पथ्य पाळलें.

## डॉ. रा. ना. दातार यांचा अकोला येथें स्वर्गवास

(८-८-१९६४)

दातार मुळचे सांगलीचे. गरीबी फार. त्यामुळें माधुकरी मागून सर्व शिक्षण केले. वि. प्र. लिमये महाविद्वान दातारांच्याकडे च लग्न होईपर्यंत राहिले. डॉ. च्या पत्नीचें नांव सीताबाई. खरोखर च त्या सीता च होत्या.

डॉ. दातार यांचा पुण्याला मोठा वाडा. ते उत्तम सर्जन झाले. ते गरीबांचीं ऑपरेशने फुकट करून देत. रोग्यांना घरचे खाणें पिणें देत. त्यांचा रोगी दगावला असें कधीं झालें नाहीं. त्यांच्याकडे विनोबाजींकडचे कोणी हि असो त्यांचें स्वागत व सेवा व्हावयाची च. विनोबाजी पूर्वी फोटोला उभे रहात नसत. पण प्रथम डॉक्टरांच्या च आग्रहामुळें ते फोटोला उभे राहिले.

डॉ. दातारांना रामकृष्ण परमहंसाची मोठी भक्ति! त्यामुळें त्यांच्या शिष्ट प्रशिष्टांकडे ते अनेक वार जात, ते साधे व स्वावलंबी होते. विनोबाजींचे मोठे भक्त. आपल्या घरीं सूत कातीत. हातमाग हि त्यांनीं लावला होता. स्वतः भांडी घाशीत. विनोबांची व रामकृष्णांची पुस्तकें विद्यार्थ्यांना फुकट देत. त्यांच्या नर्सेस त्यांच्याचकडे रहात. पुढें तर त्यांनी पैसेहि घेणें सोडून दिले. त्या त्यांच्या कुटुंबीक च झाल्या. त्यांनीं मुलाचें व मुलींची लग्नें केली. पण हुंडा मुळींच घेतला नाहीं. आपल्या मुलामुलींना घेऊन ते अनेक वेळा विनोबाजींकडे येत. त्या वेळी विनोबांची प्रार्थना तास तास उभ्याने होई. ते विनोबाजींना पूर्ण पुरुष मानीत. मुला-मुलींना त्यांनीं इस्टेट वाटून दिलीं. स्वतःसाठी कांहींच ठेवलें नाहीं. त्यांना मधुमेहाचा रोग होता. एकदा ते आम्हाला म्हणाले जगून काय करावयाचें. शेंवटीं अकोल्याला ते गेले. धन्य त्यांचें जीवन!

## लालबहादुर शास्त्री पू. विनोबांच्या भेटीला

(७—७—१९६५)

शास्त्रीजी अतिशय विद्वान्, नम्र व साधे. शास्त्रीजी पंतप्रधान झाल्यावर पू. विनोबाजींचा सल्ला विचारण्यासाठी आले होते. पाऊस धो धो पडत होता. विनोबाजी चिकनी जामनीला एका झोपडींत होते. चिखल तुडवीत तुडवीत ते एकटेच एक दोन शिपाई मागे ठेवून तेथें आले.

पू. विनोबाजींवर त्यांची अपार श्रद्धा. त्यामुळे पुष्कळ वेळ बोलणें झाले. शास्त्रीजींनी ते सर्व नोट केले आणि दोघे हि हंसत हंसत उठले. त्यांचे बोलणे काय झाले ते अर्थातच कळणें शक्य नव्हते. पाऊस तसाच धो धो पडत होता. छत्र्याहि नव्हत्याच. विनोबाजींना तर लहानपणापासून पावसांत हिंडण्याची फार

अनुक्रमणिका

हौस. पण ते बडोद्याचे रस्ते फार चांगले, येथें रस्ते चिखलाने भरलेले ढोपर ढोपर दोघांचे पाय चिखलाने बरबटले. पायांत काहीं नाहीं. शास्त्रीजींनी स्वतःच आपले पाय धुतले व विनोबाजींनी हि. मग ते दिल्लीला रवाना झाले.

## भाषा प्रश्नावर पू. विनोबाजींचें उपोषण्

(१२—९—१९६५)

तामिळनाडमध्यें भाषा प्रश्नावर अतिशय हिंसक आंदोलने चालू आहेत त्यामुळें मला फार वेदना झाली.

हिंदी भाषा लादली जात नव्हती. इंग्रजी चालूं होती. प्रातीय भाषांबाबत कोणता हि धोका नव्हता. नोकऱ्यांत कोणत्या हि प्रकारची हरकत येणार नव्हती. पंडितजींनी तसे आश्वासन दिले होते. तरी हि हिंसा चालू आहे. त्यामुळें मला अनशन करावें लागत आहे. मी स्वतःला ईश्वराच्या हातांत सोंपले आहे. उपोषण बेमुदत राहील. सर्व भाषांवर माझें प्रेम आहे. कोणतीही भाषा शिकण्याची संधी मी गमावीत नाही. तमिळ, तेलगू, मल्याळी, इ. द्रविड भाषेंत महान साहित्य आहे. ते सर्व अध्यात्मिक साहित्य मी अभ्यासिलें आहे. तुलसीदासांची हिंदी मी प्रिय मानतो. छागला मला भेटण्याला आले असताना त्यांना मी लिहून दिलें कीं हिंदी भाषा परिभाषा राहील. उत्तरेकडच्या लोकांनी दक्षिणेकडची एक भाषा शिकली च पाहिजे. मी अहंकाराने उपवास करीत नाहीं. मला ईश्वराकडून आज्ञा मिळाली आहे. आपण नम्र बनावे.

विनोबाजींच्या उपवासामुळें प्रार्थना झाल्या ते सफल व्हावे म्हणून. जगन्नाथजी हिंसक विद्यार्थ्यांना भेटत आहेत. मनमोहन चौधरी तिकडे दौरा करीत आहेत.

उपवासामुळें मद्रास व दक्षिणेकडे अशांति एकदम थांबली. व पुढें हि अशांति या प्रश्नावर होणार नाहीं अशीं सर्वांची आश्वासनें मिळाली. म्हणून १७ फेब्रुवारी दुपारी १२ वाजतां प्रार्थना झालीं. व. पू. बाळकोबा यांच्या हस्तें विनोबाजींना लिंबाचा रस दिला गेला. विनोबाजींनी एक निवेदन काढले. आपल्या देशांत त्रिसूत्री भाषा म्हणजे (१) मातृभाषा, (२) हिंदी भाषा, (३) इंग्रजी भाषा राहतील. या निर्णयामुळे सर्वत्र आनंदी आनंद झाला.

## महिला लोकयात्रा

(२५—११—१९६७)

हेम भराली, लक्ष्मी फूकन, देवी रिझवानी, निर्मला वैद्य २५ ऑक्टोबर १९६७ मध्यें इंदौरहून निघाल्या आणि २५ ऑक्टोबर १९७९, १२ वर्षे पदयात्रेचा संकल्प पवनारला पू. विनोबाजींच्या आश्रमांत त्यांनी पूर्ण केला. या भगिनी ब्रह्मचारिणी आणि सुविद्य होत्या (आहेत). जैन आणि हिंदु साधू अनादि काळापासून यात्रा करीत आलेले आहेत. पण या महिला यात्रेकरूंचा उद्देश फार थोर होता. महिला अनेक प्रांतांत अतिशय मागासलेल्या. गोषा पद्धति पारतंत्र्य हे अनेक महिलांना सहन करावे लागते. स्त्री-शक्ति उन्नत व्हावयाची तर अध्यात्मिक पायावरच हा या भगिनींचा दृढ विश्वास होता. स्त्रियांना ब्रह्मविद्येचा अधिकार नाहीं ही येथील बद्धमूळ झालेली समजूत! या चारी भगिनींनी सतत खोडून काढली. भगिनींना वैराग्य शक्यच नाहीं, हा गैरसमज हि यांनी सोदाहरणाने दूर केला. या सर्वांच्या वक्तृत्वाला तोड नव्हती.

अनुक्रमणिका

सगळे मंत्रमुग्ध होऊन ऐकत. या भगिनी प्रार्थना करीत आणि करवीत. २५–२५ मैलाच्या मजला मारीत. घोर अरण्यें पार करीत. वेळी अवेळी खाणे पिणें, सर्व गैरसोयी सर्वच अस्वच्छता त्यांनी सहन केली आणि लोकांना उत्तम उपदेश करून त्यांच्याकडून स्वच्छता करवून घेतली. त्यांच्या बरोबर कित्येक भगिनी थोड्या अंतरापर्यंत चालत येत. यांना त्रास पुष्कळ झाला तरी प्रेमहि पुष्कळ मिळे. यांतल्या भगिनींनी त्या त्या प्रांतीय भाषेचा अभ्यास केला, गाणी पाठ म्हटली. शहरांत, कॉलेजमध्ये हि व्याख्यानें दिलीं. लोक चकित होत. यांच्या अनुभवाला पार राहिला नाही. नेपाळ ते सिलोनपर्यंत त्या फिरल्या. एकूण २६ हजार मैलांची पदयात्रा झाली. पुस्तके हि तशीच. आजारी अवस्थेतहीं चालणें सोडले नाहीं. धन्य या भगिनी.

## जे. पी.—जयप्रकाश नारायण

जे. पी. चा जन्म २ ऑक्टोबर १९०२ मध्यें झाला. त्यांच्या आईचे नाव फूलराणी आणि वडिलांचे नाव हरदयाल.

१९२० मध्यें त्यांचा प्रभावतीदेवींशी विवाह झाला. त्याच वेळीं गांधीजी पटण्याला आले होते. त्यांच्या भाषणाचा जे. पी. वर फार प्रभाव पडला.

जे. पी. चे बालपण सीताबदियारा या गांवांत गेले. त्यांचे लाडात लालनपोषण केले गेले. जे. पी. शांत व साधे होते.

पुढे पटण्याला जे. पी. चे शिक्षण झाले. जे. पी. चे शिक्षक फार थोर होते. पुढे जे. पी. त्यांची फार आठवण काढीत. जे. पी. सर्व विषयांत हुशार होते व बक्षिसे मिळवीत. जे. पी. कधीं. गप्पा गोष्टींत वेळ घालवीत नसत. पुढे जे. पी. शिक्षणासाठीं अमेरिकेला गेले.

जे. पी. अमेरिकेत ७ वर्षे राहिले. तेथे सर्व खर्च मजूरी करून भागवित. मार्क्सवादाचाहि त्यांनी अभ्यास केला. कित्येक दिवस जे. पी. ना उपाशी रहावे लागे. एकादा कप चहा ते घेऊ शकत. त्यांना आजाराने घेरले. शेवटी प्रकृति सुधारून ते एम. ए. झाले. जे. पी. भाषणे करीत. त्यांत त्यांना सहज १८० डॉलर मिळत. स्वतःचा स्वयंपाक स्वतः करीत.

जे. पी. चे आईवडिल अकस्मात मरण पावले. त्यांचे घरहि पुरामुळें वाहून गेलें. जे. पी. परत आले. प्रभावतीजी गांधींच्या सेवेत होत्या. तेथे प्रस्तुत लेखकहि होता. त्याने जे. पी. ना वर्धा आश्रमात प्रथम पाहिले. कस्तुरबांनी जांवई म्हणून त्यांचे स्वागत केले.

पुढें जे. पी. चा पं. जवाहरलाल नेहरूशी घरोबा वाढला. पुढें जे. पी. देशभर भूमिगत होऊन फिरले. १९३२ मध्यें ते पकडले गेले. त्यांचा जेलमध्ये फार छळ झाला. प्रभावतीजी ब्रह्मचर्याने राहू इच्छित होत्या. जे. पी. नी ते पूर्ण कबूल केले व शेवटपर्यंत ते तसेच राहिले.

१९३४ मध्ये बिहारच्या भूकंपात जे. पी. नी फार कष्ट केले. त्यांनी कॉंग्रेस समाजवादी पक्ष स्थापन केला.

अनुक्रमणिका

पुढे ते जेलमध्ये गेले. प्रभावतीजींनी पटण्याला महिला चर्खा संघ काढला. जे. पी. जेलमधून मोठ्या हिकमतीने पळाले.

पुढे गांधींजींची हत्या झाली. सेवाग्रामला सर्व लोक जमले. जे. पी. हि. गेले. तेथे विनोबाजींच्या साधनशुध्दीचा सिद्धांत ऐकून जे. पी. अगदी खुष झाले. विनोबांशी खुप चर्चा केली. साधनशुध्दीचा प्रयोग पाहिला.

पुढे विनोबाजी भूदान चळवळीत फिरू लागले. जे. पी. नी बिहारमध्ये फिरून खूपच श्रम घेतले. १९५४ मध्ये बौद्धगया संमेलनांत जे. पी. नी जीवन दानाची घोषणा केली. सर्वत्र विद्युत् संचार झाला.

१९७५ मध्यें आणीबाणी जाहीर झालीं. जे. पी. पकडले गेलें. १९७७ मध्ये अर्धमेल्या स्थितीत त्यांना सोडले. त्यांची किडनी पूर्ण बिघडली. डायलेसिस वर रहावे लागले. मुंबईला जसलोकमध्ये दाखल झाले. पुढें गोवधबंदीसाठीं विनोबांचे उपवास झाले. जे. पी. नी लेखाद्वारे खूप प्रचार केला. पुढे काँग्रेस पक्ष हरून जनता पक्ष आला. जे. पी. नी अधिकारपदे घेतली नाहींत. ते उत्तरोत्तर अशक्त होत गेले. ८ ऑक्टोबर १९७९ ला देहावसान झाले. धन्य त्यांचे जीवन. खरोखर असा पुरुष जन्मणें हे भारताचे भाग्य.

## स्वामी आनंद

(१९८०)

स्वामी आनंदांनीं लहानपणींच रामकृष्ण मठातल्या सन्याशांकडून संन्यास घेतला होता. पण ते भगवी वस्त्रे वापरीत नसत. ते टिळक होते तोपर्यंत त्यांच्याकडे नेहमी जात. विनोबाजींचा हि त्यांचा चांगला च परिचय होता. ते सर्व हिंदुस्थान पायीं फिरले होते. ते दरवर्षी हिमालयांत कौसानीला जात. नवजीवन आणि हरिजन पत्रासाठी ते नेहमी गांधीजींकडे येत. काकासाहेब आणि मर्ढेकर मिळून त्यांनी हिमालयाचा प्रवास केला होता. किशोरलाल मश्रूवाला, नरहरी परीख, महादेव देसाई, नाथजी यांची त्यांची गाढ मैत्री होती. त्यांना लेखनांत छापण्यात एकादी लहानशी चूक हि सहन होत नसे. ते श्यामाप्रसाद मुखर्जी यांच्याकडे हि राहिले होते. ते अनेकवेळा जेलमध्यें गेले होते. साने गुरूजींना जेलमध्ये मारले तेव्हां स्वामीजींनी जेलरला माफी मागावयाला लावले.

स्वामी आनंद धुळ्याला प्रस्तुत लेखकाकडे अनेकवेळा यावयाचे. ते एक वेळ जेवीत व एक वेळ दूध पिऊन रहात. स्वामीजी ठाण्याच्या आश्रमांत पोर्तुगीझ बंगल्यात रहात तेव्हां गीताई प्रचारासाठी प्रस्तुत लेखक १ वर्ष राहिला होता. धुळ्याला त्यांनी व प्रस्तुत लेखकानें मिळून सर्वोदय विचारणा, बुद्ध भगवान भावदर्शन इ. पुस्तके लिहिली. स्वामीजींनी एक सुंदर भजनावली हि तयार केली होती. महादेवभाईंचे चुलत बंधु छोटूभाई स्वामीजीकडे नेहमी येत. मग हास्यविनोदाला पार रहात नसे. स्वामीजी रोज मुंबईला जात. सर्व मुंबई त्यांनी पालथी घातली होती. आचार्य भिसे हि वेळोवेळा बोर्डीहून येत. यापुढे ते कासेवाडला च राहिले. त्यांचा व प्रस्तुत लेखकाचा गांधी परिवारांत अधिकांत अधिक संबंध होता. स्वामीजींनीं एक लोकलिपी काढली होती. त्यांनी एका छापखान्यासाठी २ दिवसांत ५० हजार रुपये गोळा केले. त्यांना हृदयविकारानें मृत्यू आला. स्वामीजींना कोटि कोटि वंदन.

अनुक्रमणिका

## विश्वमहिला संमेलन

(३०/३१ डिसेंबर ते १ जानेवारी १९८०)

हे भारतातले संमेलन अपूर्वच. असामाच्या अमलप्रभादास ह्या संमेलनांत मुख्य होत्या. भारताची १२ वर्षे पदयात्रा केलेल्या लक्ष्मी फूकन, देवी रिझवानी, निर्मल वेद आणि हेम भराली या चारी महिलांचा सन्मान केला गेला. त्यांची भाषणे झाली. पुरस्कार म्हणून त्यांना वस्त्रें व पात्रें दिली. हा सोहळा अपूर्व होता. गुजराथी महिला ज्यांनी अनेक पदयात्रा काढल्या होत्या त्याहि आल्या होत्या. जवळ जवळ भारतातल्या सर्व महिलांनी सर्व प्रांत पादाक्रांत केले होते. सर्वांची अनुभवपूर्ण रोचक भाषणें झाली. इंग्रजी न समजणाऱ्यांसाठीं हिंदी भाषांतराची व्यवस्था होती. गोरक्षणाचे हि अनुभव सांगितले गेले. दीड हजार देशी-विदेशी महिला होत्या. मोठे व्यासपीठ, शामियाना आणि रोग्यांची शुश्रुषा उत्तम होती. सगळ्यांना निरामिष हवे ते भोजन मिळत होतें. भोजनासाठी महिलाश्रम महिलांनी खूप मदत केली. प्रदर्शन हि भरविले होतें. थोर महिलांची चरित्र्ये थोडक्यांत भिंतीवर काचेच्या फ्रेममध्ये लटकावलेली होती. खेड्यांतली मुलेबाळे हि पुष्कळ येत. प्रदर्शन पाहिले तरी पुनः पुन्हा पहावे असें वाटे. अनेक ठिकाणी बोधवाक्ये लावलेली होती. सगळ्यांना भाषणें करणे शक्य नाही म्हणून गटागटांच्या चर्चा व त्यांचे रिपोर्ट वाचले गेले. युरोपियन महिलांनी कधीं खाल्ले नाहींत असे मधुर पदार्थ त्या निरखून पहात आणि खाऊन खूष होत. त्यांनी पोळ्या तर जन्मांत कधी पाहिल्या नव्हत्या. कांहीं महिला त्या गडबडींत स्वयंपाकघरांत जाऊन कांहीं पदार्थ कसे करावे तें शिकून आल्या. जर्मन महिला तर इतक्या चाणाक्ष की हावभावावरून बहुतेक बोलणे समजून जात. मेळावा इतका सुंदर झाला की, कोणाला परत जावेसें वाटेना. सेवाग्रामची बापूकुटी पाहून विदेशी लोकांना आश्चर्य वाटे. एवढा मोठा महात्मा तेथे कसा राही. पण एकूण येथलें प्रसन्न तारकांकित आकाश, धावपळरहित शुद्ध हवेंतले शांत जीवन पाहून फार संतुष्ट झाल्या. विदेशांत शेकडों मजले घरांत राहणाऱ्या महिलांचे पाय जमिनीला कधींच लागत नाहींत. त्यांना येथला मोकळेपणा पाहून फारच हर्ष झाला. हे खरें कीं येथें कांहींच अडचणी न हत्या, पण युरोपियन लोक कोणतीही अडचण सहज सहन करतात.

## गीताई मंदिराचें उद्‌घाटन

(७ ऑक्टोबर १९८०)

गीताई मंदिराची कल्पना कमलनयन बजाज यांची. पण ते ती कल्पना पाहण्याला राहिले नाहींत. रामकृष्ण बजाज, राहुल बजाज यांनीं कमलनयन बजाज यांच्या कल्पनेप्रमाणें सर्व प्रांतातले उंच मजबूत नाना रंगांचे दगड आणून त्यावर गीताई कारागीराकडून कोरवली.

गीताई मंदिराला वरून पाहिलें तर गाईचा व चर्ख्याचा आकार दिसतो. ही कल्पना हि स्व. कमलनयन यांचीच. १-५-१९७२ ला त्यांचें अमदाबादला आकस्मिक निधन झालें.

गीताई मंदिराच्या शिलान्यास प्रसंगी ४ नवेंबर १९६४ ला कमलनयनजी होते. बादशाहदखान करकमलाकरवी ते करूं शकले. त्यावेळीं त्यांनीं भाषण हि केलें. बादशाहखान, माताजी, श्रीमन्नारायणजी, विनोबाजी होते.

अनुक्रमणिका

नंतर निर्माणकार्याची सुरवात झाली. हें मंदिर जगांतल्या सर्व मंदिरांहून अगदीं वेगळें च आहे. कमलनयनजींची कल्पनाशक्ति खरोखर अपूर्व होती. कमलनयनजींची अस्थी येथें मुख्य प्रवेशस्थानाजवळ त्यांच्या इच्छेप्रमाणे ठेवली. हेतु त्यांचा हा कीं थोर सज्जनांचे पाय त्याला लागावे.

उद्घाटन होणार म्हणून ६ वाजल्यापासून च लोकांची गर्दी सुरूं झाली. सर्व ग्रामीण व शहरांतील लोक येऊं लागले. लक्ष्मीनारायण मंदिरांतून पालखींत गीताई मिरवत पुष्पवृष्टि करीत आणली गेली.

आदल्या दिवशीं पूर्व प्रात्यक्षिक झालें होतें. आपापल्या शाळा-कॉलेजचे विद्यार्थी, प्राध्यापक पण आपापले अलग झेंडे घेऊन आले होते व ठरलेल्या जागेवर बसले होते, मुलीं हि पुष्कळ होत्या. जवळ जवळ २० हजाराचा हा समुदाय होता. मुलें मुळींच गडबड करीत नव्हते. मोहाडीकर सर्वांना कार्यक्रमासंबंधी सूचना देत होते. महिलाश्रम आणि गांवांतल्या सर्व महिला संस्थांच्या सेविका व्यवस्था पहात होत्या. सरकारी अधिकारी डी. एस. पी. वगैरे पोलिसदलासह हजर होते. कार्यक्रमासंबंधी उत्सुकता वाढत होती. सूर्यप्रकाशांत विनोबाजींचा चेहरा अगदी शुभ्र दिसत होता. सर्व विनोबांना व विनोबा सर्वांना पाहूं शकत होते. पिवळ्या पोषाखातलें जपानी लोक जेव्हां ‘न म्यो हो रें गे क्यो’ हा मंत्र म्हणू लागले तेव्हां सर्वांना फार आश्चर्य वाटलें कारण आश्रमीयांखेरीज कोणीहि हा मंत्र पूर्वी ऐकलेला नव्हता.

यानंतर सर्व मुलांनीं एक आणि सुदंर आवाजांत गीताईचा १२ वा अध्याय पाठ म्हटला. नभोवाणीचे नागपूरचे लोक आले होते. त्यांनीं कार्यक्रमाचें रेकार्डिंग केले. वर्तमानपत्रवाले हि आपले काम करीत होते. गणवेष घातलेलीं ती मुलें व मुलीं जणूं काय फुलांच्या मोठ्या ताटव्याप्रमाणें दिसत होती. पू. विनोबाजींनीं उद्घाटन केलें म्हणजे मंदिराच्या प्रवेशद्वारावरची फुलें बाजूला सारली. ती गीताई माउली या श्लोकावर होती.

रामकृष्ण बजाज यांनीं मंदिराची कल्पना थोडक्यांत सांगितली. मग विनोबा बोलले—कमलनयन—क म्हणजे करूणा, न म्हणजे नम्रता. मग म्हणाले गीताई म्हणजे माझी आई तिनें माझें पोषण केलें. हें २ मिनिटाचें भाषण लोकांना पटलें नाहीं. कांहीं सांगा म्हटल्यावर म्हणाले.—ये बच्चे आयें हैं, बचेंगे अगर माता-पिता-गुरू की आज्ञा पालन करेंगे. मातृदेवो भव! पितृदेवो भव! आचार्यदेवो भव! तेव्हां सर्व मुलांनीं हातवर केले व हालविले. विनोबांनीं हि तसेच केलें. साने गुरूजींचे ‘खरा तो एक चि धर्म । जगाला प्रेम अर्पावे’ हें गीत झालें. नंतर विनोबाजी मोटारींत बसून परत गेले. विद्यार्थी शिस्तीनें दाराबाहेर पडले. एक-दीड तासांत हा मंगल समारंभ पार पडला. कमलनयनजींच्या स्वर्गस्थ आत्म्याला खरोखर धन्यता वाटली असेल यांत शंका नाहीं.

## मृत्यूचें दर्शन (पूज्य बाळकोबाचें स्वर्गगमन)

(२१-९-१९८१)

सकाळीं मी व पूज्य विनोबाजी ४ ला उठलों. पूज्य बाळकोबाजींच्या स्वर्गवासाची बातमी देण्यांत आली. मोठा धक्का बसला. येथले अनेक लोक तात्याजींना ओळखत होते. त्यांचें ब्रह्मसूत्रभाष्य त्यांनी ऐकले होतें. त्यांचा पुन्हां प्रेमळ स्वभाव. त्यामुळें सर्वांना हळहळ वाटली. ही बातमी सर्व भारतांत रेडियोवर व वर्तमानपत्रांतून प्रसिद्ध झाली.

अनुक्रमणिका

तात्याजींची सेवा शुश्रूषा फार झाली. ते ॐ ॐ ॐ म्हणत गेले. गेल्यावर ही तीच भावमयता व मृत्यूचें कोणतें ही चिन्ह दिसलें नाहीं.

येथें ब्र. विद्या-मंदिरांत होशियारीबेन व त्यांचे बंधु यांनीं त्यांच्या अस्थी आणल्या. पूज्य विनोबाजी गंभीर झाले. मग रीतसर रामनामाच्या गजरांत हे प्रभो! या सामूहिक समाधींत आणि गोशाळेंत अस्थी विसर्जन समारंभ झाला.

तात्याजींच्या ब्रह्मसूत्र-विवरणांत दादा धर्माधिकारी हि कधीं कधीं बसत असत.

तात्याजींचा वर्ण गोरा. चेहरा प्रसन्न. लाल बुंद गरुडासारखें नाक. साएटिकामुळें फिरणें नाहीं. बसूनच सर्व आहार विहार. जरा हि आवाज झोपेंत विक्षेप करी. केवळ दूध, फळें गाजर रस हा आहार साधारण चार वेळा. १२ वाजेपर्यंत त्यांचे दूध घेणें चाले.

ब्र. वि. मंदिरांत ६ महिने थंडीचे आणि ६ महिने उन्हाळ्याचे उरळीकांचनला असा त्यांचा क्रम असे.

त्यांची मूर्तीकला, गायनवादन-प्राविण्य, भक्ताची धाव या प्रकरणांत आलीच आहे. उरळीकांचन आश्रमासाठीं आफ्रिकेंत जाऊन व भारतांत ठिकठिकाणीं फिरून तीन लाख रुपये त्यांनीं जमवले. सौराष्ट्रांतून गीर गाई आणल्या.

पूज्य बापूंना ते साबरमतीला आणि अन्यत्र हि 'वैष्णवजन तो' आणि 'हरिने भजतां हजी कोईनी लाज जनी नथी जाणीरे' हीं भजनें इतक्या तल्लीनतेनें ऐकवीत कीं बापूच काय पण ऐकणारे सर्व गद्‌गद् होऊन जात.

पूज्य बाळकोबाजी साबरमतीला असतांना कस्तूरबांच्या स्वयंपाकघरांत पोळ्या लाटण्याचें काम इतक्या सफाईनें करीत कीं बा त्यांच्यावर नेहमी खूष असत.

साबरमती आश्रमांत सर्वांना तात्याजींच्या प्रेमळ स्वभावाचें मोठें आकर्षण होतें. प्रार्थनेंत त्यांचीं भजनें सर्वांना तल्लीन करीत. शिवाय बहुधा संध्याकाळी ते सतार वाजवीत व गात तेव्हां त्यांच्या खोलीबाहेर बसून बा नेहमी त्यांचीं भजनें ऐकत. बा-बापूंचा व इतरांचा हि त्यांच्यावर मोठा लोभ असे. विशेषतः सत्य, ब्रह्मचर्य आणि अहिंसा याविषयीं तात्याजी नेहमी जागरुक असत हें हि बापूंच्या लोभाचें एक मोठें कारण होते. बापूंबरोबर प्रवासांत हि तात्याजी राहिले होते. एकदा दिल्लीला पाऊस फार पडला. तात्याजी बापूंच्या स्थानापासून १ मैल दूर होते. ते वेळेवर प्रार्थनेला गेले नाहींत. दुसऱ्या दिवशी पावसाचे कारण दाखविल्यावर बापू कठोरपणें म्हणाले, 'काय पावसांत आला असतांत तर मेला असतात.' तें ऐकून तात्याजींनीं क्षमा तर मागितलीच पण पुढें ते नेहमी सावध राहिले. एक मिनिट हि त्यांना उशीर खपावयाचा नाहीं. अर्धा चमचा जास्त दूध हि ते परत करीत. पण लगेच वाईट वाटून घेऊं नका हो. माझा स्वभावच असा, पण त्यांत तथ्य आहे, असें म्हणत यामुळें लगेच लोकांना शांती प्राप्त होई. ते दिवसांतून किती वेळा अनेकांना धन्यवाद देत त्याची तर गणतीच नाहीं.

अनुक्रमणिका

तात्याजी एकदम जातील असें कोणालाच वाटलें नव्हतें. खोकल्याचा त्रास त्यांचा वाढत होता. झोप म्हणजे गुंगी वाढत होती. होशियारीबेन काळजी घेत. त्यांना त्यांनीं ब्रह्मसूत्रभाष्य शिकविलें. तात्याजींना ब्रह्मसूत्र हा एकच ग्रंथ जीवनग्रंथ वाटे. त्याशिवाय ते काहींच वाचीत नसत. फक्त वर्तमानपत्रें वाचीत. त्यांत क्रिकेटच्या बातम्या वाचीतच. कारण त्यांना क्रिकेटविषयी फार आवड.

शेवटच्या दिवशी त्यांना थोडा ताप हि होता. शेवटीं सर्वांना पाहिले आणि ॐ ॐ म्हणत क्षणार्धांत ते गेले. त्यांना गंगाजल पाजले. ते प्यायले. सर्व शोकसमुद्रांत बुडाले.

नेहमीप्रमाणें प्रेतयात्रा निघाली. त्यांच्या स्मारकासंबंधीं पूज्य विनोबा म्हणाले– त्यांची खोली आहे तशीच ठेवावी हेंच त्यांचे स्मारक.

तात्याजींनीं बापू, ब्रह्मसूत्र, विनोबाजी, उरळीकांचन यांची जन्मभर उपासना केली. ते कृतकृत्य होते यांत शंका नाहीं.

प्रस्तुत लेखकाला अपार दुःख झालें. त्यांचा जन्मभरचा सहवास, त्यांचे मी केलेलें अनेक अपराध, त्यांची मातृभक्ती, पितृभक्ती, मित्रभक्ती, गायन आणि मूर्तीकलेंतली तल्लीनता त्यांचे गुण कोणकोणते सांगावे? असे वाटतें कीं त्यांच्यासारखे तेच.

ते म्हणत मी मंद बुद्धीचा. पण ती विनोबाजींच्या तुलनेनें...पण ते तर इतके नम्र कीं ते आपणाला सर्वांहून मंद म्हणत.

पण तें खरें नव्हते. याची साक्ष त्यांची गीतातत्वबोध, ब्रह्मसूत्रभाष्य या ग्रंथावरुन सहज होईल.

त्यांचें मानस आंतरस्मारक ब्रह्मसूत्रच म्हणावें लागेल.

त्यांनीं अनेकांना पैशानें व ज्ञानानें उपकृत करून ठेवलें होते. ते-ते लोक त्यांचीं पत्रें व फोटो जवळ ठेवीत असतात. गरीब स्वभावाच्या तात्याजींना गरीबांविषयीं फार कळकळ. धन्य त्यांचें जीवन.

## पू. काकासाहेब कालेलकर

(१९८१)

काका बापूंच्या परिवारांत महान विभूति गणले गेले होते. ते शिक्षक आणि तत्वचिंतक होते. त्यांनीं सर्व जगाचा प्रवास केला होता. काका टागोरांच्या आश्रमांत अनेक वर्षें शिक्षक होते. त्यांच्यावर टागोर बेहद्द खूष होते. मग ते गांधींजींकडे आले. काका अनेकवेळा जेलमधें गेले होते. ते बडोद्याला होते तेव्हां त्यांनीं विनोबांना तारकाविज्ञान शिकविले. साबरमतीला राष्ट्रीय शाळेंत व गुजराथ विद्यापीठांत मुख्य म्हणून त्यांनीं उत्तम काम केलें. काकासाहेबांची गुजराथी पुस्तके सुमारें २५ तरी आहेत. इंग्रजी, हिंदी, गुजराथी तिन्ही भाषांत त्यांचा हातखंडा होता. ते उत्कृष्ट वक्ते होते. त्यांनी बापू जेल मधे गेले तेव्हा नवजीवनचे उत्कृष्ट संपादन केलें. त्यांच्याकडे भेटीदाखल इतके ग्रंथ येत कीं त्याचे एक मोठें प्रचंड पुस्तकालय बनलें. मृत्युवर त्यांनी एक ग्रंथ लिहिला आहे. ते भक्त होते यांत शंका च नाहीं. काकासाहेबांनीं पुरातत्त्व संशोधन

हि केलें ते ९६ वर्षापर्यंत जगले. मरतांना हंसत हंसत गेले. त्यांचे गुण अपार होते. ते गुणग्राहक होते. त्यांचें विस्मरण होणे शक्य च नाहीं. धन्य त्यांचे जीवन. ते खरे आचार्य होते.

## कै. पू. बाळूभाई मेहता ऊर्फ काकाजी

जन्म २८ जुलै १८८१. प्राथमिक शिक्षण धुळें येथें, बाळूभाई एम. ए., एल् एल्. बी., झाले. बाळूभाईंचे अनेक थोर सहाध्यायी होते. त्यांतले हरिभाऊ पाटसकर पुढें मध्यप्रदेशचे गव्हर्नर झाले. अण्णासाहेब पटवर्धन हे बाळूभाईंच्या कुटुंबाचे गुरू होते. बाळूभाईंचें जीवन टिळक-गांधी-विनोबा यांनीं घडविले. १९२० सालीं असहकार चळवळींत बाळूभाईंनीं घर सोडले व ते आश्रमांत आले. त्यांच्या पत्नी मुक्ताबाई अगोदरच गेल्या होत्या त्यामुळें संसारांतून ते पूर्ण मुक्त झाले. पण त्यांनीं वकीली केली नाहीं म्हणून त्यांच्या आप्तइष्टांना फारच वाईट वाटलें. बाळूभाई अनेकवेळा तुरुंगात गेले. खादी कार्यासाठी त्यांनीं भारतभर दौरा काढला होता. कासाऱ्याला विनोबाजीनीं त्यांचा आश्रम काढला. तेथें ते ५ वर्षें राहिले. बाळूभाई भूदानात हि सामील झाले. बाळूभाईंनीं विस्तृत लेखन केलें. खादीमीमांसा, हिंदुधर्माची मूलतत्वें, इत्यादी त्यांची पुस्तकें प्रख्यात आहेत. १९६० साली बाळूभाई ब्रह्मविद्या-मंदिरात दाखल झाले. त्यांच्या वाट्याला आलेले २५ हजार रुपये त्यांनीं धुळ्याला ब्रह्मविद्या प्रसारासाठीं ट्रस्ट म्हणून दिले. त्यांनीं एकंदर २० ग्रंथ लिहिले आहेत. त्यांना स्वच्छतेचा फार नाद. वारंवार हात धुणें इत्यादी इत्यादींमुळें त्यांचे हात हि अधू झाले होते. १९८२ साली त्यांची किडनी फेल झाली, त्यामुळें ते गेले. मृत्युसमयीं त्यांचें वय ९२ वर्षाचे होते. ते केवळ दुधावर रहात. प्रस्तुत लेखकाचा व त्यांचा संबंध धुळ्यापासूनच होता. त्यांना कोटि कोटि वंदन.

## गोहत्त्या-बंदीसाठीं सत्याग्रह

**सर्वोपनिषदो गावो दोग्धा गोपालनंदन :**
**पार्थो वत्स : सुधीर्भोक्ता दुग्धं गीतामृतं महत् ॥**

श्रीकृष्णाच्या वेळेपासून गाईचा महिमा! भारतांत सर्वत्र तिला गोमाता मानीत असत. वेदकाळांपासून गोमातेचा महिमा आणि गोसेवा सर्वत्र चालू होती. अकबराचें हि फर्मान आहे कीं, कोणत्याहि गांवांत आणि शहरांत गोहत्या होईल तर त्याला भयंकर दंड देणे भाग पडेल.

इंग्रजी राज्यांत गोहत्या सुरू झाली. तत्पूर्वी मराठ्यांच्या राज्यांत शिवाजी महाराज आणि सर्व मराठे 'गो-ब्राह्मणप्रतिपालन' हे आपले ब्रीद मानीत असत. लष्करांतलेहि हिंदु-मुसलमान गाईचें मांस खात नसत. लष्करांत वाटण्यांत येणाऱ्या काडतुसांना गाईची व डुकराची चरबी लावलेली आहे या बातमीवरून १८५७ साली लष्करांत इंग्रजांविरुद्ध बंड झालें.

१९४७ सालीं महात्मा गांधींच्या रचनात्मक कार्यक्रमामुळें आणि सत्याग्रहामुळें भारताला स्वराज्य मिळालें आणि घटनेच्या ४८ व्या कलमांत गोवंशजातीचें संरक्षण केले जाईल असें म्हटलें गेलें. तत्पूर्वी लोकमान्य टिळकांनीं तर स्वराज्य मिळाल्याबरोबर लेखणीच्या एका फटकाऱ्याने गोवंश-हत्या बंद होईल असें म्हटलें होतें. जमनालालजींनीं गोसेवेलाच आपले जीवन वाहिलें. गोसेवा परिषदेंत बापू, विनोबाजी व

अनुक्रमणिका

चवंडे बोवा होते. 'गोसेवा संघ' ही संस्था भारतीय पातळीवर स्थापन झाली. स्वामी आनंद सेक्रेटरी बनले. पण सरकारनें गोरक्षणाकडे लक्ष दिले नाहीं.

१९७६ सालीं पूज्य विनोबाजींच्या मातेची जन्मशताब्दि होती. ती नेहमी सांगे, 'तुळशीला पाणी घाला, गोमातेला खाऊं घाला'. त्यावेळीं म्हणजे १८७६ सालीं देशांत आणिबाणि चालूं होती. गाईच्या बचावासाठीं विनोबांनीं गोहत्या-बंदीसाठीं आमरण उपवास आपल्या जन्मदिनापासून करण्याचें जाहिर केले. परिणामीं पश्चिम बंगाल आणि केरळ या राज्यांखेरीज इतरत्र गोहत्याबंदी करण्याचें सरकारनें कबूल केले आणि गोहत्यादीचेही दोन राज्यें वगळतां—इतरत्र कायदे केले. विनोबांचा प्राणांतिक उपवास टळला.

पुढें आणिबाणिमध्येंच निवडणुका होऊन जनता पक्षाचें सरकार केंद्रस्थानीं आलें. प. बंगाल आणि केरळमध्यें त्यावेळीं कम्युनिस्ट राज्य सरकारें होतीं. विशेषतः पंजाब, हरियाणा, राजस्थान, बिहार आणि आसाममधून गाई, बैलांच्या वॅगन्स आणि ट्रक्स भरून व्यापारी लोक कलकत्त्याला पाठवीत होते आणि करोडो रुपये कमावीत होते. त्यामुळे इतर राज्यातील गोहत्या-बंदीला कांहींच अर्थ राहिला नव्हता. म्हणून पुन्हां १ जानेवारी १९७९ पासून गोहत्या-बंदीसाठी पुनश्च उपवास करण्याची घोषणा विनोबांनी केली.

त्यावेळचे भारताचे पंतप्रधान श्री. मोरारजी देसाई ३० डिसेंबर १९७८ रोजीं विनोबांना भेटायला आले. त्यांच्या सूचनेनुसार केरळ आणि पं. बंगाल सरकारचे प्रतिनिधिहि वाटाघाटी करायला आले. सरकारला विचार करायला अवधी मिळावा म्हणून विनोबांनी एप्रिलपर्यंतची मुदत दिली आणि अखेर २२ एप्रिल १९७९ रोजीं त्यांनी उपवास सुरू केला. परिणामी २६ एप्रिल रोजीं दुपारीं ३॥ वाजतां लोकसभेमध्यें सरकारनें गोहत्या-बंदीचा ठराव करून त्याला काँकरंट लिस्टमध्यें घेतले आणि त्या गोष्टीला सर्व पक्षांनी पाठिंबा दिला. त्यामुळें विनोबांनीं दादा धर्माधिकारी यांच्या हस्ते मध-पाणी घेऊन उपवासाची समाप्ति केली. तत्पूर्वी प्रार्थना झाली.

पुन्हां सरकार बदललें तरी गोहत्या-बंदीचा प्रश्न तसाच कायम राहिला. म्हणून विनोबांनीं संपूर्ण गोवंशहत्या-बंदीची, म्हणजे कोणत्या हि वयाच्या गाईची आणि बैलाची कत्तल होऊ नये आणि त्यासाठीं शांति-सैनिकांनीं काम करावें, तसेच सरकारने कायदा बनवावा असा आदेश दिला. त्यांच्या आदेशाप्रमाणें ११ जानेवारी १९८२ पासून शांति सेनेचे सेनापति श्री. अच्युतभाई देशपांडे यांच्या नेतृत्वाखालीं मुंबईमध्यें देवनारच्या कत्तलखान्यासमोर रोज सत्याग्रह चालू असतो. आणखी अनेक ठिकाणी अशा प्रकारचें सत्याग्रह चालू आहेत. गुजरात, बिहार अशा कांहीं सरकारांनीं आपल्या राज्यांतून पशुधन दुसऱ्या राज्यांत जाऊं नये असें कायदे केले आहेत. गोहत्या-बंदीचा एवढा मोठा सत्याग्रह चालू असून त्यांत कुठे हि कुणा हि कार्यकर्त्यानें हिंसेचा अवलंब केलेला नाहीं, हे विशेष आहे.

## पवनार आश्रमांत

ती २० डिसेंबर १९८१ ची रात्र होती. मला पंजाबमधें पठाणकोट येथील आश्रमांत जावयाचे होते. तेथून मैत्री आश्रम, आसाम, नंतर काशी, इंदौरला विसर्जन आश्रम, नंतर बंगलोर असा कार्यक्रम ठरला होता. त्याप्रमाणें मी, शैलबेन, रामभाऊ निघालो होतो. रात्रि ९ वाजतां सुनामहून लुधियानाला आम्ही निघालो. पठाणकोटची गाडी पकडावयाची होती. मी व शैलबेन ड्रायव्हरच्या बाजुला समोर बसलो. प्यारेलालजी आणि रामभाऊ मागे. रात्रि १०॥ च्या सुमाराला आम्हा सर्वांना थोडीशी झापड आली.

इतक्यात एकदम मोठा धक्का बसला आणि समोरून एक ट्रक आमच्या मोटारीत घुसला. मी पुढें असल्यामुळे माझ्या डाव्या पायाची मांडीपासूनची तीन हाडें तुटली. शैलबेनला हि लागले पण त्या झट्कन बाहेर पडल्या व त्यांनी आम्हाला ओढून जवळच्या रस्त्याच्या कडेला बाहेर काढले. त्यानंतर मी व इतर सर्व बेशुद्ध पडलो. शैलबेन नी येणाऱ्या मोटारी थांबवून आम्हाला लुधियानाच्या हॉस्पीटलमधे दाखल केले. त्यांच्यामुळेच आम्ही वाचलो. नंतर माझे व इतरांचे ऑपरेशन करण्यात आले. मला स्वतंत्र वॉर्डमधे ठेवण्यात आले. ही बातमी चोहीकडे पसरली. अनेक लोक भेटीला येऊ लागले. पाय ऊंच करून ठेवला होता. अनेक औषधें, इंजेक्शनें आणि पडल्या पडल्याच सर्व व्यवहार, झोंप नाहीं. डॉक्टर, नर्स, शैलबेन, यांनी सेवेची कमाल केली. दोन महिने हॉस्पीटलमधे होतो. रोज ख्रिस्ति महिला येऊन प्रार्थना करीत. रामभाऊ, प्यारेलाल, ड्रायव्हर हे दुरुस्त झाले. मला दोन महिने दुरुस्त व्हायला लागले. या काळांत अनेकांच्या भेटी-गाठी आणि अनेकांची तारा, पत्रें आली. ग्लुकोज सलाईन दिले गेले. अशक्तता इतकी होती की चार फुट धरून चालविले की मूर्च्छा येत होती. चालण्याला कुबडी देण्यात आली. एक पाय टेकायचाच नव्हता. शेवटी हॉस्पीटलमधून सुट्टी मिळाली आणि जालांजींकडे दिल्लीला गेलो. स्ट्रेचरवरून आगगाडी आणि आगगाडीतून पुढील प्रवास दिल्लीला सात दिवस अतिशय आनंदांत गेले. तेथून पवनारला फेब्रुवारीमधें आलो. आल्याबरोबर स्ट्रेचरवरून पूज्य विनोबाजींकडे नेण्यात आले. त्यांनी 'ठीक होईल' म्हणून डोक्यावर हात ठेवून आशीर्वाद दिला. दिवसांमागून दिवस गेले. रोज कुबडी घेऊन विनोबांकडे नेले जात असे. त्यांचा आशीर्वाद रोज मिळत असे. पुढे सेवाग्राम हॉस्पीटलमधे एक्स-रे काढण्यासाठी गेलो. तेथे डॉ. बेलसरेंनी सांगितले की आतां चालण्याला हरकत नाही. डावा पाय आखूड झाला होता. तशा तऱ्हेचे जोडे तयार करून घेतले आणि दोघा भगिनींच्या साह्यानी चालू लागलो. थोडे-थोडे वाचन, लेखन हि सुरू केले. रोज सकाळी व दुपारी पूज्य विनोबाजीकडे जाऊन आशीर्वाद घेत असे. तेव्हां त्यांची प्रकृति चांगली होती. तरी कुसुमताई, बाळभाई किंवा जयभाई हाथ धरून त्यांना चालवीत असत. अशी दोन वर्षे गेली. हळूंहळूं पूज्य विनोबाजी अशक्त होत गेले. उत्तरोत्तर अंतर्मुख होत गेले. कोणाला हि फारशी उत्तरे देत नसत.

११ सप्टेंबर १९८१ या रोजीं त्यांचा ८६ वा वाढदिवस होता. दोन हजार लोक जमले होते. त्यांना एक लाखाची सूतांजलि देण्यात आली. एक वर्ष लोटले. १९८२ च्या ११ सप्टेंबरला पूज्य विनोबाजींना ८८ वें वर्ष लागले. हजारों लोक जमले. विष्णुसहस्त्रनाम झाले. शाळांतील मुले हि हजारोंनी आली होती. प्रार्थना आणि दादा धर्माधिकारी यांचें समयोचित भाषण झाले. काशिनाथ त्रिवेदीकृत जयप्रकाश नारायण यांच्या चरित्राच्या अनुवाद ग्रंथाचे उद्घाटन केले. पूज्य विनोबाजींनी ग्रंथ डोक्यावर ठेवला, उन्हांकडे हात केला आणि जयप्रकाश, जयप्रकाश असें म्हणाले. मी चार शब्द बोललो. सर्वांना जातांना प्रसाद वाटण्यात आला.

पूज्य विनोबाजी दर दिवशी माझ्या डोक्यावर हात ठेऊन आशीर्वाद देत असत. रविवार असला कीं म्हणायचे, 'मोहमोचन', सोमवारी— 'सौम्यतमोभव, सोमरसं पिब', मंगळवारी— "मंगलयतन विष्णुः । मंगलं गरुडध्वजः

मंगलं पुंडरीकाक्षो । मंगलायतनं हरिः"

बुधवारी—'बुद्धि दे रघुनायका', 'बुद्धं शरणं गच्छामि महावीरं च' । गुरुवारी—'गुरुर्ब्रह्मा गुरुर्विष्णुः गुरुर्देवो महेश्वरः । गुरुं साक्षात परब्रह्म तस्मै श्रीगुरवे नमः' । शुक्रवारी—'शुचिर्भूतो भव' । शनिवारी—'शनैः शनैः अग्रे गच्छ, मारुती' । बोलणे मात्र अस्पष्ट झाले होते.

अनुक्रमणिका

## महापरिनिर्वाण

नोव्हेंबर १९८२ ची चौथी तारीख! सकाळीं साडेसहा वाजतां विनोबा कुटीबाहेर येऊं लागले. दररोज सकाळीं या वेळीं ते अंगणांतील मूर्तींना नमस्कार करण्यास बाहेर येत. इतर मंडळी हि विनोबांना नमस्कार करीत, हास्य विनोद होई. मी हि या आनंदांत सामील असें. आज तसे बाहेर येत होते. नित्याप्रमाणें जयभाई आणि कुसुमताईंनीं त्यांचे हात धरले होते च. पण पायरी उतरून विनोबा चटकन् जवळच्या बेंचवर च बसले. त्यांना चालवेना. मी जवळ च उभा होतों. जयभाईंना मी यासंबंधी विचारलें असतां ते म्हणाले, “अशक्तता दिवसेंदिवस वाढत आहे”. बाकावर बसून च विनोबांनीं सर्वांचे नमस्कार स्वीकार केले. ते मात्र मूर्तीजवळ जाऊं शकले नाहींत. परंतु रोजच्या प्रमाणें त्यांनीं हास्य-विनोद केला. वातावरण कसें प्रसन्न होतें! पुनः दुपारी विनोबांनीं बाहेर येण्याचा प्रयत्न केला पण तेव्हां हि ते चालूं शकले नव्हते, बेचैनी दिसली. ताप पाहिला, तो १००·८ डिग्री होता. वर्धेहून डॉ. माऊस्कर आले. ते त्या दिवशीपासून सतत विनोबांजवळ सेवेसाठी राहिले. दुपारी सेवाग्रामचे डॉ. त्रिवेदी आणि डॉ. जाजू आले. त्यांनीं तपासले. साधारण तापांत, विशेष त्रास नसल्यास विनोबा औषध घेत नसत. आजही औषध घेतलें नाहीं.

मला कळलें कीं रात्रीं त्यांना स्वस्थ झोप नव्हती.

तारीख ५-११-८२. विनोबाजीं ची प्रकृती अतिशय बिघडली. डॉ. त्रिवेदी, डॉ. जाजू आले. औषध दिले. माऊस्करजी येथें च होते. सकाळपासून आहार फारच कमी घेतला. अशक्तता वाढत होती. तरीही पूर्ण प्रसन्नता होती, हास्यविनोद चालू च होता.

रात्रीं मी नित्याप्रमाणें झोपलों. साडेआठच्या सुमारास एका भगिनीनें सांगितले “बाबांची तब्येत चांगली नाहीं. हात, पाय थंड आहेत, शरीरांत कंपन आहे, नाडी हि खूप वेगांत चालू आहे”. मी त्यांच्या खोलींत गेलों तेवढ्यांत सेवाग्रामचे डॉक्टर पोहोंचले होते. ग्लुकोजची सलाईन, ऑक्सीजन देण्यात आले. वर्धेचे सिव्हीलसर्जन, नागपूरचे हृदयरोगतज्ञ येऊन पोहचले. विनोबांना हार्टअटॅक आला होता!

तारीख ६-११-८२. सकाळीं विनोबांच्या खोलींत गेलों. रात्रीं च्या एवढ्या त्रासाचें चिन्ह हि त्यांच्या मुद्रेवर नव्हतें. अत्यंत शांत, प्रसन्न मुद्रा! जवळ येणाऱ्यांशीं हंसून बोलत होते, हंसवत हि होते. लोडाला टेकून मधून मधून बसूं पाहत होते. अशक्ततेमुळें जास्त वेळ पडून होते. ऑक्सीजन देणें सकाळीं बंद केलें.

मुंबईहून जसलोकचे प्रसिद्ध हृदयतज्ञ डॉ. अश्विन मेहता आपल्या साथीसह आले. सर्व डॉक्टरांनीं मिळून सांगितले. अजून २/३ दिवस तरी धोका टळला असे म्हणतां येणार नाही.

तारीख ७-११-८२. डॉक्टरांनीं विनोबांच्या तब्येतीविषयी समाधान व्यक्त केलें. हृदयाची गति, रक्तदाब, नाडी, सर्व नॉर्मल होतें. आहारांत पाणी, दूध, मध घेतलें.

डॉक्टरांनीं म्हटलें, “बाबांचें शरीर उपचाराला सहयोग देत आहे. सुधारणा निश्चित आहे.”

अनुक्रमणिका

रेडियो, वर्तमानपत्रांतील बाबांच्या तब्येतीची माहिती ऐकून, वाचून अनेक लोक येऊं लागले. गर्दी वाढत गेली. दादा धर्माधिकारी सायंकाळीं बाबां च्या खोलीत गेले तेव्हां विनोबांनीं क्षीण आवाजात पण प्रसन्नतेने "आगम्यताम् सुखमास्यताम्" म्हटलें. नंतर गीताईचे, गीते चे श्लोक हि गुणगुणत होते. जो कुणी समोर येई त्याचे नांव घेऊन कांहीतरी कोटी करीत.

दुपारीं ग्लुकोज ची नळी काढण्याची इच्छा त्यांनीं व्यक्त केली. पण डॉक्टरांनीं याची आवश्यकता आहे असे सांगितलें तेव्हां ऋग्वेदांतील मंत्र 'तनूरेव तन्वो अस्तु भेषजम्' (शरीर च शरीराचें औषध आहे) गुणगुणले.

तारीख ८-११-८२. सकाळीं कुसुमताईंनीं बोलावल्यावरून बाबांच्या खोलींत गेलों. तेथें पेणचे चुलतभाऊ श्री. रघुनाथ भावे आणि त्यांच्या पत्नी सौ. इंदिरा भावे बसले होते. जो कुणी नमस्कार करी त्याच्या पाठीवर विनोबांचा हात फिरे.

विनोबा किती प्रसन्न, शांत! दिवसभर आहारांत ४५ तोळे दूध, ८ तोळे छेना, १० तोळे मध घेतले असे कळले. ऐकून संतोष वाटला.

इकडे आश्रम माणसांनी भरून गेला. दुरदूरून लोक येत होते. जवळपासच्या गांवांतून हि लोकांची रीघ लागली होती.

तारीख ९-११-१९८२ सकाळीं कुसुमताईनीं सांगितलें, "रात्रींपासून विनोबा औषध, पाणी, आहार कांहींच घेत नाहींत." मी दादा धर्माधिकारींसह बाबांच्या खोलीत गेलो. वातावरण गंभीर होते. आम्ही बाबांना निदान पाणी तरी घ्यावे अशी विनंती केली, प्रेमाग्रह केला. पण उपयोग झाला नाही. सर्वांनाच चिंता वाटूं लागली.

डॉक्टरांनीं बुलेटिन प्रसिद्ध केलें. त्यांत लिहिलें होतें, "आचार्यांच्या तब्येतींत निश्चितच संतोषजनक प्रगति होत होती. ते संपूर्णतया स्वस्थ, नॉर्मल होण्याची शक्यता हि होती. परंतु आजपासून त्यांनीं आहार-औषध-पाणी न घेण्याचा निर्णय घेतल्यामुळें त्यांच्या तब्येतीला आतां गंभीर धोका निर्माण झाला आहे."

आश्रमाच्या वातावरणांत कालपर्यंत जी प्रसन्नता होती ती आज नव्हती. एक प्रकारची हुरहुर होती. तरीहि विनोबांच्या भूमिके शी एकरूप होण्याचा प्रयत्न हि होता.

अच्युतभाईंना त्यांनीं बोलावले. बहुधा सकाळी ९॥ चा सुमार असावा, बाबा लोडाला टेकून बसले होते. मुद्रा प्रसन्न, गंभीर! अच्युतभाई येऊन उभे झाले. कांहीं वेळ स्तब्धता होती. थोड्या वेळा ने विनोबा अच्युतभाईंना म्हणाले, "अब बाबा बहुत थक गया है (आता बाबा फारच थकून गेला आहे)!" कांहीं वेळ पुनः गंभीर स्तब्धता! मग हळूच म्हणाले, "मरण्यापूर्वीच इतके लोक गोळा झाले आहेत. मेल्यानंतर किती होतील?" आणि त्यांच्या चेहऱ्यावर स्मित होते.

तारीख १०-११-१९८२. विनोबांची तब्येत बरी होती. नित्याप्रमाणे हास्य-विनोद चालू होता.

अनुक्रमणिका

डॉक्टरांची इच्छा इंजक्शन ने ग्लुकोज देण्याची होती. पण विनोबांनी हातानेच 'नाही' म्हटले. डॉक्टरांशी चर्चा करून मी त्यांना लिहून दिले, "रोगावस्थेंत जायचें नाहीं, हें ठीक आहे. परंतु पाणी देखील न घेण्यानें मूर्च्छा येईल, रक्तांत मूत्र मिसळूं लागेल आणि रोग बळावेल." विनोबांनीं चिठ्ठी वाचली आणि हातानें 'नाहीं' चा संकेत केला. मी दुसरी चिठ्ठी दिली, "डॉक्टर विचारत आहेत, या स्थितींत आपण बेशुद्ध होण्याची शक्यता आहे. तेव्हां आपण मूर्च्छित झाल्यावर जर डॉक्टर कांहीं उपचार करतील तर तो आपण स्वीकाराल काय?" कांही क्षण मौन राहून नंतर अत्यंत क्षीण आवाजांत म्हणाले, 'मेल्यानंतर स्वीकार होईल.'

दुपारी १२ च्या सुमारास महाराष्ट्राचे मुख्य-मंत्री आणि इतर कांहीं मंत्री आले. श्रीमती इंदिरा गांधी साडेबाराच्या सुमारास आल्या. त्यांचे सोबत राजीव गांधी, वसंतराव साठे, सीताराम केसरी होते. इंदिराजींनी बाबांना "पाणी नाहींतर फळांचा थोडा रस घ्यावा" असें म्हटलें. विनोबांनीं हातानेंच नकार दर्शवला आणि ते इंदिराजींना म्हणाले, "रात्री झोपतांना 'राम हरि, राम हरि' चें स्मरण करावें." स्वतः नाकाला हात लावून दीर्घ स्वास, उछ्वास करून दाखवला– "स्वास आंत घेतांना राम, बाहेर सोडतांना हरि!" इंदिराजींनी जवळ जाऊन नमस्कार करीत म्हटलें, "होय बाबा! तसेच करीन."

तारीख ११-११-१९८२. एकादशीचा दिवस. उपवासाचा तिसरा दिवस. रात्रंदिवस विष्णुसहस्रनाम, तुलसीरामायण आणि गीताई यांची अखंड पारायणे चालू होती. सकाळीं १०॥ च्या पाठानंतर बाबा-कुटीत गेले. विनोबांच्या कपाळावर आणि पोटावर थंड पाण्याच्या पट्ट्या ठेवल्या जात होत्या. कानांत दुखत होते. संकेताने सांगत होते.

अमरावतीच्या 'तपोवन कुष्ठधाम' चें डॉ. शिवाजीराव पटवर्धन आले. ते म्हणाले, 'बाबांच्या चेहऱ्यावर थकावट दिसत नाही. तब्येत इतकी बिघडली असून हि चेहऱ्यावर किती तेज आहे!' दुपारी श्री. चंद्रशेखर आले. गागोद्याहून हि तेरा मंडळी आली. सायंकाळीं कॉ. श्रीपद अमृत डांगें यांच्या कन्या आणि जावई सोबत आले होते. सर्वांना बाबा ओळखत होते.

रक्तदाब वाढल्यामुळें डॉक्टरांनी चिंता व्यक्त केली. तरी हि प्रकृति जितकी ढासळेल असे वाटले होते, तितकी ती ढासळली नव्हती. संपूर्ण आश्रम रात्रभर जागा होता.

तारीख १२-११-१९८२. सकाळीं ७ वाजतां डॉक्टरांनीं बुलेटिन प्रसिद्ध केलें, "गेल्या दहा तासांत विनोबाजींची प्रकृति खालावली नाहीं. ८० तासांपासून कुठला हि आहार, पाणी अथवा औषध त्यांनीं घेतलेलें नाहीं. लघवीचें प्रमाण थोडे कमी होत आहे, या खेरीज प्रकृति खालवल्याचें दुसरे चिन्ह नाही. आज सकाळीं ते अधिकच जागृत दिसत आहेत."

विनोबा दोन्हीं कान हातानी दाबत होते. कान दुखतो का, विचारल्यावर मानेनें होकार दर्शविला. ग्लिसरिन आणि औषध घालून डॉक्टरांनीं कान साफ केला. लघवीची मात्रा कालच्यापेक्षां थोडी अधिक होती. पायावरची सूज हि गेली होती. डॉ. ना अपेक्षित परिणाम आढळत नव्हता. १९७९ मध्यें विनोबांनीं गोहत्या-बंदीसाठीं पांच दिवस उपवास केला होता तेव्हां दुसरेच दिवशीं लघवींत 'ॲसिटोन' आढळला होता. परंतु यावेळीं कांहींच नाहीं. डॉक्टर आश्चर्य व्यक्त करीत होते. अशक्तता वाढली असली तरी हृदय, नाडी, रक्तदाब सर्वच नॉर्मल होते.

अनुक्रमणिका

तारीख १३-११-१९८२. विनोबांचीं तब्येत बरी आहे. झोप नीट लागली. आश्रमाच्या कांहीं भगिनींनीं पाणी घेण्याची विनंती केली. विनोबांनीं हातानेंच नकार दर्शविला.

सर्व स्तरांतील लोकांचे येणे-जाणे चालू होते.

तारीख १४-११-१९८२. डॉक्टरांचे बुलेटिन होते. 'निर्जल, निराहाराचा विनोबाजींचा सहावा दिवस आहे. त्यांची तब्येत थोडी खालावली आहे. रात्री अस्वस्थता होती. झोप नीट नव्हती. स्वास आणि हृदयगति वाढली आहे. लघवीचें प्रमाण कमी झालें असून ते चिंताजनक आहे. थकवा व अशक्तता असून हि विनोबा पूर्ण जागृत आहेत. त्यांचा चेहरा आध्यात्मिक तेजाने चमकत आहे.'

सायंकाळीं डॉ. सुशीला नायर ने पाणी पिण्याचा आग्रह केला. विनोबांचा नकार होता. पिलानीचे डॉ. अमरजीत सिंग सद्‌गदित होऊन बाबांच्या खोलीत आलेत. बाबांनी त्यांना संकेतांनी जवळ बोलाविले आणि हळूं हळूं जपुजी साहेबचा पहिला श्लोक म्हणूं लागले. 'एक ओंकार सतनाम । करता पुरुख'........ अमरजितसिंग ओक्साबोक्शी रडूं लागले.

सायंकाळपासून नाडी कमजोर होऊं लागली. डॉक्टरांच्या मते आतां धोका निर्माण झाला असून कांहीं तासांचाच खेळ उरला होता. मी रात्री १ ते सकाळीं ६॥ पर्यंत विनोबाजवळ बसून होतो. पहाटें ४ वाजेपर्यंत विनोबांची नाडी, रक्तदाब, नॉर्मल होऊं लागला होता. सुरवातीला जो धोका वाटत होता तो अजिबात राहिला नव्हता. डॉ. नी मधून मधून तपासणे बंद केले. विनोबांची स्थिति डॉक्टरांना आश्चर्यात टाकत होती.

तारीख १५-११-१९८२. सकाळी ७ वा. मी बाबाकुटीत गेलो. विनोबांच्या खोलीला लागून असलेल्या खोलीत बसलो. मला कळले पहाटे ४ वा. विनोबांनी उठून बसण्याची इच्छा व्यक्त केली. तसे त्यांना बसवण्यांत आले. परंतु खूप थकवा आला. पुनः निजवले. काल रात्रीच ऋता नांवाची फ्रेंच कन्या आली होती. ती सकाळी भेटली तेव्हां तिला विनोबांनी ओळखले. ऋता ने हि विनोबांना पाणी घेण्याचा आग्रह केला. विनोबा स्मित करीत तिला खुणावत होते, "तूंच पाणी घे" आणि त्यांच्या खाटे समोर खोलींतवर लिहिलेली अक्षरें 'राम हरि' तिला दाखवीत होते.

सकाळी ७ च्या सुमारास डॉक्टरांचें बुलेटिन निघालें, "निर्जल निराहाराचा सातवा दिवस. विनोबाजींची तब्येत ढासळळी आहे. रात्रभर त्यांना झोप नव्हती. अस्वस्थता आहे. एकूण स्थिति गंभीर आहे, चिंताजनक आहे. इतके असून हि विनोबाजी पूर्ण जागृत असून प्रसन्न दिसत आहेत."

इतक्या दिवसांत बाबांचा पायाचा ठेका चालूच राहिला, 'राम हरि, राम हरि'. आजहि तो चालू होता. सकाळीं त्यांना स्पंज केले गेले. कपडे बदलवले. या संपूर्ण क्रियेंत ते सचेत होते.

नंतर त्यांना पाठीवर झोपवले. दोन्ही हात छातीवर होते. चेहऱ्यावर पूर्ण शांति. श्वासोछ्श्वास चालू होता, आणि पावलांचे ताल देणे चालू होते. सकाळी नऊ पासून हळूं हळूं श्वासाची गति मंद होऊ लागली. पण त्याची लय (रिदम्) कायम होती. ठीक ९·३० वाजतां अगदीं सहजगत्या श्वास बंद झाला. विनोबांनी देह सोडला!

अनुक्रमणिका

विनोबां चें ब्रह्मनिर्वाण झाले!

सर्वत्र बातमी गेली. आश्रम परिसर फुलून गेला होता. 'रामनाम' अखंड ऐकू येत होते. आजूबाजूच्या गांवचे लोक दिंड्या घेऊन येत होते.

विनोबांचा देह कुटीबाहेर बर्फाच्या लादीवर ठेवला गेला. त्यावर फुले वाहिली जाऊं लागली.

तारीख १६-११-१९८२. सारी रात्र लोकांची रीघ लागली होती. विनोबांचें दर्शन घेत, नमस्कार करून ते पुढें जात आणि जेथें अखंड पारायण चालूं होतें तेथें बसत.

सकाळीं १० च्या सुमारास विनोबांचा देह एका मोठ्या सुंदर फुलांनीं सजवलेल्या पालखींतून भरतराम मंदिरांत आणला. अग्निसंस्काराचें स्थान नक्की झालें होतें.

मी खूर्चीवर बसलों होतों. मंदिरात व बाहेर अफाट गर्दी होती. धाम नदीच्या पात्रांत असंख्य लोक बसले होते. विष्णुसहस्रनामापूर्वी भजनें झालीं. दिंड्या आल्या एकसारखी पुष्पवृष्टी होत होती. त्याचवेळीं पंतप्रधान इंदिराजी पण आल्या. मी ऊठून दहनस्थानाजवळ गेलो. दहनस्थानीं साधी बाभळीचीं लाकडें रचली होती. ईशावास्य, ऋग्वेद मंत्र म्हटले गेले. अनेक वर्षे विनोबाजीसोबत आश्रमांत राहिलेल्या जेष्ठ भगिनी महादेवीताईंनीं अग्नि दिला.

तारीख १८-११-१९८२ ला सकाळीं ८ वाजतां दहनस्थानाकडे गेलो. तेथें अनेकांनीं सर्व राख व अस्थी अनेक घड्यांत भरल्या. बाबाकुटीबाहेर भजनें सुरूं झाली. सकाळीं १०·३० ला विष्णुसहस्रनाम झाले आणि त्यानंतर पूज्य विनोबा नेहमी झोपत असत त्या ठिकाणी अस्थी विसर्जित झाल्या.

यापुढें विचाराचा प्रश्न असा कीं ते मुक्त झाले का? जर ते जिवंत असतांना ब्राह्मी स्थितीला प्राप्त झाले होते असे अनेक मानीत होते तर उघड च ते गीतेच्या वचनाप्रमाणें ब्रह्मनिर्वाणाला प्राप्त झालें हें स्पष्ट आहे. ब्रह्मनिर्वाण म्हणजे काय तर सर्वत्र विलीन होऊन जाणें. महापुरुष जिवंत असतांना जें कार्य करतो तें मृत्यूनंतर अनंत पटीनें अधिक करूं शकतो असें त्यांचें च म्हणणें होते. बुद्ध, महावीर, शंकराचार्य, ज्ञानेश्वर इत्यादि संतांच्या उदाहरणावरून ही गोष्ट मान्य होण्याला हरकत दिसत नाही.

पण कदाचित त्यांना पुन्हां जन्म हि घ्यावा लागणार नाहीं कशावरून असें हि कित्येकांच्या मनांत येतें. आणि तसा जन्म झाला तर तो आपल्याला लाभदायक च होईल असें हि कित्येक मानतात. तसेच पू. विनोबाजी एकदां अगदीं लहानपणीं आईच्याबरोबर एके ठिकाणी जात असतांना आईला म्हणाले, आई आपण ज्या घरीं जाणार तें मी हि पाहिलेंलें नाहीं व तूं हि पाहिलेलें नाहींस पण मी सांगतो तें असें असे आहे. तेथें विहीर आहे, तेथे अशा खोल्या आहेत. इ. इ. इ. आणि तें तसेंच निघालें तेव्हां आई म्हणाली हा पूर्वजन्मींचा योगायोग आहे. तेव्हां हा सरळ पूर्वजन्माचा पुरावा नाहीं काय असें सहज वाटेल. शिवाय अनेक लोकांनीं आपला पूर्वजन्म सांगून तेथें जाऊन तेथल्या मंडळींना भेटून चकित केलें आहे असें हि दाखले आहेत. पण मुसलमान-क्रिश्चन पुनर्जन्म मानीत नाहींत. ते कयामतचा दिवस, डे ऑफ जजमेंट मानतात. आणि त्या परीक्षेच्या दिवशीं सगळ्यांचा परमेश्वरापुढें जाबजबाब होऊन ज्याला त्याला त्याच्या पापपुण्याप्रमाणें स्वर्ग-नरक मिळतो. प्रत्येक जण थडग्यांतून उठून ईश्वराच्या दरबारांत हजर होतो. तर

अनुक्रमणिका

स्वर्ग-नरक हें काय आहे? खरें आहे? असें हि विचारलें जातें. हिंदु लोक हि स्वर्ग नर्क मानतात. ब्रह्मलोक हि मानतात. तर हें सर्व खरें का? मोठा गूढ प्रश्न आहे? जर असे लोक असतील तर ते दिसले पाहिजेत. भौतिकशास्त्रज्ञांच्या कक्षेंत ते आले पाहिजेत असें म्हटलें जातें. याच्या उलट असें हि म्हटलें जाते कीं शंकराचार्य-ज्ञानेश्वर यांनीं अल्पवयांत एवढें ज्ञान कसें मिळविले. पूर्वजन्माच्या आधाराशिवाय हें कसें शक्य आहे? शिवाय शंकराचार्य-ज्ञानेश्वर सोडले तरी सामान्य घरातले सर्व च सारखे असत नाहींत, त्यांच्यांत जमीन-अस्मानाचें अंतर दिसतें. असे प्रश्न विचारले जातात? बुद्धांच्या पूर्वजन्मातल्या जातककथा काय खोट्या? असे अनेक प्रश्न आणि तर्क-वितर्क ऐकण्यांत येतात. जर कयामतच्या दिवशीं म्हणजे डे ऑफ जजमेंटच्या दिवशीं सृष्टीचा अंत होतो तर सृष्टीची सुरवात कोठून? भौतिकशास्त्रज्ञ तर म्हणतात कीं, ‘पूर्वी पृथ्वीवर जीवच नव्हते. विकासवादानें हळूंहळूं प्राणी बनत गेले’ हा डॉर्विनचा सिद्धांत आहे. बरें मनुष्यप्राण्याचा किंवा अनेक जीवांचा जन्म होतो तो पृथ्वीवर च कशावरून? हजारो अतिदूर गोलावर वस्ती असेल हि. तेथें त्यांचा जन्म कां होऊ नये? सप्तपाताळ, सप्तलोक इत्यादि वर्णनें खरी मानावयांची काय? असे अनेक प्रश्न विचारले जातात. यमलोक, यमराजा खरोखर आहे काय? या प्रश्नांना काय उत्तर देणार? कित्येक तर असें म्हणतात कीं एखाद्या कुळांत महापुरुष उत्पन्न झाला म्हणजे त्या कुळांत पुन्हां तसा महापुरुष उत्पन्न होत नाहीं. रवींद्रनाथ टागोर, टिळक, गांधी कोठें पुन्हां अवतरले? बरें, मेल्यानंतर लगेच पुनर्जन्म होतो कां, कांहीं काळ जातो? तो काळ किती? गीतेच्या सहाव्या अध्यायांत श्रीकृष्ण भगवान म्हणतात योगी अपूर्ण साधनेनें मेला म्हणजे तो आपली साधना पूर्ण करण्यासाठी पुढे यत्न करतो.

**योगी तत्पर राहूनि दोष जाळित जाळित**
**अनेक जन्मीं संपूर्ण होउनी मोक्ष गांठतो**

हें खरें काय? अवतार म्हणजे काय? का मोठा पुरुष झाला म्हणजे मागून त्याला अवतार म्हणतात? अतृप्त वासनेंनें भूतप्रेत, डाकीण, जखीण वगैरे होत असतात हें खरें काय? या प्रश्नांना काय उत्तर देणार? जो तो आपापल्या कल्पनेप्रमाणें, श्रद्धेप्रमाणें मान्यता ठरवीत असतो. भौतिकशास्त्रज्ञ तर हें कांहीं च मानीत नाहींत. ते सर्व जड च मानतात. मग त्या जडांतून चैतन्य कसें निर्माण होईल? हा हि एक प्रश्न च आहे. सर्व कांहीं पूर्वकर्मानुसार होतें असें हि मानलें जातें? तें पूर्वकर्म केव्हांपासून मानायचे? जीव पहिल्यांदाच उत्पन्न झाला तेव्हां त्याला पूर्वकर्म कुठलें? तो जडापासून झाला तर त्याचें जाड्य हें च पूर्वकर्म आणि जाड्य जसजसें जाईल तसतसें त्याचें विकसन होईल असें हि उत्तर देतात. सत्कर्म हे चेतनलक्षण असून दुष्कर्म हे जाड्यलक्षण असें हि म्हणतात. चौऱ्यांशी लक्ष योनी आहेत असें म्हणतात तें खरें काय? आसुरी आणि दैवी संपत्ति मानल्या जातात. त्या मूलतः कशा निर्माण झाल्या? या सर्व प्रश्नांचें उत्तर हर्बर स्पेन्सरनें अज्ञेयवाद सांगून दिला आहे. हें तरी ज्ञेय झालेंच. सर्वच कांहीं अज्ञेय नाहीं. अशी त्यावर पूज्य विनोबांनीं कोटी केली आहे. सारांश या गूढ प्रश्नांचें उत्तर देणें सोपें नाहीं, शक्य नाहीं. जरूरी हि नाही. गीतेचें उत्तर सरळ आहे—

**अव्यक्तादीनि भूतानि व्यक्तमध्यानि भारत**
**अव्यक्तनिधनान्येव तत्र का परिदेवना ।**

सर्व च अव्यक्त आहे. पण पुढें प्रश्न विचारला जाईल कीं पू. विनोबाजी पूर्वजन्म, पुनर्जन्म मानीत होते कीं नाहीं?—उत्तर होय. ते पूर्वजन्म पुनर्जन्म, मानीत होते. पण तसे न मानणारे पू. विनोबांचे विरोधी असें हि म्हणतां येणार नाहीं. ते तेवढें मत सोडून त्यांचें अनुयायी हि मानले जाण्याला कांहीं हरकत नाहीं. विनोबा ईश्वर मानीत होते का? होय, ते ईश्वर मानीत होते. पण ईश्वर न मानणारें अनेक जैन-बुद्धांसारखे महान्

अनुक्रमणिका

संप्रदाय आहेत त्याचें काय? तर ईश्वर न मानणें हा हि कांहीं विनोबांच्या मार्गानें न जाणारा असें म्हणतां येणार नाहीं. ईश्वर अस्ति नास्ति दोन्ही स्वरूपाचा आहे असें गीतेनें च म्हटलें आहे. नीतिमार्गानें जो जाईल तो ईश्वर मानो न मानो. पूर्वजन्म मानो न मानो, अवतार मानो व न मानो. तो नीतितत्वे मानतो ना? त्याप्रमाणें चालण्याचा अटोकाट प्रयत्न करतो ना? सामूहिकता, परस्पर सहकार्य, मर्यादा सज्जनता, परोपकार, दुःखितांची, गुरुजनांची, शक्य तितक्यांची सेवा करण्याची बुद्धि राखतो ना? म्हणजेच सत्य अहिंसेवर त्याचा भरंवसा आहे ना? हा मुख्य प्रश्न आहे. पू. विनोबाजींनीं तर सत्य, सेवा, संयम ही जीवनाची त्रिसूत्री सांगितलेली आहे. त्या दृष्टीनें विरोधकांची, दुष्टांची हि सेवा करावयाची, दुष्टतेशी सहकार करावयाचा नाहीं. हृदय-परिवर्तन, परिस्थिति-परिवर्तन आपलें व सर्वांचें सेवेनें करावयाचें हें च गांधी-विनोबांचें सांगणें होते. असार टाकून सार घ्यावयाचें. सत्याग्रहाचा प्रसंग आला तर सत्यग्राही बनून तो करावयाचा. ही सर्व शिकवण जर मनुष्यमात्रानें गिरवली, प्राणिमात्रावर उपकार आणि दयादृष्टि ठेवली, तर आपल्या जीवनाचा उपयोग होईल. हें सर्व जीवन जन्मापूर्वी आणि मरणानंतर कसें हि असो, असो किंवा नसो, सूक्ष्मदेह, लिंगदेह असो किंवा नसो, हा देह तर प्रत्यक्ष आहे ना तर त्याचें सार्थक करून घेण्याचा मार्ग हजारो वर्षांपासून ऋषिमुनींनीं सांगितला तो आचरणें हें च आपलें कर्तव्य नाहीं का? हें ध्यानांत घेतलें पाहिजे. याशिवाय येथें आणखी कांहीं लिहिण्याजोगें नाहीं. विनोबा-गांधींचा जयजयकार करणारे करोत, न करणारे न करोत आपण तटस्थपणानें सर्वांविषयीं समानभावानें, सेवाभावानें, नीतिमार्गानें जर गेलों तर त्यांत सर्व कांहीं आलें असें म्हणतां येईल. पू. विनोबाजींच्या महापरिनिर्वाणांतून उत्पन्न झालेले प्रश्न हि येथें महापरिनिर्वाणाप्रत पावले आहेत असें म्हणण्याला हरकत नाहीं, तेव्हां त्यांना सर्वांना, प्राणिमात्राला नमस्कार करून हें च म्हणावयाचें कीं—

**सर्वत्रः सुखिनः सन्तु सर्वे सन्तु निरामयाः**
**सर्वे भद्राणि पश्यन्तु मा कश्चित् दुःखमाप्नयात्**

●●●

अनुक्रमणिका

# पत्रांजली

१) तत्त्वज्ञान विद्यापीठ ६/८ विलसन स्ट्रीट, विमल ज्योति,
२ फ्लोअर, व्ही. पी. रोड, बॉम्बे-४०० ००४.
श्रद्धेय शिवाजीराव भावेजी,
सविनय प्रणाम,

आत्मीय विनोबाजीके देहांतका समाचार सुनकर विषाद हुवा. इतनी उच्च आत्मा विलीन हुई उसकी व्यथा विश्वमें रहनेवाले हमारे जैसे हजारों को हुई है. उन्होनें युगपरिवर्तन करने की भारी कोशिश की. वे तो भगवान के पास चले गये. उसका आनंद उन्हें है. प्रभू को भी है. दुःख मात्र हमें है. इसलिये विश्व के सभी स्वाध्यायी भगवान् के पास प्रार्थना करतें हैं.

“भारतीय संस्कृतिकी रक्षा करने के लिये किसी को भेज दो”

मुझे उस महान् आत्माकी अंतिम यात्रा में आने की इच्छा थी. लेकिन कार्यव्यावृताके कारण आ नहीं सकता हूं. उसकी गहरी व्यथा अंतःकरण में है. आपके लिये तो वे जीवनका सर्वस्व थे. आपकी मनस्थिति अतिकठिन होगी. आप को किन शब्दों में आश्वासन दूं? मैं आपके दुःख में सहभागी हूं.

पांडुरंग शास्त्री.
सी-६२, नितिबाग, न्यू दिल्ली-४९,
ता. १६-११-८२.

२)
श्री. शिवाजी भावे यांसी

श्री. विनोबाजी काल अनंतांत विलीन झाले. त्यांनीं तसा निर्णय च घेतलेला होता. त्याबद्दल आम्हीं काय लिहावें? सामान्य माणसाप्रमाणें आम्हांला अत्यंत वाईट वाटलें.

जगाच्या कल्याणा संतांच्या विभूति। देह कष्टविती उपकारें ॥
असा माणूस पुन्हां या भारतात उत्पन्न व्हावयाला किती वर्षे लागतील कुणी सांगावें?

भूदानयज्ञाच्या आंदोलनांत मी त्यांना पुढील श्लोकपद्यानें नमन केलें होतें. ते च श्लोक पुन्हा उद्धत करून त्यांना हे शेवटचें नमन करतो.

**येनार्चितेव पितृभूःअरनां/ध्रिपक्षैः**
**सर्वोदयाख्यसुविचारविसारणाय ।**
**तस्मै नमःसुमहते/स्तु अतिमानुषाय**
**भूदानयनमनकाय विनायकाय ॥**

अनुक्रमणिका

आपला
वामन शिवदास बारलिंगे.

३)

आशीर्वाद
५४, शाहूनगर, जळगांव
दि.१५-११-८२.

मा. श्री. शिवाजीराव भावे, यांस सादर प्रणाम.

आज, विनोबाजी गेले. आपली इच्छा पूर्ण करून अनेकांना दुःखी करून त्यांनीं मरणाला मिठी मारली. त्यांच्या आवडत्या प्रभूला त्यांनीं दीर्घालिंगन दिलें. आम्हां सामान्यांच्या दृष्टीनें ती जीवा-शिवाची भेट झाली. आपल्या व्यक्तिगत जीवनाच्या दृष्टीनें विचार करता आपल्या थोरल्या व धाकट्या बंधूंनीं त्यांच्या कार्याची व विचारांची ठेव सांभाळण्याची जबाबदारी आपणावर सोपवून ते गेले.

विनोबा—

शरीरानें दधीची होते.
बुद्धीनें ज्ञानेश्वर होते.
कार्यानें अगस्त्य होते.
विचाराने वेदांती होते.
आचारानें कर्मयोगी होते.
आणि सर्वतोपरी स्थितप्रज्ञ होते.

त्यांचें जीवन तात्त्विक, विशाल व अगाध होते. तसेच त्यांचें मरण हि आम्हां सामान्यांना अद्‌भुत झाले! मनांत जें येत आहे तें कसें व किती लिहावं ही च खरी अडचण आहे. यापेक्षा मनांतलें मनांत ठेवून होणारे क्लेश सहन करण्याची मनधरणी हेंच योग्य वाटतें. विनोबाजींना हीच मान्य श्रद्धांजलि.

आपला विनीत
(मुकुंद छापेकर) मु. द. छापेकर

—अशी अनेक थोरामोठ्यांची पत्रे आली.

●●●

अनुक्रमणिका

# समापन

**[ब्रह्मचर्य, ब्रह्मजिज्ञासा, ब्राह्मीस्थिति, ब्रह्मविहार, ब्रह्मविद्यामंदिर, ब्रह्मनिर्वाण]**

प्रस्तुत लेखकावर अनेकांचे उपकार झाले आहेत. त्या सर्वांचा ऋणनिर्देश करणें अशक्य आहे. ती नामावली फारच मोठी होईल. तें जणूं सहस्रनामाचें सहस्रनाम होईल.

तरी पण आई, बा, बापूजी, विनोबाजी, बाळकोबाजी यांचा निर्देश केल्यावाचून राहवत नाहीं.

या सगळयांचें ऋण असलें तरी तें ओझें नाहीं. तर तें ऋण वाढत च जावें, जन्मोजन्मी वाढत जावें असें वाटतें.

हा एवढा सत्संग आमच्या आईपासून सुरू झाला तो अजून पुढें चालूंच आहे. ब्रह्मविद्या मंदिरांत त्याची समाप्ति झालेली नाहीं. त्या सर्व सत्संगाचा मजवर कांहींना कांहीं परिणाम झालेला च असणार. पण तें सर्व सोडून मी इतकेंच म्हणतों—

**झाली सौंदर्यसीमा तव वपु घडतां शिल्पसीमा विधीची ।**<br>
**झाली माधुर्यसीमा मुखकमळभवा वाक्यमुक्ताफळांची ॥**<br>
**दोर्दंडीं शौर्यसीमा पदकमळवरी दीनसंतारणाची ।**<br>
**झाली मद्‌भाग्यसीमा तव गुणगणनीं योजितां बुद्धि साची ॥**

●●●

अनुक्रमणिका

# पूज्य विनोबाजींचे चरित्रकार

[चरित्रकार लेखकांचीं यादी]

| | | |
|---|---|---|
| (१) | विनोबाजी भावे | साने गुरुजी |
| (२) | परिणत प्रज्ञ विनोबाजी भावे | पुरूषोत्तम मावळंकर |
| (३) | विनोबा (जीवन झांकी) | ब्रिजलाल बियाणी |
| (४) | आचार्य विनोबा भावे | मनोहर महादेव केळकर |
| (५) | साम्ययोगी विनोबा | प्रबोध चोक्सी, नारायण देसाई |
| (६) | तपोवन विनोबा | बाबूराव जोशी |
| (७) | संत विनोबा | बाबूराव जोशी |
| (८) | आचार्य विनोबा | वी. वी. भागवत |
| (९) | विनोबा दर्शन | श्री. भारदे |
| (१०) | विनोबा जीवन-दर्शन | तरूण भाई |
| (११) | विनोबा जीवनी | जगदीश प्रसाद यादव |
| (१२) | संत विनोबा | देसाई भाई पटेल |
| (१३) | साम्ययोगी विनोबा | वसंत नारगोलकर |
| (१४) | विनोबा | विरेन्द्र गुहा |
| (१५) | विनोबा | ठाकूरदास बंग |
| (१६) | विनोबा भावे | यदुनाथ थत्ते |
| (१७) | महर्षि विनोबा | अमृत मोदी |
| (१८) | आचार्य विनोबा | ब्रज मोहन दासगुप्त |
| (१९) | विनोबांचे जीवनमंत्र | दा. न. शिखरे |
| (२०) | विनोबा के जीवन प्रसंग | मीरा भट्ट |
| (२१) | विनोबा जीवन और कार्य | कान्ती शाह |
| (२२) | युग यात्री | रमाकान्त पाटील |
| (२३) | गांधी टू विनोबा | लांजा-देल-वास्तो |
| (२४) | सेंट आन द मार्च | हॅलम टैनिसन |
| (२५) | विनोबा एन्ड भूदान | जगदीश शरण शर्मा |
| (२६) | विनोबा हिज लाईफ एन्ड वर्क | श्रीमन्नारायण |
| (२७) | व्ही फार विनोबा | बी. आर. मिश्रा |
| (२८) | विनोबा एन्ड हिज मिशन | सुरेश रामभाई |

अनुक्रमणिका

| | | |
|---|---|---|
| (२९) | एनेक्डोटस ऑफ विनोबा | ए. व्ही. बर्वे |
| (३०) | विद विनोबा | डोनाल्ड जी. ग्रुम |
| (३१) | विनोबा मैन एन्ड मैसेज | सुरेश रामभाई |
| (३२) | प्रोग्रेस ऑफ ए पिलग्रीमेज | सुरेश रामभाई |
| (३३) | विनोबा | प्रल्हाद केशव अत्रे |
| (३४) | पावन प्रसंगो | नारायण देसाई |
| (३५) | भूदान यज्ञ | बबलभाई मेहता |
| (३६) | काकाजी, बापू, विनोबा | कमलनयन बजाज |
| (३७) | विनोबा की ज्ञान गंगा में | डॉ. ज्ञानवती दरबार |
| (३८) | विनोबांच्या सहवासातलें माझे बालपण | बाळकोबा भावे |
| (३९) | विनोबाजींच्या सहवासात | निर्मला देशपांडे |
| (४०) | विनोबांची भारत यात्रा | निर्मला देशपांडे |
| (४१) | क्रांतीच्या वाटेवर | निर्मला देशपांडे |
| (४२) | क्रांतीच्या दिशेने | कुसुम देशपांडे |
| (४३) | पावन प्रसंग | मृदुला मूंदडा |
| (४४) | विनोबा के साथ सात दिन | श्रीमन्नारायण |
| (४५) | भूदान गंगोत्री | दामोदरदास मूंदडा |
| (४६) | सर्वोदय पदयात्रा | दामोदरदास मूंदडा |
| (४७) | संत विनोबा की उत्तर भारत यात्रा | दामोदरदास मूंदडा |
| (४८) | विनोबा और सर्वोदय क्रांती | काकासाहेब कालेलकर |
| (४९) | संत विनोबा की आनन्द यात्रा | सुरेश रामभाई |
| (५०) | विनोबांची पूर्व पाकिस्तान यात्रा | चारु चौधरी |
| (५१) | चम्बल के बेहडो में | श्रीकृष्ण दत्त भट्ट |
| (५२) | नक्षत्रो की छाया में | श्रीकृष्ण दत्त भट्ट |
| (५३) | विनोबा सम्वाद | ब्योहार राजेन्द्रसिंह |
| (५४) | विनोबाजीना सानिध्यमा | कान्ति शाह |
| (५५) | बाबा विनोबा | श्रीकृष्ण दत्त भट्ट |
| (५६) | विनोबा और भूदान | सुरेश रामभाई |
| (५७) | पूज्य विनोबाजींच्या जंगम विद्यापीठात | कुंदर दिवाण |
| (५८) | तूफान यात्रा | सुरेश रामभाई |
| (५९) | विनोबा विचार दर्शन | यदुनाथ थत्ते |
| (६०) | विनोबांची साहित्य दृष्टी | अ. ना. देशपांडे |

अनुक्रमणिका

| | | |
|---|---|---|
| (६१) | विनोबांचे इतिहास विचार | कृ. द. बेदरकर |
| (६२) | विनोबा विचार संकलन | डॉ. विश्वनाथ टंडन |
| (६३) | सिलेक्शनज फ्रॉम विनोबा | डॉ. विश्वनाथ टंडन |
| (६४) | विनोबा व्यक्तीत्व और विचार | सस्ता साहित्य मंडल |
| (६५) | विनोबाजी और मृत्यु | वसंत नारगोलकर |

इतके ग्रंथ लहान-मोठे भिन्न भाषांतले, भिन्न भिन्न प्रसंग व चरित्र-संवाद इ. सांगणारे मजजवळ आहेत. आणखी हि असतील. त्यांत साने गुरुजींनीं प्रथम चरित्र लिहिले.

●●●

अनुक्रमणिका

# विनोबा - साहित्य - सूची

## (मराठी)

**परंधाम प्रकाशन, पवनार, वर्धा (महा.)**

| | रुपये |
|---|---|
| गीताई (छोटी) | १ ७५ |
| गीताई (ठळक) | ३ २५ |
| गाता-प्रवचनें | ८ ०० |
| गीताई-चिंतनिका | ७ ०० |
| साम्यसूत्रें | ० ३१ |
| स्थितप्रज्ञ-दर्शन | ५ ०० |
| ज्ञानदेवांचीं भजनें | ७ ०० |
| एकनाथांचीं भजनें | ३ ०० |
| नामदेवांचीं भजनें | ३ ५० |
| तुकारामाची भजनें | ८ ०० |
| रामदासांची भजनें (अप्राप्य) | १ ०० |
| नाममाला | १ ५० |
| अभंग-व्रतें | ० ५० |
| महाराष्ट्रांत विनोबा—भाग १ ते ४ (अप्राप्य) | १ २५ |
| गुरुबोध | ६ ०० |
| दीक्षा | १ ५० |
| मधुकर | ६ ०० |
| मनुशासनम् | ३ ०० |
| ख्रिस्तधर्म - सार | ७ ०० |
| धम्मपदं (नव-संहिता) | ८ ०० |
| कुराण - सार | ८ ०० |
| उपनिषदांचा अभ्यास (अप्राप्य) | .. |
| अष्टादशी | १० ०० |
| ऋग्वेद - सार | १० ०० |

अनुक्रमणिका

## (हिंदी)

### सर्व सेवा संघ प्रकाशन, राजघाट, वाराणसी (उ. प्र.)

| | रुपये |
|---|---|
| भूदान गंगा—भाग १ ते ८ (अप्राप्य) | २ ५० |
| जपुजी | २ ०० |
| मोहब्बत का पैगाम (अप्राप्य) | २ ५० |
| जीवन-दृष्टि | ४ ०० |
| आश्रम - भजनावलि | २ ०० |
| भागवत - धर्म - मीमांसा | १० ०० |

●●●

अनुक्रमणिका

# विनोबांचा जीवन पट

| | |
|---|---|
| ११ सप्टेंबर १८९५ | गागोदा (जि. कुलाबा) येथे जन्म; आजोबा-आजींच्या सहवासात राहणें. |
| १९०५ | बडोदा येथे वैज्ञानिक दृष्टीचे पिता आणि भक्तहृदयाची यांच्या आईच्या सहवासात : विद्यार्थी मंडळाची स्थापना. |
| २५ मार्च १९१६ | ब्रह्मजिज्ञासेने दोन मित्रासोबत गृहत्याग : काशीनिवास. |
| ७ जून १९१६ | गांधीजींकडे कोचरब आश्रमात प्रवेश. |
| १९१६ ते १९१७ | वाईला नारायणशास्त्री मराठे यांच्याकडे दर्शन-ग्रंथांचा अभ्यास. |
| १९१८ | आईचा मृत्यु : वेदाध्ययनास आरंभ. |
| ८ एप्रिल १९२१ | वर्धा येथे सत्याग्रहाश्रमाच्या संचालनार्थ आगमन (तेव्हा आश्रम मगनवाडीस होता). |
| जानेवारी १९२३ | महाराष्ट्रधर्म मासिकातून उपनिषदांवर लेखमाला सुरू. |
| १३ एप्रिल १९२३ | नागपूर झेंडा सत्याग्रहाचें संचालन : चार महिन्याची सजा. |
| डिसेंबर १९२३ | सत्याग्रहाश्रमाचे महिलाश्रमाच्या जागेत स्थानांतर. |
| १९२४ | कताई-विणाईत वैज्ञानिक प्रयोग व संशोधन कार्य. |
| जून १९२६ | दोन आण्यात आहाराचा प्रयोग. |
| ७ ऑक्टोबर १९३० | गीताई लेखनास आरंभ. |
| ७ जानेवारी ते १४ जुलै १९३२. | धुळे जेल : गीताईचें जमनालालजीद्वारा प्रथम प्रकाशन. |
| २१ फेब्रुवारी १९३२ | गीतेवर प्रवचनें सुरू. |
| १९३२ | वर्धा : १४ केंद्रें स्थापून आश्रमवासीतर्फे ग्राम-रचना. |
| २५ डिसेंबर १९३२ | नालवाडी निवास : एकादश-व्रतमालेची रचना. |
| ६ मे १९३४ | ग्रामसेवा मंडळाची स्थापना. |
| ७ जून १९३५ | मजुरीच्या क्षेत्रात प्रयोग : रोज १६ लटी सूतकताई : कुराणशरीफच्या अभ्यासास आरंभ. |
| मे १९३६ | महारोगी सेवा मंडळाच्या स्थापनेस प्रेरणा : कुष्ठसेवेत प्रथमच भारतीय संस्थेचें पदार्पण. |
| मार्च १९३८ | गांधीजींच्या आदेशानुसार स्वास्थ्य सुधारासाठी पवनारला आगमन : खोदतांना विनोबांना भरत - राम - मूर्ति लाभली. |
| १७ ऑक्टोबर १९४० | गांधीजींनी विनोबांना प्रथम सत्याग्रही घोषित केलें. ‘अभंगव्रतें’ पुस्तकातील पांच व्रतांवर लेखन, ‘स्वराज्यशास्त्र’ पुस्तकाची रचना. |
| ९ ऑगस्ट १९४२ | जेल-निवास : दक्षिणेच्या चारी भाषांचें अध्ययन; लोकनागरी लिपीचा शोध; ‘ईशावास्य-वृत्ति’ चें लेखन ईशोपनिषदचें मराठी भाषांतर. ‘स्थितप्रज्ञ दर्शन.’ |

अनुक्रमणिका

| | |
|---|---|
| ते ९ जुलै १९४५ | |
| १९४५-४६ | गीताई शब्दार्थ कोशाची रचना. |
| १९४६-४७ | ज्ञानदेवांच्या भजनावर चिंतनिका. |
| २ एप्रिल १९४६-४८ | सुरगांव येथे नियमित ३ तास भंगीकाम. |
| १५ जानेवारी १९४८ | 'सेवक' मासिकास आरंभ. |
| १३-१५ मार्च १९४८ | सर्व सेवा संघाची स्थापना. |
| ३० मार्च १९४८ | निर्वासितांच्या पुनर्वसन आणि शांतिकार्यास आरंभ. |
| १५ ऑगस्ट १९४९ | 'सर्वोदय' मासिकास आरंभ व संपादन. |
| १ जानेवारी १९५० | पवनार आश्रमात 'कांचनमुक्ति व ऋषिशेती' चा प्रयोग. |
| ७ मार्च १९५१ | शिवरामपल्ली (आंध्र) स जाण्यासाठी पदयात्रा आरंभ. |
| १५ एप्रिल १९५१ | अशांति शमनार्थ तेलंगणाची पदयात्रा. |
| १८-१९ एप्रिल १९५१ | पोचमपल्ली येथे श्री. रामचंद्र रेड्डी द्वारा प्रथम शंभर एकरांचें भूदान : भूदानयज्ञ शुभारंभ. |
| १९ जानेवारी १९५२ | 'नाममाला' पद्याची रचना. |
| १९ डिसेंबर १९५३ | वैद्यनाथधाम (संथाल परगना, बिहार) येथील मंदिरात पंड्यांनी हल्ला केला. विनोबांचा एक कान यात गेला. |
| १८ एप्रिल १९५४ | बोधगया येथे समन्वय आश्रमाची स्थापना. |
| २० एप्रिल १९५४ | जयप्रकाश - विनोबांचें 'भूदान-मूलक' ग्रामोद्योग-प्रधान, अहिंसक क्रांतीसाठी जीवन समर्पण.' |
| १० जानेवारी १९५५ | 'सामूहिक समाधि' चें दर्शन. |
| २१ मार्च १९५५ | जगन्नाथपुरीच्या मंदिर-प्रवेशास बंदी. |
| १५ मार्च १९५७ | कन्याकुमारी येथे ग्रामस्वराज्याची प्रतिज्ञा आणि संकल्प. |
| २३ ऑगस्ट १९५७ | (मंजेश्वरम, केरळ) शांतिसेनेची स्थापना. |
| २१-२२ सप्टेंबर १९५७ | येलवाल (कर्नाटक) सर्वपक्षीय ग्रामदान परिषद. |
| १५—१९ ऑक्टोबर | विश्वनीडम् आश्रमाची स्थापना. |
| १ नोव्हेंबर १९५७ | 'जयजगत्' चा प्रथम उद्घोष. |
| १ फेब्रुवारी १९५८ | (धारवाड) सर्वोदय-पात्राची घोषणा. |
| २८ मे ते ३ जून १९५८ | (पंढरपूर) प्रथमच पंढरपुरात आगमन. २९ ला विठोबाच्या मंदिरात सर्वधर्मियांसह प्रवेश. |
| १ मार्च १९५९ | अजमेर दर्गाशरीफमधे महिलासह प्रवेश : सर्व-धर्म प्रार्थना. |
| १३ मार्च १९५९ | काशी का वास (राजस्थान) ब्रह्मविद्या मंदिराचें उद्घाटन. |
| ११ जुलै १९५९ | पीर-पंजाल साडेतेरा हजार फुटावरील चढाई. |
| २३ सप्टेंबर १९५९ | (पठाणकोट) प्रस्थान आश्रमाची परिकल्पना. |

अनुक्रमणिका

| | |
|---|---|
| १९ मे १९६० | भिंडच्या डाकुक्षेत्रात १९ डाकूंचे आत्मसमर्पण. |
| १५ ऑगस्ट १९६० | (इंदौर, म. प्र.) विसर्जन आश्रमाची स्थापना. |
| जानेवारी १९६१ | बोधगयेला बुद्धमंदिरात 'धम्मपद नवसंहिता' पाठ. |
| ५ मार्च १९६२ | (लीलाबारी, आसाम) मैत्री आश्रमाची स्थापना. |
| ५ ते २० सप्टेंबर १९६२ | पूर्व पाकिस्तान (आजचा बंगला देश) यात्रा. |
| २५ एप्रिल १९६३ | आरामबाग (प. बंगाल) सुलभ ग्रामदानाचा अविष्कार. |
| जून १९६३ | 'कुराण-सार' चा उद्घाटन समारोह. |
| ६ एप्रिल १९६४ | (सेवाग्राम) मुफ्त-विणाई योजनेची घोषणा. |
| १० एप्रिल १९६४ | १३ वर्षे ३ महिने ३ दिवसानंतर प्रथमच आश्रम प्रवेश. |
| १२ फेब्रुवारी १९६५ | भाषिक दंगलींच्या शमनार्थ उपोषण. |
| २४ ऑगस्ट १९६५ | बिहारमध्ये मोटरने ग्रामदानार्थ तूफानयात्रा. |
| ८ मार्च १९६८ | कहलगांव (भागलपुर जिल्हा) आचार्यकुलाची स्थापना. |
| ११ सप्टेंबर १९६८ | 'अभंग व्रतें' पुस्तिकेच्या' अन्य अभंगाची पूर्ति. |
| २६ ऑक्टोबर १९६८ | बोधगया 'ऋगवेद-सार' च्या निवडीची समाप्ति. |
| १५ जुलै १९६९ | रांची (बिहार) अष्टादशीच्या निवडची समाप्ति. |
| २३ सप्टेंबर १९७० | ब्रह्मविद्या मंदिरात स्थिर राहण्याचा निर्णय. |
| ४ ऑक्टोबर १९७० | अमृत महोत्सव समारोह. |
| ७ ऑक्टोबर १९७० | क्षेत्र-संन्यास जाहीर. |
| १६ मार्च १९७२ | ग्रंथ-मुक्ति. |
| ११ सप्टेंबर १९७३ | उपवास-दानाचा शुभारंभ. |
| २५ डिसेंबर १९७५ | वर्षभराच्या मौनाची समाप्ति. |
| ३१ मे १९७६ | गोहत्या-बंदीसाठी आमरण उपवासाची जाहीर घोषणा. |
| २२—२६ एप्रिल १९७९ | गोहत्या बंदीसाठी उपोषण. |

अनुक्रमणिका



शासकीय मुद्रणालय नागपूर

अनुक्रमणिका